मागासलेपणाची नेमकी व्याप्ति व अनुशेषाची सद्यस्थिती ठरविण्यासाठी, त्यावेळी दांडेकर आयोगाचा अहवाल १० वर्षे जुना असल्याने, राज्यपालांनी 'निर्देशांक व अनुशेष समिती' म्हणून संबोधली जाणारी एक समिती नेमली. उक्त समितीने आपला अहवाल १९९७ मध्ये सादर केला. शासनातील काही विशिष्ट विभागांकडून या अहवालावर विविध आक्षेप घेण्यात आल्यामुळे राज्यपालांनी समिती पुनर्घटित केली आणि या आक्षेपांवर काळजीपूर्वक विचार करून पुढील अहवाल सादर करण्यास सांगितले. या पुनर्घटित निर्देशांक समितीने आपला अंतिम अहवाल दि.२७ सप्टेंबर, २००० रोजी सादर केला. हा अहवाल राज्यपाल व महाराष्ट्र शासनाने स्वीकारला. शासनाने देखील स्पष्टपणे असे नमूद केले की, १९९४ मध्ये असल्याप्रमाणे विद्यमान अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करताना कोणताही नवीन अनुशेष निर्माण होणार नाही याबाबत काळजी घेण्यात यावी.

पूर्वीच्या निर्देशांक व अनुशेष समितीने १ एप्रिल, १९९४ रोजी रु.१५,३५६ कोटी इतक्या रकमेचा अनुशेष अंदाजित केला होता. पुनर्घटित निर्देशांक व अनुशेष समितीने संबंधित विभागांची मते विचारात घेतल्यानंतर अनुशेषाचे पुनर्निर्धारण केले आणि १ एप्रिल, १९९४ रोजी असल्याप्रमाणे रु.१४००७ कोटी इतके वित्तीय अनुशेषाचे ठरीव प्रमाण परिगणित केले. समितीने दर्शविलेली वित्तीय अनुशेषाची प्रदेश-निहाय विभागणी तक्ता १:१ मध्ये दिली आहे.

तक्ता १:१ वित्तीय अनुशेषाची प्रदेशनिहाय विभागणी

(रुपये कोटीत)

अनुक्रमांक	प्रदेश	वित्तीय अनुशेष	टक्केवारी
१	२	३	४
१	विदर्भ	६६२४	४७.६०
२	मराठवाडा	४००५	२८.७७
३	उर्वरित महाराष्ट्र	३३७८	२३.६३
	एकूण	**१४००७**	**१००.००**

निर्देशांक व अनुशेष समितीच्या आधारे, अनुशेष दूर करण्यासाठीचे नियतवाटप, वार्षिक योजना २००१-०२ मधून प्रथम करण्यात आले होते. राज्यपालांनी असेही निदेश दिले की, १९९४-९५ या वर्षापासून १९९९-२००० या वर्षापर्यंत अगोदर करण्यात आलेला खर्च व २०००-०१ या वर्षाचा अनुशेष दूर करण्यासाठी केलेले नियतवाटप विचारात घेऊन, १ एप्रिल, २००१ रोजी असल्याप्रमाणे उर्वरित अनुशेष २००१-०२ या वर्षापासून सुरू होणाऱ्या ५ वर्षांच्या कालावधीत भरून काढण्यात यावा. तथापि, ५ वर्षांच्या या कालावधीत अनुशेष भरून काढता आला नाही आणि म्हणून वार्षिक योजना २००९-१० साठी माननीय राज्यपालांनी जे निदेश दिले त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले :

"१९९४ मध्ये अंदाजित केल्याप्रमाणे चालू वित्तीय अनुशेष भरून काढण्यात आल्यानंतर, निर्देशांक व अनुशेष समितीने सुचविलेल्या समान निर्देशांकांचा वापर करून १ एप्रिल, १९९४ नंतर आताच्या दिनांकापर्यंत निर्माण झालेल्या अनुशेषाचे निर्धारण करता येईल. या व्यवस्थेतील उणीव अशी आहे की, अनुशेष दूर करण्याचा मुद्दा मुक्त व गतिशील राहतो. याचे कारण असे की, विद्यमान वित्तीय अनुशेष दूर झाल्यानंतर राज्याच्या सरासरीत वाढ होणे अटळ आहे आणि काही जिल्हे राज्याच्या सरासरीत खाली राहणे अटळ आहे म्हणून, राज्याच्या सरासरीच्या संकल्पनेवर आधारित अनुशेष दूर करण्याची ही प्रक्रिया निरंतर चालणारी प्रक्रिया असून ती गरजाधारित नाही.

निर्देशांक व अनुशेष समितीने, आपल्या विश्लेषणातून खाजगी स्वरूपातील गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करून केवळ सार्वजनिक गंतवणूकच विचारात घेतली होती. परंतु, नव्याने उदयास येणाऱ्या परिस्थितीनुरूप पायाभूत सोयीसुविधा (रस्ते व सिंचन) या सारख्या क्षेत्रांमधील खाजगी क्षेत्रांची भूमिका दुर्लक्षित होऊ शकत नाही. आता सामाजिक-आर्थिक क्षेत्रातील नवीन विकासाच्या बाबी विचारात घेऊन अनुशेषांच्या निर्धारणाचा मुद्दा पुन्हा तपासणे आवश्यक आहे.

अनुशेषाच्या निर्धारणाच्या विद्यमान पध्दतीत, समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्याच्या दृष्टीने प्रदेशांची गरज आणि विकासाच्या संधी या बाबी विचारात न घेता, सर्व प्रदेश विकासाच्या समान स्तरावर आणावयाचे आहेत, अशी अट घातली जाते. विद्यमान पध्दतीत, असे उदाहरण देता येईल की, सिंचन क्षेत्रातील चालू प्रकल्पाच्या नियत वाटपाकरिता काही विशेष सवलती दिल्या जात असताना, एका विशिष्ट प्रदेशाची अंदाज न घेतलेली सिंचन क्षमता उपयोगात आणण्यास फारच थोडा वाव आहे.

शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न, सुधारित दर्जाचे जीवनमान आणि सर्वसमावेशक वृध्दी यांसाठी सिंचन अनुशेष भरून काढण्याच्या प्रयत्नांबाबत कोणताही परिणामकारक निर्धारणाचा अभ्यास करण्यात आला नाही. हे अत्यावश्यक आहे की, अनुच्छेद ३७१ (२) च्या तरतुदीअन्वये करण्यात येत असणाऱ्या प्रयत्नांतून विकास घडून येत असल्याबाबत तार्किक प्रचिती येत असल्याबाबत खात्री करून घ्यावी."

तसेच, माननीय राज्यपालांनी दि.१९ मार्च,२०१० रोजी निर्गमित केलेल्या वार्षिक योजना २०१०-११ च्या निदेशांमध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :-

"१९९४ चा वित्तीय अनुशेष २०१० या वर्षापर्यंत म्हणजे जवळजवळ १६ वर्षानंतर भरून काढणे अपेक्षित आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, १९९४ यावर्षी असलेला उर्वरित अनुशेष भरून काढण्यासाठी एक निश्चित मुदत मर्यादा आखून घेणे अडचणीचे ठरेल. या प्रक्रियेतील वाढत जाणारा खर्च व वेळ यामुळे ही बाब अधिक गुंतागुंतीची ठरू शकेल. म्हणून, वित्तीय अनुशेष भरून काढल्यानंतर देखील निर्देशांक व अनुशेष समितीच्या १९९४ च्या अहवालात अभिप्रेत असल्याप्रमाणे अनुरूप सिंचन सुविधेची निर्मिती, राज्याच्या वित्तीय नियोजनावर महत्वपूर्ण वचक ठेवल्याशिवाय साध्य करणे कठीण होईल. कदाचित त्यासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांच्या कायदेशीर मागणीकडे दुर्लक्ष करून अनेक वर्षांपासून राज्याच्या निधीतील एका मोठ्या हिश्श्याचे सिंचनासाठी नियत वाटप करण्यात आले. त्यामुळे राज्याचे नियोजनच बदलले. इतर क्षेत्रांच्या परिव्ययाने इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष करून एकाच क्षेत्रावर भर देणे इष्ट नाही.

दि.२७ मे, २००९ च्या निदेशांमध्ये निदर्शनास आणून देण्यात आल्याप्रमाणे, १९९४ मध्ये अंदाजित केल्यानुसार अनुशेष भरून काढल्यानंतर, निर्देशांक व अनुशेष समितीने सुचविलेल्या समान निर्देशांकांचा वापर करून १ एप्रिल,

१९९४ नंतर आताच्या दिनांकापर्यंत निर्माण झालेल्या अनुशेषाचे निर्धारण करण्याचा पर्याय असू शकेल. या व्यवस्थेतील उणीव अशी आहे की, अनुशेष दूर करण्याचा मुद्दा मुक्त व गतिशील राहतो. याचे कारण असे की विद्यमान वित्तीय अनुशेष दूर झाल्यानंतर राज्याच्या सरासरीत वाढ होणे अटळ आहे आणि काही जिल्हे राज्याच्या सरासरीत खाली राहणे देखील अटळ आहे. म्हणून, राज्याच्या सरासरीच्या संकल्पनेवर आधारित अनुशेष दूर करण्याची ही प्रक्रिया निरंतर चालणारी प्रक्रिया असून ती गरजाधारित नाही.

निर्देशांक व अनुशेष समितीने तिच्या विश्लेषणातून खाजगी स्वरूपातील गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करून केवळ सार्वजनिक गुंतवणूकच विचारात घेतली होती. परंतु, नव्याने उदयास येणाऱ्या आर्थिक परिस्थितीनुरूप, पायाभूत सोयीसुविधा (रस्ते, सिंचन व वीज) त्याचबरोबर सामाजिक क्षेत्र (आरोग्य व शिक्षण) यांतील खाजगी क्षेत्राची भूमिका दुर्लक्षित होऊ शकत नाही. अलिकडेच, राज्य शासनाने, रस्ते, पूल, पाटबंधारे यांसंबंधातील बांधकामे व ऊर्जा प्रकल्प यासारख्या काही पायाभूत सोयीसुविधा प्रकल्पांचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारी पध्दतीने हाती घेण्याचे एक धोरण अंगीकारले आहे. सामाजिक क्षेत्रात देखील, खाजगी क्षेत्राकडून मोठया प्रमाणात शाळा, तंत्रविषयक संस्था, अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येत आहेत. खाजगी क्षेत्रातील बहुतांश कामांमधून अधिकतम नफा कमविण्याचा उद्देश आहे. असा नफा मिळणे केवळ तेव्हाच शक्य होते जेव्हा ते क्षेत्र अगोदरच विकसित झालेले आहे. या प्रक्रियेमार्फत विकास साधण्याने, राज्यातील विकसित जिल्हे व मागास जिल्हे यांच्यामधील दरी रुंदावत जाण्याचा अंगभूत धोका दिसून येतो.

मागास क्षेत्रांत पायाभूत सोयीसुविधा पुरविणे व त्यावर लक्ष केंद्रित करणे हा निर्देशांक व अनुशेष समितीचा दृष्टिकोन होता. हा दृष्टिकोन सुनिश्चित निर्देशांकांच्या अनुषंगाने उत्पादकतेत, उत्पन्नात वाढ, आरोग्य व शैक्षणिक दर्जात वाढ आणि एखाद्या व्यक्तीची सर्वांगीण सुस्थिती यांसारख्या गुंतवणुकीच्या निष्पन्नाशी केंद्रीभूत नव्हता. आंतरराष्ट्रीय स्तरावर एखाद्या प्रदेशाच्या विकासाच्या निर्धारणासाठी मानव विकास निर्देशांक (HDI) आणि ज्यात उत्पन्न, आरोग्य, शिक्षण,स्त्री-पुरुष सबलीकरण समानता यांसारख्या घटकांचा संयोग आहे. यासारखे इतर लिंगसंबंधित निर्देश व अनेक नवीन दृष्टिकोन वापरण्यात येत आहेत.

ही निरीक्षणे विचारात घेता, अनुशेषाच्या मुद्याचा आणि साधनसंपत्तीच्या समन्यायी वाटपाची खात्री करून घेण्यासाठी नव्याने सूक्ष्मदृष्टी व समन्वेषणाचा पर्यायी मार्ग स्वीकारून विकासात्मक खर्चाच्या समन्यायी वाटपाच्या मुद्याचा पुन्हा विचार करणे अत्यावश्यक आहे. म्हणून, माननीय राज्यपालांनी, या सर्व तीन प्रदेशातील विविध क्षेत्रांची विद्यमान स्थिती विचारात घेऊन त्या प्रश्नात लक्ष घालण्यासाठी आणि सर्व हितसंबंधित व्यक्तींची मते विचारात घेऊन समतोल प्रादेशिक विकासाच्या मुद्याचा आढावा घेण्यासाठी तज्ञांची एक समिती घटित करण्याचा निर्णय घेतला."

१.१ उच्चस्तरीय समितीची रचना:

माननीय राज्यपालांच्या निदेशांनुसार, राज्यशासनाने, शासन निर्णय क्र.अनुशेष-२००९/सीआर४०५/डी.१४१६, दि.३१ मे,२०११ द्वारे डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समिती घटित केली. तिची रचना पुढे दिल्याप्रमाणे आहे :

१.	डॉ.विजय केळकर	अध्यक्ष
२.	डॉ.अभय पेठे	सदस्य
३.	डॉ.मुकुंद घारे	सदस्य
४.	श्री.विजय बोराडे	सदस्य
५.	डॉ.अभय बंग	सदस्य
६.	श्रीमती कुमूद बन्सल	सदस्य
७.	डॉ.माधव चितळे	सदस्य

८.	डॉ.विनायक देशपांडे	सदस्य
९.	डॉ.श्रीमती संगिता कामदार	सदस्य
१०.	डॉ.दिलीप नाचणे	सदस्य
११.	डॉ.आर.पी.कुरुलकर	सदस्य
१२.	डॉ.व्ही.एम.मायंदे	सदस्य
१३.	महासंचालक, यशदा	सदस्य
१४.	प्रधान सचिव, नियोजन विभाग	सदस्य-सचिव

१.२ समितीपुढील विचारार्थ विषय:

उच्चस्तरीय समितीपुढील विचारार्थ विषय पुढीलप्रमाणे होते:-

(१) प्रादेशिक विकासातील असमतोल अंदाजित करण्यासाठी निर्देशांक (Indicators) निश्चित करणे.

(२) वरील १ च्या संदर्भात, २०१० या वर्षाच्या अखेरीस अलिकडच्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे, राज्य विकास सरासरीच्या संदर्भात विकासातील असमतोल निश्चित करणे. असे करताना, राज्य शासनाची थेट गुंतवणूक/खर्च आणि राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक विचारात घेतली आहे.

(३) सुनिश्चित निर्देशांकांतून ज्याची प्राथम्याने अंमलबजावणी करता येऊ शकेल असे निर्देशांक ठरविणे.

(४) असा सुनिश्चित करण्यात आलेला असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व विकासात्मक निधीच्या नियत वाटपाची तत्त्वे घालून देणे तसेच भविष्यात अनुशेष निर्माण होणार नाही अशा उपाययोजना सुचविणे व यासंबंधात विकास मंडळांची भूमिका सूचित करणे.

(५) समिती, स्वत:च तिच्या कामकाजाची पध्दत निश्चित करील.

१.३. भेटींबाबतचा तपशील.

समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी उच्चस्तरीय समितीस आपला अहवाल मा.राज्यपालांना एक वर्षाच्या आत म्हणजेच मे, २०१२ पर्यंत सादर करण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार, समितीने २२ जून, २०११ रोजीच्या पहिल्या बैठकीमध्ये सर्व महसुली विभागांना द्यावयाच्या भेटीचे वेळापत्रक आखले. या सर्व भेटी फेब्रुवारी, २०१२ पर्यंत पार पाडावयाच्या होत्या. तथापि, विविध अपरिहार्य कारणे लक्षात घेता, समिती ठरविलेल्या वेळापत्रकानुसार महसूल विभागाच्या भेटी पूर्ण करू शकली नाही आणि म्हणून समितीने मार्च, २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत राज्य शासनास विनंती केली. राज्य शासनाने शासन निर्णय क्र.समिती-२०१२/सी.आर.५/डी-१४१६,दि.२० जुलै, २०१२ द्वारे समितीस मार्च, २०१३ पर्यंत मुदत वाढवून दिली. समितीने २०११ च्या जनगणनेत प्रकाशित झालेल्या आकडेवारीच्या आधारे आपल्या शिफारशी करण्याचा निर्णय घेतला. तथापि, सविस्तर आकडेवारी उपलब्ध न झाल्यामुळे समिती विहित कालावधीत आपल्या शिफारशींना अंतिम रूप देऊ शकली नाही आणि म्हणून परत एकदा समितीने जून, २०१३ पर्यंत मुदत वाढविण्यासाठी राज्य शासनास विनंती केली. राज्य शासनाने शासन निर्णय क्र.समिती-२०१२/सी.आर.५/डी-१४१६,दि.३० एप्रिल, २०१३ द्वारे समितीस जून, २०१३ पर्यंत मुदतवाढ दिली. विविध उपगटांकडून मसुदा अहवाल तयार करण्याचे संपूर्ण काम जून, २०१३ अखेरीस पूर्ण करण्यात आले. तथापि, अहवाल फार मोठा असल्यामुळे आणि या अहवालात मोठया प्रमाणात आधारसामग्री अंतर्भूत असल्याने विविध प्रकरणांमध्ये कोणतीही विसंगती राहणार नाही याची खात्री करून घेण्याच्या हेतूने शासनाकडून योग्य मुदतवाढ मागून घेणे सूज्ञपणाचे होते. या अहवालाच्या आधारसामग्रीतील किंवा आता या अंतिम अहवालात करण्यात येत असलेल्या शिफारशींमधील विसंगतीबाबत कोणतीही शक्यता

राहू नये याकरिता सर्वतोपरि प्रयत्न करण्यात आले आहेत.

समितीचे अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांनी मा.राज्यपालांबरोबर दीर्घकाळ चर्चा केली. मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि मा.नियोजन राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्याशी सुध्दा त्यांनी दीर्घकाळ चर्चा केली.

समितीने राज्याच्या सर्व महसूल विभागांना भेटी दिल्या. या भेटींचा तपशील तक्ता १.२ मध्ये देण्यात आला आहे.

तक्ता १.२: भेटींचा तपशील

महसूल विभाग	भेट दिल्याचा दिनांक	भेट दिलेली ठिकाणे
१.	२.	३.
नागपूर	१७.०९.२०११	सर्च आणि गडचिरोली जिल्हा मुख्यालय
	१८.०९.२०११	नागपूर विभागीय मुख्यालय
औरंगाबाद	०९.११.२०११	जालना जिल्हा मुख्यालय
	१०.११.२०११	औरंगाबाद विभागीय मुख्यालय
अमरावती	०६.०४.२०१२	यवतमाळ जिल्हा मुख्यालय
	०७.०४.२०१२	अमरावती विभागीय मुख्यालय
	०८.०४.२०१२	पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
नाशिक	२२.०४.२०१२	नाशिक विभागीय मुख्यालय
	२३.०४.२०१२	नंदूरबार जिल्हा मुख्यालय
कोकण	१३.१०.२०१२	सिंधुदुर्ग जिल्हा मुख्यालय
	१४.१०.२०१२	कोकण विभागीय मुख्यालय
पुणे	०३.११.२०१२	सातारा जिल्हा मुख्यालय आणि वडूज
	०४.११.२०१२	पुणे विभागीय मुख्यालय

महसूल विभागाच्या भेटीच्या वेळी विभागातील जवळजवळ सर्व जिल्हयांचे मा.पालकमंत्री बैठकींमध्ये आणि कामकाजात सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे बहुतांश संसद सदस्य, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे सदस्य, महानगरपालिकांचे महापौर, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती, नगर परिषदांचे नगराध्यक्ष, प्रमुख अशासकीय संघटना आणि सामान्य जनता बैठकींना उपस्थित होते आणि त्यांनी त्यांची निवेदने सादर केली. समितीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र मंडळांच्या सदस्यांशी अनुक्रमे नागपूर, औरंगाबाद व कोकण विभागीय मुख्यालयांमध्ये दीर्घकाळ चर्चा केली. समितीने समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी त्या प्रदेशांच्या गरजा आणि विकासाच्या संधी विचारात घेऊन जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हयातील अधिकारी यांच्याशी सुध्दा चर्चा केली. समितीचे सदस्य, क्षेत्राला भेटी देताना ज्यांना भेटले त्या हितसंबंधित व्यक्तींची तसेच ज्यांनी समितीपुढे निवेदने दिली अशा व्यक्तींची यादी जोडपत्र १.२ मध्ये देण्यात आली आहे.

१.४ समितीच्या बैठकी

समितीने जून २०११ ते ऑक्टोबर, २०१३ या कालावधीतील जोडपत्र १.३ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास बैठकी घेतल्या होत्या.

१.५ समितीअंतर्गत असलेले उपगट

समितीने २२ जून, २०११ रोजीच्या घेतलेल्या आपल्या पहिल्या बैठकीत आपल्या कामकाजाची पध्दत ठरविली आणि समितीअंतर्गत ५ उपगट नियुक्त केले व तज्ञांकडून ११ अभ्यासक्रम क्रियान्वित केले. समितीअंतर्गत असलेले उपगट आणि समितीने सोपविलेले अभ्यासविषय याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

समितीचे उपगट :

१) जलसंपदा

२) कृषि

३) उद्योग व पायाभूत विकास

४) शिक्षण

५) शासन व्यवहार

६) आरोग्य

७) जनजाति क्षेत्रे

समितीने सोपविलेले आदिवासी विकासावरील अभ्यास विषय:

१.	Regional Growth Stratagies for Vidarbha Region	प्रा.विनायक देशपांडे
२.	Regional Growth Stratagies for Marathwada Region	डॉ.आर.पी.कुरुलकर
३.	Regional Growth Stratagies for Maharashtra	प्रा.प्रदीप आपटे
४.	A Perspective on Political Dynamics on Maharashtra	प्रा.सुहास पळशीकर
५.	Status and Prospects of Investments and Employments in Maharashtra: A Disaggregated Look	डॉ.चंद्रहास देशपांडे
६.	New Agricultural Process: Status and Prospects	डॉ.व्ही.एम.मायंदे
७.	Lessons to be Learnt from Earlier Policy Attempts and Literature	प्रा.माला लालवाणी
८.	Strategy Development of Social Sectors as Means of Human Centric Regional Development in Maharashtra	डॉ.संगिता कामदार
९.	Social Backwardness of Marathwada Region	प्रा.स्वाती शिरवाडकर
१०.	Health; Thermal Power Plants in Vidarbh and Environmental Impact	डॉ.प्रकाश डोके

समितीने, नागपूर विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, यशदा, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, महाराष्ट्र, वाल्मी, औरंगाबाद, जलसंपदा विकास केंद्र आणि नरसी मोंगजी व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था यांच्याकडून सहाय्यभूत ठरावे म्हणून विविध अभ्यासक्रमांची जमवाजमव केली.

समितीने अत्यंत अद्ययावत आधारसामग्री गोळा करण्याचा प्रयत्न केला आणि संबंधित विभागांना अद्ययावत आधारसामग्री पुरविण्याबाबत विनंती केली. परंतु, काही विभागांना विविध प्रकारचे अडथळे आल्याने सर्वतोपरी प्रयत्न करूनसुध्दा अगदी अलीकडची आधारसामग्री उपलब्ध होऊ शकली नाही. समितीचे बहुतेक सर्व कामकाज २०११ च्या जनगणनेच्या आधारसामग्रीवर आधारित असून संबंधित आधारसामग्री प्रसिध्द करण्यात आली आहे व उपलब्ध करून देण्यात आली आहे.

१.६ समितीचा अहवाल आणि विचारार्थ विषय :-

समिती घटित करण्याबाबतच्या शासन निर्णयात(शासन निर्णय क्र.अनुशेष-२००९/प्र.क्र.४०५/का.१४१६, दि.३१ मे, २०११) निश्चित केलेल्या कामाच्या व्याप्तीअंतर्गत समितीच्या अहवालात प्रत्येक मुद्याचा परामर्श घेण्यात आला आहे. आम्हाला विश्वास आहे की, आमच्या समितीने मुलभूत बदल स्वीकारला असून विचारार्थ विषयामध्ये घालून दिलेल्या मुद्यांवर बारकाईने विचार केला आहे. तथापि, अहवाल मोठा असल्याने आणि कामाच्या व्याप्तीमधील निरनिराळे मुद्दे अहवालाच्या विविध प्रकरणामध्ये हाताळले गेले असल्याने आम्ही येथे विचारार्थ विषयास अपेक्षित असल्याप्रमाणे कामाच्या व्याप्तीसह समितीच्या अहवालाचे अनुपालन थोडक्यात सारांश रूपाने देत आहोत.

(१) प्रादेशिक विकासातील असमतोल अंदाजित करण्याबाबत निर्देशांक ठरविणे.

'प्रकरण चार: समतोल प्रादेशिक विकासाकडे एक बहुआयामी धोरण दृष्टिकोन' यामुळे प्रादेशिक समतोल पूर्ववत व कायम राखण्याबाबत निर्देशांक निश्चित केले जातात आणि आढावा घेतला जातो. हे निर्देशांक पाणी, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, वीज व कृषि पत या क्षेत्रांमधील आहेत. ही क्षेत्रे निश्चित करण्याबाबतच्या कारणांची संबंधित प्रकरणांमध्ये आणखी चर्चा करून सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. मूलभूत सेवांचे समानीकरण आणि अभिवृध्दी वर्धित धोरणे यांचा समावेश असलेल्या बहुआयामी द्विअंगी दृष्टिकोन निर्देशांकांच्या विनिर्देशाच्या मुळाशी असून त्यातून विकासातील असमतोल निर्धारित करण्याचे ठरीव प्रमाण काढण्यात आले होते.

(२) वरील १ च्या संदर्भात, २०१० या वर्षाच्या अखेरीस अगदी अलिकडच्या उपलब्ध आधारसामग्रीच्या आधारे राज्याच्या सरासरी विकासाच्या संदर्भात विकासातील असमतोल निश्चित करणे, असे करीत असताना राज्य शासनाची थेट गुंतवणूक/ खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक विचारात घेण्यात यावी.

राज्यातील सरासरी विकास स्तरानुसार तीन प्रदेशांच्या एकूण परिस्थितीबाबत *'प्रकरण ३: प्रादेशिक विकास : मागील काही काळातील कल व स्वरूप'* यामध्ये चर्चा करण्यात आली आहे. समितीने प्रादेशिक असमतोल अंदाजित करण्याबाबत क्षेत्र विनिर्दिष्ट दृष्टीकोन जाणीवपूर्वक स्वीकारलेला आहे. समितीने आणखी प्रकरण चारमध्ये चर्चा केलेल्या कारणांसाठी राज्य सरासरीहून अधिक काटेकोर असलेला असा क्षेत्रनिहाय प्रमाणकांच्या आधारे विकास स्थितीची तुलना करण्याचा जाणीवपूर्ण निर्णय घेतला आहे. इतर प्रकरणांसोबत आरोग्य, शिक्षण, दळणवळण यांसारख्या प्रकरणामध्ये संबंधित क्षेत्रातील असमतोलाबाबत आणखी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. प्रत्येक क्षेत्रासाठी वेगवेगळया प्रकारे संचयी परिणाम निर्धारित करण्यात आले असून फारच कमी प्रमाणात ठरीव निर्देशांक व्यवहारिकपणे निश्चित करण्यात आले आहेत. (विश्वसनीय व सुसंगत आधारसामग्री उपलब्ध आहे तेथे) आम्ही येथे 'ओक्कम'स् रेझर' तत्त्वाचा वापर केला आहे. या तत्त्वाचा वापर केल्याने काटकसर करण्याचा मार्ग सापडतो.

राज्याची थेट गुंतवणूक याबाबत *'प्रकरण ४'* आणि *'प्रकरण ६: शासन व्यवहार'* यामध्ये चर्चा करण्यात आली आहे. आमच्या शिफारशींची पूर्तता करण्याकरिता आणि प्रस्ताव स्वयंनिर्वाही करण्याकरिता मागणी केलेले साधन, त्या साधनाच्या उपलब्धतेच्या रुढीवर अंदाजानुसार तपासण्यात आले आहे. जेणेकरून आम्ही जे सुचविले आहे ते साध्य होण्याजोगे आहे. याबाबत आमचे स्वत:चे समाधान झाले आहे. सार्वजनिक गुंतवणुका खाजगी गुंतवणुकामध्ये वाढत असल्याचे मान्य करतानाच बदललेल्या आर्थिक वातावरणात व्यापार करण्याच्या सुविधा वाढविण्यासाठी आणि खाजगी

गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आम्ही धोरणविषयक सुधारणा व शासन व्यवहार संरचना आणि संस्था यांच्या कार्याकडे विशेष लक्ष दिले आहे. आम्ही केंद्र सरकारच्या भूमिकेकडे देखील लक्ष केंद्रित केले. इतकेच नव्हे तर, आम्ही पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या व जनजाति क्षेत्रांची देखभाल करण्यासाठी "वास्तवात्मक अथवा कल्पित" प्रदेशांचा अंतर्भाव करण्याकरिता प्रदेशांच्या संकल्पनेची व्याप्ति सुध्दा वाढविली. आम्ही प्रदेशाचा गतिशील तुलनात्मक फायदा होण्यासाठी प्रदेश विनिर्दिष्ट मार्ग व उपायात्मक धोरणे निश्चित करण्याची काळजी घेतलेली आहे.

(३) निश्चित केलेल्या निर्देशांकांमधून प्राथम्याने कार्यान्वित करता येतील असे निर्देशांक ठरविणे.

प्रकरण चारमध्ये '*त्वरित कार्यवाही तात्काळ उपाय*' या भागामध्ये काही विशिष्ट प्राथम्य क्षेत्रे सूचिबध्द करण्यात आलेली आहेत. या प्राथम्य दिलेल्या क्षेत्रामध्ये ***माजी मालगुजारी तलाव, भूस्तर प्रतिकूल तालुके, खार पाणपट्टा***– पाण्यासाठी विशेष तरतुदी (पाण्याचे दुर्भिक्ष असलेली क्षेत्रे), जायकवाडीच्या पाण्याशी संबंधित नदीकाठच्या जमिनीच्या हक्काचे वाद सोडविणे, प्रादेशिक शासन संरचना स्वीकृती, निर्णय व घोषणा, ग्रीन बोनससाठी विशिष्ट रक्कम निर्बंधित करणे, खनिज संपत्तीचे स्वामित्वधन, चंद्रपूरचे पुन:स्थापन (ऱ्हासाबाबत भरपाई) मराठवाड्यासाठी सौर ऊर्जा उपक्रम, वनांशी संबंधित (पाटबंधारे प्रकल्प) सध्या या निव्वळ मूल्यांचा समावेश संकोषात करणे इत्यादींमधील समावेश आहे.

तसेच, सर्वच क्षेत्रनिहाय प्रकरणामध्ये हस्तक्षेप व प्राथम्य यांचे टप्पे सुचविण्यात आले आहेत.

(४) अशाप्रकारे निश्चित केलेला असमतोल दूर करण्याबाबतचे उपाय आणि विकासविषयक निधीच्या नियतवाटपाची तत्वे सुचविणे तसेच भविष्यात अनुशेष निर्माण होणार नाही म्हणून उपाय सुचविणे आणि याबाबतीत विकास मंडळाची भूमिका सूचित करणे.

समन्यायी गुंतवणुकीद्वारे '*मुलभूत सेवांचे समानीकरण*' आणि '*अभिवृध्दी*' हे दोन व्यापक दृष्टिकोन प्रादेशिक समतोलाबाबत आमच्या आकलन शक्तीच्या आधारे गतिशील तुलनात्मक लाभ देणारे आहेत. '*शिफारशींचा सारांश*' यात हाती घ्यावयाच्या विविध उपाययोजना देण्यात आल्या आहेत. आम्ही ***नियतवाटपाचे सूत्र*** देखील सविस्तरपणे मांडले आहे आणि ३७१ (२) अन्वये प्राप्त होणाऱ्या महादेशांतर्गत मा.राज्यपालांच्या आगामी काळातील ***निदेशांमध्ये*** हे सूत्र वापरण्यात यावे अशी शिफारस केली आहे. काळजीपूर्वक व वास्तविकपणाने अंदाजित ***साधन उपलब्धता आणि साधन*** आवश्यकता पुढील अडीच पंचवार्षिक योजनांसाठी (चालू पंचवार्षिक योजनेच्या उर्वरित कालावधीसह) सुध्दा सुचविण्यात आलेली आहे.

नियमन '***शासन व्यवहारा***'वरील प्रकरणात प्रादेशिक शासन व्यवहार यंत्रणेची सविस्तर चर्चा समाविष्ट केली आहे. त्यामध्ये प्रादेशिक विकास मंडळांना प्रादेशिक साधनसंपत्तीवर निर्णय घेण्याचा व नियंत्रणाचा जास्तीत जास्त अधिकार देऊन त्यांची मोठया प्रमाणात पुनर्रचना करण्याबाबत शिफारस केली आहे. इष्टतम विभागणीयोग्य संकोष सुनिश्चित करण्यास उपायसुध्दा सुचविण्यात आले आहेत. त्यामुळे प्रदेशांना साधन प्राप्त करून घेणे शक्य होऊन ते त्याचा योग्यरीतीने वापर करतील. या सर्वातून आम्हाला विश्वास वाटतो की, महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांमध्ये एक साखळी पुनर्स्थापित करण्यास, प्रत्येक प्रदेशास त्याच्या संभाव्य साधनसंपत्तीचे संपूर्णपणे समुपयोजन करण्याची मुभा देण्यास आणि भविष्यात असमतोलाची पुनरावृत्ती टाळण्यास मदत होईल.

समितीच्या शिफारशींना एका सदस्याव्यतिरिक्त सर्व सदस्यांकडून पुष्टी देण्यात आली आहे. डॉ. संगीता कामदार या समितीच्या सदस्यापैकी एक असून त्यांनी प्रकरण ४,६ व १२ मध्ये करण्यात आलेल्या शिफारशींतील काहीं शिफारशींवर आपले वेगळे मत व्यक्त केले आहे.त्यांची निरीक्षणे या अहवालाच्या शेवटी जोडण्यात आली असून त्याचा जोडपत्र– झेड म्हणून उल्लेख केला आहे.

हा अहवाल शासनाच्या तसेच महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करील अशी समितीला आशा आहे.

❖❖❖

प्रकरण दोन

हितसंबंधितांचा दृष्टिकोन

२.० प्रस्तावना

प्रादेशिक असमतोलाबाबत हितसंबंधितांचा दृष्टिकोन जाणून घेणे हे समितीसाठी महत्त्वाचे होते. हितसंबंधितांबरोबरच्या आमच्या चर्चेमध्ये निसर्ग, प्रत्येक प्रदेशातील प्रादेशिक असमतोलाची कारणे आणि परिणाम याबाबत वेगवेगळी मते मांडण्यात आली. संबंधितांबरोबर झालेल्या या बैठकींतून समितीला खूपच फायदा झाला.विविध हितसंबंधितांमध्ये निर्वाचित लोकप्रतिनिधी (जसे संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, नगरपालिका सदस्य आणि इतर स्थानिक मंडळांचे सदस्य, मंत्री, राजकीय पक्ष, प्रादेशिक विकास मंडळाचे तज्ञ सदस्य) त्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या अशासकीय स्वयंसेवी संघटना, महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील अधिकारी, विभिन्न शिक्षण क्षेत्रातील तज्ञ आणि सर्वसामान्य जनता यांचा समावेश होतो.

महाराष्ट्राच्या विभागीय मुख्यालयांमध्ये या बैठकी घेण्यात आल्या होत्या आणि त्याला विभागीय आयुक्तांकडून आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून उत्कृष्ट प्रकारे सहकार्य मिळाले. पुढील भागामध्ये, या तिन्ही प्रदेशांमधील हितसंबंधितांनी व्यक्त केलेली मते मांडण्यात आली आहेत.

२.१ विदर्भ प्रदेश

हितसंबंधितांनी प्रादेशिक असमतोलाबाबत आपली तीव्र चिंता व्यक्त केली. याबाबतच्या निवेदनांमध्ये केवळ गाऱ्हाण्यांचाच समावेश नाही तर, विश्लेषणाधारित धोरणात्मक सूचनांचाही अंतर्भाव आहे. पुढील परिच्छेदांमध्ये त्या सारांशरूपाने मांडलेल्या आहेत.

विदर्भाच्या नागपूर आणि अमरावती या दोन्ही विभागातील बहुतांश हितसंबंधितांनी आतापर्यंत राबविलेल्या धोरणांविषयी आपला संताप आणि निराशा व्यक्त केली आहे. बहुतेकांनी अत्यंत महत्त्वाचे असलेले करार म्हणजे अकोला करार, नागपूर करार आणि दांडेकर समिती आणि निर्देशांक व अनुशेष समिती यांचे अहवाल यांच्या अंमलबजावणीसंबंधीच्या प्रगतीबाबत आपली मते अत्यंत गंभीर शब्दात मांडली. हे करार आणि समितीच्या शिफारशी ह्या, विदर्भाच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटना आहेत याचाही पुनरुच्चार करण्यात आला. वैदर्भीय जनता तसेच त्यांचे लोकप्रतिनिधी यांची मानसिकता घडविण्यात या घटनांनी मुख्य भूमिका बजावली आहे.

लोकप्रतिनिधींनी अकोला आणि नागपूर करारामागे असलेला महत्त्वपूर्ण हेतू आणि तदनंतरची धोरणे आणि करार यांचे पूर्णपणे अनुपालन कसे झाले नाही यावर विशेष जोर दिला. यामुळे त्यांचा विश्वासघात झाला असल्याचे ते समजतात. या प्रदेशाच्या तीव्र नाराजीचे कारण ही ***विश्वासघाताची भावना*** असल्याचे समितीने हेरले. पुढे झालेल्या दोन गोष्टींची आम्ही नोंद घेऊ शकलो. एक म्हणजे, **विद्यमान समितीने विश्लेषणाचा घटक म्हणून जिल्हा विचारात घ्यावा, याबाबत बहुतेक सर्व हितसंबंधितांनी आपली मते व्यक्त करताना सर्वसंमती दर्शविली.** दुसरे म्हणजे, विशेषकरून समितीने गडचिरोलीला जेव्हा भेट दिली तेव्हा त्या प्रदेशातील आदिवासी लोकसंख्येबाबतचे काही विशिष्ट प्रश्न उपस्थित करण्यात आले. समितीने याचे औचित्य आणि महत्त्व ओळखून **आदिवासी समाजाशी निगडित असलेल्या प्रश्नांवर विचार करण्यासाठी एका विशेष अभ्यासगटाची नियुक्ती केली. याबाबतची माहिती शिफारशींसह एका स्वतंत्र प्रकरणात दिली आहे.**

आमच्या नागपूरच्या भेटीदरम्यान, सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करणारे २८ विधानसभा व विधानपरिषद सदस्यांच्या एका प्रतिनिधी मंडळाने आम्हाला भेट देऊन, प्रादेशिक असमतोलाचे विविध पैलू आणि असमतोल दूर करण्याची निकड याबाबतचे एक सामूहिक निवेदन दिले. त्याकरिता, विभिन्न क्षेत्रातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी आणि कृषि, सिंचन, उद्योग, खाणी, रस्ते, वने, सहकार, सामाजिक क्षेत्रे, नागरीकरण, इत्यादी यासारख्या प्रक्रियांसाठी त्यांनी अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत.

पुढील भागात, हितसंबंधितांच्या मतांचा सारांश दिला आहे.

२.१.१ सिंचन

विदर्भ प्रदेशातील अपुरी सिंचन सुविधा ही त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासातील अडसर बनत आहे. कोणत्याही प्रदेशाची भरभराट ही सिंचनावर अवलंबून असते. याची जाणीव हितसंबंधितांनी करून दिली. तथापि, या प्रदेशातील प्रकल्पांसाठी, पर्यावरण व वन विभागाच्या ना-हरकती प्रतिक्षित आहेत. सिंचनाअभावी या प्रदेशातील शेतकऱ्यांना खते, विद्युत पंप संच, इत्यादीवरील अर्थसहाय्य यासारखे परिणामस्वरूप लाभ मिळण्यापासून वंचित राहावे लागले आहे.

२.१.१.१ सिंचन क्षेत्राकरिता निधीचे नियतवाटप

१. निधीचे नियतवाटप करताना, सिंचनाचा अनुशेष दूर करण्यास अत्युच्च प्राधान्य देण्यात यावे. सिंचनासाठी राखून ठेवलेले निधीचे नियतवाटप दरवर्षी अद्ययावत केल्यानुसार केवळ सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठीच करण्यात यावे.

२. प्रलंबित अनुशेष दूर केला जात असल्याची खात्री झाल्यानंतरच जेथे सिंचनाची सुविधा राज्याच्या सरासरीपेक्षा अधिक असेल, अशा जिल्हयांना कोणत्याही नवीन निधीचे नियतवाटप करू नये.

३. निधीचे नियतवाटप करताना, जिल्हयातील न वापरलेल्या उपलब्ध पाण्याच्या प्रमाणात पुरेशी विशेष सवलती देण्याची आवश्यकता आहे.

४. निधीचे नियतवाटप करताना, महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या अलिकडच्या अहवालात निर्धारित केल्याप्रमाणे अद्ययावत भौतिक अनुशेषालाही अधिक प्राधान्य देण्यात यावे.

५. निधीचे नियतवाटप करण्यासाठी प्रत्येक विकास मंडळाअंतर्गत संपूर्ण निव्वळ पेरणी क्षेत्राचा विचार करू नये. फक्त बिगरसिंचित निव्वळ पेरणी क्षेत्र किंवा जिरायती लागवडीखालील क्षेत्र हाच निधीच्या नियतवाटपाचा मूलाधार असावा,असे उपाय योजल्याच्या परिणामी गरजाधारित निधीचे नियतवाटप होईल.

६. जलव्यवस्थापनाच्या प्रक्रियेत पिकांचे प्रकार, कृषिआधारित उद्योग आणि त्यावर अवलंबून असलेली लोकसंख्या यथायोग्य विचारात घेण्यात यावी.

७. (अ) ज्यामध्ये कमी मानव विकास निर्देशांक आहे (ब) ज्यांचे दरडोई उत्पन्न राज्य सरासरीपेक्षा कमी आहे (क) जे नक्षली चळवळीने बाधित झाले आहे आणि (ड) ज्यांना शेतकरी आत्महत्येच्या समस्येने ग्रासलेले आहे अशा जिल्ह्यांना नवीन सिंचन प्रकल्पासाठी अधिक प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे अशा भागात सुरू असलेले प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी त्यांना अधिकाधिक निधी देण्यात यावा.

८. उन्हाळयात, लघुसिंचन तलावांची पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे पाण्यातील फ्लोराईडची टक्केवारी वाढते. फ्लोराईड प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे पाण्याचा तसेच मृदेचा दर्जा घसरतो. या

समस्येवर मात करण्यासाठी जमिनीची मालकी विचारात न घेता शासनाने बाधित जमिनीच्या मृद संधारणासाठी ताबडतोब उपाययोजना सुरू करावी. मृद संधारणांमुळे या तलावांची पाण्याची पातळी वाढण्यास तसेच त्यातील फ्लोराईडची टक्केवारी नियंत्रित ठेवण्यास मदत होईल.

नवीन प्रकल्पांसाठी तसेच, सुरू असलेले प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी तरतूद करताना वर नमूद केलेली वस्तुस्थिती यथायोग्य विचारात घेण्यात यावी.

विदर्भातील सिंचन क्षेत्राचा अनुशेष हा "स्थल वस्तुस्थिती"च्या आधारे मोजण्यात यावा. विद्यमान पारंपरिक जलस्त्रोत कागदोपत्री दाखविलेले असले तरी ते प्रत्यक्षात अस्तित्वात नाहीत. यासंबंधात हितसंबंधित घटकांनी "माजी मालगुजारी" तलावाबाबत मांडलेली मते अधिक उद्‌बोधक आहेत.

२.१.१.२ *माजी मालगुजारी तलाव :*

माजी मालगुजारी तलाव ही एक पूरक सिंचन व्यवस्था असल्याने तिला विचारात घेण्यात यावे. १९९४ च्या अनुशेषविषयक तरतुदींमध्ये ***मालगुजारी*** तलावांचा सिंचनाचे मुख्य साधन म्हणून विचार करण्यात आला होता. चालू अनुशेषाची गणना करताना मालगुजारी तलावांना वगळण्यात यावे, पूर्व विदर्भात त्यावेळी ६८६२ माजी मालगुजारी तलाव असल्याचे महाराष्ट्र शासनाने ॲड. किंमतकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या अभ्यासगटाने दर्शविले होते.

बहुतांश माजी मालगुजारी तलावांची केवळ काल्पनिक माहिती असून ते केवळ कागदोपत्री अस्तित्वात असल्याचे एका हितसंबंधिताचे मत होते. तथापि, वास्तविक जलसाठा (genuine water storage) म्हणून त्यांची गणना केल्यामुळे भंडारा आणि गोंदिया या जिल्हयांचा सिंचन अनुशेष हा शून्य दाखविला आहे. १९५२ पासून, हे तलाव केवळ कागदावरच राहिले असून त्यांची वास्तविक उपयुक्तता नगण्यच आहे.

६८६२ तलावांपैकी फक्त २० टक्के तलाव हे कार्यरत आहेत. कार्यरत नसलेले तलाव ही अनुत्पादक मत्ता असून ते सहज कार्यरत करता येतील आणि त्यांचा पूरक सिंचन व्यवस्थेसाठी वापर करता येईल.

२.१.१.३ नदी जोड प्रकल्प: नदी जोड प्रकल्पाद्वारे पूर्व व पश्चिम विदर्भातून जलवाहिनीद्वारे पाणी नेण्याचा अंतस्थ हेतू (alterior motive) बोलून दाखविण्यात आला. गोदावरी न्यायाधिकरणाने निश्चित केलेल्या पाण्याच्या हिश्श्याचा विदर्भात सदुपयोग करून घेता येईल,अशीही सूचना करण्यात आली आहे. जेव्हा विदर्भ प्रदेशाच्या सिंचनाची आवश्यकता असेल तेव्हाच प्रदेशांबाहेरील प्रकल्पांना पुढील प्रकल्प पूर्ण करून मंजुरी देण्यात येईल :-

१. वैनगंगा (गोसीखुर्द), नळगंगा (पूर्णा तापी) नदी जोड प्रकल्प,

२. प्राणहिता चेवला सुजला श्रावंती प्रकल्प (महाराष्ट्र-आंध्रप्रदेश सीमा)

३. मांजरा प्रकल्प

४. निम्न पैनगंगा प्रकल्प (८८%) म्हणजेच ३५.४ टीएमसी इतका हिस्सा धरून ४१.१२ टीएमसी क्षमतेचा) एकूण सिंचन क्षमता २,२७,२७१ हेक्टर इतकी आहे. प्रदेशाच्या सर्वांगीण, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात यावा. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या

आत्महत्येच्या घटना कमी होण्यास मदत होईल.

विदर्भात, बहुतेक नद्या जुलै ते सप्टेंबर या कालावधीत दुथडी भरून वाहतात. तथापि, नोव्हेंबर नंतर पाण्याची पातळी अत्यंत कमी कमी होत जाते. मार्च ते मे या कालावधीत पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते. शासनाने या गंभीर स्थितीची दखल घ्यावी आणि विदर्भातील प्रकल्प खऱ्या अर्थाने यशस्वीपणे तडीस नेल्याखेरीज विदर्भातील नद्यांचे पाणी वळविण्यात येऊ नये.

२.१.१.४ विदर्भातील सिंचनाचा विकास

या भागात दरडोई आणि प्रति हेक्टर पाण्याची उपलब्धता ही खूपच कमी आहे म्हणून या प्रदेशातील हितसंबंधितांनी पुढील सूचना केल्या आहेत.

वैनगंगा नदी खोऱ्यातील पाणी गोदावरी नदी खोऱ्यात वळविण्यात यावे.

काळी कसदार मृदा आणि ***खार–पाण–पट्टा*** (आम्लता) असे या भागाचे वर्णन केले जाते. म्हणून, या प्रदेशाकरिता तांत्रिक आणि आर्थिक प्रकल्पाच्या निकषात बदल करण्यात यावा.

२.१.१.५ लाभक्षेत्र विकास प्राधिकरण पुनर्जीवित करणे:

'लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाने' महाराष्ट्रातील सिंचन सुविधेच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली आहे. म्हणून, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण पुनर्जीवित करण्यात यावे आणि विशेषत: सर्व संभाव्य सिंचनयोग्य जमीन ओलिताखाली आणण्यासाठी त्या प्राधिकरणाला जास्तीत जास्त अधिकार बहाल करावेत.

२.१.२ विदर्भातील वने

वनात रान मांजरींचे वास्तव्य असल्यामुळे नागपूर शहराला वाघपूर –वाघांचे शहर असे संबोधण्यात यावे, अशी अनेक संघटनांच्या प्रतिनिधींनी आणि आमदारांनी जोरदार सूचना केली होती. विदर्भातील वनांच्या संबंधात प्रतिनिधींच्या इतर सूचना खाली दिल्या आहेत:

१. महाराष्ट्र राज्याच्या १९२ कोटी रूपये इतक्या एकूण वन महसूलापैकी विदर्भाचा वाटा १७३ कोटी रुपये (९०%) इतका आहे. त्यामुळे अशी सूचना करण्यात आली की, विदर्भातील वनांच्या विकासावर महसुलाच्या प्रमाणात खर्च करण्यात यावा.

२. बांबूच्या घोसापासून रोजगार मिळणे सुलभ व्हावे याकरिता समुचित बांबू धोरण तयार करण्यात यावे.

३. वन्यजीव व निसर्ग पर्यटनाचे योग्य रीतीने नियोजन केले तर, बेरोजगार युवकांसाठी मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतील. नागपूरच्या जवळ असलेल्या गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक प्राणी संग्रहालय स्थापन करता येईल. त्याचा निसर्ग पर्यटन केंद्र म्हणून वापर होऊ शकेल.

४. गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा आणि अमरावती या जिल्हयातील वनसंपत्तीचे रक्षण करण्यासाठी त्या जिल्ह्यांना सहाय्य करण्याकरिता विशेष विकास निधी (पर्यावरण संवर्धन निधी) निर्माण करण्यात यावा.

५. विदर्भातील ३७ नक्षलग्रस्त तालुक्यांसाठी एक विशेष विकासाचे मॉडेल तयार करण्यात यावे, ज्याद्वारे युवकांच्या वृत्तीत बदल, लोकांच्या मानसिकतेत बदल, रोजगारांच्या संधींची उपलब्धता यासारखे प्रश्न सुटू शकतील. चुकीचा मार्ग पत्करलेल्या युवकांना मुख्य प्रवाहात परत आणण्यावर भर देण्यात यावा.

६. १९८० चे वन धोरण हा विदर्भातील सिंचन प्रकल्पांच्या प्रगतीमधील मुख्य अडसर असल्याचे दिसून येते. या

प्रकल्पाखाली ४८ ते ५० टक्के इतकी एकूण जमीन वनांनी व्यापलेली आहे. तथापि, या वनांची घनता ही १ % इतकी नगण्य आहे. अशी सूचना आहे की, वनक्षेत्रातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एक स्वतंत्र वन धोरण आखण्यात यावे.

२.१.३ झुडपी जंगलांचा प्रश्न

१९६० मध्ये जेव्हा विदर्भ प्रदेश महाराष्ट्रात विलीन करण्यात आला होता तेव्हा चरई भूमी (गायरान) याची वर्गवारी ***झुडपी जंगले*** अशी करण्यात आली होती. ही जमीन महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली येत असली तरी वन या शब्दप्रयोगानुसार अशा जमिनीची मागणी करणाऱ्या कोणत्याही प्रकल्पासाठी वनविभागाची ना-हरकत प्राप्त करणे अगत्याचे ठरते. परिणामी, गेली ५० वर्षे हा प्रश्न विदर्भ प्रदेशासाठी अत्यंत विवादास्पद बनला आहे. ***झुडपी जंगले*** असे वर्गीकरण केलेल्या जमिनीवर आता फारच थोडे वन शिल्लक राहिले आहे. आर्थिक बाजू लक्षात घेऊन, हितसंबंधितांनी असे मत मांडले की, ***झुडपी जंगलाची*** निरधिसूचित प्रक्रिया अतिप्राधान्य तत्त्वावर पूर्ण करण्यात यावी. एकट्या नागपूर विभागात १,७८,५२५ हेक्टर इतक्या जमिनीचे ***झुडपी जंगल*** म्हणून वर्गीकरण केल्याचे दिसून येते. खाणकाम, उद्योग व सिंचन प्रकल्पासारखे अनेक आर्थिक उपक्रम ***झुडपी जंगलांमुळे*** प्रलंबित आहेत.

२.१.४ रस्ते

एका हितसंबंधिताने असे नमूद केलेआहे की, विदर्भात जेथपर्यंत राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांचा संबंध आहे त्याबाबतीत विदर्भाचा कोणताही अनुशेष नाही असे अनुशेषाच्या गणनेतून उघड झाले आहे. तथापि, विदर्भ प्रदेशात इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्त्यांच्या बाबतीत ३१ मार्च, २०१० रोजीप्रमाणे प्रचंड अनुशेष अस्तित्वात आहे. रु. ६६५५ कोटी एवढा एकूण अनुशेष काढण्यात आला आहे. **बांधा, वापरा, हस्तांतरित करा**, सार्वजनिक खाजगी भागीदारी आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सारख्या संघटना यामार्फत राष्ट्रीय राज्य महामार्गाचे आणि जिल्हा मार्गाचे जाळे निर्माण करण्यात येत आहेत. जिल्हा आणि ग्रामीण रस्त्यांसाठी अशी कोणतीही यंत्रणा किंवा व्यवस्था अस्तित्वात नाही. याबाबत अशी विनंती केली आहे की, "....अनुशेषाचे पुर्ननिर्धारण करून विकासाच्या या महत्वाच्या मापदंडाकडे नव्याने पाहणे इष्ट ठरेल आणि विदर्भातील रस्त्यांचे जाळे सुधारण्यासाठी निधी देण्याची गरज आहे."

२.१.५ विदर्भाचा औद्योगिक विकास

१. या प्रदेशातील एका आमदारांनी असे दाखवून दिले आहे की, विदर्भ प्रदेशात मोठया प्रमाणावर खनिज संपत्ती असून तिचा पुरेपूर सदुपयोग न झाल्यामुळे उद्योगांच्या मूल्यवर्धनावर विपरित परिणाम झाला आहे.

तसेच त्या आमदारांनी आणखी असाही युक्तिवाद केला आहे की, खनिज प्रक्रिया युनिटाला कच्च्या मालाच्या किंमतीच्या ६०% इतकी वीज लागते. म्हणून, छत्तीसगड राज्यात लागू केलेल्या धोरणाच्या धर्तीवर खनिज प्रक्रिया युनिटांना कमी किंमतीने वीज उपलब्ध करून दिली पाहिजे.

अ. मोटार, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्माण आणि माहिती तंत्रज्ञान इत्यादीसारख्या मूल्यवर्धित उद्योगांना आकर्षित करण्यासाठी विशेष सवलती द्यायला हव्यात.

ब. विदर्भासाठी एका विकास आयुक्ताची (अपर मुख्य सचिवाच्या दर्जाचा) नेमणूक करण्यात यावी.

क. अमरावती विभागाच्या एकूण देशीय उत्पादनामध्ये कृषि उत्पादनाचा असलेला मोठा वाटा लक्षात घेता, मोठ्या प्रमाणावरील कृषि आधारित उद्योगधंदे सुरू करावेत.

ड. विदर्भामध्ये सहकारी क्षेत्रातून ८० टक्के इतक्या कापसाचे उत्पादन होत असल्यामुळे वस्त्रनिर्माण

उद्योगांना विदर्भाकडे आकर्षित केले पाहिजे. वस्त्रनिर्माण धोरण तात्काळ तयार केले पाहिजे.

ई. केंद्र सरकार व राज्य शासन यांनी, मिहानला विशेष प्रकल्पाचा दर्जा दिला पाहिजे.

फ. जल व पर्यावरण यांचे जतन करण्याच्या दृष्टीने आवश्यकतेपेक्षा जास्त वीज निर्माण करणारे वीज प्रकल्प तात्काळ बंद करावेत. या प्रकल्पांना आवश्यक असणाऱ्या पाण्यामुळे सात लाख हेक्टर्स इतकी जमीन सिंचनाखाली येऊ शकते, याचा विदर्भावर मोठा भार आहे. या बदल्यात, विभागाला निष्फळ राख मिळते व पर्यावरणाची मोठी हानी होते. याशिवाय, लागवडीखालील जमिनीचे मोठमोठे खंड हे कोरडवाहू बनत आहेत.

२. विदर्भ आर्थिक विकास परिषदेच्या अलिकडच्याच माजी अध्यक्षांनी निवेदने दिली होती. ही निवेदने, विदर्भामध्ये उद्योगधंद्यांसाठी असलेल्या संधी संबंधात होती. या विभागातून मिळणाऱ्या विभिन्न फायद्याच्या आधारे, ज्या उद्योगांमध्ये खूप वाव आहे अशा सेवा उद्योगांसह औद्योगिकीकरणासाठी लाभप्रद क्षेत्रे आपण निवडून काढली पाहिजेत. विदर्भामध्ये, औद्योगिकीकरणासाठी सहाय्यभूत ठरतील असे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. ते पुढीलप्रमाणे : (१) वीज क्षेत्र (२) लॉजिस्टिक (३) पर्यटन आणि (४) मिहान. हे चार आधारस्तंभ, (१) इमारती लाकूड व वनआधारित उद्योग (२) कृषि प्रक्रिया उद्योग (३) वस्त्रनिर्माण (४) सिमेंट, ओतशाळा (फाऊंड्री), पोलाद आणि रि-रोलींग, वाहनांचे सुटे भाग, शेतीची अवजारे यासारखे इतर वस्तुनिर्माण उद्योग (५) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा (६) खाण व खनिजे यांसारख्या उद्योगधंद्यांना आणखी पूरक ठरतील.

मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित असणे आणि 'बुटिबोरी' सारख्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये केवळ थोडेच उद्योगधंदे सुरू असणे, हा विरोधाभास आहे. जी जमीन औद्योगिक वापराखाली आणलेली नाही अशी हजारो एकर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परत घ्यावी आणि ती जमीन प्रलंबित अर्जदारांना वाटून द्यावी याबाबीवर आम्ही वर्षानुवर्षेभर देत आहोत. ही प्रक्रिया उद्योगांच्या दृष्टीने अधिकाधिक अनुकूल आणि जमीन बळकावणाऱ्या व सट्टेबाज व्यक्ती यांच्यासाठी अधिकाधिक अडचणीची ठरेल अशा रीतीने तयार करण्याची गरज आहे. या एकाच निर्णयामुळे, आपण या ओसाड संपदेचे खऱ्या अर्थाने टिकाऊ औद्योगिक संपदेमध्ये रुपांतर करू शकतो.

३. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये, अतिभव्य वीज संयंत्र (४००० मेगावॅटचा अल्ट्रा मेगा वीज प्रकल्प), सिमेंटचे कारखाने आणि वीज सामुग्री निर्मिती कारखाने उभारण्यासाठी सध्या भरपूर वाव आहे. या संबंधात पुढील बाबींचा गुणवत्तेनुसार विचार करावा :-

(अ) पिंपळखुंटी रेल्वे स्थानकाजवळ खूप मोठ्या प्रमाणात नापीक जमीन (शासकीय व खाजगी अशी दोन्हीही) असून, ती किफायतशीर दराने संपादित करता येऊ शकेल.

(ब) हे रेल्वेस्थानक, भिवाकुंड कोळसा खाणीच्या अगदी जवळ असून या संधीचा लाभ घेता येईल. हे स्थानक मुख्य मार्गावर (हावडा-मुंबई मार्ग) असून ते कोळशाची आयात केल्या जाणाऱ्या मुख्य बंदराशी जोडलेले आहे.

(क) प्रस्तावित पैनगंगा धरण या ठिकाणापासून २५ किमी अंतरावर आहे आणि म्हणून, पुरेशा पाण्याच्या उपलब्धतेची सुनिश्चिती आहे.

(ड) राष्ट्रीय महामार्ग क्र.७ हा या ठिकाणाला लागून आहे.

(ई) या ठिकाणाच्या जवळ चुनखडीच्या खाणी आहेत.

२.१.६. वीज क्षेत्र

या प्रदेशामध्ये २६ हून अधिक वीज प्रकल्प येत असल्यामुळे विदर्भ हे महाराष्ट्राचे पॉवर हाऊस बनले आहे. म्हणून, या समृध्दीचा या प्रदेशाला प्रत्यक्ष लाभ मिळावयास हवा.

१. धोरणातील पुढील बदलांवर चर्चा करण्यात आली.

(अ) जी वीज विदर्भाबाहेरील प्रदेशांमध्ये– मग ते महाराष्ट्रात असोत किंवा दुसऱ्या राज्यांमध्ये असोत – पारेषित केली जाते अशा सर्व वीजेवर विदर्भ विकास उपकर आकारण्यात यावा आणि त्या पैशाचा वापर केवळ प्रदेशाच्या विकास निधीसाठी करावा.

(ब) प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या राखेचा वापर हा, वीज प्रकल्पाच्या १०० कि.मी. च्या आत रस्ते बांधणी, खाणी भरण,सूक्ष्म, लघु व मध्यम पाटबंधारे कालव्यांचे बांधकाम, उच्च उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी घराचे बांधकाम यासाठी करणे अनिवार्य करावे.

(क) राज्याच्या उर्वरित भागात वीज पारेषित करण्यापूर्वी,ही वीज प्रथम या संपूर्ण प्रदेशामध्ये पुरविली जावी.

(ड) चांगले रस्ते तयार करून, वीज प्रकल्पांपर्यंत कोळशाची वाहतूक करताना होणाऱ्या प्रदूषणाचा परिणाम कमी करावा. सर्व वीज प्रकल्पांसाठी, पर्जन्य जलसंचयन, पाझर तलाव, पाणलोट विकास व जलस्त्रोतांमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या अशा इतर उपाययोजना अनिवार्य कराव्यात.

२. वीज निर्मिती, पारेषण व वितरण यासाठी सामग्री, सुटे भाग इत्यादींची निर्मिती करण्याकरिता सामूहिक उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी कृती आराखडा तयार करावा.

३. प्रस्तावित २६ वीज प्रकल्पांमधून ८७,००० मेट्रिक टन इतकी राख बाहेर पडणे अपेक्षित असून, या बाहेर पडणाऱ्या राखेचे उत्पादित साधनसंपत्तीमध्ये रूपांतरण करणे ही लघु व मध्यम उपक्रमांसाठी एक मोठी संधी आहे.

४. प्रदूषणामुळे चंद्रपूरच्या हितसंबंधित व्यक्तींमध्ये नाराजी वाढत असून त्याचा या प्रदेशातील जनतेच्या सामान्य जीवनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. वीज प्रकल्पांनी प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी त्यांनी स्वत:चे तंत्रज्ञान विकसित करावयास हवे तसेच प्रकल्पांकडे त्यांचे स्वत:चे जलस्त्रोत असावयास हवे. यामुळे वीज निर्मिती करणे व नैसर्गिक साधनसंपत्तीचे परिरक्षण करणे यामध्ये समतोल साधण्यास प्रामुख्याने मदत होईल. प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी छोटे वीज प्रकल्प स्थापन करावेत असेही सुचविण्यात आले होते.

२.१.७. लॉजिस्टिक्स

व्यापारी माल व सेवा कर सुरू करण्याबरोबरच, नागपूर व त्याच्या भोवतालचे क्षेत्र हे पुन्हा एकदा लॉजिस्टिक्स हब म्हणून पसंतीचे ठिकाण बनेल, परंतु, पुरवठा साखळी व्यवस्थापनातील सध्याच्या व भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी, आपणांकडे त्या ठिकाणी आवश्यक त्या पायाभूत सुविधा असायला हव्यात.

याबाबतीत पुढील गोष्टींना प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे :–

१. नागपूरपासून सर्व दिशांनी, राष्ट्रीय महामार्ग ६, राष्ट्रीय महामार्ग ७ आणि राष्ट्रीय महामार्ग ६९ यांच्या लगतच्या १०० किमी एवढ्या जमिनीचा वापर करण्यासाठी योजना आराखडा तयार करणे.

२. एकात्मिकृत लॉजिस्टिक्स पार्कांना जागा पुरविण्यासाठी नागपूरच्या सर्व चारही बाजूंना १,००० एकर जमिनीचे भाग पाडून सीमांकन करणे.

३. लॉजिस्टिक्स सेवांना उद्योगाचा दर्जा देणे आणि उद्योगांप्रमाणेच सामूहिक प्रोत्साहनाच्या प्रकर्षित योजनेसह गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे.

४. नागपूर ते संबळपूर आणि नागपूर ते सुरत व मुंद्रा बंदरापर्यंत, प्राधान्याने, चौपदरी मार्ग पूर्ण करणे. केवळ महाराष्ट्र राज्यातील या भागातच यास विलंब होत आहे.

२.१.८. पर्यटन

विदर्भाची पर्यटन क्षमता अनन्यसाधारण असून त्या बाबतीत जाणीवपूर्वक कार्य करण्याची व त्यात व्यावसायिकता आणण्याची गरज आहे. याबाबतीत महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ फार काही करू शकेल असे वाटत नाही. नवल याचे वाटते की यापैकी काही बहुमूल्य गोष्टी या आपत्तीग्रस्त व आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या क्षेत्रात आहेत. या क्षेत्रांमध्ये कृषितर रोजगारांची गरज आहे. असे नवीन रोजगार निर्माण करणाऱ्या क्षेत्रांपैकी पर्यटन हे एक चांगले क्षेत्र आहे. नागपूरला व्याघ्रभूमीचे प्रवेशद्वार असलेले शहर -- भारताचा मध्यबिंदू म्हणून घोषित करण्याबरोबरच, मोठ मोठ्या उद्योजकांनी त्यांच्या आस्थापना स्थापन करणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि विदर्भातील पर्यटन व्यवसायाच्या संभाव्य संधीचा प्रसार करणे या गोष्टी केल्या पाहिजेत. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात खात्रीशीरपणे वृध्दि होत राहील.

अशा संभाव्य गरजांच्या बाबींसंबधात, पुढीलप्रमाणे आणखी चर्चा करण्यात आली आहे :-

१. महाराष्ट्र शासनाने, या प्रदेशात पर्यटनाचा विकास व व्यवसाय करण्याच्या उद्देशाने स्वतंत्र विदर्भ पर्यटन विकास महामंडळ तात्काळ स्थापन करावे. विदर्भ पर्यटन विकास महामंडळावर पर्यटन व वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी असावेत. विदर्भ पर्यटन विकास महामंडळ केवळ सुविधा पुरविणारे मंडळ व प्रवर्तक असावे. (परंतु धंदा व व्यापारी कार्यांमध्ये सहभागी होऊ नये. ते काम खाजगी क्षेत्राकडे सोपवावे.)

२. शासनाने, विदर्भातील पर्यावरणानुकूल पर्यटन व पर्यटनविकास या दोन्ही विषयांवर टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टी.सी.एस.) (मंत्रिमंडळाने मान्यता दिलेल्या) यांनी सादर केलेल्या अहवालाची अंमलबजावणी करावी.

३. महाराष्ट्र शासनाने, उद्योगधंद्यांसारख्या सामूहिक प्रोत्साहन योजनांचा लाभ देऊन विदर्भातील पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी गुंतवणुका करण्यास प्रोत्साहन द्यावे.

२.१.९. मिहान

महाराष्ट्र शासनाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी हा एक सर्वात मोठा पायाभूत सुविधा प्रकल्प असून तो अजूनही सुरू आहे. या प्रकल्पाचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून नियमितपणे संनियंत्रण करण्याची गरज आहे. मिहानच्या क्षेत्रात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा जवळ जवळ पूर्ण आहेत असे हितसंबंधित घटकांनी निदर्शनास आणून दिले आहे. पुढील पैलूंवर प्राधान्याने विचार करण्याची गरज आहे.

१. मिहानची बाजारपेठ व्यावसायिकदृष्ट्या वस्तुनिर्माण क्षेत्रासाठी विशेषत: विशेष आर्थिक क्षेत्रासाठी आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व वैश्विक स्तरावरील संस्थांना आकर्षित करण्यासाठी वैश्विक अभिकरणाची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

२. मिहानमध्ये मुक्त व्यापार व वखार (वेअर हाऊसिंग) क्षेत्रे सुरू करावीत.

३. आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे व रस्त्यांनी जोडली जाणारी अंतिम स्थानके यांचा विकास करण्याकरिता एखादा भागीदार शोधण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी.

२.१.१०. कृषि आधारित उद्योगधंदे

१. कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर चालना देण्याची आणि संभाव्य गरजा उपयोगात आणण्याची गरज आहे.

२. विदर्भामध्ये सोयाबीन व कापसावर आधारित उद्योगधंद्यांशिवाय इतर कृषि उद्योगांमध्ये भरपूर संधी आहे. सध्याच्या औद्योगिक स्थितीत बदल करण्यासाठी, जैव-इंधन, भात, ज्वारी, संत्री, लाल मिरची, हळद यांवर आधारित उद्योगधंद्यांमधील शक्यतेबाबत परिपूर्ण अभ्यास करता येऊ शकेल.

३. नागपूर मध्ये इमारती लाकडाच्या उद्योगांची युनिटे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. तथापि, इमारती लाकडाचे नियमन करणारे नियम व विनियम यांमुळे, इमारती लाकूड उपलब्ध होत नाही. परिणामी, उपलब्ध क्षमतेचा वापर करताना या उद्योगाचा विकास व भरभराट झाली नाही. धोरणामध्ये, औद्योगिक वापरासाठी वनीकरणाला चालना द्यावी. सर्व उपलब्ध जमिनींवर- मग ती सार्वजनिक मालकीची असो किंवा खाजगी मालकीची असो-वनीकरण व तिचा औद्योगिक वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे. इमारती लाकडाची नव्याने निर्मिती करण्यासाठी वन धोरणामध्ये वन रोपनाला प्रोत्साहन व चालना देण्यात यावी.

२.१.११. औद्योगिक विकास

विदर्भाच्या औद्यागिक विकासासंबंधात, हिंगणा येथील महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ संघाचे माजी अध्यक्ष यांनी सुचविलेल्या सूचना थोडक्यात खाली देत आहोत :-

१. पुणे, मुंबई, नाशिक व औरंगाबाद येथील युनिटांची तुलना करता निर्यातीमध्ये स्पर्धाक्षम असणाऱ्या विदर्भातील युनिटांसाठी प्रमुख बंदरांपासून असलेल्या अंतरांमुळे वाहतूक खर्चात होणारी वाढ अडचणीची ठरत आहे. मुख्य बाजारपेठांच्या सान्निध्यात व्यस्त प्रमाणात अर्थसहाय्य देण्यासाठी एक समुचित धोरण तयार करता येऊ शकेल.

२. ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, इत्यादींसारख्या मोठ्या उद्योगांना, महाराष्ट्र शासनाने प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि शासनाने खाजगी क्षेत्रांना उद्योगांमध्ये शिरकाव करून देण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने योग्य ती प्रोत्साहक संरचना स्थापन केली पाहिजे.

३. विदर्भातील उद्योगधंद्यांमध्ये नवचैतन्य आणण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी शासनाच्या सध्याच्या प्रोत्साहन संरचनेत आणखी सुधारणा करण्याची गरज आहे.

४. महाराष्ट्राच्या इतर विभागात असलेल्या युनिटांशी तुलना करता विदर्भातील युनिटांना सवलतीच्या दराने वीज (पारेषण खर्च होत नसल्यामुळे) उपलब्ध करून द्यावी. यामुळे विदर्भातील कारखानदारांना सोसाव्या लागणाऱ्या अतिरिक्त वाहतूक खर्चाची भरपाई होईल.

५. केंद्रीभूत निर्णय प्रक्रिया ही विदर्भाच्या औद्योगिक धोरणातील एक मुख्य अडथळा आहे. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे.

विदर्भ प्रदेशातील उद्योगधंद्यांच्या विकासासाठी व वाढीसाठी, त्यांनी, अल्प व दीर्घकालीन उपाययोजना देखील सुचविल्या आहेत.

२.१.१२. अल्पकालीन उपाययोजना

१. शासनाने, सध्याच्या औद्योगिक धोरणात तात्काळ सुधारणा करावी व 'मुंबईपासूनचे अंतर' या आधारे प्रोत्साहन द्यावे. अधिक अंतर असलेल्या औद्यागिक क्षेत्रात अधिक प्रोत्साहने देण्यात यावीत.

२. उद्योग विकास आयुक्त, विदर्भ यासारख्या प्राधिकाऱ्याचे पद तात्काळ निर्माण करावे व त्याला, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग विभाग, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ इत्यादींसह विविध शासकीय विभागांच्या प्रश्नांसंबंधात मंजुरी देण्याचे अधिकार द्यावेत.

२.१.१३. दीर्घकालीन उपाययोजना

१. वीज वितरण कंपन्यांना, त्यांच्या निर्मिती केंद्राजवळच्या ठिकाणी स्वस्तात वीज पुरवून आणि अतिदूर असलेल्या ठिकाणी वीजपुरवठा करण्यासाठी अंतराच्या आधारे पारेषणाच्या खर्चाचा भार टाकून त्यांच्या वीज उत्पादनाची योग्य प्रकारे किंमत ठरविण्याचे निदेश द्यावेत. विदर्भाच्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगांकडून, महाराष्ट्राच्या इतर भागातील उद्योगांना दिले जाणारे अंतर्गत अर्थसहाय्य तात्काळ थांबविण्यात यावे.

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची किंमती संबंधातील संरचना निव्वळ अन्याय्य आहे. यात बदत करण्यात यावा आणि विदर्भासारख्या प्रदेशाला मुंबई व पुणे या शहरांपासून वेगळे ठेवावे. यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रदेशातील जमिनीच्या अधिकृत किंमती आपोआप कमी होऊन त्या बाजारातील किंमतीच्या समान पातळीवर येतील. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सध्याची भूमिका ही, विकास प्राधिकरण म्हणून असलेल्या त्याच्या ओळखीस साजेशी नाही.

३. प्रदेशातील खनिजांचा वापर करणाऱ्या स्थानिक उद्योगांवर स्वामित्वधन आकारण्यात येत असून ते थांबविण्यात यावे आणि प्रदेशातून खनिजे काढण्यासाठीच स्वामित्वधन आकारण्यात यावे.

४. स्थानिक पिकांचा वापर करून कृषि आधारित उद्योगधंद्यासाठी व स्थानिक खनिजांवर आधारित असलेल्या उद्योगधंद्यासाठी विशेष प्रोत्साहन योजना तयार करण्यात याव्यात.

५. अखेरीस, वीज निर्मितीवर शासनाकडून वसूल केलेले शुल्क, या प्रदेशात रोजगार निर्मिती करण्यासाठी रोख अर्थसहाय्य म्हणून विदर्भातील उद्योगधंद्यांना देण्यात यावे. वीज निर्मिती केंद्रे व वीज वितरण अभिकरणे यांना, शेतजमिनीचा वापर करून होणाऱ्या प्रदूषणाबद्दल नुकसानभरपाई देण्याचे निदेश दिले जावेत आणि ही नुकसान भरपाई ज्या शेतकऱ्यांची काही कुटीरोद्योग सुरू करण्याची इच्छा आहे त्या शेतकऱ्यांना देण्यात यावी, जेणेकरुन शेतकऱ्यांना कोणतेही भांडवल उभारावे लागणार नाही.

२.१.१४. कामगारांसंबधातील सुधारणा

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अमरावतीच्या प्रतिनिधीने कामगारांच्या समस्यांसंबंधात काही सूचना केल्या आहेत :-

१. कामगार कायदे तयार करतेवेळी, खाली सुचविल्याप्रमाणे सुधारित वर्गीकरण करण्यात यावे :-
   - अ. मोठ्या व मध्यम उद्योगधंद्यांमधील कामगार
   - ब. सूक्ष्म,लघु व कुटिरोद्योग यामधील कामगार
   - क. असंघटित क्षेत्रातील कामगार

२. एक खिडकी योजना (जिल्हास्तरावर एकाच ठिकाणी उद्योगाच्या संबधातील सर्व अधिकारी)

३. कामगार कायद्यांचे सुलभीकरण व त्यांच्या संख्येत घट करणे.

४. किमान वेतन अधिनियमातील प्रवर्ग कमी करणे. (सध्याचे प्रवर्ग हे विद्यमान ७६ प्रवर्गांमधून ३ प्रवर्गांपर्यंत कमी करण्यात यावेत)

५. दुकाने अधिनियमाखालील नोंदणी, लघु उद्योगातील युनिटांना लागू करू नयेत.

६. कामगार कायद्यांचे उद्योगधंद्यांसंबंधातील कामगार कायदे म्हणून नामकरण केले जावे. उद्योगधंद्यांचे अस्तित्व टिकून राहणे हा कायदे निर्माण करणाऱ्याचा मुख्य उद्देश असावा.

७. एका युनिटमध्ये केवळ एक कामगार असला तरी सामाजिक सुरक्षा पुरविण्यात यावी.

८. कामगाराला सुरक्षा पुरविणे हे जरी गरजेचे असले तरी कठीण स्पर्धेच्या युगात उद्योग टिकून राहण्यासाठी कामगाराला काढून टाकण्यास मालक/व्यवस्थापन यांना संपूर्ण स्वातंत्र्य देणेही सारखेच महत्वाचे आहे.

९. कामगार कायद्यांच्या चौकटीत बसविण्यासाठी व अंमलबजावणीत पारदर्शकता,लवचिकता, सलोखा असावा.

१०. देशाच्या संपूर्ण विकासासाठी कामगार धोरणाची चौकट बसविताना पुढील बाबींना प्राधान्य असावे.

अ. उद्योग, व्यापार, कृषी व सेवा क्षेत्रांचा टिकाव

ब. कामगारांना सामाजिक सुरक्षा

क. मालक/ व्यवस्थापन / भागधारकांना नफा

२.१.१५. नागपूर येथील संचालनालये

नागपूर महानगरपालिकेतील उपमहापौर यांनी दि.२८सप्टेंबर १९५३ च्या नागपूर कराराच्या आधारे निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली असली तरी गृहमंत्री व मुख्यमंत्री यांनी प्रशासकीय केंद्र म्हणून नागपूरचे महत्व कमी होणार नाही असे अभिवचन दिले होते. असाही निर्णय घेण्यात आला होता की, जरी मुंबई येथे विविध विभागांची सचिवालये स्थित असली तरी त्यांची संचालनालये नागपूर येथे असतील. त्यावेळेस नागपूर येथे १६ कार्यालये स्थलांतरित करण्यात आली होती. त्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे :-

१. कृषि संचालनालय,

२. शिक्षण संचालनालय,

३. उच्च शिक्षण संचालनालय,

४. प्रौढ शिक्षण संचालनालय,

५. क्रीडा संचालनालय,

६. पशुसंवर्धन संचालनालय,

७. सहकार आयुक्तालय

८. नगररचना विभाग

९. मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय

१०. आयुर्वेद संचालनालय

११. भूजल सर्वेक्षण संचालनालय

१२. कारागृह महानिरीक्षक यांचे कार्यालय

१३. नोंदणी महानिरीक्षक यांचे कार्यालय

१४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांचे कार्यालय

१५. सार्वजनिक आरोग्य संचालनालय

१६. समाजकल्याण संचालनालय

तथापि, मुख्य वनसंरक्षक यांच्यासारखी काही कार्यालये वगळता बहुतेक इतर सर्व कार्यालये नागपूर येथे स्थलांतरित झाली नव्हती. ही कार्यालये नागपूरला स्थलांतरित झाल्यास वेगाने विकास होण्यास व त्वरित निर्णय घेऊन कृती करण्यास सोपे होईल.

२.१.१६. नियमन(Governance)

नियमनाच्या संदर्भात प्रदेशाच्या हितसंबंधितांनी केलेल्या काही सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

१. अनुशेषाची रक्कम त्याच वर्षी वितरित करावी अन्यथा चलनवाढीच्या दबावामुळे काही वर्षांनंतर वाटप केलेली रक्कम अपुरी पडेल.

२. कृषि विकासावर विशेष जोर देण्याची गरज आहे.

३. विदर्भ विकास मंडळाला कोणताही अधिकार नाही. ते केवळ अभ्यास करून, अहवाल तयार करून त्यांच्या शिफारशी माननीय राज्यपालांकडे पाठवते. विकास मंडळाच्या सदस्यांना ग्रामीण विकासाचा व्यापक अनुभव असल्याने त्यांच्या क्षमतेचा उपयोग करून घेता येत नाही. शासनाने या मंडळांना ग्रामीण विकासासाठी अतिरिक्त अधिकार व जबाबदाऱ्या देण्यासाठी शक्ती प्रदान करावी.

४. स्थानिक परिस्थितीनुरूप शासकीय योजनेत लवचिकता असावी. उदा. बँकिंग व टपाल सुविधा उपलब्ध नसल्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेन्वये निधी संवितरण करणे अडचणीचे जाते. म्हणून योजना यथोचित तयार करण्यात यावी.

५. जिल्ह्याची योजना कार्यान्वित करण्यासाठी जिल्हा विकास प्राधिकरणासारखी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करावी. या प्राधिकरणाला, प्रशासनिक व तांत्रिक मंजुरीसाठी आणि शिस्तविषयक कार्यवाही करण्यासाठी पुरेसे अधिकार दिले पाहिजेत.

२.१.१७. कृषि

१. शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

अ. प्रमुख शेती उत्पादक संघाच्या प्रतिनिधींशी विचारविनिमय करूनच आयात-निर्यात कृषि उत्पादनांची किंमत निश्चित करण्यात यावी.

ब. शेतकऱ्यांच्या जीवनात असणाऱ्या अनिश्चितीच्या दृष्टीने शेतकरी व शेतमजूर यांच्याकरिता निवृत्तीवेतनाची तरतूद असलेले कायदे केंद्र सरकारद्वारे अधिनियमित करण्यात यावेत.

क. शेतकऱ्यांच्या मुलांना कृषि अभियांत्रिकी व इतर उपयोजित क्षेत्रे यासंबंधित शिक्षणाच्या विविध सुविधा (विनामूल्य) पुरविण्यासाठी दिवंगत डॉ.पंजाबराव देशमुख, माजी कृषिमंत्री, भारत सरकार यांनी सुचविल्याप्रमाणे ''कृषि कल्याण मंडळ'' स्थापन करण्यात यावे.

ड. विदर्भ प्रदेशातील (पश्चिम) हिंगणघाट, अचलपूर, अमरावती येथील कापड गिरण्या पुन्हा सुरू कराव्यात आणि त्या गिरण्या पुरेपूर क्षमतेने चालविल्या जातात याची खात्री करण्यात यावी.

२. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी करण्याच्या दृष्टीने आणि त्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत व्हावी यासाठी पुढील दृष्टिने विचार करावा :-

अ. मूळस्थानी जलसंधारण, रासायनिक शेती, स्थानिक कृषि संस्थांनी सुचविल्याप्रमाणे लागवडीची सुधारित पध्दती, एकात्मिकृत अन्न व फंगल व्यवस्थापन व ठिबक सिंचन यासारख्या कमी खर्चाच्या उत्पादन पध्दतीचा वापर करावा.

ब. शेततळी, जुन्या विहिरींची पुन्हा दुरुस्ती, खार पाण पट्ट्यातील कूपनलिका व समुचित ठिबक सिंचन व्यवस्था यामार्फत जेथे शक्य असेल तेथे सिंचन व्यवस्थेची तरतूद करणे.

क. कोरडवाहू जमिनीच्या बाबतीत शेतकरी केवळ निसर्गाच्या लहरीपणामुळेच नव्हे तर उत्पादनाच्या बाजारमूल्यातील चढउतारांमुळे सुध्दा बाधित झाला होतो. यामुळे, शेतकऱ्यास मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागतो. शेतकऱ्यांना त्यांच्या अडचणीच्यावेळी मदत मिळण्यासाठी लोकहितैषी निधी

स्थापन करण्यात यावा.

ड. गावातील रस्ते, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसारख्या योजनांमार्फत विकसित करणे शक्य आहे. ग्रामपातळीवर १०० टक्के अर्थसहाय्य पुरवून गोदामे, शीतगृहे व प्रक्रिया युनिटे स्थापन करणे शक्य आहे. वन्य पशुंना (जे पिकांची नासधूस करतात) पकडून त्यांची वनक्षेत्रात सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी ग्राम स्तरावर समुचित निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.

इ. विम्याचे निकष सोपे व शेतकऱ्यांना सहज समजण्याजोगे असावे. विमा कंपन्यांची कार्यालये जिल्हा स्तरावर असावीत व त्याची ग्रामपंचायत स्तरावर सुविधा उपलब्ध करून द्यावी. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन तोट्याची जोखीम कमी होण्यास मदत होणे शक्य आहे.

फ. कृषि संस्थेचे संशोधन अधिकाधिक शेतकरीभिमूख असावे. या प्रयोजनासाठी, शेतकऱ्यांकडून आग्रहाने पाठपुरावा झाला पाहिजे. या संस्थांना, प्रादेशिक अनुशेषातून अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा.

ग. संघ/सहकारी संस्थांमार्फत शेतीची व शेत उत्पादन प्रक्रिया युनिटाची अद्ययावत तांत्रिक माहिती मिळणे शक्य व्हावे म्हणून संघ/सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना उत्तेजन व प्रशिक्षण द्यावे. आर्णी तहसील हितसंबंधितांनी अशी विनंती केली की, अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला निम्न पैणगंगा प्रकल्प शक्य तितक्या लवकर पूर्ण करावा. प्रदेशातील शेतकऱ्यांना यामुळे प्रचंड सिंचन क्षमता लाभून त्याचा परिणाम ऊस, कापूस, शेंगदाणा व सोयाबीन यासारख्या कृषि उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल. परिणामी प्रदेशातील मंगरूळ साखर कारखाना चांगल्या प्रकारे चालविला जाणे शक्य आहे व बेरोजगारी समस्या सोडवून काही प्रदेशातून कृषि संस्करण युनिटे स्थापन करणे शक्य आहे. यामुळे तालुक्याचा मोठया प्रमाणात कायापालट होईल.

२.१.१८ सिकल सेल

सिकल सेल संस्थेच्या प्रतिनिधीनी जोर दिला आहे की, सिकल सेल हा समाजातील काही जमातीत सार्वत्रिक जीवघेणा रोग आहे. त्यांनी असाही युक्तिवाद केला आहे की, जर कुटूंबातील एका सदस्याला सिकल सेलची बाधा पोहोचली तर संपूर्ण कुटुंबाची आर्थिकदृष्टया व मानसिकदृष्टया हानी होते. विदर्भात सिकल सेल रुग्णांची संख्या १.३ लाख (एसएस स्वरूपाचे) इतकी आहे. तर सिकल सेल वाहकांची (एएस स्वरूपात) संख्या २६ लाख इतकी आहे. आज या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी कोणतेही औषध किंवा कोणतीही उपचार पध्दती उपलब्ध नाही. हा आनुवंशिक विकार आहे व तो एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे जातो. विवाहयोग्य तरूण पुरुष व स्त्रियांचे समुपदेशन करणे हीच एक नियंत्रण पध्दत आहे. जेव्हा दोन सिकल सेल वाहक एकमेकांशी लग्न करतात तेव्हा सिकल सेलचे रुग्ण मोठया प्रमाणात निर्माण होण्याची शक्यता असते.

यावर असे सुचविले आहे की, सिकल सेल समुपदेशन केंद्राच्या मदतीच्या जोरावर सिकल सेल जनजागृती कार्यक्रम राज्यस्तरावर घेण्यात यावे आणि विदर्भ विकास कार्यक्रमाचा तो एक भाग असावा. संपूर्ण विदर्भात सिकल सेल संशोधन, रोगनिदान पुनर्वसन केंद्रे उभारण्याची तात्काळ गरज आहे.

२.१.१९. बँक व्यवसाय (बँकिंग)

बँक ऑफ इंडियाच्या जिल्हा व्यवस्थापकांबरोबर १५ नोव्हेंबर, २०११ रोजी क्षेत्रीय कार्यालयात बैठक बोलावण्यात आली होती.

तेव्हा असे लक्षात आणून देण्यात आले होते की, बँक व्यवसायाची वाढ ही जिल्हयातील आर्थिक कामांच्या

वाढीशी अभेद्यपणे जोडली गेली आहे. त्यांना वाटले होते की, प्रदेशातील संपूर्ण संभाव्य साधनसंपत्ती उपयोगात आणणे शक्य नसल्याने अस्तित्वातील कार्यपध्दतीपेक्षा वाणिज्य उपक्रम म्हणून क्षेत्रातील लोकांच्या विनिर्दिष्ट गरजांच्या संदर्भात वाढीची कल्पना विकसित करण्याची गरज आहे. सार्वजनिक खाजगी सहभागाचे प्रतिमान समन्वेषण करण्याची शक्यता असल्याने प्रदेशातील सिंचनाच्या मूलभूत सोईत वाढ करण्याची अत्यावश्यकता आहे.

प्रमुख जिल्हा व्यवस्थापकांनी त्यांच्या संबंधित जिल्हयाचे दृश्यमान आराखडा तयार केला. चर्चेच्या दरम्यान पुढील महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले.

१. महाराष्ट्रातील बँक व्यवसायाचे वितरण एक समान नसून ते विदर्भासाठी २०% ने कमी तर उर्वरित महाराष्ट्रासाठी ५०% ने जास्त आहे.

२. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची मोठी भूमिका कृषि विद्यापिठांनी पार पाडणे गरजेचे आहे.

३. कर्जदार नव्हे तर लाभार्थी असे संबोधल्याने लोकांना बँकेच्या कर्जाच्या रकमेची परतफेड न करण्याची संस्कृती रूजत आहे.

४. संपादित जमिनीचे क्षेत्र व स्थावर संपदा विकासात केलेली गुंतवणूक यांच्या तुलनेत वाढ अंशदानाच्या अनुसार विदर्भातील औद्योगिक वसाहत महत्त्वाची नाही.

५. पायाभूत सोयीनुसार न वाढलेल्या आर्थिक वाढीला वाणिज्यिक पाठिंबा देण्यासाठी गावातील विविध कार्यांची जोड देणे गरजेचे आहे.

६. मोठ्या उद्योगांनी नवक्लृप्ती करणारे डावपेच त्याचप्रमाणे ग्रामीण क्षेत्रातील गरजा व आवश्यकता लक्षात ठेवून बनविलेल्या वाढीचे डावपेच यामार्फत ग्रामीण बाजारात शिरकाव केला आहे.

७. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराने ग्रामीण जनतेला त्यांच्या आर्थिक लाभासाठी असलेल्या योजना व कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण क्षेत्रातील उपलब्ध माहितीत वाढ झाली पाहिजे.

८. शासकीय कार्यालयात, ग्रामीण जनतेला त्यांच्या विविध प्रशासकीय गरजांशी संबंधित विशेषत: त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी योजना व कार्यक्रमाविषयीची प्रसारित केलेल्या माहितीच्या संदर्भात पाठिंबा व माहिती देण्यासाठी एक खिडकी पध्दत असायलाच हवी.

९. योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध शासकीय संस्था आणि ग्रामीण क्षेत्राचा व मागास जिल्हयांचा विकास करण्यासाठी काम करणारे अधिकारी यांच्यात योग्य त्या समन्वयाची मोठी गरज आहे.

१०. ग्रामीण वित्तव्यवस्थेसाठी स्वयंसहाय्यता गटाचा आदर्श परिणामकारक सिध्द झाला आहे. उत्पादक कार्ये व ग्रामीण विकासात वाढ होण्यासाठी मध्यवर्ती पध्दतीने या आदर्शाची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

२.१.२०. वाहतूक मार्गाचे जाळे

जिल्हयांचा विकास, विशेषत: विदर्भाच्या पश्चिम भागातील विकास हा योग्य अशा वाहतूक मार्गांच्या जाळ्याच्या कमतरतेमुळे बाधित झाला आहे.

१. **रस्ते मार्ग जोडणी :** यवतमाळसारख्या जिल्हयात २७५० किमी चा राज्य व राष्ट्रीय महामार्ग व ४४०० कि.मी.चा ग्रामीण मार्ग आहे. तथापि, पावसाळयाच्या मोसमात दहा गावांना पोहचणे शक्य होत नाही. तेथे कोणतेही रस्ते नाहीत. ४३१ गावे डांबरी रस्त्यांपासून वंचित आहेत आणि सुमारे १७३५ कि.मी. ग्रामीण व

राज्य मार्ग दुरुस्ती कामांच्या प्रतिक्षेत आहेत. त्याचा खर्च रु.२८२ कोटी इतका अंदाजित आहे.

२. **रेल्वे मार्ग जोडणी :** ब्रॉड गेज लाईन यवतमाळ जिल्ह्यातून घालणे आवश्यक आहे. यामुळे वाहतूक यंत्रणेत सुधारणा होऊन सर्वच व्यवसायांचा विकास होईल. सध्या, यवतमाळ जिल्हयात कोणतीही रेल्वे जोडणी नसल्याने रेल्वे मार्गाच्या अभावी शासकीय कर्मचारीदेखील त्यांचे नेमून दिलेले काम करण्यापासून परावृत्त होतात व निरूत्साही होत असतात.

३. **हवाई मार्ग जोडणी:** विद्यमान धावपट्टीचा (जवाहरलाल दर्डा धावपट्टी) थोडासा विस्तार करून त्याचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उड्डाणासाठी वापर करणे शक्य आहे. प्रमुख शहरांशी यवतमाळ शहर हवाई मार्गाने जोडल्यास या प्रदेशातील व्यापार, उद्योग व वाणिज्य यांचा मोठ्या प्रमाणात विकास होणे शक्य आहे.

२.१.२१ शिक्षण व प्रशिक्षण

शिक्षण व प्रशिक्षणाच्या सूचनांमध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव होतो.

१. युनिसेफचे विविध कार्यक्रम जिल्हा स्तरावर राबविण्यात येऊन त्यामुळे केवळ ग्रामीण तरूण महिलांची क्षमता निर्माण करणे सुलभ होणार नाही तर उपजिविकेच्या शोधात त्यांच्या स्वत:च्या गावापासून स्थलांतरित होण्यास किंवा उपजीविकेसाठी अनैतिक साधनांचा उपयोग करण्यास प्रतिबंध होईल.

२. सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या कल्याणासाठी "युवक निधी" म्हणून संबोधण्यात येणारा स्वतंत्र निधी निर्माण करता येईल. हा निधी पुन:पुर्तीकालासाठी पुरेसा असावा आणि याद्वारे प्रदेशाचा समतोल विकास सुनिश्चित करण्यात यावा.

३. प्रदेशातील उच्च व तंत्र शिक्षणाकडे लक्ष देण्यात आले आणि उच्च शिक्षणाच्या कोणत्याही प्रमुख संस्था उदयास आलेल्या नाहीत व विकसित झालेल्या नाहीत त्यामुळे या प्रदेशात कौशल्याधारित केंद्रे संस्थांची स्थापना करण्याची तात्काळ गरज आहे.

४. शैक्षणिक संस्थांना वेतन देण्यासाठी अनुदान मर्यादित आहे आणि विकासाबाबत कोणतेही लक्ष देण्यात आलेले नाही. निधीच्या कमतरतेमुळे दर्जेदार शिक्षण देण्यास संस्था असमर्थ आहेत. शिक्षण दर्जातील कमतरतेमुळे प्रामुख्याने ग्रामीण विद्यार्थ्यांचे स्थलांतरण मोठया प्रमाणात होत आहे.

५. शाळा आणि महाविद्यालयांमधील ज्ञानशाखांमधील अनेक पदे व कर्मचाऱ्यांची संख्या रिक्त आहे, त्यामुळे कोणत्याही शिक्षण पध्दतीचा कणा असलेल्या, अध्यापन-अध्ययनाच्या प्रक्रियेत अडथळा येत आहे.

६. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या योजना, त्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्या व फी-माफी यांची अंमलबजावणी योग्यरीतीने करण्यात येत नाही. विद्यावर्षाच्या सत्राच्या अखेरीसदेखील हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व फी माफी मिळालेली नाही. बऱ्याच विद्यार्थ्यांना त्यांचे दैनंदिन खर्च भागविण्यासाठी बँकांकडून अथवा जास्तीच्या व्याजदराने सावकारांकडून कर्जे घ्यावी लागत आहेत.

७. दिवसातून ८ ते १२ तास वीज कपातीमुळे शैक्षणिक प्रगती जैसे थे राहत आहे. यामुळे प्रात्यक्षिके अथवा प्रयोगशाळेतील कामे समाधानकारक केली जात नाहीत. परिणामी, शिक्षणाचा दर्जा व स्तर खालावत चालला आहे.

८. याठिकाणी उद्योगधंदे व नोकरीच्या संधी उपलब्ध होत नसल्यामुळे आपल्याकडील बुध्दिमान व कुशल विद्यार्थी दुसऱ्या प्रांतात जात आहेत. यादृष्टीने, पुरेशा पायाभूत सुविधा व अन्य सोयी पुरविण्यासाठी शासकीय सहाय्य आवश्यक आहे त्यामुळे विद्यार्थी शाळांकडे वळतील व मुलांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल.

२.१.२२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

मोठया प्रमाणावर होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे अमरावती विभाग व वर्धा जिल्हयाचा भाग चर्चेत आहे. कर्जबाजारीपणा, सतत लागोपाठच्या वर्षात पीक न येणे यामुळे आलेली पराकोटीची विपन्नावस्था व अत्यंत कमी मिळकत, कुटुंबातील सदस्यांचे आजार, मुलींच्या विवाहात येणारे अडथळे व उत्पन्नाची पर्यायी व्यवस्था नसणे ही प्रमुख कारणे त्यांच्या आत्महत्येस कारणीभूत होत आहेत.

राज्यात कृषि क्षेत्रात ही समस्या रौद्ररुप धारण करीत असून विशेष करून कापूस उत्पादन करणाऱ्या विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये या समस्येचे प्रमाण लक्षणीय आहे.

कापूस हे प्रमुख नगदी पीक आहे, त्यामुळे ते उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. तथापि, गेल्या दशकापासून ते अनावर्ती म्हणजेच अत्यंत कमी मोबदला मिळवून देणारे ठरले आहे. एचवायव्ही बियाण्यांच्या मोठया प्रमाणावरील वापरासाठी खते, किटकनाशके व पूरक घटक यांची अतिरिक्त मात्रा आवश्यक असते. परिणामी, या पिकांच्या लागवडीच्या खर्चात मोठी वाढ होते. यासाठी निश्चित केलेले किमान साहयभूत मूल्य हे उत्पादन खर्चाच्या जवळपास २० ते ३० टक्क्यांनी कमी आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या या कृषिविषयक समस्यांच्या संदर्भात, सर्वस्व गमावून बसलेल्या कुटुंबांच्या सहाय्यासाठी व पुन्हा अशा घटना घडू नयेत यासाठी हितसंबंधितांनी अनेक सूचना केल्या आहेत

१. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे त्यांच्या साक्षर मुलांना व कुटुंबातील अन्य सदस्यांना शासनाने नोकरीस लावले पाहिजे. यापैकी बहुतांश प्रकरणांमध्ये आत्महत्येस कारणीभूत होणाऱ्या कारणांमध्ये दारूचे व्यसन हे एक ठळक कारण आहे. त्यामुळे शासनाने यवतमाळ जिल्हयात मद्यविक्री व मद्यपान यावर बंदी घालण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे, त्यामुळे हा जिल्हा मद्यमुक्त म्हणून घोषित होईल.

२. शासकीय अधिकाऱ्यांनी नियमितपणे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना देण्यात येणाऱ्या सुविधांचे संनियंत्रण केले पाहिजे. शासकीय अधिकाऱ्यांनी योग्य रीतीने व नियमितपणे अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण केले पाहिजे आणि त्यांच्या औदासिन्याची कारणे वेळोवेळी समजून घेऊन त्यावर तोडगा शोधला पाहिजे. अशा प्रकारे या प्रांतातील आत्महत्येचे प्रमाण कमी होऊ शकेल.

३. आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना १००% सिंचनाच्या सुविधा व वीज मोफत उपलब्ध करून दिली पाहिजे व हे शेतकरी त्यांच्या कर्जाचा परतावा करीत आहेत व कर्जाच्या बोज्याला बळी पडत नाहीत ना याची खातरजमा करणे आवश्यक आहे. पाच एकरापेक्षा कमी जमीन धारण करीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी आगामी तीन वर्षांकरिता, शासनाने, शेतकऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबास रु.२०००/- इतकी रक्कम निश्चित केली पाहिजे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या उत्पादन हानीच्या आधारे, पुढील बाबतीत त्यांना नुकसान भरपाईची रक्कम म्हणून देण्यात यावी- (अ) सिंचन सुविधांच्या अभावी अल्प उत्पादन क्षमता (ब) पंपांना वीजजोडणी देण्यासाठीचा असाधारण विलंब (क) अनेक तासांच्या भारनियमनामुळे कमी उत्पादन (ड) वीज अर्थसहाय्यातील परिणामस्वरूप तूट (ई) उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी प्रमाणात किमान आधारभूत किंमत (फ) कृषि उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठीची असमाधानकारक व्यवस्था, इत्यादी तसेच शासनाने, ज्या शेतकऱ्यांचा उत्पादनात अंतर्भूत असलेल्या खर्चापेक्षा, उत्पन्नाचा दर कमी आहे अशा शेतकऱ्यांच्या कर्जाची संपूर्ण रक्कम माफ करण्याचा प्रयत्न करावा. (आणेवारी योजना)

४. बँक अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या पीक कर्जासाठी शक्य तितक्या लवकर मंजुरी द्यावी. शेतकरी योजना, पात्र शेतकऱ्यांपर्यंत त्यांना न सतावता पोचवली पाहिजे. या सुविधांमध्ये दर्जेदार बी-बीयाणे, व खते सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याचादेखील समावेश करावा. उत्पादनक्षमता सुधारण्यासाठी, शेतकऱ्यांना

अत्याधुनिक सेवासुविधांचा वापर करण्याच्या दृष्टीने तसेच विहिरी, कुंपण व जलाशय यांच्या उपलब्धतेसह डिझेल इंजिन, तुषारणी यंत्रे तसेच अत्याधुनिक यंत्रणा यांचा वापर करण्यासाठी प्रशिक्षित करण्याची गरज आहे.

५. अनेक शेतकरी शिक्षित असूनही रोजगारांच्या संधी अभावी बेरोजगार आहेत. रोजगाराच्या संधींच्या अभावी युवावर्ग आत्महत्येस प्रवृत्त होत आहे. यवतमाळमध्ये कोणतेही मोठे प्रकल्प उभारण्यात येत नसल्यामुळे युवावर्गास दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, रेशीम उत्पादन, पशुव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, लघुउद्योग, मधुमक्षिका पालन व्यवसाय, इत्यादी क्षेत्रे व प्रक्रिया यांमधील आवश्यक कौशल्य मिळू शकत नाही. युवावर्गास या क्षेत्रातील देण्यासाठी बँकेने कर्जे उपलब्ध करावीत जेणेकरून ते रोजगारासाठी सक्षम होऊ शकतील. ही कर्जे५ ते १० लाखांपर्यंतच्या व्यवसाय कर्जासह कमी व्याजदराने उपलब्ध करावीत. पंजाबराव कृषि विद्यापीठामध्ये सध्या केवळ संशोधन व शिक्षण देण्याची प्रक्रिया चालते. या कार्यक्रमांना बी-बियाणांचे उत्पादन व विक्रीची जोड दिल्यास शेतकरी व विद्यापीठ यांच्यात खऱ्या अर्थाने दुवा साधला जाईल. कृषि विद्यापीठांशी निगडित असलेल्या विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

२.१.२३ स्वतंत्र राज्यासाठीची मागणी

काही हितसंबंधितांनी स्वतंत्र राज्याची मागणी केली आहे. विदर्भात प्रदीर्घ काळापासून विकास कामे करण्यात आली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. रोजगाराच्या संधींचा अभाव, औद्योगिक व कृषिविषयक क्षेत्रांतील मागासलेपण यांमुळे महाराष्ट्रातील सर्व प्रदेशांचा समान विकास करण्याची मागणी पुढे आली. या प्रदेशातून वीज, खनिजे, तांदूळ व कापूस या स्वरूपातील कच्चा माल उर्वरित महाराष्ट्राला पुरविला जातो. मनुष्यबळ विकास व प्रशिक्षण या क्षेत्रात, विदर्भाने भरीव योगदान दिले आहे. ५० पेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालये व तितक्याच व्यवसाय प्रशासनातील पदव्युत्तर पदवी संस्था यांमधून दरवर्षी १०,००० अभियंते व ४००० व्यवसाय प्रशासनातील पदव्युत्तर पदवीधारक बाहेर पडतात. निर्णय घेण्यास लागणारा विलंब व विदर्भाच्या बाजूने निर्णय घेतले न जाणे यांमुळे या प्रांतातील उपलब्ध क्षमतेचा वापरच होत नाही.

एक राज्य-एक भाषा या सूत्रामागे कोणतेही तर्कशास्त्र नाही, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. सध्या उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, छत्तीसगढ, झारखंड यांसारखी अन्य एकापेक्षा हिंदी भाषिक राज्ये असल्याची उदाहरणे दिली जातात त्यामुळे दोन मराठी भाषिक राज्ये (महाराष्ट्र व विदर्भ) असण्यात काहीही गैर नाही. चर्चेच्या ओघात, हितसंबंधितांनी ही बाबही निदर्शनास आणली की, कोळसा काढण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्डने चुकते केलेले रु.५००० कोटी, इतके स्वामित्वधन महाराष्ट्राला देण्यात आले. त्याशिवाय मँगनीज धातू काढण्याच्या कंपन्यांना मिळणारा लाभांश राज्यास चुकता करावा लागतो. विदर्भ अतिरिक्त वीजेचे उत्पादन करून ती विकण्यास व चांगले पैसे कमविण्यास समर्थ आहे. मागासलेल्या राज्यासाठी केंद्र सरकारकडून मिळणारे अतिरिक्त वार्षिक आर्थिक सहाय्य मिळवून विदर्भ समृध्द होऊ शकते व आर्थिकदृष्टया समर्थ बनू शकते. विदर्भात कोळसा व खनिज विपुल प्रमाणात सापडत असल्यामुळे विदर्भ ६५००० मेगावॅट इतक्या वीजेचे उत्पादन करू शकते.

विदर्भातील लोकांना राज्याची राजधानी मुंबई ही तेथून ६००-१००० किलोमीटरवर असल्यामुळे हा प्रांत म्हणजे पश्चिम महाराष्ट्राची एक वसाहत असल्याचे वाटते. या संबंधातील चर्चेच्या ओघात, हितसंबंधितांनी महाराष्ट्राचे हे क्षेत्र वेगळे काढून ते स्वतंत्र राज्य म्हणून जाहीर करणे कसे योग्य ठरेल याचे समर्थन केले आहे.

या प्रांताच्या क्षमतेविषयी चर्चा करताना त्यांच्यापैकी एका हितसंबंधित व्यक्तीने आपले मत मांडताना असे सांगितले की, विदर्भ प्रांत हा भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयांमधील गर्द वनराईंनी समृध्द आहे. वनोत्पादने हे देखील महसूल मिळविण्याचे आणखी एक साधन आहे. विदर्भात, राज्य विधानमंडळ, उच्च न्यायालय, भारतीय रिझर्व्ह बँक, मंत्र्यांचे बंगले यांसारख्या सर्व आवश्यक पायाभूत सुविधा आहेत आणि काही काळातच

नागपूरचा देशातील सर्वात महत्त्वाचे शहर म्हणून विकास केला जाईल.

२.१.२४ विदर्भाचे समाकलन

विदर्भविषयीच्या समस्यांकडे एकतर दुर्लक्ष केले जाते किंवा महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबईतून त्याविषयीचे निर्णय घेणाऱ्यांकडून येथील नागरिकांना दुजाभावाची वागणूक दिली जाते, असा विदर्भातील लोकांचा सर्वसाधारण समज असल्याचे प्रातिनिधिक चित्र पाहावयास मिळते.

विदर्भातील निरनिराळया राजकीय पक्षांच्या नेत्यांना येथील आर्थिक विकास साधण्यासाठी एकत्र येऊन काम करता येईल.

समतोल विकासाचा कच्चा आराखडा योग्य रीतीने अंमलात आणण्यात येत नसेल तर त्याऐवजी पुढीलप्रमाणे पर्याय अनुसरता येतील :-

१. महत्त्वाची आर्थिक खाती आता विदर्भातील नेत्यांना देण्यात यावीत.

२. स्वतंत्र विधानमंडळ व मंत्रिपरिषद यांसह आसामचे स्वायत्त राज्य म्हणून मेघालयाला १९६९ च्या २४ व्या सुधारणेनुसार ज्याप्रमाणे दर्जा देण्यात आला त्याप्रमाणे विदर्भास स्वायत्त राज्याचा दर्जा देता येईल.

३. विदर्भाची स्वायत्तता:- आसाम राज्यातून स्वायत्त राज्य म्हणून ज्याप्रमाणे मेघालय बाजूला काढून स्वतंत्र राज्य करण्यात आले त्याप्रमाणे विदर्भास स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीच्या दुसऱ्या पर्यायाचा पाठपुरावा करता येईल.

२.२ मराठवाडा प्रदेश

दि. ९ व १० नोव्हेंबर, २०११ रोजी समितीने औरंगाबाद येथील औरंगबाद विभाग मुख्यालयास भेट दिली. मराठवाड्यातील जालना हा सर्वात मागास जिल्हा आहे. त्यामुळे याच भेटी दरम्यान, समितीने १० नोव्हेंबर, २०११ रोजी जालन्यास भेट देण्याचे ठरविले.

या भेटींदरम्यान समितीने तीन प्रकारच्या हितसंबंधितांच्या भेटी घेऊन चर्चा केली.

१. विधानसभा व विधान परिषदेचे सदस्य, संसद सदस्य इत्यादी

२. पंचायत राज, नगरपालिका इत्यादीचे प्रतिनिधी

३. सर्वसामान्य जनता व कार्यकर्ते इत्यादी.

चर्चा व विचारविमर्श करताना, या हितसंबंधित व्यक्तींनी अनेक प्रमुख मुद्दे व समस्या उपस्थित केल्या. असे काही मुद्दे सारांशरूपाने पुढीलप्रमाणे :-

२.२.१ मापदंड

मराठवाडा प्रदेशातील बऱ्याचशा हितसंबंधितांना, प्रादेशिक अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील विकासाची तूट (सर्वसाधारणपणे अनुशेष म्हणून निर्देशित) निश्चित करण्यासाठी प्रदेश हे त्यासाठीच्या मापदंडाचे युनिट म्हणून पसंती दिली आहे. पुन्हा स्मरण करून देता येईल की, विदर्भातील हितसंबंधितांनी, यासाठी जिल्हा या युनिटास पसंती दिली आहे आणि पुढील भागात नमूद केल्याप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रासाठी तालुका हे युनिट मापदंडासाठी लावण्यात येत आहे.

२.२.२ सुरू असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी

गेल्या अनेक वर्षांपासून मराठवाडयातील बरेचसे सिंचन प्रकल्प अर्धवट पडून आहेत, असे अनेक हितसंबंधितांचे म्हणणे आहे. या प्रदेशातील मोठे दुष्काळप्रवण क्षेत्र (४०टक्के) विचारात घेता, मराठवाडयात सिंचन प्रकल्प त्वरेने पूर्ण करण्याची गरज आहे. या बैठकीत सक्रीयपणे सहभागी झालेल्या निवडून आलेल्या प्रतिनिधीनी व कार्यकर्त्यांनी जालना येथील बैठकीत अशाच प्रकारची मते व्यक्त केली.

मराठवाडा विकास मंडळातील एका तज्ञ व्यक्तीने, जायकवाडी प्रकल्पाच्या धरणाच्या प्रतिवाद बांधकामाच्या संबंधात जायकवाडी प्रकल्पावर आपले मत व्यक्त केले. (अहमदनगर-नाशिक जिल्हे)

मराठवाडा प्रदेशातील पाण्याच्या उपलब्धतेच्या समस्येचा विचार करताना, हितसंबंधितांनी मराठवाडयातील सिंचनाच्या सोयींचा विकास करण्यासाठी पुढील महत्त्वाच्या सूचना केल्या :-

१. मराठवाडयातील पाणी टंचाईच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी वैतरणेचा प्रवाह वळविणे आवश्यक ठरेल.

२. वैतरणा उपखोऱ्यातून गोदावरी उपखोऱ्यात जलप्रवाह वळविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करण्यासाठी जल लवादाचा आढावा घेणे आवश्यक ठरेल.

२.२.३ मानव विकास निर्देशांक कमी असणे

महाराष्ट्र मानव विकास मिशन, औरंगाबाद याच्या कार्यकारी अध्यक्षांनी, मराठवाडयातील सर्व जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरी निर्देशांका ०.५८ पेक्षा खाली असल्याचे नमूद केले आहे. २००६ पासून या अभियानांतर्गत, मराठवाडयातील काही तालुक्यांची त्यांचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी निवड करण्यात आली. अभियानाअंतर्गत साक्षरतेचे प्रमाण वाढविणे, शालेय शिक्षण देणे व आरोग्यसेवा यांकरिता १२५ तालुक्यांमध्ये विविध कार्यक्रम हाती घेतल्याचे देखील त्यांनी सांगितले. त्यांनी असे मत मांडले की, शिक्षण व आरोग्य निर्देशांकांमध्ये दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत बरीच वाढ झाली आहे. दरडोई उत्पन्न वाढविणे हे अधिक आव्हानात्मक व कठीण काम असल्याचे त्यांनी आमच्याकडे नमूद केले. अधिकाधिक रोजगारनिर्मिती व रोजगाराची अतिरिक्त साधने दर डोई उत्पन्न वाढविण्यासाठी आवश्यक आहेत.

नांदेडच्या एका वरिष्ठ पत्रकाराने दिलेल्या निवेदनपत्रात असे म्हटले आहे की, निजामाच्या राजवटीत, या प्रदेशाच्या समतोल विकासाच्या धोरणांतर्गत, तीन प्रदेशांमध्ये तीन कापड गिरण्या होत्या. मात्र, गेल्या दोन दशकांपासून, या सर्व गिरण्या बंद पडल्या आहेत किंवा काही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे मोठया प्रमाणावर गिरणी कामगार बेरोजगार झाले आहेत.

नांदेड, हिंगोली व परभणी हे जिल्हे कापसाच्या लागवडीसाठी प्रसिध्द आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या नव्या वस्त्रनिर्माण धोरणाच्या (२०११) अंतर्गत, नांदेड येथे वस्त्रोद्योग विकासास पुन्हा चालना देण्यासाठी नांदेड येथे वस्त्र निर्मिती पार्क ची त्यांनी मागणी केली आहे.

तसेच, मराठवाडयातील रेल्वेच्या समस्यांचा अभ्यास करून, प्रशासनिक सोईसाठी व रोजगार निर्मिती व प्रवाशांच्या हितासाठी नांदेड रेल्वे विभाग दक्षिण-मध्य रेल्वेकडून मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. त्यांनी असेही सांगितले की, ही आमची न्यायोचित मागणी असूनही तिच्याकडे रेल्वे प्राधिकारी सातत्याने दुर्लक्ष करीत आहेत.

२.२.४ मराठवाडा विकास मंच

विकास मंचाने मराठवाडा प्रदेशाच्या विविध मागण्या असलेली एक पुस्तिका सादर केली आहे. प्रसिध्द व्यक्तींनी यासंदर्भातील आपली मते यात नमूद केली आहेत. अनुशेष भरून काढण्यासाठी मराठवाडयाचे औद्योगिकीकरण, पायाभूत सोयी-सुविधा, शैक्षणिक दर्जात सुधारणा, प्रशासनिक सुधारणा, ५०% योजनांतर्गत निधी उपलब्ध करून देणे यांसारख्या मौलिक सूचनांचा या पुस्तिकेत समावेश आहे.

२.२.५ औरंगाबाद सामाजिक मंच, औरंगाबाद

या मंचाचे अध्यक्ष व या मंचातील अन्य प्रसिध्द व्यक्ती यांनी मराठवाडा विकासाशी निगडीत समस्यांवर समितीला एक निवेदन सादर केले आहे. या निवेदनातील मुख्य मुद्यांचा सारांश खालीलप्रमाणे :

१. प्रादेशिक विकास मंडळाचे कार्य केवळ अनुशेषांचा अंदाज ठरविण्याइतकेच मर्यादित न ठेवता, नैसर्गिक साधनसंपत्ती व लोकसंख्या यांच्या संदर्भातील योजना तयार करणे आवश्यक आहे.

२. मानव विकास निर्देशांक व दरडोई उत्पन्न या अनुसार, मराठवाडयातील सर्व जिल्हे राज्याच्या सरासरीपेक्षा बरेच खाली आहेत. याचाच अर्थ, विकासाची फळे या प्रदेशापर्यंत पोचलेली नाहीत.

३. मराठवाड्यात निर्माण केलेली सिंचन क्षमता व प्रत्यक्षात असलेली सिंचन क्षमता यांत बरीच तफावत आहे. या प्रदेशाचा मोठा भाग पर्जन्याश्रयी आहे. त्यामुळे या प्रदेशांचे दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक खूपच खाली आहे. या प्रदेशातील सिंचन सुविधांची टक्केवारी अगदीच नगण्य आहे. त्यामुळे या समस्येवर विशेषकरून पर्जन्याश्रयी शेतकऱ्यांसाठी मोठया प्रमाणावर पाणलोट विकास कार्यक्रम राबविणे हा एक चांगला उपाय होऊ शकेल.

४. संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अनुसार, एका प्रदेशाला दिलेला निधी दुसऱ्या प्रदेशाकडे हस्तांतरित करता येणार नाही असे असतानादेखील, २००८ मध्ये, मराठवाडयाला सिंचनासाठी दिलेला निधी उर्वरित महाराष्ट्राकडे हस्तांतरित करण्यात आला. माननीय राज्यपालांनी या हस्तांतरणावर नाराजी दर्शविली होती.

निवडून आलेले प्रतिनिधी यांनी देखील त्यांची मते व्यक्त केली असून ती प्रदेशाच्या विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वाची आहेत. जिल्ह्यात निर्माण झालेली अत्यंत कमी जलसिंचन क्षमता ही चिंतेची बाब आहे. अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील प्रकल्पाच्या प्रवाहाच्या वरच्या बाजूकडे विविध धरणांचे बांधकाम सुरू असल्यामुळे जिल्ह्याला जायकवाडी प्रकल्पाचे पाणी उपलब्ध झाले नाही. यामुळे मागील पाच वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे गृहित धरण्यात आले आहे.

विविध गटांनी (उदा. नगरपालिका, पंचायत राज सदस्य) दारिद्र्याची दाहक सत्यता, दरडोई उत्पन्नाचा (राज्य सरासरीच्या जवळपास ५० टक्के) कमी स्तर, महिला साक्षरतेचा कमी साक्षरता दर आणि शिक्षणाचा व ओराग्याचा सुमार दर्जा, याकडे लक्ष वेधले आहे.

जालनाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, उद्योजकता विकासावर नाविन्यपूर्ण कार्यक्रम सादर केला असून त्याचे जालना जिल्ह्यात चांगले परिणाम दिसून आले आहेत. ही योजना महाराष्ट्र उद्योजकता विकास परिषद, औरंगाबाद यांच्या सहयोगाने कार्यान्वित करण्यात येत आहे. ही योजना जालना जिल्ह्यातील बेरोजगार व्यक्तींना रोजगार निर्मितीकडे घेऊन जात आहे. या योजनेचे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील अनुकरण करता येईल.

आमच्या भेटीदरम्यान उद्योजकता विकासावरील नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचा ठळकपणे निर्देश केला होता.

२.२.६ प्रशासकीय / नियमन विषयक सूचना

१. मराठवाड्यात आठ जिल्हे असून केवळ एकच विभागीय आयुक्त आहेत. इतर विभागात, तेथे दोन किंवा तीन विभागीय आयुक्त आहेत किंवा चार जिल्ह्यासाठी एक विभागीय आयुक्त आहे. शिवरामन समिती (भारत सरकार) यांच्यानुसार विकसित प्रदेशांपेक्षा मागास प्रदेशांमध्ये अधिक प्रशासनिक नियंत्रण असावयास हवे. म्हणून, मराठवाडा प्रदेशात इतर कोणत्याही योग्य ठिकाणी किमान एखाद्या तरी जास्त विभागीय आयुक्तांची गरज आहे. मागील काही वर्षे, हा प्रस्ताव शासनाच्या प्रत्यक्ष विचाराधीन आहे.

२. एका अति वरिष्ठ आणि आदरणीय नागरी अधिकाऱ्याने, जिल्हा प्रशासनाअंतर्गत शिक्षणाच्या ढासळत्या दर्जाबाबत त्यांचे मत व्यक्त केले आहे. यापूर्वी, मराठवाड्यातील बऱ्याचशा माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन शासन करत होते, आणि म्हणून शिक्षणाचा दर्जा हा चांगला होता. आता बदल्या आणि नियुक्त्या यांतील राजकीय हस्तक्षेपामुळे शिक्षणाच्या दर्जावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. ही समस्या सोडविण्यासाठी त्यांनी, प्रख्यात शिक्षणतज्ञ व प्रशासक असलेल्या व्यक्तींची मिळून अशा जिल्हा शाळा मंडळांची स्थापना करण्याचे सुचविले आहे. या उपाययोजनेमुळे मराठवाड्यातील शिक्षणाच्या दर्जावर निश्चितच चांगला परिणाम होईल.

२.२.७ गॅस पाईप लाईन

हाजिरा गॅस पाईप लाईन ही मराठवाड्यामधून गेली पाहिजे, अशी मागणी पुढे आली होती. जालना शहराचा हे भारतातील पोलाद बनविण्याचे दुसरे सर्वात मोठे केंद्र म्हणून विचार करण्यात येतो. या पोलाद तयार करण्याच्या प्रकल्पाला हाजिरा गॅस उपलब्ध करून देण्यात आला तर, तुलनात्मकदृष्ट्या स्वस्त उर्जा स्त्रोतामुळे उत्पादन खर्च कमी होईल आणि हे युनिट जागतिकदृष्ट्या स्पर्धेत उतरण्यास पात्र होईल. यामुळे मराठवाड्याच्या औद्योगिकरणाला मोठी चालना मिळेल.

२.२.८ कडवंची पाणलोट क्षेत्र विकास योजना

यशस्वितेची गोष्ट समितीने, पाणलोट क्षेत्र विकास योजनेचा अभ्यास करण्यासाठी जालना जिल्ह्यातील कडवंचीला भेट दिली. ही योजना, पिकाचे पाणी जलसिंचन तसेच ग्रामीण जनतेच्या उत्पन्नाचा स्तर वाढविणे, यासंदर्भात यशस्वी ठरली आहे. हे, राज्यातील इतर पाणलोट क्षेत्रांची बरोबरी करण्याचे रास्त उदाहरण आहे. इतर पाणलोट क्षेत्रांकरिता एक आदर्श ठरणार आहे.

२.२.९ कृषि

मराठवाड्यात जलसिंचनेतर जमिनीचे प्रमाण खूपच जास्त आहे. मराठवाड्याचे जवळपास ४० टक्के क्षेत्र हे अवर्षणप्रवण आहे. विजापूर-आष्टी हा मोठा अवर्षणप्रवण पट्टा आहे. म्हणून, या अवर्षणप्रवण पट्ट्यात पाणलोट विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात आले पाहिजे. आणखी, नवीन साखर कारखान्यांना परवानगी देताना, मान्यता देण्यापूर्वी प्रदेशाच्या शिल्लक जलसाठ्याविषयी योग्य अभ्यास करण्यात यावा.

प्रदेशातील पाण्याच्या टंचाईमुळे, तुषारणी, ठिबक जलसिंचन व पाणलोट विकास यांसारख्या विशेष योजना तयार करण्यात याव्यात आणि या योजना एकाच कार्यचौकटीमार्फत राबविण्यात याव्यात.

संकरित बियाणांच्या युगात काही शेतकरी, पारंपारिक बियाणांचे (गावरान) प्रजातींचे जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. अशा प्रयत्नांना विशेषकरून प्रोत्साहन देण्यात यावे.

शेतकरी पंचायत समितीच्या जिल्हा व तालुका पातळीवरील अनेक कार्यालयांशी व्यवहार करतील. शेतकऱ्यांचे कृषिविषयक समस्या एकाच कार्यालयात सोडविण्यात यावी.

२.२.१० कृषिआधारित उद्योग

१. मका, सोया, कापूस, मोसंबी, कडधान्ये, भुईमूग ही मराठवाडा प्रदेशातील मुख्य कृषि उत्पादने आहेत. शासनाने तालुका स्तरावर कृषि आधारित उद्योग स्थापन करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

२. कृषि आधारित उद्योगाच्या विकासासाठी, कृषि आधारित उद्योगाविषयी जागरूकता निर्माण करण्याकरिता व ज्ञान वाढविण्याकरिता दर सहा महिन्यांनी तालुका स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

३. कृषि उद्योगांना चालना देण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावरील कार्यालये असली पाहिजेत.

४. शीतगृहे, कार्गो सुविधा यासारख्या सुविधा कृषि आधारित युनिटांसाठी पुरविल्या पाहिजेत.

५. कृषि प्रक्रिया युनिटे उभारणाऱ्या जिल्ह्यांना संशोधन विकास सहाय्य देण्यात यावे.

६. या प्रदेशातील शेतकऱ्यांना, कृषि प्रक्रिया युनिट सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे. इच्छुक शेतकऱ्यांना, त्यांचे ज्ञान व विश्वास वाढविण्यासाठी विविध प्रदर्शनांना व विद्यमान कृषि आधारित युनिटे यामध्ये घेऊन गेले पाहिजे.

७. कापूस आधारित प्रक्रिया युनिटे, मराठवाडा प्रदेशाला खूप मोठा लाभ मिळवून देतील. हे उपक्रम सुरू करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

८. पशुसंवर्धन, दुग्ध संस्करण यासारख्या अनुपूरक व्यवसायांना, गावात राहणाऱ्या भूमीहीन लोकांकरिता, तळागाळातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहचविण्यासाठी चालना देण्यात आली पाहिजे.

९. अशा पशुसंवर्धन कार्यक्रमांसाठी गाव पातळीवर पशुवैद्यक सहाय्य सहज प्राप्त झाले पाहिजे.

२.२.११ प्रशासनाबाबत नाराजी

१. मागील तीन दशकांपासून, मराठवाड्याची जनता संतुलित वाढीची अपेक्षा / आकांक्षा करत आहे. तथापि, शासनाने या आकांक्षेकडे दुर्लक्ष केले आहे. याचा प्रभाव स्पष्टपणे प्रदेशाचा विकास कमी प्रमाणात होण्यात झाला आहे.

२. आतापर्यंत स्थापन झालेल्या विविध समित्यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणीविषयी शासन गंभीर नाही व कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३. शासकीय सेवायोजनेतील स्थानिक जनतेच्या रोजगाराचे प्रमाण हे अगदी कमी आहे आणि शासकीय सेवेतील मराठवाड्याचे प्रतिनिधित्व अपुरे आहे.

४. मराठवाडा विकास मंडळाच्या अध्यक्षांची प्राथम्यक्रमाने नियुक्ती केली पाहिजे.

५. मा. राज्यपाल यांनी मराठवाडा विकास मंडळाकडून त्याच्या कामाची ठराविक कालावधीने माहिती घेतली पाहिजे.

२.२.१२ शिक्षण

१. या प्रदेशात दोन विद्यापीठे आहेत, तथापि, विद्यार्थ्यांच्या गरजा व समस्या याकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नाही. या प्रदेशातील शिक्षणाचा दर्जा हे एक मोठे आव्हानच ठरते. या विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

२. शालेय शिक्षण स्तरावर, खाजगीकरणामुळे समस्या आणि आव्हाने निर्माण केली आहेत आणि यामुळे शिक्षण अत्यंत महागले आहे.

३. शासकीय शाळांतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत, जेणेकरून गरजू विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळेल. आवश्यक असल्यास, विशेषरीत्या प्रशिक्षित व ध्येयाधिष्ठित स्वयंसेवी संस्थांमार्फत तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण योजना पाच वर्षांच्या कालावधीकरिता राबवली पाहिजे.

४. मराठवाडा त्याच्या शिक्षणातील मागासपणासाठी व लोकांची मानसिकता यासाठी ओळखला जातो. म्हणून, शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीकरिता विशेष प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

५. मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यात, अपंग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा असल्या पाहिजेत.

६. चांगल्या सुविधांसह विद्यार्थिनींकरिता वसतिगृह असले पाहिजे. जेणेकरून 'गरजू विद्यार्थीनींच्या' आवश्यकता योग्यरीत्या मांडल्या जातील.

७. मराठवाड्याच्या मागास जिल्ह्यांमध्ये आयुर्वेद विद्यापीठ, विधि शाळा, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माण व सूक्ष्मजीवशास्त्र महाविद्यालये स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

८. बीड हे मराठवाड्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे आणि या जिल्ह्यात अत्यल्प पाऊस पडतो. सध्या जिल्ह्यात कोणताही रेल्वेमार्ग नाही. जरी हे शहर सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गावर आहे, तरी तेथे महामार्ग हा नाममात्र असून तेथे केवळ दुपदरी मार्ग आहे. थोडक्यात, शहर आणि जिल्हा हे दोन्हीही सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत आहेत. तेथे उद्योग उभारणे उघडउघड कठीण आहे. म्हणून, त्याचा व्यावसायिक व प्रशासनिक शिक्षण केंद्र म्हणून विकास करता येईल. प्रशासकीय प्रशिक्षण केंद्र, पोलीस प्रशिक्षण केंद्र, वैद्यकीय प्रशिक्षण केंद्र, तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, क्रीडा प्रशिक्षण केंद्र यांसारख्या शासकीय संस्था स्थापन केल्या पाहिजेत आणि शासनाच्या महत्वाची निर्णय घेणारी प्राधिकरणे यांना या जिल्ह्यामध्ये हलविण्याच्या शक्यतेमुळे या ठिकाणची वाढ होईल असा विचार केला पाहिजे.

२.२.१३ रस्ते (मार्ग), रेल्वे व इतर पायाभूत सुविधा

१. मराठवाडा जिल्ह्यातील रस्त्यांचा दर्जा खूपच खराब आहे आणि अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत.

२. मराठवाड्यामधून जाणारे महामार्ग चौपदरी नाहीत; तेथे अनेक रस्ते अरुंद आहेत ज्यामुळे वेग मंदावतो.

३. परळी-वैजनाथ ते अहमदनगर महामार्गास उच्च प्राथमिकता देण्यात आली पाहिजे.

४. मनमाड ते नांदेड यामधील रेल्वेसाठी दोन पदरी-दुहेरी मार्ग पद्धतीला प्राधान्य देण्यात यावे.

५. अहमदनगर ते परळी-वैजनाथ रेल्वे प्रकल्प तातडीने पूर्ण केला पाहिजे.

६. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शहर / नगर याभोवती रिंग रोड असला पाहिजे.

७. मराठवाड्याचे सर्व जिल्हे चौपदरी रस्त्यांनी मुंबईशी जोडण्यात यावेत.

८. प्रत्येक औद्योगिक ठिकाणी व जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च बँड विड्थचे संपर्क जाळे पुरवण्यात यावे.

९. लहान शहरातील आणि गावातील विजेच्या पायाभूत सोयी अगदी सुमार आहेत. विजेच्या पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

२.२.१४ उद्योग

१. शेंद्रा व जालना या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी वेगळा लोहमार्ग आणि गोदाम यांची तरतूद केली पाहिजे.

२. वाळुज, औरंगाबाद, शेंद्रा व जालना यांसाठी गॅस पाईप लाईन याची तरतूद केली पाहिजे.

३. औरंगाबादच्या शहर पायाभूत सुविधा या जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियान प्रकल्प, पुणे या धर्तीवर सुधारण्यात याव्यात.

४. नांदेड, लातूर व उस्मानाबाद येथील परिवहन सुविधा खूपच चांगल्या आहेत. या शहरांना विक्रेता केंद्र यांसोबत 'मदर युनिट' (मूळ युनिट) दिले पाहिजे.

५. या प्रदेशात गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या उद्योगांना विशेष प्रोत्साहन देऊन, बीड, परभणी व हिंगोलीत कृषि उद्योग विकसित केले पाहिजेत.

६. मराठवाडा प्रदेशाच्या औद्योगिकतेच्या क्षेत्रात भारत हेवी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडचे हेवी फॅब्रिकेशन युनिट स्थापन करण्यात आले पाहिजे.

७. मोठ्या युनिटांसाठी मोठ्या औद्योगिक शहरांमध्ये जमीन देण्यात आली असेल तर, त्यांना मागास प्रदेशात अवलंबी युनिट असले पाहिजे असे सक्तीचे केले पाहिजे.

२.२.१५ सामाजिक प्रकल्प

१. बहुविध बँकांमार्फत समाजातील गरजवंत गटाला विविध अर्थसहाय्य, सहाय्य, कर्जे, अनुदान पुरविण्यात आलेले आहे. 'एक जिल्हा एक बँक' ही पद्धत राबविण्यात आली पाहिजे.

२. बीड व उस्मानाबाद जिल्ह्यामधून स्थलांतरित होणाऱ्या ऊस तोडणी कामगारांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागते. या दोन जिल्ह्यांमध्ये वसतिगृहाची सुविधा असणाऱ्या शाळा स्थापन केल्या पाहिजेत.

३. हिंगोली जिल्ह्यात आदिवासी लोकांचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्या जिल्ह्यात आदिवासी विकास कार्यालय स्थापन केले पाहिजे.

४. दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी, जर कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यास १८ वर्षाची बंधपत्र योजना राबवली पाहिजे.

५. प्राथमिक आरोग्य केंद्रात मनुष्यबळाची कमतरता आहे. एकतर प्राथम्यक्रमाने भरती करण्यात यावी किंवा नामिकेवर खाजगी डॉक्टर घेण्यात यावेत आणि गावांमध्ये प्रभावी सेवा पुरविण्यात यावी.

६. परिचारिका महाविद्यालयात शिकणाऱ्या महिलांसाठी रोजगाराची हमी देण्यात यावी.

७. स्वयंसहायता गटांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यामुळे सर्जनशीलता कमी होते, म्हणून अर्थसहाय्य देण्याऐवजी

कमी व्याज दराने कर्ज देण्यात यावे.

८. गहू, ज्वारी, कडधान्ये (डाळी) आणि पिठाचे पदार्थ यांचा पुरवठा करण्यासाठी किरकोळ विक्रेत्यांची साखळी तयार करून स्वयंसहायता गटांनी तशी भागीदारी केली पाहिजे.

९. महिलांमधील हिमोग्लोबिनची कमतरता दूर करण्यासाठी गावांमध्ये विशेष मोहीम हाती घेण्यात यावी.

१०. बळजबरीसंबंधात महिलांच्या तक्रारी संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी पोलीस दलाला प्रशिक्षण देण्यात यावे.

२.२.१६ आरोग्य

१. मागील पंधरा वर्षांपासून, शासनाने, आरोग्य, प्राथमिक शिक्षण, महिला शिक्षण या क्षेत्रामध्ये अनेक उपक्रम सुरू केले आहेत आणि स्थिती काहीशी सुधारली आहे.

२. पश्चिम महाराष्ट्रात लक्षणीय सुधारणा झाली आहे. तथापि, शिक्षण तसेच आरोग्य यंत्रणा मराठवाडा प्रदेशामध्ये पाठीमागे पडत आहे आणि म्हणून सुधारणा आणि बदल आवश्यक आहेत.

३. राज्य कर्मचारी विमा मंडळात ज्याप्रकारे खाजगी डॉक्टर्स (वैद्यक व्यवसायी) व रुग्णालये नामिकाप्रविष्ट होतात त्याच धर्तीवर जेथे शासकीय सुविधा पुरेशा प्रमाणात विकसित नाहीत तेथे डॉक्टर्स (वैद्यक व्यवसायी) व रुग्णालये नामिकाप्रविष्ट करण्यात यावीत.

४. रुग्णालये सार्वजनिक आरोग्य केंद्रामधील गृहपालन कर्मचारीवर्गाची भरती हे एक पद्धतशीर आव्हान आहे असा पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध नाही. यामुळे रुग्णालये व वैद्यकीय केंद्र येथे आरोग्य स्वच्छता व गृहपालनाच्या गंभीर समस्या उद्‌भवतात.

२.३ उर्वरित महाराष्ट्र

आम्हाला उर्वरित महाराष्ट्राकडून अनेक अभिवेदने प्राप्त झाली आणि त्याची चार स्थूल आर्थिक-नि-भौगोलिक प्रदेशांमध्ये योग्य प्रकारे पोटविभागणी करता येईल.

(१) कोकण (२) आदिवासी जिल्हे (३) खानदेश (४) या जिल्ह्यातील अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम प्रदेशांसह पश्चिम महाराष्ट्र

अशाप्रकारे, आम्ही प्रदेशातील हितसंबंधित व्यक्तींनी समितीला सादर केलेल्या अभिवेदनाचा आवश्यक तो संक्षिप्त गोषवारा तयार केला.

नाशिक व कोकण प्रदेशातील प्रतिनिधींनी, उर्वरित महाराष्ट्रातील त्याचे प्रतिनिधित्व अगदीच कमी होते आणि त्यांचा प्रदेश दुर्लक्षित व अविकसित राहिला याची जोरदारपणे तक्रार केली. त्याचप्रमाणे खानदेश व कोकण प्रदेशातील हितसंबंधित व्यक्तींनीदेखील स्वतंत्र प्रादेशिक मंडळाची मागणी केली.

२.३.१ कोकण विभाग

कोकण हा पश्चिम महाराष्ट्राचा डोंगराळ व सागरी किनारा असलेला प्रदेश आहे. त्याची प्रदेशस्थिती व भूप्रदेश हे कोकणच्या अर्थव्यवस्थेला एक वेगळेच परिमाण देतात. कोकणला आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक-नि-प्रदेशविषयक वैशिष्ट्यांमुळे काही विशिष्ट समस्यांचा सामना करावा लागतो, यावर अनेक अभिवेदनांचा भर आहे. कोकणामध्ये पायाभूत सुविधा निकृष्ट आहेत ही बाब अनेक अभिवेदनांनी ठळकपणे निदर्शनास आणून दिली आहे व कोकणातीलपायाभूत सुविधांचा विकास व नियोजन करण्यासाठी वेगळी प्रमाणके असण्याच्या आवश्यकतेवरही भर

दिला आहे. तीन प्रमुख घटकांवर जोर देऊन कोकणात रस्ते जोडणीचा विस्तार करण्याची एक सामाईक मागणी करण्यात येत आहे. (१) आगामी दोन किंवा तीन वर्षांमध्ये मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण (२) कोकण रेल्वेच्या दुहेरी रूळाचा / मार्गाचा विकास (३) खाजगी मार्गांचा व नद्यांवरील मार्गांचा विकास. पावसाळ्यात अनेक वाड्या व गावांचा संपर्क तुटतो व त्यामुळे विविध वाड्या व गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे जाळे मजबूत करणे अत्यंत गरजेचे आहे. कोकणात मुसळधार पाऊस पडत असल्याने, सध्या अस्तित्वात असलेले मार्ग सुस्थितीत ठेवण्याचा खर्च हा कोकणात खूप जास्त आहे आणि असे मार्ग नियमितपणे सुस्थितीत ठेवण्यासाठी कोकणातील जिल्हा परिषदांना अतिरिक्त निधी खर्च करावा लागतो.

सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्राच्या सहभागाने बंदर विकास गुंतवणूक कार्यक्रमातून अनेक बंदरांचा विकास प्रस्तावित आहे. या सर्व बंदरांना चांगल्याप्रकारे विकसित पश्चिम-पूर्व मार्गांनी जोडणे आवश्यक आहे, ज्यांची शक्य तितक्या लवकर सुरूवात करणे गरजेचे आहे. सागरी अर्थव्यवस्थेमुळे, मत्स्यव्यवसायाने कोकणात महत्त्वाची आर्थिक उलाढाल निर्माण केली आहे. मत्स्यव्यवसाय विकासाच्या योजना व त्याची क्षमता या बंदर विकास प्रकल्पांशी तसे च अन्य जहाजी मालाशी (कार्गो) अगदी निकटपणे जोडल्या गेल्या आहेत व अशा मच्छिमार उत्पादनांना पूर्वेकडील जिल्ह्यांमध्ये स्थित संभाव्य बाजारपेठांमध्ये पोहचवण्यासाठी चांगल्याप्रकारे विकसित समतल रस्त्यांचे जाळे निर्माण करणे आवश्यक आहे.

विशिष्ट प्रदेशस्थिती व अगदी उंच व खोल भूभाग असलेल्या भूप्रदेश यामुळे, कोकणातील सिंचन प्रकल्पांचे नियोजन हे, पठार प्रदेशांत जी मानके नेमून देण्यात आली आहेत त्यापेक्षा वेगळ्या मानकांच्या आधारावर निर्धारित करणे भाग आहे. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा व पाटबंधारे विकासाबाबतच्या पेंडसे समितीच्या अहवालाने कोकणातील पाटबंधारे योजनांच्या दृष्टिने विविध गरजा निदर्शनास आणून दिल्या आहेत. पेंडसे समितीच्या शिफारशींचा पुनरुच्चार करताना, अनेक लहान धरणे, रोधी धरणे आणि नदीपात्रातील बांध आणि कृषिविषयक फलोत्पादन विकासासाठी उद्धरण योजनांशी लहान जलविद्युत युनिटे एकत्रितपणे जोडून त्याकरिता साठविलेल्या पाण्याचा वापर करणे या बाजूवर बऱ्याचशा अभिवेदनांमध्ये युक्तिवाद केला आहे. स्थूलमानाने प्रत्येक तालुक्यात एक जल-विद्युत प्रकल्प असावा आणि त्याला नागमोडी वळणाच्या रोधी धरणाचा जलसाठा सहाय्यभूत राहील असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. शक्य तितक्या लवकर बंद नळ मार्गाद्वारे पाटबंधाऱ्याच्या पाण्याचा पुरवठा करणे व खुल्या कालव्याच्या प्रवाहावर आधारित पाणीपुरवठ्याचा वापर हळूहळू बंद करणे यावर विविध गटांनी भर दिला आहे. योग्य सूक्ष्म नियोजन करून, प्रत्येक वाडीसाठी, सरासरी दहा दशलक्ष घनमीटर एवढी जलक्षमता असणाऱ्या धरणाची तरतूद करता येईल, असा युक्तिवाद एका अभिवेदनाद्वारे करण्यात आला आहे. जलाशयांच्या अशा मालिका या पर्यटन उद्योगाला जलसाठा सुविधेच्या स्वरूपात पूरक ठरतील असेही निदर्शनास आणून दिले आहे.

कोकण प्रदेशाला फलोत्पादनावर आधारित अर्थव्यवस्था असल्याने, अनेक शेतकरी गटांनी फलोत्पादन पिकांच्या कापणीनंतरची प्रक्रिया, पॅकेजिंग केंद्रे, शीतगृह शृंखला व वखार यामध्ये गुंतवणूक करण्याची मागणी केली आहे. गट शेती व कंत्राटी शेतीसाठी प्रयत्न वाढल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. निदान प्रत्येक तालुक्याला फलोत्पादन पिकांच्या वाणिज्यिक प्रक्रियेसाठी एक सामाईक प्रक्रिया केंद्र असावे अशी मागणी आमच्याकडे करण्यात आली आहे. कोकणामध्ये वैविध्यपूर्ण कृषि आधारित व्यवसाय करता येतील अशी नवीन क्षेत्रे आहेत आणि त्यासाठी शासनाने तांत्रिक सहाय्य देण्याची तसेच त्यास चालना देण्याची गरज आहे. यामध्ये मसाल्याच्या पदार्थांची पीके, कंदमूळे, रबर, सुगंधी व औषधी वनस्पती, चराई गवत व पशुसंवर्धन यांच्या नवीन जाती, मध व अळंबी उत्पादन यांना चालना देणे यांचा समावेश आहे. आंबा पिकांना अनेक प्रकारच्या जोखीमा आहेत. आंबा हे फलोत्पादनातील महत्त्वाचे पीक असून त्याचा पीक विमा योजनेत समावेश करावा अशी विनंती करणारी अनेक निवेदने करण्यात आली आहेत. आम्हाला प्राप्त झालेल्या निवेदनांपैकी एका निवेदनात असा युक्तिवाद केला आहे की, जवळपास चार लाख एकर जांभा खडकाच्या जमिनीवर हापूस आंब्याची लागवड करण्यात यावी.

कोकण प्रदेशास जवळपास ७२० कि.मी. समुद्रकिनारा असल्याने, बऱ्याच मोठ्या लोकसंख्येसाठी मत्स्यव्यवसाय हा उपजीविकेचा प्रमुख स्रोत बनला आहे. (अंदाजे २,२५,००० एवढी मच्छिमारांची लोकसंख्या आहे). सध्या या क्षेत्रात बहुधा पारंपारिक लहान बोटींचा वापर करण्यात येतो. त्यांची त्याच ठिकाणी मोठे मासे पकडताना मोठ्या आकाराच्या यांत्रिकी जहाजांशी (ट्रॉलर्सशी) स्पर्धा असते. या लहान मच्छिमारांनी त्यांची सर्व साधने एकत्रित करून लहान बोटींचे, मध्यम आकाराच्या यांत्रिकी बोटीमध्ये हळूहळू रुपांतरण करण्याची गरज आहे. मच्छिमारांच्या अशा सहकारी प्रयत्नांना, सहकारी साखर कारखान्याच्या धर्तीवर शासनाकडून वित्तीय सहाय्याची आवश्यकता असेल.

आमच्याकडे आलेल्या अभिवेदनांमध्ये कोकणच्या अर्थव्यवस्थेचे भविष्य हे, पर्यटनवृद्धी व पर्यटन उद्योग यावर विसंबून आहे असा जोरदार युक्तिवाद केला आहे. कोकणात पर्यटन विकासासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणात उपलभ्य संपत्ती आहे व ते महाराष्ट्रातील पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येऊ शकते. तथापि, कोकणाच्या पर्यटनाला चालना देण्याकरिता लोकप्रिय व्यक्तीच्या (ब्रॅण्ड) सहाय्याने मोहीम राबविण्यात अत्यंत मर्यादित प्रयत्न करण्यात आले. या क्षेत्रातील खाजगी क्षेत्राचा पुढाकार हा लक्षणीय आहे तसेच दोलायमान स्थितीतला देखील आहे. तथापि, सागरी विनियमन क्षेत्राच्या विद्यमान धोरणामुळे या क्षेत्राच्या बाबतीत आर्थिक विकासाची कोंडी झाली आहे. अनेक आकर्षक पर्यटन स्थळे ही, आधुनिक तसेच पर्यावरणपूरक हॉटेले, उपहारगृहे, क्रीडा व मनोरंजन सुविधा यांनी यथोचितरीत्या सुसज्ज करणे आवश्यक आहे. तथापि, सागरी विनियमन धोरणामुळे या निरंतर पाठिंब्यास खीळ बसली आहे. केवळ तटरक्षक कर्मचाऱ्यांसाठी सागरी सफारी व विद्यमान उपलब्ध असलेल्या विमानतळाद्वारे रत्नागिरीला जोडणारे विमानतळ यांचा विकास करण्यासाठी शासनाचे सहाय्य मिळवण्याची महत्त्वपूर्ण मागणी देखील करण्यात आली आहे. दोन अभिवेदनांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये विविध स्तरांवर आतिथ्य विकास व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी, युक्तिवाद केला आहे. सरासरी प्रत्येक जिल्हा स्तरावर या अभ्यासक्रमासाठी कमीत कमी २५० संभाव्य प्रवेशक्षमता असावी असे ठरविण्यात आले आहे. अनेक संघटना तसेच या प्रदेशांच्या जिल्हा परिषदा व विधानसभा मतदारसंघातील राजकीय प्रतिनिधींनी त्याच्या शेजारील गोवा पर्यटनक्षेत्राच्या तुलनेत सिंधुदुर्ग जिल्ह्याची कामगिरी निकृष्ट असल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. आमच्याबरोबर असा वाद घालण्यात आला की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांचे निसर्गसौंदर्य हे गोव्यातील समुद्रकिनाऱ्यांच्या तुलनेत अधिक आकर्षकही आहे. तथापि, विद्यमान सरकारी धोरणात या उपलभ्य संपत्तीकडे दुर्लक्ष करणे हे त्याचा विकास न होण्याचे तसेच पर्यटनाच्या उपलभ्य संपत्तीचा कमी प्रमाणात वापर होण्याचे मुख्य कारण बनले आहे.

२.३.२ नाशिक विभाग

जिल्ह्याच्या अर्वषणग्रस्त तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व सिंचनाची कमतरता यासंबंधात, निर्वाचित प्रतिनिधींनी अनेक अभिवेदने केली आहेत. पाणी पुरवठा योजना चालविणे व त्याचे परिरक्षण करणे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध साधनसंपत्ती खूपच अपुरी असल्याचा युक्तिवाद आमच्याकडे करण्यात आला आहे. सादर केलेल्या त्यांच्या काही अभिवेदनांमध्ये, पर्यायी साधनसंपत्ती व तिचे नियोजन याबाबत पर्याय देखील सुचविले आहेत. एका अभिवेदनातून आमच्या असे निदर्शनास आले आहे की, पूर्वी मंजूर केलेल्या मनमाड-इंदोर रेल्वे प्रकल्पामध्ये मालेगाव-सटाणा-साक्री-चिंचपाडा प्रकल्पाची भर घालण्यात यावी.

आदिवासीबहूल प्रदेशामध्ये आदिवासींसाठी व्यापारी संस्था तसेच स्वतंत्र क्रीडा विद्यापीठ असावे अशी मागणी करण्यात आली आहे.

२.३.२.१ दुर्लक्षित खानदेश

नाशिक जिल्ह्यातील निर्वाचित प्रतिनिधींनी असा युक्तिवाद केला आहे की, उर्वरित महाराष्ट्राच्या

तुलनेत त्यांचे अस्तित्व हे लक्षणीय विषमता व भेदभाव दर्शक आहे. या अभिवेदनांनुसार, निधी वितरित व त्यांचे वाटप करताना खानदेश जिल्ह्यांतील गरजांचा पुरेसा विचार करण्यात आलेला नाही आणि उर्वरित महाराष्ट्र प्रादेशिक विकास मंडळाच्या जेमतेम पाच टक्के निधी खानदेशाच्या वाट्याला आला आहे. नागपूर करार हा एक राजकीय करार होता आणि त्यात आर्थिक विकासाचा उद्देश नव्हता हेही आमच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. म्हणून, प्रदेश हा एक युनिट मानून अनुशेषाचा अंदाज व निधींचे वाटप करणे अयोग्य असेल. संबद्ध वाटपाची युनिटे म्हणून प्रदेश व जिल्हा यांच्या निवडीमुळे उर्वरित महाराष्ट्राचे जिल्हे त्रस्त आहेत. अनुशेषाची परिगणना करताना युनिट म्हणून तालुक्याचा विचार करण्यात यावा.

उत्तर महाराष्ट्राच्या तापी खोऱ्यात पाण्याचे प्रमाण न्यूनतम आहे व ते पाणी नळाद्वारे देता येऊ शकते आणि या जिल्ह्यातील गोदावरी खोऱ्याचे अधिकतम क्षेत्रे देखील अर्वषणग्रस्त आहेत. या टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने, ७५% अवलंबित्वाच्या विद्यमान कसोटीऐवजी ५०% अवलंबित्वाच्या आधारे पाटबंधारे प्रकल्पांचे नियोजन करण्याची मागणी आहे. या प्रदेशातील शेतकरी गटांनी, सूक्ष्म सिंचनाची अर्थसहाय्यतेत सध्याच्या ५० टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात यावी आणि अर्थसहाय्याच्या प्रयोजनासाठी विद्यमान पाच एकरांची मर्यादा शिथिल करण्यात यावी असे सुचिवले आहे. शासनाच्या आवश्यक पाठिंब्याने '**फड**' पद्धतीचे पुनरुज्जीवन करण्याची आणि घनफळाच्या आधारे पाणी वापर संस्थांना पाण्याचे वाटप करण्याची मागणी करण्यात आली आहे. सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने, तापी व गिरणा नद्यांची नदीजोडणी करण्याचे सुचविण्यात आले आहे. याशिवाय, प्राप्त झालेल्या अभिवेदनांमध्ये, इतर अनेक पाणी वळविण्याच्या योजनादेखील आम्हाला सुचविण्यात आल्या आहेत. दिंडोरीच्या निर्वाचित प्रतिनिधीने, अधिक सघन सर्वेक्षण करण्याची व विविध आकारांच्या धरणांच्या विद्यमान मोठ्या सहा धरणांना पूरक असेल अशा शृंखलांच्या दिंडोरी व पेठ यामधील डोंगराळ प्रदेशाचा वापर करण्याचा आणि तेरा पाणी वळविण्याच्या योजना सुचविल्या आहेत. तसेच, वनसंरक्षणासाठी वन सरोवरे निर्माण करण्याची आवश्यकता असण्याचा युक्तिवाद आमच्याकडे करण्यात आला आहे. वनसंरक्षणासाठी निर्माण करावयाचे विद्यमान वन नियम शिथिल करण्यात यावे व त्यामध्ये उचित सुधारणा करण्यात यावी. पिण्याचे पाणी तसेच सिंचन जल योजनांची मान्यता व प्रगती सुलभ होण्याच्या दृष्टीने, पूर्व जल उपलब्धता प्रमाणनाची अट आदिवासी क्षेत्रांसाठी शिथिल करण्यात यावी.

खानदेशाच्या नंदुरबार व धुळे जिल्ह्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्या आहे. या आदिवासी भागांतील निर्वाचित प्रतिनिधींनी, जनजाती उपयोजनांच्या अंमलबजावणीत विविध उणिवा असल्याबाबत तक्रारी केल्या आहेत. आदिवासी लोकसंख्येपैकी अनेक आदिवासी लोक डोंगराळ व वन क्षेत्रांमध्ये राहतात. वन अधिनियम व वन विभागाच्या आरक्षणांमुळे व निर्बंधामुळे मार्गांचा विकास खुंटला आहे आणि असे क्षेत्र लगतच्या प्रदेशांशी फार कमी प्रमाणात जोडले गेले आहे.

धुळे, नंदुरबार व जळगाव हा रखरखीत असलेला आणि अत्यल्प पर्जन्यमान तसेच पाणी टंचाईचा प्रदेश असलेला मोठा पट्टा आहे. अनेक संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी, विकासामधील तफावती हाताळणाऱ्या विद्यमान धोरणांबाबत असमाधान व्यक्त करून त्याविरुद्धच्या आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्यापैकी अनेकांनी विकासातील तफावती हुडकून काढण्यासाठी अनेकांनी उचित युनिट म्हणून तालुक्याचा उपयोग करण्याचे समर्थन केले आहे. जिल्ह्यांमध्ये भेदभाव केला जात असल्याच्या तक्रारी अनेक निवेदनांमध्ये केल्या आहेत.

तसेच, त्यांच्यापैकी अनेकांनी दुर्गम भूप्रदेशाकडे लक्ष वेधून घेतले आहे व त्यासाठी योग्य मानके पुन्हा निश्चित करण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. मनमाड-इंदोर रेल्वे जोडणीची प्रदीर्घ काळ प्रलंबित मागणी असून अनेक हितसंबंधितांनी आमच्याकडे, त्याबाबतच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

तापी पाटबंधारे विकास महामंडळाने 'त्वरित लाभ' आणि या भागातील सिंचन सुविधा यांची व्याप्ती वाढविणे यासाठी अनेक अपूर्ण तसेच पर्यायी योजनांची सूची केली आहे.

चांदवड व येवला हे दोन तालुके सातत्याने अवर्षणग्रस्त आहेत. या भागातील लोकप्रतिनिधींनी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांची दिशा बदलण्याच्या आणि अनेक लहान पाटबंधारे योजनांबरोबरच दमण गंगा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या व सध्या अस्तित्वात असलेल्या कालव्यांच्या जाळ्यांच्या वहन क्षमतेत सुधारणा करण्यासाठी व त्यांची खोली वाढविण्यासंबंधात युक्तिवाद केला आहे.

तसेच इगतपुरी व त्र्यंबकेश्वर हे तालुके खूप अधिक पर्जन्यमान (२५०० ते ४००० मी.मी.) असणारे डोंगराळ भूप्रदेश आहेत. तथापि, खडकाळ भूस्थितीच्या स्वरूपामुळे पडणारे पावसाचे पाणी साठविणे अवघड आहे. म्हणून, उच्च पर्जन्यमान असूनही या तालुक्यांना पावसाळ्यानंतर तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. सिंचनाच्या पाण्याची उपलब्धता असूनही, नाशिकच्या सुरगाणा, पेठ, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील जमिनीचा मोठा पट्टा हा तीव्र पाणी टंचाईने त्रस्त आहे. ह्या तालुक्यांच्या डोंगराळी भूप्रदेशामुळे परंपरागत पाटबंधारे कालवा पद्धत येणे असाध्य आहे. म्हणून, तेथे नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याची व उद्धरण सिंचन योजनेद्वारे उपलब्ध जलसंपत्तीचा वापर करण्याची गरज आहे. सिंचनाच्या पाण्याची उपलब्धता वाढल्याने, सुरगाणा, पेठ, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील कृषिविषयक उत्पादन व रोजगार यामध्ये लक्षणीय वाढ होईल. भात व नाचणी यांच्या पारंपारिक पीक पद्धतीत बहुधा बदल करून विविध प्रकारच्या भाजीपाला पीकांना उत्तेजन देतील. या प्रामुख्याने आदिवासी तालुक्यांमध्ये, पीक पद्धतीतील हा बदल, कुपोषणाच्या समस्येवरील उपाय म्हणून गणला जाईल.

नाशिक जिल्हा परिषदेमधील अभिवेदनामध्ये, आदिवासीद्वारे अन्नधान्याचे उत्पादन घेण्याच्या एकाधिकाराचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, आदिवासी लोकांना अनेक योजनांचे लाभ मिळावेत म्हणून, उत्पन्नाची मर्यादा रु. ४०,०००/- पर्यंत वाढविणे अपेक्षित आहे. आदिवासीसाठी असलेल्या अनेक निवासी शाळांमध्ये इयत्ता 'दहावी' (एसएससी) पर्यंतचे शिक्षण उपलब्ध आहे. त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून, आदिवासी प्रदेशांसाठी उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांची मागणी करण्यात आली आहे.

अधिकतर डोंगराळ-नि-आदिवासी तालुक्यांमध्ये गावांना जोडणारे पक्के रस्ते नाहीत. यापैकी अनेक वाड्या व पाड्यामध्ये ५० ते १०० एवढी लोकसंख्या आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या लोकसंख्येच्या अटीमुळे यापैकी बहुतेक वाड्या व पाडे या योजनांमधून वगळण्यात आले आहेत.

आम्हाला मालेगाव मधून देखील प्राप्त झालेल्या अभिवेदनामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ रद्द करण्याचा युक्तिवाद केला आहे. आमच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, ७/१२ उताऱ्यावर आरक्षित शेरा असलेली जमीन संपादित करण्यात आली आहे. अशा आरक्षणामुळे शेतकऱ्यांना बँकाकडून कर्जे मिळत नाहीत तसेच त्यांनी संपादित केलेली जमीनिही ते विकू वा खरेदी करू शकत नाहीत. मालेगाव महाराष्ट्र औद्योगिक विकास वसाहत, गेल्या ३०-३५ वर्षांमध्ये मंजूर झाली होती. परंतु, आतापर्यंत तेथे एकही कार्यरत युनिट नाही. शेतकऱ्यांचा विरोध आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या कार्याची कमकुवत बाजू विचारात घेऊन झोडगेमधील एमआयडीसी योजना मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

या दोन तालुक्यांमध्ये, पूर नियंत्रण कालव्यांचे सिंचन कालव्यांमध्ये रुपांतरण करण्याची मागणी करण्यात आली आहे. परंपरागत, लहान व मध्यम आकाराच्या पाटबंधारे योजनांच्या सरोवरांमधील गाळ

काढण्याचे काम हाती घेण्याच्या आणि आणखी प्लॅस्टिक कागदावरील अर्थसहाय्य ७५ टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत वाढवून त्याद्वारे शेतीसाठी लागणाऱ्या निधींबाबत आग्रही राहण्यावर भर देण्यात आला आहे.

येथे अनेक लहान परंतु ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण धार्मिक तीर्थक्षेत्रे आहेत. बऱ्याच प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार व त्यांचे संरक्षण करून या भागामध्ये 'यात्रा' पर्यटनाला आणखी चालना देता येईल. या क्षेत्रातील पूल व मार्गांचे योग्य परिरक्षण करून त्याद्वारे योग्यरीतीने अनुपूर्ती करण्याची देखील आवश्यकता आहे.

मालेगाव हे नाशिक जिल्ह्यातील मोठे नागरी केंद्र आहे आणि ते सामान्यत: त्याची वाढ जलदगतीने होत आहे. अशा वर्ग एक, वर्ग दोन नगरांची आर्थिक स्थिती ही अत्यंत बिकट असल्याचे आमच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. नगरपालिकेचे कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतनावर फार मोठ्या प्रमाणात खर्च होतो. महानगरपालिकेला, वेतनावरील खर्चाच्या प्रदानासाठी राज्य शासनाकडून वारंवार कर्ज घ्यावे लागत आहे. लगतची गावे त्यामध्ये समाविष्ट व विलीन करून या महानगरपालिकेवरील बोजा आणखी वाढणार आहे. गावे विलीन करून त्याद्वारे मोठा आर्थिक बोजा सहन करणाऱ्या अशा दुर्बल महानगरपालिकांना अतिरिक्त आर्थिक पॅकेजद्वारे सहाय्य करण्याची आवश्यकता आहे.

स्वतंत्र मालेगाव जिल्ह्याची मागणी पुष्कळदा करण्यात आली आहे व या मागणीचा पुनरुच्चार करणारी सादर अभिवेदने आमच्या समितीला प्राप्त झाली आहेत.

नाशिक जिल्ह्यात मालेगाव व येवला येथे आधीच अस्तित्वात असलेली वस्त्रोद्योग युनिटे विचारात घेऊन अनेक औद्योगिक क्षेत्रे उदयास येऊन प्रस्थापित झाली आहेत. मालेगाव व येवला येथे वस्त्रोद्योग समूहाचा विकास करण्याचे सुचविण्यात आले आहे.

लहान पाटबंधारे योजना, 'वाड्या' व 'पाड्यांचे' विद्युतीकरण करण्याचे आणि आदिवासी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात होणारे हंगामी स्थलांतर कमी करण्यासाठी व त्याला प्रतिबंध करण्यासाठी प्राथमिक तसेच माध्यमिक स्तरावर अन्न प्रक्रिया युनिटे स्थापन करण्याचे सुचविण्यात आले आहे.

धुळे जिल्ह्याप्रमाणेच, मालेगाव व मनमाड येथे स्वतंत्र विद्यापीठे स्थापन करण्याची मागणी आमच्याकडे करण्यात आली आहे.

एका अभिवेदनामध्ये असाही युक्तिवाद केला आहे की, प्रादेशिक असमतोल हा विविध तीन स्रोतांद्वारे निर्माण होतो. (१) अर्थसंकल्पीय तरतुदींबाह्य करण्यात आलेल्या गुंतवणुकीमुळे होणारा असमतोल (२) धोरणाच्या विपर्यासामुळे निर्माण झालेली असमतोल (३) नैसर्गिक साधनसंपत्तीतील तफावतींमुळे किंवा भौगोलिक व सामाजिक लाभ न मिळाल्यामुळे होणारा ऐतिहासिक असमतोल. अनेक गटांनी आमच्याकडे असे आवाहन केले आहे की, सामाजिक लाभ न मिळालेल्या आदिवासी गटाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

प्राथमिक शाळांच्या दर्जात वाढ करण्यासाठी व त्यांची देखभाल करण्यासाठी आणि प्राथमिक शाळांच्या आवाराच्या लगत असलेल्या अतिक्रमणास व बेकायदेशीर भोगवट्यास प्रतिबंध करण्यासाठी जादा वित्तीय तरतुदीची मागणी करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जात वाढ करण्याची व त्यांची देखभाल करण्याची तसेच नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना करण्याची आणि सेवा पोहचविण्यात सुधारणा

करण्याकरिता काही विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणामध्ये बदल करण्याची प्रचंड मागणी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे व अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांची अनुपलब्धता आणि ही रिक्त पदे भरण्याची तातडीची गरज या बाबी अनेक निवेदनामध्ये देखील ठळकपणे निदर्शनास आणण्यात आल्या आहेत. सध्याच्या दुर्गम व डोंगराळ प्रदेशात, प्राथमिक आरोग्य काळजी केंद्राना, वाहने व रुग्णवाहिका यांच्या ताफ्याची आवश्यकता आहे. या वाहनांच्या परिरक्षणासाठी पुरेशी तरतूद करण्याची गरज आहे. ही वाहने / या रुग्णवाहिका यांच्या कमतरतेमुळे आरोग्य सेवा पोहचविण्याची स्थिती निकृष्ट आहे व त्यांचा दर्जा निकृष्ट आहे.

आम्हाला असे दाखवून देण्यात आले आहे की, जनजाती उप योजनेखाली योजनांचा लाभ, या योजनांची अंमलबजावणी करताना लादलेल्या पूर्व शर्तींच्या विविधतेमुळे प्रतिबंधित झाला आहे.

२.३.२.२ पाणी टंचाई असलेली क्षेत्रे

अहमदनगरमधील बहुसंख्य अभिवेदनांतून जिल्ह्यातील प्रादेशिक असमतोल ठळकपणे निदर्शनास आला. सर्वाधिक सिंचन व पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेले तालुके म्हणून पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, पाथर्डी, शेवगाव, संगमनेर व अकोले यांचा विशेष उल्लेख करण्यात आला होता. त्याचप्रमाणे, असा युक्तिवाद केला होता की, जेव्हा क्षेत्राची मोजणी केली तेव्हा हा जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा असून देखील या जिल्ह्यात, चांगले पृष्ठभाग असलेले 'पक्के रस्ते' उपलब्ध नाहीत. सुमारे ६० ते ७० टक्के ग्रामीण रस्ते, निकृष्ट पृष्ठभाग असलेले 'कच्चे रस्ते' आहेत. निवडून आलेल्या काही लोकप्रतिनिधींनी असा युक्तिवाद केला की, बदलत्या परिस्थितीत, रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची मानके सुधारण्यायोग्य आहेत. जर रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये ९०% कुशल व १०% अकुशल कामगारांना काम करण्याची मुभा दिली तर, तळे, नाला बांधणी, कोल्हापूर पद्धतीच्या (के.टी.) बंधाऱ्याची कामे इत्यादींसारख्या पायाभूत सोयींची प्रचंड संख्येची कामे कमी कालावधीत यशस्वीरीत्या पूर्ण करता येतील. असा देखील युक्तिवाद केला होता की, या जिल्ह्यात अनेक महत्त्वाची धार्मिक तीर्थस्थळे असून त्यांचा आणखी विकास करता येईल आणि त्यांचा अधिक पद्धतशीरपणे पर्यटनाची उपलभ्यता निर्माण करण्यासाठी उपयोग करता येईल.

२.३.२.३ तालुका हे एकक म्हणून समजणे

या जिल्ह्याच्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी, अनुशेष निर्धारित करताना मोजण्याचे एकक म्हणून तालुका असावा, या बाजूने देखील युक्तिवाद केला आहे. या जिल्ह्यातील विविध अभिवेदनांमधून असे दाखवून देण्यात आले आहे की, उपसा सिंचन योजनेचे पुनरुज्जीवन करण्यामधील शासकीय सहाय्यामुळे सिंचनाखाली क्षेत्रात ४२००० एकर इतकी वाढ होईल. हा जिल्हा, कापूस लागवड करणाऱ्या जिल्ह्यांपैकी आघाडीचा जिल्हा म्हणून उदयास आला आहे. यामुळे एकात्मिक वस्त्रनिर्माण प्रक्रियेकरिता म्हणजेच वस्त्रनिर्माण उत्पादनाची सूत कताई, विणाई (विणकाम) यांतून शासकीय सहाय्यित प्रकल्पासाठी मागणी होत आहे. या जिल्ह्याच्या शेतकरी संघटनांनी, फलोत्पादनांसाठी आणि अन्न उत्पादन युनिटांची स्थापना करण्यासाठी सूक्ष्म सिंचन अर्थसहाय्यात वाढ करण्याची मागणी केली आहे.

अक्कलकुवा आणि धडगाव हे नंदुरबार जिल्ह्यातील सर्वाधिक दुर्गम तालुके आहेत. नंदुरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अत्यंत कमी आहे. सर्वसाधारणपणे नंदुरबार जिल्हा आणि दोन तालुके विशेषत: अत्यंत खराब रस्ते व पूल यांनी ग्रस्त आहेत. चार ते पाच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या अनेक योजना, या केवळ कागदावरच राहिल्या आहेत. आणि या तथाकथित कामांपैकी पूर्ण झालेली कामे ही, अत्यंत

निकृष्ट दर्जाची आहेत. अशाच प्रकारच्या तक्रारी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकृष्ट दर्जा व वाया गेलेला खर्च यासंबंधात करण्यात आल्या आहेत.

२.३.३ पुणे विभाग

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यांत अनेक कायमस्वरुपी अवर्षणप्रवण तालुके आहेत. पुणे महसूल विभागात, ५८ तालुके असून त्यांपैकी ३२ तालुके हे कायमस्वरुपी अर्वषणप्रवण तालुके आहेत. हे प्रदेश, पाण्याची अत्यंत टंचाई सहन करतात आणि येथे वारंवार अवर्षण व दुष्काळ पडतो. या जिल्ह्यांतून आमच्याकडे करण्यात आलेल्या बहुसंख्य अभिवेदनांमध्ये ही ज्वलंत समस्या ठळकपणे निदर्शनास आणली आहे.

सर्वसाधारणत: आणि विशेषत: लहान तसेच मोठ्या वसाहतीमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता हा, या जिल्ह्यांतील या ज्वलंत समस्येचा एक उल्लेखनीय पैलू म्हणून दर्शविण्यात आला आहे. ही समस्या, आमच्याकडे करण्यात आलेल्या विविध निवेदनांमध्ये तीव्रतेने प्रतिबिंबित झाली आहे. सर्व प्रयोजनांकरिता (म्हणजेच पिण्याकरिता, शेतीकरिता आणि उद्योगाकरिता) पाण्याच्या संयुक्तिक आणि समन्यायी वापरासाठी काम करणाऱ्या विविध संघटनांनी, विविध प्रदेशांमध्ये आणि पिकांमध्ये समन्यायी पाणी वाटपाची हमी देणाऱ्या जल धोरणाचा जोरदार युक्तिवाद केला आहे. त्यांनी, जलस्त्रोतांचे नियोजन व वापर यातील प्रमुख विषयनिष्ठ तत्त्व म्हणून पाणलोट विकासाच्या दृष्टिकोनाच्या गरजेवर देखील भर दिला आहे.

असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, जिल्ह्यांमधील अत्यंत विविधतेचे स्वरूप विचारात घेता **योग्य एकक म्हणून तालुका हा घटक विचारात घेऊन त्याद्वारे असमतोल मोजला पाहिजे ज्यामुळे विकासातील कमतरतांच्या व्याप्तीचे अधिक अचूकपणे चित्रण करता येईल.** काही विधानसभा सदस्यांनी त्यांच्या निवेदनांत असा युक्तिवाद केला आहे की, नियोजन व नियतवाटप यांची सध्याची पद्धती, ही, उर्वरित वंचित तालुक्यांच्या खर्चाच्या आधारे जिल्ह्यातील काही तालुक्यांवर समजून उमजून मेहरनजर करते. अशाच प्रकारचे युक्तिवाद, पश्चिम घाट तालुक्यांच्या लोकप्रतिनिधींकडून करण्यात आले आहेत. या जिल्ह्यांतील समित्यांच्या सर्व जन सुनावण्यांमध्ये तालुका पातळीवरील' असमतोल मोजण्याच्या बाजूचे तेच तेच प्रकरण तावातावाने मांडण्यात आले होते.

यापैकी बहुसंख्य तालुक्यांमध्ये, अनेक दशके *'पैसेवारी'* चे फारच मूल्य असल्याचे वारंवार अनुभवास आले आहे. पिण्याच्या पाण्याची कमतरता ही, फारच तीव्र आहे आणि बहुसंख्य गावांना टँकरद्वारे पुरविण्यात येणाऱ्या अल्प प्रमाणातील पाणी पुरवठ्यावर गुजराण करावी लागते. जवळजवळ अर्ध्या वर्षाच्या कालावधीसाठी, टँकरवर आधारित असलेला पाणीपुरवठा हाच केवळ या प्रदेशांकरिता पाण्याचा जलस्त्रोत आहे. या अवर्षणग्रस्त तालुक्यांपैकी काही तालुके हे, उंचावर स्थित आहेत आणि त्यांच्याकरिता उंच ठिकाणी, पाणी उचलून नेण्याची आवश्यकता आहे. यापैकी काही उंच ठिकाणावरील अवर्षणग्रस्त क्षेत्रांसाठी तयार केलेल्या अशा अनेक सिंचन योजना आहेत. तथापि, यांपैकी अनेक योजना या, मोठ्या प्रमाणावरील थकित विद्युत आकारांमुळे पूर्णपणे थांबलेल्या आहेत. अशाप्रकारे, या प्रदेशांना, पाणीपुरवठा उपलब्धतेची अकार्यक्षम पद्धत आणि टँकरद्वारे पाणीपुरवठ्याकरिता होणारा मोठ्या प्रमाणावरील खर्च अशा फार विलक्षण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे.

महाराष्ट्र शासनाने, लवादाने त्याला वाटप केलेल्या पाण्याचे भौतिक प्रत्यक्षीकरण सुरू केले. या प्रयोजनाकरिता, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या जिल्ह्यांतील बहुसंख्य प्रकल्पांचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळात समावेश केला आहे. १९९७ ते २००७ या दरम्यानच्या सुरूवातीच्या टप्प्यात जलसाठा निर्माण करण्यावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात आला. तथापि, वितरण पद्धतीतील गरज असलेली पुढील गुंतवणूक अजून व्हावयाची आहे. परिणामत: आम्हाला अनेक मागण्या प्राप्त झाल्या असून ज्या,

अशा वापर न झालेल्या पाण्याची उपलब्धता आणि पाण्याचे वितरण व वापर यांतील गुंतवणुकीच्या स्वरूपात, आवश्यक असलेल्या अखेरच्या प्रयत्नाची गरज, यांवर भर देतात.

निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी आमच्याकडे असा युक्तिवाद केला आहे की, प्रदेशांतील गुंतवणूकयोग्य स्रोतांच्या वाटपाचे सध्याचे सूत्र, मागे घेण्यात आले आहे आणि जवळजवळ पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या पूर्ततेच्या अपेक्षा लांबणीवर पडलेल्या आहे. आमच्याकडे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, ज्या प्रकल्पांसाठी राज्य शासन, नाबार्डचा ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी किंवा, केंद्र सरकारचा गतिमान सिंचन लाभ कार्यक्रम, यांसारख्या बाहेरील स्त्रोतांद्वारे निधी मिळवीत आहे, असे सर्व प्रकल्प, प्रदेशांमधील निधी वाटपाच्या, सध्याच्या राज्यपालांच्या सूत्रामधून बाहेर ठेवले पाहिजे. पुणे तसेच सोलापूर या जिल्ह्यांमध्ये अशाच तक्रारी ऐकावयास मिळाल्या आहेत.

२.४ आदिवासींच्या लोकप्रतिनिधींशी सुसंवाद

आम्ही आदिवासी प्रदेशाच्या निर्वाचित लोकप्रतिनिधींशी बरेचदा सुसंवाद साधला. या लोकप्रतिनिधींनी, आदिवासी प्रदेशाकडे होणाऱ्या दीर्घकालीन दुर्लक्षाबाबत मनस्ताप व्यक्त केला आहे. त्यांपैकी बहुसंख्य लोकप्रतिनिधींनी, जमिनीवरील प्रवेश, विकास प्रकल्पांच्या परिणामी, आदिवासी लोकांचे होणारे विस्थापन, शिक्षणाची व आश्रम शाळांची वाईट अवस्था, पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची टंचाई, आपत्तीग्रस्तांचे स्थलांतरण आणि त्यांचे वनहक्क व लाख, तेंदु पाने, मध, डिंक इत्यादीं सारख्या गौण वन उत्पादनांचा व्यापार हिरावून घेणे यासंबंधातील अनेक गाऱ्हाणी मांडली. या सर्व विधानमंडळ सदस्यांनी, आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या राजकीय व संस्थात्मक तरतुदींसंबंधात त्यांचा झालेला अपेक्षाभंग व्यक्त केला. त्यांच्या मते, आदिवासी सल्लागार समिती, त्यांच्या गंभीर समस्यांवर गंभीरपणे कार्यवाही करीत नाही आणि आदिवासी सल्लागार समितीच्या अनेक शिफारशींची कधीच गंभीरपणे अंमलबजावणी झालेली नाही. आदिवासी क्षेत्रातील अनेक पाटबंधारे प्रकल्प हे, वन क्षेत्रांच्या मोठ्या प्रमाणात जलमग्न होण्याच्या कारणामुळे स्थगित ठेवलेले आहेत. प्रतिनिधींनी दोन टक्क्यांपर्यंतचे वनक्षेत्र जलमग्न होणाऱ्या पाटबंधारे प्रकल्पांचे नियोजन करण्याची आणि अंमलबजावणी करण्याची गरज आहे अशी विनंती केली आहे. त्याचप्रमाणे, स्थानिक लहान जलसाठ्यांचे नियोजन करून, आदिवासी क्षेत्रांच्या गरजांची पूर्तता केली पाहिजे. त्यांनी, आदिवासी मुलांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या दर्जातील भरीव सुधारणेकरिता देखील युक्तिवाद केला आहे.

आदिवासी क्षेत्रांना, सिंचनाच्या व पिण्याच्या पाण्याच्या तुटवड्याला तोंड द्यावे लागते. अनेक पाणीपुरवठा योजना आदिवासी क्षेत्रांत संकल्पित केल्या आहेत व बांधण्यात आल्या आहेत परंतु या योजना नागरी क्षेत्रांना पाणीपुरवठा करीत आहेत. आदिवासींना या योजनांचा लाभ घेण्याची मुभा नाही. आदिवासी लोकप्रतिनिधींना, ही बाब, अत्यंत अन्यायी भेदभावकारक असल्याचे वाटते.

२.५ समितीला प्राप्त झालेली अभिवेदने

आम्हाला प्राप्त झालेल्या अभिवेदनांची काही लक्षणीय अशी स्थूल वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे या प्रदेशांत, वैफल्य व अपेक्षाभंग स्पष्टपणे दिसून येतो. महाराष्ट्रातील सर्व मागास प्रदेशांत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची प्रबळ भावना आहे. धोरण सुस्पष्ट असतानादेखील मागास प्रदेशात, अपुरा निधी उपलब्ध असणे आणि त्याचा अपुरा वापर करणे यांकडे अनेकांनी लक्ष वेधले आहे. विशेषत:, मराठवाडा व विदर्भामधील अभिवेदनांमध्ये वरील समस्येच्या संदर्भात समाजामध्ये वित्तीय अनुशेष असल्याचा समज दृढ आहे.

विदर्भातील लोकप्रतिनिधींनी, प्रामुख्याने, मापनाचे संबंधित एकक (घटक) म्हणून 'जिल्ह्यास' पसंती दिली आहे. दुसऱ्या बाजूला, उर्वरित महाराष्ट्रात, अनेक आदिवासी व अर्वषणप्रवण क्षेत्र कार्यक्रम तालुके आहेत. या विभागाची सापेक्ष आर्थिक कुंठितता व वंचितता या बाबी, मराठवाडा व विदर्भातील तत्सम क्षेत्रांमध्ये समान आहेत. म्हणून, योग्य एकक (घटक) म्हणून

'तालुका' या घटकास पंसती दिली होती. ही बाब म्हणजे जिल्ह्यांतर्गत असलेल्या उच्च पातळीवरील तफावतींचे प्रतिबिंब आहे आणि प्रदेशांतर्गत पातळीवर अभिजन वर्गाचा कब्जा दिसून आला आहे. अनेक अभिवेदनांमध्ये विकासविषयक आकांक्षा तसेच संबंधित प्रदेशांच्या वाढीच्या क्षमतेस चालना देण्यासाठी होत असलेले अपुरे शासकीय प्रयत्न याबद्दल चिंता व्यक्त केली होती. त्यांच्या मते, प्रादेशिक असमतोलाचे वास्तव कारण, वाढ व विकासविषयक संधी यापासून वंचित ठेवणे हे आहे. त्यांनी प्रादेशिक उपयोजनांप्रती असलेल्या विकास प्रशासनाच्या अपुऱ्या उत्तरदायित्वासंबंधात देखील त्यांच्या चिंता व्यक्त केल्या. त्यांना असे वाटले की, विद्यमान शासकीय धोरणे आणि यंत्रणा, त्यांच्या आकांक्षेशी अनुरूप नव्हत्या. गट व तज्ञ व्यक्ती यांनी, प्रदेश विशिष्ट समस्यांचे उपाय सुचविले आहेत. त्यांच्या प्रस्तावांमध्ये, वाढत्या क्षमतेच्या व प्रदेशांच्या विशिष्ट फायद्यांचा उपयोग करून घेतील अशा धोरणांबाबत आग्रह धरण्यात आला आहे.

२.६ भेटींतून मिळालेले शिक्षण

समितीला, प्रादेशिक भेटींतून खूप शिकावयास मिळाले आहे आणि सहभागी झालेल्यांकडून पुढील महत्त्वाच्या बाबी समितीच्या लक्षात आल्यात.

१. सर्व प्रदेशांमध्ये जलदगतीने वाढ व्हावी ही प्रबळ इच्छा आहे. अधिक चांगला प्रादेशिक समतोल साध्य करण्यासाठी आणि दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी, सर्व समावेशक वाढीची आवश्यकता आहे.

२. जलदगतीने निर्णय घेण्यासाठी आणि त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात विकेंद्रीकरण व प्रादेशिक सक्षमीकरण करणे अत्यावश्यक असेल.

३. आदिवासी क्षेत्रांकडे सतत होणारे दुर्लक्ष आणि त्यांच्या कायदेशीर हक्कांच्या अंमलबजावणीतील अपुरेपणा या प्रश्नांची सोडवणूक करण्याची गरज आहे.

४. जलसंपत्तीचा जलदगतीने विकास आणि त्याचा पुरेपूर वापर करण्याची निकड हा प्रत्येक प्रदेशात उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांच्या केंद्रस्थानी होतो. या पाण्याशी संबंधित असलेल्या या चर्चांबाबत नेहमी अगोदरच कळवण्यात येत होते आणि तसेच काहीवेळा त्यात विवाद देखील होत असत. या चर्चांचा भर विविध प्रदेशांत किंवा उप-प्रदेशांत बदलत गेला. पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत, पाण्याची टंचाई आणि उपजीविकेची सुरक्षितता यांसंबंधातील प्रश्न ठळकपणे निदर्शनास आणले होते. पूर्व विदर्भ आणि कोकण क्षेत्रे त्यांच्या पाणी उपलब्धतेच्या समस्येला तोंड देत असतात. आपल्या राज्याच्या सर्व प्रदेशातील वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यांमुळे पाण्याच्या वाढत्या मागण्यांची पूर्तता करणे हे आव्हान, ही दुसरी एक चिंताजनक बाब होती. हितसंबंधितांबरोबर झालेल्या आमच्या राज्यव्यापी बैठकांतून प्राप्त झालेली अंतरदृष्टी ही, आमच्या दृष्टिकोनास आणि आमच्या धोरणात्मक प्रस्तावास आकार देताना महत्त्वाची ठरणार आहे.

५. सामाजिक भांडवल उभारण्याच्या पातळ्या या प्रदेशांमध्ये असमान आहेत आणि याचा विकासविषयक फलनिष्पत्तीवर खूप परिणाम झालेला आहे.

६. सरकारी अधिकाऱ्यांमधील बांधिलकीचा अभाव विचारात घेता, अविश्वासाची भावना वाढीस लागत आहे. आणि त्यामुळे हितसंबंधितांमध्ये विश्वासघात झाल्याची भावना निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील सर्व प्रदेशांमध्ये अशा भावना व विचार व्यक्त होत असल्या तरी, त्याची तीव्रता विदर्भात कदाचित अधिक प्रबळ होती. या प्रदेशाममधील "बंध" कमकुवत होत असल्याचे आम्हाला दिसून आले आहे.

प्रकरण ३

प्रादेशिक विकास: मागील काही काळातील कल व स्वरूप

३.० प्रस्तावना: पूर्वपीठिका

मागच्या दोन दशकांमध्ये, भारतीय अर्थव्यवस्था बहु-आयामी स्थित्यंतरातून गेली आहे. वृध्दी दर तीन ते चार टक्क्यांनी खाली आला असल्याने अर्थव्यवस्थेची स्थिती बरीच खालावली आहे. मागच्या दशकात, वृध्दी दर आधीच्या काळापेक्षा नेहमीच दुप्पट झाला आहे. ***भारतीय अर्थव्यवस्था २१ व्या शतकातील आशादायकपणे समृद्ध होत जाणारी अर्थव्यवस्था बनली आहे. अस्थायी स्थित्यंतरे असताना सुद्धा, असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, भारतीय अर्थव्यवस्था आधीच्या मंद वृध्दी दराच्या पाशातून बाहेर पडली आहे आणि उच्च वृध्दी दराच्या टप्प्यात तिने प्रवेश केला आहे.*** या लक्षणीय स्थित्यंतराची अनेक कारणे आहेत. पूर्वीच्या ताठर विनियामक धोरणातून मुक्तता आणि बाजारातील वाढत्या संधींशी सुसंगती साधून, मुक्तपणे स्वातंत्र्य दिल्याने, इतर गोष्टींबरोबरच आत्तापर्यंत दबून राहिलेली अर्थव्यवस्थेची उपलभ्यता स्वतंत्र आणि बंधमुक्त झाली आहे. मागील दोन दशकांत सर्वसाधारणपणे भारतातील आणि विशेषकरून महाराष्ट्रातील, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत प्रचंड बदल झालेला आहे. ***विशेषकरून, आपण एक पक्षीय राजवटीमधून, प्रादेशिक पक्षांच्या आणि सर्वच स्तरांवरील युती शासनांच्या अस्तित्वामुळे प्रत्यक्षात आलेल्या अधिक फुटींच्या राजनीतिकडे संक्रमण केले आहे.*** प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न, गतिशील अर्थव्यवस्था आणि राजकीय परिस्थिती यांच्या संदर्भाने समजून घेतला पाहिजे. या प्रकरणात, आम्ही, बदलत्या आर्थिक संधी, वृध्दीची ठळक उपलभ्यता, धोरणांची बदलती उदाहरणे आणि आजमितीस साध्य करण्यात आलेल्या विकासातील तफावतीचा विस्तार यांच्या सारभूत दृष्टिकोनाचे हुबेहूब वर्णन केले आहे. बदलत्या संदर्भांच्या मापदंडांतर्गत भविष्यातील प्रादेशिक विकासातील बदलांचे स्वरूप मापण्यासाठी, महाराष्ट्राच्या आर्थिक वृध्दीच्या स्वरूपाचे आणि महाराष्ट्राच्या प्रदेशांतील विकासात्मक तफावतीच्या विस्ताराचे थोडक्यात रेखाटन केल्यास आवश्यक ते चित्र आपणास उपलब्ध होऊ शकेल.

३.०.१ सत्यशोधन समितीने आपला अहवाल सादर केल्यापासून भारताच्या आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत काही मोठे बदल झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा व्याप प्रचंड वाढला आहे. १९८४-८५ मध्ये भारताचे एकूण देशांतर्गत उत्पन्न रु.२,३५,११३ कोटी इतके होते. जे आता २०१२-१३ मध्ये रु.९४,६१,९७९ कोटी इतके झाले आहे. महाराष्ट्राचे एकूण राज्य देशांतर्गत उत्पन्न १९८४-८५ मध्ये रु.२५,५५८ कोटी इतके होते. जे आता २०१२-१३ मध्ये रु.१३,७२,६४८ कोटी इतके झाले आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, ***१९८३-८४ मध्ये महाराष्ट्राची स्वत:ची अर्थव्यवस्था ही, भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षा कितीतरी पटींने मोठी आहे.*** महाराष्ट्र हे प्रमुख उद्योगप्रधान आणि प्रगतीशील राज्यांपैकी एक आहे. २०१२-१३ या वर्षामध्ये, महाराष्ट्राचे एकूण राज्य देशांतर्गत उत्पन्न रु.१३,७२,६४८ कोटी इतके होते, जे राष्ट्रीय एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या प्रत्यक्ष रकमेच्या १४.५१ टक्के इतके होते. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा सरासरी वृध्दी दर सातत्याने राष्ट्रीय सरासरी वृध्दी दरापेक्षा जास्त राहिला आहे. राष्ट्रीय उत्पन्नामधील महाराष्ट्राचा हिस्सा लोकसंख्येपेक्षा जास्तच राहिला आहे. जेव्हा सत्यशोधन समितीने १९८४ मध्ये आपला अहवाल सादर केला, तेव्हा महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजच्या पेक्षा बरीच वेगळी होती. सध्याच्या बाजारभावाने मोजमाप केल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेचा व्याप बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मागच्या दशकात, भारतीय अर्थव्यवस्थेतील महाराष्ट्राचा हिस्सा साधारणपणे १२.३८% इतका होता. २०१२-१३ या वर्षामध्ये हाच हिस्सा साधारण १४.५१% इतका

असण्याची अपेक्षा आहे. (महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण, २०१२-१३, पृष्ठ २३). महाराष्ट्राचा एकूण राज्य देशांतर्गत उत्पादनातील सेवा क्षेत्राचा हिस्सा, राष्ट्रीय स्तरावरील सेवा क्षेत्रातील हिश्श्यापेक्षाही अत्यंत जलद गतीने वाढत आहे.

३.०.२ इथे आमचा मूळ संबंध महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या गतिशीलतेचे स्वरूप तिच्या प्रादेशिक दृष्टिकोनातून चित्रित करणे हा आहे. ऐतिहासिकदृष्टया महाराष्ट्र हा तीन वेगवेगळया प्रदेशांचा मिळून बनलेला आहे. मराठी भाषिक जिल्हे-(१) मुंबई प्रांत (२) भूतपूर्व मध्य प्रांत आणि वऱ्हाड (विदर्भ) आणि (३) निजामाच्या अखत्यारीतील हैद्राबाद राज्य (उदा. मराठवाडा). संबध्द आर्थिकदृष्टया मागास आणि अविकसित विदर्भ, मराठवाडा आणि दुष्काळग्रस्त पश्चिम महाराष्ट्र व कोकण हे प्रदेश "भाषिक" राज्यात एकसंघ करण्यात आल्यावर त्यांना ओळख प्राप्त झाली. हे, श्री.यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यांच्या सुप्रसिध्द भाषणात सोदाहरण सांगण्यात आले आहे. संबध्द आर्थिक मागासलेपणाला काही ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीय कारणे असू शकतात. विशेषकरून, मुंबई आणि गुजराथ मधील सुरत व अहमदाबाद सारख्या इतर औद्योगिक केंद्रांचे सान्निध्य पश्चिम महाराष्ट्रामधील जिल्हयांकरिता अनुकूल आहे. काही पारंपरिक कापड गिरण्या आणि हस्तव्यवसाय यांच्या व्यतिरिक्त मराठवाडा आणि विदर्भात मोठया प्रमाणात कोणतेही उद्योग नव्हते. या प्रदेशांतील ही असमर्थता महाराष्ट्र शासनाने ओळखली. परंतु, ही परिस्थिती सुधारण्यासाठी वापरण्यात आलेल्या उपाययोजना अपेक्षेपेक्षा फारच कमकुवत ठरल्याने त्या कामी आल्या नाहीत. आर्थिक अभ्यास आणि अनुभवजन्य पुराव्यांवरून लक्षात आलेली एक गोष्ट म्हणजे पारंपरिक औद्योगिक विर्सजन धोरण पूर्वीही कामी आले नाही आणि सध्याच्या बदलत्या आर्थिक वातावरणातही उपयोगी पडण्याची शक्यता फार कमी आहे. सत्यशोधन समिती आणि निर्देशांक व अनुशेष समिती यांनी आपल्या अहवालात निर्विवादपणे आणि सुस्पष्टपणे वृध्दी आणि विकासाला चालना देणाऱ्या या मोठया प्रभावाबद्दल आपले मत प्रदर्शित केले आहे.या दोन्ही समित्यांनी, उपरोक्त तफावत लवकरात लवकर दूर होईल या आशेवर, सर्व प्रदेशांमध्ये समान योजनाबध्द शासकीय खर्च करण्यावर जोर दिला आहे.

३.०.३ म्हणून, आपण आज अस्तित्वात असलेल्या, विभिन्नता आणि तफावती यांचे स्वरूप आणि विस्तार नीट समजून घेतले पाहिजे. आर्थिक वृध्दी आणि विकास यामध्ये अनेक घटकांचे योगदान असते ही वस्तुस्थिती आपण समजून घेतली पाहिजे. हे सर्व घटक सर्व प्रदेशांत एकाच वेळी उपलब्ध असतील असे समजणे हे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. असमतोल दूर करणे म्हणजे समान खर्च किंवा तदर्थ राजकोषीय अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, असे समजणे गरजेचे नाही हे लक्षात घ्यायला हवे. आम्ही आमच्या दृष्टिकोनात आणि शिफारशींमध्ये अशा विचारांचा समावेश केला आहे आणि प्रादेशिक समतोल हा "एककेंद्राभिमुखतेचा" स्वीकार्य स्तर मानण्यात यावा आणि धोरण सुधारणांवर आधारित असलेल्या प्रोत्साहक संरचनांच्या आधारे ठराविक कालावधीत तो प्राप्त करून घेतला पाहिजे. या प्रयोजनार्थ, आम्ही सर्व प्रदेशांतील विद्यमान आर्थिक परिस्थितीचा तौलनिक अभ्यास केला, जेणेकरून नेमक्या वैशिष्टयांच्या आधारे धोरण ठरविताना नेमके उद्दिष्ट ठरविता येणे शक्य व्हावे. आम्ही काही निर्देशांक व परिमाण जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि अंतिमत: असे निर्देशांक व परिमाण निश्चित केले आहेत की जे फक्त तफावतीचे मोजमाप करणार नाहीत तर त्याचबरोबर ज्यामुळे कमीत कमी कालावधीसाठी (साधारणत: एक वर्ष) वरचेवर त्यांचे निरीक्षण आणि संनियंत्रण करता येईल.

हितसंबंधितांशी संवाद साधला असता, इतिहास, राजकीय पुढाकार आणि सामाजिक चळवळीद्वारे बजावण्यात येणाऱ्या भूमिका याबाबत आम्हाला माहिती मिळाली. या घटनांमधील बरेचसे घटक हे राजकीय सामाजिक चळवळी आणि नेतृत्त्व यामधून निर्माण झाले आहेत याची जाणीव आम्हाला आहे. रयत शिक्षण संस्थेसारख्या, शैक्षणिक संस्थांचा उदय, सासवड-माळी साखर कारखाने तसेच श्री. विखे पाटील यांच्या नेतृत्त्वाखालील आणि श्री.धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखालील प्रवरा सहकारी संस्था यासारखे प्रयोग सहकारी दुग्धशाळा आणि प्रक्रिया केंद्रे यांचा उदय इत्यादी ही सर्व पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक क्रांतीची एकमेवाद्वितीय वैशिष्टये आहेत. असे सामाजिक आणि राजकीय घटक, जे संभाव्य विकासाला गती देतात किंवा ती मंद करतात त्यांची प्रशासकीय फतव्याद्वारे हुबेहूब 'नक्कल' करता येऊ शकत नाही. संस्थात्मक पाठबळ, सामाजिक शिकवणीचे स्वरूप आणि इतिहासाच्या प्रवाहात तयार झालेले सामाजिक भांडवल हे सामाजिक आणि राजकीय नेतृत्त्वाद्वारेच उभारले गेले पाहिजे.आमचा

अहवाल, मागास प्रदेशातील नेतृत्त्वाला जबाब विचारतो आणि आवाहन करतो की, त्यांनी संभाव्य आर्थिक प्रगतीला गती मिळेल अशा घटकांची सुयोग्य रीतीने योजना करावी जेणेकरून मागास प्रदेश सोसत असलेली तफावत कमी होईल.

३.१ भूगोल आणि लोकसंख्याशास्त्र

आम्ही तीन प्रादेशिक अर्थव्यवस्थेचा, त्यांच्या विविध भौगोलिक आणि लोकसंख्यात्मक विस्तार यांमधील त्यांच्या आकाराचा तौलनिक दृष्टिकोनापासून सुरुवात केली. तक्ता ३.१ मध्ये, आम्ही या प्रदेशांचे क्षेत्र आणि लोकसंख्या पुढे मांडली आहे (मुंबई आणि मुंबई उपनगरीय क्षेत्रे वगळून) वाचकांनी जोडपत्र ३.९ चा संदर्भही घ्यावा.

तक्ता ३.१
क्षेत्रफळ आणि लोकसंख्या यामधील प्रदेशांचा हिस्सा (मुंबई वगळून)

प्रदेश	भौगोलिक क्षेत्रफळ (०० हेक्टर)	क्षेत्रफळातील हिस्सा (%)	लोकसंख्या २०११	लोकसंख्येतील हिस्सा (%)
१	२	३	४	५
उर्वरित महाराष्ट्र	१४४८९३	४७.४	५८१८७५३७	५८.२
मराठवाडा	६४८१३	२१.०	१८७३१८७२	१८.७
विदर्भ	९७४०४	३१.७	२३०१२५५१	२३.०
महाराष्ट्र	३०७११०	१००	९९९३१९६०	१००

स्रोत : महालेखापाल, भारत आणि अर्थशास्त्र व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.

उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाचा क्षेत्रफळ आणि लोकसंख्येतील हिस्सा महत्त्वाचा आहे. प्रादेशिक नियतवाटपाच्या नियमनाच्या तत्त्वांच्या आमच्या मांडणीत पुढे याचा वापर करण्यात आला आहे. या प्रदेशांची लोकसंख्या मागील दशकात काहीशा वेगळया गतीने वाढली आहे. संदर्भासाठी तक्ता ३.२ आणि जोडपत्र ३.१ पहा, ज्यात अनुक्रमे लोकसंख्येबाबतची आकडेवारी आणि लोकसंख्येचा वृध्दी दर दिला आहे. विदर्भाचा लोकसंख्येचा सरासरी वृध्दी दर इतर प्रदेश आणि महाराष्ट्रापेक्षा (मुंबई वगळून) लक्षणीयरीत्या कमी आहे याची नोंद घेण्यात यावी. उर्वरित महाराष्ट्रातील ठाणे, रायगड, नाशिक आणि पुणे ही बाहेरून येणाऱ्या स्थलांतरितांमुळे वाढत आहेत. त्याचप्रमाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील नकारात्मक वृध्दी ही बाहेर स्थलांतरित होणाऱ्यांमुळे (आणि त्याचप्रमाणे कमी जननक्षमता यामुळे) आहे. तथापि, नंदूरबारच्या दरसाल २.३३ टक्के इतक्या उच्च वृध्दी दराची (फक्त पुण्यानंतर) बारकाईने तपासणी होणे गरजेचे आहे. उर्वरित महाराष्ट्राचे तीन मुख्य जिल्हे, मुख्यत: सातारा, सांगली आणि कोल्हापूर येथे दरसाल एक टक्क्यापेक्षा कमी संयुक्त वार्षिक अभिवृध्दी दराची नोंद झाली आहे. हे बहुतेक करून या जिल्ह्यांतील जननक्षमतेत लक्षणीय घट झाल्याने असू शकेल. त्याचप्रमाणे विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्हयांमध्येही दरसाल एक टक्क्यापेक्षा कमी वृध्दी दर आहे. एक प्रदेश म्हणून विदर्भाचा वृध्दी दर दरसाल फक्त १.११ टक्के इतकाच आहे जो, उर्वरित महाराष्ट्र (१.८१%) आणि मराठवाडा (१.९%) यांच्यापेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. लोकसंख्यात्मक विकास निर्देशांकवरील आधीच्या अभ्यासात (उदा.जननक्षमता, लग्नाचे वय, कुटुंब नियोजनाच्या साधनांचा कमी वापर) मराठवाड्याची कामगिरी कमी दर्जाची दर्शवण्यात आली आहे. हा कल मागील दशकातही कायम राहिला असल्याचे दिसून येते. उर्वरित महाराष्ट्राचा उच्च वृध्दी दर हा, मोठया प्रमाणात बाहेरून येणारे स्थलांतरित आणि कमी होणारी जननक्षमता यांचे मिश्रण आहे.

तक्ता ३.२
प्रादेशिक लोकसंख्या संयुक्त वार्षिक अभिवृध्दी दर (दरसाल)

प्रदेश	२००१	२०११	संयुक्त वार्षिक–अभिवृद्धी दर (%)
१	२	३	४
उर्वरित महाराष्ट्र	४८६४२७८५	५८१८७५३७	१.८
मराठवाडा	१५५८९२२३	१८७३१८७२	१.९
विदर्भ	२०६०७८४२	२३०१२५५१	१.१
महाराष्ट्र*	८४८३९८५०	९९९३१९६०	१.७

स्रोत : जनगणना २००१, २०११

मागील दशकात महाराष्ट्राने वेगाने होणाऱ्या शहरीकरणाचा अनुभव घेतला. तक्ता ३.३ मध्ये तीन प्रदेशांतील शहरीकरणाची गती दर्शविलेली आहे. स्पष्टपणे उर्वरित महाराष्ट्रात शहरीकरणाची गती जास्त आणि मराठवाड्यात सर्वात कमी आहे. तरीसुध्दा हे स्पष्ट आहे की, सर्व प्रदेश शहरीकरणाचा वाढता दबाव अनुभवत आहेत. शहरीकरणाची प्रक्रिया विदर्भात जरा जास्त असण्याची शक्यता आहे. २०११ च्या जनगणनेतील स्थलांतरणाचा तपशीलवार तक्ता उपलब्ध नाही. पण बहुतेक करून बाहेरून येणारे स्थलांतरित आणि बाहेर स्थलांतरित होणारे यांचा विलक्षण मिश्र अनुभव विदर्भास येत आहे. याची नोंद घ्यायला हवी की, शहरी क्षेत्रात आणि त्याच्या आसपास राहणाऱ्यांची वास्तविक लोकसंख्या ही, वर दर्शविलेल्या प्रमाणापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. रायगड, ठाणे, नाशिक व पुणे या जिल्ह्यांतील शहरांच्या आजुबाजूचा बराच मोठा नागरी वस्तीचा भाग हा, अजूनही तांत्रिकदृष्टया 'ग्रामीण' भाग म्हणूनच ओळखला जातो. शहरीकरणाचा वेग हा, आर्थिक धोरण तयार करताना वेगवेगळया समस्या आणि चिंता उपस्थित करतो. नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी नियमन संस्था यांना त्यांच्या स्वरूपास येत्या दशकांत स्वत:हून बऱ्याच वेगळया पध्दतीने आकार द्यावा लागेल. येत्या दशकात पिण्याचे पाणी, वाहतूक, गृहनिर्माण, स्वच्छ पर्यावरण यां सारख्या मुद्द्यांचे धोरणांचे कार्यसूचीत प्राबल्य असेल. (प्रकरण ४ मधील शहरीकरणावरील भाग पहा)

तक्ता ३.३
एकूण लोकसंख्येतील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचा प्रदेशवार हिस्सा

प्रदेश	२०११		२००१	
	ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी	नागरी लोकसंख्येची टक्केवारी	ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी	नागरी लोकसंख्येची टक्केवारी
१	२	३	४	५
उर्वरित महाराष्ट्र	५६.७	४३.३	६१.६	३८.४
विदर्भ	६४.९	३५.१	६७.९	३२.१
मराठवाडा	७२.९	२७.१	७५.५	२४.५
महाराष्ट्र	५४.८	४५.२	५७.६	४२.४

स्रोत :– जनगणना २००१, २०११

महाराष्ट्राची (मुंबई वगळता) जवळपास १०.११ टक्के लोकसंख्या ही आदिवासी आहे. एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी जवळपास ६१ टक्के एवढी लोकसंख्या उर्वरित महाराष्ट्रात राहते. ठाणे, धुळे, नाशिक आणि नंदूरबार हे जिल्हे उर्वरित महाराष्ट्रातील एकूण आदिवासी प्राबल्य असलेले जिल्हे आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ३२.१ टक्के (तक्ता ३.४) एवढी लोकसंख्या विदर्भात आहे आणि ती मुख्य करून गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्हयांत आहे. आदिवासी

लोकसंख्या ही, लोकसंख्येतील सर्वात वंचित आणि उपेक्षित घटक म्हणून ओळखला जातो. लोकसंख्येतील हा घटक, मागासपणाच्या आणि हुसकावून लावण्याच्या भावनेने ग्रासलेला आहे. त्यामुळेच आदिवासी जिल्हे हे अनेक तऱ्हांनी मागासलेले जिल्हे आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे, उर्वरित महाराष्ट्र पुष्कळदा प्रगत क्षेत्र म्हणून समजला जातो, पण त्यात चार मोठे आदिवासी जिल्हे आहेत. या आदिवासी जिल्हयांची विकासातील तफावत लक्षात घेऊन, आम्ही त्यांचा अल्पविकसित वास्तविक क्षेत्रे म्हणून परामर्श घेतला आहे. ही लोकसंख्येची मोठी क्षेत्रे आणि विभाग आहेत, ती निर्विवादपणे उपेक्षित आहेत आणि ती आपल्या प्रदेशांच्या 'सामान्य' वर्गवारीच्या क्षेत्रांत पसरलेली आहेत आणि जरी त्यांच्यामुळे ऐतिहासिकदृष्टया आणि भौगोलिकदृष्टया लगतचा असा मागास प्रदेश तयार होत नसला तरी, हे ही इतके महत्त्वाचे आहेत की, त्या प्रदेशांकडे दुर्लक्ष करता येत नाही. आम्ही या 'वास्तविक किंवा काल्पनिक' मागास क्षेत्रांच्या विषयांचा अहवालाच्या स्वतंत्र प्रकरणात परामर्श घेतला आहे. (आदिवासी क्षेत्रावरील प्रकरण ७ पहा)

तक्ता ३.४
अनुसूचित जमातींची प्रदेशवार लोकसंख्या (२००१)

प्रदेश	एकूण	पुरूष	स्त्री	एकूण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येतील हिस्सा (%)
१	२	३	४	५
उर्वरित महाराष्ट्र	५,२१३,०५२	२,६३३,५१०	२,५७९,५४२	६०.८
मराठवाडा	६०८,१०९	३११,६४९	२९६,४६०	७.१
विदर्भ	२,७५६,११५	१,४०२,५९५	१,३५३,५२०	३२.१
महाराष्ट्र	८,५७७,२७६	४,३४७,७५४	४,२२९,५२२	१००

स्रोत : भारतातील राज्यांतील व महाराष्ट्रातील जिल्हयांकरिता निवडक निर्देशांक, २००८-०९

आम्ही विचारात घेतलेला आणखीन एक असा वास्तविक प्रदेश आहे की जो महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त क्षेत्र आहे. खूप कमी आणि अतिशय अनिश्चित अवक्षेपण असलेले, पाण्याची टंचाई असलेले क्षेत्रे, सातत्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि कुंठित झालेली शेती याला सामोरी जात असतात. हे प्रदेश महाराष्ट्राच्या सर्व कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशांमध्ये पसरलेले आहेत. आम्ही खालील तक्ता ३.५ मध्ये, दुष्काळग्रस्त प्रदेशांतील लोकसंख्येची अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जमातीव्यतीरिक्त तर तालुके म्हणून विभाजन केले आहे. रंगनाथन समितीने अलिकडेच अनुसरलेल्या अवर्षणप्रवण क्षेत्रांच्या अधिक व्यापक व्याख्येचा सापेक्षतेने वापर करून हा तक्ता तयार करण्यात आला आहे. (तथापि, जलसंपदेचा आधारभूत म्हणून वापर करीत असता, आम्ही अधिक कठोर व्याख्या स्वीकृत केली आहे. म्हणून 'पाण्याचे दुर्भिक्ष' असणाऱ्या तालुक्यांच्या संख्येत तफावत आहे, वस्तुत: आम्ही पाण्याचा त्रास असलेले तालुके या सर्वसाधारण संकल्पनेचा जास्त विचार केला आहे.

तक्ता ३.५
अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम तालुक्यांतील लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या

	प्रदेश	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम	आदिवासी तालुके	आदिवासीतेतर तालुके	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमेतर	एकूण	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम/एकूण (%)
१	२	३	४	५	६	७	८
अनुसूचित जमाती	उर्वरित महाराष्ट्र	२५९७२४७	१७४२४९६	८५४७५१	२५२४६८५	५१२१९३२	५०.७
	मराठवाडा	२८३३८८	५८५२७	२२४८६१	३२४७२१	६०८१०९	४६.६
	विदर्भ	१०४७४१८	६१४१३२	४३३२८६	१७०८६९७	२७५६११५	३८.०
	महाराष्ट्र	**३९२८०५३**	**२४१५१५५**	**१५१२८९८**	**४५५८१०३**	**८४८६१५६**	**४६.३**

	प्रदेश	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम	आदिवासी तालुके	आदिवासीतेतर तालुके	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमेतर	एकूण	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम/एकूण (%)
१	२	३	४	५	६	७	८
अनुसूचित	उर्वरित महाराष्ट्र	१९७०५०४५	३०८०१६७	१६६२४८७८	२३८१३८०७	४३५१८८५२	४५.३
जमातीतर	मराठवाडा	६३१६८१०	१५२१०३	६१६४७०७	८६६४३०४	१४९८१११४	४२.२
	विदर्भ	७३१३०६६	१५४८९५९	५७६४१०७	१०५३८६६१	१७८५१७२७	४१.०
	महाराष्ट्र	**३३३३४९२१**	**४७८१२२९**	**२८५५३६९२**	**४३०१६७७२**	**७६३५१६९३**	**४३.७**
एकूण	उर्वरित महाराष्ट्र	२२३०२२९२	४८२२६६३	१७४७९६२९	२६३३८४९२	४८६४०७८४	४५.९
	मराठवाडा	६६००१९८	२१०६३०	६३८९५६८	८९८९०२५	१५५८९२२३	४२.३
	विदर्भ	८३६०४८४	२१६३०९१	६१९७३९३१	२२४७३५८	२०६०७८४२	४०.६
	महाराष्ट्र	**३७२६२९७४**	**७१९६३८४**	**३००६६५९०**	**४७५७४८७५**	**८४८३७८४९**	**४३.९**

	प्रदेश	अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम	आदिवासी तालुके	आदिवासीतर तालुके	अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमेतर	एकूण (%)
१	२	३	४	५	६	७
अनुसूचित	उर्वरित महाराष्ट्र	११.७	३६.१	४.९	९.६	१०.५
जमाती	मराठवाडा	४.३	२७.८	३.५	३.६	३.९
	विदर्भ	१२.६	२८.४	७.०	१४.०	१३.४
	महाराष्ट्र	**१०.६**	**३३.६**	**५.०**	**९.६**	**१०.०**
अनुसूचित	उर्वरित महाराष्ट्र	८८.४	६३.९	९५.१	९०.४	८९.५
जमातीतर	मराठवाडा	९५.७	७२.२	९६.५	९६.४	९६.१
	विदर्भ	८७.५	७१.६	९३.०	८६.०	८६.६
	महाराष्ट्र	**८९.५**	**६६.४**	**९५.०**	**९०.४**	**९०.०**

स्रोत : जनगणना २००१

रंगनाथन् समितीचा दृष्टिकोन अनुसरल्यामुळे महाराष्ट्राची जवळपास ४५ टक्के इतकी लोकसंख्या अवर्षणप्रवण क्षेत्रात राहत असल्याचे निदर्शनास आले. (प्रकरण १० जलस्त्रोत) पाण्याचा त्रास तीव्र असलेल्या तालुक्यांची व्याख्या करताना आम्ही प्रस्तुत निकषाचे एकसमयावच्छेदी प्रसंगाचे उपयोजन केले आहे.

३.१.१ काही महत्त्वाचे विकास निर्देशांक

विविध अभ्यासक्रमांच्या यथोचित दर्शकांच्या (indicators) मदतीने सापेक्ष मागासपणाचे लक्षण सांगणे शक्य आहे. प्रादेशिक तफावतीचे वर्णन करताना, दर्शकांची कल्पना व त्यांची रचना करण्यासाठी बहुविध पर्याय उपलब्ध होतात. एकदा का दर्शक निवडला की, क्षेत्र व कार्यांच्या विस्तृत व्याप्तीचा समावेश करता येईल. निवडलेल्या दर्शकाबाबतची आधारभूत माहिती ठराविक काळाने व अधिक सहजतेने वारंवार उपलब्ध झाली पाहिजे. शिवाय ती वेळ कालावधीची तुलना करण्याजोगी असावी.

सर्वंकष विकास व वाढ यांसाठी जे निर्णायक आहेत अशा मूलतत्त्वांच्या अनुसार विकासात पडलेल्या तफावतीचे मोजमाप करण्याचे आम्ही ठरविले आहे. अशाप्रकारे, भौतिक तसेच सामाजिक पायाभूत सुविधांच्या मूलतत्त्वांचे ते एक मिश्रण ठरते. इतर प्रदेशांच्या तुलनेने, मागास प्रदेशांना चांगल्या संपर्क साधनांची गरज आहे. बाजार प्रवेश, कामगार व सामग्री यांची त्वरेने ने-आण करण्याची क्षमता आणि पूर्णत: आर्थिक विस्तार यांच्या सुधारणेसाठी रस्ता व रेल्वे-जोडणी या निर्णायक पायाभूत

सुविधा आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रदेशाची रेल्वे व रस्ता जोडणी ही, विकासात्मक खंडाचा एक दर्शक आहे. मानवसाधन संपत्तीच्या दर्जास निसर्गाने मूलभूतरित्या आकार दिलेला आहे आणि त्यात शिक्षण आणि कौशल्य संपादन यांची भर पडली आहे. शीघ्र आर्थिक वाढीसाठी लोकसंख्येतील अधिकाधिक विभिन्न प्रकारच्या कार्यकुशलतेची आवश्यकता आहे. साधनसंपत्ती निर्माण करण्यासाठी शैक्षणिक सुविधा व शैक्षणिक प्रवेश ही, अत्यंत महत्त्वाची बाब आहे. शैक्षणिक नैपुण्याची निश्चित किमान पातळी प्रत्येक प्रदेशाकडे असावी. **प्रदेशातील शैक्षणिक विकासाचे दर्शक म्हणून आम्ही नोंदणीकृत माध्यमिक एसएससी विद्यार्थी व आयटीआय प्रवेशक्षमता असणारे विद्यार्थी घेतले आहेत. आधुनिक शेती उत्पादकता आणि सेवा यांसाठी वाढीव विजेची आवश्यकता आहे. अर्थव्यवस्थेच्या तांत्रिक रूपांतरणासाठी अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे मविजेचीफउपलब्धता लक्षात घेता, हा संक्षिप्त स्वरूपाचा उपाय आहे. तसेच, कृषिक्षेत्रांमध्ये बाजारांचा अभाव व पतपुरवठ्याची उपलब्धता नसणे हे कृषिमध्ये अल्प प्रमाणात विकास होण्याचे हे एक मुख्य कारण असल्याचे दिसते. उपलब्ध आधारभूत माहितीनुसार, विदर्भातील शेतीत सर्वत्र दिसून येणाऱ्या कुंठिततेत मुख्य भर घालणारा घटक म्हणजे संपूर्ण प्रदेशात अधिक प्रमाणात दिसून येणारा असमतोल हा आहे. कृषि पतपुरवठा उपलब्ध करून देण्याने गुंतवणूक क्षमतेची व्याप्ती व शेतीतील समावेशन यांवर परिणाम होतो. कृषि पतपुरवठा दरडोई उपलब्धतेच्या परिभाषेत याची गणना केली जाते आणि अंतिमत: लोकांनी उपभोगावयाच्या जीवनमानाच्या दर्जास, उपलब्ध आरोग्य सेवांची व्याप्ती व स्वरूप यांद्वारे आकार दिला जातो. आम्ही जिल्हा स्तरावर आरोग्याचा एक व्यापक निर्देशांक (Index) विकासित केला आहे. (याचे अधिक तपशीलवार स्पष्टीकरण हे, आरोग्याशी संबंधित प्रकरणांमध्ये पाहता येईल.) आम्ही या निर्देशांकाचा (Index) वापर आरोग्याच्या विकासातील तफावत मोजण्यासाठी केलेला आहे.**

आतापर्यंत बहुतांश विकासातील तफावतीचे मोजमाप हे, राज्याच्या सर्वसाधारण परिस्थीतीवर आधारलेले आहे. प्रत्येक जिल्हा किंवा एखादा प्रदेश यांच्यासाठीच्या या विकास घटकांपैकी प्रत्येक घटकाचे मूल्य हे, राज्याच्या सरासरीबाबत बहुदा नेहमीसारखेच आहे. विकासातील तफावतीची व्याप्ती समजून घेण्यासाठी हा सर्वोत्तम 'संदर्भ' देणारा उपाय ठरू शकत नाही.

आम्ही, प्रादेशिक पातळीवरील वर नमूद केलेली दर्शके पुढे सादर करीत आहोत. त्यामुळे आम्ही, आमच्या साधन वाटप सूत्रामध्ये याचा नंतर वापर केलेला आहे. **'दृष्टिकोन' या प्रकरणामध्ये आम्ही आधारभूत माहिती असलेला तपशील आणि परिगणना तसेच वजन जे वाटप सूत्रामध्ये आलेले आहे ते सादर करीत आहोत.** येथे आम्ही, प्रादेशिक विकास तुटीनुसार, सध्या आपण कोणत्या स्थितीत आहोत याच्या सोप्या दृश्यमान निरीक्षणासाठी स्तंभलेखनाच्या स्वरूपात 'दर्शके' (सर्वप्रथम असणाऱ्या तीन जिल्हयांपासूनचे अंतर) सादर करीत आहोत. विकास तफावती साठीच्या निरनिराळया दर्शकांकरिता तपशीलवार जिल्हानिहाय आधारभूत माहिती आणि तुटीचे प्रमाण जोडपत्र ३.२ ते जोडपत्र ३.७ मध्ये दर्शविली आहे. तसेच, कृपया आकृती ३.१ ते ३.७ व तत्सम तक्ते ३.६ ते ३.१२ देखील पहावेत. यावरून असे निदर्शनास येते की, मराठवाडा व विदर्भ हे मागास प्रदेश असल्याने उपेक्षित असल्याप्रमाणे त्यांच्या विकासातील तफावत सर्वसाधारणपणे सापेक्षतेने मोठी आहे. निव्वळ भौतिक निष्पत्ती दर्शकांबरोबरच आम्ही, वस्तुस्थिति दाखवून देताना सामाजिक क्षेत्र निष्पत्ती दर्शकांचादेखील विचार केलेला आहे.

प्रादेशिक समतोल विकासासाठी उच्चस्तरीय समिती

आकृती ३.१

मार्ग घनता (प्रति १०० चौ.कि.मी.) सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर



स्रोत: सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या आधारसामग्रीवरून समितीने तयार कलेले.

तक्ता ३.६

सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्ह्यांच्या सरासरीतील अंतर

(कि.मी.)

प्रदेश	(प्रति १०० चौ.कि.मी.)
१	२
विदर्भ	४९
मराठवाडा	२९
उर्वरित महाराष्ट्र	२३

स्रोत : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या आधारसामग्रीवरून समितीने तयार कलेले.

आकृती ३.२

रेल्वे घनता (प्रति १०० चौ.कि.मी.) सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर



स्रोत : मध्य रेल्वे, दक्षिण-पूर्व मध्य रेल्वे, कोकण रेल्वे व पश्चिम रेल्वे (समितीने तयार केलेले)

तक्ता ३.७
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर

(कि.मी.)

प्रदेश	(प्रति १०० चौ.कि.मी.)
१	२
विदर्भ	२.८२
मराठवाडा	३.३६
उर्वरित महाराष्ट्र	२.८०

स्रोत : मध्य रेल्वे, दक्षिण-पूर्व मध्य रेल्वे, कोकण रेल्वे व पश्चिम रेल्वे (समितीने तयार कलेले)

आकृती ३.३
एसएससी विद्यार्थ्यांची सरासरी (नोंदणीकृत)
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर



स्रोत : एमएसबीएसएचएसई आधारसामग्रीतून समितीने तयार केलेले

तक्ता ३.८
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्ह्यांच्या सरासरीतील अंतर

प्रदेश	एसएससी विद्यार्थ्यांची सरासरी (नोंदणीकृत)
१	२
विदर्भ	७८६५०
मराठवाडा	७९०४६
उर्वरित महाराष्ट्र	५४४०७

स्रोत : एमएसबीएसएचएसई आधारसामग्रीवरून समितीने तयार केलेले

आकृती ३.४
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील आयटीआय प्रवेश क्षमता सरासरीतील अंतर



स्रोत : व्यवसाय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन (समितीने तयार केलेली आकडेवारी)

तक्ता ३.९
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर

प्रदेश	सरासरी आयटीआय प्रवेश क्षमता
१	२
विदर्भ	५०७३
मराठवाडा	६०२७
उर्वरित महाराष्ट्र	३५७१

स्रोत : व्यवसाय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन (समितीने तयार केलेला तक्ता)

आकृती ३.५
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांचे सरासरीतील अंतर-कृषि व संलग्न कार्य पत प्रति हेक्टर



स्रोत : एसएलबीसी, महाराष्ट्र (समितीने तयार केलेली आकडेवारी)

तक्ता ३.१०
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर

प्रदेश	कृषि व संलग्न कार्य पत प्रति हेक्टर (रूपये)
१	२
विदर्भ	२३६८८
मराठवाडा	२४६६९
उर्वरित महाराष्ट्र	१७८४०

स्रोत : एसएलबीसी महाराष्ट्र (समितीने तयार केलेला तक्ता)

आकृती ३.६
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर
विजेचा दरडोई वापर (ताशी किलो वॅट)



स्रोत : एमएएच एडीआय एससीओएम लिमिटेड (समितीने तयार केलेली आकडेवारी)

तक्ता ३.११
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर

प्रदेश	विजेचा दरडोई वापर (ताशी किलो वॅट)
१	२
विदर्भ	८१५
मराठवाडा	९२१
उर्वरित महाराष्ट्र	४००

स्रोत : एमएमएचएडीआय एससीओएम लिमिटेड (समितीने तयार केलेला तक्ता)

आकृती ३.७
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर
जिल्हानिहाय व्यापक आरोग्य स्थिती



स्रोत : डीएलएचएस-३, डीएलएचएस-२, मृत्यूची कारणे सर्वेक्षण (ग्रामीण) २०११, सार्वजनिक आरोग्य विभाग मासिक प्रगती अहवाल मार्च, २०१२ राजमाता जिजाऊ माता बालक आरोग्य व पोषणाहार कार्यक्रम, यामधून प्राप्त झालेले (समितीने तयार केलेली आकडेवारी)

तक्ता ३.१२
सर्वप्रथम असणाऱ्या ३ जिल्हयांच्या सरासरीतील अंतर

प्रदेश	आरोग्य गुणसंख्या
१	२
विदर्भ	१२१.८
मराठवाडा	१०८.९
उर्वरित महाराष्ट्र	६९.३

स्रोत : डीएलएचएस-३, डीएलएचएस-२, मृत्यूची कारणे सर्वेक्षण (ग्रामीण) २०११, सार्वजनिक आरोग्य विभाग मासिक प्रगती अहवाल मार्च, २०१२, राजमाता जिजाऊ माता बालक आरोग्य व पोषणाहार कार्यक्रम, यामधून प्राप्त झालेले (समितीने तयार केलेली आकडेवारी)

३.२ तुलनात्मक दृष्टिकोनातून प्रदेशांचा सर्वसमावेशक आर्थिक विकास :

या पूर्वीच्या भागांमध्ये आम्ही, उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यांच्या लोकसंख्याशास्त्रीय स्थितीचे व भौतिक स्थितीचे वर्णन केले आहे. या तीनही प्रदेशांचा आर्थिक इतिहास फारच वेगळा आहे. काही मोजकी नागरी केंद्रे वगळता, यांच्या बऱ्याचशा भागामधील अर्थशास्त्रावर कृषिभूमीचे वर्चस्व आहे. तथापि, कृषिभूमिविषयक संबंधाचे स्वरूप, (म्हणजेच जमिनीची मालकी व कुळवहिवाट पध्दती) जमीन धारणेचा सरासरी आकार, पारंपरिक पिकपध्दती, या प्रत्येकातील कृषिभूमिविषयक उत्पादनाचा नागरी बाजारांतील प्रवेश आणि वाणिज्यिकरण हे फारच वेगळे होते. मुगल सत्तेचा अस्त आणि ब्रिटिशशासित अर्थव्यवस्थेचा उदय होत असताना, भारतातील व्यापाराच्या स्वरूपात बदल झालेला होता. त्यांच्या सापेक्ष प्रभावाने अगोदरच व्यापारी मार्गांचा ऱ्हास झाला. नवीन सैनिक छावण्या, बंदरे, आगमन होणारे औद्योगिक स्थाने यांनी प्रचंड महत्त्व प्राप्त झाले. नागपूर व अमरावती यांसारखी काही केंद्रे वगळता, विदर्भामध्ये अशी कोणतीही वर्चस्व असलेली वसाहत नाही. निाम राजवटीत मराठवाडा नेहमीच सापेक्षरीत्या मागासलेला व दुर्लक्षित प्रदेश होता. अशाप्रकारे, आधुनिक अर्थशास्त्राच्या नैसर्गिक वेगाबाबतची दूरदृष्टी ही मराठवाडा व विदर्भ दोन्हीमध्ये सापेक्षतेने दुर्बल होती. काही गिरण्या व पारंपरिक वस्त्रोद्योग आणि हस्तव्यवसाय वगळता, मराठवाडा व विदर्भात मोठया संख्येनी उद्योग नाही. या प्रदेशांचा असा अडथळा ओळखण्यात आला होता आणि

महाराष्ट्र शासनाने, मागास क्षेत्रांत पाच किंवा त्याहून अधिक वर्षांसाठी विक्री करातून सूट देणारी औद्योगिककरणाची योजना सुरु केली. त्या प्रदेशांचा औद्योगिक दर्जा उन्नत करण्यासाठी ही योजना फार प्रभावी ठरली नाही. आवश्यक त्या पायाभूत सोयींचा अभाव, अकुशल मनुष्यबळ, मागासलेपणात आधार देण्याचा आणि प्रगत औद्योगिक दुव्याचा अभाव आणि या प्रदेशांत व्यवसाय करण्याचा उपरोक्त अति प्रमाणातील खर्च या बाबी विक्रीकर आधारित प्रोत्साहनाला सहजपणे मागे टाकतील. तथापि, अशी प्रचंड प्रमाणातील खराब कामगिरी असताना देखील, औरंगाबाद व नागपूर ही अभिवृध्दीची संभाव्य क्षमता असलेली औद्योगिक केंद्रे म्हणून क्रमश: उदयास आली. ज्यावेळी मोठे अल्प विकसित क्षेत्र विकासाच्या प्रतिक्षेत आहे तेथील मोठ्या प्रमाणातील आवश्यकतांची तुलना करता, अद्यापही ही गती अतिशय मंद आहे व त्यावरील परिणामांचा प्रसार देखील अपुरा आहे.

पूर्वापार इतिहासाची खोलवर चौकशी करण्याची आमची इच्छा नाही. विशेषत:, जेथे राजकीय व ऐतिहासिक विकासांची बेसुमार वाढ होत आहे तेथे, प्रादेशिक तफावतीच्या शाश्वतेची भर घालण्यात आली आहे. या समितीसाठी क्रियान्वित अभ्यासात विविध बिगर अर्थशास्त्रीय पैलू आज नैसर्गिक स्थितीवर असल्याचे आढळून आले आहे. उदाहरणार्थ, राजकीय प्रतिनिधित्वाचे स्वरूप, राजकीय नेतृत्त्वाची ताकद व दुबळे राजकीय नेतृत्त्व आणि प्रादेशिक असमतोलाच्या विरोधातील राजकीय आवाज हा प्रादेशिक तफावतीचा महत्त्वाचा परिणाम आहे. अशा राजकीय व संस्थात्मक परिणामाने प्रादेशिक समतोल साध्य करण्याच्या व राखण्याच्या प्रक्रियेला बाधा आणली आहे, हे आम्ही मान्य करतो. या मूलतत्त्वांचे महत्व आम्ही मान्य करतो. समितीने नियमनावर एक स्वतंत्र प्रकरण करण्याचे ठरविले आहे. ज्यामुळे या संबंधित प्रश्नांना आर्थिक धोरण व कार्यतंत्र याचा संयोग करून त्याचा सामना करता येईल. संभाव्य विपर्यासकारी राजकीय प्रभावावर मात करण्यासाठी वरवर चांगली दिसणारी संस्थात्मक व राजकीय व्यवस्था आम्ही सुचवित आहोत.

महाराष्ट्राच्या एकूण अर्थव्यवस्थेतील प्रत्येक प्रदेशाच्या अंशदानाचे निर्धारण करण्यास आम्ही प्रथम सुरुवात करतो हे आम्ही दोन उप-कालावधीच्या (नंतर स्पष्टीकरण केल्याप्रमाणे) पहिल्या पाहणीत आणि नंतर २००१-२०१० या कालावधीची पाहणी करून केले आहे.

आता हे चांगल्या रीतीने स्वीकारलेले आहे की, महाराष्ट्राच्या वृद्धीची दोन विभेदक वैशिष्टये आहेत. म्हणजेच, त्यांचे प्रादेशिकरीत्या समसमान नसलेल्या वाढीचे स्वरूप आणि त्यांचे मुंबईच्या कामगिरीवरील मोठया प्रमाणात अवलंबून राहणे. प्रादेशिक विविधतेचे तीन स्तरांवर विश्लेषण केले जाऊ शकते. म्हणजे, प्रादेशिक स्तर (म्हणजे विकास मंडळांचे अधिकारिता क्षेत्र) किंवा सहा प्रशासकीय विभागांचा स्तर किंवा जिल्हा स्तर (संख्या ३५).

सुरूवातीस प्रादेशिक व विभागीय स्तरावर त्यांच्या वाढीच्या स्वरूपात अस्तित्वात असणारी व्यापक विसंगती व भिन्नता यांकडे लक्ष वेधण्यावर आम्ही स्वत: वर काही मर्यादा घातल्या आहेत. मुंबईचे प्रामुख्य अधोरेखित करण्यासाठी आणि तसेच उर्वरित मुंबईच्या कामगिरीची स्थिती स्पष्ट करण्यासाठी आम्ही मुंबई वगळून कोकणचा विचार देखील केला. ज्यामध्ये राज्य विभागलेले आहे अशा सहा प्रशासकीय विभागांमधून (एक)१९९३-९४ ते १९९९-२००० आणि (दोन) २०००-०१ ते २००९-१० या दोन उप-कालावधीमधील ९३-९४ पासूनच्या आकडेवारीचा विचार केला आहे.

दुसऱ्या उप-कालावधीमध्ये, राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीएसडीपी) (तक्ता ३.१३) च्या सुमारे ४० टक्के इतके अंशदान एकटया कोकण विभागाचे असल्याचे दिसून येते. तथापि, मुंबई वगळता या विभागाचा हिस्सा १८ टक्क्यांने खाली गेला. अशाप्रकारे, मुंबईचे प्रामुख्य निर्विवाद आहे. तथापि, मुंबई वगळता कोकणाची प्रगती कशी होईल हे शोधून काढणे का महत्त्वाचे आहे आणि हेही तितकेच खरे आहे की, जिल्हा/ विभागाच्या वाईट कामगिरीहूनही मुंबईशिवाय कोकणाची कामगिरी वाईट आहे किंवा कसे. स्थूल राज्य देशांतर्गत उत्पन्नामध्ये (जीएसडीपी) सगळयात कमी अंशदान अमरावती विभागाकडून होते.दोन उप-कालावधींमधील विभागामधून केलेली तुलना असे दर्शविते की, जरी नागपूर विभागासाठीच्या निदर्शनास येणारी कमाल घट, तीन मागास विभागांच्या म्हणजे औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांच्या अंशदानात घट दिसून येत असली तरी, तीन प्रगत विभागांच्या म्हणजे कोकण, नाशिक व पुणे यांच्या अंशदानात दुसऱ्या उप-कालावधीमध्ये थोडीशी वाढ दिसून येते.

प्रदेशनिहाय तफावत अधिक स्पष्टपणे दिसून येत आहे. उर्वरित महाराष्ट्राचे पहिल्या उप-कालावधीमध्ये एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीडीडीपी) जास्तीत जास्त ७१ टक्के इतके अंशदान दिलेले असून दुसऱ्या उप-कालावधीमध्ये आणखी ७४ टक्के इतकी वाढविल्याचे दिसून येते. त्याचवेळी, मराठवाडा व विदर्भ यांनी एकत्रितपणे पहिल्या उप-कालावधीमध्ये २९ टक्के इतके अंशदान दिले असून दुसऱ्या उप-कालावधीमध्ये २६ टक्क्यांनी ते खाली आल्याचे दिसून येते. ***अशाप्रकारे प्रथम दर्शनीच, दुसऱ्या उप-कालावधीमध्ये विभागांमध्ये प्रादेशिक तफावत अधिकच वाईट असल्याचे दिसून येते.***

तक्ता ३.१३

राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील विभागनिहाय अंशदान (%)

विभाग	१९९३-९४ ते १९९९-२०००	२०००-०१ ते २० ०९-१०
१	२	३
कोकण	३८.३	३९.५
नाशिक	११.७	१२.५
पुणे	२०.८	२२.०
औरंगाबाद	१०.९	१०.१
अमरावती	७.२	६.३
नागपूर	११.०	९.७
कोकण मुंबई वगळून (केईएम)	१७.६	१७.८
मुंबई	२०.७	२१.७
प्रदेशनिहाय		
उर्वरित महाराष्ट्र	७०.९	७४.०
मराठवाडा	१०.९	१०.१
विदर्भ	१८.२	१६.०

स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीइएस) आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना

आकृती ३.८

राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील विभागनिहाय अंशदान (%)



स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीइएएस) आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना

हे अंशदान चौकटीत मांडण्यासाठी आम्ही विभागातील लोकसंख्येच्या प्रमाणातील तुलनात्मक स्थिती देखील सादर करीत आहोत आणि त्याच्या राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) अंशदानासह त्यांचे वाचन करा. (अनुक्रमे

तक्ता ३.१४ व ३.१३) अमरावती विभागात सुमारे १० टक्के लोकसंख्या आहे, परंतु त्याचे अंशदान १० टक्क्यांपेक्षा बरेच खाली आहे. (९० च्या अर्ध्या दशकानंतर ७.२% व २०००-०१ च्या दशकात ६.३%) त्याचप्रमाणे, औरंगाबाद विभागाचे राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) अंशदान त्याच्या लोकसंख्येतील हिश्श्या (वाट्या) पेक्षा कमी आहे. (लोकसंख्येच्या १५.९% व राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) अंशदान १०.१% इतके आहे.) नागपूर व पुणे विभागाचा लोकसंख्येतील आणि राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) त्यांचा अंशदानाचा हिस्सा सममूल्याने कमी किंवा अधिक आहे. (नागपूर विभागाची लोकसंख्या सुमारे ११ टक्के इतकी आहे) व त्याचे राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) अंशदान १० टक्क्यांपेक्षा अगदी खाली आहे. त्याचप्रमाणे, पुणे विभागाची लोकसंख्या २०.६ टक्के इतकी आहे आणि त्याचा राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) हिस्सा सुमारे २२ टक्के इतका आहे. दुसऱ्या बाजूला कोकण विभागाचे राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) अंशदान मुंबई वगळून देखील लोकसंख्येतील त्याच्या हिश्श्यापेक्षा अधिक आहे. त्यांचा लोकसंख्येतील हिस्सा १३.४ टक्के इतका आहे. त्यावेळी राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) हिस्सा १७.८ टक्के इतका आहे. मुंबईत स्पष्टपणे अतिशय मोठया प्रमाणात उत्पादकता आहे. लोकसंख्येमधील त्याचा हिस्सा केवळ १२.८ टक्के इतका आहे. परंतु राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) त्याचे अंशदान २१.७ टक्के एवढे आहे. यावरून असे नमूद करता येईल की, ***औरंगाबाद व अमरावती विभागामध्ये उत्पादकता ही कमी असून तेथे राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) अंशदान लोकसंख्येतील हिश्श्यापेक्षा कमी आहे.***

प्रदेशनिहाय आम्हाला असे दिसून आले आहे की, लोकसंख्येमधील उर्वरित महाराष्ट्राचा हिस्सा राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) त्याच्या अंशदानापेक्षा कमी आहे. आमच्या विभागनिहाय विश्लेषणानुसार आम्हाला अशी जाणीव झाली आहे की, प्रथमत: ही स्थिती मुंबई वगळून मुंबई व कोकण यांच्यामुळे आहे. मराठवाडा व विदर्भामध्ये आम्हाला असे आढळून आले आहे की, लोकसंख्येमधील त्याचा हिस्सा राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (जीएसडीपी) त्याच्या अंशदानापेक्षा बहुतकरून ५ टक्के बिंदूनी वाढला आहे.

आम्ही तयार केलेला तक्ता ३.१४ मधून आम्ही काढलेला अन्य निष्कर्ष असा आहे की, मुंबई वगळून कोकणच्या लोकसंख्येचा हिस्सा आपल्या उप-कालावधीमध्ये उंचावला आहे. ***बाह्य स्थलांतरासाठी कोकण प्रसिध्द होते या संकेताप्रमाणे, यात घट झाली असल्याचे दिसून आले आहे. हे लक्ष वेधक आहे.***

तक्ता ३.१४

लोकसंख्येतील विभागनिहाय हिस्सा (वाटा) (%)

विभाग	१९९३-९४ ते १९ ९९-२०००	२०००-०१ ते २००९-१०
१	२	३
कोकण	२४.७	२६.२
नाशिक	१६.४	१६.१
पुणे	२०.८	२०.६
औरंगाबाद	१६.२	१५.९
अमरावती	१०.५	१०.२
नागपूर	११.३	११.०
मुंबई	१२.५	१२.८
कोकण मुंबई वगळून (केईएम)	१२.२	१३.४
प्रदेशनिहाय		
उर्वरित महाराष्ट्र	६१.९	६२.९
मराठवाडा	१६.२	१५.९
विदर्भ	२१.९	२१.१

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीइएस) आकडेवारीवरून तयार केले.

आकृती ३.९
लोकसंख्येमधील हिस्सा (%)



स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीइएएस) आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना

एकूण राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीएसडीपी) वास्तव वाढीच्या दराच्या संबंधात (२००४-०५ च्या किंमती) आम्हाला असे दिसून आले आहे की, दुसऱ्या उप-कालावधीमध्ये सर्व विभागांची वाढ उंचावली आहे. या आधीच उच्च वाढीचा दर असलेल्या केवळ पुणे विभागाने दरवाढ टिकवून ठेवली. *आम्ही पुन्हा एकदा असे दर्शवितो की, ज्या विभागाने एकूण राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादना (जीएसडीपी) मध्ये मोठया प्रमाणात अंशदान दिले आहे. मूळ परिणाम असून देखील मागास विभागांपेक्षा उच्च दराने वाढ (विकास) केली आहे.*

तसेच आम्ही दर्शवितो की, *मुंबई वगळून कोकणाचा (केईएम) वाढीचा दर, दुसऱ्या उप-कालावधीमध्ये उल्लेखनीय सुधारणा दर्शवितो.* अशाप्रकारे, केवळ मुंबईमुळे कोकणची कामगिरी अधिक चांगली झाल्याचे दिसून आले आहे. हे पारंपरिक विचारधारेच्या विरोधी आहे. (तक्ता ३.१५)

तक्ता ३.१५
एकूण राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा विभागनिहाय वाढीचा दर (२००४-०५ च्या किंमती) (%)

विभाग	१९९३-९४ ते १९ ९९-२०००	२०००-०१ ते २००९-१०
१	२	३
कोकण	५.८९	८.६७
नाशिक	७.०४	८.५१
पुणे	८.२३	८.२४
औरंगाबाद	५.२०	७.१९
अमरावती	४.६०	६.३५
नागपूर	४.९९	७.३०
महाराष्ट्र	**६.१२**	**८.१०**
मुंबई *	**६.६०**	**८.७९**
कोकण मुंबई वगळून (केईएम)	**५.१५**	**८.५५**
प्रदेशनिहाय		
उर्वरित महाराष्ट्र	६.६७	८.५०
मराठवाडा	५.२०	७.१९
विदर्भ	४.७०	६.९१

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीइएस) आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना

आकृती ३.१०

एकूण राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) वाढीचा दर (२००४-०५ च्या किंमती) (%)



स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीइएएस) आधारित असलेली समितीची परिगणना

पूर्णपणे खुली अर्थव्यवस्था असलेल्या व लोकांचे स्थलांतर (परिचालन) ही एक सामान्य घटना असलेल्या संबंधित जिल्हयांनी विभागनिहाय दरडोई उत्पन्नाकडे लक्ष दिल्यास विद्यमान प्रादेशिक तफावत आणखी सूक्ष्म दृष्टीने समजून घेता येईल. *आम्हाला असे आढळून आले आहे की, विभागांमधील वास्तविक दरडोई उत्पन्नामधील तफावत दोन्ही उप-कालावधींसाठी (तक्ता ३.१६) खाली दिलेल्या तफावतीच्या गुणांकातून (सी.व्ही.) उघड झाल्याप्रमाणे दुसऱ्या उप-कालावधीमध्ये सीमांतिक वाढ झाली असल्याचे देखील दिसून येते.* किमान वास्तव दरडोई उत्पन्नाशी केलेल्या कमाल वास्तविक दरडोई उत्पन्नाच्या तुलनेतून असे दिसून येते की, येथे देखील सीमांतिक वाढ झाली आहे. (अनुक्रमे दोन उप-कालावधीमध्ये २.३ ते २.५ पर्यंत).

प्रदेशनिहाय प्रदेशांची सापेक्ष स्थिती उर्वरित महाराष्ट्र शिखर (उच्च) स्थानावर तर मराठवाडा तळ (निम्न) स्थानावर यासह दोन्ही उप-कालावधीमध्ये सारखीच राहिलेली आहे. तथापि, कमाल/किमान गुणोत्तर १.७ पासून १.९ पर्यंत सीमांतिक वाढ दर्शविते.

तक्ता ३.१६

वास्तव दरडोई उत्पन्न (२००४-०५ च्या किंमती) (रुपये)

विभाग	१९९३-९४ ते १९९९-२०००*	२०००-०१ ते २००९-१०*
१	२	३
कोकण	४९९२६	६९१८७
नाशिक	२२४५३	३५०६९
पुणे	३०७०९	४८४१४
औरंगाबाद	२०९०६	२८४४२
अमरावती	२१७९७	२८०३१
नागपूर	३०९१८	४०१७०
महाराष्ट्र	**३१५९४**	**४५५८१**

विभाग	१९९३-९४ ते १९९९-२००० *	२०००-०१ ते २००९-१० *
१	२	३
मुंबई	५२६५१	७८०४७
कोकण वगळून मुंबई	४७२२२	६०६७७
प्रमाण विचलन (एसटीडीइव्ही)	१०९८६.७७	१५५५२.६
एम इ ए एन	२९४५१	४१५५२
भिन्नता सहगुणांक (सी.व्ही)	३७.३०	३७.४३
कमाल/किमान	२.३	२.५
प्रदेश निहाय		
उर्वरित महाराष्ट्र	३६१९३	५३६८४
मराठवाडा	२०९०६	२८४४२
विदर्भ	२६५२५	३४३४१
कमाल/किमान	१.७	१.९

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीईएस) आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना. * कालावधीची वार्षिक सरासरी.

आकृती ३.११

दरडोई एकूण राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) (२००४-०५ च्या किंमती)



स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या (डीईएएस) आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना

अशाप्रकारे विभागीय /प्रादेशिक स्तरावरील आमच्या विश्लेषणातून आम्हाला असा निष्कर्ष काढणे भाग पडते की, *विभागांच्या आणि प्रदेशांच्या सापेक्ष स्थितीत कोणताही महत्त्वपूर्ण फेरबदल झाल्याचे अनुभवास आलेले नाही. परंतु, प्रादेशिक तफावत वाढल्याचे दिसून येते आणि चांगली कामगिरी करणाऱ्या विभागांनी /प्रदेशांनी चांगली कामगिरी केलेली असून देखील आणि मागे पडलेले विभाग /प्रदेश अधिकच घसरत गेलेले असूनदेखील विशेषकरून कालावधीच्या शेवटी त्यातील अंतर वाढतच आहे.*

प्रदेशांमधील लोकसंख्येतील वाढीच्या विभिन्न दरांची आपण, प्रदेशांमधील दरडोई उत्पन्नाच्या वाढीच्या दरांशी तुलना करू शकतो. तक्ता ३.१७ मध्ये आम्ही दरडोई उत्पन्नाच्या पातळया उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भाची सापेक्ष स्थिती आणि दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर सादर केला आहे.

तक्ता ३.१७
प्रदेशांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना : (चालू किंमतीनुसार एकूण जिल्हा देशांतर्गत दरडोई उत्पन्न (जीडीडीपीसीआय) (२०१०-११) (रुपये)

प्रदेश	एकूण जिल्हा देशांतर्गत दरडोई उत्पन्न (जीडीडीपीसीआय)
१	२
उर्वरित महाराष्ट्र *	११०५३१
मराठवाडा	६४३३०
विदर्भ	७७३८२
मुंबई	२०७२११
महाराष्ट्र	१०६७४६

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवर आधारित असलेली समितीची परिगणना *मुंबई वगळून.

तक्ता ३.१८
प्रदेशांचे दरडोई उत्पन्न (२००४-०५ च्या स्थिर किंमतीनुसार) (रुपये) (२०११ च्या जनगणनेवर आधारित असलेली नवीन मालिका)

अ.क्र.	प्रदेश	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	उर्वरित महाराष्ट्र*	२३४५२	२४७७१	२६६५२	२९४९३	३२७०४	३७४९१	४२८४६	५०४४७	६१७०८	६८८१८
२	मराठवाडा	१५५९५	१५४९१	१६११८	१७४०९	१८४२९	१९९३७	२४०४८	२७५५२	३३६८९	४०८२४
३	विदर्भ	१९३३६	१९१४०	२०९१३	२२२५४	२४६७३	२५७४७	३०७११	३५१३४	४२०९३	५२२८२
	महाराष्ट्र	२२८०३	२३०७२	२४३७०	२६२२०	२९०१५	३२१७४	३६८८४	४२१५१	४९६३०	६०७०८

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केली. *मुंबई वगळून

टीप : हे अंदाज, सन २०११ च्या अंतिम आकडेवारीवर आधारित आहेत. म्हणून, अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीपेक्षा त्यात काही फरक आहेत.

तक्ता ३.१९
उर्वरित महाराष्ट्राशी मराठवाडा व विदर्भाच्या दरडोई उत्पन्नाचे गुणोत्तर

अ.क्र.	प्रदेश	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	उर्वरीत महाराष्ट्र *	१	१	१	१	१	१	१	१	१	१
२	मराठवाडा	०.६६	०.६३	०.६०	०.५९	०.५६	०.५३	०.५६	०.५५	०.५५	०.५९
३	विदर्भ	०.८२	०.७७	०.७८	०.७५	०.७५	०.६९	०.७२	०.७०	०.६८	०.७६

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केली. *मुंबई वगळून

तक्ता ३.२०
प्रदेशांच्या दरडोई उत्पन्नातील वाढीचे दर (%)

अ.क्र.	प्रदेश	दरडोई उत्पन्न वाढीचा दर (संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर)
१	२	३
१	उर्वरित महाराष्ट्र *	१३.२५
२	मराठवाडा	११.४१
३	विदर्भ	११.५७
	महाराष्ट्र (मुंबई वगळून)	११.५५

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केली. *मुंबई वगळून (तक्ता ३.१८ मधील आकडेवारीवर आधारित)

वरील तक्त्यांवरून असे दिसून येईल की, मराठवाड्याचे दरडोई उत्पन्न, उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या ६० टक्के

(म्हणजे, ३/५) इतके उत्तम आहे आणि मराठवाड्याच्या दरडोई उत्पन्न वाढीचा दर, प्रतिवर्षी ११.४१ टक्के इतका आहे. त्याचप्रमाणे, विदर्भाचे दरडोई उत्पन्न उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या अंदाजे ७५ टक्के इतके (म्हणजे, ३/४) इतके आहे आणि ते प्रतिवर्षी ११.५७ या दराने वाढत आहे. जर मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्राच्या बरोबरीने आला आणि सन २०२५-२६ पर्यंत, उर्वरित महाराष्ट्राच्या ७५ टक्के इतक्या पातळीपर्यंत आला तर, त्याचे प्रतिवर्षी दरडोई उत्पन्न १५ टक्के इतक्या दराने वाढले पाहिजे. त्याचप्रमाणे, जर सन २०२५ पर्यंत, विदर्भाचे दरडोई उत्पन्न, उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या किमान ८५ टक्के इतके वाढवावयाचे असेल तर, ते, प्रतिवर्षी १४.२६ टक्के या दराने वाढले पाहिजे. या अंदाजावरून असे गृहीत धरता येते की, उर्वरित महाराष्ट्राच्या वाढीचा हा दर आज आहे इतकाच म्हणजेच, प्रतिवर्षी १३.२५ टक्के इतका राहतो. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगावयाचे झाल्यास, या दोन प्रदेशांच्या या वाढीच्या दरांमध्ये पायाभूत सुविधा व सेवाक्षेत्र यांमधील वाढीवर आधारित असलेल्या आणि कृषि, उद्योग गतीशील तुलनात्मक, फायद्याचे बळकटीकरण याद्वारे मोठी धडक देवून महत्त्वपूर्ण मजल गाठली पाहिजे.

हे वाढीचे अपेक्षित दर अगदीच अशक्य आहेत काय ? शक्यतेच्या आवाक्याबाहेर आहेत? अलिकडील काळामध्ये मागे असणाऱ्या अनेक 'राज्यांना' सुपूर्दगी व नियमन (शासन) यांमध्ये सुधारणा करून त्याद्वारे परिपुष्ट केलेल्या निवडक बाबींवर लक्ष केंद्रित केलेली 'वाढ' करून त्याद्वारे अशा वाढीच्या दरांच्या पातळ्या साध्य करणे (गाठणे) शक्य झाले आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे (तक्ता ३.२१ पहा). त्या प्रदेशांनी याआधी साध्य केलेल्या वाढीच्या दराचे चित्र फारसे चांगले नाही. जर मोठी धडक मारून व शासनामध्ये सुधारणा करून त्याद्वारे उचित सहाय्य केले तर, त्यांनी उच्च दर्जाच्या कामगिरीचा विश्वास दाखविणे त्यांच्याकरिता अजूनही खूप मोठे आहे.

तक्ता ३.२१

एकूण राज्यांतर्गत उत्पन्नाचा व वाढीचा दर (रुपये कोटीत)

अ.क्र.	राज्ये	सन २००९-१० मधील किंमत	सन २०१०-११ मधील किंमत	सन २०११-१२ मधील किंमत	वाढीचा दर २००९-१० ते २०१०-११	वाढीचा दर २०१०-११ते२०११-१२
१	२	३	४	५	६	७
१	बिहार	१७७५३७	२१७८१४	२६२२३०	२२.७%	२०.४%
२	ओरिसा	१६३७२७	१९५०२८	२२६२३६	१९.१%	१६.०%
३	राजस्थान	२५५२९५	३०३३५८		१८.८%	
४	उत्तरप्रदेश	५२१९३०	५९५०५५	६७८०८३	१४.०%	१४.०%
५	छत्तिसगड	९९२६२	११७५६७	१३५५३६	१८.४%	१५.२%
६	झारखंड	९६३२७	१०६६९६	११९३८६	१०.८%	११.९%

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केली.

साधने आणि प्रादेशिक असमतोलाची कारणे ही क्षेत्रांमध्ये वेगवेगळी आहेत. सर्वसाधारणपणे, विविध साधनसंपत्तीची म्हणजे, तथाकथित 'बाह्य अर्थव्यवस्थेची' मागणी निर्माण करतो आणि पुरवठ्याची हमी देतो, असा 'मूळ उद्योग' बंद झाल्यामुळे त्यातून उत्पन्न होणारे लाभ प्राप्त करण्यासाठी सर्व आर्थिक कार्यांचा नागरी समूहाकडे अंगभूत कल आहे. अन्य नागरी समूह व स्थान आधारित विशेषत: निर्माण करण्यासह सहस्थानास प्रोत्साहन देणे, विवक्षित प्रादेशिक असमतोल निर्माण करण्याची ही प्रवृत्ती आहे. वाढीच्या उच्च टप्प्यामध्ये, हा कल, अधिक अभिभूत होत आहे. व त्यामुळे प्रादेशिक असमतोल, अधिक बिघडण्याचा संभव आहे. जर परिवहन सुविधा आणि संपर्क जाळे निकृष्ट असतील तर, प्रादेशिक असमतोल आणखी बिघडेल. उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यांमधील असमतोल वाढीचे स्वरूप हे, या प्रक्रियेचे परिणाम आहे. याकरिता असलेल्या एका सर्वात प्रभावी धोरणात्मक साधनामुळे संपर्क जाळ्यांमधील अडथळे दूर होतील. यामुळे, विद्यमान क्षमतेच्या संधींचे व आकाराचे नवीन प्रमाण (परिमाण) खुले होईल. तसेच, मागे पडणाऱ्या प्रदेशांमध्ये नवीन चेतना देखील निर्माण होईल. अशाप्रकारे, जे उच्चत्तर वाढीचा मार्ग / विक्षेप मार्ग शोधण्याच्या या प्रक्रियेला गती देतील अशी क्षेत्रे व कार्ये निश्चित करणे महत्त्वाचे आहे. संपर्क जाळ्यामध्ये सुधारणा करण्याचा उद्देश असलेल्या मोठ्या प्रकल्पांना चालना देण्याशिवाय एका बाजूला

अधिक चांगली क्षमता असल्याचे उघड झालेली क्षेत्रे आणि दुसऱ्या बाजूला विद्यमान मोठ्या क्षेत्रांच्या कुंठीत क्षमतेचा कायाकल्प घडवून आणणारी क्षेत्रेही, प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे निर्णायक घटक आहेत.

सार्वजनिक मालाचे समानीकरण आणि संपर्क जाळ्यांच्या पायाभूत सुविधांमधील सुधारणा यांमुळे महत्त्वपूर्ण बाह्यपणा निर्माण होईल, जो त्यानंतर मागे असणाऱ्या प्रदेशांच्या बंद झालेल्या विकास क्षमतेस चालना देईल. मागील दशकामध्ये केलेली घोषणा सध्याच्या परिस्थितीत, मागे घेण्याची आवश्यकता आहे. मागील दशकामध्ये गमावलेल्या वाढीच्या एककेंद्राभिमुखतेचा आकृतीबंध पुन:स्थापित केला पाहिजे. अशी पिछेहाट, विदर्भाच्याबाबतीत खूप लवचिक आहे. आमचे विश्लेषण असे सूचविते की, विदर्भ व मराठवाडा प्रदेशांमधील वाढीचा प्रसार दोन्ही बाजूच्या कार्यतंत्रात असला पाहिजे. मुख्य पिकांसाठी आश्वासित संरक्षण सिंचन आणि नवीन वैविध्यपूर्ण शेतीच्या नवीन तंत्रज्ञानाचे प्रचालन (पीक पध्दतीतील बदल, उत्तम सूक्ष्म हवामान व्यवस्थापन यांसह) याद्वारे कृषि वाढ स्थिर ठेवल्यामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या शेतीत पुन्हा चैतन्य निर्माण होईल. दुसऱ्या बाजूला, रस्ते, बंदर जोडण्या, रेल्वे यांसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्ये, महत्त्वपूर्णरीत्या व लक्षणीयरीत्या प्रादेशिक वाढ करण्याची, विकासाचा प्रसार करण्याची क्षमता असेल.

३.२.१. विषमता (गिनी) :

आम्ही प्रदेशांच्या बाहेरील तसेच या प्रदेशांमधील विषमतेची व्याप्ती मोजू शकलो. गिनी सहगुणकाच्या परिभाषेत मोजलेली विषमता तक्ता: ३.२२ मध्ये दर्शविलेली आहे. गिनी सहगुणकाच्या अंदाजावरून असे उघड होते की, सर्व प्रदेशांमध्ये विषमतेत किंचितशी वाढ झाली आहे. प्रदेशांमधील तसेच त्यांच्या स्वत:मधील विषमता अत्यंत वाईट आहे. साहित्यात तसेच व्यवहारामध्ये हे चांगले ठाऊक आहे की, वाढीमुळे सुरुवातीला विषमता वाढते. तथापि, अंतर्गत जाणीवेने काळजीयुक्त वैशिष्ट्यांना सामोरे जाणाऱ्या मराठवाड्याच्या जिल्हयांमध्ये, विषमतेचे दुखणे अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे, दरडोई उत्पन्न व गिनी सहगुणक याद्वारे मोजल्याप्रमाणे, प्रदेशांमधील विषमता कमी करण्याची गरज आहे. प्रदेशांमधील विषमतेची व्याप्ती, असाधारणपणे अधिक नाही याचे कोणालाही आकलन झाले पाहिजे. उदा. भारताच्या राज्यांमधील विषमतेचे गिनी मापन ०.२८ असून जे येथे नमूद केलेल्या मापनापेक्षा खूप मोठे आहे. उच्च दरडोई उत्पन्नाचे गुणोत्तर प्रमाण २.५ इतके निम्नतम असून राज्यांमधील (बिहार व गोवा) ८.४ इतक्या तत्सम गुणोत्तर प्रमाणाच्या बरचसे खाली आहे. विषमतेची ही सापेक्ष निम्न पातळी कोणालाही त्याबद्दल आशा बाळगता येऊ शकेल अशा एककेंद्राभिमुखतेच्या क्षमता आधाराचे अंशत: चिन्ह आहे.

तक्ता ३.२२

२००४-०५ च्या स्थिर किंमतीनुसार (जीडीडीपीपीसी) चा वापर करणारे प्रदेशनिहाय गिनी सहगुणांक

प्रदेश	२००१-०२	२००४-०५	२००९-१०
१	२	३	४
उर्वरित महाराष्ट्र	०.१६८८	०.१७१२	०.१७३७
मराठवाडा	०.०८३७	०.१०१६	०.१११४
विदर्भ	०.१३५५	०.१५१९	०.१५६७
महाराष्ट्र	०.१८१२	०.१९०४	०.२०४३

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

टीप : गिनी सहगुणक शून्य (०) आणि एक (१) मध्ये फरक करतो. गिनी सहगुणक शून्याच्या जवळ आहे म्हणजे, अधिक समानता आहे आणि एकाच्या जवळ आहे म्हणजे पराकोटीची विषमता आहे.

३.३ आर्थिक विकास : क्षेत्रे

आम्ही, आमचे पुढील लक्ष, विभागवार क्षेत्रीय अंशदानाकडे वळवीत आहोत. प्राथमिक क्षेत्रातील राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीएसडीपी) कोकणचे अंशदान, पहिल्या उप-कालावधीत विभागांमध्ये सर्वात कमी आहे, आणि दुसऱ्या उप-

कालावधीत यामध्ये आणखी घट झाली आहे. प्राथमिक क्षेत्रातील राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये कोकणचे कमी (निम्न) अंशदान हे, कोकण हवामानदृष्ट्या शेतीसाठी योग्य नसल्याने ते अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. दुसऱ्या उप-कालावधीमध्ये कोकणाचा हिस्सा (वाटा) आणखी खाली आला असल्याचे निदर्शनास येते. मागे असणाऱ्या विभागांमध्ये औरंगाबाद विभागाने, दुसऱ्या उप-कालावधीमधील त्याच्या अंशदानामध्ये काहीशी सुधारणा केली असल्याचे दिसून येते, त्याचवेळी अमरावती व नागपूर विभागामध्ये तीव्र घट झाली असल्याचे दिसून येते. तक्ता ३.२३ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे, ज्या विभागांमध्ये कार्यशक्ती मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे अशा विभागांसाठी हे चांगले भाकित नाही. (एकतर शेतमजूर आणि शेतकरी (लागवडदार) म्हणून असलेल्या कार्यशक्तीच्या ७५% कार्यशक्ती अमरावतीमध्ये व ६०% कार्यशक्ती नागपूरमध्ये आहे.)

तक्ता ३.२३
प्राथमिक क्षेत्रांचे विभागवार अंशदान (%)

विभाग	१९९३-९४ ते १९ ९९-२०००	२०००-०१ ते २००९-१०
१	२	३
कोकण	११.६	१०.८
नाशिक	१७.७	२०.६
पुणे	२२.६	२२.७
औरंगाबाद	१६.१	१८.५
अमरावती	१४.३	१३.६
नागपूर	१७.७	१३.८
मुंबई	२.४	२.२
कोकण वगळून मुंबई (केईएम)	९.३	८.६
प्रदेशनिहाय		
उर्वरित महाराष्ट्र	५१.९	५४.१
मराठवाडा	१६.१	१८.५
विदर्भ	३२.०	२७.४

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडील आकडेवारीवरून समितीने तयार केला.

आकृती ३.१२



स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

प्राथमिक क्षेत्रांच्या देशांतर्गत राज्य उत्पादनाची (एसडीपी) विभागवार टक्केवारी

तक्ता ३.२४
शेतीवर अवलंबून असलेली कार्यशक्ती

विभाग		लागवडदार/ एकूण कामगार	शेतमजूर/ एकूण कामगार	शेतीवर अवलंबून असलेले एकूण कार्यशक्ती/एकूण कामगार
१	२	३	४	५=(३+४)
कोकण	उर्वरित महाराष्ट्र	१८.९०	१०.२६	२९.१६
नाशिक	उर्वरित महाराष्ट्र	३६.०२	३०.६९	६६.७२
पुणे	उर्वरित महाराष्ट्र	३५.७३	१९.९६	५५.६९
औरंगाबाद	मराठवाडा	३९.२३	३४.६०	७३.८३
अमरावती	विदर्भ	२६.२४	४९.२७	७५.५१
नागपूर	विदर्भ	२४.६२	३४.९१	५९.५३

स्रोत : जनगणना, २०११
दोन्ही प्रवर्गांमध्ये, मुख्य व सीमांतिक अशा दोन्ही प्रवर्गांचा समावेश आहे.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या कार्यशक्तीचा मोठा हिस्सा, म्हणजेच, ६० टक्के इतका (तक्ता ३.२४) असल्याखेरीज नागपूर विभागाचे एकूण सिंचन क्षेत्र, एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राच्या टक्केवारीच्या २५% पेक्षा अधिक असून, जो पुणे विभागानंतर राज्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे याची नोंद घेणे लक्षवेधक ठरेल (तक्ता ३.२५). जेव्हा आम्ही याची प्राथमिक क्षेत्रातील राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील नागपूर विभागाचे अंशदान १७.७% वरून १३.८% पर्यंत खाली आले आहे या वस्तुस्थितीशी तुलना करतो तेव्हा, (तक्ता ३.२३) ***खासकरून कृषि आघाडीवर, नागपूर विभागाची कामगिरी निकृष्ट असल्याचे हे संकेत आहेत.***

प्रदेशनिहाय विचार करता आपल्याला असे दिसून येते की, उर्वरित महाराष्ट्राच्या एकूण सिंचन क्षेत्राची टक्केवारी, एकूण पेरणी केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक आहे आणि विदर्भाची, १२.८% इतकी कमी आहे. तथापि, असे प्रदेशनिहाय विश्लेषण, हे, अमरावती (५.९%) व नागपूर (२५.७%) यांमधील तीव्र तफावत उघड करीत आहे, याची नोंद घेणे देखील महत्त्वाचे आहे.

तक्ता ३.२५
एकूण सिंचन क्षेत्राची एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राशी असलेली टक्केवारी (२००८–०९)

१	२
औरंगाबाद	१४.०८
कोकण	८.०९
नाशिक	१८.१५
पुणे	२७.०२
अमरावती	५.९०
नागपूर	२५.६७
प्रदेशनिहाय	
उर्वरित महाराष्ट्र	२०.५६
मराठवाडा	१४.०८
विदर्भ	१२.८२

स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केला.

नाबार्डकडून जिल्हानिहाय कृषि विकास निर्देशांकाची गणना करण्यात आली आहे. http://12thplan.gov.in/12fyp_mgr/suggestions/docs/9_District%20Agriculture%20Development%20Index.pdf. नाबार्डने सादर केल्याप्रमाणे कृषि विकासाचा तुलनात्मक टप्पा पुढील नकाशामध्ये दर्शविण्यात आला आहे. (आकृती ३.१३)

आकृती ३.१३
कृषि विकासाची तुलनात्मक स्थिती



स्रोत: जिल्हा कृषि विकास निर्देशांक, नाबार्ड.

जेव्हा दुय्यम क्षेत्रासाठीच्या अंशदानाचा विचार केला जातो तेव्हा, आम्हाला असे दिसून आले की, कोकण, पुणे आणि नाशिक हे तीन विभाग सतत सर्वप्रथम राहिले आहेत. मात्र, मागास असलेले तीन विभाग हे सातत्याने मागे पडले आहेत. तथापि, प्रगत विभागांमधून कोकण (दोन्ही मुंबई आणि मुंबई वगळून कोकण) खाली घसरत चालल्याचे दिसून आले आहे. मात्र नाशिक व पुणे या विभागांनी कोकण विभागाहून कमी असे महत्त्वपूर्ण योगदान दिले असून दुसऱ्या उप-कालावधीमध्ये सुधारणा दिसून आली आहे. औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या तीन पिछाडीवर असलेल्या विभागांमधून पहिल्या दोन विभागांनी सीमांतिक सुधारणा केली असल्याचे दिसून आले आहे. मात्र नागपूर विभागाची सीमांतिक घसरण झाल्याचे दिसून आले आहे. ***म्हणून, विभागांची संबंधित स्थिती पाहता, दुसऱ्या उप-कालावधीमध्ये, ती कमी अधिक प्रमाणात न बदलता तशीच राहिलेली आहे. कोकण सर्वप्रथम आणि नागपूर सर्वात खाली घसरल्याचे दिसून आले आहे. मात्र, इतर सर्व विभागांमध्ये सुधारणा झाली असल्याचे दिसून आले आहे.***

प्रदेशनिहाय, उर्वरित महाराष्ट्र व विदर्भ विभाग यांनी आपल्या वाट्यामध्ये सीमांतिक घसरण झाल्याचे दाखविले आहे. मात्र, मराठवाड्याने काही सुधारणा दर्शविली आहे. (तक्ता ३.२६ पहा)

तक्ता ३.२६
दुय्यम क्षेत्रासाठी विभागनिहाय अंशदान (टक्केवारी)

विभाग	१९९३-९४ ते १९९९-२०००	२०००-०१ ते २००९-१०
१	२	३
कोकण	५१.१	४२.९
नाशिक	८.५	११.६
पुणे	२०.५	२४.९
औरंगाबाद	७.६	८.४
अमरावती	३.०७	३.१
नागपूर	९.२२	९.१
मुंबई	२५.८५	२०.७
मुंबई वगळून कोकण	२५.२९	२२.२
प्रदेशनिहाय		
उर्वरित महाराष्ट्र	८०.१	७९.४
मराठवाडा	७.६	८.४
विदर्भ	१२.३	१२.२

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केली.

आकृती ३.१४
दुय्यम क्षेत्र देशांतर्गत राज्य उत्पादनाची विभागनिहाय टक्केवारी



स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केली.

औद्योगिकरणाचा प्रादेशिक विस्तार लक्षात घेता, मुंबईमध्ये आणि मुंबईच्या आजूबाजूला हे घडले आहे. (पहा उद्योग प्रकरण). पुणे, ठाणे व रायगड हे जिल्हे काही कमी विकसित क्षेत्र खंडांसह विकासित झालेले जिल्हे आहेत. नाशिक व अहमदनगर हे जिल्हे पुरेसे विकसित आहेत. मात्र सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर हे कमी विकसित झालेले आहेत. उर्वरित महाराष्ट्राचा पिछाडीवर असलेला प्रदेश म्हणून वर्गवारी करण्यात आली आहे. (राज्य पर्यावरण अहवाल, महाराष्ट्र शासन, २००६-०७, http://envis.maharashtra.gov.in/envis_data/pdf/soer/ chapter1.pdf)

आकृती ३.१५
औद्योगिकरणाचा प्रादेशिक विस्तार



स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडील आकडेवारीवरून तयार केला.

सेवाक्षेत्राचे अंशदान हे कोकण विभागात केवळ ३ टक्क्यांनी वाढले. ही वाढ मुंबई आणि मुंबई वगळून कोकण या दोन्हीसाठी झाल्याचे निदर्शनास आले आहे. नाशिक आणि पुणे विभागात दुसऱ्या उप-कालावधीमध्ये अल्पप्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसून आले. तर औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागांची घसरण झाल्याचे दिसले. ***म्हणून, पुन्हा एकदा, पिछाडीवर असलेल्या विभागांनी दुसऱ्या उप-कालावधीमध्ये अगदीच खराब कामगिरी केल्याचे दिसून आले.***

तक्ता ३.२७
सेवा क्षेत्राला विभागनिहाय दिलेले योगदान (%)

विभाग	१९९३-९४ ते १९९९-२०००	२०००-०१ ते २००९-१०
१	२	३
कोकण	४१.६	४४.४
नाशिक	११.१	११.१
पुणे	१९.४	१९.९
औरंगाबाद	१०.६	९.१
अमरावती	७.४	६.३
नागपूर	९.९	९.१
मुंबई	२५.५	२६.८
मुंबई वगळून कोकण	१६.१	१७.५
प्रदेशनिहाय		
उर्वरित महाराष्ट्र	७२.०	७५.४
मराठवाडा	१०.६	९.१
विदर्भ	१७.४	१५.५

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडील आकडेवारीवरून तयार केला.

आकृती ३.१६
राज्य स्थूल देशांतर्गत उत्पादनाची विभागवार टक्केवारी



स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केली.

म्हणून, दोन उप-कालावधींसाठीच्या विभाग स्तरावरील माहितीची आम्ही तपासणी केली. त्यावरून संपूर्ण चित्र स्पष्ट झाले ते असे की, जेथवर विभागांच्या संबंधित स्थितीचा संबंध येतो तेथवर, सर्वांगीण राज्य स्थूल घरगुती उत्पादनासाठीच्या अंशदानानुसार किंवा प्राथमिक, दुय्यम व भूप्रादेशिक क्षेत्रे यांसाठीच्या अंशदानानुसार जे अमरावती, औरंगाबाद व नागपूर यांच्या इतर गटाच्या पुढे आहेत, अशा कोकण, पुणे व नाशिक यांच्यासाठी एक गट स्थापन केला असल्याचे दिसून आले आहे. सर्वात वाईट म्हणजे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर हे स्थूलमानाने पिछाडीवर असणारे जिल्हे दुसऱ्या उप-कालावधीमध्ये अधिकाधिक वाईट कामगिरी करीत असल्याचे दिसून आले आहे.

आपण, आता या तीन प्रदेशांमधील आर्थिक कार्यक्रमांचे स्वरूप आणि रचना यांमध्ये तुलना करू शकतो.

तक्ता ३.२८
प्रदेशांची आर्थिक व क्षेत्रीय रचना
मुंबई वगळून महाराष्ट्राकरिता प्रदेशाच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी असलेले क्षेत्राचे उत्पन्न
एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादन स्थिर किंमती (२००४-०५)

	१९९९-२०००	२००२-०३	२००४-०५	२००७-०८	२००९-१०
१	२	३	४	५	६
प्राथमिक क्षेत्र	१८.०५	१६.९६	१४.६५	१४.२३	११.०८
दुय्यम क्षेत्र	२९.९४	२७.४७	२९.११	३२.४३	३०.९०
सेवा क्षेत्र	५२.०१	५५.५८	५६.२४	५३.३४	५८.०१
एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**	**१००**

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडील आकडेवारीवरून समितीने तयार केला.

तक्ता ३.२९
मुंबई वगळून उर्वरित महाराष्ट्राकरिता प्रदेशाच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी असलेले क्षेत्राचे उत्पन्न एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादन स्थिर किंमती (२००४-०५)

	१९९९-००	२००२-०३	२००४-०५	२००७-०८	२००९-१०
१	२	३	४	५	६
प्राथमिक क्षेत्र	१३.४१	१२.८४	१२.२९	१०.७२	८.८८
दुय्यम क्षेत्र	३३.३९	३०.३७	३२.२२	३६.०३	३४.००
सेवा क्षेत्र	५३.२०	५६.७९	५५.४९	५३.२६	५७.१२
एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**	**१००**

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

तक्ता ३.३०
मराठवाडा प्रदेशाच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी असलेले क्षेत्राचे उत्पन्न एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादन स्थिर किंमती (२००४-०५)

	१९९९-००	२००२-०३	२००४-०५	२००७-०८	२००९-१०
१	२	३	४	५	६
प्राथमिक क्षेत्र	२३.१६	२२.७२	२०.०३	२२.७२	१७.५३
दुय्यम क्षेत्र	२५.१९	२२.८९	२३.७०	२६.३०	२५.२४
सेवा क्षेत्र	५१.६६	५४.३९	५६.२७	५०.९८	५७.२३
एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**	**१००**

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला

तक्ता ३.३१
विदर्भ प्रदेशाच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी असलेले क्षेत्राचे उत्पन्न एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादन स्थिर किंमती (२००४-०५)

	१९९९-००	२००२-०३	२००४-०५	२००७-०८	२००९-१०
१	२	३	४	५	६
प्राथमिक क्षेत्र	२९.५२	२६.८७	१९.१५	२०.६९	१४.८७
दुय्यम क्षेत्र	२१.९५	२०.७७	२२.१२	२४.१९	२३.४६
सेवा क्षेत्र	४८.५३	५२.३६	५८.७३	५५.१२	६१.६७
एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**	**१००**

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

सर्व तिन्ही प्रदेशांमध्ये प्राथमिक क्षेत्राचे वर्चस्व असले तरी, त्यांच्या लोकप्रियतेचा प्रभाव कमी होत आहे हे नमूद करणे महत्त्वाचे आहे. मराठवाडा आणि विदर्भ प्रदेशामध्ये प्राथमिक क्षेत्राचा लेखाजोखा हा, अदमासे अनुक्रमे १८ ते १५ टक्के इतका आहे. उर्वरित महाराष्ट्रातील वाटा त्याही पेक्षा कमी असणे अपेक्षितच आहे. सर्व तीन प्रदेशांमध्ये दुय्यम क्षेत्राचा वाटा हा एकतर २५ टक्क्यांहून जास्त आहे किंवा २५ टक्क्याच्या जवळपास पोचणारा आहे. भूप्रादेशिक क्षेत्र किंवा सेवा क्षेत्र सर्व तीनही प्रदेशांमधील उत्पन्न निर्मितीच्या स्वरूपावर आपले वर्चस्व गाजवीत आहे. हा प्रवाह देशातील तसेच देशाबाहेरील विकसित अर्थव्यवस्थेच्या नेहमीच्या अनुभवाशी सुसंगत आहे. रोजगाराची क्षेत्रीय रचना ही जरी तशाच प्रकारच्या क्षेत्रीय वितरणाचे

अनुसरण करीत असली तरी तिची गती खूपच मंद होत जात आहे, हे सर्वज्ञात आहे. ***सर्व तीनही प्रदेश आर्थिक मूल्यमापनाच्या एकाच रूळावर आहेत, आणि किमान पक्षी ती व्यापक क्षेत्रीय स्तरांवरील नजिकच्या भविष्यात, आर्थिक वाढ व विकास ज्या स्वरूपात तो अपेक्षित आहे त्याच स्वरूपात होईल.***

उर्वरित महाराष्ट्राचे, वस्तुनिर्मिती, बांधकाम व वीजनिर्मिती यांचेमध्ये असलेले संबंधित वर्चस्व हे दुय्यम क्षेत्रात त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे दर्शविते. असे निदर्शनास आले आहे की, वस्तुनिर्माण कामे मुंबई व उपनगर प्रदेशांमधून बव्हंशी नाहीशी झाली आहेत. हळूहळू ती ठाणे, रायगड येथे स्थलांतरित झाली आहेत. पुणे आणि नाशिक हे अन्य दोन प्रदेश औद्योगिकदृष्ट्या झपाट्याने विकासाच्या वाटेवर चालले आहेत. म्हणून, वाढीचा मुख्य स्रोत असणारी उर्वरित महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती व्यापक क्षेत्रीय रचनेच्या आधारसामग्रीमध्ये उठून दिसत आहे.

सेवा क्षेत्रात होत असलेल्या वाढीची सूक्ष्म तपासणी करावी लागेल. 'वित्तीय अंतर्भावाच्या' आमच्या आढाव्यामध्ये, पतठेव गुणोत्तरामधील काही मतभिन्नतेचे प्रमाण दाखवले आहेत. अद्यापि, 'बँक सेवांचा उपयोग करून घेणे' या संज्ञांच्याबाबतीत अंतर्भाव करण्यात आलेला नव्हता. यावरून, संपूर्ण प्रदेशामध्ये वित्तीय सेवांचा उदय झाल्याचे स्पष्ट होते. गेल्या दशकात, अनेक लहान लहान नगरांमध्ये व शहरांमध्ये म्युच्युअल फंड, विमा व इतर थेट गुंतवणुकींच्या सुसंधींमध्ये वाढ झालेली आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, सर्व प्रदेशांमध्ये, व्यापार, हॉटेल व उपहारगृहे यांच्या सेवा जोमाने वाढत आहेत. व्यक्तिलक्ष्यी क्षेत्राच्या वाढीचा दर हा इतर क्षेत्राच्या वाढीच्या दराइतका वाढविला तर, व्यक्ति लक्ष्यी क्षेत्राच्या वाट्यामध्ये वाढ होईल. म्हणून, आम्ही तक्ता क्रमांक ३.३२ मध्ये क्षेत्रीय वाढीचा दर सादर केला आहे.

तक्ता ३.३२
प्रत्येक प्रदेशाकरिता स्थिर किंमतीवरील (२००४-०५)
एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादनामधील क्षेत्रीय वार्षिक वाढीचा दर (२०००-०१ ते २०११-१२) (%)

	मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्र	मराठवाडा	विदर्भ	मुंबई वगळून महाराष्ट्र
१	२	३	४	५
प्राथमिक क्षेत्र	४.७३	६.३८	०.३९	३.७४
दुय्यम क्षेत्र	९.६५	९.६५	८.८७	९.५३
सेवा क्षेत्र	९.०५	९.०९	९.५५	९.१६
एकूण	८.७५	८.६७	७.३४	८.४६

स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केला.

वरील तक्त्यावरून लक्षणीय प्रवाह दिसून येतो. ***संपूर्ण प्रदेशांमधील वाढीचे दर हे विदर्भातील प्राथमिक क्षेत्र वगळता, (अर्थात तेथे मूळ घटक असेल) बव्हंशी सर्व क्षेत्रांमध्ये साधारणपणे एकमेकांशी सारखेच आहेत.*** मराठवाड्यातील ६.३८ टक्क्यांच्या व उर्वरित महाराष्ट्रातील ४.७३ टक्क्यांच्या तुलनेत विदर्भातील प्राथमिक क्षेत्राचा दर ०.३९ टक्के इतका कमी आहे. यामुळे त्याची सूक्ष्म तपासणी होणे आवश्यक आहे. हे सर्वांना माहीत आहे की, प्राथमिक क्षेत्रामध्ये शेतीचा सर्वात जास्त वाटा आहे. म्हणून, वाढीच्या भिन्नतेचे मूळ हे शेतीमध्येच आहे. म्हणून, आम्ही गेल्या दशकातील शेतीच्या वाढीचा दर पाहिला. तक्ता ३.३३ मध्ये आम्ही वर्षवार व प्रवाहानुसार (म्हणजेच संपूर्ण कालावधीचा समावेश करून) शेतीच्या वाढीचा दर सादर केला आहे.

तक्ता ३.३३
विभिन्न प्रदेशांमधील कृषि उत्पन्नातील वर्षागणिक व प्रवाही संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर (%)

जीडीडीपीमधील वर्षागणिक वाढ – कृषि व संलग्न कार्यक्रम–स्थिर किंमतीनुसार (२००४–०५)				
वर्ष	मुंबई वगळून महाराष्ट्र	मुंबई वगळून उर्वरित महाराष्ट्र	मराठवाडा	विदर्भ
१	२	३	४	५
१९९९–००	–	–	–	–
२०००–०१	–१८.७९	–१३.५०	–१६.३९	–२८.७८
२००१–०२	२२.५६	१९.३८	१५.९८	३२.९७
२००२–०३	१.३०	१.५०	८.१५	–२.७५
२००३–०४	७.९३	१२.०४	–०.७१	५.३६
२००४–०५	–७.५३	–०.२४	७.६६	–३०.६२
२००५–०६	९.५०	३.५४	१५.४६	२१.४३
२००६–०७	१४.२८	१२.५४	१६.६४	१६.५८
२००७–०८	१३.९६	७.९३	२२.९४	२०.८१
२००८–०९	–१५.८०	–५.६१	–२५.८६	–२८.८५
२००९–१०	१.१०	–०.९६	१०.२८	–१.१९
२०१०–११	१९.०५	१७.२६	२६.९८	१६.३१
२०११–१२	४.५२	९.०७	–१.२९	–२.१८
प्रवाहा (संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर)	**४.२४**	**५.१४**	**६.८७**	**०.३४**

स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केला.

वरील तक्ता असे दर्शवितो की, विदर्भामधील कृषिविषयक कामगिरीची इतर प्रदेशांशी तुलना केली असता, ती अत्यंत वाईट आणि मंद आहे. विदर्भामधील वाढीचा प्रवाही दर ०.३४ एवढा कमी असून तो सांख्यिकीदृष्ट्या उल्लेखनीय नाही (म्हणजेच सांख्यिकीदृष्ट्या शून्यवत आहे) प्रवाहाच्या दृष्टीने, केवळ वाढ कुंठीत झाली आहे एवढेच नव्हे तर अधिक महत्त्वाचे म्हणजे वर्षागणिक तफावत, वारंवारता तसेच आकारमान यामध्ये उल्लेखनीयरीत्या मोठी तफावत आहे. दहा वर्षांपैकी, सहा वर्षे नकारात्मक वाढीचा दर प्रदर्शित करतात. अशा वर्षागणिक वाढीच्या चढउताराचे आकारमान व वारंवारता ही, सापेक्षतेने मराठवाडा तसेच उर्वरित महाराष्ट्रामध्ये सौम्य आहे. परिणामी, दोन्ही प्रदेश, या प्रदेशांमधील वाढीच्या दराची मोठी स्थितीस्थापकता नकारात्मक प्रवाह दर्शवतात. अशाप्रकारे, कृषि उत्पन्नामधील संपूर्ण कुंठितता (वाढीच्या शून्य दराने दर्शविल्याप्रमाणे) व व्यापक चढउतार हे, विदर्भामधील वाढीच्या प्रक्रियेचे प्रमुख नकारात्मक वैशिष्ट्य आहे. हा आघात, विदर्भाच्या वाढीच्या प्रक्रियेवर व कामगिरीवर नकारात्मक परिणाम करीत आहे. परिणामी, चालू तसेच स्थिर किंमतीमध्ये विदर्भाच्या वाढीचा एकूण दर मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या वाढीच्या दरापेक्षा खाली आहे.

तथापि, अन्य क्षेत्रांनी असे प्रतिकूल नकारात्मक परिणाम सोसलेले नाहीत. वस्तुनिर्मिती क्षेत्रामध्ये, निकोप (साक्षेपाने कृषिमध्ये आणि जी अंशत: मराठवाडा व विदर्भ यांमधील प्रारंभिक निम्नतम आधारभूत पातळी देखील झाली आहे) प्रगती झालेली दिसते. तिचा जोडपत्र ३.१० मध्ये सारांश दिला आहे.

याची नोंद घेता येईल की, हिंगोली व नंदुरबार हे दोन बहि:स्थ भाग आहेत आणि त्यांना संयुक्त वार्षिक अभिवृद्धीचा दर अंदाजित करताना त्यांना वगळण्यात आले आहे. उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यांच्या वाढीचा दर, अनुक्रमे १०.१, ८.२, व ९.१ इतका आहे.

व्यापार, हॉटेल व उपाहारगृह यांसारख्या महत्त्वाच्या सेवा क्षेत्रांमध्ये देखील अधिक निकोप वाढ दिसून आली आहे. तक्ता ३.३४ मध्ये ती सादर केली आहे. या क्षेत्रामधील संयुक्त वार्षिक अभिवृद्धीचा दर, मराठवाड्याखालोखाल विदर्भामध्ये सर्वाधिक आहे. उर्वरित महाराष्ट्रातील वाढीचा दर, ज्यावरून वाढीचा दर मोजण्यात येतो त्या त्याच्या मोठ्या आधारामुळे निम्नतम असल्याचे दिसते.

तक्ता ३.३४
स्थिर (२००४-०५ च्या) किंमतीनुसार व्यापार, हॉटेल व उपहारगृह (%)

वर्ष	मुंबई वगळून उर्वरित महाराष्ट्र	मराठवाडा	विदर्भ	मुंबई वगळून महाराष्ट्र
१	२	३	४	५
१९९९-००	-	-	-	-
२०००-०१	३.२१	०.८६	-०.१०	२.४०
२००१-०२	३.१७	५.९७	६.७०	४.०५
२००२-०३	१२.०३	१०.७५	११.१५	११.७४
२००३-०४	६.७४	१.१८	७.५७	६.२४
२००४-०५	-१.२८	४२.९६	५४.९०	१२.७५
२००५-०६	८.२०	८.०९	८.१४	८.१७
२००६-०७	१५.१३	१५.०९	१४.९७	१५.०८
२००७-०८	८.१६	८.०५	८.०३	८.१२
२००८-०९	-१.१४	-१.६४	३.५८	-०.१५
२००९-१०	१७.१४	१७.५०	११.६९	१५.९२
२०१०-११	६.६३	६.५१	६.४८	६.५८
२०११-१२	२.९३	२.८१	२.८३	२.८९
संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर (सीएजीआर)	**७.०४**	**१०.८१**	**१२.६२**	**८.५६**

स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तयार केला.

चालू किंमतीमधील वाढीच्या क्षेत्रीय दरांचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे.

तक्ता ३.३५
प्रत्येक प्रदेशाकरिता चालू किंमतीवरील एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादनामधील क्षेत्रीय वार्षिक वाढीचा दर

	मुंबई वगळून उर्वरित महाराष्ट्र	मराठवाडा	विदर्भ	मुंबई वगळून महाराष्ट्र
१	२	३	४	५
प्राथमिक क्षेत्र	१३.४७	१५.७०	८.१०	१२.३८
द्वितीय क्षेत्र	१५.६०	१५.५९	१४.६७	१५.४६
सेवा क्षेत्र	१४.०३	१४.७५	१४.८७	१४.२८
सर्व क्षेत्र	१४.४६	१५.१९	१३.२६	१४.३१

स्त्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

वरील तक्ता ३.३५ मध्ये, आम्ही, प्रत्येक प्रदेशाचा क्षेत्रीय व एकूण वाढीचा दर सादर केला आहे. यापूर्वी यावर भाष्य केल्याप्रमाणे, विदर्भाच्या प्राथमिक क्षेत्रातील वाढीच्या दराखेरीज, आर्थिक विस्ताराची शीघ्रता एकमेकांच्या पूर्णपणे निकट आहे. कृषि क्षेत्रातील आत्यंतिक कुंठिततेमुळे, विदर्भातील एकूण वाढीची कामगिरी खालावली आहे. दुसऱ्या बाजूला, मराठवाडा प्रदेशामध्ये एकूण वाढीचा दर मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे.

३.४ एककेंद्राभिमुखता:

आता आपण लक्षवेधक अभ्यासाचे प्रतिवेदन करण्याकडे म्हणजेच, प्रादेशिक वाढीच्या दरांमधील एककेंद्राभिमुखतेची चाचणी करण्याकडे वळू या. आम्ही हा भाग, प्रा.माला लालवानी यांच्या समितीने केलेल्या अभ्यासावरून घेतलेला आहे.

प्रदेशाच्या समयश्रेणी आधारसामग्रीच्या संदर्भात, बिनशर्त एककेंद्राभिमुखता, ज्या दराने प्रदेश, त्यांच्या उत्पन्नाची संभाव्य पातळी गाठतो तो दर मोजते. स्तरच्छेद आधारसामग्रीच्या संदर्भात, गरीब (मागासलेले) प्रदेश, संपन्न प्रदेशांपर्यंत पोहचतात किंवा कसे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याच्या मुळाशी अशा अपेक्षा आहे की, या प्रदेशांमधील फरक हा केवळ त्यांच्या भांडवलाच्या प्रारंभिक पातळ्यांपुरता आहे या गृहीतकावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहून, गरीब प्रदेशांमध्ये, संपन्न प्रदेशांपेक्षा शीघ्रतेने वाढ होईल (त्यांना त्यांच्यापर्यंत पोहचणे शक्य होईल) यास बिनशर्त एककेंद्राभिमुखता म्हणून ओळखले जाते आणि ती गरीब व संपन्न प्रदेशांच्या उत्पन्नाची स्थिर राज्य पातळी असल्याचे गृहीत धरले जाते. जर प्रदेशांमध्ये विभिन्न तंत्रशास्त्रविषयक किंवा वर्तणूकविषयक मापदंड असतील तर, प्रदेश, त्यांच्या स्थिर राज्य उत्पन्नामध्ये फरक करणाऱ्या या मापदंडामध्ये फरक करतील असे गृहीत धरून सशर्त एककेंद्राभिमुखता अंदाजित करण्याची गरज आहे.

दोन उप-कालावधीच्या वेगवेगळ्या वाढीच्या दरानुसार, प्रारंभिक दरडोई उत्पन्नाच्या आलेखनासह आंतर-जिल्हा तफावतीमधील बदलाच्या अंत:प्रेरणात्मक कल्पना मिळविण्याचा प्रयत्न आम्ही सुरुवातीपासून करीत आहोत. पहिल्या उप-कालावधीसाठी, प्रारंभिक वास्तव दरडोई उत्पन्न (१९९३-९४), १९९३-९४ ते १९९९-२००० या कालावधीच्या वाढीच्या दरानुसार आलेखित केले आहे (आकृती ३.१७). त्याचप्रमाणे दुसऱ्या उप-कालावधीसाठी, आम्ही, २०००-०१ ते २००९-१० या कालावधीच्या वाढीच्या दरानुसार प्रारंभिक उत्पन्न (१९९९-२०००) आलेखित केले आहे (आकृती ३.१८). सहजपणे दिसावे ***म्हणून, प्रारंभिक कालावधीत उच्चतम दरडोई उत्पन्न असलेल्या जिल्ह्यांना निम्नतम वाढीचा दर प्रदर्शित केला आहे असे दर्शविणाऱ्या पहिला उप-कालावधीसाठी आम्ही खाली उतरत जाणारी प्रवाही रेषा ओढलेली आहे. स्वाभाविकपणे यामुळे एककेंद्राभिमुखतेला आधार मिळेल. दुसऱ्या उप-कालावधीकरिता (२०००-०१ ते २००९-१०) विभिन्नता सुचविणारी वर चढत जाणारी प्रवाही रेषा आम्ही ओढलेली आहे.***

आकृती ३.१७

प्रारंभिक वास्तव दरडोई उत्पन्न व दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर (१९९३-१९९४ ते १९९९-२०००)



स्रोत : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

आकृती ३.१८

प्रारंभिक वास्तव दरडोई उत्पन्न व दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर (२०००-०१ ते २००९-१०)



स्रोत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून समितीने तयार केला.

बिनशर्त तसेच सशर्त एककेंद्राभिमुखतेची / भिन्नतेची औपचारिक चाचणी पार पाडली होती. आम्ही, विभिन्न उप-गटामधली म्हणजेच, सर्व जिल्हे, प्रदेशनिहाय व विभागनिहाय, यांमधील आकडेवारी देखील विचारात घेतली. ***सर्व जिल्हे तसेच ते प्रादेशिक दृष्ट्या एकत्रित करून विचारात घेतो तेव्हा, आम्हाला, पहिल्या उप-कालावधीमध्ये, म्हणजेच ९० च्या नंतरच्या अर्ध्या दशकामध्ये एककेंद्राभिमुखतेचा (बिनशर्त व सशर्त असे दोन्ही) आणि दुसऱ्या उप-कालावधीमध्ये भिन्नतेचे पुरावे आढळले.*** या प्रतिसमर्थनांचा पहिला प्रभाव असा आहे की, आम्हाला, पहिल्या उप-कालावधीसाठी खाली उतरत जाणारा आलेख मिळाला व दुसऱ्या उप-कालावधीमध्ये वर चढत जाणारा आलेख मिळाला. ही प्रतिकूलता एक आघात म्हणून सुधारणेची मागणी करीत असल्याचे दिसून येईल. (मागे असणाऱ्या प्रदेशांच्या वाढीचा वेग वाढविण्याच्या कार्यतंत्राचे अनुसरण करून त्याद्वारे सुधारणा करता येईल असा दृष्टिकोन आम्ही मांडला होता.)

३.५ मानव विकास निर्देशांक

आता आपण, खालील तक्त्यांमध्ये दर्शविलेल्या जिल्ह्यांच्या व प्रदेशांच्या मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भातील कामगिरीकडे वळू या. जोडपत्र ३.११ वर ओझरता दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की, जिल्ह्यांमधील व प्रदेशांतील मानव विकास निर्देशांकांत कालांतराने एकसारखी वाढ झालेली आहे. यासाठी, प्रदेशामधील दरडोई उत्पन्नात भिन्नता आहे या वस्तुस्थितीच्या (यापूर्वीच प्रतिवेदन केलेल्या) जवळ जाण्याची गरज आहे. **यातून असे दिसून येते की, संबंधित कालावधीमध्ये ही नकारात्मक आर्थिक कामगिरी असली तरी, जणू काही काहीच बदलले नाही किंवा सर्व आघाडयांवर त्या गोष्टी खचितच बिघडल्या आहेत असे नाही.** मानव विकास निर्देशांकाची कामगिरी असे दर्शवते की, (मानव विकास निर्देशांकाचे घटक विचारात घेता), केंद्र पुरस्कृत योजनांच्या खास करून सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांच्या संदर्भातील शासनाच्या सहभागामुळे सर्व प्रदेशांना लाभ व्हावयास पाहिजे. अर्थात आम्ही मान्य करतो की, केंद्र पुरस्कृत योजनांमार्फत सीएसएस च्या हस्तक्षेपामुळे केवळ तात्पुरते दोष निवारण होतात आणि खऱ्या अर्थाने दीर्घकालीन उपजीविकेचे सक्षमीकरण केवळ वाढ व रोजगार यांच्याद्वारे होऊ शकते.

जेव्हा एखाद्याला अशी जाणीव होईल (खालील तक्ते ३.३६ –३.३८) की, मानव विकास निर्देशांक, मराठवाड्यात १४.४ टक्क्यांनी, *विदर्भात १४.३० टक्क्यांनी व उर्वरित महाराष्ट्रात १२.१ टक्क्यांनी वाढला आहे तेव्हा, ही बाब आणखी अधोरेखित होते. म्हणून, मानव विकास निर्देशांकातील वाढ मागे असणाऱ्या प्रदेशांच्या बाबतीत अधिक असल्याचे दिसून येते.* तसेच, भिन्नता सहगुणांकाद्वारे दिसून आल्याप्रमाणे जिल्हा पातळीवरील तफावत असे दर्शविते की, ती सर्व प्रदेशांमध्ये कमी झालेली असून ती मराठवाड्यानंतर विदर्भात आणि शेवटी उर्वरित महाराष्ट्रात निचतम असल्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर सामूहिक विकास झाल्याचे दर्शविते आणि म्हणून जेथवर मानव विकास निर्देशांकाचा संबध आहे, तेथवर प्रदेशांतर्गत समस्या कमी आहेत.

तक्ता ३.३६
मानव विकास निर्देशांक – मराठवाडा

मराठवाडा मानव विकास निर्देशांक २००१–११		
१	२	३
एमइएएन	०.६०४	०.६९१
प्रमाण विचलन (एसटीडीइव्ही)	०.०३३	०.०२८
भिन्नता सहगुणांक (सीव्ही)	०.०५५	०.०४१

तक्ता ३.३७
मानव विकास निर्देशांक – विदर्भ

विदर्भ मानव विकास निर्देशांक ०१–११		
१	२	३
एमइएन	०.६३०	०.७२०
प्रमाण विचलन (एसटीडीइव्ही)	०.०३१	०.०१५
भिन्नता सहगुणांक	०.०४९	०.०२१

तक्ता ३.३८
मानव विकास निर्देशांक–उर्वरित महाराष्ट्र

उर्वरित महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक ०१–११		
१	२	३
एमइएएन	०.६८७	०.७७०
प्रमाण विचलन (एसटीडीइव्ही)	०.०५७	०.०५२
भिन्नता सहगुणांक (सीव्ही)	०.०८३	०.०६८

३.६. समारोपीय अभिप्राय

निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल सादर केल्यानंतर एकूण वाढीच्या दरातील तसेच प्रादेशिक व क्षेत्रीय वाढीच्या दरातील प्रवाहाच्या (कल) संदर्भात मागील दोन दशकांत काय घडून आले याबाबत आम्हाला आढळून आलेल्या बाबी या प्रकरणात संक्षिप्तपणे दिल्या आहेत. आम्ही दरडोई संज्ञेतील व जिल्हा स्तरावरील प्रवाहांकडे देखील लक्ष दिले आहे. प्रदेशांतील गरिबी दूर करण्याच्या संदर्भात, प्रदेशांतील प्रवाह(कल) खूप असमान नसले तरी, उपप्रादेशिक वाढीत भिन्नता निर्माण झाली असल्याचे आपल्याला दिसून येईल.

तथापि, या कालावधीमध्ये, आंतर-प्रादेशिक दरडोई उत्पन्न विशेषत: मागील दशकात बदलताना, मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र यांच्या ०.६६ : ०.८२ : १.०० पासून ०.६ : ०.७६ :१.०० या प्रमाणात अधिक खालावणाऱ्या सापेक्ष प्रमाणांसह अधिक खालावले आहे. याचा अर्थ असा होतो की, पहिल्या उप-कालावधीमध्ये दिसून आलेला सकारात्मक प्रवाह (कल) दुसऱ्या अर्ध्या उप-कालावधीमध्ये उलटला. बिघडण्याचा हा प्रवाह देखील उलटला पाहिजे. वाढीमधील विद्यमान भिन्नता (तफावत), जर भविष्यात देखील चालू राहू दिली तर, असमानता आणखी बिघडेल. अन्य त्रासदायक घटक असा आहे की, आदिवासी क्षेत्रातील वाढ सातत्याने वाढीच्या स्तरांच्या निम्न स्तरावरच आहे.

येथे दोन कळीचे प्रश्न उद्‌भवतात ते असे :

१. संपूर्ण प्रदेशातील दरडोई उत्पन्नाच्या या गुणोत्तर प्रमाणातून प्रचंड असमतोल प्रतिबिंबित होते किंवा कसे? आणि

२. मागे असणारे प्रदेश, भविष्यात दरडोई उत्पन्नाच्या संदर्भात बरोबरी गाठू शकतील आणि हा असमतोल कमी करू शकतील किंवा कसे?

जर अन्य महासंघाचा (जागतिक लोकसंख्येच्या ५०% हून अधिक लोकसंख्या असणाऱ्या व जागतिक सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या १/३ हून अधिक उत्पन्न असणाऱ्या) अनुभव विचारात घेता, आपल्याला असे आढळून येते की, या महासंघांमधील आंतर-राज्यीय असमानता खूपच मोठी असून चीन, ब्राझील, इंडोनेशिया यांसारख्या उदयास येणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत तेथे श्रीमंत व गरीब यांच्यामधील दरडोई उत्पन्नाच्या गुणोत्तरामध्ये (प्रमाण) १२ व २० इतकी तफावत आहे, इतकचे नव्हे तर कॅनडा व युएसए यांसारख्या प्रगत महासंघांमध्ये देखील १.५ व २.५ एवढी तफावत आहे. आपल्या देशामधील आंतरराज्यीय दरडोई उत्पन्नाचे उच्चतम व निम्नतम गुणोत्तर ८.४ एवढे आहे. त्यानंतर असा प्रश्न उद्‌भवतो की, विशेषत: जेव्हा मानव विकास निर्देशांकामधील राज्यव्यापी एककेंद्राभिमुखता उदयास येते तेव्हा, प्रादेशिक विषमतेची सापेक्ष निम्नतम पातळी महाराष्ट्रात गाठली जाते का. कदाचित पुढील कारणांमुळे असू शकेल.

मागील दशकांमध्ये, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने दोन मोठे आर्थिक धक्के आणि एका राजकीय सत्तांतराचा एक मोठा धक्का अनुभवला आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तसेच ऑटो, औषधनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक इत्यादींसारख्या प्रगत वस्तुनिर्माणकारी क्षेत्रात नव्याने वृद्धी होण्याची निर्माण झालेली संभाव्यता हा एक सकारात्मक धक्का असून त्याचा अधिक मोठ्या प्रमाणात लाभ मराठवाडा व विदर्भाच्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्राला लाभला. त्याच कालावधीमध्ये विशेषत: विदर्भाच्या कृषि क्षेत्रामध्ये, अत्यंत अस्थिरतेबरोबरच प्रति-कुंठित अवस्था अनुभवास आल्याने, तो एक नकारात्मक धक्का होता. या कालावधीमध्ये, जरी मराठवाड्याचा विकास शीघ्रतेने होत असला तरी, लोकसंख्या वाढीचा दर मराठवाड्यामध्ये सर्वाधिक आहे या वस्तुस्थितीमुळे त्यांच्या दरडोई वाढीचा दर निम्नतम होता. सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या मराठवाड्याला बसलेले दोन आर्थिक धक्के म्हणजे त्यांचा अगोदर असलेला विकासाचा दर घसरला आहे आणि प्रादेशिक विषमता वाढली आहे. विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या दु:खद घटनांमुळे आणि आदिवासी क्षेत्रातील हिंसाचारात वाढ झाल्यामुळे, ही घसरण वाढतच गेली. महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या रचनेत राजकीय सत्तेच्या वाटपातील बदलामुळे निर्माण झालेल्या विभक्त होण्याच्या भावनेत कदाचित आणखी भर पडली असावी. संमिश्र (युतीच्या) सरकारमुळे, या प्रदेशांमध्ये अधिक शक्तिशाली विभाग व मंत्रालये यांच्या हिश्श्यामध्ये एक तिरकस आकृतीबंध निर्माण झाला आणि त्यामुळे विशेषत: विदर्भामध्ये असक्षमीकरणाची भावना निर्माण होत आहे.

नागपूर कराराप्रती आपल्या राज्याची अक्षरश: व तत्त्वत: बांधीलकी असल्याने, राज्याच्या विद्यमान कारभाराच्या स्थितीत तातडीने सुधारणा करण्याची गरज आहे. समितीचा असा दृष्टिकोन आहे की, पिछाडीवर पडलेल्या प्रदेशांमध्ये वाढीचा वेग वाढवून, धोरणात्मक सुधारणा करून आणि साधनसंपत्तीचे व राजकीय सत्तेचे अधिक समन्यायपणे वाटप करून हे साध्य करता येऊ शकेल. समितीचा असा दृष्टिकोन आहे की, विद्यमान प्रादेशिक तफावत, १४ व्या योजनेच्या कालावधीत १/३ ने कमी करता येऊ शकेल आणि आदिवासी क्षेत्रांसाठी, या अहवालात अंतर्भूत केलेल्या प्रस्तावांची अंमलबजावणी करून त्याद्वारे तफावत मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकेल.

❖❖❖

प्रकरण ४

समतोल प्रादेशिक विकासाकडे: एक बहुआयामी धोरण दृष्टिकोन

४.० प्रस्तावना

या समितीच्या दृष्टिकोनाचे सविस्तर विवेचन आम्ही या प्रकरणात करणार आहोत. विविध महत्त्वाच्या घटकांनी आमचा हा दृष्टिकोन तयार झालेला आहे. (एक) आमच्या समितीपुढील विचारार्थ विषय (दोन) पूर्वीची धोरणे आणि धोरण दृष्टिकोनांचा तसेच आधुनिक विकास साहित्यातून मिळालेल्या माहितीचा चिकित्सक आढावा (तीन) हितसंबंधितांची मते (चार) आदिवासी आणि दुष्काळग्रस्त भागांमधील प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न आणि त्यावर विशेष भर देण्याची गरज. (पाच) प्रदेशांअंतर्गत उद्‌भवणाऱ्या असमानता (सहा) अर्थव्यवस्था आणि नवीन राजकीय अर्थव्यवस्था यांतील संरचनात्मक बदल (सात) जागतिकीकरणाचा परिणाम (आठ) संस्थात्मक आणि प्रशासनाशी संबंधित गुंतागुंतीच्या बाबी (नऊ) लोकशाहीच्या महत्त्वपूर्ण विकेंद्रीकरणाचा संबंध(दहा) भारतातील इतर राज्यांच्या अनुभवांपासून मिळणारी शिकवण (अकरा) संभाव्य स्रोत पाकीट (बारा) वेगवेगळया क्षेत्रांच्या तुलनात्मक उपयोगितांची होणारी गतिमान उत्क्रांती (तेरा) राज्य शासन आणि भारत सरकार यांच्या बाजूने धोरणाच्या पुनर्निमितीच्या अत्यावश्यकता. (चौदा) बदलत्या विश्वातील प्रोत्साहनपूरक यंत्रणा आणि बाजाराची दिशा यांच्या वाढत्या भूमिकेची ओळख (पंधरा) अधिकाधिक समन्यायी आणि वैभवशाली महाराष्ट्र निर्माण करण्याचे सहभागी स्वप्न.

४.०१ अशारीतीने, *आमचा दृष्टिकोन हा फक्त साधनांच्या वाटपावर लक्ष केंद्रित करणारा नसून तो वर दर्शविल्याप्रमाणे एक बहु आयामी दृष्टिकोन आहे. यात दोन मार्गांचा अवलंब केलेला आहे, एक म्हणजे सार्वजनिक मालमत्तेच्या वापरातील समानीकरण आणि दुसरा म्हणजे एकसमयावच्छेदेकरून विकासाच्या गतीत वाढ. यातील निष्कर्ष हे आयोगाच्या अभ्यासातून काढलेले आहेत व ते तज्ज्ञांच्या ज्ञानावर आणि वास्तवदर्शी विश्लेषणावर आधारित आहेत. प्रशासन आणि धोरणाची पुनर्रचना– हा साह्यकारी पायाभूत सुविधांचा महत्त्वपूर्ण संवेदनशील भाग असल्याने– हा आमच्या दृष्टिकोनातील गाभ्यामधून आलेला आहे. (फक्त खर्चाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी) आम्ही विकासातील तफावतीची गणना/अंदाज करताना फलनिष्पत्तींवर लक्ष केंद्रित केले आहे. आमचा प्रस्ताव तयार करतांना, आम्ही महाराष्ट्रातील साधनांची उपलब्धता, प्रोत्साहकांची पूरकता आणि राजकीय अर्थशास्त्र यांचे भान ठेवले आहे.*

४.०२ एखाद्या प्रदेशाच्या दरडोई उत्पन्नातील तफावतींमध्ये परावर्तित होणाऱ्या आर्थिक विषमतांमध्ये घट होणे याचाच प्राथमिक अर्थ म्हणजे समतोल प्रादेशिक विकास साधणे होय असा समितीचा दृष्टिकोन आहे. विषमतेमध्ये अशी घट ही दोन महत्वाच्या मार्गांनी शक्य आहे: सार्वजनिक मालमत्तेच्या वापरामध्ये, समानता आणि विविध विभागांमध्ये त्यांच्या गतिमान तुलनात्मक उपयोगितेच्या संदर्भात सुसंवादीपणे विभागातील आर्थिक वाढीला चालना देणे. आपण प्रकरण ३ मध्ये ('वाढीतील कल आणि स्वरूप') यापूर्वीच पाहिल्याप्रमाणे गेल्या दशकात सर्व प्रदेशांनी वाढ अनुभवली आहे आणि ही वाढ भविष्यात सुरू राहील. समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्यासाठी मागास विभागांची वाढ ही अधिक वेगाने व्हायला हवी. या ठिकाणी हे लक्षात घ्यावे की, मागास विभागांमधील वेगाने होणारी वाढ ही संबंधित प्रगत विभागांच्या वाढीच्या प्रक्रियेला मंद करणारी किंवा त्यांना मागे खेचणारी नाही. याउलट, विभागातील सुधारित पायाभूत सुविधा संपर्कक्षमता आणि त्यांच्या बाजारपेठांशी त्यांची निकट एकात्मता यातून सर्व विभागात पूरक सकारात्मक पूनर्भरण वाढीचे परिणाम समोर येतील.

आम्ही समजतो तो प्रादेशिक समतोल हा अशाप्रकारे दुपेडी आहे. (त्या प्रत्येकाचे बहुविध घटक या प्रकरणात सविस्तरपणे दिले आहेत) सर्वप्रथम, आम्हाला मूलभूत सार्वजनिक मालमत्तेचा (नंतर निश्चित केलेल्या) उपयोग हा वैश्विकरीत्या समान करून आणि सार्वजनिक स्रोतांचे समानतेने वाटप आणि संस्थात्मक व प्रशासनिक सुधारणांची पुनर्निर्मिती घडवून आणायची आहे, जिचा प्रभाव खाजगी गुंतवणुकीवर पडेल आणि त्याची परिणती तुलनात्मक गतिमान उपयुक्ततांच्या दबावतंत्राच्या माध्यमातून मागास क्षेत्रांची वेगवान वाढ होण्यात होईल. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा गुंतागुंतीचा असून त्याला बहुविध परिमाणे आहेत. अशा गुंतागुंतीच्या समस्येत, व्यूहरचनात्मक आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. आमच्यावर सोपवलेले काम हे आव्हानात्मक आहे. या दृष्टीने, लोकशाही राजनितीत धोरणप्रक्रियेकरिता आवश्यक असलेली वास्तविकता न विसरता, या गुंतागुंतीच्या प्रश्नाला हात घालण्याचा आमचा प्रयत्न आहे. हे आमचे धोरण निरंतर समतोल विकासाला चालना देण्यासाठी वास्तवदर्शी व्यूहरचना तयार करणे आहे.

४.०२.१ समितीपुढील विचारार्थ विषयांनुसार आमच्यावर सोपवण्यात आलेल्या कामगिरीला ऐतिहासिक दृष्टिकोनातून समजून घ्यायला हवे. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळांच्या कामांमध्ये १९९९ ते २०१० या वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सक्रिय सहभाग घेतलेला आहे. या संस्थात्मक व्यवस्थेला तिची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये आणि मर्यादा आहेत. गेल्या दशकात प्रादेशिक असमतोलाच्या समस्येमध्ये विविध मुद्दे आणि प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रादेशिक विकास मंडळे आणि वित्तीय खर्चाच्या तरतुदींची विशेष संस्थात्मक व्यवस्था असतांना सुध्दा प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न टिकून आहे. एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे निधी वळविण्याचे झालेले आरोप आणि त्यासोबतच विकासाची धोरणे तयार करण्याच्या कामी हेतूपुरस्सरपणे केलेले अक्षम्य दुर्लक्ष आणि दिलेली भेदभावाची वागणूक अशा कटू राजकीय मतभेदांसोबत हा असमतोल सद्यकाळातही सुरू आहे. त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे, त्याची परिणती राजकीय नैराश्यामध्ये होत आहे. तसेच, शासनाच्या उद्देशांविषयी 'अविश्वास' आणि संताप वाढतो आहे. (सविस्तर माहितीसाठी 'हितसंबंधितांचा दृष्टिकोन' हे प्रकरण २ पहा) प्रादेशिक तफावती दूर करण्यामधील वाटप यंत्रणेचे अपयश दर्शवून, विचारार्थ विषयात आम्हाला या दृष्टिकोनाचे चिकित्सात्मक आणि सुरूवातीपासून पुन:परीक्षण करण्यास बजावले आहे. आमच्या विचारार्थ विषयांमध्ये दिनांक २७.५.२००९ आणि १०.३.२०१० चे राज्यपालांचे निदेश नमूद करण्यात आहे आहेत. आम्हाला विकासातील समानता सुनिश्चित करण्यासाठी एक धोरण तयार करणे आवश्यक आहे. आतापर्यंत, अलिकडील दोन समित्यांच्या कामांमधून, समतोल प्रादेशिक विकासाबद्दलची अधिक माहिती, दृष्टिकोन मिळालेला आहे. या समित्यांनी क्षेत्रनिहाय लक्ष केंद्रित करून निविष्टीवरील सार्वजनिक खर्चावर प्राथमिकदृष्टया लक्ष केंद्रित केले आणि त्यांनी हे एकपरिमाणात्मक पद्धतीने केले होते. पूर्वीचा दृष्टिकोन हा काहीसा मर्यादित असल्याचे आम्हाला जाणवले आणि त्यामुळे इतर गोष्टींबरोबरच मूळाशी असलेल्या संबंधित प्रश्नांची, त्यांच्या विविध परिमाणांनुसार आणि पैलुंनुसार आमच्या दृष्टिकोनात आणि अहवालात आम्ही छाननी केली आहे.

४.०२.२ नागपूर कराराच्या आशय आणि दृष्टिकोनातून आणि त्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरक बांधिलकीतून समितीला मार्गदर्शन मिळाले. १९६० मध्ये विधानमंडळाला संबोधित करतांना त्यांनी आपल्या भाषणात म्हटले होते, "**या शहराच्या विश्वबंधुत्व लक्षणाचे जतन आणि त्याच्या विकासाच्या गरजांकडे विशेष लक्ष देणे हा भविष्यातील महाराष्ट्र शासनाचा दृढ निश्चय असेल असा विश्वास मी मुंबई शहरातील जनतेला देऊ इच्छितो.**

त्याचप्रमाणे, मी विदर्भातील जनतेला असा विश्वास देऊ इच्छितो की, त्यांच्या रास्त व न्यायोचित हितसंबंधांचे रक्षण केले जाणार की नाही याबाबत त्यांनी काही एक भीती बाळगण्याची गरज नाही. याउलट त्यांचे पुरेपूर संरक्षण केले जाईल आणि त्यांना भावी महाराष्ट्र

शासनाबद्दलच्या समर्पित भावनेने वागविले जाईल. तसेच नागपूर करार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कराराच्या ज्या काही अटी आहेत त्यांचा आदर केला जाईल आणि शक्य असेल तेथे त्याबाबतीत काहीतरी चांगले केले जाईल.

कदाचित सभागृहास याची कल्पना नसेल की, नागपूर करार हा जितका विदर्भास लागू होतो तितकाच तो मराठवाडयासही लागू आहे आणि मला हे ही सांगायला आवडेल की, नागपूर कराराच्या अटी जेथवर मराठवाड्याशी संबंधित असतील तेथवर त्यांची समर्थपणे पूर्तता केली जाईल. या भागातील माझ्या बांधवांना पुनश्च आश्वस्त करण्यासाठी मी मुंबई शहर, विदर्भ आणि मराठवाडयाशी संबंधित धोरणांविषयी जी आपणास ओळख करून दिली त्या धोरणांबाबतचे एक निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवले आहे. कोकणातील जिल्ह्यांच्या तसेच, महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांच्या नियोजित विकासावर भर देण्यासाठी मला एक चांगली संधी मिळाली आहे.

यासंदर्भात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ कडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो, ज्यात मुंबई आणि इतर राज्यांसाठी विशेष तरतुदी अंतर्भूत आहेत. या अनुच्छेदात, स्वतंत्र विकास मंडळे, विकास खर्चासाठी निधीचे समन्याय्य नियत वाटप, तंत्रशिक्षण व्यवसाय प्रशिक्षण यांसाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील नोकरीच्या पर्याप्त संधी प्रतिपादित केल्या आहेत. मुंबई राज्याच्या उर्वरित भागास म्हणजेच उर्वरित महाराष्ट्रास या अनुच्छेदाद्वारे देण्यात आलेले संरक्षण हे यापुढेही सुरू राहील."

४.०२.३ प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न पूर्णपणे समजून घेण्यासाठी आम्ही आंतराष्ट्रीय स्तरावरील अनुभवांवर नजर टाकली आणि संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तींशी विचारविनिमय केला. त्यासोबतच समस्येचे स्वरूप समजून घेण्यासाठी विविध देशांच्या अनुभवांवर दृष्टिक्षेप टाकला आणि सुचवण्यात आलेल्या आणि अवलंब केलेल्या धोरणात्मक उपायांचा आवाका समजून घेतला. महाराष्ट्रातील परिस्थितीचे सूक्ष्म आणि अधिक सविस्तर विश्लेषण आम्हाला हवे आहे. प्रादेशिक असमतोलाचे वेगवेगळे पैलू अभ्यासण्यासाठी आम्ही अनेक अभ्यासयोजना राबवल्या. या अभ्यासांसाठी आम्ही विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमधील प्रमुख विद्वानांचे सहाय्य घेतले. या चाचण्यांची यादी प्रकरण १ मध्ये दिलेली आहे. आमच्या समितीअंतर्गत, विशिष्ट भाग किंवा प्रदेशाचा सखोल अभ्यास करण्यासाठी विविध उपगट तयार करण्यात आले होते. या उपगटांमध्ये त्या संबंधित क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ आणि विद्वान व्यक्ती निमंत्रित सदस्य होते. संबंधित हितसंबंधितांनी दिलेल्या माहितीवर, तज्ज्ञांच्या ज्ञानावर आणि संशोधित सल्ल्यावर आमचा मूलभूत दृष्टिकोन तयार झालेला आहे.

४.०२.४ सर्वात महत्वाचे म्हणजे, समितीने विभागातील वेगवेगळया जिल्हयांचा दौरा करण्याचा निर्णय घेतला. जाहीर नोटीस देऊन आणि सूचना मागवून आम्ही हितसंबंधितांच्या सर्व महत्त्वपूर्ण भागांना भेटी दिल्या आणि त्यांची मते, गाऱ्हाणी आणि धोरणात्मक सल्ले ऐकून घेतले. या दौऱ्यांदरम्यान, आम्हाला सर्व विभागांमधून मोठया संख्येने निवेदने आणि भरीव प्रतिसाद मिळाला. या परस्परप्रक्रियेतून आम्ही बरेच काही शिकलो. या सार्वजनिक परस्परप्रक्रियांच्या काळात राजकीय अस्थैर्याचे स्वरूप, भावनिक उद्वेग आणि प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नाने वेढलेला संताप ठासून भरल्याचे आमच्या अनुभवास आले. आम्हाला सादर केल्या गेलेल्या विविध निवेदनांमध्ये आर्थिक आणि सामाजिक-राजकीय परिस्थितीस फुटणारे विविध फाटे आणि सर्वांना सारखा वाटा या दृष्टिकोनातील ***'अंगभूत असमानता'*** यावर प्रकाश टाकलेला आहे. आम्ही महत्त्वपूर्ण प्रतिज्ञापत्रांचा आणि निवेदनांचा सारांश आणि त्यातून आम्हाला जाणवलेल्या गोष्टी मागील प्रकरणात नमूद केल्या आहेत.

४.०२.५ आम्ही तज्ज्ञ, विद्वान, हितसंबंधित व्यक्ती आणि प्रशासक, अधिक महत्वाचे म्हणजे, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींशी केलेल्या साधकबाधत चर्चेमधून प्रादेशिक असमतोलाशी सामना करण्याकरिता जागरूक आर्थिक धोरणाची आवश्यकता आत्यंतिकपणे सुचवण्यात आली. परिणामस्वरूप ***समितीला तीव्रतेने जाणवले की यात आर्थिक, सामाजिक– सांस्कृतिक, भौगोलिक, प्रशासनिक गुणवत्तेशी आणि नेतृत्वाशी संबंधित संस्थात्मक असे अनेक घटक प्रादेशिक विषमतेवर महत्त्वाचा प्रभाव पाडत आहेत.***

४.०२.६ प्रत्येक प्रदेशात अनुभवास आलेल्या आर्थिक आणि सामाजिक विकासाची एक निश्चित ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. मराठी बोलणाऱ्या महाराष्ट्र राज्यात जे तीन विभाग विलीन करण्यात आले त्यांचे सामाजिक–आर्थिक इतिहास हे खूपच वेगवेगळे आहेत. पश्चिम महाराष्ट्राला प्रागतिक सामाजिक चळवळींचा, अलिकडील आधुनिक मुक्त शिक्षणाचा उदय आणि प्रसार यांचा दीर्घ वारसा आहे. पूर्वीच्या सामाजिक श्रेणीरचनेस आव्हान दिले गेले होते आणि अशा सामाजिक क्रांतीचे प्रतिनिधित्व करणारे नवीन राजकीय नेतृत्व हे यापूर्वीच आघाडीवर होते. राजकीय प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी वेगवेगळया समाजात मोठी राजकीय एकजूट आणि एकमत होते. मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात मात्र अशा विकासाच्या वाटचालीची तीव्रता ही सुरूवातीला कमी होती आणि या भेदामुळे, राजकीय प्रक्रिया तसेच प्रशासकीय यंत्रणेवर याचा थोडा परिणाम झाला असेल.

४.०२.७ राजकीय प्रतिनिधित्व आणि संघटन यामध्ये परावर्तित झालेले या भागातील सामाजिक घटक हे सुध्दा वेगवेगळे आहेत. १९९५ पासून विविध पक्षांच्या एकत्रिकरणातून निवडणुकीचे राजकारण आकारास आले आहे. आपापल्या विभागात स्वतंत्र पक्षांनी मिळवलेल्या निवडणुकीतील पाठिंब्याच्या स्वरुपामुळे, युती असलेल्यांना प्रादेशिकता आणि प्रतिनिधित्व यांची सांगड घालण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला, युती/आघाडी च्या माध्यमातून मिळालेल्या प्रादेशिक राजकीय प्रतिनिधित्वामुळेच कदाचित दुर्लक्षाची आणि राजकीय नैराश्याची भावना वाढीस लागली असावी.

४.०२.०८ वरील परिस्थिती विचारात घेता, दिसून येणाऱ्या वाढीमध्ये आणि विभागांच्या न्याय्य आकांक्षा, प्रशासन आणि विकेंद्रीकरणाची महत्त्वाची भूमिका, राजकोषीय वास्तविकतेमध्ये बसू शकणारे धोरणातील अनुकूलन आणि संस्थात्मक क्षमतेच्या उभारणीची गरज यामध्ये आम्ही बहुआयामी दृष्टिकोन अवलंबला. **आमचा विश्वास आहे की सामाजिक–राजकीय आणि आर्थिक सबलीकरण हेच कळीचे मुद्दे असून ते आम्ही शिक्षण आणि प्रशासन यासंबंधी (खास करून विकेंद्रीकरणात) केलेल्या शिफारशींच्या माध्यमातून साध्य होऊ शकतात.** एका बाजूस आमचा दृष्टिकोन महत्त्वाच्या सार्वजनिक मालमत्तेच्या उपयोगातील समानतेवर भर देतो आणि दुसऱ्या बाजूस विकासात मागे पडलेल्या प्रदेशांच्या अभिवृध्दीकरिता अधिक न्याय्य वाटपांसह योजना तयार करणारे प्रशासन यावर जोर देतो. आमचा असा विश्वास आहे की, सामाजिक नवोउद्यमशीलतेशी जोडलेल्या विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून, ज्याअर्थी अभिवृध्दीमध्ये केंद्रीकरणाचे घटक असतील त्याअर्थी रोजगारामध्ये वाढ करणाऱ्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांना प्रोत्साहन देता येऊ शकेल. **आम्हाला असे आढळून आले आहे की, याकरिता कोणतीही जलद उपाययोजना नाही आणि सामाजिक व राजकीय नेतृत्वाच्या एकविचाराने केलेल्या प्रयत्नासह कुशल मनुष्यबळाचा वापर हेच यावरील उत्तर आहे.** शासनाच्या धोरणांच्या पुनर्निमितीला सोबत घेणारा असा दृष्टिकोन सर्व क्षेत्रातील सुप्त वाढीच्या सुधारित आणि संपूर्ण उपयुक्ततेला आघाडीवर नेईल.

४.१ प्रादेशिक असमतोलासंबंधी धोरणे – एक मागोवा

४.१.१ सगळया प्रदेशांमध्ये, विकासाची पातळी, जीवनमान आणि उपजीविकेचा दर्जा आणि आर्थिक व सामाजिक भेद या बाबी क्वचितच सारख्या असतात. तथापि, या परिमाणांमधील विषमता आणि तफावत ही खूपच जास्त होती असा तेथील इतिहास आहे. त्यात भर म्हणजे, सामाजिक आणि राजकीयदृष्टया स्वीकारार्ह असलेल्या पातळीपेक्षाही बरेच अधिक मिळू शकते हे त्यांना समजले. अशा परिस्थितीत, विकासातील उत्पन्न स्तरातील आणि आर्थिक व सामाजिक संधी यामधील फरक हा क्षेत्रीय असमतोल म्हणून उदयास आला. काही उदाहरणांमध्ये मागासलेपणाला, सहज ओळखता येणारी भौगोलिक लक्षणे आहेत. (जसे की, दीर्घकाळापासूनची दुष्काळग्रस्त असलेली क्षेत्रे, जनजाती क्षेत्रे, डोंगराळ क्षेत्रे, दीर्घकाळापासून पुरग्रस्त असलेली क्षेत्रे, क्षारतेमुळे बाधित झालेली किनारी क्षेत्रे इ.) राज्यांच्या भाषावार पुनर्रचनेच्या परिणामस्वरुप विदर्भ आणि मराठवाडा हे **'महाराष्ट्रा'**चे भाग बनले. पुनरर्चनेच्या वेळी या दोन क्षेत्रांचा संबध्द मागासलेपणा हा पुरेसा ज्ञात होता. त्यात भर म्हणजे, या क्षेत्रातील विकास प्रक्रिया आणि संधी यांमध्ये भेदभावविरहीत समतेचे विवक्षित पातळीपर्यंत परिरक्षण करणे हा नागपूर कराराचा मूलाधार आहे. अशा तऱ्हेने, विकासातील भेदांची व्याप्ती लाक्षणिक व त्यासोबतच निदानोपयोगी तऱ्हेने अर्थपूर्ण ठरतील असे यथोचित निर्देशांक निर्धारित करण्याची आता गरज आहे. विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्राचा उर्वरित भाग सर्वसाधारणत: याचा उल्लेख 'उर्वरित महाराष्ट्र' असा केला जातो, ही नागपूर कराराअन्वये निर्धारित केलेली क्षेत्रे भौगोलिक आणि ऐतिहासिकदृष्टया एकमेकांच्या समीप आहेत. तथापि, या क्षेत्रांमध्ये लक्षात घेण्याजोगी विविधता आहे. या सर्वांमध्ये बहुधा कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त क्षेत्रे म्हणून ओळखले जाणारे अनेक तालुके आहेत. त्याचप्रमाणे, उर्वरित महाराष्ट्र व विदर्भातही अनेक पूर्वापार ***आदिवासी*** तालुके आहेत. ***हे दोन्हीही अतिशय मागासलेले विभाग मानले जातात.*** ज्या ठिकाणी त्यांच्या भौगोलिक सीमा या अनिश्चित नाहीत व व्यवस्थित निर्धारित केल्या आहेत, आणि त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यास आम्हाला बाध्य करण्याईतपत महत्त्वाच्या आहेत तेथे 'आम्ही त्यांचा समावेश आभासी किंवा कल्पित क्षेत्रे म्हणून केला आहे'. (एका अर्थाने, अशाप्रकारे आम्ही आमच्या विचारार्थ विषयाच्या अर्थाची व्याप्ती विस्तारली आहे.)

४.१.२ विकासातील तफावती आणि भिन्नता यांना असंख्य परिमाणे आणि लक्षणे आहेत. म्हणून, बहुविध तथ्ये आणि निष्कर्ष चलांनी त्यांचे विवरण आणि मापन करण्याची गरज आहे. विकसित आणि अविकसित क्षेत्रांमधील समानता आणि असमानतांचा चोखपणे गोषवारा देणाऱ्या सुयोग्य 'बहुवस्तुस्थिती निर्देशांकांची' एकत्रित उभारणी करण्यामध्ये अनेक विद्वान आणि तज्ज्ञ समित्यांच्या प्रयत्नांचा वाटा आहे. उदाहरणार्थ, पांडे समिती (१९६८), चक्रवर्ती समिती (१९७१), मागास क्षेत्रांच्या विकासावरील राष्ट्रीय समिती (१९८१) किंवा अगदी अलिकडील 'वाढत्या प्रादेशिक असमतोलाच्या निवारणावरील आंतर मंत्रालयीन कृती गटाने' (नियोजन आयोग,२००५) निर्देशांक आधारित पद्धतीचा उपयोग केला आहे. मागास म्हणून क्षेत्रांची निश्चिती करणे हे आमचे मुख्य काम नव्हे. आमच्यासाठी महाराष्ट्रातील मागास असलेली 'क्षेत्रे' व 'प्रांत' हे आधीच निश्चित केलेले व ज्ञात आहेत. म्हणून आम्ही फक्त धोरणाची रचना आणि स्रोतांचे निदर्शक वाटप या संदर्भातील मागासलेपणाची निर्देशके गृहीत धरली आहेत.

४.१.३ महाराष्ट्रातील, शासनाच्या विकास प्रयत्नांची 'प्रत्यक्ष फलनिष्पत्ती' या दृष्टिने विकासात मागे पडलेल्या जिल्ह्यांचा अनुशेष आणि विकासातील तफावत सत्य शोधन समिती (किंवा **दांडेकर समिती**–१९८४) ने निर्धारित केली. हे करत असतांना, 'अनुशेष' दूर करण्यासाठीचे आर्थिक अंदाजपत्रक या समितीने सादर केले. विभागाविभागातील अनुशेष निर्धारित केल्यानंतर या समितीने प्रत्येक जिह्यांतील अनुशेषाची बेरीज केली आणि अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया कशाप्रकारे सुरू केली जावी याची तपासणी केली. आपण येथे असेही म्हणू शकतो की, नागपूर करारातील मूळ आशयाची शब्दश: व पुरेपूर अंमलबजावणी न होण्याकडे सुध्दा दांडेकर समितीने कठोरपणे निर्देश केलेला आहे. **निर्देशांक व अनुशेष समिती** ने (१९९५) खाली दिलेल्या पध्दतीचा अवलंब केला आहे.

(एक) जेथे सार्वजनिक खर्च हाती घेतला आहे अशा क्षेत्रांपुरतेच हे निर्देशांक मर्यादित आहेत.

(दोन) विश्लेषणासाठी जिल्हा हा एकक म्हणून घेतला आहे.

(तीन) विभागातील भौतिक अनुशेष अंदाजित करण्याकरिता राज्याची सरासरी आणि जिल्ह्याची सरासरी यातील फरकाचा वापर करण्यात आला आहे. राज्याच्या क्षेत्रनिहाय सरासरीखालील जिल्ह्यांचा विचार अनुशेष दूर करण्यासाठी केला आहे.

(चार) प्रत्येक जिल्ह्यातील विभागवार भौतिक अनुशेष अंदाजित केल्यानंतर, त्यांनी चालू किंमतीवरील मूल्य एकक वापरून त्याचे वित्तीय अनुशेषात रुपांतर केले आहे.

(पाच) 'सर्वांगीण विकासाची पातळी' मोजण्यासाठी विकासाच्या काही संयुक्त निर्देशांकांच्या मदतीने त्यांचे मोजमाप करणे समितीला आवश्यक वाटले.

या समितीने प्रत्येक क्षेत्रातील विभागवार खर्चवाटपाचा आढावा घेतला आणि त्याची तुलना दांडेकर समितीच्या शिफारशींशी केली आहे.

निर्देशांक व अनुशेष समितीने प्रत्येक विभाग आणि काही उपविभागांसाठी निर्देशांकांचे परिक्षण केले त्यापैकी काही विकासाच्या संबध्द स्तरांचे मापन करण्याकरिता निवडलेली होती. संपूर्ण राज्याने एकत्रितरीत्या गाठलेल्या स्तरांच्या संदर्भात संबंधित स्तरांचे मापन केलेले आहे. राज्याच्या सरासरीपेक्षा एखाद्या जिल्ह्याच्या सरासरीत असलेली तूट ही त्या विभागातील किंवा उपविभागातील त्या जिल्ह्याचा 'अनुशेष' म्हणून निश्चित करण्यात आली. विविध विभागातील अनुशेषाच्या एकत्रिकरणाच्या दृष्टीने आणि प्रत्येक जिल्हा विभाग किंवा भागासाठीचे सादरीकरण उपलब्ध करून देण्याकरिता प्रत्यक्ष अनुशेष दूर करण्यासाठीची चालू किंमतीवर आधारित असलेली किंमत समितीने अंदाजित केली. या अनुशेष मूल्यामध्ये भांडवली मूल्य आणि आवर्ती व अनावर्ती खर्च समाविष्ट आहेत.

संबंधित स्तरांच्या तुलनेकरिता वापरलेली राज्याची सरासरी ही काल्पनिक सरासरी असून तो स्थितीजन्य आकडा नसल्याचे समितीने दाखवून दिले आहे. सर्व जिल्ह्यांमधील सर्वसाधारण वाढीची प्रक्रिया आणि सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांमधील अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया यापुढे ती जास्त आहे. **त्यामुळे अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया ही, मागास जिल्ह्यांचा संपूर्ण विकास करण्याच्या प्रयत्नांचाच एक भाग असल्याचा अन्वयार्थ लावायला हवा.**

४.२ सत्यशोधन समिती आणि निर्देशांक व अनुशेष समिती : एक संक्षिप्त आढावा:

यापूर्वीच दाखवून दिल्याप्रमाणे, आधीच्या समित्यांचे आणि त्यासोबतच वैयक्तिक संशोधनाचे अनेक अहवाल उपलब्ध आहेत. या प्रश्नांवर मुबलक आणि विविध साहित्य उपलब्ध आहे. या अभ्यासांचा निवडक सारांश आम्ही येथे सादर केला आहे, आमच्या मते तो विचार प्रक्रियेला आणि धोरण निश्चितीला उपयुक्त दिशा देणारा ठरेल. अलिकडील शिफारशींपैकी काही शिफारशी कार्यरत धोरणामध्ये समाविष्ट असतीलच असे नाही. असे असूनही, त्यांच्यात गांभीर्यपूर्वक दखल घेण्याजोग्या व अंमलात आणण्याजोग्या काही पुरेशा उपयुक्त सूचना आणि कल्पना आहेत. **सत्यशोधन समिती** (१९८३) आणि **निर्देशांक व अनुशेष समिती** (१९९७) या दोन महत्त्वाच्या समित्यांनी प्रादेशिक असमतोलाबद्दलचा दृष्टिकोन आणि धोरण कल्पना यांना बऱ्यापैकी आकार दिला आहे. त्यांच्या दृष्टिकोनामध्येही समानता दिसून येते. पहिली समानता ही, प्रत्यक्ष निर्देशांकांच्या यशस्वी संपादनांमध्ये समानीकरण करण्यासाठी आवश्यक वित्तीय खर्चाची गणना करण्याच्या पध्दतीत दिसून येते. ही पध्दती मागासलेपणाची गणना करण्यासाठीची एक ठराविक

वाक्प्रचार आणि त्यासोबतच मागासलेपणा दूर करण्याचे एक राजकोषीय साधन बनली आहे. विचाराचा हा प्रकार लोकभावनेवर आधारलेला असून तो मुठी आवळण्याच्या आणि घट्ट पकडण्याच्या स्वरूपाचा आहे; आम्ही त्याचा विचार खालील स्वतंत्र विभागात करू.

४.२.१ **सत्यशोधन समिती किंवा दांडेकर समिती** (१९८३) ने जिल्हा नियोजन हा एक अविभाज्य भाग असलेल्या, राज्यातील नियोजन आणि विकासाच्या सध्याच्या आराखड्यात शिफारशी सादर केल्या आहेत. समितीने असा सल्ला दिला आहे की, योजनावरील मान्यता मिळालेला खर्च त्यांनी तपासला आहे आणि म्हणून, तो विवक्षित अनुशेष दूर करण्याशी संबंधित असल्याने तो तथाकथित 'विवक्षित अनुशेष दूर करण्यासाठीचा राज्य संकोष' यामध्ये प्रस्थापित करायला हवा. जिल्ह्यांतर्गत वाटपापुरताच फक्त समितीचा संबंध होता, असे समितीने स्पष्ट केले आहे. त्यांनी राज्य संकोषातील १५ टक्के निधी (अ) अनुशेषाशी संबंधित नसलेली सध्या सुरू असलेली विवक्षित कामे/प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि (ब) नैसर्गिक वाढीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, देण्याचे सुचवले आहे. (ब) करिता राखून ठेवलेली रक्कम ही फक्त लोकसंख्येनुसार सर्व जिल्ह्यांमध्ये वितरीत केली जावी. उर्वरित ८५ टक्के रक्कम ही विवक्षित अनुशेष दूर करण्यासाठी उपलब्ध करून दयावी आणि ती सर्व अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना त्यांच्या अनुशेषाच्या प्रमाणात योजनानिहाय दिली जायला हवी होती, असे या समितीने सुचवले होते. अशारीतीने या समितीने सुचवलेल्या योजनेकरिता (अ) प्रत्येक वर्षी वार्षिक योजनेत विशिष्ट संबध्द विभाग, उपविभाग, योजना, कार्यक्रमांसाठी मान्य झालेल्या खर्चाची निश्चिती करणे (ब) चालू कामे पूर्ण करण्याकरिता आणि नैसर्गिक वाढीच्या गरजा पूर्ण करण्याकरिता १५ टक्के खर्च राखून ठेवणे (क) राज्याच्या सरासरीच्या तुलनेत अनुशेषाच्या प्रमाणानुसार सर्व अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना विभागनिहाय उर्वरित ८५टक्के रकमेचे वाटप करणे, आवश्यक आहे.

४.२.२ या समितीने अनुशेष दूर करण्यासाठी एखादा 'कार्यक्रम' सुरू करण्याऐवजी, विकासातील तफावती कमी करणारी निरंतर प्रक्रिया, म्हणजेच **'वरच्यांना खाली खेचण्यापेक्षा खालच्यांना उन्नत करून विकास साधण्याचे पर्यायी धोरण'** प्रस्तावित केले आहे. सत्यशोधन समितीला असा विश्वास आहे की, या समितीने प्रस्तावित केल्याप्रमाणे विकासातील तफावत दूर करण्याची अशी निरंतर प्रक्रिया, ही विद्यमान तफावतींमध्ये वाढ होणार नाही याची खात्री करून घेईल आणि जर नवीन काही तफावती उद्‌भवल्या तर त्या बेदखल केल्या जाणार नाहीत.

४.२.२.१ प्रादेशिक असमतोल पुन्हा उद्‌भवू नये याकरिता समितीने सुचवलेल्या काही दीर्घमुदतीच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत:

औद्योगिक विकास – निरनिराळया ठिकाणी उभारलेल्या उद्योगांमध्ये आश्वासक प्रगती योजना प्रभावी ठरण्याकरिता अंतराचा घटक लक्षात घेणे आणि अधिक अंतरावर असलेल्या क्षेत्रांना पुरेशी भरपाई देणे हे अत्यावश्यक आहे, असा समितीचा दृष्टिकोन होता.

कृषि – विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये कसदार काळी कापसाची मृदा असल्याचे लक्षात घेऊन, विशेषत: पाणी वापराच्या पद्धती व स्वरूप याबाबतीत विदर्भातील ओलिताखालील पीक पध्दतीच्या समस्येकडे संशोधनाचा रोख वळवला पाहिजे. आधीच्या प्रयोगातून, पाणी वापराचे अचूक तंत्रज्ञान आणि सुयोग्य पीक पध्दती यावर सिंचनामधील वाढीव गुंतवणुकीचे अपेक्षित फायदे अवलंबून असल्याचे सिध्द झाले आहे.

सिंचन– समितीने विकासाचे निदर्शक म्हणून, प्रमाणित रबी एकरांइतक्या क्षेत्रातील निव्वळ पेरणीच्या प्रमाणास सिंचन क्षमता म्हणून गृहीत धरले आहे. सिंचन क्षेत्राच्या बाबतीत समितीच्या शिफारशी या द्विविध आहेत.

(अ) निर्देशांकांच्या आधारे आणि समितीने दिलेल्या अनुशेषाच्या अंदाजानुसार तफावती कमी करणे आणि

(ब) फक्त ओलिताखालील क्षेत्रांनुसार नव्हे तर पाण्याच्या ठरीव प्रमाणानुसार वेगवेगळे भाग/जिल्हे/तालुक्यांमधील पाटबंधारे विकासाच्या उपायांमध्ये सुधारणा करणे.

जिल्ह्यांतर्गत असलेल्या तफावती या मोठया प्रमाणात असल्याने सिंचन क्षमतेच्या बाबतीत सुध्दा समितीने, **दुष्काळग्रस्त भागाचे** स्वतंत्र विश्लेषण आणि 'तालुका पातळीवरील विश्लेषणाचे' महत्त्वदेखील सांगितले आहे.

४.२.२.२ *सहकार:* राज्य शासनाने १:९ या प्रमाणात सुतगिरण्यांचा भांडवली वाटा देणे आवश्यक आहे. समितीसमोर ही बाब सुध्दा आली होती की, पश्चिम महाराष्ट्रातील कृषि व ग्रामीण विकासाकरिता सहकारी साखर कारखान्यांनी एक भक्कम पाया पुरवलेला आहे आणि मराठवाडा आणि विदर्भातील विकासाकरितादेखील कापूस आणि तेलबिया प्रक्रिया सहकारी तत्त्वावर चालवून याचप्रकारचा भक्कम आधार पुरवणे शक्य आहे. शासनाने ज्याप्रमाणे उसाकरिता मजबूत प्रशासकीय, वित्तीय आणि राजकीय पाठबळ दिले, त्याच प्रकारचे पाठबळ शासन कापूस आणि तेलबियांना देईल असा सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोन समितीने बाळगलेला होता.

४.२.२.३ *नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व:* मागे पडलेल्या जिल्ह्यांच्या विकासाला वेग देण्याकरिता त्या जिल्ह्यांतील विवक्षित विभागांमधील प्रशासनाची आणि सामान्य प्रशासनातील बळकटीकरणाची गरज असल्याचेही समितीचे मत होते. त्यामुळे समितीने विविध जिल्ह्यांमधील विविध विभागातील सध्या असलेल्या कर्मचारीवर्गाचा विनाविलंब आढावा घेण्याची आणि आवश्यक असेल तेथे त्यात वाढ करण्याची शिफारस केली आहे.

४.२.२.४ *वैधानिक देखरेख प्राधिकरण:* विकासातील प्रादेशिक तफावती कमी करण्याची प्रक्रिया, कार्यक्रम व धोरण यावर देखरेख ठेवण्याकरिता एका वैधानिक देखरेख प्राधिकरणाची स्थापना करण्याची शिफारस समितीने केली आहे. समितीने या बाबतीत संपूर्ण राज्यासाठी एक सदस्यीय, अ-राजकीय, न्यायिकवत प्राधिकरण सुचवले आहे. त्यांनी असेही प्रस्तावित केले आहे की, शासनाने विरोधी पक्षनेत्याशी विचारविनिमय करून अशा व्यक्तीची पाच वर्षांच्या कालावधीसाठी नेमणूक करावी. त्यानंतर ही व्यक्ती दरवर्षी, राज्यशासनाकरिता एक अहवाल तयार करील, व राज्य शासन तो अहवाल विधानमंडळासमोर ठेवेल.

४.२.२.५ *विकास मंडळे:* अनुच्छेद ३७१(२) अन्वये नेमावयाच्या वैधानिक मंडळांच्या प्रस्तावाचे परीक्षण सुध्दा समितीने केले आहे. समितीतील सदस्यांचे बहुमत या पर्यायाच्या बाजूने नव्हते. तथापि, मा. सदस्य श्री. बी.ए. कुळकर्णी यांनी विकास मंडळे स्थापन करण्याच्या बाजूने युक्तिवाद केला व एक भिन्नमत दर्शवणारी टिप्पणी दिली. याचप्रकारे, प्रा. एस.ए. देशपांडे आणि श्री. एस.ए. दवे यांनी विकास मंडळांच्या स्थापनेच्या बाजूने पूरक टिप्पणी दिली.

४.२.२.६ *इतर भिन्नमत दर्शविणाऱ्या टिप्पण्या:* समितीचे आणखी एक सदस्य प्रा. व्ही. व्ही. बोरकर, यांनी एक भिन्नमत दर्शविणारी टिप्पणी लिहिली. त्यांच्या टिप्पणीमध्ये त्यांनी समितीच्या दृष्टिकोनाविरुध्द युक्तिवाद केला आहे. 'समितीने वाणिज्य क्षेत्राची व 'असमान पायाभूत सुविधांची' गांभीर्यपूर्वक दखल घेतली नाही आणि तिने हेतुपुरस्सर 'खाजगी क्षेत्राने बजावलेली भूमिका' दुर्लक्षित केली असा युक्तिवाद त्यांनी केला. ज्या प्रकरणी पुरेशा प्रमाणात आधारसामुग्री उपलब्ध नव्हती तेथे प्रातिनिधिक चलांचा वापर करण्यापासून समितीने हेतुपुरस्सर स्वत:ला दूर ठेवले, असाही युक्तिवाद त्यांनी केला. कोणताही बांधील आणि 'कालबध्द' कार्यक्रम न सुचवण्याबाबत' सुध्दा त्यांनी समितीच्या दृष्टिकोनावर टीका केली आहे.

४.२.३ महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या **निर्देशांक व अनुशेष समिती (१९९७)** ने कालबध्द कार्यक्रमाच्या माध्यमातून अनुशेष दूर करण्याची शिफारस केली. समतोल प्रादेशिक विकासाकरिता अनुशेष दूर करण्यास प्रथम प्राधान्य दयावे. याकरिता पुढील तत्त्वांची शिफारस करण्यात आली आहे :

(एक) राज्याच्या जिल्ह्यांमध्ये, एकूण अनुशेषातील त्यांच्या हिश्श्याच्या आधारावर अनुशेषाच्या संवितरणाची तरतूद करण्यात यावी.

(दोन) पुढील पद्धतीने एकूण अनुशेष संपूर्णत: दूर व्हावा म्हणून अनुशेष दूर करण्यासाठी वार्षिक तरतुदींचे वाटप करण्यात यावे :

अ) तंत्रशिक्षणाचा अनुशेष ३ वर्षात संपूर्णत: दूर करण्यात यावा.

ब) सिंचन व रस्ते या क्षेत्रातील संपूर्ण अनुशेष ७ वर्षात दूर करण्यात यावा.

क) या समितीच्या शिफारशी ९७-९८ पासून म्हणजे ९ व्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीपासून अंमलात आणण्यात याव्यात.

ड) राज्यस्तर व जिल्हास्तरामधील योजनांमधील अनुशेष दूर करण्यासाठी क्षेत्रीय वाटपाचे संवितरण, राज्य योजनेकडे असलेल्या जिल्हा योजनेच्या समतुल्य प्रमाणात असावे.

४.२.३.१ अनुशेष दूर करण्याच्या प्रक्रियेतील काही मर्यादा, निर्देशांक व अनुशेष समितीने लक्षात आणून दिल्याआहेत.

(एक) "हा अनुशेष काढण्याच्या काही वर्षे अगोदरचा राज्याचा सरासरी अनुशेष लक्षात घेऊन अनुशेष काढण्यात येत असल्यामुळे या साठीच्या मर्यादांची निर्मिती या प्रक्रियेअंतर्गत झाली आहे. राज्याची सरासरी ही स्थितिशील आकडेवारी नसून ती प्रत्येक वर्षी सर्व जिल्ह्यांतील सर्वसाधारण विकासात्मक कार्यामुळे, अनुशेष दूर करण्याच्या प्रक्रियेमुळे तसेच प्रगत जिल्ह्यांचा त्यामानाने होत असलेल्या जलद विकासामुळेही वाढत जाणारी आहे. प्रदीर्घ कालावधीपासून अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया ही निरंतर सरासरीच असल्याने अनुशेष जिल्हे लक्ष्यित सरासरीपर्यंत पोहचू शकणाऱ्या लक्ष्यित सरासरीपेक्षा ती सारत: मोठी आहे. हा मार्ग काल्पनिक सरासरीचा एक अंतहीन पाठलाग आहे."

(दोन) "अनुशेष दूर करण्याच्या प्रक्रियेचा प्रभाव कालमर्यादेवर अवलंबून असतो. जर ही कायलमर्यादा खूप मोठी असेल तर राज्याची विद्यमान सरासरी व लक्ष्यित राज्याची सरासरी यांमधील अंतर खूप मोठे असेल त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया निष्फळ ठरेल. म्हणून ही समिती कालमर्यादित कार्यक्रम व वाटप अनुसूचीची शिफारस करते."

(तीन) "तुटपुंज्या वाटपामुळे प्रक्रियेचा कालावधी लांबतो. म्हणून ही समिती, अनुसूची नुसार काटेकोर पुरेसे वाटप करण्याची शिफारस करते."

४.२.३.२ प्रादेशिक समतोल राखण्यासाठी विकास कार्यक्रमांचा भडिमार केवळ अनुशेष दूर करण्याच्या प्रक्रियेने प्रादेशिक समतोल राखता येणे शक्य नाही, असे समितीचे मत होते. नियोजित विकासाच्या संपूर्ण कार्यास सकारात्मक दिशा देण्याची गरज होती. नियोजनबद्ध विकास करण्यासाठीच्या प्रयत्नांचे समर्थन करून अनेकविध क्षेत्रांविषयी विनिर्दिष्ट शिफारशी करण्यात आल्या.

अ. व्यापक दीर्घकालीन नियोजन

ब. समान वाटप

क. मागास जिल्ह्यांमध्ये प्रशासनाची पकड मजबूत करणे

यावर जोर देण्यात आला आहे.

समितीने मराठवाडा प्रदेशात नवीन विभागांची निर्मिती करण्याचे सुचविले आहे. काही जिल्हे हे मोठ्या प्रमाणात अवर्षण प्रवण तालुके असल्याने नवीन विभागाची निर्मिती करतांना सर्व विभागांच्या प्रशासनाची त्यावरील पकड मजबूत करण्याची आवश्यकता आहे. समितीने विदर्भ आणि मराठवाड्यातील मोठ्या तालुक्यांचे विभाजन करण्याची सुद्धा शिफारस केली. त्याचबरोबर विदर्भ प्रदेशाच्या विकासासाठी अतिरिक्त महसुली तालुके व जिल्हे व आयुक्तांचे प्रदेश निर्माण करून प्रशासकीय हातभार लावण्याची गरज असल्याचे समितीचे मत होते. निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल व त्याच्या शिफारशी देखील शासनाने स्वीकारल्या नव्हत्या. समितीने तयार केलेला अनुशेषाचा सुधारित अंदाज राज्यपालांनी स्वीकृत केला नव्हता व आंमलात आणला नव्हता.

४.२.३.३ महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांचे निदेश

संविधानाच्या सातव्या सुधारणेद्वारे मूळ अनुच्छेद ३७१ वगळण्यात आला आणि त्याऐवजी अनुच्छेद ३७१ (१) व ३७१ (२) दाखल करण्यात आले. व्यवहार्य असेल तेथवर नागपूर कराराला संविधानिक देण्याच्या उद्देशाने अनुच्छेद ३७१ (२) दाखल करण्यात आले. उपखंड (ख) व (ग) मधील विनिर्दिष्ट बाबींसाठी विशेष जबाबदारी महाराष्ट्राच्या राज्यपालांकडे सोपविण्यात आली. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, १९९४ च्या नियम ७ अनुसार, महाराष्ट्राच्या राज्यपालांना संपूर्ण राज्यांच्या गरजांच्या अधीनतेने विकास मंडळांसाठी समन्यायी निधीचे संवितरण करण्यात येत असल्याची खातरजमा करण्याची विशेष जबाबदारी देण्यात आली. नियम ८ अनुसार राज्यपालांनी केलेले निधीचे वाटप किंवा नियतव्यय राज्य विधानमंडळाच्या पुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात (एएफएस) दर्शविण्यात येईल. ज्या प्रदेशासाठी व ज्या प्रयोजनासाठी निधीचे वाटप करण्यात आले असेल त्यासाठी तो वापरणे बंधनकारक केले असून हा निधी इतर प्रदेशाकडे वळविण्यात व उपयोजित करण्यात येऊ नये.

४.२.३.४ २००१ पासून राज्यपालांकडून राज्य शासनाला निदेश देण्यात येत आहेत. अनुशेष लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्रासाठी ५० टक्के, २५ टक्के व २५ टक्के असे प्रमाण ठेवण्याबाबत २००१ चे निदेश दृष्टीसमोर ठेवण्यात आले. तथापि, २०१० च्या निदेशनाने असे लक्षात आणून दिले की, सिंचनातील वित्तीय अनुशेषाकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यामुळे सिंचन क्षेत्रातील उर्वरित बिगर- विभागणीयोग्य रकमेच्या प्रयोजनासाठी शेष विभागणीयोग्य नसलेल्या रकमेच्या प्रयोजनाच्या अनुशेषाकरिता स्वतंत्रपणे लक्ष देण्यात आले नाही त्यामुळे लोकसंख्या व निव्वळ पेरणीक्षेत्र हे घटक दुर्लक्षित राहीले आहेत. २०१० च्या निदेशांद्वारे असे बंधनकारक केले की, "उर्वरित अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक ती तरतूद केल्यानंतर विभागणीयोग्य योजना खर्च हा लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्राच्या आधारे प्रत्येक घटकासाठी तिन्ही प्रदेशामध्ये ५० टक्के असा विभागण्यात यावा."

४.२.३.५ २००५-२००६ च्या निदेशात राज्यपालांनी असे निदर्शनास आणून दिले की, गेल्या चार वर्षापासून राज्यपालांच्या निदेशानुसार सिंचन क्षेत्रातील खर्चाचे वाटप केले तरी राज्यपालांच्या निदेशात करारनिविष्ट केलेल्या टक्केवारीप्रमाणे प्रदेश निहाय खर्चाचे संवितरण करण्यात आले नाही असे दिसून आले आहे.

आधारभूत खर्चाच्या प्रमाणासारखे वित्तीय वर्षाची गणना करण्यासाठीच्या पद्धतीतील असंबद्ध बाबी दि.१ एप्रिल,२००० पासून होत्या आणि उर्वरित अनुशेषाचे ठरीव प्रमाण ठरविण्यासाठीच्या

चलनवाढीसाठी कोणताही समझोता करण्यात आला नव्हता. त्यामुळे **भौतिक व वित्तीय अनुशेषामध्ये विस्कळीतपणा** दिसून आला. असे सन २००९ च्या निदेशनात यथायोग्य निदर्शनास आणून देण्यात आले.

४.२.३.६ सन २००९ च्या राज्यपालांच्या निदेशातून असे लक्षात आणून देण्यात आले की, सन २००७-०८ व २००८-०९ या वर्षामध्ये विदर्भ प्रदेशातील लक्षणीय तूट असली तरी याच कालावधीत उर्वरित महाराष्ट्र प्रदेशाचा अधिक खर्चाकडे कल होता. असेही लक्षात आणून देण्यात आले होते की, **अनुशेष जिल्ह्यांसाठीचा निधी बिगर-अनुशेष जिल्ह्यांसाठी वापरण्यात आला. सन २००९ च्या राज्यपालांच्या निदेशात आणखी असेही लक्षात आणून दिले की, खर्च न केलेली शिल्लक रक्कमही होती.**

४.२.३.७ अंतिमत: २००९ च्या निदेशांमध्ये असे नमूद केले आहे की, "**प्रदेशांसाठी निधीच्या नियतवाटपाची सुनिश्चित तत्वे** असूनदेखील प्रत्यक्ष खर्च करताना या निदेशांचे अनुपालन करण्यात आलेले नाही. राज्यपालांनुसार याची कारणे निधीचे वाटप व खर्च यासाठी पुरेसे नियंत्रण आणि सनियंत्रण यंत्रणेचा अभाव असणे" ही होती.

४.३ प्रमुख पध्दतीमीमांसात्मक बाबी व विचार

४.३.१ **सत्यशोधन समितीचा दृष्टिकोन:** महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हाताळताना आमचा दृष्टिकोन हा, धोरणांच्या पूर्वेतिहासाच्या संदर्भात पाहण्यात यावा. सत्यशोधन समितीचा अहवाल हा, जरी त्याला अधिकृतरीत्या स्वीकारण्यात आलेले नसले तरी, महत्त्वपूर्ण अहवाल आहे. तरीसुध्दा सत्यशोधन समितीमधील तर्काची पध्दती आणि प्रश्नाची मांडणी यांनी बराचसा परिणाम कृतीत आणला आहे. सत्यशोधन समितीने, प्रादेशिक असमतोल धोरणाबाबत अधिकृतपणे विचार करण्याकरिता आवश्यक चौकट उपलब्ध करून दिली आहे.

४.३.२ सत्यशोधन समितीचा अहवाल येण्यापूर्वी विकास अनुशेषाचे नेहमीच तदर्थ वित्तीय वाटपात स्पष्टीकरण देण्यात येत होते. सत्यशोधन समितीने तदर्थ तरतुदींची प्रथा मोडून काढण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आणि प्रत्यक्ष अवधी व प्रत्यक्ष निर्देशांक यांनुसार तफावतींचे मोजमाप करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. सत्यशोधन समितीला अशी आशा होती की, अर्थपूर्ण वास्तविक मुदतीत मोजमाप करण्यात आलेल्या तफावती या, तशाच परिमाणयोग्य वास्तविक मुदतीत, पुढील शासकीय कार्यवाही निश्चित करण्यासाठी उपयोगी पडतील. तथापि, अशा कोणत्याही कार्यवाहीकरिता निधी उभा करण्याची आवश्यकता असल्यामुळे समितीला अशा तफावत - निर्मूलन कार्यवाहीचा वित्तीय भाषेत अर्थ लावावा लागला. त्यातही कहर म्हणजे सत्यशोधन समितीच्या शिफारशींना केवळ वित्तीय अनुशेषाचे स्वरूप देण्यात आले जो टाळणे किंवा भरून काढणे शक्य होते. निर्देशांक समितीने त्यानंतर तशाच दृष्टिकोनाचे अनुसरण केले व तशाच परिस्थितीचा अनुभव घेतला.

४.३.३ वित्तीय तरतुदी करून "अनुशेष दूर करणे" या कार्यतंत्राने खर्चाचे समानीकरण करणे हे विकासाच्या समानीकरणाची हमी देईल या दिशाभूल करणाऱ्या कल्पनेला बळकटी आणली आहे. या दुर्दैवी विरोधाभासात्मक निष्पतीची अनेक कारणे असू शकतील. कदाचित सत्यशोधन समितीने, किमान सूचकतेने असे गृहित धरले आहे की, राजकीय व प्रशासकीय क्षमता वित्तीय साधनसामग्रीचे रूप यातील 'मूल्य स्पष्ट पध्दतीने फलनिष्पतीत' रूपांतरित करण्याची ही, प्रदेश व जिल्हे यांत, एकरूपता असेल. तिने 'शासनाचा' एकसमान दर्जा गृहित धरला आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सत्यशोधन समिती, केवळ असे गृहित धरते की, सुपूर्द करण्याची प्रशासकीय क्षमता ही, सर्व जिल्हे व प्रदेश यांमध्ये "जवळपास समान" असेल. तिने, वित्तीय खर्चाच्या फलनिष्पतीचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी सुस्पष्ट संस्थात्मक यंत्रणेची तरतूद देखील केली नाही. शासनाने सुपूर्द केलेला माल व सेवा यांवरच केवळ तिने लक्ष केंद्रीत केल्यामुळे, तिने, प्रदेशांमधील प्राथम्याच्या बाबींतील तफावत मान्य केली नाही. त्याचप्रमाणे, तिने प्रदेशांमध्ये आवश्यक असलेल्या

साधनसामग्रीच्या आवश्यकतांच्या (किंवा खर्चाच्या) प्रमाणकांतील तफावत विचारात घेतलेली नाही. त्यांनी उद्देशपूर्वक दुरुपयोगाच्या शक्यता अंदाजित केली नाही. तसेच ज्यामुळे राजकीय प्रतिनिधी व प्रशासन हे दोघेही, निर्देशित उद्दिष्टापासून विचलित होऊ शकतात आणि वित्तीय आभासाखाली त्यात गोंधळ निर्माण करू शकतात अशी शक्यतादेखील त्यांनी विचारात घेतलेली नाही. सत्यशोधन समितीने, कोणतेही प्रादेशिक विकास कार्यतंत्र असण्याची गरज किंवा समानतेने, खाजगी क्षेत्रातील गुंतवणुका आणि गुंतवणुकीची निर्धारके यांची भूमिका व महत्त्व, यांचा अंदाज केला नाही. याचा परिणाम म्हणून, समितीने उचित धोरणे तयार करण्याचा किंवा धोरणांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचा विचार केला नाही. सत्यशोधन समितीने, प्रदेशांमधील विकास प्रशासनाच्या प्रचलित प्रशासकीय चौकटीचीसमान कार्यक्षमता सुस्पष्टपणे गृहित धरल्यामुळे तिने, शासन व प्रभावी लोकशाही विकेंद्रीकरण यांच्याशी संबंधित असणारे प्रश्न विचारात घेतले नाहीत. एका शब्दात सांगायचे तर, समितीने सर्वांसाठी एकच मापदंड या विधानाच्या आधारे या प्रश्नांचा परामर्श घेतला.

४.३.४ सत्यशोधन समितीच्या पध्दतीने काही घटक, बारकाईने तपासणी केली जाण्यास पात्र आहेत. सत्यशोधन समितीने, प्रामुख्याने "गुणोत्तरे" असल्याचे आढळून आलेल्या निर्देशकांचा वापर केला आहे. जिल्हयांच्या आकारात फरक असल्यामुळे, विकास साध्य करण्याच्या भौतिक निर्देशांकाचे प्रमाणीकरण करण्याची गरज आहे. (त्या अनुषंगाने, प्रादेशिक घटक म्हणून, "जिल्हा" हा सत्यशोधन समितीकरिता तिच्या विचारार्थ विषयात महादिष्ट करण्यात आला. आमच्या समितीकरिता, असे कोणतेही युनिट केलेले नाही.) अनेक प्रकरणांमध्ये, निर्देशांकाचे निर्देशक हे एकूण लोकसंख्या किंवा संबंधित उप-गटाची लोकसंख्या किंवा जमीन-क्षेत्र आहे. जर जिल्हयांमधील निर्देशकाच्या वाढीच्या दरात बदल झाला तर, या उपलभ्यतेबाबत प्रश्न निर्माण होतो आणि त्याचप्रमाणे, जिल्हयांमधील गणकाच्या वाढीच्या दरातदेखील बदल होतो. जिल्हयांमधील वाढीचे दर बदलतात अशी वस्तुस्थिती असताना जर राज्य सरासरी मूल्य हे देखील (उंचावत) असेल तर, अनुशेष भरून काढणे ही, जवळजवळ न संपणारी किंवा ६०/७० वर्षांपेक्षा अधिक काळ चालणारी खूपच दीर्घ प्रक्रिया असू शकेल. "राज्य सरासरीच्या खाली असलेल्या जिल्हयांना, राज्याच्या सरासरीपर्यंत वर आणण्याची संकल्पना ही, ठराविक वेळेत पूर्ण करण्याचा कार्यक्रम नाही. तर ती सतत चालणारी प्रक्रिया आहे." सत्यशोधन समितीचा असा विचार आहे असे दिसून येते. असे जेव्हा तिचे मत असते तेव्हा, काही अर्थाने ही अपेक्षा करते. समितीने केलेले विश्लेषण, करण्यात यावे आणि जिल्हयांपेक्षा निम्न असलेल्या घटक म्हणजेच, तालुका विचारात घेऊन, तफावती कमी करण्याचा प्रयत्न केला जावा, अशी शिफारस करणारी समिती असणे हे अधिक कारस्थान करण्यासारखेच आहे. स्पष्टच आहे की, एकूण समुहाच्या निम्न पातळीवरील **तफावतीत**, बहुसंख्य बाबतींत वाढ होईल. अशा प्रकरणी, कालमर्यादा व साधनसामग्रीची आवश्यकता यांत आणखी वाढ होईल. सत्यशोधन समितीने अनुशेष दूर करण्याकरिता योजनांतर्गत साधनसंपत्तीपैकी ८५% इतक्या साधनसंपत्तीचा वापर करण्यात यावा आणि उर्वरित १५% साधनसंपत्तीचा नेहमीच्या नियोजन प्रक्रियेकरिता वापर करण्यात यावा अशी शिफारस केली होती. तथापि, सत्यशोधन समितीने, साधनसंपत्तीच्या आकारमानाचे अभिप्रेत अर्थ आणि साधनसंपत्तीच्या वाढीचे दर या बाबी, पुरेशा विचारात घेतल्या नव्हत्या.

४.३.५ ठराविक काळाबाहेरील आंतर-प्रादेशिक तफावती कमी करणे याचे पुनर्वितरण व वाढ हे दोन अंगभूत पैलू आहेत. हे दोन्ही पैलू महत्त्वाचे असले तरी, सिध्दांत व अनुभव आम्हाला, जर पुरेशी वाढ झाली नाही तर, पुनर्वितरणाच्या पैलूंचे पूर्णपणे निवारण करता येऊ शकत नाही आणि म्हणून तफावती कमी करण्याच्या समस्या अर्थपूर्णरीत्या सोडविता येऊ शकत नाहीत असा विश्वास ठेवण्यास भाग पडतो. वाढीच्या पैलूंचा हा घटक, सत्यशोधन समितीच्या बाबतीतदेखील (आम्ही नंतरच्या कालावधीतील निर्देशांक समितीकरिता देखील) अधिक समस्यायुक्त झाला आहे. सत्यशोधन समितीने केवळ, केवळ शासकीय खर्चाद्वारे साध्य झालेली वाढ व विकास यांवरच लक्ष केंद्रीत केले आहे. उपलब्ध साधनसंपत्तीचे (प्रामुख्याने योजनांतर्गत साधनसंपत्तीच्या) आकारमान हे मर्यादित व निश्चित आहे. वेळेचा टप्पा मर्यादित आहे आणि उपलब्ध साधनसंपत्तीच्या वाढीचा दर हा, स्थूलमानाने निश्चित आहे. योजनांतर्गत साधनसंपत्तीची रक्कम आणि प्राय:

वाढीचा पूर्वनिश्चित दर या बाबी, त्या बदल्यात, तफावती काढून टाकण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी निश्चित करतात. जेव्हा आपण लोकसंख्या वाढीचा विचार करतो तेव्हा, ही परिस्थिती आणखी गुंतागुंतीची व वाईट होते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सत्यशोधन समितीचा दृष्टिकोन हा, यशस्वी सुसंगत रीतीने, या अंगभूत घटकांशी (म्हणजेच लोकसंख्या वाढ, निश्चित व मर्यादित साधनसंपत्तीच्या उपलब्धतेची वास्तवता आणि समय चौकटीचे राजकीयदृष्टया संवेदनशील परिणाम वास्तववादीपणे एकरूप होत नाही व त्याच्याशी त्याचा संयोग होत नाही. निर्देशांक समितीने देखील नियत वाटपांचे संकल्पन करताना, या प्रश्नांचे निवारण केलेले नव्हते/ हे प्रश्न विचारात घेतलेले नव्हते.

४.३.६ सत्यशोधन समितीने, विकासाच्या (उत्पन्न, शाळेतील नावनोंदणीच्या पातळया, रोजगार) अंतिम निकालाच्या/फलनिष्पतीच्या नेहमीच सूचक असलेल्या निर्देशांकाचा वापर जाणीवपूर्वक टाळलेला होता आणि जे केवळ शासनाच्या खर्चाचा परिणाम म्हणून स्पष्टपणे मोजण्यायोग्य होते अशा निर्देशांकांनाच केवळ पसंती दिली होती. हे सुपरिचित आहे की, पायाभूत सुविधा व सोई निर्माण करण्याबाबत शासनाची निर्णायक भूमिका असली तरीदेखील, मोठया संख्येने असलेल्या क्षेत्रांत, लोकांच्या स्वत:च्या पुढाकाराने म्हणजेच खाजगी क्षेत्रामुळे बरेचसे कार्यक्रम प्रत्यक्षात येतात. सत्यशोधन समितीला, कदाचित, प्रदेशांतील सामाजिक उपक्रमविषयक आणि संस्थाविषयक इतिहास, यांमधील या तफावतींची सखोल माहिती होती म्हणूनच सत्यशोधन समितीने, शासन काय करते किंवा करू शकते यांवर लक्ष केंद्रीत करण्याचे ठरवले. परिणामी, सत्यशोधन समितीने, शासनाने काय केले आहे, शासन काय करू शकेल आणि शासनाने काय करावे याचे जे मोजमाप करतील अशाच निर्देशकांची व घटकांचीच निवड केलेली आहे. भूतकाळात देखील (जेव्हा सत्यशोधन समितीने समस्यांचा अभ्यास केला होता अशा काळात), शासनाच्या नियंत्रणाखालील गुंतवणूकयोग्य साधन संपत्तीचे आकारमान व हिस्सा हा, २५ % पेक्षा कमी होता हे लक्षात घेण्यासारखे आहे. परिणामी, स्वत:च्या गुंतवणूक खर्चामार्फत, मागे पडलेल्या प्रदेशांची उन्नती करण्याची शासनाची क्षमता, मूळापासूनच मर्यादित राहिली. तिने केवळ शासकीय खर्चावर भर दिल्यामुळे, रस्त्यांचे बांधकाम व सिंचनजलाचा साठा साठवणुकीवर यांना निर्विवादपणे अधिक पसंती दिली होती. लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) यांसारख्या योजनांद्वारे (फलनिष्पती) पाण्याच्या प्रत्यक्ष वितरणाशी संबंधित असलेली धोरणे व खर्च यांवर कमी भर देण्यात आला. सत्यशोधन समितीने, प्रत्येक विभागाला अनुरूप असलेला कोणताही विशिष्ट मोठा आधार देऊन त्याद्वारे अर्थव्यवस्थेला उत्तेजन देण्याच्या पर्यायाचा गंभीरपणे विचार केलेला नव्हता. योग्य धोरणात्मक वातावरणाचा वापर करून वाढीला चालना देणे व आर्थिक विकासाचा वेग वाढवणे, प्रदेशाच्या गतिशील तुलनात्मक फायद्यावर दिलेला कार्यतंत्रात्मक भर आणि आवश्यक प्रोत्साहने, या बाबींचा सत्यशोधन समितीच्या दृष्टिकोनात अभाव होता.

४.३.७ मागील दोन दशकांत, अर्थव्यवस्थेच्या विकासास आकार देण्यामधील शासनाच्या भूमिकेत अनेक बदल झालेले आहेत. खाजगी गुंतवणूक कमी करण्याची पूर्वीची निर्बंधकारी राजवट कमी अधिक प्रमाणात त्यागण्यात आली आहे. खाजगी गुंतवणुकीच्या विनियमनाचा दृष्टिकोन हा, मोठया प्रमाणात स्पर्धाभिमुख होत आहे. राष्ट्रीय सीमामधील व्यापार व भांडवलाचा ओघ, यांकरिता अर्थव्यवस्था मोठया प्रमाणात मुक्त करण्यात आली आहे. पायाभूत सुविधा व दीर्घ मुदतीच्या भांडवली सुखसुविधा यांमधील खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढत आहे. औद्योगिकदृष्टया एक प्रगत राज्य म्हणून, महाराष्ट्र राज्य हे, धोरणात्मक नमुन्यातील या सर्वत्र पोहोचणाऱ्या बदलांपासून, स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही आणि लपून राहू शकत नाही. प्रादेशिक असंतुलनाचे प्रश्न सोडविण्यासाठी या बदलांना, सकारात्मक तसेच नकारात्मक असे दोन्ही ध्वनितार्थ आहेत.

म्हणून, वाढीचा प्रश्न सोडविताना, वाढीचे स्रोत तसेच वाढीची संभाव्यता यांचा विचार करण्याची गरज आहे. सत्यशोधन समितीने, प्रादेशिक वाढीच्या संभाव्यतेचा प्रश्न उपस्थित केलेला नव्हता तसेच तिने, प्रादेशिक तुलनात्मक फायद्याच्या विषयाचीदेखील चौकशी केलेली नव्हती. समानीकरणाचे एकमेव उद्दिष्ट म्हणून, शासनाने सुरु केलेल्या प्रयत्नांवर तिचे लक्ष केंद्रीत असणे ही बाब, तसे केले असल्याची खात्री देत नाही. पश्चातबुध्दीचा लाभ म्हणून आम्हाला माहित असलेला हा दृष्टिकोन प्रादेशिक असंतुलन दूर करण्याकरिता, अपुरा व धोक्याचा असल्याचे सिध्द

होईल. सत्यशोधन समितीदेखील निर्विवादपणे "प्रदेशांतील" सर्व क्षेत्रांकरिता प्राथम्याचा एकच क्रम लादते. म्हणून प्रदेशांतील विकासात्मक गरजांची भौगोलिक-नि-आर्थिक विविधता, पुरेशी सर्वमान्य नाही.

४.४ निर्देशांक व अनुशेष समिती

१९९४ मध्ये तीन विकास मंडळांची संयुक्त समिती म्हणून "निर्देशांक व अनुशेष समिती" नेमली होती. या समितीने आपला पहिला अहवाल जुलै, १९९५ मध्ये शासनास सादर केला. महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाच्या सापेक्ष स्तरांचे निर्धारण करणे आणि आर्थिक विकासाच्या मोजमापाकरिता सुयोग्य निर्देशांकाची निवड करणे याची तरतूद या अहवालाने केली. नोव्हेंबर, १९९५ मध्ये राज्यपालांनी निर्देशांक व अनुशेष समिती ची पुनर्रचना केली. या समितीतील तीन सदस्य सत्यशोधन समितीचेदेखील सभासद होते. या समितीच्या विचारार्थ विषयांमध्ये पुढील गोष्टी आवश्यक आहेत. (अ) विकासाच्या सापेक्ष स्तरांचे निर्धारण करण्याकरिता सुयोग्य निर्देशांकांची आणि विविध क्षेत्रांमधील अनुशेष निर्धारित करण्यासाठी सुयोग्य क्षेत्रांची, निश्चिती करणे, (ब) प्रत्येक जिल्हयाचा आणि प्रत्येक जिल्हयाकरिता शक्य असेल तेथे, प्रत्येक तालुक्याकरिता, विविध क्षेत्रांमधील संपूर्ण राज्य म्हणून विकासाचा स्तर लक्षात घेऊन असे निर्देशांक निश्चित करणे आणि (क) अशाप्रकारे खात्री केलेल्या सापेक्ष विकासाचे स्तर आणि अनुशेष यांच्या आधारे समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी यथोचित कार्यवाही सुचवणे; आणि (ड) तीन विकास मंडळांच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चाच्या समन्यायी वाटपाची सुनिश्चिती करण्यासाठी यथोचित पध्दत सुचवणे.

४.४.१ काही थोडी मते वगळता या समितीने सत्यशोधन समितीच्या कार्यपध्दतीचाच अवलंब केला आहे. समितीचे विचारार्थ विषय हे स्पष्टपणे "संपूर्ण राज्य म्हणून विकासाचा स्तर लक्षात घेऊन प्रत्येक जिल्हयाचा आणि शक्य असेल तेथे प्रत्येक तालुक्याचा विविध क्षेत्रांमधील, सापेक्ष, अनुशेषाच्या" संदर्भात आहेत. या बाबतीत समितीने केलेल्या निरीक्षणांची नोंद घेणे महत्त्वाचे आणि उपयुक्त ठरेल "...*(१.२२) आमच्या पैकी काही जण, क्षेत्रीय विकासाच्या तुलनेकरिता तालुका हा घटक मानावा यासाठी प्रथमत: उत्साही होते. इतर काही जणांना फक्त तीन विभागांपुरतेच विश्लेषण व तुलना हवी होती." ती पुढे असेही नोंदवते की "(१.२३) काही प्रदेशांतील तालुके हे तुलनात्मकदृष्टया आकाराने मोठे आहेत. नवीन तालुके तालुके हे स्वतंत्रपणे फक्त महसूल विभागाकरिता कार्यरत आहेत. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसहित उर्वरित विभाग अजूनही पूर्वीच्या मोठया तालुक्यांसाठी काम करतात. समितीने त्यापुढे असेही मत नोंदवले आहे, "(१.२४) जिल्हयांनुसार माहिती मिळविणे हे फारच कठीण काम होते. विविध विभागांना ते पूर्ण करण्यासाठी एका वर्षपिक्षाही अधिक काळ लागला. तालुकानिहाय माहिती गोळा करण्यासाठी तर फारच जास्त वेळ लागेल." छोटी आणि निम्नस्तरीय युनिटे निवडल्यास अनुशेषाचा आकार वाढेल आणि परिवर्तनशीलतेत प्रचंड वाढ होईल असे अचूक निरीक्षण समितीने केले आहे. "(१.२५) विभागांसारख्या मोठया घटकांच्या तुलनेत राज्य सरासरीच्या वर असलेल्या जिल्हयांचा सकारात्मक मूल्यांकडून "राज्य सरासरीच्या खाली असलेल्या जिल्हयांच्या नकारात्मक मूल्यांचा काही अंशी ऱ्हास होतो. केवळ विभागीय पातळीवर तुलना करून अंदाजित केलेल्या अनुशेषापेक्षा जिल्हयांमध्ये तुलना करून अंदाजित केलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात ५० % ते ६०%वाढ आढळून आली. असे असूनही केवळ मागास विभागातच मागास जिल्हयांचा ठावठिकाण लागणे आवश्यक नाही तर तो विकसित विभागांतही लागला पाहिजे. त्याचप्रकारे वस्तुत: मागास तालुक्यांचा ठावठिकाणा फक्त मागास जिल्हयांमध्येच नव्हे तर विकसित जिल्हयांमध्येही लागला पाहिजे."*

४.४.२ निर्देशांक व अनुशेष समितीने सेवा देण्याच्या बाबतीतील प्रशासनिक क्षमतांमध्ये भिन्नता असण्याची अपेक्षा ठेवलीच होती. याचीही नोंद घेणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीचे महत्त्व हा विषमता दूर करण्यामधील एक महत्त्वाचा घटक आहे. हे देखील निर्देशांक व अनुशेष समितीने स्पष्टपणे मान्य केले होते. तथापि, या घटकांनी साधन संपत्तीच्या वाटपाची संस्थात्मक योजना आणि समितीने आखलेल्या धोरणात यावर अधिक प्रभावीपणे भर दिला नव्हता. अर्थसंकल्पीय वाटपातील राजकीय चढाओढ आणि सत्ताधारी प्रतिष्ठितांचा निधी आपल्याकडे जोडून घेण्याची

क्षमता यांचा विभागासाठी होणाऱ्या साधनांच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ शकतो. निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालात हे घटक उघडपणे समाविष्ट केलेले नाहीत.

४.५ भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण आणि धोरण आराखडा

४.५.१ **प्रारंभ:** गेल्या तीन दशकांमध्ये, भारताच्या आर्थिक संधी, साधनसंपत्ती आणि धोरणात्मक वातावरण यात अनेक महत्त्वपूर्ण मार्गांनी फेरफार होत आहेत. भारतातील एक प्रमुख अग्रणी राज्य म्हणून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला देखील याचप्रकारच्या लक्षणीय परिवर्तनातून जावे लागत आहे. या बदलत्या संधी आणि दृष्टिकोनांच्या संदर्भात, प्रदेशांमधील गरिबीचे वाढते प्रमाण आणि विकासातील तफावत यांचे मूल्यन केले पाहिजे.

४.५.२ त्याचबरोबरच निर्बंध शिथिल केल्यामुळे (उदारमतवाद), खाजगी क्षेत्रांना आता महत्वपूर्ण भूमिका प्राप्त झाली आहे. यात शासनाच्या मालकीच्या वाणिज्यिक संस्थांच्या खाजगी क्षेत्राला झालेल्या विक्रीचा (खाजगीकरण) समावेश होतो. त्याचप्रमाणे, आंतरराष्ट्रीय पातळीवर/राष्ट्रीय सीमा पार करून वस्तू, सेवा, वित्तीय बचती आणि गुंतवणुका यांची उपलब्धता पूर्वीपेक्षा सोपी, कमी खर्चिक आणि कमी अडथळयांची झाली आहे.(म्हणजेच जागतिकीकरण).

४.५.३ खुलेपणात वाढ होऊनही, गेल्या दोन दशकात दूरसंचार, जैव-तंत्रज्ञान आणि नव्या शेतीचा उदय यांमध्ये खूप महत्त्वपूर्ण तांत्रिक बदल होताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे, पर्यावरणीय आणि पारिस्थितीविषयक जागरूकता आणि त्यावरील उपाययोजना या बाबतीतील सामाजिक व राजकीय भानही वाढले आहे. पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण आणि पर्यायी नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर संतुलित होत आहे आणि कार्यतंत्रामुळे नियामक राजवटीचे आवश्यक पैलू उजेडात आले आहेत. तसेच अनुपालनाविषयीची सामाजिक जाणीव अधिक तीव्र झाली आहे.

४.५.३.१ **सर्वसमावेशकता व मानव विकास :** धोरणविषयक वादविवाद, व चर्चा यांमधून आणखी दोन बाजूदेखील स्पष्टपणे समोर आल्या. त्यापैकी एक म्हणजे सर्वसमावेशक वाढीचे महत्त्व (११ व्या योजनेपासूनच्या सर्व शासकीय दस्तऐवजांमधील एक प्रमुख भाग राहिला आहे) आणि ***मानव विकास निर्देशांकाचे*** महत्व यांची नियतकालिक गणना आता सर्व स्तरांवर अधिकृतरीत्या हाती घेण्यात आली आहे. दुसरी बाजूही केंद्रपुरस्कृत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे तुलनेने सोप्या मार्गाकडे वळविता येऊ शकते. सबलीकरणाशी संबंधित आहे आणि त्यासाठी पहिली बाजू ही अधिक कठीण आहे, कारण ती जीवनमान व रोजगार कौशल्ये यांच्या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. एकीकडे आम्हाला असेही नमूद करता येईल की, आम्ही या दोन्ही बाजू विचारात घेऊन आमचे मत व्यक्त केले आहे व शिफारशी केल्या आहेत.

४.५.३.२ **विकेंद्रीकरण, धोरण आणि विनियामक सुधारणा :** गेल्या दोन दशकातील राजकीय व्यवस्था, युतीचे राजकारण आणि युतीचे शासन यांचा उदय आणि प्रभाव, यांची साक्षीदार आहे. या घडामोडींचा संघीय संतुलनाच्या स्वरूपावर परिणाम झाला आहे. राज्ये हळूहळू त्यांच्या करयोजनांचा मेळ घालण्यासाठी मतैक्य तयार करीत आहेत आणि नजिकच्या भविष्यात ते वस्तू व सेवाकराच्या एकात्मिक आराखडयास पुष्टी देतील. संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या सुधारणांमुळे, शासनाने त्रिस्तरीय व्यवस्था संपादित केली आहे. ग्रामीण भागांमध्ये त्याबरोबरच वेगाने नागरीकरण होणाऱ्या क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या भूमिका वाढल्या आहे, संघीय व्यवस्थेमध्ये संभाव्य बदल घडवून आणण्यात योगदान दिले आहे.

विनियमन व्यवस्था धोरण निश्चिती यांसारख्या असंख्य नव्या संस्था उदयास आल्या उदाहरणार्थ ऊर्जा विनियामक प्राधिकरण, जल संपदा प्राधिकरण, विज्ञान तंत्रज्ञान आयोग व पुनर्नवीकरणक्षम ऊर्जा

विकास अभिकरणे. "हक्क आधारित दृष्टिकोनाचा" उदय हे, आर्थिक धोरणाचे लक्षणीय नवीन वैशिष्टये आहे. उदा. शिक्षणाचा हक्क, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका (आत्मोन्नती) अभियान, हमीसह काम मागण्याचा हक्क, इत्यादी धोरण राबविण्यातील व प्रशासनाचे कार्यचालन करण्यातील पारदर्शकतेच्या मागणीत वाढ होत आहे. या मागण्यांना प्रतिसाद म्हणून, "माहितीचा अधिकार" आता प्रस्थापित झाला आहे. त्याचप्रमाणे, विकेंद्रीकरणाची मागणी वाढत आहे. पंचायत राज संस्थांची भूमिका व आवाज वाढलेला आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे, एकूण आर्थिक क्षेत्रामधील राज्याची भूमिका, पुन्हा निश्चित करण्यात आली आहे. खाजगी क्षेत्राची भूमिका परिवर्धित केलेली आहे आणि पूर्वीची खाजगी क्षेत्रासंबंधीची निर्बंधक धोरणे पुष्कळशी सौम्य करण्यात आली आहेत.

४.५.४ **महाराष्ट्रातील बदल :** मागील २५ वर्षांमध्ये, महाराष्ट्रातील आर्थिक वाढ व विस्तार, प्रभावी ठरलेला आहे. आजचा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आकार चालू किंमतीमध्ये रुपये १४ लाख कोटी इतका आहे. ही पातळी, १५ वर्षांपूर्वीच्या संपूर्ण भारतीय अर्थव्यवस्थेइतकी आहे. महाराष्ट्रातील अंदाजे ४६ टक्के इतकी लोकसंख्या, नागरी क्षेत्रांमध्ये राहते. देशांतर्गत राज्य उत्पादनातील कृषीचा हिस्सा, १२.५% नी घटला आहे आणि सेवा क्षेत्रांचा हिस्सा, देशांतर्गत राज्य उत्पादनाच्या ५५% इतका आहे. माहिती तंत्रज्ञान आधारित समर्थ तंत्रज्ञानाने अनेक व्यवसाय प्रक्रिया तसेच व्यवहाराच्या पध्दती, गती व व्याप्ती यांमध्ये आमुलाग्रपणे बदल झाला आहे. पूर्वीचे आर्थिक संक्रमण व विकास यांच्यातील अनेक टप्पे तथाकथित "मुसंडी" मारण्यामुळे आता सहजपणे टाळले जाऊ शकतात.

प्रादेशिक असमतोलावर या सर्व धोरणातील बदलांवर महत्वाचा अपेक्षित भार पडतो. केवळ हस्तक्षेप आधारित थेट शासकीय खर्चावर विसंबून राहण्याचे पुन:परीक्षण करण्याची गरज आहे. यथायोग्य प्रोत्साहने व आवश्यक त्या धोरणात्मक सुधारणा याद्वारे खाजगी क्षेत्राच्या अधिकाधिक सहभागास उत्तेजन देणे अधिक महत्त्वाचे ठरेल.

४.५.४.१ ***महाराष्ट्रातील प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती, सामाजिक-आर्थिक परस्परविरोधाचे विलक्षण मिश्रण देऊ करते. सर्व स्तरांच्या उत्पन्न पातळया सर्वसाधारणपणे सुधारल्या आहेत. ती पातळी दारिद्र्याचे प्रमाण निश्चितपणे कमी झाल्याचे दिसून येते. अद्यापही त्याच्याविषयीच्या प्रादेशिक तफावती व राजकीय विफलता टिकून आहे. प्रदेशांमधील, सापेक्ष वंचिततेची आणि "मागे राहण्याची" जाणीव क्वचितच नाहीशी झाली आहे.*** खचितच, प्रादेशिक असमतोल (आयबी) समितीच्या नंतरच्या दशकात खचितच काही एककेंद्राभिमुखता होती (या सुरुवातीच्या मुद्यापासून आम्ही स्वत:ला जाणीवपूर्वक दूर ठेवले होते. कारण १९६० पासून आणखी मागे जाताना आणि विश्लेषण करताना, तो एक उपयुक्त अकादमिक अभ्यास ठरु शकत असल्याने, आम्ही निर्धारपूर्वक भविष्याकडे पहात आहोत. तसेच, विश्वसनीय आणि सुसंगत आकडेवारीच्या (अनु) उपलब्धतेमुळे असा अभ्यास करणे आम्हाला शक्य झाले नाही. दोन मागील समित्यांनी यापूर्वी काय केले होते याचे उपयुक्त विश्लेषण केलेले आहे असादेखील आमचा विश्वास आहे) मागील दशकात, उलट कल (भिन्नता) दिसून आला आहे. गतिशीलता बदललेल्या अर्थव्यवस्थेला बसलेल्या किमान तीन धक्क्यांमुळे हे झाले होते. ते म्हणजे, एक कृषीतील अस्थैर्य/चंचलता, ज्याचा विशेषकरून विदर्भावर नकारात्मक परिणाम झाला, दोन, वेगाने पुढे जाणाऱ्या सेवा क्षेत्रांसह उत्पादक क्रियाशील कार्यांमधील संरचनेतील बदल (हा अर्थव्यवस्थेला बसलेला सकारात्मक धक्का होता परंतु सापेक्ष संदर्भाने त्याने पाठीमागे पडलेल्या प्रदेशांच्या विरोधात काम केले) आणि तीन, प्रादेशिक नेतृत्त्वाच्या संदर्भात, सशक्त खात्यांचे असमान वितरण झालेल्या संमिश्र राजकारणाचा उदय यामध्ये, "जलसिंचन", "शेतकरी" आपदग्रस्त व आत्महत्या, यांच्याशी संबंधित असणाऱ्या राजकीय व सार्वजनिक क्षेत्रातील मतभेद नक्षलवादाचा उदय तसेच कुपोषण आणि प्रदेशातील राजकीय नेतृत्त्वाचा संभाव्य दुबळेपणा यांची भर पडली आहे आणि हे चित्र पूर्ण आहे. या सर्व गोष्टी, मागील दशकातील

अपवाहनास कारणीभूत ठरल्या आहेत आणि नाराज राजकीय/आर्थिक स्थितीचा पुनर्उदय तसेच झालेले प्रत्यक्ष ज्ञान या गोष्टी या समितीची नियुक्ती करण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.

४.५.५ वित्तीय अनुशेष आणि आमचे आक्षेप :

"वित्तीय अनुशेष" या परिभाषेच्या कमतरतांवर आम्ही याआधीच मत व्यक्त केले आहे. परित्याग करावयाची गरज असलेल्या वित्तीय अनुशेषासंबंधीच्या वाक्यप्रयोगामध्ये अभिव्यक्त केल्या जाणाऱ्या विचाराची ही एक पध्दत आहे. या वाक्यप्रयोगाने धोरणात्मक विचार करण्याची पध्दती सखोलपणे अनुकूलित केली आहे आणि ती अवास्तव अपेक्षांवर स्वार झाली आहे. तिने राजकोषीय समानीकरणाचा विवक्षित दृष्टीभ्रमदेखील निर्माण केला आहे. तिने, ही समस्या सोडविण्यासाठी आवश्यक असलेला वास्तविक आणि बहु-आयामी दृष्टीकोनास प्रतिबंध केला आहे. आमचे विचार (दृष्टीकोन) मांडताना व शिफारशी करताना, आम्ही ही गोष्ट लक्षात घेत असतो. आमच्या दृष्टीने, शिर्षस्थ वारे (हेडविंडस) सौम्य करण्याच्या आणि टेलविंडचे समुपयोजन करण्याच्या तत्त्वाचे अनुसरण करण्यामध्ये आम्ही विश्वास ठेवतो.

४.५.६ या यथार्थ दर्शनातील दोन प्रमुख भेद पुढीलप्रमाणे दूर करता येतील. (अ) खर्चाच्या पातळयाखेरीज "फलनिष्पती" चे संनियंत्रण केले जावे. (ब) वाढीच्या तसेच शासकीय खर्चा(मोठया प्रमाणावरील) द्वारे झालेल्या वाढीच्या इतर सर्व एकसमयावच्छेदी स्रोतांचे (साधनांचे) परिपोषण, सुसज्जता व उपयोग करण्यात यावा. शासकीय योजना/विकास खर्च यांचा आकार हा एकूण गुंतवणूकयोग्य साधनांचा (२५% पेक्षा खूप कमी असलेल्या) एक भाग आहे हे, याची नोंद घेतली पाहिजे; शासकीय गुंतवणुकीची/खर्चाची संबंध्दता व महत्व सर्वश्रुत आहे. तथापि, विकासात्मक आकांक्षा व ध्येये यांचे समानीकरण करण्यासाठी शासकीय खर्च, क्वचितच पर्याप्त ठरू शकेल. उर्वरित ७५% साधने खाजगी क्षेत्रामधून सुसज्जित करता येतील. सातत्यपूर्ण वाढीच्या शाश्वती, समुचित सुलभीकरण व पर्याप्त प्रोत्साहने यांबाबतची हमी दिल्याखेरीज खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक पुढे येणार नाही. विकासातील तफावत कमी करण्यामध्ये प्राणभूत व आवश्यक असलेल्या आर्थिक वाढीच्या शक्ती, वाढीच्या सर्व अशासकीय साधनांना, प्रोत्साहन देण्याच्या आणि त्यांचे परिपोषण करण्याच्या शासकीय क्षमतेवर सारखाच परिणाम करतील. धोरणे तयार करणे आणि धोरणांमधून संदेश देणे या गोष्टी, विकासाच्या धोरणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात असा आमचा विश्वास आहे. म्हणून, "राज्याच्या" तसेच केंद्र सरकारच्या धोरणांची सर्वोत्तम आखणी करणे आणि सुधारणा करणे यांना, आमच्या दृष्टीने, खूप महत्व असेल.

४.५.६.१ **संस्था :** जेथवर धोरणात्मक उपायांनी,तत्त्वत: वित्तीय साधनांच्या नियत वाटपावर आणि नियतवाटपाच्या सूत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे तेथवर आमच्या मते, गुंतवणूकयोग्य साधनांचे नियतवाटप महत्त्वाचे आहे, परंतु "फलनिष्पतीवर" परिणाम करणाऱ्या अनेक घटकांचा गुंता सोडविणे हेच केवळ पुरेसे असणार नाही. आम्ही या प्रकरणात अन्यत्र नमूद केल्याप्रमाणे, भौतिक धोरण लोलुप्त साधने, भूगोल, संस्कृती व संस्थात्मक बाबी यांच्यापासून खूपच अलग आहेत. सामुदायिक मानकांचा समावेश असणारे सामाजिक भांडवल (जे नियंत्रित परिवर्तनशीलतेपेक्षा मंदगतीने वाटचाल करणारे प्रचालक (पॅरामेट्रिक) आहे), तिची सामावून घेणारी क्षमता, सामाजिक विकास, नेतृत्त्व विषयक **(राजकीय नेतृत्त्वासह)** भूमिका व बुध्दिसामर्थ्य (जी सर्वांशी परस्पर संलग्न असते) हे अतिशय महत्त्वाचे घटक आहेत. नियंत्रण किंवा धोरणविषयक परिवर्तनशीलता यांमध्ये असंख्य आधारभूत धोरणे व धोरणविषयक सुधारणा आहेत. याशिवाय, शासनाला जनतेच्या जवळ घेऊन जाणारे प्रशासकीय सुपूर्दगी (पोचवणी) पध्दतीची बांधणी पोचवणींचा दर्जा, प्रभावी विकेंद्रीकरण यांसारखे मजबूत (ब्रिक अँन्ड मोर्टर) घटक, हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. या दृष्टीने, आम्ही, प्रादेशिक मंडळांसाठी अनेक धोरणात्मक सुधारणा व नवीन विकेंद्रित संस्थात्मक संरचना करण्याचे प्रस्तावित केले आहे. या आधारभूत संस्थात्मक घटकांच्या नियमनावर स्वतंत्र प्रकरणामध्ये परामर्श घेण्यात आला आहे.

४.५.७ प्रक्रिया, धोरणनीती उपक्रम, प्रतिसाद व "निष्पती" यांनुसार प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता आहे. प्रदेशांतील प्राथमिक अवस्था या उघडउघड वेगवेगळया आहेत. साधनसंपत्तीच्या नैसर्गिक देणग्या आणि प्रदेशांतील अंतर या बाबीदेखील विस्तृतपणे असमान आहेत. आपण संभाव्य साधन संपत्तीचा व "निसर्ग" म्हणून निर्देश केला पाहिजे व परिपोषण म्हणून त्यांना सुसज्ज करण्यासाठी व आकार देण्यासाठी (किंवा पुन: आकार देण्यासाठी) धोरणनीतीचा प्रयत्न केला पाहिजे.

याशिवाय, "निसर्ग" आधारित (साधनसंपत्ती आधारित) विभिन्नता असतानासुध्दा, समन्यायी प्रवेश व निष्पतीच्या आश्वासकासाठी ते, सर्व प्रदेशातील काही 'विशिष्ट गुण', माल (जो सार्वजनिक माल तांत्रिकदृष्टया 'सार्वजनिक माल' नसला तरी यासारख्या सार्वजनिक मालाचा तो गुणोपचार आहे व विकास ध्येय यांस पात्र ठरते. दुसत्या शब्दांत सांगावयाचे तर एकाच वेळी कार्यकरण्यासाठी काही विशिष्ट पैलूंमध्ये प्रवेश व निष्पत्तीची समानता आणि जोराने वाढ पुढे नेण्यासाठी गतिशील प्रादेशिक तुलनात्मक फायदा करण्यात यावा म्हणून आम्ही, दुमार्गी दृष्टीकोन निश्चित केला आहे. सार्वजनकि माल म्हणून स्थूलमानाने निर्देशिलेला प्रवेश व हक्क यांचे मूलतत्व प्रदेशभर एकसमान असावे आणि अशा सार्वजनिक मालातील समानतेचे आम्ही समर्थन करतो. पुढील भागात हा दृष्टीकोन आम्ही सविस्तर मांडला आहे.

४.६ आमचे ध्येय आणि दृष्टिकोन

४.६.१ आमच्या दृष्टिकोनाच्या आवश्यकतेचा अर्थ, पिछेहाट झालेल्या प्रदेशांच्या संबंधात विकास धोरणनीतीवरील विचार करण्यासाठी 'रुपाचे स्थलांतर' असा आहे. **अशाप्रकारे 'अनुशेषा'च्या संकल्पनेवर सुदूर आवश्यक चालू दृष्टीकोन केंद्रीभूत झालेला आहे. जो, आमचे विश्लेषण व मागील अनुभव याद्वारे आवश्यक निष्पत्ती करण्यासा निखालसपणे अपुरा आहे.** आपल्या देशाचा इतर भाग तसेच इतर विकसनशील देश यांचा अलिकडील विकास अनुभव असे सूचित करतो की, हा एक सामान्य प्रतिमान (मॉडेल) आहे. यानंतर आपण पाहणार आहोत की, आमचा दृष्टिकोन हा, प्रमाणके / हक्क आधारित विकास व वाढ यांचा वेळ वाढवून कळवण्यात आला आहे. कोणत्याही प्रदेशाच्या विशेषत: मागे पडलेल्या प्रदेशाचा वाढीचा वेग वाढविणे ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे आणि ती अनेक घटकांवर अवलंबून आहे. खात्री करून घ्यायची तर, मोठ्या प्रमाणावरील शासकीय खर्च हा एक समारात्मक घटक आहे, **परंतु आर्थिक विकास आणि वाढ निष्पत्ती या बाबी, प्रदेशाचा इतिहास व भूगोल, भौगोलिक साधनसंपत्तीची नैसर्गिक देणगी समाजिक भांडवलाची सुसज्जता, आधारभूत धोरणे, भौतिक पायाभूत सोयी, संस्थाविषयक क्षमता, प्रदेशाचे राजकीय नेतृत्व, शासन आणि व्यवसाय करण्याचा कमी व्यवहार खर्च यासारख्या इतर घटकांवर गंभीररीत्या अवलंबून आहे.** विशेषत: आम्ही, सामाजिक भांडवल व उद्योजकता यांच्या भूमिकेला जिची वाढ व विकास यांत महत्वाची भूमिका आहे, तिला विशेष महत्व देऊ परंतु सामाजिक-राजकीय -सांस्कृतिक इतिहासातून काही संवेदनशील विषय उद्‌भवत आहेत. याचा अर्थ असा होत नाही की, त्यासंबंधात काहीही करता येणे शक्य नाही किंवा काहीही करण्यात येऊ नये. परंतु ते करण्यासाठी कोणत्याही जादू करणाऱ्या या संदर्भात आवश्यक वस्तू नाहीत. असे सुचविण्यात येते की, आमचा दृष्टिकोन बहुपरिमाणी गरजांसाठी असेल आणि केवळ शासकीय खर्चावर लक्ष केंद्रित करणारा नसेल. आणखी असे की, बहुपरिमाणकत्त्वाचाच दुसरा ध्वनितार्थ असा आहे की, वेगवेगळ्या प्रदेशांना, वाढ व विकास यांचा वेग वाढविण्यासाठी उपाययोजनांच्या विनिर्दिष्ट व असाधारण एकीकरणाची; आवश्यकता असेल. अंतिमत:, आम्हाला राज्य आणि केंद्राकडून आधारात्मक धोरण सुधारण्याची आवश्यकता आहे ज्यामुळे, प्रादेशिक महत्वाकांक्षा लक्षात घेऊन, जबाबदारीसह प्रादेशिक अधिकार प्रदान करणे शक्य होईल. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर '**आपण सर्वासाठी एकच**' मोजमाप हा दृष्टिकोन काळजीपूर्वक सोडून दिला पाहिजे आणि आमचा अहवाल हेच करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो.

४.६.२ **आम्ही विश्लेषणाचे युनिट म्हणून** जिल्हा निवडला आहे आणि प्रादेशिक पातळीवरील तफावत ही, घटक जिल्ह्यांच्या पातळीवर दिसणाऱ्या विकासअंतराच्या परिमाणावरुन एकत्रित करण्यात येईल. समितीमध्ये या विषयावर विचारयोग्य चर्चा झाली. काहींना असे वाटले की, काही विशिष्ट दशकांच्या परामर्शाच्या संबंधात, गट/तालुका, जिल्हा किंवा प्रदेश ही सोईस्कर व अधिमान्य युनिटे असतील. व्यवस्थापन योग्य पातळीवर मोजलेले असंतुलनाचे प्रश्न महत्त्वाचे तत्व होते. अलिकडच्या कामांपासून/ अभ्यासापासून घेतलेल्या धड्यावरून केवळ एकास विजेता ठरविणे निष्फळ ठरते. जेथवर हितसंबंधितांच्या विचारांचा संबंध होता तेथवर वेगवेगळे दृष्टिकोन दिसून आले होते आणि देण्यात आलेली विभिन्नता, परिस्थिती ही नैसर्गिक होती. मराठवाड्यातील हितसंबंधितांनी एक युनिट म्हणून जिल्ह्याला पसंती दिली आणि उर्वरित महाराष्ट्रातील हितसंबंधितांना विश्लेषण युनिट म्हणून तालुका हवा होता. अंतिमत: अशा भिन्न मतांच्या मुळाशी असलेल्या कारणांच्या विचारामुळे आणि दोन मुख्य कारणांमुळे आम्हाला आमच्या निर्णयाप्रत पोचण्यासाठी सहाय्य केले. प्रथमत: वाजवी दर्जाची अधिकृत आधार माहिती आणि एकत्रित निम्न पातळीवरील सुसंगती जिल्ह्याची होती. दुसरे असे की, विद्यमान शासकीय संरचनेची आणि प्रशासनाची जागा ही, जिल्हा पातळीवर स्थित आहे. फलवाद तसेच अहवालात आमच्या शिफारशींच्या मूळ गोष्टी असे सुचवितात की, आम्ही आमच्या दृष्टीकोनात विश्लेषणाचे प्राथमिक युनिट म्हणून जिल्ह्याला पसंती दर्शविलेली आहे. आमच्या दृष्टिकोनाच्या इतर सर्व सामान्य मतांचा सिद्धांत व्यवस्थितपणे तयार केला असून तो आमच्या विकेंद्रिकरणाच्या बळकटीकरण्याच्या संबंधात आहे. यामुळे ऑनलाईन विभागांवरील मोठ्याप्रमाणातील दबाव टाळता येईल. तसेच सूक्ष्म व्यवस्थापनासाठी प्रयत्न करणे शक्य होईल. आमच्या दृष्टिकोनाचा पुढील भाग गृहित धरण्यासाठी ३७१ (२) च्या आश्रयाखालील योजना निधीच्या सूत्रबद्ध प्रक्रांतीचा आधार प्रदेशच आहे.

४.६.३ विशेष बाबींशी संबंधित उपचारांच्या (अभियान पद्धतीत) बाबतीत,गट/तालुक्यांचा विचार करण्यात आला आहे. या विशेष बाबींना वास्तविक किंवा काल्पनिक म्हणून ओळखण्यात आले आणि संबंधित प्रश्न हे, **आदिवासींची** लोकसंख्या व **अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रमांसारखी** (डीपीएपी) क्षेत्रे यांच्याशी संदर्भित आहेत. हे फारच महत्वाचे व संवेदनक्षम प्रश्न आहेत आणि या काल्पनिक प्रदेशांबाबत आमच्याकडे विशेष प्रतिवेदन लेख आहेत जे, प्रदेशांच्या नेहमीच्या संकल्पनेशी जुळत नाहीत. आमचा असा विश्वास आहे की, (विश्लेषणाच्या युनिटशी संबंधित) समस्येबाबतचे आमचे उत्तर हे (विशेषत: अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रम यांसारख्या) काल्पनिक / वास्तविक प्रदेशांच्या परामर्शाला देण्यात आल्यास स्वीकार्य असेल. आणखी असे की, आमचा विश्वास आहे की, ही योजना निधींची प्रक्रांति जी प्रादेशिक / जिल्हा पातळीवर लोकांच्या खास वर्गाद्वारे कब्जा केला जाण्याची भिती नाकारण्यास सहाय्य करील, अशा प्रक्रांतीकरिता निरनिराळे गट पातळी क्षेत्रीय आणि जागेसंबंधातील पातळ्यांच्या संबंधात आमच्या शिफारशींद्वारे बळकट करण्यात आली आहे.

४.६.४ प्रकरण तीन (प्रादेशिक विकास : कल व स्वरूप)

यात दर्शविल्याप्रमाणे, जिल्ह्यातील दरडोई जिल्हा उत्पादनात मोठया प्रमाणावर बदल होता. व असमानता कमी करण्यासाठी संबंधित दोन उद्दिष्टे आहेत. एक अग्रगण्य औद्योगिक राज्य म्हणून, महाराष्ट्राने, गरिबीचे लवकरात लवकर निर्मूलन करण्याचे आणि अधिक समन्यायी प्रादेशिक संतुलनाचे ध्येय ठेवावे. असे करताना, प्रादेशिक उत्पादन रूपरेखेत क्षेत्रीय हिश्श्यानुसार आपण कोठे आहोत याचे निर्धारण आवश्यक आहे. असे दिसून येते की, प्राथमिक आणि सेवा क्षेत्रावरील तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेल्या सेवांवरील परावलंबतेच्या संबंधातील विषय हे, आतापर्यंतच्या मागास प्रदेशाच्या कार्यक्रमांची वैशिष्ट्ये सांगतात. सध्या मराठवाड्याचे दरडोई उत्पन्न हे, उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या ६० टक्के इतके आहे. त्याचप्रमाणे विदर्भाचे दरडोई उत्पन्न हे, उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या ६६ टक्के इतके आहे. हे अंतर, चौदाव्या पंचवार्षिक योजनेचा तिसरा कालावधी संपण्यापूर्वी कमी होणे आवश्यक आहे आणि याच्या

परिणामी, मराठवाड्याचे दरडोई उत्पन्न हे, अदमासे ७३ टक्के इतके आणि विदर्भाचे दरडोई उत्पन्न हे उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या ८० टक्के असल्याचे दिसते. याचा अर्थ असा होईल की, मराठवाडा व विदर्भ यांतील दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर हा, १४.५ ते १५ टक्के या मर्यादेत असला पाहिजे. ही उद्दीष्टे साध्य करण्यासाठी; म्हणजेच लोकोपयोगी मालांची प्रत्यक्ष सार्वजनिकरीत्या तरतूद करणे याशिवाय, गरीबी निर्मूलन तसेच उत्पनांतील तफावत कमी करणे हे साध्य करण्यासाठी आम्हास मूलत: वेगवान आर्थिक वाढीची आवश्यकता आहे आणि असे करताना सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकीत योग्य साधनसामग्री आणि आर्थिक वाढीची आवश्यकता आहे. लगतच्या भविष्यकाळात महाराष्ट्र राज्याची, केवळ भारत देशातील म्हणून नव्हेतर खरोखरच जगामधील वेगवान वाढ होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक अर्थव्यवस्था म्हणून उदयास येण्याची क्षमता आहे. **महाराष्ट्राकरिता असलेले आमचे एकूण परिप्रेक्ष्य म्हणजे, महाराष्ट्र हे देशातील एक प्रगतिशील आणि अग्रेसर राज्य आहे जे हरित राज्य आहे आणि ज्यात जागतिक पातळीवर स्थिरचिन्ह देण्यात आलेली प्रथम दर्जाची शैक्षणिक पद्धती आहे. महाराष्ट्र राज्याने २०३० पर्यंत संपूर्ण गरिबी निर्मूलनाची आकांक्षा बाळगावी व संपूर्ण गरिबी निर्मूलन साध्य करावे. याशिवाय एक प्रगतिशील राज्य म्हणून, आमच्या सर्व रहिवाश्यांकरिता जागतिक आरोग्य व्याप्तिक्षेत्र उपाययोजनांसह आपण सामाजिक धोरण विकसित करावे.**

४.६.५ जाहीरपणे तरतूद केलेला माल व सेवा यांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी शासकीय साधनसंपत्ती नियुक्त करण्यात यावी. उदारणार्थ, आम्ही, सर्व प्रदेशांतून पिण्याच्या पाण्याकरिता प्रमाणक आधारित समन्यायी प्रवेश आणि शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाचे समर्थन केले आहे. सिंचन साठवण पायाभूत सोयी निर्माण करणे हे पुरेसे नाही. त्याच्या धोरणाद्वारे, जी (धोरणे) योग्य पीक स्वरूप, पाण्याच्या वापराच्या दर युनिटामागची प्राप्ती कमाल प्रमाणात करील अशा पाण्याचे अधिक चांगले वितरण आणि उपयोजन सुनिश्चित करतात, त्यांद्वारे आणखी गौरव करण्यात यावा. म्हणून, 'लाभक्षेत्र विकास प्राधिकरण' (सीएडीए) अशा धोरणात्मक सुधारणा या, आमच्या दृष्टिकोनाच्या अविभाज्य भाग आहेत. असा मोक्याचा दृष्टिकोन वास्तविक किंवा काल्पनिक प्रदेशांनादेखील (म्हणजेच आदिवासी व अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रम अशा प्रदेशांना) समानतेने लागू होतो. (चौकोन ४.१ पहा)

चौकोन ४.१ पाण्याकरिता आमचा दोन मार्गी दृष्टिकोन

वर स्पष्टीकरण दिलेला दृष्टिकोन हा, आमच्या पाण्याच्या परामर्शात चांगल्या रीतीने उदाहरण देऊन दर्शविता येईल. आम्ही पाण्याचा, 'सार्वजनिक माल' असा आणि पाण्याचा 'उत्पादक साधनसामग्री' असा बेत दर्शविला आहे. सार्वजनिक माल म्हणून किमान प्रमाणाक आधारित पाण्याची उपलब्धता म्हणजेच दरडोई दर दिवशी १४० लिटर इतके पाण्याची, महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना (पिण्याकरिता आणि इतर संबंधित जीवनावश्यकतत्त्वांकरिता) तरतूद करण्यात येईल. पाण्याची ही उपलब्धता प्रत्येक प्रदेशातील प्रत्येकाला समान असेल. प्रादेशिक आधारावर पाण्याचा पुरेसा साठा ही, या प्रयोजनासाठीची पूर्वावश्यकता असेल.

पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य असताना, जलस्त्रोत्राचा उत्पादक प्रयोजनांकरिता, शेतीद्वारे आणि उद्योगांद्वारे देखील (यात बिगरशेतकी उत्पादक वापराचादेखील समावेश आहे) मोठ्या प्रमाणावर उपयोजन करण्यात येईल. कायमस्वरूपी शेती, आंतर्भूत असलेल्या उत्पादकता व वाढीचे त्वरण करण्यासाठी त्यांची क्षमता या बाबी विचारात घेऊन, अशा वापरासंबंधात धोरण तयार करावे लागेल. तंत्रज्ञान (उदाहरणार्थ सूक्ष्म सिंचन, पाणी पुन्हा उपयोगात आणण्याची क्रिया) आधारभूत संस्था संरचना (उदाहरणार्थ नवीन समावेश क्षेत्र विकास एजन्सी, पाण्याच्या वापरकर्त्यांची संघटना), प्रोत्साहकांची योग्य पातळी या बाबी पाण्याचा उत्पादक साधनसामग्री म्हणून अधिक संयुक्तिक व दक्षतापूर्वक वापर करण्यासाठी प्रवर्तन करण्याकरिता अत्यंत

महत्त्वाच्या ठरतील. हे उघड आहे की, "उत्पादक साधनसामग्री" म्हणून पाण्याबाबत असलेले धोरण हे , "पाणी: सार्वजनिक माल" यापेक्षा सुस्पष्ट मूलतत्वावर असेल. पाणी वापर धोरणाचे असे दोन मार्ग सूचित करताना, आम्ही जलविद्या वस्तुस्थितीद्वारे शोधून काढण्यात आलेली उपलब्धता देखील विचारात घेतली आहे. उदाहरणार्थ पर्जन्यवृष्टीचे आकारमान व परिवर्तनशीलता, भूपृष्ठ लक्षात घेऊन भूजलाची उपलब्धता, निरनिराळ्या प्रदेशांची पाणी धारण करण्याची क्षमता. प्रदेशांतील निसर्ग निर्मित साठवणींच्या क्षमता वेगवेगळया असतात आणि आतापर्यंत तयार झालेले साठे हे विस्तारपूर्वक वेगवेगळे आहेत. आमच्या शिफारशी, भविष्यकालीन विकासाकरिता साधनसामग्रीचे वाटप करताना, अशा भिन्नता विचारात घेतात. विशेषत: अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रमांकरिता, जेथे पाणलोट विकासाद्वारे पाणी उपयोगात आणणे ही चिंताजनक बाब आहे तेथे, आमचा दृष्टिकोन आणि आम्ही सुचवलेले साधनसामग्रीचे वाटप या बाबी, या प्राणभूत साधनसामग्रीच्या संबंधातील दृष्टिकोनात अर्थपूर्ण बदल परिणाम करतील.

बऱ्याच काळापासून, पाण्याला एक उत्पादक साधनसंपत्ती म्हणून प्राप्त झालेले महत्व हा एक बदल अनुभवास येत आहे. मागील तीन दशकांमध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायांपेक्षा, तंत्रशास्त्रीय पर्याय व नवनवीन विकल्प हे, खूप वेगवेगळया प्रकारे विकसित पावलेले आहेत. जल साधनसंपत्तीचा वापर करताना, जलवितरणाच्या यंत्रणेत झालेली लक्षणीय सुधारणा विचारात घेणे महत्वाचे आहे. गेल्या ५० वर्षामध्ये, आपण, लहान, मध्यम व मोठया प्रकल्पांमध्ये काही हजारोंच्या मत्ता निर्माण केल्या आहेत. त्यांपैकी खूप मोठया संख्येतील मत्ता हया उपयोगात नसून, प्रकल्पाचा 'शेवटचा टप्पा' पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीच्या अभावामुळे त्या वायादेखील गेल्या आहेत! अशा प्रकारे, आपणाला, केवळ नवीन मत्ता व नवीन प्रकल्प निर्माण करण्यावर सतत भर देण्याची गरज नसून, अधिक वेगाने विकास होऊ शकेल अशा प्रकारे जलउत्पादकतेत सुधारणा करण्यावर समान भर देण्याची गरज आहे.

मध्यम व दीर्घ मुदतीच्या कालावधीत, आम्हाला, पाण्याचा उत्पादक रीतीने वापर करण्यास प्रोत्साहन देणारी धोरणे अपेक्षित असून, त्यामुळे या नैसर्गिक साधनसंपत्तीचे तांत्रिकदृष्ट्या मूल्य कळण्यास आणि प्रदेश व राज्ये यांऐवजी 'जलखोरे' या आधारावर पाण्याचे व्यवस्थापन करण्यास आणि उदयोन्मुख राष्ट्रीय जलधोरण आराखडयाशी मेळ घालण्यास मदत होईल. हे करीत असताना, महाराष्ट्र जलनियामक प्राधिकरणाला धोरणात्मक भूमिका बजावावी लागेल. आमची समिती अशी शिफारस करीत आहे की, शासनाच्या विचारार्थ, या प्रश्नांवर एक धोरण पत्रिका तयार करण्याची या प्राधिकरणाला विनंती करावी.

४.६.६ शासनाने, त्याचवेळी प्रत्येक प्रदेशामध्ये अशा धोरणात्मक उपाययोजना हाती घ्याव्यात की, ज्यामुळे उद्योगधंद्यांची वाढ वेगाने होईल आणि या उद्योगधंद्यामुळे त्या प्रदेशांचा तुलनात्मक फायदा होईल. अशा उपाययोजनांमध्ये, प्रामुख्याने पायाभूत सुविधांमधील निर्णायक गुंतवणुकींचा समावेश असावा आणि ज्यामुळे खाजगी गुंतवणुकीस उत्तेजन मिळेल अशी आवश्यक ती धोरणे आखावीत. आम्ही, अनेक धोरणात्मक सुधारणा व उपाययोजना सुचविल्या असून, यामुळे विकास करण्यासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक गुंतवणुकांकरिता आवश्यक त्या उपाययोजना बिंबविता येतील. शासनाच्या धोरणात्मक उपाययोजनेमध्ये, आर्थिक वेगाचे स्वरूप अपेक्षिले गेले पाहिजे जेणेकरून तो आर्थिक वेग भविष्यातही सुरू राहील. प्रगत असेलेल्या प्रदेशांच्या अनुभवातून आर्थिक विकासावर हे सूचित होते की, योग्यप्रकारे शीघ्र गतीने विकास होण्यासाठी उद्योग व सेवा यांचे तुलनात्मक महत्व वाटले पाहिजे. अशा प्रकारे, आपण, उत्साहवर्धक, अशा कृषि क्षेत्रासह, भविष्यामध्ये विकासाभिमुख क्षेत्रांना एकत्रित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठादेखील केली पाहिजे. पारंपारिक शेती करताना नेहमीचा एक व्यवसाय म्हणून सहजगत्या काम केले जात नसल्यामुळे, प्रस्तावित धोरणात

नावीन्यपूर्ण शेती करण्याबरोबरच नवीन उदयोन्मुख क्षेत्रावर भर देणे महत्वाचे आहे.(पहा चौकट ४.२) विशेषत: पाण्याची टंचाई असलेल्या प्रदेशामध्ये, आवश्यक त्या सहाय्यभूत उपाययोजना कराव्यात. जेणेकरुन मजूरवर्ग हा, अधिक उत्पादक साधनाकडे वळेल. यामध्ये शिक्षणाच्या दर्जावर लक्ष केंद्रित करुन भरीव प्रयत्न करण्याची आवश्यकता भासेल व त्यामुळे मनुष्यबळात सुधारणा होऊन त्यांना उचित कौशल्ये प्राप्त होतील. जेणेकरुन लोक रोजगार मिळण्यासाठी सक्षम बनतील.

चौकट ४.२: नावीन्यपूर्ण शेती

प्रादेशिक विकास या प्रकरणात, आम्ही प्रतिपादन केल्याप्रमाणे, विदर्भातील कृषी क्षेत्राची खुंटलेली वाढ हा अनेक धक्क्यांपैकी एक मोठा धक्का होता. त्यामुळे मागील दशकामध्ये प्रादेशिक असमतोलात वाढ होत गेली. मागे पडलेल्या प्रदेशांतील शेतीविषयी, एकाच वेळी पारंपरिक पद्धतीने व वेगवेगळया पद्धतीने विचार करण्याची आवश्यकता आहे. विदर्भ व मराठवाड्यातील शेतीचा बराच मोठा भाग कोरडवाहू शेतीने व्यापला आहे. कोरडवाहू शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक तंत्रशास्त्रीय पर्याय आहेत. पाण्याची बचत करणाऱ्या सिंचन पद्धतीस प्रारंभ, पावसाचे पाणी साठविणे यांसारख्या जलसंधारण उपाययोजना, पाणलोट क्षेत्राचा विकास व शेततळी हे या पर्यायांपैकी काही प्रमुख पर्याय आहेत. विदर्भ व मराठवाड्यामध्ये अभियान पद्धतीचा (मिशनमोड) अंगीकार करून, जलउत्पादकतेत सुधारणा करण्यासाठी सूक्ष्म सिंचनाच्या तंत्राद्वारे आनुषांगिक सहाय्य करण्याची आणि प्रमुख पिकांच्या बाबतीत नावीन्यपूर्ण तांत्रिक व मुरलेल्या व्यावसायिक बाबींना चालना देण्याची गरज आहे.

याशिवाय, पाण्याचा ताण सहन करू शकण्याऱ्या पिकांच्या जातींमध्ये संशोधन करून, उच्च मूल्य असलेल्या अपारंपरिक पिकांसाठी व पूरक बागायती पिकांसाठी पीकपद्धतीमध्ये विविधता आणण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. भूजलाच्या वाढलेल्या वापरामुळे, मराठवाडा हा एकूण पीक क्षेत्र निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी सक्षम आहे असे दिसून आले आहे. त्यातून अंशत: हे स्पष्ट होते की, विदर्भापेक्षा मराठवाडा प्रदेशाची कामगिरी तुलनेने अधिक चांगली आहे. दोन्ही प्रदेशांना, कृषि विकासासंबंधी नवीन धोरणांच्या रुपाने उत्तेजन मिळाले पाहिजे. अशा धोरणांमध्ये एका बाजूला हरितगृहाचे तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन व सुपिकता यासाठी विविध तंत्रे आणि दुसऱ्या बाजूला बाजारभिमूख वैविध्यपूर्ण पीक पद्धती, गटशेती, गटामार्फत खरेदी-विक्री आणि प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांबरोबर मूल्य सहभागिता व्यवस्था हे उद्दिष्ट असलेली कंत्राटी शेती यांचा मेळ घालण्यात येईल. जमीन मालकाच्या हक्कांचे कोणतेही नुकसान न होता कुळ वहिवाट असलेल्या जमिनीचे व्यवहार, खुले, पारदर्शक व व्यापक असतील. अशारीतीने कुळ वहिवाटी संबंधातील विनियमांच्या सध्याच्या पद्धतींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता भासते. यामुळे कृषि क्षेत्रात दीर्घकाळ आर्थिक लाभ मिळत राहील.

४.६.७ केवळ चांगल्या प्रशासनाचा पाठिंबा असेल तेव्हा चांगल्या पायाभूत सुविधा, पुरेशी प्रोत्साहने व व्यवसाय करण्यातील सुलभता यांच्या जोरावर कामे पार पाडता येतील. अलिकडच्या दशकात, मागास म्हणून ओळखल्या गेलेल्या अनेक राज्यांनी सोईसुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेत वाढ केल्याने आणि प्रशासकीय सुधारणा केल्यामुळे आमूलाग्र बदल घडवून आणण्यात ती राज्ये सक्षम ठरली आहेत. आम्ही या घटकावर अधिक सखोलपणे विचार केला असून, अभिनव अशी पुनर्व्यवस्था सुचविली आहे, ज्या योगे प्रशासन हे प्रादेशिक समतोल साधण्यासाठी व विकास विषयक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कटिबद्ध असेल.

४.६.८ प्रादेशिक असमतोल दूर करण्यामधील राज्य शासनाच्या प्रयत्नांना पुरेशा प्रमाणातील साधनांची आवश्यकता भासेल.

विकासविषयक तफावती दूर करण्यासाठी शासनाला जी साधनसंपत्ती निर्माण करता येऊ शकेल व तिचे वाटप करता येऊ शकेल अशा साधनसंपत्तीचे प्रमाण आम्ही निर्धारित केले आहे. आमच्या मते, राज्य शासनाला,अतिरिक्त साधन संपत्ती निर्माण करणे आणि विद्यमान साधनसंपत्तीचा वापर करताना तिचे वाटप योग्य प्रकारे करणे या दोन्ही बाबींची विचारपूर्वक सांगड घालण्याची गरज आहे. आम्ही, एकूणात/सूक्ष्म प्रमाणात उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीचा आणि वास्तव व सुधारणावादी रीतीने, क्षेत्रांमध्ये आवश्यक असलेल्या गरजांचा विकास केला आहे. या संबंधातील आमची योजना जोडपत्र ४.१ मध्ये सादर केली आहे.

४.६.९ आम्ही, या धोरणामध्ये एकमेकांशी संबंधित असलेले अनेक उपाय सुचविले आहेत. आमच्या मते, (पुन्हा व्यक्त करीत आहोत) चांगल्या रितीने उपजीविका करता येणे व रोजगार मिळणे यासाठी दारिद्र्याचे संपूर्णत: उच्चाटन, मोठ्या प्रमाणावर सामाजिक – आर्थिक सक्षमीकरण हे प्राथमिक उद्दिष्ट असावयास हवे. **आम्ही, शासकीय धारेणांमध्ये दोन समान मार्ग प्रस्तावित केले असून, त्यामुळे प्रादेशिक तफावत अधिक शीघ्र गतीने दूर होण्याची खातरजमा होईल. (अ) महत्वाच्या लोकपयोगी वस्तू (अन्यत्र निश्चित केल्याप्रमाणे) मिळणाऱ्या संधीतील समानता आणि (ब) सुधारणा केलेल्या सहाय्यभूत पायाभूत सुविधांच्या आधारे झालेल्या गतिमान वाढीची तंत्रे, ज्या क्षेत्रांमध्ये प्रदेशांना तुलनात्मकरित्या अधिक फायदा होत असेल, उचित प्रात्साहने मिळत असतील अशा क्षेत्रांचा विकास आणि 'इमॅजिन्ड प्रदेशांसह' (म्हणजे आदिवासी/अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम) सर्व प्रदेशांमध्ये खाजगी गुंतवणूक व रोजगाराच्या संधी वाढविणारी धोरणे.**

४.६.१० महत्वाच्या लोकोपयोगी वस्तू व सेवा मिळण्याच्या समान संधीशी आणि प्रदेशामधील विशेष बाबी व तुलनात्मकरित्या तातडीने मिळणारे फायदे यांचा वापर करून होणाऱ्या गतिमान वाढीशी संबंधित असणाऱ्या दोन मार्गांमधील घटकांचा पुढील उपविभागांमध्ये परामर्श घेण्यात आला असून, या घटकांमधून निष्पत्तीबाबतचे निर्देशांक काढण्यात आले आहेत. हे घटक संबंधित प्रकरणांमध्ये तसेच शिफारशींशी संबंधित असलेल्या प्रकरणांमध्ये आणखी विशद केले असून, त्या प्रकरणांमध्ये, ते टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याच्या प्राध्यान्यक्रमाचा देखील परामर्श घेतला आहे.

४.६.११ हा दृष्टिकोन, पुढील आकृती क्रमांक ४.१ मध्ये आलेखाच्या सहाय्याने थोडक्यात सांगितला आहे.

आकृती क्र.४.१


असमतोल कमी करण्याबाबतचे धोरण
(योजनानिहाय आढावा)
मार्ग- एक
मार्ग- दोन
गतिमान वाढ करणारे उत्तेजन देणारे घटक
लोकोपयोगी चांगल्या वस्तू मिळण्याबाबतची समान संधी
आदिवासी व अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या प्रदेशांना विशेष सहाय्य
धोरणातील सुधारणा केंद्र व राज्य : सागरी विनियम क्षेत्र, वन धोरण, कामगार धोरण, किंमतीबाबतचे धोरण, पाणी धोरण, वीज
विशेष निधीमार्फत केंद्र सरकारच्या धोरणांना सहाय्य
कौशल्य विकास
शासन: व्यवसाय करताना विशेषत: खर्चात कपात करणे
प्रदेशाचे तुलनात्मक गतिमान लाभ निश्चित करणे, प्रादेशिक विकासाची धोरणे
रस्ते, रेल्वे,धरणे,कालवे यांचे जाळे वाहतूक/व्यापार कॉरिडॉर यांसारख्या आधारभूत पायाभूत सुविधांचा विकास व उपक्रमशीलता.
घरगुती वीजजोडणी
इयत्ता दहावीपर्यंत सर्वांना शिक्षण
मानकांनुसार पिण्याच्या पाण्याचा पुरवठा / संरक्षित जलसिंचन
न्याय आणि कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा (आदिवासी)
सर्व गावांना बारमाही रस्त्यांनी जोडणे व त्यांच्यासाठी दूरध्वनी सेवा.
सर्वात खालच्या दोन तृतीयांश जिल्ह्यांचा सार्वत्रिक आरोग्य सुविधा योजनेमध्ये समावेश. (अंत्योदय सारख्या आमच्या संपूर्ण योजनेमध्ये दिसून येणारे) सर्वांकरिता प्राथमिक व दुय्यम सेवा.

४.६.१२ पहिल्या टप्प्यामध्ये शासनाच्या धोरणांमध्ये महत्त्वाच्या जाहीरपणे तरतूद करावयाच्या सार्वजनिक व गुणवत्तापूर्ण मालाची समान प्रमाणात तरतूद करण्याचे उद्दिष्ट अंतर्भूत असले पाहिजे. अशा मालाची उपलब्धता व सुलभता ही कोणत्याही भेदभावाशिवाय व तडजोडीशिवाय सर्व प्रदेशांमध्ये उपलब्ध असावी. ती विहित प्रमाणकांवर आधारित असावी व "अधिकार" म्हणून सुनिश्चित व्हावी. हे सर्व अगोदरच समर्थन केलेल्या व मान्य केलेल्या विद्यमान धोरणांना अनुरूप आहे. हे समानीकरण पुढील घटकांमध्ये सूचीबध्द करता येईल :

एक. सर्वांसाठी शिक्षण: इयत्ता १० वी पर्यंत.

दोन. आरोग्यदेखभाल: सर्वांसाठी मुलभूत सार्वजनिक आरोग्यविषयक सेवा आणि खालच्या स्तरावरील दोन तृतीयांश जिल्हयांपासून सुरुवात करून, ग्रामीण जनता सार्वत्रिक आरोग्य देखभाल सेवेच्या कक्षेत आणणे.

तीन. "प्रमाणकीकृत" तत्त्वावर पिण्याचे पाणी व मूलभूत उपजीविका यांची तरतूद करणे.

चार. सर्व गावांसाठी बारमाही रस्ते जोडणी.

पाच. घरगुती विद्युतीकरण.

सहा. न्याय आणि कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा (विशेषत: आदिवासी जनतेकरिता).

दारिद्र्य, उत्पन्नाचा निम्नस्तर, अनिश्चित उपजीविका आणि हक्कदारी व उपयोग संधी यांचा अभाव ही, निरंतर न्यून व मंद विकासाची परिचित कारणे आहेत. "अधिकार", "प्रमाणके" व खात्रीशीर हक्कदारी निर्माण करून यांपैकी काही कारणे दूर करता येतील. अलीकडच्या वर्षांमध्ये, प्रमाणक-आधारित हक्कदारी निर्माण करून, शिक्षण, शिक्षण-प्रवेश, आरोग्य क्षेत्रातील काही निवडक प्रवेश, सुनिश्चित करण्यात येत आहेत. **आम्ही वर सुचविलेली प्रमाणके ही राष्ट्रीय प्रमाणकांपेक्षा अधिक आहेत.** एक प्रगत अग्रेसर राज्य म्हणून महाराष्ट्राने प्रमाणके व हक्कदारी निर्माणाच्या कार्यामध्ये पुढाकार घेऊन पहिले पाऊल टाकले पाहिजे. सध्या राष्ट्रीय पातळीवर पिण्याच्या पाण्याकरिता कोणतेही अनिवार्य प्रमाणक नाही, असे दाखविता येईल. हे एक तातडीचे प्राधान्य म्हणून समजले पाहिजे, असे आम्हास वाटते. अशा हक्कदारांमुळे तत्त्वत: सर्व प्रदेशांना समान रीतीने प्रवेश, व संधी मिळतील. आम्ही अशा धोरण-उपक्रमांना पुष्टी देतो. वर नमूद केलेल्या, सार्वजनिक मालातील तफावती २०२५ पर्यंत जवळपास दूर होतील, अशी आम्हाला आशा आहे. यांपैकी काही तफावती या आणखी लवकर दूर होऊ शकतात. अशा अनेक प्रमाणकाधारित हक्कदाऱ्या मोजता येण्यासारख्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वित्तीय साधनसंपत्तीचे आम्ही केलेल्या मूल्यमापनावरून व निर्धारणावरून आम्ही हे समानीकरण सहज शक्य असल्याचे स्पष्ट करतो.

४.६.१३ तथापि, अशा "उपयोग संधीच्या समानीकरणां" मुळे प्रदेशा-प्रदेशांमध्ये (तरतुदींच्या प्रमाणकांमध्ये) विशिष्ट लवचिकता व अनुकूलता परिवर्तनशीलता देखील निश्चितपणे येईल, याची पडताळणी करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, लहान मुलांना दर दिवशी शाळेत जाण्यासाठी जेवढे अंतर चालणे आवश्यक असेल ते सरासरी अंतर किंवा वस्तीच्या ठिकाणापासून जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंतचे अंतर यांमध्ये खूपच तफावत असेल. म्हणून "राज्य सरासरी" तत्त्वावर निश्चित केलेले निकष व प्रमाणके ही अपुरी व अयोग्य असू शकतील. सुलभ प्रमाणकावर आधारित खरेखुरे समानीकरण करण्याकरिता प्रदेश-विशिष्ट बदल समर्थनीय असतील.

४.६.१४ साधनसंपत्ती प्रचंड प्रमाणावर आपल्या प्रदेशांकडे "खेचून घेण्याची" राजकीय पक्षांची क्षमता ही बाब बाजूला ठेवली तरी, अंमलबजावणीस जबाबदार असलेले प्रशासन आणि फलितांची पोचवणी यासंदर्भातील क्षमतांमध्येही आम्हाला लक्षणीय फरक दिसून आला आहे. अगोदरच्या धोरणांमध्ये हा पैलू पुष्कळदा गंभीरपणे दुर्लक्षित राहिला होता. हया घटकामध्ये साधनसंपत्तीच्या उपलब्धतेच्या तुल्य स्तरांकरिता असमान वाटप होण्याचे एक महत्त्वाचे कारण दडलेले आहे. सार्वजनिक साधने व सेवा यांची पोचवणी करण्याशी संबंधित प्रशासकीय क्षमता या प्रशासकीय युनिटा युनिटांमध्ये व प्रदेशा प्रदेशांमध्ये वेगवेगळया आहेत, हे आता चांगलेच जाणवलेले आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी आपणास जाणीवपूर्वक प्रयत्न व अभिनव अशा संस्थाविषयक व्यवस्था करणे गरजेचे आहे. अशाप्रकारच्या अभिनव संस्थाविषयक व्यवस्थांमुळे प्रदेशांकरिता हमी देणारी आवश्यक ती लवचिकता सुनिश्चित होईल. आम्ही राज्यकारभाराच्या रचनेच्या या प्रमुख मुद्यावर पुढे थोडक्यात नवीन संघटनात्मक -नि-संस्थाविषयक बांधणी व रचना या परिच्छेदामध्ये उहापोह केलेला

आहे; त्याबाबतची सविस्तर चर्चा "सुशासन" या प्रकरणात करण्यात आली आहे.

* प्रादेशिक अग्रक्रम/ प्राधान्य यामधील असमानतेशी संबंधित प्रश्न हे, इतर कोणत्याही बाहय प्राधिकरणाने नव्हे तर, लोकशाहीच्या प्रतिनिधींनी हाताळणे गरजेचे आहे (व ते त्यांनी हाताळावेत) अशी आमची इच्छा आहे. तसेच प्रत्येक प्रदेशासाठी योग्य व उचित प्रमाणके/सरासरी खर्च यांमधील तफावतीचा प्रश्न प्रदेश स्तरावरील नियोजन/धोरण प्राधिकरणांकडून हाताळला गेला पाहिजे.
* स्वतंत्र प्रादेशिक प्राधिकरणांनी परिणामांचे मूल्यमापन, कार्यक्षमता व ज्ञानामार्फत आढावा यांविषयीचे कार्यतंत्र हाती घेतले पाहिजे.
* पोचवणी कार्यतंत्र, तंत्रज्ञानामधील नवीनोपक्रम, संस्थाविषयक नूतन पध्दती यांचे संनियंत्रण करणे ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ही गरज पूर्ण करण्याकरिता स्वतंत्र मूल्यमापन अभिकरण नेमण्यात यावे.
* महाराष्ट्र विकास संशोधन परिषद (ज्ञानाधारित दृष्टिकोन असलेली व धोरण-निर्मितीकरिता पुष्टी दिलेली) स्थापन करण्यात यावी.
* राज्य सांख्यिकी मंडळ स्थापन करण्यात यावे (राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या धर्तीवर) त्याच्याशिवाय आमचे अनेक प्रस्ताव विफल ठरतील.

आम्ही सुचविलेल्या अभिनव व्यवस्थेच्या सहाय्याने, 'प्रमाणकाधारित समानीकरण' हे तत्त्व अधिक अर्थपूर्णरीतीने व जाणीवपूर्वक सिध्दीस नेले जाईल, अशी आम्हाला आशा आहे. या व्यवस्थांविषयी 'सुशासन' या स्वतंत्र प्रकरणात स्पष्टपणे व सविस्तर वर्णन केलेले आहे.

४.६.१५ समतोल प्रादेशिक विकासामधील सुशासनाचे कार्य

कोणत्याही देशातील, प्रदेशातील अथवा क्षेत्रातील विकास सुनिश्चित करण्यामध्ये सशासन हा केंद्रस्थानीय घटक आहे. विकासातील तफावती व असमतोल दूर करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे, सुरुवातीलाच तफावतींना थारा मिळणार नाही, असे सुशासन कार्यतंत्र स्थापन करणे होय. असमतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नाबाबतच्या हया दीर्घकालीन प्रतिबंधात्मक दृष्टिकोनाबरोबरच समितीने सुशासन या मुद्यावर विस्ताराने विचारविमर्श केलेला आहे. वस्तुत: सुशासनावरील समर्पित व सविस्तर प्रकरण हे समितीच्या या अहवालाचा अतिशय महत्त्वाचा व आवश्यक भाग आहे.

आम्ही प्रस्तावित केलेल्या, (क्षेत्रीय नियोजनाचे विकल्प आणि निम्न युनिटांसाठीचे परिवर्तन यांच्याशी संबंधित अशा) प्रादेशिक मंडळांच्या नवीन व्यवस्थेमुळे, आम्ही सुचविलेले सर्वांगीण विकास उपक्रम राबविण्यास नक्कीच हातभार लागेल.

गतिशील प्रादेशिक तौलनिक फायद्यावर आधारित आर्थिक व समावेशक सामाजिक प्रगती आणि त्वरित विकास या मुद्यावर प्रादेशिक धोरणामध्ये सर्वप्रथम भर द्यावा, असे समितीस वाटते. प्रादेशिक तफावतींची वेगवेगळी कारणे व परिमाणे आहेत, आणि म्हणून ती एकाच बहूतंत्राने दूर करता येणार नाहीत.

दुसरीकडे, सार्वजनिक व गुणवत्तापूर्ण साधनांच्या सुलभतेच्या समानीकरणाच्या आम्ही केलेल्या पुरस्कारामुळे महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या विकासाच्या दर्जामध्ये समानता येण्याची हमी मिळते. साधनसंपत्ती, क्षमता व आकांक्षा यांतील तफावतींमुळेच प्रदेशांना आपले अग्रक्रम ठरविण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे यथोचित संस्थाविषयक यंत्रणा असली पाहिजे.

सुशासन या प्रकरणामध्ये आम्ही, राज्याच्या एकंदर सुशासनाच्या चौकटीअंतर्गत येणारे प्रदेश-विशिष्ट राज्यकारभार कार्यतंत्र प्रस्तावित केलेले आहे. याचे बहुविध फायदे असतील. एकीकडे, अशा कार्यतंत्रामुळे सुशासनाची प्रक्रिया संबंधित प्रदेशांच्या अधिक जवळ येईल व अशाप्रकारे दुर्लक्षित व वंचित असल्याची भावना जी समितीने या तीनही प्रदेशांमधील हितसंबंधित व्यक्तींबरोबर केलेल्या चर्चांमधून सातत्याने उमटत होती- दूर होईल. दुसरीकडे, नियोजन, अर्थसंकल्पात तरतूद करणे, अंमलबजावणी, संनियंत्रण-मूल्यमापन आणि धोरण-आखणी या

घटकांभोवतीच्या अधिकाधिक वस्तुस्थिती-आधारित निर्णय प्रक्रिया राबवणे शक्य होईल. जेणेकरून विकास प्रक्रियेमध्ये अत्यंत वस्तुनिष्ठता व पारदर्शकता येईल. शिवाय, प्रादेशिक सक्षमीकरणामुळे प्रदेशांमध्ये अलीकडच्या काळात दिसून आलेले, राजकीय व प्रशासकीय सत्ता विभागणीचे एककल्ली स्वरूप नाकारले जाईल.

या अहवालात शिफारस केलेले सुशासन कार्यतंत्र हे खऱ्या तत्त्वाने व जोमाने राबविले गेल्यास, समतोल प्रादेशिक विकासाला एक नवीन परिमाण लाभेल.

४.६.१६ सांख्यिकी यंत्रणा बळकट करण्याची गरज

कोणत्याही मुद्याचे यथायोग्य समालोचन करण्यासाठी व्यापक, अद्ययावत व पडताळणी केलेल्या सार्वजनिक आकडेवारीची उपलब्धता ही पूर्वावश्यक बाब आहे. समितीला आपल्या विचारविमर्शादरम्यान, विचाराधीन मुद्यांचे विश्लेषण करण्याकरिता आणि अनुमान काढण्याकरिता विश्वसनीय आधारसामग्री उपलब्ध होण्यामध्ये अनंत अडचणी आल्या. सध्या, विविध प्रकारची आकडेवारी गोळा करणे ती सुस्थितीत ठेवणे, तिचे विश्लेषण करणे व ती प्रसिध्द करणे या प्रयोजनांकरिता राज्य स्तरावर अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे, मध्यवर्ती अभिकरण आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने संकलित केलेली आधारसामग्री ही, क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पुरविलेली असते किंवा वेगवेगळया विभागांच्या व्यवस्थापन माहिती यंत्रणेकडून गोळा केलेली असते. या यंत्रणेतील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आधारसामग्री एकत्र करण्यासाठीच्या पूर्वावश्यक बाबींवर क्वचितच नियंत्रण असते. यामुळे आधारसामग्रीच्या वैधतेबाबत व विश्वसनीयतेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उभे राहते.

राज्यस्तरीय सांख्यिकी यंत्रणा बळकट करण्याविषयीच्या अनेक सुधारणा केल्या जात आहेत. केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाच्या अनुदेशांनुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने हाती घेतलेल्या राज्य सांख्यिकी सक्षमीकरण प्रकल्पाचे उद्दिष्ट हे विकासाचे विविध पैलू शोधून काढण्याकरिता निश्चित केलेल्या २० महत्त्वाच्या निदर्शकांबाबत विशेषकरून, राज्यस्तरीय आधारसामग्रीची विश्वसनीयता, समयोचितता व खरेपणा यांमध्ये सार्थ सुधारणा अपेक्षित असणे, हेच आहे. भारत सरकारने संमत केलेल्या, आकडेवारी संग्रह अधिनियम, २००८ मध्येदेखील सांख्यिकीय यंत्रणा बळकट करण्याकरिता अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

४.६.१७ आर्थिक व विकासात्मक तफावतीचे अनेक स्रोत व कारणे आहेत. साधनसंपत्तीची उपलब्धता त्यामधील वाढ या घटकांमुळे मुख्यत: आर्थिक तफावती व्यापक होतात. काही साधनसंपत्तीच्या बाबतीत, प्रत्यक्ष समानीकरण हे अशक्य आहे. प्रत्येक प्रदेशाला त्याच्या स्वत:च्या अशा विभिन्न, भौतिक/नैसर्गिक साधनसंपत्तीची देणगी लाभलेली आहे. साधनसंपत्तीच्या देणगीतील विविधता व विशेषता यांच्याबरोबरच तंत्रज्ञानविषयक विकल्पांच्या श्रेणीमुळे १५-२० वर्षांच्या कालावधीत एखाद्या प्रदेशाच्या गतिशील तौलनिक उपयोगास आकार देता येतो, हे मान्य करावेच लागेल. वाढत्या तंत्रज्ञानविषयक विकल्पांमुळे तौलनिक उपयोगांमध्ये फेरफार होतो. अशा तऱ्हेने, केवळ भौतिक साधनसंपत्तीच नव्हे तर, व्यवसाय करण्यासंबंधातील तंत्रज्ञानविषयक व संस्थाविषयक शक्यता नवीन पध्दतीने अजमावून पाहिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे, हितसंबंधित व्यक्तींनी त्यांना पुन:संघटित होण्याकरिता दिलेल्या प्रतिसादामुळे अधिक चांगला परिणाम साधला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, अनेक पर्जन्य छाया कमी असलेल्या तालुक्यांनी पिके बदलून किंवा बागायती पिके घेऊन किंवा शेतीशी संलग्न कामे, जसे की दूध उत्पादन व प्रक्रिया यांसारखी कामे करून कमालीचे लाभ करून घेतलेले आहेत. प्रदेशांच्या संभाव्य साधनसंपत्तीला व प्रयत्नाला अनुरूप असे आर्थिक विकासाचे व्यूहतंत्र आपण निश्चित करणे गरजेचे आहे.

४.६.१८ आम्ही समर्थन केलेल्या दुमार्गी कृती योजनेची अत्यंत महत्वाची बाजू म्हणजे गतिमान आर्थिक वृध्दी ही होय. अर्थात, पहिला मार्ग हा मानवी विकासाची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. तथापि, समान मानवी विकासासाठी अत्यावश्यक असलेले लोकोपयोगी -नि-गुणवत्तापूर्ण मालाच्या समानीकरणाचे स्वरूप हे, केवळ प्रदेशांमधील आर्थिक वृध्दीच्या परिवर्धित आणि निश्चित स्रोतांच्या जोडीने शाश्वत ठरेल. गतिमान वृध्दीची अभिनव व परिणामकारक कृतीयोजना तयार करणे ही, अधिक आव्हानात्मक कामगिरी आहे. गतिमान वृध्दीसाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या

धोरणांमध्ये चार घटक आहेत: (क) आवश्यक गुंतवणुकीसह भौतिक पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी तरतूद करणे, (ख) कौशल्य विकास व रचनात्म क्षमतांच्या विकासाला चालना देणे, (ग) योग्य पोषक वातावरणे निर्माण करून त्याद्वारे खाजगी गुंतवणुकीला उत्तेजन देणे आणि उद्योगधंद्याचा उत्पादन खर्च कमी करणे, (घ) सकारात्मक बाह्यघटकांमुळे प्रगतीत मागे राहणारे व प्रगत असणारे यांच्यात दुवा साधण्याव्यतिरिक्त, शासनाने महत्वाचे प्रश्न लक्षात घेऊन विश्वसनीयता निर्माण करण्यासाठी (प्रशासकीय संकेताद्वारे) महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यास महत्व दिले पाहिजे.

४.६.१९ पायाभूत सुविधा उभारण्यास चालना व त्यासाठीची संधी यांमध्ये होणाऱ्या वृध्दीस गती देण्यासाठी महत्त्वाची विकासक्षम क्षेत्रे ओळखून कोणत्याही प्रदेशाच्या वृध्दीची कृतीयोजना व विकासाचे धोरण तयार केले पाहिजे. विद्यमान संदर्भामध्ये, प्रमुख उल्लेखनीय तुटी पुढील प्रमाणे:

१. कृषि संबंधी उद्योगांना आवश्यक असणारी वीज
२. कृषि उद्योगांना लागणारे पाणी
३. गुंतवणुकीची साधने
४. रस्त्यांचे जाळे व बाजारपेठेचे सान्निध्य
५. खाजगी गुंतवणुकीला आकर्षित करण्याची क्षमता
६. सामाजिक भांडवल व रचनात्मक क्षमता
७. (चांगल्या) प्रशासनाचा दर्जा
८. कौशल्यांचा विकास किंवा मानवी संसाधनाची निर्मिती
९. आर्थिक क्रियाशीलतेसाठी कर्जाची उपलब्धता

योग्य साधनांची कमतरता व अनुपलब्धता यामुळे याबाबतच्या प्रत्येक उपलब्ध तुटीच्या योग्य निर्देशसूची विकसित करणे शक्य होत नाही. तथापि, प्रत्येक प्रदेशातील उपलब्ध पाणी, रस्त्यांचे जाळे, वीज व कर्जाची अंशत: उपलब्धता या गोष्टींचे आम्ही सखोल निर्धारण करण्यासाठी उपक्रम हाती घेतला आहे.

४.६.२० रस्ते, पूल, बंदरे, लोहमार्ग यांसारख्या शाश्वत पायाभूत सुविधांची तरतूद करण्याची शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. ॲडम स्मिथ त्यांना "शासनाचे कर्तव्य" म्हणून संबोधित करतो. त्याच्या म्हणण्यानुसार, ज्या सार्वजनिक संस्था व जी सार्वजनिक बांधकामे एका मोठया समाजासाठी उच्चतम प्रमाणात फायदेशीर असू शकेल अशा सार्वजनिक संस्था व ती सार्वजनिक बांधकामे उभारणे व त्यांचे परिरक्षण करणे, हे सार्वभौम शासनाचे तिसरे व शेवटचे कर्तव्य आहे. तथापि, अशा स्वरूपाची कामे कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या लहान समुहाला अशा कामांच्या उभारण्यासाठी व परिरक्षणासाठी करावयाच्या खर्चाची परतफेड त्यांच्या नफ्यातून होऊ शकत नाही, कारण चांगले रस्ते, पूल, कालवे,बंदरे इत्यादि, यांसारख्या सार्वजनिक बांधकामांची उभारणी व परिरक्षण ज्यामुळे कोणत्याही देशाच्या वाणिज्य क्षेत्राच्या विकासाला चालना मिळते, त्याकरिता त्यांच्या उभारणीसाठी व परिरक्षणासाठी समाजाच्या वेगवेगळया कालावधीत करावयाच्या खर्चाची तरतूद शासनाने करणे आवश्यक आहे, ही बाब कोणत्याही पुराव्याशिवाय उघड आहे. या निर्णायक खर्चिक पायाभूत सुविधांची सोय करण्यात व निर्मिती करण्यात राज्य शासनाला केंद्र सरकारला महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे. राज्य शासनाला अप्रगत रस्ते जोडणीसाठी व व्यवसायाशी संबंधित संभाव्य साधनसंपत्ती यांचा मेळ घालून विकासाची गती वाढविण्यासाठी सार्वजनिक खाजगी सहभागातून किंवा त्याशिवाय चतुराईने योजना तयार करावी लागेल. उद्योग व्यवसाय आस्थापना ह्या जागांची निवड व पसंत करतात. ज्या ठिकाणी, (क) कच्च्या मालाचा पुरवठा करणारी केंद्रे निकट आहेत, (ख) कुशल मजुरांची उपलब्धता आहे, आणि (ग) उत्पादित केलेल्या उत्पादनास बाजारपेठेचे सान्निध्य आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे चांगले रस्ते, रेल्वे व विमान सेवांमुळे तेथील भागाचे स्वरूप पालटते. आपल्या तज्ञ व प्रशासकीय विभांगासोबत झालेल्या आमच्या चर्चेतून आणि परस्पर झालेल्या विचारविनिमयातून कुतूहलजनक संभाव्य प्रकल्प उघड झाले आहेत ज्यामुळे आर्थिक अप्रगत प्रदेशामध्ये मोठे प्रकल्प उभारले जाऊ शकतात. आम्ही सोदाहरणपणे काही मोठे महागडे प्रकल्प व त्यांमधील महत्त्वाच्या प्रकल्पांची यादी

पुढीलप्रमाणे देत आहोत. विदर्भातील मिहान प्रकल्प, सुरत-नागपूर प्रमुख मार्ग, लातूर- रत्नागिरी महामार्ग, मुंबई-बँगलोर कॉरिडॉर, कोकणासाठी पोचरस्त्याकरिता पूर्व-पश्चिम बंदरमार्ग, दिल्ली-मुंबई कॉरिडॉर, सोलापूर-उस्मानाबाद-जालना-वेरूळ रेल्वेमार्ग. रेल्वेमार्ग व रस्त्यांचे जाळे या व्यतिरिक्त, महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये विमानतळ जोडणीच्या विकासाचा कृतीयोजनात्मक विकल्प तात्काळ विचारात घ्यायला हवा. उत्पादन व सेवा क्षेत्रांमधील गुंतवणुकीचा वेग वाढविण्याच्या दृष्टिकोनाने, विमान वाहतुकीच्या सुविधा वाढविणे ही बाब निर्णायक पायाभूत रचनेतील घटक ठरेल.

४.६.२१ प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी खाजगी क्षेत्रामधील गुंतवणुकीचे धोरण निर्णायक असणार आहे. यामुळे सामाजिक क्षेत्रांमध्ये जसे आरोग्य व शिक्षणासह पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडता येईल. नजिकच्या भविष्यकाळात अप्रगत प्रदेशांमध्ये खाजगी गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करणे व ती आकर्षित करणे हे राज्य शासनासाठी प्रमुख आव्हान असून ते आव्हान पेलण्याची गरज आहे. राज्य शासनाने गुंतवणुकदारांना त्यांच्या स्वत:च्या औद्योगिक धोरणांमध्ये मैत्रीपूर्व परस्पर सहाय्यकारी पध्दतीने गुंतवणूक वाढविण्यासाठी प्रत्येकवेळी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. हितसंबंधित घटकांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, शासनाच्या नियामक धोरणाच्या चौकटीत राहून काम करत असतांना त्यांना अनेक अडचणींना तोंड घ्यावे लागते. प्रादेशिक विकासाच्या धोरणांशी संबंधित असलेल्या प्रकरणात, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यात व व्यवहारात आम्ही महत्त्वाच्या सुधारणा अधोरेखित केलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात आणि विशेषत: मराठवाडा व विदर्भात उत्पादनाचा खर्च खूपच जास्त आहे, असे समजले जाते. उद्योजकांनी उद्योग उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या व ना हरकती यांविषयी खूप तक्रारी केल्या आहेत. त्यांपैकी कित्येक उद्योजकांना मुंबईत असलेल्या शासकीय कार्यालयांमध्ये अतिशय वाईट रीतीने वागणूक देण्यात आली आहे. आम्ही या बाबतीत काही विशिष्ट निरीक्षणे नोंदविली आहेत व सुचना दिल्या आहेत. औद्योगिक विकासाची गती वाढविण्याकरिता, प्रत्येक प्रदेशाला सुस्पष्ट निर्बंध व आवश्यक गोष्टींना सामोरे जावे लागते. या दृष्टीने, आम्ही अशी शिफारस केली आहे की, प्रत्येक प्रदेशासाठी स्वतंत्र उद्योग संचालनालय असायला हवे. (त्याकरिता पुढील तपाशिलासाठी कृपया औद्योगिक वृध्दी व धोरण या प्रकरणाचा संदर्भ घ्यावा)

४.६.२२ आणखी महत्त्वाचे म्हणजे, राज्य शासनाने प्रत्येक प्रदेशाचे मूल्यांकन करून तौलनिक वर्चस्वावर लक्ष केंद्रित करावे. या अगोदर निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे, केवळ नैसर्गिक व भौतिक साधनांची उपलब्धता तुलनात्मक वर्चस्व निश्चित करू शकत नाही. आधुनिक तंत्रज्ञान व निरनिराळे विकल्प, उद्योंगाना जोडण्यासाठी प्रगत व अप्रगत प्रदेशातील पायाभूत सुविधा, उपलब्ध कुशल मनुष्यबळ, शैक्षणिक संस्था आणि उद्योगासाठी अनुकूल धोरणे यागोष्टी प्रादेशिक गतीशील तौलनिक वर्चस्व निश्चित करतात. दुसऱ्या शब्दात, यापैकी उचित घटकांची उपलब्धता तौलनिक वर्चस्व निर्माण करू शकेल. उदाहरणार्थ, भारतातील दूरसंचार यंत्रणेने अलौकिक शीघ्रतेने सुधारणा घडवून आणली आहे. पुढील विकास ब्रॉडबँड जोडणीच्या माध्यमातून अशा अनेक उद्योगव्यवसायाच्या संधी निर्माण करता येऊ शकतील ज्याबद्दल भूतकाळात आपण कधीही कल्पना केलेली नसेल. ज्ञानाचा प्रसार नवीन पध्दतीने विकसित करण्यासाठी हे तंत्रज्ञान विस्तृत करायला हवे व उपयोगात आणायला हवे. राज्य शासनाने प्रादेशिक/स्थानिक भाषेतून माहिती नि ज्ञान विकसित आणि ते समृध्द करण्यासाठी गुंतवणूक करायला हवी. भविष्यात, अप्रगत प्रदेशांमध्ये अनेक ऑन-लाईन सेवा, सुसाध्य उद्योग प्रस्ताव निर्माण होतील ते पहायला हवे. उद्योगावरील प्रकरणात आम्ही अशी नोंद घेतली आहे की, सर्वप्रकारे अप्रगत असूनदेखील जालना जिल्हा एका बाजूने स्टील उत्पादनात प्रमुख केंद्र व धातुची वस्तु उत्पादने त्याचप्रमाणे मोटार निर्मिती केंद्र म्हणून आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राची बियाणांची राजधानी म्हणून उदयास आलेला आहे. त्याचप्रमाणे, औरंगाबाद हे औषधनिर्मितीच्या उद्योगासाठी प्रमुख केंद्र म्हणून उदयास आलेले आहे. (तक्ता क्र. ४.३ क्षेत्रीय व प्रादेशिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी शक्य तत्रंज्ञान व धोरणात्मक सुधारणा उपक्रमांची विशद करणारी यादी पहावी).

येणाऱ्या दशकात, ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्थेकडून बजावली जाणारी भूमिका खूप निर्णायक असेल. राज्य शासनाने विकासाचे भविष्यकालीन संभाव्य मार्ग ओळखायला हवेत आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये नेतृत्त्वासह राज्याची प्रगती साधण्यासाठी दूरदृष्टी असायला हवी. राज्य शासनाने धोरणात्मक विकास व उच्च शिक्षणामध्ये सुधारणा

करण्यासाठी गती वाढविली पाहिजे. त्यासाठी राज्याच्या विद्यापीठांमध्ये बदल घउवून आणून त्यात श्रेणीवाढ करून उच्च अध्ययनाच्या संस्था व शैक्षणिक स्वतंत्र आणि जगातील सर्वश्रेष्ठ १०० विद्यापीठांमध्ये त्यांना स्थान देऊन आदर्श संस्थामध्ये रूपांतर करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

तक्ता ४.३

क्षेत्रीय व प्रादेशिक विकासाची गती वाढविण्यासाठी विशिष्ट उपक्रमांची सोदाहरण यादी.

अ . मराठवाडा व अवर्षणप्रवण प्रदेशातील सौर ऊर्जेचे उपक्रम.

ब. सूक्ष्म सिंचनाला व जेथे जेथे शक्य असेल त्या त्याठिकाणी सूक्ष्म सिंचनाकडे वळविण्यासाठी प्रचालना देणे.

क. पाणलोट विकास अभियान.

ड. अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान अभियान.

ई. विदर्भ व मराठवाडा वस्त्रोद्योग अभियान.

फ. कोकण, मराठवाडा व विदर्भासाठी स्वतंत्र पर्यटन विकास अभियाने.

ग. संरक्षण सिंचन धोरण व समुचित पीक पध्दती उपक्रम.

ह. वाडीधिष्ठित दृष्टिकोन ठेवून आदिवासी प्रदेशासह अप्रगत प्रदेशांसाठी चारा व दूधउत्पादन अभियान.

आय. विदर्भ, कोकण व मराठवाडा यांसाठी फलोत्पादन अभियान.

ज . कोकणासाठी बंदराला जोडणारे पोचरस्ते.

के. कोकण व नाशिक विभागातील डोंगराळ भागासाठी पूरनियंत्रण -नि- वीज-नि-संरक्षण सिंचन योजना.

ल. नागरी क्षेत्रांसाठी व औद्योगीकरणासाठी पिण्याचे पाणी /पुनर्वापर व संपूर्ण मल निस्सारण प्रक्रिया अनिवार्य करणे.

म. औद्योगिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपक्रम.

न. पीक घेण्याच्या पध्दतीत बदल.

ओ. कृषि कर्ज व वखार प्रचालन, शेतकऱ्यांना जमा पावतीवर आधारित पत पुरवठा मिळविण्यासाठी सुधारित सुलभ पध्दत.

प. कृषि प्रक्रियेसाठी निधीचा पुरवठा.

क्यू. कृषि संबंधित नवीन प्रकल्प व पीक पध्दतीमधील दर्जात्मक बदल.

र. नागपूरमध्ये विमान निर्मितीचा उद्योग व वैमानिक प्रशिक्षण केंद्र.

स. कोरडवाहू व पर्जन्याश्रयी शेती विकास मंडळ.

ट. संपूर्ण महाराष्ट्रभर ब्रॉडबँड सेवेची जोडणी.

यु. प्रादेशिक भाषेमध्ये शैक्षणिक सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनचा विकास.

व्ही . सामूहिक वन हक्क.

डब्ल्यू. आदिवासी तरूणांमध्ये कौशल्य निर्मिती करणे (मंडळ).

क्ष. वनोत्पादनाचे (प्रक्रिया/विपणन) मूल्यवर्धन करणे.

य. उद्योजकता (समाजाचा समावेश करून) प्रशिक्षण अभियान.

४.६.२३ आमच्या दृष्टिकोनाने, आम्ही 'केंद्र शासनाच्या' जबाबदाऱ्या व त्याची भूमिका यांदेखील ठळकपणे निदर्शनास आणल्या आहेत. 'शासन' या प्रकरणात केंद्र शासनाची भूमिका यावर एक पूर्ण खंड आहे. हे अतिशय महत्त्वाचे असून, त्यावर आमचा विश्वास आहे आणि घटनेचे अनुच्छेद ३७१(२) मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे वरील बाबीचे अनुपालन करते. **अशाप्रकारे, केंद्र शासन अनुच्छेद ३७१(२) च्या आदेशानुसार केवळ धोरणात्मक सुधारणाच करीत नाही तर आम्ही असे देखील मानतो की, केंद्र शासनाने वित्तीय आयोगांमार्फत निधीची तरतूदही करायला हवी.** केंद्र शासनाकडे काही क्षेत्रे त्याच्या अखत्यारित आहेत, उदाहरणार्थ रेल्वे जर दीर्घकाळ प्रलबित असलेल्या रेल्वे प्रकल्पांची तत्परतेने व शीघ्रतेने अमंलबजावणी करण्यात आली तर मराठवाडयाच्या प्रदेशाची वाणिज्यिक उत्कर्षात आमूलाग्रतेने बदल घडून येईल. त्याचप्रमाणे, वन धोरण, वन क्षेत्रांशी संबंधित पर्यावरणीय ना हरकती, विदर्भातील प्रमुख खनिजांवरील स्वामित्व हक्काचे दर व प्रदाने आणि कोकणातील सागरतटीय निर्बंधित क्षेत्र धोरण या सर्व बाबी क्षेत्र केंद्र शासनाच्या अखत्यारीत येतात. जर ह्या सर्व धोरणांत योग्यपध्दतीने सुधारणा करण्यात आल्या व आवश्यक बदल करण्यात आले तर अप्रगत प्रदेशांच्या विकासाला सहजतेने गती देता येऊ शकेल. शिवाय, आपण याआधी युक्तिवाद केल्याप्रमाणे, संरक्षण, उद्योग व शस्त्र निर्मिती केंद्राच्या विकासासाठी मराठवाडयातील प्रदेश अतिशय योग्य व संभाव्य आशादायक स्थान आहे. यांपैकी काही उद्योग हे 'संरक्षण मंत्रालयाच्या' अखत्यारीतील आहेत व या प्रदेशात खाजगी पुरवठादार व खाजगी पुरवठादाराचे सहाय्यभूत जाळे उभारण्याच्या कामासंबंधी शीघ्रतेने विकास करता येऊ शकेल. या अप्रगत प्रदेशात, गतिमान प्रादेशिक विकासाचा प्रश्न, केंद्र शासनाच्या धोरणात्मक बदलाद्वारे यथायोग्य समर्थनास पात्र आहे.

४.६.२४ येणाऱ्या काही वर्षात, पायाभूत सरंचनेशी संबंधित अनेक प्रकल्प हे, सार्वजनिक खाजगी भागीदारी व्यवस्थेअंतर्गत तसेच विशेष नैमित्तिक वाहन निर्मिती उद्योग उभारण्याच्या माध्यमातून असतील. असे प्रकल्प विशेषकरून दीर्घकालीन संविदात्मक व्यवस्थेअंतर्गत असतील.म्हणून अशा प्रकारच्या करारामध्ये संविदात्मक तरतुदीचे नियतकालिक परीक्षण, पुनर्वाटाघाटी या गोष्टींचा सुध्दा समावेश असेल. राज्य शासनाकडे, अशा गुंतागुंतीच्या व विविध बाबींना हाताळण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा असणे गरजेचे आहे.

४.६.२५ **जाहीर वादविवाद व चर्चा यांमधून पारिस्थितिकी बद्दलची संवेदनशीलता व पर्यावरणसंबंधीची चिंता अत्यंत प्रकर्षाने दिसून आली आहे व ते बरोबरही आहे.** त्यामुळे कोणत्याही प्रकल्पांचे उत्पादन खर्च-नफा यांचे विश्लेषण करतांना उत्पन्नखर्चाचा त्यात समावेश झाल्यामुळे त्याचा स्पष्टपणे हिशेब ठेवणे आवश्यक आहे. म्हणून, पर्यावरणाशीसंबंधित धोरणाच्या विकासाच्या उद्दिष्टांसह सूक्ष्मपणे अंदाज बांधणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा आहे की, विधिसंमत व निर्णायक पारिस्थितिकीय चिंता ही अत्यावश्यक तर्कशास्त्राधारित धारणा ठेवतांना काळजी घेऊन हे बघायला पाहिजे की, तो विकास विकासाला मारक नाही, म्हणून, महाराष्ट्राने 'हरीत विकासाचे' धोरण अनुसरावयास हवे (यासंबंधी अहवालात अन्यत्र प्रयोजनधिष्ठित पूर्वसूचना केली आहे) आणि म्हणून, उदरनिर्वाह होण्यासाठी साधन क्षमतांचा विकास करतांना जिवनाधार गोष्टींचे रक्षण केले पाहिजे. विशेषत: कोकण प्रदेश व विदर्भ प्रदेशात पर्यावरणीय परिस्थितिकी साधन संपत्तीच्या स्रोतांची खूप वेगळी रचना आहे. या दोन्हीही प्रदेशांमध्ये, येणाऱ्या दशकात, मोठया संख्येने औष्णिक वीज प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. त्यांना मी अल्प प्रदूषणकाशी तंत्रज्ञानासह त्यांची कार्यक्षमतेपूर्वक देखरेख करणे व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. फक्त एवढयावरच न थांबता प्रयोजनाधिष्ठित भरपाईचे तत्व अंमलात आणणे आवश्यक आहे. याच वृत्तीने, विशिष्ट प्रादेशिक/स्थानिक विकासाकरिता प्रयोजनाधिष्ठित साधनसंपत्तीचे हे तत्त्व आत्मसात करणे आवश्यक आहे. अशा इतर दोन प्रकरणात उत्खनन केल्या जाणाऱ्या खनिजांच्या स्वामित्वधनाबाबत आणि वनांमुळे टिकून असलेल्या अधातूद्रव्याबाबत चर्चा केली आहे. प्रादेशिक असमतोल ज्यामुळे निर्माण होतो त्यासाठीच्या अंतर्निहित शक्ती सौम्य करण्यासाठी आमच्या दृष्टिकोनाचा एक वेगळा पैलू आहे. त्याचप्रमाणे, येणाऱ्या दशकांत, महाराष्ट्रामधील वाढत्या नागरी प्रदेशामुळे घनकचरा व्यवस्थापन व मलनिस्सारक प्रक्रियेशी संबंधित गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागेल. या प्रदेशांमध्ये, पर्यावरणाविषयीच्या समस्या व साधनसंपत्तीची व्याप्ती ही त्यांचे स्वरूप खूप भिन्न असण्याची संभावना आहे. जरी आम्ही या अहवालात स्पष्टपणे तपशिलवार उपाय योजले नाहीत तरीही ही बाब महत्त्वाची असून, भविष्यात विभिन्न प्रकारचा असमतोल निर्माण होण्यासाठीची संभाव्य परिस्थिती असू शकेल याबाबत आम्ही संदेश दिला आहे.

४.६.२६ महाराष्ट्र एक मोठे राज्य असून त्यात मोठया प्रमाणात विभिन्न तालुके, जिल्हे व प्रदेशांचा समावेश आहे. त्यापैकी त्याचे प्रत्येकाची ठळक अशी वैशिष्टे आहेत. अशा परिस्थितीत 'सर्वांसाठी एकच धोरण' निष्फळ ठरते. सामाजिक-आर्थिक स्थितीमधील भिन्नतेचे स्वरूप व विस्तार यांचे परिणामकारक व अर्थपूर्ण विकेंद्रिकरण होण्याची आवश्यकता आहे. आमच्या दृष्टीने, अप्रगत प्रदेशांना सकारात्मक अनुकूल वागणूक देण्याची आवश्यकता आहे. आमच्या समजुतीप्रमाणे, अप्रगत प्रदेशांमध्ये वास्तविक किंवा काल्पनिक म्हणजे आदिवासी व पाण्याचे दुर्भिक्ष असलेले अवर्षणप्रवण प्रदेश यासारख्या प्रदेशांचा समावेश होतो. नियोजित तसेच अनियोजित अशा दोन्हीही साधनसंपत्तीच्या बाबतीत प्रदेशाअंतर्गत त्याच बरोबर प्रदेशा प्रदेशांतर्गत भिन्नतेच्या वादप्रश्नांना आमंत्रित केलेले आहे.

आम्ही अनुसरलेल्या दृष्टिकोनानुसार धोरण आराखडा व शासन यांच्यामध्ये मूलभूत बदल अभिप्रेत आहेत. आम्ही प्रस्तावित केलेल्या सूचना व साधने शक्य असतील तेवढया कमी आहेत. राज्यस्तरीय धोरण तयार करतांना प्रादेशिक नियोजनाचे सूक्ष्म तपशील कमीतकमी प्रमाणात अतंर्भूत व्हायला पाहिजे. प्रादेशिक नियोजन व कार्यतंत्रासाठी अधिकाधिक लवचिकता व त्यासंबंधी स्वायत्तता देण्याच्या प्रयोजनार्थ, आम्ही प्रमुख क्षेत्रांसाठी किमान गोष्टींवर आधारित व्यापक सूत्राची शिफारस केली आहे.

शासनामार्फत वचिंत राहिलेल्या प्रदेशांच्या लोकसंख्येचे ज्ञात झालेल्या अन्यसंक्रमणाबद्दल भाष्य व्हायला पाहिजे. **फक्त विशुध्द विकेंद्रित लोकशाही शासन, हे शासन व जनता यामधील विद्यमान राजकीय दरी कमी होण्यास मदत करू शकेल म्हणून, आम्ही आग्रहपूर्वक सूचित करतो की, महाराष्ट्र शासनाने ७३ वी /७४ वी घटना दुरुस्तीच्या तत्त्वाचे पालन केलेच पाहिजे. राज्य वित्त आयोगाच्या संविधानात्मक तरतुदींचा मान राखला पाहिजे. अर्थ व आशयाच्या दृष्टीने अनुसरण व्हायला पाहिजे. केंद्रीय वित्त आयोगाला ज्या शिफारशीद्वारे मान्यता देण्यात आली आहे. त्याच बांधीलकीच्या व पावित्र्याच्या स्तरावर राज्य वित्त आयोगालादेखील मान्यता द्यायला हवी.**

अंतत:, प्रत्येक समाजाची तिच्या स्वत:च्या साधनसंपत्तीच्या जोरावर विकास करण्याची क्षमता देखील राजकीय व संस्थाच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. ***राजकीय नेतृत्व व सामाजिक उद्योगशीलता जर समानतेने सावध, तयार व संघटित झाली नाही तर, तेच ठराविक धोरणे तेच ठराविक साधन संपत्तीचे प्रमाण अतिशय भिन्न स्वरूपाचे परिणाम लोकांपुढे येण्याची शक्यता आहे.*** हे अधोरेखांकित करणे महत्त्वाचे आहे की, साधनसंपत्तीची वृध्दी व विकास करतेवेळी राजकीय नेतृत्व, खाजगी क्षेत्राची उपक्रमशीलता आणि लोकांचा सहभाग यांची भूमिका अंत्यत निर्णायक आहे सामाजिक-राजकीय तफावती कमी करणे हे, फक्त शासनाच्या धोरणाने साध्य होऊ शकत नाही. नजिकच्या भविष्यकाळात, खाजगी क्षेत्राची भूमिका व संधीच्या प्रकारांविषयी लोकोपयोगी जाणीव या गोष्टी अधिकाधिक महत्त्वाच्या असल्याने गृहित धरल्या जातील. म्हणून शासनाची धोरणे व प्रयत्नांचे यश हे जाणीवपूर्वक मोठया प्रमाणात समाजाकडून त्याचा आवश्यक पाठिंबा आजमावून घेतला पाहिजे व सार्वजनिक खाजगी सहभागाची अनेक क्षेत्रे व रूपे आहेत. उल्लेखनीय म्हणजे, तंत्रशिक्षण, आरोग्य, ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेत उदयास येणारे नवनवीन विभाग, हे सार्वजनिक खाजगी सहभागाच्या प्रकारांमधून पुढे उपयोगात आणले जायला पाहिजेत.

'शासन' याप्रकरणामध्ये आम्ही सुचविल्याप्रमाणे संस्थाचे स्वरूप व व्यवस्था यांचा उद्देश शासनाला प्रादेशिक आशाआकांक्षाप्रत जवळ आणणे व अधिक परिणामकारक रीतीने व ठामपणाने प्रादेशिक चौकट साधण्यासाठी राजकीय वर्गाकरिता संस्थाविषयक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. शासन प्रणालीत सुधारणा करणे आणि राजकीय नेतृत्व व संस्थाची उपक्रमशीलता एकमेकांच्या सहकार्याने व्हायला हवी.

४.७ प्रादेशिक समतोल साधण्यासाठी साधनसंपत्ती संघटित करणे

४.७.१ आर्थिक कृतियोजना व संस्थाच्या धोरणातील सुधारणा ज्यांचे आम्ही समर्थन केले आहे त्याबाबत विविध आघाडींवर राज्य शासनामार्फत जाणिवपूर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहे. तथापि, अशा अनेक प्रयत्नांना ध्येये प्रत्यक्षात

आणण्याकरिता पुरेशा प्रमाणात साधनसंपत्तीचे संघटन व वित्तीय धोरणाची आवश्यकता आहे. आम्ही सुचविलेल्या धोरणाची सूक्ष्म-अर्थव्यवस्था व वित्तीय वर्धनक्षमता यांची खात्री करून घेण्यासाठी आम्ही प्रत्येक प्रयत्न केला आहे. आम्ही आवश्यक अंदाज तयार करण्यासाठी काही प्रमाणात पुराणमतवादी सावध आहोत. उदाहरणार्थ महसुली उत्पन्नाबद्दल पूर्वानुमान करते वेळी आम्ही नेहमीप्रमाणे उच्चतम वृध्दी दरासोबत निम्न प्राप्त होण्याजोगा वृध्दीदर व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून गृहित धरले आहे. आम्ही वेतनांच्या सुधारणेवर आधारित नंतरच्या दोन वेतन आयोगांच्या शिफारशी यासारख्या भविष्यातील मोठया सक्षमतेच्या आकस्मित बाबी विचारात घेतलेल्या आहेत. त्याच वेळी आम्ही राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन व राजकोषीय दूरदर्शीत्व प्रमाणकांचे पालन करण्यासाठी प्रत्येक सावधगिरी बाळगली आहे. उदाहरणार्थ कर्जाद्वारे संभाव्य साधनसंपत्ती संघटित करून अंदाजपत्रके तयार करतेवेळी आम्ही कर्ज घेण्याची मर्यादा अशा पातळीपर्यंत आणून ठेवली आहे की, त्यामुळे एकूण स्थूल कर्जाची रक्कम ही राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या १७.५ टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही, म्हणजेच ती निर्धारित मर्यादेतच आहे. म्हणून, आम्ही खात्री दिलेली आहे की, सुचविण्यात आलेले राजकोषीय धोरण हे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या कार्यशीलतेला कोणताही आघात किंवा अडथळा नसून प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे ध्येय साध्य केले आहे. याउलट, आम्हाला खात्री आहे की, विशेषत: चौदाव्या पंचवार्षिक योजनेच्या नंतरच्या काळात वाटपासाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध असेल. सूचविण्यात आलेल राजकोषीय धोरण हे, प्रभावी परिणाम यासाठी निर्णायक ठरेल, व उच्चतम वृध्दी धोरणास राज्याच्या अर्थव्यवस्थेला सुस्थितीत ठेवील, पुढील भागांत आम्ही, आवश्यक साधनसंपत्ती संघटित करण्याबद्दलचा थोडक्यात आराखडा व राजकारणीय अनुशासनाची समोच्च रेषा तयार केली आहे, जी सुचविलेल्या शर्तीखाली कार्य करील.

४.७.२ २०११-२०१२ या वर्षासाठी एकूण राज्याचे स्थूल उत्पादनाची चालू किंमत जवळपास रू. १२ लाख कोटी आहे. २०११-१२ साठीचा राज्याच्या स्थूल उत्पादनाच्या वृध्दीदराचे (२००४-०५) मूल्य सतत २०१०-११ मध्ये १०.२ टक्क्यावरून ७.१ टक्क्यापर्यंत तीव्रतेने घसरला असून अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये एकूण वृध्दी दर ८.१ टक्क्यापर्यंत सीमित झाला आहे. या तुलनेत २०१२-१३ दरम्यान राज्याच्या स्थूल उत्पादनाचा वृध्दी दर हा जवळपास ७.१ टक्क्यापर्यंत आहे. २०१२-१३ साठीचे महसुली उत्पन्न अगोदर नमूद केल्याप्रमाणे रूपये १,३७,००० कोटी होते. तथापि, त्या वर्षाभरात मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे, महसुली उत्पन्नाचे सुधारित अंदाजपत्र वाढविण्यात येऊन जेव्हा समितीला याबद्दल माहिती देण्यात आली त्यावेळी प्रत्यक्ष जमा रक्कम ही रूपये १,४४,००० कोटीपेक्षा थोडी अधिक अपेक्षित होती. वर्ष २०१३-१४ मध्ये, राज्याला रुपये १,५५,९८७ कोटी इतकी रक्कम वसूल होईल व विविध क्षेत्रांकडून मागणी केलेल्या वाढीव खर्चाचा मेळ घालण्यात राज्य समर्थ होईल अशी आशा होती. तेराव्या वित्त आयोगाने घातलेल्या अटी पूर्ण करण्यास राज्य समर्थ आहे. आणखी, या वर्षातील निव्वळ घेतलेली कर्जे राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या फक्त १.६ टक्क्यापर्यंत निर्बंधित करण्यात आली आहेत.

राज्याची पुढील वित्तीय स्थिती, हा संतुलीत विकासाची खात्री करून देणारा एक प्रमुख घटक राहाणार आहे. म्हणून, राज्याचे राजकोषीय अनुशासन सुस्थितित ठेवण्याबद्दलचे कार्य उल्लेखनीय आहे. जेथवर राज्याच्या कर्ज घेण्याबद्दल संबंध येतो, तेथवर याच्या परिणामस्वरूप राज्य निश्चितच दिलासादायी स्थितीत आहे. समितीने वर्तमान व भविष्य या दोन्हींच्या वित्तीय स्थितीचे सखोल विश्लेषण केलेले आहे, आणि त्याबद्दल आम्ही समाधानी असून आमची खात्री देखील पटली आहे की, सर्व विकास प्रस्तावांचा मेळ घालण्यासाठी आवश्यक साधनसंपत्ती ही, आम्ही केलेल्या शिफारशीप्रमाणे, ती साधने चालू पंचवार्षिक योजनेदरम्यान पुढील दोन पंचवार्षिक योजनेदरम्यान राज्यात उपलब्ध असतील. मूळात महत्त्वाचे आव्हान असे आहे की, त्या साधनांचा परिणामकारक उपयोग करण्याची सुनिश्चिती करणे, हे आहे.

४.७.३ अशाप्रकारे, राज्याची आर्थिक व केंद्रिय स्थिती बळकट केल्यावर, वृध्दी दराचे विवक्षित अत्यंत सुरक्षात्मक व पुराणमतवादी गृहीतकांसह समितीने चौदाव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर पर्यंत साधनसंपत्तीबद्दलचे ध्येय गाठण्यासाठी सविस्तर योजना तयार केली आहे. राज्य शासनाकडे मागील दहा वर्षापासूनच्या ऐतिहासिक आधार सामग्रीवर आधारित राज्याच्या विविध प्रकारच्या महसुलासाठी असे करण्यात आलेले आहे.

योजना/अंदाजपत्रक तयार करतांना, महाराष्ट्रासाठीची सर्व साधनसंपत्ती पुढील अडीच पंचवार्षिक योजनांसाठी आम्ही अतिशय सावधगिरीने पारंपारिक दृष्टिकोन बाळगून आहोत. वृध्दी दरांच्या खालील घटकनिहाय गृहितके आम्ही तयार केलेली असून त्यांना अलिकडील ऐतिहासिक कल (महसूल व खर्च या दोन्हीही बाजू) यांचा आधार घेण्यात आला आहे व समतोल ठेवण्यात आला आहे किंवा पारंपारिक पध्दतीने प्रमाणाबाहेर कृत्रिम चलनवाढ करण्यात आली आहे. त्याच वेळी, आम्ही साधनसंपत्तीच्या (क्षेत्रनिहाय मागण्या) गरजा देखील विचारात घेतलेल्या आहेत. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, आम्ही, आमच्या शिफारसींमध्ये अनुवाद केल्याप्रमाणे तज्ञांच्या अभ्यासपूर्वक दृष्टीकोनातून उद्‌भवणाऱ्या/निर्माण होणाऱ्या क्षेत्रीय साधनसंपत्तीच्या गरजा भागविण्यास आम्ही सक्षम/समर्थ असू आणि असे की, दिलेल्या कालावधीच्या चौकटीत राहून विनिर्दिष्ट क्षेत्रीय उद्दिष्टये साध्य करण्यासाठी अंदाजित असलेल्या सर्व साधन संपत्तींचा विचार करून त्यात भर करण्यात येईल किंवा त्यांची कपात करता येईल. २०२७ पर्यंतचे वर्ष निहाय संपूर्ण साधनसंपत्तीचे नियोजन व चौदाव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंतचा कालावधीमध्ये योजनांतर्गत निधिची उपलब्धता पारंपरिक गृहीतकांनुसार करण्यात आली आहेत. आणि परिशिष्ट ४.१ मध्ये ते पाहता येऊ शकेल. ***जेव्हापासून माल व सेवाकर खाली वर होत असल्याने, आम्हाला आत्मविश्वास आहे की, राज्याला प्रत्यक्ष मिळणारा महसूल अदाजांपेक्षा अधिक असेल. त्यामुळे कर्ज घेण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी पुढे शक्य होणार असून राजकोषीय उत्तरदायित्व कायदा अस्तित्वात असेपर्यंत उर्वरित कर्ज घेणे त्याच्या मर्यादित राहणार आहेत आणि शेवटी केंद्रपुरस्कृत योजनेद्वारे अधिक चांगली शासन प्रणाली राज्याला केंद्र शासनाच्या साधनसंपत्तीपर्यंत आणण्यात सक्षम करील.***

४.७.४ याप्रकारे, व्यापक साधनसंपत्ती ही, मर्यादित राजकीय भूमिका या व्यतिरिक्त पारंपरिक दृष्टिकोनाखालील गृहितके जे अकल्पित आकस्मिक बाबी यांबरोबर नेहमीच्या व्यवसायाची क्रियाशीलता यागोष्टी त्यांना दिलासा देणाऱ्या व जागा निर्माण करून देणाऱ्या आहेत. विद्यमान पंचवार्षिक योजनेव्यतिरिक्त, नंतरच्या दोन पंचवार्षिक योजनांसाठी लागणारी एकूण साधनसंपत्तीत, चालू किंमतीच्या जवळपास २३-२४ लाख कोटीपर्यंत रक्कमेची भर होणे शक्य आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या उर्वरित कालावधीमध्ये, राज्याला जवळपास रुपये २,१७,००० कोटी इतकी रक्कम वाटप करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे, तेराव्या आणि चौदाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये नियोजन निधीसाठी अनुक्रमे रुपये ६,७०,००० कोटी व रुपये १४,८०,००० कोटी इतक्या रकमेपर्यंतची साधनसंपत्ती उपलब्ध असेल. आम्ही एकेका प्रकरणांमधून उद्‌भवणाऱ्या विभाग/क्षेत्र निहाय मागण्यांसह साधनसंपत्तीची उपलब्धता यांचा आपसमेळ बसविण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही केलेल्या शिफारशींबरोबर प्राधान्यक्रम व वेळेच्या चौकटीसह कार्य करण्याकरिता साधनसंपत्तीचे अपेक्षित वित्तीय भार व तत्कालीन सुसंगती यांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, आम्ही, (यापुढील योजना विचारात घेऊन) त्यांचा विविध रुपातील तज्ञ व्यक्तिंवरचे नियंत्रण टाळण्याकरिता क्षेत्रनिहाय वाटप तसेच विशिष्ट स्थळाच्या वाटपासंबंधीची कमीतकमी टक्केवारी करण्यासाठी काही जमिनीची सरळ तरतूद करण्यासाठी देखील आमच्या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. असे प्रयत्न करतेवेळी, त्यामधील पावित्र्य व सहभागी असणाऱ्या लोकशाहीचे मूल्य राखण्यासाठी निवडून आलेले प्रतिनिधी व अक्षत विधानमंडळाची भूमिका व कृती या सर्व गोष्टी देखील पूर्णपणे बंद करायच्या नाहीत. आवश्यक असणाऱ्या साधनसंपत्तीचे तपशील तसेच सूत्ररुपाने तयार केलेल्या वाटणीचे तपशील (गृहित धरलेला/शिफारस केलेल्या जमिनीचा स्तर व सूत्ररुपाने केलेल्या वाटणीखालील घटकांच्या आधारसामग्रीचा समावेश करून) जोडपत्र ४.२ ते जोडपत्र ४.७ मध्ये देण्यात आले आहेत, आणि क्षेत्रीय तसेच वाटपाचे स्वरूप हे जोडपत्र ४.८ व ४.९ मधील तक्त्यात दाखविण्यात आले आहेत. प्रत्येक क्षेत्रासाठी (प्रति वर्ष ५ टक्के गृहित चलनवाढीसह) योजना केल्याप्रमाणे आवश्यक साधनसंपत्ती पुर्णाकांत धरण्यात आली आहे, आणि आम्ही योजना केल्याप्रमाणे एकूण आवश्यकतेच्या जवळपास १६ लाख कोटी इतक्या रकमेची आहे. उर्वरित बारावी पंचवार्षिक योजना, तेरावी पंचवार्षिक योजना आणि चौदावी पंचवार्षिक योजनांसाठी अनुक्रमे जवळपास रुपये १,९०,०००, रुपये ५,१२,००० व रुपये ८,४३,००० कोटी इतकी रक्कम योजना निहाय काढण्यात येईल (कृपया जोडपत्र ४.४, स्तंभ १३ बघावा).

४.८ प्रादेशिक समतोल निर्माण करण्यासाठी व तो टिकवून ठेवण्यासाठीचे निर्देशांक

वरील धोरणांचा पुनरुच्चार करतांना, प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करणे आमचे धोरण असून, मूळत: निष्पत्तीवर आधारित दुहेरी दृष्टिकोन ठेवणे आवश्यक झाले आहे. पहिला दृष्टिकोन म्हणजे विकास घटक किंवा पायाभूत लोकोपयोगी माल जो प्रमाणित पध्दतीने संपूर्ण लोकसंख्येसाठी समान ठेवण्यासाठी प्रयत्न झाले आहेत, ते ओळखणे, हा आहे. दुसरा दृष्टिकोन जो पुन्हा पूर्वीच्या परिवर्तनशील घटकांवर स्थूलमानाने कार्य करतो, परंतु त्यांना एकमात्र उपभोग्य वस्तु न मानता गुंतवणुकीस योग्य म्हणून विचारात घेतो, आणि अप्रगत प्रदेशांमध्ये वृध्दी दरात वाढ होईल अशा आधारक्षम पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी धोरणाची तरतूद करतो. म्हणून हे निर्देशांक मूलत: परिवर्तनशील क्षेत्राच्या पुढील गटांमधून प्राप्त करणे अत्यावश्यक आहे.

१. **पाणी:** पिण्याचे पाणी व मूलभूत उपजीविका (१४० एलपीसीपीडी) यांसह पाणी साठवून ठेवणे व ते वाहून नेणे, या गोष्टी पहिल्या दृष्टिकोनानुसार सुनिश्चित केल्या आहेत तर दुसऱ्या दृष्टिकोनातून पाणी हे उत्पादक साधनसंपत्ती (सिंचन /पाणलोट) म्हणून सुनिश्चित केली आहे.

२. **शिक्षण:** पहिल्या दृष्टिकोनानुसार साक्षरता व शिक्षणाचा हक्क+ (उदाहरणार्थ: आदिवासी स्त्रियांवर लक्ष केंद्रित करून त्यांना साक्षर करणे आणि सर्वांना इयत्ता दहावी पर्यंतच्या शिक्षणाचा हक्क देणे) आणि दुसऱ्या दृष्टिकोनानुसार सेवायोजनक्षम क्षेत्रात व्यावसायिक किंवा कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आणि सर्वोत्कृष्ट विद्यापीठ शिक्षण देणे, हे आहे. (वैद्यकीय शिक्षणासह मुक्त व परवडण्याजोगे)

३. **आरोग्य:** सर्वांसाठी मूलभूत आरोग्य सेवा आणि पहिल्या प्रयत्नात ग्रामीण क्षेत्रांतील तळातील आठ जिल्ह्यांसाठी सार्वत्रिक आरोग्य सेवा पुरविणे.

४. **रस्त्यांची जोडणी:** पहिल्या दृष्टिकोनानुसार ग्रामीण रस्ते जोडणी आणि दुसऱ्या दृष्टिकोनानुसार राज्य व राष्ट्रीय महामार्ग, लोहमार्गाचे जाळे पार्श्वप्रदेश ते बंदरे यांमधील रस्ते जोडणी, आंतरप्रादेशिक मोठया रस्त्यांचे प्रकल्प, विमानतळ, बंदरांचा विकास व ब्रॉडबँडच्या सेवेची जोडणी करणे.

५. **वीज:** पहिल्या दृष्टिकोनानुसार निवासी वापरासाठी घरगुती पातळीवर पूर्ण विद्युतीकरण करणे आणि दुसऱ्या दृष्टिकोनानुसार उत्पादनक्षम प्रयोजनांसाठी (कृषी, उद्योग, वाणिज्य या क्षेंत्रासाठी) पुरेशा प्रमाणात वीजपुरवठा करणे.

६. **कायदा, सुव्यवस्था व सुरक्षा :** विकास घटक म्हणून जीवन व संपत्तीच्या बाबतीत सुव्यवस्था ठेवणे व गुन्ह्याचे प्रमाण कमी राखून सुरक्षिततेची खात्री देणे. विशेषत: नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे.

७. **कर्ज:** दुसऱ्या दृष्टिकोनानुसार व्यवहार्य प्रकल्पांकरिता सुलभरीत्या कर्ज (निधी) उपलब्ध करून देणे.

८. **दरडोई उत्पन्न (पीसीआय) :** दरडोई उत्पन्न हा कदाचित सर्वात महत्त्वाचा दर्शक आहे. आंतर प्रादेशिक असमतोलाचा दोषास्पद उल्लेख केल्याशिवाय, मानव विकास निर्देशांक (एचडीआय) यासारख्या (अपुरी आकडेवारीविषयक परिवर्तनशीलता होती या कारणास्तव आम्ही ती टाळली व तिचा अंतर्भाव केल्यास आरोग्य, उत्पन्न व शिक्षण यांची दुहेरी मोजणी करता येईल) इतर चल घटकांशी ते अत्यंत परस्परसबंधित असून काही अर्थाने ती पुरेशी आकडेवारी आहे.

'कायदा व सुव्यवस्था यांसह आरोग्य' ही नित्यक्रम (एक) मध्ये दिसते, इतर मार्गातील (प्रत्येक चलघटक) तत्सम विस्तारांचे स्पष्ट अपेक्षित भार असताना देखील, आमचा संबंध आहे तोपर्यंत 'पतपैसा' केवळ नित्यक्रम दोनमध्येच दिसून येतो याची नोंद घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे, आम्ही नित्यक्रम दोनमधील आदरातिथ्य व पर्यटन उद्योगास पूरक असल्याने उद्योगाची सुस्थिती विचारात घेऊ शकलो आणि नित्यक्रम एकमध्ये (दारिद्र्यस्थिती सुधार / टिकाव) याबाबत सूक्ष्म पतपैसा किंवा संयुक्त पतपैसा विचारात घेऊ शकलो ही दोन्ही उदाहरणे असून आमच्या चौकशीसाठी संबद्ध असल्याने ती विचारात घेतलेली नाहीत. आणखी, आमच्या वाटपसूत्रात (अपेक्षित असणे) कायदा व सुव्यवस्था घटक विचारात घेतला असला तरीही आम्ही केवळ असेच गृहीत धरले आहे की, आमच्या गणतीमध्ये नसून, ती साधन मर्यादेची बाब असल्याने, आम्ही निर्विवादपणे अशी अशा केली आहे की, या प्रश्नावर सजगपणे लक्ष केंद्रीत करण्याचे सतत प्रयत्न हे काम पर्याप्तरीतीने पूर्ण करील.

४.८.१ वरील विचार आमचे वाटपसूत्र /गणकसूत्र सूचित करते सूत्र निर्माण करताना (खाली चर्चा केल्याप्रमाणे) आम्ही दोन स्वतंत्र दृष्टीकोन विचारात घेतलेले नाहीत. आम्ही काही विशिष्ट चलघटक जे वरील दर्शकांपैकी प्रत्येक दर्शकासारखे असल्याने व्यावहारिकपणे (मोठ्याप्रमाणात विश्वसनीय व सुसंगत माहिती/आकडेवारी यांच्या आधारे) काळजीपूर्वक निवडले आहेत. प्राधान्यक्रमाचा संबंध असेल तितपत, प्रत्येक प्रकरणांतील चर्चा सर्वसाधारण स्तरावरील चर्चा असेल. दृष्टीकोन एक किंवा विकास घटक हे स्पष्टपणे प्राधान्य क्रमांक एक आहेत. अर्थातच, याचा अर्थ असा नाही की, दृष्टीकोन दोनचे उपक्रम तात्पुरत्या अनुक्रमाने नंतर हाती घेण्यात येतील. वास्तविक, आम्ही जे सर्व काही सुचवित आहोत ते आरंभिक अल्प क्षणभंगूर काळाव्यतिरिक्त निश्चित कालावधीत करता येऊ शकेल/करण्यात यावे अशी आम्ही पूर्णपणे अपेक्षा करतो आणि शिफारस करीत आहोत की, ते सर्व खरोखरच करण्यायोग्य आहे याबाबत आम्ही सर्वतोपरी काळजी घेतलेली आहे.

४.९ वाटप सूत्र आणि गणनाविषयक कार्यपद्धती

वाटपसूत्र आणि गणनाविषयक कार्यपद्धती समजून घेण्याच्या प्रयोजनासाठी आम्ही वाचकांना जोडपत्रे ३.२ ते ३.९ आणि जोडपत्रे ४.५ ते ४.९ पाहण्याची सूचना करतो. उदाहरणार्थ कोणत्याही विशिष्ट वर्षात भविष्यात केंव्हातरी रुपये ६५,००० कोटी इतकी एकूण योजनांतर्गत साधने आम्ही गृहीत धरलेली आहेत. (रु.६६,००० कोटी २०१४-१५ साठी योजनांतर्गत आकार म्हणून अन्वयार्थ काढण्यात येऊ नये, हे केवळ उदाहरणादाखल आहे). आम्ही योजनांतर्गत साधने म्हणून आरंभीचा मुद्दा स्वीकारलेला आहे. यावरील प्रथम खर्च (घटनात्मक दृष्टीने) अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजना याबाबतचा आहे. सध्या उपलब्ध एकूण योजनांतर्गत साधनांच्या अनुक्रमे १०.२% आणि ८.९% इतकी वाटप पातळी आहे, परंतु २०११ च्या जनगणनेनुसार निश्चित करण्यात येईल ते प्रमाण देऊन किंबहुना भिन्न असावी अशी ही मागणी राज्याने स्वीकारावयाची असेल.

पुढील खर्च, अनुसूचित जाती उपयोजना आणि जनजाति उपयोजना वाटप वजा करून उपलब्ध योजनांतर्गत साधनांच्या नियत ३०% जल क्षेत्र योजनेसाठी बाजूस काढून ठेवण्याबाबत आम्ही शिफारस केली. (कृपया जोडपत्र ४.७ विशेषत: अ, ब, क, ड, व इ मधील आकडे या विशदीकरणात्मक उदाहरणात पहावे.) हे सर्व जल क्षेत्र विकास यासाठी (जल साधने, पेयजल आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, विशेष व दाब असलेली क्षेत्रे, जलसंधारण आणि लाभक्षेत्र विकास प्राधिकरणासहित) आम्ही प्रस्तावित करीत आहोत आणि ते नंतर याप्रकरणात नमूद केले आहे त्या विभागणी योग्य आधारावर असेल. कोणत्याही विशिष्ट वर्षात कोणत्याही कारणास्तव हे, अपुरे असल्याचे आढळून आले तर, योजनांतर्गत साधनांचा अविभाज्य भाग नेहमीच उपलब्ध आहे आणि सर्व क्षेत्रांची गरज लक्षात घेऊन राज्याने ही मागणी स्वीकारावयाची आहे. 'पाणी' त्याचे विवादास्पद व संवेदनात्मक स्वरूपास केंद्रीभूत करून असे वाटले की, हे करणे दूरदर्शीपणाची बाब आहे, जेणेकरून संपूर्ण एकात्मिक राज्यास याबाबतीत सूक्ष्मपणे देखरेख आणि वितरण याबाबत राज्याच्या जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. म्हणून, जल क्षेत्रासाठी आमच्याकडे स्वतंत्र वाटपसूत्र आहे. ***पाण्याशी निगडीत मुद्यांचे स्वरूप काहीसे संमीश्र आहे. आम्हाला त्यासाठी गरजांकडे पाहून उचित न्याय्य मागण्या तसेच शक्य तेथे सूत्ररूपाच्या पद्धती स्वीकारावयाच्या होत्या. सूक्ष्मस्तरावर 'एक आकार सर्वांना योग्य नाही' हा सर्वमान्य बेढब (परंतु अधिक लाभदायक) दृष्टीकोन आमच्या सिद्धांताचे एक प्रात्यक्षिक आहे.*** या तीव्र समस्या वेगाने हाताळणे शक्य व्हावे म्हणून आम्ही १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधीसाठी निश्चितपणे पाणी उपक्षेत्र वाटपासाठी काही निश्चित स्तर आणि काही किमान स्तर आणि नंतर याबाबत आढावा घेण्यात यावा किंवा नंतर योग्यरित्या फेरबदल करण्यात यावे याची देखील शिफारस केली. हे स्तर पुढीलप्रमाणे आहे :

४.९.१ वर नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरावरील विभागणीयोग्य पाण्याचे अशाप्रकारे प्राप्त झालेल्या ८.५% वाटपाचे (जोडपत्र ४.७ मधील आर १ पहा) पुढच्या पाच वर्षासाठी पुढील रीतीने विशेष क्षेत्रासाठी वाटप करण्यात यावे.

अ) ८.५% पैकी २७.३% ही विशेष तरतूद ज्या तालुक्यांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे त्या तालुक्यात (एक) ७५० मि.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो (दोन) ज्या तालुक्यामध्ये मागील १० वर्षाच्या कालावधीत कमीत कमी तीन वर्ष टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो (तीन) मागील १० वर्षाच्या कालावधीत किमान तीन वर्षात आणेवारी ५० पेक्षा कमी असल्यास व असावी सुद्धा (चार) ३०% पेक्षा कमी सिंचन क्षेत्र असल्यास (जोडपत्र ४.७ मधील 'एस' पहा). सध्या प्रदेशात अशा प्रकारचे ४४ तालुके आहेत.

ब) वर नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय विभागणीयोग्य जल वाटणीचे ८.५% पेक्षा अशाप्रकारे साध्य झालेले २६.३% क्षेत्र हे '***भूस्तर प्रतिकूल***' प्रक्रियेसाठी, तालुक्यांची संख्या ८५ आहे. (जोडपत्र ४.७ मधील 'टी' पहा)

क) अमरावतीतील '***खारपाण पट्ट्या***' कडे पिण्याच्या पाण्याची गरज म्हणून विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असून राज्यस्तरीय विभागणीयोग्य जल वाटणीच्या वर नमूद केल्याप्रमाणे साध्य झालेल्या ८.५% पैकी ८.२% (जोडपत्र ४.७ मधील 'यू' पहा) आणि

ड) विशेषत: नागपूरसाठी सिंचन आणि मत्स्यव्यवसाय विकास यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे प्राप्त झालेल्या '***माजी मालगुजारी तलाव*** (एमएम तलाव)'साठी राज्यस्तरीय विभागणीयोग्य जल वाटणीच्या ८.५% पैकी ३८.२% (जोडपत्र ४.७ मधील 'व्ही' पहा).

४.९.२ या गोष्टींची काळजी घेतल्यानंतर, प्रादेशिक स्तरांवरील जल क्षेत्र योजनांसाठीच्या इतर प्रयोजनांसाठी (खालील नमूद केलेली चार क्षेत्रे) उर्वरित साधने वापरण्यात यावी. प्रादेशिक स्तरावरील जल क्षेत्र वाटप अनुक्रमे जलसाधनांचा विकास, लाभक्षेत्र विकास, जलसंधारण, भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरण आणि स्वच्छता यांसहीत पेयजल या चार क्षेत्रांसाठी आहे. या चार क्षेत्रांसाठी आम्ही शिफारस केलेले किमान स्तर अनुक्रमे ५०%, ८%, १०% व १२% असून उरलेले २०% कोणत्याही किंवा वरील सर्व क्षेत्रांसाठी वाटप करण्यात यावे. अनुक्रमे ५०:५० भारांकासह प्रादेशिक स्तरांवर मोजण्यात आलेली जल विकास तूट आणि पेयजल तूट यांमधून वाटप तत्व निर्माण झाले. वरील सर्व प्रादेशिक स्तरावरील जल क्षेत्र योजना, विदर्भासाठी ३५.२६%, मराठवाड्यासाठी २१.५९% आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ४३.१५% या दरांनी जलक्षेत्रांसाठी प्रादेशिक स्तरावर वाटप करतील. साधनांचे (जलासंबंधी ३०%) एकूण प्रादेशिक वाटप प्राप्त करण्यास वरील परिच्छेद ४.९.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तीव्र /विशेष पाणी समस्यांची काळजी घेण्यास आवश्यक अतिरिक्त साधनांची जोड देण्यात आली पाहिजे. हे विदर्भासाठी ३६.६८%, मराठवाड्यासाठी २०.८३% आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ४२.४९% तपशीलवार तयार केले. अधोरेखित पृथकरणासहित अधिक तपशिलाबाबत कृपया प्रकरण 'पाणी' पहावे आणि वाटपाबाबतचे सविस्तर कामकाज जोडपत्रे ४.६ व ४.७ मध्ये दिले आहे.

४.९.३ योजनांतर्गत साधनांची (अनुसूचित जाती उपयोजना/जनजाति उपयोजना/पाणी याची वजात केल्यानंतर) सामान्यत: विभाज्य आणि अविभाज्य घटकांत ६०:४० याप्रमाणात विभागणी करावी. तथापि, विभागणीयोग्य निधींच्या ६०% निधी पायाभूत किंवा किमानस्तर शिफारस म्हणून समजून घ्यावयाचे आहेत. हे संयुक्तिक असल्याचे वाटते कारण आम्ही पाणी बाहेर ठेवले (ज्यामध्ये एक विभाज्य घटक सुध्दा असेल) आणि जे आंतरराज्यीय आहेत आणि साधनांची आवश्यकता असेल अशा काही मोठ्या नावाच्या प्रकल्पांची शिफारस केली आहे. म्हणून, राज्य स्तरावर उपलब्ध सुमारे ४०% उर्वरित निधीमधून राज्यास दिलासा मिळेल. आम्ही अर्थसंकल्पात विभागणीयोग्य बाबींच्या काटेकोर/पारदर्शक अर्थउकलाची सुध्दा व्यवस्था केली आहे. कसेही करून हे (६०%) एक पायाभूत/किमान स्तर आहे आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि स्वतंत्र विशेषज्ञ/अभिकरणे यांना एकत्र करून शासनाद्वारे ठराविक काळाने आढावा घेण्यात यावा. त्याच तज्ञ गटाने पाच वर्षाच्या अखेरीस परिच्छेद ४.९.१ मध्ये दर्शविल्यानुसार विशेष क्षेत्र तरतुदींची आवश्यकता आणि पेयजल तूट आणि विकासातील तूट (ज्याची परिच्छेद ४.९.२ मध्ये ५०:५० अशी शिफारस करण्यात येत आहे) याचा सुध्दा आढावा घ्यावा. आता आम्हास **विभागणीयोग्य संकोषास लागू करावयाच्या** वाटप सूत्राकडे पहावे लागेल.

१. आम्ही आधीच आवाहनपत्र दाखल करून सुरूवात करतो. आम्ही काम करीत आहोत त्या प्रश्नांची बहुविधता देऊन, अनेक चलघटक आणि संयुक्त स्वरूपाचा असलेला एक निर्देशांक याचा समावेश करून वाटप सूत्राची गरज आहे. याचा अर्थ असा की, निर्देशांक निर्मितीसाठी नेमून देण्यात आलेले तसेच सर्वच भारांक अंतर्निहित संशोधनात्मक आहेत. म्हणून, अंतिम अनुकूल मांडणीपर्यंत पोचण्याची प्रक्रिया आणि उचित व कार्यान्वयनयोग्य परिणाम आणि समितीच्या सभासदांनी आणि अधिक महत्त्वाचे धोरणकर्त्यांनी व सामान्य करून हितसंबंधित व्यक्तींनी त्याची स्वीकार्यता वारंवार सांगणे जरूरी आहे. म्हणून सर्व संबंधित वस्तुस्थिती आणि आमच्या निर्णयाची सुसाध्यता याचा काळजीपूर्वक विचार करून ही प्रक्रिया सूचित करण्यात आली आहे.

२. सूत्र रूपातील दर्शके निवडण्याबाबत, अनेक विचार करण्यायोग्य बाबी होत्या. प्रथम, आम्ही आधीच या प्रकरणात मांडणी केलेली आहे अशा आमच्या बहुआयामी दृष्टिकोनातील 'दुहेरी दृष्टीकोन' यांच्याशी सुसंगत असणे आवश्यक होते. दुसरे, ज्याअर्थी, आमच्या शिफारशींच्या चर्चा व बहुपरिमाणांमध्ये सैद्धांतिक विचार करण्यायोग्य बाबी व सूक्ष्म फरक पूर्णपणे प्रतिबिंबित झाल्या, त्याअर्थी आम्हास एकसूत्र तयार करण्याबाबतच्या विनिर्दिष्ट कामात ज्यासाठी संयुक्तिकपणे विश्वसनीय व सुसंगत आधारसामग्री आणि आकडेवारी संकल्पन व वार्तांकन यंत्रणा अधिक व्यवस्थित होत्या ती परिणाम दर्शके निवडण्याची गरज होती. तिसरे, आकडेवारी संबंधी किंवा तांत्रिक निकष निवडण्यात आलेली दर्शके वाजवीपणे परिवर्तनशील असावीत आणि एकदुसऱ्यांशी एकरेषीय सुध्दा नसावीत (अशा कारणांसाठी नागरीकरण वगळण्यात आले). चौथे, अंशत: तिसऱ्या बरोबर आहे ते 'ओक्कामस रेझर किंवा काटकसर तत्त्व' होते. विशेषत: हे सूत्र केवळ प्रादेशिक दृष्ट्या साधनांचे वाटप करीत असल्याने (म्हणजेच, एका विशिष्ट दर्शकामधून येणारे वाटप क्षेत्रनिहाय खर्चाशी बद्ध केले नव्हते) आणि इतर मार्गांनी वापर कसा करावयाचा याबाबत शिफारस केली (जसे की विनिर्दिष्ट प्रकल्प, क्षेत्रनिहाय किमान स्तर इत्यादी) यामुळे वरील गोष्टीबाबत आम्ही समाधानी होतो.

३. आमच्या वाटपसूत्रासाठी अंतिमरीत्या आम्ही निवड केलेली दर्शके: लोकसंख्या, विकासातील तूट किंवा तफावत, दरडोई उत्पन्न, क्षेत्र ही होती. या दर्शकांपैकी प्रत्येक दर्शकाचे स्पष्टीकरण आणि अंतर स्पष्ट करण्याबाबत ते कसे नेहमीसारखेच होते याकडे वळण्यापूर्वी (जे स्पष्टपणे सूत्रात नोंदविले) आम्ही त्याची महत्त्वाची बाजू आणि त्यामधील शिफारस याकडे वळलो.

चांगले धोरण योजण्याचा महत्त्वाचा पैलू वाटप कार्यतंत्रामध्ये व्यापक अनुरूपतेचा मुद्दा एकत्रितपणे अविभाज्यपणे अंतर्निहित आहे. असे प्रेरक अनुरूपता पैलू असे वाटले होते. याचा वाटप आणि खर्च यांचे परिणामांमध्ये रूपांतर करणे अशा वितरण कार्यतंत्र व प्रक्रिया याच्याशी संबंध आहे. चांगल्या शब्दांच्या अभावी, आम्ही त्यास 'शासन' असे संबोधण्याचा विचार केला. आम्हास असे वाटते की, इतर सर्व बाबी एकसारख्याच असल्याने, चांगल्या सुशासनाची (प्रादेशिक स्तरावर) दखल घेण्याची आणि मोबदला देण्याची (कुटील प्रेरकमार्ग हाणून पाडण्याव्यतिरिक्त काहीही नाही) गरज आहे. तथापि, आमच्याकडे अशाप्रकारचा निर्देशांक (जो निकोप आणि सर्वसाधारणपणे स्वीकार्य असा) सध्यातरी उपलब्ध नाही. आम्ही, म्हणून, अशी शिफारस केली की, शासनाने निकटच्या भविष्य काळात तज्ञ गटांद्वारे असा दर्शक तयार करण्याबाबत विचारणा करावी आणि सूत्राच्या पुनरिक्षणाच्या वेळी वाजवी महत्त्व देवून त्याचा निर्देशांक म्हणून अंतर्भाव करण्यात यावा.

४.९.४ दर्शके आणि वाटणीचे सूत्र यांच्या तपशीलाबाबत उजळणी (मुंबई संगणनेतून वगळली आहे याची नोंद घ्यावी) आम्ही वाचकांना जोडपत्रे ३.२ ते ३.९ तसेच ४.५ पाहण्याबाबत सूचित करतो.

(१) **लोकसंख्या:** हा समाविष्ट करावयाचा एक नैसर्गिक दर्शक (नागपूर कराराद्वारे पाठबळ दिलेला) आहे आणि आम्ही अशी अपेक्षा करतो. काळाच्या ओघात (अपेक्षित परिणाम शक्य असल्याने) इतर सर्व परिवर्तनशीलतेत कमी होतील आणि प्रचंड प्रमाणात लोकसंख्येवर अवलंबून असल्याने त्याबाबतच्या सूत्रास गती येईल. सूत्रामध्ये या निर्देशांकाचा समावेश होण्याचा मार्ग अगदी सरळ आहे. प्रादेशिक लोकसंख्येच्या प्रमाणांची गणना करण्यात आली आहे. (ते स्वाभाविकपणे एकतेत भर घालतात) आणि या दर्शकास देण्यात आलेला एकूण भार ४५% इतका आहे जो प्रसंगवश चालू सूत्र १००% भार देतो. त्यापेक्षा ती एक अतिशय मोठी घसरण आहे.

(२) **विकासातील तफावत:** हा एक संमिश्र निर्देशांक आहे आणि यामध्ये विकास घटकांचा त्याचबरोबर पुष्टीदायी आधारभूत घटकांचा समावेश आहे. हा सापेक्ष प्रादेशिक असमतोल हस्तगत करणारा निर्णायक दर्शक आहे आणि तो कमी करण्यावर व शेवटी तो दूर करण्यावर समितीचा केंद्रबिंदू आहे. या संमिश्र निर्देशांकात प्रत्येक निर्देशांकाची २०% समान भारासह नोंद केलेल्या पाच घटकांचा समावेश आहे. एकूण विकास तफावत निर्देशांक नंतर २५% भारासहित वाटपसूत्रात सामील केला जातो. प्रत्येकी २०% समान भारांक असलेले पाच घटक

दळणवळण, शिक्षण व कौशल्य विकास, आरोग्य, पतउपलब्धता आणि वीज जोडणी यांच्याशी संबंधित आहेत. राज्यातील तीन मोठ्या जिल्ह्यांच्या सरासरी अंतराची गणना करून प्रदेश स्तरावर एकूणात जिल्ह्यांच्या (प्रति १०० चौ.कि.मी.) मार्ग आणि रेल्वे मार्गाच्या घनतेवर आधारित दळणवळण भारांकाची गणना केली आहे. दळणवळणाच्या एकूण भारांकांची गणना करण्याबाबत मार्ग व रेल्वे मार्ग घनतांना ७०:३० भारांक देण्यात आले आहेत. तसेच, जिल्हानिहाय नोंद केलेले एसएससी विद्यार्थी आणि संशोधन प्रशिक्षण संस्थेची प्रवेश क्षमता, प्रादेशिक स्तरावर स्वतंत्रपणे एकत्रित करून राज्यातील तीन मोठ्या जिल्ह्यांच्या संबंधित सरासरीशी तुलना केली आहे व तुटींची गणना करण्यात आली आहे. शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या एकूण भारांकांची गणना करण्याबाबत नोंदणीकृत एसएसएसी विद्यार्थी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रवेशक्षमता यास देण्यात आलेले भारांक, पुन्हा ७०:३० असे या गुणोतरात आहेत. अशाप्रकारे आम्ही एकूण विकासातील तफावत निर्देशांकाप्रत आलो ज्याचा प्रादेशिक वाटप प्रमाणांची गणना करण्याबाबत वापर केला आहे. या प्रकरणाच्या आधीच्या भागात त्यांच्या महत्त्वाविषयी काहीशी सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे. येथे, आम्ही भारांकासह उप-घटक आणि अंतीम वाटप सुत्रात ते त्याप्रमाणे येतील ती रीत याबद्दल स्पष्ट केले आहे.

(३) **दरडोई उत्पन्न (पीसीआय):** हा एक दर्शक असून या दर्शकाचा नागरीकरण आणि मानव विकास निर्देशांकासह जवळजवळ सर्वच विकास दर्शकांशी परस्पर संबंध आहे. हा अत्यंत निर्णायक परिणाम दर्शक आहे. सर्वोच्च तीन जिल्ह्यांतील भारांकित सरासरीमधून प्रादेशिक दरडोई उत्पन्नाचे अंतर म्हणून सूत्रात समावेश आहे. ही गणनात्मक पद्धती (जिल्हा कार्यगती म्हणून राज्यातील मोठ्या तीन जिल्ह्यांचे भारांकित सरासरीचे अंतर प्रदेशाशी योग्यरीत्या एकत्रित केले) जेथे तुटींचा अंतर्भाव आहे अशा मापन केलेल्या इतर सर्व दर्शकांसाठी एकसमान अनुसरण्यात आली आणि म्हणून अंतर वापरण्यात आले आहे असा आम्हास येथे उल्लेख करता येईल. दरडोई उत्पन्नाच्या दर्शकात २०% भारांसह एकूण प्रादेशिक वाटपसूत्राचा समावेश आहे.

(४) **क्षेत्र:** याचा वरील प्रमाणेच पुन्हा सूत्रात समावेश होतो. किमान सीमांतिक दृष्ट्या क्षेत्रावर अवलंबून मूलभूत सार्वजनिक वस्तू त्याचप्रमाणे सहयोगात्मक पायाभूत सुविधा मिळण्याची तरतूद आवश्यक असेल तेथे (अनुमापी अनुकूलतेबाबत लेखांकसुध्दा) पुरविण्याची गरज आहे. जल क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांसाठी एकूण प्रादेशिक वाटप क्षेत्रात या दर्शकास १०% इतका भार आहे.

४.९.५ संपूर्ण सुस्पष्टतेच्या प्रयोजनार्थ आम्ही पुन्हा एकदा विकासाच्या तफावतीची गणनापद्धती संक्षिप्त करून खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे (कृपया जोडपत्र ४.५ पहावे)

१. **संपर्क यंत्रणा:**

येथे हा निर्देशांक दोन घटकांचा बनलेला आहे. एक रस्त्यांची घनता आहे आणि दुसरा रेल्वे मार्गाची घनता आहे, या दोन्ही प्रकरणात, आम्ही प्रमाणिकरण घटक म्हणून दर १०० चौ.कि.मी. लांबी विचारात घेतलेली आहे. गणनेबाबतचे मूलभूत युनिट जिल्हा आहे. त्यामधून ते प्रादेशिक स्तरावर एकत्रित केले आहे. तीन मोठ्या जिल्ह्यांतून प्राप्त झालेल्या सरासरीमधून नंतर त्या अंतराची गणना केली आहे. प्रदेशांसाठी अशाप्रकारे प्राप्त झालेले अंतर नंतर प्रमाणात रूपांतरित केले. अशाप्रकारे, आमच्याकडे अंतरप्रमाणांचे, एक रस्त्यासाठी आणि एक रेल्वेमार्गासाठी असे दोन संच आहेत. त्यांना अनुक्रमे ७०% व ३०% भारांक देवून ते आणखी एकत्रित करण्यात आले आहेत. अशाप्रकारे प्राप्त झालेले संपर्क यंत्रणा अंतराचे प्रमाण नंतर २०% भारासहित विकास तुटीच्या निर्देशांकात जोडण्यात आले आहे.

२. **शिक्षण आणि कौशल्य विकास :**

येथे सुद्धा दर्शक दोन घटकांपासून बनलेला आहे. एसएससीसाठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची (अलिकडच्या दोन वर्षात) सरासरी संख्या आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी सरासरी प्रवेशक्षमता हे आहेत. गणनेची पद्धती संपर्क यंत्रणेच्याबाबतीत असल्याप्रमाणे '*योग्य ते फेरबदलासह*' प्रदेशनिहाय प्रमाण प्राप्त करण्यास ७०% व ३०% भार लागू करून एसएससी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी संबंधित अंतर एकत्रित करून नंतर ते

२०% भारासहित पुन्हा विकास तुटीच्या निर्देशांकात समाविष्ट करावयाचे आहे.

३. आरोग्य:

समितीने विविध आरोग्य परिणाम दर्शकांचा विचार केला होता. काटकसरीचे तत्त्व वापरून यातील थोडेच निश्चित करण्यात आले आणि जिल्ह्यांसाठी संयुक्त गुणांची गणना करण्यात आली. सविस्तर तपशीलासाठी कृपया 'आरोग्य' याबाबतचे प्रकरण पहावे. अंतराची गणना करण्याबाबत अंकांच्या एकाच श्रेणीत पुन्हा ***योग्य त्या फेरबदलासह*** आधीची पद्धती (अगदी सहजगत्या) लागू करण्यात आली. येथे पुन्हा विकास तूट निर्देशांकाचा समावेश करीत असताना २०% इतका भार आहे.

४. पत उपलब्धता :

जिल्हा स्तरावर हा दर्शक दर हेक्टरी रुपये म्हणून प्रमाणीकृत केला आहे. आधीच्या प्रकरणात असल्याप्रमाणे योग्य त्या फेरबदलासह विकासाच्या तुटीचा निर्देशांक सामावून घेण्यास जिल्ह्यांमधील या श्रेणीची एकदा गणना केल्यानंतर प्रादेशिक स्तरावर प्रमाणांची आणखी गणना करावयाची आहे. या दर्शकात सुध्दा २०% इतक्या भारासहित विकास तुटीच्या निर्देशांकाचा समावेश आहे.

५. वीज :

या दर्शकाची गणना (पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे विकास आणि त्यासोबतच वाढीची बाजू या दोन्हींचा पुन्हा समावेश करून) ही जिल्हास्तरावरील दरडोई वीज वापराची सरासरी घेऊन करण्यात आली आहे. आधीच्या प्रकरणांमध्ये केलेल्या ***योग्य त्या फेरबदलासह*** प्रदेशांच्या हिश्श्याची पुन्हा एकदा गणना करण्यात आली. विकासाच्या तुटीचा निर्देशांक मोजतांना, या निर्देशांकास २०% इतका भार दिला आहे.

अशारीतीने, वर नमूद केल्याप्रमाणे, अनुसूचित जाती उपयोजना/जनजाती उपयोजना/पाणी यांच्यासाठी असलेला हिस्सा कपात केल्यानंतर योजनांतर्गत साधनांच्या विभागणीच्या हिश्श्यास लागू होणाऱ्या वाटपाच्या सूत्रामधून एक प्रमाण प्राप्त होईल ज्यानुसार तीन प्रदेशांना साधनांचे वाटप केले जाईल. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी हे प्रमाण अनुक्रमे ३०.७८%, २८.५१% आणि ४०.७१% इतके आहे. वर पाण्याकरिता विशेष बाबींच्या तरतुदींसह दिलेले प्रादेशिक वाटपाचे अंतिम जलक्षेत्र प्रमाणात विचार करण्याची 'भर घालण्याची' आपणाला आवश्यकता असेल. याचा परिणाम अनुच्छेद ३७१ (२) अन्वये, योजनांतर्गत साधनांमधून प्रादेशिक वाटपाचे भव्य प्रमाण मिळण्यात होईल. ते अंतिमत: विदर्भाकरिता ३२.२४%, मराठवाड्याकरिता २५.३१% आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता ४१.४५% इतके असेल असे गृहित धरून वरील विभिन्न किमान स्तरावर केलेले उर्वरित वाटप हे सुद्धा याच दरांनी केलेले आहे. (कृपया जोडपत्र ४.७ भाग चार पहा). तथापि, शासनाने अ-विभाज्य निधी इत्यादीसारख्या इतर कोणत्याही साधनामधून अधिक वाटप करण्याचा कितीही निर्णय घेतला तरी वर्तमानात किंचितसाच फरक पडेल, परंतु तो राज्याचा विशेषाधिकार आहे. अशाप्रकारे वाटप झालेले निधी हे प्रादेशिक योजनांचा पाया ठरतील ज्या आम्ही शिफारस केलेल्या (पहा 'सुशासन' हे प्रकरण) पुनर्रचित प्रादेशिक शासन योजने अंतर्गत एकत्रित करता येतील. आमच्या इतर मुख्य शिफारशींशी सुसंगती राखण्याकरिता विकेंद्रीकरणाच्या बळकटीकरणासह आम्ही प्रदेशनिहाय योजना वाटपाकरिता अजून काही आदितत्वे /टप्पे प्रस्तावित केले आहेत. आमच्या प्रस्तवांची इतर योजनांसोबत अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हा आणि तालुका पातळीवरील योजनांकरिता (प्रादेशिक स्तरावरील मंडळांकडून वाटप करण्यासाठी) आणि त्या सोबतच क्षेत्रनिहाय (एकत्रित प्रादेशिक स्तरावर) योजनांकरिता ही आदितत्त्वे/टप्पे आहेत.अशारीतीने, आम्ही, सर्व जिल्हाभर सारख्याच रकमांचे वाटप होणार नाही या अटीवर, एकूण प्रादेशिक वाटपांपैकी (पाणी वगळता) जिल्हा नियोजन समित्यांकरिता ३०% इतका टप्पा प्रस्तावित करतो. जिल्हा नियोजन समित्यांकरिता, क्षेत्र, लोकसंख्या व मानव विकास निर्देशांक यांना भारांक देवून एक समुचित वाटपसूत्र तयार करण्यात यावे. तथापि, प्रदेशांतर्गत असलेल्या जिल्ह्यांमध्ये समन्याय साध्य

करण्याच्या उद्देशाने प्रदेशांना साधनांचे वाटप करण्यासाठी समितीने सुचविलेल्या सूत्राच्या धर्तीवर प्रत्येक प्रदेशांने एक सूत्र तयार करावे. तालुक्यांकरिता, सर्व तालुकाभर समान वाटप खात्रीशीरपणे होणार नाही या अटीवर, एकूण प्रादेशिक वाटपामधून (पाणी वगळता) त्याचप्रकारचा ३०% टप्पा आम्ही प्रस्तावित करतो. आणखी असे की, सर्व क्षेत्रांना केली असेल अशा तरतुदींप्रमाणेच व्यवहार्य असेल तेथवर, तालुका व जिल्ह्यांच्या साधनांच्या संचिती करणासाठीही परवानगी देण्यात यावी. या नियत कार्यक्रमासाठी आम्ही फक्त संबद्ध आणि महत्त्वाची क्षेत्रे विचारात घेतली आहेत. क्षेत्रनिहाय टप्पे हे संपर्क यंत्रणा (२०%), कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय व सहकार यांसह कृषि व संलग्न (१५%), वीज (८%), आरोग्य (११%) आणि शिक्षण (११%) अशा प्रकारे करावयाचे आहेत. एकसमान क्षेत्रनिहाय विकासाचे (दुर्बल क्षेत्रांना वगळण्यास प्रतिबंध) संरक्षण आणि असे असूनही एकूण सर्वंकष नियोजनाकरिता प्रदेशांना साधनांच्या ३५% साधने पुरविणे हाच याचा सुस्पष्ट अर्थ आहे, या क्षेत्रनिहाय किमान स्तरांची तपासणी प्रादेशिकदृष्ट्या एकत्रित स्तरावर करावयाची आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, जिल्हा नियोजन समिती आणि गटांनी प्रत्येक क्षेत्रातील किमान स्तरांचे अवलोकन करण्याची आवश्यकता नाही. जर एकत्रित प्रादेशिक स्तरावर तूट असेल तर फक्त प्रादेशिक विकास मंडळानेच न्यूनतम किमान स्तर साध्य करण्याकरिता क्षेत्रात कुठेही त्या क्षेत्रास अधिक वाटप करावे.

४.१० आपत्ती सूचनांचा आढावा

अहवालामध्ये शिफारस केलेल्या योजनेची सर्वंकष दखल घेतलीच पाहिजे. आमची अशी धारणा आहे की, सार्वजनिक साधनसंपत्तीचे वाटप (विशेषत: समष्टि अर्थशास्त्राच्या विचारधारेत झालेले बदल) ही गोष्ट अधिक महत्त्वाची नाही, किंबहुना प्रशासन व धोरण सुधारणा यांसारख्या या योजनेमध्ये असलेल्या अन्य धोरणात्मक गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, वाटपाचे सूत्र हे एकत्रितपणे व्यापक व्यवहार करण्याशी संबंधित आहे. ही सूत्रे आम्हाला झालेल्या विद्यमान स्थितीच्या आकलनावर आधारित आहेत आणि आमचा दृष्टिकोन हा परिणामाभिमुख आहे ही वस्तुस्थिती आहे, कालांतराने या सूत्रांवर पुनर्विचार होणे गरजेचे आहे आणि दरम्यानच्या काळात लागू केलेल्या सुधारणा (mid-term corrections) ह्या परिणामांमधील प्रत्यक्ष बदल त्याचप्रमाणे या काळामध्ये मिळालेले अनुभव यावर आधारित आहे. आपल्या वाटपाच्या सूत्रांमधील विशेष सवलतींची निवड समिती, इतर गोष्टींबरोबरच आपल्या राज्याची समकालीन विकास आव्हाने लक्षात घेऊन, संशोधनात्मक रीतीने करील. भविष्यात यामध्ये बदल होईल, म्हणून वाटपाची सूत्रे अनुयोजित करण्याची गरज आहे.उदाहरणार्थ ही अपेक्षा करता येईल की, प्रादेशिक तफावतींमुळे सुधारणा होणे सुरू झाल्याने बदलत्या लोकसंख्येचा सापेक्ष भार काही काळाने वाढेल. पूर्वी सांगितल्याप्रमाणे बदलत्या प्रशासनाला योग्य ते महत्त्व दिले पाहिजे जेणेकरून, साधनसंपत्तीचा अधिक चांगला वापर होण्याच्या दृष्टीने प्रदेशांना प्रोत्साहन देता येईल. म्हणून आम्ही असे प्रस्तावित करतो की, शिफारशी व तपशील यांचे **पुनर्विलोकन** करावे व योग्य ते फेरफार करावे म्हणून **प्रत्येक पाच वर्षांहून अधिक नसणाऱ्या** कालावधीसाठी एक अंतर्गत समिती ***(किमान काही स्वतंत्र तज्ञ असतील अशी रचना असलेली)*** स्थापन करण्यात यावी.

४.११ उद्‌भवणाऱ्या ठळक समस्या: शहरीकरण

४.११.१ अहवालाच्या अखेरीस येताना काही आकस्मिकपणे उद्‌भवणाऱ्या समस्यांची नोंद घेणे आम्हाला आवश्यक वाटते. पारिस्थितीकीय व पर्यावरणीय संवेदनशीलता व त्याबाबतची चिंता या संदर्भात खनिजे व वन यांबाबतचे उपाय आणि विकासाचा व वाढीचा एकूण प्रश्न पर्यावरणाच्या नवीन मापदंडाद्वारे परिसीमित करण्यात येईल. याबाबतीतला काहीसा तपशीलवार विचार आम्ही आमच्या प्रकरणामध्ये मांडला आहे. मात्र नव्याने उदयाला येणाऱ्या पर्यावरणाच्या आणखी एका महत्त्वाच्या घटकाकडे आपले अगदी पूर्णपणे दुर्लक्ष (पाण्याची गरज या संकल्पनेखेरीज) झाले आहे आणि तो म्हणजे शहरीकरणाची प्रक्रिया हा होय. म्हणून, या संक्षिप्त भागात आम्ही काही संबद्ध प्रश्नांकडे, आम्ही आशेने व अशा इच्छेने लक्ष वेधित आहोत की, समिती या प्रश्नांवर गंभीरपणे व तपशीलवार विचार करून नजीकच्या भविष्यकाळात आमच्या शिफारशींचे पुनर्विलोकन करील (आपत्ती सूचनांचा आढावा पहा). शहरीकरणाची प्रक्रिया नेहमीच

औद्योगिकीकरणाशी व अधिकतर आर्थिक प्रगतीशी व विकासाशी समानार्थी असते. अभ्यासूंनी शहरीकरणाच्या महत्त्वपूर्ण लाभांची वाखाणणी केली आहे आणि त्यांनी शिक्षण, ज्ञान व नवोपक्रम ही त्याची बलस्थाने असल्याचे म्हटले आहे. म्हणून नगराचे फायदे म्हणजे केवळ त्यांचे समाजरचनाशास्त्रीय गुणवैशिष्ट्येच नाहीत तर तेथील जनसामान्यांच्या मानसिकतेशी ते अधिक निगडीत आहेत. ही शहरे स्थानिक लोकांद्वारे त्याचप्रमाणे स्थलांतरित लोकांद्वारे देखील तयार झालेली आहेत. सापेक्षत: महाराष्ट्र हे सुमारे ४६ टक्के शहरीकरण झालेले राज्य आहे त्याची नोंद आहे. (जनगणना २०११). वस्तुत: दिलेल्या आकडेवारीपेक्षा महाराष्ट्रात अधिक मोठ्या प्रमाणात शहरीकरण आहे, कारण तेथे या प्रक्रियेचा अनादर करण्याचे सामूहिक प्रयत्न (राजकीय कारणास्तव) होताना दिसून येतात. **दरम्यान शहरीकरण ही सकारात्मक प्रक्रिया आहे आणि ती होताना आव्हाने व प्रश्न यांचा स्थितिपालट घडवून आणते.** ही स्थित्यंतरे ओळखता न आल्यास आणि ते सौम्य करण्यासाठी योग्य उपाययोजना न केल्यास, राज्यामध्ये राजकीय, सामाजिक व आर्थिक परिणामांसह नव्याने असमतोल निर्माण होतो, अयोग्य कृती करण्यात येते व त्याचे आवर्धन होते.

४.११.२ वास्तविकपणे भारतात, महाराष्ट्रातील शहरीकरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. नवीन जनगणतीची शहरे (नागरी स्थानिक संस्थांकडून अद्याप प्रशासित नाहीत) उदयास येत आहेत आणि जागेच्या दृष्टीने मोठे शहर किंवा महानगरी याच्या मध्यवर्ती ठिकाणाच्या सभोवार स्थित आहेत. स्वाभाविकपणे या राज्याच्या भूदृश्यात शहरी ठिकाणांच्या जागेचा समप्रमाणात नसलेला विकास होत आहे. अशाप्रकारे भारतातील दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या सर्व शहरांपैकी सुमारे २५ टक्के लोकसंख्या मुंबई-पुणे-नाशिक या त्रिकोणात स्थित आहे. (अनुषंगाने उर्वरित महाराष्ट्रात) ***त्याचप्रमाणे, राज्यात जवळपास १३० असे तालुके किंवा गट आहेत. ज्यांना कोणतेही शहर, नगर किंवा नागरी ठिकाणे नाहीत. ही ठिकाणे अधिकतर विदर्भ, मराठवाडा व कोकण प्रांतात आहेत.*** नागरीकरणाचा संबंध प्रदेशामधील दरडोई उत्पन्नाशी आहे आणि त्याचा अभाव असल्यास तो मागासलेपणाशी समरूप आहे.

४.११.२.१ विशिष्ट स्थलाच्या तुलनात्मक फायद्यांमधून तांत्रिक लाभ उठवत महाराष्ट्राचा विकास होत आहे आणि म्हणून औद्योगीकरणाला उत्तेजन देणे (हे एके काळी 'भारताचे औद्योगिक शक्ती केंद्र' म्हणून ओळखले जात होते), सेवा क्षेत्र किंवा प्रदेश क्षेत्र यांचे बळकटीकरण करणे व कृषि आधारित मूल्यवर्धन उपयोगात आणणे आणि सर्वसाधारणपणे 'नवीन कृषीशास्त्र' स्वीकारून, अधिक व अकृषिक कामांची निर्मिती करण्यात होईल. त्यामुळे कृषीवर अवलंबून असलेल्या लोकांच्या संख्येत घट होईल तसेच, छुपी बेरोजगारी कमी होईल. यामुळे गतिमान शहरीकरण आणखी जोराने पुढे जाईल. जर आपण वाढत्या लोकसंख्येला मोठ्या प्रमाणात शहरात समावून घेतले असेल तर पुढील १५ वर्षात, स्थूलमानाने, किमान २० दशलक्षाहून अधिक शहरवासी निर्माण करू. ही फार मोठी संख्या आहे आणि सोबत निश्चितच मोठी आव्हाने घेऊन येईल. हे समजून घेणे आवश्यक आहे की, लोक स्थलांतरित होतील व विस्तारित शहरे व नगरांमध्ये वसती करतील आणि नवीन शहरे व नगरे देखील निर्माण करतील. आणखी असे की, महाराष्ट्रात शहरीकरण झाल्यामुळे, सार्वजनिक मालाचा पुरवठा करणे तसेच राहणीमान याबाबतीत शहरी व ग्रामीण भाग यांमध्ये उद्भवणारा असमतोल टाळणे आवश्यक आहे. ***अशाप्रकारे सार्वजनिक मालाचा पुरवठा करण्याच्या बाबतीत शहरी व ग्रामीण भागातील तंतोतंत विभागणी टाळण्यासाठी मुख्य धोरण उपक्रम (ग्रामीण क्षेत्रात नागरी सुविधांसाठी तरतूद) हाती घेण्यात यावा जेणेकरून, ते एकसंघ अखंड राहतील.***

४.११.३ कोणत्याही परिस्थितीत, या नव्याने निर्माण होणाऱ्या शहरांच्या पायाभूत गरजांसाठी मोठ्या प्रमाणात साधनसंपत्तीची

गुंतवणूक करण्याची गरज असेल. नवीन शहरांखेरीज विद्यमान शहरांना सुद्धा सध्या सेवा देणे सुरू आहे आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी भरीव रक्कम देण्यात यावी. **यामध्ये, नागरी वाहतूक पद्धती, पाणी पुरवठा व स्वच्छता पद्धती, आरोग्य व शिक्षण पद्धती, राजकीय व प्रशासकीय पद्धती आणि गृहनिर्माण व निवारा कार्यक्रम यांसारख्या काही महत्त्वपूर्ण गोष्टींचा समावेश आहे आणि अधिक महत्त्वाच्या कार्यक्रमांचा समावेश आहे.** त्या हरित संवदेनशील (Green Sensitive) व निर्बंध यांच्याशी जुळवून घेऊन कराव्या लागतील. तथापि, या गोष्टी पुरविण्याकरिता मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागेल आणि ही आनंदाची गोष्ट आहे की, शहरे व नागरी क्षेत्रे त्यांच्या वास्तविक स्वरूपात आर्थिक प्रगतीची दोलायमान गिरीशिखरे आहेत. म्हणून *आवश्यक असलेली साधनसंपत्ती सहाय्याच्या स्वरूपात नव्हे तर जेव्हा अधोरेखित प्रकल्प यथोचितरित्या प्रत्यक्षात येतील तेव्हा ते प्रकल्प बँकेप्रमाणे स्वत:च स्वत:साठी पैसे उभारू शकणारे प्रकल्प असतील. हे खाजगी संस्थाना लागू आहे मात्र शासनाच्या उच्च स्तरावरही महत्त्वपूर्ण आहे. ही केवळ राज्य व राष्ट्रीय देशांतर्गत उत्पन्नाचे अंशदान किंवा शहरी क्षेत्रेच केवळ अधिक नाहीत, तर राज्य तसेच राष्ट्रीय सरकारलाही उपार्जित होणारा कर लाभांश देखील प्रमाणापेक्षा जास्त आहे.*

४.११.४ हे सर्व परिचित आहेच की, हा तथाकथित 'विकेंद्रीकरण सिध्दांत' आहे. यासाठी स्थानिक शासनाने तीन त्रिसूत्रीचे (कार्य, कार्यतंत्र व वित्त व्यवस्था) जोमाने अनुसरण करणे आवश्यक आहे. यापैकी कोणत्याही गोष्टीचा भारतात किंवा खरेतर महाराष्ट्रात प्रभाव नाही. महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांपैकी १० टक्क्यांहून कमी संस्थांचा अपवाद वगळता (म्हणजेच महानगरपालिका) उर्वरित अतिरिक्त २८७ शेष नागरी स्थानिक संस्था या दुर्बल आहेत व क्वचितच त्या एखादी स्वायत्तता स्वीकारतात. (मग ती महसूल साधने असो, कराचा आधार व करांसाठी दर निश्चित असो वा खर्चाची स्वायत्तता असो.) ७४ वी संविधान सुधारणा करण्यात आली असूनही नागरी स्थानिक संस्था या राज्याचे खेळणे बनून राहिल्या आहेत. व्यापारी माल सेवा कर हा काही गोष्टी निश्चित करण्यासाठी सुरू केला. **राज्यांना तसेच स्थानिक संस्थांना सहाय्य देऊन त्यांना स्वायत्त होणे शक्य व्हावे म्हणून नागरी स्वराज्य संस्थांना मालकी मिळावी म्हणून व शहरांचे चांगले व्यवस्थापन व्हावे म्हणून सेवा कर सुरू करण्यात आला.**

४.११.४.१ प्रशासनिक यंत्रणादेखील कमकुवत आहे आणि प्राथमिक दृष्ट्या पाहता संबद्ध शहरांचे हित व गरजा यांना अनुसेवी नाही. निवडून आलेले नगरसेवक व महापौर यांची भूमिका वादाचा विषय असते मात्र, कार्यकारी भूमिका ही निश्चितपणे नोकरशहांचीच आहे. शासनाच्या समस्या चमत्कारिक व ठिगळे लावल्याप्रमाणे आहेत. सरमिसळ झालेल्या अधिकारिता व सुसंगत नसलेली प्राधिकरणे, राज्याच्या व केंद्राच्या जी हुजुरी करणाऱ्या संस्थांचे आभार. कार्यक्षम फलनिष्पत्ती देणारी कामाप्रती अगदी अल्प सहभागी लोकशाही आहे, किंबहुना राजकीय आश्रयावर आधारित कामांची विपुलता आढळून येते. येथे **थेट निवडून आलेले महापौर** मोठी मदत करतील.

४.११.४.२ **महानगर** समुहांमध्ये / क्षेत्रांमध्ये शासनाचा उचित स्तर ही नव्याने उद्‌भवणारी समस्या सध्या चर्चेचा प्रश्न आहे. ज्यांवर नुकतीच चर्चा करण्यात आली आहे. हा मुद्दा कार्यात्मक, कार्यक्षमता व लोकशाहीचे विकेंद्रीकरण यांवरील वादविवाद लक्षात घेता त्यांची एकमेकांशी स्पर्धा असल्याचे दिसते. किंबहुना, *महानगरीच्या पातळीवर निवडून आलेल्या महापौराकडे अर्थव्यवस्थेच्या प्रमाणामध्ये काटछाट मात्र, मर्यादित कार्यात्मक अधिकारितेच्या बाबतीत करण्याचे अधिकार देण्यासाठी राज्यकारभारासंबंधीच्या दृष्टीकोनावर काम करण्यात येईल.*

४.११.५ अगदी तातडीने लक्ष देण्याची महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, चांगल्या जमिनी मिळवण्याशी संबंधित आहे. जलदगतीने होणाऱ्या शहरीकरणासाठी व मोठ्या प्रमाणातील जमिनीचे व्यवहार आवश्यक ठरतात आणि यासाठी नागरीतर जमिनीचे रूपांतर व त्याचप्रमाणे जास्तीत जास्त नागरी जमिनींचे वापरात आणणे या दोन्ही गोष्टींची आवश्यकता आहे. एकदा हे झाले की, मग, पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अशाप्रकारे आवश्यक असलेली साधनसंपत्ती देण्याकरिता निदान सार्वजनिक जमिनींचे तरी जमीन मूल्य (रोखीकरण) ठरविण्यासाठी, कोणीही त्या जमिनीवर बांधकाम करू शकेल. पारंपरिक नगर नियोजनकर्त्यांनी 'उत्तरे'कडून उसनी घेतलेली उपकरणे येथे चालणार नाहीत. खऱ्या सामाजिक-आर्थिक प्रक्रियेचा प्रवाहीपणा आणि सोयीस्करपणा स्वाभाविक असावयास हवा आणि म्हणून, अशा योजनांचा विशेष तपशील देणे भाग आहे, जो तांत्रिक नगर नियोजनकर्त्यांच्या विचारसरणीला प्रतिबंध करीत नाही मात्र, समान शास्त्रज्ञांच्या साधन संचातून उसने घ्यावयास हवे.

४.११.६ एकदा का या गोष्टीचे निराकारण झाले की, चटईक्षेत्र निर्देशांक व विकास हक्कांचे हस्तांतरण यांच्याशी संबंधित चांगली व कमी प्रतिबंधात्मक धोरणे पुढे येतील व यामुळे स्थावर मालमत्तेचा व्यवसाय दाबून टाकला होता आणि आकाशाला भिडणाऱ्या किंमती देणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर नेणारे मत्तांचे बुडबुडे निर्माण केले होते. अशा धोरणांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. जेणेकरून अतिशय गरीब व मध्यम वर्गांना, जे सध्याच्या घडीला आपल्या शहरात **परवडण्याजोग्या निवाऱ्यांपासून** वंचित आहेत, अशांना दिलासा मिळेल. म्हणून, महाराष्ट्राची शहरे सध्या सामोरे जात असलेल्या झोपडपट्टी व तत्संबंधित समस्या टाळण्यासाठी घरे ज्यांची सार्वजनिकरित्या पुरविण्यात येणाऱ्या किंवा सहाय्यभूत देणाऱ्या परवडण्याजोगी बांधण्याची नितांत आवश्यकता आहे. ***अंतर्गत गृहनिर्माण किंवा भाडे नियंत्रण कायद्यामध्ये फेरबदल*** करणे यांसारख्या अनेक धोरणात्मक सुधारणा आहेत ज्या इतरत्र वापरण्यात आल्या आहेत, त्यांची येथे तातडीने योजना करण्याची गरज आहे, जेणेकरून किमान नवीन शहरांमध्ये तरी आपल्याला त्याच समस्यांचा सामना करावा लागणार नाही.

४.११.६.१ शहरातील नागरिकांसाठी पाणी पुरवठा करण्याच्या संबंधातील समस्या ही काही कमी महत्त्वाची नाही. अर्थात, पाणी हे उद्योग व इतर सेवांसाठीही आवश्यक आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, आवश्यकतेनुसार पाण्याचे व्यवस्थापन (पुनर्वापराची प्रमाणके) हे राज्यात वापरण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या प्रमाणात अगदी स्वल्प आहे. ***अर्थातच यासाठी पाण्याचे यथायोग्य मूल्य ठरवणे तसेच पाण्याचा सुनियोजित वापर (बाजार)*** या गोष्टी मध्यवर्ती आहेत. घनकचरा व्यवस्थापन तसेच द्रवकचरा व्यवस्थापन यांच्याशी संबंधित तितकाच गंभीर प्रश्न (विशेषत: नागरी क्षेत्रातील पाण्याशी संबंधित बाबी) विचारात घेण्याचा काळ काही फार दूर नाही. यासाठीच्या पायाभूत सुविधांसाठी (प्रत्यक्ष व त्यासाठीची साधनसंपत्ती) कोणत्या मोठ्या रकमेची आवश्यकता नाही. आणखी, एक आनंदाची बातमी अशी की, नवीन तंत्रज्ञान व इष्टतम मूल्य ठरविणे यांच्या मदतीने या प्रकल्पांपैकी, अनेक प्रकल्पांचे बँकेप्रमाणे सहाय्य मिळेल अशा प्रकल्पांमध्ये रूपांतर करता येऊ शकेल, आणि म्हणून, हे खाजगी संस्थाच्या हिताचे किंवा व्यवहार्य सार्वजनिक खाजगी सहभागी तत्त्वावर निधीतील तफावत दूर करण्यासाठी तरी उपलब्ध करून देता येईल. ही वस्तुस्थिती अधोरेखित करण्याची /तिचे पुनर्उच्चारण करण्याची गरज आहे की, हे सहाय्य नसून गुंतवणूक आहे जी बऱ्याच कालावधीसाठी शहरे खात्रीने प्रदान करू शकतील.

४.११.७ म्हणून, प्रचंड शहरीकरणाचे व्यवस्थापन करण्याची आत्यंतिक गरज ओळखणे हा केवळ दूरदर्शीपणा नाही तर ती एक अत्यंत आवश्यक बाब आहे. साधनसंपत्ती ही गरज म्हणून असल्याखेरीज गंभीर व राज्यकारभारासंबंधीचे सुधारणात्मक धोरण म्हणून वापरणे गरजेचे आहे कारण, असे करण्यात आपण कसूर केली तर आपणास राजकीय

अर्थव्यवस्थेच्या चौकटीच्या आतील सुरक्षित अनौपचारिक पद्धतीनुरूप व्यवहार करावा लागेल. हे अगदीच बेलगाम आहे कारण, 'ते त्यांचे स्वत:चे नियम पाळतात' मात्र, हे कायद्याच्या चौकटीबाहेर (beyond the Shadow of Law) जाऊन चालविण्यात येते याचा परिणाम कल्याण खर्चांमध्ये वाढ होण्यात होतो आणि हे विकासात्मक प्रयत्नांसाठी हानीकारक आहे.

महाराष्ट्रासाठी, या धोरणांचा उद्देश, शहरीकरण किंवा शहर वाढीला केवळ प्रोत्साहन देणे/ सहाय्यभूत ठरणे हा नाही, तर विद्यमान शहरांचा कायापालट करणे व नवीन अद्ययावत शहरे निर्माण करणे, हा आहे, जेणेकरून, आपण जागतिक रचनेच्या आव्हानांना सामोरे जाऊ शकू आणि विकास व वाढीच्या प्रक्रियेस अधिक चांगली मदत करू शकू. **या अद्ययावत शहरांनी माहिती व संसूचना तंत्रज्ञानाच्या वापरांनी यांत्रिक लाभ घ्यावा, त्यांनी कौशल्य व ज्ञानाचे कोठार आणि उच्च शैक्षणिक संस्थांची निर्मिती करून त्यांचे संवर्धन करून त्याद्वारे आणखी ज्ञान व कौशल्य निर्मिती करण्यास कारणीभूत व्हावे. या शहरांना लाभलेले उच्च सांस्कृतिक वातावरण हे (विकास विरोधी नसलेले) आहे व ते कार्यशीलरीतीने परंपरा व ओळख यावर उभारलेले आहे. अशी शहरे आटोपशीर व दाट असलीच पाहिजे जेणेकरून, आपण शहरी दाट वस्तीत उर्जा निर्मितीची चूक पुन्हा करणार नाही.**

४.१२ प्रारंभिक उपाययोजना: विश्वास पुन्हा संपादनासाठी

समितीला आपल्या भेटींमधून व विचारविमर्शांद्वारे संपूर्ण प्रदेशासाठी अगदी अचूक व सुसंगत सूत्र आढळून आले, ते म्हणजे शासनप्रती वाटणारी 'विश्वासाची कमतरता' किंवा विश्वसनीयतेचा अभाव हे होय. हा चांगला राज्यकारभार नव्हे आणि केवळ व्यवहार्य दृष्टिकोनातून पाहिले तरी शासनाने चांगल्या उद्देशाने हाती घेतलेल्या सुधारात्मक उपाययोजनांमध्ये देखील अडथळा येतो. म्हणून शासनावरील पहिला आरोप म्हणजे, शासनाने या दृष्टिकोनावर अगदी गंभीरपणे उपाययोजना करण्याची गरज आहे. या संदर्भात आम्ही या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो व अशी शिफारस करतो की, लोकांचा विश्वास व विश्वसनीयता संपादन करण्यासाठी शासनाने अगदी तात्काळ उपाययोजना हाती घेतल्या पाहिजेत. यामध्ये स्वाभाविकपणे समाविष्ट असलेल्या आमच्या शिफारशींचा उपसंच हा प्राधान्याने हाती घेता येईल. आम्ही येथे काही महत्त्वाच्या बाबी देत आहोत.

१. ***माजी मालगुजारी तलावांच्या*** समस्यांचे वर्गीकरण करणे.

२. 'अवघड भूप्रदेश' क्षेत्रासह पाण्यासाठी (पाण्याचा अभाव असलेली क्षेत्रे) विशेष तरतूद.

३. जायकवाडी पाण्याशी संबंधित जलाशयाच्या हक्कांबाबतचे वाद मिटवणे.

४. प्रादेशिक शासन रचनेची स्वीकृती, निर्णय व घोषणा.

५. हरित बोनस व खनिजाकरिता स्वामित्वधन यांना निर्बंध घालणे.

६. चंद्रपूरचे पुन:स्थापन (ऱ्हासाची भरपाई).

७. मराठवाड्यासाठी सौर ऊर्जेचा प्रारंभ.

८. न करता येणाऱ्या संकोषामध्ये येणाऱ्या वनांशी (पाटबंधारे प्रकल्प) संबंधित सध्याचे निव्वळ मूल्य विचारात घेणे.

४.१३ समारोप

समारोपाकडे वळताना असे म्हणता येईल की, आमचा दृष्टिकोन हा ज्ञानावर आधारित व अनुभवाधिष्ठित प्रायोगिक रीतीने पुराव्यांवर आधारित तसेच सहभागी स्वरूपाचा आहे. आम्हाला हे कळले आहे की, ***साधनसंपत्तीचे वाटप महत्त्वाचे असले तरी*** कदाचित ते असमतोलावर उपाययोजना करणे किंवा निरंतर समतोल राखणे याबाबतीत ***जास्त महत्त्वाचे नाही***, म्हणून, आम्ही ***व्यूहरचनात्मक उपाययोजनांकडे धोरणात्मक उपाययोजना व सुधारणा विशेषत: शासनाच्या सुधारणा या स्वरूपात***

पाहतो. परिणामांकडे आम्ही वैयक्तिक निविष्टी म्हणून न पाहता त्याच्याकडे विकासातील तुटीचा अंदाज घेण्यासाठी पाहतो. आमच्या दृष्टिकोनातून आम्ही दोन मार्गांचा अवलंब केला आहे, प्रत्येक मार्ग हा अंमलबजावणीच्या व तात्पुरत्या स्वरूपात **अन्त्योदय** या महत्त्वाकांक्षी तत्त्वाची स्फूर्ती देणारा आहे. मार्ग पहिला, लोक व प्रदेश यांमध्ये मूलभूत सार्वजनिक मालाच्या समान प्रवेशाबाबत आहे. आम्ही प्रत्येक विभागवार तसेच प्रादेशिक स्तरावर जिल्हा व गट पातळीवर वाटपासाठी तलस्तरावर सुविधा पुरविल्या आहेत. हे सर्व तलस्तर विभागीय मंडळ स्तरावर एकत्रितपणे विचारात घेतले जात आहेत. आम्हाला याची जाणीव आहे की, प्रत्येक विभाग किंवा क्षेत्रामध्ये जोपर्यंत किमान खर्च केला जात नाही तोपर्यंत चांगल्या गोष्टी आत्मसात करणे टाळता येणारे नाही. मार्ग दुसरा, मागास प्रदेशांतील वाढीचा वेग वाढवण्याबाबत आहे. दुसऱ्या मार्गाच्या संदर्भात आमचा दृष्टिकोन प्रादेशिक विशिष्टता लक्षात घेते आणि 'नोकरीनुसार लोकांची सांगड घालणे', एकल अनन्यसाधारण तत्त्वाचा पाठपुरावा करण्यापेक्षा जोमदार सामूहिक लाभांची अपेक्षा करणे, यांची शिफारस करतो. थोडक्यात आम्हाला याची जाणीव झाली आहे की, 'एकच परिमाण सर्वांना लागू होत नाही'. आम्हाला मान्य आहे की, तेथे जादूची कांडी किंवा चांदीची गोळी नाही. मात्र, शासनाची संस्थात्मक रचना म्हणून, विशेषत: मानवी भांडवल खूपच महत्त्वाचे आहे असा आमचा विश्वास आहे. प्रत्यक्ष आधारभूत पायाभूत सुविधा महत्त्वाच्या आहेत आणि **त्याहून महत्त्वाचे म्हणजे 'क्ष' घटक यात संस्थांची भूमिका व त्यांच्या कामाचे स्वरूप तसेच समाज भांडवल ज्यामध्ये उद्योजकता व सामाजिक-राजकीय नेतृत्वाचा समावेश होतो, या गोष्टी अंतर्भूत आहेत.**

समिती, २०२६-२७ पर्यंतची साधनसंपत्ती लोकांपुढे मांडण्यास जागरूक आहे. आम्ही मागील १० वर्षांचा वार्षिक वाढीचा दर विद्यमान सर्वात कमी वार्षिक वाढीच्या दराशी एकत्रित करून महसुली जमा रकमा अंदाजित केल्या आहेत. त्याचवेळी आम्ही मागील १० वर्षातील वाढीचा दर एकत्रित वार्षिक वाढीच्या दराहून उच्च वार्षिक वाढीच्या दराने वाढत जाणारा योजनेतर खर्च अंदाजित केला होता. राज्याची वित्तीय दायित्वे अजूनही व्यवस्था लावता येण्याजोग्या मर्यादित आहेत, असे वाटल्यामुळे आम्ही बाजारातून अधिक वाढीव स्तर कर्ज घेण्याचे सुचविले आहे आणि असा विचार करतो की, मोठे प्रकल्प शीघ्रगतीने पूर्ण करण्यासाठी ही बाब महत्त्वाची आहे असे आम्हाला वाटते. जोडपत्र ४.४ च्या स्तंभ ११ व १२ मधील अधिक भर हा मुख्यत्वेकरून बाजारातील कर्जाच्या प्रस्तावित वाढीव स्तरामुळे आहे.

आम्ही येथे असेही स्पष्ट करू इच्छितो की, वर्षनिहाय प्रोदशिक तसेच एकूण निधीच्या आवश्यकतेला (जोडपत्र ४.४ चा स्तंभ २ ते स्तंभ ११) त्या संबंधित वर्षांसाठीचे निश्चित व विनिर्दिष्ट शिफारस केलेल्या नियतवाटपाप्रमाणे अन्वयार्थ लावू नये. हे केवळ निर्देशक आहे.

अंतिमत: आम्ही जे सुचविले आहे ते असे की, आम्हाला सहभागी लोकशाहीचे महत्त्व व त्याचे मूल्य याची विशेषत्वाने जाणीव आहे, त्यामुळे आम्ही, जी अगदी नेहमीच अतिनिर्धारित पद्धतीच्या अग्रणी असते अशा आमच्या सूत्रबद्ध सम्यक रचनेच्या वापरावर जाणीवपूर्वक निर्बंध घालीत आहोत. त्याऐवजी, आम्ही नियतवाटपासाठी आधार / पायऱ्या यांची तरतूद केली आहे. जेणेकरून, त्या त्या क्षेत्रातील श्रीमंत व सुखवस्तू अशा स्थानिक घटकांनी ताबा मिळवण्याची शक्यता कमी होईल.सरधोपट **संगणकीय निर्धारणाचा** (paternalistic 'computer' determination) **मार्ग टाळून आम्ही स्वाभाविकपणे व विचारपूर्वक (लोकशाहीच्या स्वभावगुणास महत्त्व देऊन) हितसंबंधितांचा (निवडून आलेल्या प्रतिनिधींसह) मार्ग मोकळा करून दिला आहे, जेणेकरून, आमच्या अपेक्षेपेक्षा ते अधिक चांगले परिणाम देऊ शकतील.**

प्रकरण ५

विकासाची गती वाढविण्यासाठी प्रादेशिक ध्येयधोरणे

५.० प्रस्तावना

सामाजिक-आर्थिक विकासातील प्रादेशिक तफावत ही, गंभीर सामाजिक व राजकीय गुंतागुंतीचा अलिकडील काळातील एक संवेदनशील मुद्दा बनला आहे. पन्नासच्या दशकाच्या मध्यावधीत राज्याच्या स्थापनेच्या / पुनर्रचनेच्या वेळी मागील विविध ऐतिहासिक घटकांमुळे महाराष्ट्राच्या बाबतीत या मुद्यांना अधिक महत्त्व येण्यासही सुरुवात झाली होती. आधीचे हैद्राबाद राज्य, मध्य प्रांत व मुंबई प्रांत यांच्या अनुक्रमे मराठवाडा, विदर्भ, कोकण व पश्चिम महाराष्ट्र या भागांचा समावेश असलेल्या क्षेत्रांना एकत्रित करून १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. तथापि, अनेक राजकीय, आर्थिक व सामाजिक घटकांमुळे, राज्याचे सर्व प्रदेश एकाच गतीने प्रगती साध्य करू शकले नाहीत. नैसर्गिक (भौगोलिक) किंवा स्वाभाविक (सांस्कृतिक) वेगळेपणा असल्यामुळे, सर्व तफावती संपूर्णपणे दूर करणे अशक्य नसले तरी, अवघड आहे. परंतु , लोकांना, प्रदेशांना त्यांच्या तुलनात्मक लाभांपासून आणि त्यांचा संपूर्ण संभाव्य विकास साधण्यापासून परावृत्त करणाऱ्या सामाजिक - राजकीय निर्णयांमुळे किंवा संस्थात्मक निर्बंधामुळे निर्माण होणारे असे किमान सर्व 'मानव-निर्मित' अडथळे दूर करणे शक्य व आवश्यक आहे.

समतोल प्रादेशिक विकासासाठी मागासलेल्या प्रदेशांच्या विकासाची गती वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता पायाभूत सुविधा पुरविणे, कौशल्य विकास, सुप्रशासन, उत्पादनावरील खर्च कमी करणे व सहज सुलभ आणि मुबलक प्रमाणात विकास भांडवल उपलब्ध होणे, आवश्यक आहे. विकासाचा वेग वाढविण्यामध्ये आवश्यक असलेल्या धोरणात्मक सुधारणांच्या अंमलबजावणीची महत्त्वपूर्ण भूमिका असते. अशाप्रकारे, आपण निर्बंध सौम्य करू शकू, सामर्थ्याचे तपशीलाने वर्णन करू शकू व विविध प्रदेशांना गतीशील तुलनात्मक लाभ देण्यास शक्ती देऊ शकू. विविध प्रदेशांना, निरनिराळी संमिश्र धोरणे आवश्यक राहतील हे सांगण्याची गरज नाही.

प्रदेशांमधील आर्थिक असमतोल संपूर्णपणे दूर करण्यासाठी, मागासलेल्या प्रदेशांतील विकासाची गती वाढविण्यावर विशेष भर देणे महत्त्वाचे आहे. या प्रदेशांच्या, विकासाच्या ध्येयधोरणामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याची गरज आहे. मागासलेल्या प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेसाठी ज्या धोरणामुळे अधिक उत्पादनक्षम क्षेत्रांवर जास्तीत जास्त भर सुनिश्चित करणाऱ्या विकास धोरणाचा अवलंब केला पाहिजे. मागासलेल्या प्रदेशांतील बहुसंख्य क्षेत्रे ही, परंपरागत कोरडवाहू शेतीवर अवलंबून आहेत. सिंचनाच्या पाणी बचत पद्धती, पीक पद्धतीमधील बदल, फलोत्पादनाचा विकास, इत्यादींचा समावेश असलेली आधुनिक शेती केल्यास मागासलेल्या भागांमधील कृषि क्षेत्र पुनरुज्जीवित होण्यास मदत होईल. तसेच, कमी उत्पादकता असलेल्या कृषि क्षेत्रामधील मनुष्यबळ अधिक उत्पादनक्षम असलेल्या कृषीतर रोजगारामध्ये वळविण्याची आवश्यकता असेल. हे, उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून परिणामकारकरीतीने साध्य करता येऊ शकेल. पायाभूत सुविधांचा विकास व कुशल मनुष्यबळ निर्माण करणाऱ्या संस्थांचा विस्तार यांमुळे प्रदेशाच्या गतिशील तुलनात्मक लाभाची नवीन ठिकाणे उदयास येणे शक्य होईल.

प्रादेशिक विकासविषयक ध्येय-धोरणे तयार करण्यासाठी, समितीने, शिक्षणतज्ञ, उद्योगविषयक तज्ञ यांचा समावेश असलेल्या प्रदेशनिहाय तज्ञ गटांची नेमणूक केली होती. त्यांच्या अहवालांमध्ये क्षेत्रनिहाय व जिल्हानिहाय शिफारशी प्रस्तावित केल्या आहेत. या प्रकरणामध्ये त्यांचे विश्लेषण करून धोरणात्मक सूचना मांडल्या आहेत.

५.१ विदर्भाच्या विकासासाठी ध्येयधोरणे

उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाच्या उत्पन्नातील असमतोल हा, विशेषकरून (१) कृषि क्षेत्राचा अल्प व अस्थिर विकास दर, (२) खाजगी गुंतवणुकीचा अपर्याप्त ओघ, (३) आश्वासित सिंचन, दळणवळण आणि वीज पुरवठ्याचा दर्जा यांच्या बाबतीतील पायाभूत सुविधांची घट, आणि (४) प्रशासनाचा स्तर, यांमुळे मागील दशकात अधिक बिघडला आहे. अशा विकासविषयक धोरणानुसार शासनाच्या धोरणात्मक सुधारणांच्या आवश्यकतेबरोबरच सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामधील फार मोठ्या साधनसंपत्तीच्या ओघासह कृषिविषयक पिछेहाटीचा व विदर्भाच्या विकासाचा प्रश्न तातडीने हाताळण्याची आवश्यकता आहे.

विदर्भामध्ये विकासाची गती वाढविण्याच्या दृष्टीने पूर्ण वापर करता येऊ शकेल अशी सामर्थ्य पुरविणारी प्रमुख क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

- कृषि व कृषि प्रक्रिया उद्योग
- वने
- मत्स्यव्यवसाय
- खनिज संपत्ती
- उद्योग (वस्त्रोद्योग)
- वीज क्षेत्र
- पर्यटन

५.१.१ कृषि व कृषि प्रक्रिया उद्योग

कृषि हा विदर्भाच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे व अलिकडील काळात त्यात खूप अस्थिरता आणि मोठ्या प्रमाणात अवरुद्धता दिसून आलेली आहे. शेतीस्तरावर आश्वासित सिंचन तसेच संरक्षित सिंचनात वाढ करणे हे या क्षेत्रासाठी विकासात्मक ध्येयधोरणाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी एक घटक असेल. यादृष्टीने, विशेषत: पश्चिम विदर्भात सिंचन क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढविणे, प्रलंबित प्रकल्प जलदगतीने कार्यान्वित करणे, पाण्यातील गाळाची समस्या हाताळणे, इत्यादींसारख्या अनेक कामांची आवश्यकता आहे. जलसंपत्तीचा विकास (प्रकरण १०) यावरील आमच्या प्रकरणामध्ये, आम्ही, या मुद्यांबाबत विस्तारपूर्वक लिहिले आहे.

विदर्भाच्या पूर्व भागात मुख्यत: धानाचे पीक घेतले जाते तर पश्चिम भागात फलोत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. कापूस व कडधान्याचे पीक सर्व प्रदेशात घेतले जाते. तथापि, त्या प्रदेशात कृषिविषयक उत्पादनात वाढ करणे व या क्षेत्राच्या कृषिविषयक संभाव्य क्षमतेचा पूर्ण वापर करणे यांसाठी कृषिविषयक विस्तार सेवांमध्येही मोठी वाढ करणे, ग्रामीण भागातील रस्त्यांचे व शेती रस्त्यांचे जाळे वाढविणे, कृषि कर्जाचा पुरवठा करणे आणि मूल्यवर्धित कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देणे या बाबी आवश्यक असतील. पशुसंवर्धन, कुक्कुटपालन व त्यांसारखे पूरक व्यवसाय यांनाही चालना देण्याची आवश्यकता आहे.

कृषि क्षेत्रामध्ये स्थैर्य आणण्यासाठी हे आवश्यक आहे की, (तपशीलासाठी कृषिवरील प्रकरण पहावे) प्रत्येक शेतकऱ्याकडे आश्वासित सिंचनाचा निदान एक हंगाम असणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक पद्धतीत व अनेक पिके घेण्यामध्ये वैविध्य आणणे सुलभ होईल. यामुळे, केवळ एक हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यासाठी आश्वासित उपजीविकेची सुनिश्चिती होईल, आणि अशाप्रकारे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या दुर्भाग्यपूर्ण घटना ज्या संकटाच्या परिस्थितीत घडतात त्या परिस्थितीशी लढा देता येईल. अशी अनुकूल परिस्थिती ही, १५.४४ लाख हेक्टर जमिनीला पाणी पुरविणारे पाटबंधारे प्रकल्प शीघ्रगतीने पूर्ण केले तर अपेक्षित स्थिती दिसून येईल.

५.१.२ वने

विदर्भात २६,९८,८०० हेक्टर इतकी वन जमीन असून ती महाराष्ट्रातील एकूण वन जमिनीपैकी ५३.२९ टक्के इतकी आहे. विदर्भातील वने ही वन्य व प्राणीसृष्टीचे माहेरघर असून दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात.

आजवर विदर्भातील वनांना अनुत्पादक मत्ता म्हणून समजले गेले, परंतु त्यांचे रूपांतर आर्थिक मत्तेत होऊ शकते, तसेच जगभरामध्ये महत्त्व असणाऱ्या कार्बन सिंक प्रमाणेसुद्धा रूपांतर होऊ शकते. वन उत्पादने, विशेषकरून बांबू सारखी लाकूड नसलेली उत्पादने ही दुर्गम भागातील खेड्यांकरिता महत्त्वाचा महसुली स्रोत म्हणून विकसित केली जाऊ शकतात. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात क्षमता आहे त्या ठिकाणी बांबू आधारित फर्निचर सारखी मूल्यवर्धित उत्पादने निर्माण करू शकतील अशा समूहाधारित सहकारी उद्योगांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. संवर्धन म्हणजे वनसंपदेचा वापर न करणे असे नाही. या बाबतीतील परंपरागत प्रश्न आहेत आणि वन अधिनियमाचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून अंगभूत सुसंगतता (लॉजीक) शाबूत ठेवतानाच तो पूर्णपणे विकासविरोधी अधिनियम होणार नाही. विशेषत: '*झुडपी जंगल*' या संकल्पनेचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. स्थानिक लोक त्यांच्या पारंपरिक ज्ञानानुसार **या साधनसंपत्तीचा** उत्पादक कारणांसाठी वापर करू शकतात, यास प्रोत्साहन दिले पाहिजे. विदर्भ आणि त्या नंतर महाराष्ट्राला निसर्गाने बहाल केलेल्या दुर्मिळ आणि संपन्न अशा साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी पृथ्वीच्या संरक्षणाबाबत दोन टोके असलेले धोरण आणि प्रदेशाच्या विकासाबाबत वन (कार्बन) क्रेडीट असणे ही काळाची गरज आहे. सध्या विदर्भातील वनांकडून पुरवल्या जाणाऱ्या पर्यावरणीय सेवांचा भारत सरकारने 'हरित बोनस' देऊन गौरव केला आहे. तथापि, हा बोनस महाराष्ट्राच्या एकत्रित निधीचा भाग बनला आहे. आम्ही अशी शिफारस करतो की, **हा बोनस विभागाच्या विकास योजनेकरिता नियतवाटप करण्यात येणाऱ्या निधीमध्ये भर म्हणून विदर्भ प्रदेशाच्या विकासाकरिता 'निर्बंधित' असावा.**

उपजीविकेचे साधन म्हणून कृषि वने: विदर्भ प्रदेशातील कृषि वनांचा उत्पन्नाचे साधन म्हणून विकास करण्याची आवश्यकता आहे. वन क्षेत्राच्या जवळ राहणाऱ्या लोकांनी जमिनीचे निर्वनीकरण करून ती जमीन शेतीच्या कामासाठी रूपांतरित करण्याचा उपक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेतला आहे. काही बाबतीत, ज्या लोकांनी वन जमिनींवर अतिक्रमण केले आहे त्या लोकांना जमिनीवरील मालकीहक्क सुद्धा देण्यात आला आहे. ही प्रथा कमी करण्यासाठी स्थानिक लोकांकडून वनांचाच विकास केला जाऊ शकतो. राज्याच्या काही भागांमध्ये वनांच्या सामूहिक मालकीची पद्धत स्वीकारण्यात आली आहे. आवश्यक त्या पायाभूत सुविधा आणि प्रोत्साहके देऊन औषधी वनस्पतींचा, बिगर-इमारती लाकडांच्या वनांचा विकास करणे अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. वन जमिनीचा विकास करण्यासाठी आणि त्यायोगे झाडे वाढण्याचा प्रतिक्षावधी कमी करण्यासाठी सिंचनाचा खूप चांगला वापर करता येऊ शकेल.

५.१.३ मत्स्यव्यवसाय

विदर्भातील मत्स्यव्यवसाय उद्योग हे दुसरे असे क्षेत्र आहे, ज्यात विकास होण्याची संभाव्यता आहे. जुनी तळी किंवा *माजी मालगुजारी* तलावांमध्ये असलेला गाळ तात्काळ काढण्याची गरज आहे, जेणेकरून पाणी साठ्याची क्षमता वाढविता येऊ शकेल. पूर्व विदर्भाच्या गावांजवळ अतिरिक्त पाणी उपलब्ध असून शेतकऱ्यांना या पाण्याचा वापर मत्स्यपालनाकरिता करण्यास प्रोत्साहन मिळेल. सामाजिक-आर्थिक विकासामध्ये मत्स्यव्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे, कारण मासेमारी करणाऱ्या गरीब आणि मागासलेल्या समाजासाठी हे उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे.

पूर्व विदर्भाची मत्स्य क्षमता इतकी आहे की, तो एकतर पूर्व किनाऱ्याबरोबर किंवा पश्चिम किनाऱ्याबरोबर चांगल्याप्रकारे स्पर्धा करू शकेल. मोक्याच्या जागेवर स्थित असल्याने हे उत्पादन, किमान संपूर्ण मध्य भारताला मत्स्य पुरवठा करण्यासाठी उपयोगी पडू शकेल. मत्स्यव्यवसायास कालांतराने संबंधित आनुषंगिक सहाय्य (logistic support) आणि योग्य ठिकाणी संपर्क जाळे स्थापन करून तसेच उत्पादन व विपणन सुविधा निर्माण करून

भरभराटीच्या निर्यात व्यवसायामध्ये परिवर्तन होऊ शकेल. एकूणच विदर्भ प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याची भूमिका पार पाडू शकणारी प्रचंड निर्यातक्षमता येथे आहे.

५.१.४ खनिज संपत्ती

विदर्भ हा नेहमीच, महाराष्ट्राचा खनिज संपत्तीने समृद्ध असलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो. वास्तविक पाहता, मध्य भारताचा पट्टा हा देशातील दुसरा सर्वात मोठा खनिज पट्टा असल्याचे अलिकडील अभ्यासांमधून दिसून आले आहे. मँगनीज, बॉक्साईट, युरेनिअम, चुनखडी, संगमरवर, कोळसा, हिरे, अभ्रक आणि ग्रॅफाईट इत्यादी सारखी विविध खनिजे येथे मोठ्या प्रमाणात आहेत आणि या विभागातील खनिजांचे प्रत्यक्ष प्रमाण अजून निर्धारित व्हायचे आहे.

बहुधा, वन संरक्षण अधिनियम, १९८० ने लादलेल्या मर्यादांमुळे विदर्भातील खनिज संपत्ती वापराविना पडून राहिली आहे. या अधिनियमाचा व्यापक आढावा घेण्याची आणि स्थानिक विकासाच्या गरजा व स्थानिक पर्यावरणीय समस्या यांचा चांगल्या प्रकारे मेळ घालण्यासाठी त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची गरज आहे. 'ग्रीन बोनस' प्रमाणे *विदर्भाच्या खनिज संपत्तीपासून मिळणारी स्वामित्व मिळकत* (royalty earnings) *ही स्थानिक क्षेत्राच्या विकासाकरिताच 'निर्बंधित' करावी. त्याचप्रमाणे, स्वामित्व मिळकतीचे दर* (royalty rates) *हे सुद्धा तर्कसंगत अशा मूल्यानुसारी ठरवावेत आणि ते ठराविक काळाने सुधारण्यात यावेत.*

५.१.५ उद्योग

विदर्भाकडे एक अनन्यसाधारण असे स्थानाधारित आनुषंगिक फायदे (logistical advantage) आहेत, जे उत्पादन क्षेत्राच्या विकासाच्या दिशेने एक स्पर्धात्मक किनार उपलब्ध करून देतात. कुठूनही, इतर कोणत्याही स्थानापर्यंत मग राष्ट्रीय असो वा आंतरराष्ट्रीय मालांची आणि सेवांची ने-आण करण्यासाठी या भागास तुलनात्मकदृष्ट्या मोक्याचे भौगोलिक स्थान प्राप्त झाले आहे. या भागात आवश्यक असलेल्या संपर्कजाळ्यासंबंधीच्या पायाभूत सुविधा योग्य ठिकाणी उपलब्ध करून देऊन या अनन्यसाधारण उपयुक्ततेचा पुरेपूर फायदा करून घेता येईल.

कापड उद्योग, कृषि प्रक्रिया, अन्नसंस्करण, वीज क्षेत्र, आनुषंगिक बाबी (logistics) आणि पर्यटन या भोवती विदर्भाच्या औद्योगिकीकरणाची बांधणी करता येईल. या औद्योगिकीकरणास लाकूड व वन आधारित उद्योग, सिमेंट, ओतशाळा (foundries), पोलाद व रि-रोलिंग, वाहनांचे सुटे भाग, शेती सामग्री, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा, खाणी व खनिजे इत्यादींनी आणखी पूरक करता येईल. विदर्भ हा अशा काही थोड्याच प्रदेशांपैकी एक आहे जेथे ग्रामीण सामूहिक केंद्रे / कृषि आर्थिक क्षेत्रे यांची ब्रॉडगेज रेल्वे मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग यांच्याभोवती आखणी व विकास करता येईल. या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता मैत्रीपूर्ण गुंतवणूक धोरणांवर जोर दिला पाहिजे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेखेरीज, याकरिता या भागात अधिकारप्रदत्त उद्योग व व्यापार संचालनालय स्थापन करण्याची आवश्यकता आहे, जे व्यवसाय करण्यामधील सुलभतेच्या सुधारणा करून आणि त्यामुळे व्यवहार खर्च कमी करून सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रमांना आणि इतर उद्योगांना प्रोत्साहन देईल. विकासाला चालना देण्यासाठी खाजगी क्षेत्राच्या गुंतवणुकीला वाढते महत्त्व देणाऱ्या अशा धोरणांना विदर्भ प्रदेशामध्ये निर्णायक महत्त्व असेल.

५.१.६ वस्त्रोद्योग

जरी विदर्भ हा सर्वात मोठा कापूस उत्पादक प्रदेश असला तरी, कापड उद्योग युनिटांना आकर्षित करून घेण्यात तो अपयशी ठरला. वस्त्रोद्योगातील मोठ मोठे उद्योजक विदर्भाकडे आकर्षित होतील अशा पद्धतीने वस्त्रोद्योग धोरणाची आखणी व कार्यान्वयन करायला हवे. सध्या येथे अनेक जिनिंग व प्रेसिंग युनिटे असून ही युनिटे कापसाच्या गासड्या तयार करतात व मुख्यत्वेकरून आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूतील स्पिनिंग व विविंग गिरण्यांना विकतात. याच्या परिणामी कापडाचे विणकाम, रंगकाम करणारे, तयारे कपडे इत्यादी त्यानंतरची युनिटेसुद्धा त्याच भागात आहेत.

उद्योगांची सद्यस्थिती आणि त्यांच्या सुधारणेकरिताच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत:

१. नवीन औद्योगिक धोरणाची घोषणा केल्यानंतरची अलिकडील आकडेवारी असे दर्शविते की, हे क्षेत्र विदर्भामध्ये रुपये ५,००० कोटी इतकी गुंतवणूक आकर्षित करू शकते. हे साध्य करण्यासाठी, प्रचलित योजनेमध्ये व्याज अर्थसहाय्याची व तंत्रज्ञान दर्जावाढ निधी योजनेमध्ये राज्यस्तरावर सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

२. विदर्भात कापूस लागवड मोठ्या प्रमाणात व उत्पादन खूपच कमी असे मोठे क्षेत्र आहे. नवीन धोरणाच्या फलनिष्पत्तीद्वारा या विसंगतीस चांगला अटकाव होऊ शकेल. नवीन धोरणानुसार, शेतकरी, थेट गिरण्यांना कापूस विकू शकतात. एकदा का मोठ्या स्पिनिंग व विविंग गिरण्या उभारल्या की, त्या करार पद्धतीच्या शेतीमध्ये प्रवेश करू शकतील आणि अशाप्रकारे, वाढत्या नफ्यातून त्यांना चांगली प्राप्ती व लाभ मिळण्याकरिता पेरणी व कापणीपर्यंत मृदा परिक्षणापासून ते शेतकऱ्यांना तांत्रिक व आर्थिक सहाय्य, बी-बियाणे, इत्यादी देतील. तथापि, यास शासनाकडून खालील दोन महत्त्वाच्या प्रयत्नांमधून सहाय्य मिळाले पाहिजे.

(अ) प्रवर्तनीय करार पद्धतीने शेती करणे अधिनियम.

(ब) लहान भूधारकांना त्यांची धारण जमीन एकत्र करण्यास, त्याची ५००-१००० एकरच्या स्वरूपात त्याचा संकोष (बँक) तयार करण्यास प्रोत्साहन देणे, त्यामुळे करार करणाऱ्या क्रेत्यास, आवश्यक आधार जाळे स्थापन करणे शक्य होईल. आदर्श स्वरूपाचा करार करून आणि असा करार करण्यासाठी प्रदेय असलेले कोणतेही मुद्रांक शुल्क रद्द करून यास आणखी मदत करता येईल.

३. स्पिनिंग व विविंग सूतगिरण्या या, मूल्य साखळीतील विणकाम, रंगाई व कापड उद्योग यांचे अग्रदूत आहेत आणि महाराष्ट्र शासनाने धोरणात्मकपणे स्थित असलेल्या समूहांतील लहान व मध्यम उपक्रमांच्या विकासाला प्रोत्साहन दिले पाहिजे.

४. स्पिनिंग व विविंग सूतगिरण्यांसाठी वीज ही एक प्रमुख बाब आहे. विदर्भाला २६ नवीन वीज निर्मिती केंद्रे मिळत आहेत. त्यामुळे, महाराष्ट्र शासनाने, या वस्त्रनिर्माण घटकांना वेगवेगळ्या दरांमध्ये वीज दिली पाहिजे असे सुचविण्यात येत आहे. ज्यामुळे भूक्षेत्रीयदृष्ट्या जवळच्या प्रदेशांच्या तुलनेत स्पर्धात्मक आहे आणि विशेषत:, अधिक दर्जेदार सूतासाठी, निर्यातीच्या संधी खुल्या होतील.

५. डि-लिंट सूत गिरण्यांसाठी उच्च तंत्र प्रक्रियांचा स्वीकार करताना अगोदरच अस्तित्त्वात असणाऱ्या तंत्रज्ञान दर्जा वाढ निधीसाठी पात्र बनविले पाहिजे.

५.१.७ वीज क्षेत्र

विदर्भ हा देशाचा प्रमुख वीज उत्पादक आहे. महाराष्ट्रातील १०,१०० मेगावॅट इतक्या स्थापित क्षमतेपैकी, विदर्भाचे ५,६०० मेगावॅट (५५ टक्के) इतके योगदान आहे. जेथवर दशलक्ष युनिटामधील ऊर्जानिर्मितीचा संबंध आहे तेथवर, विदर्भ, एकूण प्रमाणाच्या जवळपास ५३ टक्के इतके योगदान देतो. राज्यातील वीज वापर, विदर्भ प्रदेशातील २,००० मेगावॅट (१२.४ टक्के) च्या तुलनेत १६,१४३ मेगावॅट (२०१०-११) इतका आहे. सन २०१०-११ मधील विदर्भाची दरडोई विद्युत विक्री, महाराष्ट्राच्या (७७४ युनिट) सरासरीच्या सुमारे ६५ टक्के (५०२ युनिट) इतकी होती. ती मराठवाड्याखेरीज, सर्व प्रदेशांमध्ये कमीत कमी सुद्धा होती. अलिकडील आकडेवारी असे दर्शविते की, विदर्भाचे अनेक जिल्हे राज्याच्या तुलनेत, घरगुती विद्युतीकरणात मागे पडले आहेत. २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांचा घरगुती विद्युतीकरणाचा दर राज्याच्या ८३.९ टक्के इतक्या सरासरीपेक्षा कमी आहे. या जिल्ह्यांमध्ये, गडचिरोली (५९.२ टक्के), यवतमाळ (६९.७ टक्के), वाशिम (७६ टक्के) व इतर जिल्ह्यांचा समावेश आहे.

बाराव्या पंचवार्षिक (सन२०१२-१७) योजनेच्या शेवटी, विदर्भाची मागणी, ६,००० मेगावॅट पर्यंत पोहचेल (तरतूद केलेला, मिहान प्रकल्प पूर्णपणे कार्यरत झाल्यास). तथापि, नळमार्गातील वीज प्रकल्पांचा विचार करता, वीज निर्यात, सातत्याने तितकीच असेल किंवा भविष्यात अधिक सुद्धा असेल. तथापि, प्रत्येकाने कृषि व वीज

क्षेत्रांतील पाण्याच्या गरजेतील समतोल लक्षात घेतला पाहिजे. म्हणून, या दोन स्पर्धा करणाऱ्या मागण्यांमधील पाण्याचे वाटप, विवेकशीलपणे करावे लागेल.

सोडविण्याची गरज असलेला दुसरा प्रश्न असा आहे की, वीज निर्मिती व पर्यावरण संवर्धन यांच्या गरजांमध्ये संतुलन राखणे हा आहे. विदर्भातील अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण कोळसा साठा व चांगला जल स्रोत आहे. अशाप्रकारे, कोळसाआधारित औष्णिक ऊर्जा निर्मिती संयंत्रे हा, या क्षेत्रासाठी चांगला विकासात्मक पर्याय असल्याचे दिसून येते. खचितच, यापूर्वी नोंद घेतल्याप्रमाणे, विदर्भात एकूण ५,२६० मेगावॅट इतकी महत्त्वपूर्ण कोळसाआधारित विद्युत निर्मिती क्षमता असून ती राज्यातील एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमतेच्या अदमासे २९ टक्के इतकी आहे. विदर्भात, नवीन औष्णिक ऊर्जा निर्मिती संयंत्रे उभारण्याच्या आणि कोळसा खाणींचा विस्तार करण्याच्या योजनांबाबत तेथे सर्वसाधारणपाणे मोठा संताप, संशयवाद व विरोध देखील आहे. विद्यमान औष्णिक ऊर्जा निर्मिती संयंत्रांच्या व कोळसा खाणींच्या प्रदेशाच्या अनुभवावर आधारित आहे. एका बाजूला, ज्या क्षेत्रांमध्ये ऊर्जा निर्मिती संयंत्रे व खाणी अगोदरच अस्तित्वात आहेत अशी क्षेत्रे, प्रदूषण, विस्थापन, भूजल व भूपृष्ठ जल स्रोत आटणे, सिंचनाचे व पिण्याच्या पाण्याच्या गरजेचे पाणी वळविणे, आरोग्य समस्यांमधील वाढ, कृषि उत्पादन व उत्पादकता यातील घसरण आणि पशुधनावरील परिणाम यांसारख्या तीव्र समस्यांना तोंड देत आहेत. वक्रोक्तिपूर्णपणे, दुसऱ्या बाजूला प्रदेश, राज्याच्या अनेक इतर भागांच्या तुलनेत, वारंवार वीज पुरवठा खंडित होणे, घरगुती विद्युतीकरणाची व वीज वापराची निम्न पातळी, यास सतत तोंड देत आहे. यात, घरगुती व कृषि क्षेत्रांतील वापराचा समावेश होतो.

कोळसा व वीज क्षेत्र विकासाविरुद्धचे हे कायदेशीर गाऱ्हाणे व निर्बंध सोडविण्याच्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे, चंद्रपूरमधील (आमच्या समितीने नेमलेल्या प्रयासाने केलेल्या अभ्यासाच्या *संदर्भात*) परिस्थितिकी समतोलाचे पुन:स्थापन प्राधान्याने हाती घेणे हा आहे. यासाठी आणखी करावयाची उपाय योजना म्हणजे, योजनांतर्गत खर्चाचा अतिरिक्तपणे व विभागणीयोग्य नसलेल्या संकोषाचा भाग हा आहे. अशाप्रकारे, काम करताना, पर्यावरणविषयक मानकांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावयाची आहे, जलसंवर्धन व सममूल्यन पारदर्शक रीतीने केले पाहिजे आणि ऱ्हास झालेल्या उप-प्रदेशांचे, उचित व कुशल मार्गाने (रिंग फेन्सड वे) पुनर्भरपाई करावयाची आहे. या सर्व उपाययोजना, भावी योजनांबाबत हितसंबंधितांमध्ये विश्वास वाढवतील आणि 'विश्वासाची' कमतरता भरून काढण्यास मदत करतील, असा आम्हाला विश्वास वाटतो.

५.१.८ प्रचलित प्रशुल्क धोरणाचे तुलनात्मक तोटे

उच्च दाबाने व कमी दाबाने वीज वापर करणाऱ्या ग्राहकांच्या औद्योगिक वीज प्रशुल्काशी संबंधित असणारी माहिती, तक्ता ५.१ मध्ये सादर केली आहे.

तक्ता ५.१
औद्योगिक वीज प्रशुल्क

(रु. दर ताशी किलो वॅटमध्ये)

राज्य	उच्च दाब	कमी दाब
महाराष्ट्र	७.६८	८.५०
कर्नाटक	६.००	५.२५
गुजरात	५.३०	५.५०
आंध्रप्रदेश	५.५०	५.७०
मध्यप्रदेश	६.००	५.८५
छत्तीसगड	४.८०	५.२५
गोवा	४.५०	३.३०

स्रोत : महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना

तक्ता ५.१ मध्ये दिसून आल्याप्रमाणे, महाराष्ट्रात उच्च दाबाने व कमी दाबाने वीजेचा वापर करणाऱ्या अशा दोन्ही ग्राहकांच्या संबंधात, दर ताशी किलोवॅट (के डब्ल्यू एच) च्या प्रति युनिटासाठी अधिकतम प्रशुल्क आकारले

जाते. वीज ही, वस्तुनिर्माण क्षेत्रासाठी आवश्यक व कायमस्वरूपी निविष्टी असल्याने, इतर राज्यांमध्ये स्थित असलेल्या औद्योगिक युनिटांच्या संदर्भात, महाराष्ट्रातील उद्योग स्पर्धात्मक गैरसोयीस तोंड देत आहेत. स्पष्टपणे, (वीज शुल्क हे, या अधिक प्रशुल्क) भर घालणारा प्रमुख घटक आहे आणि यात सुधारणा होण्याची गरज आहे. अंतिमत: प्रदेश, शेजारच्या राज्यांच्या तुलनेत स्पर्धात्मक गैरसोय सहन करीत असल्यामुळे, आम्ही, विदर्भ प्रदेशासाठी कमी प्रशुल्काचा स्वीकार करण्याची शिफारस केली आहे. ज्यामुळे, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रमांना (एम एस एम इ) उत्तेजन देण्यासह औद्योगिकीकरणास चालना देण्याच्या संबंधात दीर्घ पल्ला गाठू, असा आम्हाला विश्वास आहे.

५.१.९ पर्यटन

देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय वाहतुक व्यवस्था असल्या कारणाने पर्यटन हे विदर्भात, समर्थपणे भरारी घेण्याच्या मार्गावर आहे. स्थानविषयक फायदे, जंगलातील वन्यजीवन व ऐतिहासिक वारसाप्राप्त ठिकाणे असल्यामुळे, विदर्भ यथोचित कार्यतंत्र प्रचालित करून त्याद्वारे, सहजरीत्या पातळी उंचावू शकतो.

विदर्भातील पर्यटन प्रचालन, आतिथ्य व पर्यटन उद्योग तसेच फावल्या वेळेतील उद्योग यांचा विस्तार करून त्याद्वारे रोजगार व उत्पन्न निर्मिती यांचा प्राथमिक अभिवर्धक म्हणून विचार केला पाहिजे. यासाठी, शासनाने आधीच मान्यता दिलेल्या टीसीएस अहवालाची शीघ्रतेने अंमलबजावणी करणे उपयुक्त होईल. याशिवाय, शासनाने, संपर्क जाळे, संबंधित कौशल्य विकास यांसारख्या आधारभूत पायाभूत सुविधा पुरविण्याच्या उपाययोजना हाती घ्यावयाच्या असून त्यामुळे आतिथ्य क्षेत्र व पर्यटन उद्योगात खाजगी गुंतवणुकीकडे लोकांचा ओघ वळेल. असे असूनही आणखी निमित्तत्व असे आहे की, यामुळे विदर्भ पर्यटन विकास महामंडळाच्या निर्मितीद्वारे, पर्यटनाचे अभिवर्धन होण्यास मदत होईल.

आगामी व्यापारी माल व सेवाकरासह, नागपूर व आजूबाजूचा परिसर हा, पुन्हा एकदा, रसद पुरवठा केंद्र म्हणून (लॉजिस्टिक हब) नैसर्गिक पसंतीचे ठिकाण बनेल, परंतु विद्यमान व भावी पुरवठा साखळी व्यवस्थापनाच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या आहेत. नागपूरपासून सर्व दिशांना, राष्ट्रीय महामार्ग ६, राष्ट्रीय महामार्ग ७ व राष्ट्रीय महामार्ग ६९ यांमध्ये १०० कि.मी. साठी पद्धतशीरपणे जमीन वापर करण्याचे नियोजन करणे; एकात्मीक रसद पुरवठा (लॉजिस्टिक) केंद्रांसाठी नागपूरच्या सर्व चार बाजूंच्या १,००० एकर प्रक्षेत्राद्वारे (झोनिंग) सीमांकन करणे; लॉजिस्टिकला (रसद पुरवठ्याच्या कामास) उद्योगाचा दर्जा देणे; आणि उद्योगांप्रमाणेच प्रोत्साहन पॅकेज योजनांद्वारे लॉजिस्टिकमध्ये (रसद पुरवठा) आधारभूत गुंतवणूक करणे यांद्वारे रसद पुरवठाकारांना (लॉजिस्टिक) उत्तेजन देता येऊ शकेल. प्रत्येक जिल्ह्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधांसह विमानतळाची उभारणी केल्यामुळे केवळ पर्यटनाच्या चळवळीला नव्हे तर, या प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणारा एक सकारात्मक संलग्नता परिणाम म्हणून व्यवसाय कर्मचारी वर्गालाही उत्तेजन मिळेल व त्यात वाढ होईल.

५.१.१० अधिक गतीमान–प्रमुख प्रस्ताव

वर नमूद केलेल्या क्षेत्रीय उपक्रमशिलता व धोरणात्मक सुधारणा यांशिवाय, आम्ही काही मोठे प्रकल्प योजिलेले असून त्यांची सुरुवात झाल्यावर, दृगोचरपणे सकारात्मक संकेत मिळतील आणि हितसंबंधितांमध्ये मोठा उत्साह तसेच विश्वसनीयता यांचे अंत:क्षेपण होईल आणि त्यामुळे या प्रदेशात मोठ्या प्रमाणात खाजगी क्षेत्राची गुंतवणूक आकर्षित होईल. यामुळे क्रमश: प्रदेशातील मागास व प्रगत (उद्योग) यांच्यामध्ये दुवे साधण्यास उत्तेजन मिळेल आणि आर्थिक कार्यांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होईल. उदाहरणार्थ, वाढणारे अवकाश व संरक्षण क्षेत्रातील वस्तुनिर्मिती आणि प्रगत उद्योग यांचे दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स, प्रकाशशास्त्राशी संबंधित व अन्य वैशिष्ट्यपूर्ण साहित्य यांसारख्या अन्य धोरणात्मक व मोठ्या उद्योगांशी खूपच प्रबळ दुवे साधलेले आहेत.

दुसरा दृश्यमान घटक म्हणजे, अवकाश व संरक्षण क्षेत्रातील वस्तुनिर्मिती यावर होत असलेला नागरी उद्योगांचा आघात हा आहे. या प्रवाहामध्ये (कल) ए आणि डी या खंडामध्ये वापर करण्यासाठी तयार केलेल्या

पद्धतींमध्ये, नागरी वस्तुनिर्मिती करणाऱ्या घटकांवर आधारित असलेल्या वाणिज्यिकदृष्ट्या चौकटीबाहेर (कमर्शियली ऑफ-द-शेल्फ) पद्धतीचा वाढता वापर हा प्रमुख कल (प्रवाह) आहे.

अशाप्रकारे, अधिक गतिमान प्रस्तावांमध्ये महामार्ग, रेल्वे छन्नमार्ग (कॉरिडोर्स), आंतरराष्ट्रीय विमानतळ, विमानचालन व अवकाश केंद्रे (एरोस्पेस हब) यातील इतर बाबीं, यांचा विकास करण्याचा व त्यांच्या उभारणीसाठी उत्तेजन देण्याचा अंतर्भाव होतो. विशेषत:, सूरत ते परादीप महामार्ग, मिहान (MIHAN) चा शीघ्रगतीने विस्तार, आणि नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ अशा तीन प्रकल्पांचा त्यात अंतर्भाव होतो.

या प्रकल्पांसाठी, केंद्र सरकारने मोठे अंशदान देणे गरजेचे असेल. अर्थात राज्याने, आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी केंद्राकडे, चिकाटी धरावी व केंद्राचे मन वळवावे.

प्रदेशातील ५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांसह तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता ही समस्या नसावी. बहुसंख्य व्यवस्थापन संस्था व खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये यांसह या प्रदेशात कार्यरत असणारी राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था विचारात घेता, नागपूर व अमरावती यांचा माहिती तंत्रज्ञान केंद्र (आयटी हब) म्हणून विकास होऊ शकेल.

५.१.११ प्रलंबित असणाऱ्या विकास प्रकल्पांची पूर्णता

शून्याधारित अर्थसंकल्पनाचा निकष स्वीकारून प्रलंबित असणाऱ्या सर्व विकासात्मक प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यात येईल. या मूल्यमापनामुळे, ध्येयानुरूप वर्धनक्षम फलनिष्पत्तीसह रेंगाळलेल्या प्रकल्पांवरील अडथळ्यांची सविस्तर पुनर्तपासणी करणे सुकर होईल. ही लक्ष्ये, फलनिष्पत्ती विनिर्दिष्ट नीलप्रतीच्या चौकटीमधील या प्रकल्पांचे वास्तविक आधार असतील. हे मूल्यमापन, वास्तविक रीतीने प्रदेशाच्या संपूर्ण निधीविषयक गरजादेखील दूर करील.

कृषिविषयक फायद्यांचा संपूर्णपणे उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने, शेतीपंपासाठी वीजेची जोडणी आणि गावांना रस्त्याने जोडणे ह्या अत्यावश्यक आनुषंगिक गरजा आहेत. वीज जोडणी पुरविण्यातील सततच्या प्रचंड विलंबामुळे विद्यमान सिंचन सुविधा वापरास देखील हानी पोहचवते. असे असले तरी, रस्ते तयार करून दुरावस्थेतील रस्त्यांचे योग्य परिरक्षण करून व त्यांची निगा राखून (दुरूस्ती करून) त्याद्वारे ग्रामीण जोडण्यांमध्ये सुधारणा झाली आहे. रस्त्यांचे परिरक्षण करण्याची व दुरूस्तीची (निगा राखण्याची) कामे, सर्वसाधारणपणे, निधीच्या कमतरतेमुळे तीन वर्षांतून एकदा हाती घेण्याऐवजी सहा वर्षांतून एकदा या कालांतराने हाती घेण्यात येतात.

सर्व दृष्टीने मिहान प्रकल्प पूर्ण करणे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रिक्त भूखंडाचे शंभर टक्के वाटप करणे ही विदर्भाच्या द्वितीय क्षेत्राच्या वाढीला गती देण्याबाबत दुसरी महत्त्वपूर्ण उपाययोजना असू शकेल. या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक ही, अवशिष्ट स्वरूपाची व कमी प्रमाणातील आहे.

शिक्षण व आरोग्याची काळजी याच्याशी संबंधित असलेल्या विद्यमान पायाभूत सुविधांचा प्रभावी व कार्यक्षम वापर हा तृतीय आधार देण्याचा दीर्घ पल्ला असेल. ज्यायोगे सार्वजनिक सुविधांकडून खाजगी सुविधांकडे होणाऱ्या स्थलांतरास अटकाव करता येऊ शकेल आणि सर्वसामान्य नागरिकांना देण्यात येणाऱ्या चांगल्या सेवेत वाढ करता येऊ शकेल अशा शासनाच्या दोन महत्त्वपूर्ण शाखांकडून गुणात्मक पोहचणी होण्याची आवश्यकता आहे. खात्रीशीर गुंतवणूक ही, गुणात्मक शासनाने जोपासलेले गुणात्मक प्रशासन आहे.

आम्हाला असा आत्मविश्वास आहे की, या उपाययोजनांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी केली तर, विदर्भ प्रदेशाची, पुढील दोन योजना कालावधीमध्ये शाश्वत तत्त्वावर दरवर्षी किमान १५ % या गतिमान दराने वाढ होईल.

५.२ मराठवाड्याच्या विकासासाठी धोरणे

अन्य प्रदेशांप्रमाणेच, येथील विकास धोरण हे, प्रदेशाची क्षमता व प्रदेशास तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्या यांवर

आधारलेले आहे. तसेच सार्वजनिक गुंतवणूक करून, विकास धोरणाला बळकटी आणता येते व शासन प्रक्रियांमध्ये सुधारणा करून त्याद्वारे समस्या दूर करता येतात. हा प्रदेश मोक्याच्या ठिकाणी असणे, सध्याची गतिमान उत्पादक क्षमता आणि लहान व मध्यम उपक्रम क्लस्टर, वास्तूवारसा पर्यटन, सौर ऊर्जा, प्रादेशिक भाषेत माहिती व तंत्रज्ञानक्षम सेवा, बीपीओ क्षमता ही, या प्रदेशाची प्रमुख शक्तिस्थळे आहेत. दुसऱ्या बाजूस, पाण्यासारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीची कमतरता, (कुशल कर्मचाऱ्यांची वानवा) कौशल्य तफावत, संपर्कव्यवस्थेतील (रेल्वे/रस्ते) तफावत, प्रशासनातील तफावत, विशेषत: विकास खर्चाचा कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी प्रशासकीय क्षमता आणि सामाजिक भांडवलाशी, संबंधित परिणाम या समस्या आहेत. जेणेकरून, मराठवाडा आणि महाराष्ट्राचे इतर भाग यांमधील दरडोई उत्पन्नातील तफावत लक्षणीयरीत्या कमी व्हावी म्हणून मुख्यत्वेकरून नियमन व धोरणात्मक सुधारणा यामार्फत एकापाठोपाठ एक अडचणी दूर करून, सर्वसमावेशक पद्धतीने प्रादेशिक वाढीचा दर वेगाने वाढविण्यासाठी अशाप्रकारे धोरणाद्वारे प्रयत्न केला जातो. पुढील भाग, विकास धोरण व विशिष्ट उपाययोजना याचा तपशील देतात.

५.२.१ सामाजिक-राजकीय उपक्रम

या उपक्रमांनी जनजागृती, कामधंदा, मोठ्या प्रमाणातील स्त्री-पुरूषांबाबतची संवेदनशीलता निर्माण होईल आणि प्रदेशाच्या विकासाचे यथार्थ दर्शनातील बदल अशा उपक्रमांचा निर्देश करतात, जेणेकरून हे उपक्रम विकासाचा वेग वाढविण्याकरिता हितावह होतील. ऐतिहासिक वारशामुळे सांस्कृतिकदृष्ट्या प्रेरित असे सामाजिक-राजकीय उपक्रम, मराठवाड्यातील गतिमान व सर्वंकष विकासासाठी आवश्यक आहेत. असे उपक्रम वाढविले पाहिजेत आणि ते प्रदेशातील जागरूक राजकीय नेतृत्त्वाला वाट दाखवतील.

५.२.२ प्रशासकीय पुनर्रचना करणे

महाराष्ट्रात सहा प्रशासकीय विभाग आहेत. बहुतेक सर्व विभागांमध्ये, प्रत्येकी पाच जिल्ह्यांसाठी एक विभागीय आयुक्त आहे. मात्र, मराठवाड्यात आठ जिल्ह्यांसाठी एकच विभागीय आयुक्त आहे. म्हणून त्या प्रदेशात एकापेक्षा जास्त विभागीय आयुक्ताची मागणी सतत करण्यात येत आहे. यासंबंधी राज्याला पुढाकार घेऊन निर्णय घ्यावाच लागेल.

५.२.३ शिक्षण व कौशल्य विकास वाढविणे

आमच्या शिक्षणावरील प्रकरणामध्ये आम्ही शिक्षणाच्या, प्रशिक्षण कौशल्य विकासाच्या विविध पैलूंचा परामर्श घेतला आहे. तथापि, मराठवाड्यासाठी आवश्यक असणारे विशिष्ट प्रकारचे शैक्षणिक उपक्रम दिल्यानंतर आम्ही या ठिकाणी पुनरूक्ती होत असली तरीही काही गोष्टींचा पुनरूच्चार केला आहे.

१. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांचे साक्षरता प्रमाण हे राज्याच्या सरासरी साक्षरता प्रमाणापेक्षा कमी आहे. सर्व शिक्षा अभियानास अधिक बळकट करण्याकरिता केलेल्या एकत्रित प्रयत्नांमुळे प्रदेशातील परिस्थितीमध्ये सुधारणा होईल.

२. काही इतर प्रदेशांप्रमाणेच, प्रदेशातील इयत्ता चौथी ते इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांना खास शिक्षण देऊन विशेषरीत्या तयार केलेल्या स्पर्धात्मक परीक्षा (महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षासारख्या) देण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. याकरिता शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.

३. माहिती तंत्रज्ञानाच्या पद्धतीचा वापर (प्रादेशिक भाषेमध्ये अभ्यासक्रम विकसित करणे, व्यावहारिक इंग्रजी व विशेषत: इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी मूळ विज्ञानाच्या संकल्पना प्रादेशिक भाषेमध्ये मांडणे) सर्व शाळांसाठी खास करून, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी वाढवला जाईल.

४. इयत्ता आठवी पासून दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना जाणीव निर्माण केली जाईल व राष्ट्रीय व्यावसायिक प्रमाणपत्र

कार्य चौकटीचा वापर करून योग्य व्यावसायिक पाठ्यक्रमांसंबंधात त्याबाबतचे पर्याय स्वीकारण्यास सहाय्य केले जाईल. आमच्या अहवालातील शिक्षणाबाबतच्या प्रकरणामध्ये या वैशिष्ट्यांशी संबंधित सविस्तर शिफारशी आहेत.

५. पदवीपूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये विशेषत: बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांना किरकोळ व्यापार, आतिथ्य, वित्त, बँकिंग, विमा, पर्यटन सेवा, रूग्णालय व्यवस्थापन यांमधील योग्य असे मूल्यवर्धित व्यावसायिक पाठ्यक्रम संबंधात जाणीव करून दिली जाईल आणि ते स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल, ती क्षेत्रे त्यांच्या उपजीविकेच्या संभाव्यतांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रदेशाच्या विशिष्ट गरज असलेल्या क्षेत्रांशी संबंधित आहेत.

६. जर एखादा उद्योग किंवा उद्योग गट/व्यवसाय गट, पुढील पाच वर्षांकरिता दरवर्षी किमान ६० विद्यार्थ्यांना रोजगार देण्यास तयार असेल तर, त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण तंत्रनिकेतने चालविण्यासाठी संपूर्ण स्वायत्तता दिली जाईल.

७. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रदेशामध्ये राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (एनआयटी)/भारतीय तंत्रशास्त्र संस्था (आयआयटी)/भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) यांची स्थापना करणे. यामुळे प्रदेशामध्ये संपूर्ण देशभरातून हुशार विद्यार्थ्यांचा ओघ येणे चालू होईल व तो स्थानिक विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षा व संस्कृती यामध्ये बदल घडवून आणणारा एक घटक म्हणून कार्य करेल.

८. मराठवाड्यातील महिलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे आणि म्हणून महिलांकरिता वसतिगृहे व संबंद्ध मूलभूत तरतुदींसाठी अतिरिक्त वित्तीय तरतुदीची गरज आहे. महिलांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणी सुरक्षितता व सुरक्षा यांसाठी विशेष निधी दिला जाईल व वाहतुकीची व्यवस्था केली जाईल.

५.२.४ प्रादेशिक विकास केंद्रे:

विकास केंद्रे ही खालील केंद्रस्थ क्षेत्र/क्षेत्रे यांसाठी असतील :

- निर्मिती उद्योग (सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम)
- कृषि संस्करण
- पर्यटन
- उच्च व तंत्र शिक्षण
- सौरउर्जा
- माहिती तंत्रज्ञान (आयटी) माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा (आयटीइएस)

५.२.५ विकास केंद्रांची ओळख:

प्रदेशाचा कायापालट करण्याकरिता विकास केंद्रांची आवश्यकता असेल, सुविधांची जमीन, पाणी, वीज, रसद पुरवठा (लॉजीस्टीक) व वखार निर्मिती व संपर्क यंत्रणा यासारख्या आधारात्मक पायाभूत तरतूद आवश्यक असेल. ज्यासाठी शासकीय प्राधिकरणांकडून मोठ्या प्रमाणात साधनांचा पुरवठा होणे आणि जलदगतीने निर्णय घेणे गरजेचे असेल. सामाईक निचरा उपचार संयंत्रणासाठी देखील तरतूद करावयाची गरज आहे.

५.२.६ विकास केंद्रांचे वर्गीकरण:

सुरूवातीची परिस्थिती व वाढीची शक्यता यावर आधारित विकास केंद्रांचे बहुविध वर्गीकरण करता येईल.

१. **'वर्धित विकास केंद्रे'**: जेथे आर्थिक साधने स्थापित झाली आहेत (उद्योग, व्यापार, पर्यटन, शिक्षण) आणि

त्यांच्या वाढीस गती देण्यासाठी आणखी आधाराची गरज आहे अशी ठिकाणे. औरंगाबाद, जालना ही अशा केंद्रांची मुख्य उदाहरणे आहेत.

२. **'संभवनीय' विकास केंद्रे :** नैसर्गिक अनुकुलतेमुळे जेथे निर्मिती, कृषि संस्करण, पर्यटन, सौरऊर्जा, इत्यादीसाठी वाव आहे अशी ठिकाणे. नांदेड, लातूर, उस्मानाबाद ही अशा केंद्रांची मुख्य उदाहरणे आहेत.

३. **'नवीन' विकास केंद्र :** जेथे मोठ्या पायाभूत सुविधेची गुंतवणूक, विशेषत: कृषि संस्करण क्षेत्र व वस्तु निर्मिती करणारे यामध्ये संभाव्य वर्चस्व निर्माण करण्यासाठी आवश्यकता असेल अशी ठिकाणे. हिंगोली, परभणी, व बीड ही अशा केंद्रांची मुख्य उदाहरणे आहेत.

५.२.७ औद्योगिक शहराचा पायाभूत सुविधा विकास :

आव्हाने :

उद्योग त्याचप्रमाणे पर्यटन या दोन्हीमुळे, शहरे, बेसुमार वाढ व वाहतुकीच्या ताणाखाली येत आहेत. दुर्दैवाने, विकसित केलेल्या पायाभूत सेवासुविधा ज्याप्रमाणात शहराची वाढ होत आहे, त्या प्रमाणात विकसित होत नाहीत. आता या गोष्टींचा नेहमीच्या व्यवहारांवर परिणाम होत आहे आणि त्याचा शहराच्या प्रतिमेवर मोठा आघात झाला आहे. विकास वाढीसाठी एक मुख्य अडथळा ठरत आहे.

शिफारस :

शहराच्या दीर्घकालीन वाढीच्या गरजा भागविण्यासाठी इमारत, रस्ते, उड्डाणपूल, पाणीपुरवठा, निस्सारण, वाहतूक डेपो, क्रीडा संकुल, व्यापार केंद्रे, पर्यटनाची आकर्षणे व शहराचे हरितीकरण करणे यासाठी स्वतंत्र असे औरंगाबाद विकास प्राधिकरण स्थापन केले पाहिजे.

५.२.८ माहिती तंत्रज्ञान (आयटी) व माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा (आयटीइएस) याचा विकास:

माहिती तंत्रज्ञान उद्योग क्षेत्र हे जलदगतीने संस्थापित करावयाचा उद्योग आहे व विविध कौशल्य समुच्चयातील अनेक लोकांना रोजगार देणारे क्षेत्र आहे. या क्षेत्राचा प्रादेशिक समतोल राखण्यास मदत होईल.

पुणे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगविषयक मासिकाच्या सर्वेक्षणानुसार असे उघडकीस आले आहे की, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील स्थानिक रोजगारापैकी मराठवाडा व विदर्भ यांचे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदान १२ टक्क्यांपर्यंत आहे. येथे स्पष्टपणे दिसून येते की, दोन्ही प्रदेशांमध्ये माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा यामधील अर्हताकारी मनुष्यबळ जे पुणे येथे स्थलांतरित होत आहे. यावरून या प्रदेशांची संभाव्य क्षमता दिसते.

शिफारशी :

१. ई-शासनासाठी (ई-गव्हर्नन्स) केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर अनेक उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. ज्यात, प्रणाली विकास, प्रणाली सुव्यवस्था, माहिती संग्रहित करणे व कार्यालयाच्या पूर्वीच्या कामाचे आयोजन करणे या कामांची मागणी केली जाते.

२. शासनाने, मराठवाडा प्रदेशातून, प्रकल्पांची व्यवस्था पाहण्यासाठी व प्रकल्प पार पाडण्यासाठी प्रणाली (सॉफ्टवेअर) विकास कंपन्यांना सांगितले पाहिजे. अशा अंमलबजावणीसाठी, मराठवाडा औद्योगिक संघ, प्रदेशामध्ये बहुराष्ट्रीय व मोठ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांचे स्वागत करेल व संपूर्णत: स्थानिक पाठबळ देईल.

३. असे देखील प्रस्तावित करण्यात येते की, अशा कार्यात सहभागी होण्याऱ्या स्थानिक माहिती तंत्रज्ञान घटकांना एकतर, प्रत्यक्षपणे किंवा मोठ्या कंपन्यांमार्फत प्राधान्य दिले पाहिजे. यामुळे प्रदेशामध्ये रोजगाराची व उद्योजकता याची जोपासना करता येईल.

४. त्याचप्रमाणे, एटी केअर्नी-नॅसकॉम (राष्ट्रीय प्रणाली व सेवा कंपनी संघ) यांनी आपल्या सर्वेक्षणामध्ये औरंगाबादला, २५ माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा यांमध्ये साधक अशा अंतिम स्थानी पात्र असल्याचे निर्धारित केले आहे. म्हणून, पथदर्शी उदाहरण म्हणून आणि शहरातील माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा यांच्या विकासाची जोपासना करण्यासाठी चिखलठाणे औद्योगिक वसाहत, हे प्रदूषण विरहित माहिती तंत्रज्ञान व सेवा क्षेत्र म्हणून विचारात घेतली पाहिजे आणि आता ती निवासी क्षेत्राने वाढलेली आहे आणि या प्रदेशामध्ये काही श्रेष्ठ माहिती तंत्रज्ञान आणण्यात विशेष प्रयत्न केले जातील.

५.२.९ अति लहान उद्योगांची स्थापना :

नागरी/ग्रामीण भागासाठी स्थानिक उपक्रमशीलतेला संधी देण्यासाठी व आर्थिक साधने विकसित करण्यासाठी ग्रामीण क्षेत्रातील व लहान शहरांमधील सूक्ष्म उद्योग वाढविणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

कमी जागेची गरज, कमीत कमी स्तराची गुंतवणूक आणि ५ ते २० लोकाच्या रोजगारासह मालकाचा स्वयंरोजगार हा अति लहान उद्योगाच्या संकल्पनेचा मूलभूत 'व्यवसाय प्रतिमान' आहे.

केव्हीआय व औद्योगिक कार्ये यामध्ये कमी कौशल्य स्तर याचा समावेश होतो. परंतु, मानवी प्रयत्नांचा मोठा स्तर अति लहान उद्योगासाठी विचारात घेतला जाईल.

चांगली बाजारपेठ, चांगल्या मूलभूत सोयीसुविधा, प्रारंभिक गुंतवणूक आधार आणि कमी व्याजदराने खेळते भांडवल देणे हे अति लहान उद्योग यशस्वी करण्यास मुख्य कारण होईल.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, 'अति लहान उद्योगाबरोबरच क्रेते (खरीददार)' यांना प्रोत्साहन देण्यासाठी तरतूद केली जाईल. तसेच बँकर्सचा सहभाग, व्यवसाय वर्धनक्षम बनविण्यासाठी व अशा उद्योगांच्या चांगल्या आर्थिक नियंत्रणासाठी, अशा व्यवसायाच्या प्रतिमानामध्ये वाढ केली जाईल.

प्रस्तावित अति लहान उद्योग प्रतिमान पुढीलप्रमाणे आहेत :

१. प्रमुख औद्योगिक वसाहतीपासून चांगला रस्ता किंवा रेल्वे मार्ग असणारे १०,००० लोकसंख्येचे शहर आणि जे १५० कि.मी. पर्यंतच्या कक्षेत आहे, ते अति लहान उद्योग प्रतिमान स्थापन करण्यासाठी सर्वाधिक हितावह आहे.

२. अति लहान औद्योगिक वसाहतीमध्ये ५०,००० चौरस फुटांचे औद्योगिक बांधकाम करता येईल आणि अदमासे ५० उपक्रमचालक यांना वाटप केले जाईल. या ५० घटकांची एकूण गुंतवणूक जवळपास रुपये २५ कोटी इतकी असेल. त्यातून ५०० लोकांसाठी रोजगार निर्मिती होईल आणि दरवर्षी सुमारे रुपये १०० कोटींच्या व्यवसायाची उलाढाल होईल.

३. १०,००० लोकसंख्येच्या एखाद्या शहरातील ५०० लोकांच्या रोजगाराने, २५ टक्के निवासी लोकांची काळजी घेतली जाईल आणि हे केवळ अदमासे २ ते ३ एकर क्षेत्राची वाटणी करून व रुपये २५ कोटी एवढ्या व्यावसायिक आधाराने सहज शक्य होईल.

४. आज, भूसंपादन एक मोठे आव्हान आहे. लहान क्षेत्राच्या गरजेमुळे, या संकल्पनेने भूसंपादन करण्याची आव्हाने कमी होण्यास मदत होईल आणि शहर स्तरावर उद्योगाला नेण्यात येईल.

५. हे प्रतिमान यशस्वी करण्यासाठी, प्रमुख बाब म्हणजे ५ वर्षांच्या कालावधीसाठी खरेदीदार त्याचबरोबर विक्रेते या दोघांनाही प्रोत्साहन देणे होय.

५.२.१० कृषि संस्करण उद्योगासाठी उपक्रमशीलतेचा विकास:

कृषि संस्करण केंद्रांसाठी मराठवाड्यात बरीचशी उपलभ्यता आहे. व्यापार व्यासपीठ/केंद्र (हब) निर्माण करताना, अशा केंद्रांचा आणखी विस्तार व एकत्रीकरण सुकर करणे ही पूर्वावश्यकता असेल. हे प्रस्तावित महाराष्ट्र कृषि-उद्योग महामंडळासाठी अनिवार्य असेल (कृषि प्रकरणातील आमचा अहवाल पहा.) ह्या केंद्रांमध्ये, मराठवाड्याची महत्त्वाची उत्पादने जसे कापूस, सोयाबीन, संत्री, दाळ इत्यादीचा समावेश असणे अपेक्षित आहे.

महामंडळाला (महाराष्ट्र कृषि उद्योग महामंडळ) शीतगृह व आवेष्टन,हवाई-मालवाहतूक सुविधा यासाठी आणि उत्पादन पुरवठा साखळी स्थापन करणे यासाठी पायाभूत सोयीसुविधांच्या आवश्यकतांची देखील काळजी घेणे गरजेचे असेल.

- मराठवाडा हा फार मोठा कापूस उत्पादन करणारा भाग आहे आणि तेथे सूत गिरण्यापण बऱ्याच आहेत. 'वस्त्रनिर्माण पार्क' स्थापन करून त्याद्वारे हा व्यवसाय मूल्यवाढीच्या वरच्या स्तरावर न्यायला हवा. आवेष्टन (पॅकींग) करणाऱ्या यंत्रांची निर्मिती करणाऱ्या चाळीस निर्माणकर्त्यांनी दक्षिण जर्मनीमध्ये 'शेवाबीज हॉल जिल्ह्यात' 'पॅकेजींग व्हॅली' स्थापन केली आहे. त्याच धर्तीवर, मराठवाड्यात 'वस्त्रनिर्माण पार्क व्हॅली' स्थापन केली जाईल. प्रदेशामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांची वस्त्रनिर्माण पार्क स्थापन करण्यासाठी आकर्षित करण्याचे प्रयत्न केले जावेत.

५.२.११ पर्यटन विकास:

मराठवाड्याला सांस्कृतिक/तिर्थयात्रा पर्यटनाकरिता इष्ट स्थळ म्हणून नैसर्गिक/ऐतिहासिक फायदा मिळाला आहे. या उद्योगाने दिलेल्या संभाव्य रोजगारामुळे याला अधिक प्राधान्य द्यायला हवे. यासाठी, तेथे पद्धतशीर, केंद्रीत योजना आणि पायाभूत सोयीसुविधांची अंमलबजावणी व या भागातील पर्यटक आणि भेट देणारे (अभ्यागत) यांच्यासाठी सुखसोयी, आरामदायी, आकर्षक अशा सुविधा देण्यासाठी आधारभूत सुविधांचा विकास करण्याची गरज आहे. महाराष्ट्र शासनाने, औरंगाबादला महाराष्ट्राची पर्यटन राजधानी म्हणून अगोदरच घोषित केले आहे. ही सत्यता सिद्धिस नेण्यासाठी, खालील विशेष प्रयत्न उपयुक्त ठरतील.

१. सर्व पर्यटन स्थळे चौ-पदरी रस्त्याने जोडणे.

२. मुंबई व हैद्राबाद ही अधिक वारंवारतेच्या अतिजलद रेल्वेने जोडणे.

३. औरंगाबाद येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. औरंगाबाद विमानतळावर आंतरराष्ट्रीय उड्डाणासाठीची आवश्यक सुविधा व व्यवस्था याच्या मागणीसहित आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या प्रारंभासाठी रीतसर तरतूद करणे.

४. बेंगळूरुला थेट रेल्वेने जोडणे.

५. हैद्राबाद, बेंगळूरु, अहमदाबाद व जयपूर ही हवाई मार्गाने जोडणे

६. पर्यटक स्थळांची दुरूस्ती, देखभाल व सुशोभीकरण यांसाठी विशेष निधीचे वाटप करणे.

७. औरंगबाद येथे औद्योगिक-नि-पर्यटन प्रदर्शनाचे आयोजन करणे.

८. बिबिका मकबरा, देवगिरी किल्ला, वेरूळ व अजिंठा लेणी यांसारख्या ठिकाणी लेझर, ध्वनी, चित्रपट देखावे निर्माण करणे

९. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी, आधार देण्यासाठी, त्यांच्यात सुरक्षितता व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी पोलिसांसह विशेष कार्य पथक निर्माण करणे आणि त्यामुळे पर्यटन व्यवसायात गुंतलेल्या विविध सेवा देणाऱ्यांपासून पर्यटकांची पिळवणूक किंवा छळवणूक यास प्रतिबंध होईल.

१०. स्वतंत्र अशा 'मराठवाडा पर्यटन विकास महामंडळाची' निर्मिती करणे.

५.२.१२ सौरऊर्जा विकास:

सौर ऊर्जेचा अधिक कार्यक्षमपणे वापर करण्यास अलीकडील तंत्रज्ञानामुळे मिळालेली मोठी चालना व पर्यावरणपूरक ऊर्जा धोरणाची वाढती गरज यामुळे मराठवाड्याला, त्याच्या नैसर्गिक तुलनात्मक फायद्याचा यांत्रिक लाभ घेण्याची धोरणात्मक सुसंधी मिळाली आहे. दिलेल्या वस्तुस्थितीनुसार, मराठवाड्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या भागाकरिता, जीवाश्म इंधनावर आधारित वीज निर्मितीसाठी तुलनात्मकदृष्ट्या पाण्याची अतिशय कमी प्रमाणात वापर करण्याची आवश्यकता आहे. सौर ऊर्जेचा पर्याय असा संभाव्य बदल घडवेल. या पर्यायाचा पुरवठा खर्च हा भारतातील इतर राज्यांच्या अनुभवावरून स्पष्ट होत असल्याप्रमाणे आता आर्थिकदृष्ट्या यशस्वी ठरण्याची शक्यता आहे.

अशा उपक्रमांसाठी मराठवाड्याची वगळता येण्याजोगी विशेष क्षेत्रे म्हणून, उस्मानाबाद, परभणी व बीड ही असतील. प्राथमिक अंदाजानुसार, संभाव्यक्षमता फार मोठी आहे आणि ती केवळ एका जिल्ह्यासाठी १०,००० मॅगावॅट पेक्षा अधिक असू शकते. हे साध्य करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या नवीन सौरऊर्जा धोरणाच्या अधिनियमितीच्या परिभाषेत सक्रिय बदल आवश्यक असतील. हे इतरांबरोबर राजस्थान व तामिळनाडू यांनी पाठपुरावा केलेल्या धोरणाप्रमाणेच असू शकेल. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धर्तीवर शासन ऊर्जा पार्क सुरू करेल, जे पायाभूत निवीष्ट, दूरभाष, पारेषण सुविधा इत्यादीसारख्या सर्वसाधारण सुविधा पुरविल. यात खाजगी क्षेत्र खूपच महत्त्वाची भूमिका बजावेल व शासकीय अभिकरणे, खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यास कार्यप्रवण होतील.

हे नवीन उपक्रम, रत्नागिरी-उस्मानाबाद महामार्ग, नागपूर-आंबेजोगाई रेल्वे प्रकल्प व जिल्ह्याच्या ठिकाणची मोठी विमानतळे अशा महत्त्वकांक्षी प्रकल्पांबरोबरच, १६टक्के व त्यापेक्षा जास्त स्तरापर्यंत मराठवाड्याच्या दीर्घ मुदतीच्या वृध्दीदरात वाढ होईल.

मोठे रस्ते जोडणी प्रकल्पाबरोबरच शेवटच्या तीन घटकांचा प्रदेशाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून समावेश होईल. पूर्वोक्त उपायांबरोबरच, मराठवाड्याचा जवळपास १६ टक्के एवढ्या स्तरांपर्यंत दीर्घ मुदतीचा वृध्दीदर हा वाढविणे शक्य होईल, त्यामुळे प्रमाणशीर आधारावर प्रादेशिक उत्पन्नातील तफावतीमध्ये घट होईल.

५.३ उर्वरित महाराष्ट्राच्या विकासासाठी धोरण :

प्रदेश म्हणून उर्वरित महाराष्ट्राची लोकसंख्येच्या ५७ टक्के व क्षेत्राच्या बाबतीत ४७ टक्के एवढी आहे. तो त्याच्यातील वेगळेपणाचा एक मोठा भाग आहे. त्यात तीन सागरी जिल्हे, सहा डोंगराळ प्रदेश असणारे जिल्हे, चार अग्रगण्यतेने आदिवासी जिल्हे व कायमस्वरूपी अवर्षणप्रवण असे अतिशय मोठ्या संख्येतील तालुके आहेत. त्याचवेळी, महाराष्ट्राच्या मोठ्या आर्थिक अधिष्ठानामध्ये त्याची गणना होते. सुस्पष्टपणे उर्वरित महाराष्ट्रामधील या परिक्षेत्रांपैकी प्रत्येक परिक्षेत्राची कुवत व दौर्बल्य याचा अंदाज घेणे आवश्यक आहे.

५.३.१ उर्वरित महाराष्ट्रची ताकद :

ह्या प्रदेशाची ताकत फार मोठी आहे. उर्वरित महाराष्ट्र हा नैसर्गिक व मानव साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणात विविधता असलेला एक संकोष आहे. त्याला तीन सागरी जिल्हे, सहा डोंगराळ प्रदेश असणारे जिल्हे, चार अग्रगण्यतेने आदिवासी जिल्हे व कायमस्वरूपी अवर्षणप्रवण असे अतिशय मोठी संख्या असलेले तालुके आहेत. प्राप्त झालेल्या कृषि हवामान वैचित्र्यतेमुळे, या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पीक-पद्धतीत विविधता आहे. अनेक जिल्हे व तालुके त्यांच्या 'पीक विशेषता' याबाबत नावलौकीक आहेत. उदाहरणार्थ, द्राक्षांसाठी नाशिक व सांगली, काद्यांसाठी लासलगाव, डाळिंबासाठी सांगोला, चीप्स बनविण्याच्या बटाट्यासाठी आंबेगाव व तसेच इतर.

५.३.१.१ शीघ्रतेने वाढ होणारी औद्योगिक केंद्रे

ठाणे, पुणे, रांजणगाव, सिन्नर व नाशिक ही पाच मोठी औद्योगिक वाढीची केंद्रे आहेत. वर नमूद

केलेल्या औद्योगिक वाढ होणाऱ्या केंद्रांमध्ये मोठ्या संख्येत शैक्षणिक संस्था आहेत. त्या संस्था तांत्रिक व उदारमतवादी असे नानाविध प्रकारचे शिक्षण देतात.या केंद्रापैकी काही केंद्रे संपूर्ण देशात शैक्षणिक केंद्रे (हब) म्हणून उदयास आली आहेत. अशा संस्थात्मक पायाभूत सोयीमुळे, उद्योगासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ अधिक सहजतेने मिळते. या केंद्रांपैकी बहुतेक केंद्रे मुंबई पासून २०० किमी एवढया अंतरावरील परिसरात आहेत. उद्योगांकडून सामग्री जवळ असणे उत्पादित वस्तूंसाठी बाजारपेठा जवळ असणे आणि योग्य कुशल कामगारांची उपलब्धता या बाबींना नेहमीच पसंती दिली जाते. उर्वरित महाराष्ट्रातील औद्योगिक केंद्रांमध्ये असे सर्व घटक आहेत. म्हणून या केंद्रामध्ये शीघ्रगतीने झालेली औद्योगिक वाढ ही, काही आश्चर्यकारक बाब ठरत नाही.

उर्वरित महाराष्ट्र हा एक प्रदेश असा आहे की, ज्याला सामाजिक व राजकीय सुधारात्मक चळवळीची दीर्घ परंपरा आहे. अनेक राष्ट्रीय नेते परंपरागत सामाजिक संरचना नव्याने निर्माण करण्यात व तिचे आधुनिकीकरण करण्यात क्रियाशील होते. त्यांच्या शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये व सांस्कृतिक संस्था यांमध्ये त्यांनी अनेक चळवळी उभारल्यात. या चळवळींचा, त्यातील विचारवंत व सक्रीय सामाजिक नेते यांचा सामाजिक प्रभाव उर्वरित महाराष्ट्रातील नागरी सामाजिक व सांस्कृतिक जीवनात स्पष्टपणे दिसून येतो. या प्रदेशांमधील शहरे ही, सापेक्षतेने अधिक सामाजिक व प्रगत वातावरणाचा प्रभाव असणारी आहेत आणि शैक्षणिक संस्थांची भरभराट ही काही शहरांमधील स्थानांतरणात महत्त्व पूर्ण रितीने सहाय्यकारी ठरली आहे. दोन दशकांच्या दरम्यान या प्रदेशातील शहरीकरणाचा वेग वाढलेला आहे. संपूर्ण देशाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेणे व आकर्षित करून घेणे यामुळे शक्य झाले आहे. म्हणून अनेक कौशल्य-अभिमुख उद्योग विशेषत: सेवा क्षेत्रातील उपक्रम हे, या प्रदेशात त्यांची केंद्रे विकसित करण्यास अधिक पसंती देत आहेत.

५.३.१.२ ऊस संस्करण सहकारी संस्था

सन १९५२ या वर्षापासून, सहकारी कारखान्यांच्या चळवळीचा अधिक शक्तीशाली आर्थिक व सामाजिक प्रभाव पडला आहे. त्याद्वारे आधुनिक तंत्रशास्त्र, व्यवस्थापन व जागतिक बाजारपेठ प्रकाशात आणून या प्रदेशातील राजकीय नेतृत्त्वास आकार दिला आहे व त्याचा विकास केला आहे. सहकारी रचनेअन्वये चालविला जाणारा हा एक सर्वात मोठा कृषि संस्करण उद्योग आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर हे जिल्हे, नाशिक, धुळे व जळगांव या जिल्हयांचा काही भाग हा, दख्खन पठाराचा ऊस उत्पादक पट्टा म्हणून ओळखला जातो. सहकारी साखर कारखान्यांच्या पाठिंब्याने केला जाणारा साखर उद्योगाचा हा विकास या जिल्हयांचे वर्चस्व दर्शविणारे व उल्लेखनीय वैशिष्टय ठरले आहे. विरोधाभासात्मक स्थिती अशी आहेकी, कोल्हापूर व्यतिरिक्त, या साखर उत्पादक जिल्हयांपैकी बहुतेक जिल्हे हे, सहयाद्री पर्वतरांगांच्या प्रदेशातील पर्जन्य छायांकित प्रदेशाचा भाग आहेत. राज्य शासनाने निर्माण केलेल्या मोठया संख्येतील पाटबंधारे प्रकल्प व सिंचन क्षमता याबाबतीत या जिल्हयांवर लक्ष केंद्रित केले आहे. या जिल्हयांमधील राजकीय नेतृत्वाचे अनेक निर्णायक आर्थिक धोरणे तयार करण्याच्या व तयार न करण्याच्या मुद्यावर उघडपणे वर्चस्व आहे.

५.३.१.३ दूध प्रक्रिया

सन १९७० पासून, महाराष्ट्राने दूध देणाऱ्या जनावरांच्या पैदाशीत विविधता आणण्याच्या कार्यक्रमास प्रारंभ केला आहे. भारतीय कृषि उद्योग संस्था या अशासकीय संस्थेने या प्रदेशात कृत्रिम रेतन केंद्रे व मोठया संख्येतील संकरित गायी पुरविण्याच्या कामास मोठ्या प्रमाणात चालना दिली आहे. तेव्हापासून उर्वरित महाराष्ट्रातील दूध उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. सुरूवातीच्या टप्प्यात, शासकीय दुग्धशाळांना दूध उत्पादनात संधी देण्यास आणि त्याचा विस्तार करण्यास आणि आवश्यक तो पाठिंबा देण्यास अधिक महत्त्व दिले जात होते. सध्या, पिशवीबंद पाश्चरीकृत दूधापासून ते चीझचे प्रकार,

मिठाई व आईस्क्रीम या सारख्या मोठया श्रेणीतील दुग्ध उत्पादनांच्या निर्मितीत खाजगी कंपन्या व सहकारी आस्थापना यांच्यात एक संमिश्र चढाओढ आहे. आता या प्रदेशात दूध प्रक्रियेच्या अत्यंत आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.

५.३.१.४ फलोत्पादन

उर्वरित महाराष्ट्राच्या फलोत्पादक शेतकऱ्यांनी त्यांची व्यापारविषयक अभिमुखता आणि तंत्रविषयक शिक्षण आत्मसात करणे याबाबतची क्षमता सिध्द केली आहे. द्राक्ष बागायतदार संघ, डाळिंब उत्पादक संघ यांसारख्या उत्पादक संघटनांनी योग्य तंत्रज्ञान, कृषिविषयक अभ्यास यावर संशोधन करण्यात प्रशंसनीय भूमिका बजावली आहे आणि सदस्य उत्पादकांमध्ये त्याचा साधनांसह प्रसार करण्यात आला आहे. कोणत्याही अन्य संस्थेपेक्षा या संघटनेद्वारे देण्यात येणाऱ्या विस्तार सेवांचे स्वरूप व दर्जा अधिक कार्यक्षम व सातत्यपूर्ण आहे. शेतकऱ्यांची शेती करण्यात व प्रयोग करण्यात येणाऱ्या समस्यांपर्यंत पोहचण्याची त्यांची प्रचालनात्मक भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. ही बागायती पिके त्यांनी यशस्वीपणे तयार केली आहेत, उपयोगात आणली आहेत आणि त्यांची निर्यात संभाव्य क्षमता एकत्रित केली आहे. महाराष्ट्र राज्य हे आता द्राक्ष व डाळिंबे यांचे मोठे व प्रमुख निर्यातदार आहे. उल्लेखनीय म्हणजे हे शतकरी व ह्या शेतकरी संघटना, इतर प्रदेशांतील मराठवाडा, लातूर, उस्मानाबाद येथील अनेक शेतकऱ्यांसाठी स्फूर्तीदायी ठरल्या आहेत. संस्थात्मक नवकल्पनांचा विस्तार करण्याची व तंत्रज्ञान आत्मसात करण्याची क्षमता विकसित करण्याची गरज आहे.

५.३.२ दोषपूर्व परिस्थिती

त्याचवेळी, या प्रगत औद्योगिक प्रदेशांच्या सभोवताली अत्यंत कमी उत्पन्न असलेली मागास गावे आहेत. तसेच, ठाणे जिल्हयामध्ये देखील हा विरोधाभास अधिक ठळकपणे दिसून येतो. या एकाच जिल्हयामध्ये, समुद्र किनाऱ्याच्या बाजूने अल्प उत्पन्न असणारे असे गरीब मच्छीमार आणि अत्यंत वंचित असा मागास आदिवासी समाज यांनी वेढलेले अशा त्याच जिल्ह्यातील प्रगत औद्योगिक वसाहती बरोबरचे सहजीवन आम्ही पाहिले आहे. लगतच्या रायगड जिल्हयाची देखील हळूहळू अशीच स्थिती होत असल्याचे दिसत आहे.

५.३.२.१ शीघ्र शहरीकरणाची समस्या

औद्योगिक वाढीच्या विस्ताराचा परिणाम म्हणून या प्रदेशाचे अधिक शीघ्रतेने शहरीकरण झाले आहे. शीघ्र शहरीकरणामध्ये त्या शहराचा साधनसंपत्तीवर त्याचा स्वत:चा अपेक्षित भार असतो. विशेषत: या प्रदेशातील पिण्याचे पाणी व औद्योगिक पाणी यांच्या वापराचा प्रश्न स्फोटक स्वरूप धारण करण्याची शक्यता आहे. पुणे व पिंपरी चिंचवड यांसारखी काही केंद्रे वगळता, शहरी पिण्याच्या पाण्याच्या आवश्यकतेचे नियोजन फारच निकृष्ट आहे. अनेक शहरांमध्ये मलप्रवाह व सांडपाणी यांवरील पुनर्वापर करण्याची योजना नाही. पाण्याच्या बाबतीतील पर्यावरणीय प्रदूषण हे धोक्याचा इशारा देण्याच्या प्रमाणात वाढतच आहे. शीघ्र शहरीकरणाच्या परिणामी, घरांच्या बांधकामात तेजी येते. दीर्घ मुदतीतील जमीन वापर धोरणाच्या अभावी वसाहतींच्या अव्यवहारीक नियोजन आणि विनियमाशी संबंधित जमीन बाजारपेठेतील साचेबद्धपणा यामुळे या प्रदेशातील नागरी क्षेत्रांमध्ये अनेक प्रकारच्या सामाजिक-आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. या प्रदेशात भू-माफियांचा उदय, अनधिकृत बांधकामे, रातोरात पळून जाणारे संस्थाचालक व अनधिकृत भोगवटादार यांच्या संख्येत वाढ होत आहे.

५.३.२.२. ऊस संस्करण उद्योगाच्या संबंधातील समस्या

उसाच्या पिकाला प्राधान्य देण्यात आल्यामुळे परिणामी, जलसंपत्तीच्या वापरामुळे आत्यंतिक आंतरपिकांचा असमतोल निर्माण झाला आहे. ऊस संस्करणाच्या संबंधातील सापेक्ष किंमत व उत्पन्नातील

स्थिरता याचा परिणाम म्हणून, शेतकऱ्यांनी अखंडपणे ऊसाचे पिक घेणे अधिक पसंत केले आहे. आता दुसऱ्या बाजूला, मोठया संख्येतील तालुके पूर्णपणे पावसाच्या लहरीवर अवलंबून आहेत. ते दुष्काळ किंवा दुष्काळ सदृश्य परिस्थिती अशा कायम भितीखाली वावरत असतात. दुसऱ्या बाजूला, सहकार क्षेत्रामधील मोठया संख्येतील साखर कारखाने आर्थिकदृष्टया सक्षम नाहीत. या कारखान्यांपैकी अनेक कारखान्यांमध्ये गैरव्यवस्थापन आहे; त्यांना राजकीय आश्रय असल्याने ते अजून सुरक्षित आहे. राजकीय दबावाखाली लायसेन्स देण्यात आली होती आणि प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये अतिशयोक्ती पूर्ण संभाव्यक्षमता दर्शविण्यात आली होती. गेल्या काही दशकांमध्ये अगदी कमी संख्येतील साखर कारखान्यांचा एकतर लिलाव करण्यात आला किंवा त्यांच्या व्यवस्थापनाकडून स्पर्धात्मक बोलीअन्वये मर्यादित कालावधीसाठी कारखाने खाजगी चालकांकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. या प्रक्रियेत, पुढील मूल्याधारित साखळीतून लाभ मिळविण्याबाबत शेतकऱ्यांकडून पालन करण्यात येणाऱ्या सहकाराच्या अत्यावश्यक तत्त्वाचे नुकसान झाले आहे. उलटपक्षी, शेतकरी व व्यवस्थापन यांच्यामधील आपापले आर्थिक हितसंबंध प्रस्थापित करण्यातील हा एक झगडा आहे.

५.३.२.३ अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम तालुक्यांच्या समस्या

या विकास वृद्धीच्या प्रक्रियेच्या परिणामी, (औद्योगिकीकरण, शहरीकरण व उसाच्या पिकातील अवाजवी वाढ) जलसाधनसंपत्तीची काटकसर आणि तिचे व्यवस्थापन हा उर्वरित महाराष्ट्रातील एक अत्यंत ज्वलंत प्रश्न झाला आहे. अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम सुरु असणारे प्रदेश पाण्याच्या अस्तित्वापासून वंचित आहेत आणि अति पाणी लागणाऱ्या पीक पध्दतीचे उत्पादन यामुळे उर्वरित महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल अत्यंत वाईट स्थितीत पोहचला आहे. यालाच प्रोत्साहनात्मक आधारित धोरण हस्तक्षेप असे म्हणतात. याद्वारे प्रत्यक्ष सूक्ष्मस्तरीय तर्कसंगततेतून उदभवणारा हा बृहत प्रश्न दूर करता येईल.

शेतकरी व धोरण-कर्तांमध्ये या समस्येबद्दलच्या जागरूकतेत वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. या प्रदेशात जलसंपदा अपुरी आहे. या प्रदेशाच्या दुष्काळाचा एक दीर्घकालीन दु:खद इतिहास आहे व अवर्षणासारखी स्थिती पुन्हा पुन्हा येते. म्हणून, अविरत वाढीच्या कार्यतंत्राद्वारे, पाणी बचतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर व त्यांना प्रोत्साहक ठरेल अशी धोरणात्मक उपाययोजना याबाबत संयुक्तपणे खात्री करून द्यावी लागेल. ठिबक सिंचन, फवारणी सिंचन यांसारखे विविध सूक्ष्म सिंचन, तंत्रज्ञान वाढत्या प्रमाणात लोकप्रिय होत आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील शेतकरी हे, वाढत्या प्रमाणात अधिक जागरूक होत आहेत आणि हे सिंचन तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी इच्छुक आहेत. अशा सिंचन यंत्रणांच्या निर्मात्यांच्या व पुरवठादारांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे आणि साधनसामग्रीच्या, ती बसविण्याच्या व तिची देखभाल करण्याच्या किंमती स्पर्धात्मकतेमुळे कमी झालेल्या आहेत. त्यासाठी कृषि विभागाने ठिबक सिंचनाकरिता अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु केली आहे. काटकसर विषयक जागरूकता व कामाचा खर्च यातील बदलामुळे, हे तंत्रज्ञान स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्या प्रदेशात शेतकरी द्राक्षे, मोसंबी व डाळिंबे यांसारख्या बागायती पिकांद्वारे विविधता आणत आहे ही अधिक सहजपणे लक्षात घेण्यासारखी येणारी घटना आहे, अर्थसहाय्यात घट करणे आणि जे प्रकल्प प्रमाणित करण्यायोग्य /कर्ज योग्य आहेत त्यासाठी विश्वसनीय व सुलभ पतपुरवठयाची तरतूद करण्यासाठी एक मूर्त स्वरूपाचा उपाय करावा लागेल.

५.३.२.४ कोकण व डोंगराळ प्रदेश

डोंगराळ प्रदेशांचे प्रदेश वर्णन व या प्रदेशांमधील सर्वत्र दिसून येणारी कृषि-हवामानविषयक स्थिती याचे खास विचारपूर्वक भाष्य केले आहे. रस्ते, पाटबंधारे व पाणी साठवण, रूग्णालये व शाळा यांसारख्या पायाभूत प्रकल्पांचे संकल्पन करताना व नियोजन करताना जी अन्य प्रदेशांमध्ये योग्य वाटतील अशी प्रमाणके या प्रदेशांकरिता उपयुक्त व योग्य न ठरण्याचा संभव आहे. म्हणून, रस्ते, बंदरे जोडणी, सिंचन व पिण्याच्या पाण्याची साठवण यांसारख्या सार्वजनिक चांगल्या तरतुदींचे नियोजनाचे काम योग्य व समुचित

फेरबदल केलेल्या प्रमाणकांनुसार हाती घेण्यात यावे. या क्षेत्रांमध्ये बहुसंख्य आदिवासी लोक राहत आहेत. त्यांच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने भौतिक अडचणी अत्यंत वाईट स्थितीत आहेत. म्हणून, या प्रदेशांकरिता वेगळ्या शिफारशी करण्यात आल्या आहेत.

५.३.३ सातत्यपूर्ण व त्वरित उत्पादन वाढीकरिता उपाययोजना व धोरणात्मक पर्याय

सूक्ष्म सिंचन: राज्य शासनाने, उसाच्या लागवडीमध्ये पाण्याची काटकसर करण्यासाठी, सहकारी साखर कारखान्यांना सहभागी करून घ्यायला पाहिजे आणि सूक्ष्म सिंचन विषयक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी एक मुख्य प्रवाहक म्हणून त्यांचा वापर करून घ्यायला पाहिजे; हे सहकारी कारखाने उसाचे प्राथमिक वापर करते आहेत आणि त्यांना सदस्यांकडून उत्पादित करण्यात आलेल्या ऊसावर संस्करण करण्याचे संविदात्मक स्वातंत्र्य आहे. कारखान्यांच्या उभारणीकरिता आवश्यक असलेल्या भांडवलाच्या मोठया प्रमाणातील हिश्श्यासाठी राज्य शासनाने अंशदान दिले आहे आणि राज्याने कर्ज भांडवलासाठी हमी दिली आहे. त्या व्यतिरिक्त पाण्याची कायमस्वरूपी सापेक्ष टंचाई विचारात घेता, शासनाने योग्य त्या काटकसरीच्या उपकरणांमार्फत पाण्याचा वापर विनियमित करावा. एक धोरण म्हणून, साखर कारखान्यांनी त्यांच्या सदस्यांना सूक्ष्मसिंचन तंत्रज्ञान स्वीकारण्यास पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे त्याचबरोबर त्यासाठी त्यांचे मन वळवावे.

पुढील पाच वर्षात, सहकारी साखर कारखान्यांना संलग्न असलेल्या उसाखालील संपूर्ण क्षेत्रातील ऊस लागवडीसाठी सूक्ष्म सिंचन प्रणालीचा स्वीकार करण्याची आवश्यकता असेल. क्षेत्राला दिलेले ठरीव प्रमाण, शेतकऱ्यांची संख्या, संचमांडणी व ती कार्यरत करण्याचा खर्च या बाबींची शेतकऱ्यांमधील निवडक गटाच्या आधारे सहजपणे व्यवस्था करता येईल. म्हणून, आर्थिक सहाय्य योजनेचा आधार असलेल्या सध्याच्या एकेका शेतकऱ्याला अर्थसहाय्य योजनेतून टप्प्याटप्प्याने कमी करता येऊ शकेल. एक समयावच्छेदेकरून, शेतकरी गटांना पाणी उपयोगात आणणे, कापणी करणे व संवर्धन करणे यांकरिता नगदी सहायता देण्यात येईल. राज्याने, गोडबोले समिती व जलआयोग (१९९९) यांचेकडून सूचित करण्यात आल्याप्रमाणे नदीच्या खोऱ्यातील उसाच्या पिकाखाली असलेल्या क्षेत्रावर मर्यादासुध्दा घालावी. असे धोरणात्मक उपाय योजल्यामुळे पिकांसाठी वापरण्यात आलेल्या पाण्याचे माफक प्रमाणात पुनर्भरण होईल. त्याचा परिणाम म्हणून, सध्या वाया जात असलेल्या पाण्याची मोठया प्रमाणात बचत होईल आणि त्याच तालुक्यांच्या पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या प्रदेशांमध्ये पाण्याचे पुन:वाटप करता येऊ शकेल. जल साधनसंपत्तीवरील आमच्या प्रकरणामध्ये आम्ही प्रादेशिक समानीकरणातील एक अनिवार्य प्रमाणक म्हणून संरक्षित सिंचनाचे समर्थन केले आहे. धोरणातील अशा बदलाच्या परिणामी संरक्षित सिंचनाकरिता अतिरिक्त प्रमाणातील जल साधनसंपत्तीची आवश्यकता असेल.

५.३.३.१ गट शेती करणासाठी आधारभूत पध्दती

अनेक वर्षांपासून, शेतीचे कार्यात्मक भूधारणाचे सरासरी प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे कार्यात्मक भूधारणेच्या आकारात घट झाल्याने पिक विविधतेचे प्रमाण अत्यल्प झाले आहे आणि लहान आकाराची परिव्ययवर्धक प्रतिकूलता निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांना बंधनकारक निर्बंधाची जाणीव झालेली आहे आणि शेती करता येण्याइतपत इष्टतम वाढीव शेतीच्या आकारापर्यंत पोहचण्यासाठी त्यांनी एकत्रितपणे त्यांची साधनसंपत्ती संचित करण्याचा उपाय शोधून काढला आहे. आमच्या असे निदर्शनास आले आहे की, गट शेती त्याचबरोबर गटाने पिकांची खरेदी विक्री, या बाबी निरनिराळया गावांमध्ये झपाटयाने लोकप्रिय होत आहेत. अशा स्वयंप्रेरित प्रयत्नांना व संघटनात्मक नवप्रवर्तनास राज्य शासनाद्वारे आणि कृषि विभागाद्वारे योग्य तो पाठिंबा देण्याची गरज आहे. विशेषत: त्यांच्या व्यापारविषयक कार्यासाठी पतपुरवठयाचे स्वरूप व प्रमाण हे, व्याजदराने अर्थसहाय्य देण्यास पात्र आहे.

५.३.३.२ कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमात आवश्यक फेरबदल :

कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमातील बदल हा धोरणविषयक सुधारणा याचा एक मोठा

भाग असून त्यामुळे सामान्यत: महाराष्ट्राला व विशेषत: उर्वरित महाराष्ट्राला मोठया प्रमाणात दिलासा मिळणार आहे. गट शेतीच्या उदयामुळे, शेतकऱ्यांना थेट खरेदी-विक्री करणे सहजसाध्य होणार आहे व त्यांच्यासाठी आकर्षक ठरणार आहे. त्याचप्रमाणे, शेतकऱ्यांच्या गटांना वायदा/भविष्यातील बाजारांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक निर्णायक प्रमाण प्रमात्रा गाठणे शक्य होईल. राज्य शासन शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची खरेदी विक्री संघटितपणे करणे शक्य व्हावे म्हणून, आपल्या वखारींपैकी काही वखारींच्या भागाचा वापर करू देऊ शकेल. तसेच, शेतकऱ्यांना पत आधारावर वखार देण्याच्या योजनेची अंमलबजावणी अधिक अर्थपूर्णरीत्या होऊ शकते.

५.३.३.३. कृषि प्रक्रियात्मक युनिट

उर्वरित महाराष्ट्रात अनेक फलोत्पादन पिकांचे उत्पादन व खरेदी-विक्री होत असल्याने कृषि प्रक्रियात्मक उद्योगांच्या विकासासाठी पुरेसा आधार प्राप्त होतो. सामान्यत: प्रक्रियात्मक उद्योगासाठी अन्न प्रक्रियेकरिता अधिक योग्य आहेत अशा विविध जाती निवडणे आवश्यक आहे. प्रक्रिया करण्यासाठी योग्य असलेल्या प्रत्येक पिकाच्या जातींची माहिती करून देणे व त्या जातींचे स्थिरीकरण हे वाढीसाठी महत्त्वाचे स्रोत ठरेल. सुरुवातीच्या टप्प्यात काही विशिष्ट तंत्रज्ञान आयात करावयाची व ते आत्मसात करावयाची गरज आहे. विशेषत: सडून किंवा कुजून जाणार नाही अशा रीतीने आवेष्टित करणे, हाताळणे, संस्करण करणे व साठवण क्षमता उभारणे या बाबी परवडण्यायोग्य प्रमाणात निर्माण करण्याची गरज आहे. असे उपक्रम कोकण प्रदेशासाठी व अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत प्रदेशांतील फलोत्पादन उत्पादकांसाठी जास्त करून महत्वाचे आहेत. या दोन्ही प्रदेशांसाठी फलोत्पादनात विविधता आणणे ही बाब मोठी दिलासा देणारी व आशादायक ठरणारी आहे. या दोन्ही प्रदेशांमध्ये (अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम आणि कोकण) प्रक्रिया करण्यासाठी अशा नवीन जातींची अग्रक्रमाने कसून तपासणी करण्यात यावी व माहिती करून देण्यात यावी. खानदेशात, खास उल्लेखाने जळगावात कडधान्य उत्पादनात व कडधान्य प्रक्रियेत परिणामकारक प्रगती नोंदवली आहे. तसेच, नवापूर, धुळे या प्रदेशात कुक्कुटपालन उद्योगात बऱ्यापैकी वाढ नोंदवली गेली आहे.

५.३.३.४ लहान रवंथ करणारे प्राणी

अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत प्रदेशांमध्ये फलोत्पादनातील विविधतेबरोबर गवत व वैरण पिकांमधील वाढ हा विविधतेसाठी एक चांगला मार्ग ठरेल. या प्रदेशांमध्ये धनगर जमातीची पिढीजात वस्ती असून ते लहान रवंथ करणारे पशुधन जवळ बाळगतात. शेळी आणि मेंढी या दोन जाती असून त्यांच्यावर हा प्रदेश मोठया प्रमाणात अवलंबून आहे. या व्यवसायासाठी नवीन जातींची माहिती करून देणे आणि आवश्यक ती पशुवैद्यकीय सेवा विकसित करणे गरजेचे आहे.

५.३.३.५ औद्योगिक वाढ

उर्वरित महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील वाढीसाठी औद्योगिक वाढ हा प्रमुख भाग आहे. या प्रदेशाने आपली विकासाची गती राखण्यासाठी भारतातील अन्य अनेक राज्यांशी प्रभावीपणे स्पर्धा केली पाहिजे. धोरणामध्ये औद्योगिक विकासात तातडीने उदभवणाऱ्या काही गरजांचा उल्लेख करावा लागेल. व्यवसाय करण्याच्या खर्चात घट करणे ही बाब, धोरणविषयक सुधारणेच्या केंद्रस्थानी ठेवण्यात यावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामकाजात सुधारणा व जास्त लवचिकता उद्देशित कामगार यांस अग्रक्रम देण्यात यावा. या दोन सुधारणा विजेची उपलब्धता व विजेचा खर्च याच्याशी निगडीत आहेत. सध्या, उद्योगाला विजेचा जादा आकार भरावा लागत आहे. विजेची किंमत आकारण्याची ही भेददर्शी अंतर्गत अर्थसहाय्य आधारित पध्दत बंद करण्यात यावी. याखेरीज, मूल्याधारित कराच्या परिगणनेतून

वजावट देण्यासाठी पात्र असल्याप्रमाणे विजेवरील शुल्कास मुभा देण्यात यावी.

भविष्यात, लहान व मध्यम उपक्रमांची औद्योगिक वाढ हा एक महत्त्वाचा भाग असेल. या भागाची वाढ ही, औद्योगिक संभाव्य क्षमतेच्या समतोल प्रसारास अधिक पूरक ठरेल. उर्वरित महाराष्ट्रात औद्योगिक वाढीसाठी आवश्यक ठरणारी उपक्रमशीलतेतील विशेष बुध्दिमत्ता व मनुष्यबळाचे भांडवल विपुल प्रमाणात आहे. या उपक्रमशीलतेच्या संभाव्य क्षमतेचे परिपोषण करण्यासाठी व त्यास पाठिंबा देण्यासाठी राज्यशासनाने लहान व मध्यम उपक्रमांसाठी पत-हमी महामंडळ स्थापन करावे.

भावी औद्योगिक वाढ विचारात घेता, विशिष्ट प्रकल्प तातडीने हाती घेऊन त्या आधारे वेगवेगळे प्रदेश परस्परांना जोडले जाण्यासाठी, सुधारणा करण्यात यावी. या कामामुळे औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या वाढीस मोठी गती मिळेल. मुंबई-बेंगलुरु कॅरिडॉर, मुंबई-दिल्ली कॅरिडॉर व पूर्व महाराष्ट्राला जोडणारी पूर्व-पश्चिम सागरी बंदर केंद्र यांचा विकास हे प्रमुख प्रकल्प असून त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रातील औद्योगिक व सेवा क्षेत्रास महत्त्वपूर्ण चालना मिळवून देता देईल. मुख्य व लहान बंदरांचा विकास व वाढीव जहाजीमाल तसेच किनाऱ्याच्या बाजूने प्रवासी मार्गाची व्यवस्था केल्यामुळे कोकण पर्यटनास व वाणिज्यिक संभाव्य क्षमतेस उत्तेजन मिळेल. भविष्यात वाढ होणे अपेक्षित असताना, राज्य धोरणामध्ये प्रत्येक जिल्हयात विमानतळ व प्रत्येक जिल्हा हवाई मार्गाने ऐकमेकांना जोडणे हे उद्दिष्ट असले पाहिजे व तशी योजना असली पाहिजे.

पूर्वी युक्तिवाद केल्याप्रमाणे उर्वरित महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागांमध्ये जे स्पर्धात्मक फायदे आहेत, त्यात फरक आहे कोकणात सुंदर नैसर्गिक सृष्टीसौंदर्य आहे परंतु त्याच बरोबरीने हा प्रदेश दुर्गम व पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील आहे. या प्रदेशास भंगूर क्षेत्र असे संबोधण्यात आले आहे. राज्य शासनाने या प्रदेशात शिक्षण व प्रशिक्षण यांसारख्या कमी प्रदूषण करणाऱ्या सेवांसाठी प्रोत्साहन व पाठिंबा दिला पाहिजे. मानवी कौशल्य निर्माण करणारा एक स्रोत म्हणून कोकणाशी पूर्व-पश्चिम बाजूने संपर्कव्यवस्था वाढविल्यास, सांगली, इचलकरंजी व सातारा यांसारख्या नव्याने उदयास येणाऱ्या औद्योगिक शहरांचे आणखी अभिवर्धन होण्यास उत्तेजन मिळेल. येणाऱ्या दशकात, ज्ञानाधारित अर्थव्यवस्था ही, वाढीबाबतचे वर्चस्वी स्रोत ठरणार आहे. शासनाने विविध मार्गांनी ज्ञान यंत्रणेतील वाढ सुकर करावी. उच्च शिक्षण व व्यावसायिक शिक्षण आणि धंदेविषयक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये शीघ्रतेने वाढ होणे गरजेचे आहे. खाजगी तसेच राज्य विद्यापीठांमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या नेटवर्कचा महत्वपूर्ण असा विस्तार करण्यात यावा. खाजगी विद्यापीठांच्या स्थापनेबाबतचा मसुदा विधेयक अपेक्षित असताना, राज्य शासनाने एक शैक्षणिक उद्योग झोन म्हणून कोकणाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करावे.

महाराष्ट्र हे, अगोदरच एक मोठया प्रमाणात नागरीकरण झालेले राज्य आहे. नागरी क्षेत्रात राहणाऱ्या लोकंसख्येच्या प्रमाणात पुरेशा जलदगतीने वाढ होत आहे आणि नागरी क्षेत्रातील नागरिकांच्या सुविधा व सेवा यांत लक्षणीय वाढ व सुधारणा करावी लागेल. म्हणून, अनेक धोरणविषयक सुधारणांमध्ये आर्थिक स्वयंनिर्वाहिता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे आणि त्यासाठी नागरी स्थानिक संस्था शासन सुरु करावयाची गरज आहे. विशेषत: नागरी स्थानिक शासन संस्थेचा आधारस्तंभ ठरलेली मालमत्ता कराची चालू पध्दत, यात सुधारणा करण्यात यावी व ती अधिक कार्यक्षम करण्यात यावी. जमीन खरेदी विक्रीची झपाटयाने वाढणारी समस्या आणि येत्या दशकात गृहनिर्माण क्षेत्रावर त्याचा होणारा परिणाम यावर लक्ष देणे आवश्यक आहे.

राज्य शासनाने, त्यांच्या पर्यावरण संरक्षण कायद्यांत सुधारणा केली पाहिजे व त्या कायद्यांची कार्यक्षम अंमलबजावणी केली पाहिजे. पर्यावरणविषयक खर्चाच्या योग्य स्वाभाविकतेस प्रेरणा मिळावी व त्याची अंमलबजावणी व्हावी अशा रीतीने धोरणे आखण्यात यावीत.

उर्वरित महाराष्ट्राने शेतकऱ्यांच्या गट शेती व गट पणन कार्यक्रमांचा उदय झालेला यापूर्वीच पाहिला आहे. अशा निकोप वाढीस उत्तेजन देण्याची गरज आहे. कार्यात्मक जमीन-धारणेचा आशावाद अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने विद्यमान कुळवहिवाटीचे कायदे सुधारणा करावयासाठी पात्र ओहत. मालकी हक्काची हानी न होता जमीन भाडेपटटयाने देण्यात आणि भाडेपटटा काढून घेण्यात अधिक पारदर्शकता आणता येणे सुकर होईल असा योग्य फेरबदल करण्यात यावा.

५.३.४. कोकण आणि डोंगराळ क्षेत्रांसाठी विशेष उपाययोजना :

उर्वरित महाराष्ट्रातील कोकण क्षेत्राचा सागरी किनारा-नि-डोंगराळ प्रदेश असे वैशिष्टय आहे. या भूप्रदेशातील भूशास्त्रीय गुणधर्म हे, सहयाद्रीच्या रांगाच्या पूर्वेकडील प्रदेशांपेक्षा विभिन्न आहेत. कोकणाचा बराचसा भाग जांभा खडकांनी व मातीने बनलेला आहे. कोकण प्रदेशात अतिवृष्टी होते. तथापि, या प्रदेशाचे एक विशिष्ट भूशास्त्रीय स्वरूप असल्यामुळे, पावसाचे पाणी सहजतेने साठविता येऊ शकत नाही. पावसामुळे मिळालेले बहुतांश पाणी सहयाद्री पर्वताच्या उतारावरून अरबी समुद्राच्या दिशेने नैसर्गिकरीतीने वाहून जाते. म्हणून, आम्ही विपुल प्रमाणात पाऊस पडत असला तरी, तीव्र पाणीटंचाई अशी एक विरोधाभासात्मक परिस्थिती अनुभवली. असेही निदर्शनास आणून देता येईल की, नाशिक जिल्हयातील काही डोंगराळ प्रदेशांनादेखील अशाच प्रकारची समस्या भेडसावत आहे. तेथे विपुल प्रमाणात पाऊस पडतो. मात्र साठवण केलेल्या पाण्याची तीव्र टंचाई असते. डोंगराळ भूप्रदेश व नैसर्गिकपणे उगवण्याचा गुणधर्म असलेला वनस्पती समूह यांमुळे कोकणची पारिस्थितीकी व पर्यावरणीय वैशिष्टये लक्षणीयरीत्या वेगळी आहेत. या प्रदेशाच्या सागरी क्षेत्रात अनेक सुंदर समुद्रकिनारे आहेत व तेथील बरेचसे प्रदेश संपूर्ण वर्षभर वृक्ष वनस्पतींनी बहरलेले असतात. तथापि, डोंगराळ भूप्रदेशामुळे गावे व शहरे फारच दूर दूर वसलेली आहेत. वस्त्यांचा सरासरी आकार लहान आहे व वस्त्यांमधील ***(पाडे किंवा वाडया)*** अंतर सरासरीपेक्षा अधिकच आहे व त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची पुष्कळदा दुर्दशा असते. अतिवृष्टीमुळे वारंवार रस्त्यांची देखभाल करावी लागते व ती अधिक खर्चिक आहे. अशी परिस्थिती असल्यामुळे शालेय, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व आरोग्य सेवा यांसारख्या सार्वजनिकरीत्या पुरविण्यात येणाऱ्या सेवा देणे अडचणीच्या व अपुऱ्या ठरत आहेत. अन्य डोंगराळ नसलेल्या प्रदेशांसाठी ठरविण्यात आलेले सरासरी प्रमाण अयोग्य असल्याचे सिध्द झाले आहे. म्हणून, या प्रदेशासाठी (आणि इतरत्र असलेल्या अशाच प्रकारच्या प्रदेशांसाठी) वेगळे प्रमाण ठरवणे इष्ट व आवश्यक असेल. असे नमूद करावसे वाटते की, दोन्ही म्हणजे अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत प्रदेशात त्याचबरोबर कोकण प्रदेशात वेगवेगळया प्रकाराने पाणी टंचाई दिसून येते. परंतु, ती दूर करण्याची जी गरज आहे ती त्या अनुषंगाने सारखीच कठीण आहे.

५.३.४.१ रोधी बंधारे

तसेच, या प्रदेशातील जागेची निवड, संकल्पचित्र, सिंचन किंवा जलविद्युत वीज प्रकल्पांचा आकार ह्या बाबी उल्लेखनीयरीत्या भिन्न आहेत. या प्रदेशात अशा अनेक जागा आहेत की जेथे जल सिंचनासाठी व लहान आकारातील जलविद्युत निर्मिती प्रकल्पासाठी एकत्रित पाणी साठवून ओळीने लहान रोधी बंधारे असणे सहज शक्य होईल तेथे अशी अनेक ठिकाणे ही आहेत की, जेथे ऋतुमानानुसार वारंवार पुराला तोंड द्यावे लागते. या नियतकालिक आपत्तीवरील उपाययोजना म्हणून त्याचबरोबर हिवाळी व उन्हाळी फलोत्पादन पिकांसाठी व पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी योग्य पाणी साठवण निर्माण करण्याकरिता लहान धरणांची ओळीने प्रतवार उभारणी देखील उपयोगी ठरेल. जलसंपदा विभागाने नियोजन, प्रकल्प निर्धारणाची मानके याबाबतचा त्यांचा दृष्टिकोन बदलला पाहिजे जो या प्रदेशासाठी अधिक योग्य ठरेल.

५.३.४.२ बंदराच्या पायाभूत सोयीसुविधा बळकट करणे

कोकण प्रदेशास लाभलेल्या लांबलचक किनाऱ्यावर अनेक लहान व मध्यम बंदरे आहेत. बहुतांश

ठिकाणी, बंदरे आकाराने मोठी करण्यात येत आहेत व अनेक नवीन बंदरे उभारली जाणे अपेक्षित आहे. या बंदरांपैकी काही बंदरे, नवीन भावी विद्युत निर्मिती प्रकल्पांशी जोडली आहेत. या बंदरांचे कार्य यशस्वीरीत्या चालण्यासाठी ही बंदरे पूर्व-पश्चिम रस्त्याने जोडून बळकट करण्याची गरज आहे. कोकणातील सध्याची पूर्व-पश्चिम रस्ते जोडणी फारच वाईट स्थितीत व अपुरी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने कोकणाच्या रस्त्यांना अति महत्त्वाचा अग्रक्रम देऊन चार पदरी पूर्व-पश्चिम रस्ते जोडणीच्या विकासाचा विचार करावा. मत्स्त्यव्यवसाय व फलोत्पादन उत्पादने यांसाठी अशी रस्ते जोडणी ही महाराष्ट्राच्या पूर्व भागात व कर्नाटकात व्यापारीदृष्टया पोहचण्यासाठी उत्तम व किफायशीर ठरणारी घोषणा असेल. त्याचप्रमाणे, मुंबई-गोवा महामार्गाची शक्य तितक्या लवकर सहापदरी महामार्गात दर्जावाढ करण्यात यावी.

५.३.४.३ कोकणचे तुलनात्मक फायदे

कोकणास मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन व पर्यटन या क्षेत्रांमध्ये निरंतर तुलनात्मक फायदे आहेत. कोकणाला लांबवर खोल किनारा व त्या बरोबरीने सुंदर समुद्र किनारे लाभले आहेत. सध्या, बहुतेक मत्स्य उत्पादनही मुंबई बाजारपेठेत जात आहे. मत्स्य उत्पादनासाठी गरजेची असलेली साठवण व जतन क्षमता अतिशय अल्प आहे व त्याच्या परिणामी, मासळी पकडल्यानंतर ती मोठया प्रमाणात खराब होते. अनेक फलोत्पादन उत्पादनांबाबत देखील, कापणीनंतरचे तंत्रज्ञान व सुविधा यांमधील अशाच प्रकारच्या उणिवांना सामोरे जावे लागते. राज्य शासनाने या क्षेत्रांमधील गट उत्पादन, समूह विपणन कार्यक्रम यांकरिता प्रोत्साहन दिले पाहिजे आणि कापणीनंतरची प्रक्रिया केंद्रे निर्माण करण्यात व ती चालविण्यात उत्पादक संघटनांना सहाय्य केले पाहिजे. उत्पादक संघटना अशा कापणीनंतरची सुविधा केंद्रे स्थापन करण्यासाठी व ती चालविण्यासाठी योग्य समूहांचा विकास करू शकतील. कोकणातून कापणी केलेल्या अनेक वन उत्पादनांबाबत देखील अशाच प्रकारचा दृष्टिकोन ठेवून प्रयत्न करण्यात यावा. कोकणात खाजगी मालकीची मोठया संख्येने वनक्षेत्रे आहेत. या खाजगी मालकांना इमारती लाकडासह वन उत्पादनाची आळीपाळीने लागवड, वन संरक्षण व वन कापणी विकसित करण्यास योग्य रीतीने प्रोत्साहित करण्यात यावे. झाडे कापण्यावरील व तोडण्यावरील कोणताही फरक न केलेली सरसकट बंदी उत्पादनविरोधी व अयशस्वी असल्याचे सिध्द झाले आहे.

५.३.४.४ सागरी विनियमन क्षेत्र

वर नमूद केलेल्या प्रारंभीच्या पायाभूत सोयीसुविधा, कोकणातील पर्यटन क्षमतेत वाढ करण्यासाठी तेवढयाच उपयोगी पडणाऱ्या आहेत. कोकण प्रदेश हा, जलदगतीने विकसित होणारे पर्यटन स्थळ म्हणून यापूर्वीच उदयास आले आहे. तथापि, पर्यटनासाठी आवश्यक असलेली पायाभूत सोयीसुविधा व्याप्ती व गुणवत्ता अस्तित्वात नाही. कोकणाची संभाव्य पर्यटनक्षमता वाढविण्यासाठी व ती बळकट करण्यासाठी चांगल्याप्रकारे रस्ते जोडणी, रेल्वे मार्ग जोडणी, सागरमार्ग जोडणी अनिवार्य असेल. त्याचबरोबर, पर्यटनाच्या विकासासाठी निवासगृहे, उपहारगृहे व हॉटेल यांत वाढ होण्याची देखील आवश्यकता आहे.अशा सुविधा समुद्रकिनारी उपलब्ध करून दिल्यास कोकण पर्यटनाचे जबरदस्त आकर्षण वैशिष्टय ठरेल. तथापि, न्यायालयीन आदेशाद्वारे (सागरी विनियमन निर्बंध क्षेत्र म्हणून सर्वज्ञात आहे) लादण्यात आलेल्या बंदीमुळे अनेक आकर्षक पर्यटन ठिकाणी, खात्रीशीर अवश्य प्रमाणातील हॉटेल सुविधा पुरविण्याची संधी दुरावली आहे. राज्य शासनाने धोरणांमध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात ज्यामुळे या ठिकाणी शीघ्रतेने अधिक प्रमाणात हॉटेल बांधून हॉटेल सेवा पुरविणे सुलभ होईल. ही गोष्ट, संबंधित पर्यावरणीय संवेदनशीलतेसाठी अत्यावश्यक तर्कशास्त्र वापरले आहे त्यास उपद्रव न करता, विशिष्ट क्षेत्रामध्ये योग्य व सयुक्तिक धोरणे स्वीकारून केली गेली पाहिजे.

पर्यटनाच्या विकासासाठी, पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या सेवा पुरविण्याकरिता योग्य

मनुष्यबळाची देखील आवश्यकता आहे. राज्य शासनाने पर्यटन विकासाशी संबध्द असे अनेक कौशल्याधारित कार्यक्रम सुरु करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना उत्तेजन दिले पाहिजे व सहाय्य केले पाहिजे महाराष्ट्र शासनाने /महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाने कोकणचा पर्यटनविषयक ठसा उमटवण्यासाठी मोहीम राबवली पाहिजे. त्यांनी पुरेशा संख्येने हॉटेल उभी करण्यासाठी व पश्चिम सागरी किनाऱ्यावरून आनंददायी प्रवासासाठी सागरी परिवहन सुरु करण्याकरिता खाजगी क्षेत्रांना आमंत्रित केले पाहिजे.

सह्याद्रीचे विस्तृत क्षेत्र (पश्मिच घाट) उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये मोडते. हे क्षेत्र पर्यावरणीयदृष्टया संवेदनक्षम व नाजूक आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस बाध न आणता या क्षेत्राचे पर्यावरण व परिस्थितिकी समतोल याचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. अलिकडेच कस्तुरीरंगन समितीने पश्चिम घाटाच्या संरक्षणाबाबतच्या समस्यांचा वेध घेतला आहे. समितीने कस्तुरीरंगन समितीच्या अहवालातील शिफारशींना पुष्टी दिली आहे.

५.३.४.५ सागरी महामार्ग

सागरी महामार्ग, म्हणजेच, राष्ट्रीय महामार्ग १७ ला समांतर असलेला राज्य महामार्ग क्र.४ हा राज्याच्या सागरी प्रदेशातून जातो. तो ठाणे जिल्ह्यातील झाई येथून सुरु होतो आणि रायगड, रत्नागिरी जिल्हे पार करून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी येथे समाप्त होतो. सागरी महामार्गालगत दिघी, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, जैतापूर, विजयदूर्ग, देवगड व रेडी ही राज्य बंदरे आहेत. या सागरी महामार्गाची लांबी ७८७ किमी इतकी आहे.

या महामार्गावर ५१ मोठे व लहान पूल आहेत. यांपैकी अनेक पुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून काहींचे काम चालू आहे. (तपशिलासाठी संलग्नता यावरील प्रकरण १३ पहा) हा सागरी मार्ग लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

जर वर केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली तर, आम्हाला विश्वास आहे की, संपूर्ण प्रदेश शाश्वततेच्या आधारावर जरी तो मोठा असला तरी, दरवर्षी अदमासे १४% नियमित वृध्दी होण्यासाठी सक्षम ठरू शकेल आणि प्रदेशांतर्गत प्रश्न सोडविण्यासाठी कार्यक्षम बनू शकेल.

५.३.५ खानदेशाचे अभिवृध्दी धोरण

धुळे व नंदूरबार जिल्ह्यांनी पीक पध्दतींमध्ये महत्वाचे बदल अनुभवले आहेत. नंदूरबार जिल्ह्याने कापसाखालील क्षेत्रात आणि कापसाच्या दर हेक्टरी उत्पन्नात मोठी वाढ नोंदवली आहे. हे जिल्हे गुजराथ व मध्यप्रदेश सीमेवर आहेत आणि सध्या व्यापारी, परभणी व हिंगोली सारख्या सीमेवर असलेल्या वस्त्रनिर्माण उद्योगासाठी या क्षेत्रांकडून कापूस प्राप्त करतात. नंदूरबार वस्त्रनिर्माण उत्पादनांचा एक प्रमुख उत्पादक म्हणून संभाव्य क्षमतेने विकसित होईल. वस्त्रनिर्माण पार्कचा विकास केल्यास आणि नंदूरबार व धुळे रस्त्यांनी तसेच रेल्वेमार्गांनी जोडून संपर्कव्यवस्था वाढविल्यास या अतिमागास जिल्हयांमध्ये औद्योगिकीकरण व व्यापाराची संभाव्यक्षमता एकवटली जाईल व तिला स्थैर्य प्राप्त होईल.

जळगांव, धुळे व नंदूरबार जिल्हयांत कोरडवाहू शेतीचे मोठे क्षेत्र आहे. जलसंधारणास उत्तेजन देणे आणि उत्पादकता वाढविणारी सूक्ष्म सिंचन तंत्रे या जिल्ह्यांसाठी अग्रक्रमाने असावीत. धुळे जिल्हयाचा शिरपूर पॅटर्न आधीच पाटबंधारे विकासाचे नावारूपाला आलेले मॉडेल बनले आहे आणि हा पॅटर्न अधिक व्यापकपणे उपयोगात आणण्याची गरज आहे. भूजलाच्या पुर्नभरणासहित जलसंधारणाची उपायात्मक धोरणास या जिल्हयांमध्ये व्यापकपणे चालना देण्यात यावी. धुळे व नंदूरबारमध्ये मोठया प्रमाणात आदिवासी लोकसंख्या आहे आणि आम्ही या विशेष वेगळया प्रदेशाबाबतची चर्चा स्वतंत्र प्रकरणात केली आहे. नाशिक विभागाच्या इतर तालुक्यांप्रमाणे या जिल्हयांतील बहुतांश तालुके दुर्गम भूप्रदेशाचे आहेत आणि त्याकरिता रस्त्याचे व जलसंपत्ती विकास प्रकल्पांचे नियोजन विभिन्न समुचित मानकांवर आधारित असावे. जळगांव हा केळी व डाळी उत्पादक सुप्रस्थापित जिल्हा आहे. तेथील रेल्वेमार्गाची व

रस्तेजोडणीतील सुधारणा यामुळे या प्रदेशाच्या निर्यात व देशांतर्गत व्यापाराच्या संभाव्यक्षमतेत आणखी वाढ होईल. मनमाड-इंदोर रेल्वेमार्ग जोडणीबाबत दीर्घ काळापासूनची मागणी होत आहे त्यामुळे मालेगाव, जळगाव व नंदूरबार प्रदेशांना महत्त्वपूर्ण लाभ होतील.

५.४ विदर्भ व मराठवाडा यांसाठी अभिवृध्दीजन्य वर्णन

आम्ही आमच्या प्रकरण ४ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मागे पडलेल्या प्रदेशांच्या आर्थिक अभिवृध्दीच्या गतीचे प्रादेशिक असमतोल सुधारण्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे योगदान राहील. प्रकरण ३ मधील आमच्या विश्लेषणात विभिन्न प्रदेशांतील अभिवृध्दी प्रक्रियेच्या स्वरूपाचे वर्णन अगोदरच करण्यात आले आहे. सध्या चालू किंमतीमध्ये प्रादेशिक देशांतर्गत उत्पादनाचा संयुक्त वार्षिक अभिवृध्दी दर १३.७२ टक्के (उर्वरित महाराष्ट्र), १४.६० टक्के (मराठवाडा) आणि १३.२३ टक्के (विदर्भ) एवढा आहे. समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्याबाबत आम्ही असे प्रस्तावित केले आहे की, प्रदेशांमधील दरडोई उत्पन्नातील फरकाच्या अनुषंगाने मोजलेली विषमता पुढील १२ ते १५ वर्षांत एक तृतीयांश एवढी कमी करण्यात यावी. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी, विदर्भ आणि मराठवाडा यांचा अभिवृध्दी दर लक्षणीयरीत्या वाढणे गरजेचे आहे. याचा अर्थ, उर्वरित महाराष्ट्र त्याचा अभिवृध्दी दर, सुमारे १४ टक्के इतका राखत असताना मराठवाडयास त्याचा अभिवृध्दी दर १६.५ टक्के इतका उंचावण्याची म्हणजे सध्याच्या १४.६ टक्के (चालू किंमतीस) दराहून जवळपास १७५ किंवा २०० मूळ गुणांनी अभिवृध्दी दरात वाढ करण्याची गरज असेल. तसेच विदर्भाचा अभिवृध्दी दर १४.५ टक्के म्हणजे सध्याच्या अभिवृध्दी दरापेक्षा १२५ मूळ गुणांनी अधिक वाढविण्याची गरज असेल. मागील काही वर्षातील कालावधीत हे दर खरोखरच साध्य करण्यात आले होते. यावरून लक्ष्यित अभिवृध्दीदर शाश्वततेच्या आधारावर साध्य करण्याजोगा असल्याचे दिसून येते मात्र त्यासाठी आमच्या अहवालाच्या निरनिराळया प्रकरणांमध्ये आणि शासन सुधारणाविषयक शिफारशी करण्यात आल्या आहेत.

५.५ समारोपीय अभिप्राय

महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांत अनेक नवीन उद्योग असून तेथे रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत आणि याचा अंतर्भाव उद्योग या प्रकरणात करण्यात आला आहे. या प्रकरणात, वर आम्ही काय केले आहे तर चिकित्सक पध्दतीने अडचणी निश्चित केल्या आणि त्या कमी करण्यासाठी व दूर करण्यासाठी उपायात्मक धोरणे सुचवली आहेत. आणखी, आम्ही वृध्दीस गती देण्याचे साधन म्हणून प्रदेश विनिर्दिष्ट मनुष्यबळ व स्पर्धाक्षेत्र निश्चित केली आहेत. आम्ही क्षेत्रे तसेच प्रेरक ठरणारे प्रकल्प निश्चित केले आहेत. आम्ही योग्य संस्थागत फेरबदलांशिवाय धोरणात्मक उपाययोजना सुधारणा सुध्दा सुचविल्या आहेत. या सर्व मिळून परस्परसंबंधित कार्यक्रम तयार झाला आहे. त्यांचा अर्थ व आशयानुसार प्रबळ विकेंद्रीकरणासहित कार्यक्षम अंमलबजावणी केली तर मागे पडलेल्या प्रदेशांना त्यांचा अभिवृध्दी वाढविण्याबाबत आणि उर्वरित महाराष्ट्रास उदयोन्मूख प्रदेशांतर्गत प्रश्न सोडवताना जरी त्याचा चालू पाया भक्कम असला तरी त्याची अभिवृध्दीदर स्थिर ठेवण्याबाबत मदत होईल.

समितीचे असे मत आहे की, समतोल प्रादेशिक विकास साध्य करणे म्हणजे प्रामुख्याने, प्रदेशांच्या दरडोई उत्पन्नातील तफावतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे आर्थिक विषमतेमध्ये वाढती घट होते. विषमतेमधील घट ही दोन अत्यावश्यक मार्गांनी शक्य आहे: सार्वजनिक वस्तुमधील प्रवेशाचे समानीकरण आणि प्रदेशातील आर्थिक विकासात त्यांच्या संबंधित गतीशील तुलनात्मक लाभाशी सुसंगत असलेली वेगवान वाढ. आधीच प्रकरण ३ (प्रादेशिक विकास : अलीकडच्या काळातील प्रवाह व स्वरूप) मध्ये विचार व्यक्त केल्यानुसार मागील दशकात सर्व प्रदेशांनी विकासाचा अनुभव घेतला आहे आणि भविष्यात तो तसाच चालू राहील. समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्यासाठी, मागे राहिलेल्या प्रदेशांनी अधिक शीघ्रगतीने विकास करावा. असे सांगावसे वाटते की, मागे राहिलेल्या प्रदेशातील अधिक जलद विकास सापेक्षतेने प्रगत प्रदेशातील अभिवृध्दी प्रक्रिया रोखून धरील किंवा मंद करील असे निश्चितपणे म्हणता येत नाही. उलटपक्षी या प्रदेशांमधील सुधारित पायाभूत सोयीसुविधांची संलग्नता आणि त्यांच्या बाजारपेठांचे आणखी निकटतम एकात्मीकरण यातून प्रदेशांमधील परिपूरक सकारात्मक माहिती वृध्दीचे परिणाम आजमावता येतील.

❖❖❖

प्रकरण ६

सुशासन: महत्तम प्रादेशिक सक्षमीकरण व उत्तरदायित्त्वे

"दारिद्र्य निर्मूलनासाठी आणि विकासास चालना देण्यासाठी सुशासन हाच कदाचित एकमेव सर्वात महत्त्वाचा घटक आहे."
कोफी अन्नान[१]

६.० प्रस्तावना

कोणत्याही क्षेत्राच्या विकासाची खात्री करण्यासाठी सुशासन हा एक अतिशय महत्वपूर्ण घटक आहे. आधीच निर्माण झालेला विकासातील असमतोल सुधारण्यासाठी सुरुवातीला विशिष्ट उपाययोजना हाती घेता येतील; परंतु शेवटी धोरण तसेच त्याची अंमलबजावणी या दोन्ही स्तरांवर सुशासनाची सुनिश्चिती करणे आवश्यक आहे, जेणेकरून यातून सुरुवातीलाच असमतोल निर्माण होणार नाही.

महाराष्ट्रातील सर्व तीन प्रदेशांना समितीने ज्या भेटी दिल्यात त्यातून असे जाणवले की, विदर्भ प्रदेशात स्वतंत्र होण्याचा विचार अधिक स्पष्ट होता. तथापि, मराठवाडा व कोकणात सुध्दा लोकांनी तशीच भावना व्यक्त केली आहे. पश्चिम महाराष्ट्रानेदेखील जर त्यांना त्यांची देणी मिळाली नाही तर एकटे राहण्याचा त्यांचा मनसुबा व्यक्त केला. विदर्भ व मराठवाडा या दोन्ही प्रदेशात आज बहुतकरून पश्चिम महाराष्ट्राबाबतच्या निर्णय प्रक्रियेत ज्याप्रमाणे राजकीय व प्रशासकीय म्हणणे आहे त्याप्रमाणे म्हणणे मांडून या प्रदेशाच्या विकासाची सुनिश्चिती होण्याबाबत देखील चिंता व्यक्त करण्यात येत होती. विकास प्रक्रियेतील प्रशासनामध्ये प्रत्येक प्रदेश हा आपले मत प्रभावीपणे व्यक्त करू इच्छितो, असे दिसून येते. म्हणून जी शासन यंत्रणा केवळ त्यांची वंचित स्थितीबाबतची भावना शमवणार नाही तर, ज्यामुळे प्रादेशिक विकास अधिक चांगला होईल अशा निर्णय प्रक्रियेबाबत देखील खात्री पटवून देईल, अशी सुशासन यंत्रणा सुचविणे हे या समितीसमोरचे आव्हानात्मक काम आहे. प्रादेशिक गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून व प्राधान्यक्रम प्रभावीपणे निश्चित करण्यासाठी प्रदेश विनिर्दिष्ट निर्णय निश्चिती करणारी व उत्तरदायित्व घेणारी सुशासन यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. अनुशेष दूर करण्यासाठी आणि तीन प्रदेशांना साधनसंपत्तीचे समन्याय वाटप करण्यासाठी राज्याच्या विशेषकरून अनुच्छेद ३७१(२) च्या यंत्रणेद्वारे उचितपणे असलेल्या व्यापक धोरणास अनुसरून वर्षांनुवर्षे प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि, राज्याने स्वीकार केलेल्या समतोल प्रादेशिक विकासाच्या तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी एक प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याची अजूनही गरज आहे.

६.१ प्रादेशिक शासनातील प्रमुख महत्त्वाचे टप्पे

६.१.१ नागपूर करार (१९५३) (जोडपत्र १.१ पहा)

महाविदर्भासाठीच्या चळवळीचे मूळ १९०५ पर्यंत मागे जाऊन काढता येऊ शकेल. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी १९४७ मध्ये केलेल्या अकोला करारात महाविदर्भ नावाने मध्यप्रांत व वऱ्हाड आणि स्वतंत्र विधानमंडळ असलेला पश्चिम महाराष्ट्र व उपप्रदेशांसाठी मंत्रिमंडळ–परंतु एकच सामाईक राज्यपाल असलेले–मराठी भाषिक क्षेत्रांसाठी उप–प्रदेशांसहित एकल संयुक्त महाराष्ट्राचा प्रदेश स्थापन करण्यास संमती दिली होती. त्यानंतर १९५३ मध्ये नागपूर करारावर स्वाक्षरी करण्यात आली. (पहा जोडपत्र १.१) नागपूर करारात (१९५३) तीन प्रदेशांचे विविध विकास स्तर आणि विदर्भ व मराठवाडा यांचा तुलनात्मक मागासलेपणा विचारात घेऊन, राज्य शासनाच्या तत्त्वांचा स्पष्टोच्चार केला. नागपूर करार

[१] संयुक्त राष्ट्र विद्यापीठ, http://unu.edu/publications/articles/what-does-good-governance-mean.html, कोफी अन्नान, भूतपूर्व महासचिव, संयुक्त राष्ट्रे

केल्यापासून प्रादेशिक असमतोलाच्या संपूर्ण वादविवादामुळे शासनाचे घटक म्हणून तीन प्रदेशांना एक औपचारिक मान्यता देण्यात आली आहे. या समितीने शासन क्षेत्रातील शिफारशी करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्व म्हणून नागपूर करार विचारात घेणे अत्यावश्यक आहे. वस्तुत: शासनाचा प्रश्न हा नागपूर कराराचा अत्यंत महत्त्वाचा भाग असल्याचे दिसते. नागपूर करारात समाविष्ट असलेले शासनाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे आहेत :

१. *"सर्व प्रकारचा विकास व प्रशासन यांच्या प्रयोजनार्थ हे राज्य महाविदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित राज्य हे तीन घटक मिळून बनलेले असेल.*

२. *एक स्वतंत्र शासन म्हणून ज्या गरजा असतील त्यांना बाध न आणता निरनिराळ्या घटकांमधून करावयाच्या खर्चासाठी पैशाचे नियतवाटप त्या त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. परंतु, मराठवाड्याची अविकसित स्थिती लक्षात घेऊन, त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकरिता मराठवाड्याकडे खास लक्ष पुरवण्यात येईल. आणि दरवर्षी राज्य विधानसभेपुढे त्यासंबंधीचा अहवाल ठेवण्यात यावा.*

३. *तीन घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात (अ) शासनाची रचना (ब) व्यावसायिक आणि वैज्ञानिक व्यवसायातील प्रशिक्षण सुविधा किंवा इतर विशेषीकृत प्रशिक्षण असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश, आणि (क) शासन किंवा शासन नियंत्रित उपक्रमांतर्गत सर्व श्रेणींच्या सेवा यांमध्ये प्रतिनिधित्व देण्यात येईल.*

४. *नवीन राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायपीठ मुंबई इथे असेल व दुसरे खंडपीठ नागपूर येथे असेल. नागपूर खंडपीठ सर्वसाधारणपणे महाविदर्भ प्रदेशाचे कामकाज पाहील. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नेमणुका करण्यासाठी शिफारशी करताना, महाविदर्भाच्या सेवांमधील आणि वकीलवर्गामधील व्यक्तींचीही शिफारस करून या प्रदेशाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, अशी व्यवस्था करावी*

५. *एकल राज्याचे कार्यक्षम प्रशासन चालविण्याच्या अधीन राहून, विदर्भाच्या लोकांना त्यांच्या राज्याची राजधानी म्हणून नागपूरपासून मिळालेले लाभ शक्य तितक्या प्रमाणात जोपासण्यात येतील. शासन निश्चित कालावधीसाठी नागपूरला हलविण्यात येईल आणि प्रत्येक वर्षी राज्य विधिमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूरमध्ये घेण्यात येईल.*

६. *वेगवेगळ्या घटकांमधील लोकांनी प्रशासनाशी अधिक चांगल्या प्रकारे सहयोग साधण्याचे परिणामकारक साधन म्हणून प्रशासनाचे विकेंद्रीकरण करण्यात येईल."*[२]

६.१.२ संविधानाचा अनुच्छेद ३७१ (२)

राज्य पुनर्रचना आयोगाने (१९५५) वेगळा विदर्भ निर्माण करण्याची शिफारस केली होती, परंतु, संसदेने ती स्वीकारली नाही. तथापि, संविधानामध्ये नववी सुधारणा अधिनियम, १९५६ अन्वये अनुच्छेद ३७१ (२) चा अंतर्भाव करून नागपूर कराराच्या आशयास संविधानिक मान्यता देण्यात आली. अनुच्छेद ३७१(२) पुढीलप्रमाणे वाचावा :

या संविधानात काहीही असले तरी (महाराष्ट्र किंवा गुजराथ या राज्यांबाबत) आदेश काढून त्याद्वारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टींसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपविण्याची तरतूद करता येईल :

(एक) "विदर्भ, मराठवाडा (आणि यथास्थिति उर्वरित महाराष्ट्र), सौराष्ट्र, कच्छ आणि उर्वरित गुजराथ यांकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करून या सर्व मंडळांनी दरवर्षी आपल्या कार्याचा अहवाल राज्य विधानसभेपुढे मांडण्याची तरतूद करावी.

(दोन) उक्त क्षेत्रांच्या विकास खर्चाकरिता संपूर्ण राज्याच्या गरजांच्या अधीन राहून निधीचे समन्यायी नियतवाटप करणे; आणि

[२] महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल सत्यशोधन समिती, १९८४:४

(तीन) उक्त सर्व क्षेत्रांच्या बाबतीत, संपूर्ण राज्याच्या गरजांच्या अधीन राहून तंत्र शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांच्या पुरेशा सुविधा देणारी तसेच राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेत सेवायोजनाच्या पुरेशा सुविधा देणारी एक न्यायोचित व्यवस्था निर्माण करणे."[३]

६.१.३ प्रादेशिक शासनाबाबतची संयुक्त महाराष्ट्राची भूमिका

१९६० मध्ये, प्रांतिक पुनर्रचनेमुळे संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणात प्रादेशिक शासनाबाबतची संयुक्त महाराष्ट्राची भूमिका उत्कृष्ट प्रकारे प्रतिबिंबित झाली होती.

"अशाच प्रकारे, मी विदर्भातील जनतेला आश्वस्त करू इच्छितो की, त्यांच्या रास्त व न्यायोचित हितसंबंधाचे रक्षण केले जाईल की नाही, याबाबत त्यांनी काही एक भिती बाळगण्याची गरज नाही. याउलट त्यांचे पुरेपूर संरक्षण केले जाईल आणि त्यांना भावी महाराष्ट्र शासनाबद्दलच्या समर्पित भावनेने वागविले जाईल. तसेच, नागपूर करारातील अटींचा आदर केला जाईल आणि शक्य असेल तेथे त्याबाबतीत काहीतरी चांगले केले जाईल.

कदाचित सन्माननीय सभागृहाला याची जाणीव नसेल की, नागपूर करार जेवढा विदर्भाला लागू आहे तेवढाच तो मराठवाड्यालाही लागू आहे. मला आपणास सांगावेसे वाटते की, नागपूर कराराच्या अटी जेथवर मराठवाड्याशी संबंधित असतील तेथवर, त्यांची समर्थपणे पूर्तता केली जाईल. या प्रदेशातील आमच्या बांधवांना पुन्हा आश्वस्त करण्यासाठी, मुंबई शहर, विदर्भ आणि मराठवाडा यासंबंधीच्या धोरणाविषयी जी आपणास मी ओळख करून दिली त्या धोरणाबाबतचे एक निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवले आहे. कोकणातील जिल्ह्यांच्या तसेच, महाराष्ट्रातील टंचाईग्रस्त भागांच्या नियोजित विकासावर भर देण्यासाठी मला एक चांगली संधी मिळाली आहे.

या संबंधात, मुंबई आणि इतर राज्यांबद्दलच्या विशेष तरतुदींचा अंतर्भाव असलेल्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ कडे मी सन्माननीय सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. त्या अनुच्छेदामध्ये स्वतंत्र विकास मंडळे, विकास खर्चाकरिता निधीचे समन्यायी नियतवाटप, तंत्र शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षणासाठी न्यायोचित व्यवस्था आणि राज्य सेवेतील सेवायोजनाच्या पुरेशा संधी प्रतिपादित केल्या आहेत. या अनुच्छेदाद्वारे दिलेले संरक्षण उर्वरित मुंबई राज्यात म्हणजेच महाराष्ट्र राज्यातही यापुढे चालू राहील."[४]

६.१.४ प्रदेशावर असलेले लक्ष जिल्ह्याकडे वळविणे

तथापि, १९६९ मध्ये प्रदेशाऐवजी जिल्ह्याला नियोजनाचा आणि विकासाचा घटक मानण्यात आले. त्यानुसार, जिल्हा नियोजन व विकास समित्यांची (डी.पी.डी.सी.) स्थापना होऊन एक स्वतंत्र जिल्हा वार्षिक योजनाही तयार झाली. प्रदेशावरील लक्ष जिल्ह्यांकडे वळविल्याने लोकांजवळ साधनसंपत्ती येण्यास मदत झाली. प्रारंभी, एकूण राज्य योजनेत, जिल्हा योजनेचा वाटा ६० टक्के इतका होता. मात्र, वर्षानुवर्षे त्यात सतत कपात होत गेली आणि सध्या जिल्हा योजनेचा वाटा फक्त सुमारे ११ टक्के इतका राहिला. बलवंतराय मेहता समिती आणि पी.बी.पाटील समिती यांच्या अहवालांच्या आधारे, पंचायती राज व्यवस्थेची स्थापना ही, दुसरी एक महत्त्वाची घटना होती. पंचायत राज व्यवस्थेनेही प्रदेशावरील लक्ष जिल्ह्यांकडे वळविले. ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रयत्नांना आणखी बळकटी देऊन, प्रशासन, स्थानिक शासन, नियोजन आणि अंमलबजावणी यांच्या बाबतीत जिल्ह्याला मुख्य घटक मानण्यात आले. जिल्हा नियोजन व विकास समित्यांची जिल्हा नियोजन समित्यांमध्ये (डी.पी.सी.) पुनर्रचना करून त्यामध्ये ग्रामीण व नगरपंचायतीच्या निर्वाचित सदस्यांचा अंतर्भाव करण्यात आला.

६.१.५ सत्यशोधन समिती

१९८४ मध्ये, श्री.वसंतदादा पाटील यांनी तिन्ही प्रदेशांमधील विकास स्तर निर्धारित करण्यासाठी श्री.व्ही.एम.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीची स्थापना केली.

[३] भाग एकवीस, अनुच्छेद ३७१ (२) अस्थायी, संक्रमणकालीन व विशेष तरतुदी. महाराष्ट्र व गुजराथ राज्यांबाबतची विशेष तरतूद. भारताचे संविधान.

[४] प्रादेशिक असमतोलावरील सत्य शोधन समिती, १९८४:६

"या समितीने नऊ विकास क्षेत्रांचा म्हणजेच (१) रस्ते (२) सिंचन (३) ग्रामीण विद्युतीकरण (४) सर्वसाधारण शिक्षण (५) तंत्र शिक्षण (६) आरोग्य सेवा (७) पाणीपुरवठा (८)भूविकास, मृद व जलसंधारण आणि (९) पशु वैद्यकीय सेवा यांमधील अनुशेषाचा क्षेत्रीय अभ्यास हाती घेऊन १९८४ मध्ये आपला अहवाल सादर केला. दांडेकर समितीने दि. ३०.६.१९८२ रोजीप्रमाणे परिगणित केलेला क्षेत्रीय अनुशेष हा, रुपये ३१८६.७७ कोटी इतका होता. उक्त दिनांकाप्रमाणे विदर्भ प्रदेशाचा क्षेत्रीय अनुशेष सर्वात जास्त म्हणजे रु. १३८५.९३ कोटी इतका होता. विदर्भ प्रदेशातील सिंचन क्षेत्राचा अनुशेष रुपये १२४६.५४ कोटी इतका होता. तर, दि. २०.६.१९८२ रोजीप्रमाणे सिंचन क्षेत्राचा अनुशेष रुपये ५२७.३१ कोटी म्हणजेच एकूण क्षेत्रीय अनुशेषाच्या ३८.०५ टक्के इतका होता. दांडेकर समितीचा अहवाल महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे स्वीकारला नव्हता. तथापि, असमतोल दूर करण्यासाठी १९८५ मध्ये रुपये २०० कोटी ते १९९३-९४ मध्ये रुपये ५०० कोटी असे थोडयाफार प्रमाणात निधीचे नियतवाटप करण्यात आले. दरवर्षी एकूण अर्थसंकल्पीय नियतवाटपापैकी ८५ टक्के नियतवाटप अनुशेष दूर करण्यासाठी वापरण्यात यावे, त्या समितीने अशी शिफारस केलेली असली तरी, राज्य शासनाने ती शिफारस अंमलात आणली नव्हती."[५]

६.१.६ मागास प्रदेशांकरिता तदर्थ अनुदाने

सहाव्या योजनेत पुढे काही विशिष्ट प्रयोजनासाठी राखून ठेवलेली अनुदाने, तिन्ही प्रदेशांच्या विकासाकरिता ठेवण्यात आलीत :

"सहाव्या योजनेच्या (१९८०-८५) कालावधीत राज्य नियोजन विभागाने जिल्हानिहाय विकास कामगिरीचा अभ्यास हाती घेऊन, सिंचन, रस्ते, सार्वजनिक आरोग्य आणि तंत्र शिक्षण क्षेत्रांच्या बाबतीत त्या क्षेत्रांची लक्षणीय तफावत असल्याचे दाखवून दिले. सहाव्या योजनेच्या कालावधीत, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासनाने विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या तिन्ही प्रदेशांकरिता अनुक्रमे ३८ कलमी, ३५ कलमी आणि १७ कलमी विकास कार्यक्रम जाहीर केले."[६]

"महाराष्ट्र शासनाने सत्यशोधन समितीच्या शिफारशी अधिकृतरीत्या स्वीकारल्या नसल्या तरी, त्यांचा सर्वंकष निष्कर्षानुसार पायाभूत सुविधांचा अनुशेष दूर करण्यासाठी दरवर्षी योजनांतर्गत निधीचे काही प्रमाणात नियतवाटप केले जात होते. १९८५-१९९४ या कालावधीत रुपये ३१५६ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली."[७]

१९८५-८६ पासून २००८-०९ पर्यंत अनुशेष दूर करण्यासाठी तरतूद केलेला नियतव्यय आणि प्रत्यक्ष खर्च दर्शविणारा तक्ता जोडपत्र ६.१ मध्ये दिलेला आहे.

६.१.७ प्रादेशिक विकास मंडळांची स्थापना

तीन प्रादेशिक विकास मंडळांची स्थापना ही, समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रयत्नातील एक महत्त्वाची घटना होती:

"दि.२६ जुलै, १९८४ रोजी महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी, विदर्भ, मराठवाडा, आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्याकरिता स्वतंत्र मंडळांची स्थापना करण्यासाठी अनुच्छेद ३७१ (२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आदेश काढण्यासाठी राष्ट्रपतींना विनंती करणारे ठराव एकमताने संमत केले."[८]

"राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे राज्यपालांवर सोपविण्यात आलेली विशेष जबाबदारी पार पाडताना, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, १९९४ (यात यापुढे ज्याचा निर्देश १९९४ चा आदेश असा केला आहे) जारी केला."[९]

[५] नियोजन आयोगाच्या विदर्भाबाबतच्या सत्यशोधन गटाचा अहवाल, २००६: ७०
[६] महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांच्या कामगिरीचे मूल्यांकन, २००३:२
[७] महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांच्या कामगिरीचे मूल्यांकन २००३:३३,३४
[८] नियोजन आयोगाच्या विदर्भाबाबतच्या सत्यशोधन गटाचा अहवाल २००६:६९,७०
[९] नियोजन आयोगाच्या विदर्भाबाबतच्या सत्यशोधन गटाचा अहवाल, २००६:७१

विदर्भ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र यांची अनुक्रमे नागपूर, औरंगाबाद आणि मुंबई येथे मुख्यालये असलेल्या या तीन विकास मंडळांची दि. ३० एप्रिल, १९९४ रोजी स्थापना केल्यानंतर, माननीय राज्यपालांनी हया वैधानिक विकास मंडळाच्या यथोचित कार्यशीलतेबाबत सविस्तर आदेश आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केलेली आहेत:

"माननीय राज्यपालांच्या आदेशात निर्धारित केलेली विकास मंडळाची कार्ये:

१. *संपूर्ण राज्याचा विकास स्तर लक्षात घेऊन, समुचित निर्देशांकाच्या आधारे, त्यांच्या कार्यक्षेत्रांच्या संबंधात निरनिराळ्या विभागांमधील सापेक्ष विकासाचे स्तर निश्चित करणे.*

२. *त्यांच्या कार्यक्षेत्रामधील अनुशेष दूर करण्यासाठी व सर्वांगीण विकास साधण्यासाठी केलेल्या विकासाच्या अनेकविध प्रयत्नांच्या परिणामांचे मूल्यमापन करणे.*

३. *वार्षिक योजनेसह पंचवार्षिक योजनेच्या कालावधी दरम्यान विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चाचे स्तर सुचविणे, आणि*

४. *त्यांच्या कामकाजावरील वार्षिक अहवाल तयार करणे आणि तो महाराष्ट्र राज्य विधानमंडळासमोर मांडण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतर, व्यवहार्य असेल तेथवर, तीन महिन्यांच्या आत राज्यपालांकडे पाठविणे."*[१०]

प्रादेशिक विकासासाठी पथदर्शी आणि लक्ष्यधारित उद्दिष्टे गाठण्याकरिता प्रत्येक मंडळास रुपये १०० कोटी देण्यात आले :

"लहान व उपयुक्त स्वरूपाच्या विकास कामांसाठी या तीन विकास मंडळांना १९९५–९६ पासून २०१०–११ पर्यंत दरवर्षी रुपये १०० कोटी एवढया विशेष निधीचे नियतवाटप केले जात होते. अशा प्रकारच्या निधीचे नियतवाटप हे, अनुशेषातील त्यांचा वाटा आणि लोकसंख्या यांच्या प्रमाणात (विदर्भात ४३.८६ टक्के, मराठवाड्यात २७.२८ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात २८.८६ टक्के) केले जात होते. शिक्षण व आरोग्य संस्था, रस्ते विकास, समाज कल्याण आणि सिंचन सुविधा यांसारख्या सुसज्ज सामाजिक पायाभूत सुविधांकरिता या तिन्हीं मंडळांनी या निधीचा मोठया प्रमाणात विनियोग केला."[११]

६.१.८ निर्देशांक व अनुशेष समिती

सत्यशोधन समितीनंतर, निर्देशांक व अनुशेष समितीने प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नांचा व्यापक अभ्यास केला. त्या समितीने दि. ११.७.१९९७ रोजी आपला अहवाल माननीय राज्यपालांना सादर केला. शासनाने तो अहवाल तत्त्वत: स्वीकारला. तथापि, भौतिक व अर्थिक अनुशेष परिगणित करताना, सिंचन, उच्च व तंत्र शिक्षण, वीज पंपांचे विद्युतीकरण आणि भूविकास, मृद व जलसंधारण यासंबंधित क्षेत्रीय विभागांची मते, निर्देशांक व अनुशेष समितीच्या विचारार्थ पाठविण्यात यावी, अशी शासनाने शिफारस केली. माननीय राज्यपालांनी उपरोक्त विभागांची मते, पुनर्घटित केलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीकडे निर्णयार्थ पाठवून दि. १.४.१९९४ रोजी असलेल्या उपरोक्त क्षेत्रांच्या प्रदेशनिहाय भौतिक व आर्थिक अनुशेषास अंतिम रूप देण्यास सांगितले. पुनर्घटित केलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने दि.२७.९.२००० रोजी आपला अहवाल माननीय राज्यपालांना सादर केला आणि त्याला महाराष्ट्र शासनाने स्वीकृती दिली.[१२]

६.१.९ १९८४ आणि १९९९ या वर्षांमधील अनुशेषाचा कल

१९८४ आणि १९९९ या कालावधी दरम्यान अनुशेष सुधारण्याऐवजी वाढतच गेल्याचे दिसून येते. त्याबाबतीत माननीय राज्यपालांनी २००० मध्ये एक विशेष टिप्पणी दिली होती:

---

[१०] नियोजन आयोगाच्या विदर्भाबाबतच्या सत्यशोधन गटाचा अहवाल, २००६:८२

[११] नियोजन आयोगाच्या विदर्भाबाबतच्या सत्यशोधन गटाचा अहवाल, २००६:८५

[१२] महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांच्या कामगिरीचे मूल्यमापन, २००३

"१९८४ मध्ये पहिल्यांदा सत्यशोधन समितीने आणि त्यानंतर १९९४ मध्ये निर्देशांक व अनुशेष समितीने अनुशेष दाखवून दिला होता, तेव्हापासून प्रादेशिक असमतोल वाढत गेला. एकूण अनुशेषामधील विदर्भाचा अनुशेष हा, १९८४ मधील ३९.१२ टक्क्यांवरून १९९४ मध्ये ४७.६० टक्के इतका वाढला, आणि तो आणखी पुढे दि. १ एप्रिल, २००० रोजी असल्याप्रमाणे ४८.२६ टक्क्यांपर्यंत पोहोचला. त्याचप्रमाणे, मराठवाडा प्रदेशाच्या बाबतीत, तो, १९८४ मधील २३.५६ टक्क्यांवरून १९९४ मध्ये २८.७७ टक्के इतका वाढला आणि तो आणखी पुढे दि. १ एप्रिल, २००० रोजी असल्याप्रमाणे २९.६२ टक्क्यांपर्यंत पोहोचला. दुसरीकडे, एकूण अनुशेषामधील उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष हा, १९८४ मधील ३७.३२ टक्क्यांवरून १९९४ मध्ये २३.६२ टक्के इतका कमी झाला आणि तो आणखी पुढे दि. १ एप्रिल, २००० रोजी असल्याप्रमाणे २३.१२ टक्के इतका कमी झाला. अशाप्रकारे, अनुशेष दूर करण्यासाठी विशेष नियतवाटप करूनही विदर्भ आणि मराठवाड्याच्या बाबतीत प्रादेशिक तफावत वर्षागणिक सतत वाढत गेली. तफावतीमध्ये सिंचन क्षेत्रांच्या बाबतीत अधिक लक्षणीय वाढ झाली. विदर्भाच्या एकूण अनुशेषामधील सिंचन क्षेत्राच्या अनुशेषाचे प्रमाण हे, १९८४ मधील ४२.३० टक्क्यांवरून १९९४ मध्ये ६१.६४ टक्के इतके वाढले होते आणि ते पुढे आणखी दि. १ एप्रिल, २००० रोजी असल्याप्रमाणे ६८.४७ टक्के इतके वाढले. त्याचप्रमाणे, मराठवाडा प्रदेशाच्या बाबतीत ते प्रमाण १९८४ मध्ये ४२.१८ टक्क्यांवरून १९९४ मध्ये ५९.९६ टक्के इतके वाढले होते आणि ते आणखी पुढे दि. १ एप्रिल, २००० रोजी असल्याप्रमाणे ६१.२९ टक्के इतके वाढले. तर दुसरीकडे, उर्वरित महाराष्ट्राच्या एकूण अनुशेषामधील सिंचन क्षेत्राच्या अनुशेषाचे प्रमाण १९८४ मधील ४५.५६ टक्क्यांवरून १९९४ मध्ये २७.६५ टक्के इतके कमी झाले आणि ते आणखी पुढे दि. १ एप्रिल, २००० रोजी असल्याप्रमाणे १८.४२ टक्के इतके कमी झाले."[१३]

सन १९८४ व १९९९ मध्ये अनुशेषाच्या स्थितीसंबंधात जे विचार मांडण्यात आले होते तेच विचार नियोजन आयोगाच्या विदर्भासंबंधातील सत्यशोधन समितीच्या अहवालातही (२००६) मांडले आहेत:

"पुनर्घटित केलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने काढलेल्या निष्कर्षांमधून असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्यातील विदर्भ व मराठवाडा या प्रदेशांच्या अनुशेषात दि.३१.३.१९८४पासून ते दि.३१.३.१९९४ पर्यंत सातत्याने वाढ झाली तर उर्वरित महाराष्ट्राच्या अनुशेषात घट झाल्याचे दिसून येते. दिनांक ३१.३.१९८४ रोजी, विदर्भातील सिंचन क्षेत्राचा अनुशेष रुपये ५३७.३१ कोटी किंवा ३८.०५ टक्के इतका होता तो रुपये ४,०८३कोटी पर्यंत किंवा ५५.०५ टक्क्यांपर्यंत वाढला. त्या तुलनेत, उर्वरित महाराष्ट्राच्या दि.३१.३.१९८४ रोजी रुपये ५९४.९० कोटी इतक्या असलेल्या अनुशेषात केवळ रुपये ९३४ कोटी इतकी अल्प वाढ झाली. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, टक्केवारीच्या परिभाषेत उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचन क्षेत्रातील दि.३१.३.१९८४ रोजी असलेल्या ३९.१० टक्के इतक्या अनुशेषात दि.३१.३.१९९४ रोजी १२.५९ टक्के इतकी लक्षणीयरीत्या घट झाली आहे. विदर्भाच्या सिंचन क्षेत्रातील अनुशेषात १९८२ मधील ३८.०५ टक्क्यांवरून २००२ मध्ये ६२.२० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे तर उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचन क्षेत्रातील अनुशेषात १९८२ मधील ३९ टक्क्यांवरून दि.१.४.२००२ रोजी ४.७३ टक्क्यांपर्यंत उत्तरोत्तर घट होत गेली आहे."[१४]

६.१.१० साधनसंपत्तीच्या समन्यायी नियतवाटपासंबंधात राज्यपालांचे निदेश

विकास मंडळांच्या निर्मितीनंतर, राज्यपालांनी, प्रदेशनिहाय सर्वसाधारण योजनेच्या नियतवाटपास सुरुवात केली. १९९५-९६ च्या वार्षिक योजनेत, राज्यपालांनी पहिल्यांदा, तीनही मंडळांमध्ये योजनेतील संपूर्ण निधीचे समन्यायी नियतवाटप केले. तीनही प्रदेशांमध्ये निधीचे वाटप करण्यासाठी विशिष्ट सूत्र नसले तरी, राज्यपालांनी, १९९१ च्या जनगणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात तीन प्रदेशांत असलेल्या लोकसंख्येची टक्केवारी आणि सत्यशोधन समितीने निश्चित केलेल्या अनुशेषाचे प्रमाण, यांसारखे घटक विचारात घेतले होते. विकास मंडळांना वाटप केलेला निधी हा, एका विकास मंडळाच्या क्षेत्रातून दुसऱ्या विकास मंडळाच्या क्षेत्रात वळता केला जात नव्हता. याची

[१३] राज्यपालांच्या निदेशांच्या पार्श्वभूमीची टिप्पणी, http://rajbhavan.maharashtra.gov.in

[१४] नियोजन आयोगाच्या विदर्भासंबंधातील सत्यशोधन समितीचा अहवाल- २००६:७३

सुनिश्चिती करण्यासाठी, राज्य विधानमंडळासमोर मांडलेल्या वार्षिक आर्थिक विवरणपत्रांमध्ये, राज्यपालांनी वाटप केलेला निधी दर्शविणे राज्य शासनास बंधनकारक केले होते. योजनेतील निधीचे वाटप करण्यासंबंधातील १९९४ च्या आदेशातील खंड ७ अन्वये प्रत्येक वर्षी निदेश देण्यात आलेले आहेत.

"तीन विकास मंडळांकरिता निधीचे स्वतंत्रपणे वाटप करणाऱ्या अशा आदेशांपैकी पहिला आदेश वार्षिक योजना १९९५–९६ मध्ये काढण्यात आला होता. ही पध्दत २००१–०२ पर्यंत सुरू होती. त्या वर्षापर्यंत, निश्चित केलेल्या नऊ क्षेत्रांसाठी प्रदेशनिहाय वाटप करण्याचे आदेश राज्यपालांनी दिले होते, ती नऊ क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत – (१) सिंचन; (२) रस्ते; (३) सर्वसाधारण शिक्षण; (४) तंत्र शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण; (५) आरोग्य सेवा; (६) पाणी पुरवठा–ग्रामीण व नागरी; (७) भूविकास, मृद व जलसंधारण व फलोत्पादन; (८) पशुवैद्यकीय सेवा; आणि (९) पंपांचे विद्युतीकरण."[१५]

"प्रदेशांमधील अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्रीय नियतवाटप हे, दि.१ एप्रिल, २००५ रोजी संबंधित क्षेत्रांमध्ये असलेल्या उर्वरित अनुशेषाच्या प्रमाणात करण्यात यावे अशी अट देखील घातली होती."[१६]

"वर नमूद केल्याप्रमाणे, संबंधित विकास मंडळांच्या अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठीच्या संपूर्ण नियतवाटपामधील, योजनानिहाय नियतव्यय हा, संबंधित विकास मंडळे व जिल्हा स्तरीय समित्यांच्या बाबतीत संबंधित जिल्हा नियोजन समित्या आणि स्टेट पूल व राज्य स्तरावरील योजना यांच्या बाबतीत संबंधित विभाग यांच्याशी विचारविनिमय करून केलेल्या शिफारशींच्या आधारे नियोजन विभागाने केला पाहिजे. सिंचन क्षेत्रासाठीचे नियतवाटप व इतर अनुशेषाच्या क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठीचा निधी वजा केल्यानंतर, योजनेतील उर्वरित नियतव्ययाचा विभागणीयोग्य भाग हा, संबंधित प्रदेशांमधील संपूर्ण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार तीनही प्रदेशांमध्ये वितरित करण्यात यावा. अनुशेष असलेल्या क्षेत्रातून बिगर अनुशेषाच्या क्षेत्रात आणि एका विकास मंडळाच्या क्षेत्रातून दुसऱ्या विकास मंडळाच्या क्षेत्रात निधी वळवण्यात येणार नाही."[१७]

६.२ विभागणी योग्य व विभागणी योग्य नसलेल्या नियतव्ययाचा अंदाज

६.२.१ राज्याच्या साधनसंपत्तीचे नियतवाटप करण्याबाबत राज्यपालांचे नियम

महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, ऑगस्ट, १९९४ मध्ये, "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे नियम" तयार केले असून या तीनही प्रदेशांमध्ये राज्याच्या साधनसंपत्तीचे समन्यायी वाटप करण्याचा एक भरभक्कम पाया या नियमांमध्ये घालून देण्यात आलेला आहे :

"राज्यपाल हे, संपूर्ण राज्याच्या गरजा लक्षात घेऊन व मंडळाच्या शिफारशीवरून मंडळांमध्ये निधीचे नियतवाटप करतील."[१८]

उपरोक्त नियमांच्या नियम ७(५) मध्ये, 'संपूर्ण राज्याच्या गरजा' या शब्दप्रयोगाचा अर्थ सांगितला असून विभागणीयोग्य नसलेल्या नियतव्ययाची गणना करण्यासाठी विशिष्ट तत्त्वे घालून दिली आहेत.

"तीन प्रदेशांमधील विकास खर्चाची संभाव्य रक्कम काढताना, खालील बाबींसाठी, राज्य शासनाला आवश्यक असलेली रक्कम विचारात घेऊन ती बाजूला ठेवण्यात येईल."

---

[१५] नियोजन आयोगाच्या विदर्भासंबंधातील सत्यशोधन समितीचा अहवाल, २००६:७४

[१६] नियोजन आयोगाच्या विदर्भासंबंधातील सत्यशोधन समितीचा अहवाल, २००६:७५

[१७] नियोजन आयोगाच्या विदर्भासंबंधातील सत्यशोधन समितीचा अहवाल, २००६:७५,७६

[१८] राज्यपालांचे नियम, १९९४ मधील नियम ७ (३) http://rajbhavan.maharashtra.gov.in

(एक) भारित खर्च,

(दोन) योजनेतर खर्च,

(तीन) बाह्यत: अनुदानित कार्यक्रमांवरील खर्च,

(चार) केंद्र सहाय्यित कार्यक्रमांवरील खर्च,

(पाच) जे कार्यक्रम व प्रकल्प एक मंडळाच्या क्षेत्रापलीकडील क्षेत्रांसाठी अथवा संपूर्ण राज्यांसाठी लाभदायक असतील व ज्यात गुंतवणूक अविभाज्य असेल असे कार्यक्रम व प्रकल्प,

(सहा) देशांतर्गत किंवा आंतरदेशीय खाजगी क्षेत्रांतील गुंतवणुकीसंबंधातील कार्यक्रम व प्रकल्प यांच्याबाबतीतील खर्च,

(सात) आंतरराज्यीय करार किंवा आंतरराज्यीय निवाडे किंवा न्यायालयाचे निर्णय यांची अंमलबजावणी करण्यासंबंधातील खर्च,

(आठ) संविधानाच्या अनुच्छेद २४३(झ) खंड (१) अनुसार राज्यपालांनी घटित केलेल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींवरून घेतलेल्या शासन निर्णयांनुसार स्थानिक संस्थांना नियतवाटप करावयाचा निधी,

(नऊ) राज्यपालांना संपूर्ण राज्याच्या गरजेनुसार योग्य वाटत असेल अशा खर्चाची इतर कोणतीही बाब."[१९]

६.२.२ विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या नियतव्ययाच्या प्रमाणातील बदल

उपरोक्त नियमांतील बाबी (एक) ते (आठ) हया स्वयंस्पष्ट असताना, बाब (नऊ) साठीच्या स्वेच्छानिर्णयास भरपूर वाव आहे. परिणामी, राज्याच्या योजनेतील विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या घटकांच्या प्रमाणात वर्षानुवर्षे भरपूर बदल होत आहेत.

विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या नियतवाटपाच्या प्रमाणातील बदल जोडपत्र ६.२ मध्ये दिसून येईल. या तक्त्यावरून असे दिसून येईल की, २००८-२००९ या वर्षामधील एकूण योजना रु.१८४२९ कोटी (अनुसूचित जाती उपयोजना, जनजाति उपयोजना आणि जिल्हा नियोजन समिती वगळून) इतकी असताना रुपये १६८२७ कोटी इतक्या नियतवाटपासह योजनांतर्गत विभागणीयोग्य हिस्सा ९१.३१ टक्के इतका अधिक होता, आणि २००४-०५ या वर्षामधील योजना रुपये ७७२९ कोटी (अनुसूचित जाती उपयोजना, जनजाती उपयोजना आणि जिल्हा नियोजन समिती वगळून) इतकी असताना, नियतवाटप केलेल्या रुपये ४९९५ कोटी इतक्या रकमेसह योजनांतर्गत विभाजनयोग्य हिस्सा सर्वात कमी (६४.६३टक्के) होता. यावरून हे स्पष्ट होते की, योजनांतर्गत विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या हिश्श्यांचे, आतापर्यंत नेमक्या पध्दतीने अनुसरण करण्यात आलेले नाही.

६.२.३ विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या नियतव्ययासंबंधात राज्यपालांचे अभिप्राय

राज्यपालांनी, विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या साधनसंपत्तीच्या नियतवाटपासंबंधात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :

> *"सन २०११-१२ या वार्षिक योजनेतील विभाजनयोग्य नसलेला भाग सुमारे रुपये १०,८१३ कोटी इतका आहे असे राज्यपालांच्या निदर्शनास आले. हे प्रमाण राज्याच्या वार्षिक योजनेच्या जवळजवळ २६ टक्के इतके आहे. राज्यपालांच्या आणखी असेही निदर्शनास आले की, खर्चाच्या विवक्षित बाबींचे विभाजनयोग्य नसलेल्या बाबी म्हणून वर्गीकरण केले आहे. जेणेकरून या*

[१९] राज्यपालांचे नियम, १९९४ यामधील नियम ७ (५) http://rajbhavan.maharashtra.gov.in

बाबींवरील खर्चाचे प्रदेशनिहाय वर्गीकरण करणे सहज शक्य होईल. उदाहरणार्थ, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान (रुपये २५०० कोटी) महाराष्ट्र नगरोत्थान अभियान (रुपये २५० कोटी) आणि लहान व मध्यम शहरांसाठी नागरी पायाभूत सुविधा विकास योजना (रुपये ४०० कोटी) यांसाठी नागरी विकास क्षेत्रांतील अर्थसंकल्पीय नियतवाटप हे, विभागणीयोग्य नसलेले नियतवाटप म्हणून दाखविण्यात आले आहे. ज्यांनी या अनुदानांचा प्रत्यक्ष वापर केलेला आहे अशा महानगरपालिका किंवा नगरपरिषदा ओळखणे शक्य व्हावे. ज्यात बेसुमार वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे अशा विभागणीयोग्य नसलेल्या शीर्षखालील खर्चाची टक्केवारी ही, नियतव्ययाच्या संपूर्ण प्रदेशनिहाय वाटपामध्ये विपर्यास करणारी ठरत आहे. राज्यपालांनी, याद्वारे निदेश दिले आहेत की, नियोजन विभागाने, ज्यांचे अर्थसंकल्पीय दस्तऐवजांमध्ये विभागणीयोग्य नसलेली बाब म्हणून वर्गीकरण करण्यात आलेले आहे अशा खर्चाच्या बाबींची पुनर्तपासणी करावी आणि जेथे जेथे शक्य असेल तेथे तेथे वर्गीकरणात योग्य त्या सुधारणा कराव्यात. काही बाबतीत, आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून हे वर्गीकरण करता येणे शक्य नाही. जर आर्थिक वर्षाच्या अखेरीनंतर, खर्चाच्या बाबीचे विभागणीयोग्य बाब म्हणून वर्गीकरण करता येणे शक्य असेल तर, नियोजन विभागाने, पूर्वीच्या आर्थिक वर्षातील खर्चाच्या आधारसामग्रीच्या आधारे अशा बाबींवरील प्रदेशनिहाय खर्चाची गणना करावी. संबंधित विभागाशी विचारविनिमय करून हे काम हाती घेण्यात यावे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील अशा कार्याचा अहवाल राज्यपालांच्या माहितीसाठी जुलै, २०१२ पूर्वी पाठविण्यात यावा."[२०]

६.२.४ विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या खर्चाबाबत सुस्पष्ट अशा मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव

राज्यपालांचे नियम, १९९४ यातील कलम ७ (५) नुसार, विभागणी योग्य व विभागणी योग्य नसलेल्या खर्चाची विभागणी केली असली तरी, चालू नियोजन प्रक्रियेची तपासणी व राज्य नियोजन विभागाशी चर्चा केली असता असे दिसून येते की, विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या खर्चाचा अंदाज करताना, विभागांकडे, शासन निर्णयाच्या स्वरूपातील कोणतीही कार्यचालनात्मक मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या साधनसंपत्तीच्या आवश्यकतेप्रत पोहचण्यासाठी, विभागांना पध्दतशीर व क्रमबध्द कार्यपध्दतीची गरज आहे. विभागणीयोग्य नसलेल्या निधीतून हाती घ्यावयाच्या कामांबाबत संबंधित विभागांने स्पष्टपणे व्याख्या करावी आणि त्या कामांना नियोजन विभागाकडून मान्यता घेण्यात यावी.

६.३ तीनही प्रदेशांमध्ये विभागणीयोग्य नियतव्ययाचे वाटप

६.३.१ विभागणीयोग्य नियतव्ययाचे वाटप करण्यासाठी राज्यपालांची तत्त्वे

राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असलेले नियतवाटप एकदा निश्चित केले गेले की, त्यानंतर योजनेतील विभागणीयोग्य असलेल्या उर्वरित निधीचे, तीनही प्रदेशांमध्ये त्यातील लोकसंख्येच्या आधारे वाटप करण्यात यावे.

"सिंचन क्षेत्रातील नियतवाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर, योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशांच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित करण्यात यावा. असे करताना, २०११ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घ्यावी. उर्वरित योजनांतर्गत नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियत वाटप करण्यामध्ये, त्या त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी याचा विचार करून क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि, एखाद्या प्रदेशातील सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही, उर्वरित योजनांतर्गत नियतव्ययामधील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधीन राहील."

[२०] राज्यपालांचे २०१२-२०१३ या वर्षासाठीचे निदेश http://rajbhavan.maharashtra.gov.in

राज्यपालांच्या पूर्व मान्यतेशिवाय कोणताही निधी अनुशेष असलेल्या जिल्ह्यांमधून अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांकडे आणि एका विकास मंडळाच्या क्षेत्रातून दुसऱ्या विकास मंडळाच्या क्षेत्राकडे, निधी वळविता येणार नाही."[२१]

६.३.२ विभागणीयोग्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय वाटप करण्याकडे कल

राज्यपालांनी, तीनही प्रदेशांमध्ये, विभागणीयोग्य साधनसंपत्तीची विभागणी करण्यासाठी मापदंड म्हणून लोकसंख्या (सिंचन व अनुशेष निधी वजा केल्यानंतर) हा घटक निश्चित केला आहे. वार्षिक योजना (२००१-०२ ते २०१२-१३)दर्शविणारा तक्ता जोडपत्र ६.२ मध्ये पाहता येईल.

६.३.३ योजनांतर्गत व योजनेतर नियतव्ययाकडे कल

राज्याच्या अर्थसंकल्पातील योजनेतर नियतव्यय हा योजनांतर्गत नियतव्ययापेक्षा खूपच अधिक आहे. सन २००२-०३ मध्ये, एकूण खर्चातील योजनेतर खर्चाचा वाटा ९१.६ टक्के इतका अधिक होता. तथापि, अनेक वर्षांमध्ये योजनेतर खर्चाचा वाटा कमी झाला असून २०१०-२०११ मध्ये तो ७२.५ टक्के इतका होता. त्यानंतरसुध्दा, या रकमा, संपूर्ण अर्थसंकल्पाच्या दोन तृतीयांशपेक्षा अधिक होत्या. योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचा कल दर्शविणारा तक्ता जोडपत्र ६.३ मध्ये दिलेला आहे.

योजनेतर अर्थसंकल्पातील खर्चाच्या सध्याच्या वर्गीकरणाची तपासणी करण्याची गरज आहे. अशाप्रकारे, विभागांनी, योजनेतर बाबींची व नियतव्ययाची काटेकोरपणे छाननी करण्याची गरज असून नियोजन विभागानेसुध्दा, योग्य तज्ञ व्यक्तींच्या मदतीने या बाबींची छाननी करण्याची गरज आहे. कमाल नियतवाटप हे योजनांतर्गत नियतव्ययासाठी केले पाहिजे.

६.३.४ बाहेरून मिळालेला निधी/सहाय्य याचे मार्ग

केंद्र पुरस्कृत योजना, केंद्रीय क्षेत्र योजना यांअन्वये भारत सरकारकडून व बाहेरून निधी मिळालेल्या अन्य प्रकल्पाकडून प्राप्त झालेला निधी महत्त्वपूर्ण आहे. प्रदेशांच्या विकासासाठी उपलब्ध झालेल्या एकूण साधनसंपत्ती संकोषाचा चांगल्या कामासाठी उपयोग व्हावा म्हणून तीन विभागांनी केलेल्या या निधीच्या वितरणाचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. तक्ता ६.१ मध्ये केंद्र पुरस्कृत योजना, केंद्रीय क्षेत्र योजना व बाह्यत: निधी मिळालेल्या अन्य प्रकल्पांमार्फत राज्याला मिळालेल्या निधीच्या संख्येची कल्पना येते.

तक्ता ६.१

२०१२-१३ या वर्षादरम्यान मिळालेली केंद्र पुरस्कृत योजना/बाह्यत: मिळालेला निधी

(रुपये कोटीत)

अ.क्र.	योजना	बाहेरील हिस्सा	राज्याचा हिस्सा	एकूण
१	२	३	४	५
१	अर्थसंकल्पाद्वारे केंद्र पुरस्कृत योजना	५८३४	७५०	६५८४
२	अर्थसंकल्पाबाहेरील केंद्र पुरस्कृत योजना	१०९७०	२२१८	१३१८८
३	केंद्र सहाय्यित योजना	५९८८	१६७	६१५५
४	बाह्यत: अनुदानित प्रकल्प७७५	६७	८४२	
५	देशांतर्गत वित्तीय हिस्सा	७१८	२६	७४३
	एकूण	**२४२८५**	**३२२८**	**२७५१२**

स्रोत: वार्षिक योजना २०१२-१३, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन

[२१] राज्यपालांचे निदेश २०१२-२०१३ http://rajbhavan.maharashtra.gov.in

या योजनांचे नियोजन करताना प्रादेशिक समतोलाचे योग्य प्रमाण लक्षात घेणे आणि प्रदेशनिहाय व्यय व खर्च यावर संनियंत्रण करणे अत्यावश्यक आहे. तीनही प्रदेशांनी समितीने प्रस्तावित केलेल्या साधनांच्या हिश्श्याचे सूत्र शासनबाह्य निधीला लागू करावे अशी शिफारस करण्यात आली आहे.

६.३.५ निदेशांच्या अनुपालनाविषयी राज्यपालांचे अभिप्राय

राज्यपालांनी २०१२-१३ या वर्षासाठीच्या त्यांच्या निदेशांवरील सविस्तर अभिप्राय मांडले आहेत:

> *"राज्यपालांनी, वित्तीय वर्षाच्या अखेरीस पाटबंधारे विकास महामंडळाकडे खर्च न करता शिल्लक राहिलेल्या रकमेबाबत चिंता व्यक्त केली आहे. जलसंपदा विभागाने दि.१५.०३.२०१२ च्या पत्रानुसार कळविले आहे की, २००९-१० या वित्तीय वर्षाच्या अखेरीस रुपये २४३८ कोटी इतकी व २०१०-११ या वित्तीय वर्षाच्या अखेरीस रुपये ३४९६ कोटी इतकी रक्कम खर्च न करता महामंडळाकडे शिल्लक राहिली. ही शिल्लक रक्कम त्या त्या वर्षांच्या एकूण योजनेच्या आकारानुसार अनुक्रमे ३५टक्के व ४५ टक्के इतक्या प्रमाणात आहे. शिवाय,वित्तीय वर्ष २००९-१० करिता उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाच्या जलसंपदा विभागाने कळविलेल्या खर्च न करता शिल्लक रकमेत विसंगती आहे. जलसंपदा विभागाने सुरुवातीला उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाची रुपये ४६७ कोटी इतकी खर्च न झालेली शिल्लक रक्कम कळविली होती. (दि.१३.०५.२००९च्या पत्राद्वारे) नंतर ही रक्कम दि.१५.०३.२०१२ च्या जलसंपदा विभागाच्या पत्राद्वारे रुपये १००७ कोटी इतकी सुधारित करण्यात आली. राज्यपालांनी, मुख्य सचिवांना पाटबंधारे महामंडळाकडे खर्च न होता शिल्लक राहिलेल्या रकमेची कारणे आणि जलसंपदा विभागाने कळविलेल्या रकमेतील विसंगतीची कारणे देखील तपासण्याचे निदेश दिले होते. मुख्य सचिवांना याची खात्री पटवायची होती की, यासंबंधात, संबंधित विभागाद्वारे योग्य त्या उपाययोजना केल्या आहेत आणि त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल ३ महिन्यांच्या आत राज्यपालांच्या माहितीसाठी सादर करावयाचा होता. दिनांक १० मार्च, २०११ रोजीच्या राज्यपालांचे निदेश याचा परिच्छेद ३५ चे अनुपालन करताना, नियोजन विभागाने कळविले होते की, सिंचनासह सर्व क्षेत्रासाठी प्रदेशनिहाय नियतव्यय व खर्चाचा तपशील शोधण्याची यंत्रणा तयार करण्यात आली होती. ही यंत्रणा दि.१ एप्रिल, २०१२ पासून क्रियाशील होणे अपेक्षित होते. नियोजन विभागाने वित्त विभागाच्या समन्वयाने तिमाही स्वरूपात ही आकडेवारी प्रसिध्द करावी. यामुळे निदेशांची अंमलबजावणी करताना अधिक पारदर्शकता येण्यास मदत होईल. तसेच दिनांक ९ मार्च, १९९४ च्या राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे व संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या उपखंड २ (ख) च्या तरतुदींद्वारे राज्यपालांना नेमून दिलेल्या विशेष दायित्त्वाच्या कक्षेत योजनेतर विकास खर्चाचा देखील अंतर्भाव होत असल्याने राज्यपालांनी, प्रदेशनिहाय नियतवाटप व सर्व क्षेत्रांसाठीचा खर्च याबाबतचा वरील तपशील तयार करतेवेळी योजनेतर विकास खर्चाचा समावेश करण्याचे निदेश, नियोजन विभागाला दिलेले होते."*[२२]

संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये विकासाचा असमतोल दूर करण्यासाठी सांविधानिक व्यवस्था करण्यात आली. तथापि, विदर्भ व मराठवाडयाचा मागासलेपणा अद्याप तसाच आहे. याचा संबंध उर्वरित महाराष्ट्राकडे निधी (मागास प्रदेशांसाठी वाटप केलेला) वळवण्याशी जोडला आहे. राज्यपालांचे निदेश आणि नियोजन आयोगाच्या सत्यशोधन गटाचा (मे,२००६) अहवाल यांची अंमलबजावणी न करता निधी वळवण्याची बाब सिध्द झाली आहे.

राज्यपालांच्या निदेशांतील (२००९-१०) विचार :

१. नियोजन विभागाने, विदर्भाकडून पश्चिम महाराष्ट्रात निधी वळवला असल्याचा शोध घेऊन भविष्यात अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून दायित्व निश्चित करावे व कारवाईची शिफारस करावी आणि त्याचा अहवाल राज्यपालांना सादर करावा.

२. नियोजन, वित्त व जलसंपदा या विभागांच्या सचिवांचा समावेश असलेल्या समितीने, निधीचा व्यय, त्याचे वितरण व त्याचा खर्च याचे संनियंत्रण केल्यानंतर त्याचा तिमाही अहवाल राज्यपालांना सादर करावा.

३. नियोजन विभागाने, चालू असलेल्या सिंचन प्रकल्पावरील खर्च व अवधी याचा तपशीलवार अभ्यास करावा आणि सहा महिन्यांच्या आत त्या बाबतचा अहवाल राज्यपालांना सादर करावा.

४. खर्चातील तूट किंवा अधिक खर्च याचे निर्धारण करण्यासाठी नियोजन विभागाने, प्रत्येक प्रवर्गातील सर्व क्षेत्रांचा प्रदेशनिहाय खर्च स्वतंत्रपणे दाखवावा.

अशाप्रकारे संक्षिप्तपणे सांगता येतील.

राज्यपालांचे निदेश, २०११-१२ (पृष्ठ १४) यात दाखवून दिले आहे की, सिंचन निधी वळवणे, मूल्यनिर्धारण अभ्यास परिणाम आणि जास्तीचा वेळ व खर्च याबाबतची जबाबदारी निश्चित करण्याबाबतचा अहवाल अद्याप सादर केलेला नाही. राज्यपालांचे निदेश, २०१३ (परिच्छेद ३९) यामध्ये २००९ च्या निदेशांचे अनुपालन न केल्याबद्दल पुन्हा एकदा चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

नियोजन आयोगाचा सत्यशोधन गट (मे, २००६) याच्या अहवालाद्वारे साधनसंपत्ती वळवण्याला पुष्टी दिलेली आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, अधिकारी व अधिकृत शासन यंत्रणा यांना असे वाटते की, अनुच्छेद ३७१(२) च्या सांविधानिक तरतुदींनुसार अनुशेषाच्या तरतुदी व मागास प्रदेशांसाठीच्या तरतुदी मांडताना मंत्रिपरिषदेने अनुपालनाच्या संबंधात काही अंशी तरी शिस्त पाळली याचे श्रेय राज्यपालांना जाते. तथापि, प्रभावी अंमलबजावणीकरिता यंत्रणा गतिमान केलेली नाही. विदर्भ व मराठवाडयाद्वारे प्रत्यर्पित करण्यात आलेल्या वार्षिक निधीचे पूरक अर्थसंकल्पामार्फत उर्वरित महाराष्ट्राला पुन्हा वाटप करण्यात आले (पृ.१२).

प्रत्येक प्रदेशाला संवितरित केलेली रक्कम आणि मागील किमान दहा वर्षांपासून प्रत्येक प्रदेशाने केलेला प्रत्यक्ष खर्च यामधील तफावती यांवर समिती हस्तक्षेप करू शकत नाही. वित्त विभागाने स्पष्टीकरण दिले होते की, प्रदेशनिहाय खर्चाचा मागोवा घेण्याची अशी कोणतीही संपूर्ण पुरावा पध्दती २०१२-१३ पर्यंत अस्तित्वात नव्हती. आता, त्यांनी अशा प्रकारच्या खर्चाचा शोध घेण्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाज, नियतवाटप व संनियंत्रण प्रणालीची सुरुवात केली. समितीने याची नोंद घेतली होती आणि एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात निधी न वळवण्याविषयी शिफारशी केल्या होत्या.

६.४ जिल्हा क्षेत्र नियतव्यय

राज्याची वार्षिक योजना ही पुढे राज्यक्षेत्र व जिल्हाक्षेत्र योजनांतर्गत नियतव्यय यात विभागली जाते. राज्यक्षेत्र योजनांतर्गत नियतव्यय प्रामुख्याने राज्य योजनांनी बनलेला असतो, ज्याची अंमलबजावणी प्रामुख्याने राज्याच्या विभागांद्वारे केली जाते. जिल्हा क्षेत्र योजनांतर्गत नियतव्यय प्रामुख्याने जिल्हा योजनांनी बनलेला असतो. त्यासाठीच्या योजना व अर्थसंकल्प, जिल्हा नियोजन समितीद्वारे तयार करण्यात येतो. विकेंद्रीकरण व प्रक्रांती यांवरील सध्याचे विचार असे सूचित करतात की, राज्यातील सर्व जिल्हयांना राखून ठेवलेल्या जिल्हा क्षेत्र नियतव्ययाच्या आधारे साधनसंपत्तीचा पुरेसा पुरवठा होतो की नाही याबाबतची सुनिश्चिती करण्यासाठी जिल्हा योजनेच्या व्याप्तीत उत्तरोत्तर वाढ झाली पाहिजे. म्हणून, समतोल प्रादेशिक विकासाच्या संदर्भात, राज्य व जिल्हा संकोषांचा कल तपासणे महत्त्वाचे ठरते.

६.४.१ जिल्हा नियोजन यंत्रणा

महाराष्ट्राला जिल्हा नियोजनाची भक्कम परंपरा आहे. श्री.वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतानाच्या काळात शासनाने पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना तयार करण्यासाठी जिल्हा हे युनिट मानून योजना स्वीकृत केली.

[२२] राज्यपालांचे निदेश, २०१२-२०१३ http://rajbhavan.maharashtra.gov.in

या प्रयोजनार्थ नियोजन विभागाच्या दि. १.१०.१९७४ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्हयात जिल्हा नियोजन व विकास परिषद घटित केली होती. १९९८ मध्ये, संविधानाच्या ७४ व्या सुधारणेच्या अनुच्छेद २४३ यघ नुसार जिल्हा नियोजन व विकास परिषदेऐवजी जिल्हा नियोजन समिती घटित करण्यासाठी राज्याने अधिनियमिती संमत केली होती. तथापि, जिल्हा नियोजन समित्या प्रत्यक्षात २००८ मध्ये घटित झाल्यात. जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष जिल्हयाचे पालकमंत्री असतात तर जिल्हाधिकारी सदस्य-सचिव असतात. राज्य शासनाने, जिल्हा नियोजन समितीमध्ये महिला प्रतिनिधींसाठी नुकतेच ५०टक्के आरक्षण घोषित केले आहे.

विकेंद्रीकरणाच्या धोरणानुसार जिल्हा नियोजन समितीने ग्रामीण व नागरी पंचायतींच्या सहभागी योजनांची तयारी सुकर करणे आणि त्या योजनांचे एकात्मीकृत जिल्हा योजनेत एकत्रीकरण करणे अपेक्षित आहे. जिल्हा नियोजन समितीद्वारे एकत्रीकरण केलेल्या योजनेला मा.मंत्री (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बैठकीत अंतिम रूप देण्यात आले. जिल्हा योजनेचा मंजूर नियतव्यय राज्य अर्थसंकल्पात अंतर्भूत केलेला आहे. या मंजूर जिल्हा योजनांचे एकत्रीकरण करून त्या विधानमंडळाला सादर केल्या आहेत. चालू कामांसाठी प्राधान्याने निधीची तरतूद केली आहे आणि त्यानंतर नवीन कामे प्रस्तावित केली आहेत. जिल्हा योजनेखालील कामे दोन वर्षांत पूर्ण करणे गरजेचे आहे. निधीच्या पुनर्विनियोजनाचे अधिकार जिल्हा नियोजन समितीकडे सोपविण्यात आले आहेत.

६.४.२ जिल्हा क्षेत्र नियतव्यय

जिल्हा क्षेत्र संकोष हा, सर्वसाधारण योजनेचा जिल्हा नियतव्यय, जनजाति उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजना या तीन प्रमुख गोष्टींनी बनलेला आहे.

सर्वसाधारण योजना:

जिल्हा नियोजन अधिकारी हा जिल्हाधिकाऱ्याच्या अधीक्षणाखाली अर्थसंकल्पीय तसेच जिल्हा क्षेत्र नियतव्यय याचा घटक असलेल्या सर्वसाधारण योजनेचे संवितरण व संनियंत्रण करण्यात आणि जिल्हा नियोजन समितीला संपूर्णपणे निदेश देण्यात मध्यस्थाची भूमिका बजावतो. सर्वसाधारण योजनेतून विविध जिल्हयांना जिल्हा क्षेत्र निधीचे वाटप करण्यासाठीचे सूत्र तक्ता ६.२ मध्ये दिलेले आहे.

तक्ता ६.२

जिल्हा नियोजन समितीला निधीचे वाटप करण्याचे सूत्र

निकष	भारांक (%)
१	२
एकूण सर्वसाधारण लोकसंख्या	३० %
एकूण ग्रामीण लोकसंख्या	२० %
जिल्ह्याचे क्षेत्र	३० %
जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक (१-)	२० %

स्रोत: राज्य वार्षिक योजना २०१२-१३ महाराष्ट्र शासन.

जनजाती उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजना :

जनजाती उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजनेचा जिल्हा क्षेत्र नियतव्यय राज्यस्तरावरील सामाईक श्वेत पत्रिकेत प्रसिध्द केला आहे. प्रकल्प संचालक, एकात्मीकृत आदिवासी विकास प्रकल्प व जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे अनुक्रमे जनजाती उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजनेसाठी नियोजन अधिकारी असल्याचे मानण्यात आले आहे. जिल्हा क्षेत्र नियतव्ययाची संरचना आकृती ६.१ प्रमाणे आहे.

आकृती ६.१
जिल्हा क्षेत्र नियतव्ययाची संरचना
जिल्हा क्षेत्र नियतव्यय



६.४.३ महाराष्ट्रातील राज्यक्षेत्र व जिल्हा क्षेत्र यांवरील नियतव्ययाचा कल

२०१२-१३ या वर्षासाठी राज्य व जिल्हा क्षेत्र वाटपाचे प्रमाण आकृती ६.२ मध्ये पहायला मिळू शकते.

आकृती ६.२
राज्य व जिल्हा क्षेत्र खर्चाचे प्रमाणे : २०१२-१३



स्रोत: वार्षिक योजना २०१२-१३ महाराष्ट्र शासन

२००१-०२ ते २०१२-१३ या वर्षांकरिता जिल्हा नियोजन समितीने केलेल्या वाटपामधील विविधता जोडपत्र ६.२ मध्ये दर्शविली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या १९७४-७५ ते २००९-१० पर्यंत ठरविलेल्या सूत्रानुसार जिल्ह्यांमध्ये नियतव्ययाचे वाटप केलेले होते. राज्य शासनाने, २०१०-११ पासून उक्त सूत्रात सुधारणा केली. तथापि,

राज्य व जिल्हा योजना संकोषाची विभागणी करण्याची निश्चित तत्त्वे ठरविण्यात आली नाहीत. समितीने आता जिल्ह्यांकडे येणाऱ्या साधनसंपत्तीचे तल स्तर प्रमाण प्रस्तावित केले आहे.

६.४.४ गटस्तरावरील नियोजन

नियोजन व समतोल विकास यांसाठी जिल्हा हे, प्रचंड मोठे युनिट असल्याची जाणीव आता झपाट्याने होऊ लागली आहे. पुष्कळदा कृषि-हवामान, आर्थिक व सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोन याअनुसार जिल्ह्यामध्ये लक्षणीय बहुजिनसीपणा असल्याचे दिसते, ज्यामुळे एक संपूर्ण घटक म्हणून परिणामकारक योजना करणे कठीण जाते. जिल्ह्यामध्ये, महसूल प्रशासन, जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, राज्य विभागांची जिल्हा कार्यालये इत्यादींसारखी बहुविध अभिकरणे सुध्दा आहेत. या सर्व अभिकरणांमध्ये समन्वय साधला आहे किंवा नाही याची खात्री करणे कठीण जाते जेव्हा, जिल्हा साधनसंपत्तीचे अनेक गट व गावे यात वितरण केले जाते तेव्हा, जिल्हा साधनसंपत्ती अधिक विभागली जाते. अशाप्रकारे मर्यादित साधनसंपत्तीच्या प्रचंड मागणीमुळे साधनसंपत्तीचे वितरण विशिष्ट कारणास्तव केले जाते व त्यात असमानता निर्माण होते.

राज्याच्या मानव विकास निर्देशांकात सुधारणा करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने मानव विकास निर्देशांकांच्या सुधारणेसाठी २००६ मध्ये "महाराष्ट्र मानव विकास अभियान" स्थापन केले आहे. मानव विकासातील मध्यस्थ युनिट म्हणून गट स्वीकारण्यात आला आहे:

"२०११-१२ पासून मानव विकास अभियानाद्वारे राबविण्यात आलेल्या योजनांच्या उत्तम परिणामांचा विचार करता, शासनाने मानव विकासाचा घटक म्हणून "जिल्हा" याऐवजी "तालुका" याचा विचार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यातील अतिशय मागास १२५ तालुक्यांमध्ये राबविलेल्या कार्यक्रमाद्वारे मानव विकासाचा पाया विस्तृत करण्याचे ठरविण्यात आले."[२३]

क्षेत्रीय भेटींदरम्यान, विशेषत: पश्चिम महाराष्ट्राच्या बाबतीत समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, विकासाच्या अनुषंगाने जिल्हयांतर्गत लक्षणीय स्वरूपाचा बहुजिनसीपणा आहे. त्यामुळे निवडून आलेले लोकप्रतिनिधीदेखील जिल्ह्याऐवजी गटाचा नियोजनाचा घटक म्हणून विचार करण्याची आपली मागणी चारचौघांत मांडतात. वस्तुत:, हे वादप्रश्न दांडेकर समितीपुढे देखील चर्चेला आले होते.या समितीस ज्यामध्ये गट योजनेसह नियोजनाच्या निरनिराळ्या घटकांच्या मुद्यांचा सखोल परामर्ष घेतला होता, त्याचा (लालवानी) अभ्यास करण्यास अधिकृतपणे सांगण्यात आले. समिती अशा मताप्रत येऊन पोचली आहे की, नियोजनाचा घटक म्हणून गटाचा विचार करणे या टप्प्यावर शक्य होणार नाही. मात्र, जिल्हा हा पूर्णपणे बहुजिनसी आहे आणि गट हे त्यांच्या विकासाच्या स्थितीनुरूप एकजिनसी आहेत ही वस्तुस्थिती विचारात घेता, विकेंद्रीकरणाचे तत्त्व जिल्ह्यांखालोखाल गटांना देखील लागू करणे तार्कीकदृष्ट्या योग्य ठरेल. म्हणून, समितीने अशी शिफारस केली की, राज्याने प्रत्येक गटासाठी गट योजना समिती स्थापन करावी आणि साधनसंपत्तीचा भाग गट योजना समितीकडे सोपवावा. त्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी असेल आणि गटस्तरीय योजनेमध्ये समन्वय साधण्यासाठी व ती अंमलात आणण्यासाठी राज्याला उपजिल्हाधिकारी स्तरावरील अधिकाऱ्याला सदस्य सचिव व मुख्य अधिकारी म्हणून पदनिर्देशित करता येईल.

६.५ राज्य वित्त आयोगाची भूमिका

पंचायत राज संस्थेचे व स्थानिक शासनाचे वृध्दिंगत झालेले कामकाज व महत्त्व भारताच्या संविधानात त्र्याहत्तरावी व चौऱ्याहत्तरावी सुधारणा करून मांडण्यात आले आहे. झपाट्याने शहरीकरण होत असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्याने प्रशासनिक कार्ये, उत्तरदायित्वे व राजकोषीय साधनसंपत्ती यांचे विकेंद्रीकरण करून पूर्वीचे आपले अग्रस्थान पुढे चालू

[२३] वार्षिक योजना २०१२-१३ महाराष्ट्र शासन (पृ.५३)

ठेवले पाहिजे. या सुधारणेचे आशय तत्त्व अभिकरणाधारित प्रत्यायोजनाचा दृष्टिकोन व्यापक करून निश्चित उपाययोजना हाती घेऊन खऱ्या अर्थाने साकार करता येईल. शासनाच्या व नियमनाच्या आणि संसाधनी कार्यक्षमतेच्या कोणत्याही बहुस्तरीय प्रकारांमध्ये समानता व आवश्यक प्रत्यायोजन, प्रक्रांती व विकेंद्रीकरण यांचे योग्य रीतीने नियोजन केले गेले पाहिजे.

सध्या, अनेक उत्तर दायित्त्वे ही प्रचालन कार्य विभागांवर नियंत्रणाचा फारसा ताण न येऊ देता, शासनाच्या निम्न किंवा दुय्यम स्तराकडे हस्तांतरित करण्यात आली आहेत. अनेक वर्षांपासून दुय्यम स्तरीय शासनव्यवस्था समर्थ व सक्षम करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. यशस्वी व अधिकाधिक विकेंद्रीकरण यांसाठी समर्थ व प्रशिक्षित प्रशासकीय मनुष्यबळ व स्थानिक पातळीवरील जबाबदार राजकीय नेतृत्त्व उपलब्ध होणे आवश्यक आहे.

विकेंद्रीकरणामागील मुख्य हेतू विपर्यस्त करपध्दतीमध्ये अवाजवी विविधतेस परवानगी न देता, खर्चाच्या कार्यक्रमाच्या रचनेत आवश्यक ती लवचिकता आणून स्थानिक सार्वजनिक वस्तूंमध्ये 'पसंती' संबंधात विविधता अनुरूप करणे हा आहे. हे जाणून घ्यावे की, लोकसंख्येचे झपाटयाने शहरीकरण होत असल्याने निरनिराळी आकारमाने असलेल्या व स्थानिक लोकांच्या सार्वजनिक वस्तुंच्या गरजा भागविणाऱ्या नगर वसाहती निर्माण होणे अपेक्षित आहे. सर्व शहरांमध्ये, आवश्यक त्या पायाभूत सोयीसुविधांमधील गुंतवणूक झपाट्याने वाढवावी लागेल. सर्व काळ मोठ्या प्रमाणावरील भांडवल वाढवणाऱ्या सोयीसुविधा उभारताना परिरक्षित करण्याची गरज आहे आणि त्या सोयीसुविधांचे मोठया प्रमाणावर संरक्षण करावे लागेल. त्यामुळे सर्व स्तरीय, स्थानिक प्रशासनाच्या योजनेतर खर्चात पुरेशा प्रमाणावर झपाटयाने वाढ होईल. यांपैकी काही खर्चासाठी समुचित स्थानिक कर आकारून वित्तव्यवस्था करावी लागेल. त्याचबरोबर उच्च (केंद्रीय) स्तरावरील शासनाच्या महसुलातील समुचित वाटा उपलब्ध करून देण्यात यावा. भिन्नस्तरीय केंद्रीभूत महसुलाची कार्यक्षम वसुली अनिवार्यपणे प्रतिसंतुलीत करणे आणि घटनात्मकदृष्टया बंधनकारक असलेला राज्य वित्त आयोग स्थापन करून समस्तरीय समकारी सहभागिता साध्य करणे हे समंजसपणाचे आहे.

कित्येक राज्यशासने अजूनही या तत्त्वाचा मन:पूर्वक व कटिबध्द राहून विचार करताना दिसत नाहीत. यातूनच तेराव्या वित्त आयोगाने घटनात्मक तरतुदींनुरूप कामकाजाची आदर्श कार्यपध्दती करून देण्याचा व त्यास किमान चिकटून राहण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राच्या बाबतीत अन्य राज्यांच्या तुलनेत तो उल्लेखनियरीत्या वेगळा व श्रेष्ठ नसल्याचे आपल्याला दिसून येईल.

वर दर्शवल्याप्रमाणे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ग्रामीण त्याचबरोबर शहरी भागांमध्ये झपाटयाने वाढेल आणि ती वैविध्यदपूर्ण असेल. विकासात्मक स्थानिक पायाभूत सुविधांवरील गुंतवणुकीतून (योजनांतर्गत खर्चातून निर्माण झालेली बरीचशी गुंतवणूक) नेहमीच मोठया प्रमाणावर मत्तांची निर्मिती होते व त्यात वाढ होते. ही निर्मिती तशीच चालू ठेवणे व तिच्यात वाढ करणे आवश्यक आहे. प्रक्रांत होण्याच्याआधारे अशा योजनेतर खर्चांसाठी निधीची व्यवस्था करण्याकरिता समुचित यंत्रणा नसेल तर, मोठया प्रमाणावर आर्थिक ऱ्हास, अपव्यय व राजकीय तणाव निर्माण होईल. म्हणून, राज्य वित्त आयोगाची कार्यपध्दती अधिक गंभीरपणे व प्रतिसादात्मकतेने स्वीकारणे दूरदर्शीपणाचे ठरेल.

आम्ही प्रादेशिक मंडळांसाठी निरनिराळया संस्थात्मक-नि-संघटनात्मक पध्दती सुचवल्या आहेत. त्या प्रामुख्याने महसुली खर्चासह नवीन गुंतवणुकांशी (भांडवली खर्च) निगडित आहेत. प्रस्तावित आराखडयानुसार यशस्वीपणे कामकाज केल्यास ते राज्य वित्त आयोगाच्या कामकाजाशी एकसारखे व परिपूरक ठरेल. एकूण खर्चाच्या ७० ते ७५ टक्के सरासरी योजनेतर खर्च हिशेबात घ्यावा. शासनाच्या त्रि-स्तरीय योजनेतर खर्चासाठी राज्य वित्त आयोगाच्या घटनात्मक यंत्रणेमार्फत गांभीर्यपूर्वक व पध्दतशीरपणे विचार करण्याची गरज आहे.

६.६ प्रदेश हा नियोजन व विकासाचा घटक असणे.

नागपूर करारात विकासाचा एक घटक म्हणून प्रदेश अभिप्रेत आहे. "सर्व प्रकारच्या विकासाच्या व प्रशासनाच्या

प्रयोजनार्थ विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र अशा प्रकारे तीन घटक ठेवण्यात येतील."

नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण/मूल्यमापन करताना प्रत्येक प्रदेशाच्या विनिर्दिष्ट गरजा भागविण्याकडे योग्य लक्ष दिले जाते याची खात्री करून घेण्यासाठी महाराष्ट्रात तीन प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. तथापि, नियोजन आयोगाच्या विदर्भावरील सत्यशोधन समितीच्या अहवालावरून असे आढळून आले की, प्रादेशिक विकास मंडळांची विद्यमान कार्यप्रणाली उपयुक्त असली तरी ती पुरेशी नाही:

"विदर्भ व मराठवाडा या प्रदेशांचा नियोजनबध्द विकास साध्य करण्याच्या दृष्टीने सध्या स्थापन केलेली वैधानिक विकास मंडळे, ही समुचित यंत्रणा असल्याचे दिसून येत नाही."[२४]

त्याचप्रमाणे, नियोजन आयोगाच्या (भारत सरकार) कार्यक्रम मूल्यमापन संस्थेने 'महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांच्या कामगिरीचे मूल्यमापन (२००३)' हे शीर्षक असलेल्या आपल्या अहवालातून देखील प्रादेशिक विकास मंडळांबाबत विद्यमान संरचनेच्या व कामकाजाच्या विशिष्ट मर्यादा निदर्शनास आणून दिल्या आहेत. सदर मंडळे ही मूलत: सल्लागार मंडळे असून त्यांचा राज्याच्या विकास प्रक्रियेशी कोणताही थेट संबंध येत नाही हे लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नियोजन, वित्त व कार्यचालन विभागांकडून निर्णयप्रक्रिया पार पाडली जाते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, त्यांचा कार्यक्रम ठरवणे गरजेचे आहे आणि म्हणून त्यांनी दिलेले सल्ले नेहमीच प्रत्यक्ष वापरात आणण्यात येऊ नये. तसेच ही मंडळे स्वत:हून आपल्या प्रदेशाचा नियतकालिक आढावा घेऊन त्यांचा मागासलेपणा निश्चित करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सोयी-सुविधांनी सुसज्ज नाहीत. तर त्याचबरोबर त्यांच्याकडे हा अनुशेष भरून काढण्यासाठी आवश्यक रकमेचे नियतवाटप करण्याचे वित्तीय अधिकारही नाहीत. त्यापेक्षा मंडळे आपल्या ठरावांमध्ये व अहवालांमध्ये विकासविषयक मुद्दे तयार करून ठळकपणे मांडू शकतात आणि अनुशेष भरून काढणे व प्रादेशिक विषमता दूर करण्यासंबंधातील शिफारशी करण्याचे काम उत्तमप्रकारे करू शकतात.[२५]

वरील विचारविमर्शाच्या आधारे,-

१. प्रादेशिक विकास मंडळांची पुनर्रचना करणे

२. प्रदेशांकडे साधनसंपत्ती सुपूर्द करणे

३. जिल्हयांकडे अधिकाधिक साधनसंपत्ती सुपूर्द करणे

४. गटांकडे साधनसंपत्ती सुपूर्द करणे

५. योजनांतर्गत व योजनेतर विभाजनाच्याबाबतीत तर्कसंगत कारणमिमांसा करणे, आवश्यक आहे.

६.६.१ प्रादेशिक नियमनासाठी प्रस्तावित संस्थात्मक रचना

अशारीतीने, प्रादेशिक मंडळाची रचना व कार्यप्रणाली अशा दोहोंत नव्याने सुधारणा करण्याची निकड आहे. राज्यपालांनी सर्वसमावेशक निदेशक तत्त्वे जारी करूनही नियोजन प्रक्रिया केंद्रवर्ती (जिल्हा योजनेव्यतिरिक्त) राहिली आणि शिवाय प्रदेशांना नियोजन प्रकियेविषयी आपले मत मांडताच आले नाही असे पूर्ववर्ती कलमांत दिसून आले आहे. अजूनही राज्य शासनाचे विभाग व नियोजन विभाग यांच्याकडून योजना तयार करताना व त्या मान्य करून घेताना पारंपरिक कार्यपध्दती अनुसरली जात आहे. म्हणूनच, नागपूर कराराच्या खऱ्या अर्थानुसार योजनांमध्ये प्रादेशिक गरजा व आवश्यकता समाविष्ट झाल्याचे दिसून येत नाहीत. ही संपूर्ण प्रक्रिया अजूनही राज्य स्तरावरील विभागांच्या

[२४] नियोजन आयोगाचा विदर्भाच्या सत्यशोधन समितीवरील अहवाल (पृष्ठ ८६)
[२५] महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळाच्या कामगिरीचे मूल्यमापन(२००३)

कामकाजापुरतीच राहिली आहे. जरी प्रदेशनिहाय नियतव्यय दर्शविण्यात आला असला तरीसुध्दा प्रादेशिक गरजांचा समावेश करण्यासंबंधातील कोणतीही यंत्रणा नाही. वस्तुत:, प्रत्यक्षातील विकेंद्रित प्रादेशिक अभ्यास करण्यापेक्षा आकडेवारीचे विभक्तीकरण करण्याचा अधिक अभ्यास केला जातो. तसेच, शासन प्रदेशनिहाय खर्च संकलित करण्याचे प्रयत्न करीत असले तरी नियतव्ययाच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च समितीपुढे येऊ शकलेला नाही.

त्यामुळे, नागपूर कराराच्या अर्थानुरूप व आशयानुरूप तसेच राज्यपालांच्या निदेशक तत्त्वांनुसार, नियोजनबध्द कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. योजना तयार करताना व मंडळाची कार्यप्रणाली ठरविताना प्रमुख नियमन सुधारणा करूनच हे संभवनीय होऊ शकेल. राज्य स्तरावर साधनसंपत्तीचे नियतवाटप करण्याची गणितीय आकडेमोड करून केवळ समतोल प्रादेशिक विकासाचे अंतिम ध्येय साध्य होणार नाही, तर प्रादेशिक स्तरावर निधी, कार्ये व पदाधिकारी नेमूनच ते साध्य होईल. त्यासाठी समितीने पुढील तीन मुलभूत बदल सुचविले आहेत:

१. भारताचा नियोजन आयोग प्रत्येक प्रदेशासाठी विभागणीयोग्य संकोषाच्या एकत्रित रकमेच्या प्रमाणावर आधारित योजनांचे आकारमान निश्चित करीत असतो, नियोजन विभागाने प्रत्येक तीन प्रदेशांसाठीच्या योजनेचे आकारमान निश्चित केले पाहिजे. एकदा का असे झाले तर, प्रत्येक प्रादेशिक विकास मंडळ, पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करण्यास सक्षम होईल.

२. योजना तयार करणे, त्यांची अंमलबजावणी व संनियंत्रण करणे यांसाठी प्रादेशिक विकास मंडळांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे.

३. शासनाने प्रशासनिक व वित्तीय अधिकार प्रत्यायोजित करण्यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन करावी. जेणेकरून प्रादेशिक विकास मंडळाच्या यंत्रणांना योजना प्रत्यक्षात अंमलात आणणे आणि प्रादेशिक, जिल्हा व गट योजनांची श्रेणी ठेवणे शक्य होईल.

६.७ प्रादेशिक साधनसंपत्ती संकोषाचे इष्टतमीकरण

६.७.१ तीन प्रदेशांना नियतवाटप करावयाच्या विभागणीयोग्य योजनेसाठी कमाल साधनसंपत्ती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, विभागणीयोग्य नसलेल्या खर्चाचा व योजनेतर खर्चाचा अचूक अंदाज काढण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्यात यावीत. या प्रयोजनार्थ पुढीलप्रमाणे निर्देशक मार्गदर्शक तत्त्वे सुचविण्यात आली आहेत :

१. अर्थसंकल्पाच्या विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या आणि तसेच योजनांतर्गत व योजनेतर विभागांमध्ये सर्व बाबींच्या खर्चाचे वर्गीकरण करण्यासाठी समावेशक कार्यक्रम हाती घेण्यात यावा. या वर्गीकरणासाठी नियोजन विभागाची मान्यता घ्यावी आणि या वर्गीकरणांमध्ये नंतर केलेला कोणताही बदल/नंतर केलेल्या कोणत्याही सुधारणा नियोजन विभागाकडे मान्यतेसाठी सादर कराव्यात.

२. केंद्र पुरस्कृत योजनांचे/अर्थसंकल्पीत निधीचे/बाह्यत: सहाय्यित प्रकल्पांचे /राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान इत्यादी यांसारखे थेट भारत सरकार सहाय्यित कार्यक्रम यांचे नियोजन व साधनसंपत्तीचे नियतवाटप असेल तेवढया मर्यादेपर्यंत अशा योजनांसाठी घालून दिलेल्या चौकटीत समितीच्या बहु-उद्देशीय सूत्रावर आधारित असावे.

३. आंतर प्रादेशिक स्वरूपाचे खर्च स्पष्टपणे विनिर्दिष्ट केले पाहिजेत आणि भौगोलिक क्षेत्राची माहिती देऊन प्रत्यक्ष लक्ष्याची व्याप्ती ठरवली पाहिजे.

४. आंतर राज्यीय करार/लवाद/बंधने यांसंबंधातील नियतव्ययाच्या बाबतीत लाभ उपार्जित झाल्यास तो राज्यांना उपलब्ध करून देण्यात यावा.

५. राज्याची विभागणीयोग्य नसलेली आवश्यकता म्हणून योग्य मानण्यात आलेल्या कोणत्याही इतर खर्चासाठी सयुक्तीक व अपेक्षित फलनिष्पतीसुध्दा उपलब्ध करून देण्यात यावी.

६.७.२ राज्यांची साधनसंपत्ती तीन प्रदेशांकडे सुपूर्द करण्यासाठी शिफारस करण्यात आल्याप्रमाणे, प्रदेशांतर्गत विभागणीयोग्य संकोषाच्या वितरणासाठीच्या समितीच्या सूत्राचे अनुपालन करण्यात यावे.

१. एकूण योजनेतील अनुसूचित जाती उपयोजना व जनजाति उपयोजना यांसाठीचे नियतवाटप, लोकसंख्येच्या निकषांनुसार राज्याच्या स्तरावर सध्या करण्यात येत असल्याप्रमाणे वजा करावयाचे आहे. त्यानंतर बाकी रकमेच्या ३० टक्के इतक्या रकमेचे ठराविक स्तरावर संपूर्णत: जलक्षेत्रासाठी नियतवाटप करावयाचे आहे, ज्याची या समितीकडून शिफारस करण्यात आली आहे. असे केल्यावर पुढे स्पष्ट केल्याप्रमाणे जल क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांसाठी विभागणीयोग्य व विभागणीयोग्य नसलेल्या योजनांसाठी परिणामभूत रक्कम उपलब्ध करून देण्यात येते.

२. या विभागणीयोग्य संकोषातून पुन्हा ३०% इतकी रक्कम जिल्हा योजना व ३०% इतकी रक्कम गट योजना यांसाठी वजा करावयाची आहे. या दोन्ही प्रकारची साधनसंपत्ती समितीच्या सूत्रानुसार पुन्हा तीन प्रदेशांमध्ये पुनर्क्षेत्रित करावयाची आहे. उर्वरित विभागणीयोग्य संकोष साधनसंपत्ती समितीच्या तत्त्वानुसार पुन्हा तीन प्रदेशांकडे सुपूर्द करण्यात यावी.

३. जलक्षेत्र वगळता अन्य क्षेत्रांकरिता प्रत्येक प्रदेशास मिळालेल्या एकूण साधनसंपत्तीपैकी किमान ३०% इतकी रक्कम जिल्हयांकडे सुपूर्द करण्यात यावी आणि प्रादेशिक विकास मंडळाद्वारे किमान ३०% इतकी रक्कम गटांना देण्यात यावी. उर्वरित साधनसंपत्ती प्रादेशिक स्तरावरील योजनांकरिता प्रादेशिक विकास मंडळांकडे ठेवावयाची आहे. जिल्हयांसाठी साधनसंपत्तीचे संविभाजन करण्याकरिता ५०% वाटा मानव विकास निर्देशांकासाठी, २५% वाटा क्षेत्रासाठी व २५% वाटा लोकसंख्येकरिता हे सूत्र लागू करण्यात यावे.

४. राज्य मानव विकास अहवालासोबत तयार केलेला संयुक्त गट विकास निर्देशांक याचा जिल्हयातील गटांमध्ये साधनसंपत्ती संविभाजित करण्यासाठी वापर करण्यात यावा.

५. गट स्तरावर जिल्हा नियोजन समितीसारखी कोणतीही संरचना अस्तित्वात नाही. शासनाने गट नियोजन समितीची रचना करण्याची आणि गट स्तरावर राबविता येऊ शकतील अशा गट योजनांची शिफारस करण्यासाठी एक तज्ञ गट गठित करावा. शासनाला जिल्हा पातळीवरील जिल्हाधिकाऱ्याप्रमाणे गट स्तरीय योजनांचे समन्वयन करण्यासाठी व ती राबविण्यासाठी सदस्य सचिव आणि मुख्य अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी स्तरावरील अधिकाऱ्यास नामनिर्देशित करता येईल.

प्रदेशनिहाय नियोजन आणि केंद्र पुरस्कृत योजनांसाठी साधनसंपत्तीचे नियतवाटप/ अर्थसंकल्पीय निधी/बाह्य अनुदान प्राप्त प्रकल्प/राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान इत्यादींसारखे थेट भारत सरकारद्वारा सहाय्यित कार्यक्रम यांचे प्रदेशनिहाय नियोजन व साधनसंपत्तीचे नियतवाटप हे, शक्य असेल, तेवढया मर्यादेपर्यंत आणि भारत सरकारच्या एकूण मार्गदर्शक तत्त्वांनुसार समितीच्या संमिश्र सूत्रावर आधारित असावे.

६.७.३ साधनसंपत्तीच्या नियतवाटपाची प्रक्रिया

आकृती ६.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे साधनसंपत्तीचा ओघ चार स्तरीय असावा.

आकृती ६.३
प्रदेशाकडील साधनसंपत्तीचा ओघ



६.८ शासन व प्रशासनाचा घटक म्हणून प्रदेश

६.८.१ शासनाच्या रचनेतील प्रदेशांचे प्रतिनिधित्व

नागपूर कराराच्या उपखंड ६ मध्ये शासनाच्या रचनेत प्रदेशांचे समान प्रतिनिधित्व दृष्टीसमोर ठेवले आहे. उप खंडात पुढे असेही नमूद केले आहे की, शासकीय सेवांमध्येदेखील प्रदेशांचे समान प्रतिनिधित्व असावे. म्हणून,शासनाची रचना आणि शासनातील सेवा हे दोन वेगवेगळे मुद्दे म्हणून मान्य केले आहेत. याचा अर्थ असा की, राजकीय व्यवस्थेच्या संरचनेत प्रदेशांचे समान प्रतिनिधित्व असावे. १९९५ पासून राज्य मंत्रिमंडळाच्या रचनेतील प्रादेशिक प्रतिनिधित्त्वाचे विश्लेषण तक्ता ६.३ मध्ये मध्ये देण्यात आले आहे.

तक्ता ६.३
राज्य मंत्रिमंडळामधील प्रदेशांचे प्रतिनिधित्व : निर्देशक तक्ता

अ.क्र.	राज्य मंत्रिमंडळाचा कालावधी	पहिल्या मंत्रिमंडळापासून तीन प्रदेशांतील मंत्र्यांची संख्या			मंत्र्यांची एकूण संख्या
		विदर्भ	मराठवाडा	उर्वरित महाराष्ट्र	
१	२	३	४	५	६
१	२१ मार्च १९९५ (९ वी विधानसभा)	०५ (२४ %)	०४ (१९ %)	१२ (५७ %)	२१
२	ऑक्टोबर १९९९ (१० वी विधानसभा)	१० (२० %)	०८ (१६ %)	३३ (६४ %)	५१
३	नोव्हेंबर २००४ (११ वी विधानसभा)	१० (२५ %)	०६ (१५ %)	२३ (६० %)	३९
४	नोव्हेंबर २००९ (१२ वी विधानसभा)	०७ (१८ %)	०७ (१८ %)	२४ (६३ %)	३८

स्रोत : महाराष्ट्र विधानमंडळ, २०१३; टीप यशदाने तयार केलेला/संकलित केलेला तक्ता

हा तक्ता केवळ निर्देशक म्हणून आहे.

१९९५ पासून मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री या स्थानांवरील प्रादेशिक प्रतिनिधित्व पुढीलप्रमाणे आहे :

तक्ता ६.४
मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री या स्थानावरील प्रादेशिक प्रतिनिधित्व : निर्देशक तक्ता

अ.क्र.	स्थान	सरकार स्थापनेचा दिनांक व वर्ष	या तीन प्रदेशांतील मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांची संख्या		
			विदर्भ	मराठवाडा	उर्वरित महाराष्ट्र
१	२	३	४	५	६
१	मुख्यमंत्री	मार्च, १९९५			√
	उप मुख्यमंत्री	(०९ वी विधानसभा)		√	
२	मुख्यमंत्री	ऑक्टोबर, १९९९		√काही काळ	√काही काळ
	उप मुख्यमंत्री	(१० वी विधानसभा)			√
३	मुख्यमंत्री	मार्च, २००४		√	
	उप मुख्यमंत्री	(११ वी विधानसभा)			√
४	मुख्यमंत्री	मार्च, २००९		√काही काळ	√काही काळ
	उप मुख्यमंत्री	(१२ वी विधानसभा)			√

स्रोत: महाराष्ट्र विधानमंडळ, २०१३; टीप : यशदाने तयार केलेला/संकलित केलेला तक्ता.

१९९१ पासून महत्त्वाच्या मंत्री पदावरील विविध प्रदेशांमधून आणि प्रादेशिक प्रतिनिधित्व मधून मुख्यमंत्र्यांच्या कालावधीचा अधिक तपशील अनुक्रमे जोडपत्र ६.४ व जोडपत्र ६.५ मध्ये सादर केलेला आहे.

६.८.२ समन्यायी प्रतिनिधित्त्वाचा मुद्दा

समितीने, डॉ. पळशीकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ यांच्या "Reimagining Maharashtra:- Moving Towards Creative Politics: Overview and Suggestions" या अहवालाचा अभ्यास केला. त्यामध्ये तीन प्रदेशांमधील मंत्र्यांच्या महत्त्वाच्या मंत्रिमंडळ खातेवाटपाच्या मुद्यावर सविस्तर लिहिले आहे. अहवालामधील संबंधित उतारे जोडपत्र ६.६ मध्ये देण्यात आले आहेत.

असे दिसून येईल की, या सर्व तीन प्रदेशांतील मंत्री कमीजास्त प्रमाणात असले तरी, कॅबिनेट मंत्रीपदे उपभोगली आहेत. असे नमूद करता येईल की, अनेक मुख्यमंत्री हे मराठवाड्यातून होऊन गेले आहेत. तथापि, राजकीय सत्तेतील विदर्भ प्रदेशाचा सहभाग हा अगदीच कमी राहिला आहे.

नागपूर करारात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, "*सरकार तयार करण्याच्या रचनेत या तीन घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व देण्यात येईल.*" समितीने, तडजोड करण्याची वृत्ती 'महाराष्ट्राप्रती', बांधीलकी– महाराष्ट्राच्या स्वप्नांसाठी पुन्हा समर्पित होण्याची वृत्ती, महाराष्ट्राच्या पुनर्विचाराची कल्पना आवश्यक असेल" आणि प्रसंगोपात्त लबाडीपेक्षा मुत्सद्देगिरीवर आधारित राजकारण करणे देखील आवश्यक असेल (पळशीकर २०१२, पृ.७१) अशा आशयाच्या अहवालाच्या शिफारशींना पूर्णपणे पुष्टी दिली आहे. म्हणून, समिती अशी शिफारस करते की, मंत्रिमंडळातील महत्त्वाच्या खात्यांचे वर्गीकरण करून ती खाती या तीन प्रदेशांमध्ये समन्यायाने वाटून देण्यात यावीत.

६.८.३ हिवाळी अधिवेशनाच्या सत्रात विधानमंडळ व मंत्रालय नागपूर येथे हलविणे.

नागपूर करारानुसार विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे आयोजित केले जाते आणि त्या कालावधीत संपूर्ण मंत्रालय नागपूर येथे हलविले जाते. या परंपरेचे वर्षानुवर्षे सातत्याने अनुपालन करण्यात येत आहे. व्यावहारिकदृष्ट्या सोयीचे ठरावे म्हणून विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंत्रालय नागपूर येथे हलविण्यात येते. (तक्ता ६.५ पहा)

विधानसभेच्या नागपूर अधिवेशनात हाती घेण्यात येणाऱ्या मागास प्रदेशासंबंधीच्या प्रश्नांचा तपशील जोडपत्र ६.७ मध्ये दिलेला आहे.

काही कालावधीकरिता नागपूर येथे विधानमंडळ अधिवेशन आयोजित केल्याने आणि मंत्रालयाचे कामकाज तिथून चालवल्याने, मागास प्रदेशांच्या समस्यांवर मोठा प्रकाशझोत टाकणे शक्य होईल असा विचार करण्यात आला होता. तथापि, वर्षानुवर्षे या परंपरेचे पालन करूनही हे मूळ उद्दिष्ट पूर्ण झालेले आहे असे दर्शविणारा कोणताही प्रत्यक्ष पुरावा नाही. विधानसभेतील कामकाजाचे स्वरूप पाहता, केवळ मागास प्रदेशांच्या समस्यांवरच विचारविमर्श करण्याचे बंधन घालणे हे कठीण आहे. त्याचप्रमाणे, विधानमंडळाच्या अधिवेशनादरम्यान संपूर्ण मंत्रालयीन यंत्रणा ही विधानमंडळाच्या कामकाजामध्ये आधीच गुंतलेली असते.

तक्ता ६.५

काही वर्षांसाठीचा नागपूर येथील विधानसभा अधिवेशनाचा कालावधी

अ.क्र.	वर्ष	नागपूर अधिवेशनाच्या कालावधीचे दिवस
१	२	३
१	१९६०	१० नोव्हेंबर ते १६ डिसेंबर (२७ दिवस)
२	१९६२ आणि ६३	चीनच्या हल्ल्यामुळे अधिवेशन झाले नाही.
३	१९६८	१८ नोव्हेंबर ते २७ डिसेंबर (सर्वात जास्त कालावधी २८ दिवस)
४	१९७९	अधिवेशन झाले नाही.
५	१९८०	२१ जानेवारी ते १ फेब्रुवारी आणि १५ डिसेंबर ते २६ डिसेंबर (दोनदा आयोजित केले)
६	१९८५	अधिवेशन आयोजित केले गेले नाही
७	१९८६	६ जानेवारी ते २४ जानेवारी आणि २४ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर (दोनदा आयोजित केले)
८	१९८९	१६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर (सर्वात कमी कालावधी – ५ दिवस)

स्रोत: राष्ट्रकुल संसदीय संघ, महाराष्ट्र शाखा, नागपूर अधिवेशन कल्पना व वास्तव-२०१२

म्हणून, विधानमंडळाचे नागपूर अधिवेशन व मंत्रालय नागपूर येथे हलविणे या गोष्टी परस्परांशी जोडणे आवश्यक आहे. विधानमंडळ अधिवेशन लक्षात न घेता, किमान एक महिन्याच्या कालावधीसाठी १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत प्रत्येक वर्षी मंत्रालयाचे स्थलांतर करण्यात यावे. नागपूर मधून मंत्रालयाचे कामकाज करण्याची कार्यसूची, संबंधित वर्षांत उद्भवणाऱ्या मागास प्रदेशातील गंभीर प्रश्नांची पध्दतशीर सविस्तर यादी तयार करण्यात यावी.

६.८.४ राज्य सेवांमधील प्रदेशांचे प्रतिनिधित्व

या तीन प्रदेशांतील राज्याच्या मनुष्यबळाच्या विभागणीतील असमतोलाविषयी सातत्याने चिंता व्यक्त करण्यात आली आहे. असा सार्वत्रिक समज आहे की, सर्वात चांगले मनुष्यबळ उर्वरित महाराष्ट्रात केंद्रित झाले. अधिकारी, विदर्भ व मराठवाडयात नोकरी करण्यास इच्छुक नसतात. मागास प्रदेशांतील पदस्थापनेकडे एक सकारात्मक आव्हान म्हणून न पाहता, त्याकडे नेहमी एक प्रकारचे मानसिक खच्चीकरण म्हणून पाहिले जाते. शासकीय सेवायोजनातील प्रादेशिक प्रतिनिधित्वाचे एक व्यापक चित्रण जोडपत्र ६.८ मध्ये देण्यात आले आहे.

हे विचारात घेऊन, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने, विविध प्रकारची भरती करण्यासाठी वर्ग एक व वर्ग दोन अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचा कालावधी विहित करून, विभागीय संवर्गाची निर्मिती करण्याकरिता नियम तयार केले आहेत. लोकसेवा आयोगामार्फत तसेच विभागीय पदोन्नती समितीमार्फत सरळ सेवाप्रवेशाकरिता जून, २०१० रोजीच्या अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१०/सीआरआय/१०/१२ अन्वये राजपत्रात हे नियम अधिसूचित करण्यात आले आहेत. हे नियम शासनाने, संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून तयार केले आहेत. या नियमांचा विस्तृत सारांश खाली देण्यात आला आहे:

या नियमांमध्ये सहा विभागीय संवर्गांचा समावेश होतो. शासनाने विहित केलेल्या नियमांचे २ संच आहेत. एक संच सरळ सेवाप्रवेशासंबंधी आहे तर, दुसरा पदोन्नती वाटपाशी संबंधित आहे. या नियमात इतर गोष्टींबरोबरच सरळ भरती

करावयाचा उमेदवार असल्यास लोकसेवा आयोगामार्फत आणि दुसरे विभागीय पदोन्नती समितीद्वारे भरती करावयाच्या उमेदवाराच्या निवडीची प्रक्रिया विहित केली आहे.

या नियमांमध्ये निवडीनंतर विभागीय संवर्गाची वाटपाची कार्यपध्दती विहित केली आहे. या नियमांमध्ये असे देखील नमूद केले आहे की, उमेदवारांना त्यांना कोणत्या ठिकाणी नोकरी करण्याची इच्छा आहे अशा ठिकाणचा पसंती क्रम देण्यास सांगितले जाईल. पसंतीच्या संवर्गात पद उपलब्ध नसल्यास, नियमांत अशीही तरतूद केली आहे की, गुणवत्ता क्रमानुसार याच क्रमाने नागपूर पासून सुरु करून अमरावती, औरंगाबाद, कोकण, नाशिक व पुणे या सहा विभागांतील उपलब्ध रिक्त पदावर नेमणूक करण्यात येईल.

या नियमात अशीही तरतूद आहे की, या संवर्गातील पदस्थापनेचा कालावधी हा कमीतकमी असेल. दिनांक ८ जून, २०१० रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेतील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे आहेत :

"*कलम ४ :*

(क) आयोगाच्या किंवा निवड समितीच्या किंवा यथास्थिति, निवड मंडळाच्या शिफारशीनंतर गट अ व गट ब मधील पदाच्या नियुक्तीसाठी, संबंधित उमदेवाराला विभागीय संवर्गपैकी कोणतेही एक पसंतीचे ठिकाण दर्शवील.

(ख) वरीलप्रमाणे पसंती व गुणवत्ता क्रमांक विचारात घेऊन एकदा पद देण्यात आल्यास, गट–ब मध्ये नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारास किमान नऊ वर्षांचा कालावधी पूर्ण करणे आवश्यक असेल; आणि गट अ मध्ये नियुक्ती झालेल्या उमेदवाराला विभागीय संवर्गातील किमान सहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणे आवश्यक असेल..."[२६]

जोडपत्र ६.८ (एक) आणि (दोन) यांमध्ये दिलेल्या आकडेवारीचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, संपूर्ण राज्यात मनुष्यबळाचे असमान वाटप झाले आहे. शिवाय, राज्य शासनाने, मनुष्यबळाचे समन्यायतेने वाटप केले जात असल्याची खात्री करण्यासाठी पुरेसे उपाय योजलेले आहेत.

६.९ मुख्य शिफारशी

६.९.१ प्रादेशिक मंडळांची पुनर्रचना करणे.

विविध ठिकाणी आणि परिच्छेद ६.६.१ मध्ये अधिक विनिर्दिष्टपणे निदर्शनास आणून देण्यात आल्याप्रमाणे, आमच्या समितीने पुढीलप्रमाणे प्रादेशिक विकास मंडळांच्या पुनर्रचनेची व कामकाजाची कार्यकारिणीची शिफारस केली आहे:

१. संरचना :

अ.	मुख्यमंत्री	अध्यक्ष
	उप मुख्यमंत्री	उपाध्यक्ष
	प्रदेशातील वरिष्ठतम कॅबिनेट मंत्री	कार्यकारी अध्यक्ष
	कॅबिनेट मंत्री (वित्त व नियोजन)	सदस्य
	प्रदेशातील इतर कॅबिनेट मंत्री	सदस्य
	राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष	सदस्य
	राज्य मंत्री (वित्त व नियोजन)	सदस्य
	प्रदेशातील इतर राज्य मंत्री	सदस्य

[२६] दि.८ जून, २०१० रोजीची सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना.

ब.	मा.राज्यपालांनी नामनिर्देशित केलेले पुढील सदस्य	
	प्रदेशातील विधानपरिषदेचे दोन सदस्य	सदस्य
	प्रदेशातील विधानसभेचे दोन सदस्य	सदस्य
	प्रदेशातील महानगरपालिकांचे दोन महापौर	सदस्य
	प्रदेशातील जिल्हा परिषदांचे दोन अध्यक्ष	सदस्य
	प्रदेशातील नगरपरिषदांचे दोन अध्यक्ष	सदस्य
	प्रदेशातील दोन तज्ञ व्यक्ती (कोणत्याही क्षेत्रातील म्हणजेच, ग्रामविकास, नगर नियोजन, परिवहन, संपर्कता, जलसंपदा, कृषि, शिक्षण, आरोग्य, पेयजल, स्वच्छता, सामाजिक क्षेत्रे इत्यादी)	सदस्य
	प्रदेशातील सामाजिक क्षेत्रातील दोन नामवंत व्यक्ती	सदस्य
क.	अपर मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त	सदस्य सचिव

(टीप: त्या प्रदेशातील प्रत्येक जिल्ह्याला प्रादेशिक विकास मंडळात प्रतिनिधित्व मिळेल याची सुनिश्चिती केली पाहिजे. त्याचप्रमाणे महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आले पाहिजे.)

२. प्रादेशिक विकास मंडळांचे अधिकार व कार्ये

प्रादेशिक विकास मंडळाचे अधिकार व कार्ये यांमध्ये पुढील बाबीं समाविष्ट केल्या आहेत:

अ. प्रदेशाकरिता सर्वसमावेशक पंचवार्षिक यथार्थ योजना आणि प्रादेशिक वार्षिक योजना तयार करणे.

ब. या समितीने सुचविलेल्या सूत्रानुसार जिल्हे व गट यांच्याकडे योजनांतर्गत साधनसंपत्तीचे हस्तांतरण करणे.

क. जिल्हा नियोजन समित्यांनी सादर केलेल्या योजनांना तद्नुसार मान्यता देणे.

ड. प्रदेशातील विकास योजनांची अंमलबजावणी, पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे.

ई. माननीय राज्यपाल यांनी वेळोवेळी सोपवलेली कोणतीही अन्य कार्ये व जबाबदाऱ्या.

फ. राज्य शासनाने वेळोवेळी सोपविलेली कोणतीही अन्य कार्ये व जबाबदाऱ्या.

ग. प्रादेशिक विकास मंडळाची तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक होईल.

३. अधिकारप्रदत्त मंत्री गट

प्रत्येक प्रदेशासाठी त्या प्रदेशातून ज्येष्ठतम कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली अधिकारप्रदत्त मंत्री गट स्थापन करण्यात येईल व प्रदेशातील सर्व कॅबिनेट दर्जाचे मंत्री त्याचे सदस्य असतील. राज्य मंत्रिमंडळ जसे निर्णय घेतील त्याच धर्तीवर निर्णय घेण्यासाठी हा गट, आवश्यक असेल त्याप्रमाणे व तेव्हा परंतु, केवळ योजनांची अंमलबजावणी करण्याच्या त्याच्या कार्यपद्धतीनुसार, बैठक घेईल. योजनेच्या अंमलबजावणीकरिता प्रदेश विशिष्ट समस्यांवर जलदगतीने निर्णय घेणे सुलभ होण्यासाठी ही शिफारस करण्यात येत आहे. तथापि, राज्य शासनाने, अशा अधिकारप्रदत्त मंत्री गटाची कार्ये व पद्धती विनिर्दिष्ट करणारी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत.

४. प्रादेशिक सचिवालय

अ. 'अतिरिक्त मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त' म्हणून पदनिर्देशित केलेला अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाचा अधिकारी हा, प्रादेशिक सचिवालयाचा प्रमुख असेल आणि प्रादेशिक विकास मंडळाचा सदस्य-सचिव असेल.

ब. अतिरिक्त मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त यांना, राज्य शासनाच्या सचिव दर्जाचे सह प्रादेशिक विकास आयुक्त, सह सचिव, उप सचिव, कक्ष अधिकारी यांच्यासारखे मंत्रालयीन अधिकारी आणि सहायक कर्मचारीवर्ग मदत करतील.

क. प्रादेशिक विकास मंडळाशी विचारविनिमय करून, वेळोवेळी राज्य मंत्रिमंडळ, प्रादेशिक सचिवालयातील मनुष्यबळाची संख्या निश्चित करील.

ड. सध्या, मंत्रालयातील अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या कामगिरीच्या मूल्यांकन अहवालाचा संबंधित मंत्र्याद्वारे आढावा घेण्यात येतो. अतिरिक्त मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त यांच्या कामगिरीच्या मूल्यांकन अहवालाचा आढावा हा प्रादेशिक विकास मंडळाच्या कार्यकारी अध्यक्षाद्वारे घेण्यात यावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

ई. अतिरिक्त मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त यांच्या दर्जाचे आणि त्यांच्यापेक्षा कमी दर्जा असणारे कार्यासन/कक्ष अधिकारी यांच्या दर्जापर्यंतचे सर्व अधिकारी हे, (एक) याखेरीज त्याच्या पूर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्यांचे शासकीय निवासस्थान ठेवण्यास हक्कदार असतील. प्रादेशिक सचिवालयाच्या ठिकाणी उचित निवासस्थान मिळण्यास देखील हक्कदार असतील, किंवा (दोन) प्रादेशिक सचिवालयाच्या ठिकाणी उचित निवासस्थान मिळण्यास हक्कदार असण्याखेरीज, अशा पूर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी शासकीय निवासस्थानाऐवजी प्रचलित दराने घरभाडे भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

फ. अतिरिक्त मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त यांच्या दर्जाचे आणि त्यांच्यापेक्षा कमी दर्जा असणारे कार्यासन / कक्ष अधिकारी यांच्या दर्जापर्यंतचे असे सर्व अधिकारी हे, त्यांची, त्यांच्या विद्यमान दर्जापेक्षा एक दर्जा अधिक असलेल्या पदावर मंत्रालय, मुंबई येथे पदस्थापना झाली आहे असे समजून मंत्रालयातील अनुक्रमे त्यांच्या दर्जापेक्षा एक दर्जा अधिक असलेल्या अधिकाऱ्यांना लागू असलेल्या दराने सर्व लाभ / भत्ते / रोख रकमेची भरपाई मिळण्यास हक्कदार असतील.

५. प्रादेशिक विकास मंडळांच्या कार्यालयांची ठिकाणे

प्रादेशिक विकास मंडळाच्या कार्यालयांची व प्रादेशिक सचिवालयांच्या ठिकाणांबाबत पुढील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

अ) विदर्भ प्रादेशिक विकास मंडळ : नागपूर

ब) मराठवाडा प्रादेशिक विकास मंडळ : औरंगाबाद

क) उर्वरित महाराष्ट्र प्रादेशिक विकास मंडळ : नाशिक

६. वित्तीय शिफारशी

प्रदेशांमध्ये वितरण करण्यासाठी विभागणीयोग्य साधनसंपत्ती म्हणून जास्तीत जास्त साधनसंपत्तीचे वाटप करण्याबाबत प्रयत्नाची शिकस्त करण्यात यावी. मागील १० वर्षांमधील कल पाहता असे निदर्शनास येते की, एकत्रित विभागणीयोग्य संकोषाचे प्रमाण हे किमान ६० टक्के एवढे आहे. साधनसंपत्तीची विभागणी ही राज्यपालांच्या नियमावलीतील नियम ७(५) च्या अनुरूप करण्यात यावी. परंतु, एकत्रित विभागणीयोग्य संकोषाचे प्रमाण हे ६० टक्के पेक्षा कमी असू नये. तथापि, अंदाजे ४० टक्के साधनसंपत्ती ही राज्यात वितरण करण्यासाठी ठेवावयाची असली तरीही आणि अशा विभागणीयोग्य नसलेल्या साधनसंपत्तीचे प्रदेशनिहाय वाटप व खर्च हा, शक्य तितक्या मर्यादेपर्यंत, प्रत्येक अर्थसंकल्पात दर्शविण्यात यावा.

एकदा अशी साधनसंपत्ती प्रादेशिक विकास मंडळांच्या उपयोगासाठी ठेवण्यात आल्यानंतर, ती त्या वित्तीय वर्षात जरी खर्च करण्यात आली नसली तरी, ती इतर प्रदेशांकडे वळविण्यात येऊ नये. ही रक्कम, पुढे नेलेली रक्कम (roll on money) म्हणून पुरविण्यात यावी आणि शासनाने, ती रक्कम त्या प्रदेशामध्ये वापरण्यात आली आहे याबाबतची खात्री करून घेण्यासाठी समुचित वित्तीय यंत्रणा विकसित करावी.

अ. एकूण योजनेपैकी, अनुसूचित जाती उपयोजना व जनजाती उपयोजना यांचे वाटप हे, सध्या करण्यात येते त्याप्रमाणे लोकसंख्येच्या निकषांनुसार राज्य स्तरावर वजावट करून करावयाचे आहे. त्यानंतर, या समितीने शिफारस केल्याप्रमाणे संपूर्ण पाणी क्षेत्रासाठीचे वाटप हे अशा उर्वरित पाणी क्षेत्राच्या ३० टक्के एवढ्या निश्चित पातळीपर्यंत करावयाचे आहे.असे केल्यानंतर, पुढे स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे पाणी क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांसाठी विभागणीयोग्य आणि विभागणीयोग्य नसणाऱ्या योजनांसाठी असा परिणामस्वरूप निधी उपलब्ध असेल.

ब. या एकत्रित विभागणीयोग्य संकोषामधून पुन्हा ३० टक्के एवढ्या निधीची जिल्हा नियोजनासाठी व ३० टक्के एवढ्या निधीची गट नियोजनासाठी कपात करावयाची आहे. या दोन्ही प्रकारच्या साधनसंपत्तीचे समिती सूत्रानुसार या तीनही प्रदेशांना पुन्हा पुनर्वाटप करावयाचे आहे. उर्वरित विभागणीयोग्य साधनसंपत्ती तीनही प्रदेशांना समितीच्या सूत्रानुसार पुन्हा हस्तांतरित करावयाची आहे.

क. पाणी क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांसाठी प्रत्येक प्रदेशाला मिळालेल्या एकूण साधनसंपत्तीपैकी, किमान ३० टक्के एवढी साधनसंपत्ती जिल्ह्यांना व किमान ३०टक्के एवढी गटांना, प्रोदशिक विकास मंडळांकडून हस्तांतरित करावयाची आहे. उर्वरित साधनसंपत्ती, प्रादेशिक स्तरावर नियोजन करण्यासाठी प्रादेशिक विकास मंडळांकडे राखून ठेवावयाची आहे. ५० टक्के महत्त्व असलेला मानव विकास निर्देशांक, २५ टक्के महत्त्व असलेले क्षेत्र व २५ टक्के महत्त्व असलेली लोकसंख्या याचे सूत्र हे, जिल्ह्यांसाठी असलेल्या साधनसंपत्तीचे संविभाजन करण्यासाठी लागू करण्यात येईल. तथापि, तद्नंतर, प्रदेशांनी, तीनही प्रदेशांना साधनसंपत्ती हस्तांतरित करण्यासाठी समितीच्या सूत्राच्या धर्तीवर, जिल्ह्यांमध्ये साधनसंपत्तीचे संविभाजन करण्यासाठी सूत्र विकसित करावे.

ड. राज्य मानव विकास अहवालाबरोबर तयार केलेला संयुक्त गट विकास निर्देशांक, जिल्ह्यातील गटांमध्ये साधनसंपत्ती संविभाजित करण्यासाठी वापरण्यात यावा.

ई. गट स्तरावर, जिल्हा नियोजन समितीसारखी कोणतीही संरचना नाही. शासनाने, गट नियोजन समिती आणि गट स्तरावर कार्यान्वित करता येऊ शकतील अशा गट योजना यांच्या संरचनेची शिफारस करण्यासाठी तज्ञ गट स्थापन करावा. जिल्हा स्तरावरील जिल्हाधिकाऱ्याप्रमाणे, राज्य, गटस्तरावरील योजनेचे समन्वय व कार्यान्वयन करण्यासाठी सदस्य-सचिव व मध्यस्थ अधिकारी म्हणून

उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी पदनिर्देशित करू शकेल.

फ. समितीने शिफारस केली असेल त्याप्रमाणे, योजना तयार करताना, योजनांतर्गत वाटपाचे विविध "तल स्तर" (क्षेत्रीय, उपक्षेत्रीय व भौगोलिक) तसेच "निश्चित स्तर" हे, सर्व विभागांसाठी बंधनकारक असले पाहिजे.अशा तयार केलेल्या प्रादेशिक योजना या, राज्य शासनाद्वारे अंतिमरीत्या मंजूर करण्यात येतील.

ग. साधनसंपत्तीच्या अशा "तल स्तरांचे" (क्षेत्रीय, उपक्षेत्रीय) तसेच "निश्चित स्तरांचे" वाटप केल्यानंतर, संबंधित नियोजन प्राधिकरणे, सर्वसाधारण व राज्य / प्रदेश / जिल्हे किंवा यथास्थिति गट यांच्या सर्वसाधारण व एकूण नियोजनासाठी– अशा संबंधित नियोजन प्राधिकरणांद्वारे निश्चित करण्यात येईल अशा प्राथम्यक्रमानुसार उर्वरित साधनसंपत्तीचे वाटप करण्यास मोकळे असतील.

ह. राज्यातील योजना चार स्तरीय असतील, त्या म्हणजे राज्यस्तरीय योजना, प्रादेशिक स्तरावरील योजना, जिल्हास्तरीय योजना व गटस्तरीय योजना. या योजना निश्चित करण्यासाठी तज्ञ समिती स्थापन करावी.

आय. मंडळाकडून शिफारस केलेल्या अशा योजनांना, संबंधित मूळ विभागांशी विचारविनिमय करून अंतिम रूप देण्यात यावे. सर्व तांत्रिक सहाय्य मूळ विभागाकडून पुरविण्यात यावे. या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठीचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार, प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयांकडे योग्यरीतीने हस्तांतरित करावेत.

ज. गट योजनांसाठी – गट स्तरावरील कार्यकर्त्यांना अधिकार प्रदान करावेत.

के. विभागीय आयुक्तांची विद्यमान संस्था ही, विभागीय किंवा उपप्रादेशिक स्तरावर कार्य करण्याचे चालू ठेवील. परंतु, ती, प्रादेशिक विकास मंडळे व प्रादेशिक सचिवालयांच्या संपूर्ण मार्गदर्शनानुसार, प्रादेशिक विकास सुलभ होण्यावर मुख्य लक्ष केंद्रित करील.

६.९.२ प्रकल्प मूल्यांकन मंडळाची स्थापना

विकासाचा वेग वाढविण्यासाठी, राज्याकडून अतिरिक्त गुंतवणूक करणे आवश्यक असेल, व राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमाअंतर्गत कर्ज घेण्यासाठी जर मध्यवर्ती कार्यालय (headroom) असेल तर ते शक्य होईल. यामुळे प्रादेशिक विकासासाठी साधनसंपत्तीत वाढ करण्यास मदत होईल. साधनसंपत्तीच्या विभागणीकरिता असलेल्या समितीच्या सूत्रामध्ये, शक्य असेल तेथवर, कर्ज घेणे यासह एकूण साधनसंपत्तीचा समावेश असावा. हे साध्य करण्यासाठी, विवक्षित विचारार्थ विषयांसह प्रकल्प मूल्यांकन मंडळाची स्थापना करण्याचे आम्ही प्रस्तावित केले आहे.

केंद्रिय योजना साधनसंपत्तीप्रमाणेच, हे अत्यावश्यक आहे की, कर्जाद्वारे उभारण्यात आलेली साधनसंपत्तीदेखील, जरी ती सरकारी अर्थसंकल्पाचा भाग असली तरी, प्रादेशिक मागासलेपणाचे परस्परसंबंध विचारात घेऊन, न्याय्यरीतीने, प्रदेशांकडे हस्तांतरित करण्यात यावी. वस्तुत: राजकोषीय उत्तररदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००३ याच्या कक्षेत राहून कर्ज घेण्यासाठी, राज्याकडे साधन उपलब्ध असल्यामुळे, प्रकल्प विनिर्दिष्ट कर्ज घेण्यासाठी राज्य विचार करू शकते. असे कर्ज घेणे हे, अशा प्रदेशांच्या व संपूर्ण राज्याच्या देखील विशिष्ट विकासाच्या गरजांसाठी शक्य असू शकते. त्यासाठी कर्ज घेण्याद्वारे उभारण्यात आलेली अशी साधनसंपत्ती ही, राज्याच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या संदर्भात विशिष्ट विकासाच्या फलनिष्पत्तीसाठी उभारण्यात आली आहे, हे तत्त्व त्याच्या मूळाशी असावे. अशाप्रकारे, विविध विभाग, योजना व कार्यक्रम यांना अर्थसंकल्पाद्वारे अशा प्रकारे कर्जाऊ घेतलेल्या साधनंसपत्तीचे कमी प्रमाणात पुनर्वाटप करण्यापेक्षा, विशिष्ट क्षेत्रे निश्चित करता येऊ शकतील. जेणेकरून, केंद्रीभूतरीतीने साधनसंपत्ती उभारता येईल व ती खर्च करता येईल. अशाप्रकारे, दिलेली विकास धोरणे विचारात घेता, अशी अपेक्षा करण्यात येत

आहे की, राज्याने विनिर्दिष्ट उद्देशित (intervention) प्रकल्प तयार करावेत व वाढीव कर्जाचा वापर करून प्रकल्पांसाठी साधनसंपत्ती उभारावी.

६.९.२.१ प्रकल्प मूल्यांकन मंडळाची कार्ये

प्रकल्प मूल्यांकन मंडळाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :

१. सक्षम प्राधिकरणाने मान्यता देण्यासाठी रुपये ५०० कोटींपेक्षा अधिक असलेल्या एकूण गुंतवणुकीसह सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांच्या शिफारशी करणे.

२. सामाजिकदृष्ट्या वर्धनक्षम पण महत्त्वाच्या सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांच्या निधीमधील वाढती तफावत भरून काढण्यासाठी पर्याप्त निधी देण्याची शिफारस करणे.

३. सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांसाठीच्या शासनाच्या कर्जावर जाणीवपूर्वक लक्ष ठेवणे.

४. प्रकल्पांच्या व्यवस्थापनामध्ये आवश्यक असेल त्या त्या वेळी '***मध्यावधी***' (mid-term) दुरुस्त्या करून घेणे.

अभिवृद्धी कार्यतंत्रांच्या प्रचालनाच्या संदर्भातच **केवळ** विनिर्दिष्ट प्रकल्पांकरिता कर्ज घेण्यात आले आहे याची खात्री करून घेण्यासाठी मंडळाने मदत केली पाहिजे. मंडळाने केवळ रुपये ५०० कोटींपेक्षा अधिक रकमेच्या प्रकल्पांबाबत कार्यवाही केली पाहिजे. अशा प्रकल्पांचे मूल्यांकन व प्रशासन यांमध्ये हे मंडळ महत्त्वाची भूमिका बजावेल. ते, (मंडळ) अशा प्रकल्पांकरिता एक खिडकी निपटाऱ्याची तरतूद करील. ते (मंडळ) सदर प्रकल्पाकरिता दूरदर्शी कर्जाची (prudent borrowing) सुनिश्चिती करील. मंडळाला सार्वजनिक – खाजगी भागीदारीच्या करारात्मक शर्तींमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार असला पाहिजे. प्रकल्प मूल्यांकन मंडळ हे, प्रकल्पांच्या वर्धनक्षमतेची व संबंधित प्रदेशांच्या उपयोजन क्षमतेची देखील तपासणी करील आणि सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मंत्रिमंडळाकडे किंवा समुचित सक्षम प्राधिकरणाकडे अग्रेषित करील. सुरुवातीस, मंडळाने, रस्ते, रेल्वे (लोहमार्ग), मेट्रो, विमानतळ, बंदरे, ऊर्जा, मोठे पाटबंधारे प्रकल्प आणि नागरी पायाभूत सुविधा यांसारख्या मर्यादित क्षेत्रांसंबंधात कार्यवाही केली पाहिजे. परिणामत: प्रदेशांच्या आवश्यक असलेल्या गरजांचा समावेश करण्यासाठी त्याची व्याप्ती वाढविता येऊ शकेल.

६.९.२.२ प्रकल्प मूल्यांकन मंडळाची रचना

मुख्य सचिव	अध्यक्ष
अतिरिक्त मुख्य सचिव आणि संबंधित प्रदेशाचा प्रादेशिक विकास आयुक्त	सदस्य
अतिरिक्त मुख्य/ प्रधान सचिव/ सचिव (नियोजन)	सदस्य
अतिरिक्त मुख्य/ प्रधान सचिव/ सचिव (वित्त)	सदस्य
अतिरिक्त मुख्य/ प्रधान सचिव/ सचिव (विधि व न्याय विभाग)	सदस्य
अतिरिक्त मुख्य/ प्रधान सचिव/ सचिव (संबंधित विभागाचे)	सदस्य

तीन तज्ञ व्यक्ती (त्यापैकी एक बँकिंग, व्यवस्थापन आणि तांत्रिक पार्श्वभूमी असलेली)	सदस्य
सह/ उप सचिव (नियोजन विभाग)	सदस्य-सचिव

६.९.३ राज्य सांख्यिकी मंडळाची स्थापना

विकासात्मक प्रश्नांचे योग्य नियोजन व पुनरीक्षण करण्यासाठी आकडेवारीच्या समावेशक, अद्ययावत आणि पडताळणी केलेल्या संचाची उपलब्धता ही पूर्वावश्यकता आहे. समितीला विचारविनिमय करीत असताना, विचाराधीन प्रश्नांचे विश्लेषण करण्यासाठी व त्यांवर अनुमान काढण्यासाठी, सुयोग्य (निकोप) आधारसामग्रीच्या उपलब्धतेबाबतच्या असंख्य अडचणी आढळून आल्या. तसेच, सर्वसाधारण जाणीव अशी आहे की, राज्याच्या आकडेवारीचा खरेपणा हा, नेहमीच शंकामुक्त नसतो.

सध्या, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (डीइएस) ही, विविध प्रकारची सांख्यिकी आकडेवारी गोळा करणे, तिचे परिरक्षण करणे, तिचे विश्लेषण करणे व ती प्रसिद्ध करणे यांकरिता राज्य स्तरावरील नोडल (मध्यवर्ती) एजन्सी आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची विभागीय तसेच जिल्हा कार्यालये आहेत. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने संकलित केलेली बहुसंख्य आधारसामग्री, क्षेत्र अधिकाऱ्यांकडून पुरविली जाते किंवा विविध विभागांच्या व्यवस्थापन माहिती यंत्रणा (एमआयएस) कडून गोळा केली जाते. आधारसामग्री गोळा करण्याच्या यंत्रणेवर अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे फारच कमी प्रमाणात नियंत्रण आहे. यामुळे आधारसामग्रीच्या विधिग्राह्यतेचे व विश्वसनीयतेचे प्रश्न उद्‌भवतात.

केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाने, राज्य सांख्यिकीय यंत्रणांचे बळकटीकरण करण्यासाठी तयार केलेला सर्वसमावेशक प्रकल्प म्हणून भारत सांख्यिकी बळकटीकरण प्रकल्पाची स्थापना केली आहे. हा प्रकल्प आणि विशेषत: राज्य व उप-राज्य स्तरांवरील धोरणात्मक नियोजनाच्या प्रयोजनांकरिता, विश्वसनीय सांख्यिकी (आकडेवारी) गोळा करण्यासाठी, तिचे संकलन करण्यासाठी आणि तिचा प्रसार करण्यासाठी सांख्यिकीय क्षमतेत व पायाभूत सुविधेत सुधारणा करण्याकरिता पुरेसे तांत्रिक व वित्तीय सहाय्य पुरवील. या उपक्रमांतर्गत, विशेषत:, राज्य देशांतर्गत उत्पादन, भांडवल निर्मिती व बचती, जिल्ह्यांतर्गत उत्पादन, स्थानिक संस्थांचे (अंशदान), प्रमुख राजकोषीय चलघटक, उद्योगधंद्यांचे वार्षिक सर्वेक्षण करणे, औद्योगिक उत्पादनांचा निर्देशांक, घाऊक किंमत निर्देशांक, ग्राहक किंमत निर्देशांक, आरोग्य व आरोग्य काळजी उपयोजन, रोगटपणा, मृत्यु व कुटुंब कल्याण सांख्यिकी, अनुसूचित जाती विकास, आदिवासी विकास, शिक्षण व साक्षरता सांख्यिकी, कामगार व रोजगार सांख्यिकी, गृहनिर्माण सांख्यिकी, जन्म/मृत्यु नोंदणी व लोकसंख्या, वीज निर्मिती व वितरण सांख्यिकी, पर्यावरण व वन सांख्यिकी, परिवहन सांख्यिकी आणि स्थानिक क्षेत्र नियोजनाबाबतची सांख्यिकी, इत्यादींसारख्या प्रमुख निश्चित सांख्यिकीय निर्देशकांच्याबाबतीत, राज्य स्तरावरील आधारसामग्रीची विश्वसनीयता, समयोचितता आणि विश्वासार्हता, अपेक्षित आहे.

याशिवाय, आयएसएसपीने, शासनाच्या वेगवेगळ्या निवडक योजनांसह विविध विकास योजनांचे नियोजन, संनियंत्रण आणि पुनरीक्षण करण्याकरिता आवश्यक असलेली आधारसामग्री निर्माण करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करणे व अभिक्रिया करणे, अपेक्षित आहे. देशातील सांख्यिकीय यंत्रणांचे बळकटीकरण करण्यासाठी सांख्यिकी संकलन अधिनियम, २००८ देखील संमत केला आहे.

या संदर्भात, समिती अशी शिफारस करते की, पुढीलप्रमाणे व्यापक उद्दिष्टांसह राष्ट्रीय सांख्यिकीय आयोगाच्या धर्तीवर, प्रधान सचिव स्तरांवरील अधिकारी प्रमुखपदी असलेले राज्य सांख्यिकीय मंडळ स्थापन करावे:-

१. अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता महत्त्वाच्या सांख्यिकी अडचणी शोधून काढणे;

२. प्रमाणित सांख्यिकीय वर्गीकरण व पद्धतिमीमांसा विकसित करणे आणि किमान दर्जाविषयक मानके तयार करणे;

३. महत्त्वाची आकडेवारी गोळा करण्यासाठी, तिचे कोष्टक तयार करण्यासाठी आणि तिचा प्रसार करण्यासाठी प्रभावी कार्यतंत्रे विकसित करणे;

४. विविध प्रश्नांबाबत राज्य शासनाला सहाय्य करण्यासाठी कार्य गटांची स्थापना करणे;

५. राज्य शासनाचे विविध विभाग आणि एजन्सी यांच्यामध्ये सांख्यिकीय समन्वय साधणे;

६. समतोल प्रादेशिक विकासाच्या संनियंत्रणाकरिता आवश्यक असलेल्या सर्व मापदंडांची व निर्देशकांची प्रदेशनिहाय सांख्यिकी आकडेवारी ठेवणे;

७. राष्ट्रीय सांख्यिकीय आयोगाशी समन्वय साधणे;

८. राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील अशी महत्त्वाची कामे हाती घेणे.

६.९.४ समतोल प्रादेशिक विकासाकरिता सार्वजनिक धोरण व्यासपीठ

पुरावा आधारित धोरण निश्चिती ही, कोणत्याही प्रदेशाच्या समतोल व शाश्वत विकासाची गुरूकिल्ली आहे. ही एक जगभरात स्वीकारलेली बाब आहे की, अशा धोरण निश्चितीसाठी संशोधन/मूल्यमापन तसेच विविध हितसंबंधितांसोबत विचारविनिमय, या घटकांची आवश्यकता आहे. अनेक देशांमध्ये, पुरावा आधारित धोरणे निश्चित करण्याकरिता राज्याला सहाय्य करण्यासाठी, समर्पित संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. धोरण तयार करण्याची अशाप्रकारची ही प्रक्रिया, प्रातिनिधिकपणे, विद्यमान धोरणे/ कार्यक्रम यांचे मूल्यमापन, सुधार/ सुधारणा करण्याची गरज निर्धारित करणे, अशा सुधारणांकरिता उपलब्ध असलेले विकल्प/ पर्याय शोधून काढणे, प्रत्येक पर्यायाची सुसाध्यता/ सामाजिक मूल्य-लाभ/ सामाजिक-राजकीय सुगमता इत्यादी निर्धारित करण्यासाठी, त्यांचे पद्धतशीरपणे विश्लेषण करणे, आणि त्यानंतर निवडक विकल्पांचे पथदर्शन करणे, हितसंबंधितांसोबत चर्चा करणे आणि राज्याद्वारे अंतिम निर्णय घेण्यासाठी अंतिमत: धोरणात्मक रूपरेषा सुचविणे, यांसारख्या पद्धतशीर उपाययोजनांचे अनुसरण केले जाते.

आज, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही एक प्रचंड अर्थव्यवस्था आहे आणि ती कालानुरूप अधिक मोठी व अधिक गुंतागुंतीची होत असल्यामुळे विकासविषयक धोरणे तयार करणे फारच आव्हानात्मक होईल, आणि परिणामी, प्रश्न (समस्या) व पर्याय या बाबी बहु-व्यापक व परस्पर संबंधित झाल्याने, अधिक ज्ञानाधारित धोरणे व उपाय यांचे प्रचलन करण्याची आम्हाला गरज पडेल. नागरीकरण प्रक्रियेतून उद्‌भवणारी नवीन आव्हाने आणि हवामानात होणारा बदल किंवा पर्यावरणविषयक दडपण ही, अशा उद्‌भवणाऱ्या गुंतागुंतीची प्रमुख उदाहरणे आहेत.

या संदर्भात, हितसंबंधितांमधील चर्चेची माहिती देणे सुकर होण्यासाठी, तसेच धोरणात्मक निवडी, विकल्प व पर्याय यांची सुधारणा करण्यासाठी प्रश्नांचे संशोधन-आधारित विश्लेषण खूपच महत्त्वाचे ठरेल. सध्या, आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेस भेडसावत असलेल्या किंवा भेडसावणाऱ्या प्रश्नांवर विकासविषयक संशोधन करण्यास चालना देण्यामध्ये महाराष्ट्र पुरेशी गुंतवणूक करीत नाही. आमच्या समितीचे कार्य चालविण्यासाठी देखील, आम्ही महाराष्ट्रातील विद्यापीठे व संशोधन संस्था यांच्या सहभागाने नव्याने अभ्यास केला. परंतु, हा केवळ एकदाच करावयाचा अभ्यास होता आणि तो भविष्यकालीन आव्हानाचा सामना करण्यासाठी पुरेसा ठरणार नाही. आम्हाला अधिक पद्धतशीर व शाश्वत संस्थात्मक चौकटीची (ढाच्याची) गरज आहे.

म्हणून, राज्यात सार्वजनिक धोरणविषयक अधिष्ठान तयार करण्याकरिता द्वीमार्गी दृष्टीकोनाची आम्ही शिफारस करतो :

१. सार्वजनिक धोरण संस्था.

२. महाराष्ट्र विकास संशोधन परिषद.

६.९.४.१ सार्वजनिक धोरण संस्था

पद्धतशीर धोरणात्मक मूल्यन, धोरणात्मक विश्लेषण आणि धोरणात्मक शिक्षण हाती घेण्यासाठी, राज्य पातळीवर एका सार्वजनिक धोरण संस्थेची स्थापना केली पाहिजे. ही कामे करण्यासाठी, संस्थेत तीन विभिन्न विभाग (शाखा) असावेत. मूल्यन, विश्लेषण आणि शिक्षण या कामांचे एकात्मीकरण करण्याच्या दृष्टीने, संस्थेत सर्व प्रमुख क्षेत्रांकरिता राज्य पातळीवरील संसाधन केंद्रे असावीत. जी, संबंधित क्षेत्रांतील धोरणे व कार्यक्रम यांच्या अखंड परिष्करणाबाबतचे काम करतील. सदर संस्थेत, नियामक मंडळापासून संसाधन केंद्रांतील विद्याशाखांपर्यंत सर्व पातळ्यांवरील, अनुभवी शासकीय अधिकारी आणि स्वतंत्र विद्याविषयक तज्ञ व्यक्ती यांचे दक्ष संधायक असले पाहिजे.

सदर संस्थेत, संतुलित प्रादेशिक विकासास वाहून घेतलेले एक युनिट देखील असू शकेल, ते प्रादेशिक विकास मंडळांना धोरणसंबंधातील सहाय्य पुरवील आणि शासनाच्या प्रादेशिक संस्थांच्या कार्यक्रमांसाठी देखील मार्गदर्शन करील.

६.९.४.२ महाराष्ट्र विकास संशोधन परिषद (एस.डी.आर.सी):

सदर परिषद, विकास संशोधन क्षेत्रांचे धोरणात्मक प्रश्न शोधून काढील आणि उच्च दर्जाच्या संशोधनाची सुनिश्चिती करण्यासाठी महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठे व संशोधन संस्था यांना निधींचे वाटप करील. संबद्ध विषयांवरील स्वतंत्र दर्जात्मक संशोधनाखेरीज, परिषदेत तिच्या स्वतंत्र संनियंत्रणाच्या अनिवार्य सुविधा आणि शासकीय (केंद्र सरकारसह) योजनांच्या मूल्यमापनाचा देखील समावेश असेल. या प्रयोजनाकरिता, महाराष्ट्र विकास संशोधन परिषद, असे मूल्यमापन करण्यासाठी, स्वतंत्र विद्याव्यासंगी आणि संशोधन संस्था/विद्यापीठे यांचा शोध घेईल. म्हणजेच, ही बाब स्वतंत्र मूल्यमापक कार्यालयाचे (आयईओ) अनुकरण करील, जी एक प्रमाणित उत्तम पद्धती असून जी आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आयएमएफ) सारख्या आंतरराष्ट्रीय संघटना आणि नियोजन आयोग यांसारख्या राष्ट्रीय संघटना यांच्या कामकाजातून दिसून येऊ शकेल, त्याप्रमाणे प्रचलित असेल. मध्यम-मार्ग दुरूस्तीच्या माहितीसह धोरणकर्त्यांना मदत करण्याखेरीज, ही बाब, शासकीय धोरणे आणि कार्ये यासंबंधातील लोकांच्या बाजूने असलेला विश्वास/ विश्वसनीयता कमी करण्यासाठी मदत करील असा संकेत देखील पाठविता येईल आणि सुशासनास मदत करील.

या परिषदेचे, कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ हे अध्यक्षस्थानी असणाऱ्या, एका स्वतंत्र व वेगळ्या विश्वस्त मंडळाद्वारे नियमन करण्यात यावे. प्रादेशिक विकास मंडळांचे कार्यकारी अध्यक्ष आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे, या परिषदेचे, पदसिद्ध-सदस्य असतील आणि एखादी विख्यात विद्याव्यासंगी व्यक्ती ही, या परिषदेची सदस्य-सचिव असली पाहिजे. प्रस्तावित महाराष्ट्र विकास संशोधन परिषदेस, ही एक विकास संशोधन निधी पुरवठा करणारी एजन्सी म्हणून योजिलेले आहे आणि परिषदेकडे स्वत:चा कमी संख्येचा कायमस्वरूपी कर्मचारीवर्ग असला पाहिजे. उच्च दर्जाच्या विकास संशोधनास निधी पुरविण्यासाठी प्रारंभिक स्थायी दान निधी रुपये २०० कोटी किंवा त्या आसपास असू शकेल. पुणे विद्यापीठ, गोखले इन्स्टिट्यूट, भारतीय शिक्षण संस्था, एसएनडीटी महिला विद्यापीठ, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, सिंबायोसिस विद्यापीठ, यशदा, महाराष्ट्र तंत्रज्ञान संस्था इत्यादींसारखा व्यापक संस्थात्मक पाया असल्याने, पुणे हे ठिकाण महाराष्ट्र विकास संशोधन परिषदेच्या मुख्यालयासाठी आदर्श ठिकाण असेल.

६.९.५ प्रादेशिक नियमन संस्था

संभाव्य साधनसंपत्ती व साधनसंपत्ती आणि प्रदेशांतील प्रचलित असणाऱ्या प्रदेश विशिष्ट संधी या बाबी विचारात घेऊनच केवळ समतोल प्रादेशिक विकास करणे शक्य आहे. समितीने तीन प्रदेशांकरिता विकास कार्यतंत्र अभ्यास केला होता. असे अपेक्षित आहे की, प्रादेशिक विकास मंडळे ही, त्यांच्या पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करताना, या अभ्यासांच्या निष्कर्षाचा वापर करतील. तथापि, प्रदेश विशिष्ट कार्यतंत्रे, धोरणे, कार्यक्रम व योजना विकसित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विशेष ज्ञान संपादित करणे ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. प्रादेशिक विकास मंडळांना केवळ राज्याच्या योजना निधींतील साधनसंपत्तीच्या उपलब्धतेच्या आधारावरच कार्यतंत्रे विकसित करावी लागतील असे नव्हे तर, खाजगी क्षेत्रांकडून देखील गुंतवणुका आकर्षित कराव्या लागतील आणि प्रदेशातील वाढीस चालना देण्यासाठी प्रदेश विशिष्ट धोरणात्मक उपक्रम देखील हाती घ्यावे लागतील. सदर जे प्रदेशातील लोकांना कमाल लाभ आणि परतावा देतील असे कार्यक्रम व योजना यांमधील उपलब्ध असलेल्या दुर्मिळ साधनसंपत्तीचा उपयोग करणे, ही प्रादेशिक विकास मंडळांची मुख्य जबाबदारी असेल. म्हणून, प्रादेशिक विकास मंडळांना त्यांच्या कामात, संस्थात्मक सहाय्य व विशेष ज्ञान मिळणे आवश्यक असेल.

विद्यमान प्रादेशिक मंडळांना देखील, योजनांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या प्रक्रियेचे सुसूत्रीकरण करण्याची व संहिताकरण करण्याची गरज आहे. शासकीय योजनांची परिणामकारकता ही, केवळ साधनसंपत्तीवर नव्हे तर मनुष्यबळाच्या उपलब्धतेसह संपूर्ण नियमनावर देखील अवलंबून आहे. म्हणून, असे प्रस्तावित करण्यात आले आहे की, प्रत्येक प्रदेशात शासनाची प्रादेशिक संस्था स्थापन करण्यात यावी, जी प्रत्येक प्रदेशाचा समतोल विकास सुकर करण्यासाठी सातत्याने संशोधन, संनियंत्रण, मूल्यमापन, अभिनव उपक्रमांसाठी मार्गदर्शन धोरणांचा पुरस्कार आणि निर्वाचित प्रतिनिधी आणि अधिकारी यांची क्षमता वृद्धी इत्यादी कार्ये हाती घेईल.

६.९.६ प्रदेशांत महत्त्वाची सरकारी कार्यालये स्थापन करणे

राजधानी म्हणून नागपूरचे महत्त्व कायम राखणे हा नागपूर कराराचा महत्त्वाचा पैलू आहे. दांडेकर समितीने अशी शिफारस केली होती की, सर्व संचालनालये नागपूर येथे स्थलांतरित करण्यात यावीत, पण असे झाले नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाचे कार्यान्वयन पाहणारे नवीन आयुक्तालय नागपूर येथे निर्माण करण्यात आले आहे ही एक चांगली कार्यवाही आहे.

शासनाने शक्य होतील तितकी विद्यमान संचालनालये पुण्याहून नागपूर येथे स्थलांतरित करावीत. म्हणून, कोणतीही नवीन संस्था/ संचालनालये यापुढे नागपूर किंवा औरंगाबाद येथे निर्माण करण्यात यावीत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, शहर आणि उद्योग विकास महामंडळ (सिडको), महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ इत्यादीं सारखी काही विद्यमान सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे त्रिभाजन करण्यात यावे आणि त्यांनी स्वतंत्र संस्थांसारखे काम करावे आणि त्यांना संपूर्ण स्वायत्तता देण्यात यावी. राज्याने सर्वंकष अभ्यास हाती घेणे व सर्व अशा सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमांचे आणि संघटनांचे शेअर घेणे आणि स्वायत्त संघटनांची निर्मिती करणे आवश्यक आहे. महत्त्वाच्या कार्यालयांचे स्थलांतर कालबद्ध रीतीने करण्यात यावे.

६.९.७ इतर शिफारशी

१. काही योजनांचे, योजनांतर्गत योजना म्हणून पुनर्वर्गीकरण करण्याची गरज आहे, जेणेकरून जास्तीत जास्त विकासविषयक योजनेतर खर्च, योजनांतर्गत विकासात्मक साधनसंपत्ती संकोषाचा भाग बनेल. म्हणून, विभागांनी योजनेतर म्हणून ठेवण्यात आलेल्या बाबींची आणि नियतव्ययाची कसून छाननी करण्याची गरज आहे

आणि सुयोग्य तज्ञांच्या मदतीने नियोजन विभागाने सुद्धा या बाबींची छाननी करावी.

२. व्यवहार्य असेल तोपर्यंत आणि बाह्य निधीकरण अभिकरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या चौकटीत राहून, या समितीने प्रस्तावित केलेले साधनसंपत्ती सहभागिता सूत्र याआधारे सर्व प्रदेशांसाठी तरतूद केलेल्या बाह्य निधीत समन्याय वाढ करणे अत्यावश्यक आहे.

३. राज्याच्या साधनसंपत्तीतील विभागणीयोग्य नसलेल्या संकोषाच्या बाबी सिद्ध केल्या पाहिजेत आणि नियोजन विभागाने प्रत्येक विभागासाठी राज्यपालांच्या नियमांच्या नियम ७(५) अनुसार काटेकोरपणे निश्चित केल्या पाहिजेत. एकदा का ह्या बाबी नियोजन विभागाने सिद्ध केल्या की, कोणत्याही एका विभागास वर्गीकरणामध्ये एकतर्फी बदल करता येणार नाही.

४. एकदा का संपूर्ण योजना निधी विशिष्ट प्रदेशाला संविभाजित केला गेला की, प्रदेशासाठी उपलब्ध करून देण्यात यावा आणि आणखी नियोजन करणे हा प्रादेशिक विकास मंडळांचा अनन्य परमाधिकार असावा. या साधनसंपत्तीसाठी कोणतेही केंद्रीभूत विभागीय नियोजन असणार नाही.

५. प्रादेशिक विकास मंडळांना परिणामकारकपणे योजना पार पाडणे शक्य होण्यासाठी, शासनाने प्रशासकीय आणि वित्तीय अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी तज्ञ गटाची स्थापना करावी.

६. अशी शिफारस करण्यात आली आहे की, नागपूर कराराला चालना देण्यासाठी तीन प्रदेशांत महत्त्वाच्या मंत्रालयांचे समन्यायपणे विभाजन करण्यात यावे.

७. नागपूर करारात असे नमूद करण्यात आले आहे की, काही ठराविक कालावधीसाठी शासन अधिकृतपणे नागपूरला स्थलांतरित होईल आणि दरवर्षी राज्य विधानमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूरमध्ये घेण्यात येईल. त्यानुसार दरवर्षी मंत्रालय १ ते ३१ डिसेंबर या निश्चित कालावधीसाठी नागपूरला स्थलांतरित करावे. संबंधित वर्षात उद्‌भवलेले मागास प्रदेशांचे महत्त्वाचे प्रश्न यांची पद्धतशीर सूची करून नागपूरहून काम करण्याची मंत्रालयाची कार्यसूची आगाऊ निश्चित करण्यात यावी.

८. राज्य वित्त आयोगाचे बळकटीकरण करण्याची आवश्यकता आहे आणि त्याच्या शिफारशींची अंमलबजावणी सर्वतोपरि प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे.

६.१० केंद्र सरकारच्या भूमिकेसंबंधात शिफारशी

समितीला असे वाटते की, राज्याच्या समतोल आणि सर्वंकष विकासासाठी राज्य शासन मुख्यत: जबाबदार असले तरी, केंद्र सरकारला देखील महत्त्वाची भूमिका बजावयाची आहे. समितीला उद्योग, खनिकर्म, वन आणि पर्यावरण, रस्ते आणि वस्त्रोद्योग इत्यादींसारख्या काही क्षेत्रांमध्ये मोठ्या पायाभूत विकासांत अडथळे / त्रुटी दिसून आल्या आहेत. राज्याच्या या क्षेत्रांच्या अभ्यासातून असे उघडकीस आले आहे की, या क्षेत्रात भारत सरकारने हस्तक्षेप करण्याची गरज आहे. ज्यामुळे समतोल प्रादेशिक विकासास चालना मिळण्यास मदत होईल.

६.१०.१ उद्योग आणि खनिकर्म

महाराष्ट्र हे, देशातील ज्याचा एकूण देशांतर्गत उत्पादनात सर्वात मोठा वाटा आहे असे अत्यंत मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण आणि सर्वांत जास्त दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांपैकी एक राज्य आहे. महाराष्ट्राने नुकतेच नवीन औद्योगिक धोरण, २०१३ घोषित केले आहे, ज्यात दरवर्षी यथायोग्य अर्थसंकल्पीय नियतवाटप करून राज्य शासनाकडून औद्योगिक पायाभूत विकासासाठी पाठबळ देण्यात येणार आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्राचा विकास करण्यासाठी, केंद्रीभूत आणि नवीकृत प्रयोग करण्यात येत आहेत. तथापि, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या विभागणीवरून असे दिसून येते की, जवळ जवळ ८०% सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम हे पुणे, नाशिक आणि

(मुंबईसह) कोकण प्रदेशांत स्थित आहेत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम मंत्रालयाची सूक्ष्म व लघु उपक्रम समूह विकास कार्यक्रम योजना आणि औद्योगिक धोरण प्रचालन विभागाची औद्योगिक पायाभूत सुविधा श्रेणीवाढ योजना, उद्योग आणि पणन मंत्रालय समूह दृष्टिकोनाचा अवलंब करतात आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या औद्योगिक समूहांना सामाईक सुविधा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतात. या योजनांतर्गत, चाचणी प्रयोगशाळा, वेष्टन (पॅकेजिंग) सुविधा, प्रशिक्षण सुविधा, सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे इत्यादींसारखी सामाईक सुविधा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांना अत्यावश्यक सुविधा सहज प्राप्त होण्यासाठी, त्यांच्या खर्चात व वेळेत बचत होण्यासाठी आणि त्यांची उत्पादन क्षमता आणि उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी मदत होते. राज्यात ज्ञात असलेल्या ७५ समूह योजना आहेत आणि १६ समूह योजनांना रुपये ४४१ कोटी इतक्या प्रकल्प खर्चासह मान्यता देण्यात आली आहे.

१. तथापि, सर्व समूह योजना एकाच समान गतीने प्रगती साध्य करीत नाहीत. ***म्हणून, भारत सरकारने समूह स्थापन करणे, समजुतीने मध्यस्थी करणे आणि प्रकल्प पूर्ण करणे या विविध टप्प्यांवर कोणतीही कालमर्यादा लादू नये. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम समूह विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत एका समूह योजनेसाठी देण्यात आलेल्या निधीची रक्कम दुसऱ्या समूह योजनांसाठी देण्यात आलेल्या निधीच्या खर्चाशी ताडून पाहू नये.*** यामुळे, महाराष्ट्राच्या औद्योगिकदृष्ट्या मागास प्रदेशात नावारूपास येणाऱ्या विविध समूहांना प्रोत्साहन मिळेल आणि त्यांचे परिपोषण होईल.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये 'सहकारी औद्योगिक वसाहती' स्थापन करण्यात आल्या आहेत आणि त्यांनी राज्याच्या औद्योगिकरणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ***केंद्र सरकारच्या एकात्मीकृत पायाभूत सुविधा विकास योजनेचा लाभ 'सहकारी औद्योगिक वसाहतीं' च्या प्रस्तावांसाठीही विस्तारित करण्यात यावा.*** हा लाभ केवळ राज्य शासनाच्या मालकीच्या औद्योगिक वसाहतींना देण्यात येत आहे.

३. ***चंद्रपूर जिल्ह्यातील आणखी औद्योगिकरणाची मागणी आणि वाव पाहता त्या प्रदेशातील नवीन उद्योग चालू करण्यावरील निर्बंध उठविण्यात यावेत. वन जमिनींच्या संदर्भात उद्योगांना पर्यावरणीय मंजुरी देण्याची प्रक्रिया जलद गतीने पार पाडण्याची आवश्यकता आहे. उद्योगांना २०,००० चौ.फूट आणि त्याहून अधिक बांधीव क्षेत्रासाठी पर्यावरण व वन मंत्रालयाची मंजुरी मिळविण्यासाठी जी तरतूद केली आहे ती निश्चित करून ही मर्यादा १ लाख चौ. फूटांपर्यंत आणण्याची आवश्यकता आहे.***

४. राष्ट्रीय गुंतवणूक आणि उत्पादन झोन हे आणखी एक असे क्षेत्र आहे जेथे भारत सरकारच्या धोरणामुळे विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांचा विकास करताना सहाय्य मिळेल. उमरेड-कुही यांसारख्या विभागीय राष्ट्रीय गुंतवणूक आणि उत्पादन झोनमुळे या मागास प्रदेशाच्या विकासावर मोठा परिणाम होईल. दिल्ली-मुंबई औद्योगिक विकास पट्ट्याचा भाग म्हणून धुळे आणि शेंद्रा बिडकीन (औरंगाबाद) केंद्रस्थानी विशाल औद्योगिक पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, त्यामुळे पुन्हा या मागास प्रदेशाच्या औद्योगिकरणात पाहिजे तेवढी वाढ करता येईल. मराठवाडा आणि विदर्भात आणखीन असे राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन झोन विकसित करण्याची गरज आहे. ***महाराष्ट्राला "जागतिक दृष्ट्या स्पर्धात्मक उत्पादक केंद्र" बनविण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या किमान ५०% हिस्सा देऊन केंद्र सरकारने आपले आर्थिक सहाय्य वाढवावे.***

६.१०.२ खनिकर्म

खनिकर्म आणि खनिजे अधिनियम, १९५७ याच्या कलम ९ अनुसार भारत सरकारद्वारे कोळसा, लोखंड, बॉक्साईट इत्यादींसारख्या मुख्य खनिजांचा स्वामित्व दर निश्चित करण्यात आला आहे. राज्याला कोळशामुळे एकूण ८० टक्के स्वामित्व मिळते. कोळसा आणि लिग्नाईट यांसाठी निश्चित केलेला स्वामित्व दर बाजारमूल्याच्या अनुक्रमे १४

टक्के आणि ६ टक्के आहे, तर नैसर्गिक तेल आणि नैसर्गिक वायू यांसाठी निश्चित केलेला स्वामित्व दर बाजारमूल्याच्या अनुक्रमे २० टक्के आणि १५ टक्के इतका आहे. *कोळसा उत्खननाचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊन प्रदूषण होत असल्याने, पर्यावरणीय प्रदूषणाच्या प्रतिकूल परिणामास तोंड देण्यासाठी, कोळसा आणि लिग्नाईटचे स्वामित्व दर अनुक्रमे नैसर्गिक तेलाच्या आणि नैसर्गिक वायुच्या स्वामित्व दरांप्रमाणेच असावेत अशी शिफारस करण्यात आली आहे. तसेच ० ते ५ हेक्टर खनिकर्माचे क्षेत्र प्राधिकरणाची मंजुरी घेण्यापासून वगळण्याची देखील शिफारस करण्यात आली आहे. कारण बहुतांश खनिकर्म क्षेत्र पूर्व विदर्भात येत असल्याने समतोल विकास साधण्यासाठी विदर्भातील मागास प्रदेशास त्यामुळे मदत होईल.*

६.१०.३ वन आणि पर्यावरण

सध्या, शासकीय प्रकल्पांसाठी गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांत ५ हेक्टरपर्यंत आणि इतर प्रदेशांत १ हेक्टरपर्यंत वन निर्मूलन मंजुरी, राज्य शासनाकडून देण्यात येते त्याचप्रमाणे १ ते १० हेक्टरच्या शासकीय प्रकल्पांसाठीची वन निर्मूलन मंजुरी भोपाळ येथील प्रादेशिक वन कार्यालयाकडून देण्यात येते. हे क्षेत्र विकास प्रकल्पांसाठी फारच छोटे आहे आणि त्याच्या मंजुरीसाठी प्रदीर्घ कालावधी लागतो आणि त्यामुळे विलंब होऊन प्रकल्पाच्या खर्चात मोठी वाढ होते. *त्यामुळे असे सुचविण्यात आले आहे की, क्षेत्र मानकांत शिथिलता आणावी आणि परिव्यय प्रभावी जलदगती विकास साध्य करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणांना जास्त अधिकार देण्यात यावेत.* तथापि, विकासविषयक कामांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात येऊ नये आणि अशा कृतींना प्रोत्साहन देण्यात येऊ नये.

६.१०.४ खाजगी वने

१९७५ च्या अधिनियमान्वये वन क्षेत्रे असणाऱ्या खाजगी मालकीच्या जमिनी काढून घेण्यात आल्या आणि त्या वन खात्याकडे सुपूर्द करण्यात आल्या, ज्या पुन्हा १९७८ मध्ये परत करण्यात आल्या. तथापि, १९९० मध्ये वन क्षेत्र असणाऱ्या खाजगी मालकीच्या जमिनीबाबतची मंजुरी मिळविण्याचा अधिकार केंद्र सरकारच्या दिल्ली कार्यालयाकडे निहित केला होता. *म्हणून, खाजगी जमिनीच्या विकासावरील सरसकट बंदी उठविण्यात यावी आणि संपूर्ण व्यवस्थापन राज्य शासनाद्वारे हाताळण्यात यावे, कारण तीनही प्रदेशांतील वनांचे प्रकार लक्षात येण्याजोगे वेगवेगळे आहेत आणि नेमका त्याचमुळे राज्याच्या विकासावर परिणाम होत आहे.*

६.१०.५ झुडपी जंगले

कोणत्याही अधिनियमात '*झुडपी जंगले*' या संज्ञेची व्याख्या करण्यात आलेली नाही. तथापि, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, गोंदिया आणि वर्धा या ६ जिल्ह्यांमध्ये गावकरी त्यांच्या सामाजिक गरजांसाठी वापरत असलेली सरकारी जमीन ही सर्वसाधारणपणे मोठ्या झाडांनी व्यापलेली नसून झुडपांनी (खुरटी झुडप) व्यापलेली आहे, ज्यांना '*झुडपी जंगले*' म्हणून ओळखले जाते. या जमिनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० द्वारे संरक्षित आहेत. महाराष्ट्र शासनाने भारत सरकारकडे पुढील प्रस्ताव विचारार्थ पाठविले आहेत:-

१. *वन व्यवस्थापन, विकास आणि संवर्धन यांसाठी योग्य असल्याचे आढळून आलेली ९२,११६ हेक्टर झुडपी जंगले ही, वन अधिनियम, १९२७ अन्वये संरक्षित वने म्हणून अधिसूचित करण्यात यावीत. (यापैकी १६,३१० हेक्टर याआधीच संरक्षित वने म्हणून अधिसूचित केली आहेत.)*

२. *खाली नमूद केल्याप्रमाणे वन व्यवस्थापनासाठी योग्य नसलेली ८६,४०९ हेक्टर झुडपी जंगलाची जमीन निरधिसूचित करण्यात यावी आणि महसूल विभाग निर्णय घेईल त्याप्रमाणे वनेतर प्रयोजनासह कोणत्याही प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.*

३. *भारत सरकारने वन संवर्धन अधिनियमान्वये ही ८६,४०९ हेक्टर जमीन त्या जमिनीवर पूरक*

वनीकरणाच्या शर्तीचा आग्रह न धरता, सुलभ केलेल्या एकत्रीकृत प्रस्तावाद्वारे ती निरधिसूचित करण्याची परवानगी देण्यात यावी.

हे उक्त प्रस्ताव भारत सरकारच्या विचाराधीन आहेत आणि त्यावर लवकरात लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे.

६.१०.६ संरक्षित क्षेत्र

पायाभूत सुविधांच्या विकासाच्या सर्व क्षेत्रांसाठी सर्वात मोठा अडसर म्हणजे वन निर्मूलन मंजुरी हा आहे, ज्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागतो आणि त्याचा प्रदेशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. भारत सरकारकडून त्वरेने मंजुरी मिळणे आवश्यक आहे. अशा सर्व जंगलांना मंजुरी देण्यात यावी. अशाप्रकारे सर्व मंजुरी आदेश जास्त करून केंद्र सरकारच्या अखत्यारित घेतले जातात. ***अशा मंजुरीसाठीचे गुणवत्तेवर आधारित असलेले अधिकार भोपाळ कार्यालयाकडे प्रत्यायोजित केल्यास त्यामुळे पायाभूत प्रकल्पांची विशेषकरून विदर्भात जलदगतीने अंमलबजावणी करण्यासाठी नक्कीच मदत होईल.***

६.१०.७ पर्यावरण

औद्योगिक वाढ रोखणारी कडक सागरी विनियमन क्षेत्राची मानके यांवरील चर्चा आज महाराष्ट्राच्या बाबत लागू होते. सागरी विनियमन क्षेत्राची अंमलबजावणीचा परिणाम विकासाच्या दिशेत बदल होण्यात होईल आणि ती उद्योगांसाठी विनियमित करण्यात यावी. किनारी प्राधिकरणाने किनारी क्षेत्राच्या विकासाची शिफारस केली आहे. प्राधिकरणाने किनाऱ्यांवर रस्त्यांना मंजुरी दिली आहे. मात्र क्षेत्राची सुरक्षा लक्षात घेऊन पुन:प्रापण करण्यास भराव टाकण्यास मंजुरी दिलेली नाही. किनारी प्राधिकरणाने वाणिज्येतर विकासासाठी हमी घेऊनच केवळ पायाभूत सुविधांसाठी (भराव टाकून) पुन:प्रापण करून किनारी मार्गासाठी शिफारस केली आहे. महाराष्ट्रात ३ विकास नियंत्रण विनियम (DCR) कार्यान्वित आहेत. विकास नियंत्रण विनियम, १९६७, विकास नियंत्रण विनियम, १९९१ आणि विकास नियंत्रण विनियम, २०१२. ***विनियम त्वरेने लागू करण्याकरिता या सर्व विकास नियंत्रण विनियमांचे सुसूत्रीकरण करणे ही आजची गरज आहे..***

प्रमाणितता व पर्यावरणीय मंजुरी यासाठीची भारत सरकारची भूमिका आम्ही जाणतो आणि अशी अपेक्षा करतो की, --

१. ***पश्चिम घाट अहवालावर त्वरेने निर्णय घ्यावा.***

२. ***बांधकाम व स्थावर संपदा प्रकल्प यांतील बांधीव क्षेत्राची २०,००० चौ.मी. ची मर्यादा किमान १,००,००० चौ.मी. बांधीव क्षेत्रापर्यंत वाढविण्यात यावी.***

३. ***शासकीय प्रकल्प / बीज प्रकल्प प्राथम्याने मान्य करण्यात यावेत.***

६.१०.८ रस्ते

प्रादेशिक विकासास गती देऊ शकतो अशी काही अत्यंत महत्त्वाची रस्ते जोडणी अद्याप प्रस्थापित करावयाची आहे. राज्याच्या दक्षिण भागात व पूर्व भागात, जो देशाचा मध्यवर्ती भाग देखील आहे मार्गाचे जाळे नसणे आणि राष्ट्रीय महामार्गांना जोडला जाणारा पूर्व-पश्चिम जोडणी रस्ता नसणे हे राज्याच्या समतोल विकासातील अद्याप मोठे अडथळे आहेत. समितीने अशा सुस्थितीत नसलेल्या रस्ते जोडण्या निश्चित केल्या असून पुढीलप्रमाणे सूचीबद्ध केल्या आहेत :

रत्नागिरी-नागपूर रस्त्याचा काही भाग रस्ते विकास योजना १९८१-२००१ मध्ये प्रमुख राज्य महामार्ग-३ म्हणून आणि रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये प्रमुख राज्य महामार्ग म्हणून निर्देशित केलेला होता. आता, २०१३

मध्ये रत्नागिरी ते सोलापूर (३६९ कि.मी.) हा जोडमार्ग राष्ट्रीय महामार्ग- १६६ म्हणून घोषित केला होता. सोलापूर ते तुळजापूर (४० कि.मी.) हा जोडमार्ग यापूर्वीच राष्ट्रीय महामार्ग-२११ म्हणून घोषित केलेला आहे आणि तुळजापूर ते नागपूर (४९५ कि.मी.) हा जोडमार्ग राष्ट्रीय महामार्ग-३६१ म्हणून २०१३ मध्ये घोषित करण्यात आलेला आहे. या रस्ते जोडण्या अद्याप राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्पात अंतर्भूत करावयाच्या आहेत आणि त्यामुळे त्या चारपदरी करण्याचे काम हाती घेता येत नाही. सध्याची संरचना मानके विचारात घेता, ९०४ कि.मी. असलेल्या रत्नागिरी ते नागपूर पर्यंतचा चारपदरी मार्गाचा एकूण खर्च अंदाजे रुपये १३,५००/- कोटी इतका असेल. या महामार्गाचे विविध भाग राष्ट्रीय महामार्गात रूपांतरित करताना हा राष्ट्रीय महामार्ग महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशातून जाणार असल्याने आणि महाराष्ट्राच्या सर्व प्रमुखेतर बंदरे यांना देखील जोडणारा असल्याने संपूर्ण प्रदेशाच्या समतोल विकासाची सुनिश्चिती होईल. हा राष्ट्रीय महामार्ग २०१७ पर्यंत पूर्ण होण्यासाठी रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम देखील प्राथम्याने हाती घेण्यात यावे. ***वस्तुत: रत्नागिरी ते नागपूर पर्यंतचा संपूर्ण पट्टा द्रुतगतीमार्ग प्रवर्गात रूपांतरित करण्याची गरज आहे.***

किनाऱ्यालगतच्या विविध बंदरांसह किनारी क्षेत्राचा विकास यापूर्वीच सुरू झालेला आहे. कोकणातील ही बंदरे, लहान पूर्व पश्चिम जोडमार्ग विकसित करून, जे सध्या अवजड बंदर वाहतुकीसाठी तयार केलेले नसतील, ते मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाला म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग-१७ ला जोडले जाऊ शकतात. असे २० जोडमार्ग आहेत ज्यांसाठी मोठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. राज्याच्या बंदरविषयक धोरणामध्ये खाजगी विकासकाने बंदर हद्दीपासून ते जवळच्या राष्ट्रीय महामार्गापर्यंत ६/८ पदरी सिमेंट क्रॉंक्रीट रस्ता बांधण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. आतापर्यंत तीन बंदरांचा विकास करण्यासाठी केवळ तीन बंदर विकासक पुढे आले आहेत. १७ जोडमार्गांचा विकास करण्याचे उर्वरित काम, जर केंद्र सरकारने पुरेसे वित्तीय सहाय्य वाढवून दिले तर राज्य शासन हाती घेऊ शकते.

६.१०.९ कृषि (पणन)

कृषि मालासाठी किमान आधारभूत किंमत केंद्र सरकारने ठरविलेली आहे आणि ती संपूर्ण देशासाठी सारखी आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेस, मुख्य अन्नधान्य उत्पादक राज्यांकडून मोठ्या प्रमाणात अन्नधान्य पुरवठ्याची आवश्यकता आहे (आणि विशेषकरून अन्न सुरक्षा अधिनियम लागू केल्यानंतर याची अधिक आवश्यकता असेल) ज्यामुळे राज्याबाहेर झालेल्या हाताळणी व वाहतुकीचा खर्च प्रचंड आहे आणि अन्नधान्य अर्थसहाय्याच्या स्वरूपात तो भारतीय अन्न महामंडळाना देण्यात आला आहे. राज्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेची आवश्यकता भागवण्याच्या मर्यादेपर्यंत किमान राज्यातील शेतकऱ्यांना उच्चतम किमान आधारभूत किंमत दिली जाऊ शकते. ज्यातून (एक) शेतकऱ्यांचा थेट लाभ होईल (दोन) उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहनांकरिता तरतूद करता येईल (तीन) मध्यस्थांची नफेबाजी कमी करता येईल (चार) जास्त अंतराच्या वाहतुकीवरील निष्फळ खर्च टाळता येईल (पाच) स्थानिक क्षेत्रासाठी हाताळणीच्या स्वरूपात आणि कमी अंतराची वाहतूक करण्याविषयी संधी निर्माण करता येतील.

६.१०.१० वस्त्रोद्योग

महाराष्ट्र हे अंदाजे ७० लाख गासड्यांचे वार्षिक उत्पादन करणारे दुसरे मोठे कापूस उत्पादक राज्य आहे. राज्यात फक्त २० टक्के गासड्यांवर प्रक्रिया केली जात असल्याने उत्पादन व प्रक्रिया यामध्ये मोठी तफावत राहते. राज्य शासन सर्व कापूस प्रक्रिया क्षेत्रांना म्हणजे कताई, विणाई, प्रक्रिया व कापड उत्पादन यांना उत्तेजन देत आहे. ३६ सहकारी सूत गिरण्यांमधील १४ लाख चातींची बांधकामाधीन असलेल्या आणखी ९ लाख चातींसह सध्याची क्षमता आवश्यकतेहून खूपच कमी असेल. ***म्हणून आम्ही कताई क्षेत्रात अधिकाधिक मागणी असल्याने क्षेत्रीय खर्चाची मर्यादा काढून टाकण्याची शिफारस करतो. महाराष्ट्र शासनाने २०१२-१३ मध्ये नवीन वस्त्रोद्योग धोरण सुरू केले असून राज्यातील संपूर्ण कापूस उत्पादनावर प्रक्रिया करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे आणि म्हणून***

गुंतवणूकविषयक वातावरण सुधारण्यासाठी तंत्रविज्ञान श्रेणीवाढ निधीबाबतची अनिश्चितता दूर करणे आवश्यक आहे. शिवाय, वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगार निर्माण करण्याची मोठी क्षमता आहे त्यामुळे मुख्यत: विदर्भ व मराठवाडा प्रदेशांच्या कापूस उत्पादक क्षेत्रांतील लोकांच्या आर्थिक स्थितीत थेट सुधारणा होईल.

६.१०.११ विमानचालन क्षेत्र

डावा जहालमतवाद (नक्षलवाद) यामुळे विकासावर परिणाम होत आहे आणि राज्याच्या गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये विशेष कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी, अशा दुर्गम क्षेत्रांत राज्याकडून एकतर विमानतळ किंवा धावपट्टी विकसित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ***समितीने अशी शिफारस केली आहे की, केवळ विमानतळ/ धावपट्टी उभारण्यासाठी नव्हे तर अशा डावा जहालमतवाद बाधित क्षेत्रांतून आकस्मिक स्थलांतर खर्चासाठीदेखील भारत सरकारने खर्चाच्या ५० टक्के इतका हिस्सा द्यावा.***

६.१०.१२ निष्कर्ष

प्रादेशिक असमतोल दूर करताना तसेच भविष्यात राज्याच्या समतोल विकासाची सुनिश्चिती करताना, भारत सरकारचा सहभाग संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये गर्भित असल्याचा निष्कर्ष काढता येतो. ज्यामुळे विकास प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो त्याकरिता काही महत्त्वाच्या अधिनियमांमध्ये सुधारणा करून केंद्र स्तरावर काही गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्याची आवश्यकता असेल आणि हा खर्च भागविण्यासाठी राज्याला काही अतिरिक्त निधी आगाऊ देण्याचीदेखील आवश्यकता असेल. असे करण्यासाठीचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे, क्रमवर्ती केंद्रीय वित्तीय आयोगाच्या 'विचारार्थ विषयाची' व्याप्ती अशाप्रकारे वाढविणे की, त्यामुळे आयोगाच्या शिफारशींवर प्रादेशिक असमतोलाच्या मुद्यासाठी समुचित रीतीने योजना तयार करता येतील. आमच्या समितीने केलेली ही शिफारस भारत सरकार लवकरात लवकर विचारात घेईल, अशी आम्ही आशा बाळगतो.

❖❖❖

प्रकरण ७

आदिवासी क्षेत्रे: वचनपूर्ती

७.० प्रस्तावना

देशातील आदिवासींपैकी मोठ्या संख्येने आदिवासी लोक महाराष्ट्रात राहतात. २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या १,०५,१०,२१३ इतकी आहे. ही लोकसंख्या राज्याच्या लोकसंख्येच्या ९.३५ टक्के इतकी आहे.

राज्यातील लोकसंख्येचा बहुतांश वंचित व दुर्लक्षित घटक असणारे हे आदिवासी लोक आहेत. स्थूलमानाने ते राज्यातील सह्याद्री, सातपुडा व पूर्व गोंडवाना या तीन दुर्गम, डोंगराळ व आडवळणी वन क्षेत्रांमध्ये राहतात. जोडपत्र ७.१ मधील नकाशामधून असे दिसते की, राज्याच्या परिघी क्षेत्रात ही वसतिस्थाने आहेत. अशाप्रकारे भौगोलिक दूरते मुळे आदिवासी लोकांचे दमन सुरू आहे. दुसरी गोष्ट अशी की, या जमाती १५ जिल्ह्यांमध्ये आणि ८० हून अधिक तालुक्यांच्या ठिकाणी विखुरलेल्या आहेत. जरी त्या ऐतिहासिकदृष्ट्या या लगतच्या भूभागांमध्ये वसलेल्या असल्या तरी, अलिकडील वर्षांमध्ये अनेक क्षेत्रांपैकी कित्येक क्षेत्रात अल्पसंख्य बनलेल्या आहेत. तिसरी गोष्ट अशी आहे की, आदिवासी लोकांना अधिकारापासून वंचित ठेवणे व त्यांचे शोषण करणे यास एक ऐतिहासिक दुवा आहे. वसाहतवादाच्या काळात ब्रिटिशांनी त्यांना त्यांच्या वडिलोपार्जित भूसंपदा व वन हक्क यांपासून वंचित ठेवले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, जरी भारताच्या संविधानाने विविध संरक्षक उपपाययोजना व हमी यांची तरतूद केलेली असली तरी, आदिवासी हे प्रशासकीय दुर्लक्षतेचे व बिगर आदिवासी लोकांकडून होणाऱ्या शोषणाचे बळी ठरले होते. चौथी गोष्ट, त्यांची संस्कृती व भाषा ही आधुनिक नागरी-औद्योगिक हुकमती शक्तींनी धोक्यात आणलेली आहे. आदिवासी लोकांमधील विकासविषयक वैफल्य व असंतोष यात वाढ होत असल्याचे अलिकडे दिसून येत आहे आणि विवक्षित जिल्ह्यांत, याची तीव्रता अधिक असल्याचे दिसून येते. वरील सर्व कारणांसाठी समितीने 'आदिवासी क्षेत्र' हे दोन 'महत्त्वूपर्ण' प्रदेशांपैकी एक म्हणून विचारात घेतलेले आहे. त्यामुळे हे क्षेत्र विशेष उपाययोजनेखाली आणता येईल जेणेकरून ते वंचित राहणार नाही आणि त्यांचा वेगाने विकास होईल.

या प्रयोजनासाठी एक वेगळा अभ्यासगट तयार केलेला होता. गटाने तयार केलेल्या अभ्यास अहवालावरून बरीचशी माहिती घेऊन हे प्रकरण तयार करण्यात आले आहे. या प्रकरणामध्ये, आम्ही चार महत्त्वपूर्ण दृष्टिकोनातून या महत्त्वाच्या प्रदेशाची समस्या हाताळण्याचे प्रस्तावित करतो.

१) भारताच्या संविधानाने दिलेली निदेशक तत्त्वे व मूलभूत हक्क, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विहित केलेली पंचशील तत्त्वे, आणि महाराष्ट्र शासनाने अंगीकारलेली धोरणे, कार्यक्रम आणि विधिविधान यांच्या संदर्भात, महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा सध्याच्या स्थितीचा आढावा घेऊन आम्ही सुरुवात करतो.

२) या पार्श्वभूमीनुसार, विकासविषयक तुटीचे आम्ही मानव विकास निर्देशांकानुसार निर्धारण करतो आणि जेथे शक्य असेल तेथे, ती पैशाच्या रूपात मोजतो आणि तूट भरून काढण्यासाठी शिफारशी करतो.

३) व्यापक धोरण आणि आदिवासी जमातींचे बहुआयामी विकासविषयक दमन दूर करण्यासाठी संस्थात्मक बदल यांबाबत चर्चा यातून त्याचे अनुपालन करण्यात येईल.

४) धोरणे प्रत्यक्षात आणताना आम्ही कार्यक्रमात यथायोग्य बदलांची शिफारस करतो.

७.१ महाराष्ट्रातील आदिवासी लोकांची सद्य:स्थिती

जरी अनुसूचित जमाती किंवा आदिवासी ही संज्ञा वापरलेली असली तरी, आदिवासी लोक ही एकजिनसी संस्था नाही. महाराष्ट्रामध्ये ४५ जमातींना अनुसूचित जमाती म्हणून दर्शविण्यात आलेले आहे. २००१ च्या जनगणनेनुसार, आकारमानाच्या अनुषंगाने भिल्ल (१८,१८,७९२), गोंड (१५,५४,८९४), महादेव कोळी (१२,२७,५६२), वारली (६,२७,१९७), कोकणी (५,७१,९१६), ठाकर (४,८७,६९६), आंध (३,७२,८७५), हळबा (२,९७,९२३), कातकरी (२,३५,०२२), मल्हार कोळी (२,३३,६१७), कोरकू (२,११,६९२), कोलाम (१,७३,६४६), ढोर कोळी (१,७०,६५६), पारधी (१,५९,८७५), परधान (१,२६,१३४) आणि गामित (८६,७७७) या अत्यंत महत्त्वाच्या जमाती आहेत. कातकरी, कोलाम व माडिया गोंड यांची आदिम आदिवासी गट म्हणून गणती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन (२०१२). आदिवासी लोकांमधील बहुजिनसीपणा हा ते एकाच विकासात्मक पातळीवर नसल्याने देखील आहे. त्यांच्यामध्ये तीन स्थूल वर्ग मोडतात:

(१) दुर्गम, डोंगराळ, वन क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या आदिवासी जमाती,

(२) बिगर आदिवासी लोकांबरोबर सपाट प्रदेशात राहणारी आदिवासी कुटुंबे, आणि

(३) शिक्षित आणि अर्ध-शिक्षित आदिवासी लोक.

ते अनुसूचित क्षेत्रात राहतात किंवा त्या क्षेत्राबाहेर राहतात किंवा कसे या आधारेदेखील त्यांच्यात भेद केलेला आहे. या घटकांच्या विकासविषयक गरजा आणि आकांक्षा या वेगळ्या आहेत आणि भविष्यासाठी नियोजन करताना ही गरज विशेषत: विचारात घेतली पाहिजे. आदिवासी जमातींच्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीचे निर्धारण करताना त्यांच्या सद्य:स्थिती विषयीची विनिर्दिष्ट व संकलित न केलेली आकडेवारी ही प्रमुख अडचण आहे. अशी आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे, उर्वरित लोकसंख्येच्या तुलनेत त्यांचे जे नुकसान झाले त्याचे निर्धारण करणे वस्तुत: अशक्य बनले आहे. तथापि, उपलब्ध असलेली काही निदर्शके स्पष्टपणे विकासात्मक तफावत दर्शवितात.

७.१.१ राज्याच्या लोकसंख्येशी तुलना

राज्याची सर्वसाधारण लोकसंख्या व अनुसूचित जमाती यांसाठी विकास निदर्शकांची तुलना जोडपत्र ७.२ मध्ये पाहता येईल. पुरुष साक्षरतेमध्ये अनुसूचित जमाती सर्वसाधारण लोकसंख्येच्या जवळजवळ २० टक्क्यांनी मागे पडल्या आहेत. तसेच महिला साक्षरतेमध्ये अनुसूचित जमाती सर्वसाधारण लोकसंख्येच्या अंदाजे ४१ टक्क्यांनी मागे पडल्या आहेत. एकूण नाव नोंदणीच्या प्रमाणात देखील अनुसूचित जमाती खूपच मागे पडल्या आहेत. ६-१७ वर्षे वयोगटातील शालाबाह्य मुलांमध्ये ३४.५टक्के इतकी मुले अनुसूचित जमातीतील आहेत, तर १५.९ टक्के इतकी सर्वसाधारण लोकसंख्येतील आहेत. अनुसूचित जमातींसाठी ५-२९ वर्षे वयोगटातील प्रति विद्यार्थी सरासरी वार्षिक खर्च फक्त रुपये १२९७ इतका आहे. तर सर्वसाधारण विद्यार्थ्यांवरील दरडोई खर्च रुपये ४५११ इतका आहे. अनुसूचित जमातीतील मुलांची प्रतिक्षमता ३९.३ टक्के इतकी आहे आणि सर्वसाधारण लोकसंख्येकरिता हीच आकडेवारी ६२.२ टक्के इतकी आहे.

७.१.२ दरडोई उत्पन्न

राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या उत्पन्नाची स्वतंत्र आकडेवारी उपलब्ध नव्हती. २० मार्च, २०१३ रोजी अर्थमंत्र्यांनी राज्य विधानसभेत सादर केलेले राज्याचे आर्थिक सर्वेक्षण स्पष्टपणे राज्याची सरासरी व आदिवासीबहुल जिल्हे या दरम्यानच्या दरडोई उत्पन्नातील असमर्थता दर्शविते. जर आपण नंदुरबार (रुपये ४६,४१५) आणि गडचिरोली (रुपये ४८,३११) यांसारख्या आदिवासींचे प्राबल्य असणाऱ्या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना केली तर आपणास असे दिसून येते की, या जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न हे राज्याच्या दरडोई उत्पन्नाच्या (रुपये ९५,३३९) अनुक्रमे फक्त ४८ व ५१ टक्के इतके आहे.

७.१.३ तालुका विकास निर्देशांक

महाराष्ट्र मानव विकास अहवालामध्ये (२०१२) जिल्हा मानव विकास निर्देशांक काढण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या ३५ जिल्ह्यांमध्ये नंदुरबार व गडचिरोली या दोन आदिवासीबहुल जिल्ह्यांचे स्थान सगळ्यात खालचे आहे (यशदा, २०१२: २५७ (अप्रकाशित). आदिवासी समाजाचा दर्जा हा, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, नागरी सुखसोयी आणि शासकीय सेवांचा उपयोग यांच्याशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक निर्देशकांच्या बाबतीत सर्वसाधारण लोकसंख्येपेक्षा निम्न आहे.

यशदाने संगणना केलेले तालुका विकास निर्देशांक आणखी असे दर्शवितात की, **महाराष्ट्रातील ३५६ तालुक्यांपैकी तळाचे पंधरा तालुके हे, सर्व आदिवासीबहुल तालुके आहेत (जोडपत्र ७.३).** हा निर्देशांक मानव विकास निर्देशांकाशी काटेकोरपणे तुलनायोग्य नाही आणि यशदाकडून त्याची स्वतंत्रपणे संगणना देखील करण्यात आली आहे. सर्वोच्च पातळीवरील तालुका (पुणे ०.८८८) आणि सर्वात खालचा (तळाचा) तालुका (अक्राणी ०.०५९) यांच्यामधील फरक, अतिहानीकारक आहे. राज्यातील प्रादेशिक विकासाच्या विषमतेचे हे स्पष्ट चित्र आहे. ठाणे जिल्ह्यातील तालुके ठाणे, कल्याण, वसई, उल्हासनगर व अंबरनाथ हे तालुके सर्वोच्च पातळीवरील १५ तालुक्यांमध्ये मोडतात. तर मोखाडा, विक्रमगड, तलासरी, जव्हार व डहाणू हे लगतचे ५ आदिवासी तालुके शेवटच्या १५ आदिवासी तालुक्यांमध्ये मोडतात, या तथ्याद्वारे ही बाब आणखी ठळकपणे निदर्शनास आणता येते. राज्यातील समतोल नसलेल्या विकासाचा आणि पिरॅमिडच्या तळाशी असलेल्या आदिवासी लोकांच्या स्थितीचा हा निर्देशक आहे.

आकृती ७.१
तालुका विकास निर्देशांक



(स्रोत: यशदा, २०१२ अप्रकाशित.)

सर्वोच्च पातळीवरील १५ तालुक्यांचा (सर्व जनजातितेतर ८) ०.७९७ आणि खालच्या पातळीवरील १५ तालुक्यांच्या (सर्व आदिवासी) ०.२५२, सरासरी तालुका विकास निर्देशांकामधील फरक जास्तीत जास्त ६८% इतका आहे.

७.१.४ गरिबी (दारिद्र्य)

जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाने केलेल्या दारिद्र्य-रेषेखालील सर्वेक्षणातून असे दिसून येते की, १९८० मध्ये ६३.७ टक्के आदिवासी कुटुंबे दारिद्र्यरेषेच्या खाली होती तर १९९६-९७ मधील संदर्भ (bench mark)

सर्वेक्षणामध्ये, उपयोजना क्षेत्रांमधील ९१.१ टक्के आदिवासी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली असल्याचे निश्चित केले आहे. (महाराष्ट्र शासन, २०१२ (ए):४६७) जरी तुलनात्मक आकडेवारी उपलब्ध नसली तरी, संपूर्ण राज्यात असलेले दारिद्र्याचे प्रमाण १९८३ मध्ये ४३.४ टक्के इतके व १९९३-९४ मध्ये ३६.९ टक्के इतके होते. (नियोजन विभाग, २०११:२६७) संपूर्णत: आदिवासी लोकांमधील दारिद्र्य हे राज्याच्या जवळजवळ दुप्पट होते. याबाबत आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून अलिकडची राज्यव्यापी आकडेवारी उपलब्ध झालेली नव्हती.

७.१.५ पोषाहार

२००९ मध्ये राष्ट्रीय पोषाहार संनियंत्रण केंद्राने प्रसिद्ध केलेल्या अंदाजातून पुढीलप्रमाणे उघड झाले आहे:

७.१.५.१ आदिवासी बालकांमधील कुपोषण, तक्ता ७.१ मध्ये दिलेले आहे.

तक्ता ७.१
आदिवासी बालकांमधील कुपोषण

(टक्केवारी)

अ.क्र.	बालके	कुपोषण	
		२ प्रमाण विचलनाखाली	३ प्रमाण विचलनाखाली
१	२	३	४
१	महाराष्ट्र - सर्वसाधारण (एनएफएचएस-३)	३७	१२
२	भारत - आदिवासी (एनएनएमबी)	५३	२०
३	महाराष्ट्र आदिवासी (एनएनएमबी)	६४	२९
४	फरक (३ वजा १)	७३	१४२

वर नमूद केलेल्या राष्ट्रीय पोषाहार संनियंत्रण केंद्रामधील सर्वेक्षण पद्धतीपेक्षा बहुतकरून वेगळ्या सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून ० ते २ वयोगटातील एकूण १४०३ ग्रामीण आणि १४०६ नागरी बालकांचे सर्वेक्षण करणाऱ्या महाराष्ट्र बाल पोषाहार सर्वेक्षण (२०१२) वेगळी संख्या दर्शविते, परंतु अनुसूचित जमाती आणि उर्वरित लोक यांच्यामधील फरक बराच मोठा आहे. कमी वजन असलेल्या बालकांची संख्या अनुसूचित जमातीच्या बालकांमधील ३२.१ टक्क्यांच्या तुलनेत बिगर अनुसूचित जमाती व अनुसूचित जातीतर लोकसंख्येमध्ये (उर्वरित) १९.२ टक्के इतकी होती.

कुपोषित प्रौढ पुरुष व स्त्रिया यांचे प्रमाण (बीएमआय < १८.५) तक्ता ७.२ मध्ये दिल्याप्रमाणे होते. (एनएनएमबी, २००९)

तक्ता ७.२
कुपोषित प्रौढ पुरुष व स्त्रिया यांचे प्रमाण

(टक्केवारी)

प्रवर्ग	पुरूष	स्त्रिया
१	२	३
भारत - आदिवासी	४०	४९
महाराष्ट्र आदिवासी	५२.६	६२.५

जर पोषाहार हा, मानवी विकासाचा निर्देशांक म्हणून विचारात घेतला तर, आदिवासी लोक उर्वरित समाजापेक्षा अधिकच न्यूनविकसित आहेत. आणखी दयनीय स्थिती म्हणजे, महाराष्ट्रातील आदिवासी लोक हे देशातील सरासरी आदिवासी लोकांपेक्षा अधिकच वंचित आहेत. भारतीय मानवी विकास अहवालामध्ये असे प्रतिपादन केले आहे की, महाराष्ट्रातील आदिवासी लोकांची परिस्थिती, देशातील सरासरीपेक्षा अत्यंत दयनीय अशी आहे. (नियोजन आयोग, २०११:७१)

७.१.६ आरोग्य

१. दुर्दैवाने, जनजाती क्षेत्रातील किंवा अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येतील बालमृत्यु दराचा राज्यव्यापी अंदाज उपलब्ध नव्हता. [महाराष्ट्रातील अज्ञात बालमृत्यु, भारत सरकार (२००६), बालमृत्युबाबतच्या समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन (२००४-०५), आणि यशदाने केलेले अंदाज (२०१२)] यांच्याकडील उपलब्ध असलेल्या मर्यादित आकडेवारीच्या आधारे, आम्ही, असा तर्क केला की, महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील बालमृत्यु दर सुमारे ६०-७० टक्के इतका असून तो राज्याच्या सरासरीपेक्षा उच्च आहे.

२. महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण (२०१२-१३) असे नमूद करते की, आदिवासी गडचिरोली जिल्ह्यात घरांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात असलेल्या कुटुंबांचे प्रमाण राज्य सरासरीच्या ६३ टक्क्यांच्या तुलनेत १९.५ टक्के इतके होते, आणि घरामध्ये प्रसाधनगृह असलेल्या कुटुंबांचे प्रमाण, राज्य सरासरीच्या ५३ टक्क्यांच्या तुलनेत २७ टक्के एवढे होते.

३. राज्यातील आदिवासी तालुक्यांचा आरोग्य सुविधा निर्देशांक (जो प्रामुख्याने कार्यकारी सेवांपेक्षा भौतिक मूलभूत सुविधांवर आधारित आहे.) राज्याच्या सरासरीपेक्षा खूप कमी नव्हता (यशदा, २०१२).

७.१.७ शिक्षण

१. आदिवासी मुलांमध्ये साक्षरतेच्या आणि शाळेत नावनोंदणी करण्याच्या पातळीत वाढ होत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा आणि ***आश्रमशाळा***, जरी त्याचा दर्जा अतिशय सुमार असला तरी निश्चितपणे आदिवासी क्षेत्रामध्ये सुद्धा विस्तारपूर्वक शिक्षण उपलब्ध करून देत आहेत. आदिवासी विकास आयुक्त (२०१३) यांनी दिलेली माहिती असा दावा करते की, राज्यातील ११०८ ***आश्रमशाळांमध्ये*** शिक्षण घेणाऱ्या आदिवासी मुलांची एकूण संख्या ४४७,९२५ इतकी आहे. शैक्षणिक योजनांचा लाभ मिळालेला आहे अशा आदिवासी बालकांची/युवकांची एकूण संख्या २०१२-१३ मध्ये १८.६ लाख इतकी असल्याचा दावा केलेला होता.

२. आदिवासी लोकांचा साक्षरता दर, सर्वसाधारण लोकांच्या तुलनेत, कमी आहे. आदिवासी मुलांचा गळतीचा दर उच्च आहे. माडिया गोंड, भिल्ल, कातकरी या समूहांतील स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी म्हणजे अनुक्रमे २३, २१ व १६ टक्के इतके आहे. (सीआरएचपी व एमएएसएस, २००७(२):८-९) त्याचवेळी राज्याची सरासरी ६९ टक्के इतकी होती.

७.१.८ आदिम जमाती

१. आदिम जमाती गटांची (कातकरी, माडिया गोंड व कोलाम) त्याचप्रमाणे पारधी जमातीची स्थिती, इतर आदिवासी समूहापेक्षा अतिशय दयनीय आहे.

विविध विकास निर्देशांकांचा गोषवारा (सारांश) तक्ता ७.३ मध्ये दिलेला आहे.

तक्ता ७.३

आदिवासी लोकसंख्येबाबतच्या विकास निर्देशांकाचा गोषवारा

अ.क्र.	निर्देशांक	राज्य	आदिवासी	टक्केवारीतील फरक
१	२	३	४	५
१.	स्त्री साक्षरता (%)	६९	४१	४१
२.	बालरोग प्रतिक्षमता (%)	६२.५	३९	३८
३.	बालमृत्यू दर (आयएमआर)*	४८	८०	६७
४.	दरडोई उत्पन्न (रूपये)	९५,३३९	४८,३११ (गडचिरोली)	४९
५.	बालकांमधील कुपोषण (-३ एसडी)	१२	२९	१४२
६.	तालुका विकास निर्देशांक सर्वोच्च पातळीवरील १५ तालुके विरुद्ध खालच्या पातळीवरील १५ तालुके	०.७९७	०.२५२	६८

* बंग, रेड्डी व देशमुख, भारत सरकार (२००५)

ह्या मर्यादित आकडेवारीवरून असे सूचित होते की, विविध निर्देशांकावरून आदिवासी लोकांची स्थिती, राज्य सरासरीपेक्षा खूपच खालावलेली असून तुटीचे प्रमाण ३७ ते १४२ टक्के इतके आहे.

राज्यातील विषमतोल व असमान प्रादेशिक विकासामुळे एकत्रित नसलेल्या आकडेवारीमध्ये, वंचितपणा, गरीबी व असहायता पूर्णपणे दिसून येत नाही. सद्य:स्थितीत, महाराष्ट्रातील आदिवासी लोक हे केवळ अत्यंत गरीब व अतिशय उपेक्षित घटकच नाही तर ते अत्यंत शोषित आणि दुर्लक्षित गट देखील आहेत. जर या स्थितीस कारणीभूत ठरणारी ऐतिहासिक व समकालीन कारणे विचारात घेतली तर, त्यांच्या वंचिततेची संपूर्ण व्याप्ती अधिक चांगल्या तऱ्हेने समजून घेता येईल.

७.२ वंचितपणाची कारणे

७.२.१ नैसर्गिक साधनसंपत्ती आणि निर्वाहाची साधने यांवरील हक्कांपासून वंचित ठेवणे (हक्क हिरावून घेणे)

७.२.१.१ जमीन अन्यसंक्रामण आणि अपर्याप्त जमीन सुधारणा

ब्रिटीश राजवटीपूर्वी, जमीन ही आदिवासी क्षेत्रामध्ये स्थूलमानाने एक सामाईक मालमत्ता होती आणि रूढिगत कायद्यांद्वारे आणि सामाजिक निर्बंधाद्वारे नियमन केले जात होते. वसाहतवादाच्या कालावधीमध्ये खाजगी जमीन मालमत्तेस मान्यता होती, परंतु जमीन अन्यसंक्रामण करण्याच्या प्रक्रियेस देखील सुरुवात झाली होती. बिगर आदिवासी व्यापारी, सावकार व जमीनदार यांनी, आदिवासी लोकांच्या गरीबीचा, अज्ञानाचा व निरक्षरतेचा फायदा घेतला व त्यांच्या जमिनी बळकावल्या. ही प्रक्रिया, स्वातंत्र्यानंतर देखील चालू राहिली. १९७४ मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कुळवहिवाट कायदे सुधारणा अधिनियम (१९७४ चा अधिनियम क्रमांक ३५) व अनुसूचित जमातीच्या जमिनी परत करणे अधिनियम (१९७५ चा अधिनियम क्रमांक १४) संमत केले. त्यानंतर, मालमत्तेच्या हक्कांचे उल्लंघन केल्याबाबत त्याला आव्हान दिलेले नव्हते याची सुनिश्चिती करण्याकरिता १९७५ च्या अधिनियमाचा भारतीय संविधानाच्या ९ व्या अनुसूचीमध्ये देखील समावेश केला होता. जरी हे अधिनियम संमत करण्यात आले असले तरी, त्यांच्या अंमलबजावणीतील व कार्यान्वयनातील प्रगती, अत्यंत संथपणे झाली आहे. **आदिवासींच्या जमिनींचे अन्यसंक्रामण करण्याची ही समस्या बदलल्याचा कोणताही पुरावा समितीला आढळून आला नाही.** प्रारूप राष्ट्रीय आदिवासी धोरण, २०१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे, "आदिवासींच्या जमिनींचे अन्यसंक्रामण हे, त्यांची दुर्बल आर्थिक स्थिती अधिक अस्थिर करून त्यांना कंगाल करण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे."

स्वातंत्र्यानंतर, जमिनीच्या मालकीमधील असमानता दूर करण्यासाठी आणि जमिनीच्या वास्तविक शेतकऱ्याला (कास्तकारांना) न्याय देण्यासाठी जमीन सुधारणांची प्रक्रिया सुरू केली होती. महाराष्ट्रामध्ये कुळवहिवाट व कमाल मर्यादा विधिविधान (कायदे) संमत केले होते. परंतु, आदिवासी समाजाला त्याच्यापासून विशेष असा कोणताही लाभ झालेला नाही. जवळजवळ २० लाख आदिवासी कुटुंबांपैकी (१.५%) केवळ आदिवासी लाभार्थ्यांची संख्या २९,२६२ इतकी होती. याशिवाय, नवीनतम आकडेवारी उपलब्ध झालेली नाही. महाराष्ट्र शासनाने, १९७० मध्ये रायगड जिल्ह्यातील ५,२०० 'दळी' जमीन पट्टाधारकांना जमिनीचा मालकी हक्क देण्याचा निर्णय घेतला. (शासन निर्णय एफएलडी/४२६८/२७०२३-डब्ल्यू) काही लाभार्थ्यांनी, त्यांच्या निवेदनामध्ये समितीला असे दाखवून दिले की, या निर्णयाची अंमलबजावणी संथ गतीने करण्यात आली. भावी लाभाधिकारी हे, प्रामुख्याने आदिम आदिवासी गटातील कातकरी होते. विस्तृत जमीन सुधारणा व जमिनीचे फेरवाटप कार्यक्रम या अभावी, आदिवासींची उपजीविका अस्थिर होईल आणि विकासात्मक प्रक्रियांना आवश्यक स्थैर्य प्राप्त होऊ शकणार नाही.

७.२.१.२ वन हक्कांपासून वंचित ठेवणे

वन हक्क मान्य करणे अधिनियम, २००६ च्या उद्देशिकेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, वसाहती सरकारच्या राजवटीत तसेच स्वतंत्र भारतात, राज्य वनाचे एकत्रीकरण करताना, आदिवासी समाजाच्या व इतर पारंपरिक वनवासींच्या वडिलोपार्जित जमिनीवरील वन हक्कांना व त्यांच्या वसतिस्थानाला पर्याप्त मान्यता न दिल्यामुळे, अशा वनवासी आदिवासी समाजावर आणि इतर पारंपरिक वनवासींवर ऐतिहासिक अन्याय झाला आहे. शिवाय, राष्ट्रीय जनजाती धोरण, २०१० च्या मसुद्यात प्रवर्गीकृतपणे असे नमूद केले आहे की, "*गेल्या अनेक काळात, वने जाहीर करताना, हक्कासंबंधीची तडजोड करण्यात आली नसल्यामुळे, वनांमधील, आदिवासींचे त्यांच्या पारंपरिक जमीन धारणे संबंधातील हक्क सर्वसाधरणपणे संपविण्यात आले आहेत. (वनजमिनीच्या) धारणाधिकाराची असुरक्षितता आणि या वनजमिनीवरून हुसकावून लावण्याची भीती, ही आदिवासी समाजाला भावनिकदृष्ट्या तसेच भौतिकदृष्ट्या वने व वनजमिनींमधून अन्यसंक्रमित करण्याकडे घेऊन जात आहे.*" *यामुळे अशाच अनेक हितसंबंधित व्यक्तींनी आमच्याकडे अशाच प्रकारच्या तक्रारी मांडल्या आहेत.*

'वन हक्क मान्य करणे अधिनियम, २००६' हा अन्याय निवारण्याचा खराखुरा प्रयत्न आहे. परंतु, याची महाराष्ट्रामधील अंमलबजावणी असमाधानकारक झालेली आहे. नोव्हेंबर २०१२ च्या अखेरपर्यंत गडचिरोली जिल्हा वगळता, २,२६,२८० एकर जमिनीसाठी १,०४,७०२ इतक्या वैयक्तिक दाव्यांना मान्यता देण्यात आली असली तरी, इतर जिल्ह्यांमध्ये सामूहिक हक्काला मान्यता देण्यात आलेली नाही. नंदुरबार सारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यातील प्रगती अत्यंत मंद गतीने झाली आहे. मूळ समस्या अशी आहे की, हक्क सिद्ध करण्याची जबाबदारी, कोणतीही गावातील माहिती नसलेल्या गावकऱ्यांवर, पुरेसे अधिकार प्रदान न करता लादलेली आहे.

ज्यामुळे आदिवासींना वन हक्क बहाल केले जाऊन वनाचे व पर्यावरण यंत्रणेचे संरक्षण करण्यास सहाय्य होऊ शकेल अशा भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २८ अन्वये, 'ग्रामीण वने' संबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी देखील करण्यात आलेली नाही हे यापैकी वंचित असल्याचे दुसरे उदाहरण आहे. बांबू, तेंदूपत्ते, मोह, चारोळी, आवळा, हिरडा, बेहडा इत्यादींसारखे इमारती लाकूड नसलेले वन उत्पादन, खरेदी करण्याचा खाजगी क्षेत्राचा सध्याचा दृष्टिकोन आदिवासी लोकांच्या हिताचा नाही. आदिवासी लोकांपर्यंत संपूर्ण फायदे पोचवण्यासाठी स्थानिक अधिकार व शासकीय सहाय्याची गरज आहे.

७.२.१.३ अपर्याप्त जल हक्क

महाराष्ट्रात, मोठ्या प्रमाणात, डोंगराळ क्षेत्रात जेथे आदिवासींची पारंपरिक वस्ती आहे तेथे, धरणे बांधण्यात आली आहेत. या धरणांमुळे आदिवासी समाज विस्थापितच झाला नाही तर तो, सिंचनाच्या फायद्यापासून देखील वंचित झाला आहे. आदिवासी लोक 'पाणलोट' क्षेत्रात रहात असले तरी, 'लाभ क्षेत्रातील' बिगर आदिवासी शेतकरी सिंचनाचे लाभ घेत आहेत ही आजची सर्वसाधारण स्थिती आहे. अपुरा लाभक्षेत्र विकास कार्यक्रम आणि 'पाण्याचा उपसा करण्याच्या हक्कांचा' अभाव यामुळे आदिवासींची शेती अवर्धनक्षम बनली आहे. सपाट प्रदेशात देखील सिंचनाची व्याप्ती मर्यादित आहे. महाराष्ट्र शासनाच्या *आदिवासी उत्थान* कार्यक्रमांतर्गत पुढील संदर्भाचा अभ्यास करण्यात आला. पाहणी केलेल्या आदिवासी कुटुंबांपैकी केवळ दहा टक्के आदिवासी कुटुंबांकडे, सिंचन सुविधा होती, त्यापैकी बऱ्याच सुविधा या मुख्यत्वेकरून विहिरी व तलावाच्या स्वरूपात होत्या. (सर्वसमावेशक ग्राम आरोग्य प्रकल्प आणि महाराष्ट्र मानवशास्त्र संघटना, २००७: ३६) दुसरे म्हणजे, पाणी क्षेत्रापुढील बदललेल्या प्राथमिकतांनुसार औद्योगिक गरजांसाठी आणि नगरातील नागरीसमुहांची पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी साठवलेले बरेचसे पाणी उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे, प्रत्येक उन्हाळ्यामध्ये उंचीवरील प्रदेशातील आणि डोंगराळ प्रदेशातील पाणलोट क्षेत्रातील आदिवासी समाजाला तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागते.

गोड्या पाण्यातील मासेमारी ही सर्व आदिवासी समाजाच्या उपजीविकेचे पारंपरिक महत्त्वाचे साधन आहे. गोड्या पाण्यातील मासेमारी ही, केवळ उपजीविकेमधील 'रोख रक्कम' हा आवश्यक घटक मिळवून देते असे नव्हे तर, ती, त्यांची पोषणविषयक आवश्यकता देखील भागविते. तथापि, सद्यस्थितीमध्ये, या उपजीविकेच्या साधनावर विपरित परिणाम झाला आहे. पारंपरिक साधनांची अवनती व ऱ्हास, पाणी अडविणे, बिगर आदिवासी गटांची आर्थिक हितसंबंधाची स्पर्धा, पर्यावरणाचे प्रदूषण आणि वापरकर्त्याचे हक्क नाकारणे, या प्रमुख घटकांना अटकाव करण्याची गरज आहे. सन २०१२-१३ च्या वार्षिक जनजाति उपयोजनेच्या कागदपत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्रातील ३,१८,००० हेक्टर इतक्या अंदाजित आदिवासी क्षेत्रापैकी जवळपास ९७,००० हेक्टर इतक्या आदिवासी क्षेत्राला तलाव आणि जलाशयांमधून पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. तथापि, (सन २०१२-१३ मध्ये रुपये १२९ लाख इतकी) मत्स्यव्यवसाय विकासासाठीची तरतूद ही, फारच कमी आहे. आमच्या हितसंबंधितांबरोबर झालेल्या चर्चेच्या वेळी आम्हाला असे सांगण्यात आले होते की, मत्स्यव्यवसायाच्या अधिकारांचे नियमन करणारी सहकारी चौकट बिगर आदिवासी व्यापारी व कंत्राटदारांनी उलथून टाकली होती. जलसंपदेवरील अधिकार आदिवासी ***ग्रामसभेकडे*** निहित नाहीत आणि म्हणून, तेथे प्रभावी नियंत्रण व व्यवस्थापन नाही; परिणामी, बिगर आदिवासी अभिकरणे फायदे उठवित आहेत.

७.२.१.४ विकास प्रक्रियेमुळे होणारे विस्थापन

जल, वन आणि खनिज संपदेने समृद्ध असलेली आदिवासी क्षेत्रे, प्रदेशातील साधनसंपत्तीचा पूर्णपणे वापर करण्यास बांधील असणाऱ्या व महत्त्वाकांक्षी असणाऱ्या अनेक आर्थिक गटांच्या सातत्याने अधीन राहिली आहेत. ही प्रक्रिया वसाहतवादाच्या काळात सुरू झाली होती. त्या प्रक्रियेवर, स्वातंत्र्यानंतर जोर देण्यात आला होता आणि ती अजूनही चालूच आहे. राष्ट्रीय जनजाती धोरण, २०१० च्या मसुद्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे विस्थापन हा, बहुपरिणामी आघात आहे, त्याचा परिणाम आदिवासी लोकांची वसतिस्थाने आणि त्यांची मायभूमी विखंडित होण्यात, त्यांची संस्कृती बिघडविण्यात, समाज जीवनाचे तुकडे तुकडे करण्यात आणि त्यांचे स्थलांतरित कामगार बनण्यात, ओझे वाहणारे हमाल होण्यात आणि नागरी भागात अनधिकृत वसाहत करून राहण्यात होतो. स्थलांतराची ही प्रक्रिया अशीच चालू राहिली तर, महाराष्ट्राच्या आदिवासी जिल्ह्यांचे देखील नागरीकरण व औद्योगिकरण शीघ्रपणे होईल. दुर्दैवाने याबाबतीतील अधिक विश्वसनीय आकडेवारी सध्या उपलब्ध नाही. थंड हवामानाच्या ठिकाणांसारख्या क्षेत्रांमध्ये पर्यटन-स्थान /हॉलिडे होम/नागरी वसाहत विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २६ नोव्हेंबर, १९९६ रोजी एक विशेष शासन निर्णय निर्गमित केला होता आणि प्रकल्प क्षेत्रातील आदिवासींच्या जमिनी खरेदी करण्यासाठी, मालक/विकासक यांना महसूल विभागाची परवानगी घेण्यास सांगितले. परिणामी, विविध वसाहती आणि पायाभूत सुविधा प्रकल्प पश्चिम घाटालगत उदयास आल्यामुळे, **आदिवासींच्या जमिनीच्या** अन्यसंक्रामणासंबंधीच्या तक्रारी वाढत आहेत. अलिकडील पायाभूत सुविधा विकास प्रकल्प, दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा (कॉरिडॉर) जरी स्वागतार्ह विकास कार्य असले तरी, रायगड, ठाणे, पुणे, नाशिक, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांमधून जसजसा तो पुढे जाईल तसा मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज विस्थापित होण्याची भीती आहे. केंद्र सरकार तसेच राज्य शासन, यांनी या सर्व गोष्टींकडे मनापासून लक्ष द्यावे.

७.२.१.५ रोजगाराचा अभाव

मोठ्या प्रमाणावरील भारतीय ग्रामीण मनुष्यबळाचा भाग असलेले आदिवासी लोक सतत लाभदायक रोजगाराच्या शोधात असतात. राहत्या ठिकाणी वर्षभर पर्याप्त आणि पारिश्रमिक मिळवून देणारा रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे (बंधन आणि कर्जबाजारीपणा यासह) पुष्कळांचे हाल व फसवणूक होत असते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम यामध्ये रोजगाराचे आश्वासन दिले आहे. परंतु, त्याच्या अंमलबजावणीत इच्छित पातळीपर्यंत महत्त्वपूर्ण सुधारणा करावी लागेल. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात

सन २०११-१२ मध्ये, (प्रती कुटुंब सरासरी १६ दिवस इतके) जॉब-कार्ड असलेल्या ८,३२,६४१ आदिवासी कुटुंबांना केवळ १,३३,८८,०५९ इतक्या श्रमदिवसांचा रोजगार मिळाला. पुरेशा रोजगाराअभावी, **आदिवासी कुटुंबांचे सतत** हंगामी स्थलांतरण सुरू असते, यामुळे वंचित राहण्याच्या दुसऱ्या घटकाची भर पडली आहे. हंगामी स्थलांतरण हे, गरीब कुटुंबांच्या अस्तित्वाचा दुबळेपणा वाढवितो एवढेच नाही तर, त्यांना, विकासाची संधी देखील नाकारतो.

७.२.२ संस्कृती, शिक्षण, आरोग्यसेवा, अल्कोहोल या संबंधीचे धोरण

७.२.२.१ सांस्कृतिक वंचितता

विविधता आणि जीवनक्षमता यासाठी आदिवासी संस्कृतीचे कौतुक केले जात असले तरी, प्रगत आधुनिकीकरणामुळे प्रत्यक्षात ती धोक्यात आली आहे. आदिवासींच्या बोलीभाषा अत्यंत वाईटरीतीने याच्या बळी ठरत आहेत. मोठ्या संख्येने आदिवासींच्या बोलीभाषा विलुप्त होत आहेत. याचे कारण त्यांच्या संरक्षणाचे आणि विकासाचे पद्धतशीर प्रयत्न करण्यात आले नाहीत हे आहे. प्रमुख आदिवासी भाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार करण्यात आलेली नाहीत. राज्य शासन लोकनृत्य स्पर्धेचे आणि हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन करते. परंतु, कविता, संगीत, साहित्य व रंगभूमी यांसारख्या विविध सांस्कृतिक घटकांच्या विकासासाठी पद्धतशीर प्रयत्न करण्यात येत नाहीत. निसर्गाशी समरस होणाऱ्या किंवा स्त्री-पुरुष संबंधावरील आदिवासींबाबतच्या जागतिक दृष्टिकोनाचे पुरेसे आकलन होत नाही. म्हणून, आदिवासींची तरुण पिढी त्यांच्या स्वत:च्या परंपरांचा तिरस्कार करते आणि पुढे जाण्यासाठी प्रबल संस्कृतीशी स्पर्धा करण्याचा प्रयत्न करते. आदिवासींच्या तरुण पिढीला पारंपरिकतेपासून विविध सामाजिक पातळ्यांवर प्रस्थापित होईपर्यंत अशा संक्रमणाच्या ताण- तणावाला सामोरे जावे लागते.

७.२.२.२ शैक्षणिक वंचितता

जरी आदिवासी मुलांची नावे शाळेत दाखल करण्याचे प्रमाण वाढत असले तरी, आदिवासी विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यमान शिक्षणपद्धत योग्य नाही, आणि म्हणून ती अपेक्षित परिणाम देत नाहीत. यु.एन.ढेबर आयोग (१९६१) या पासून आदिवासी विकासावरील भारत सरकारच्या राष्ट्रीय धोरणाचा मसुदा (२०१२) पर्यंत, सर्वांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, भाषिक अडथळे, विसंगत अभ्यासक्रम, भावनारहित अध्यापन आणि आनंददायक शिक्षणोपयोगी वस्तूंचा अभाव यांमुळे या पद्धतीशी जुळवून घेणे आदिवासी मुलांना कठीण जाते. शैक्षणिक प्रक्रिया सुरू करण्यामधील प्रमुख अडथळा, आदिवासी क्षेत्रामध्ये प्राथमिक शाळा चालविणे व शाळेत प्रवेश करणे हा आहे. आदिवासीबहुल क्षेत्रामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना, सामाजिक कुचेष्टांना देखील तोंड द्यावे लागते. पालकांचे स्थलांतरण हे शैक्षणिक वंचिततेचे नवीन प्रमुख कारण म्हणून पुढे येत आहे. ग्रामीण क्षेत्रांमधील कामगारांची कमतरता ही देखील आदिवासी मुलांना बाल मजूर बनविण्यासाठी आकर्षित करीत आहे व भाग पाडीत आहे. दुसरे असे की, जे शालेय शिक्षण पूर्ण करतात ते देखील अकुशलच राहतात आणि म्हणून परिणामी ते बेरोजगार राहतात.

आश्रमशाळांचा आदिवासी मुलांना शिक्षण देण्याचा उत्तम पर्याय म्हणून, पारंपरिकरीत्या विचार करण्यात आला असला तरी, विविध मूल्यमापन अभ्यासाद्वारे दर्शविल्याप्रमाणे, त्या सध्या, त्यांची गुणकारिता व कार्यक्षमता गमावीत आहेत. आदिवासी विकास विभागाने शिक्षणावर खर्च केलेल्या अर्थसंकल्पीय नियतव्ययावर विचार करताना, त्याचे वितरण व ते मागे पाडणे अन्यायकारक व असमान आहे. उदा. अनुदानित ***आश्रमशाळेला*** प्रतिवर्ष, प्रती विद्यार्थी, केवळ रुपये ४९७० आणि शासन संचालित ***आश्रमशाळेसाठी*** रुपये ८४६९ इतकी रक्कम खर्च करण्यात येते. खर्चाची ही मर्यादा वाढविण्याची निश्चितच गरज आहे.

७.२.२.३ अयोग्य व दुर्लभ आरोग्य सेवा

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधून, दुर्गम आदिवासी क्षेत्राला आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करण्यात येत असताना, प्रत्यक्ष पायाभूत सुविधांमधील, अनुशेषाच्या अभावी स्पष्ट होणारा आदिवासी लोकांच्या आरोग्याचा दर्जा (पोषाणआहार, बालमृत्यू, मलेरिया सारख्या रोगांची लागण) आणि आरोग्य सेवा मिळण्याचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. याचे प्रमुख कारण, सध्याची आरोग्य सेवा पद्धती ही, आदिवासी लोकांचे विशिष्ट सामाजिक व भौगोलिक संदर्भ आणि गरजा यांना योग्य होईल अशाप्रकारे तयार करण्यात आली नाही. आरोग्यविषयक गंभीर समस्यांच्या बाबतीत, लक्ष देण्यात आले नाही; आरोग्य सेवेचा प्रमाणभूत व सर्वसाधारण नमुना वापरण्यात येत आहे, आदिवासींच्या विशिष्ट आजारांना आणि रोगांना अग्रक्रम देण्यात आला नाही आणि आरोग्य कर्मचारीवर्गाची कमतरता सुधारण्यात आली नाही. अनुपस्थिती किंवा पदे रिक्त राहणे, कुशल कर्मचारीवर्गाचा अभाव आणि आदिवासी लोकांचा पारंपरिक रूढींवर विश्वास आणि औषधे घेण्याकडे कल कमी असल्यामुळे आरोग्य सेवेचा वापर फारच कमी आहे. म्हणून, आरोग्य सेवा फारच अपुऱ्या आहेत. मेळघाट, नंदुरबार व ठाणे येथील कुपोषण व बालमृत्यूंच्या वारंवार होणाऱ्या घटनांमुळे आणि मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या वेगवेगळ्या जनहित याचिका आणि स्वाधिकारे स्वीकारलेल्या प्रकरणांमुळे ही बाब लक्षात आणून दिली आहे. म्हणून, **आदिवासी क्षेत्रांच्या गरजा कोणत्या असतील तर त्या, आदिवासी क्षेत्रांच्या उचित गरजा व वैशिष्ट्ये यांना प्रत्यक्षात चांगल्या रीतीने कार्यरत असणाऱ्या उचित आरोग्य सेवा मिळणे ह्याच आहेत.**

७.२.२.४ मद्य धोरणाची अंमलबजावणी न करणे

मद्यामुळे आदिवासींचे जीवन बरबाद होते हे सर्वमान्य आहे. केंद्र सरकारने १९७६ मध्ये जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे महाराष्ट्र शासनाने स्वीकारली आहेत आणि १९७७ मध्ये आदिवासी क्षेत्रांसाठी नवीन उत्पादन शुल्क धोरण तयार केले. या धोरणानुसार अनुसूचित क्षेत्रात मद्य विक्रीस प्रतिबंध करण्यात आला होता आणि कोणत्याही मद्याच्या दुकानाकरिता परवानगी नव्हती. तथापि, या धोरणाचा हेतू सफल न होऊ देता १९८० मध्ये शहरांमध्ये व आदिवासी क्षेत्रातील तालुक्यांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी दारूच्या दुकानांना परवानगी देण्यात आली होती. परिणामी, सध्या आदिवासी क्षेत्रामध्ये देशी बनावटीचे आणि भारतीय बनावटीचे विदेशी मद्य याचा पुरेसा पुरवठा होत आहे. यामुळे लोकांच्या, विशेषकरून, महिला व मुलांच्या दारिद्र्यात व हालअपेष्टांमध्ये भर पडली आहे. आदिवासीबहुल नंदुरबार जिल्ह्यात, सन २०१०-११ मध्ये जवळपास ४० लाख लिटर इतके मद्य अधिकृतपणे विकण्यात आले होते, जिचे अंदाजे बाजार मूल्य रुपये ८० कोटी ते १०० कोटी इतके असेल. अनुसूचित क्षेत्र असलेल्या नंदुरबार जिल्ह्याच्या एकट्या नवापूर तालुक्यात, नोव्हेंबर, २०१२ मध्ये २,७०,००० लिटरपेक्षा अधिक मद्याची विक्री करण्यात आली होती. (समितीला ही माहिती, उत्पादन शुल्क विभाग, नंदुरबार यांच्याकडून देण्यात आली आहे) अशाप्रकारे आदिवासींच्या आरोग्याची चेष्टा करण्यात येते.

राज्यात गुटख्यावर बंदी असली तरी, तंबाखूचा वापर होत आहे हे देखील खरे आहे. तंबाखू सेवनाचा प्रकार बोकाळला आहे. सन २००९ मध्ये 'सर्च' या संस्थेने गडचिरोली जिल्ह्यामध्ये तंबाखूच्या सेवनावरील खर्च रुपये ७३ कोटी इतका अंदाजित केला होता. (सामूहिक आरोग्याशी संबंधित शिक्षण, कृति व संशोधन संस्था, २०१३)

७.२.३ राजकारण, शासन, प्रशासन

७.२.३.१ आदिवासी सल्लागार समितीची अपरिणामकारकता

संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या तरतुदींनुसार, महाराष्ट्रामध्ये देखील आदिवासी सल्लागार समिती घटित

करण्यात आली होती. 'पेसा'प्रमाणेच आदिवासी सल्लागार समिती देखील अनुसूचित क्षेत्रांमधील प्रशासन आणि शासन पाहणारे, सांविधानिक प्राधिकरण म्हणून वचनबद्ध आहे. तथापि, सांविधानिक इच्छेनुसार, तिच्या क्षमतांचाही वापर करता आलेला नाही. आदिवासी सल्लागार समितीच्या सदस्यांकडून आम्हाला असे सांगण्यात आले होते की, समितीच्या पुरेशा, नियमित बैठका घेण्यात आलेल्या नाहीत आणि करण्यात आलेले कामकाज हे पूर्णपणे असमाधानकारक आहे. आदिवासींमध्ये अविश्वासाची भावना कायम राहू नये याची खात्री करून घेण्याची गरज आहे आणि म्हणून आम्ही विश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया वाढवली.

७.२.३.२ राजकीय वैफल्य

विधानसभेच्या निवडणुकीत आदिवासी प्रतिनिधी निश्चित संख्येने निवडून येत असले तरी, आदिवासी लोकांच्या हिताचा कैवार घेणारा दबावगट म्हणून निष्क्रिय होत असल्याचे दिसून येते. आदिवासी लोकांच्या लोकशाही आकांक्षांची पूर्तता करण्यास 'पक्षीय राजकारण' अपुरे पडत असल्याचे दिसून येते. आदिवासी आमदारांनी या अभ्यासगटाकडे असे मत व्यक्त केले आहे की, सध्याच्या राजकीय परिस्थितीत, त्यांचा आवाज दुबळा बनला आहे आणि त्यांच्या हिताबाबत स्पष्टपणे बोलता येत नाही. लोकशाहीची प्रातिनिधिक पद्धती शासनाच्या (गव्हर्नन्सच्या) थेट, सहभागाच्या प्रक्रियेला पूरक नाही आणि म्हणून, विविध स्तरांवरील राजकीय वैफल्यात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

७.२.३.३ जनजाति क्षेत्रांचे प्रशासनिक विभाजन

१९८५ च्या राष्ट्रपतींच्या आदेशास अनुसरून, अनुसूचित क्षेत्रे आणि जनजाति उपयोजना क्षेत्रे यांच्या महाराष्ट्रामध्ये समान सीमा आहेत असे मानू. तथापि, अद्यापही लक्षणीय विसंगती आढळतात. सुमारे ४९ टक्के आदिवासी लोकसंख्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये राहते तर उर्वरित ५१ टक्के लोकसंख्या त्या क्षेत्राच्या बाहेर राहते. त्यांच्यापैकी काही 'जनजाति क्षेत्राबाहेरील उपयोजना कार्यक्रम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संज्ञेच्या कक्षेत येतात; मात्र त्यांना अनुसूचित क्षेत्रांसाठी असलेल्या सांविधानिक सुरक्षित उपाययोजनांचा लाभ घेता येत नाही. १५ जिल्ह्यांमधील ८० तालुक्यांमध्ये विभागणी झालेल्या अशा अनुसूचित क्षेत्रांमध्ये देखील केवळ २२ तालुक्यांमध्ये बहुसंख्येने आदिवासी समाज आहे. उर्वरित तालुक्यांमध्ये ते लोकसंख्येच्या २० ते ५० टक्के इतक्या अल्पसंख्येत राहतात आणि म्हणून निर्णय प्रक्रियेमधून ते सहजगत्या बाहेर फेकले जातात. विशेषत: पायाभूत सुविधा कार्यक्रमांच्याबाबतीत आदिवासी लोकांकरिता अर्थसंकल्पीय खर्च देखील कमी करण्यात येतो. अनेक ठिकाणी, निरनिराळ्या तालुक्यांमध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्र विस्तारित आहे, मात्र त्यांचा संपूर्ण जिल्ह्याचा त्यात समावेश नाही. त्याच्या प्रशासनाची विभागणी महसूल, ग्रामविकास, वन व आदिवासी विकास या विभागांमध्ये झालेली आहे. तथापि, आदिवासी विकास विभागाव्यतिरिक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांसारख्या इतर विभागामधील अधिकाऱ्यांना अनुसूचित क्षेत्रांमधील त्याचप्रमाणे बिगर अनुसूचित क्षेत्रांमधील कार्यक्रमांची व्यवस्था पाहावी लागते. म्हणून, जिल्ह्यांतील शासन हे आदिवासी केंद्रित नाही.

७.२.३.४ शासनविषयक प्रश्न : अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार

महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या निदेशांद्वारे करण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्था पद्धत सुकर करण्यासाठी, १९६६ मध्ये पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, अधिनियमित केला होता. अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार यात गतिमान व कठोर विधिविधान आहे आणि आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्याची संभाव्य क्षमता त्यात आहे. तथापि, अगदी आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रामध्ये, अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार यामध्ये केंद्राची निदेशक तत्त्वे अंमलात आणण्याचे धाडस अजून व्हावयाचे आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार कार्यक्रमाची सर्वात मुख्य अडचण म्हणजे त्यात गावाची आणि ***ग्रामसभेची*** योग्यप्रकारे व्याख्या करण्यात आलेली नाही. एखाद्या व्यक्तिगत पाड्यासाठी (***वाडी, पाडा, टोला, पोड, मोहल्ला किंवा गाव***) निर्णय करणारे पीठ म्हणून ***ग्रामसभा*** तयार करण्याऐवजी, ग्रामपंचायतीसाठी (महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार) ***ग्रामसभा*** प्राधिकृत करण्यात आली आहे. हे माहीतच आहे की, ***ग्रामपंचायत*** अनेक गावांनी व पाड्यांनी घेरलेली आहे आणि म्हणून, त्या खऱ्या अर्थाने स्वयं शासनाचे स्थान मिळवू शकल्या नाहीत. दुसरे असे की, आदिवासी समाजाला अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार अधिनियमाच्या कठोर तरतुदींची संपूर्ण माहिती नाही आणि त्यामुळे त्यांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरु झालेली नव्हती. विकेंद्रीकरण आणि सहभागस्वरूप लोकशाही या पद्धतीने अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार यांमधून मिळणारे अपेक्षित लाभ अत्यंत धिम्या गतीने प्राप्त होत आहेत.

७.२.३.५ जनजाति उपयोजना व विकास कार्यक्रमांची मर्यादा

जनजाति उपयोजना सुरु करण्यामागाचे मूलभूत उद्दिष्ट, आदिवासी लोकांचे राहणीमान उंचावणे आणि ते व उर्वरित समाज यांच्यामधील विकास दरी भरून काढणे, हे होते. जनजाति उपयोजना, महाराष्ट्रात १९७५-७६ मध्ये सुरु करण्यात आली होती. १९९२ मधील सुकथनकर समितीच्या शिफारशी स्वीकारणे ही जनजाति उपयोजना कार्यान्वित करण्यामधील मुख्य अडचण होती. या शिफारशींचे अनुसरण करून, जनजाति उपयोजनेसाठी राज्यातील योजनांतर्गत नियतव्याच्या ८.९ टक्के इतका खर्च बाजूला काढण्याची पद्धत स्वीकारण्यात आली आणि आदिवासी विकास विभागाकडे जनजाति उपयोजनेचे नियोजन सोपविण्यात आले. तथापि, अनेक वित्तीय वर्षांमध्ये एकतर, राज्याच्या अर्थसंकल्पाच्या ९ टक्क्यांहून कमी रकमेचे वाटप झाले होते किंवा त्याचा भाग 'खर्च न झाल्यामुळे' व्यपगत झाला. अशाप्रकारे, १९९४ पासून, महाराष्ट्रातील आदिवासी लोकांना अर्थसंकल्पातील आपल्या रुपये ७,६०७ कोटी इतक्या कायदेशीर हिश्श्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे. (जोडपत्र ७.४)

आणखी असे की, तत्त्वत: आदिवासी लोकांना उर्वरित जनसामान्यांच्या पातळीपर्यंत आणण्यासाठी, जनजाति उपयोजनेखाली अर्थसंकल्पीय अतिरिक्त तरतूद केली आहे. म्हणून, संपूर्ण राज्यात एकसमान प्रसार होणे गरजेचे असलेल्या अन्य सेवा किंवा खर्च जनजाति उपयोजनेमधून केला जाता कामा नये. जनजाति उपयोजना अर्थसंकल्पाचा वापर बरेचदा सर्वसाधारण अर्थसंकल्पाच्याऐवजी करण्यात आला आहे आणि तो अर्थसंकल्प सर्वसाधारण अर्थसंकल्पाचा अतिरिक्त भाग म्हणून कधी वापरण्यात आलेला नाही.

सुकथनकर समितीच्या इतर शिफारशी, विशेषत: तळापासून, म्हणजेच गाव पातळीपासून, जनजाति उपयोजनेचे नियोजन करण्यासाठी सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आलेली नव्हती. या अभ्यासगटाने जनजाति उपयोजनेच्या केलेल्या चिकित्सक पुनर्विलोकनावरून असे दिसून आले आहे की, आदिवासी विकास विभाग नियोजन करून विविध विभागांना निधीचे वाटप करण्यास सुरुवात केली आहे. तरीही, ती बाब अगदी केंद्रीभूत व प्रमाणभूत आहे आणि त्यामागचा विचार हा वरपासून तळापर्यंत याच्या उलट आहे. एकाचवेळी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. योजनांच्या अंमलबजावणीच्या सध्याच्या स्थितीचे चिकित्सक मूल्यमापन आणि पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे. योजनेची स्पष्ट व्याख्या न करणे, परस्परविरोधी प्राथम्यक्रम, वाईट व चुकीचे लक्ष्य ठेवणे, योजनांचा उचित आराखडा नसणे किंवा भुरट्या चोऱ्या यांसारख्या समस्या नवनवीन सुधारणांची उद्दिष्टे समोर ठेवून निर्धारित केल्या पाहिजेत. ज्या आदिवासी विकास विभागाने साधनसंपत्तीचे वाटप केलेले आहे त्या विभागाकडे प्रगतीचे संनियंत्रण करण्याची व त्याबाबतचा परिणाम निर्धारित करण्याची यंत्रणा हवी. अंमलबजावणी करणाऱ्या विभागांवर दायित्व निश्चित करणाऱ्या अशा पुनर्विलोकनाच्या आणि संनियंत्रण प्रक्रियेच्या अभावी २४

एकात्मीकृत आदिवासी विकास प्रकल्पांपैकी ११ प्रकल्प संवेदनाक्षम स्थितीत आहेत. शासनाने त्यावर भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, तो अजून प्रत्यक्षात यायचा आहे. आदिवासी विकास विभागाकडे सक्षम कर्मचारीवर्गाची कमतरता असल्याने त्याचा प्रकल्पाच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला आहे. दुसरे असे की, जिल्हा नियोजन समितीमध्ये नियोजनाची व संनियंत्रणाची स्वतंत्र व्यवस्था करणे अपेक्षित असले तरी, त्याची अंमलबजावणी प्रतिक्षित आहे. (शासन निर्णय क्रमांक जनजाति उपयोजना-१०९९/क्रमांक २७/६, दिनांक १९ जून, १९९९ नुसार) तिसरे म्हणजे, प्रकल्प स्तरीय अंमलबजावणी समिती (शासन निर्णय क्रमांक जनजाति उपयोजना-१९९२/१३-१/६, दिनांक ११ फेब्रुवारी, १९९३ नुसार) अद्याप कार्यान्वित व्हायची आहे. परिणामी, कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची व त्यांचे संनियंत्रण करण्याची, आदिवासी विकास विभागाची क्षमता क्षीण बनली आहे.

थोडक्यात काय तर आदिवासी लोकांची सध्याची वंचितावस्था अनेक घटक व प्रक्रियांचा संमिश्र परिणाम आहे. वसाहतवादाचा अंमल असताना हक्कांपासून वंचित होणे, स्वातंत्र्यानंतरचे सामाजिक व राजकीय दुर्लक्ष, सांस्कृतिक अधिनता, बिगर आदिवासींनी जमीन, वन व जलसंपदा अन्यसंक्रमित करून अनेक प्रकारे पिळवणूक करणे इत्यादी. आज आदिवासी लोकांना ज्यांना आपण चेतना हरवणे म्हणतो त्या गोष्टीला सामोरे जावे लागत असल्याचा प्रत्यय येतो. समतोल विकासाच्या संदर्भात, मुळात वचनभंगाची ही दु:खद गोष्ट आहे.

या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी, विकास भरून काढण्याकरिता व वाढ सुकर करून सर्वांगीण विकास साधण्यासाठी पुढीलप्रमाणे काही शिफारशी प्रस्तुत केल्या आहेत.

चौकट ७.१
आदिवासी विकासासाठी पंडित जवाहरलाल नेहरूंचे पंचशील

१. लोकांनी स्वत:च्या प्रतिभेनुसार स्वत:चा विकास साधावा आणि आपण त्यांच्यावर काहीही लादणे टाळावे. आपण, हरएक प्रकारे त्यांच्या पारंपारिक कलेला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा.

२. जमीन व वन यांमधील आदिवासींचे हक्क संरक्षित करावेत.

३. त्यांच्यातील लोकांनी स्वत:चा एक संघ निर्माण करून प्रशासनाचे आणि विकासाचे काम करावे म्हणून त्यांना प्रशिक्षण देण्याचा आणि संघ बांधणीसाठी मदत करण्याचा आपण नेहमीच प्रयत्न करावा. यात काही वाद नाही की, काही तांत्रिक कर्मचारीवर्गाची, विशेषत: सुरुवातीला बाहेरून गरज लागेल. मात्र बाहेरील बऱ्याच लोकांना आदिवासी क्षेत्रांमध्ये आणण्याचे आपण टाळावे.

४. आपण, बहुविध योजना राबवून या क्षेत्रांचे अधिक प्रशासन करू नये किंवा त्यांना भारावून टाकू नये, किंबहुना आपण त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक संस्थांच्यामार्फत आणि त्यांच्या विरोधात नव्हे, काम करावे.

५. आपण आकडेवारीच्या किंवा खर्च केलेल्या रकमेच्या आधारे नव्हे तर, मानवी जीवनाच्या विकसित दर्जाच्या आधारे परिणामांचे मूल्यांकन करावे. (गुहा, २००१: २६८)

७.३ शिफारशी

दृष्टिक्षेप :

आदिवासी लोक हे स्वत:च त्यांच्या विकासाचे शिल्पकार आहेत हे ओळखून, आवश्यक साधनसंपत्ती पुरवून त्यांना सक्षम करणे हे आपल्या राज्याच्या धोरणांचे उद्दिष्ट असले पाहिजे. यासाठी पंचशील मार्गदर्शक तत्त्वे, भारताच्या संविधानाद्वारे घालून दिलेली चौकट आणि केंद्र सरकार व राज्य शासन यांनी अधिनियमित केलेले कायदे व विधिविधान यांचे अनुसरण करून, हे उद्दिष्ट साकार करण्याची गरज आहे. या दृष्टिने, आमची उद्दिष्टे आणि शिफारशी मार्गदर्शक ठरतील.

उद्दिष्टे : २०२७ पर्यंत पुढील गोष्टी साध्य करणे.

१. आदिवासी लोकांचा मानवी विकास निर्देशांक राज्याच्या सरासरी इतका आणावा.

२. आदिवासी लोकांचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक प्रादेशिक दरडोई उत्पन्नाइतके किंवा त्यांच्या किमान ८० टक्के इतके आणावे.

लक्ष्य :

१. जिल्हे व तालुके यांचा पुन्हा आराखडा तयार करावा, म्हणजे तेथे आदिवासी लोक बहुसंख्येने असतील असे एकूण जवळपास आठ जिल्हे व १०० तालुके असतील.

२. आदिवासी समाजाला स्वत:चा विकास करता यावा यासाठी, त्यांच्या अधिकारात प्रक्रांती घडवून आणणे आणि त्यांच्या क्षमतेचा विकास करावा. जेणेकरून, ५० टक्के जनजाति उपयोजना अर्थसंकल्प नियंत्रणात येईल आणि ग्रामसभेकडून त्याचे व्यवस्थापन करता येईल.

३. आदिवासी लोकांच्या जमीन सुधारणांची, अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार आणि वन हक्क अधिनियम यांची पूर्णपणे अंमलबजावणी करणे; ज्यामुळे कोणतेही आदिवासी कुटुंब किंवा गाव या तीन हक्कांपासून वंचित राहणार नाही.

४. दोन लक्ष आदिवासी युवकांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी व्यवसाय शिक्षण / व्यावसायिक शिक्षण देणे आणि वित्तीय व व्यवस्थापन पाठबळ देण्यात यावे.

७.३.१ प्रशासकीय व संस्थात्मक सुधारणा

७.३.१.१ महाराष्ट्र आदिवासी सल्लागार परिषद (टीएसी)

राज्यातील आदिवासी संबंधातील कामकाज सक्रिय व जबाबदारीने पार पाडण्यासाठी पुढील उपायोजनांच्या माध्यमातून आदिवासी सल्लागार परिषद सक्षम करण्यात यावी:

१. आदिवासी सल्लागार परिषदेला 'आदिवासी सल्लागार व विकास परिषद' असे नाव देऊन तिची व्याप्ती व जबाबदाऱ्या यांमध्ये वाढ करण्यात यावी.

२. राज्याची संपूर्ण आदिवासी विकास योजना व तिचा नियतव्यय राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यापूर्वी आदिवासी सल्लागार परिषदेसमोर ठेवून त्यास मान्यता घ्यावी आणि आदिवासी सल्लगार परिषदेने त्याचे संनियंत्रण करावे.

३. विधानसभेच्या आदिवासी सदस्याला साधारणपणे आदिवासी विकास मंत्री करावे.

४. आदिवासी सल्लागार परिषदेची महत्त्वपूर्ण जबाबदारी लक्षात घेता, (एक कोटी लोक आणि ४००० कोटी रुपये इतका नियतव्यय), तिच्या वर्षातून किमान सहा वेळा, प्रत्येक वेळी एक पूर्ण दिवस, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेण्यात याव्यात.

५. आदिवासी विकास विभाग, आदिवासी सल्लागार समितीला स्पष्टीकरण देण्यास जबाबदार असेल. त्यांनी त्यांचे वार्षिक नियोजन, अर्थसंकल्प व कामगिरी अहवाल आदिवासी सल्लागार समितीला सादर करावे व पुढील वर्षासाठी मान्यता घ्यावी.

६. विशेष अभ्यासगटाची नियुक्ती करावी आणि आदिवासी सल्लागार समितीचे कामकाज अधिक चांगल्या रीतीने करण्यासाठी तज्ञांचा सल्ला उपलब्ध करून द्यावा.

७. आदिवासी सल्लागार समितीचे सदस्य, अधिकारी आणि तज्ञ व्यक्ती यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर बैठकीची कार्यसूची तयार करावी.

८. मा. राज्यपाल, सांविधानिक जबाबदारीचा एक भाग म्हणून आदिवासी सल्लागार समितीच्या कार्याचे अवलोकन करतील.

९. आदिवासी सल्लागार समितीच्या वार्षिक कामगिरीचा अहवाल राज्य विधानसभेला सादर करण्यात यावा.

७.३.१.२ **महाराष्ट्र पंचायत (अनुसूचित क्षेत्रांसाठी विस्तार) अधिनियम.** यामध्ये केंद्रीय निदेशांनुसार त्वरित सुधारणा कराव्यात. या प्रयोजनाकरिता, राष्ट्रीय सल्लागार परिषदेद्वारे विकसित करण्यात आलेला मसुदा, मार्गदर्शक चौकट म्हणून स्वीकारण्यात यावा. ग्रामीण स्तरावर सर्व निर्णय घेण्यासाठी मूळ रहिवाश्यांच्या (***गाव, वाडी, टोला, पाडा, पोड, मोहल्ला, तांडा*** इत्यादी) ***ग्रामसभेवर*** लक्ष केंद्रित करण्यात यावे. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांसाठी विस्तार) अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे काम आदिवासी विकास विभागाकडे सोपविता येईल. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांसाठी विस्तार) अधिनियमाअन्वये त्यांना त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांचे वापर करणे शक्य व्हावे यासाठी ***ग्रामसभेचे*** व्यापक प्रशिक्षण हाती घेण्यात यावे. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांसाठी विस्तार) अधिनियम याची अंमलबजावणी करण्यासाठी अशासकीय व सामाजिक संस्थांना सहभागी करून घ्यावे.

७.३.२ जनजाति क्षेत्र उपयोजना निधीचे वाटप

आदिवासी लोकांची चिंताजनक विकास पोकळी भरून काढणे हे जनजाति क्षेत्र उपयोजनेचे प्रयोजन आहे आणि जनजाति क्षेत्र उपयोजना निधीमधून, ही पोकळी भरून काढण्यासाठी काही विशिष्ट धोरण व कार्यक्रम निश्चित करण्याची गरज आहे. जनजाति क्षेत्र उपयोजनेला केवळ लेखांकनाचा वापर करून घट करणे शक्य नाही. त्याद्वारे विभागाला, जनजाति क्षेत्र उपयोजना शीर्षांतर्गत त्यांच्या खर्चाचे (८.९ टक्के) प्रमाण नुसते आगाऊ राखून ठेवता येते. जनजाति क्षेत्र निधीला प्रत्येक क्षेत्रातील खर्चाचे केवळ गणिती प्रमाणाप्रमाणे वाटप करणे शक्य नाही. जनजाति क्षेत्र उपयोजनेला विशेष व विनिर्दिष्ट नियोजन असावयास हवे आणि अनुसूचित जमातीच्या विकास गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन योजना व कार्यक्रम विकसित करण्याच्या प्रयत्नांची गरज आहे. तसेच सिंचन, वीज, आरोग्य व शिक्षण यांसारख्या सर्वसामान्य क्षेत्र योजनांकरिता जनजाति क्षेत्र निधीमधून आणखी प्रमाणशीर निधी देण्यात येऊ नये. तत्त्वत:, जनजाति क्षेत्र योजना निधी, उक्त नियमित सर्वसाधारण योजनेहून अधिक आदिवासी विनिर्दिष्ट योजना विकसित करण्यासाठी 'अतिरिक्तता तत्त्वावर' पुरविण्यात यावा.

७.३.२.१ जनजाति क्षेत्र उपयोजनेच्या वार्षिक अर्थसंकल्पाच्या ८.९ टक्क्यांची विद्यमान तरतूद २०११ च्या जनगणनेच्या नवीन निष्कर्षांनुसार सुधारण्यात यावी, व ती राज्य अर्थसंकल्पाच्या ९.३५ टक्के एवढी करण्यात यावी.

अतिरिक्ततेचे तत्त्व म्हणून विकासाकरिता जनजाति क्षेत्र उपयोजना अर्थसंकल्पाच्या ९.३५ टक्के इतके वाटप करण्यात यावे (म्हणजेच, हा निधी विकास कार्यक्रमांसाठी व अन्य जनजाति क्षेत्र उपयोजनेतर क्षेत्र म्हणून जनजाति क्षेत्र उपयोजनांचा योजनेतर अर्थसंकल्पासाठी नियमित निधीहून अधिक आहे.)

७.३.२.२ महाराष्ट्र शासनाने विधानमंडळाच्या अधिनियमानुसार किंवा राज्यपालांच्या आदेशाने असे बंधनकारक करावे की, जनजाति क्षेत्र उपयोजनेचा निधी व्यपगत करू नये किंवा इतर प्रयोजनासाठी वळवू नये. (आंध्र प्रदेश विधानसभेने असा अधिनियम नुकताच संमत केला आहे.)

७.३.२.३ गरजा योग्यरीतीने पूर्ण करणे आणि अत्यंत गरजू व पात्र व्यक्तींच्या आवश्यकता भागविणे यासाठी अर्थसंकल्पाच्या विद्यमान वाटप पद्धतीमध्ये फेरफार करावेत. पंचायत (अनुसूचित क्षेत्रासाठी विस्तार) अधिनियम याच्या तत्त्वानुसार जनजाति क्षेत्र उपयोजनेचा किमान निम्मा निधी ***ग्रामसभेसाठी*** राखून ठेवण्यात यावा व तो प्राधान्यक्रम व कार्यक्रम निर्धारित करण्यासाठी वापरण्यात यावा. जनजाति क्षेत्र उपयोजनेच्या निधीचे निर्धारण व वाटप पुढील रीतीने करावे.

तक्ता ७.४
प्रस्तावित अर्थसंकल्पीय नियतवाटप तत्त्व

अ.क्र.	स्तर	जनजाति क्षेत्र उपयोजना अर्थसंकल्पाची टक्केवारी
१	२	३
१	ग्रामसभा	५०
२	ग्रामपंचायत	२०
३	पंचायत समिती	१५
४	जिल्हा स्तर	१०
५	राज्य स्तर	५
	एकूण	**१००**

७.३.२.४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्याने आदिवासी ***ग्रामसभांशी*** थेट संपर्क प्रस्थापित करावा व वरीलप्रमाणे व्यवस्था करावी. असा बदल यशस्वीपणे घडून येण्यासाठी प्रमुख क्षमता उभारणी कार्यक्रमाचा प्रारंभ आपल्या राज्याद्वारे करण्याची गरज असेल हे आम्ही ओळखले आहे.

७.३.२.५ जिल्हा जनजाति उपयोजना समिती (शासन निर्णय क्रमांक जनजाति उपयोजना/१०९९/ २७/६, दिनांक १९ जून, १९९९) कार्यरत करावी आणि त्यांनी, स्वतंत्रपणे बैठका घेणे व संबंधित जिल्ह्यांमध्ये जनजाति क्षेत्र उपयोजनेचे नियोजन करणे व संनियंत्रण करणे अनिवार्य असेल.

७.३.२.६ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या कार्यक्रमांचे पुनर्विलोकन व संनियंत्रण करण्याचे अतिशय योग्य साधन असल्याचे आढळून आल्यामुळे **प्रकल्पस्तरीय कार्यान्वयन समिती** (शासन निर्णय क्रमांक जनजाति उपयोजना/१९९२/ १३-१/६, दिनांक ११ फेब्रुवारी, १९९३) कार्यरत करावी.

७.३.२.७ **विधानमंडळाची अनुसूचित जमाती कल्याण समिती** पुन:स्थापित करावी व तिला 'स्थायी समितीचा' दर्जा द्यावा आणि तिचा अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवावा व त्यावर सखोल चर्चा करावी.

७.३.२.८ विकास कार्यक्रम व निधीची व्यवस्था करण्यासाठी आदिवासी ***ग्रामसभा***, प्रतिनिधी व पुढारी यांना सहाय्यभूत होण्यासाठी **क्षमता विकास कार्यक्रम** मोठ्या प्रमाणात हाती घ्यावा.

७.४ प्रशासकीय सुधारणा

७.४.१ **आदिवासीबहुल जिल्हे व तालुके निर्माण करणे:** अनेक आदिवासी अल्पसंख्याक जिल्हे व तालुके यांमधील अनुसूचित क्षेत्राच्या विभाजनाची विद्यमान समस्या सोडविण्यासाठी, लहान, लगतचा व आदिवासी बहुसंख्यांक तालुके व जिल्हे निर्माण करण्यासाठी, अनुसूचित क्षेत्रामधील प्रशासकीय सीमांची पुनर्व्याख्या करावी. (छत्तीसगड मधील डाव्या जहाल मतवादाने (नक्षलवादाने) बाधित आदिवासी क्षेत्रातील शासनात सुधारणा करण्यासाठी, बस्तर जिल्ह्याची विभागणी अलिकडे प्रत्येक दोन लाखांच्या लोकसंख्येसह सात जिल्ह्यांत करण्यात आली आहे.) अनुसूचित क्षेत्रात राहणारी जवळपास ७५ लाख एवढ्या एकूण (बिगर आदिवासी लोकसंख्येसह ५० लाख आदिवासी लोक) लोकसंख्येकरिता एकूण आठ आदिवासी जिल्हे आणि१०० आदिवासी तालुक्यांची निर्मिती करता येईल. यासाठी चार निकष असावेत. (१) प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात आदिवासी लोक बहुसंख्येने असावेत. (२) जिल्हा व तालुक्यातील एकूण लोकसंख्या अनुक्रमे दहा लाख व ८० हजार पेक्षा कमी नसावी. (३) कोणत्याही गावाचे अंतर जिल्हा मुख्यालयापासून १०० कि.मी. पेक्षा जास्त व तालुका मुख्यालयापासून २५ कि.मी. जास्त नसावे. (४) प्रशासकीय युनिटे अधिकाधिक मर्यादेपर्यंत अनुसूचित क्षेत्रांशी अनुरूप असावीत.

अशा आदिवासीबहुल जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या निर्मितीमुळे, आदिवासी विभाग व प्रशासनाला केंद्रस्थान

करताना, संपूर्ण तालुका व जिल्हा यांमध्ये पंचायत (अनुसूचित क्षेत्रासाठी विस्तार) अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मुभा मिळेल. या नवीन प्रशासकीय युनिटांशी योग्यरीतीने अनुरूप होण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पुन्हा तयार करावेत.

७.४.२ हे आव्हानात्मक कार्य पार पाडण्यासाठी **आदिवासी विकास विभागाची** पुनर्रचना करण्यात यावी व त्याचे बळकटीकरण करण्यात यावे. हे कर्मचारीवर्गाच्या थेट, समस्तर प्रवेशाद्वारे तडीस नेता येईल. आदिवासींना निपुण बनवण्याकरिता विभागाला अभिमुख बनवण्याची गरज आहे. त्यांनी आदिवासी सल्लागार समिती अंतर्गत सक्षम, पारदर्शक व जबाबदारपणे कार्य करावे.

७.४.३ **अपर आदिवासी आयुक्त** हा, जिल्हा अधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वरिष्ठ असलेला भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असला पाहिजे. अनुसूचित क्षेत्रातील जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपर आदिवासी आयुक्तास अहवाल द्यावा. त्यामुळे, आदिवासी विकास विभागाला आदिवासी विकासाचे कार्यक्रम व निधी यांच्या प्रशासनाचे व जबाबदारीचे प्रभावीपणे अवलोकन करणे शक्य होईल.

७.४.४ **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था :** यशदाच्या (यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी) धर्तीवर विकसित करण्यात याव्यात. आणि यथोचित मनुष्यबळाची नियुक्ती करून प्राथमिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये तिचे रूपांतर करावे. पुण्यातील राज्य आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा दर्जा वाढविण्याव्यतिरिक्त, आदिवासी नेते / प्रतिनिधी यांना प्रशिक्षित करण्यासाठी व आदिवासी विकास कार्यक्रमांचे संनियंत्रण/ मूल्यमापन करण्यासाठी चार प्रादेशिक संशोधन व प्रशिक्षण केंद्रे (प्राधान्याने, असुविधा असलेल्या आदिवासी जिल्ह्यांमध्ये) पुनर्स्थापित करावीत. आदिवासी लोकांची परिस्थिती व कार्यक्रमांची अंमलबजावणी यांची अचूक व अद्ययावत माहिती संकलित करणे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक असेल. ही माहिती दरवर्षी प्रसिद्ध करणे अनिर्वाय करता येईल. आम्ही अशीही शिफारस करतो की, आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील राज्य विद्यापीठांमध्ये आंतर- विद्याशाखीय केंद्रांची स्थापना करावी.

७.४.५ **आदिवासी विकास निर्देशांक** मोजण्याची पद्धत मानव विकास निर्देशांकाच्या धर्तीवर तयार करण्यात यावी व दरवर्षी ती प्रसिद्ध करावी.

७.४.६ आदिवासी जनतेच्या दर्जावर आणि विविध विकासात्मक कार्यक्रमांच्या कार्यचालनावर **ग्राह्य खऱ्या माहितीचा अभाव** असल्यामुळे संनियंत्रण करताना व निर्णय घेताना मोठा अडथळा येतो. महाराष्ट्राकरिता उभारावयाच्या सांख्यिकी आयोगाची ही एक स्वतंत्र जबाबदारी असेल. आदिवासी विकास विभाग किंवा स्वतंत्र राज्यव्यापी अभिकरणे यांच्याकडे प्रत्येक आदिवासी गट व प्रत्येक गाव यांच्यापर्यंत पोहोचून माहिती गोळा करणे, संनियंत्रण करणे व कार्यक्रमांचे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी सोपवली असेल. या कामांसाठी आदिवासी उपयोजनेच्या वार्षिक अर्थसंकल्पाच्या ०.२५ टक्के निधी खर्च करावा.

७.५ हक्क व नैसर्गिक देणग्या

७.५.१ जमीन सुधारणा: शासनाने विशेष आयोगाची नियुक्ती करून, आदिवासी लोकांसाठी सर्व जमीन सुधारणा व जमीन वाटपाच्या कार्यक्रमाची त्वरेने अंमलबजावणी करावी व पुढील दोन वर्षांमध्ये वचनपूर्ती करावी. मार्च, २०१३ मध्ये केंद्र सरकारने काढलेल्या मार्गदर्शनपर सल्ल्यांना धरून राहावे. भूमि अभिलेखामधील विसंगती दूर करणे व दिनांक ३१ मार्च, २०१५ पूर्वी संभवनीय आदिवासी लाभार्थींच्या जमिनीच्या हक्काची प्रक्रिया पूर्ण करणे, हे या आयोगाचे अंतिम उद्दिष्ट असावे.

७.५.२ आदिवासी लोकांच्या **जमिनींचे अन्यसंक्रमण** करता येणार नाही किंवा त्या जमिनी कोणत्याही कारणासाठी व कोणत्याही बहाण्यासाठी किंवा कार्यक्रमासाठी देता येणार नाही. आदिवासींच्या अन्यसंक्रमित जमिनी तातडीने व कालबद्ध कार्यक्रमाद्वारे परत करण्यात याव्यात.

७.५.३ **वन हक्क अधिनियम, २००६** याचा शब्दश: व पुरेपूर स्वीकार करून त्याची तातडीने व कालबद्ध रीतीने अंमलबजावणी करण्यात यावी. पुढील प्रशासकीय उपाययोजना त्वरित हाती घेण्यात याव्यात :

१. वन हक्क संरक्षण अधिनियम, २००६ चे कलम ३.१ व कलम ५ यांची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी, जेणेकरून कोणत्याही ग्रामसभेचा (वन हक्क समिती) सामूहिक मालकी हक्क हिरावून घेतला जाणार नाही.

२. राज्यस्तरीय सुकाणू समितीने, या अधिनियमाच्या शीघ्र अंमलबजावणी संबंधात स्पष्ट व नेमक्या सूचना देण्यात याव्यात. आदिवासी, महाराष्ट्र विधानसभा सदस्य व अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश करून जिल्हा संनियंत्रण समिती घटित करावी.

३. आदिवासी विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी घोषित केल्याप्रमाणे, आधार मूल्याचे कार्यतंत्र सुरु करावे. जेणेकरून, बाजारात इमारती लाकूड नसलेल्या वन उत्पादनांची विक्री करताना आदिवासी समाजाच्या पिळवणुकीला प्रतिबंध करता येईल.

४. 'पारगमन परवाना' मंजूर करण्याची प्रक्रिया व इतर प्रक्रिया यांचे सुसूत्रीकरण करण्यात यावे.

५. आदिवासी विभागाद्वारे सामाजिक वनांच्या व्यवस्थापनात ***ग्रामसभांना*** अधिकार प्रदान करण्यासाठी व्यापक प्रशिक्षण व क्षमता उभारणी कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

६. आदिम आदिवासी गटांना, वन हक्क अधिनियम, २००६ अन्वये 'वसतिस्थान हक्क' प्रदान करण्यात आले आहेत. आदिवासी विकास विभागाने, या तरतुदींअन्वये त्यांचे दावे दाखल करून घेण्यासाठी त्वरित उपाययोजना करावी.

७.५.४ **विकासातील तफावत** दूर करणे आणि आदिवासी लोकांना विकासाच्या समन्याय पातळीवर आणणे हे शासनाचे उद्दिष्ट असले पाहिजे; याची रचना, पंचशील धोरण आणि पंचायतीसंबंधीचे उपबंध अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे या बाबी अधिनियमानुसार ते स्वत: ठरवतील. आदिवासी जनता विकासात पिछाडीवर आहे. याकरिता अडचणी व अन्यायाचा दीर्घकालीन इतिहास आणि जल व मत्स्यव्यवसायविषयक हक्क न देण्यासह १९६० पासून जमिनींशी आणि वनांशी संबंधित विविध कायद्यांची अंमलबजावणी करण्यात झालेला अक्षम्य विलंब कारणीभूत आहे. अशाप्रकारे, त्यांना वंचित ठेवल्यामुळे झालेले नुकसान लोकसहभागाने आणि अर्थसंकल्पीय तरतूद करून सर्वांगीण विकास कार्यक्रमाद्वारे भरून काढावे. आदिवासी जनतेचे उत्पन्न आणि मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरीइतका आणण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्याची आवश्यकता आहे. यात पुढील बाबींचा अंतर्भाव असला पाहिजे:

१. पाणलोट क्षेत्राचा १०० टक्के विकास करणे आणि आदिवासी जनतेच्या मालकीच्या लागवडयोग्य जमिनीच्या कमीत कमी ५० टक्के जमिनीवरील किमान दोन पिकांसाठी सिंचन सुविधा पुरवणे.

२. दोन दशलक्ष आदिवासी युवकांना व्यवसाय/धंद्याचे शिक्षण देणे आणि स्वंयरोजगार उपलब्ध करून देणे.

३. ज्या वनांवर आदिवासी ग्रामसभांना सामूहिक हक्क प्रदान करण्यात आले आहेत. त्या वनांचा विकास करण्यासाठी निधी देणे.

७.५.५ आदिवासी जनतेकरिता उत्पन्न निर्मिती धोरण म्हणून वनांचा विकास करणे

कमी उत्पन्न मिळवून देणारे क्षेत्र म्हणून वनांकडे पाहण्याचा पूर्वापार दृष्टिकोन असल्याने वन विभागदेखील त्याकडे फारसे लक्ष देत नाही. नवीन वन हक्क अधिनियमानुसार (२००६) अनेक आदिवासी गावांना सामूहिक वन हक्क मिळाले आहेत आणि ते देण्यात येतील. या वनांचा सक्रियपणे विकास आणि परिपोषण केले पाहिजे. जेणेकरून जास्तीतजास्त वनोत्पादन मिळेल. या ठिकाणी अनेक प्रकारच्या वनस्पती व वनोत्पादने असून त्यांचे परिपोषण करता येईल, जसे बांबू, तेंदू, मोह, चर, लाख, वनौषधी, मध, जळाऊ लाकूड व इमारती लाकूड. अशा क्षेत्रांतील अनेक भागात भरपूर पाणी उपलब्ध असल्याने त्याचा वापर करून सिंचनाद्वारे वनीकरण करता येईल. सामूहिक हक्कांतर्गत अशा वनांचा विकास करण्यासाठी

निधी पुरविण्याकरिता जनजातिक्षेत्र उपयोजना निधीचे वाटप करता येईल.

७.६ विकासातील तफावत आणि आवश्यक कार्यक्रम

७.६.१ आदिवासी प्रदेशातील नैसर्गिक साधनसंपत्तीची अनुकूलता लक्षात घेऊन, किमान दोन पिकांसाठी सिंचन सुविधा पुरविण्याचे व्यापक उद्दिष्ट असले पाहिजे. ज्याचे नियंत्रण व व्यवस्थापन समूहाला करता येईल अशा पाणी साठवण्याच्या आणि सिंचनाच्या पध्दती असाव्यात आणि त्यामुळे पाणी वाया जाता कामा नये. आधीच बंधारे बांधले असतील तर त्या बाबतीत पाणी साठयातील १० टक्के पाणी प्रवाहाच्या वरच्या बाजूला राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांकरिता राखून ठेवावे. त्याचप्रमाणे, पाणलोटाच्या क्षेत्रातील जमिनीच्या लागवडीचे हक्क आदिवासी कुटुंबांना मिळाले पाहिजेत.

७.६.२ आदिवासी क्षेत्रांमध्ये जलग्रहण क्षेत्र विकास तसेच **पाणलोट क्षेत्र विकासाचा** (जल व मृदसंधारण आणि वनीकरण यांवर भर देऊन) सर्वसमावेशक कार्यक्रम, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियमामार्फत आणि अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रमासारखे इतर कार्यक्रम एकत्रित करून त्यामार्फत राबविण्यात यावेत. स्थानिक पातळीवरील नियोजनासाठी ***ग्रामसभेला*** प्रोत्साहन देण्यात यावे आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत तिचा सहभाग असावा.

७.६.३ गोडया पाण्यातील मासेमारी हे उपजीविकेचे तसेच विकासाचे साधन आहे ही वस्तुस्थिती विचारात घेऊन, पुढील दहा वर्षांकरिता जनजाति क्षेत्र उपयोजना क्षेत्रातील ९७,००० हेक्टर मत्स्यव्यवसाय क्षमतेचा विकास करण्याचे उद्दिष्ट निश्चित करावे; आणि एक निश्चित, कालबध्द मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाचा आराखडा तयार करावा. विविध अशासकीय संघटनांनी सप्रमाण सिध्द केलेले नवीन पथदर्शी प्रकल्प या प्रयोजनार्थ लक्षात घ्यावेत. मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहकार्याने तपशीलवार योजना आणि अंदाजपत्रक तयार करावे आणि जनजाति क्षेत्र उपयोजनेतील विद्यमान तरतूद यथाप्रमाण वाढवावी.

७.६.४ सुशिक्षित बेरोजगार आदिवासी युवकांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण देणे, बीज भांडवल आणि खेळते भांडवल उपलब्ध करून देणे, तसेच बाजाराशी सांगड घालून देण्याची व्यवस्था करणे यांवर भर देणारे विशेष कार्यक्रम तयार केले पाहिजेत. **आगामी दहा वर्षांकरिता दरवर्षी २,००,००० आदिवासी युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य ठेवले पाहिजे.** याकरिताचे आराखडे व अंदाजपत्रक राष्ट्रीय कौशल्य विकास मिशनच्या (अभियानाच्या) सहकार्याने तयार करावेत व विद्यमान जनजाति क्षेत्र उपयोजनेकरिता असलेल्या निधीखेरीज, ही अतिरिक्त साधने उपलब्ध करून द्यावीत.

७.६.५ ज्या वनांचे हक्क आदिवासी समुदायाला देण्यात आले आहेत किंवा प्रदान करावयाचे आहेत अशा वनांचा विकास करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद जनजाति क्षेत्र उपयोजनेकरिता असलेल्या ९.३५ टक्क्यांपेक्षा अधिक असावी.

७.६.६ उर्वरित राज्यासाठी म्हणून वर्षभरातील पिण्याच्या पाण्याची व घरगुती वापराच्या पाण्याची (दररोज दरडोई १४० लिटर) तरतूद सर्व आदिवासी गावांसाठी करण्याची सुनिश्चिती करावी.

७.६.७ गावपातळीवरील विकास आणि **महात्मा गांधी रोजगार हमी योजना / महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी** अधिनियमांतर्गत रोजगारनिर्मिती प्रकल्प सर्व ***ग्रामसभांमध्ये*** हाती घेण्यात यावेत आणि जनजाति क्षेत्रातील आपद्ग्रस्तांचे हंगामी स्थानांतरणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने नियमित रोजगार पुरविण्यात यावा. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना कार्यक्रम आदिवासी क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणावर राबविण्यात यावा. किमान एक दशलक्ष आदिवासी कुटुंबांना म्हणजेच जनजाति उपयोजनेतील दोन दशलक्ष प्रौढांना किमान २०० दिवसांचा रोजगार देण्याचे वार्षिक उद्दिष्ट पुढील दहा वर्षांकरिता ठेवले पाहिजे.

७.६.८ जी अनुसूचित क्षेत्रे, वन साधनसंपत्तीचे संरक्षण करतात त्यांना **'हरित बोनस'** मंजूर करण्यात यावा. १३ व्या वित्त आयोगाने उत्तरपूर्वेकडील राज्यांना **'हरित बोनस'** देण्याचे सूत्र आखून दिले आहे. याच सूत्राचा वापर करून राज्यातील अनुसूचित क्षेत्रांना पुढील पाच वर्षे सुमारे रुपये ३०० कोटी द्यावे लागतील, असा आमचा अंदाज आहे. ही रक्कम बिनशर्त

आणि वन हक्क अधिनियम, २००६ द्वारे मिळालेली नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्कदारीस बाध न आणता देण्यात यावी.

७.६.९ वरील 'विकासातील तफावत' भरून काढण्यासाठीचा निधी जनजाति क्षेत्र उपयोजनेच्या निधीसाठी आधी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विविध पातळ्यांवर देण्यात यावा.

७.६.१० आदिवासींचा विकास घडवून आणणाऱ्या अशासकीय संघटनांना, त्यांच्या कैवारी म्हणून उत्तेजन दिले पाहिजे.

७.७ शिक्षण

७.७.१ जनजाति क्षेत्रातील शिक्षणपध्दतीचा मूलभूत उद्देश सांस्कृतिक वारसा हस्तांतरित करणे आणि सर्व आदिवासी मुलांना उपजीविका मिळवून देणाऱ्या कौशल्यांचा विकास करण्यासह सयुक्तिक व दर्जेदार शिक्षण देणे हा असावा. याकरिता विशेषत्वाने पुढील उपाययोजना कराव्यात :

१. आदिवासी पाडयांवर शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी ***अंगणवाड्यांच्या*** जोडीला **पूर्व प्राथमिक शाळा** सुरू कराव्यात.

२. बालकाच्या **मातृभाषेतून** प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे. ढेबर आयोगाच्या (१९६१) शिफारशी आणि राष्ट्रीय जनजाति धोरणाच्या मसुद्यानुसार इयत्ता तिसरी किंवा चौथीपासून इतर भाषा शिकविण्यास सुरुवात करावी.

३. जनजाति क्षेत्रातील शिक्षणाचे (प्राथमिक शाळा, ***आश्रमशाळा*** आणि वसतिगृहे) मूल्यमापन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विविध अभ्यास गट आणि समित्यांच्या अनेक शिफारशी प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा सर्वांगीण आढावा घेऊन त्या पुढील दोन वर्षांत राबविण्यात आल्या पाहिजेत.

४. विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्थांना अर्थसहाय्य देण्यातील असमानता दूर करून आदिवासी विकास विभागाने एकरूप, गुणात्मक सहाय्य केले पाहिजे.

५. ***ग्रामसभांकडे*** त्यांच्या अधिकारितेतील शैक्षणिक आस्थापनांचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी सोपविली पाहिजे. अंतिमत:, स्थानिक शिक्षणपध्दती राबविण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली पाहिजे.

६. सर्व शिक्षा अभियानातील तरतुदींचे अनुपालन करून हंगामी स्थानांतरित बालकांकरिता विशेष हंगामी वसतिगृहे अथवा इतर व्यवस्था केली पाहिजे.

७. आदिवासी युवकांकरिता असलेल्या **व्यावसायिक प्रशिक्षणात** कृषि, मत्स्यव्यवसाय, कृषि-उद्योग, वनीकरण, फलोत्पादन, जैवविविधता, जल व ऊर्जा व्यवस्थापन आणि स्थानिक उद्योगांमध्ये नव्याने उपलब्ध होणाऱ्या संधींची जाणीव करून देण्यावर भर असला पाहिजे.

८. आदिवासी बालकांचा अभ्यासक्रम, पाठयपुस्तके व शिक्षक हे **आदिवासी संस्कृतीची** संपन्नता व शक्तिस्थळे यांचे अनुकूलरीतीने शिक्षण देणारे असावेत.

९. (१) आदिवासी बालकांकरिता व युवकांकरिता शैक्षणिक मॉडेल व कार्यपध्दती विकसित करण्यासाठी (२) आदिवासी युवकांना यथोचित शिक्षण व उपजीविकेकरिता कौशल्य ज्ञान देण्यासाठी आणि (३) आदिवासी संस्कृती,जीवनमान, विकास आणि उकल यांवर संशोधन करण्यासाठी समर्पित असलेली **दोन आदिवासी विद्यापीठे** (गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठ आणि ठाणे- नाशिक क्षेत्रातील आणखी एक नवीन विद्यापीठ) स्थापन करण्यात यावीत.

१०. नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पूर्व विदर्भातील गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठ हे, (एक) आदिवासी विकास (दोन) आदिवासी शिक्षण (तीन) आदिवासी संस्कृती (चार) वन (पाच) वनोत्पादनांवर आधारित व्यवसायाचा विकास आणि (सहा) आदिवासी शासन केवळ याकरिताच पूर्णत: वाहून घेतलेले असून ते स्थानिक विद्यापीठ म्हणून विकसित केले पाहिजे. या विद्यापीठाकरिता एक विशेष योजना विकसित केली पाहिजे व हे काम

एखाद्या तज्ञ सक्षम प्राधिकरणाकडे सोपविले पाहिजे. हे विद्यापीठ सर्वसामान्य पदव्या देणाऱ्या नेहमीच्या विद्यापीठासारखे नसावे तर गोंडवाना प्रदेशातील आदिवासी क्षेत्राला प्रगतिपथावर नेणारे इंजिन बनावे.

११. **राज्यातील बिगर आदिवासी बालकांना आदिवासी आचारविचार, जीवनशैली, संस्कृती आणि इतिहास यांच्याशी परिचित केले पाहिजे.** अभ्यासक्रमामध्ये यथोचित पाठ (धडे) पाठ्यपुस्तके यांची भर घातली पाहिजे. आदिवासी विकास विभागाने याकरिता पुढाकार घेऊन त्यानुसार राज्य पाठयपुस्तक मंडळाला सहकार्य करावे. राज्यातील बिगर आदिवासी प्रौढ नागरिकांना अशाच स्वरूपाची माहिती देण्याकरिता प्रसारमाध्यमांना उत्तेजन द्यावे.

७.८. आरोग्य

आदिवासी जनतेच्या सभोवतालची परिस्थिती, संस्कृती, जीवनशैली आणि आरोग्यविषयक गरजा या सर्वसामान्य जनतेपेक्षा अगदी भिन्न असल्याने एक स्वतंत्र **आदिवासी आरोग्य योजना** आणि आदिवासी आरोग्य कार्यक्रम तयार करण्यात यावा. त्याच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये पुढील बाबींचा समावेश असावा :

१. आदिवासी जनतेला स्वत:च्या आरोग्याबाबत समर्थ व स्वावलंबी करण्यावर भर दिला पाहिजे. आरोग्यविषयक साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी (शाळांचा अंतर्भाव करून) एखादी धडक प्रचारमोहीम सुरू केली पाहिजे.

२. आदिवासी गावांमध्ये स्वच्छता, पाणीपुरवठा आणि शौचालयांची व्यवस्था केली पाहिजे.

३. *आश्रमशाळां*मधील आरोग्यविषयक परिस्थिती आणि आरोग्याची काळजी यात ताबडतोब सुधारणा केल्या पाहिजेत.

४. आदिवासी क्षेत्रातील माता, नवजात शिशु आणि बाल आरोग्य पोषण यांत सुधारणा करण्यासाठी बालमृत्यू मूल्यन समितीच्या (महाराष्ट्र शासन, २००५) शिफारशींची ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे.

५. एकात्मिक बाल विकास योजनेतील प्रत्येक बालकाच्या पोषणावरील तरतूद, जनजाति क्षेत्र उपयोजनेतील क्षेत्रांसाठी वाढविण्यात आली पाहिजे.

६. प्रत्येक आदिवासी *गाव/पाडा/टोला* येथे विशेष प्रशिक्षित 'आशा' आणि *अंगणवाडी* कार्यकर्ता, औषध प्रशिक्षण व देखरेख यांसह असले पाहिजेत.

७. गावापासून आरोग्य केंद्रे लांब अंतरावर असणे ही एक मोठी समस्या आहे आणि म्हणून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे चालविण्यात येणाऱ्या फिरत्या वैद्यकीय सुविधा व्हॅनने प्रत्येक आदिवासी गावाला दर आठवड्याला भेट देऊन वैद्यकीय आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

८. आदिवासी क्षेत्रांतील सर्व आरोग्यविषयक संस्थांनी भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांची (आयपीएचएस) पूर्तता केली पाहिजे.

९. सर्व आदिवासी जनतेला वैद्यकीय विमा संरक्षण द्यावे आणि निदान व उपचार सेवांकरिता वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न करावे.

१०. प्रत्येक आदिवासी जिल्ह्याला प्रशिक्षण शाळा असणे आवश्यक आहे. या शाळा, तीन वर्षांचे ग्रामीण वैद्यक पदवीधर आणि परिचर्या व परावैद्यक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतील.

११. आदिवासी क्षेत्रात आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

१२. आदिवासी क्षेत्रातील आरोग्याचा दर्जा आणि आरोग्याची काळजी याचे दरवर्षी स्वतंत्रपणे संनियंत्रण केले पाहिजे.

७.९ उत्पादनशुल्क धोरण

केंद्र सरकारने विहित केलेले आणि राज्य शासनाने १९७६ मध्ये स्वीकारलेले **आदिवासी क्षेत्रांकरिताचे उत्पादनशुल्क**

धोरण अनुसूचित क्षेत्रांमध्ये (शहरांसह) काटेकोरपणे राबविले पाहिजे. कालांतराने नियमांमध्ये सुधारणा करून आणि अनुसूचित क्षेत्रांतील शहरांमध्ये आणि मोठ्या गावांमध्ये दारूच्या दुकानांना परवानगी देऊन या धोरणाच्या आशयामध्येच तडजोड केली आहे. हा ढिलेपणा दूर केला पाहिजे.

१. अनुसूचित क्षेत्रांतील दारूचे सर्व परवाने (विक्री आणि खरेदीबाबत) रद्द केले पाहिजेत आणि अनुसूचित क्षेत्राच्या १० कि.मी.च्या परिक्षेत्रात कोणतेही दुकान, बार किंवा उपाहार गृह यांना दारू विक्रीसाठी परवानगी देवू नये.

२. ***मोहाच्या*** पानांपासून दारूचे गाळप करायला आदिवासी समुदायाला परवानगी देता येईल; परंतु त्याचे उत्पादन व वापर ***ग्रामसभेतील*** महिलांच्या मान्यतेच्या अधीन असावे.

३. पंचायतीसंबंधीचे उपबंध अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे या अधिनियमाच्या तरतुदी तसेच देवतळे समितीने केलेल्या शिफारशी (चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भात) सर्व आदिवासी क्षेत्रांमध्ये लागू कराव्यात.

४. गुटख्याप्रमाणेच सर्व प्रकारचे तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांवर अनुसूचित क्षेत्रांमध्ये परिणामकारक रीतीने बंदी घालावी.

७.१० आदिवासींकरिता आरक्षित नोकऱ्या

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या सेवायोजनेतील सध्याची तफावत एका निश्चित आणि कालबध्द कार्यक्रमाद्वारे भरून काढावी. जाती प्रमाणपत्र वैधता पडताळणी प्रक्रिया काटेकोरपणे राबविली पाहिजे आणि अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवलेले लाभ कोणत्याही बनावट किंवा खोटया आदिवासी लोकांना मिळू देता कामा नये. विद्यमान कार्यक्रमातील त्रुटी ताबडतोब दूर कराव्यात.

❖❖❖

प्रकरण ८

नवीन शेती पद्धती: भूमिका व आव्हाने

८.० प्रस्तावना

लोकसंख्या तसेच एकूण मनुष्यबळ यांचा मोठा भार कृषि व्यवस्थेवर असतो आणि त्यामुळे कृषि व्यवस्था ही, राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावीत असते. उर्वरित महाराष्ट्राची तुलना करता मराठवाडा आणि विदर्भ हे, उपजीविकेकरिता अजुनही मुख्यत: शेतीवर अवलंबून असल्याचे दिसते. या प्रदेशात, औद्योगिक विकास आणि कृषीतर रोजगार फारच कमी आहेत. या प्रदेशात खराब रस्ते आणि खराब लोहमार्गाचे जाळे अशा निकृष्ट पायाभूत सोयी आहेत आणि कुशल कामगारांच्या उपलब्धतेची या प्रदेशांत फारच कमतरता आहे. त्याचप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रातील काही अवर्षणप्रवण क्षेत्रांत अशीच परिस्थिती आहे. या प्रदेशांतील मुख्य उपजीविकेचे स्त्रोत असलेले कृषिक्षेत्र वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करते, ज्यांत इतर गोष्टींबरोबर (अ) शेतीला फायदेशीर बनवणे (ब) स्थानिक रोजगार निर्माण करणे (क) शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा भार कमी करणे यांचा समावेश आहे. या अहवालात सुचवलेल्या अनेक धोरणात्मक सुधारणा आणि 'नवीन कृषि' उपक्रम यात, ही उद्दिष्टे साध्य करण्याचे सामर्थ्य आहे.

या प्रकरणात, निरनिराळे तंत्रज्ञानविषयक हस्तक्षेप, शेतीची नवीन पध्दती सुरू करणे, कृषि-प्रक्रिया, कृषि-आधारित उद्योगधंदे, पाणलोट आणि पाटबंधारे व्यवस्थापन, कृषि शिक्षण, विस्तार, संशोधन, कृषि-सेवा उपक्रम, संस्थांचा सहभाग, शेतीच्या वेगवान वाढीकरिता नवीन कृषि कार्यक्रम आणि धोरणे यांद्वारे, सध्याच्या पीक पध्दतीच्या उत्पादनात सुधारणा, जिल्हानिहाय कृषि- विक्रेय वस्तु पार्क, यांत्रिकीकरणाचा विकास, सूक्ष्म पाटबंधारे, फलोत्पादन विकास, कोरडवाहू शेती कार्यक्रम, कृषि-वनीकरण, कृषि-उद्योग, कृषि-सेवा उपक्रम, महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, व्यावसायिक शिक्षण प्रादेशिक चौकट विचारात घेऊन वित्तीय वाटपासह उच्च शिक्षण आणि संस्थाचा सहभाग या संबंधात चर्चा केली आहे.

प्रादेशिक वाढीवरील प्रकरणात, आम्ही याअगोदरच दर्शवल्यानुसार विदर्भातील कृषिव्यवस्थेतील कुंठितता हे, प्रादेशिक आर्थिक समतोल अधिक वाईट करणाऱ्या कारणांपैकी एक कारण आहे, हे आम्ही आधीच दाखवून दिले आहे.

वेगवेगळ्या प्रदेशांतील कृषि उत्पन्नातील वर्षनिहाय व संयुक्त वार्षिक अभिवृध्दी दराचा कल जोडपत्र ८.१ यात देण्यात आलेला आहे.

२००१-२०१० या दशकात, विदर्भातील कृषिव्यवस्थेला अनेक हादरे बसले आहेत.मागील दशकात, पर्जन्यवृष्टीच्या स्वरूपात प्रतिकूल बदल झाले. पर्जन्यवृष्टी अपुरी होती असेच नव्हे तर, पर्जन्यवृष्टीच्या प्रमाणात, कालिक बदलाचा अनुभव आला. यामुळे विदर्भ प्रदेशातील प्रमुख पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला. या बाबी, वाढीत वर्षानुवर्षे होणाऱ्या चढउतारात प्रतिबिंबित होतात. दहा वर्षांपैकी, जवळजवळ सहा वर्षे वर्षानुवर्षे होणारी वाढ ही नकारात्मक होती. याच्या परिणामी, कृषि उत्पादनाच्या वाढीचा एकूण दर शून्य किंवा ज्याला नकारात्मक म्हणता येईल असा होता. त्याचप्रमाणे एकूण वाढ समाधानकारक असली तरी सुध्दा, मराठवाड्यातील काही जिल्हांमध्ये असाच चढउतार दिसून आला. समितीने या धोक्याच्या परिस्थितीची गंभीर दखल घेतली आणि शेतीवरील उप-गटाद्वारे करण्यात आलेल्या अभ्यासाद्वारे, या प्रदेशांना सध्याच्या आर्थिक कोंडीच्या संकटावर मात करण्यासाठी सहाय्यभूत होतील अशी धोरणात्मक हस्तक्षेपांची संभाव्य क्षेत्रे शोधून काढली.

८.१ कृषि क्षेत्रातील प्रादेशिक विकास सामर्थ्य

आम्ही सूचवलेले उपाय हे, शेतीवरील उप-गटाद्वारे करण्यात आलेल्या अभ्यासावर आधारित आहेत. विकासातील तफावत व अंतर यांचे मोजमाप करताना अनेक पैलू तपासण्यात आले. प्रादेशिक तफावत, विकासातील कमतरता आणि कृषि क्षेत्रातील प्रादेशिक विकास संभाव्यता यांच्या सध्याच्या अवस्थेचे निर्धारण करण्यासाठी उप-गटाने २१ निर्देशके शोधून काढली आहेत.

१. फलोत्पादन २. वन व्याप्ती ३. पीक सघनता ४. रासायनिक खतांचा वापर ५. कृषि यांत्रिकीकरण ६.कृषिवरील लोकसंख्येचे दडपण ७. कृषि अर्थसंकल्प ८. पशुधन कुक्कुटपालन आणि मत्स्यव्यवसाय ९. जमीन धारणा १०. अवर्षणप्रवण क्षेत्र ११. पाणलोट १२. पाटबंधारे १३. ग्राम सडक जोडणी १४. मुख्य पिकांचा संयुक्त वार्षिक वाढीचा दर १५. शेतमजूर १६. पीक कर्ज १७. कृषि बाजार पायाभूत सोयी १८. कृषि शिक्षण १९. कृषि संशोधन केंद्रे २०. कृषि आधारित उद्योगधंदे २१. कृषि क्षेत्रातील विद्युत ऊर्जा.

जोडपत्र ८.२ मधील तक्त्यांमध्ये प्रदेशाची स्थिती व विकासातील तफावत दर्शविणाऱ्या निर्देशकांची आकडेवारी सादर करण्यात आली आहे.

आमच्या विश्लेषणाने पुढील प्रमुख क्षेत्रे शोधून काढली आहेत जी, मागे पडलेल्या क्षेत्रांच्या कृषि वाढीचा वेग वाढवतील. (१) पिकांकरिता आश्वासित पाणीपुरवठयाच्या उपलब्धतेची कमतरता. (२) संबंधित प्रादेशिक पीक आकृतिबंधाकरिता योग्य अभियाने व प्रोत्साहके (३) संस्थात्मक पाठिंब्यासह तंत्रशास्त्रविषयक माहितीची निर्मिती व प्रसार, आणि (४) मागे पडलेल्या प्रदेशांकरिता सुसाध्य होऊ शकेल अशी तंत्रशास्त्रविषयक झेप घेण्यासाठी धोरणात्मक पाठींबा, आम्ही यांची पुढील परिच्छेदांत चर्चा केली आहे.

८.२ कृषिमधील जलसंपदा

पाणी हा शेतीकरिता महत्त्वाचा घटक आहे आणि विकासाचे भवितव्य त्याच्यावर अवलंबून आहे. सिंचन क्षमतेतील वाढ आणि कृषितील जल उत्पादकतेतील परिणामस्वरूप सुधारणा या, कृषिविकासाला चालना देणाऱ्या प्रमुख बाबी आहेत. वाढते नागरीकरण व औद्योगिकीकरण यांमुळे पाण्याच्या मागणीमध्ये वाढ झाली असून मुख्यत: कृषिक्षेत्राला मिळणारे पाणी त्याकरिता वळविण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, जलसंधारण विकास व व्यवस्थापन या महत्त्वाच्या बाबी ठरतात. पावसाचे पाणी हा एक मूलभूत स्त्रोत आहे जो भूजलाच्या आणि भूपृष्ठीय जलाच्या साठयाच्या संरचनांची पुन:पूर्ती करतो. पावसाच्या पाण्याने पुनर्भरण केलेल्या संधारण व साठवण करण्याच्या उपाययोजना या, जलसंपदा व्यवस्थापनाचे मूलभूत धोरण तयार करतात. ***पाणलोटांची खातरजमा करून घेण्यात आली आहे आणि ते पावसाच्या पाण्याच्या साठवणीच्या मूळच्या जागीचे आणि मूळच्या जागी नसलेले तंत्रशास्त्रीयदृष्टया समर्पक पर्याय आहेत.***

८.२.१ पाणलोट

महाराष्ट्रात २४१.० लाख हेक्टर इतके क्षेत्र पाणलोट विकासाकरिता योग्य आहे. (या विषयाच्या अधिक तपशीलवार माहितीसाठी'जलसंपदा' हे प्रकरण पहावे) मृद व जलसंधारण, जलभरण आणि पर्जन्याश्रयी क्षेत्रांतील वाढती उत्पादकता या संदर्भात पाणलोटांचे फायदे विचारात घेऊन पाणलोट कार्यक्रमाला पुढील दहा वर्षाकरिता भूपृष्ठावरील सिंचनाइतकेच सर्वोच्च प्राथम्य देण्यात आले पाहिजे. कोरडवाहू जमिनीवरील शेतीकडे विशेष लक्ष दिल्यास राज्यातील शेतीचा विकास आणि त्यास स्थैर्य साध्य होईल. पाणलोटाचे क्षेत्र हे कोरडवाहू शेती तंत्रज्ञानातील प्राथमिक घटक आहे. कोरडवाहू क्षेत्रातील लाभ आणि सर्वदूर होणारा परिणाम या बाबी समजून घेण्यासाठी सर्व प्रदेशांत, ***पाणलोटाचा, एक अभियान पध्दत कार्यक्रम याप्रमाणे वैज्ञानिकदृष्टया*** परामर्श घेण्यात यावा. कृषिविकास हा, महाराष्ट्रातील विस्तृत पर्जन्याश्रयी शेतीतून होणार असल्यामुळे, ***कोरडवाहू शेती व पाणलोट कार्यक्रम यांवरील अभियानाला, पुढील दहा वर्षांकरिता सर्वोच्च प्राथम्य*** दिलेच पाहिजे.

धोरणात्मक उपक्रम : आम्ही अशी शिफारस करतो की,

१. **विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रात पुढील पाच वर्षांतील कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करिता प्रादेशिक पाणलोट अभियान सुरू करण्यात यावे.**

२. **पाणलोट अभियानासोबत एककेंद्राभिमुखतेने कोरडवाहू शेती संबंधात अभियान पध्दती कार्यक्रम निर्माण करण्यात यावा आणि पुढील १० वर्षांत कोरडवाहू जमिनींच्या वाढीव उत्पादनाचे उद्दिष्ट हे, सदर अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट असावे.**

८.२.२ संरक्षक पाटबंधारे

महाराष्ट्रात ८२ टक्के इतके पर्जन्याश्रयी क्षेत्र आहे आणि प्रदेश निहाय वितरणाचे क्षेत्र हे, कोकणात ९२.६ टक्के, पश्चिम महाराष्ट्रात ७७.० टक्के, मराठवाड्यात ९५.०२ टक्के आणि विदर्भात ८१.२ टक्के इतके क्षेत्र दर्शविते. *खरीप* मोसमात एक किंवा दोन उघडीपीच्या कालावधीमुळे पर्जन्याश्रयी पिकांचे फार मोठे नुकसान होते. उघडीपीच्या काळात प्रत्येक ५ से.मी. खोलीचे एक किंवा दोन संरक्षक पाटबंधारे हे, सर्वसाधारण पीक उत्पादनाची खात्री करून देतात. जर सूक्ष्म सिंचनाचा (उदाहरणार्थ ठिबक सिंचन/ तुषारक/ संरक्षक सिंचनासाठी वापर करण्यात आला तर, ५ से.मी. पृष्ठभाग सिंचन जलात दुप्पट क्षेत्राचा समावेश होईल. म्हणून 'संरक्षक सूक्ष्म – पाटबंधारे' आवश्यक आहे. म्हणून संपूर्ण पर्जनश्रयी प्रदेशात, पंप आणि सूक्ष्म सिंचन संच यांसह, शेततळी, टाक्या, विहिरी इत्यांदींद्वारे जलसंपदा निर्माण करून त्याआधारे सर्वसाधारण पीक उत्पन्नाची खात्री करून घेता येईल. कापूस व तूर या प्रमुख पिकांना *ठिबक सिंचनाद्वारे* संरक्षक सिंचनाची आवश्यकता आहे आणि सोयाबीन व हरभरा यांचा *तुषार पध्दतीचा* वापर करून संरक्षक पाटबंधाऱ्याखाली समावेश करता येईल. सर्वसाधारणपणे कापूस व तूर यांकरिता ठिबक सिंचन पध्दती आणि सोयाबीन व हरभरा यांकरिता तुषारक पध्दतीचा वापर करता येईल.

८.२.३ कालवा पाटबंधारे

महाराष्ट्राने ४८.२५ लाख हेक्टर इतकी सिंचनक्षमता निर्माण केली असून त्यापैकी २९.५४ लाख इतके क्षेत्र प्रत्यक्ष सिंचनाखाली आहे. उर्वरित महाराष्ट्रात निर्माण करण्यात आलेल्या सिंचनक्षमतेचा वापर हा ७६.४ टक्के, मराठवाड्यात ३८.३ टक्के, आणि विदर्भात ४७.४ टक्के इतका आहे. यावरून असे दिसून येते की, मराठवाडा व विदर्भात सिंचनक्षमतेचा वापर फारच कमी झाला आहे. साठवलेल्या पाण्याचा दक्षतेने वापर करणे आणि त्याचे वाटप ही बाब हे हस्तक्षेपाचे प्रमुख क्षेत्र बनते. बांध व धरणे यांचे बांधकाम करून पाण्याचा साठा निर्माण करणे ही महत्त्वाची बाब आहे. परंतु, वाटप जाळे आणि वापर प्रभावी असणे ही देखील तेवढीच महत्वाची बाब आहे. या राज्यात सर्वाधिक संख्येने पाटबंधारे प्रकल्प आहेत. तथापि, भूजल हाच अजूनही प्रमुख सिंचन स्रोत आहे. भूपृष्ठावरील धरणांच्या पाण्याच्या वापराची कार्यक्षमता ही इच्छित पातळीपर्यंत नाही, कारण पिकांकरिता पाण्याचा वापर करण्याऐवजी इमारतींच्या बांधकामावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

८.३ नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरण

पाण्याचे वाटप, पीक नियोजन, यांत्रिकीकरण, कापणीनंतरचे तंत्रज्ञान आणि प्रक्रिया उद्योगाद्वारे मूल्यात भर घालणे यांकरिता सर्व पाटबंधारे प्रकल्पांसाठी, नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाची स्थापना करणे इष्ट आहे; आणि हे नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरण ही स्वायत्त संस्था असेल जी, लाभक्षेत्राच्या एकूण सामाजिक –आर्थिक विकासाकरिता जबाबदार असेल. सिंचनाखाली आणलेले प्रत्यक्ष क्षेत्र लक्षात घेऊनच वास्तव लक्ष्याचे मोजमाप करावे. प्रकल्पाचे संभाव्य क्षेत्र ही साध्य केलेली बाब म्हणून प्रतिवृत्त कळविण्याची आणि या काल्पनिक–क्षेत्राला, सिंचनाखालील क्षेत्र म्हणून दाखवण्याची सध्याची पध्दती बंद करण्यात यावी. नियोजन केलेल्या सर्व संभाव्य क्षेत्रांना पाटबंधारे प्रकल्पांखाली आणण्याचे उद्दिष्ट हे पुढील दहा वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावे. पाण्याचे नियंत्रण, पाणी देणे, वापर, पीक नियोजन आणि पाण्याच्या वापराची कार्यक्षमता आणि कालवे सुस्थितीत ठेवणे ही कार्ये, नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आली पाहिजेत.

८.३.१ नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरण

लाभक्षेत्राचा सामाजिक-आर्थिक विकास साध्य करण्यासाठी, नवीन आंतरशाखीय संरचनेसह नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरण निर्माण करण्यात आले पाहिजे. पाण्याच्या वाटपाचे नियंत्रण व व्यवस्थापन आणि योग्य पीक नियोजनासह पाण्याच्या उत्पादकतेत सुधारणा करणे यांसारखी कार्येही, प्रस्तावित नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाची जबाबदारी असली पाहिजे. धरणांचे बांधकाम व त्यांची देखभाल ही कामे पाटबंधारे विभागाकडेच राहणार असली तरी पाण्याच्या उपयोजनावरील जवळजवळ संपूर्ण नियंत्रण आणि पाणी सोडणे ही कार्ये नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाकडे निहित असली पाहिजेत. प्रस्तावित नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाकडे, केवळ जलसाठयातून पाणी सोडण्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य असले पाहिजे असे नव्हे तर, वहन पध्दती, पिकाच्या आवश्यकतेनुसार पाण्याचे उपयोजन, वाहतूक व पोचवणी यांत होणारे नुकसान कमी करणे, नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याच्या उत्पादकतेत सुधारणा करणे आणि नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरण प्रदेशात विस्तार करण्याची तालीम यांची देखील जबाबदारी व उत्तरदायित्व असले पाहिजे. नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाला, कृषि-प्रक्रिया आणि पणन यांकरिता, इतर आधारभूत सोयींची निर्मिती करून जलप्रदाय क्षेत्राच्या एकूण सामाजिक- आर्थिक विकासाची जबाबदारी सोपवण्यात यावी. पिके, फलोत्पादन वनस्पती संरक्षण, यांत्रिकीकरण, कृषि-प्रक्रिया, दुग्धशाळा, कृषि विस्तार, कृषि अर्थशास्त्र आणि पुरेसा तांत्रिक व क्षेत्र सहाय्य कर्मचारीवर्ग यांतील तज्ञ व्यक्तींच्या आंतरशाखीय गटांसह **वरिष्ठ कृषि अभियांत्रिकी तज्ञ** हे, नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाचे प्रमुख असावेत. नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाच्या कार्यक्रमांनी, स्थानिक संस्था, इतर विशिष्ट विभाग आणि खाजगी क्षेत्र अभिकरणे या सोबतदेखील विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, समन्वय साधावा व एककेंद्राभिमुख व्हावे. त्रयस्थ पक्षाद्वारे वार्षिक संनियंत्रण हा, नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणाचा अविभाज्य भाग असावा. सध्याच्या लाभक्षेत्र विकास अभिकरण संरचनेला पूर्णपणे बंदी घालता येईल किंवा प्रत्येक प्रकल्पाकरिता, नवीन लाभक्षेत्र विकास अभिकरणात यथोचितरीत्या रुपांतरित करता येईल. यामुळे लाभक्षेत्रातील सामाजिक विकासासह पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत आणि उत्पन्नात सुधारणा होईल.

८.४ अधिक पाण्याची आवश्यकता असलेल्या पिकांकरिता सूक्ष्म पाटबंधारे अनिवार्य करणे.

८.४.१ पूर्णत: ठिबक सिंचन पीक म्हणून ऊसाचे पीक

ऊसाच्या पिकाचे मुख्य क्षेत्र हे पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या प्रदेशांत असून ते अनुक्रमे ६.७ आणि २.१ लाख हेक्टर इतके आहे. ऊसाचे पीक हे पाण्याची आवश्यकता असणारे पीक असून त्याकरिता २५,००० घन मीटर/हेक्टर इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. ठिंबक सिंचनामुळे अंदाजे ५० टक्के पाण्याची बचत होते. जर एकाच वेळी फर्टिगेशनचा स्वीकार केला तर, त्यामुळे सुमारे ४० टक्के इतक्या पोषकतत्त्वांची बचत होईल. जर सर्व ऊस क्षेत्र ठिबक / फर्टिगेशन यांखाली घेण्यात आले तर त्यामुळे १२,५०० घन मीटर/हेक्टर इतक्या पाण्याची बचत होईल. बचत केलेले हे पाणी पर्जन्याश्रयी पिकांच्या संरक्षित सूक्ष्म सिंचनाकरिता उपलब्ध करून देता येईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, उदाहरणार्थ, तुरी सारख्या पिकाला, पूर्ण उत्पादकता संभाव्यतेची खात्री करून घेण्यासाठी प्रत्येकी ५ सें.मी. खोलीच्या दोन संरक्षित पाटबंधाऱ्यांची आवश्यकता आहे, जे १००० घन मीटर/ हेक्टर याच्या समान आहे. ही बाब असे ध्वनित करते की, १.० हेक्टरकरिता १०० टक्के ठिबक सिंचन स्वीकृत करण्यामुळे, संरक्षित सूक्ष्म-पाटबंधाऱ्याच्या तरतुदीद्वारे १२.५ हेक्टर तुरीच्या पिकाची हमी देता येईल. परिणामी, तुरीचे उत्पादन हे सरासरी ७५० किलोग्रॅम/हेक्टर वरून १,५०० किलोग्रॅम / हेक्टर असे दुप्पट होईल.

ऊसाच्या पिकासाठी प्रति हेक्टर ३००:१५०:१५० किलोग्रॅम नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम आणि दर हेक्टरी सुमारे ६५० किलोग्रॅम युरिआ, ९४० किलाग्रॅम सुपर फॉस्फेट आणि पोटॅशियमचे २५० किलोग्रॅम म्युरिएट यांची आवश्यकता आहे. रासायनिक खतांचे सध्याचे बाजारभाव लक्षात घेता, याचा खर्च दर हेक्टरी रु. १७,५८० (६५०० नायट्रोजन+६५८० फॉस्फरस+४,५०० पोटॅशियम) इतका होईल. मृद उपयोजितेची रासायनिक खत वापर परिणामकता

ही, ३० टक्के इतकी आहे आणि ठिबक सिंचनाद्वारे (फर्टिगेशन) ती ७० टक्के इतकी आहे, त्यामुळे ४० टक्के इतकी बचत होते. यामुळे केवळ ऊस पिकाकरिता पोषक द्रव्यांच्या खर्चाची रु. ७,०३२/- हेक्टर इतकी बचत होईल.

पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ऊस पिकाच्या क्षेत्रात अनियोजित पध्दतीने वाढ होत आहे आणि उत्पादकतेत परिणामकारकरीत्या घट होत आहे. सदर क्षेत्रावर निर्बंध घालणे आवश्यक असून १२० टन /हेक्टर इतक्या उत्पादकतेचे उद्दिष्ट ठेवावे. यामुळे सध्याच्या एकूण उत्पादन पातळीवर परिणाम होणार नाही आणि त्यामुळे वंचित प्रदेशांतील पर्जन्याश्रयी पिकांच्या आश्वासित उत्पादनासाठी तर्कसंगत पाण्याच्या वापराची देखील खात्री करून घेता येईल. याचा अर्थ, पश्चिम महाराष्ट्राची ऊस क्षेत्रासाठी असलेली पाण्याची आवश्यकता ही सध्याच्या वापराच्या जवळजवळ निम्म्यापर्यंत कमी करता येईल. दर हेक्टरी उपलब्ध असलेले अतिरिक्त पाणी हे सरासरीने, पर्जन्याश्रयी पिकांच्या ७.५ हेक्टरकरिता, संरक्षित सूक्ष्म पाटबंधाऱ्याची तरतूद करण्याकरिता पुरेसे असेल. जर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ऊसाचे पीक हे पूर्णत: ठिंबक सिंचन पिकात रुपांतरित करण्यात आले तर, पश्चिम महाराष्ट्रातील ४५ लाख हेक्टर आणि मराठवाडयातील १५ लाख हेक्टर इतक्या पर्जन्याश्रयी पिकांकरिता संरक्षित सिंचन शक्य होईल. ऊस पिकाचे ठिबक सिंचनात रुपांतर करण्याचा खर्च तक्ता ८.१ यात देण्यात आला आहे.

तक्ता ८.१
ऊस पिकाचे ठिबक सिंचनात रुपांतर करण्याचा खर्च

प्रदेश	क्षेत्र (लाख हेक्टर)	सध्याची उत्पादकता (प्रति हेक्टर टन)	लक्ष उत्पादकता (प्रतिहेक्टर टन)	सध्याचे उत्पादन (लाख टन)	लक्ष्य उत्पादन (लाख टन)	रूपये ०.७४ लाख/हेक्टर दराने ऊस पिकाकरिता ठिबक सिंचनचा खर्च (रू. कोटीत)
१	२	३	४	५	६	७
पश्चिम महाराष्ट्र	६.७	९२	१२०	७००	७२०	४,४४०
मराठवाडा	२.१	७१	१००	१५०	२००	१,४८०

स्रोत : कृषि उपगट यांच्याकडून मिळालेल्या माहितीवर आधारित.

वर उद्धृत केलेले अंदाज हे, केवळ निदर्शक स्वरूपाचे आहेत आणि ते चालू प्रमाणकांवर आधारित आहेत. जर सूक्ष्म पाटबंधाऱ्यांच्या अधिक स्पर्धात्मक आणि नावीन्यपूर्ण पध्दतीने वापरण्यास मुभा देण्यात आली तर, या खर्चांत आश्चर्यकारक घट होईल.

साखर कारखाने / सहकारी संस्था हे ऊस पिकाचे प्रमुख लाभार्थी असल्याने आणि त्यांनी सर्व ऊस पिकाचे संपूर्ण ठिबक सिंचनात रुपांतरण करण्याचे कार्यतंत्र विकसित करावे. शासनाने, कारखान्याला, सध्याच्या अपव्ययी प्रथांमध्ये सुधारणा करण्याची स्वत:ची पध्दत शोधून काढणे अनिवार्य करावे.

८.४.२ फळबागा- पूर्णत: ठिबक सिंचन पिके

पाण्याची बचत करणे तसेच उत्पादकतेत वाढ करण्यासाठी उर्वरित महाराष्ट्रातील (९.२३ लाख हेक्टर), मराठवाडयातील (३.६८ लाख हेक्टर) आणि विदर्भातील (३.१६ लाख हेक्टर) फळबागांचे पूर्णत: ठिंबक सिंचनात रुपांतरण करणे आवश्यक आहे. सर्व फळबागांचे सूक्ष्म सिंचन पध्दतीखालील क्षेत्रात रूपांतरण करण्याचा निदर्शक व स्पष्टीकरणात्मक खर्च, तक्ता ८.२ यात देण्यात आला आहे.

तक्ता ८.२
सध्याच्या फळबागांकरिता सूक्ष्म सिंचनासाठी प्रोत्साहके

प्रदेश	क्षेत्र (लाख हेक्टर)	खर्च (रूपये लाख/हेक्टर)	एकूण खर्च (रूपये कोटीत)	पुढील ५ वर्षांकरिता प्रोत्साहकांसाठी वार्षिक खर्च (रूपये कोटीत)
१	२	३	४	५
विदर्भ	३.१६	०.२९*	९१६	१८३
मराठवाडा	३.६८	०.२९*	१०६७	२१३

* या खर्चात नियंत्रण युनिट, नळ व्यवस्था आणि पंप वगळता सूक्ष्म पाटबंधारे पध्दती यांचा समावेश आहे.
स्रोत : भारत सरकारच्या सूक्ष्म पाटबंधाऱ्यांवरील राष्ट्रीय अभियानाकरिता मार्गदर्शन सूचना.

धोरणात्मक शिफारशी : सूक्ष्म सिंचन

आम्ही शिफारशी करतो की :

१. धोरणात्मक उद्दिष्टे आणि आवश्यक विनियम या बाबी, सर्व ऊस पिकाची लागवड आणि फळबागा यांना सूक्ष्म सिंचन पध्दतीखाली आणण्यास सहाय्यभूत ठरतील. पाण्याच्या दुर्लभ स्रोताच्या काटकसरीच्या वापराकरिता या बाबी आवश्यक आहेत. संपूर्ण ऊस लागवडीला ठिंबक सिंचनाखाली आणण्याकरिता, साखर कारखान्यांसोबत संयुक्तपणे एक योजना विकसित करण्याची आवश्यकता आहे.

२. भविष्यकाळातील सर्व नवीन फळबागांकरिता सूक्ष्म पाटबंधारे हे अनिवार्य करण्यात येतील. विदर्भ व मराठवाडा यांना अधिकतम पाण्याची उत्पादकता साध्य करण्यासाठी, सर्व फळपीक क्षेत्राचे सूक्ष्म सिंचनामध्ये रूपांतर करण्यासाठी पुढील ५ वर्षांकरिता विशेष प्रोत्साहकांची तरतूद करण्यात यावी.

३. सर्व योजना व विभागांच्या अर्थसंकल्पीय तरतुदी एकत्र करून, ऊस, फलोत्पादन व इतर पिके यांकरिता, **महाराष्ट्र कृषि-अभियांत्रिकी कंपनी**ची स्थापना करून सूक्ष्म-सिंचन कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करण्यात यावी. हा कार्यक्रम शास्त्रीयदृष्टया राबविण्यासाठी या प्रस्तावित कंपनीच्या नेतृत्वपदी व्यावसायिक कृषि अभियंते आणि सहायक पथके असतील.

८.५ कृषिकरिता प्रादेशिक जल अर्थसंकल्प

पिकांच्या, यात फळे व भाज्या यांचाही समावेश आहे, अधिकाधिक उत्पादनासाठी त्या त्या प्रदेशातील पीक लागवडीचे स्वरूप विचारात घेऊन शेतीच्या प्रादेशिक जल आवश्यकता ठरविता येईल. याचा सूचक तपशील जोडपत्र ८.३ मध्ये देण्यात आला आहे. पिकांच्या भूपृष्ठ सिंचनाकरिता असलेली पाण्याची आवश्यकता ही **१,९७,९५८** दशलक्ष घन मीटर (दमी ३) इतकी आहे.सूक्ष्म सिंचनाची पध्दत स्वीकारल्यास पाण्याची आवश्यकता ही, **१,०१,२४०** दशलक्ष घन मीटर इतकी कमी होईल म्हणजेच पाण्याची ४९ टक्के इतकी बचत होईल. न्यायाधिकरणाद्वारे परवानगी मिळालेला पाण्याचा वापर **१,२५,९३६** दशलक्ष घन मीटर इतका आहे. ही आकडेवारी स्पष्टपणे असे दर्शविते की, महाराष्ट्रात शेतीकरिता आवश्यक असलेल्या पाण्याची कमतरता ३६ टक्के आहे. जर पिण्याचे पाणी व उद्योगधंदयांना आवश्यक असलेले पाणी यांची आवश्यकता लक्षात घेतली तर, शेतीकरिता असलेली पाण्याची टंचाई आणखी कमी करता येईल.

महाराष्ट्राने उपलब्ध असलेल्या पाण्याचे अधिक प्रभावीपणे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. ओलिताखालील सर्व पिकांचे सूक्ष्म सिंचनात रूपांतर करणे, पाणलोट कार्यक्रमाची अधिक त्वरेने (प्राथम्यक्रमाने पुढील पाच वर्षांत) अंमलबजावणी करणे, जलसंधारण व साठवण संरचनांचे बांधकाम करणे, नलिकांचा वापर करून पाणी वाहून नेण्यात होणारे नुकसान वाचवणे, कमी पाण्याची आवश्यकता असणारी पिके घेणे या बाबी म्हणजे, शेतीच्या कायमस्वरूपी वाढीकरिता आवश्यक असलेले महत्त्वाचे आणि प्राथम्य असलेले उपक्रम आहेत.

प्रदेशनिहाय पाण्याचा वापर यांसंबंधातील आकडेवारी ही, उपलब्ध पाण्याच्या वापरातील मोठी तफावत दर्शविते. ३६

टक्के इतके पीक क्षेत्र असलेला पश्चिम महाराष्ट्र हा, ४७ टक्के इतक्या पाण्याचा वापर करतो, ३० टक्के इतके पीक क्षेत्र असलेला विदर्भ २८ टक्के इतक्या पाण्याचा वापर करतो, ३१ टक्के इतके पीक क्षेत्र असलेला मराठवाडा १४ टक्के इतक्या पाण्याचा आणि ३ टक्के इतके पीक क्षेत्र असलेला कोकण ११ टक्के इतक्या पाण्याचा वापर करतो. पाण्याचा तुटवडा असलेल्या क्षेत्राला पाण्याच्या प्रमाणशीर हिश्याची तरतूद करून, पाण्याच्या प्रादेशिक वापराचे पुन: परीक्षण करण्याची आवश्यकता आहे. या बाबींमुळे मागास प्रदेशाच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा नक्कीच काढता येईल.

भूजलाचा कार्यक्षमतेने वापर करणे, पाण्याचा तुटवडा असलेल्या क्षेत्रांना खोऱ्यांतर्गत पाण्याचे हस्तांतरण करणे याचे काटेकोर पालन करून नगरपालिका मळप्रवाहाचे पाणी आणि कारखान्यांचे पाणी पुन्हा उपयोगात आणणे आणि उद्योगधंदे व नागरी संस्था यांद्वारे पाणी पुन्हा उपयोगात आणण्याच्या संबंधात अधिक कडक कायदे तयार करणे, या आवश्यक असलेल्यांपैकी काही धोरणात्मक ऊपाययोजना आहेत.

८.६ पीक विनिर्दिष्ट उपक्रम

८.६.१ कापूस

कापूस हे महत्त्वाचे नगदी पीक असून ते विदर्भ व मराठवाड्यात प्रत्येकी १५.० लाख हेक्टर इतक्या क्षेत्रात घेतले जाते, आणि उर्वरित महाराष्ट्रात (खानदेश) ११.० लाख हेक्टर इतक्या क्षेत्रात कापसाचे पीक घेण्यात येते. संकरित बीटी प्रकारांच्या मोठया प्रमाणावरील वापरामुळे मागील दशकात महाराष्ट्रातील कापसाच्या उत्पादकतेत, लक्षणीय वाढ (३४३ किलोग्रॅम लिंट/हेक्टर) झालेली असली तरीदेखील, ५१० किलोग्रॅम लिंट/हेक्टर या राष्ट्रीय सरासरीशी तुलना करता एकूण उत्पादकता ही कमी आहे. विदर्भातील कापसाचे पीक हे प्रामुख्याने पर्जन्याश्रयी आहे. मराठवाडयात हे पीक अंशत: ओलिताखाली आणले गेलेले आहे आणि खानदेशात हे पीक मोठया प्रमाणावर ओलिताखाली आणले गेले आहे. महाराष्ट्रात कापसाचे उत्पादन मिळवण्यासाठी करावा लागणारा महत्त्वाचा हस्तक्षेप म्हणजे संरक्षक सूक्ष्म सिंचनाची तरतूद करणे, विदर्भ आणि मराठवाडा येथे पावसाच्या पाण्याची साठवण यावर मुख्य लक्ष केंद्रित करण्यात यावे कारण पुढील किमान एक दशकाकरिता तरी सिंचनाचा दुसरा कोणताही मोठा स्त्रोत उपलब्ध नसेल. सिंचनाच्या पाण्याच्या कमतरतेमुळे कापूस पिकावर अजैविक ताण पडतो ज्याच्या परिणामी फारच कमी उत्पादन होते. जलग्रहण क्षेत्राच्या मांडणीसह, वाहून जाणारे पाणी एकत्रित करणाऱ्या संरचनांच्या जाळ्यामुळे (शेततळी) यात कमतरतेच्या कालावधीत कापसाच्या संरक्षक सिंचनाकरिता पुरेसे पाणी निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. कापसासाठी पाण्याची आवश्यकता ही, सुमारे ५० से.मी. इतकी आहे जी, दर हेक्टरी ५००० घन मीटर याच्याशी सममूल्य आहे. दोन ते तीन अवर्षण कालावधीत कापसाच्या पिकाला ओलसरपणाचा सामना करावा लागतो. असे अवर्षण काल हे विदर्भ व मराठवाडा यांत सर्वसाधारणपणे ऑगस्ट ते ऑक्टोबर महिन्यांत आढळून येतात. पावसाच्या पाण्याद्वारे सर्वसाधारणपणे सुमारे ३००० घन मीटर इतक्या पाण्याची आवश्यकता भागवण्यात येते आणि उर्वरित २००० घन मीटर इतक्या पाण्याची आवश्यकता ही, संरक्षित सूक्ष्मसिंचनाद्वारे भागवावी लागेल. सरासरी वार्षिक पर्जन्यवृष्टी ही, ७०० ते ८०० मिलीमीटर यादरम्यान आहे, आणि त्यात पीक निर्मितीची व २० टक्के इतक्या पावसाच्या पाण्याच्या साठवणीची क्षमता आहे. पावसाळयात दोन किंवा तीन वेळा होणाऱ्या जोरदार पर्जन्यवृष्टीत, संरक्षक सूक्ष्म सिंचनाची आवश्यकता भागवण्यासाठी पुरेसे पीक निर्मितीयोग्य पाणी असते. संकल्पित साठवण संरचनांसह घळ मांडणी व जलनि:सारण मार्ग मांडणी यांसारख्या ***मूळच्या जागेची*** आणि ***मूळच्या जागेहून*** अन्य ठिकाणी केलेली मांडणी या बाबी, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस पिकाच्या यशस्वी उत्पादनाकरिता आवश्यक आहे.

शेत जमिनीचा कस पाहण्यासाठी साधनसामग्री तयार करण्याचा खर्च प्रत्येक ठिकाणी वेगळा असेल, तथापि, विदर्भ आणि मराठवाडा येथील जमिनीचा सर्वसाधारण प्रकार, प्रदेशज्ञान पर्जन्यवृष्टीची स्थिती या बाबींचा विचार करता, एकूण विकास खर्च हा, (सध्याच्या बाजारभावाप्रमाणे) अंदाजे **रू. ५९,०००**/हेक्टर **(२१,०००+६,०००+३२,०००)** इतका असेल. यात २००० घन मीटर इतक्या क्षमतेच्या ३०३०३ मीटर इतक्या

आकाराच्या शेतातील तळयाच्या खर्चाचा (४ हेक्टर आकाराच्या शेतासाठी रू. ८४,०००/- म्हणजेच दर एकरी रू.२१,०००/-) जमीन मांडणीसाठी दर एकरी रू. ६,०००/- आणि विस्तीर्ण शेतातील पिकांसाठी दर एकरी रु. ३२,००० इतक्या खर्चाचा समावेश आहे. (स्रोत: सूक्ष्म सिंचनावरील राष्ट्रीय अभियान). ***पर्जन्याश्रयी क्षेत्रातील कापूस उत्पादनाच्या सातत्यतेची खात्री करून घेण्यासाठी, ९० टक्के इतक्या मर्यादेपर्यंतचे सूक्ष्मसिंचन युनिटचे अर्थसहाय्य देणे इष्ट आहे. (जोडपत्र ८.४ अ)***

वरील उपाययोजनांमुळे विदर्भ, मराठवाडा व खानदेश या प्राधान्याने पर्जन्याश्रयी क्षेत्रांमध्ये कापसाचे लक्ष्याधारित उत्पन्न ५१० कि.ग्रॅ. लिंट/हेक्टर एवढ्या राष्ट्रीय सरासरीसह सममूल्याने अधिकतम उत्पन्नाचे उद्दिष्ट गाठता येईल. विदर्भात २४३ कि.ग्रॅ. लिंट/हेक्टर, मराठवाड्यात १६७ कि.ग्रॅ.लिंट/हेक्टर आणि उर्वरित महाराष्ट्रात १९१ कि.ग्रॅ.लिंट/हेक्टर इतकी मर्यादा असणाऱ्या कापसाच्या उत्पादनामध्ये अतिरिक्त वाढ होईल आणि कापसाच्या बियांच्या स्वरूपात, विदर्भात रुपये २६,९१०/ हेक्टर, मराठवाड्यात रुपये १८,७२०/हेक्टर आणि उर्वरित महाराष्ट्रात (खानदेश) रु. २१,४५०/ हेक्टर (रुपये ३९०० प्रति क्विंटल इतक्या सध्याच्या किंमतीच्या) इतके अतिरिक्त उत्पन्न मिळविता येईल. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र येथील कापसाच्या पिकामध्ये संरक्षित सिंचनाच्या विकासामध्ये केलेल्या भांडवली गुंतवणुकीतून अनुक्रमे रु.४,०३६ कोटी, रु.२,९९५ कोटी व रु.२,३५९ कोटी इतके अतिरिक्त वार्षिक उत्पन्न मिळेल. म्हणून, तीन प्रदेशांमध्ये कापसाच्या संरक्षित सिंचनाच्या विकासासाठी निधीचे वार्षिक वाटप करणे न्याय्य ठरेल. शेजारच्या राज्याची अलिकडची माहिती आणि अनुभव देखील या धोरणाच्या प्रस्तावाला पुष्टी देणारे आहे.

८.६.२ तूर

तूर हे विदर्भ (६.३६ लाख)आणि मराठवाड्यातील (५.२४ लाख) मुख्य ***खरीप*** कडधान्य पीक आहे. तुरीची सरासरी उत्पादकता सुमारे ७५० कि.ग्रॅ./हेक्टर इतकी आहे. तुरीचे बव्हंशी आंतरपीक म्हणून पीक घेतले जाते. दोन संरक्षित सिंचनांमुळे प्रति हेक्टर उत्पादन दुप्पट होते. तुरीच्या पिकामध्ये कापूस पिकाच्या संरक्षित सूक्ष्म सिंचन पद्धतीचा (पर्जन्यजल संधारण आणि साठवणूक संरचना या स्वरूपातील सहाय्य गृहीत धरून) देखील प्रभावीपणे वापर करता येईल.

८.६.३ सोयाबीन

महाराष्ट्र राज्यात गेल्या दशकामध्ये, सोयाबीन पिकाच्या क्षेत्रात ११.७ लाख हेक्टर वरून २७.३ लाख हेक्टर इतकी वाढ झाली आहे आणि त्यात सातत्याने वाढ होत आहे. नव्याने लागवड करण्यात येणारे हे महत्त्वाचे पीक संपूर्ण महाराष्ट्रात घेतले जाते. (विदर्भात १५.७ लाख हेक्टर, मराठवाड्यात ८.३ लाख हेक्टर आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३.३ लाख हेक्टर). सोयाबीन हे महाराष्ट्रातील मुख्य तेलबिया पीक म्हणून उदयास आले असून ते विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांमधील हिरवा वाटाणा, काळा वाटाणा व ***खरीप*** सुदान गवत यांच्या बदल्यात पिकविण्यात येते. कमी कालावधी, दुहेरी पीक आयोजन, सुस्पष्ट उत्पन्न फायदा आणि उत्तम पणन सहाय्य यांमुळे सोयाबीन पीक हे या प्रदेशांमधील अत्यंत किफायती पीक म्हणून सिद्ध झाले आहे. तथापि, जैविक आणि अजैविक ताणामुळे हे पीक दमट हवा व पाणी साचण्याच्या स्थितीला अतिशय संवेदनाक्षम पिकाच्या उत्पादकतेमध्ये होणारे चढउतार हा मुख्य चिंतेचा विषय आहे. सोयाबीनचे उत्पादन, विदर्भामध्ये १४४५ कि.ग्रॅ/हेक्टर इतक्या कमी प्रमाणात, मराठवाड्यामध्ये १,७०० कि.ग्रॅ./हेक्टर आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये १,९०० कि.ग्रॅ./हेक्टर होत आहे. पर्जन्याश्रयी क्षेत्रांमध्ये तुषारकांमार्फत एक संरक्षक सूक्ष्म सिंचनासह काढलेल्या सोयाबीनच्या पिकामुळे विदर्भ आणि मराठवाडा यांमधील उत्पादनाच्या चढऊतारातील जोखीम फारच कमी होईल. सोयाबीन आणि हरभरा यांच्यासाठी तुषारणी पद्धत ही सामाईकपणे वापरता येईल.

८.६.४ हरभरा

तूरडाळीनंतर हरभरा हे महाराष्ट्रातील मुख्य कडधान्य पीक आहे. विदर्भ (५.७० लाख हेक्टर), मराठवाडा (४.४० लाख हेक्टर) आणि उर्वरित महाराष्टातील (४.० लाख हेक्टर) हे अत्यंत महत्त्वाचे पीक आहे. पर्जन्याश्रयी

स्थितीमध्ये या पिकाची वाढ होते. हरभऱ्याचे सरासरी उत्पादन ८०० कि.ग्रॅ./हेक्टर इतके आहे. क्षेत्र चाचणी आणि प्रयोगाद्वारे असे आढळून आले आहे की, हरभऱ्याकरिता तुषारणी संचासोबत पर्जन्यजल संधारण आणि साठवणूक संरचना यांच्या स्वरूपात सहाय्य पुरविल्यास उत्पादन दुप्पट होईल. यासाठीच्या अंदाजित गुंतवणुका (सध्याच्या किंमतीत) पुढीलप्रमाणे आहेत: जमीन संस्करण रु. ६,०००/ हेक्टर दराने, पर्जन्यजल साठवणूक संरचना रु.२१,०००/ हेक्टर दराने, तुषारणी सिंचन संच रु.१८,५००/ हेक्टर दराने यांसह एकूण खर्च रु.४५,५०० /हेक्टर.

हरभऱ्याकरिता विकसित संरक्षक सूक्ष्म सिंचनामध्ये भांडवली गुंतवणूक केल्यामुळे, (जोडपत्र ८.४ ब) उत्पादन दुप्पट होईल. हरभऱ्याचे १,६०० कि.ग्रॅ./ हेक्टर इतके लक्ष्याधारित उत्पन्न, ११.४१ लाख टन अतिरिक्त उत्पादन देईल. हरभऱ्याकरिता रु.४,००० क्विंटल दराच्या सध्याच्या बाजार मूल्यानुसार प्रतिवर्ष एकूण अतिरिक्त लाभ हा रु.४,५६४ कोटी इतका असेल.

८.६.५ भात

विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनुक्रमे ७.०६ लाख हेक्टर, ४.१२ लाख हेक्टर आणि ३.०८ लाख हेक्टर क्षेत्रात भात हे, आणखी एक महत्त्वाचे तृणधान्य पीक आहे. विदर्भात ७८० कि.ग्रॅ/हेक्टर, पश्चिम महाराष्ट्रात १,८५० कि.ग्रॅ./हेक्टर आणि कोकणामध्ये २,५६० कि.ग्रॅ./हेक्टर इतके सरासरी उत्पादन आहे. विदर्भ आणि कोकणातील भाताचे उत्पादन हे बव्हंशी पर्जन्याश्रयी आहे. तथापि, विदर्भामध्ये कमी उत्पादनाची कारणे ही पावसाचे त्याच्या ठराविक कालावधीपूर्वी परत माघारी फिरणे आणि घडणाऱ्या पिकाच्या निर्णायक पुनरुत्पादन टप्प्या दरम्यान संरक्षक सिंचन सुविधेची अनुपलब्धता असणे ही आहेत. योगायोगाने या गोष्टी ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्येच घडतात. ***मालगुजारी*** तलावांसारखे सिंचनाचे पारंपारिक स्त्रोत गाळाच्या परिस्थितीमुळे लुप्त झाले आहेत. भाताच्या पिकाच्या उत्पादनात वाढ करण्याकरिता पूर्व विदर्भाच्या भात उत्पादनाच्या क्षेत्रात नवीन पर्जन्यजल साठवणूक संरचनांची निर्मिती करण्याद्वारे हस्तक्षेप करणे आवश्यक झाले आहे. या प्रदेशामध्ये दरवर्षी १,२०० ते १,७०० मिलीमिटर इतका पाऊस पडतो आणि जुन्या ***मालगुजारी*** तलावांमध्ये किंवा पर्यायी व्यवस्था करून, योग्य ठिकाणी १७,००० घनमीटर/हेक्टर इतक्या क्षमतेचे ८५८५३ इतक्या आकाराच्या मोठ्या साठवणूक शेततळ्यांमध्ये पावसाचे पाणी साठविण्याची खूप मोठी क्षमता आहे. भाताच्या उत्पादनासाठी १२० ते १४० सेंटीमिटर इतकी एकूण पाण्याची आवश्यकता असते, त्यापैकी ३५ टक्के योगायोगाने हा कालावधी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये परिपक्वता टप्प्यापर्यंत असतो. लोंबी लागण्याच्या टप्प्यापासून ते हा पावसाळा संपण्याचा कालावधी असतो आणि पिकावर ओलाव्याचा ताण पडल्यामुळे त्याचे उत्पादन कमी होते. या ताणाच्या कालावधीत, सुमारे ४५ सेंटीमीटरचे जी ४५०० घनमीटर/हेक्टरशी समतुल्य आहे अशा संरक्षक सिंचनाची आवश्यकता असते. याचा अर्थ, वर उल्लेख केलेल्या आकाराचे तळे सुमारे ४.० हेक्टर भाताच्या पिकाला संरक्षक सिंचनाची तरतूद करील. वरील आकाराच्या तळ्यासाठी पंपासहित, रुपये ७.२ लाख इतकी भांडवली गुंतवणूक अंदाजित आहे. हा खर्च रुपये १.८ लाख/हेक्टर इतका येतो. पूर्व विदर्भातील भाताच्या पिकासाठी संरक्षक सिंचनाची खातरजमा करण्याकरिता एकूण खर्चाची आवश्यकता जोडपत्र ८.४ क मध्ये दिली आहे.

पूर्व विदर्भामध्ये रु.१.८ लाख /हेक्टर इतकी भांडवली गुंतवणूक करून (कोकणाच्या सममूल्यासह) २५०० कि.ग्रॅ./हेक्टर इतक्या भाताच्या उत्पादकतेचे उद्दिष्ट साध्य करताना त्यात गुंतवणुकीत वाढ करून ते साध्य करता येईल. यामुळे १२.१४ लाख टन इतके अतिरिक्त उत्पादन होईल. आणि सध्याच्या रू.१,२५०/ क्विंटल या दराने किमान आधारभूत किंमतीनुसार यामध्ये रु.१,५१८ कोटी इतके अतिरिक्त वार्षिक ऊत्पन्न मिळेल. म्हणून, पूर्व विदर्भातील भाताच्या पिकासाठी संरक्षक सिंचनाच्या विकासाकरिता सुचविलेली वार्षिक गुंतवणूक समर्थनीय आहे.

कापूस, तूर, सोयाबीन, हरभरा आणि भात ही या प्रदेशांमधील कृषि क्षेत्राची जीवनरेषा आहे. या सर्व प्रदेशांमधील विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील ती मुख्य पर्जन्याश्रयी पिके आहेत. या पिकांसाठी संरक्षक सिंचनाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

८.७ पिकांचा विकास

कापूस, भात, सोयाबीन, तूर ही मुख्य पिके विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांमधील पर्जन्याश्रयी परिस्थितीनुसार वाढतात. कापूस आणि सोयाबीन पिकाचे विदर्भामध्ये आणि मराठवाड्यामध्ये वर्चस्व आहे, तर विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुरीच्या पिकाचे उत्पादन होते. विदर्भातील भात पीक कमी उत्पादकतेसह जास्तीत जास्त क्षेत्र व्यापते. ही पर्जन्याश्रयी पिके विदर्भातील व मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांचे जीवन आहे. म्हणून, शाश्वत उत्पादकतेसाठी या पिकांच्या विकासावर विशेष भर देवून ती अभियान पद्धतीने घेण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात, पिकांचा विकास करण्याकरिता, पुढील प्रादेशिक अभियाने सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे.

८.७.१ विदर्भ व मराठवाड्याकरिता कापूस पीक अभियान

३० लाख हेक्टर क्षेत्राहून अधिक क्षेत्राचा समावेश असणाऱ्या विदर्भ व मराठवाड्यात कापूस हे मुख्य नगदी पीक आहे, तथापि, उत्पादकता सर्वात कमी आहे. पर्जन्याश्रयी परिस्थितीखाली असलेले क्षेत्र बदलत्या पावसाळी हवामानामुळे या पिकावर वाढीच्या कालावधीत ताण असतो. पर्जन्यजल व्यवस्थापन, संरक्षक सिंचन, पोषकद्रव्य व किटकनाशक व्यवस्थापन या काही घटकांवर विदर्भ व मराठवाडा यांकरिता अभियान पद्धत चालवून विशेष भर देणे आवश्यक आहे. विदर्भ व मराठवाडा या प्रत्येक प्रदेशांकरिता कापूस विकासासाठी स्वतंत्ररीत्या रु.२०० कोटींचे वाटप करून, प्रादेशिक कापूस अभियान प्रस्थापित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

८.७.२ पूर्व विदर्भाकरिता भात पीक अभियान

पूर्व विदर्भ प्रदेशातील भात हे मुख्य पीक असून त्याने ७ लाख हेक्टर क्षेत्राहून अधिक क्षेत्र व्यापले आहे. ठराविक कालावधीपूर्वी पाऊस परत माघारी फिरत असल्यामुळे अंतिम टप्प्यात पाण्याच्या अभावाने या पिकाचे नुकसान होते. या अभावामुळे सरासरी उत्पादकता ही सुमारे ७०० कि.ग्रॅ./हेक्टर इतकीच आहे. पोषकद्रव्य, किटकनाशक आणि रोग निदान व्यवस्थापन यांसह संरक्षक सिंचन, सुधारित सघन भातरोपण पद्धती ह्या काही तंत्रविषयक सुधारणा आहेत ज्या पूर्व विदर्भातील भाताच्या उत्पादन वाढीसाठी आवश्यक आहेत. याशिवाय, स्थानिक संस्करण उद्योगांना चालना देण्याची आवश्यकता आहे. आम्ही प्रस्तावित करीत आहोत की, पूर्व विदर्भामध्ये भाताच्या शाश्वत विकासाकरिता रू.१०० कोटी इतक्या अर्थसंकल्पीय वाटपासह पूर्व विदर्भाकरिता भात पीक अभियान सुरू करण्यात यावे.

८.७.३ कोरडवाहू कृषि विकास अभियान

महाराष्ट्र राज्यातील ८२ टक्के क्षेत्र हे कोरडवाहू कृषि क्षेत्राखालील असून ते बव्हंशी विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या भागांमधील आहे. प्रमुख अन्नधान्य, कापूस व तेलबिया यांची कोरडवाहू परिस्थितीमध्ये वाढ होते. कोरडवाहू शेतीमध्ये पर्जन्यजल व्यवस्थापन, जमीन व्यवस्थापन, पोषकद्रव्य व्यवस्थापन आणि संधारणाच्या पद्धती यांवरील तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीवर विशेष भर देण्याची आवश्यकता आहे. राज्यातील कोरडवाहू शेतीची व्याप्ती आणि कोरडवाहू जमिनींवरील उपजीविका, या वरील मुख्य अल्पभूधारक शेतकऱ्याचे अवलंबित्त्व लक्षात घेता, विदर्भ आणि मराठवाडा याकरिता प्रत्येकी रु.५०० कोटी आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता रु.२५० कोटी इतके अर्थसंकल्पीय नियत वाटप करून मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यामध्ये कोरडवाहू कृषिविकासाकरिता 'अभियान पद्धत कार्यक्रम' सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे.

८.८ फलोत्पादन विकास

फलोत्पादन, इतर कृषियोग्य पिकांच्या तुलनेत, प्रति युनिट क्षेत्र उच्च उत्पन्नाची हमी मिळवून देते. मराठवाड्यात निव्वळ लागवडीखालील क्षेत्राच्या १.२ टक्के, विदर्भात ३.७ टक्के, पश्चिम महाराष्ट्रात ६.२ टक्के आणि कोकणात ११.० टक्के इतके फलोत्पादन क्षेत्र आहे. मराठवाडा व विदर्भातील मागास प्रदेशांमध्ये, **फलोत्पादन अभियान म्हणून अंमलबजावणी करता येईल असा फलोत्पादन विकास कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.**

८.८.१ फलोत्पादन अभियान:

आम्ही अशी शिफारस केली आहे की, पुढील ५ वर्षांमध्ये या प्रदेशांमध्ये फलोत्पादन क्षेत्राची वाढ होण्याच्या उद्देशाने, **मराठवाडा व विदर्भ यांमध्ये फलोत्पादनासाठी प्रादेशिक अभियानाची आखणी करण्यात यावी.** मराठवाडा व विदर्भ यांमध्ये फलोत्पादन पिकांची लागवड करण्यासाठी रुपये २५,००० प्रती हेक्टर इतके प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असेल. पुढील ५ वर्षांमध्ये विदर्भात ३.० लाख हेक्टर आणि मराठवाड्यात २.५ लाख हेक्टर इतके अतिरिक्त क्षेत्र फलोत्पादनाखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात यावे. यामुळे फलोत्पादनाचा समतोल विकास करण्याचा मार्ग सुकर होईल. विदर्भ व मराठवाड्यासाठी फलोत्पादनाचे स्वतंत्र प्रादेशिक अभियान सुरू करण्यासाठी योग्य अर्थसंकल्पीय तरतुदीची आवश्यकता असेल.

कृषिविषयक क्षमता आणि पिकांची विविधता लक्षात घेता, मराठवाडा व विदर्भ या प्रदेशांमध्ये फलोत्पादन कार्यक्रम काळजीपूर्वक राबविणे आवश्यक आहे. उर्वरित महाराष्ट्राचा अनुभव असे सूचवितो की, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रसार यामध्ये राज्य शासनाकडून सक्रिय उत्पादक महासंघाला यथोचित सहाय्य मिळाल्यास, संभाव्य विकास त्वरेने होण्यास मदत होईल. शेतीच्या या महत्त्वाच्या उपक्षेत्राचा वेगाने विकास व्हावा यावर भर देणारा विकास कार्यक्रम तडीस नेण्यासाठी विदर्भ व मराठवाड्याकरिता फलोत्पादन अभियानाची आम्ही शिफारस करत आहोत.

८.८.२ हायटेक फलोत्पादन

हायटेक फलोत्पादन हे एक तंत्र असून त्यामध्ये पिकांवर छत बांधून सूक्ष्मस्तर हवामान वातावरण तयार करून झाडांच्या वाढीच्या कालावधीत त्यांच्या आवश्यकतेनुसार अंशत:/पूर्णत: त्याचे नियंत्रण करण्यात येते. वेगवेगळ्या पिकांच्या हवामान स्थितीत वेगवेगळे बदल करून, पिकांच्या जातीला योग्य असे संरक्षक लागवड पद्धतींचे विविध प्रकार विकसित करण्यात आले आहेत.

हरित गृहे, पॉली हाऊस, जाळ्याचे छत या सामान्यपणे अवलंबिल्या जाणाऱ्या काही चालू पद्धती आहेत. लहरी हवामानाच्या परिस्थितीमुळे संरक्षक फलोत्पादनाला किंवा हायटेक फलोत्पादनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. हवामान बदलाचा परिणाम गेल्या दशकामध्ये प्रामुख्याने शेतीवर झाला आहे. पाऊस पडण्याचे स्वरूप आणि पिकांचे नुकसान यावरून ते उघड झाले आहे. म्हणून संरक्षक फलोत्पादन हा पिके टिकण्याची खात्री देणारा नवीन मार्ग आहे. संरक्षक फलोत्पादन / हायटेक फलोत्पादन यामध्ये, उच्च मूल्याची पिके (फुले, विदेशी भाजीपाला, इत्यादी) पूर्णपणे स्वयंचालित नियंत्रित परिस्थितीमध्ये घेतली जातात. हायटेक शेती, ही भांडवलाधारित शेती आहे आणि पुढील १० वर्षांमध्ये, किमान २५००० हेक्टर क्षेत्राचा त्यामध्ये समावेश करण्यासाठी तिला क्रमश: चालना देण्याची गरज आहे. संरक्षक शेतीला चालना देण्यासाठी रुपये २५० प्रति चौरस मीटर दराने सुरुवातीला प्रोत्साहन रकमेची तरतूद करण्यात येईल. संरक्षक शेतीला चालना देण्यासाठी प्रदेशनिहाय वाटप तक्ता क्रमांक ८.३ मध्ये देण्यात आले आहे.

तक्ता ८.३
हायटेक फलोत्पादनाला चालना देण्याकरिता प्रोत्साहकांचे प्रदेशनिहाय वाटप

प्रदेश	लक्षित क्षेत्र (हेक्टर)	प्रोत्साहनार्थ वाटप रू. २५० प्रति चौरस मीटर दराने (रूपये कोटी)	पाच वर्षांकरिता वार्षिक वाटप (रूपये कोटी)
१	२	३	४
विदर्भ	१००००	२५००	५००
मराठवाडा	१००००	२५००	५००
उर्वरित महाराष्ट्र	५०००	१२५०	२५०

स्रोत : कृषिसंबंधित उपगटाने पुरविलेली आकडेवारी

८.९ पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विकास

८.९.१ दुग्धव्यवसाय क्षेत्र : वैरण व पशुधन सुधार कार्यक्रम

पशुधन हा कृषि यंत्रणेचा अविभाज्य घटक असून तो आधारभूत ऊत्पन्न देतो. महाराष्ट्राच्या पशुधन संख्येच्या जवळ जवळ ५०% इतके पशुधन उर्वरित महाराष्ट्रात असून उर्वरित २८% इतके पशुधन विदर्भामध्ये आहे, तर मराठवाड्यामध्ये २२% इतके पशुधन आहे. संपूर्ण राज्यात देशी गुरांच्या संख्येचे व राज्यातील बोवरिन पशुधनाच्या संख्येचे प्रमाण २५ ते ४१ टक्के इतके आहे. राज्यातील एकूण संकरित गायींपैकी जवळ जवळ ७६ टक्के संकरित गायी पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहेत. मराठवाडा व विदर्भातील अधिक उत्पन्न देणाऱ्या संकरित जनावरांची संख्या व म्हशींची संख्या पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत फारच कमी असूनही या प्रदेशातील दुग्धव्यवसाय क्षेत्राची विकास तूट व पुढील संभाव्य वाढ दर्शविते. मराठवाडा व विदर्भाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रातील दूध उपलब्धता ३ ते ४ पटीने जास्त असून ती विदर्भ व मराठवाड्यातील पशुधन विकासात तफावत दर्शविते. जनावरांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रादेशिक पशुधन पैदास धोरण तातडीने सुरू करण्यात यावे.

८.९.२ विदर्भ व मराठवाड्यातील दुग्धव्यवसाय कार्याच्या विकासात चाऱ्याची (वैरणीची) उपलब्धता ही दुसरी प्रमुख अडचण आहे. या प्रत्येक प्रदेशांमध्ये वैरण विकास क्षमता मोठ्या प्रमाणात आहे.विभागाने याकडे प्राथम्याने लक्ष केंद्रित केल्यास मागास प्रदेशातील दुभत्या जनावरांची संख्या आणि दुग्ध उत्पादकतेत वाढ होईल आणि अशा प्रकारे पुढील पाच वर्षात, पश्चिम महाराष्ट्राच्या विकास पातळीवर आणण्यास मदत होईल. कालबद्धरीतीने विशेष प्रयत्न करून या दोन अडचणीचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. विदर्भ व मराठवाडा या प्रदेशांतील कृषियोग्य जमिनीचा बराच मोठा भाग पर्जन्याश्रयी आहे. वैरणीचे योग्य प्रकार विकसित करून आणि संकरित अधिक उत्पादन देणाऱ्या पशुधनामध्ये क्रमाक्रमाने व कायम स्वरूपी सुधारणा करण्यासाठी एकात्मिकपणे व कार्यक्रमाधारित पद्धतीने ते हाताळण्यात यावे. दुसऱ्या बाजूला बाजार व्यवस्थेचा आणि शेतकरी गटावर आधारित सामुदायिक कार्यक्रमांचा विकासही एकाच वेळी करण्यात यावा. मराठवाडा व विदर्भासाठी एकत्रित विकासाकरिता एका स्वतंत्र कार्यक्रमाची आम्ही शिफारस करीत आहोत. या कार्यक्रमासाठी आवश्यक वार्षिक वाटप तक्ता ८.४ मध्ये देण्यात आले आहे.

तक्ता ८.४
विदर्भ व मराठवाड्याकरिता वैरण व पशुधन सुधार कार्यक्रम

प्रदेश	विद्यमान दुभती जनावरे/१००० लोकसंख्या	लक्ष्यित दुभत्या जनावरांची संख्या (लाख)	पुढील पाच वर्षाच्या वैरण अभियानाकरिता वार्षिक वाटप (रू. कोटी)
१	२	३	४
विदर्भ	४८	१५.०	१५.०
मराठवाडा	६१	१०.०	१०.०

८.९.३ **मेंढी व शेळी** पालनामुळे कौटुंबिक उत्पन्नास स्थैर्य प्राप्त होते आणि म्हणून, त्याची कोकण, विदर्भ व मराठवाडा यांच्या विवक्षित भागात त्यास चालना देण्याची गरज आहे.

८.९.४ **कुकुटपालन** हे महत्त्वाचे क्षेत्र असून त्यामुळे पर्यायी रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी प्राप्त होतात आणि म्हणून विदर्भ व मराठवाड्यातील काही निवडक क्षेत्रात त्याचे प्रचालन करण्यात यावे. परसदारातील कुकुटपालन कमी उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यासाठी आधार असल्याचे सिद्ध झाले आहे.

८.९.५. मत्स्यव्यवसाय विकास

मत्स्यव्यवसाय हे विकासाला हातभार लावणारे क्षेत्र असून त्यासाठी आधारभूत सुविधा निर्माण करून व प्रोत्साहके देऊन ते पूर्णत: विकसित करण्याची गरज आहे. कोकणात, अंदाजे १५००० हेक्टर इतकी खारे पाणी मत्स्य संवर्धनाची क्षमता आहे. सर्व प्रदेशांमध्ये विशेषत: मराठवाडा व उवरित महाराष्ट्रामध्ये गोडया पाण्यातील मासेमारी विकसित करण्यास वाव आहे. कोकण प्रदेशात सागरी मत्स्य व्यवसायाला मोठा वाव आहे.

सागरी मत्स्यव्यवसाय

कोकणच्या किनारी प्रदेशात पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे, सागरी मत्स्यव्यवसायामधील मत्स्योत्पादन पुरेपूर क्षमतेने घेता येत नाही. किनारी प्रदेशातील रस्त्यांची जोडणी, शीतगृहांची उभारणी, बंदरांचा विकास यांवर अधिक जोर देवून कोकण सागरी क्षेत्रात सागरी मत्स्यव्यवसायात वाढ करण्याची गरज आहे.

मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या वाढीसाठी धोरण

१. *या क्षेत्रामध्ये कायमस्वरूपी खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी मत्स्यपालन तलावांचे (किमान ५ वर्षाचे) दीर्घ मुदतीचे करार करणे इष्ट असेल.*

२. *मत्स्य बीज फलन केंद्रात खाजगी गुंतवणुकांना आकर्षित करण्यासाठी धोरणात सुधारणा करणे.*

३. *खोल समुद्रात मच्छिमारी करण्यातील यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देणे.*

८.१० महाराष्ट्र कृषि यांत्रिकीकरण अभियान

कृषि क्षेत्र हे, लोकांना मोठ्या प्रमाणात पारंपरिकरीत्या रोजगार पुरविते. तथापि, मागील दशकांमध्ये उद्योग व सेवा यांसारख्या अन्य क्षेत्रांत आणि नागरीकरणात वाढ झाल्यामुळे या क्षेत्रातील ग्रामीण कामांकडे मोठ्या प्रमाणात रोजगार परिवर्तित झाल्याने या क्षेत्रात सर्वोतम रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. दुसरे म्हणजे, ग्रामीण क्षेत्रातील शासनाचे सामाजिक कार्यक्रम अन्नासाठी अर्थसहाय्य पुरवितो आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे (मनरेगा) रोजगाराची हमी मिळवून देतो. ह्या परिस्थितीमुळे कृषि क्षेत्रामध्ये, कामगार टंचाईचे नवीन संकट निर्माण झाले आहे. कामगाराची उपलब्धता आणि त्याचा खर्च या कृषि क्षेत्रातील महत्वाच्या समस्या बनल्या आहेत. शेतीच्या कामांमध्ये काबाडकष्ट आणि गैरसोय या गोष्टींचा समावेश होतो आणि त्यामुळे नवीन पिढीला खडबडीत शेतामध्ये नांगराच्या मागे मैलोनमैल चालत जाणे क्वचितच आवडेल. या पार्श्वभूमीवर कमी परंतु कुशल

कामगारांसह शेती टिकवून ठेवण्यासाठी शेतीचे यांत्रिकीकरण एकमेव मार्ग आहे.

शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी प्रस्तावित अभियान पद्धतीचा दृष्टिकोन हा, प्रदेशाच्या विशेष यांत्रिकीकरण साधन पद्धतीच्या विकासाकरिता व तिच्या लोकप्रियतेसाठी आवश्यक त्या इष्ट धोरणनीतीचे हस्तक्षेप सुनिश्चित करील. यामध्ये दुहेरी धोरणनीतीचा समावेश होतो : (अ) साधनांचे संकल्पचित्र, विकास, चाचणी तसेच कुशल मनुष्यबळ यासाठी प्रशिक्षण देणे, (प्रत्येक प्रदेशांमध्ये प्रस्तावित कृषि यांत्रिकीकरण संस्थेकरिता) या गोष्टीसाठी संस्थात्मक व्यवस्था करणे आणि (ब) औद्योगिक विस्तार, क्षेत्रीय प्रात्यक्षिके, पुढील दशकामध्ये राज्याच्या सर्व प्रदेशांमध्ये यांत्रिकीकरणाच्या विस्तारासाठी धोरणात्मक कार्यक्रमांसह गरजांवर आधारित अवजारांचा व यंत्रसामग्रीचा अंगीकार करणे आणि ती लोकप्रिय करणे या गोष्टींचा समावेश असलेली कार्ये हाती घेण्यासाठी विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्रात शेती यांत्रिकीकरणाचे प्रादेशिक अभियान.

८.१०.१ कृषि यांत्रिकीकरण संस्था

संशोधन व विकास कार्य प्रदेशासाठी योग्य ती शेतीची अवजारे व साधनसामग्री यांची चाचणी, प्रशिक्षण व प्रात्यक्षिक याकरिता रु. १०० कोटी इतके वित्तीय सहाय्य करून राज्यातील प्रत्येक कृषि विद्यापीठाला कृषि यांत्रिकीकरण संस्था संलग्न करण्यात आल्यास, त्यामुळे प्रदेशातील यांत्रिकीकरणास चालना मिळेल. प्रदेशातील कृषि यंत्रणेचा विस्तार करण्यास या संस्था बांधील असतील. कृषि विद्यापीठातील उपलब्ध मनुष्यबळ मुख्य अध्यापक म्हणून वापरण्यात यावे आणि ऊर्वरित तांत्रिक आणि आधारभूत कर्मचारी वर्ग कंत्राटीतत्वावर नियुक्त करणे शक्य आहे. या संस्थेने, ५ वर्षानंतर तिचा कार्यचालनात्मक खर्च भागविण्यासाठी चाचणी व प्रशिक्षण यामधून उत्पन्न मिळवावे. यांत्रिकीकरणाच्या प्रचालनासाठी आवश्यक असलेले प्रादेशिक वाटप,जोडपत्र ८.५ मध्ये देण्यात आले आहे, तर पुढील १० वर्षांपर्यंत प्रोत्साहन देण्याची ज्या कृषियंत्रणांना गरज आहे त्या कृषियंत्रणाची यादी जोडपत्र ८.६ मध्ये देण्यात आली आहे.

८.१०.२ प्रादेशिक कृषि यांत्रिकीकरण कार्यक्रम

विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्र या प्रत्येकांसाठी चार प्रादेशिक कृषि यांत्रिकीकरण कार्यक्रम असावेत. स्थानिकरीत्या आवश्यक असलेली अवजारे, साधनसंपत्ती निश्चित करणे, त्यांची उपयोगिता चाचणी घेणे आणि अंतिमत: समुचित अर्थसहाय्यीकरण आणि प्रोत्साहके यांचा अंगिकार करणे, याकरिता कार्यक्रमांमध्ये कृषि अभियांत्रिकी पदवीधर व पदव्युत्तर पदवीधारकांची नियुक्ती करावी. उद्योगाद्वारे नवीन अवजारांचे उत्पादन हा यांत्रिकीकरणाचा अत्यावश्यक घटक असल्यामुळे, दर्जेदार अवजारे आणि यंत्रे तयार करण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरणात्मक पुढाकार प्रस्तावित आहे. काही यथार्थमापी (Precision) यंत्रसामग्री अत्यंत महाग असते व लहान शेतकऱ्यांना ती व्यक्तीश: खरेदी करणे शक्य नाही म्हणून मोठया संख्येने असलेल्या ग्रामीण समुहामध्ये लहान शेतकऱ्यांच्या फायद्याकरिता, "भाडेतत्त्वावरील ग्राहक केंद्राची" स्थापना करण्यात यावी. सर्व प्रादेशिक अभियानांना या कार्यक्रमासाठी असलेला निधी वापरून कालबध्द वेळेत यांत्रिकीकरण करण्यासाठी उत्तरदायी ठरविले पाहिजे.

कृषि यांत्रिकीकरणाचे धोरण

एक. संकल्पचित्र आणि विकास यामध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारीसाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत.

दोन. विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रामध्ये कृषि यांत्रिकीकरणावर आधारित स्वतंत्र प्रादेशिक अभियान असावे.

तीन. कृषि यंत्रसामग्रीच्या करामध्ये सूट देण्यात यावी.

चार. प्रोत्साहके व अर्थसहाय्य याबाबतचे धोरण ठरवावे.

पाच. प्रादेशिक अभियानाचा भाग असावा यासाठी यांत्रिकीकरण योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मध्यस्थ अभिकरण म्हणून महाराष्ट्र कृषि औद्योगिक महामंडळाचे अधिकार काढून घेणे.

सहा. प्रोत्साहके व अर्थसहाय्य ऑनलाईन देण्यात यावेत आणि अंमलबजावणीची मुदत योग्यपणे निश्चित करण्यात यावी. याचा इतर राज्यांना, सर्व गोष्टींचा विचार करून आणि त्याचे फायदे अधिक प्रभावीपणे मिळवण्यासाठी लक्ष्ये निश्चित करून अभ्यास करण्याकरिता व अनुभव घेण्याकरिता उपयोग होईल. पुढील पाच वर्षामध्ये विदर्भ व मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या अवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये मोठ्या ट्रॅक्टरवरील (३५ अश्व शक्तीवरील) प्रोत्साहके ३० टक्यांपर्यंत वाढविण्यात येतील आणि कृषिसंबंधीच्या अवजारांवरील प्रोत्साहके ६० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात यावी.

सात. कृषि संबंधीच्या अवजारांकरिता असलेल्या भाडे तत्त्वावरील ग्राहक केंद्रांना करांमध्ये सूट देऊन आणि व्यक्तिगत गट व सहकारी तत्त्वांवरील नवीन उपक्रमांना ३० ते ५० टक्के परिव्यय प्रोत्साहके देऊन ग्राम समुहांमध्ये चालना द्यावी.

८.११ कृषिविषयक यंत्रसामग्री व अवजारांकरिता भाडेतत्त्वावरील ग्राहक केंद्र :

शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात तुकडे पाडण्यात येत असून बिगरशेतीची कामे त्या जमिनीवर करण्यात येत आहेत. भाडे तत्त्वावरील ग्राहक केंद्रांची स्थापना करून त्याद्वारे शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर शेतीविषयक सेवा पुरविण्यासाठी प्रत्येक गावामध्ये/गावसमुहामध्ये कृषि यंत्रसामग्री व साधनसामग्री असलेली पेढी, अल्पभूधारक शेतकऱ्याची शेतीची कामे करण्यासाठी प्रोत्साहन देईल. ग्रामीण युवकांना योग्य प्रशिक्षण देऊन आणि गरजेनुसार शेतकऱ्यांना साधनांची खरेदी करण्याकरिता तसेच भांडवलाची पूर्तता करण्यासाठी सहज पतकर्ज उपलब्ध करून देण्याकरिता आणि भाडे तत्त्वावरील ग्राहक केंद्राच्या कार्यचालनात्मक खर्चासाठी प्रोत्साहके देऊन गाव पातळीवरील उपक्रम म्हणून, या केंद्रांचे प्रचालन करण्यात यावे. यामुळे ग्रामीण क्षेत्रामध्ये रोजगाराची संधी निर्माण होईल आणि शेतकऱ्यांना सेवा पुरविणे शक्य होईल.

८.१२ कृषि –उद्योग विकास कार्यक्रम

महाराष्ट्र कृषि क्षेत्रात अग्रेसर असूनही महाराष्ट्रात केवळ १४ टक्के इतकेच कृषि उद्योग आहेत. जवळपास ५८ टक्के उद्योगधंदे पश्चिम महाराष्ट्रात एकवटलेले आहेत. मराठवाडा आणि विदर्भ हे औद्योगिकदृष्ट्या मागास प्रदेश आहेत आणि या प्रदेशात कृषि आधारित उद्योगक्षमता मोठी आहे. कापूस, सोयाबीन, तूर डाळ, हरभरा, लिंबुवर्गीय फळे, आंबा या प्रमुख कृषि विक्रेय वस्तु म्हणजे या प्रदेशाची ताकद आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याकडे प्रमुख उत्पादनाची क्षमता असून यामध्ये जवळपासच्या जिल्ह्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश होतो. कृषि मालाचे संस्करण, मूल्यवर्धन आणि एकतर सार्वजनिक निधीतून किंवा खाजगी अभिकरणांबरोबर भागीदारी करून, सर्व आधारभूत सुविधासह खरेदी विक्री याकरिता, प्रत्येक जिल्ह्यातील कृषि–उत्पादन केंद्रांनी, जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या कच्चा मालाचा उपयोग करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

कृषि विक्रेय वस्तु केंद्रे (पार्कस्)

प्रत्येक जिल्ह्याकरिता कृषि आधारित उद्योग आणि एकूण रु. २,४६०/– कोटी इतक्या एकूण खर्चाची कृषि विक्रेय वस्तु केंद्रे (पार्कस्) प्रस्तावित करण्यात आली असून, ही केंद्रे, कच्च्या कृषि मालाचे पक्क्या मूल्यवर्धित ग्राहक उत्पादनामध्ये रूपांतर करणे सहज शक्य व्हावे म्हणून मदत करतील. त्यामुळे प्रदेशातील कृषि उत्पादनामध्ये वाढ होईल तसेच जिल्ह्यामध्ये रोजगाराच्या समान संधी निर्माण होतील आणि कृषिच्या विकासास हातभार लागेल. प्रदेशनिहाय प्रस्तावित कृषि संस्करण उद्योग/केंद्रे तक्ता ८.५ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

८.१३ प्रादेशिक कृषि उद्योग विकास महामंडळ–एक नवीन भूमिका

कृषि उद्योग विकास महामंडळाने कृषि उद्योग क्षेत्राच्या विकासात आणि प्रादेशिक समतोल राखण्यात देखील प्रमुख भूमिका बजावणे अपेक्षित आहे. प्रदेशांमधील कृषि उद्योग विकासावर विशेष लक्ष केंद्रीत करून, **सध्याच्या महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाचे,** विदर्भात **अमरावती** येथे, मराठवाड्यात **लातूर** येथे व उर्वरित महाराष्ट्रात **कोल्हापूर** येथे **तीन स्वतंत्र प्रादेशिक स्वायत्त शाखांमध्ये (युनिटमध्ये) विभाजन करणे** इष्ट आहे. कृषि आधारित उद्योगांच्या जलद विकासासाठी, मराठवाडा व विदर्भ यांच्या मागास प्रदेशांकरिता अधिक नियतवाटप करणे इष्ट ठरेल. आम्ही प्रस्तावित केलेले नवीन प्रादेशिक कृषि उद्योगविकास महामंडळ हे, दहा वर्षांच्या कालावधीत प्रदेशांमध्ये कृषि आधारित उद्योगांच्या विकास करण्याच्या लक्ष्यासह तंत्रशास्त्र **व्यवस्थापन तज्ञ** प्रमुख असलेली एक स्वायत्त एजन्सी असावी. प्रादेशिक कृषि उद्योग विकास महामंडळाने स्वत:हून कोणताही व्यवसाय करू नये आणि कृषि व्यवसायास चालना देणारी व विनियामक संस्था म्हणून काम करावे.

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाच्या नियामक मंडळात, अध्यक्ष म्हणून कृषिमंत्री यांचा, उद्योग, फलोत्पादन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय यांचे सचिव/आयुक्त, तीन प्रदेशांपैकी प्रत्येक प्रदेशाचे विभागीय आयुक्त यांचा समावेश असेल. नियामक मंडळाने, तीन वर्षांच्या कालावधीसाठी, प्रत्येक प्रदेशातील एक याप्रमाणे तज्ञ सदस्यांची नियुक्ती करावी. प्रादेशिक कृषि उद्योग विकास महामंडळाच्या एका व्यवस्थापकीय संचालकाने, आळीपाळीने, नियामक मंडळाचा सदस्य–सचिव म्हणून काम करावे.

तक्ता ८.५

प्रदेशनिहाय प्रस्तावित कृषि संस्करण उद्योग/ पार्क

प्रदेश	जिल्हे	उद्योग*	खर्चाचा अंदाज (रूपये कोटीत)
१	२	३	४
विदर्भ	अमरावती	मॅन्डारिन पार्क+	१००
	अकोला	कडधान्य पार्क +	७०
	भंडारा	दुग्धशाळा +	५०
	बुलढाणा	बीज प्रक्रिया +	१००
	चंद्रपूर	सोयाबीन प्रक्रिया+	५०
	गोंदिया	तांदुळ पार्क +	५०
	गडचिरोली	वन उत्पादन पार्क +	१००
	नागपूर	मेगा फूड पार्क +	१००
	वर्धा	रेशीम उत्पादन पार्क +	३०
	वाशिम	सोयाबीन पार्क +	७०
	यवतमाळ	मेगा कॉटन पार्क +	१२०
पोट बेरीज			८४०
मराठवाडा	औरंगाबाद	मेगा फूड पार्क +	१००
	बीड	स्ट्रार्च +	५०
	हिंगोली	हळद +	४०
	जालना	स्वीट ऑरेंज +	१००
	लातूर	सोयाबीन पार्क +	७०
	नांदेड	केळी पार्क +	८०
	उस्मानाबाद	एईझेड द्राक्षे +	८०
	परभणी	मेगा कॉटन पार्क +	१००
पोट बेरीज			६२०

प्रदेश	जिल्हे	उद्योग*	खर्चाचा अंदाज (रूपये कोटीत)
१	२	३	४
उर्वरित महाराष्ट्र	रायगड	मस्त्य पार्क +	१००
	रत्नागिरी	काजू पार्क +	५०
	सिंधुदुर्ग	आंबा पार्क +	१००
	ठाणे	तांदुळ पार्क +	५०
	अहमदनगर	मांस पार्क +	१००
	धुळे	कांदा पार्क +	५०
	जळगाव	केळी पार्क +	१००
	कोल्हापूर	पुष्पसंवर्धन +	५०
	नाशिक	भाजीपाला पार्क +	१००
	नंदुरबार	मिरची पार्क +	५०
	पुणे	वाईन पार्क +	५०
	सांगली	दुग्धव्यवसाय +	५०
	सातारा	मेगा फूड पार्क +	१००
	सोलापूर	डाळिंब पार्क +	५०
पोट बेरीज			१,०००
एकूण बेरीज			२,४६०

*प्रमुख विक्रेय वस्तु +स्थानिक कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर आधारित असलेल्या इतर विक्रेय वस्तू

स्रोत : कृषिवरील उपगटाने पुरविलेली.

८.१४ कृषिविषयक पतपुरवठा व आवश्यक बाबी

८.१४.१. पतपुरवठा मिळवणे :

प्रदेशांमधील लागवडीच्या सरासरी खर्चाच्या बाबतीत कर्जाच्या /दर हेक्टरी वितरणात तफावत आहे. उर्वरित महाराष्ट्रात, लागवडीच्या खर्चाच्या बाबतीत, दर हेक्टरी १४.३ टक्के इतका पतपुरवठा मिळतो, तर मराठवाडयात हे प्रमाण ६.३ टक्के आणि विदर्भात ७.३ टक्के इतके असून ते मराठवाडा व विदर्भाच्या मागास प्रदेशांमध्ये कमी प्रमाणात पतपुरवठा मिळण्याचे दर्शवितो. तसेच प्रत्येक लागवडदाराला (शेतकऱ्याला) वितरित केलेल्या कर्जामध्ये देखील तफावत असून ते पश्चिम महाराष्ट्रात रु.६,०६० इतके, मराठवाड्यात रु.३३५४ आणि विदर्भात रु. ४४८७ इतके आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शेतीचे होत असलेले वाणिज्यीकरण व विविधीकरण यांमुळे, शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पतपुरवठा करण्याची मागणी वाढत आहे. सघनता असलेली नवीन शेती, उच्च तंत्रज्ञान व आवश्यक बाबी आणि पायाभूत सुविधा यांची वाढती मागणी केवळ पर्याप्त आणि वेळेवर पतपुरवठा सहाय्य मिळण्यावरच टिकवून ठेवता येऊ शकेल. राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकाकडून मिळणाऱ्या सहाय्याबरोबरच महाराष्ट्रात ग्रामीण वित्तीय संस्था, पतपुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावतात.

महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांमध्ये गेल्या ५ वर्षांमध्ये पतपुरवठा सुविधेचा फायदा करून घेणाऱ्या लागवडदारांची सरासरी संख्या उर्वरित महाराष्ट्रातून ५५ टक्के, मराठवाड्यातून २४ टक्के आणि विदर्भातून २१ टक्के असल्याचे दिसून येते. कर्ज वितरणाचे लक्ष्य, उर्वरित महाराष्ट्रासाठी रु.४,४५६ कोटी, मराठवाड्यासाठी रु.१,३६३ कोटी व विदर्भासाठी रु.१,३८७ कोटी इतके होते. त्यापैकी उर्वरित महाराष्ट्रासाठी ८७ टक्के, मराठवाड्यासाठी ८२ टक्के आणि विदर्भासाठी ९२ टक्के इतके लक्ष्य साध्य झाले आहे. प्रतिहेक्टरी कर्ज वितरण देखील, उर्वरित महाराष्ट्रासाठी रु.३,९०९, मराठवाड्यासाठी रु.१,७२७ आणि विदर्भासाठी रु.२०९८ इतके असल्याचे दिसून येते. (सहकार आयुक्त, पुणे, २०१२). मराठवाडा व विदर्भात प्रतिहेक्टरी कर्ज वितरण कमी असून त्यातून प्रादेशिक तफावत दिसून येते. मोठ्या

संख्येतील शेतकऱ्यांसाठी पतपुरवठा मिळण्याची सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच वितरणासाठी कर्ज रकमेचे पर्याप्त लक्ष्य गाठण्यासाठी मराठवाड्यातील व विदर्भातील वित्तपुरवठ्याच्या प्रमाणात वाढ करण्याची गरज आहे. मराठवाडा व विदर्भ यांमध्ये, प्रतिहेक्टरी संवितरित केलेल्या कर्जाची टक्केवारी ही उर्वरित महाराष्ट्रातील १४ टक्क्यांच्या तुलनेत लागवडीच्या सरासरी खर्चाच्या केवळ ६ ते ७ टक्के इतकी असल्याचे दिसते. संवितरित केलेले कर्ज इतके अल्प असते की, मराठवाड्यातील व विदर्भातील शेतकऱ्यांना पीक वाढीच्या हंगामात त्रास सहन करावा लागतो आणि उत्पादनात नुकसान सहन करावे लागते. २०११-१२ या वर्षाच्या कर्ज वितरणातून, मराठवाडा व विदर्भातील अनुक्रमे २१ टक्के व १९ टक्के वितरणाच्या तुलनेत, उर्वरित महाराष्ट्रात ५६ टक्के नियतवाटप झाल्याचे दिसते. हे कर्जाच्या नियतवाटपात मोठे अंतर असल्याचे दर्शक आहे. मराठवाड्यातील व विदर्भातील लागवडीचा खर्च व वित्तपुरवठ्याचे प्रमाण यांमध्ये स्पष्टपणे तफावत आहे.

८.१४.२ कृषिसंबंधातील आवश्यक बाबी :

(एक) बी-बियाणे

बियाणांची आवश्यकता व उपलब्धता यांत मोठी तफावत आहे. शेतकरी एकतर त्यांचे स्वत:च्या बियाणांचा किंवा स्थानिक बाजारपेठेतून घेतलेल्या निकृष्ट दर्जाच्या बियाणांचा वापर करीत असल्याचे दिसून येत असून त्यामुळे उत्पादकतेवर गंभीर परिणाम होतो. विद्यमान तालुका बीज प्रक्षेत्रांचा दर्जेदार बियाणांचे उत्पादन करण्यासाठी आणि ३.३५ लाख टन इतकी मागणी व पुरवठ्यातील तफावत दूर करण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक उपलब्धतेची सुनिश्चिती करण्यासाठी कार्यक्षमतेने वापर करण्यात येईल. स्थानिक मागणीनुसार बियाण्यांचे उत्पादन पुन्हा सुरू करण्यासाठी प्रत्येक तालुका बीज प्रक्षेत्रांना दर्जदार बियाणे मिळण्यासाठी रु. १० लाख इतके एक रकमी सहाय्य देण्याचे प्रस्तावित केले आहे.

८.१५ शेतमजूर प्रशिक्षण शाळा

सर्व कृषि विद्यापीठांमधील शेतमजूर प्रशिक्षण शाळांमध्ये, शेतमजुरांना शेतकाम व नवीन शेती पद्धतींमधील कौशल्य विकासासाठी प्रमाणपत्र पाठ्यक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रवेशाच्या निकषामध्ये कोणतीही विनिर्दिष्ट अर्हता किंवा वयाची आडकाठी असणार नाही, परंतु, शेतमजूर म्हणून कामाचा अनुभव असावा. शेतमजूर प्रशिक्षण शाळेच्या स्थापनेच्या या कार्यक्रमासाठी चार कृषि विद्यापीठांपैकी प्रत्येक विद्यापीठाला व महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाला ५० कोटी इतके ठोक अनुदान देण्याची शिफारस केली आहे.

८.१६ कृषिविषयक शिक्षण

सध्या, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकण येथील प्रत्येकी एक अशा चार प्रादेशिक कृषि विद्यापीठांमार्फत आणि पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठामार्फत कृषि शिक्षण दिले जाते. या विद्यापीठांना नेमून दिलेले मूलभूत काम म्हणजे कृषि शिक्षणामध्ये प्रगती करणे, संशोधन करणे व तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करताना विस्तार कामगारांना प्रशिक्षित करण्यासाठी विस्तार शिक्षण देणे, हे विद्यापीठांमध्ये स्नातकपूर्व व स्नातकोत्तर पाठ्यक्रमांसह कृषि, कृषि अभियांत्रिकी, उद्यानविद्या, गृहविज्ञान, वनशास्त्र, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, जैव तंत्रज्ञान, या विद्याशाखा आहेत. विद्यापीठे, कृषि तंत्र शाळा व माळी प्रशिक्षण केंद्रे यांच्यामार्फत निम्नस्तरावरील कृषि शिक्षण देण्याचे कामे देखील करतात. याशिवाय, सर्व चार कृषि विद्यापीठांच्या अधिकारक्षेत्रात राज्याच्या सर्व प्रदेशांमध्ये एकूण ४४ कृषि विज्ञान केंद्रे पसरली आहेत. नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठात पशुवैद्यकीय विज्ञान, मत्स्यव्यवसाय व दुग्धशाळा यांमध्ये स्नातकपूर्व व स्नातकोत्तर शिक्षण दिले जाते.

जर कृषिक्षेत्रात, शिक्षित व कुशल मनुष्यबळ आले तर, नवीन शेती चांगले परिणाम देऊ शकेल. म्हणून कृषि शिक्षण हा राज्यातील कृषि क्षेत्राच्या वाढीचा एक अत्यावश्यक घटक आहे. या संदर्भात, नवीन विद्यापीठे, महाविद्यालये व शाळा सुरू करून त्याद्वारे कृषि शिक्षणाचा विस्तार करण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रात नऊ कृषि हवामान प्रक्षेत्रे (झोन) आहेत आणि या झोनपैकी

प्रत्येक झोनमधील शेतीच्या गरजा विविध आहेत. कृषि शिक्षण व संशोधन यांवर झोननिहाय लक्ष केंद्रित केले पाहिजे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यामधील विद्यमान कृषि विद्यापीठांमध्ये, स्थूलमानाने प्रदेशातील कृषि हवामान प्रक्षेत्रांच्या (झोनच्या) गरजा पुरविणाऱ्या पायाभूत सुविधा आहेत, तथापि, पूर्व व पश्चिम विदर्भात संपूर्णत: वेगळी कृषि हवामानाची स्थिती आहे. पश्चिम विदर्भात स्थित असलेल्या कृषि विद्यापीठाचे अधिकारक्षेत्र मोठे आहे आणि पश्चिम विदर्भातील संशोधन व शैक्षणिक पायाभूत सुविधा सापेक्षतेने अतिशय कमी असल्याने, प्रदेशाच्या वाढीसाठी कृषि शिक्षण व संशोधन यांवर विशेष जोर देण्याची गरज आहे.

म्हणून, पूर्व विदर्भ प्रदेशाच्या वाढीसाठी गडचिरोली/सिंदेवाही येथे पश्चिम विदर्भ प्रदेशासाठी एक नवीन कृषि विद्यापीठ, अत्यावश्यक आहे. तसेच प्रत्येक तालुक्याच्या स्तरावर एक कृषि महाविद्यालय आणि ग्रामीण महाराष्ट्रातील एक लाख लोकसंख्या असणाऱ्या गावाच्या एका समुहासाठी एक कृषि तंत्रनिकेतन अत्यावश्यक आहे.

८.१७ शिफारशी

(अ) व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था :

कृषी व संलग्न क्षेत्रांमध्ये, रोजगाराची खूप मोठी क्षमता आहे आणि नवीन कृषि उपक्रमांसहित प्रवर्तन, व्यवस्थापन दुरुस्ती व देखभाल, बियाणे, रोपमळा, रोप संरक्षण, हंगामोत्तर प्रक्रिया, पशुधन व्यवस्थापन, कुक्कूटपालन, दुग्धशाळा व इतर उपक्रम यांमध्ये अतिविशेष कौशल्यांची गरज असेल. प्रत्येक प्रदेशात प्रत्येक व्यवसायातील पुरेशी प्रवेशक्षमता असलेली ४ आठवडयांपासून ते २ वर्षे कालावधीचे व्यावसायिक प्रशिक्षण देणारी स्थान विशिष्ट व्यवसाय प्रशिक्षणाची एक व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था असेल. प्रत्येक प्रदेशात प्रत्येकी **रु. १०० कोटीचा** अर्थसंकल्प असलेली व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था आदर्श नमुना असेल.

(ब) शेतमजूर महिला प्रशिक्षण संस्था

शेतीमधील जवळपास ७०% इतका कामाचा भार महिला उचलतात, तथापि, नवीन कृषी व्यवधानांसाठी आवश्यक असलेली उच्च कौशल्ये व ज्ञान त्यांना अवगत नाही. कृषीक्षेत्रात महिलांना करावी लागणारी बहुतांश कामे नेहमी काबाडकष्टाची व त्यामुळे त्यांची क्षमता कमी करणारी असतात.पुरोगामी राज्य असणाऱ्या महाराष्ट्राने शेतमजूर महिलांच्या व महिला शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी आद्य प्रवर्तक कार्यक्रम सुरू करण्यात पुढाकार घ्यावा. प्रत्येक प्रदेशात (शेतमजूर महिला प्रशिक्षण संस्था) नवीन प्रशिक्षण संस्था सुरू करणे अत्यंत इष्ट असून त्या कृषिविषयक विकासाच्या सुविधेमध्ये नवीन परिमाणे आणतील. प्रादेशिक/स्थानिक परिस्थितीस योग्य असलेली प्रशिक्षण पध्दती, तज्ञांकडून विकसित करण्यात यावी आणि पाठयक्रम प्रमाणपत्र देणाऱ्या प्रशिक्षण शाळा त्या प्रदेशांतील कृषि विद्यापीठांशी संलग्न असाव्यात. प्रत्येकी रु.१०० कोटी इतका खर्च करून मागास प्रदेशांमध्ये शेतमजूर महिला प्रशिक्षण संस्था सुरु कराव्यात आणि त्या प्रामुख्याने यवतमाळ (विदर्भ), बीड (मराठवाडा), सोलापूर आणि सिंधुदुर्ग (उर्वरित महाराष्ट्र) यासारख्या कोरडवाहू शेती असलेल्या जिल्हयांमध्ये असाव्यात.

(क) पूर्व विदर्भासाठी नवीन कृषि विद्यापीठ

पूर्व विदर्भ, अतिपर्जन्य असलेल्या स्वतंत्र कृषि हवामान क्षेत्रात आहे. पश्चिम विदर्भ प्रदेशापासून हे (हवामान) अगदी भिन्न आहे. पश्चिम विदर्भात सध्या असलेले कृषी विद्यापीठ, मुख्यत: प्राबल्य असलेली कापूस-सोयाबीन पिके आणि काळी जमीन यासंबंधात काम करते. पूर्व विदर्भात तुलनेने मोठे वन क्षेत्र, लक्षणीय आदिवासी लोकसंख्या, भातशेतीवर आधारित पर्जन्याश्रयी पिके, डाव्या विचारसरणीचा जहालमतवाद व्यापणारा सीमा भाग यांमुळे या प्रदेशाच्या कृषिविषयक विकासासाठी विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पूर्व विदर्भ प्रदेशात गडचिरोली/सिंदेवाही येथे एक नवीन कृषि विद्यापीठ स्थापन करण्याबाबत आम्ही शिफारस केली आहे.

(ड) कृषि महाविद्यालये व तंत्रनिकेतन :

फार मोठ्या कृषी क्षेत्रासाठी मनुष्यबळ निर्माण करण्याकरिता प्रत्येक तालुका स्तरावर एक कृषि महाविद्यालय आणि एक लाख लोकसंख्या असलेल्या गावांच्या समुहामध्ये एक कृषि तंत्रनिकेतन असणे देखील अत्यावश्यक आहे.

८.१७.१ कृषि संशोधन

संशोधनाचा भर अधिकतर नैसर्गिक संपत्ती व्यवस्थापन (जमीन, पाणी, हवामान) आणि प्रदेश विशिष्ट विक्रेय वस्तु विकास दृष्टिकोन यांवर असला पाहिजे. विदर्भात मोठे पर्जन्याश्रयी क्षेत्र आहे आणि कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, धान, फळे व भाजीपाला यांसारखी प्रमुख पिके आहेत. याशिवाय उत्पादन-प्रक्रिया व खरेदी विक्री या प्रश्नांशी संबंधित अद्ययावत संशोधनविषयक पायाभूत सुविधा आवश्यक असणाऱ्या दूध, कुक्कुटपालन, व गोडया पाण्यातील मासे या प्रमुख विक्रेय वस्तु देखील आहेत. मराठवाडयात कापूस, सोयाबीन, तूर, सुदान गवत, आंबा, लिंबु, डाळिंब,दूध आणि गोड्या पाण्यातील मासे या प्रमुख विक्रेय वस्तु आहेत. पश्चिम महाराष्ट्रात फळे, फुले, लहान पशू, कुक्कुटपालन आणि कोकणात काजू, मसाले, सागरी मासे ही प्रमुख संशोधनाची क्षेत्रे असून त्यामुळे प्रदेशातील क्षेत्राचा विकास सुकर होईल. पशुधन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय या क्षेत्रातील संशोधनाचे बळकटीकरण करण्याची गरज आहे. याशिवाय सर्व प्रदेशांमध्ये कृषि विकासास चालना देण्यासाठी विक्रेय वस्तु विशिष्ट प्रक्रिया संशोधन केंद्रे, कृषी यंत्रसामग्री संशोधन व सेवा केंद्रे आदिवासी कृषि संशोधन केंद्रे, सेंद्रीय शेती संशोधन केंद्रे याची गरज आहे.

८.१७.२ महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद

लोकसंख्या व क्षेत्र पाहता महाराष्ट्र राज्याने कृषिक्षेत्र मोठया प्रमाणात व्यापले आहे. म्हणून कृषि व्यवसाय हा किमान पुढील दोन दशकांसाठी ग्रामीण लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन राहणार आहे. म्हणून, राज्याने संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण व विस्तार याबाबत अधिक संस्थात्मक सहाय्य देऊन शेतीस पाठबळ दिले पाहिजे. आम्ही, भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या धर्तीवर महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद स्थापन करण्याची शिफारस करतो. राज्यात सध्या चार कृषि विद्यापीठांच्या कार्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद आहे. या संस्थेने फारच मर्यादित मनुष्यबळ असतानाही चार कृषि विद्यापीठांच्या विद्याविषयक बाबींमध्ये समन्वय साधण्याचा तिचा हेतू साध्य केला आहे.

दोलायमान कृषि क्षेत्रासाठी कृषिविषयक संशोधन, शिक्षण व विस्तार संरचनेचे नियोजन व विकास करण्याच्या अनिवार्यतेसह **महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या जागी महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद** स्थापन करण्यात यावी. महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद ही, पिके, फलोत्पादन, कृषि अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, पशुधन व मासे या उपक्षेत्रातील विशेषज्ञांखेरीज संशोधन, शिक्षण व विस्तार व्यवस्थापनातील विशेषज्ञांचे पाठबळ असलेली **विख्यात कृषिशास्त्रज्ञ/विद्यैकनिष्ठ प्रमुखपदी** असलेली स्वायत्त संस्था असावी. महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेकडे, राज्यातील कृषि संशोधनाच्या विकासात प्रादेशिक समतोल राखण्याचे अनिवार्य कार्यसुध्दा असावे. राज्यातील सर्व कृषि आणि पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठे संशोधन व शिक्षणासाठी महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेशी संलग्न असावीत. महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेच्या नियामक मंडळात सर्व तीनही प्रदेशांना प्रतिनिधित्व असावे आणि मुख्यमंत्री अध्यक्ष असलेल्या या मंडळात कृषि, सहकार, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन आणि पाटबंधारे मंत्री हे सदस्य असतील. वरील मंत्रालयातील मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेल्या वरिष्ठ मंत्र्याने महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेचा उपाध्यक्ष म्हणून काम करावे. नियामक मंडळात २ वर्षांसाठी प्रत्येक प्रदेशाच्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी देखील असावेत आणि सर्व कृषि व पशुविज्ञान विद्यापीठांचे कुलगुरू नियामक मंडळाचे सदस्य म्हणून असावेत.

असे प्रस्तावित करण्यात येते की, महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेची स्थापना करण्यासाठी रु. ५०० कोटी इतके अनुदान देण्यात येईल. महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेचे कार्यालय राज्याच्या मध्यवर्ती भागात शक्यतो औरंगाबाद येथे (मराठवाडा) असेल.

८.१७.३ प्रस्तावित नवीन कृषि संशोधन केंद्रे :

- कृषि प्रक्रिया संशोधन केंद्रे (विक्रेय वस्तुंवर आधारित) – **प्रादेशिक**

- कृषि यंत्रसामग्री संशोधन केंद्रे (कृषि यांत्रिकीकरण संस्था) – **प्रादेशिक**
- सेंद्रीय शेती संशोधन केंद्रे – **प्रादेशिक**
- **मराठवाडा:** तूर, मिलेट व कापूस तंत्रज्ञान संशोधन केंद्र
- **विदर्भ:** धान, कडधान्ये, कापूस संशोधन केंद्रे.
- **कोकण:** काजू संशोधन केंद्र
- **खानदेश:** केळी संशोधन केंद्र
- **आदिवासी शेती संशोधन केंद्र:** नंदूरबार, मेळघाट, किनवट, गडचिरोली,जव्हार

८.१७.४ भारतीय कृषि संशोधन परिषदेने राज्यामध्ये केलेले संशोधन

भारतीय कृषि संशोधन परिषदेने राज्यात पुढील विशेष संशोधन संस्था स्थापन केल्या आहेत. महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेने राज्याच्या हितासाठी स्थानसापेक्ष संशोधनासाठी समुचित प्रदेश विनिर्दिष्ट करार करून त्याद्वारे या संस्थांशी अनुबंध विकसित करावे. विद्यापीठांद्वारे भारतीय कृषि संशोधन परिषदेचे आणि महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेचे संयुक्त संशोधन व विकास कार्यक्रम, औपचारिकपणे आयोजित करता येतील. भारतीय कृषि संशोधन परिषदेने आणि महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेने त्यांच्या संस्थांच्या विशेषीकरणाच्या संबंधित क्षेत्रांमध्ये सामाईक व सहभागी संशोधन कार्यक्रम विकसित करावेत.

एक. केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

दोन. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई

तीन. राष्ट्रीय अजैविक दाब व्यवस्थापन संस्था,माळेगाव,बारामती

चार. राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन केंद्र, नागपूर

पाच. राष्ट्रीय द्राक्षे संशोधन केंद्र, पुणे

सहा. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर

सात. राष्ट्रीय मृद सर्वेक्षण व भूमिवापर नियोजन केंद्र, नागपूर

आठ. कांदा व लसूण संशोधन संचालनालय, राजगुरुनगर, पुणे

याशिवाय जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) आणि वसंतदादा साखर संस्था, या संस्था जल आणि ऊस संशोधनात कार्यरत आहेत.

येणाऱ्या दशकांमध्ये कृषीक्षेत्रास गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागेल, म्हणून उद्‌भवणाऱ्या समस्यांबरोबर मार्गक्रमण करण्यासाठी प्रदेशामध्ये शाश्वत अन्न, पोषण आहार व पर्यावरणविषयक सुरक्षा यांसाठी राज्य कृषि विद्यापीठांचे आणि इतर प्रादेशिक संशोधन संस्थांचे बळकटीकरण करण्याची गरज आहे.

८.१७.५ राज्य कृषि विद्यापीठांचे आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांचे बळकटीकरण करणे :

कृषि विद्यापीठांना शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यक्रमांसाठी खूप कमी कार्यसंबद्ध अर्थसंकल्प आहे. शेतीच्या प्रादेशिक संशोधनविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी अद्ययावत सुविधा निर्माण करण्याबाबत विशेष अनुदाने देण्यात आली पाहिजेत. **प्रत्येक कृषि विद्यापीठ आणि महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ यांना, शिक्षण व**

संशोधनासाठी अद्ययावत पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता रु. १०० कोटी इतके विशेष विकास अनुदान देण्यात येईल.

८.१७.६ कृषि विस्तार सेवा

कृषि विस्तार सेवा हा कृषि मूल्य साखळीतील कमकुवत दुवा आहे. विस्तार कार्यकर्ते सुरुवातीला कृषिविषयक सेवांचे काम करीत होते आणि सध्या अधिक करून, विकासविषयक कामे व प्रकल्पांचे कार्यान्वयन यांमध्ये गुंतलेले आहेत. नवीन कृषिव्यवस्था ज्ञानाधिष्ठित आहे आणि त्यासाठी विशेष प्रशिक्षण व कौशल्ये आवश्यक आहेत. शेतकऱ्यांपर्यंत हे ज्ञान पोचविण्यासाठीच्या विस्तार कामांचा अभाव आहे. शेतीच्या नवीन पध्दतींचा अंगीकार करण्यासाठी आजच्या शेतकऱ्याला नवीन तंत्रज्ञान अवगत असले पाहिजे व कृषिविषयक नवनवीन तंत्रे असलेल्या धोरणांची माहिती असली पाहिजे. शेजारील राज्यात **'कृषि महोत्सव'** सारख्या विद्यापीठातील (शेती) शास्त्रज्ञ, कृषि विभाग, शासकीय अधिकारी वर्ग, राजकीय नेते यांच्याद्वारे चालविण्यात येणारा प्रत्येक गावाचा अंतर्भाव असलेला एका महिन्याच्या विस्तार कार्यक्रमामुळे तेथील कृषिविषयक प्रगतीवर गेल्या चार वर्षांत बराच प्रभाव पडला आहे. पुढील उपक्रम व धोरणे राज्यातील विस्तार कार्यक्रमास चालना देतील.

८.१७.७ जिल्हा विस्तार सेवा युनिटे स्थापन करणे,

जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी, शेतीचे यांत्रिकीकरण, कृषि संस्करण, मृद-जल संधारण, कृषिविद्या, फलोत्पादन, कृषि विस्तार, पशुधन, मत्स्यव्यवसाय, इत्यादीमधील विशेषज्ञ असलेले तसेच प्रत्येक जिल्हयांपर्यंत पोहोचण्यासाठी पायाभूत सोयी सुविधा असलेले जिल्हा विस्तार सेवा युनिट असावे. या युनिटांनी प्रदर्शने, सविस्तर भेटी यांमार्फत,नवनवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सेवांचा वापर करून, धार्मिक नेत्यांमार्फत गावामध्ये ई-कृषि सेवा सुविधा उपलब्ध करून आणि माहितीचा प्रसार करण्यासाठी इतर अनेक अभिनव कार्यक्रम करून जागरूकता निर्माण करावी. जिल्हा विस्तार सेवा युनिटामध्ये २-३ प्रमुख सदस्य असावेत व बाकीच्या तज्ज्ञांना कंत्राटी तत्त्वावर घेता येईल. कार्यालये, वस्तुसंग्रहालये, तंत्रज्ञान पेढया, फिरती सेवा वाहने, आणि अन्य सहाय्यभूत सेवा यांसह जिल्हा स्तरावरील पायाभूत सेवा सुविधा निर्माण करण्यात याव्यात. जिल्हा विस्तार सेवा युनिटे कार्यक्रमांचे त्रैमासिक संनियंत्रण करण्यात यावे व कृषि विद्यापीठाच्या नियंत्रणाअंतर्गत त्याचे कार्य चालविण्यात यावे. प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा विस्तार सेवा युनिटे स्थापन करण्यासाठी रु. ५० कोटी रक्कम लागेल असा अंदाज आहे. या युनिटांमुळे राज्यात कृषिविषयक विस्तार सेवांचे एक नवीन दालन खुले होणार आहे.

८.१७.८ विकासासाठी नवीन पध्दतीची शेती

नवीन कृषि तंत्रज्ञान व नावीन्यपूर्ण प्रगत तंत्रज्ञान पध्दतीच्या वाटेवर असून त्याचा विपुल आर्थिक व सामाजिक फायद्यासाठी प्रसार होण्याची गरज आहे.

प्रादेशिक शक्तीस्थाने

विदर्भ क्षेत्राकडे राज्य क्षेत्राचा मोठा भाग आहे आणि तांदूळ, कापूस, सोयाबीन, कडधान्ये व तेलबिया यांचे उत्पादनही येथे मोठया प्रमाणात आहे. विशेषकरून जवळपास खरीपाच्या तांदळाखाली ४८ टक्के क्षेत्र व ३९ टक्के उत्पादन कापसाखाली ३८ टक्के क्षेत्र व ३३ टक्के उत्पादन, सोयाबीनखाली ५७ टक्के क्षेत्र व ५२ टक्के उत्पादन कडधान्यांखाली ४० टक्के क्षेत्र व ४० टक्के उत्पादन, तेलबियांसाठी ४६ टक्के क्षेत्र व ४६ टक्के उत्पादन आहे. पश्चिम विदर्भातील माती सुपिक असून, तेथे पाऊसही चांगला पडतो. येथे वैविध्यपूर्ण फळे, भाजीपाला, पशुखाद्य व दुग्धव्यवसाय यांची क्षमता चांगली आहे. कापूस व सोयाबीन हया प्रमुख विक्रेय वस्तू असून त्यांच्यामध्ये कडधान्यांच्या गिरण्या वगळता, कापूस प्रक्रिया उद्योग व सोयाबीन असलेले खाद्यपदार्थ व तेल उद्योग यांच्या क्षमता

आहेत. पूर्व विदर्भात सर्वाधिक तांदूळ उत्पादन होते. त्यामुळे तांदळावर आधारित कृषि उद्योग सुरू करण्यासाठी ते महत्त्वाचे क्षेत्र आहे. मराठवाडयात कापसाखाली ३९ टक्के क्षेत्र व ४२ टक्के उत्पादन, सोयाबीनखाली ३० टक्के क्षेत्र व ३२ टक्के क्षेत्र उत्पादन (सोरघम), सुदानी गवताखाली *(खरीप+रब्बी)* ३५ टक्के क्षेत्र व ३५ टक्के उत्पादन, कडधान्याखाली ३२ टक्के क्षेत्र व ३५ टक्के उत्पादन व तेलबियांखाली ३२ टक्के क्षेत्र व ३२ टक्के उत्पादन होते. मराठवाडयात आंबे, डाळिंबे, केळी, हळद, कांदे, भाजीपाला व फुले अशी विविधता आणण्याची क्षमता मोठया प्रमाणावर आहे. कापूस, सोयाबीन व कडधान्य हया येथील प्रमुख विक्रेय वस्तू आहेत. कापूस प्रक्रिया उद्योग, सोयाबीन पासून बनविलेल्या खाद्यपदार्थांची प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग, निर्यात करण्याच्या दर्जाची द्राक्षे यांची येथे विपुलता आहे ऊस हे देखील महत्त्वाचे पीक आहे आणि साखर कारखान्यांमुळे याठिकाणी महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.

पश्चिम महाराष्ट्रात ५६ टक्के क्षेत्रावर सुदानी गवताचे (सोरघम) उत्पादन होते *(खरीप+रब्बी)*, ६२ टक्के क्षेत्रावर मका पिकतो *(खरीप+रब्बी)* तर ७७ टक्के क्षेत्र ऊसाखाली असून ८२ टक्के उत्पादन होते. द्राक्षे, डाळिंबे, केळी, पेरु, कांदा, भाजीपाला, दूध, पाळीव पक्षी या येथील प्रमुख विक्रेय वस्तू असून त्यांच्यामध्ये प्रक्रिया उद्योग व निर्यात यांची क्षमता जास्त प्रमाणात आहे. सिंचनसुविधा व उपक्रमशील शेतकरी ही पश्चिम महाराष्ट्राची ताकद आहे. कोकणात २८ टक्के क्षेत्र *खरीप* भातशेतीखाली असून ३८ टक्के उत्पादन होते. महाराष्ट्राची फळांची संपत्ती ही प्रामुख्याने कोकण (आंबा) व पश्चिम महाराष्ट्र (द्राक्षे, केळी व डाळिंब) येथे असून विदर्भामध्ये संत्र्यांचे उत्पादन जास्त होते. फलोत्पादन,उच्च मूल्य असलेल्या भाज्या, अंडी व दुग्धजन्य पदार्थ यामध्ये देखील पश्चिम महाराष्ट्र ताकदवान आहे; या प्रदेशात राज्याच्या दूध उत्पादनापैकी ६५ टक्के उत्पादन होते.

प्रादेशिक उत्पादनक्षमता असूनही, राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत प्रमुख विक्रेय वस्तूंची उत्पादकता कमी असल्याचे मानले जाते. या प्रदेशांमधील पायाभूत सुविधांची कमतरता हे विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण क्षेत्रांमधील प्रमुख कारण आहे. या प्रदेशांमधील शेती प्राधान्याने पर्जन्याश्रयी आहे. ज्या वर्षी उत्पादन चांगले झाले त्या वर्षी देखील मालासाठी चांगली कृषि बाजारपेठ उपलब्ध झाली नाही. यासंदर्भात आवश्यक ती क्षमता प्राप्त करण्यासाठी व ती स्थिर ठेवण्यासाठी आणि एकूणच कृषिविषयक आर्थिक समतोल साधण्यासाठी संभाव्य प्रदेश देखील सक्षम करण्याची गरज आहे आणि संबंधित उणिवा दूर करणे आवश्यक आहे.

८.१७.९ कंत्राटी शेती

अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी कंत्राटी शेती देखील लाभदायक ठरू शकेल. कंत्राटी शेतीला चालना देण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून कृषिक्षेत्राकडे खाजगी क्षेत्रातील व्यक्तींना वळविण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. खाजगी क्षेत्रातील व्यक्तींचा अंतिम बाजारपेठेबरोबर समन्वित दुवा असतो. कंत्राटी शेतीस चालना देऊन ती अंमलात आणल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला चांगले मूल्य मिळेल आणि किंमतीतील जोखीम कमी होईल. कंत्राटी शेतीला चालना देण्यासाठी जिल्हास्तरीय कंत्राटी शेती कक्ष स्थापन करण्यात यावा. ज्यायोगे शेतकरी व उद्योग यांचे हितसंबंध जपले जातील आणि कोणत्याही परिस्थितीत फलनिष्पती चांगलीच होईल. कंत्राटी शेतीवरील काटेकोर परंतु कार्यक्षम विनियम विकसित करण्याची गरज आहे.

या संपूर्ण प्रदेशात कंत्राटी शेतीचे फायदे मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. कृषि उत्पादनांवर पुढील प्रक्रिया करण्याची आवश्यकता असते तेव्हा कंत्राटी शेतीच्या संधी उपलब्ध होतात. विदर्भ व मराठवाडा येथे कापूस व सोयाबीन यांची मोठी बाजारपेठ आहे. त्याचप्रमाणे, पूर्व विदर्भात मोठया प्रमाणात भाताला बाजारपेठ मिळाली आहे. मिरची, हळद, आंबे, लिंबुवर्गीय फळे, आले, औषधी वनस्पती यांमध्ये कंत्राटी शेतीतील संधींकरिता विशेष क्षमता आहे. येत्या दशकांमध्ये, पिकांमध्ये अशी विविधता आणल्यास या व्यवस्था पिछाडीवर असलेल्या क्षेत्रांमध्ये कृषि विकासासाठी उपयुक्त ठरतील. सहकारी तत्त्वावर चालणारे ऊस व दूध प्रक्रिया हे उद्योग वस्तुत: कंत्राटी शेतीचाच एक प्रकार आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

कंत्राटी शेती ही, खाजगी कृषि व्यवसाय कंपन्या, कृषि उत्पादक व शासन अशी त्रिपक्षीय यंत्रणा असून ती खाजगी-खाजगी-सार्वजनिक-भागीदारी व्यवस्था असल्याचे म्हणता येईल. कंत्राटी शेतीमध्ये कृषिव्यवसायातील तंत्रज्ञान व भांडवल यांचा समावेश होतो. यामुळे अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला स्पर्धात्मक मूल्य मिळण्याचे अधिकार प्राप्त होतील. तसेच यामुळे शेतकऱ्यांचे किंमत व उत्पादनातील धोके कमी होतात. कंत्राटी शेतीमधील उपयुक्तता वाढविण्यासाठी संस्थात्मक व्यवस्थेच्या स्वरूपात योग्य वातावरण निर्माण करण्यात सार्वजनिक क्षेत्राची महत्त्वाची भूमिका असते. उदाहरणार्थ, सार्वजनिक क्षेत्र, नातेसंबंध परस्परांचा आदर करण्यास व पारदर्शकपणे वाटाघाटी करण्यास प्रोत्साहन देऊन कंपनी-शेतकरी यांच्यातील शाश्वत नात्याची खात्री करील.

या क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने चांगले वातावरण निर्माण करून व व्यवहारांवर होणारा खर्च कमी करण्यासाठी बाजारपेठेविषयीची माहिती देऊन कृषि उद्योग करणाऱ्या संस्था व शेतकऱ्यांना सहाय्यभूत ठरेल अशाप्रकारे सध्याच्या पुरवठा साखळीचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाचा हस्तक्षेप आवश्यक असेल.

८.१७.१० धोरणे

एक. कंत्राटी शेतीमधील हस्तक्षेपांचे संनियंत्रण, तपास, विश्लेषण करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी सार्वजनिक व खाजगी लाभार्थी (शासकीय अधिकारी, बाजारभाव संशोधक, शेतकरी, व्यापारी, प्रक्रिया करणारे, ग्राहक, स्वयंसेवी संस्था व इतर) अशा दोहोंचा समावेश असलेले एक कंत्राटी शेती केंद्र जिल्हा पातळीवर स्थापन करावे.

दोन. कंत्राटी शेतीमुळे परस्पर यशस्विता मिळवून देण्याची योग्य भूमिका खाजगी क्षेत्राला पार पाडावी लागेल.

तीन. सार्वजनिक-खाजगी भागीदारी पध्दती अंतर्गत गुंतवणूक करण्यासाठी खाजगी क्षेत्रांना प्रोत्साहन, नियामक आराखडयामधील बदल, कृषिउद्योग करणाऱ्या संस्थांना सुलभ व्हावे म्हणून, जमा रकमेविषयीच्या मानकांचे शिथिलीकरण आणि कंत्राटी शेती व्यवसायात खाजगी उद्योगांचा प्रवेश सुलभ व्हावा म्हणून कायदेविषयक कागदपत्रांचा आढावा, शेतकऱ्यांकरिता किंमत व उत्पन्न जोखीम यांचा समावेश करण्यासाठी खाजगी संस्थांना परवानगी देण्यासाठी तरतुदी करणे.

चार. राज्य कृषि विद्यापीठे व कृषि विभाग यांनी कंत्राटी शेतकऱ्यांच्या क्षमता उभारणीसाठी कृषि व्यवसाय संस्था व स्वयंसेवी संस्था यांना सहाय्य करण्याची गरज आहे.

पाच. कंत्राटी करारामुळे स्पर्धेमध्ये वाढ होते, शेतकऱ्यांच्या मालाकरिता निश्चितपणे बाजारपेठ मिळण्याची खात्री होते, पैशाचे हस्तांतरण शेतकऱ्यांकडे होते आणि मालाच्या विक्रीचे योग्य निर्णय घेण्यासाठी बाजारभावाविषयीची पुरेशी माहिती मिळते याची सार्वजनिक क्षेत्रांनी खात्री करावी.

सहा. कंत्राटी शेतीस चालना देण्यासाठी अनेक नवीन उपक्रम राबविणे शक्य आहे. शेतमालाला नाविन्यपूर्ण मूल्य मिळवून देणे, कंपनीच्या समभागातील वाटा मिळवून देणे, इत्यादीमुळे भागीदारीचा हा नवीन प्रकार अधिक मजबूत होईल.

सात. शेतमालाची प्रतवारी करण्यासाठी, त्याचे वर्गीकरण करण्यासाठी, तो पॅकबंद करण्यासाठी व साठविण्यासाठी पायाभूत सेवा सुविधा आवश्यक आहेत. अशा प्रकारच्या बाजारपेठेसाठीच्या पायाभूत सेवासुविधा उभारण्यासाठी सार्वजनिक क्षेत्र सहाय्य करू शकेल.

आठ. केंद्र सरकारने कृषि उत्पन्न निर्यातीसाठी स्थिर व पूर्वअनुमानित निर्यात आयात धोरण ठरविले पाहिजे. शेतकरी व निर्यातदार यांनी दर्जेदार उत्पादनांचे विश्वसनीय पुरवठादार असल्याच्या नावलौकिकासह निर्यातदार बाजारपेठेमध्ये प्रवेश मिळवणे व तो बळकट करणे आवश्यक आहे. म्हणून निर्यात धोरणामधील कृषि निर्यातीशी संबंधित वारंवार होणारे कोणतेही बदल टाळले पाहिजेत.

८.१७.११ एकात्मीकृत शेती पद्धती :

राज्यात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील व महाराष्ट्राच्या अवर्षण प्रवण प्रदेशातील एकूण शेतकऱ्यांच्या ८४ टक्के इतके लहान शेतकरी व अल्प भूधारक शेतकरी मुख्यत: पिकांवर व पशुधनावर अवलंबून असतात. जे हवामानाच्या लहरीपणामुळे बरेचदा प्रभावित होतात. विदर्भ व मराठवाड्यातील पीक पद्धतीवर कापूस, तृणधान्ये, तेलबिया व कडधान्ये यांचे वर्चस्व आहे. पीक उत्पन्नाच्या सुमारे ४० टक्के इतका खर्च मजूर, बी-बियाणे, शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री, रासायनिक खते, खते व सिंचन यावर होतो. शेतकऱ्याच्या कुटूंब खर्चाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक खर्च हा अन्नाखेरीज इतर गरजांवर होतो. लहान शेतकरी व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कुटुंबाला निव्वळ पिकांपासून मिळणाऱ्या उत्पन्नापासून कसेबसे कुटूंब चालवता येते. शेती हे मुख्यत्वेकरून उपजीविकेचे साधन म्हणून राहिले आहे आणि त्यामधून नेहमीच आर्थिकदृष्टया फायदा होतो असे नाही. प्रामुख्याने, पर्यावरण व अर्थव्यवस्थेच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी खात्रीलायक आणि स्थिर उत्पादनाची आवश्यकता आहे. कृषिविषयक उपक्रम व शेतीच्या लागवडीकरीता जमिनीच्या समस्तर विस्तारासाठी कोणताही वाव नसल्याने शेती संलग्न चांगल्या उपक्रमांची निवड करून, उपलब्ध साधनसंपत्तीचा यथोचित वापर करून, उत्पादकता वाढवून थेट विस्तार करावयाचा आहे.

एकात्मीकृत शेती पद्धतीचा मार्ग हा लहान व अल्प भूधारक शेतकऱ्यांना नफा वाढविण्यासाठी खूपच परिणामकारक ठरल्याचे सिद्ध झाले आहे. सुधारित दुग्धोत्पादन उद्योग, शेळीपालन, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, इत्यादी सारख्या शेती उपक्रमांचा विस्तार करून शिवाय कमी खर्चाचे तंत्रज्ञान व शेती उत्पन्नाची यथोचित किंमत देऊन त्यांचे उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे. प्रदेशाच्या प्रमुख पीक पद्धतीचा अंतर्भाव करून प्रदेशातील विशिष्ट शेती पद्धतीला चालना देण्याची गरज आहे. त्यामुळे शेतीच्या ठिकाणी ऊर्जात्मक कार्यक्षमतेमध्ये भरीव सुधारणा होण्यासाठी चांगल्या व संकल्पित पद्धतीला पुढे आणणे शक्य होईल. त्यामुळे बंदिस्त चक्रांच्या अंगिकाराच्या माध्यमातून पूर्वीच्या जादा शोषणाला मदत मिळेल.

८.१७.१२ सेंद्रीय शेती :

शेतीपासून ग्राहकांपर्यंतची संपूर्ण मूल्य शृखंला विकसित करण्यासाठी सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून एक पथदर्शी योजना तयार केली आहे. या धोरणात एकात्मीकृत पद्धत म्हणून सेंद्रीय शेती निश्चित केली असून यात शेतीसाठी स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर होतो आणि पिंकासाठी रसायनांचा वापर नाकारण्यात येतो. शेती करण्याच्या अशा पद्धतीमुळे, जमिनीचा दर्जा सुधारण्यास आणि वायु व जल प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. सेंद्रीय शेतीखालील एकूण क्षेत्र अद्यापही अल्प आहे. मात्र महानगरीय क्षेत्रात अशा शेती उत्पादनाला किफायतशीर मूल्य मिळत असल्यामुळे त्यात स्थिरपणे वाढ होत आहे. **असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्रातील सेंद्रीय शेतीखालील क्षेत्र हे ६.५ लाख हेक्टर इतके आहे.** (भारतीय उद्योग महासंघ २०१२) सेंद्रीय शेतीसाठी एकूण शेतजमिनीच्या १० टक्के इतकी शेतजमीन व सेंद्रीय शेतीच्या काही शेती पद्धतीच्या वापरासाठी शेतजमिनीच्या २५ टक्के इतकी शेतजमीन रूपांतरित करण्याचे या धोरणाचे उद्दीष्ट आहे.

सेंद्रीय शेती करताना सेंद्रीय पूरक द्रव्ये, जैवखते व सेंद्रीय उत्पादनासाठी स्थानिक बाजारपेठ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने आणि मार्गदर्शक तत्त्वे, प्रमाणन व निविष्टी खर्च याविषयी अगदीच कमी माहिती असल्याने शेतकऱ्यांना धास्ती वाटते. **जिल्हा स्तरावर एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याची गरज आहे जो सेंद्रीयशेतीच्या वाढीचे संनियंत्रण करील आणि बाजारपेठ, आवेष्टन, संस्करण व शीतगृह युनिटे निर्माण करण्यास सहाय्य करील.**आदिवासी क्षेत्रातील सेंद्रीय शेतीच्या सर्व प्रदेशातील संघटित गटांना, जिल्हा कक्षामार्फत प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

८.१७.१३ कृषि पर्यटन

कृषि पर्यटन हा एक पर्यायी शेती विषयक उपक्रम असून त्याची व्याख्या, शेतीच्या उत्पादनाला चालना

देण्यासाठी लोकांच्या करमणुकीसाठी व शिक्षणासाठी शेती करणाऱ्याकडून चालविण्यात येणारा एक व्यवसाय व त्याद्वारे अतिरिक्त शेती उत्पन्न निर्माण करणे अशी करता येईल.

सर्वसाधारणपणे, कृषि पर्यटन हा प्रामुख्याने शेतीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या एखाद्या क्षेत्राकडे किंवा क्षेत्रांकडे प्रवाशांना किंवा अभ्यागतांना आकर्षित करण्याचा व्यवसाय आहे. तथापि, कृषि पर्यटन हा, लहान प्रमाणातील, कमी प्रभाव असणारा आणि बऱ्याचशा प्रकरणात शिक्षणकेंद्री उद्योग आहे. महाराष्ट्रातील मोठ्या संख्येतील शेती ही जमीनमालकच करतात. यामुळे अनन्य व धंद्याच्या संधी अमर्यादित आहेत. कृषि पर्यटनाच्या अनेक कार्यक्रमात यशस्वी होण्यासाठी केवळ एक छोटासा शेतीविषयक कर्मचारीवर्ग आवश्यक आहे. उदाहरणार्थ, शेतांना भेटी, राहण्याची व खाण्याची सोय, कर्षित्र (ट्रॅक्टर)/बैलगाडी यातून फेरफटका, द्राक्ष, आंबे आणि इतर फलोत्पादन शेती, शेतीची गौण उत्पादने, पक्षी/पशु प्राणिसंग्रहालये असे इतर अनेक कार्यक्रम आणि मजुरी खर्चात अतिरिक्त छोटीशी गुंतवणूक करून चालविणे शक्य आहे.

नैसर्गिक परिस्थिती व कृषि उत्पादनांचे विविध प्रकार तसेच ग्रामीण परंपरांमधील विविधता व उत्सव यामुळे महाराष्ट्रामध्ये कृषिपर्यटनाचा विकास करण्याची क्षमता खूपच अधिक आहे. ४५ टक्क्याहून अधिक टक्के जनता ही नागरी क्षेत्रात राहते आणि त्यांना ग्रामीण जीवनाचा आनंद घ्यावासा वाटतो आणि त्यांना ग्रामीण जीवनाबाबत माहिती करून घ्यावीशी वाटते. महाराष्ट्रात कृषिपर्यटन विकासासाठी चांगली संधी आहे. परंतु, शेतकऱ्यांमध्ये या व्यवसायाविषयी कमी जागरूकता असणे ही एक समस्या आहे आणि महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांकडे आर्थिक पाठबळाची व योग्य त्या दृष्टिकोनाची समस्या आहे. म्हणून, कृषिपर्यटनाविषयी उद्‌बोधन करण्याची आणि काही नावीन्यपूर्ण कल्पना देण्याची गरज आहे. अनुदान व संस्थात्मक वित्त पुरवठा याद्वारे महाराष्ट्रातील कृषि पर्यटन उपक्रमांना अधिकतम शासन वित्तीय सहाय्य पुरवील.

८.१७.१४ आदिवासी शेती:

महाराष्ट्र हे भारताच्या भौगोलिक क्षेत्रापैकी ९.४ टक्के इतके भौगोलिक क्षेत्र असणारे देशातील तिसरे सर्वात मोठे राज्य आहे. राज्यात, शासनाने निश्चित केलेल्या ४८ अनुसूचित जमाती आहेत. केंद्र सरकारने निश्चित केलेले चार आदिम जनजाती गट सध्या राज्यात आहेत. ते पश्चिम, उत्तर पश्चिम, उत्तर मध्य व पूर्व क्षेत्रांमधील जवळपास १५ जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहेत. ते जिल्हे असे : सातारा, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, बुलढाणा, वाशिम, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व नांदेड. अनुसूची पाच मधील क्षेत्रे तसेच इतर क्षेत्रात देखील अनुसूचित जमातींचे रहिवाशी आहेत. परंतु ते प्रामुख्याने अनुसूची पाच मधील क्षेत्रात आहेत. आदिवासी विभागाने प्रामुख्याने अधिसूचित जनजाती क्षेत्रात आणि जवळपासच्या क्षेत्रात प्रकल्प कार्यालये स्थापन केली आहेत. ही क्षेत्रे डोंगराळ क्षेत्रे आहेत आणि तेथे चांगला पाऊस पडतो आणि ही क्षेत्रे वनांनी व्यापलेली आहेत. राज्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के इतकी आहे.

पारंपरिक वन उत्पादने, शेती आणि मर्यादित स्थलांतरण हे या संपूर्ण क्षेत्रातील उपजीविकांचे पारंपरिक पर्याय होते. परंतु मागील काही दशकात हे दृश्य झपाट्याने बदलले आहे. झाडे उन्मळून पडणे, खाण उद्योग, विकास प्रकल्प, संवर्धन प्रकल्प इत्यादीसारख्या विविध घटकांमुळे वने ओसाड झाली आहेत किंवा त्यांचा वापर करण्यावर बंदी घातली आहे. पुष्कळशी जमीन डोंगराळ असून मातीचा पोत चांगला नसल्यामुळे कृषि उत्पादकता खूपच कमी आहे. त्याचवेळेस, कृषिविषयक साहित्य आणि कृषिविषयक नवीन ज्ञान या क्षेत्रात पाहिजे त्या प्रमाणात पोहोचलेले नाही. कोणत्याही शैक्षणिक पार्श्वभूमीमधील युवकांसाठी कृषि, जल, पशुधन व वन यासंबंधित क्षेत्र विनिर्दिष्ट लघु पाठ्यक्रम तयार करणे विविध कृषि पारिस्थितिकी क्षेत्रांमध्ये जनजाती कृषि संशोधन केंद्रे जनजाती उपयोजने अंतर्गत मुख्य जनजाती जिल्ह्यांमध्ये उभारता येतील.

८.१७.१५ जमिनीची सुपीकता

महाराष्ट्रात मृद अपक्षरणामुळे, प्रतिवर्ष ७७५ दशलक्ष टन इतकी हानी होत असून यामुळे रु. १.८६ अब्ज कोटी इतक्या मूल्यांसह दरवर्षी एकूण अपक्षरण झालेल्या मातीची जवळपास ८ टक्के पोषकद्रव्ये (६२ दशलक्ष टन) नष्ट होत आहेत. यामुळे प्रतिवर्ष सुमारे २,५०० कोटी इतक्या रुपयांची कृषि उत्पादकतेची हानी होत आहे. (इंदिरा गांधी विकासविषयक संशोधन संस्था अहवाल, २००७) महाराष्ट्राचा जमिनीच्या सुपिकतेचा निर्देशांक, मध्यम नायट्रोजन, कमी फॉस्फरस व अतिशय जास्त पोटॅशियम घटक असा आहे (राज्य कृषि विभाग, २०११) विशेषत: झिंक (जस्त) ४५%, लोह २३%, मॅगनिज ३% आणि तांबे (कॉपर) २% इतकी सूक्ष्म पोषक द्रव्यांची कमतरता ही धोक्याची सूचना आहे. जेणेकरून या पोषक द्रव्यांच्या उपयोजनामुळे १०-१५ टक्क्यांनी उत्पादन खर्चात वाढ होईल. मातीतील ४ ग्रॅम/किलोग्रॅम सेंद्रीय कार्बन विचारात घेता, महाराष्ट्रात मृद अपक्षरणामुळे दरवर्षी ३.१ दशलक्ष टन सेंद्रीय कार्बनची हानी होते.

जमिनीचा कस कमी होण्याचे दुसरे मुख्य कारण हे विदर्भाच्या पूर्णा खोऱ्यातील आणि पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या लाभक्षेत्रातील लवणता व सोडिसिटी, कोकणातील क्षारता हे असून त्या जमिनींच्या पुन्हा लागवड्योग्य करणाऱ्या कार्यक्रमांची गरज आहे. शेतीसाठी जमिनीतील साधनसपंत्तीची कमतरता आहे आणि सद्यस्थिती असे दर्शविते की, जमिनीची सतत झीज होत आहे आणि तिचा कस कमी होतो आहे. तसेच याचा परिणाम उत्पादकतेची हानी व उच्च उत्पादन खर्च यावर होत आहे. जमिनीचा कस कमी होण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गुंतवणूक करणे आणि महाराष्ट्रातील विविध प्रदेशात पुन:संधारणाच्या उपाययोजना आवश्यक आहेत.

८.१७.१६ जमिनीच्या सुपीकतेबाबतच्या समस्या :

एक. जमिनीची सुपीकता पुन्हा प्राप्त करण्यासाठी, सर्व प्रदेशात दिसून आलेला ऑरगॅनिक कार्बनचा ऱ्हास आणि मुख्य व सूक्ष्म पोषकद्रव्यांची कमतरता याकरिता दीर्घकालीन व अल्प मुदतीचे कार्यतंत्र आवश्यक आहे.

दोन. हिरवळीचे खत करण्याच्या पध्दतीला चालना देणे, जाळण्याऐवजी पीक अवशेषांचे जमिनीत संमिश्रण करणे, रासायनिक खताच्या गांडुळ खताच्या स्थानिक उत्पादनास चालना देणे आणि जमिनीची सुपीकता पुन्हा प्राप्त करण्यासाठी शेणखताचा व रासायनिक खताचा संयुक्तपणे वापर करण्यास चालना देणे.

तीन. जी सेंद्रीय व असेंद्रीय पोषकद्रव्ये साधनसंपत्तीस एकत्रित करणारी, अशा उत्पादकतेशी तडजोड न करता जमिनीची सुपीकता राखणारी पोषाहार व्यवस्थापन ही एक सिध्द झालेली पध्दत असून त्यास चालना देण्यात येईल.

चार. खतांचे उच्चतर मूल्य, उपलब्धतेत अडचण, वापर करण्याची कमी कार्यक्षमता, विचारात घेऊन, पोषकद्रव्यांच्या सेंद्रीय साधनसंपत्तीचा वापर गरजेचा असून, यामध्ये बायोमास, पीक अवशेष, गांडूळ खत, जैव खत यांचा समावेश होतो आणि सेंद्रीय उत्पादनाच्या बाजारपेठेचा लाभ घेण्यासाठी पुढील १० वर्षात प्रमाणित सेंद्रीय शेतीखाली क्रमाक्रमाने किमान १०टक्के क्षेत्र आणण्याचे देखील ध्येय आहे.

पाच. खतांचा संयुक्तिक वापर करण्यासाठी मृदा चाचणीवर आधारित पोषक द्रव्ये व्यवस्थापन आवश्यक आहे. सर्व कृषि महाविद्यालये व प्रशाळा, स्थानिक विज्ञान महाविद्यालये यामध्ये मृदा चाचणी प्रयोगशाळांचे जाळे निर्माण करण्यात यावे. जमिनीबाबत सुपीकता कार्ड पुरविण्यासाठी आणि तसेच शेतकऱ्यांना पोषकद्रव्ये वापरण्याबाबत सल्ला देण्यासाठी अर्हताप्राप्त खाजगी उद्योजकांना सहभागी करून घेण्यात येईल.

सहा. उद्योगांना अर्थसहाय्य देण्याऐवजी शेतकऱ्यांना थेट अर्थसहाय्य देण्यात येईल.

८.१७.१७ मृद चाचणी प्रयोगशाळा

शेतकऱ्यांना मृद आरोग्य सेवा व मृद आरोग्यावरील सल्ला देण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये प्रमुख व सूक्ष्म पोषणद्रव्यांचे विश्लेषण करणाऱ्या सुविधेसह मृदचाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्याची गरज आहे. मृदचाचणी प्रयोगशाळेसाठी साधनांचे प्रदेशनिहाय वाटप तक्ता ८.६ मध्ये दिले आहे.

तक्ता ८.६
मृदचाचणी प्रयोगशाळेकरिता साधनांचे प्रदेशनिहाय वाटप

प्रदेश	वाटप
१	२
मराठवाडा	४०
विदर्भ	५५
उर्वरित महाराष्ट्र	७०
राज्य	१६५

स्रोत : कृषिविषयक उपगटाद्वारे पुरविण्यात आलेले

८.१७.१८ वने

राज्याचे अभिलेखित वनक्षेत्र ६१,९३९ कि.मी. आहे, जे भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के एवढे आहे. ऑक्टोबर-डिसेंबर २००८ च्या उपग्रह आकडेवारीच्या माहितीवर आधारित, राज्यातील वनाच्छादित क्षेत्र हे ५०.६४८ कि.मी. एवढे आहे. हे राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या (भारतीय राज्य वने अहवाल २०११) १६.५ टक्के आहे. सुमारे ३३ टक्के वनाच्छादित प्रमाणकांची तुलना केल्यानुरूप (प्रदेशाचे स्थलरूप व प्राकृतिक भूवर्णन यावर अवलंबून असलेले प्रमाणक) पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून ही खात्रीने सकल उणीव आहे. प्रदेशनिहाय कोकणात ४१.२ टक्के, पश्चिम महाराष्ट्रात ७.९ टक्के, मराठवाड्यात ३.० टक्के व विदर्भात २७.७ टक्के, एवढे क्षेत्र वनाच्छादित आहे. भौगोलिक क्षेत्राच्या ३० टक्क्यांहून अधिक वनाच्छादित असलेले जिल्हे गडचिरोली (७० टक्के), रत्नागिरी (५१.२ टक्के), सिंधुदुर्ग (४९.३ टक्के), रायगड (४०.० टक्के), चंद्रपूर (३५.६ टक्के), गोंदिया (३५.१ टक्के) व ठाणे (३०.५ टक्के) हे आहेत. ५ टक्क्यांपेक्षा कमी वनाच्छादित असलेल्या भयसूचक स्थितीतील ६ जिल्ह्यांसह संपूर्ण मराठवाडा जिल्ह्यात १० टक्क्यांहून कमी वनाच्छादित क्षेत्र असून विदर्भातील अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी वनाच्छादित क्षेत्र आहे. पश्चिम महाराष्ट्रात ५ टक्क्यांपेक्षा कमी वनाच्छादित क्षेत्र असलेले ४ जिल्हे आहेत. राज्य स्तरावरील मागील निर्धारणाच्या (ऑक्टोबर-डिसेंबर २००६) तुलनेत ४ कि.मी. वर्ग वनाच्छादित क्षेत्र कमी झाल्याचे दिसून येते.

वन धोरणामध्ये संवर्धन, संरक्षण यासाठी कायदे व साधनांचे एकूण व्यवस्थापन ही शासकीय उपक्रमशीलतेची महत्त्वाची बाजू आहे. महाराष्ट्र वन धोरण, २००८ मध्ये राज्यात ३३ टक्के वनाच्छादित क्षेत्राचा पल्ला गाठण्यासाठी जिल्हानिहाय योजना तयार करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. एकूण भौगोलिक क्षेत्रात किमान १५ टक्के हरित (झाडे) पट्ट्याचा समावेश असणे हे हरित शहराचे प्रमाणक आहे. शासकीय व्यवस्थापन, सामाजिक वनीकरण, वनशेती, कृषी-वनीकरण, समूह वनीकरण, नागरी वनीकरण, पडीत जमिनीवरील वनरोपण, जळाऊ लाकडांच्या वापरामध्ये कपात करणे इत्यादी उपक्रम आधीपासूनच राबविण्यात येत आहेत. ते प्रादेशिक परिस्थितीशी निगडीत वनाच्छादनाचे प्रमाण साध्य करण्यासाठी आणि पर्यावरणीय समतोल साधण्यासाठी या उपयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

कार्बन वायुचे कोठार आणि कार्बन वायु आपल्या नियंत्रणात ठेवणे यांमधील वनाची महत्त्वपूर्ण भूमिका, त्यांना मोठ्या प्रमाणात वनाच्छादित करण्याबरोबर प्रदेशांचे महत्व वाढवून हवामानातील बदल सौम्य करणाऱ्या कार्यतंत्राच्या मूळच्या टप्प्यावर घेऊन येते. संपूर्ण जगभरात जंगलांचे संवर्धन व विस्तार करण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता, भारत,

त्यांच्या कार्बन सेवेबद्दल राष्ट्रांकरिता आंतरराष्ट्रीय स्तरावर मोबदला देण्याकरिता पुष्टी देत आहे आणि त्यांच्या वनाच्छादित क्षेत्रात वाढ करील आणि संवर्धन करून, स्थिरीकरण करून आणि / किंवा हवामान बदलासंबंधातील संयुक्त राष्ट्र अभिसंधी आराखडा याच्या वृक्षतोड आणि ओसाड झालेल्या वनजमिनी यांच्यापासून होणारे उत्सर्जन कमी करणे, (आरईडीडी किंवा आरईडीडी- +) असेही संबोधले जाते, यांच्या विकसित देशांमधील वन निर्मूलनापासून उत्सर्जन कमी करण्यासाठीच्या कार्यसूचीच्या संदर्भात भारताकडून धोरण दृष्टिकोनातून समर्थन करण्यात आले, त्याला मोबदला दिलेले संवर्धन असे नामकरण करण्यात आले होते (किश्वान २००७). तथापि, प्रदेशाच्या वन कार्बन साठ्याचे नियमित अंतराने निर्धारण करणे व संनियंत्रण करणे आवश्यक होते. त्याच धर्तीवर, मोठे वनाच्छादित क्षेत्र असलेल्या, राज्यातील त्या प्रदेशांना, विशिष्ट प्रादेशिक वाटप प्रारंभ करता येऊ शकेल. (किश्वान जे. २००७, विकसित देशांमधील वन निर्मूलनापासून उत्सर्जन करणे : भारताचा प्रस्ताव. ओसाड झालेल्या वनजमिनी यांच्यापासून होणारे उत्सर्जन कमी करणे यावरील दुसऱ्या हवामान बदल संबंधातील संयुक्त राष्ट्र अभिसंधी आराखडा कार्यशाळेत मांडलेला : ७-९ मार्च २००७, क्विन्स (ऑस्ट्रेलिया) (http:unfccc.int/files/methodsand science/iuiucfapplication/pdf/07030kishwan.pdf)

८.१७.१९ मराठवाडा व पश्चिम विदर्भासाठी कृषि वनशास्त्र विभाग

मराठवाड्यामध्ये अगदीच कमी असे ३.५ टक्के वनाच्छादित क्षेत्र आहे. उर्वरित महाराष्ट्रात १५.८ टक्के वनाच्छादित क्षेत्र आहे तर विदर्भामध्ये २७.७ टक्के वनाच्छादित क्षेत्र आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी किमान ३३ टक्के वनाच्छादित क्षेत्राची आवश्यकता असते. तथापि, सर्व प्रदेशांमध्ये किमान आवश्यकतेपेक्षा कमी वनक्षेत्र आहे. तरी विदर्भात जास्त वनाच्छादित क्षेत्र असून, पश्चिम विदर्भात फक्त ३.५ टक्के वनाच्छादित क्षेत्र आहे. मागील दशकात विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र यांमध्ये वनाच्छादित क्षेत्रामध्ये घट झालेली दिसून आली. जरी वनविभाग लागवडयोग्य क्षेत्राच्या २१ टक्के क्षेत्र नियंत्रणाखाली ठेवत असले तरी, राज्यातील सरासरी वनक्षेत्र १७ टक्के आहे. यात असे दिसून येते की, वन विभागाच्या जमिनी प्रभावी वनाच्छादित क्षेत्राशिवाय आहेत. वनाच्या व्याप्ती क्षेत्रात प्रादेशिक असमतोल दिसून येतो आणि मराठवाडा व पश्चिम विदर्भाच्या इतर जिल्ह्यातील कमी वन व्याप्ती क्षेत्रामुळे जेथे वनाची पिकांसह संयोजनाने वाढ होऊ शकते तेथे कृषि वनशास्त्र कार्यक्रमावर भर देण्याची गरज आहे.

मराठवाडा, पश्चिम विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र या प्रदेशात अगदी कमी वनाच्छादित क्षेत्र आहे आणि यावर या क्षेत्रात कृषि वनास चालना देणे हा एकमेव उपाय आहे. कृषि वनशास्त्र संशोधनात संयोजी झाडे-पिके संयोजनाचे अनेक वर्धनक्षम पर्याय सुचविले आहेत. पिकांसह झाडांच्या जातींचे स्थान निश्चयन, विनिर्दिष्ट प्रचालन व त्याचे भूमितीशास्त्र मराठवाडा, पश्चिम विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राचा भाग असलेल्या अशा कमी वनक्षेत्रांमध्ये पर्याप्त झाडे आच्छादित करण्यात येत आहेत याची खात्री देईल. या प्रदेशांमध्ये संकेतमान्य वनाची निर्मिती व पुनर्निर्मिती अवर्धनक्षम दिसून आली, म्हणून या प्रदेशांसाठी स्वतंत्र कृषि वनशास्त्र विभागाची उभारणी करण्याचा सल्ला देता येईल. म्हणून, बांधांवर झाडांची लागवड आणि कृषि वनशास्त्र संशोधन कार्यक्रमाच्या शिफारशींनुसार संयोजी झाडे-पिकांचे संयुक्तपणे संयोजन करून वाढ करण्यास या प्रदेशांमध्ये चालना देण्यात यावी. **मराठवाडा, पश्चिम विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे यांमध्ये, पिकांना बाधा न आणता वनाच्छादित क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी कृषि वनशास्त्र विभाग असावेत. तीन प्रदेशांतील कृषि वनशास्त्र विभागासाठी निधीचे वाटप पुढील तक्ता ८.७ मध्ये दिले आहे.**

तक्ता ८.७
महाराष्ट्रातील वनांची स्थिती

प्रदेश	भौगोलिक क्षेत्र (चौ. मी.)	एकूण वनक्षेत्र (चौ.मी.)	भौगोलिक क्षेत्राची टक्केवारी	कृषिवनशास्त्र प्रचालनासाठी वाटप १० वर्षात १० टक्के लक्ष्यापर्यंत पोहचण्यासाठी प्रचालन
१	२	३	४	५
विदर्भ	९७४०४	२६९९०	२७.७१	१०*
मराठवाडा	६४८१३	१९२३	२.९७	१०
उर्वरित महाराष्ट्र	१४५४९६	२१७३३	१४.९४	५
एकूण	**३०७७१३**	**५०६४६**	**१६.४६**	**२५**

स्रोत : भारतीय वनराज्य अहवाल २०११
* पश्चिम विदर्भ

८.१८ सर्वसाधारण शिफारशी

झालेली चर्चा आणि या प्रकरणात अलिकडेच करण्यात आलेल्या शिफारशी याशिवाय समितीला असे वाटते की, आधारसामग्री गोळा करणे व ती साठवणे यासाठी कोणत्याही समर्पित अभिकरणाचे अस्तित्व नसल्याने आधारसामग्री शोधून काढणे प्रथमत: सोपे काम नव्हते. नेहमीची विभागीय माहिती संचयिका पर्याप्त नव्हती व बऱ्याच वेळा चुकीची होती. समिती कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, वनशास्त्र व इतर कृषिविषयक पैलू यांची माहिती गोळा करणारी व त्याचे परिरक्षण करणारे माहिती संचयिका स्वतंत्र अभिकरणाची जोरदारपणे शिफारस करीत आहे.

८.१८.१ महाराष्ट्र कृषि सांख्यिकी अभिकरण

कृषि व संलग्न विषयावरील, माहिती संचयिका बँकेकरिता माहिती गोळा करणे व तिचे परिरक्षण करणे यासाठी पर्याप्त कर्मचारीवर्गाच्या रचनेसह, कृषि, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाअंतर्गत, महाराष्ट्र कृषि सांख्यिकी अभिकरण या स्वतंत्र अभिकरणाची शिफारस केली आहे. या अभिकरणाला राज्याच्या कृषिविषयक नियोजन व विकास कार्यतंत्रासाठी आवश्यक असलेल्या विविध बाजूंवरील आधारसामग्रीचा चांगला लाभ मिळेल.

८.१८.२ महाराष्ट्र जमीन भाडेपट्टा अधिनियम

राज्यात अंमलात असलेला जमीन भाडे नियंत्रण अधिनियम, जेव्हा तो अधिनियमित करण्यात आला होता तेव्हा तो महत्वाचा होता आणि तो कास्तकाराला जमिनीची मालकी देण्यासाठी आपली भूमिका पार पाडीत होता. आता जमिनीचे खंडित तुकडे वापरण्याजोगे नाहीत आणि पुष्कळदा मापणीचे भाग पाडल्यामुळे बिनलागवडीचे राहतात. 'भाडे नियंत्रण अधिनियम' निरसित करण्यास आता फार वेळ झाला. आता शेतकऱ्यांना, मान्य केलेल्या अटी व शर्तींवर ठराविक कालावधीसाठी इतर शेतकऱ्यांच्या जमिनी लागवडीसाठी भाड्याने देण्यास मुभा देणारा नवीन, 'महाराष्ट्र जमीन भाडे नियंत्रण अधिनियम' अधिनियमित करण्याची वेळ आहे. या प्रकरणात, जमिनीची मालकी ठेवून घेतली जाते व मालकाला भाडे कराराद्वारे उत्पन्न मिळते.

८.१८.३ विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळणे

शेती करणे हा एक उच्च दर्जाचा व्यवसाय होता व शेतकऱ्यांना शेती करण्यात अभिमान वाटत असे. तथापि, मागील दशकात (१९९९-२००९) पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रकरणात वाढ झाल्याचे असे दिसून आले. अभ्यास असे दर्शवितो की, आत्महत्येची प्रमुख कारणे उत्पादनातील घट व कर्ज परत करण्यातील असमर्थता, लहान व मध्यम शेतकऱ्यांमधील अंतमुर्ख प्रवृत्ती, सलग ५ वर्षे सतत कमी पर्जन्यवृष्टी, उत्पादकतेत झालेली घट, अधिकतर पर्जन्याश्रयी शेतकऱ्यांना सिंचनाचा वापर करण्याचा अभाव अशी क्षेत्रे आत्महत्याविरहित शेती

करण्यासाठी बाधक ठरत होती. या प्रदेशाने, सहा जिल्ह्यांतील आत्महत्याप्रवण क्षेत्रात पॅकेजच्या वाटपाद्वारे केंद्र व राज्य शासनाचे लक्ष आधीच वेधले आहे. विदर्भात आत्महत्याविरहित दीर्घकाळ कायमस्वरूपी शेती करण्यासाठी पाटबंधारे प्रकल्प शीघ्रतेने पूर्ण करणे, कोरडवाहू जमिनीसाठीच्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे, नवीन शेतीविषयक उपक्रमाची सुरूवात करणे, पत व निविष्टी यामध्ये शिरकाव करण्यासाठी सुधारणा करणे, एकात्मीकृत शेती पद्धतीचा आराखडा लोकप्रिय करणे, कृषि आधारित उद्योगांना प्रोत्साहन देणे, रस्ते, परिवहन, दळणवळण, साठवण, बाजार इत्यादी आधारभूत पायाभूत सुविधा निर्माण करणे, हे काही मुख्य उपक्रम सुचविण्यात आले आहेत.

८.१८.४ शेजारी राज्यांची कृषि वाढीची गोष्ट

वाढीचा दर ५३% हून ११% इतका कमी करून प्रमाणबध्दतेकडे दुर्लक्ष करून कृषिवाढ स्थिर करण्यात आली. कृषि विस्तारावरील जोर बागायती, मुख्य पाच पिकांची (कापूस, भुईमूग, एरंडेल,आंबा, खजुराची झाडे) उत्पादकता वाढविण्यासाठीची धोरण नीती आणि जिरे, बडीशेप, इसबगोल, कांदा व बटाटा या नवीन जोरदार नगदी पिकांची सुरुवात केल्याने जबरदस्त नवीन वाढ झाली. बागायतीवर जोर दिल्यामुळे अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये फळे व भाजीपाला यांचे उत्पादन दुप्पट झाले.

वाढीच्या प्रतिमानामध्ये ८-१० तास अखंडित वीज पुरवठा, सहा लाख पाणी साठवण बंधाऱ्यांची निर्मिती, बीटी कापासाचे यश, कृषि उत्पन्न पणन समितीची सुधारणा, बाजारपेठ रस्त्यांचे जाळे, उच्च तंत्रज्ञान बागायती, यथार्थ शेती, चारा, ९८ लाख मेट्रिक टन दूध उत्पादनाची सहकारी दुग्धशाळा आणि विस्तार धोरण नीती म्हणून कृषि महोत्सव यांचा अंतर्भाव होतो. बी-बियाणे, खते, यांत्रिकीकरण व कीटनाशके यांसारख्या निविष्टिला जोडून मृद व जल हे लक्षकेंद्रित करणारी क्षेत्रे होती.

स्थानिक अधिकाऱ्यांकडे अधिकार सोपवून खुल्या वितरण व्यवस्था यंत्रणेसाठी शासन पुढाकार घेते. केंद्र सरकारच्या योजनेत सर्व वित्तीय योजनांचे संनियंत्रण करणे,सुसूत्रीकरण आणि कृषिच्या वाढीस उत्तेजन देण्यामध्ये सकारात्मक भूमिका बजावणाऱ्या, ज्ञान, नवीन बी-बियाणे आणि यंत्रे, वाढणारी उत्पादकता, पाण्याबाबत जागृती, ठिबक सिंचन इत्यादींवरील काही लक्ष्य कार्यक्रमांमध्ये मोठया संख्येतील योजनांचे रूपांतरण करून, समूह संपर्कात मदत केलेल्या प्रत्येक गावाचा समावेश करून एक महिन्यासाठी गतीशील कृषिमहोत्सव यासाठी शासन पुढाकार घेते. अकराव्या पंचवार्षिक योजना कालावधीमध्ये कृषि उत्पादन मूल्यात ५८ टक्क्यांनी वाढ झाली.

८.१८.५ प्रस्तावित प्रादेशिक गुंतवणुका

एकूण अतिरिक्त भांडवली रचनेशी संबंधित पुढील अंदाज (तक्ता ८.८) अधिक वाढीच्या मार्गाकडे नेण्याची गरज आहे. अर्थसंकल्पीय आधार आणि/किंवा अर्थसहाय्य म्हणून पुढील अंदाज करण्यात यावे. या गुंतवणूक खर्चातील खाजगी व सार्वजनिक अंशदानाचा हिस्सा हा, कार्यक्रम व शेतकऱ्यांचा सहभागाचे संकल्पन यानुसारच असेल.

तक्ता ८.८
कृषीवाढीस उत्तेजन देण्यासाठी पुढील ५/१० वर्षांकरिता प्रदेशनिहाय गुंतवणुका

(रूपये कोटीत)

विकास बाबी	विदर्भ	मराठवाडा	उर्वरित महाराष्ट्र	एकूण**	वार्षिक अर्थसंकल्प (वर्षे)*
१	२	३	४	५	६
संरक्षक जलसिंचन शेततळी + पंप+सूक्ष्म+जल सिंचन संच)	२५,४८५	१०,८५२	८,३२४	४४,६६१	४,४६६ (दहा)
सूक्ष्म जलसिंचन (ठिबक व तुषारक)	९१६	२,५०५	४,४४०	७,८६१	१,५७२ (पाच)
उद्यानविद्या अभियान	७५०	६२५	–	१,३७५	२७५ (पाच)
कापूस अभियान	१००	१००	–	२००	४० (पाच)
भात अभियान	१००	–	–	१००	२० (पाच)
कोरडवाहू जमीन कृषि विकास अभियान	५००	५००	२५०	१,२५०	२५० (पाच)
उच्च तंत्रज्ञानाची उद्यानविद्या	२,५००	२,५००	१,२५०	६,२५०	१,२५० (पाच)
कृषि विक्रेय वस्तु केंद्रे	७८०	६६०	१०२०	२४६०	४९२ (पाच)
महाराष्ट्र कृषि यांत्रिकीकरण अभियान	२,८७३	२,८१३	२००	५,८८६	१,१७६ (पाच)
तालुका बी बियाणे प्रक्षेत्रे	१२	८	१६	३६	१८ (दोन)
व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था	१००	१००	१००	३००	६० (पाच)
शेतात काम करणाऱ्या महिलांचे प्रशिक्षण संस्था	१००	१००	२००	४००	८० (पाच)
पूर्व विदर्भ कृषि विद्यापीठ, गडचिरोली	२००	–	–	२००	४० (पाच)
महाराष्ट्र कृषिविषयक संशोधन परिषद	१५०	१५०	२००	५००	१०० (पाच)
कृषि विद्यापीठ मजबूत करणे	१००	१००	१०० (कोकण)	३००	६० (पाच)
मृद तपासणी प्रयोगशाळा	५५	४०	७०	१६५	३३ (पाच)
वनीकरण/कृषि वनीकरण	१०	१०	५	२५	५ (पाच)
चारा व पशुधन सुधारणा अभियान	१५	१०	–	२५	५ (पाच)
जिल्हा विस्तार सेवा युनिट रू. ५० कोटी प्रत्येकी	५५०	४००	७००	१६५०	३३० (पाच)
एकूण (पूर्णांकात)	**४६,५३४**	**२६,६११**	**२९,२८७**	**७३,६४४**	**१०,२७२**

* वर्षांच्या संख्येसाठी वार्षिक अर्थसंकल्पीय वितरण (२/५/१०)

** आवश्यक एकूण अतिरिक्त गुंतवणुकीच्या ७१% गुंतवणूक पाण्यासाठी आहे (संरक्षक सूक्ष्म-जलसिंचन)

स्रोत : कृषि उपगटाने पुरविलेली

८.१९ धोरणांतर्गत उपक्रम व सुधारणा: सारांश

१. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी आम्ही प्रादेशिक जलप्रदाय अभियानाची शिफारस करतो. जलप्रदाय अभियानाने पुढील पाच वर्षांमध्ये कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची पूर्तता करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे.

२. शेत कोरडवाहू जमीन विकास अभियानाने, जलप्रदाय अभियानाशी एककेंद्राभिमुख होऊन, पुढील १० वर्षांमध्ये कोरडवाहू जमिनींच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी शिफारस केलेली आहे.

३. कापूस, तूर, सोयाबीन, हरभरा व भात ही सर्व प्रदेशात विशेषत: विदर्भ व मराठवाडयात मोठी पर्जन्याश्रयी पिके आहेत. येणाऱ्या ५ ते ७ वर्षांमध्ये त्याच्या उत्पादकतेत दुप्पट वाढ होणे आवश्यक आहे. या पिकांच्या उत्पादकतेची ही पातळी गाठण्यासाठी संरक्षक जलसिंचनाची गरज आहे. या पिकांसाठी 'संरक्षक जलसिंचना' ची पध्दत स्थापन करण्यासाठी तात्काळ पावले ऊचलण्याची गरज आहे.

४. विदर्भ व मराठवाडयासाठी कापूस अभियान व पूर्व विदर्भासाठी भातशेती अभियान सुरू करणे.

५. या मागास प्रदेशांतील बागायती शेतीचा विकास करण्यासाठी पुढील पाच वर्षांकरिता विदर्भ व मराठवाडा प्रादेशिक बागायत अभियानाची शिफारस केलेली आहे.

६. सर्वांगीण वाढीसाठी प्रदेशातील पशुधन व दुग्धव्यवसाय यांना स्थैर्य आणण्यासाठी पुढील ५ वर्षांकरिता विदर्भ व मराठवाडा चारा व पशुधन सुधारणा अभियानाची शिफारस केली आहे.

७. विदर्भातील व मराठवाडयातील चालू जलसिंचन प्रकल्प करारनिविष्ट कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने लक्ष देण्याची गरज आहे.

८. **नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (एन-सीएडीए)** लाभक्षेत्राचा सामाजिक-आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आंतर-शिस्तविषयक दृष्टिकोन, संरचना व मनुष्यबळ असावे असे आम्ही प्रस्तावित केले आहे. पाणी नियंत्रण, ते सोडणे, त्याचा वापर, पीक नियोजन, व पाणी वापर कार्यक्षमता व कालव्यांचे परिरक्षण ही कार्ये नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित केलीच पाहिजेत.

९. पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्यासाठी यथायोग्य प्रोत्साहनांसह ऊस, केळी, इतर फळे व भाजीपाला यांसारख्या जास्त पाणी वापर होणाऱ्या पिकांसाठी सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान बंधनकारक करण्यासंबंधीच्या आम्ही शिफारस करतो.

१०. उच्च तंत्रज्ञान बागायती शेती ही भांडवलधारित आहे आणि पुढील १० वर्षांमध्ये किमान २५००० हेक्टर क्षेत्र व्यापण्यासाठी तिला क्रमश: प्रोत्साहित करण्याची गरज आहे.

११. विविध हस्तक्षेप आणि धोरण उपक्रमशीलता यांची आम्ही शिफारस करतो, ज्याची अभियान पध्दती दृष्टिकोनामध्ये अंमलबजावणी करण्याची गरज आहे. कृषि व जलसंपदा विभागाद्वारे आवश्यक असलेल्या मनुष्यबळात वाढ करण्याचा असा दृष्टिकोन आवश्यक आहे. या दोन्ही विभागांनी, त्यांच्या विद्यमान मनुष्यबळात व मानवी संसाधनात वाढ करण्यासाठी गांभीर्यपूर्वक विचार करावा. विशेषत: मागास प्रदेशातील पडलेल्या विस्तार सेवांमध्ये तात्काळ स्वरूपात सुधारणा करण्याची गरज आहे.

१२. **महाराष्ट्र कृषि-अभियांत्रिकी कंपनी** ही, सूक्ष्म-जलसिंचन व यांत्रिकीकरण कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व योजना व विभाग यांचा अर्थसंकल्प एककेंद्राभिमुख करून व विलीन करून निर्माण करण्यात यावी. कार्यक्रमांची शास्त्रीयदृष्टया अंमलबजावणी करण्यासाठी कंपनीच्या प्रमुखपदी व्यावसायिक कृषि अभियंते व सहायक पथके असतील.

१३. **दुष्काळ प्रवण क्षेत्र :** दुष्काळप्रवण क्षेत्राचे मोठे भूभाग आहेत ते प्रदेशभर पसरलेले आहेत. या प्रदेशातील लोक जीवन जगण्यासाठी मोठया हालअपेष्टा सोसत आहे व अखंड झगडत आहे. या प्रदेशांसाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात यावी आणि संबंधित प्रदेशातील दुष्काळ प्रवण क्षेत्रास प्रमाणशीर प्रादेशिक वाटप करण्यात यावे. या क्षेत्रांसाठी पिण्यासाठी आणि संरक्षक सिंचनासाठी जलप्रदाय, पाणी ऊपसा (उध्दरण)पध्दती हे प्राथम्य कार्यक्रम आहेत. या क्षेत्रात प्रमाणबध्द खाजगी गुंतवणुका आकर्षित करण्यासाठी मत्सव्यवसाय तलावांसाठी दीर्घमुदती करार (किमान ५ वर्षे) इष्ट आहेत. मत्स्य बीज केंद्रांमध्ये खाजगी गुंतवणुका आकर्षित करणे आणि खोल समुद्रातील मासेमारीतील यांत्रिकीकरणासाठी प्रोत्साहने देणे हे इष्ट कार्यक्रम आहेत.

१४. संपूर्णपणे भिन्न कृषि हवामानाची परिस्थिती असलेल्या पूर्व विदर्भ प्रदेशाच्या विकासासाठी पूर्व विदर्भातील गडचिरोली, सिंदेवाही येथे नवीन कृषि विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१५. आधुनिक शेतीच्या मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी प्रत्येक तालुक्याकरिता एक कृषि महाविद्यालय आणि एक लाख लोकसंख्या असलेल्या गावांच्या एका समुहाकरिता सुध्दा एक कृषि तंत्रनिकेतन असणे अत्त्यावश्यक आहे.

१६. राज्य कृषि विद्यापीठांना संलग्न असलेल्या प्रत्येक प्रदेशांकरिता व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची शिफारस केली आहे. जेणेकरून त्यातून ४ आठवडे ते दोन वर्षे मुदतीच्या स्थल विशिष्ट व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे प्रवर्तन, व्यवस्थापन, दुरुस्ती व देखभाल, बी-बियाणे, रोपवाटिका, वृक्ष संवर्धन, हंगामोत्तर कापणी आणि प्रक्रिया, पशुधन व्यवस्थापन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, इतर उद्योग या क्षेत्रांतील विशेष कौशल्याची गरज असलेल्या आधुनिक शेतीच्या कुशल मनुष्यबळाची मागणी पूर्ण केली जाईल.

१७. प्रत्येक प्रदेशाकरिता कुशल महिला प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात यावी.

१८. आम्ही अशी शिफारस करतो की, **भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या** धर्तीवर राज्यात संशोधनाला चालना देण्यासाठी औरंगाबाद येथे प्रारंभी रू. ५०० कोटी एवढे अनुदान देऊन महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद स्थापन करण्यात यावी. या परिषदेने आधुनिक शेतीचे घटक आणि पध्दती यांवरील आधारभूत संशोधनावर प्रकाशझोत टाकावा. कृषि विद्यापीठांकरिता समन्वयक अभिकरण म्हणून काम करणारी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद ही, नवीन नियामक व्यवस्था आणि अधिष्ठान असलेल्या महाराष्ट्र कृषि संशोधन परिषदेमध्ये विलीन करण्यात यावी.

१९. संशोधन व शिक्षण याकरिता अद्ययावत पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी विद्यमान प्रत्येक विद्यापीठाला रु. १०० कोटी इतक्या रकमेचे विशेष अनुदान देण्यात यावे.

२०. आधुनिक शेतीच्या गरजा भागविण्यासाठी विशेष विस्तार सेवा पुरविण्याकरिता प्रत्येक जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी **जिल्हा विस्तार सेवा युनिटाची** निर्मिती करण्यात यावी. जिल्हा विस्तार सेवा युनिटाच्या कार्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या अंदाजपत्रकात सुमारे **५० कोटी** रुपये इतकी रक्कम राखून ठेवण्यात यावी.

२१. तक्ता ८.८ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. २४६० कोटी एवढया एकूण गुंतवणूकयोग्य साधनसंपत्तीतून प्रत्येक जिल्हयात, कृषिआधारित उद्योग/सेवा/कृषि विक्रेय वस्तु केंद्र उभारण्यात आले पाहिजे.

२२. प्रदेशांमधील कृषि उद्योगांच्या विकासावर भर देण्यासाठी सध्याच्या महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाऐवजी चार प्रादेशिक कृषि उद्योग विकास महामंडळांची (विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकण) निर्मिती करण्यात यावी.

२३. संशोधन व विकास, चाचणी, प्रशिक्षण व त्या त्या प्रदेशासाठी अनुरूप असलेली कृषि उपकरणे व अवजारे यांचे प्रात्यक्षिक यांकरिता रु. ५८८६ कोटी इतक्या आवश्यक असलेल्या एकूण गुंतवणूकयोग्य साधनसंपत्तीतून महाराष्ट्र कृषि यांत्रिकीकरण मंडळाच्या एकछत्री अंमलाखाली प्रत्येक राज्य कृषि विद्यापीठाला संलग्न असलेल्या कृषि यांत्रिकीकरण संस्थेची आणि प्रादेशिक कृषि यांत्रिकीकरण मंडळांची स्थापना करण्यात येईल.

२४. व्यक्तिगत, गट व सहकारी संस्था तत्त्वावर, नवीन सेवा प्रदात्यांना व्यवसायासाठी करमाफी आणि किंमतीत ३० ते ५० टक्के इतकी सवलत घेऊन गावांच्या समूहात ग्राहकानुसार भाडेतत्वावर शेती अवजारे देणाऱ्या केंद्रांना चालना देण्यात यावी.

२५. कृषि विक्रेय वस्तुंची हानी टाळणे, शेतकऱ्यांना अडत्यांकडून योग्य वागणूक मिळत असल्याची आणि त्यातून त्यांना किफायतशीर भाव दिले जात असल्याची सुनिश्चिती करणे यांसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमात यथोचित सुधारणा करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल. कृषि उत्पन्न बाजार समितीचे सर्व व्यवहार संगणकीकृत असावेत आणि त्याच दिवशी ऑनलाईन पध्दतीने प्रदानाची सुनिश्चिती करावी.

२६. शेतकरीभिमुख विमापत्रे तयार करणे, पीक व पशुंचा विमा सक्तीचा करणे, विम्याच्या हप्त्यासाठी अर्थसहाय्य यांसारखे काही धोरणविषयक उपक्रम आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची सामाजिक सुरक्षितता सुलभ होईल.

२७. वेळीच बी-बियाणे, खते व अवजारे खरेदी करण्याची किमान गरज भागविण्यासाठी आणि शेतीला एक किफायतशीर साहसी उपक्रम बनविण्यासाठी सर्व प्रदेशांमध्ये लागवड खर्चाच्या ७५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत पतकर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

२८. सेंद्रीय शेती पध्दतीला चालना देण्यासाठी आणि खतांवरील अर्थसहाय्याचा प्रश्न पुन्हा विचारात घेण्यासाठी, अनुरूप दर्जेदार खतांचा विकास त्याचबरोबर सेंद्रीय पोषकद्रव्यांचा अधिकाधिक वापर यांसारखे काही प्रमुख धोरणात्मक उपक्रम सुरू करण्याची गरज आहे. तथापि, शेतकऱ्यांना वेळेवर घरपोच दर्जेदार खतांचा पुरवठा करणारे कार्यतंत्र विकसित करून सध्याच्या खतांची मागणी आणि पुरवठा यामधील तफावत दूर करण्याची गरज आहे.

२९. दर्जेदार बियाणांची स्थानिक मागणी पूर्ण करण्यासाठी तालुका बीज क्षेत्रे पुनरूज्जीवित करण्यात येतील.

३०. मनरेगाअंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम विशेषकरून पिकांच्या हंगामात शेतीची कामे करण्यात यावीत आणि इतर वेळी शेत रस्ते,मृद संधारणाची कामे आणि पाणी साठवण बंधारे यांच्याशी निगडित कामांना प्राधान्य देण्यात यावे.

३१. उत्पन्न वाढीसाठी आणि स्थानिक रोजगार निर्मितीसाठी प्रादेशिक प्रोत्साहने देऊन प्रादेशिक सामर्थ्यावर आधारित, गट शेती, कंत्राटी शेती, यांत्रिकी शेती, सेंद्रीय शेती, दर्जेदार शेती, संवर्धन शेती, एकात्मीकृत आदर्श शेती पध्दती, कृषि पर्यटन, विकेंद्रित शेती, सामुदायिक शेती, सौर शेती इत्यादी आधुनिक शेतीच्या कामांना चालना देण्यात येईल.

३२. शेतकऱ्यांना मृद चिकित्सा सेवा पुरविण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात मृद चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात येईल.

३३. राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १६.४६ टक्के इतके क्षेत्र राज्यात वनांनी व्यापले असून ते ३३ टक्के या आवश्यक असलेल्या मानकांच्या जवळपास निम्मे इतके आहे (भारतीय वन अहवाल, २०११ नुसार) पर्यावरणीय स्थैर्यासाठी मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या प्रदेशांमधील वन क्षेत्र वाढविण्याची कृषि-वनीकरण विभागाकडे संभाव्यक्षमता आहे.

३४. महाराष्ट्राच्या विभिन्न प्रदेशांमधील पीक पध्दतीचा विचार करता, पिकांना १९७९५७ दशलक्ष घन मीटर इतके पाणी लागते. सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करून हे प्रमाण ५१ टक्क्यांपर्यंत कमी करता येईल. प्रादेशिक संभाव्य क्षमतेनुसार जल साधनांच्या विकासाचा पूर्ण अभ्यास करण्यात येईल. पाणलोट, लहान पाटबंधारे, मध्यम पाटबंधारे प्रकल्पांचे लाभ जास्तीत जास्त क्षेत्रास आणि समुदायास देण्याची गरज आहे. म्हणून मोठया प्रकल्पांपेक्षा त्यांना अधिक प्राधान्य देण्यात येईल.

३५. तुटीच्या क्षेत्रास पाण्याचा प्रमाणशीर वाटा देऊन प्रादेशिक पाणी वापराचा पुन्हा विचार करण्याची गरज आहे.भूपृष्ठ जल, भूजल यांचा कार्यक्षम वापर आंतर नदी खोऱ्यातील पाणी तुटीचे क्षेत्र असलेल्या भागाकडे वळविणे, नगरपालिका मलजलाचे आणि औद्योगिक कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे पुनश्चक्रण यांसारखे काही धोरणात्मक उपाय, जलअंदाजपत्रक तयार करण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

८.२० काही सर्वसाधारण शिफारशी आणि निरीक्षणे

८.२०.१ कृषि-सेवा पुरवणारे गट

पारंपरिक शेतमजूर इतर कार्य क्षेत्राकडे स्थलांतरित झाल्याने, तसेच शेतमजूर ग्रामीण रोजगार हमी योजनेकडे वळल्यामुळे, शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांना यांत्रिकी सेवा पुरवून ही उणीव भरून काढण्याची

गरज आहे. ग्रामीण स्तरावरील युवकांच्या गरजांवर आधारित उपकरणे/अवजारे/यंत्रे खरेदी करण्यासाठी प्रोत्साहने देऊन त्यांच्या कृषि सेवा पुरवणाऱ्या गटांना चालना देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना कुळवणी, फवारणी, कापणी, सफाई, प्रतवारी, आवेष्टन, परिवहन, बाजाराची माहिती, ई-सेवा, विमा, वित्तपुरवठा इत्यादींसारख्या कामांच्या सेवा पुरविल्याने त्यातून मोठया प्रमाणावर स्वयंरोजगारक्षमता निर्माण होईल.

८.२०.२ कृषि विद्यापीठ, किंमती आणि विमा

कापूस, सोयाबीन, तूर आणि हरभरा ही पर्जन्याश्रयी प्रदेशातील विशेषत: पूर्व विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पर्जन्याश्रयी क्षेत्रे यांमधील प्रमुख पिके आहेत. शेतकऱ्यांच्या कापूस व इतर पिकांना मिळणारा भाव हा स्थिर नसल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत अनिश्चित असतो आणि ही बाब या प्रदेशांमधील क्लेशदायक परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. फळे, भाजीपाला आणि इतर विक्रेय वस्तुंना त्यांच्या मागणी पुरवठयानुसार बाजार व्यवस्थेकडून भाव दिला जातो. राज्य शासनाने, विपणनावरील निर्बंध उठवून शेतकऱ्यांच्या सामूहिक विपणनाच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले पाहिजे. भावी बाजारपेठांमध्ये शेतकऱ्यांच्या सहभागास उत्तेजन देण्यासाठी राज्य शासनास, वखार पावतीवर आधारित बँक पत वाढविता येईल आणि तारण गहाण ठेवल्या जाणाऱ्या कृषि मालासाठी अंशत: हमी देता येईल.

कृषि मालाच्या किंमतीमध्ये होणाऱ्या चढ उतारापासून शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी आधारभूत धोरणात्मक उपक्रमांची गरज असून, कृषि उत्पन्न बाजार समितीने कृषि मालाच्या हानीस प्रभावीरीत्या आळा घालावा आणि अडत्यांकडून शेतकऱ्यांना योग्य भाग मिळत असल्याची सुनिश्चिती करावी. सर्व कृषि उत्पन्न बाजार समितींच्या व्यवहाराचे संगणकीकरण करण्यात यावे, व्यवहाराची त्याच दिवशी ऑनलाईन पध्दतीने रक्कम चुकती केली जात असल्याची सुनिश्चिती करण्यात यावी. शेजारच्या राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी यशस्वीरीत्या संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. त्यामुळे ऑनलाईन कृषिमालाची आवक जावक नियंत्रित केली जाते आणि रकमा त्वरित चुकत्या करणे शक्य झाले असून अद्ययावत आधारदायी पायाभूत सुविधा पुरवून मालाची हानी केली जाते.

८.२०.३ बाजारवृत्त अभिकरण

मालाची विक्री केव्हा करावी याचा निर्णय करण्यासाठी हे अभिकरण अत्यावश्यक आहे. बाजारभावांचे कल आणि कृषि मालाची विक्री यांविषयी शेतकऱ्यांना सल्ला देण्यासाठी प्रत्येक प्रदेशामध्ये बाजारवृत्त अभिकरण स्थापन करण्यात यावे.

८.२०.४ धान्य कोठारे आणि शीत साखळी

महाराष्ट्रातील धान्य कोठारांच्या विभागणीवरून, एकूण क्षमतेच्या ५१ टक्के क्षमतेची ५२ टक्के कोठारे ही, उर्वरित महाराष्ट्राच्या १५ जिल्ह्यांमध्ये एकवटलेली आहेत, तर ४८ टक्के क्षमतेची ४८ टक्के कोठारे ही मराठवाडा व विदर्भातील केवळ १९ जिल्ह्यांमध्ये आहेत. मराठवाडा आणि विदर्भातील साठवण क्षमता वाढविण्यासाठी कोठारांचे भक्कम जाळे निर्माण करण्याची गरज आहे. फळे व भाजीपाला साठविण्यासाठी शीतगृहांची साखळी अत्यावश्यक आहे.

८.२०.५ विमा

हवामानातील बदल जैविक आणि अजैविक दाबाच्या परिस्थितीस कारणीभूत ठरत असल्याने, प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा येथील पर्जन्याश्रयी शेतीला आणि इतर सर्व प्रदेशांमधील दुष्काळ प्रवण क्षेत्रांना जोखीम पत्करावी लागते. या जोखीम प्रवण शेतीचे रक्षण करण्यास कोणतीही सुरक्षा यंत्रणा अस्तित्त्वात नाही. नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या हानीपासून रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना सामाजिक सुरक्षा पुरविण्याकरिता समुचित जोखीमरोधक विमा संरक्षण निर्माण करण्याची गरज आहे. पिके, हवामान, पशु इत्यादींकरिता असलेल्या विमायोजना या अजूनही बहुसंख्य

शेतकऱ्यांना माहिती नसून त्या शेतकऱ्यांना तितक्याशा अनुकूल दिसत नाहीत.

८.२१ जोखीमरोधक संलेख

शेतकरीभिमुख विमापत्रे निर्माण करणे, पीक व पशु विमा सक्तीचा करणे, हप्त्यासाठी अर्थसहाय्य देणे यांसारखे काही धोरणात्मक उपक्रम असल्यामुळे शेतकऱ्यांची सामाजिक सुरक्षितता सुनिश्चित होईल. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या हानीबद्दलच्या भरपाईच्या मागण्या यामुळे कमी होतील.

८.२२ खते आणि खतांचा वापर

खते हा सघन शेतीचा अत्यंत महत्त्वाचा घटक असून प्रदेशनिहाय खतांची गरज आणि उपलब्धता यात मोठी तफावत दिसून येते. याचा पिकांच्या उत्पादकतेवर अत्यंत गंभीर परिणाम होतो. ही तफावत भरून काढण्यासाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने दर्जेदार खतांच्या उत्पादनाचे निदेश द्यावेत. कमी प्रभाविता असलेल्या खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याची प्रवृत्ती आहे. खतांच्या वाढत्या किंमती आणि कमी प्रभाविता यामुळे तसेच शेतमालाच्या बाजारभावात बहुतकरून बदल होत नसल्यामुळे उत्पादन खर्च वाढतो. परिणामी, शेती व्यवसायात तोटा सहन करावा लागतो. म्हणून, दर्जेदार अनुरूप खतांच्या विकासाबरोबरच जास्तीत जास्त सेंद्रीय पोषकद्रव्यांच्या वापरामुळे संपूर्ण पोषकद्रव्य व्यवस्थापनाची व्याप्ती पुन्हा विचारात घेण्याची गरज आहे. ***विभिन्न पिकांच्या गरजेसाठी दर्जेदार अनुरूप खतांच्या विकासावरील कृषि संशोधनामुळे संतुलित पोषकद्रव्यांचे तंत्रज्ञान विकसित करता येईल. रासायनिक शेतीकडून, सेंद्रीय शेतीकडे वळण्यावर भर देऊन सेंद्रीय खते बी–बियाणे (निविष्टी) यांना चालना देण्यासाठी आणि खतांवरील अर्थसहाय्याच्या प्रश्नांचा पुन्हा विचार करण्यासाठी प्रमुख धोरणात्मक उपक्रम योजण्याची गरज आहे.***

रासायनिक कीटनाशकांचा वापर कमी करून हळूहळू जैविक–कीटनाशकांचा वापर करण्यास सुरूवात करण्याची गरज आहे आणि दर्जेदार जैविक उत्पादने घेण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन करून जैविक नियंत्रण उपाययोजना करण्यासाठी प्रामुख्याने पुढाकार घेण्याची गरज आहे. स्थानिक उपक्रम कौशल्य व पथसहाय्य यासाठी केलेल्या गुंतवणुकीमुळे स्थानिक पातळीवर जैव नियंत्रण करून जैविक कीटनाशके उपलब्ध होऊन त्यांचा सुलभतेने वापर करण्याचा मार्ग खुला होईल.

८.२३ मनरेगाअंतर्गत (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम) शेत रस्त्यांची आणि संरचनांची कामे

पिकांच्या सर्वोच्च हंगामाच्या कालावधीत, मनरेगा अंतर्गत (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम) विशेषकरून, शेतीची कामे केली जावीत आणि इतर वेळी त्याअंतर्गत शेत रस्ते, मृद संधारणाची कामे केली जावीत तसेच पाणी साठवण बंधारे यांसारख्या संरचनात्मक कामांना प्राधान्य देण्यात यावे.

८.२४ गट शेती

धारण जमिनींचे तुकडे पाडणे सतत सुरू असून २ हेक्टरपेक्षा कमी असलेल्या तुकडयांचा वार्षिक वृध्दि दर हा कोकणामध्ये १६.५ टक्के, पश्चिम महाराष्ट्रामध्ये १९.२ टक्के, मराठवाडयामध्ये १५.४ टक्के इतका आणि विदर्भामध्ये १५.२ टक्के इतका आहे. धारण जमिनी क्रमश: अकार्यात्मकतेसाठी जोपासण्यात येत आहेत. म्हणून, सामूहिक किंवा गट शेतीला उत्तेजन देण्याची गरज आहे. गट शेतीमध्ये सामुदायिकरीत्या कामे पार पाडणे, पीक पध्दतीचा सामूहिक निर्णय घेणे आणि शेतकरी गटाच्या सहभागाने विपणन करणे या बाबींचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी ऐच्छिक उपक्रम करावयाचे आहेत तथापि, या संकल्पनेला धोरणात्मक पाठबळ देण्याची आणि लहान शेतकऱ्यांनी लाभदायकता सुलभ होण्यास गट शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

❖❖❖

प्रकरण ९

औद्योगीकरणाचा प्रसार

९.० प्रस्तावना

भारतीय संघराज्यातील एक अग्रगण्य असलेले महाराष्ट्र राज्य, हे देशाचे 'आर्थिक व औद्योगिक सामर्थ्यशाली राज्य' म्हणून दूरवर ओळखले जाते. प्रामुख्याने मुंबई ही भारताची वाणिज्यिक व आर्थिक राजधानी असल्यामुळे आणि ठाणे-पुणे प्रदेशामधील औद्योगीकरणात लक्षणीय प्रगती झाल्यामुळे, महाराष्ट्र देशांतर्गत तसेच विदेशी गुंतवणुकीकरिता त्याचप्रमाणे मोठया व लहान उद्योगांकरिता नेहमीच सर्वाधिक पसंतीचे स्थान ठरले आहे. १५० वर्षांची जुनी खाजगी उद्योगांची परंपरा, तुलनेने अधिक चांगल्या पायाभूत सोयीसुविधा, दूरदृष्टी असणारे नेतृत्त्व, आणि सुरुवातीच्या जडणघडणीच्या वर्षांमधील प्रशासन, स्पर्धात्मक कार्यसंस्कृती इत्यादी प्रमुख घटकांपैकी काही घटक होते ज्यांमुळे महाराष्ट्र गुंतवणुकीचे अग्रगण्य ठिकाण ठरले आहे आणि भविष्यातील ५०० कंपन्या आणि इतर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगार बनले आहे.

पारंपारिकदृष्ट्या महाराष्ट्राचे औद्योगिक सामर्थ्य ***अभियांत्रिकी व मोटार उद्योग (ऑटोमोटिव्ह), रसायने, अन्न संस्करण व वस्त्रोद्योग यांसारख्या क्षेत्रात सामावलेले आहे. गेल्या दोन दशकात औषधनिर्माणविद्या, जैव-तंत्रज्ञान, जीवन-विज्ञान, माहिती व तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान साहयकारी सेवा, बी.पी.ओ., पर्यटन व आतिथ्य, किरकोळ विक्री, बँकिंग- वित्त-विमा, प्रसारमाध्यमे व करमणूक*** इत्यादींसारखी आधुनिक आणि/किंवा ज्ञानाधिष्ठित क्षेत्रे म्हणून ओळखली जाणारी क्षेत्रे यांची भर पडल्याने राज्याचा औद्योगिक पाया लक्षणीयरीत्या बदलला आहे.

सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योग राज्याच्या औद्योगिक अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याचा गुंतवणूक, अभिवृद्धी, रोजगार तसेच निर्यात यामध्ये फारच मोठा वाटा आहे. रत्ने व दागिने, तयार कपडे, पारंपरिक प्रक्रिया केलेले अन्न अशी निर्यात क्षेत्रे आणि अलीकडच्या वर्षातील माहिती व तंत्रज्ञान आणि वित्तीय सेवा यांनी राज्याच्या सर्वांगीण अभिवृद्धी व संपत्तीत लक्षणीयरीत्या भरच घातलेली आहे.

तथापि, गेल्या दोन दशकात भारतीय अर्थव्यवस्था विशेषकरून महाराष्ट्रात आणि खरेतर सर्वच राज्यात देशांतर्गत विनिमयमुक्त आणि खुली होत गेल्यामुळे औद्योगीकरणात मोठीच उलथापालथ झाल्याचे दिसून येते. **खाजगी गुंतवणुकीस राजकीय आश्रय देण्यात आल्यामुळे आज सर्वत्र औद्योगीकरणाच्या बदलत्या स्वरूपास चालना मिळाली आहे.** परिणामी, सर्व राज्यांमध्ये सध्या, देशांतर्गत किंवा विदेशी, मोठी किंवा लहान स्वरूपातील गुंतवणूक आकर्षून घेण्यासाठी व ती ***टिकवून*** ठेवण्यासाठी त्यांच्या त्यांच्यामध्येच तीव्र अशी चुरस निर्माण झाली आहे. त्याबरोबरच, अग्रगण्य सेवांची रचना पार बदलून टाकणारा गतिशील सेवा क्षेत्राचा दुसरा असा एक घटक अस्तित्त्वात आला आहे. माहिती तसेच संसूचना तंत्रज्ञानातील क्रांतीने विकासाच्या व रोजगाराच्या नव्या संधी खुल्या झाल्या आहेत.

९.१ मागे पडलेल्या प्रदेशांमध्ये उद्योगाचे प्रचालन

अभिवृध्दी कार्यक्रमासाठी अग्रेसर असलेल्या उर्वरित महाराष्ट्रासह महाराष्ट्र राज्यातील औद्योगीकरणामधील प्रगती असमान आहे. २००१ ते २०११ पर्यंतच्या अलीकडच्या काळात ज्यावेळी राज्याच्या औद्योगिक वाढीचा दर प्रतिवर्षी ९.८% इतका होता. त्यावेळी उर्वरित महाराष्ट्राचा वाढीचा दर प्रतिवर्षी १०.९% होता तर विदर्भ व मराठवाडा यामध्ये तो अनुक्रमे ८.५% व ८.१% इतका होता. वाढीतील हा भेदच राज्यात विकोपाला गेलेल्या प्रादेशिक असमतोलासाठीचे प्रमुख कारण आहे, व तो दूर करणे गरजेचे आहे.

अर्थातच मागास जिल्ह्यांमध्ये उद्योगांचे प्रचालन करणे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे आणि त्यासाठी अलीकडच्या उदारमतवादासह गेली कितीतरी दशके राज्य शासनाने मागास जिल्हयात आर्थिक प्रोत्साहनपर योजना आणि सवलती देऊन गुंतवणूका आकर्षून घेणे व औद्योगीकरणाचा प्रसार करण्याचा दृष्टीकोन स्वीकारला आहे. या धोरणामधील मुलभूत तत्त्वांमध्ये फेरफार न करता या धोरणांत ठराविक कालावधीनंतर सुधारणा करणे आवश्यक आहे.

बृहद प्रकल्पांच्या प्रचालनासाठी २००६ चे धोरण आणि २०१३ चे महाराष्ट्राचे नवीनतम औद्योगिक धोरण ही धोरणे सारत: आर्थिक सवलतींबाबत समान दृष्टिकोन ठेवून आखण्यात आली होती. आतापर्यंतच्या अनुभवातून या दृष्टिकोनामधला अपुरेपणा दिसून आला आहे आणि या मागे पडलेल्या प्रदेशांच्या औद्योगिक विकासाच्या प्रचालनासाठी नव्याने विचार करण्याची गरज आहे. मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ पुरविणे, अत्याधुनिक पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, उद्योजकतेस खतपाणी घालणे, धंदा करण्यावरील खर्च कमी करणे आणि अशाप्रकारे, तुलनात्मक फायदे व स्थानिक साधनसंपत्तीचा समुपयोग करणे या मुख्य मुद्यांचा पाठपुरावा केला पाहिजे.

९.१.१ औद्योगिक असमतोल

खाजगी गुंतवणुकीचा अंतर्वेशी प्रवाहाचा स्तर हा औद्योगिक वाढीचा प्राथमिक निर्णायक घटक आहे आणि हा स्तर पुढील भागात दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रदेशांमध्ये असमान आहे.

औद्योगिक उपक्रम प्रस्तावपत्रे, २०१२ च्या अलीकडच्या माहितीनुसार, गेल्या दशकात, पुणे, रायगड, रत्नागिरी आणि ठाणे या चार जिल्हयांत महाराष्ट्रामधील गुंतवणुकीच्या ५०% पेक्षा अधिक गुंतवणूक आणि पुणे, कोकण व नाशिक या तीन विभागामध्ये संपूर्ण गुंतवणुकीच्या ८०टक्क्यांपेक्षा अधिक गुंतवणूक झाल्याचे दिसते दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, आर्थिक प्रोत्साहने देऊनही, खाजगी गुंतवणुकीचा ओघ हा कोकण, पुणे आणि नाशिक या तीन विभागांमध्ये मोठया प्रमाणात एकवटलेला आहे, तर औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती यासारख्या विभागांमध्ये अत्यंत नगण्य गुंतवणूक झाली आहे.

"बृहद प्रकल्पांच्या" बाबतीतले चित्र काही फारसे वेगळे नाही. "३१ डिसेंबर", २०१२ रोजी अशा ११४ युनिटांपैकी ९० युनिटे पुणे, नागपूर, व नाशिक या शहरात स्थित आहेत आणि रोजगार सुध्दा भौगोलिकदृष्टया एकवटलेला आहे. आतापर्यंत मंजूर झालेल्या ३५० बृहद प्रकल्पांपैकी ८५ टक्के प्रकल्प कोकण प्रदेशात आणि पुणे व नागपूर यासारख्या शहरात आहेत आणि ६० टक्के रोजगार निर्मिती पुणे, ठाणे, कोल्हापूर व नागपूरचा काही भाग या चार जिल्हयात झाली आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमध्ये (एमएसएमई) सर्व युनिटांपैकी ५० टक्के इतकी युनिटे नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, पुणे व ठाणे या पाच जिल्हयांत स्थित आहेत. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील संयंत्रे व यंत्रसामग्री यांतील रुपये १६००० कोटींच्या एकूण गुंतवणुकीपैकी ७५ टक्के गुंतवणूक ही मुंबई, ठाणे, पुणे व औरंगाबाद या चार जिल्हयात करण्यात आली आहे तर एकूण रोजगाराच्या २/३ इतका दोन दशलक्ष रोजगार मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर व औरंगाबाद या महाराष्ट्राच्या सहा जिल्हयांमध्ये निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र राज्यात, काही जिल्हयांमध्ये व प्रदेशांमध्ये औद्योगिक घडामोडी झाल्या, त्याबाबतीत मोठया प्रमाणावर 'विचार मंथन' झाले. मागील ५ दशकांतील दृष्टिकोन पाहता, आज मुंबई-ठाणे-पुणे पट्यापलिकडे झालेला उद्योगांचा उदय कोणाच्याही दृष्टीस स्पष्टपणे पडू शकतो. वर नमूद केलेल्या सहाय्यकारी घटकांच्या उदयामुळे नाशिक, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, रत्नागिरी यासारखी अनेक नवी औद्योगिक केंद्रे सातत्याने स्थिरपणे उदयाला आलेली दिसतात. तथापि, ही वाढीची ही काही केंद्रे असतानासुध्दा, एकतर आंतरजिल्हा व आंतर- प्रादेशिक असमतोलाच्या अनुषंगाने परिस्थिती फारशी बदललेली नाही.

९.१.२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

राज्यामधील योजनाबध्द औद्योगिक विकासाकरिता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची भूमिका फार

महत्त्वाची आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारितेमधील औद्योगिक क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या उपक्रमांसाठी रस्ते, पाणी, वीज इत्यादींसारख्या आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुरवते. ३१ मार्च, २०१० पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामाची प्रगती तक्ता क्र.९.१ मध्ये दर्शविण्यात आली.

तक्ता ९.१
औद्योगिक, युनिटे, गुंतवणूक व रोजगार

अ.क्र.	प्रदेश	औद्योगिक युनिटे		गुंतवणुका		रोजगार	
		क्रमांक	टक्केवारी	रक्कम (रू. कोटीत)	टक्केवारी	क्रमांक (लाख)	टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८
१	उर्वरित महाराष्ट्र	२४७८६	७४.३	४०११२	७४.६	७.३७	८३.८
२	मराठवाडा	४४७९	१३.४	४३०३	८.०	०.५३	६.०
३	विदर्भ	४०९०	१२.३	९३७७	१७.४	०.९०	१०.२
४	राज्य	३३३५५	१००.०	५३७९२	१००.०	८.८०	१००.०

स्रोत : महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण, २०११-१२

तक्ता ९.१ मध्ये ३१ मार्च, २०१० पर्यंत राज्याच्या तीन प्रदेशांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेली कामे दर्शविण्यात आली आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात एकूण ३३३५५ एवढी औद्योगिक युनिटे उभारली होती. त्यापैकी ७४.३% एवढी युनिटे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात स्थित आहेत तर, मराठवाडा व विदर्भ येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक युनिटचे प्रमाण अनुक्रमे १३.४% व १२.३% इतके आहे.

या औद्योगिक युनिटांमधील एकूण गुंतवणूक रुपये ५३९७२कोटी इतकी होती. या एकूण गुंतवणुकीमध्ये तीन प्रदेशांचा हिस्सा पुढीलप्रमाणे होता : उर्वरित महाराष्ट्र (७४.६%); मराठवाडा (८.०%); विदर्भ (१७.४%); या औद्योगिक युनिटांमध्ये निर्माण झालेल्या रोजगाराच्या संबंधात (८.८० लाख) एकूण रोजगार निर्माण झाल्याचे व जास्तीत जास्त रोजगार हा उर्वरित महाराष्ट्रात निर्माण झाल्याचे आढळून आले होते. मराठवाडा व विदर्भाचा हिस्सा अनुक्रमे ६ % आणि १०.२% एवढा होता.

९.१.३ सहकारी औद्योगिक वसाहती

राज्यामधील रोजगाराच्या संधीमध्ये वाढ व्हावी याकरिता सरकारी औद्योगिक वसाहतीची स्थापना करून महत्त्वाची भूमिका बजावण्यात आली आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१० मधील सहकारी औद्योगिक वसाहतींची प्रगती तक्ता ९.२ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता ९.२
सहकारी औद्योगिक वसाहतींची प्रगती

अ.क्र.	प्रदेश	नोंदणीकृत		प्रत्यक्ष कार्यरत		कार्यरत युनिटे		रोजगार	
		संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	उर्वरित महाराष्ट्र	९६	६७.६	८१	८०.२	६१७४	८८.१	११५६१७	९३.३
२	मराठवाडा	२६	१८.३	१३	१२.९	४५५	६.५	४४६०	३.६
३	विदर्भ	२०	१४.१	७	६.९	३८०	५.४	३७९०	३.१
४	राज्य	१४२	१००.०	१०१	१००.०	७००९	१००.०	१२३८६७	१००.०

स्रोत : महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण, २०११-१२

तक्ता ९.२ असे दर्शवतो की, नोंदणीकृत असलेल्या एकूण औद्योगिक वसाहतींपैकी ६७.६% वसाहती उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये आहेत. त्यामानाने मराठवाडा आणि विदर्भामध्ये यांचे प्रमाण अनुक्रमे १८.३% आणि १४.१% इतके असून राज्याच्या मागे पडलेल्या प्रदेशामधील सहकारी औद्योगिक वसाहतींची अतिशय बिकट स्थिती दर्शविणारे आहे.

या औद्योगिक वसाहतीमधील प्रत्यक्ष काम करणाऱ्या युनिटांच्या या संख्येपैकी बहुतांश युनिटे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये (८०.२%) असल्याचे दिसून येते. मराठवाडा आणि विदर्भ या प्रदेशामध्ये, काम करणाऱ्या युनिटांच्या हिश्श्यांमध्ये अनुकमे १२.९% आणि ६.९% इतकी फारच मोठी घसरण झाली आहे. सर्व प्रदेशांमध्ये सहकारी औद्योगिक उपक्रमांद्वारे निर्माण करण्यात आलेल्या रोजगारांचे वाटप उर्वरित महाराष्ट्रासाठी ९३.३%, मराठवाड्यासाठी ३.६% आणि विदर्भासाठी ३.१% इतके असल्याचे आढळून आले.

९.१.४ विशेष आर्थिक क्षेत्राचा प्रादेशिक विस्तार

महाराष्ट्र शासनाने १० फेब्रुवारी, २००६ पासून, विशेष आर्थिक क्षेत्राशी संबंधित धोरण स्वीकारले आहे. राज्याचा आर्थिक विकास जलदगतीने होण्याबाबत हे धोरण अपेक्षित आहे. तक्ता ९.३ मध्ये दिनांक ३१ डिसेंबर, २०१० रोजी असल्याप्रमाणे राज्यात असलेल्या १४३ विशेष आर्थिक क्षेत्रांशी संबंधित माहिती दर्शविली आहे.

तक्ता ९.३
विशेष आर्थिक क्षेत्राचा प्रादेशिक विस्तार (२०१०)

अ.क्र.	प्रदेश	मंजुरी क्र.	अधिसूचित क्र.	प्रस्तावित मंजूर गुंतवणूक	अधिसूचित गुंतवणुका (रू.को.)	प्रस्तावित मंजूर रोजगार	अधिसूचित रोजगार (लाखांत)
१	२	३	४	५	६	७	८
१	उर्वरित महाराष्ट्र	१२१	४८	१७३५३८	६८४१५	५६.१८	१६.१७
		(८४.६)	(७६.२)	(९१.८)	(८८.७)	(८८.४)	(७७.७)
२	मराठवाडा	१२	७	३८५५	१७७५	१.५२	०.३१
		(८.४)	(११.१)	(२.२)	(२.३)	(२.४)	(१.५)
३	विदर्भ	१०	८	११५९४	६९४८	५.८६	४.३२
		(७.०)	(१२.७)	(६.०)	(९.०)	(९.२)	(२०.८)
	एकूण राज्य	**१४३**	**६३**	**१८८९८७**	**७७१३८**	**६३.५६**	**२०.८०**
		(१००)	**(१००)**	**(१००)**	**(१००)**	**(१००)**	**(१००)**

महाराष्ट्र २०१०-११ आर्थिक सर्वेक्षण स्रोत, महाराष्ट्र शासन, मुंबई- पृ.१०६ टीप : कंसातील संख्या एकूण टक्केवारी दर्शवते.

वरील तक्ता ९.३ वरून असे उघड होते की, १४३ विशेष आर्थिक क्षेत्र प्रस्तावांपैकी मराठवाडा आणि विदर्भामध्ये केवळ अनुक्रमे ८.४% आणि ७.०% प्रमाण असतानाच उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रस्ताव ८४.६% इतके आहे. त्याचप्रमाणे, अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी मराठवाडा आणि विदर्भ प्रदेशाचा भाग अनुक्रमे ११.१% आणि १२.७% इतके असतानाच, उर्वरित महाराष्ट्राकडे अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्र ७६.२% इतके आहे. विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प (मंजूर) अंतर्गत करण्यात आलेल्या गुंतवणुकीच्या रकमेबाबत, मराठवाडा आणि विदर्भ यांच्यामध्ये गुंतवणुकीचे प्रमाण अनुक्रमे केवळ २.३% आणि ९.०% इतके असतानाच ८८.७% इतकी गुंतवणूक उर्वरित महाराष्ट्रात करण्यात आली आहे. त्याचप्रकारे, या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये प्रदेशनिहाय निर्माण करण्यात आलेले रोजगार मराठवाड्यासाठी १.५%, विदर्भासाठी २०.८% आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ७७.७% इतके आहेत.

९.२ औद्योगिक उत्पादनाच्या हिश्श्यांवर प्रोत्साहकांचा प्रभाव

आधीच्या प्रकरणांमध्ये २००६-२०११ च्या औद्योगिक धोरणांतर्गत, महाराष्ट्र शासनाने तरतूद केलेल्या त्याच्या धोरण

उपक्रमशीलतेविषयी आम्ही चर्चा केली. मागास क्षेत्रे आणि हिंगोली व गडचिरोली या सारख्या फारच कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये औद्योगिक उपक्रमांना उत्तेजन देण्याबाबत ही क्षेत्रे **अ, ब, क, ड, ड+** आणि उद्योग नसलेले जिल्हे म्हणून वर्गीकृत करण्यात आले. राज्यामध्ये हे धोरण २००६ ते २०११ या कालावधीमध्ये अंमलात होते.

तक्ता ९.४

औद्योगिक उत्पादनाच्या प्रमाणामध्ये प्रदेशनिहाय बदल (२००१-०२ आणि २००८-०९)

प्रदेश	नोंदणीकृत निर्माणक (%)	नोंदणीकृत नसलेले निर्माणक (%)	एकूण (%)
१	२	३	४
उर्वरित महाराष्ट्र			
२००१-०२	८७.६	७९.३	८५.२
२००८-०९	८४.४	७९.२	८३.१
मराठवाडा			
२००१-०२	६.२	७.१	६.५
२००८-०९	६.५	७.४	६.७
विदर्भ			
२००१-०२	६.२	१३.६	८.३
२००८-०९	९.१	१३.४	१०.२

स्रोत : उद्योग आणि समितीने स्थापन केलेला पायाभूत सुविधा गट याच्याद्वारे उपलब्ध.

१. उर्वरित महाराष्ट्र तक्ता ९.४ मध्ये औद्योगिक उत्पादनावरील विविध प्रोत्साहकांचा भार दर्शविला आहे. उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामधील औद्योगिक उत्पादनाचे प्रमाण, नोंदणीकृत निर्माणकांमध्ये २००१-०२ आणि २००८-०९ या काळात ८७.५६% वरून ८४.४४% पर्यंत सूचकपणे घटले आहे. तसेच त्याच कालावधीमध्ये नोंदणीकृत नसलेल्या निर्माणकांमध्ये देखील ७९.२७% पासून ७९.१४% पर्यंत अल्प प्रमाणात घट झाली आहे. या कालावधीमध्ये, नोंदणीकृत व नोंदणीकृत नसलेले निर्माणक या दोन्हींचा संयुक्त भार ८५.२०% आणि ८३.०८% इतका असल्याचे दिसून आले.

२. मराठवाडा मराठवाडा प्रदेश हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला म्हणून मानण्यात येतो. या प्रदेशावर २००१-०२ आणि २००८-०९ यामध्ये प्रोत्साहक योजनांचा प्रभाव खरोखरच अत्यल्प आहे. ज्या कालावधीत नोंदणीकृत या प्रदेशातील उत्पादनाचे प्रमाण ६.२३% पासून ६.५१% पर्यंत वाढले तो खरोखरच नगण्य आहे. हे लक्षात घेता नोंदणीकृत नसलेल्या निर्माणकांच्या उत्पादनात, याच कालावधीमध्ये ७.०६% वरून ७.४२% इतक्या प्रमाणात वाढ झाली आहे. नोंदणीकृत आणि नोंदणीकृत नसलेल्या या दोन्ही निर्माणकाच्या उत्पादनाचा संयुक्त भार अल्प प्रमाणात ६.४७% वरून ६.७४% इतक्या अल्प प्रमाणात वाढलेला आहे.

३. विदर्भ विदर्भ प्रदेश देखील (नागपूर व्यतिरिक्त) औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे मानले जाते. या प्रदेशामध्ये, नोंदणीकृत निर्माणकांच्या औद्यागिक उत्पादनाचे प्रमाण २००१-०२ मध्ये ६.२१% वरून २००८-०९ मध्ये ९.०५% पर्यंत लक्षणीय रीतीने वाढले. नोंदणीकृत नसलेल्या निर्माणकांच्या उत्पादनाच्या प्रमाणात या कालावधीत १३.६७% वरून १३.४३% पर्यंत थोडीशी घट झाली आहे. अंतिमरीत्या दोन्ही नोंदणीकृत आणि नोंदणीकृत नसलेल्या निर्माणकांचा संयुक्त भार महत्त्वपूर्ण होता, अर्थात, २००१-०२ मध्ये ८.३४% वरून २००८-०९ मध्ये १०.१७% पर्यंत तो वाढला. तथापि, औद्योगिक क्षेत्रातील प्रादेशिक तफावत कमी करण्याबाबत त्यांचे काहीही योगदान नाही.

वरील आकडेवारी असे दर्शवते की, राज्यातील नोंदणीकृत त्याचबरोबर नोंदणीकृत नसलेल्या निर्माणकांचे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामधील औद्योगिक कार्यात मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले आहे.

(अ) औद्योगिक उत्पादनातील सुधारणांवरील विविध प्रोत्साहकांचा विदर्भ प्रदेशामधील परिणाम खूपच सकारात्मक

आहे.

(ब) मराठवाडा प्रदेशामध्ये या कालावधी दरम्यान प्रभाव जरी सकारात्मक असला तरी तो तितकासा लक्षणीय नाही. या प्रदेशाची औद्योगिक प्रगती सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

(क) उर्वरित महाराष्ट्रामध्ये औद्योगिक उत्पादनाचे प्रमाण नि:संशय कमी झाले आहे परंतु त्यांच्या मानाने या कालावधीत इतर दोन प्रदेशांची स्थिती तुलनेने सुधारलेली आहे असे दिसते.

९.२.१ संपूर्ण राज्यातील खाजगी औद्योगिक गुंतवणूक

उपलब्ध पुरावा आणि आकडेवारीमधून काही उघडपणे विरूद्ध असलेली वस्तुस्थिती स्पष्ट होत आहे–

१. कित्येक वर्षे मोठ्या प्रमाणात प्रोत्साहके असूनदेखील, आज सुद्धा खाजगी गुंतवणूक ही मोजक्या जिल्ह्यांमध्ये आणि / किंवा सहा प्रशासकीय विभागांपैकी केवळ कोकण–पुणे–नाशिक या अर्ध्या विभागांमध्येच प्राधान्याने केंद्रीत झाली आहे. याचा अर्थ असा आहे की, आतापर्यंत, औरंगाबाद, नागपूर व अमरावती प्रदेशांमध्ये करण्यात आलेली औद्योगिक गुंतवणूक सरासरी गुंतवणुकीच्या केवळ अंशाइतकीच आहे.

२. तीन तुलनात्मक प्रगत महसूल विभागांमध्ये सुद्धा आंतर–जिल्हा तफावती अगदी ढळढळीत आहेत.

३. जर आम्ही संबंधित विभागातून औरंगाबाद आणि नागपूर हे विनिर्दिष्ट जिल्हे वगळले तर, या तीन विभागांत असलेल्या सर्व उर्वरित जिल्ह्यांमधील बहुतेक अनुल्लेखनीय औद्योगिक गुंतवणूक कार्याचे चित्र अधिकच करूणाजनक दिसत आहे.

९.२.१.१ आम्ही ४ प्राचल औद्योगिक उद्योजकांचे प्रस्तावपत्र, मोठे प्रकल्प (महाप्रकल्प), सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम (वस्तूनिर्माण व सेवा) आणि समूह यांवरील आकडेवारी वापरली. गुंतवणूक आणि रोजगाराच्या जिल्हानिहाय स्वरूपावर उपलब्ध पुराव्याचे परीक्षण करण्याचा सुद्धा प्रयत्न करण्यात आला आहे.

१. नवीनतम औद्योगिक उपक्रम प्रस्तावपत्रांनुसार, महाराष्ट्रामध्ये 'प्रस्तावित व अंमलबजावणीअंतर्गत' सर्व औद्योगिक गुंतवणुकीच्या ५०% पेक्षा अधिक गुंतवणूक केवळ ४ जिल्हे अर्थात पुणे, रायगड, रत्नागिरी आणि ठाणे आहे असा खुलासा होतो. जर गुंतवणुकीवरील आकडेवारीचे विभागनिहाय विश्लेषण केले तर, संपूर्ण गुंतवणुकीच्या ८०% पेक्षा अधिक गुंतवणूक पुणे, कोकण आणि नाशिक अशा तीन विभागामध्ये दिसून येते.

२. रोजगाराच्या संबंधात, चित्र फारसे वेगळे नाही, औद्योगिक उपक्रम प्रस्तावपत्रांद्वारे निर्माण करावयाचे उद्दिष्ट असलेल्या एकूण रोजगारांपैकी अर्ध्यापेक्षा अधिक रोजगार केवळ ६ जिल्ह्यांमध्येच असल्याचे स्पष्ट होत असून हे जिल्हे – पुणे, ठाणे, नागपूर, रायगड, नाशिक व कोल्हापूर आहेत. त्याचप्रमाणे, ७०% पेक्षा अधिक रोजगार कोकण, नाशिक व पुणे विभागांत केंद्रित झाले आहेत.

३. राज्यामधील महा–प्रकल्प यांचे वितरण त्याचबरोबर, लहान व मध्यम उपक्रम यांचे वितरण याबाबतची परिस्थिती सारखीच आहे. सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रमांच्या जिल्हानिहाय वितरणाची ठळक वैशिष्ट्ये असे प्रकट करतात की :

(अ) सर्व सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम निर्माणकांच्या युनिटांपैकी जवळपास ५०% युनिटे केवळ ५ जिल्ह्यात अर्थात कोल्हापूर, औरंगाबाद, पुणे, नाशिक व ठाणे येथे आहेत.

(ब) तसेच एकूण सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांपैकी ५० टक्क्यापेक्षा अधिक उद्योग हे केवळ नाशिक,

कोल्हापूर, मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे व औरंगाबाद या ७ जिल्ह्यांमध्ये स्थित आहेत.

(क) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमधील संयंत्रे व यंत्रसामग्री यांवरील एकूण गुंतवणुकीच्या संबंधात सुमारे रुपये १६,००० कोटी, जवळजवळ रुपये १२,००० कोटी किंवा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमधील गुंतवणुकीच्या ७५ टक्के गुंतवणूक केवळ, मुंबई, ठाणे, पुणे व औरंगाबाद या ४ जिल्ह्यांमध्येच केंद्रित झाली आहे.

(ड) रोजगाराच्या संबंधात, महाराष्ट्रामधील सर्व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये २ दशलक्षाहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. एकूण रोजगाराच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक रोजगार हा केवळ ४ जिल्ह्यात म्हणजे मुंबई, ठाणे, पुणे व कोल्हापूर यामध्ये सामावला आहे. तसेच तो नागपूर व नाशिक जिल्ह्यांमध्येही केंद्रित झाला आहे. असे आढळून आले आहे की, एकूण सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या रोजगार निर्मितीच्या सुमारे २/३ रोजगार निर्मितीही महाराष्ट्राच्या केवळ ६ जिल्ह्यांमध्ये झाली आहे.

४. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग समूह अलीकडील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमधील वाहन वृद्धी विचारात घेता, भारत सरकारने दिनांक १.१.२०१३ रोजी प्रमाणे मान्यता दिलेले सर्व ११ उद्योग समूह हे मराठवाडा व अमरावती विभाग वगळता पुणे (४), नागपूर (४), नाशिक (२) व कोकण (१) या जिल्ह्यांमध्ये केंद्रित झाले आहेत. मराठवाडा व अमरावती या विभागांमधील उद्योग समूहांना अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही.

तसेच एकूण उद्योग समूह युनिटांपैकी एकूण ८५ टक्के उद्योग समूह हे फक्त पुणे (५० टक्के) व नाशिक (३५ टक्के) या दोन विभागांत असून एकूण उद्योग समुहांमधील रोजगाराच्या ८० टक्के रोजगार निर्मिती या दोन विभागात होते.

५. दिनांक ३१.१२.२०१२ रोजी असलेल्या बृहद् प्रकल्पांच्या संबंधात, उत्पादन सुरू असलेल्या ११४ युनिटांपैकी सुमारे ९० (किंवा ८० टक्क्यांपर्यंत) युनिटे ही पुणे, नागपूर व नाशिक या ३ विभागांत स्थित असून त्यामध्ये रुपये ६१,३०० कोटी इतकी गुंतवणूक झाली आहे. या प्रकल्पांपैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त प्रकल्प हे एकट्या पुणे विभागात आहेत. त्याचप्रमाणे विशाल प्रकल्पांद्वारे निर्माण होणाऱ्या एकूण रोजगाराच्या सुमारे ७० टक्के रोजगार हा पुणे व नागपूर या दोन विभागांत आढळतो.

(अ) महाराष्ट्रातील जुलै २००५ नंतर मान्यता मिळालेल्या विशाल प्रकल्पांची एकूण संख्या ही सुमारे ३५० पर्यंत वाढली आहे. जेथवर त्यांची जिल्हानिहाय रचना प्रकल्पांशी संबंधित आहे तेथवर असे आढळून येते.

(ब) प्रस्तावित प्रकल्पाच्या एकूण रुपये २,७५,००० कोटीपेक्षा अधिक एकूण प्रस्तावित गुंतवणुकीच्या म्हणजेच एकूण गुंतवणुकीच्या सुमारे ६० टक्के एवढी गुंतवणूक ही, निव्वळ रत्नागिरी, पुणे, रायगड, गडचिरोली, चंद्रपूर आणि ठाणे या ६ जिल्ह्यांमध्येच केंद्रित झाली आहे.

(क) विभागनिहाय विशाल प्रकल्पांमधील गुंतवणुकीच्या ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक ही, कोकण, पुणे व नागपूर या तीन विभागांमध्ये केंद्रित झाली आहे. नाशिक, औरंगाबाद व अमरावती या उर्वरित ३ विभागांत एकूण प्रस्तावित गुंतवणुकीपेक्षा १५ टक्क्यांपेक्षा कमी गुंतवणूक झाली आहे.

(ड) रोजगाराच्या बाबतीतही हे चित्र फारसे काही वेगळे नाही. या ३५० विशाल प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या ३,२०,००० एवढ्या अंदाजित रोजगारापैकी ६० टक्के रोजगार निर्मिती ही केवळ कोल्हापूर, पुणे, ठाणे व नागपूर या ४ जिल्ह्यांत होते.

९.२.१.२ काही निष्कर्ष

१. औद्योगिक उपक्रम प्रस्तावपत्रे आणि / किंवा विशाल प्रकल्प गुंतवणूक आणि / किंवा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि / किंवा उद्योग वसाहती यांवरील माहिती विचारात घेता आम्हाला असे आढळून आले की, मुंबई (ज्यांमध्ये प्रामुख्याने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग सेवा उद्योगांचे वर्चस्व आहे) वगळता, गुंतवणुकीच्या बाबतीत औद्योगिकदृष्ट्या क्रियाशील असलेले जिल्हे केवळ पुणे, ठाणे, नागपूर हे आहेत तर, रोजगाराच्या दृष्टिकोनातून औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर हे जिल्हे अग्रेसर आहेत.

२. विशाल गुंतवणूक प्रकल्प मोठ्या प्रमाणात प्रस्तावित असलेल्या चंद्रपूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यातील प्रकल्पांची खरी स्थिती सातत्याने दिली गेलेली नाही. त्याचप्रमाणे रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांत फक्त पोलाद व उर्जेचे मोठे प्रकल्प बेसुमारपणे राबविले जातात.

३. सातारा, सांगली, सोलापूर, जळगाव इत्यादी जिल्ह्यांत तसेच काही मर्यादेपर्यंत जालना व अमरावती या जिल्ह्यांत औद्योगीकरणाची प्रगती काही प्रमाणात घडून आलेली दिसून येते.

४. तथापि, मुख्यत्वेकरून उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या प्रदेशांतील उर्वरित जिल्ह्यांमध्ये औद्योगिक गुंतवणूक-वृद्धि-रोजगार चक्राची गती अगदी कमी आहे.

५. त्याचप्रमाणे मराठवाडा, अमरावती, नागपूर या संपूर्ण विभागाचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता त्यांमध्ये उद्योगधंद्यांचे प्रमाण फारच कमी आहे. तसेच ही स्थिती या वस्तुस्थितीवरून आणखी सुनिश्चित होते की, याच विभागांतील फक्त औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी, संबंधित प्रदेशांच्या/ विभागांच्या तुलनेत उद्योगधंद्यांचे प्रमाण हे अधिक दिसून येते. म्हणून या प्रत्येक प्रदेशांतील / विभागांतील उर्वरित चार-पाच जिल्ह्यांमध्ये उद्योगधंद्यांचे प्रमाण हे अगदी कमी किंवा नगण्य राहिले आहे. अशा भागांमध्ये उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण झाल्यास, उद्योग क्षेत्रातील प्रादेशिक असमतोल निश्चितच दूर होईल.

९.३ धोरणात्मक सुधारणा

महाराष्ट्रातील प्रदेशांमध्ये औद्योगीकरणाचे जाळे अधिक चांगल्या प्रकारे पसरविण्यासाठी आम्ही पुढील काही विभागांच्या बाबतीत धोरणात्मक उपाययोजना सुचवितो.

९.३.१ विशिष्ट प्रदेशात केंद्रीत होणारी अत्यधिक गुंतवणूक कमी करण्याचे उद्देशित असलेल्या धोरणात्मक सुधारणेमुळे, 'राज्य व्यापी', 'प्रदेश-विशिष्ट', 'क्षेत्र-विशिष्ट' तसेच 'उद्योगस्तरीय' प्रश्न मार्गी लागतील. स्थानिक विनिर्दिष्ट गरजा व मूलभूत सेवा सुविधा यांचा देखील धोरणात्मक आराखड्यात विचार करता येईल. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे सर्व व्यापी दृष्टिकोन अवलंबणे फलदायी ठरेल.

राज्य स्तरावरील धोरणे ही, मुख्यत्वेकरून, गुंतवणुकीतील सुधारणा, करविषयक धोरणात्मक सुधारणा जसे माल व सेवाकर, मूलभूत सोयी सुविधा आणि विशेषत: प्रदेश स्तरावरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र कृषि उद्योग महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र यांसारख्या विकास अभिकरणांचे बळकटीकरण करणे या बाबींशी निगडीत आहेत. अर्थात तुलनात्मकदृष्ट्या कमी औद्योगीकरण झालेल्या प्रदेशांना या सुधारणांचा अधिक लाभ होईल, हे म्हणणे वावगे ठरणार नाही. या सुधारणा पुढील परिच्छेदांमध्ये अधिक विस्ताराने चर्चिल्या आहेत.

१. **मूलभूत सुविधांचा विकास –** कमी विकसित जिल्ह्यांमध्ये स्पष्टपणे, या सुधारणाविषयक कार्यास सर्वोच्च प्राथम्य देण्याची गरज आहे. कार्यक्षम रेल्वे व मार्ग यांचे जाळे, कार्यशील असलेली हवाई बंदरे, योग्य त्या वाजवी खर्चाने अखंडीत झालेला वीज पुरवठा यांसह लहान बंदरांना पार्श्व प्रदेशातील उपयुक्त रस्त्यांशी जोडणे यामुळे अधिकाधिक औद्योगिकीकरणाचा एक प्रशस्त मार्ग खुला होईल. या दृष्टीने मूलभूत सुविधांच्याबाबतीत

सार्वजनिक खाजगी भागीदारीतून काही पावले उचललेली असली तरी आणखी बरेच काही करण्याची गरज आहे. ब्रॉडबॅन्ड सेवेचे जाळे निर्माण करणे हे एक आणखी मूलभूत सुधारणांचे प्राथम्य क्षेत्र आहे.

ब्रॉडबॅन्ड जोडणीवरील प्रकरणांत, या क्षेत्रात असलेल्या गुंतवणुकीचा प्रदेशनिहाय तपशील दिला आहे.

२. **व्यावसायिक सुलभता –** विविध सार्वजनिक अभिकरणांचा प्रक्रियात्मक साचेबंदपणा आणि बाहुल्यामुळे राज्याच्या उद्योगधंद्यांच्या विशेषत: सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगधंद्यांच्या प्रगतीत अंमलबजावणीविषयक अजून अडचणी व अडथळे निर्माण होतात. यासंबंधी अलीकडच्या २०१३ च्या औद्योगिक धोरणात कार्यपद्धतीच्या सुलभीकरणासाठी प्रशंसनीय पाऊले उचलली गेली आहेत. तरीही पूर्णत: संघर्षमुक्त व्यावसायिक वातावरणापासून आपण फारच दूर आहोत. "वास्तविक एक खिडकी योजनेला" जास्तीत जास्त प्राथम्य दिले गेले पाहिजे.

३. **कामगार सुधारणा –** कामगारविषयक कायद्यांमध्ये जसे औद्योगिक विवाद अधिनियमाच्या प्रकरण ५ क व ख मध्ये मालकांना/नियोक्त्यांना अधिकाधिक अनुकूल ठरतील अशा सुधारणा केल्याने रोजगार निर्मितीस चालना / उभारी मिळेल. असे पाऊल उचलल्याने, विदर्भ, मराठवाडा व खानदेश यामधील वस्त्रोद्योगातील रोजगारात लक्षणीय वाढ होऊ शकेल याचा फायदा अल्पावधीतच दिसून येईल.

४. सवलती, स्थगित कर, मुद्रांक शुल्क प्राप्त करणे, विनाविलंब मूल्यवर्धित करामधील रक्कम परत करण्यात पारदर्शकता ठेवणे हे, **आर्थिक सवलतीचे स्वरूप आहे.** कोणत्याही प्रदेशातील वास्तविक प्रकरणांत कालबद्ध रीतीने ही कार्यपद्धत अवलंबण्याची गरज आहे आणि याची सुरूवात करण्यासाठी ही किमान कार्यपद्धत, तार्कीक पद्धतीने वापरण्याची गरज आहे.

५. तुलनात्मक हानीवर मात करण्यासाठी न्यूनविकसित प्रदेशांत उत्पादित होणाऱ्या उत्पादनांवर जास्तीत जास्त मूल्याधारित स्पर्धात्मक कर सवलत व व्याज सवलती देऊन त्या प्रदेशांना पद्धतशीरपणे समर्थ करता येईल. विशेषकरून, विक्रीकरात २ टक्के सवलत आणि बँकिग क्षेत्राकडून कर्जाऊ घेतलेल्या भांडवलावरील व्याजदरांत १ टक्का दराने कपात यामुळे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांना मोठी चालना मिळेल आणि अधिकाधिक खाजगी गुंतवणूक होऊ शकेल. या दोन धोरणांत्मक उपायांमुळे फार काळपर्यंत विदर्भ तसेच मुंबई-पुणे-नाशिक पट्टयाच्या तुलनेत विदर्भामधील उत्पादन खर्चातील हानी भरून काढण्याचा एक प्रशस्त मार्ग मोकळा होईल.

६. **माल व सेवा कर याबाबत तातडीने अधिनियम** अधिनियमित केल्यास त्यामुळे गुंतवणूक व उत्पादन (सेवा) यांचा आंतर राज्य ओघ सुरळीत होण्याचा मार्ग मोकळा होईल.

७. **कौशल्य विकास–** शिक्षित, तांत्रिक अर्हताप्राप्त युवक आणि औद्योगिक नोकऱ्या गरजा यांतील दरी मिटविण्यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागातून समुचित कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

९.३.२ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील धोरणात्मक सुधारणा

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हा (एमएसएमई) औद्योगिकीकरणाचा कणा आहे. या क्षेत्राचा एकूण मूल्यवर्धनात ३५ टक्के व रोजगार निर्मितीत ४५ टक्के इतका वाटा आहे. मागासलेल्या प्रदेशात औद्योगीकरणाचा विस्तार करण्याकरिता हे क्षेत्र मोलाची भूमिका बजावेल.

भारतीय उद्योगाची परिव्यय परिणामकारकता ही, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रमाच्या कमी स्थिरतेमुळे झाली आहे आणि म्हणून मोठ्या / विशाल औद्योगिक क्षेत्राला, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम क्षेत्रांकडे कामाचा भार सोपवून त्याद्वारे त्यांची परिव्यय परिणामकारकता राखणे शक्य आहे.

सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम क्षेत्र यांच्यापुढे पुढीलप्रमाणे प्रमुख मूलभूत आव्हाने आहेत:

१. **वित्त पुरवठा :** सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम उद्योजकांना, विखंडित भांडवली बाजारांमुळे अल्प मुदतीचा व दीर्घ मुदतीचा अशा दोन्ही वित्त पुरवठ्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना साहसी भांडवल देखील सहजपणे मिळत नाही. चीनमध्ये, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम पत हमी महामंडळ यांसारख्या शासकीय वित्तीय संस्था आहेत. आम्ही अशी शिफारस करतो की, महाराष्ट्र शासनाने अशी एजन्सी निर्माण करावी जी एकतर पूर्णपणे शासनाच्या मालकीची असू शकेल किंवा आघाडीच्या वित्तीय संस्थेच्या संयुक्त उपक्रमाच्या स्वरूपात असू शकेल.

२. **मनुष्यबळ :** या क्षेत्राला बहुराष्ट्रीय कंपन्यांसह मोठ्या उद्योगांशी/उपक्रमांशी स्पर्धा करावी लागत असल्याने कुशल मनुष्यबळ व व्यवस्थापकीय प्रज्ञावंतांना आकर्षित करणे हे एक आव्हानात्मक काम आहे. यामुळे उद्योजक/उद्योजिका यांच्यावरील बहुविध कामे पार पाडण्याच्या संदर्भात त्याच्या/तिच्यावर मोठ्याप्रमाणात बोजादेखील पडत आहे. आम्ही, शिक्षण विषयक प्रकरणामध्ये, विदर्भ प्रदेशाच्या लहान शहरांमध्ये कौशल्यास चालना देण्यासाठी एक विशेष योजना प्रस्तावित केली आहे. ही योजना, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम क्षेत्रात कुशल कामगाराचा पुरवठा करील.

याशिवाय औद्योगिकदृष्ट्या मागास प्रदेशात स्थापन केलेल्या, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रमांना सहजरीत्या ग्राहक मिळवण्यासंबंधीचे अतिरिक्त आव्हान आहे. या सर्व कारणांमुळे, सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम क्षेत्राच्या विशेषत: औद्योगिकदृष्ट्या मागास प्रदेशामधील स्थैर्यासाठी विशेष लक्ष देणे व धोरणे आखणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामकाजात सुधारणा करणे आवश्यक असून ज्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकतेचा आणि जुन्या सामुहिक प्रोत्साहन योजना, इत्यादींचे निराकरण करण्याशी संबंधित असलेले प्रश्न यांचा समावेश असावा. याशिवाय, जिल्हा उद्योग केंद्राला योग्यरीतीने अधिकार प्रदान करून, निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे. याचा अर्थ असा होईल की, उद्योजकांना, निर्णयांसाठी मुंबईला जावे लागू नये. हे विचारात घेऊन, आम्ही अशी शिफारस करतो की, प्रत्येक विभागाला, एक विकास आयुक्त (उद्योग) असला पहिजे.

अनेक राज्यांनी, औद्योगिक प्रकल्पांसाठी जमिनीचे सुरळीतपणे वाटप करण्यासाठी आणि/किंवा हस्तांतरण करण्यासाठी एका 'भू-बँक' प्रतिमानाचे यशस्वीपणे अनुसरण केले आहे. महाराष्ट्राने, भू-बँकांवर आपले स्वत:चे धोरण विकसित केले पाहिजे. हे प्रयत्न, पिछाडीवर असलेल्या प्रदेशांमध्ये औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी, विशेषरीत्या महत्त्वाचे आहेत.

९.३.३. प्रदेश विशिष्ट धोरणे :

हा भाग प्रदेश विशिष्ट धोरणे निश्चित करतो.

विदर्भ प्रदेश :

विपुल खनिज साधनसंपत्ती व मोक्याची दळणवळण ठिकाणे यांसारख्या विदर्भाच्या आंतरिक शक्तीस प्रतिपूरक ठरणाऱ्या नवीन व अभिनव दृष्टीकोनांसह विदर्भामध्ये औद्योगिक वाढ गतिमान करणे शक्य आहे. मिहान प्रकल्प जलदगतीने कार्यान्वित केल्याने, या प्रदेशातील औद्योगिक कार्यास गती मिळू शकेल. त्याचप्रमाणे, त्यामध्ये कोळसा संपत्ती असल्याने, संपर्क जाळ्यांचा विकास करून, त्याद्वारे हा प्रदेश, एक प्रमुख वीज उत्पादक बनू शकेल व एक विद्युत केंद्र होऊ शकेल. कापूस व फलोत्पादन या उत्पादनांमध्ये त्यांची प्रचंड क्षमता असल्याने, विशेषीकृत अन्नपदार्थ व वस्त्रोद्योग केंद्रे (पार्क) कृषि आधारित औद्योगीकरणाला गती देईल. विपूल प्रमाणात वनसंपत्ती, विशेषत: आदिवासी क्षेत्रांमध्ये वनआधारित उद्योगांना चालना देण्यासाठी आधार देवू शकेल. शासन, फर्निचर, कागद, हस्तव्यवसाय, रेशीम उत्पादन इत्यादींसारखी औद्योगिक युनिटे सुरू करण्यासाठी खाजगी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याकरिता पुढाकार घेऊ शकते. यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल व परस्परसंबंध विकसित होतील.

वनौषधींच्या वाणिज्यिक उत्पादनासाठी उचित संशोधन व विकास करून त्याद्वारे जंगली वनस्पतींच्या वाढीचा चांगला वापर करून घेता येऊ शकेल.

९.३.३.१ विदर्भातील वस्त्रोद्योग :

१. विदर्भात कापूस लागवडीखालील एकूण क्षेत्र मोठ्या प्रमाणात असले तरी त्याचे उत्पादन फारच कमी आहे. सुसंरचनात्मक 'कंत्राटी शेती' बरोबरच सूत कताई व विणाई करणाऱ्या गिरण्यांना उत्तेजन देऊनच केवळ यात सुधारणा केली जाऊ शकते.

२. सूत कताई व विणाई करणाऱ्या गिरण्या या, विणकाम, रंगकाम, तयार कपडे इत्यादींच्या प्रमुख अग्रदूत आहेत. महाराष्ट्र शासनाने, धोरणात्मकदृष्ट्या समूहांमध्ये स्थित असलेल्या लहान व मध्यम उपक्रमांच्या विकासास उत्तेजन द्यावे.

३. वीज ही सूत कताई व विणाई करणाऱ्या गिरण्यांसाठी आवश्यक असणारी मुख्य निविष्टी (बाब) आहे. विदर्भाला २६ नवीन वीजसंयंत्रे मिळणार आहेत आणि महाराष्ट्र शासनाने विदर्भाच्या लगतच्या राज्यांच्या तुलनात्मक दराने या वस्त्रोद्योग युनिटांना वीज द्यावी असे सुचविण्यात येत आहे.

९.३.३.२ विदर्भाच्या पारंपरिक व्यवसायांचे पुनरुज्जीवन :

विदर्भाच्या पारंपरिक व्यवसायांमध्ये, मुख्यत्वेकरून वस्त्रोद्योग व धातूसामान (भांडी) (पितळ व तांबे) व्यवसाय यांचा समावेश होतो आणि महात्मा गांधी व विनोबा भावे यांसारख्या क्रांतिकारकांच्या प्रयत्नामुळे लोकांमध्ये खादी लोकप्रिय झाली आहे. खादी व धातूशी संबंधित असलेले उद्योग, सत्तरच्या दशकापर्यंत विदर्भ प्रदेशामध्ये चांगल्या प्रगतीपथावर होते. तयार कपडयांनी केवळ मोठी शहरेच नव्हे तर लहान शहरे देखील काबीज केली आहेत आणि पारंपरिक धातूसामानाची (वस्तूंची) जागा ही, दीर्घकाळ टिकण्याच्या हमीसह, कमी देखभाल खर्च लागणाऱ्या पोलाद (स्टील) ॲल्युमिनियम व प्लॅस्टिक यासारख्या पर्यायी सामानाने घेतली आहे. तथापि, आज हे दोन्हीही उद्योग ठप्प आहेत. ते निश्चितपणे भावी संबंधाच्या स्वरूपातील सुसज्जतेमध्ये एक चांगला प्रयत्न ठरला असते. आधुनिक पिढीच्या मागणीस अनुरूप कापसांपासून सूत काढणे, कापडाची निर्मिती करणे आणि तयार कपडे बनविणे शक्य होते. मानवनिर्मित वस्तू बनविण्यासाठी धातूवर (पितळ व तांबे) प्रक्रिया करता येऊ शकली असती व या वस्तूंनी, घरगुती व वाणिज्यिक आस्थापनांमध्ये महत्त्वाचे स्थान काबीज केले असते. कच्च्या स्वरूपातील साधनसंपत्तीची (कापूस व धातू) विक्री करण्याऐवजी, नफाक्षमता, रोजगार आकर्षित करणे आणि अंतिमत:, आजारी व्यवसायांच्या एकूणच भरभराटीमधील निष्पत्ती यांच्या तुलनेत, त्यांचे मूल्यवर्धन करणे निश्चितपणे मोठ्या प्रमाणात फायदेशीर ठरेल.

महाराष्ट्र औद्योगिक विकास परिषदेने (एमइडीसी) सापेक्षतेने कमी विकसित असलेल्या विदर्भ व मराठवाड्याच्या जिल्ह्यांसाठी साधनसंपत्तीवर आधारित असलेल्या औद्योगीकरणाची मागणी केली होती. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये – वाशिम, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. विनिर्दिष्ट शिफारशी पुढीलप्रमाणे सादर केल्या आहेत:

वाशिम : जिल्हा उद्योग धोरण हे, कापसापाठोपाठ सोयाबीनवर केंद्रित असले पाहिजे जागतिक दर्जाचे स्तर उंचावत असल्याची आणि उर्ध्व प्रवाही आणि उत्पादने वर्धनक्षम होत असल्याची खात्री करण्यासाठी हिंगोली व परभणी यांच्या पाठोपाठ लक्ष दिले पाहिजे. अशा धोरणांची, अंमलबजावणी करताना सढळ हाताने गुंतवणूक करणे, पारदर्शक व न्याय्य भूसंपादन, खात्रीशीर वीज पुरवठा व मोठ्या बाजारपेठ व राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्पांच्या (एनएचडीपी) कॉरिडोर्स यांच्याकडे जाणारे रेल्वे मार्ग वाहनावळ

वाहतूक मार्गांचे बळकटीकरण करणे, यांचा समावेश केला पाहिजे. वाशिमचा संशोधन व विकास आणि उद्योगामध्ये सौरऊर्जेचा वापर करण्यामधील एक आदर्श म्हणून देखील उदय झाला पाहिजे.

गडचिरोली: विपुलतेचे यंत्रसामग्री व साधनसामग्री, सिमेंट, पोलाद उत्पादने, काच स्वच्छताविषयक सामान, इत्यादींसारख्या बांधकामाशीसंबंधित असलेल्या उद्योगांचे विशेष महत्त्व आहे. खनिजांच्या उपलब्धतेमुळे जिल्हयामध्ये जागतिक गुंतवणूकदारांना आकर्षित करणे शक्य होईल. याशिवाय, आज बांधकाम क्षेत्राला, खाणींची तीव्र गरज असून या क्षेत्रामध्ये त्या विपुल प्रमाणात आहेत. या क्षेत्रातील कामगारांच्या सघनतेमुळे, स्थानिक अकुशल कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, उत्खनन कार्याच्या जवळ आपली युनिटे स्थापन करण्यासाठी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याकरिता त्यांना संरक्षण व सुरक्षा (संवेदनशील क्षेत्र असल्यामुळे) पुरविण्याची अत्यंत गरज आहे.

बाजारपेठांची उपलब्धता : औद्योगिक युनिटांना स्थानिक बाजारपेठेचा अभाव व मोठ्या बाजारपेठांना जोडणारी निकृष्ट जोडणी, या प्रमुख अडचणींना तोंड द्यावे लागते. अर्थव्यवस्था, बाजारपेठांच्या आवश्यक वाढीस चालना देत नाही आणि बाजारपेठांचे चित्र विस्तारित नाही. त्यावर मात करण्यासाठी, स्थानिक उद्योजगकांकडून शासकीय कंत्राटांमध्ये स्थानिक पुरवठादारांना प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे. दर्जात्मक मानकांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, स्थानिक उद्योजकांना १० वर्षांच्या मर्यादित कालावधीसाठी, मूल्य खरेदी प्राधान्याचा, कमी मानवी विकास निर्देशांक असलेल्या सर्व जिल्ह्यांकरिता गंभीरपणे विचार करण्यात यावा.

मध, लाख व मोहाची फुले यांसारख्या वन उपजापासून आदिवासींनी उत्पादित केलेल्या उत्पादनांसाठी बाजारपेठ ही देखील एक प्रमुख समस्या आहे.

महानगरांमधील अभिजनांसाठी विदेशी वैयक्तिक सौंदर्याची काळजी घेणारी उत्पादने म्हणून उदयास येण्याची त्यामध्ये क्षमता आहे. आदिवासी उत्पादक व फॅबइंडिया, न्यासा व इको कॉर्नर यांसारखी अभिजनांची विक्रीकेंद्रे यांच्यामध्ये परस्परसंबंध निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावयास पाहिजे, जेणेकरून ही उत्पादने, बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करतील आणि गुणात्मक दर्जाची पूर्तता करतील. या प्रयोजनासाठी, एका विशेष ब्रँडचा उपक्रम हाती घेता येईल जो या उत्पादनांची प्रसिद्धी करील व त्यांना इतर सहाय्य करील.

औद्योगिक केंद्रे/समूह : प्रदर्शन ते जागतिक ब्रँडची गरज या मार्फत त्यांना मूल्य साखळीपर्यंत घेऊन जाण्याच्या दृष्टीने, पुढील क्षेत्रांमध्ये औद्योगिक पार्क स्थापन करता येतील. गुणवत्ता चाचणी, बांधणी, टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट, सांडपाणी शुद्धिकरण, इत्यादींसाठी या युनिटांना सामाईक पायाभूत सुविधा पुरविता येतील.

(एक) अन्न पार्क : अन्न पदार्थ व अन्न प्रक्रिया.

(दोन) बांधकाम साहित्य व अंतर्गत सजावट : फर्निचर स्वच्छताविषयक वस्तू व काचेच्या वस्तू.

(तीन) बांधकाम अभियांत्रिकी : पोलाद फॅब्रिकेशन, सिमेंट व ग्रेनाईट लाद्या.

या प्रमुख बाजारपेठांना जलदगतीने जोडण्यासाठी नागपूर, औरंगाबाद, हैद्राबाद व मुंबई येथे रेल्वे वाहतूक कॉरिडॉर निर्माण करण्याची अत्यंत गरज आहे. लहान खाजगी विमानांसाठी, विमान हवाई जोडमार्ग पुरविल्यामुळे, राज्याने पुढाकार घेतलेल्या खाजगी विमान मालकांसह महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या सार्वजनिक खाजगी भागिदारीच्या उपक्रमा अंतर्गत महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमधील औद्यागिकीकरणास चालना मिळेल.

अनेक स्थानिक उद्योग प्रतिनिधींनी पुढील मागणी केली आहे:–

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या जमीन वाटपामध्ये अधिकाधिक उद्योगाभिमूख दृष्टिकोन बाळगावा.
- बाहेर पडणारी राख एकत्रित गोळा केल्यामुळे स्थानिक विकास होईल तसेच पर्यावरणातील प्रदूषण कमी होईल;
- लॉजिस्टिक व पर्यटन क्षेत्राला 'उद्योगाचा दर्जा' देणे
- स्थानिक उद्योगांना 'कमी किंमतीत' वीज देणे

९.३.३.३ मल्टिमोडल इंटरनॅशनल कार्गोहब ॲन्ड एअरपोर्ट नागपूर (मिहान) :

विदर्भातील संधी :

मिहान हा, सर्वात मोठया पायाभूत सुविधा असलेल्या प्रकल्पांपैकी एक मोठा प्रकल्प असून, महाराष्ट्र शासनाने तो राज्यात सुरु केला आहे. तो प्रकल्प शीघ्रतेने पूर्ण होण्याची व त्यावर नियमितपणे संनियंत्रण ठेवण्याची गरज आहे. पायाभूत सुविधा या जवळजवळ तयार आहेत, तथापि, खाली नमूद केलेल्या क्षेत्रांकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

१. विशेष आर्थिक क्षेत्रातील, विशेषकरून वस्तुनिर्माण क्षेत्रामध्ये मिहानचे व्यावसायिक दृष्टीने व्यापारीकरण करण्याची गरज आहे. यासाठी, जागतिक स्तरावरील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याकरिता एखाद्या वैश्विक अभिकरणाची नियुक्ती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

२. मिहानमध्ये 'मुक्त व्यापार वखार प्रक्षेत्र' तयार करणे.

३. आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे आणि रस्ते यासंबंधातील टर्मिनल्सचा विकास करण्यासाठी भागीदार शोधण्याची प्रक्रिया गतिमान करणे.

९.३.३.४ विदर्भातील औद्यागीकरण व वने

१) विशेषत: विदर्भातील वने ही विकासातील एक मुख्य अडचण मानली गेली आहे. तथापि, पारिस्थितीकीय समतोल राखण्यामध्ये अडथळा न आणता, रहिवाशांसाठी महसूल निर्मितीचा एक शाश्वत स्रोत म्हणून याचे रूपांतर करता येऊ शकेल. फर्निचर, कागद, हस्तव्यवसाय, रेशीम उत्पादन इत्यादींसारखी औद्योगिक युनिटे सुरू करण्यासाठी खाजगी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याकरिता शासनाला पुढाकार घेता येऊ शकेल. यामुळे स्थानिक जनतेला रोजगार पुरविता येईल आणि लॉजिस्टीक पार्कस आणि व्यापार व व्यावसायिक आस्थापना या मार्गाने इतर क्षेत्रांबरोबर सांगड घालता येईल. मोठया प्रमाणावर वाढणाऱ्या औषधी वनस्पतींवर योग्य ते संशोधन करून आणि वनौषधींच्या व्यापारी उत्पादनात वाढ करून त्यांचा चांगला उपयोग करता येऊ शकेल. विदर्भाचा पूर्वेकडील भाग हा विपुल गौण वन उत्पादनांनी बहरलेला आहे. शासनाच्या योग्य धोरणामुळे लाख, मध इत्यादींसारख्या वस्तुनिर्मिती कार्यांना प्रोत्साहन देता येऊ शकेल. मालकी प्रस्थापित होईल असे लहान कार्यगट तयार करावेत आणि उत्पादनांचे शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन व खरेदी विक्री करण्यासाठी शासनाचे सहाय्य पुरविण्यात यावे.

जगण्यासाठी व अन्नासाठी, प्रचलित व्यवस्थेविरुध्द बंडखोरी करणारे बंडखोर/ दहशहतवादी हे, जंगलांचे रूपांतर युध्दभूमीत करीत आहेत. आदिवासींच्या आयुष्यांसबंधातील प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राज्याने योग्य प्रकारे मध्यस्थी करणे ही काळाची गरज आहे.

९.३.३.५ महाराष्ट्रातील वीज परिस्थिती आणि विदर्भाची भूमिका

महाराष्ट्र राज्यात, मोठया प्रमाणावरील औष्णिक वीज प्रकल्प येऊ घातले आहेत. वस्तुत:,

८९२६९ मेगावॅट इतकी प्रचंड औष्णिक क्षमता असलेले हे एक राज्य आहे. यामुळे, जलविद्युत व अणुऊर्जा यांसह महाराष्ट्राच्या एकूण विद्यमान क्षमतेत सुमारे ५ पट इतकी वाढ होईल. यांपैकी बहुतांश प्रकल्प हे विदर्भ(४१,१९५ मेगावॅट) किंवा कोकण प्रदेशात (३०,९७८ मेगावॅट) येत आहेत. या पार्श्वभूमीवर, या प्रकल्पांमध्ये समर्पक तर्कशास्त्र आहे. विदर्भाच्या बाबतीत, या प्रकल्पातून स्थानिक विकासासाठी स्थानिक साधनसंपत्तीचा वापर करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वाचे वास्तव दर्शन घडते.

महाराष्ट्रात, वीजेच्या कमाल मागणीमध्ये, २०००-०१ या वर्षातील १०४७० इतक्या मेगावॅटवरून २०१०-११ या वर्षामध्ये १८००० मेगावॅटपर्यंत वाढ झाली आहे. अशी परिस्थिती असताना, वीज उपलब्धतेसाठी ८६५० मेगावॅटवरून (२०००-०१) १०१०० मेगावॅटपर्यंत (२०१०-२०११) वाढ झाली आहे. याच कालावधीमध्ये, तुटीचे प्रमाण हे १८०० मेगावॅटवरून ७९०० मेगावॅटपर्यंत वाढले आहे. महाराष्ट्रातील १०१०० मेगावॅट इतक्या स्थापित क्षमतेपैकी, विदर्भाचे योगदान ५६०० मेगावॅट (५५.४टक्के) इतके आहे. जेथवर लक्षावधी युनिटांच्या ऊर्जा निर्मितीचा संबंध आहे तेथवर एकूण निर्मितीपैकी विदर्भाचे योगदान सुमारे ५३ टक्के इतके आहे. परंतु, या प्रदेशात केवळ १२.५ टक्के एवढी वीज वापरली जाते.

विदर्भाची वीज निर्मितीक्षमता ५६०० मेगावॅट इतकी असताना, विदर्भ प्रदेशाच्या कमाल मागणीच्या कालावधीतील (जानेवारी) कमाल सरासरी मागणी ही, ३००० मेगावॅट इतकी आहे. याचाच अर्थ असा की, दिवसभरात कोणतेही भार नियमन न करता विदर्भ हा, मुंबई, पुणे व महाराष्ट्राच्या पश्चिम भागात २६०० मेगावॅट इतक्या मर्यादेपर्यंत वीजेचा पुरवठा करतो. जर आता भार नियमन सुरु केले जात आहे असे मानले तर, वीजेची निर्यात ही, ३००० मेगावॅटपेक्षा अधिक आहे.

बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस (२०१२-१७ ही वर्षे) विदर्भातील मागणी ६००० मेगावॅटपर्यंत (मिहान प्रकल्प पूर्णत: कार्यान्वित झाला तर) जाईल. परंतु प्रगतीपथावर असलेल्या वीज प्रकल्पांचा विचार केल्यास, वीजेची निर्यात ही याप्रमाणेच किंवा भविष्यात यापेक्षा अधिक प्रमाणात सुरु राहील.

युनिटानुसार महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रातील वीजेचा दरडोई वापर हा, अखिल भारतीय स्तरावरील दरडोई औद्योगिक वापरापेक्षा खूपच अधिक आहे. महाराष्ट्रातील घरगुती व कृषि क्षेत्रांमधील वीजेची गरज ही, भारताच्या सरासरी गरजेपेक्षा अधिक आहे. तपशिलासाठी, कृपया तक्ता क्र.९.५ पहा.

तक्ता ९.५
वीज : दरडोई वापर

प्रकार	भारत	महाराष्ट्र	
	२०१०-११	२०१०-११	२०११-१२
१	२	३	४
औद्योगिक वापर	१९०	३०७	३२१
घरगुती वापर	१३१	१७५	१८५
कृषि	१०७	१४५	१९१

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३

अलीकडच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, राज्याशी तुलना करता, विदर्भातील अनेक जिल्हे हे घरगुती वीजजोडणीच्या बाबतीत मागे आहेत. २०११ च्या जनगणनेच्या आधारसामग्रीवरून असे दिसून येते की, विदर्भाच्या अनेक जिल्हयांतील घरगुती वीज जोडणीचे प्रमाण ८३.९ टक्के एवढया राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे. या जिल्हयांमध्ये, गडचिरोली (५९.२ टक्के),यवतमाळ (६९.७ टक्के), वाशीम (७६ टक्के) व इतर जिल्हयांचा समावेश होतो. या निर्देशांकाच्या बाबतीत विदर्भापेक्षा मराठवाडयाची परिस्थिती खूपच बिकट आहे हे खरे आहे परंतु विरोधाभास हा आहे की, विदर्भात भरपूर

वीज निर्मिती होत असतानादेखील विद्युतीकरणाचे प्रमाण कमी आहे.

सन २०१०-११ मध्ये, विदर्भात २४,७५७ दशलक्ष ताशी किलोवॅट (दशलक्ष युनिटे) इतकी वीज निर्माण झाली असून ती, महाराष्ट्रातील वीज निर्मितीच्या सुमारे २८ टक्के इतकी आहे. तथापि, त्याच वर्षी विदर्भ प्रदेशामधील एकूण वीज विक्री ही केवळ ११,५५५ दशलक्ष युनिटे इतकी होती आणि ती महाराष्ट्रातील एकूण वीजविक्रीच्या सुमारे १३ टक्के इतकी आहे. ही बाब, वार्षिक दरडोई वीज विक्रीमध्ये दिसून आली आहे. सन २०१०-२०११ या वर्षामध्ये विदर्भातील दरडोई वीज विक्री ही, महाराष्ट्राच्या सरसरीच्या (७७४ युनिट) सुमारे ६५ टक्के इतकी (५०२ युनिटे) होती.

९.३.३.६ विदर्भ प्रदेशामध्ये औष्णिक वीज केंद्रे स्थापन करण्याचा अपेक्षित भार

राज्य क्षेत्राकडे औष्णिक वीज केंद्रांचा मोठा हिस्सा असताना, विदर्भ प्रदेशाच्या क्षमतांमध्ये भर घालण्यासाठी खाजगी क्षेत्र वेगाने पुढे येत आहे. वर्धा पॉवर, ग्रॅन्डी मल्लिकार्जुन राव (जीएमआर) लॅन्को आयईपीएल, इंडिया बुल्स या व्यापारी तत्त्वावर वीज निर्माण करण्याची शक्यता असलेल्या काही प्रमुख कंपन्या आहेत. या सर्व कंपन्यांनी, चंद्रपूर, नागपूर, अमरावती, गोंदिया, व वर्धा या जिल्हयांमध्ये आपले लक्ष केंद्रित केले आहे. या प्रकल्पांमुळे प्रतिकूल सामाजिक व पर्यावरणीय परिणाम होण्याची शक्यता आहे.

९.३.३.७ प्रदूषणात वाढ

चंद्रपूर औद्योगिक क्षेत्राचे वर्चस्व असलेल्या विदर्भ प्रदेशाला (विशेषत: खाणकाम, औष्णिक वीज प्रकल्प, सिमेंट उद्योग इत्यादी असलेल्या क्षेत्रांमध्ये) प्रदूषणाच्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत असून, पर्यावरण व वन मंत्रालयाने २०१० मध्ये या प्रदेशाला भारताचा सर्वाधिक चौथा प्रदूषित औद्योगिक समूह म्हणून वर्गीकृत केले आहे. हवा, जल व भूमी प्रदूषणाचा विचार करून गणना केलेल्या सर्वसमावेशक पर्यावरणीय प्रदूषणनिर्देशांकाच्या आधारे हे वर्गीकरण केले आहे. कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्प, कोळसा खाणी, सिमेंट प्रकल्प आणि पोलाद व लोह उद्योग हे मोठया प्रमाणात असल्यामुळे व हे उद्योग सर्वाधिक प्रदूषण करणारे उद्योग मानले जात असल्यामुळे या प्रदेशाचा सर्वसमावेशक पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक सर्वाधिक आहे असे म्हणता येऊ शकेल.

विद्यमान प्रकल्पांना लागणाऱ्या कोळशाच्या स्त्रोतासंबंधीतील माहिती उपलब्ध असून येऊ घातलेल्या ४१,१९५ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांपैकी कोळशावर आधारित असलेल्या १३,५४५ मेगावॅट औष्णिक क्षमतेच्या प्रकल्पांना पर्यावरणीय मान्यता देण्यात आलेली आहे. या १३,५४५ मेगावॅट क्षमतेपैकी, केवळ ४२० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पात वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (स्थानिक स्त्रोत) यामधील कोळशाचा वापर करण्यात येईल. १,९२० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज प्रकल्पामध्ये वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड तसेच सीआयएलच्या इतर दुय्यम कंपन्यांमधील (दूर अंतरावर असलेल्या) कोळशाचा वापर करण्यात येईल, आणखी ९,०९० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज प्रकल्पामध्ये दूर अंतरावर असलेल्या सीआयएलच्या इतर दुय्यम कंपन्यांमधील (साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड, महानदी कोलफिल्ड मर्यादित) कोळशाचा आणि महाराष्ट्र आणि ओरिसातील ताब्यात असलेल्या काही खाणींमधील कोळशाचा वापर करण्यात येईल. यामुळे विदर्भातील औष्णिक वीज प्रकल्पांमधून स्थानिक साधनसंपत्तीच्या आधारे स्थानिक विकास झाल्याचे दिसून येते या मूळ म्हणण्याला छेद दिला जातो.

९.३.३.८ वीज प्रकल्पांमधील समस्या दूर करण्यासाठी काही सूचना

१. सध्याच्या वीज प्रकल्पांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी व त्यांच्या निर्मितीच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटरच्या (ईएसपी) जागी बॅग फिल्टर तंत्रज्ञानाचा वापर

करावा. यामुळे चिमणीतून बाहेर पडणाऱ्या राखमिश्रित कणांमध्ये घट होईल. चिमणीतून धूरमुक्त वायूंचे उत्सर्जन करण्याबाबत सांविधिक अट घातली पाहिजे.

२. राखेची विल्हेवाट लावण्यासाठी व तिचा वापर करण्यासाठी नवीनतम आधुनिक आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान वापरण्यात आले पाहिजे. नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या, मुख्य भाग असलेल्या राख निर्माण होणाऱ्या ठिकाणी राखेचा वापर करणारे कारखाने स्थापन करण्यासाठी पुढे आल्या आहेत. यामुळे स्थानिक लोकांना संभाव्य रोजगार मिळणार आहे. राखेचा वापर सिमेंट निर्मिती करणे, खडी तयार करणे (रस्त्यांसाठी वापर करणे) आणि कालव्याचा दर्शनी भागाचा स्तर (पाण्याची गळती कमी करणे) यासाठी सुद्धा होऊ शकतो.

३. असे लक्षात आले आहे की, कृषि जमिनीतून अति उच्च व्होल्टेजच्या वीजवाहिनी टाकण्यासाठी पारेषण छन्नमार्ग वापरल्यामुळे जवळजवळ अनेक हेक्टर जमीन निरूपयोगी झाली आहे. अशा छन्नमार्ग असलेल्या जमिनीला ताबडतोब पुरेशी भरपाई दिली नाही. असे सुचविण्यात येते की, अशा जमिनीच्या मालकाला अशा नुकसानीसाठी नुकसान भरपाईचे भाडे म्हणून वार्षिक संयुक्तिक रक्कम देण्यात यावी.

४. आपण फक्त औष्णिक वीज निर्मितीबाबत बोलत असताना व सौर ऊर्जा, पवन उर्जा, जीवाष्म ऊर्जा इत्यादी पुन्हा सुरू करण्यासारख्या ऊर्जा साधनांपासून वीजेचा वापर करण्याची वेळ आली आहे. ग्रामीण क्षेत्रात "निर्मिती वितरणांची" कल्पना आर्थिकदृष्ट्या स्वीकारू शकतात. यथोचितरित्या गॅसिफीड जीवाष्म ऊर्जा वापरण्यासाठी २५० किलोवॅट/ ५००किलोवॅट/ १००० किलोवॅटचे लहान वीज प्रकल्प चालू केले पाहिजेत. मोठ्या लाभासाठी तूस, चिपाड, टाकाऊ कापूस व स्थानिक टाकाऊ कृषि उत्पादने यासारखी जिवाष्म ऊर्जा वापरू शकतात. भुकटीच्या स्वरूपातील हे स्थानिक इंधन, ऊर्जा निर्मिती करू शकते हे लक्षात घेता निर्माण केलेला गॅस घरगुती वापरासाठी ग्रामीण सामान्य लोकांद्वारे वापरात येऊ शकतो. २५० किलोवॅट/५०० किलोवॅटच्या छोट्या सौर ऊर्जा प्रकल्पांचा सुद्धा विचार होऊ शकतो. विदर्भ क्षेत्रात वर्षातील ३०० दिवस प्रखर सूर्यप्रकाश असल्याने सौर किरणाची उच्च तीव्रता वीजेमध्ये परिवर्तित करू शकतो. जीवाष्म ऊर्जा निर्मिती सह सौर फोटोव्होल्टेइक (पीव्ही) ऊर्जा निर्मिती यांच्या संकरित संयोगाने दर दिवशी चोवीस तास वापरासाठी पुरेशी उर्जा निर्मिती होऊ शकते. स्वाभाविकपणे शेतकऱ्यांना दिवसा त्यांचे पंप चालविणे शक्य होईल अन्यथा ज्यावेळी सर्व ग्राहकांच्या जास्तीच्या आवश्यकतांमुळे त्याच्या परिणामी होणाऱ्या भार नियमनामुळे ग्रीडमधून ऊर्जा मिळणे शक्य होत नाही.

५. जे रस्ते खाणी व औष्णिक ऊर्जा प्रकल्प यासाठी कोळसा, राख, अन्य मालाची वाहतूक करण्यासाठी वापरतात ते रस्ते अवाढव्य ट्रकांमुळे केवळ खराब होत नाही तर लोकांसाठी ते असुरक्षित होतात त्यामुळे स्थानिक वाहतुकीसाठी रस्ते वेगळे करणे.

या सूचनांची अंमलबजावणी ही, विदर्भ प्रदेशाचा योग्य दिशेने विकास करताना, समतोल साधणे, सुशासन प्रक्रिया व पुढाकार घेणे असा ऊर्जा नियोजनाचा दृष्टीकोन आणि सामाजिक व पर्यावरणीय दृष्टीकोन या दोन्हींची तातडीची गरज, यांना अनुलक्षून राहील.

९.३.४ मराठवाडा प्रदेश

१९६० साली औरंगाबादमध्ये औद्यागिकीकरणाला सुरूवात झाली त्यानंतर १९७० मध्ये 'चिखलठाणा औद्योगिक वसाहत' व मागच्या दशकात जालना येथे सुरूवात झाली. या औद्योगिक वसाहतीत अनेक लहान व मध्यम उद्योग सुरू झाले. सुरूवातीच्या काळात शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या विविध प्रोत्साहक योजनांमुळे अनेक बाहेरील

उद्योग आकर्षित झाले. तथापि, कालांतरांनंतर त्यांचे स्वारस्य कमी झाले आणि अनेक उद्योग बंद पडले.

१९८० मध्ये 'वाळुंज औद्योगिक वसाहत' राज्य शासनाच्या पुढाकारामुळे स्थापन करण्यात आली होती. बजाज ऑटो व व्हिडीओकॉन या सारख्या प्रमुख उद्योगाच्या उपस्थितीमुळे प्रदेशाचा चेहरामोहरा बदलून गेला आणि अनेक सहाय्यभूत युनिटे अस्तित्वात आली व औरंगाबाद येथे उद्योजक आपले पाय पसरू लागले. महत्वाकांक्षी जायकवाडी धरणाने औरंगाबाद आणि जवळपासच्या ठिकाणी असलेल्या औद्योगिकीकरणासाठी वरदान असल्याचे सिद्ध केले.

१९९० पासून औरंगाबाद हे मोटारगाड्यांचे केंद्र बनले आहे व या शहरातील उद्योगातून ५२ विविध देशांमध्ये माल निर्यात होत आहे. याव्यतिरिक्त एल्लोरा मुळे हे शहर देशातील महत्वाचे पर्यटन स्थळ देखील आहे.

पुढील दशक हे ठराविक प्रमाणात प्रगती होणारे दशक म्हणून समजण्यात यावे. अनेक लघु उद्योगांची प्रगतशील मध्यम आकाराच्या उपक्रमात वाढ झाली आहे.

स्थानिक उद्योजक परिणामक व कार्यक्षम नियंत्रण प्रणालीच्या अंमलबजावणीद्वारे प्रगतीच्या मार्गाने चालले आहेत. चालू घडामोडी पाहतेवेळी असे दिसून येते की, कल्पना करता येईल की, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॅरिडॉर सुरू होईल आणि त्यामुळे २०२० मध्ये या क्षेत्राच्या विकासाने ठरीव प्रमाणात उसळी घेतली असेल. प्रगतीची प्रक्रिया ही सतत चालू असेल आणि औरंगाबाद-जालना हा राज्याचा महाऔद्यागिक पट्टा म्हणून विकसित होऊन समतोल राखला जाणार आहे.

मराठवाडा औद्योगिकीकरणाच्या संदर्भात तीन वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात विभागला जाऊ शकतो.

१. **विकसित प्रदेश :**

औरंगाबाद व जालनामध्ये, औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानासंबंधीची कार्ये, मोटार गाड्या, अभियांत्रिकी, औषधनिर्माणक, कृषी बियाणे संशोधन व विकास, मद्य, बांधकाम, स्टील, कापूस इत्यांदीसारखे वस्तु निर्माण व्यवसाय याचे सान्निध्य अनुभवता येऊ शकते. तेथे स्थैर्य व प्रगतीच्या दृष्टीकोनासह, विशेष संख्येने मध्यम व मोठे त्याचबरोबर लघु व सूक्ष्म व्यवसाय आहेत. हे व्यवसाय महत्वाची रोजगार निर्मितीसाठी संधी निर्माण करीत आहेत.

२. **विकसित होत असलेला प्रदेश :**

लातूर, उस्मानाबाद व नांदेड येथे पुरेशा औद्योगिक पायाभूत सुविधा, चांगली संयोजकता व उत्तम पाण्याची उपलब्धता आहे. उद्योजकांनी या क्षेत्रात उद्योग सुरु करण्यासाठी याअगोदरच काही प्रमाणात पुढाकार घेतलेला आहे. तथापि, या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात औद्योगीकरणाची कमतरता आहे. आणखी राजकोषीय प्रोत्साहनासह पायाभूत सुविधांचा विकास करून या क्षेत्रातील उद्योग वाढीसाठी व्यावसायिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

३. **अविकसित प्रदेश :**

जरी तेथे औद्योगिक वसाहती असल्यातरी केवळ काही उद्योग बीड, परभणी व हिंगोली येथे अस्तित्वात आहेत. त्यातले काही उद्योग जे चालू आहेत ते कृषिप्रक्रिया विषयक स्वरूपाचे काम करतात आणि त्यांचे कामाचे प्रमाण खूपच कमी आहे. म्हणून या क्षेत्रात मोठे मूल्यवर्धन झालेले नाही किंवा मोठ्या रोजगाराची संधी नाही. यामुळे मराठवाड्यात समतोल औद्योगिक विकासासाठी मोठे आव्हान असल्याचे दिसून येते.

९.३.४.१ कृषि उद्योगावर लक्ष केंद्रीत करणे

कृषि उद्योगावर जोर दिल्यास शेतकऱ्यांची उत्पादकता व उत्पादन त्याचबरोबर या उद्योगाला आवश्यक असलेल्या लहान व्यवसाय व सेवा यांकरिता संधी देण्याची संपूर्ण व्यापकता तयार करावी. नवीन शेतकरी उद्योजकांना नव्या व्यवसायाकडे वळणे किंवा त्याच्या परिस्थितीशी निकट संबंधित नवीन व्यवसाय किंवा सेवा यांकडे जाण्यास अधिक सोपे होईल. हा भविष्यवेध साधण्यासाठी, उद्योगासह कृषिविषयक कामांशी दुवे स्थापन करणे, वाढवणे व विस्तार करणे याबाबतचे औद्योगिक धोरणाचे लक्ष हे कठोर असावे. जिल्ह्याच्या औद्योगिक धोरणात पुढील मुद्दे योजने आवश्यक आहे.

उच्च मूल्यांच्या परंपरेकडे वळणे :

कृषि पीके आणि वापरकर्त्याची प्रक्रिया युनिटे यामधील उत्तम मूल्य साखळी बनण्याचे साध्य करताना कृषि पिकांपासून प्रक्रिया युनिटे या पर्यंतचे दुवे व त्यापुढे बाजारा पर्यंतचे दुवे निश्चितपणे प्रस्थापित केले पाहिजेत. कृषिविषयक/ उत्पादक/ पुरवठाकार, वित्तीय मध्यस्त व वापरकर्ता युनिटे यांना एकत्र आणून एकात्मीकृत रितीने हे दुवे निर्माण करण्यासाठी व त्यांना बळकटी आणण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), अग्रणी बँक, कृषि महाविद्यालये व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांनी एकत्रितपणे योजनेचा विकास केला पाहिजे. मराठवाड्यातील उस्मानाबाद हा एक जिल्हा आहे जो नमूद केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यास सामर्थ्यशील आहे आणि कृषि उद्योगासाठी राज्याचे कला केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) नवीन क्षेत्र हे विनिर्दिष्ट "कृषि संस्करण उद्योगासाठी" वाटपापूर्वी दिलेले असू शकते आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संपूर्ण पायाभूत सुविधा म्हणजेच वीज, वाहतूक, गोदामे व शीत गृहे, मूळचाचणी या, त्या विशिष्ट अन्न संस्करण क्षेत्राच्या विनिर्दिष्ट आवश्यकता असल्याचे योजले पाहिजे. बाजाराशी घटक संबधही जवळच्या सान्निध्यात स्थापन केले पाहिजे. जिल्ह्यात चार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळे आहेत त्यापैकी फक्त एक उस्मानाबाद येथे विकसित झाले आहे. उर्वरित उमेरगा, भूम व कळंब येथील तीन मंडळे अद्याप विहित रीतीने विकसित होत आहेत. भूमी संपादन, पाणी पुरवठा, वीज जोडणी इत्यादीसारखी संबंधित कामे प्रगतीपथावर आहेत. विविध गटातील औद्योगिक क्षेत्रांचा/वसाहतींचा विकास करण्यासाठी विविध स्तरावर प्रलंबित असलेले सर्व प्रस्ताव तात्काळ निकालात काढण्याची आवश्यकता आहे.

पुढीलप्रमाणे समर्पित विशेषीकृत अन्न संस्करण पार्क उभारता येतील.

- ज्वारीपासून होणारी उत्पादने,
- फळे, तेलबिया व रस, सोयाबिन व सोया उत्पादनांचे संस्करण,
- दुध व दुग्धजन्य उत्पादने

हिंगोली जिल्ह्यात कृषिवर आधारित उद्योगांकरिता विविध भागांसाठी आणि त्यातही त्यात विशेषकरून जास्त सोयाबिनसाठी समूह दृष्टिकोन आहे. हा दृष्टिकोन चांगल्या प्रकारे संकलन केलेले अन्न व अन्न संस्करण उद्योग सिद्धीस नेण्यासाठी पद्धतशीर रीतीने शेती व संस्करण तंत्रज्ञानाचा दर्जा वाढविण्यास आणि गुणवत्ता व उत्पादकता सुधारण्यास, पणन व चिन्हांकन (ब्रँडिंग) यांना आधार देण्यास आणि शेतकरी, उद्योजक व कामगार यांना प्रशिक्षण देण्यास सहकार्य करील. जिल्ह्यातील विवक्षित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळे केवळ अन्न संस्करण समूहासाठी राखून ठेवता येतील त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये, सामान्य पायाभूत सुविधा उपलब्ध असतील.

१. वस्त्रोद्योगाच्या संबंधातील सर्व तंत्रज्ञान हे, या क्षेत्रातील जागतिक नेतृत्व प्राप्त करण्यासाठी, अति महत्वाचे आहे. वस्त्रोद्योग हा देशातील एक प्रमुख उद्योग आहे, असे असले तरी, गुणवत्तेनुसार येथे जागतिक दर्जाची वस्त्रनिर्मिती करण्याच्याबाबतीत अद्याप फार मोठे अंतर आहे. कपड्याचे उत्पादन करण्यापासून ते कपड्याच्या गुणवत्तेपर्यंतचे संस्करण, तंत्रज्ञान, कपड्याचा उत्पादनोत्तर अत्यंत उत्तम दर्जा राखणे, याबाबत भारत हा उर्वरित जगाच्या मागे आहे आणि तो सतत वेगाने मागेच पडत चालला आहे. हिंगोली सारखा लागवडीखाली जमीन न आलेला (व्हर्जिन) जिल्हा, या जिल्ह्यात स्थित असलेल्या, वस्त्रनिर्मितीमध्ये उपयुक्त ठरणाऱ्या साखळीतील कोणत्याही युनिटला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्याबरोबरच जागतिक दर्जाचे वस्त्रनिर्माण पार्क किंवा वस्त्रनिर्माण जिल्हा म्हणून उभी राहण्याची संधी देत आहे. जर राज्य शासनाने परभणी-हिंगोली व वाशीम चा प्रत्येक जिल्ह्याकरिता विशेष धोरणात्मक योजनांची घोषणा करून हा संपूर्ण प्रदेश 'वस्त्रोद्योग क्षेत्र' म्हणून घोषित केल्यास उपयोगाचे होईल.

२. खासकरून कापूस वटणी व दाबणी यंत्रांचा दर्जा वाढविण्याकरिता आधुनिक पर्यावरणस्नेही व आरोग्याला उपकारक अशी यंत्रसामग्री उभारणे आणि एखाद्या संबंधित उद्योगातील सध्याच्या यंत्रसामग्रीच्या जागी नवीन यंत्रसामग्री बसवण्यावरील कोणताही खर्च यांकरिता तंत्रज्ञान निधी उभारण्यात यावा. केंद्राने अलीकडे जाहीर केलेल्या रुपये १४०० कोटींच्या तंत्रज्ञान निधीतून राज्याने जिल्ह्याकरिता विशेष नियत वाटप मागितले पाहिजे.

३. वस्त्रनिर्माण, अन्न प्रक्रिया, फलोत्पादन व सोया-आधारित उत्पादने यांसारख्या शेतीवर आधारित क्षेत्रांमध्ये, उपायात्मक व धोरणविषयक उपक्रमांवर भर देण्यात यावा. हिंगोली, परभणी व वाशिम हे जिल्हे जवळ जवळ असल्याकारणाने, या तीनही जिल्ह्यांकरिता हे उपक्रम एकत्रितपणे राबवावे लागणार आहेत, असे असले तरी, विशिष्ट क्षेत्र संधीचे मूल्यमापन करण्यापूर्वी, आपणास जिल्ह्यातील उद्योगाला भेडसावणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला पाहिजे.

४. कापूस वटणी व दाबणी उद्योगाकरिता विखंडित व पर्याप्त वीज पुरवठा सुनिश्चित केला गेला पाहिजे.

९.३.४.२ औषधनिर्माण विद्याविषयक केंद्र :,

६० हून अधिक औषधनिर्माण विद्याविषयक युनिटे आणि अनेक औषधनिर्माणविद्याविषयक मोठया कंपन्या असलेले औरंगाबाद हे एक मुख्य औषधनिर्माणविद्याविषयक केंद्र आहे.

संयुक्त राज्ये, अन्न व औषधिद्रव्ये प्रशासन मान्यताप्राप्त असलेल्या ५ कंपन्या या शहरात आहेत, ही या शहरासाठी अभिमानास्पद गोष्ट असून या शहरानेच ही कामगिरी बजावली आहे. अधिक संख्येने उत्तम दर्जा असलेली औषधनिर्माणविद्या पदवी/पदविका महाविद्यालये आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा रासायनिक तंत्रज्ञान विभाग यांमुळे, औषधनिर्माणविद्याविषयक केंद्राच्या निरंतर वाढीसाठी, गुणवत्तापूर्ण व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे.

९.३.४.३ सौर ऊर्जा :

सौर ऊर्जा क्षेत्रातील अलीकडच्या तंत्रज्ञानविषयक प्रगतीमुळे सौर साधनसंपत्तीची नैसर्गिक देणगी लाभलेल्या मराठवाडा प्रदेशाला उपायात्मक धोरणविषयक संधी प्राप्त होते. यथायोग्य धोरणे अवलंबल्यास सौर ऊर्जा हा मराठवाड्याच्या औद्योगीकरणात क्रांती घडवणारा घटक ठरू शकेल. इंधनाधारित औष्णिक वीजनिर्मितीच्या तुलनेत हे तंत्रज्ञान सापेक्षतेने खूपच कमी प्रमाणात पाणी ग्रहण करणारे आहे आणि म्हणून, मराठवाड्यासाठी विशेषकरून ते योग्य आहे. प्रकल्प सुरु होऊन पूर्णत्वास येईपर्यंत आवश्यक असलेला

कालावधीही तुलनेने कमी आहे. महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर आपले सौर ऊर्जा धोरण जाहीर करावे अशी समितीने शिफारस केली आहे. तामिळनाडू, राजस्थान, गुजरात यांसारख्या अनेक राज्यांमध्ये असे उपक्रम यशस्वी झाल्याची उदाहरणे आहेत.

९.३.४.४ शिफारशी :

दीर्घकालीन विकासाचा दृष्टिकोन बाळगण्याच्या हेतूने, रस्ते, उड्डाण पूल, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, जलनिस्सारण, वाहतूक आगार, क्रीडा संकुल, व्यापार केंद्रे, पर्यटन आकर्षणे व शहराचा हरीत पट्टा यांकरिता एक स्वतंत्र औरंगाबाद प्रादेशिक विकास प्राधिकरण स्थापन करण्याची गरज आहे.

प्रदेशाची अंगभूत क्षमता वापरण्याच्या दृष्टीने या प्रदेशाच्या औद्योगिक प्रगतीकरिता एक केंद्रीभूत विकास योजना आवश्यक आहे.

१. शेंद्रा २ व जालना ३ मध्ये औद्योगिक वसाहत उभारून औरंगाबाद-जालना हा औद्योगिक पट्टा म्हणून विकसित करावा.

२. मराठवाड्याच्या सर्व औद्योगिक वसाहती या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टला (जेएनपीटी) चार पदरी मार्गांनी जोडण्यात याव्यात.

३. माहिती तंत्रज्ञान उद्योग हा उद्योगांपैकी असा एक भाग आहे की तो जलद गतीने प्रस्थापित होतो. या उद्योगामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक कुशल व्यक्तींना रोजगार मिळू शकतो. प्रादेशिक समतोल साधण्यामध्ये हा उद्योग सहाय्यभूत ठरेल.

४. मराठवाड्याच्या औद्योगिक विकासास चालना देण्याच्या बाबतीतील महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेच्या शिफारशींना समिती मान्यता देते.

९.३.५ उर्वरित महाराष्ट्रातील औद्योगीकरण :

उर्वरित महाराष्ट्रामध्ये धुळे, नंदुरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व या प्रदेशातील अनेक दुष्काळप्रवण तालुके औद्योगिक विकासामध्ये मागे पडलेले आहेत. यातील प्रत्येक जिल्ह्याची स्वत:ची क्षमता व तौलनिक उपयोग आहे.

धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये कापूस लागवड सुस्थापित झालेली आहे. नंदुरबार जिल्ह्यामध्ये कापसाचे हेक्टरी उत्पादन उच्चतम आहे. या प्रदेशामध्ये वस्त्रनिर्माण उद्योग वाढवणे शक्य असेल. या जिल्ह्यांना दिल्ली-मुंबई व मुंबई-नागपूर द्रूत मार्गांच्या विकासाने लक्षणीय लाभ होईल. हे दोन्ही जिल्हे गुजरात व मध्य प्रदेश या शेजारील राज्यांशी व्यापारदृष्ट्या अगोदरच जोडले गेलेले आहेत. औद्योगिक विकास गतिमान व्हावा म्हणून या जिल्ह्यांच्या तौलनिक उपयोगाचा कापूस लागवडीकरिता फायदा करून घेणे इष्ट ठरेल.

धुळे हे अगोदरच महाराष्ट्राचे कुक्कुटपालन क्षेत्र म्हणून उदयाला आले आहे. या जिल्ह्यामध्ये दूध उत्पादन व दूध प्रक्रिया युनिटे विकसित करणे शक्य होईल. अशीच संभावना जळगाव जिल्ह्याच्या बाबतीतदेखील आहे. हा जिल्हा अगोदरच विशेषत: डाळी व मिरच्या यांच्याबाबतीतील मुख्य अन्न प्रक्रिया केंद्र म्हणून, उदयाला आला आहे. हा स्तर आणखी वाढविता येईल. जळगाव हा भारताचा एक मुख्य केळी उत्पादक जिल्हा आहे. तो एक मुख्य फळ प्रक्रिया केंद्र म्हणून उदयास येईल. या जिल्ह्याला लोहमार्गाचे जाळे आणि उत्तर भारतातील प्रदेशांबरोबर सुस्थापित आंतर-राज्य व्यापार यांमुळे फायदा होऊ शकेल.

अशाच प्रकारच्या फलोत्पादन व मत्स्य उत्पादन प्रक्रिया व्यवसायाच्या क्षमता कोकण क्षेत्रात आहेत. उर्वरित महाराष्ट्राशी पूर्वेकडील भाग रस्त्याच्या जाळ्यांनी जोडण्याची प्रक्रिया गतिमानतेने व विस्तारपूर्वक व्हावी, अशी आम्ही शिफारस केली आहे. अशा विकसित रस्त्यांच्या जाळ्यांमुळे कोकणातील प्रक्रियाकृत मत्स्य व बागायती उत्पादनांकरिता बाजारपेठा व संधी विस्तारित होतील. राज्य शासनाने, अनेक प्रकारची फळे हाताळण्याची क्षमता

असलेली सामूहिक अन्न प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यास उत्तेजन द्यावे. कोकण हा प्रदेश विविध प्रकारच्या औषधी वनस्पती व वृक्ष संपदेने समृद्ध आहे. यापैकी अनेक वनस्पती जंगलांमध्ये निसर्गत: विपुल प्रमाणात उगवतात. अशा अनेक औषधी वनस्पतींची लागवड करता येईल व कंत्राटी शेतीच्या व्यवस्थांद्वारे त्यांवर प्रक्रिया करता येईल. पर्यटन व शिक्षण यांमधील विकास हा औद्योगिक विकास प्रक्रियेला अधिक पूरक ठरेल.

९.४ भविष्यातील औद्योगीकरणाकरिता उदयोन्मुख मार्ग :

दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गामुळे महाराष्ट्रात या मार्गाच्या केंद्रस्थानी आणि त्यांच्या जवळपास असलेल्या प्रदेशांकरिता एक फार मोठी संधी प्राप्त होईल. राज्याने या प्रदेशांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची सुनिश्चिती करून दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गाचा फायदा करून घेणे गरजेचे आहे.

या प्रस्तावित दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गामध्ये १४८३ कि.मी. अंतर समाविष्ट असलेल्या, राष्ट्रीय राजधानी 'दिल्ली' पासून ते आर्थिक राजधानी 'मुंबई' पर्यंतच्या अत्याधुनिक वाहतूक मार्गाची तरतूद असेल आणि तो दिल्ली, उत्तर प्रदेश, हरयाणा, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश व महाराष्ट्र या राज्यांतून जाईल. यामुळे भारतातील औद्योगीकरणाची परिमाणे, दिशा व गती यांत बदल होणार आहेत. मुंबई-दिल्ली रेल्वे मार्ग हा 'निर्देश रेषा' म्हणून समजण्यात येत आहे आणि रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूंकडील अंदाजे २०० कि.मी. क्षेत्र हे दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गाचा पट्टा म्हणून समजले जात आहे आणि या क्षेत्रासाठी व्यूहशास्त्रीय चौकट तयार करण्याकरिता नियोजन केले जाईल. दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गाच्या लाभक्षेत्रामध्ये ७ राज्यांतील २२ औद्योगिक वसाहती, ९ वाहतूक इष्ट स्थाने, ६ विमानतळे व ३ सागरी बंदरे यांचा समावेश आहे. दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गांतर्गत येणाऱ्या एकूण क्षेत्रापैकी राजस्थानचे ३९ टक्के, गुजरातचे ३८ टक्के आणि महाराष्ट्र व हरयाणा यांचे प्रत्येकी १० टक्के क्षेत्र समाविष्ट होते. धुळे, औरंगाबाद, नाशिक व पुणे ही दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गाची महाराष्ट्रातील लाभ क्षेत्रे आहेत.

दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्ग हा प्रकल्प पुढील दृष्टिकोन व उद्दिष्टे ठेवून कार्यान्वित करण्यात येत आहे :-

१. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक असणे;

२. अत्याधुनिक पायाभूत सुविधा पुरविणे;

३. स्थानिक उद्योगधंद्यांना हितावह वातावरण देणे;

४. मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, आणि

५. पुढील ५ वर्षांत रोजगाराच्या संधी दुप्पट करणे, उत्पादन तीन पट व चार पट वाढवणे, निर्यातीत चार पट वाढ करणे.

औरंगाबाद व धुळे हे मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील आर्थिक दृष्ट्या मागास प्रदेश असल्याकारणाने दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गामध्ये या प्रदेशांचा अंतर्भाव होणे हे वरदानच आहे. औरंगाबाद प्रदेशाला राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र योजनेचादेखील लाभ मिळालेला आहे. या योजनेअंतर्गत, दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्ट्यात समाविष्ट झालेली ८ शहरे अत्युत्तम शहरे ("स्मार्ट शहरे") म्हणून विकसित करण्याकरिता निश्चित करण्यात आली आहेत. औरंगाबाद-शेंद्रा या आठ शहरांपैकी एक आहे. दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा प्रकल्पाबरोबरच राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र योजना, औरंगाबाद शहराच्या औद्योगिक, वाणिज्यिक व निवासविषयक विकासामध्ये 'दुहेरी विकास-गतीवर्धक' म्हणून कार्य करू शकेल.

दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा व राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र ह्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील मागास प्रदेशांमध्ये गतिमान, स्थिर व निश्चित स्वरूपाचा विकास करण्याची उत्कृष्ट संधी आहे, आणि म्हणून, महाराष्ट्र शासनाने, ह्या संधीकडे एक चांगल्या उपायात्मक धोरणाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे आणि त्यानुसार, दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा व राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र या प्रकल्पांना पूरक म्हणून राज्य औद्योगिक धोरणे, उपायात्मक तंत्रे व कृति आराखडे तयार करावेत, जेणेकरून ह्या निश्चित केलेल्या क्षेत्रांना परिणामकरीत्या लाभ होईल. त्याचवेळी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या इतर आसपासच्या अतिरिक्त क्षेत्रांनाही हे लाभ मिळावेत यासाठी त्याबाबत सखोल अभ्यास करण्यात यावा.

महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील सर्व प्रदेशांचा समतोल विकास होण्यावर कार्य करीत असले आणि १९८१ पासून मागास

प्रदेशांवर विशेष लक्ष केंद्रित करीत असले तरी, मराठवाडा प्रदेशाच्या ८ जिल्ह्यांपैकी केवळ एकच, म्हणजे औरंगाबाद जिल्हा हा महाराष्ट्राच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या व मानव विकास निर्देशांकाच्या जवळ आहे. उर्वरित जिल्हे हे राज्य सरासरीहून खूपच खाली आहेत. गेल्या ३ दशकांमध्ये, औद्योगीकरण व व्यापार विकास यांमुळे औरंगाबाद शहराचा चार पट विकास झालेला आहे. परिणामी, जादा रोजगार, उच्चतर महसूल व सुधारित पायाभूत सुविधा या जिल्ह्याला मिळालेल्या आहेत. रगड पैसे मिळवून देणाऱ्या या घटकामुळे औरंगाबाद जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक यांमध्ये लक्षणीय वाढ होण्यास मदत झाली आहे. या विकासाचे विशेष श्रेय हे औद्योगीकरणालाच द्यावयास हवे. ही वस्तुस्थिती पाहता, महाराष्ट्र शासनाने दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा प्रकल्पावर भर देवून मागास प्रदेशांना त्याचे अधिकाधिक लाभ मिळवून द्यावेत.

दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा व राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र ह्या प्रकल्पांमुळे प्रदेशाला पुढील लाभ निश्चितपणे मिळतील.

१. उद्योग, व्यापार व निवास यांकरिता जमिनीची उपलब्धता;

२. अत्याधुनिक पायाभूत सोयीसुविधा.

३. बृहत उद्योक व बहुराष्ट्रीय कंपन्या यांना आकृष्ट करणे;

४. शिक्षण व प्रशिक्षण संस्था;

५. संशोधन व विकास संस्था आणि असे अनेक लाभ;

या लाभांमुळे उलट औरंगाबाद प्रदेशात व दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्ट्यामध्ये पुढील संधी निर्माण होणार आहेत:

१. मोटार, उद्योग विकास (ऑटोमोटिव्ह) व अभियांत्रिकी संकुल;

२. मोटार व अभियांत्रिकी युनिटांच्या अस्तित्वामुळे सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रमांसाठी मोठ्या संधी व विकास;

३. बी-बियाणे व औषधनिर्माणशास्त्र उद्योगांकरिता संशोधन व विकास;

४. प्रक्रिया उद्योगांकरिता संशोधन व विकास;

५. अन्नपदार्थांचे आवेष्टन व वितरण;

६. कच्च्या मालाच्या, जसे की कापसाच्या उपलब्धतेचा विचार करता वस्त्रनिर्माण उद्योगाकरिता संधी;

७. इलेक्ट्रॉनिक उपभोग्य टिकाऊ उत्पादनांचा खप या प्रदेशातील अतिउत्तम असल्याकारणाने, या मालाकरिता संधी;

८. बांधकाम, परिवहन, कच्चामाल पुरवठा, उपभोग्य वस्तुंचा पुरवठा, हॉटेल व उपहारगृह, प्रशिक्षण इत्यादींसारख्या सहाय्यभूत सेवांकरिता अत्युत्तम संधी.

या सर्व संधीचा लाभ उठवण्याच्या व उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने, प्रदेश आज तेवढा सज्ज ठेवण्यात आलेला नाही. तथापि, राज्य शासनाने या संधीकरिता प्रदेश सज्ज होण्याच्या उद्देशाने स्थानिक उद्योजकांना अधिकाधिक प्रशिक्षण सुविधा देण्याकरिता उपक्रम हाती घेतले पाहिजेत. जर राज्य शासनाने कार्याभिमुख पद्धतीने काम केले, या संधीकरिता नियोजन केले आणि ते नियोजन परिणामकरीत्या अंमलात आणले तर, प्रदेशाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या स्वरूपात महत्त्वपूर्ण लाभ होईल तसेच राज्याचे स्थिर दीर्घकालीन विकासाचे उद्दिष्ट देखील साध्य होईल.

राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र योजनेमुळे औरंगाबादला विशेष लाभ होणार आहे. या योजनेमध्ये औद्योगिक वसाहतींबरोबरच वाणिज्यिक आस्थापना व निवासी वसाहतीदेखील नियोजनबद्ध व संघटित पद्धतीने निर्माण करण्यात आल्या पाहिजेत. सामान्यत: असे अनुभवास येते की, औद्योगिक क्षेत्र हे चांगले विकसित होते. मात्र या औद्योगिक क्षेत्रांच्या अवतीभवती आपल्या सोयीनिशी निवासी वसाहती व वाणिज्यिक आस्थापना वसवल्या जातात. काही काळ लोटल्यावर, अशा नियोजनशून्य अपुऱ्या सोयी असलेल्या निवासी वसाहती व वाणिज्यिक आस्थापना या, प्रदेशाचा आणखी विकास करण्यासाठी आव्हाने निर्माण

करतात कारण त्यामुळे अडथळे निर्माण होतात व प्रदेशाचे दयनीय चित्र रेखाटले जाते आणि या कारणामुळे उच्चशिक्षित व प्रशिक्षित कर्मचारीवर्ग आणि अत्यंत कौशल्यपारंगत संघटना या अपुऱ्या सोयीनिशी वसलेल्या क्षेत्रांना पसंती देत नाहीत. राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र या योजनेद्वारे औरंगाबाद हे अत्युत्तम शहर प्रकल्पाच्या कक्षेत येईल आणि हा प्रकल्प गुंतवणूकदारांसाठी मोठे आकर्षण असेल.

राज्य शासनाने, अत्यंत दक्ष राहावे आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे पद्धतशीर, सर्वसमावेशक व निश्चित नियोजन करून, अत्युत्तम शहर प्रकल्पाचा भाग नसलेल्या आसपासच्या प्रदेशांना पूरक ठिकाणे म्हणून खुबीने त्यांच्याशी जोडले पाहिजे. या योजनेचे निर्देश, 'महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण' या नवीन प्रकरणामध्ये दिलेले आहेत.

अशा मोठ्या व असाधारण योजना तयार करताना, संधीबरोबरच आव्हानेदेखील येतात. ही आव्हाने राष्ट्रीय स्तरावरील, राज्य स्तरावरील व प्रादेशिक स्तरावरीलही असतात. त्याचवेळी हेही लक्षात ठेवले पाहिजे की ही आव्हाने राजकीय, प्रशासकीय तसेच सामाजिक स्वरूपाचीही असतात.

दिल्ली–मुंबई औद्योगिक पट्टा प्रकल्प ७ राज्यांमध्ये २२ ठिकाणी राबविण्यात येईल आणि म्हणून वेगवेगळ्या ठिकाणची राजकीय+प्रशासकीय+व्यवसाय+सामाजिक ऊर्जा व कार्यप्रवणता वेगवेगळे असेल. याचा परिणाम प्रत्येक ठिकाणची प्रेरणा, सहभाग, अडथळे, गती व कामाचा दर्जा यांवर होईल.

जपान सरकारचे प्रतिनिधी व उद्योग प्रतिनिधी हे दिल्ली–मुंबई औद्योगिक पट्टा समितीचे घटक आहेत हे जाणीवपूर्वक ध्यानात घ्यावे. हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिनिधी विविध ठिकाणची "ऊर्जा व कार्यप्रवणता" यांचे बारकाईने संनियंत्रण करतील. म्हणून, महाराष्ट्रासारखी उद्योग कौशल्यपारंगत ठिकाणे कार्याभिमुख ठेवून, या प्रकल्पाची सुयोग्य चौकटीत अंमलबजावणी होणे सुनिश्चित करावे.

उपरोल्लिखित मार्गांच्या संदर्भात, प्रदेशाला पुढील आव्हानांना सामोरे जावे लागेल आणि याचा परिणाम दिल्ली–मुंबई औद्योगिक पट्टा आणि राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र या प्रकल्पांच्या यशावर होईल:

१. जमीन संपादन व जमीन मालकांचे पुनर्वसन हा महत्त्वाचा व संवेदनशील विषय आहे. जमिनींच्या मालकांचे योग्य पुनर्वसन होणे, त्यांना उपजीविकेची साधने मिळणे व त्यांना विकासाची संधी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मागील काळात भारताला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले आणि याबाबतीत आपणाकडे क्लेशकारक वारसा आहे. म्हणून, जमीन मालकांचे पुनर्वसन व रोजगाराच्या संधी या प्रशासनाचा व राजकीय निर्णय प्रक्रियेचा औपचारिक व व्यापक भाग असला पाहिजे, जेणेकरून 'सिंगरूर' ची पुनरावृत्ती होणार नाही. "शेतकरी व उद्योग" हे दोन्ही घटक विकासवर्धक व रोजगाराच्या संधी देणारे आहेत. म्हणूनच शेतकऱ्याच्या हिताचे असो वा उद्योगाच्या हिताचे रक्षण असो, ते त्या ठिकाणाच्या "नैसर्गिक गुणांच्या व उपयोगाच्या" आधारे निश्चित करण्यात यावे.

२. सर्वसाधारणपणे, प्रकल्पबाधित व्यक्ती या शेतकरी असतात, म्हणून त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून औद्योगिक रोजगार हा पर्याय निवडल्यास, शिक्षण किंवा व्यावसायिक अर्हता हे एक आव्हान असते. जमीन मालकाचा दर्जा हा मालक म्हणून राखला गेला पाहिजे आणि जमिनीचा एक भाग हा औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी क्षेत्रांकरिता पुन:वाटप करण्यात यावा आणि त्याला किंवा तिला बांधकाम, परिवहन, वखार, सुरक्षा, बागकाम, हॉटेल, दुकाने यांसारख्या सहाय्यभूत सेवांच्या क्षेत्रात उद्योजक म्हणून प्रशिक्षित, प्रेरित व प्रोत्साहित करावयास हवे. यामुळे बाधित व्यक्तींचे सत्वर व राजीखुषीने पुनर्वसन होण्यास मदत होईल.

३. जमिनीची उपलब्धता व आकर्षक योजनांची घोषणा या गोष्टी या प्रदेशामध्ये नवीन व्यवसायांना आकर्षित करण्यास पुरेशा नाहीत. निवास विषयक पायाभूत सुविधा आणि राहणीमान दर्जा हे दोन्ही घटक नवीन गुंतवणुका व रोजगार आकर्षित करण्यास समानरीत्या महत्त्वाचे आहेत. शहरातील अपुऱ्या पायाभूत सोयीसुविधा गुंतवणुकदारांच्या मनात किंतु निर्माण करतात. म्हणून, अशा औद्यागिक प्रकल्पाबरोबरच शहराच्या पायाभूत सुविधांची दर्जावाढ होणे आवश्यक आहे.

४. दिल्ली–मुंबई औद्योगिक पट्टा प्रकल्पामध्ये ज्या रीतीने स्वत:च्या वापरापुरती वीज निर्मिती युनिटांची योजना आहे त्याच

पद्धतीने या प्रकल्पासाठी स्वतंत्र स्वत:च्या वापरापुरती पाणी पुरवठा व्यवस्था करण्याची योजना आखण्यात यावी, जेणेकरून 'शेती विरुद्ध उद्योग' हा वाद टाळता येईल.

५. दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा, राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र, वित्त मंत्रालय, वाणिज्य मंत्रालय यांसारखी बहुविधस्तरीय राज्य व राष्ट्रीय अभिकरणे ही स्थापना व मान्यता प्रक्रियेत सहभागी असतील. मागील अनुभव पाहता, मान्यता प्रक्रियेमध्ये अनेकविध अडथळे असतील आणि उद्योगांना अशा मोठ्या अडथळ्यांना व त्याच्या परिणामी लागणाऱ्या विलंबाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. विलंब कमी करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने एक "उच्चाधिकार एकल खिडकी" समन्वय अभिकरण स्थापन करावे, अशी आम्ही शिफारस करतो.

९.५ "ज्ञानाधारित" उद्योगांकरिता संधी :

महाराष्ट्रात असलेल्या मोठ्या प्रमाणातील उच्च व तंत्र शिक्षण संस्था, संशोधन व विकास आस्थापना आणि महाराष्ट्रातील वैज्ञानिक व तंत्रज्ञाना विषयक मानव साधनसंपत्तीयुक्त वाढते संकुल विचारात घेता, महाराष्ट्र हे, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा, जैव-विज्ञान, जैव-तंत्रज्ञान, नॅनो-तंत्रज्ञान, चिकित्सालयीन संशोधन, रेणू (molecular) संशोधन, अणुविज्ञान इत्यादींमधील संशोधन व विकास आणि तंत्रज्ञानविषयक अभिनव उपक्रम यांच्याकरिता महत्त्वाचे केंद्र ठरू शकेल. या उद्योगांमुळे विकास व रोजगाराच्या लक्षणीय संधी प्राप्त होतात. अजून एक क्षेत्र उदयाला येत आहे, ते म्हणजे संरक्षणविषयक उत्पादन क्षेत्र. ज्ञानाधारित उद्योगांची ही क्षेत्रे हाताळण्याकरिता महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांना लाभलेल्या स्थानीय, संस्थात्मक व मानव साधनसंपत्तीच्या देणगीमुळे त्यांना कमालीचा फायदा होईल. या क्षेत्रातील संधीचा पुरेपुर लाभ उठविण्यासाठी महाराष्ट्राकडे अगोदरच असलेल्या संभाव्य क्षमतेचा फायदा घेण्याच्या दृष्टीने खाजगी विशेष आर्थिक क्षेत्राचे संरक्षणविषयक उद्योग क्षेत्रामध्ये रुपांतर करता येईल.

९.६. समारोपीय अभिप्राय :

महाराष्ट्रातील औद्योगिक गुंतवणुकीच्या प्रदेशनिहाय/विभागनिहाय वितरणावरून असमानता असल्याचे चित्र पाहावयास मिळते-मग ते सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम असोत किंवा बृहत प्रकल्प असोत किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती असोत - हे सर्वच प्रकल्प काही ठराविक जिल्ह्यांमध्येच मोठ्या प्रमाणावर एकवटलेले आहेत.

ही तफावत दूर करण्याबाबतचा आणि विशेषत: राज्यातील मागे पडलेल्या प्रदेशांमध्ये गुंतवणुकीचा ओघ वाढविण्याची सुनिश्चिती करण्याबाबतचा दृष्टीकोन हा बहुआयामी असणे आवश्यक आहे आणि वित्तीय प्रोत्साहने व सवलतीविषयक पारंपरिक दृष्टिकोनापेक्षा उजवा असावा.

वरील विभागांमध्ये मांडण्यात आलेल्या रूपरेषेप्रमाणे, राज्यव्यापी-धोरणे, प्रदेश व क्षेत्र-विशिष्ट धोरणे यांसारखी क्षेत्रे ही धोरण-उपक्रमांमध्ये अंतर्भूत करायला हवीत. त्यांमध्ये लहान व मध्यम उपक्रमांशी संबंधित प्रश्न, तसेच "भरभक्कम" प्रकल्पांची सत्वर पूर्णता या बाबी हाताळणे गरजेचे आहे. शासनाने ज्ञानाधारित तसेच संरक्षण संबंधित उद्योगांमध्ये गुंतवणुकीस चालना देण्याबाबतची धोरणे देखील आखणे गरजेचे असेल.

❖❖❖

प्रकरण १०

जलसंपत्तीचा विकास

१०.० प्रस्तावना

या प्रकरणामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी महत्त्वाची साधनसंपत्ती म्हणून आम्ही पाण्याचा विचार केला आहे. आमच्या हितसंबंधितांसोबत झालेल्या चर्चेमधून पिण्याचे पाणी, सिंचन, पिण्याखेरीज दैनंदिन पाण्याचा वापर व औद्योगिक वापर यांसारख्या वेगवेगळ्या वापरांसाठी पाण्याची उपलब्धता व तरतूद असे महत्त्वपूर्ण विवादित प्रश्न पुढे आले. महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांतील पाण्याची नैसर्गिक उपलब्धता फार भिन्न आहे. प्रत्येक प्रदेशाला विशिष्ट साधनसंपत्तीवर आधारित संधी व अडचणी आहेत. म्हणून, प्रत्येक आर्थिक बाजूचा विचार करता त्यात संपूर्ण समानता आणणे अतिशय कठीण व जवळजवळ अशक्य असेल.

१०.०.१ प्रकरण ४ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, ('समतोल प्रादेशिक विकासाकडे : एक बहुआयामी धोरण दृष्टिकोन') पाण्यासंबंधीचा आमचा दृष्टिकोन सूक्ष्म फरकाचा व वेगळया स्वरूपाचा आहे. समितीचा दृष्टिकोन असा आहे की, दैनंदिन पिण्यासाठी व पिण्याव्यतिरिक्तच्या प्रयोजनासाठी पाण्याचे वाटप समानतेने होण्याची जबाबदारी राज्य शासनाची असावी. पाण्याला सार्वजनिक सुविधा समजण्यात यावे व राज्य शासनाच्या व विविध स्थनिक संस्थांच्या स्तरावरून योग्य अशी सार्वजनिक गुंतवणूक करूनच त्याची तरतूद करणे शक्य होईल. या दृष्टिकोनातून, आम्ही या प्रकरणामध्ये आमचे सविस्तर निर्धारण व आवश्यक साधनसंपत्तीचा अंदाज सादर केला आहे. पाण्याचे संवर्धन व साठवण करण्याचे प्रत्येक प्रयत्न शक्य तितक्या तातडीने करावेत. या दृष्टीने, आम्ही दरवर्षी ऑक्टोबरच्या १५ तारखेला असलेले पाण्याचे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र व पाण्याची साठवण' यावर विकासाचा सर्वाधिक निर्णायक दर्शक म्हणून जोर दिला आहे. पिछेहाट झालेल्या प्रदेशांच्या विकासातील तुटीचा महत्त्वाचा भाग साठवण तुटीनुसार मोजण्यात आला आहे. म्हणून, आम्ही, गुंतवणूकयोग्य साधनसंपत्तीच्या मोठ्या भागाचे वाटप करण्याबद्दल सुचवले आहे, जे निर्माण करावयाच्या साठवण क्षमतेच्या निकषावर आधारित आहे. हे तक्ता क्रमांक (१०.२४) मध्ये सादर करण्यात आले आहे.

१०.०.२ महाराष्ट्रात पर्जन्यमानाचे आणि पाण्याचे दुर्भिक्ष असलेले दुष्काळप्रवण क्षेत्र मोठया प्रमाणात आहे. या प्रदेशातील तीव्र टंचाईची समस्या सोडविण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोनाची गरज आहे. राज्य स्तरावरील मोठ्या व मध्यम पाणी साठवण प्रकल्पांखेरीज, या गंभीर समस्यांवर तोडगा काढण्यासाठी अतिरिक्त मार्गांचा पाठपुरावा करण्यात यावा. म्हणून आम्ही, पाणलोट विकास, (परिच्छेद १०.११.२) भूजल विकास, (१०.१२) आणि लाभक्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत पाणी देण्याची व पाणी वापराची सुधारित पद्धत (भाग १०.१०.२)यांची मोठ्या प्रमाणात तरतूद केली आहे. या कार्यक्रमांव्यतिरिक्त, आम्ही, विदर्भातील माजी मालगुजारी तलावाचे पुनरुज्जीवन (१०.९.३) व पाण्याचे दुर्भिक्ष असलेले प्रदेश व भूशास्त्रीयदृष्ट्या अडचणीचे प्रदेश यासारख्या प्रदेशविशिष्ट कार्यक्रमांकरिता अतिरिक्त स्वतंत्र तरतुदीही सुचविल्या आहेत.

१०.१ समितीचा दृष्टिकोन

जटिल व गुंतागुंतीचे असले तरी, आमच्या अहवालाच्यासंदर्भात पाणी हे अत्यंत महत्त्वाच्या केंद्रवर्ती स्थानी आहे. *पाण्याने केवळ सार्वजनिक/सामाजिक–राजकीय वादविवादात त्याने मुख्य स्थान मिळवले आहे असे नसून*

स्वाभाविकपणे आमच्या समितीच्या कामकाजात देखील स्थान मिळवले आहे. आम्ही केलेल्या चर्चेदरम्यान या विषयाबाबतची संवेदना दिसून आली होती. 'न्याय्य हक्क' मिळण्यासाठी आम्ही जो वेळ खर्च केला तो आम्ही या विषयाशी किती जोडले गेलो आहोत याचा पुरावा आहे. **आमचा सूक्ष्म फरकाचा– बहुआयामी, दुहेरी मार्गाचा, संस्थात्मक व सुधारणावादी दृष्टिकोन वापरून आम्ही पाणी या विषयाचा जसा परामर्श घेतला आहे तसा इतर कुठेही घेतलेला नाही.** जरी आम्हाला सिंचनाशी संबंधित चर्चा ज्यामुळे जनतेमध्ये क्षोभ निर्माण झाला आहे (खासकरून अनुशेषाची समस्या) याच्या वर्चस्वाची जाणीव असली तरी *आम्ही पाण्याचा सर्वंकष दृष्टिकोन स्वीकारलेला आहे.* त्याचबरोबर, आम्ही प्रचलित समजुती व अन्यायाची वास्तवता याबाबत संवेदनशील आहोत. तसेच चालू प्रकल्पाबाबत व सिंचनाकडे आम्ही लक्ष दिले आहे.

१०.१.१ आमचा दुहेरी मार्गाचा दृष्टिकोन ठेवताना, आम्ही सार्वजनिक हित म्हणून पाणी (नागरिकांत व समन्यायीपणासाठी) प्रदेशभर व क्षेत्रभर तर्कसंगतपणे व समन्यायीपणे द्यावयाचे उत्पादक संसाधने यात भेद केला. पहिल्या प्रसंगी आम्ही विश्वास करतो की, पिण्याचे पाणी व नागरी व ग्रामीण यातील सर्व नागरिकांचा हक्क म्हणून इतर जीवनावश्यक गरजा लक्षात घेऊन महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना प्रमाणकाच्या आधारावर पाणी पुरविण्यात येत आहे. यासाठी पूर्वावश्यकता, प्रादेशिक आधारावर पाण्याची पुरेशी साठवणूक करण्यात येईल. असे करताना, कालिक विविधता तसेच संस्थात्मक म्हणजे लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचा पैलू तसेच दर्जा यांच्याकडे आम्ही काळजीपूर्वक लक्ष देत आहोत. **आमच्या दृष्टिकोनातून बहुआयामी असणाऱ्या जलस्रोताचा वापर परिणामकारक वाढवून याद्वारे उपयोगी पाणी देण्यात व वाटण्यात आले आहे.**

१०.१.२ आम्ही पुन्हा, पारंपरिक रीतीपासून किंचितशा निराळ्या पद्धतीने पाण्याचा दुष्काळ असलेल्या प्रदेशांचा विचार करतो. अशा प्रकारे, आम्ही विशेष रीतीने वास्तविक प्रदेश म्हणून अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमास महत्त्वाचे समजतो; आम्ही असे देखील मानतो की, दुष्काळ केवळ टंचाईमुळे नाही तर तो विपुलता त्याचबरोबर विशेष भूशास्त्रीय त्याचप्रमाणे स्थलवर्णनात्मक वैशिष्ट्ये यातून उद्‌भवणारे प्रश्न (पूर नियंत्रणासह पाणी व्यवस्थापनाच्या विशेष समस्यांचा पुढाकार करून) यामुळे सुद्धा आहे, व म्हणून अशा जागांसाठी विशेष उपाय केले पाहिजेत. कृषि, उद्योग व नागरी क्षेत्रांत पाणी साधन संपत्तीचा पर्यायी वापर होण्याचे आम्ही जाणतो. साधनसंपत्तीमधून पाण्याचा उत्पादक वापर विचारात घेताना आपण स्पष्ट प्राथम्यक्रम देणार नाही. मात्र निरनिराळ्या क्षेत्रात गुंतलेल्या उत्पादकांद्वारे आणि आर्थिक वाढ व प्रमाणशीर उपजीविका यांचा वेग वाढविण्याची त्यांची क्षमता (निर्धारित केली नसल्यास) माहिती करून देण्यात येईल. येथे आम्ही, विशेषकरून शेतीमध्ये पाण्याच्या अधिक कार्यक्षम वापरासाठी तंत्रज्ञानाचा वापर करताना त्याचवेळी चांगल्या रीतीने प्रदूषण नियंत्रण करून पाण्याची गुणवत्ता मागास क्षेत्रात (खासकरून शहराचा वाहून जाणारे) वाढवण्याचे प्रस्तावित करीत आहोत. आधारभूत माहितीशी तसेच मांडणी प्रकल्पांचा विचार करून अपरिपक्व राजकीय वळणाशी संबंधित मुद्दे दीर्घकालीन दृष्टीकोन विचारात घेऊन आम्ही लगेच थांबविले आहेत. आम्ही प्राधान्य द्यावयाच्या बाबी व त्यावरील कृती योजनाच प्रस्तावित केली आहे त्या आधारे लहान व मध्यम मुदतीच्या योजना हाती घेता येतील आणि त्यानंतर त्याता आढावा घेऊन चांगली आधारभूत माहिती तयार केल्यावर पुढील प्रस्तावित उपाय योजना हाती घेता येतील.

१०.१.३ पाण्याला जितके महत्त्व दिले पाहिजे तितके दिले जात नाही. विशेषकरून पाण्याच्या प्रांतात उत्पादक साधनसंपत्ती म्हणून संयुक्त पाण्याचे मोल हे प्रदीर्घ कालावधीचा पाणी धोरण ठरविण्यासाठी निर्णायक केंद्रबिंदू असेल. त्यासाठी अचूक प्रोत्साहन देण्यात येईल तसेच उत्तम तंत्रज्ञान व अधिक कार्यक्षम वापरास उत्तेजन देण्यात येईल. वस्तुत: तांत्रिक अर्थशास्त्र शक्यतेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल आणि ते पाणी अवक्षेपण, भूपृष्ठ जल व भूजल आणि टिकवून ठेवण्याची क्षमता (भूशास्त्र) यासहित जलविद्यात्मक वास्तवतेद्वारे लादलेल्या उपलब्धतेसह पाणी क्षेत्रासाठी वाढीव गुंतवणुकांचे ठरवून व त्यातील अग्रक्रमांना चालना देऊन आशावादी धोरण मार्ग निर्माण करण्यासाठी आम्हाला मदत करेल. पाण्याच्या खरेदी विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी आमची अपेक्षित भावी धोरणे फार लांब नाहीत. ते संयुक्तिकपणे व खोरे यांवर आधारित व्यवस्थापन व नियोजन याद्वारे कदाचित प्रदेश व राज्ये आणि उदयास येणाऱ्या राष्ट्रीय पाणी धोरण कार्यचौकटीच्या अनुरूप अशा या नैसर्गिक स्रोताचे मूल्य ठरविण्यास मदत करेल.

१०.२ पार्श्वभूमी

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.७० लाख हेक्टर इतके आहे, त्यापैकी २२५.४ लाख हेक्टर "लागवडयोग्य जमीन" आहे. महाराष्ट्र, भारतीय द्विपकल्पाचा महत्त्वाचा भाग असून अरबी समुद्राच्या पश्चिम बाजूवरील ७२० किलोमीटरच्या समुद्र किनाऱ्यालगत आहे. सह्याद्री रांगांचा पश्चिम घाट जवळजवळ समुद्र किनाऱ्याला समांतर आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा समुद्र सपाटीच्यावर सरासरी १००० मीटरवर आहेत. सह्याद्रीच्या पूर्वेला दख्खनचे पठार आहे, ज्याचा उतार समुद्र सपाटीपासून ३०० ते ६०० मीटरच्या सरासरी उंचीसह पूर्वेकडे आहे.

तक्ता १०.०
कृषि हवामान प्रक्षेत्रनिहाय क्षेत्र व पर्जन्यमान

कृषि हवामान क्षेत्र	वार्षिक पर्जन्यमान (मिमी)	व्याप्त क्षेत्र (लक्ष हेक्टर)
१	२	३
लॅटेराइटी, काळी, तांबडी मृदा यासह अतिवृष्टी क्षेत्र- जांभ्या दगडाच्या मृदेतील अतिशय जास्त पर्जन्यमान क्षेत्र.	२००० ते ३०००	दक्षिण कोकण क्षेत्र मुख्यत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे क्षेत्र- १३.२० लक्ष हेक्टर.
अ-लॅटेराइटी मृदेसह अतिवृष्टी क्षेत्र- काळ्या व तांबडी मृदा यातील अतिशय जास्त पर्जन्यमान क्षेत्र. (व्हर्टिसोल व ऑक्सिसोल)	२२५० ते ३०००	उत्तर कोकण क्षेत्र मुख्यत्वे ठाणे व रायगड जिल्हे - क्षेत्र १६.५९ लक्ष हेक्टर.
घाट क्षेत्र- घाट प्रक्षेत्र	३००० ते ५०००	सातारा, कोल्हापूर, पुणे, अहमदनगर, सिंधुदुर्ग, नाशिक जिल्ह्यांचे डोंगराळ क्षेत्र - २६.६३ लक्ष हेक्टर.
संक्रमण क्षेत्र-एक- संक्रमण प्रक्षेत्र एक	१२५० ते २५००	नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांच्या उताराचा भाग- क्षेत्र १०.२९ लक्ष हेक्टर.
संक्रमण क्षेत्र-दोन- संक्रमण प्रक्षेत्र दोन	७०० ते १२५०	धुळे, अहमदनगर, सांगली यांचा काही भाग व नाशिक, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांचा मध्य भाग.
टंचाईग्रस्त प्रक्षेत्र	५०० ते ७००	नाशिक, धुळे, अहमदनगर पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, अंबड, बीड, उस्मानाबाद क्षेत्र- ७३.२३ लक्ष हेक्टर. यांचे अवर्षणग्रस्त तालुके
हमखास पर्जन्यवृष्टी होणारे क्षेत्र- सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यांचा काही भाग आणि परभणी व नांदेड व बुलढाणा जिल्ह्यांचा संपूर्ण भाग-	७०० ते ९००	अंबड, जालना, बीड, अकोला, अमरावती, यवतमाळ, जळगांव, धुळे, जिल्ह्यांचा बहुतेक भाग तसेच लातूर क्षेत्र- ६७.८० लक्ष हेक्टर.
मध्यम पर्जन्यवृष्टी प्रक्षेत्र-मध्यम पर्जन्यवृष्टी प्रक्षेत्र दोन तालुके यांचा मोठा भाग, औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेड	९०० ते १२५०	वर्धा जिल्ह्याचा संपूर्ण भाग, नागपूर व यवतमाळ जिल्हे, चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्ह्यांचा काही भाग- क्षेत्र- ४९.८८ लक्ष हेक्टर.
एचआरएम- हाय रेन फॉल झोन विथ सॉईल फ्रॉम मिक्स्ड पॅरेंट मटेरियल.	१२५० ते १७००	वर्धा, गडचिरोली, नागपूर जिल्ह्यांचा संपूर्ण व चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग- क्षेत्र- ३२.१६ लक्ष हेक्टर.

स्रोत : महाराष्ट्र जल व सिंचन आयोग (१९९९)

१०.२.१ लागवडयोग्य क्षेत्राच्या (तक्ता १०.० मध्ये न दिलेले) अंदाजे २५ टक्क्यापेक्षा अधिक क्षेत्र दर्शविणारा तक्ता १०.० हा, मोठ्या प्रमाणात पाण्याची कमतरता दर्शवितो. हे प्रदेश, ठळक वक्र ठिपक्याच्या रेषेने दर्शविण्यात आले आहेत. (कृपया जोडपत्र-१०.१ जोडलेला कृषि-हवामान नकाशा पहावा.)

१०.३ लोकसंख्या

२००१ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११,१३,७२,९७२ इतकी आहे. ती भारताच्या लोकसंख्येच्या (१२१,०१,९३,४२२) ९.२९ टक्के इतकी असून उर्वरित भारतापेक्षा तिचे अधिक झपाट्याने नागरीकरण झालेले आहे. कृषि आधारित मनुष्यबळाच्या हिश्श्यात घट झाली आहे. तरी सुद्धा सध्या लोकसंख्येचा मोठा भाग शेतीवर किंवा शेती संलग्न कामावर अवलंबून आहे. म्हणून, कृषि व कृषि उत्पादनाच्या संस्करणाचे बळकटीकरण केल्याने त्याची खरेदी विक्री होऊन ग्रामीण लोकांची भरभराट व त्यांचे जीवनमान सुधारणे शक्य होईल. सिंचनात सुधारणा केल्याने शेतीतील उत्पन्न, उत्पादन व रोजगारात मोठ्या प्रमाणात सुधारणा होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच, विकास धोरण नीतीतील सिंचन विस्ताराला प्राथम्यक्रम दिला आहे. समितीने, महाराष्ट्राच्या प्रत्येक विभागातील महाराष्ट्राच्या सिंचन व कृषि समस्यांचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्राचे प्रशासकीय महसूल विभाग व कृषि हवामान क्षेत्र यात मोठ्या प्रमाणात सुसंगतता व साम्य दिसून येते. प्रशासकीय व्यवस्थेच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र राज्य हे, सहा महसूल विभाग, ३५ जिल्हे व ३५८ तालुके यांमध्ये विभागण्यात आले आहे. आम्ही 'प्रशासकीय विभागांच्या' स्तरावर मुख्यत: कृषि सिंचन गरज व पिण्याच्या पाण्याच्या गरजा यांचा अभ्यास व विश्लेषण करण्यासाठी निवडले आहे.

तक्ता १०.१
लोकसंख्या, जिल्हा, तालुका, लागवडयोग्य लाभक्षेत्र व पर्जन्यमान (मुंबईसह) प्रदेशनिहाय

प्रदेश	लोकसंख्या (२०११)	लोकसंख्या टक्केवारी	जिल्ह्यांची संख्या	तालुक्यांची संख्या	भौगोलिक क्षेत्र (लक्ष हेक्टर)	लागवडयोग्य लाभक्षेत्र (लक्ष हेक्टर)	दरडोई लागवडयोग्य लाभक्षेत्र (लक्ष हेक्टर)	सरासरी पर्जन्यमान (मिलीमीटर)
१	२	३	४	५	६	७	८	९
कोकण (मुंबईसह)	२८६२९५१२	२५.५	६	५०	३०.७	१७.९	०.०६	३१६१
कोकण (मुंबईव्यतिरिक्त)	१६१५१०६५	१४.४	४	४७	३०.७	१७.६	०.११	३१६१
पुणे	२३४४०९९८	२०.९	५	५८	५७.३	४५.६	०.१९	११६८
नाशिक	१८५७१५३५	१६.५	५	५४	५७.५	४०.२	०.२२	७९६
उर्वरित महाराष्ट्र	**७०६४२०४५**	**६२.९**	**१६**	**१६२**	**१४५.५**	**१०३.७**	**०.१५**	
मराठवाडा	**१८७२७७४८**	**१६.७**	**८**	**७६**	**६४.८**	**५९.३**	**०.३२**	**८२५**
अमरावती	११२६६६५३	१०.०	५	५६	४६.०	३५.६	०.३२	८९१
नागपूर	११७३६५२६	१०.०	६	६४	५१.३	२६.९	०.२३	१३३०
विदर्भ	**२३००३१७९**	**२०.५**	**११**	**१२०**	**९७.४**	**६२.५**	**०.२७**	
महाराष्ट्र	**११२३७२९७२**	**१००.०**	**३५**	**३५८**	**३७०.७**	**२२५.४**	**०.२०**	**१३६०**

संदर्भ : जनगणना २००१ व २०११ आणि हवामान विभाग

१०.३.१ बृहन्मुंबईत कोणतीही कृषि व 'कृषि आधारित' लोकसंख्या नाही. **म्हणून कोकण प्रदेश क्षेत्रातील व मुंबईची लोकसंख्या मुंबईसह व मुंबई व्यतिरिक्त स्वतंत्रपणे दाखविण्यात आली आहे.** मुंबई व्यतिरिक्तचे क्षेत्र अभ्यासाच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात आले आहे.

१०.३.२ १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळची सिंचन क्षमता आणि त्याची सद्यस्थिती यांचे तुलनात्मक चित्र आम्ही तक्ता १०.२ मध्ये सादर केले आहे. राज्याच्या स्थापनेनंतर गेल्या ५० वर्षांमध्ये सिंचनाच्या स्थितीमध्ये फार मोठा बदल झाला आहे. सिंचन क्षमता ४७.४० लाख हेक्टरपर्यंत पोहोचलेली आहे. जेव्हा महसूल विभागांशी तुलना

करतो तेव्हा, एकूणच स्थिती सुधारली आहे आणि त्यामधील विषमता कमी झालेली आहे. तथापि, कोकण व अमरावती हे प्रदेश लक्षणीयरीत्या मागे राहिलेले आहेत.

तक्ता १०.२
जलविद्युत, जलसाठा व सिंचित क्षेत्र यांची स्थिती
(महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळेची व सध्याची)

बाब	सन १९६०-६१	सन २०१०-११	वृद्धीचा दर (वेळेत)
१	२	३	४
संकल्पित केलेला पाण्याचा साठा दशलक्ष घन मीटर	१५७४.४०	३३३८५	२१.२०
निर्माण झालेली सिंचन क्षमता लाख हेक्टरमध्ये	३.९६	४७.४	११.९६
स्थापित जल विद्युत क्षमता मेगावॅटमध्ये	२८९.८०	३५७८.७३	१२.३५
लोकसंख्या (कोटींमध्ये)	३.९५	११.२४	२.८५
सिंचित क्षेत्र (लाख हेक्टरमध्ये)	२.२६	२९.५५	१३.०६
बिगर सिंचनासाठी केलेला पाण्याचा वापर दशलक्ष घन मीटर	-	६९५५	

संदर्भ : महाराष्ट्र शासनाचा २०१० चा सिंचनाच्या स्थितीचा अहवाल.

तक्ता १०.३
महसूल विभागवार निर्माण झालेल्या सिंचन क्षमतेची स्थिती (२०१०-११)

महसूल विभाग	लागवडयोग्य क्षेत्र लाख हेक्टरमध्ये	१९६० रोजी निर्माण झालेली सिंचन क्षमता	२०१० रोजी निर्माण झालेली सिंचन क्षमता	लागवडयोग्य क्षेत्राची टक्केवारी
१	२	३	४	५
कोकण	१७.९३	३.१	०.९८	५.४६
नाशिक	४०.१६	३.१	९.७	२४.१५
पुणे	४५.५६	३.१	१५.४१	३३.८२
औरंगाबाद	५९.३०	०.१२	१०.५०	१७.७०
अमरावती	३५.६२	} ०.७४	४.६	१२.९१
नागपूर	२६.८५		६.१	२२.७१
महाराष्ट्र	२२५.४२	३.९६	४७.४	२१.०२

स्रोत: महाराष्ट्र शासनाचा २०१० चा सिंचनाच्या स्थितीचा अहवाल.

१०.३.३ डिसेंबर, १९६० मध्ये, महाराष्ट्र शासनाने, पाटबंधारे सचिव, श्री.स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन आयोगाची स्थापना केली होती. आयोगाच्या विचारार्थ विषयांमध्ये इतर गोष्टींबरोबरच, जल संपत्तीचा अभ्यास, विविध प्रयोजनांसाठी त्याचा वापर, सिंचन क्षमतेचा अंदाज, भविष्यातील सिंचन क्षमतेचा विकास यांचा समावेश होता. या आयोगाने असे अंदाजित केले होते की, भूपृष्ठावरील जलाद्वारे ५२.६१ लाख हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली (सिंचनाखाली) येऊ शकेल आणि भूजल संपत्तीद्वारे ४१ लाख हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली येईल. त्यानंतर १९९५ मध्ये, डॉ.एम.ए.चितळे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने, भूपृष्ठ व भूजल सिंचनातील अनुक्रमे ८५ लाख हेक्टर आणि ४१ लाख हेक्टर मिळून १२६ लाख हेक्टर इतकी अंतिम सिंचन क्षमता अंदाजित केली

होती. प्रसिध्द झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यस्तरीय प्रकल्पांनी ४७.३६ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण केली आहे आणि स्थानिक क्षेत्रातील प्रकल्पांनी १५.५६ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण केली आहे. याशिवाय, भूजलाने ३१.८२ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण केली आहे. म्हणून, ९४.७७ लाख हेक्टर इतकी एकूण सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. अशाप्रकारे, निर्माण केलेली सिंचन क्षमता ही, अंदाजित केलेल्या १२६ हेक्टर इतक्या अंतिम सिंचन क्षमतेच्या ७५.१९ टक्के इतकी असून (जोडपत्र १०.२ पहा) जर ठिबक सिंचन, तुषार सिंचन, नळाद्वारे पाणी वितरण करण्याची पध्दती यांसारख्या प्रगत तंत्राचा उपयोग केला तरच केवळ हे प्रत्यक्षात येईल.

आकृती १०.१
लागवडयोग्य क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी



	1960	1970	1980	1990	2000	2010
RoM	3.00	6.19	9.38	13.92	19.93	25.26
Marathwada	0.20	3.67	7.13	10.38	14.03	17.72
Viddarbha	1.18	3.83	6.48	9.08	12.69	17.24

आकृती १०.२
सिंचन क्षेत्रामधील वाढीचा वार्षिक दर (१९६० – २०१०)

(वाढीचा दर टक्केवारीमध्ये)



भाष्य: आकृती १०.१ असे दर्शविते की, १९६० मध्ये, राज्याची स्थापना झाली त्यावेळी सिंचन झालेली प्रतिशत जमीन फारच कमी प्रमाणात होती. तीन प्रदेशांमधील तफावत कमी होती. १९८० पर्यंत सिंचन झालेल्या जमिनीची ही टक्केवारी, त्याच गतीने वाढली, त्यानंतर उर्वरित महाराष्ट्रामधील टक्केवारी जलदगतीने वाढल्याने २०१० पर्यंत, या तीन प्रदेशामधील तफावतीतील अंतर जवळजवळ दीडपट झाले. आकृती १०.२ ही, या तीन प्रदेशातील सिंचनाच्या वाढीचा वार्षिक दर स्पष्ट करते. हा दर उर्वरित महाराष्ट्रामध्ये १९८२ ते २०१० या दरम्यान उच्च होता. गेल्या १० वर्षांमध्ये हा दर गाठण्याचा काहीसा प्रयत्न केला गेला. परंतु तो अजूनही अपुरा आहे.

१०.४ जलसंपत्तीची उपलब्धता

१०.४.१ महाराष्ट्रात मुख्यत्त्वेकरून, नैऋत्य तसेच आग्नेय मान्सून वाऱ्यांपासून पाऊस पडतो. राज्याचे सरासरी पर्जन्यमान १६६० मी.मी. इतके आहे. तथापि, महाराष्ट्राच्या विविध प्रदेशामधील पावसाची उपलब्धता व त्यावरील अवलंबितता यात खूपच तफावत आहे. कोकणात सरासरी २००० ते ३५०० मी.मी. इतका पाऊस पडतो. सहयाद्री प्रदेशाच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात ४५० मी.मी. इतका पाऊस पडतो. जर आपण राज्याच्या पूर्व भागाकडे गेलो तर, तेथे १००० ते १४०० मी.मी. इतका पाऊस पडतो. त्यांच्यातील मोठ्या तफावतीमुळे विविध प्रदेशांच्या उपलब्धतेमध्ये व जलसाठयाच्या क्षमतेमध्ये कमालीची विषमता निर्माण झाली आहे.

१०.४.२ पर्जन्य, नदीचे प्रवाह व भूजल यांसारख्या स्रोतांद्वारे पाण्याची उपलब्धता विचारात घ्यावयाची आहे. पाण्याच्या एकूण वापरामध्ये जलसिंचन या घटकाचा मोठा वाटा आहे. आधुनिक काळात जलसिंचन सुविधा, नदीच्या प्रवाहांवर पाणी देण्याच्या विशिष्ट प्रक्रिया करून त्याद्वारे प्रामुख्याने निर्माण करण्यात आल्या आहेत. म्हणून, जलसंपत्तीची उपलब्धता, पारंपरिकपणे अंदाजित करण्यात येत असते आणि नदीचे प्रवाह व नदीच्या खोऱ्यांचा समूह या आधारावर अंदाजित व निर्धारित केली जाते. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्र, खाली दिल्याप्रमाणे ५ मोठया नदी खोऱ्यांमध्ये विभागले आहे. आंतरराज्यीय लवादाने (पाण्याच्या वाटपावरील) दिलेली व नैसर्गिकपणे उपलब्ध असलेली जल संपत्तीची एकूण उपलब्धता पुढीलप्रमाणे आहे:-

तक्ता १०.४
महाराष्ट्रातील उप खोऱ्यांतील पाण्याची उपलब्धता

खोऱ्याचे नाव	भौगोलिक क्षेत्र राज्य क्षेत्राच्या टक्के (लाख हेक्टर)	लागवडयोग्य लाभक्षेत्र/ राज्याच्या लागवडयोग्य लाभ क्षेत्राची टक्केवारी (लाख हेक्टर)	वार्षिक सरासरी पाण्याची उपलब्धता (दशलक्ष घनमीटर)	५० टक्के अवलंबिततेशी पाण्याची उपलब्धता (दशलक्ष घन मिटर)	न्यायाधिकरणा नुसार पाण्याची उपलब्धता (दशलक्ष घन मीटर)	लागवडयोग्य लाभ क्षेत्राच्या प्रति हेक्टर पाण्याची उपलब्धता (दशलक्ष घन मीटर)	पाण्याच्या उपलब्धते नुसार प्रवर्ग
१	२	३	४	५	६	७	८
गोदावरी (वैनगंगासह)	१५४.३/४९.५%	११२.६ /४९.९ %	५०८८०	४७७०८	३४१८५	३०३७	छीरश्र
तापी	५१.२ /१६.७%	३७.३ / १६.६ %	९११८	९७८०	५४१५	१४५१	ऊशषळलळीं
नर्मदा	१.६ /०.५%	०.६ /०.३%	५८०	४८२	३०८	४८१३	छीरश्र
कृष्णा	७.१ /२२.६%	५६.३ / २५.० %	३४०३२	३४५०४	१६८१८	२९८९	छीरश्र
कोकणामधील नद्या (पश्चिम वाहिनी नद्या)	३१.६ /१०.७%	१८.६ /८.२%	६९२१०	६९३००	६९२१०	३७१३०	अर्लीपवरपीं
महाराष्ट्र	**२४५.८ /१००.०%**	**२२५.४/१००.०%**	**१६३८२०**	**१६१७७४**	**१२५९३६**	**५५८७**	**छीरश्र**

स्रोत : महाराष्ट्र जल व सिंचन आयोग (१९९९)

१०.४.३ तक्ता १०.४ मधील आकडेवारी सहा महसुली विभागांमधील मोठा फरक उघड करते. महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने, पाण्याच्या उपलब्धतेच्या आधारे संपूर्ण राज्यामधील उप-खोऱ्यांमध्ये फरक केला आहे व त्यांचे वर्गीकरण केले आहे.

तक्ता १०.५

पाण्याच्या उपलब्धतेनुसार महसूल विभागनिहाय प्रवर्ग

प्रदेश	क्षेत्र (लाख हेक्टर मध्ये)	लागवड योग्य लाभ क्षेत्र (लाख हे. मध्ये)	पाण्याची उपलब्धता (दशलक्ष घनमीटर)	दशलक्ष घनमिटरमधील ५० टक्के अवलंबिततेशी पाण्याची उपलब्धता	न्यायाधिकरण नुसार पाण्याची उपलब्धता	पाण्याची उपलब्धता घन मीटर/ हेक्टर (स्तंभ ६/३)	पाण्याची उपलब्धता घन मीटर/ हेक्टर (स्तंभ ४/३)	पाण्याच्या उपलब्धते नुसार प्रवर्ग
१	२	३	४	५	६	७	८	९
कोकण (मुंबई)	३०.७	१७.६	६४५०१	६५३५७	६५३५७	३६५०७	३५९६८	Very High
नाशिक	५७.५	४०.२	१७४७८	१३१९३	१३६३५	३३९५	४३५२	Normal
पुणे	५७.३	४५.६	३२६९६	२७६०३	१६०८७	३५३१	७१७६	Normal
औरंगाबाद	६४.८	५९.३	१५२५४	८७४९	८२०२	१३८३	२५७२	Deficit
अमरावती	४६.०	३५.६	९८१३	९६८२	७०३३	१९७४	२७५५	Deficit
नागपूर	५१.३	२६.८	२४०७७	१९५०७	१५६२२	५८१८	८९६८	Abundant
महाराष्ट्र	**३०७.७**	**२२५.४**	**१६३८२०**	**१३१५६२**	**१२५९३६**	**५५८७**	**७२६७**	Normal

स्रोत: समितीच्या जलसंपत्ती उपगटाने पुरविलेली.

तक्ता १०.६

महाराष्ट्र राज्याची प्रदेशनिहाय पाण्याची उपलब्धता (दरडोई, दर हेक्टर)

प्रदेश	लागवडीयोग्य लाभ क्षेत्र (लाख हेक्टरमध्ये)	लोकसंख्या	न्यायाधिकरणाच्या मते पाण्याची उपलब्धता (दशलक्ष घनमिटरमध्ये)	पाण्याची उपलब्धता दरडोई घन मीटर/ हेक्टर (स्तंभ ४/३)	लागवडयोग्य लाभक्षेत्र प्रतिहेक्टर (स्तंभ ४/२)
१	२	३	४	५	६
कोकण (मुंबईसह)	१७.९	२८६२९५१२	६५३५७	२२८३	३६४५१
कोकण (मुंबई वगळून)	१७.६	१६१५१०६६	६४२८९	३९८०	३६५०७
नाशिक	४०.२	१८५७१५३५	१३६३५	७३४	३३९५
पुणे	४५.६	२३४४०९९८	१६०८७	६८६	३५३१
उर्वरित महाराष्ट्र	**१०३.७**	**७०६४२०४५**	**९५०७९**	**१३४६**	**९१७३**
औरंगाबाद	५९.३	१८७२७७४८	८२०२	४३८	१३८३
मराठवाडा	**५९.३**	**१८७२७७४८**	**८२०२**	**४३८**	**१३८३**
अमरावती	३५.६	११२६६६५३	७०३३	६२४	१९७४
नागपूर	२६.९	११७३६५२६	१५६२२	१३३१	५८१८
विदर्भ	**६२.५**	**२३००३१७९**	**२२६५५**	**९८५**	**३६२७**
महाराष्ट्र	**२२५.४**	**११२३७२९७२**	**१२५९३६**	**११२१**	**५५८७**

स्रोत: समितीच्या जलसंपत्ती उपगटाने पुरविलेली.

१०.४.४ तक्ता १०.४ मध्ये असे स्पष्टपणे दर्शविले आहे की, प्रत्येक लागवडयोग्य क्षेत्रानुसार पाण्याची उपलब्धता तापी खोऱ्यांमध्ये खूपच कमी आहे. परिणामी, उत्तर महाराष्ट्र (नाशिक महसूल विभाग) आणि पश्चिम विदर्भ (अमरावती

महसूल विभाग) पाण्याची टंचाई सोसत आहे.इतर नद्यांच्या खोऱ्यांमध्ये, तसेच उप-खोऱ्यांमध्ये असलेली उपलब्धता ही मोठ्या प्रमाणात भिन्न आहे याची नोंद घेण्यात यावी. महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोगाने प्रत्येक उप-खोऱ्यातील जलस्रोतांचा अभ्यास केला होता. सिंचनासाठी जलस्रोतांची असलेली उपलब्धता लक्षात घेऊन सिंचन आयोगाने या खोऱ्यांची पाच गटात उपविभागणी करण्यात यावी असे सुचविले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, या खोऱ्यांमध्ये असलेली पाण्याची उपलब्धता ही मोठ्या प्रमाणात असमान आहे. म्हणून, जलस्रोतांच्या नियोजनातील मानके ही सर्वच क्षेत्रांमध्ये एकसमान किंवा एकसारखी असू शकत नाहीत. 'पाण्याची टंचाई असणारे प्रदेश' आणि 'पाण्याची तीव्र टंचाई असणारे प्रदेश' यांचा इतर प्रदेशांपासून स्वतंत्रपणे आणि सुस्पष्टपणे विचार करण्यात यावा. ही टंचाईग्रस्त आणि तीव्र टंचाईग्रस्त क्षेत्रे एकूण लागवडक्षेत्राच्या १३% आणि ३३% इतकी आहेत (म्हणजेच ती एकूण लागवडक्षेत्राच्या ४६% आहेत.).

१०.४.५ कोकण आणि नागपूर विभाग वगळता, महाराष्ट्रातील पाण्याची नैसर्गिक उपलब्धता ही फारशी चांगली नाही. म्हणून, आर्थिक विकासाकरिता जलस्रोतांचा वापर हा अतिशय काळजीपूर्वक, दक्षतेने आणि सावधगिरीने नियोजन केलेला असावा. विशेषत: 'प्रति हेक्टर ३००० घनमीटरपेक्षा कमी पाणी' असलेल्या क्षेत्रांचा सिंचनाखालील सुयोग्य पीक पद्धतींच्या बाबतीत गांभीर्यपूर्वक पुनर्विचार करावा लागेल. कमी पावसाच्या क्षेत्रांमध्ये, सुसंगत प्रोत्साहके आणि कृषी विस्तार सेवांच्या तरतुदींचे भक्कम पाठबळ असणारी सुयोग्य किफायतशीर पीक पद्धती असावी.

१०.४.६ महाराष्ट्राच्या महसुली विभागांच्या संदर्भात जर आपण या विश्लेषणाकडे पाहिले तर, औरंगाबाद आणि अमरावती या विभागात 'प्रति हेक्टर ३००० घनमीटरपेक्षा कमी पाणी' सिंचनासाठी उपलब्ध आहे. या दोन विभागातील अशी अत्यल्प उपलब्धता ही एक गंभीर स्वरूपाची बाब आहे. जिल्ह्यानुसार पाण्याच्या उपलब्धतेची सद्यस्थिती **जोडपत्र १०.३, जोडपत्र १०.४आणिजोडपत्र १०.५** मध्ये सादर केली आहे.

१०.४.७ जलसंपत्तीचे नियोजन आणि व्यवस्थापन याकरिता महाराष्ट्रातील २५ उप-खोऱ्यांमधील जलसंपत्तीच्या उपलब्धतेची तपासणी आणि निर्धारण करणे आवश्यक आणि समुचित आहे. तथापि, प्रशासकीय घटकांमधील (जसे की विभाग, जिल्हे, तालुके, पंचायत इत्यादी) औद्योगिकीकरण, शिक्षण, आरोग्य, रस्ते या सारख्या इतर विकासाच्या गरजांचे नियोजन होणे गरजेचे आहे. प्रशासकीय शाखांना 'उप-खोऱ्यांमधील' जलसंपत्तीच्या आधारभूत माहितीचे पुनर्व्यवस्थापन करावे लागेल. प्रशासकीय घटकांनी केलेली जलसंपत्तीची पाहणी ***जोडपत्र-३*** मध्ये सादर केली आहे. यातून असे सूचित होते की, तीव्र पाणी टंचाई असलेल्या जिल्ह्यांचा वेगळा विचार करणे आवश्यक आहे. पाण्याची तीव्र टंचाई असलेल्या क्षेत्रांमध्ये (म्हणजेच दरडोई ५०० घनमीटरपेक्षा कमी पाणी असलेल्या) सर्वांगीण आणि संपूर्ण विकास साध्य करणे हे जिकिरीचे काम आहे. पुनश्च एकदा, औरंगाबाद आणि अमरावती विभाग आणि त्या लगतच्या क्षेत्रांची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. त्यासोबतच कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त असलेल्या तालुक्यांसाठी सुद्धा वेगळ्या स्वतंत्र वित्तीय तरतुदींची आणि पाठबळाची आवश्यकता आहे. अशा तरतुदी त्यांना कमी ताण असलेल्या क्षेत्रांमधील विकासाच्या स्तराशी बरोबरी करण्याकरिता सहाय्यभूत होतील. या क्षेत्रांकरिता अनेक साधनांमधून (उदा. शासन, खाजगी गुंतवणूक, सहकारी गुंतवणूक, रोखे, जागतिक बँक, राज्य, संघ इत्यादी) वित्तीय साधने एकत्रित करून कामी लावावे लागेल. याशिवाय, जलस्रोताची टंचाई असल्यामुळे शिक्षण, प्राथमिक आरोग्य केंद्रे, रोपवाटिका, पाणलोट क्षेत्र विकासाच्या माध्यमातून पूर्वीच्याच ठिकाणी नव्याने जलसंधारण करणे, हरितगृहे, छपरी जाळे, कंत्राटी पद्धतीची शेती या सारख्या इतर पायाभूत सुविधा, सूक्ष्म जलसिंचनासारख्या पाणी बचत तंत्रविज्ञानास जोरदारपणे प्रचालन करून कार्यान्वित करण्याची गरज आहे. ज्या प्रदेशांमध्ये पाण्याची कायम व तीव्र कमतरता आहे अशा प्रदेशांतील पाण्याच्या आणि पेयजलाच्या स्वतंत्र असलेल्या नैसर्गिक उपलब्धतेशी संबंधित एका सुस्पष्ट यंत्रणेची गरज आहे.

१०.४.८ वैध व नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेल्या जलसंपत्तीच्या मर्यादेत जलसंपत्तीच्या क्षमतेचा वापर व विकास करण्याच्या

प्रयत्नाची शिकस्त करावयाची आहे. उपलब्ध कार्यकक्षेअंतर्गत केलेल्या प्रगतीच्या पातळीचा सारांश (आणि स्पष्टीकरण) जोडपत्र १०.६ मध्ये दिला आहे. प्रामुख्याने मोसमी पावसावर अवलंबून असलेल्या महाराष्ट्रासारख्या प्रदेशात जलसाठ्यांचे महत्त्व आणि संबद्धता ही फारच महत्त्वाची आहे. साठवलेल्या पाण्याची दरडोई आणि प्रति हेक्टरी उपलब्धता या निकषांवर मूल्यांकन केल्यास सर्वात मागे पडलेली क्षेत्रे म्हणून औरंगाबाद आणि अमरावती ही क्षेत्रे स्पष्ट दिसून येतात. (जोडपत्र १०.६पहा). विकासाच्या विविध गरजा भागवण्यासाठी, आगामी दहा वर्षात जलसाठ्यांमध्ये भरीव वाढ करण्यास सर्वोच्च प्राथम्य असावे. येथे याचीही नोंद घेण्यात यावी की, औरंगाबाद विभागातील वैध व नैसर्गिकरीत्या असलेली पाण्याची उपलब्धता ही आधीच जवळपास संपुष्टात आली आहे. म्हणून, आपणास पाण्यावरील पुर्नप्रक्रिया व पुनर्वापर आणि पाणलोट क्षेत्राचा विकास या पाणी वाचवण्याच्या पर्यायाचा प्राथम्यक्रमाने विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे, न्यायाधिकरणाकडून गोदावरी खोऱ्याचा आढावा घेऊन पुनर्तपासणी करणे आवश्यक असेल.

१०.४.९ पाण्याच्या नैसर्गिक उपलब्धतेतील तफावती दूर करण्यामध्ये असंख्य लहान आणि मध्यम आकाराच्या सिंचन प्रकल्पांची आणि भूजल विकासाची भूमिका ही उघडपणे निर्णायक स्वरूपाची आहे. जून २०१० च्या अखेरीस, एकूण ३५७५ राज्य स्तरावरील प्रकल्प होते (यामध्ये ८६ मोठे प्रकल्प, मध्यम आकाराचे २५८ प्रकल्प आणि राज्य क्षेत्रातील ३१०८ लहान प्रकल्प समाविष्ट आहेत). यामध्ये 'पूर्ण झालेल्या' आणि 'अंशत: पूर्ण झालेल्या' अशा दोन्ही प्रकल्पांचा समावेश आहे. शिवाय यामध्ये स्थानिक क्षेत्रातील २७९२८ जलसंवर्धन प्रकल्प आणि पाणलोटक्षेत्र व भूजल विकास प्रकल्प आहेत. या सर्व विविध प्रकारच्या प्रकल्पांनी एकत्रितरीत्या ९४.७७ लाख हेक्टर्स इतकी संभाव्य सिंचनक्षमता निर्माण केली आहे. या विविध प्रकल्पांशी संबंधित माहिती आणि आधारसामुग्रीची विश्वसनीयता ही एकसारखी नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. यापैकी जवळपास अर्धी संभाव्य क्षमता ही राज्य स्तरावरील प्रकल्पांमधून साध्य झालेली आहे आणि उर्वरित संभाव्य क्षमता ही स्थानिक क्षेत्रातील प्रकल्प आणि भूजल विकासाच्या माध्यमातून साध्य झालेली आहे.

१०.४.१० मागील दशकातील क्षमतेच्या वार्षिक विकासाचे सविस्तर वर्णन **जोडपत्र १०.७** मध्ये आहे. सर्व विभागांनी जलसाठ्याची उपलब्धता आणि सिंचित क्षेत्र यांमध्ये सतत वाढ नोंदविलेली आहे. नाशिक विभागात पाणी साठा आणि सिंचित क्षेत्र हे उल्लेखनीयरीत्या अधिक चांगले आहे. नाशिक आणि औरंगाबाद विभाग हे गोदावरी खोऱ्याने जोडलेले आहेत. नाशिक विभागाअंतर्गत असलेल्या गोदावरी खोऱ्यातील वाढीव जलसाठ्यामुळे, खालच्या बाजूस असलेल्या औरंगाबाद विभागास या वाढीव जलसाठ्याचे लाभ विभागून देण्याबाबतची मागणी पुढे येत आहे. प्रादेशिक समतोलाच्या संदर्भात या मागणीस बरेच महत्त्व आहे. समितीस अशी आशा आहे की, महाराष्ट्र जलसंपदा विनियमन प्राधिकरण, मुंबई या प्रश्नांच्या संदर्भात सुयोग्य अशा विनियमाची तरतूद करील.

१०.४.११ पाणलोट क्षेत्रातील कालव्यांच्या प्रत्यक्ष वितरणाचे जाळे हे सिंचन विकासाची सद्यस्थिती प्रत्यक्षपणे अधिक चांगल्या प्रकारे निर्देशित करते. म्हणून, विकासाच्या स्थितीचे प्रमाण म्हणून प्रकल्पाच्या विकसित सिंचन क्षमतेचा वापर करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. विकसित क्षमतेचा अधिक चांगल्यारीतीने वापर करण्याची शक्यता सुधारण्याकरिता, पाणलोट क्षेत्र विकास उपक्रमासारख्या वेगळ्या मापन पद्धती स्वतंत्ररीत्या बळकट करण्याची गरज आहे. परंतु वार्षिक पर्जन्यमानातील वैविध्यामुळे, वापरलेल्या सिंचन क्षमतेची आकडेवारी ही वर्षानुवर्ष मोठ्या प्रमाणात वेगवेगळी दिसून येते.

१०.४.१२ जोडपत्र १०.७ मध्ये देण्यात आलेल्या माहितीत एकूण पाणीसाठा आणि राज्यात तयार करण्यात आलेल्या सिंचन क्षेत्राची क्षमता याबाबतची माहिती पूर्णपणे प्रतिबिंबित होत नाही. जोडपत्र १०.७ मध्ये चित्रित करण्यात आलेली स्थिती राज्य स्तरांवरील प्रकल्पांपुरतीच मर्यादित आहे. स्थानिक क्षेत्र प्रकल्पांतील पाणी साठ्याची उपलब्धता आणि पाटबंधारे सिंचित क्षेत्र आणि भूजल विकास यांचे चित्रण जोडपत्र १०.७ मध्ये दिलेल्या माहितीत केलेले नाही.

प्रशासकीय विभागांकडून वापरण्यात येणाऱ्या पाणी साठ्याचे आणि सिंचनाचे स्रोत यांची वार्षिक माहिती ही अजूनही पद्धतशीरपणे गोळा आणि संकलित करण्यात आलेली नाही. तरीसुद्धा जोडपत्र १०.७ मध्ये काही महत्त्वाची वैशिष्ट्ये प्रतिबिंबित होतात उदाहरणार्थ पाणीसाठा त्याचप्रमाणे कोकण आणि अमरावती विभागात कमी असलेल्या स्थापित सिंचन संभाव्यता कमी आहे आणि जोडपत्र १०.७ मध्ये हे सर्व दर्शविण्यात आले आहे. ***प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र हे निर्मित सिंचित क्षेत्राच्या केवळ ४० टक्के इतके आहे याची नोंद घेण्यात यावी.*** लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाला अधिकार बहाल करून या परिस्थितीत सुधारणा करणे गरजेचे आहे. ही समिती लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यंत्रणेचे पुनरुज्जीवन करण्याचे आणि त्यात नवचैतन्य आणण्याचे जोरदार समर्थन करते.

१०.४.१३ वार्षिक पर्जन्यमानातील बदलांमुळे 'पाण्याचे साठे' आणि 'सिंचित क्षेत्र'यांमध्ये तीव्र चढउतार होतात. वार्षिक पर्जन्यमानातील तीव्र बदल हे सिंचन प्रकल्पांचे नियोजन आणि प्रत्यक्षातील व्यवस्थापन यादृष्टीने महत्त्वाचे आहेत. सरासरीनुसार, ही तफावत ३० टक्क्यांच्या आसपास राहिली आहे.कोकण प्रदेशात ही तफावत तुलनात्मक दृष्ट्या फारच कमी असून ती तशीच राहीली आहे. तथापि, नाशिक विभागात २००६ मध्ये पाण्याचा साठा ३८११ दशलक्ष घन मीटर इतका होता आणि २००९ मध्ये तो २७२३ दशलक्ष घन मीटर इतका कमी झाला. यावरून २५ टक्के इतकी घट झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे औरंगाबाद विभागात २००६ मध्ये पाण्याचा साठा ६२०४ दशलक्ष घन मीटर इतका होता तो २००९ मध्ये २००० दशलक्ष घन मीटर इतका कमी झाला. ही घट चिंताजनक आणि धोक्याची सूचना देणारी आहे. २००८ मध्ये सिंचित क्षेत्र २.९९ लाख हेक्टर इतके होते. तथापि, २००९ मध्ये ते फक्त १.२७ लाख हेक्टर इतके कमी झाले. सिंचन क्षेत्रातील अशा प्रकारची तफावत ही एक चिंताजनक बाब आहे.

१०.४.१४ अमरावती विभागातही अशाच प्रकारचे चढ-उतार पहायला मिळतात. या विभागातील सिंचनाचे क्षेत्र २००२ मध्ये १.१४ दशलक्ष हेक्टर इतके होते जे कमी होऊन २००४ मध्ये फक्त ०.३२ लाख हेक्टर इतकेच राहिले. २००६ मध्ये पाण्याचा साठा २३४२ दशलक्ष घन मीटर इतका होता जो २००९ मध्ये ११४२ दशलक्ष घन मीटर इतका कमी झाला. नागपूर विभागात, पाण्याचा साठा २००३ मधील २८८६ दशलक्ष घन मीटर वरून २००४ मध्ये ९८० दशलक्ष घन मीटर इतका कमी झाला. त्याचप्रमाणे सिंचनाखालील क्षेत्र २००३ मध्ये ३.०९ लाख हेक्टर वरून २००४ मध्ये २.१३ लाख हेक्टर इतके कमी झाले.

१०.४.१५ जोडपत्र १०.८ मधील संभाव्य भूजल हे मंजूर प्रकल्पासाठी केलेल्या तरतुदीवर आधारित आहे. विहिरींद्वारे वापरता येणाऱ्या भूजलाच्या आधारावर संभाव्य भूजल वापराचा अंदाज काढण्यात आला आहे. साठविण्यात आलेल्या पाण्याचा काही भाग पावसाळ्या दरम्यानही वापरण्यात येतो. या परिमाणाची माहिती दरवर्षी बदलत राहते. हे बदल मुख्यत: पर्जन्यमानातील खंड यामुळे होतात. पावसाळ्यातील पाण्याचा वापर आणि पाऊस पडण्यामधील खंड यांचा एकमेकांशी असणाऱ्या संबधांचा अजून योग्यपणे अभ्यास करण्यात आलेला नाही. या संबंधांचा शोध घेणे आणि मोजमाप करणे गरजेचे आहे. परंतु प्रत्यक्ष सिंचनाबाबतची माहिती उपलब्ध आहे. म्हणून, निर्माण केलेला पाणी साठवणीची क्षमता आणि प्रत्यक्ष सिंचन यांचा संबद्ध निर्देशांक म्हणून वापर करणे शक्य आहे.

१०.४.१६ सामाजिक आणि आर्थिक विकास हा निर्णायक दृष्ट्या पाण्याच्या साठवण क्षमतेवर अवलंबून आहे. आपण महाराष्ट्र राज्याची तुलना, समान पर्जन्यमान भौगोलिक क्षेत्र आणि भूशास्त्रीय आकारमान असलेल्या ऑस्ट्रेलिया, स्पेन, दक्षिण अफ्रिका यांसारख्या इतर देशांशी करू शकतो. या देशांमध्ये निर्माण करण्यात आलेली दरडोई साठवण क्षमता ही पुढीलप्रमाणे आहे :

ऑस्ट्रेलिया	--	४७३३ घन मीटर
स्पेन	--	१४१० घन मीटर
दक्षिण अफ्रिका	--	७५३ घन मीटर

महाराष्ट्रात सध्या उपलब्ध असलेल्या ३०० घन मीटर इतक्या दरडोई साठवण क्षमतेपेक्षा या सर्व क्षमता जास्त आहेत, हे स्पष्टपणे दिसून येते.

टीप: २००८ आणि २००९ च्या सिंचनावरील स्थिती अहवालांत पुणे विभागातील पाणी साठा फुगवून सांगितला आहे. २०१० च्या अहवालात या माहितीतील चूक दुरुस्त करण्यात आली आहे. प्रकल्पात साठवण करण्यात येणाऱ्या पाण्याची पातळी मागील दशकात सातत्याने वाढत आहे. तथापि, पुणे विभागातील **सिंचन क्षमता शहरी भागाच्या पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे मागील दोन वर्षांत कमी झाली आहे. ही बाब आणखी छाननी होण्यायोग्य आहे.**

१०.५ महाराष्ट्र शासनाचे जल धोरण

१०.५.१ महाराष्ट्र शासनाने जुलै २००३ मध्ये राज्याचे जल धोरण घोषित केले. महाराष्ट्राचे जल धोरण हे एक प्रगतिशील जल धोरण म्हणून ओळखले जाते. जल स्रोतांचा एकात्मीकृत विकास आणि व्यवस्थापन हा या धोरणाचा केंद्रीय बिंदू आहे. दर पाच वर्षांनी किंवा गरज वाटल्यास पाचपेक्षा कमी वर्षांत धोरणाचा पुन्हा आढावा घेण्याचाही यात समावेश आहे. या धोरणातील काही महत्त्वाच्या तरतुदींमुळे प्रादेशिक असमतोलाबाबत धोरणात्मक विचार करताना मदत होईल. त्या पुढीलप्रमाणे :

१. पाण्याच्या वापराचे नियोजन, बांधणी आणि व्यवस्थापन यात जनतेचा सहभाग अनिवार्य.

२. एकूण घनपरिमाणाच्या आधारे वापरकर्त्यांना पाण्याचा पुरवठा.

३. कायदेशीररीत्या हक्कदार असणाऱ्या पाणी वापरकर्ता संस्थांकडे सिंचन व्यवस्थापन यंत्रणा सोपविणे.

४. उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रचार.

५. दारिद्र्य निर्मूलनासाठी आणि प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी भावी योजना तयार करणे.

६. 'पाण्याची विपुलता' असणाऱ्या प्रदेशांकडून 'पाण्याचे दुर्भिक्ष' असणाऱ्या प्रदेशांकडे पाणी वळविणे.

१०.५.२ या तरतुदींमधील १ ते ३ या सामाजिक संघटनात्मक स्वरूपाच्या आणि कौशल्याच्या आहेत. अजूनपर्यंत प्रादेशिक असमतोलाचे विश्लेषण हे मुख्यत: 'संरचनात्मक पैलू' यावर केंद्रीत होते. तथापि, त्यात 'सामाजिक' अंगाचा विचार करण्यात आला नव्हता. त्याचप्रमाणे, पाण्याच्या मर्यादित उपलब्धतेच्या संदर्भात, मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध करण्यासाठी आणि विकासाच्या फायद्यांची प्रत्यक्ष जाणीव करून देण्यासाठी कौशल्याचा आणि तांत्रिक क्षमतेचा विकास निर्णायक आहे. या दृष्टीने, उपरोक्त चौथा मुद्दा (तरतूद) अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याहीपेक्षा, सिंचन प्रकल्पांच्या फायद्यांचे मोजमाप करण्यासाठी जास्त व्यापक कल्पनात्मक रूपरेषा नव्याने तयार करायला हवी. या व्यापक रूपरेषेत फक्त संरचनात्मक पैलूंचा विचार केलेला नसेल तर सामाजिक सुधारणा आणि समृद्धतेच्या उपाययोजनांचा देखील त्यात समावेश असेल. या प्रयोजनार्थ, लाभक्षेत्र विकासाचा व्यापक दृष्टिकोन कार्यान्वित करणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातील काही तत्त्वांबाबत इथे खाली लाभक्षेत्र विकास हे शीर्ष असलेल्या भागात चर्चा केली आहे.

१०.५.३ इलेक्ट्रॉनिक किंवा माहिती तंत्रज्ञान सेवा यांसारख्या काही उद्योगांना पाण्याची कमी गरज असते आणि तेथे पाण्याचा वापरही कमी होतो. पाण्याची उपलब्धता कमी आणि अपुरी असणाऱ्या प्रदेशांत, अशा उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि आवश्यक वित्तीय सहाय्यासह, रस्ते, वीज, रेल्वे आणि हवाई वाहतूक सुविधा यांसारख्या आवश्यक

मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजेत. औद्योगिक प्रगतीमध्ये मागे असणाऱ्या प्रदेशांचाही याच प्रकारचे समान धोरण व धोरणात्मक सहाय्य देण्याच्या दृष्टीने विचार व्हावा.

१०.५.४ महाराष्ट्र सिंचन व जलसंपत्ती आयोगाने (१९९९), उपखोऱ्यांतील पाणी हस्तांतरित करण्याच्या अनेक योजना सुचविल्या आहेत. उदा. निम्न वैनगंगा उपखोऱ्यातील *(प्राणहिता नदी)* ७०७८ दशलक्ष घन मीटर पाणी टंचाई असलेल्या मध्य गोदावरी उपखोऱ्यांमध्ये हस्तांतरित करता येईल. मध्य गोदावरी उपखोरे हे, बव्हंशी मराठवाड्यात आहे. या प्रदेशाच्या पाणी विकासाचे दोन्ही निर्देशांक (म्हणजेच दरडोई पाणी उपलब्धता व सिंचन क्षेत्र), या प्रदेशात पाण्याची विशेष तूट असल्याचे दर्शवितात.

१०.५.५ सन २०१०-२०११ या वर्षी, महसूल विभागांनी केलेल्या पाण्याच्या वापराची स्थिती पुढीलप्रमाणे आहे (एकक: दशलक्ष घन मीटर)

तक्ता १०.७

महसूल विभागनिहाय पाणी वापर

(दशलक्ष घनमीटरमध्ये)

प्रदेश	संकल्पित साठा	१५.१०.२०१० रोजी असलेला प्रत्यक्ष साठा	बाष्पी भवन	पाणी वापर					एकूण पाणी वापर	सिंचनेतर वापराची टक्केवारी
					सिंचनेतर					
				सिंचन	पिण्याचे पाणी	औद्योगिक	इतर	एकूण		
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
कोकण	३५०१	३०६०	२३३	२९१	१०७६	२७०	१०३०	२३७६	२९००	८०.०
नाशिक	४४७३	३५७४	८१९	२२३०	५६२	९१	३२५	९७८	४०२७	२२.०
पुणे	१०२२८	८८००	१२६८	६३८७	९३०	११२	४५८	१५००	९१५५	१५.०
औरंगाबाद	७५०८	६२६८	१४१६	३२४१	३८४	४५	८५	५१४	५१७१	१०.०
अमरावती	२९६९	२६५२	९७२	१२४७	११७	३	५८	१७८	२३९७	८.०
नागपूर	४७०६	२९५५	६७५	२०५१	१९०	१३५	४	३२९	३०५५	१८.०
एकूण	**३३३८५**	**२७३०९**	**५३८३**	**१५४४७**	**३२५९**	**६५६**	**१९६०**	**५८७५**	**२६७०५**	**२१.५**
असलेल्या प्रत्यक्ष साठ्याची टक्केवारी			**१९.७**	**५६.६**	**११.९**	**२.४**	**७.२**	**२१.५**	**९७.८**	**२१.५**

स्रोत: समितीच्या जलसंपत्ती उप गटाने पुरविलेली एकत्रित माहिती.

१०.५.६ जलसंपत्ती विनियमन नियम, २००५ नुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. या प्राधिकरणाला पाण्याच्या हक्कदारांची व्याख्या करण्याचे आणि सर्व नदी खोऱ्यांकरिता पाण्याचे समन्यायी वाटप करण्याची व एकात्मीक विकास योजना तयार करण्याची सुनिश्चिती करण्याचे आदेश आहेत. ही कार्ये पार पाडताना, प्रादेशिक असमतोलाची त्याची अपेक्षित जबाबदारी लक्षात घ्यावी असा देखील आदेश दिला आहे.

१०.६ पाण्याचा पुरवठा व उपलब्धता यांमधील चढउतार :

१०.६.१ सरासरी उपलब्धतेच्या आधारे, साठवणूक प्रकल्पांची योजना करणे हे, सर्वसाधारणपणे अधिक फलदायी आहे. स्वातंत्र्याच्या लगतनंतरच्या वर्षांमध्ये पर्जन्य तसेच नदीच्या पाण्याचा प्रवाह मोजण्याची साधने आणि तंत्रे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची होती आणि कमी वापरली जात होती. वेगळ्या अवलंबितेच्या निकषांच्या आधारे, पाण्याच्या तुलनात्मक उपलब्धतेचा अभ्यास करणे शक्य नव्हते. तथापि, आज स्थिती सुधारलेली असून ती अधिक चांगली आहे. सध्या पुरेशी आधारसामग्री उपलब्ध असून तिचे संगणकाच्या वापराने कार्यक्षमपणे विश्लेषण करता येऊ शकते. म्हणून,

७५ टक्के अवलंबिततेच्या मानकाचा पूर्वीचा वारसा चालविण्याचे कोणतेही कारण नाही. असे निकष, संपूर्ण जगातील अन्य कोणत्याही देशांमध्ये, प्रचलित नाहीत. पर्जन्य व नदीचे प्रवाह यांवरील समावेशक आधारसामग्रीच्या अभावामुळे विकासाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये भारतात याचा वापर केला जात होता. पूर्वी कालवे नदीच्या प्रवाहांची दिशा बघून बांधले जात होते. या परिस्थितीमध्ये, ७५ टक्के अवलंबिततेच्या निकषांचा 'कामचलाऊ साधन' म्हणून अंगिकार केला होता. राष्ट्रीय स्तरावरदेखील या निकषाचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. सर्व खोऱ्यांतील व उपखोऱ्यातील संकल्पचित्रण व प्रकल्प नियोजन, ५० टक्के अवलंबिततेच्या निकषावर किंवा सरासरी उपलब्धतेवर केले जावे.

१०.६.२ न्यायाधिकरणाच्या निर्णयामध्ये साठ्याच्या वाढत्या आकारावर किंवा धरणांची उंची वाढविण्यावर कोणतेही निर्बंध घातलेले नाहीत. न्यायाधिकरणाने घातलेले निर्बंध पाण्याच्या वार्षिक वापराशी संबंधित आहेत. धरणाची उंची वाढविणे, साठवणूक क्षमतेमध्ये वाढ करण्यामध्ये खूपच लाभदायक ठरेल. तथापि, पूर्ण झालेल्या जुन्या प्रकल्पांच्या बाबतीत आवश्यक जमीन संपादन करताना, भयंकर अडचणींना तोंड द्यावे लागेल. त्यामुळे धरणाची उंची वाढविण्याच्या पर्यायावर, अधिक मर्यादा येईल. तथापि, जर आवश्यक जमीन सहजरीत्या उपलब्ध झाली तर त्याचा विचार करता येईल आणि नवीन प्रकल्पांच्या बाबतीत, याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे.

१०.६.३ सर्वसाधारणपणे असे गृहीत धरण्यात येते की, शहरी व ग्रामीण घरगुती वापरांसाठी, बारमाही फलोत्पादनासाठी आणि औद्योगिक वापरासाठी आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्याची ९० ते ९५ टक्के इतकी अवलंबितता असली पाहिजे. ज्या वर्षी, जेव्हा पाण्याची उपलब्धता, या स्तरापेक्षा खाली गेली तेव्हा, उपलब्ध पाणी निर्बंधित करणे आणि त्याचे मितवाटप करणे आणि प्रदेशाच्या बाहेरील स्त्रोतांमधून पाणी पुरविणे आवश्यक झाले आहे. अशी स्थिती दहा वर्षातून एकदा उद्‌भवू शकते. जर अशा आकस्मिक परिस्थितीचे पुरेसे नियोजन केले नाही व त्यासाठी तरतूद केली नाही तर, मनुष्य व पशुधन यांना मोठ्याप्रमाणात स्थानांतरित करणे अपरिहार्य बनते. सध्याच्या नियोजन प्रक्रियेमध्ये अशा आकस्मिक परिस्थितीसाठी स्वतंत्रपणे व विभिन्नपणे तरतूद केलेली नाही. म्हणून, पूर्वीच्या १९७२-१९७४ च्या दुष्काळाप्रमाणे किंवा सध्याच्या २०११-२०१२ चे अवर्षणाप्रमाणे, स्थिती उद्‌भवल्यास, आपल्याला तदर्थ आपत्ती /आपत्ती निवारण व्यवस्थापनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणून, पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून असलेली कोणतीही विकास नियोजन प्रक्रिया व पद्धती यांमध्ये अशी आकस्मिक परिस्थिती अपेक्षित धरली पाहिजे आणि त्यामध्ये नुकसानीचे आणि आपत्तीचे निवारण करण्यासाठी सुस्पष्ट तरतूद देखील केली पाहिजे.

१०.६.४ अशी गंभीर पाणी टंचाई, टँकरने पाणी पुरवठा करून त्याद्वारे पाणी पुरवठ्याची व्यवस्था करून हाताळणे आवश्यक आहे. तथापि, अशा उपाययोजना, अडचणीच्या आणि अत्यंत खर्चिक असतात. अशा टंचाई निवारण कार्यक्रमांच्या या तात्पुरत्या योजना, या अवर्षणाच्या दुष्काळाच्या कारणांचे निर्मूलन करण्यात क्वचित प्रभावी ठरतात.

१०.६.५ अशा पाणी टंचाई असलेल्या प्रदेशांसाठी, स्वतंत्र, टिकाऊ पाईपद्वारे व नळाद्वारे पाणी पुरवठा योजना अंमलात आणणे उचित ठरेल. यामुळे एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात पाण्याचे हस्तांतरण करून त्या आधारे अवलंबित पाण्याची सुनिश्चिती होईल. त्याचप्रमाणे, पाणलोट क्षेत्र विकास, भूजल व विहीर विकास, शेततळी, ग्रामतळी, लहान धरणे, सुधारित विजेची उपलब्धता, सूक्ष्म पाटबंधारे तंत्रे, इत्यादींसारख्या योजनांकरिता मोठ्या प्रमाणात वित्तीय तरतुदी करता येतील. ही कामे कालबद्ध रीतीने पूर्ण करण्यात यावीत, म्हणजे, पाण्याची टंचाई असलेली क्षेत्रे ही, हळूहळू विकसित क्षेत्रांच्या बरोबरीला येऊ शकतील. या क्षेत्रांमधील पाण्याचे नियोजन, हे इतर पारंपरिक पाणी योजनांपेक्षा लक्षणीयपणे वेगळे आहे. सामान्यपणे, जोडपत्र १०.९ मध्ये उल्लेखिलेल्या बहुतेक पाणी साठवण योजना, या नदीतील पाण्याच्या प्रवाहाच्या प्रमाणावर आधारित आहेत. पाणी टंचाई असलेल्या प्रदेशांमधील योजना, थेट पावसापासून मिळणाऱ्या पाण्यावर आणि पावसापासून मिळणारे असे पाणी धारण करण्याच्या आणि त्याचे संवर्धन करण्याच्या कार्यक्षम यंत्रणांवर अवलंबून आहेत. पाणलोट क्षेत्र विकास आणि भूजल पुनर्भरण संकल्पना, या तत्त्वावर वर्तविल्या आहेत. अमरावती व औरंगाबाद विभागामधील पाण्याचे नियोजन करताना, केवळ नदीच्या पाण्याच्या प्रवाहांची दिशा

बदलण्याच्या आणि साठवणूक करण्याच्या पांरपरिक दृष्टिकोनापेक्षा या मार्गाचे अनुसरण करावयास हवे.

टीप: सन २००८-०९ व २०१०-११ मध्ये पाण्याचा वापर, साठवणुकीच्या १०० टक्क्यांपेक्षा अधिक झाला, कारण खरीप हंगामामधील पाण्याचा वापर आणि पावसाळ्यानंतरच्या अंत:प्रवाहातील पाण्याचा वापर एकत्रितपणे विचारात घेतला आहे.

काही वर्षांमध्ये, एकूण साठ्यातील बाष्पीभवनामुळे वाया गेलेल्या पाण्याबरोबरच खरीप हंगामातील पाण्याचा वापर कमी झाल्यामुळे पाण्याचा वापर खूप कमी झाल्याचे दिसून येते. गेल्या पाच वर्षांमध्ये, हा फरक ३० टक्क्यांपेक्षा अधिक झाल्याचे दिसून येते. अशी तूट भरून काढण्यासाठी पाणी व्यवस्थापन यंत्रणेने स्वत:ला सुसज्य ठेवले पाहिजे.

१०.७ अतिरिक्त साठ्याची गरज

१०.७.१ 'पडणाऱ्या पावसाच्या परिवर्तनशीलतेमुळे' उप-खोऱ्यांमधील साठवण सुविधांद्वारे साध्य झालेली प्रत्यक्ष साठवण ही, असमान आहे. त्यांपैकी काही साठे, साठवण क्षमतेच्या केवळ अर्ध्यावरच पोहचले आहेत. त्यांपैकी अनेक साठे, अजूनही त्यांच्या क्षमतेच्या अर्ध्यापेक्षा खाली आहे आणि त्याचवेळी त्यापैकी काही साठे क्षमतेच्या वर ओसंडून वाहत असल्याचे अनुभवास आले आहे. संपूर्ण कालावधीमध्ये उप-खोऱ्यांमध्ये 'निर्माण केलेल्या साठवण क्षमतेच्या' तुलनेतील 'प्रत्यक्ष वार्षिक उपलब्धता' आपण विचारात घेतली तर, आपणास असे आढळून येते की, बहुसंख्य उप-खोऱ्यांची 'प्रत्यक्ष उपलब्धता' ही निर्माण केलेल्या 'साठवण क्षमते'पेक्षा खूपच कमी आहे. विशेषत: अमरावती प्रदेशातील पूर्णा व तापीचे खोरे आणि मराठवाडा विभागातील मांजरा व सीनेचे उप-खोरे यामध्ये 'साठवण क्षमते'शी प्रत्यक्ष उपलब्धतेचे असलेले गुणोत्तर हे ५० टक्क्यांहून कमी आहे. गर्भित तुटीवर, मात करण्यासाठी, अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे. परिणामी भविष्यात साठवण क्षमता निर्माण करण्याची दोन कारणे आहेत.

(१) ज्या प्रदेशांमध्ये १०० टक्के वापरास मुभा आहे अशा प्रदेशांमध्ये किंवा ज्या प्रदेशांचे टंचाई / तूट किंवा आत्यंतिक तूट हे वैशिष्ट्य राहिलेले आहे अशा प्रदेशांमध्ये, सरासरी किंवा सरासरीहून कमी अवलंबित्वाच्या निकषाच्या आधारे, साठवणीचे नियोजन करणे आवश्यक ठरेल.

(२) पाण्याच्या उपलब्धतेचा संपूर्ण वार्षिक वापर करण्याच्या सुव्यक्त प्रयोजनासह अतिरिक्त साठवण सुविधा निर्माण करणे.

१०.७.२ म्हणून, प्रत्येक नदी खोऱ्यातील जल स्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन करताना, या खोऱ्यांमध्ये अंतर्भूत असलेली तिची उप-खोरी व पाणलोट क्षेत्रे याद्वारे खोरे योजनेची पुनर्रचना करून, त्याद्वारे वाढीव पाणी साठवणुकीसाठी व्यापक तपशीलवार योजना तयार करावी. राज्य शासनाने, अशी व्यापक खोरे-निहाय बृहत योजना तयार करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे आणि त्या जलदगतीने लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. जलसंपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन यांमधील या कमतरतेमुळे आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेले पुरेसे पाणी साठवण्यात अपयश येईल आणि महत्त्वपूर्ण उपाययोजनेमधील विकास मंदावेल.

१०.७.३ तफावतीच्या म्हणजेच, साठवण क्षमता व प्रादेशिक प्रत्यक्ष पाणी उपलब्धता यांमधील तूटीच्या संदर्भात, जल विकास निर्देशांक तयार करणे इष्ट ठरेल. जलसंपदा विभागाने, त्याचा वार्षिक अहवाल, २०१० मध्ये अशा तफावती किंवा तूट यांवरील प्रादेशिक आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. टक्केवारीच्या संदर्भातील तुटीच्या अशा उपाययोजना आगामी दहा वर्षांसाठी वापरता येतील आणि त्यानंतर त्यांचे पुनर्विलोकन करता येऊ शकेल.

१०.८ पाणी व सिंचनाशी संबंधित असलेल्या शासन नियुक्त समित्या व अभ्यास गट :

१०.८.१ प्रकियात्मक पद्धतींसह पाणी व सिंचन धोरणे ठरविण्यासाठी अनेक समित्या व अभ्यास गट नियुक्त करण्यात आले होते.

१. महाराष्ट्र सिंचन आयोग, (अध्यक्ष स.गो.बर्वे) १९६२

२. महाराष्ट्राच्या अवर्षण प्रवण प्रदेशांची सत्य शोधक समिती (अध्यक्ष श्री.सुकथनकर १९७३)

३. 'वाढीव सिंचन लाभांसाठी आठमाही पाणी पुरवठा' यावरील समितीचा अहवाल- १९७९ (सर्वश्री देऊस्कर, दांडेकर, देशमुख)

४. कोकण सिंचन विकासावरील उच्चस्तरीय समिती- १९८० (अध्यक्ष श्री.बी.जी.खाथाल)

५. 'पश्चिम घाटाच्या जल स्त्रोतांच्या अभ्यासा'चा अहवाल. (कोकण सर्वंकष प्रारूप योजना- १९८१) (अध्यक्ष डॉ. एम.एस.स्वामीनाथन)

६. सिंचन व्यवस्थापनावरील उच्चस्तरीय समिती, १९८१ (अध्यक्षश्री. एस.बी.जैन)

७. 'महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्य शोधन समिती'चा अहवाल - १९८४ (अध्यक्ष प्रा. वि.म.दांडेकर)

८. महाराष्ट्रातील विस्तारित सिंचन क्षमतेवरील अभ्यास गटाचा अहवाल - १९८६ (अध्यक्ष श्री. पी.डी.कसबेकर)

९. महाराष्ट्रातील जल व सिंचन आयोग- १९९६ (अध्यक्ष डॉ. एम.ए.चितळे)

१०. अवर्षण प्रवण तालुक्यांच्या सिंचन अनुशेषावरील समितीचा अहवाल - २००४ (अध्यक्ष श्री. व्ही.रंगनाथन)

१०.८.२ १९६२ मध्ये, बर्वेआयोगाने, प्रत्येकी १५ वर्षांनी सिंचन धोरणाच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी व आढावा घेण्यासाठी एका समितीची नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. तथापि, कायमस्वरूपी तत्त्वावर, आकडेवारी गोळा करण्यासाठी, माहिती व विश्लेषण करण्यासाठी कोणतीही पद्धतशीर यंत्रणा नाही. म्हणून बर्वेआयोगाने योजिलेल्या धोरणविषयक आढाव्याचा दर्जा, पुरेसा गाठला गेला नाही. अवर्षण प्रवण प्रदेश सत्य शोधन समितीने (सुकथनकर)-१९७३ देखील, अवर्षण प्रवण प्रदेशासाठीच्या संबंधित निकषाप्रमाणे ५० टक्के अवलंबित्वाच्या (७५ टक्के अवलंबित्वाऐवजी) निकषाची शिफारस केली होती. त्याचप्रमाणे सुकथनकर समितीने, पाणलोट विकास कार्यक्रमामध्ये एकात्मिक मृद व जलसंधारण कामांची देखील शिफारस केलेली होती. त्यांनी, लोकशिक्षणाचे व जनजागृती करण्याचे महत्व देखील ठामपणे अधोरेखित केले होते. सर्वश्री देऊस्कर, दांडेकर, देशमुख- या तीन सदस्यीय समितीनेदेखील ५० टक्के अवलंबित्वाच्या निकषावर सिंचन प्रकल्पांचे नियोजन करण्याचे जोरदार समर्थन केलेले आहे. या अत्यंत महत्त्वाच्या शिफारशी आहेत आणि त्यांचा गांभीर्यपूर्वक पाठपुरावा केला पाहिजे. या समितीने, अधिक अलीकडच्या आकडेवारीसह या पूर्वीच्या समित्यांचे विश्लेषण व शिफारशी विचारात घेतलेल्या आहेत. या विश्लेषणाच्या आधारे, आम्ही प्रत्येक विभागाच्या सिंचन विकासासाठी स्वतंत्रपणे विशेष शिफारशी केलेल्या आहेत.

१०.९ सिंचन विकास : विभागांचा आढावा

१०.९.१ कोकण विभागातील सिंचन विकास

कोकणाची भौगोलिक व हवामानविषयक वैशिष्ट्ये, पर्जन्यमान, लागवडयोग्य जमीन, प्रचलित व नवीन

पीकपद्धती याबाबत चौकशी करण्यासाठी आणि कोकणातील सिंचन विकासासाठी कालबद्ध एकात्मिक यथार्थ योजनेची शिफारस करण्यासाठी १७ ऑक्टोबर, १९८० रोजी श्री.बी.जी.खट्टाल यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नियुक्त केली होती. समितीने, मार्च १९८१ मध्ये तिचा अहवाल सादर केला आणि तिने कोकण प्रदेशातील नियोजन व लाभ क्षेत्र विकासाकरिता वेगळ्या विकास प्राधिकरणाची शिफारस केली.

१०.९.२ शासनाने, १९८१ मध्ये डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रासाठी (कोकण) पश्चिम घाट व्यापक योजना समिती नियुक्त केली. या समितीने, कोकणाच्या कृषी हवामानविषयक माहितीकरिता स्वतंत्र संशोधन केंद्राची, कोकणातील धरणे व कालवे यांची संकल्पचित्रे व नकाशे तयार करण्यासाठी स्वतंत्र विभागाची आणि कोकणासाठी स्वतंत्र लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाची शिफारस केलेली आहे. तिने, प्रशासकीय यंत्रणेमधील शेतकऱ्यांच्या संघटनेच्या मोठ्या सहभागदायी भूमिकेचे देखील समर्थन केले. तसेच, या समितीने, ७५ ते९० टक्के अवलंबित्वाच्या पारंपरिक प्रमाणकाकडे दुर्लक्ष करून सरासरी तत्त्वावर, जलविद्युत प्रकल्पांचे नियोजन करण्याची आणि लहान व सूक्ष्म जल-विद्युत प्रकल्पांसाठी व्यापक योजना तयार करण्याची शिफारस केली. याशिवाय, समितीने, लॅटेराईट खडक स्थिती अंतर्गत जल व्यवस्थापनासाठी चाचणी-नि-प्रात्यक्षिक केंद्राची आणि कोकणातील सिंचन व्यवस्थापनासाठी मूलभूत नियोजनाचा घटक म्हणून, पाच किंवा त्याहून अधिक गावांच्या समूहाची शिफारस केली. भौगोलिक व सामाजिक आर्थिक प्रदेश म्हणून कोकणाची अनेक व्यवच्छेदक वैशिष्ट्ये आहेत आणि त्याच्या, स्वत:च्या अनन्यसाधारण अशा आवश्यकता व गरजा आहेत. तथापि, नंतरच्या धोरणांमध्ये, कोकणाची अशी व्यवच्छेदक वैशिष्ट्ये व समस्या पुरेशा प्रमाणात विचारात घेतल्या गेल्या नाहीत.

१०.९.३ कोकण प्रदेशातील पाण्याची नैसर्गिक उपलब्धता ही, मुख्यत्त्वेकरून विपुल आहे. मुंबईसह कोकणात, दरडोई २२८३ दशलक्ष घन मीटर इतके पाणी आहे आणि प्रति हेक्टरी ३६४५१ दशलक्ष घन मीटर इतके पाणी आहे. तथापि, पुढील नैसर्गिक वैशिष्ट्ये आहेत ज्यांमुळे गंभीर अडचणींना तोंड द्यावे लागते :

१) उच्च चढ-उतार असणारा डोंगराळ प्रदेश आणि बहुतांश लागवडयोग्य क्षेत्र अरुंद पट्ट्यांमध्ये वसलेले आहे.

२) अनेक क्षेत्रांतील भूशास्त्रीय संरचनेमध्ये, मोठ्या प्रमाणात लॅटेराईट खडकांचा समावेश आहे. या खडकांमध्ये पाण्याचा साठा करणे अवघड आहे आणि लॅटेराईट खडक स्थिती अंतर्गत पाणी साठवणे व पाणी पुरवठा व्यवस्थापन याविषयी आपण संशोधन करण्याची व प्रयोग करण्याची गरज आहे. जलकुंड व सूक्ष्म जलसिंचन योजना तातडीने कार्यान्वित केल्या जाव्यात.

३) डोंगराळ प्रदेशांच्या बेसुमार उतारांमुळे, पाईपलाईनच्या विस्तृत जाळ्याद्वारे पाणी वाहून नेणे आवश्यक आहे.

४) साठवण आणि सूक्ष्म सिंचन यांसारखे लहान जल तळे कार्यान्वित करण्याची व ते लोकप्रिय करण्याची गरज आहे.

५) पूर किंवा पूरसदृश्य स्थिती (रन-ऑफ) यांचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असलेले वेगळे उपाय व संरचना करणे. त्या प्रदेशात वारंवार पूर येतात आणि अशा पूरस्थितीच्या नियंत्रणासाठी मोठा खर्च करावा लागतो. ही समस्या कायमस्वरूपी आणि सोयीस्करपणे सोडविण्यासाठी शास्त्रीय पर्यायांकरिता संशोधन करण्याची आपल्याला गरज आहे.

१०.९.४ अमरावती विभागातील सिंचन विकास

अमरावती प्रदेशांमध्ये, दरडोई व प्रति हेक्टरी पाण्याची उपलब्धता ही, अनुक्रमे, केवळ ६२४ व १९७४ दशलक्ष घन मीटर्स इतकी आहे, जी राज्य सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. या विभागात, खोल काळीमाती अधिक

प्रमाणात आहे आणि काही भागांत खारपाणपट्टा जमिनी आहेत. या जमिनी अतिशय उत्पादक म्हणून ओळखल्या जातात. तथापि, या मृदा वैशिष्ट्यामुळे, प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेस काही विशिष्ट अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणींवर मात करण्यासाठी तांत्रिक व आर्थिक निकषामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. अशा सुधारणेमुळे, या प्रदेशांमधील अनेक प्रकल्पांमध्ये सुधारणा करता येईल व त्यांना गती देता येईल. या दृष्टीने, हा विभाग, काही विशेष योजना व व्यवस्था करण्यास पात्र आहे. परंतु अशा उपाययोजनांचा खालील परिच्छेद १०.९.१४.१ मधील आराखड्याप्रमाणे काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. खोल काळ्या मातीमुळे, प्रकल्पांद्वारे निर्माण केलेल्या जल साठ्यांचा पारंपरिक कालवा पद्धतीने अधिक चांगल्याप्रकारे वापर केला जाऊ शकत नाही. पाण्याचा वापर व वितरण व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या, दृष्टीने पर्यायी पद्धती विकसित करण्याची गरज आहे, (उदा. पाईपलाइन्सद्वारे वितरण). भविष्यात, प्रकल्पांचे सर्वेक्षण व नियोजन करताना, या आवश्यकता व विशेष वैशिष्ट्ये विचारात घेतली पाहिजेत.

१) या विभागात, खोल काळी मृदा व खारपाणपट्टा प्रकारची मृदा आहे. म्हणून, प्रकल्पांत वापरलेल्या तांत्रिक व आर्थिक निकषाची समुचितपणे पुनर्निश्चिती व सुधारणा करण्याची गरज आहे.

२) शेततळी व सूक्ष्म सिंचन यांचा वापर करण्यासाठी याठिकाणी मोठा वाव आहे.

३) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकासाची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरेल.

४) जलसिंचनाच्या वितरण पद्धतीतील उणिवा दुरुस्त करण्याची गरज आहे.

५) या प्रदेशात खोल काळी मृदा असल्यामुळे, पाईपलाईन जाळ्यांवर आधारित असलेले पाण्याचे वितरण व अभिसरण करणे आवश्यक असेल.

१०.९.५ वितरण पद्धतीतील उणिवा व किरकोळ दोष (अनपेक्षित संकटे) यांवर अत्यंत तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. या प्रदेशांतील संत्रा लागवड निर्णायकपणे या भूजल सिंचनावर अवलंबून आहे. म्हणून, या प्रदेशांसाठी स्वतंत्र पाणलोट विकास आणि भूजल विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरेल. सुकथनकर समितीच्या शिफारशींचे अनुपालन करताना, महाराष्ट्र शासनाने अमरावती, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, तिवसा, वरूड, नांदगाव (खांडेश्वर) आणि मोर्शी हे सात तालुके कायमस्वरूपी अवर्षण प्रवण प्रदेश म्हणून घोषित केले आहेत. यादृष्टीने, पेय जल योजनांचे नियोजन करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. या विभागात, पाईपलाईनवर आधारित असलेल्या पाणी पुरवठ्याच्या जाळ्याच्या विकासाचा मोठ्याप्रमाणात स्वीकार केला पाहिजे.

१०.९.६ खानदेश व नाशिक महसूल विभागातील सिंचन (पाटबंधारे) विकास

तापी खोरे हे, खानदेशातील सिंचन विकासातील मुख्य खोरे असल्याचे दिसून येते. तथापि, हे खोरे, पाणी तुटीचे खोरे आहे. महाराष्ट्राला वाटप झालेले नर्मदेतील अत्यधिक पाणी, तापी खोऱ्यामध्ये हस्तांतरित करण्याची गरज आहे. जळगाव जिल्ह्यातील भूजल पातळी, ३० मीटर खाली पोहचलेली आहे. हे कमी झालेली भूजल संपत्ती पुन्हा भरून काढण्याची गरज आहे. विशेष भूशास्त्रीय रचना सातपुडा प्रदेशाचे हे वैशिष्ट्य असून तो सार्वत्रिकपणे बंजाडा प्रदेश म्हणून संबोधला जातो. या भूशास्त्रीय संरचनेमुळे पाणी जलदगतीने पाझरते व झिरपते. यादृष्टीने, या क्षेत्रांमध्ये पाणलोट विकास कार्यक्रमांचा उपाय केला पाहिजे ज्यामुळे उपलब्ध भूजल पातळीत सुधारणा होईल.

१०.९.७ या उप-खोऱ्यात, '*बंधाऱ्यांवरील*' तीस '*फड*' पद्धती आहेत. पारंपरिकरीत्या, '*फड*' पद्धतीचे लाभार्थी लोकांकडून सामूहिकरीत्या व्यवस्थापन केले जात होते. धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्यामध्ये असे आठ '*फड*' बंधारे आहेत व त्यापैकी सहा बंधारे सध्या कार्यान्वित आहेत. पांझरा नदीतील, कार्यक्षम नदी प्रवाह व पाण्याची उपलब्धता ही,

सर्वसाधारणपणे, पाच ते सहा महिने टिकून राहते. पाणी पुरवठ्याच्या खात्रीशीर प्रमाणाच्या अभावामुळे आणि पाणी उपलब्धतेच्या प्रमाणावर परिणाम करणाऱ्या इतर कारणांमुळे '**फड**' पद्धतीचा क्रमश: ऱ्हास होत चालला आहे. म्हणून, सध्याची उद्दिष्ट्ये आणि काळ या संदर्भात, सिंचन व्यवस्थापनाच्या सामाजिक व तांत्रिक परिमाणांचा पुनर्विचार करण्याची व त्याचे पुन्हा संरेखन करण्याची गरज आहे. पाणी वापर संघाचे नवीन जाळे, विकसित करण्याची व मजबूत करण्याची गरज आहे.

१०.९.८ गोदावरी खोऱ्याचा काही भाग, नाशिक विभागामध्ये स्थित आहे. सह्याद्री डोंगररांगातून येणाऱ्या विपुल पावसाच्या पाण्याच्या प्रवाहामुळे गोदावरी खोऱ्याचा हा भाग, सुविकसित झाला आहे. ब्रिटीश राजवटीमध्ये, सह्याद्रीच्या डोंगररांगातील पाण्याची विपुल उपलब्धता, गोदावरी खोऱ्याच्या सर्वसमावेशक नियोजनाचा भाग म्हणून संपूर्णत: विचारात घेतली गेली नव्हती. पाणी साठवणुकीचे नियोजन, ब्रिटीश राज्य क्षेत्रापुरते परिरुद्ध केलेले होते आणि त्यापलीकडे त्याचा विस्तार केलेला नव्हता. गोदावरी खोऱ्याच्या सर्वसमावेशक विकासाचा पुनर्विचार करणे आणि नाशिक विभागातील पाण्याच्या नियोजनाची आवश्यक ती परिणामस्वरूप सुधारणा करणे आता दूरदर्शीपणाचे ठरेल. महाराष्ट्र जलसंपत्ती विकास प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून याचा तातडीने विचार करण्यात यावा. गोदावरी खोऱ्याचे पाण्याची तूट हे वैशिष्ट्ये आहे. म्हणून, महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने, मध्य गोदावरी प्रदेशातील पाण्याच्या तुटीवर मात करण्यासाठी अप्पर वैतरणा प्रकल्पातून सध्या मुंबईला दिले जाणारे पाणी पूर्व-क्षेत्राकडे वळविण्याची शिफारस केलेली होती. या शिफारशीची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात यावी.

१०.९.९ पुढील उपाययोजनांकरिता प्राथम्याने लक्ष देण्याची आवश्यकता असेल :-

१) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकासाची अंमलबजावणी करणे.

२) विस्तृत प्रमाणात भूजलाचे पुनर्भरण करणे. भूशास्त्रीय संरचना, म्हणजे बंजाडा प्रकारची संरचना अशा भूजलाचे पुनर्भरण करण्यास पूरक असेल.

३) शेततळी व सूक्ष्म सिंचन यावर मोठ्याप्रमाणात भर देण्यात यावा.

४) डोंगराळ व कापसासाठी उपयुक्त असलेल्या काळ्या मृदेमुळे वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी, बंद पाईपलाइन जाळ्यामार्फत पाण्याचे वितरण व अभिसरण करणे.

गोदावरी नदी हा नाशिक व औरंगाबाद या विभागांना जोडणारा एक सामाईक घटक आहे म्हणून गोदावरी नदी खोरे विकास प्राधिकरण हे, दोन विभागांमधील पाण्याचे नियोजन व वितरण करण्याच्या स्थितीत आहे. या दोन विभागांमधील पाण्याची नैसर्गिक उपलब्धता, मुळातच असमान आहे. गोदावरी नदी खोरे अभिकरण, यापूर्वीच निर्माण करण्यात आले आहे.परंतु, पाणी उपलब्धतेतील तफावत कमी करण्यासाठी आणि संपूर्ण हंगामभर आणि वर्षभर पाण्याचे उत्तम, कार्यक्षम व कौशल्यपूर्ण व्यवस्थापन करण्यासाठी एक प्राधिकरण म्हणून तिला पुन्हा आकार देण्याची गरज आहे.

१०.९.१० मराठवाडा विभागातील सिंचन विकास

मराठवाड्यातील दरडोई व प्रति हेक्टरी पाण्याची उपलब्धता ही, महाराष्ट्रात सर्वात कमी आहे आणि महाराष्ट्राच्या सरासरी उपलब्धतेच्या खूपच कमी आहे. (ती दरडोई ४३८ घनमीटर आणि प्रति हेक्टर १३८३ घनमीटर इतकीच आहे). दुर्देवाने, लवादाने दिलेल्या निर्णयानुसार, मराठवाड्यासाठी उपलब्ध असलेले पाणी क्वचितच पुरते. मराठवाडा प्रदेशातील मोठा भाग हा, कायमस्वरूपी अवर्षण प्रवण आहे आणि पावसाच्या लहरीपणा (कमीजास्तपणा) विचारात घेता, या प्रदेशामध्ये पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास सर्वोच्च

प्राधान्य दिले पाहिजे. याशिवाय, या प्रदेशातील पाणी साठविण्याच्या तंत्रज्ञानात, आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. या प्रदेशातील सिंचन हे, केवळ नदीच्या प्रवाहांवर अवलंबून राहू नये. त्याऐवजी, पावसाचे पाणी, शेततळ्यात, गावतळ्यात आणि रोधी बंधाऱ्यांमध्ये साठवणे दूरदर्शीपणाचे ठरेल. स्थानिक तलावामध्ये पावसाच्या पाण्याचा साठा केल्यामुळे आणि भूजल स्रोताचे पुनर्भरण केल्यामुळे या प्रदेशातील पाण्याची उपलब्धता स्थिर राहील. या प्रयोजनाकरिता, पाणलोट क्षेत्रांच्या विकासाकरिता प्राथम्यतत्त्वावर तपशीलवार आराखडे तयार करणे अत्यावश्यक ठरेल. सिंचनाचे पाणी, पाईपलाईन जोडणीद्वारे वितरण व अभिसरण करण्याची गरज आहे आणि सूक्ष्म सिंचनाचा मोठ्याप्रमाणात वापर केला पाहिजे. सध्या, गोदावरी खोऱ्यातील पाणी वापरावर निर्बंध घातलेले आहेत. म्हणून, न्यायाधिकरणाच्या निर्णयाचा, पुनर्विचार व पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे. गोदावरी खोऱ्यातील मराठवाड्याची पाण्याची तूट भरून काढण्यासाठी, वैतरणा नदीचे पश्चिम दिशेला वाहणारे पाणी पूर्वेकडे वळविण्याची गरज आहे. पाण्याची कमी उपलब्धता पाहता, कमी पाण्यावर वाढणाऱ्या पिकांना, उत्तेजन द्यावे आणि या पिकांचे उदा.कडधान्ये (डाळी), तेलबिया, कापूस यांचे आणखी संस्करण करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे. पाण्याचा नागरी व औद्योगिक वापर, पुनर्चक्रिकरणकारी (पुनर्निमिती) गरजांच्या अधीन असला पाहिजे. नागरी स्थानिक संस्था व उद्योग (कारखाने) यांच्याद्वारे असे पुनर्चक्रिकरण (पुनर्निमिती) करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

पुढील उपाययोजनांकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे :

१) एकात्मिक कालबद्ध पाणलोट विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

२) शेततळे व सूक्ष्म सिंचन कार्यक्रम यांवर भर देणे.

३) डोंगराळ प्रदेशामुळे व काळ्या मातीमुळे होणारा पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी बंदिस्त पाईपलाईन जाळ्यामधून पाण्याचे वितरण व अभिसरण करणे.

४) न्यायाधिकरणाने घातलेल्या पाण्याच्या वापरण्यायोग्य प्रमाणावरील निर्बंधांचा पुनर्विचार व पुनर्विलोकन करणे.

५) मराठवाडा प्रदेशासाठी कमी पाण्याची तूट असणाऱ्या गोदावरी खोऱ्यात वैतरणा नदीमधून पाणी वळविण्याची योजना करणे आवश्यक ठरेल.

१०.९.११ पूर्व विदर्भातील म्हणजेच नागपूर विभागातील सिंचन विकास

या प्रदेशाला, मुबलक पाऊस व नद्या यांसह निसर्गाची देणगी लाभलेली आहे. तरीही, न्यायाधिकरणाने परवानगी दिलेल्या पाण्यापैकी निम्म्याहून अधिक पाणी, एकतर प्रकल्प अपूर्ण असणे किंवा प्रकल्प सुरू न होणे किंवा याहूनही वाईट म्हणजे, असे कोणतेही नियोजन न करणे या कारणांमुळे वापरण्यात आलेले नाही. जनजाती लोकांचे कमी उत्पन्न विचारात घेता पाण्यामुळे या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात अभिवर्धन होऊ शकेल. पूर्व विदर्भातील पिकांच्या पद्धतीत धान लागवडीचे प्राबल्य आहे. इतर स्पर्धात्मक पर्यायी पीक पद्धतीत ऊसाचे पीक काढणे सहज शक्य होईल. पूर्वी, शिंदेवाही, चंद्रपूर जिल्हा येथे ऊस संशोधन केंद्र होते. तथापि, ऊस लागवडीसाठी बारमाही पाणीपुरवठा आवश्यक असतो. बारमाही पाणी पुरवठ्याच्या अनुपलब्धतेमुळे तसे होत नाही. ही परिस्थिती, बऱ्याच अंशी कोकणासारखीच आहे. याशिवाय कोकणाप्रमाणे येथेही पीक पद्धतीवर मर्यादा आहेत. पाणी उपलब्ध झाल्यास, शेतीमध्ये स्वत:होऊन दुबार पीक घेण्याची पद्धती स्वीकारता येईल. या प्रदेशात, वन अधिनियमामुळे आणि इतर पर्यावरणविषयक परवानग्यांमुळे भेडसावणाऱ्या अडथळ्यांमुळे पाटबंधारे प्रकल्पांना मान्यता मिळण्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात अडचण येत आहे. वन जमिनींच्या पट्ट्यांचा समावेश असणाऱ्या पूर्व विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पांना, मान्यता देण्यात खूपच वेळ लागतो. वन जमिनी ताब्यात घेण्याबद्दल प्रदान करावयाच्या

नुकसानभरपाईचे प्रमाण अतिशय जास्त आहे. प्रकल्प खर्चात नुकसानभरपाईच्या अशा मूल्याचा समावेश करण्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी करणे आणि ते पूर्ण करणे, कठीण ठरते. म्हणून, वन जमिनींच्या नुकसानभरपाईचे सध्याचे निव्वळ मूल्य, प्रकल्प खर्चामधून वेगळे व स्वतंत्र ठेवले पाहिजे. हा प्रदेश, नक्षलवादी चळवळीमुळे देखील प्रतिकूलपणे प्रभावित आहे. ज्यांनी पूर्व विदर्भातील भौतिक विकास रोखून ठेवलेला आहे, असे हे दोन मुख्य घटक आहेत. शक्य तितक्या शीघ्रतेने, प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त साधनसंपत्ती देण्यात आली पाहिजे.

पुढील उपाययोजनांकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे :

१. वन मंत्रालयाने व पर्यावरण मंत्रालयाने लादलेले तांत्रिक व आर्थिक अडथळे दूर करणे.

२. जे प्रकल्प प्रदेशातील विकासाचा वेग वाढवतील आणि विकासावरील नक्षलवादी चळवळीचा प्रतिकूल प्रभाव प्रतिबंधित करतील असे प्रकल्प शीघ्र गतीने पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र अतिरिक्त निधी देण्यात यावा.

३. ***माजी मालगुजारी*** तलावांचे पुनरुज्जीवन करणे आणि त्यातील साठवण क्षमता वाढविणे.

४. सूक्ष्म सिंचन पद्धतीस चालना देण्यासाठी ***माजी मालगुजारी*** तलावांचा पुनर्विकास करणे.

५. या प्रदेशात पावसामुळे पुरेसा पाणी पुरवठा होतो. प्रकल्प वेगाने पूर्ण केल्यास, दुबार किंवा बहुविध पिके घेण्यास चालना मिळेल आणि प्रदेशात आर्थिक स्थैर्य येईल.

६. प्राणहिता, इंद्रावती, वैनगंगा, वर्धा यांसारख्या नद्यांच्याबाबतीत, बंधारे व उपसा सिंचन योजना दोन्हींच्या एकत्रित वापरातून सिंचन क्षमता वाढविणे शक्य होईल. यामुळे वन नियमन मंत्रालयापासून भेडसावणाऱ्या अडचणी देखील दूर करता येतील.

७. कापसास उपयुक्त असणाऱ्या काळ्या मृदेच्या क्षेत्रांसाठी पाईपलाईनद्वारे पाण्याचे वितरण.

८. पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांची सर्वोच्च प्राधान्याने अंमलबजावणी करावी.

९. भूजल क्षमतेचा मोठ्याप्रमाणात वापर करणे.

१०.९.१२ विदर्भाच्या अल्पविकसित आणि गरिबातल्या गरीब प्रदेशातील पाण्याच्या उपलब्धतेची हमी देणाऱ्या आणि पाण्याची उपलब्धता वाढविणाऱ्या प्रकल्पांना, सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. तथापि, पर्यावरण व वन मंत्रालयाच्या विद्यमान कार्यपद्धतीविषयक आणि परवानगीविषयक मार्गदर्शकतत्त्वे, या प्रक्रियेत, मोठा व्यत्यय आणतात. ही परवानगीविषयक कार्यपद्धती विदर्भातील प्रकल्पांसाठी मोठ्याप्रमाणात हानीकारक ठरल्याचे सिद्ध झाले आहे. पाण्याखाली गेलेल्या वन क्षेत्राचे निव्वळ विद्यमान मूल्य ही एक काल्पनिक आरोपकारी कल्पना आहे. या तरतुदीशिवाय, आणखी प्रतिपूरक वनीकरण करणे देखील आवश्यक आहे. प्रतिपूरक वनीकरणाच्या आणि निव्वळ विद्यमान मूल्याच्या खर्चासाठी आवश्यक असलेला निधी, राज्याच्या एकत्रित निधीत भारित केला पाहिजे आणि प्रदेशाचा व प्रदेशातील प्रकल्पांचा घटक खर्च म्हणून त्याचा अन्वयार्थ लावू नये. त्यास राज्याच्या एकत्रित निधीवरील अविभाज्य खर्च म्हणून समजले पाहिजे आणि याचा प्रदेशाशी संबंध लावण्यात येऊ नये.

१०.९.१३ मध्य वैनगंगा उप-खोऱ्यात ६८६२ ***माजी मालगुजारी*** तलाव आहेत. यापैकी अनेकांचे बांधकाम, गोंड राजाच्या राजवटीमध्ये ३०० ते ४०० वर्षापूर्वी करण्यात आले होते. धानाच्या लागवडीचे संरक्षण करणे आणि ऊस लागवडीस सहाय्यभूत ठरणे, हे या तलावांचे प्रमुख उद्दिष्ट होते. तथापि, सध्या त्यांचा धानाच्या लागवडीसाठी अतिशय चांगल्या प्रकारे वापर होत आहे. या भागातून ऊसाचे पीक बहुत करून दिसेनासे झाले आहे. ब्रिटिश कालावधीत, तलावांचे

व्यवस्थापन ***मालगुजारांकडे*** हस्तांतरित केले होते. ***मालगुजारांमार्फत*** महसूल गोळा करण्याची पद्धती प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने, असे केले होते. स्वातंत्र्यानंतर, शासनाने, त्यांना आपल्या अधिपत्याखाली घेण्याचा प्रयत्न केला. तथापि, ज्या पद्धतीमुळे हे, तलाव विकसित झाले व त्यांचे व्यवस्थापन केले गेले ती सामूहिक प्रयत्नांची व व्यवस्थापनाची पद्धती हळूहळू नष्ट झाली. आज त्यापैकी अनेक ***मालगुजारी*** तलाव लुप्त झाले आहे. जे कार्यान्वित आहेत व कार्यरत आहेत, अशा तलावांचे पुनर्बांधकाम करण्याची व पुनर्रचना करण्याची गरज आहे. सामुदायिक सहभागी प्रयत्नामध्ये जिचे स्वत:चे मूळ आहे अशा सिंचनाच्या या पद्धतींचे पुनरूज्जीवन करण्याची गरज आहे. विविध जिल्ह्यातील ० ते १०० हेक्टर्स आणि १०१ ते २५० हेक्टर्स इतकी सिंचन क्षमता असलेल्या माजी ***मालगुजारी*** तलावांशी संबंधित असणारी आकडेवारी खालील तक्त्यात सादर करण्यात आली आहे.

तक्ता १०.८
पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या पुन:स्थापन प्रस्तावासाठी आवश्यक असलेला निधी

(क्षेत्र हेक्टर्समध्ये आणि रुपये कोटीत)

अ.क्र.	जिल्हा	० ते १०० हेक्टर्स		१०१ ते २५० हेक्टर्स		एकूण	एकूण	माजी मालगुजारी तलावांच्या पुन:स्थापनासाठी आवश्यक असलेला निधी
		तलावांची संख्या	सिंचन क्षमता	तलावांची संख्या	सिंचन क्षमता	तलावाची क्षमता	सिंचन	
१	२	३	४	५	६	७	८	९
१	नागपूर	२१६	६०८५	–	–	२१६	६०८५	१२२
२	भंडारा	१४३४	१४५६४	२८	७११७	१४६२	२१६८१	४३४
३	गोंदिया	१७४८	२८६६४	३८	६५१०	१७८६	३५१७४	७०३
४	चंद्रपूर	१६७८	२८१०२	५१	१०५०३	१७२९	३८६०५	७७२
५	गडचिरोली	१६५८	२२३०८	११	२१३३	१६६९	२४४१	४८९
	विदर्भ	**६७३४**	**९९७२३**	**१२८**	**२६२६३**	**६८६२**	**१२५९८६**	**२५२०**

स्रोत: पृष्ठ क्र.२६ व २८, ग्राम विकास विभागाची पुस्तिका दिनांक ०१/०४/२०११ अभ्यास गटाने पुन:स्थापनासाठी प्रति हेक्टर रु.२ लाख इतका खर्च अंदाजित केला आहे.

१०.९.१४ या तलावांनी, एकूण सिंचन केलेल्या क्षेत्राच्या जवळपास १ लाख हेक्टर किंवा त्याहून अधिक क्षेत्र व्यापलेले आहे. समुचित पीक पद्धती व अशा मोठ्या हेक्टर क्षेत्राचे सिंचन व्यवस्थापन या सिंचनाच्या स्रोतांशी जोडलेले आहेत. म्हणून, येत्या काही वर्षांत, लुप्त होण्याच्या मार्गावर असलेल्या या पद्धतीच्या पुनरूज्जीवनाचा शाश्वत कार्यक्रम असणे, दूरदर्शीपणाचे ठरेल. या तलावांनी व्यापलेल्या क्षेत्रासाठी लाभ क्षेत्र विकास कार्यक्रमांची संकल्पना लागू करणे उपयुक्त ठरेल, ज्यामध्ये, पुनर्बांधणी, देखभाल(परिरक्षण), देखभालीमधील लोकांचा सहभाग, पीक पद्धतीतील बदल आणि उत्पादित केलेल्या कृषि उत्पादनासाठी युनिटे, यांसारख्या पैलूंचा (घटकांचा) समावेश असेल. माजी मालगुजारी तलावांच्या विकासाबरोबरच सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर करण्यास व त्याचे प्रचालन करण्यास चालना द्यावयाची आहे.

१०.९.१४.१ मुबलक पाणी असलेल्या क्षेत्रामधून पाण्याचा तुटवडा असलेल्या क्षेत्रामध्ये पाण्याचे आंतर-खोरे हस्तांतरित करण्याची मागणी आहे. तथापि, संबंधित लोकांकडून याबाबत भिती व्यक्त होत आहे आणि आक्षेप घेण्यात येत आहेत. म्हणून, जेव्हा खाली नमूद केलेल्या पूर्व अटींची पूर्तता करण्यात येईल तेव्हाच अशा हस्तांतरणाचे समन्वेषण करणे उचित ठरेल.

१. पाण्याचे कोणतेही प्रमाण अधिक आहे असे घोषित करण्यापूर्वी, मूळ क्षेत्रामधील लोकांच्या पाण्याच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा समजून घेण्यात याव्यात आणि

त्या पूर्णपणे भागविण्यासाठी नियोजन करण्यात यावे. कालबद्ध रीतीने भागविण्यात येणाऱ्या या गरजांची पूर्णपणे अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून घेण्यासाठी स्वयंसिद्ध यंत्रणा बसविण्यात यावी.

२. पाण्याच्या हस्तांतरणाच्या अशा शक्यतेचे पर्यावरणदृष्ट्या व सामाजिक-आर्थिकदृष्टया होणाऱ्या परिणामाचे उचित निर्धारण करण्यात यावे व निर्णय घेताना त्याबाबत विचार करण्यात यावा आणि प्रस्तावांमध्ये आवश्यक स्थितिसुधारविषयक उपाययोजनांचा समावेश करण्यात यावा.

३. पाण्याच्या हस्तांतरणाच्या परिणामी, अशा हस्तांतरणामुळे दाता क्षेत्राला लाभापासून वंचित रहावे लागल्यास किंवा त्या क्षेत्राची दुर्दशा झाल्यास कोणतीही द्यावयाची नुकसान भरपाई तपशीलवार तयार करावी आणि प्रकल्पाच्या प्रस्तावात त्यांचा समावेश करण्यात यावा.

४. मुबलक पाणी असलेल्या बऱ्याच क्षेत्रांमध्ये आदिवासी लोक राहत असल्याने, त्यांच्या हक्कांचे व हितसंबंधांचे संरक्षण करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

१०.९.१५ उर्वरित महाराष्ट्रातील सिंचन विकास

या क्षेत्रामध्ये तीन महत्त्वाच्या समस्या आहेत. १) पुणे विभागामध्ये झपाट्याने होणारी वाढ आणि पाण्याच्या साठवणुकीचा आणि सिंचनाचा उच्च स्तर, मात्र कोकण विभागापेक्षा पिछाडीवर आहे. २) ऊसाखालील खूप मोठ्या जमिनीला खूप अधिक पाण्याची आवश्यकता असते. ३) यामधील अनेक तालुक्यांमध्ये पाण्याची टंचाई आहे. पश्चिम महाराष्ट्रात, सातारा आणि सांगली जिल्ह्यांचा खूप मोठा भाग हा कायम अवर्षण प्रवण असतो. या क्षेत्राचा चांगला भाग समुद्रसपाटीपासून ६०० मीटर उंचीवर आहे. यामुळे या क्षेत्रासाठी जलसंपत्ती आणण्याचे नियोजन करण्यात प्राथमिक अडचण येते आणि अडथळा येतो. समुद्रसपाटीपासून ६०० मीटरच्या वर असलेली कवठेमहांकाळ, माणदेश, आटपाडी, सांगोला यांसारखी क्षेत्रे लागोपाठ तीन वर्षे अवर्षणग्रस्त आहेत. उरमोडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांची त्याच क्षेत्रांमध्ये राहण्याची व्यवस्था केली आहे. यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. पुनर्वसन झाल्यानंतर पाणी मिळेल अशी पुनर्वसित लोकांना आशा होती. दुर्दैवाने, त्यांना सिंचनाचा कोणताही लाभ झाला नाही आणि त्याहून वाईट म्हणजे रोजचे पिण्याचे पाणी उपलब्ध होणे देखील दुर्लभ झाले. नदीतून २०० मीटर उंचावर उपसा करणे हे आर्थिकदृष्ट्या परवडण्याजोगे नाही तरी मानवतावादी दृष्टिकोनातून या क्षेत्रांसाठी, काही प्रमाणात उपसा सिंचन करणे आवश्यक आहे. या प्रदेशातील संपूर्ण क्षेत्र कालबद्धरीतीने पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाखाली आणण्याची गरज आहे. यामुळे अवर्षणाची तीव्रता कमी होण्यास मदत होईल. पिण्याच्या पाण्याची आणि पशुधनासाठी चाऱ्याची अनुपलब्धता ही या क्षेत्राची अत्यंत गंभीर समस्या बनली आहे. ही विशिष्ट आणि कठीण परिस्थिती लक्षात घेता, उपसा सिंचन योजना लागू करणे ही खास बाब मानण्यात यावी. अशा योजनेद्वारे शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करताना, ज्या पिकांना पाणी कमी लागते आणि पाण्याच्या प्रति युनिटानुसार ज्यांची किंमत वाढते अशा पिकांवर भर देऊन, त्याच स्वरूपाचे पीक घ्यावे याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, शेतकऱ्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचन यांसारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर करणे आवश्यक आहे. सूक्ष्म सिंचनाला अर्थसहाय्याचे योग्य असे पाठबळ देण्याची आवश्यकता आहे. ज्यांचे क्षेत्र नदीच्या पात्रापासून समान उंचीवर नाही अशा अहमदनगर आणि सोलापूर यांसारख्या जिल्ह्यांमध्ये देखील वर उल्लेखिलेल्या निर्बंधाचा अवलंब केला पाहिजे. एका बाजूला उंच सपाट जमिनी आणि दुसऱ्या बाजूला त्याच खोऱ्यामध्ये सखल सपाट जमिनी असलेल्या उंचसखल जागा आहेत. ही विशेष भौगोलिक अडचणी

असणारी आणि वांरवार दुष्काळ पडणारी क्षेत्रे आहेत. असे प्रदेश विभिन्न कार्यक्रम राबवून वेगळ्या प्रकारे हाताळण्याची गरज आहे. या क्षेत्रांना एकात्मिकृत पाणलोट विकास, शेततळी व सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाची देखील गरज आहे. या क्षेत्रांचा विकास पुढील गोष्टींवर अवलंबून असेल–

१. एकात्मिकृत पाणलोट विकासाची अंमलबजावणी

२. शेततळी आणि सूक्ष्म सिंचन यांवर मोठ्याप्रमाणात भर देणे

३. उंचसखल, चढउतार असलेल्या व डोंगराळ भूप्रदेशांकरिता आवश्यक असल्याप्रमाणे नळमार्गाद्वारे पाण्याचे वितरण आणि अभिसरण करणे.

४. अवर्षणप्रवण आणि उंच सपाट भूप्रदेशांसाठी विशेष उपसा योजना तयार करणे.

१०.९.१६ नागपूर प्रदेशातील ८० टक्के भाग हा भाताच्या लागवडीखालील आहे. कोकणाप्रमाणेच या प्रदेशाला देखील भाताच्या पिकाऐवजी दुसरे कोणतेही पीक नाही. पिकांच्या पद्धतीतील कोणताही बदल, पिकांच्या किमान दोन हंगामाकरिता सिंचनाच्या उपलब्धतेच्या अभावामुळे कठीण असल्याचे दिसून आले आहे. पूर्वी, ऊसाची लागवड 'गूळ' तयार करण्याकरिता केली जात होती. सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मिळाल्यास केवळ पूर्ववत पीक घेता येऊ शकेल. ऊसासाठी असलेल्या क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास साखर कारखाने देखील शक्य होतील आणि वाढीस लागतील. वैनगंगा खोऱ्यासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ असणे आवश्यक आहे.

१०.९.१७ औरंगाबाद विभागामधील ओलिताच्या क्षेत्रांच्या पीकपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात विविधता असल्याचे दिसून येते. या विभागात, कालव्याच्या पाण्यावरील पिकांपेक्षा विहिरीवरील पाण्याच्या पिकांचा हिस्सा अधिक चांगला आहे. कमी पाण्याची आवश्यकता असलेल्या आणि पाण्याच्या प्रति युनिटनुसार मोठ्या प्रमाणात मूल्यवाढ देणाऱ्या पिकांचा अवलंब करण्याची गरज आहे.

१०.९.१८ पुणे विभागात कालवा तसेच उपसा व विहीर सिंचनाखाली मोठ्या आकाराचे ओलिताचे क्षेत्र आहे. तथापि, २५ टक्के ओलिताचे क्षेत्र हे इतर पिकांच्या प्रकाराखाली आहे. या विभागामध्ये पाणी टंचाईची आणि तीव्र पाणी टंचाईची क्षेत्रेदेखील आहेत. म्हणून सर्वसाधारण समन्यायी विकासाकरिता आणि ग्रामीण असमानता कमी करण्याकरिता पीकपद्धतीतील बदल आणि सूक्ष्म सिंचनाच्या दिशेने वाटचाल करणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. यादृष्टीने, या विकसित प्रदेशामध्ये, उप-खोऱ्यांमध्ये पिकांच्या स्वरूपाची पुनर्रचना करणे आणि सूक्ष्म सिंचन तंत्राचा मोठ्या प्रमाणात अवलंब करणे हे अत्यंत फायदेशीर ठरेल. किंबहुना, जेथे प्रतिहेक्टर पाण्याची उपलब्धता ही प्रतिहेक्टर ३,००० क्युबिक मीटरपेक्षा कमी आहे अशा सर्व प्रदेशांकरिता, पिकांच्या स्वरूपाचा गंभीरपणे पुनर्विचार करण्यात यावा. ज्यांना अधिक प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते अशा सर्व पिकांकरिता (ऊसासह) क्षेत्राच्या प्रमाणावर मर्यादा किंवा उच्च मर्यादा घालण्यात यावी. कमी पावसावर किंवा सिंचनावर वाढणाऱ्या परंतु अधिक मूल्य देणाऱ्या पिकांना चालना देण्यात यावी आणि उचित धोरणांमार्फत त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे.

१०.९.१९ नाशिक प्रदेशात, विहिरींच्या सिंचनाखालील ओलिताचे क्षेत्र हे कालवा सिंचनापेक्षा १.५ पटीने अधिक आहे. पुणे प्रदेशासारखे, ओलिताखालील क्षेत्राचा सर्वात मोठा भाग, अन्य पिकांच्या (उदा.द्राक्षे) प्रकारासाठी उपयोगात आणला जातो. या दोन विभागांमध्ये पीकपद्धती व पाण्याच्या प्रत्येक युनिटवर आधारित मूल्य वाढ यांमध्ये उल्लेखनीय संबंध दिसून येतो. ही बाब अन्य प्रदेशांसाठी देखील हितकारक व निर्णायक ठरेल.

१०.९.२० ओलिताखालील जमिनीचे केवळ भौगोलिक लेखांकन केल्याने सामाजिक व आर्थिक विकास पुरेसा अधोरेखित होत

नाही. सिंचित प्रदेशातील समृद्धीचा स्तर, घेतलेली पीके, अशा पिकांचे वर्चस्व असलेले बाजारमूल्य व या पिकांशी संबंधित संस्करण उद्योगाचा विकास, यांसारख्या घटकांवर अवलंबून आहे. म्हणून, केवळ सिंचित क्षेत्राचे ठरीव प्रमाण विचारात घेणे उचित ठरणार नाही. तर पिकाचे स्वरूप त्याची दर हेक्टरी उत्पादकता व त्या पिकांच्या संबंधातील संभवनीय संस्करण याबाबी विचारात घ्याव्या लागतील. या प्रयोजनासाठी, ज्यात कृषि संस्करण उद्योगासह सिंचनाच्या उपलब्धतेने निर्माण झालेल्या आर्थिक स्थानांचा अधिक एकत्रितपणे विचार केला आहे असा अधिक व्यापक यथार्थदर्शी लाभक्षेत्र विकास साधावा लागेल. म्हणून, सिंचन यंत्रणेच्या नियोजनातील व व्यवस्थेतील अविभाज्य दुवा म्हणून पीक पद्धतीतील बदल, पिकांची साठवण व संस्करण उद्योगांची वाढ याबाबी विचारात घ्याव्या लागतील.

१०.१० सिंचित क्षेत्राच्या विकासाची संकल्पना

१०.१०.१ क्षेत्रीय स्तरावर सिंचन व्यवस्थापन करताना सामना कराव्या लागणाऱ्या अडचणी वास्तविक सिंचित क्षेत्र व क्षेत्रानुसार निर्माण केलेली सिंचन संभाव्यक्षमता यांमध्ये खूपच तफावत आहे. वास्तविक सिंचित जमिनीच्या आधारावरून विकास निर्देशक स्वीकारण्यात यावा. येत्या १० वर्षांमध्ये, सिंचित क्षेत्रातील तूट अशा निर्देशकावर आधारित असावी. भारत सरकारने ही तफावत शोधून काढण्याचे व त्याबाबत अभ्यास करण्याचे काम भारतीय व्यवस्थापन संस्था, बंगलोर यांच्याकडे सोपविले होते. या अभ्यासाद्वारे तयार करण्यात आलेले उल्लेखनीय निष्कर्ष, निरीक्षणे व सिंचन यंत्रणेची व्यवस्था करण्याबाबतचा विभागाचा मागील अनुभव, त्याचबरोबर या समितीच्या पाणी उप-गटाद्वारे दिलेल्या कार्यक्षेत्र भेटी यांतून निष्पन्न झालेली माहिती आम्ही येथे सादर करीत आहोत.

१. प्रत्येक वर्षी धरणे किंवा साठवण सोयी त्यांच्या कमाल क्षमतेपर्यंत भरली नाहीत. परिणामी, वापरण्यायोग्य पाणी क्षमतेच्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात पाणी प्रत्यक्षात उपलब्ध आहे.

२. प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची ऊस, केळी यासारख्या अधिक पाण्याची आवश्यकता व सघनता असलेल्या नगदी पिकांना अधिक पसंती आहे.

३. खरीप हंगामात पाण्याची मागणी तुलनेने बरीच कमी असते.

४. जलदगतीने होणाऱ्या नागरीकरणामुळे, वाढीव प्रमाणातील पाणी सिंचनेतर प्रयोजनांसाठी राखून ठेवावे लागते.

५. लाभक्षेत्रातील वितरण यंत्रणा अपूर्ण व अपुरी आहे.

६. वितरण यंत्रणेतील उणीवेमुळे अनेक अपेक्षित वितरणाच्या जागा व गंतव्यस्थान पाण्याचा प्रवाह सामावून घेण्यास असमर्थ ठरलेल्या आहेत.

७. निधीच्या अभावामुळे, कालव्याचे वितरण मार्ग व उप-मार्ग यांच्या देखभालीचे व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले नाही.

८. लाभक्षेत्रातील पीक क्षेत्राची व पीक पद्धतीची मोजणी विसंगत रीतीने केली आहे.

९. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रांच्या नियोजनात व व्यवस्थापनात लाभाधिकाऱ्यांचा कोणताही सक्रिय सहभाग नाही.

१०. कालवा सल्लागार समितीच्या बैठका हंगामाच्या सुरुवातीपूर्वी घेण्यात येऊ नयेत किंवा त्यानंतर उशिरानेही घेण्यात येऊ नयेत. या सल्लागार समितीत लाभाधिकारी व पाणी वापरकर्ता संघटनांचे प्रतिनिधित्व करणारे कोणीही नाही. लाभाधिकारी व पाणी वापरकर्ता संघटनांचा या समितीशी कोणताही समन्वय नाही. म्हणून,

शेतीचे व पिकांचे नियोजन लाभाधिकाऱ्यांसाठी असमर्थनीय ठरते.

११. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात, धरणातून शेतीला पुरविण्यासाठी उपलब्ध असलेले पाणी स्वेच्छानुसारी अवेळी कपात करण्याच्या अधीन राहून देण्यात येते.

१२. पाण्याच्या तळाशी गाळ साचण्यात वाढ झाल्यामुळे पाण्यातील जलचर व एकूण प्राणी सृष्टी प्रमाण कमी झाले आहे, त्यामुळे प्रकल्पाच्या पाणी साठवण्याच्या क्षमतेत घट झाली आहे.

१०.१०.१ (अ) किमान ८ महिन्यांच्या कालावधीत तरी शेती करणे शक्य व्हावे हे सिंचनाच्या उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पावसाळी हंगामातील ४ महिन्यांमध्ये जेव्हा आणि जसे आवश्यक असेल त्याप्रमाणे, संरक्षक सिंचन पुरविण्यात यावे, त्यानंतर, किमान हिवाळ्याच्या हंगामासाठी ओलिताखालील पीक घेणे शक्य करून देण्यात यावे. म्हणून, किमान ८ महिन्यांच्या कालावधीत सिंचनाच्या आधारभूत सोयी पुरविण्यात येतील, हा दृष्टीकोन विचारात घेऊन सिंचन पद्धतीचे नियोजन व व्यवस्थापन करण्यात यावे.

१०.१०.१ (ब) परिच्छेद १०.३.३ मधील आलेखात गेल्या किमान ५० वर्षांचा महाराष्ट्रातील सिंचन विकासाचा कल चित्रित केला आहे. यात खाली दिलेल्या तक्ता १०.९ मध्ये दाखविण्यात आल्याप्रमाणे या ५० वर्षांपैकी २२-२४ वर्षांमधील प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ६० टक्क्यांपेक्षा कमी आहे. म्हणून, वापरातील कार्यक्षमतेत वाढ करणे ही देखील तातडीची गरज आहे.

१०.१०.२ लाभक्षेत्राचा विकास

उद्दिष्टे व अपेक्षा : लाभक्षेत्र विकासाच्या संकल्पनेत, क्षेत्रात करावयाच्या भौतिक व तांत्रिक बाबींच्या वितरणासह, लाभक्षेत्रात स्थित असलेल्या लाभाधिकाऱ्यांचा सामाजिक-आर्थिक विकास साधावयाचा आहे. म्हणून, संघटनात्मक व कार्यान्वयन यंत्रणेत, शासनाच्या अनेक इतर विभागांचा व संस्थांचा सहभाग असणे आवश्यक आहे. सन १९८० पासून २००० या वर्षाच्या अखेरपर्यंत अशी एक यंत्रणा कार्यरत करीत होती.तथापि, सध्या अशी कोणतीही यंत्रणा कार्यक्षम रीतीने अस्तित्वात असल्याचे दिसत नाही. लाभक्षेत्र विकास कार्यक्रमातून केवळ पाणी व जमिनीचा इष्टतम वापर करणेच केवळ ध्वनित होत नाही, तर लाभाधिकाऱ्यांच्या गरजा व अपेक्षांचीदेखील पूर्तता करावयाची आहे. लाभाधिकाऱ्यांच्या किमान गरजा पुढीलप्रमाणे आहेत:-

१. धरणापासून थेट शेतापर्यंत पाणी घेऊन जाणारी वितरण यंत्रणा. (पूर्वी पाणी ४० हेक्टर ब्लॉकपर्यंत पोहचविले जात होते.)

२. वितरण यंत्रणेने, ठरलेल्या वेळी भरवशाने इष्टतम आवश्यक प्रमाणात पाण्याचे वितरण करायलाच हवे.

३. जर शेतकऱ्यांना, प्रवाह पद्धतीने पाणी मिळणे अपेक्षित असेल तर, जमीन योग्य प्रकारे समतल करणे.

४. ओलिताखालील शेती पिकांची निवड, बी-बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके व कीडनाशके, त्याच्या योग्य मात्रा, यासंबंधातील चांगल्या प्रथांच्या संबंधातील माहिती पुरविणारी एक संस्था असावी. अशा संस्थेकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम देखील हाती घेण्यात यावे.

५. शेतकऱ्यांना, त्यांच्या शेतात शेती करताना सामना करावा लागणाऱ्या अडचणी व अशा अडचणीवर मात करावयाचे शक्य ते उपाय आणि कृषि विद्यापीठांचे संशोधन यासंबंधात माहिती असावी.

६. एखाद्याला स्वत:च्या शेतात अशा ज्ञानाचा वापर करण्यासाठी आर्थिक गुंतवणुकीची गरज असेल तर ती पतपुरवठ्याद्वारे पुरविण्यात यावी. अशा प्रकारे, शेतकऱ्याला पतपुरवठा मिळविण्यास देखील सहाय्याची गरज असेल.

७. जवळच्या मार्गपरिवहन व्यवस्थेस शेती जोडली जाण्यासाठी पुरेसे शेतरस्ते असावेत.

८. कृषि उत्पादित वस्तूसाठी सुनियोजित बाजारपेठा व संस्करण केंद्राची उपलब्धता असावी.

९. वर नमूद केलेल्या शेतकऱ्यांच्या गरजा वेगवेगळ्या कार्यात्मक विभागांच्या अधिकाराखाली येतात. या विभागांनी आपसात समन्वय साधावा आणि त्यांच्या क्षमता लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या एकछत्री अंमलाखाली एकत्रित कराव्यात.

१०. नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाची संकल्पना ही, सिंचन विकासाचा एक अविभाज्य भाग करण्यात यावी. सर्व मोठे, मध्यम व लहान सिंचन प्रकल्प, लाभक्षेत्र विकास कार्यक्रमाखाली आणण्यात यावेत आणि प्रादेशिक प्राथम्यक्रमाच्या आधारे त्या प्रकल्पांचा क्रम ठरवण्यात यावा आणि ते संकोषित करण्यात यावेत. त्यानुसार, विकासात्मक कार्यतंत्रात व लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या संरचनेत योग्यरीतीने फेरबदल करण्याची व त्यास पुन्हा चालना देण्याची गरज आहे. नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाची प्रशासकीय यंत्रणा ही बहु-शाखीय स्वरूपाची असलीच पाहिजे म्हणजे त्यात पाटबंधारे अभियंते, कृषि अभियंते, कृषि अर्थशास्त्रज्ञ, कृषि विस्तार अधिकारी, सहकार, पणन, संस्करण, साठवण व वखार यांमधील अधिकारी असावेत व कृषि अधिकारी त्यांचा प्रमुख असेल. पाणी व्यवस्थापनाची कार्ये (उदा. वापरकर्त्यास किंवा वापरकर्त्यांच्या गटास प्रमाणकांच्या आधारावर पाणी पोहचविणे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे संपूर्णपणे सोपविण्यात यावीत) सर्व प्रकल्पांमधील मग ते मोठे, मध्यम किंवा लहान किंवा ***माजी मालगुजारी*** तलाव असोत नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे एक वेगळे घटक असतील.

११. सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनाच्या प्रशासकीय यंत्रणेने तिच्या पाणी वितरण कार्यक्षमतेत सुधारणा करायलाच हवी आणि सिंचन त्याचबरोबर सिंचनेतर प्रयोजनांसाठी प्रमाणकांच्या आधारावर पाण्याच्या वितरणाच्या तत्त्वाला अगदी ठामपणे चिटकून राहिले पाहिजे.

तक्ता क्रमांक १०.९
लाभक्षेत्र विकास कामांमधील तूट भरून काढण्यासाठी आवश्यक असलेला महसुली विभागनिहाय निधी

अ. क्र.	महसुली विभाग	जून २०१० पर्यंत राज्य क्षेत्रात निर्माण केलेली सिंचन क्षमता (लाख हेक्टर)	२०१०-११ मधील प्रत्यक्ष सिंचन	अ- तूट भरून काढण्याकरिता		
				निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेशी प्रत्यक्ष सिंचनाचे प्रमाण	प्रत्यक्ष सिंचनातील तूट (स्तंभ ४ स्तंभ ५) (लाख हेक्टर)	तूट भरून काढण्यासाठी आवश्यक असलेला निधी (०.५०x स्तंभ ६x१० ५/१०० (कोटीमध्ये)
१	२	३	४	५	६	७
१	कोकण	१.०	०.१	०.१	०.९	४३०
२	नाशिक	९.७	५.३	०.५	४.४	२२०७
३	पुणे	१५.४	१४.६	१.०	०.८	३९४
अ	**उर्वरित महाराष्ट्र**	**२६.१**	**२०.०**	**०.८**	**६.१**	**३०३१**
४	औरंगाबाद	१०.५	४.४	०.४	६.२	३०७९
ब	**मराठवाडा**	**१०.५**	**४.४**	**०.४**	**६.२**	**३०७९**
५	अमरावती	४.७	१.८	०.४	२.८	१४१८
६	नागपूर	६.१	३.३	०.६	२.८	१३८२
क	**विदर्भ**	**१०.८**	**५.२**	**०.५**	**५.६**	**२८०१**
	महाराष्ट्र	**४७.४**	**२९.६**	**०.६**	**१७.८**	**८९११**

स्रोत: १) स्तंभ ३ मधील आकडेवारी, सिंचन स्थिती दर्शक अहवाल सप्टेंबर, २०११ च्या पृष्ठ ७२-७३ वरील तक्ता क्रमांक १८ च्या स्तंभ ४ मधून घेतली आहे.
२) स्तंभ ४ मधील आकडेवारी, सिंचन स्थिती दर्शक अहवाल सप्टेंबर,२०११ च्या पृष्ठ ७२-७३ वरील तक्ता क्रमांक १८ च्या स्तंभ १० मधून घेतली आहे.
३) लाभक्षेत्र विकास बांधकामांकरिता, प्रति हेक्टरी रुपये ५०,००० ची आवश्यकता, भारत सरकारच्या जलसंपदा मंत्रालयाच्या दिनांक - च्या लाभक्षेत्र विकास व जलव्यवस्थापन परिपत्रकातून घेतली आहे.

१०.१०.३ सिंचन यंत्रणेच्या व्यवस्थापनाचे लाभार्थ्यांकडे हस्तांतरण

सध्या, सिंचन व्यवस्थापन हस्तांतरण, हे (अ) सहकार नियम, १९६० आणि (ब) महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ या दोन विनियमांद्वारे विनियमित केले जाते. पाणी वापर संस्थांना (अभिकरणांना) यंत्रणेच्या व्यवस्थापनाच्या अधिकारांचे हस्तांतरण आणि विविध विभागांमध्ये त्यांच्याकडे सुपूर्द केलेले क्षेत्र, जोडपत्र १०.१० मधील तक्त्यामध्ये संक्षिप्तपणे दिले आहे.

१०.१०.४ जोडपत्र १०.१० मध्ये दर्शविल्याप्रमाणे, कोकण वगळता सर्व विभागांनी सारख्याच प्रमाणात प्रगती केल्याचे दिसून येते. तथापि, अजूनही पाणी वापर संस्थांकडे उद्देशित हस्तांतरण करण्याचे प्रतीक्षित असलेले फार मोठे क्षेत्र शिल्लक आहे. लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यंत्रणेने, येत्या दोन ते तीन वर्षामध्ये ही कठीण कामगिरी पूर्ण करणे आवश्यक असेल. लाभक्षेत्र विकास आणि व्यवस्थापनाच्या अनेक अभिनव योजनांकरिता कोकण विभागात फार मोठा वाव आहे. तथापि, लाभार्थ्यांच्या संघटना स्थापन करण्यासाठी याहून अधिक प्रयत्न करणे आवश्यक ठरेल. महाराष्ट्र शासनाने सिंचन व्यवस्थापन लाभार्थ्यांकडे सोपविण्याचे धोरण यापूर्वीच स्वीकारलेले आहे. तथापि, राज्य क्षेत्रातील प्रकल्पांच्या ४७.०१ लाख हेक्टर्स इतक्या सिंचन क्षमतेपैकी, जून २०१० पर्यंत केवळ ११.६१ लाख हेक्टर्स इतके क्षेत्र लाभार्थ्यांकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. स्थानिक क्षेत्रातील प्रकल्पांमधील स्थिती यापेक्षाही फार वाईट आहे. प्रकल्प व्यवस्थापनातील सामाजिक सहभाग हा, सिंचन विकासाच्या महत्त्वपूर्ण निर्देशांकापैकी एक आहे. थोडक्यात तीव्र तूट सोसणाऱ्या प्रदेशांना, पाण्याच्या वापराच्या अधिक चांगल्या, कार्यक्षम आणि कमी नुकसानकारक व्यवस्थापनामुळे याहून अधिक फायदे मिळतात. अशा प्रदेशांमध्ये सामाजिक सहभागातून पाणी वितरण व्यवस्थापन संस्थांची स्थापना करण्यास उच्च प्राधान्य द्यावे. येत्या पाच वर्षांत अशा संस्था निर्माण करण्यासाठी आणि त्यांचे बळकटीकरण करण्यासाठी विशेष मोहीम हाती घ्यावी.

१०.११ जलसंवर्धन कार्यक्रम

१०.११.१ स्थानिक क्षेत्रातील लहान सिंचन योजना

लहान आकारमानाच्या सिंचन योजनांची (म्हणजेच ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असणाऱ्या योजनांची) अंमलबजावणी करण्याकरिता १९९२ मध्ये जलसंधारण विभागाची स्थापना केली होती. याआधी जलसंपदा विभागाद्वारे, १०० हेक्टरपर्यंत आकारमान असलेल्या लहान प्रकल्पांची सुद्धा अंमलबजावणी करण्यात येत होती. जलसंपदा विभागाने नवीन प्रस्तावित योजनांसहीत आधीच पूर्ण झालेल्या सर्व योजना, जलसंपदा विभागाकडे हस्तांतरित केल्या आहेत. आतापर्यंत ६४३९१ लहान सिंचन योजना पूर्ण झाल्या असून त्यांनी १५.५५ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण केली आहे. या योजनांचा एकूण खर्च रुपये ४५८७ कोटी इतका आहे. १.९१ लाख हेक्टर इतक्या सिंचन क्षमतेच्या ६७०४ लहान सिंचन योजना सध्या सुरू असून या प्रकल्पांचा अंदाजित खर्च, रुपये २७६९ कोटी इतका आहे. भविष्यात, १०५९७ लहान सिंचन योजना हाती घेता येऊ शकतील. यामुळे, ३.६ लाख हेक्टर इतकी अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होईल आणि त्याकरिता १७३५ कोटी रुपयांची गरज भासेल. सिंचनाखालील क्षेत्र कमी असलेल्या जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये, आगामी पाच वर्षात लहान सिंचन योजनांची कामे पूर्ण करणे उचित ठरेल. खालील तक्त्यात विभागवार पूर्ण झालेल्या प्रकल्पांची स्थिती, दाखवली आहे. स्थानिक क्षेत्रातील योजनांच्या माध्यमातून निर्माण झालेली सिंचन क्षमता व विकसित झालेले क्षेत्र यांचा निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेशी संबंधित असणाऱ्या आधारसामग्रीमध्ये समावेश करण्यात यावा.

तक्ता १०.१०

विभागनिहाय स्थानिक क्षेत्रातील पूर्ण झालेले प्रकल्प

अ.क्र.	प्रदेश	एकूण भौगोलिक क्षेत्र घटक (लाख हेक्टर)	लागवडयोग्य लाभक्षेत्र (लाख हेक्टर)	स्थानिक क्षेत्रातील प्रकल्पांची संख्या	निर्माण केलेली सिंचन क्षमता (लाख हेक्टर)
१	२	३	४	५	६
१	कोकण	३०.७३	१७.९३	४०९५	०.५८
२	नाशिक	५७.५	४०.१६	५६५७	३.९९
३	पुणे	५७.२८	४५.५६	४५५३	३.१०
४	औरंगाबाद	६४.८२	५९.३	३४४८	४.२५
५	अमरावती	४६.०२	३५.६२	१३६४	१.१७
६	नागपूर	५१.३४	२६.८५	८८११	२.४७
	महाराष्ट्र	**३०७.७**	**२२५.४२**	**२७९२८**	**१५.५६**

स्रोत : मुख्य अभियंता, स्थानिक क्षेत्र यांनी प्रसिद्ध केलेला अहवाल, १.४.२०११.

१०.११.२ पाणलोट क्षेत्र विकास

जेव्हा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह विशिष्ट क्षेत्रावरून वाहत जातो असे प्रवाह एकत्र येऊन त्याचा एक प्रवाह तयार होतो, तेव्हा, अशा क्षेत्रास, अशाप्रकारे तयार झालेल्या प्रवाहाला पाणलोट क्षेत्र असे संबोधले जाते. साधारणपणे, पाणलोट क्षेत्र हे, प्रदेशाच्या त्या भागाच्या नैसर्गिक भौतिक रचनेचा परिपाक असते. पावसाचे पाणी भूपृष्ठावरून विशिष्ट प्रकारे वाहते, पुढे पाण्याच्या धावत्या प्रवाहाचे स्वरूप घेऊन त्या क्षेत्रातून प्रवाहित होते आणि त्यानंतर एकाच ठिकाणहून बहिस्रवण होते. पाणलोट क्षेत्रे, पृष्ठवाह विभागणाऱ्या उंच सुळक्यांच्या रांगांनी बंदिस्त केले जाते. जमिनीवरील कोणत्याही आणि प्रत्येक 'जलसाठ्यास' आणि प्रत्येक 'जलप्रवाहाच्या जलाशयास' त्याचे स्वत:चे पाणलोट क्षेत्र असते. पाणलोट क्षेत्र हे अतिशय लहान किंवा फार विस्तृत असू शकते.

१०.११.३ महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरणाने, राज्यातील एकूण भौगोलिक क्षेत्राचे १५०५ पाणलोट क्षेत्रांमध्ये रेखाटन केले आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये, त्यात किंचितशी सुधारणा केली गेली आहे. भूजलाची उपलब्धता निर्धारित करणे हा या रेखाटनाचा प्राथमिक उद्देश असून ती पर्जन्यमान, भूशास्त्रीय रचना, जमीन, उतार व उंचवटे, इत्यादीसारख्या मूलभूत वास्तव घटकांद्वारे निश्चित केली जाते. तथापि, पाणलोट क्षेत्राची अशी निश्चिती ही हाताळणीच्या व मांडणी करण्याच्या दृष्टीने, आवाक्याबाहेरची आहे. म्हणून, त्याची आणखी लहान व सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांमध्ये विभागणी केली होती. भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण, पुणे यांनी पाणलोट क्षेत्रांचे सीमांकन करण्याकरिता महाराष्ट्राचे संपूर्ण भौगोलिक क्षेत्र विचारात घेतले आहे. कृषि विभागाने, सविस्तर उपचारात्मक उपाययोजनाकरिता पाणलोट क्षेत्रांची पुन्हा सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांमध्ये उपविभागणी केली आहे.

	क्षेत्र लाख हेक्टर्स
एकूण भौगोलिक क्षेत्र	३०७.७०
पाणलोट विकासाकरिता अनुरुप क्षेत्र	२४१.००
आतापर्यंत उपचार केलेले क्षेत्र	१२६.००
उर्वरित उपचारयोग्य क्षेत्र	११५.००

१०.११.४ पाणलोट विकासाच्या संदर्भात, लागवडयोग्य क्षेत्र निश्चित करण्याची विविध उद्दिष्टे, या दृष्टिकोनात आहेत. म्हणून येथे फक्त उपचार करण्यायोग्य क्षेत्र विचारात घेतले गेले आहे. (जोडपत्र १०.११)

	पाणलोट क्षेत्रांची संख्या
सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांची एकूण संख्या	४४१८५
निवडलेल्या सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांची संख्या	३४१४३
पूर्णपणे उपचार केलेल्या सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांची संख्या	११६२९
अपूर्ण सूक्ष्म पाणलोट क्षेत्रे	१५३८७
ज्या ठिकाणी अजून कामास प्रारंभ झालेला नाही अशी पाणलोट क्षेत्रे	७१२७

तक्ता १०.११
विभागनिहाय सूक्ष्म पाणलोट क्षेत्रे

अ.क्र.	प्रदेश	निवडलेल्या लहान पाणलोट क्षेत्रांची संख्या	ज्या ठिकाणी पाणलोट क्षेत्र विकास सुरू झालेला आहे. अशा लहान पाणलोट क्षेत्रांची संख्या	जेथे पाणलोट क्षेत्र विकास पूर्ण झाला आहे अशा लहान पाणलोट क्षेत्रांची संख्या	अपूर्ण पाणलोट क्षेत्रांची संख्या	जेथे अजून पाणलोट विकासास सुरूवात झालेली नाही अशा पाणलोट क्षेत्रांची संख्या
१	२	३	४	५	६	७
१	कोकण	२३९७	१५७६	७०३	८७३	८२१
२	नाशिक	६८४९	५७६८	१९३२	३८३६	१०८१
३	पुणे	७९०५	६४६४	१७४४	४७२०	१४४१
४	मराठवाडा	७६९०	६५१३	३२९३	३२२०	११७७
५	अमरावती	४८१०	३२६३	१८९६	१३६७	१५४७
६	नागपूर	४४९२	३४३२	२०६१	१३७१	१०६०
	महाराष्ट्र	**३४१४३**	**२७०१६**	**११६२९**	**१५३८७**	**७१२७**

स्रोत : समितीच्या जलसंपदा उप-गटाने पुरवलेली माहिती.

१०.११.५ एकूण भौगोलिक क्षेत्राचे वर्गीकरण, पाणलोट विकासाकरिता जे भौगोलिक क्षेत्र वळविता येईल ते (वर नमूद केल्याप्रमाणे २४१ लाख हेक्टर इतके) भौगोलिक क्षेत्र आणि पाणलोट विकासाकरिता योग्य नसलेले उर्वरित क्षेत्र पुढील घटकांवर आधारित आहे. या घटकांपैकी पहिला घटक हा, दिलेल्या नदीपात्राच्या सिंचन जलसाठयामधील गाळाला प्रतिबंध करण्याच्या उद्दिष्टाशी संबंधित आहे. याप्रयोजनार्थ, पुढील निर्देशांकांचा विचार करण्यात आला :- (१) गाळ निर्देशांक (२) प्रवाह (रन-ऑफ) निर्देशांक आणि (३) जमीन उत्पादकता निर्देशांक या जमीन उत्पादकता निर्देशांकामध्ये (एक) सरासरी जमिनीची स्थिती (टक्केवारी), (दोन) जमिनीचा पोत (टक्केवारीमध्ये), (तीन) उतारभाग आणि सहाय्य (टक्केवारीमध्ये), (चार) आम्लयुक्त किंवा आम्लारि गुणधर्मावर आधारित जमीन, धूप प्रभावित जमीन इत्यादींसारख्या स्थान विशिष्ट बाबी आणि (पाच) पावसाचे प्रमाण (टक्केवारीत) यांचा समावेश आहे. पाणलोट विकासाचा विकासविषयक अग्रक्रम निश्चित करताना, यागोष्टी विचारात घेण्यात येतात. कृषी आयुक्त, महाराष्ट्र आणि संचालक, मृदसंधारण हे, जिल्हयाच्या पाणलोट क्षेत्राची सरासरी परिस्थिती, जमिनीची जलधारण क्षमता, जमिनीचा प्रकार आणि पावसाचे सरासरी प्रमाण या गोष्टी विचारात घेऊन पाणलोट विकासाचा अग्रक्रम निश्चित करतात. या पाणलोट क्षेत्रातील मृदसंधारण आणि पाण्याच्या उपलब्धतेचे प्रमाण फार महत्त्वाचे आहे. पाणलोट विकासाचे प्राथमिक उद्दिष्ट भूजलाचे स्थिरीकरण करून, कालवा सिंचन प्रकल्पापलिकडे पाण्याची उपलब्धता वाढविणे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्याबाबतीत, थेट प्रकल्प क्षेत्राच्या लाभक्षेत्रामध्ये पाणलोट विकास कामे हाती घेण्याची आवश्यकता असेल. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रांमध्ये मृद व जलसंधारण कामे हाती घेण्याइतपत प्रकल्प अनुकूल नव्हते. तेव्हा असे प्रतिबंध काहीसे शिथिल करण्यात आल्याचे दिसून आले आहे. परंतु, लाभ क्षेत्रामध्ये पाणलोट (क्षेत्र) आणि शेत-तळयांचा विकास साध्य करता यावा म्हणून, हा प्रतिबंध पूर्णपणे काढून टाकण्याची गरज आहे.

१०.११.६ पाणलोट (क्षेत्र) विकास व पाण्याची उपलब्धता

लोकसहभागाने पाणलोट विकास प्रकल्पाची अंमलबजावणी केल्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील जीवनमान निरपवादपणे सुधारेल. काही गावांनी जवळपास २५ ते ३० वर्षांपूर्वी पाणलोट क्षेत्र विकासाची ही कामे पूर्ण केली असून ती सिंचन वाढविण्यास आणि उत्पादकता वाढविण्यास सक्षम झाली आहेत. पाण्याची उपलब्धता प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी आहे. पावसाची भूशास्त्रीय संरचना, जमिनीची संरचना आणि स्वरूप हे, या प्रयोजनासाठी निर्णायक घटक आहेत. सन १९८३ नंतर वेगवेगळया हवामानाच्या प्रदेशांनी पश्चिम घाट प्रकल्प, अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम किंवा नदीपात्र जलग्रहण सुधारणा प्रकल्प इत्यादींसारख्या विविध कार्यक्रमांतर्गत पाणलोट विकासाची अंमलबजावणी केली. या प्रकल्पांच्या निर्धारणाच्या आधारावर प्रती हेक्टर पाण्याची उपलब्धता अंदाजित आणि निश्चित करण्यात आली. सिंचन क्षेत्रात प्रकल्प वाढ होण्यापूर्वी व नंतरच्या विहिरींच्या संख्येची आकडेवारी आणि जलाशयांची संख्या व आकार उपलब्ध आहेत. असे निर्धारण वेगवेगळया अभिकरणांकडून करण्यात आले आहे. कृषी वित्त आयोगाने, कालवणी (रत्नागिरी), पेठ (नाशिक), धाडगाव (नंदूरबार), दक्षिण सोलापूर, सोनेगांव आबाजी (वर्धा), पळसपाणी चांदुरी (भंडारा), यांचे मूल्यमापन केले आहे. केंद्रीय मृद संवर्धन केंद्र डेहरादूनने, कोल्हेवाडी (अहमदनगर), पडाळशेंगी (बीड), ससूर (सोलापूर) यांचे मूल्यमापन केले. महाराष्ट्र जल व पाटबंधारे आयोगाने, कामिनी पाणलोट क्षेत्र (पुणे), कृषि विज्ञान केंद्र, जालना आणि कोरडवाहू जमीन क्षेत्र केंद्रीय संशोधन संस्था यांचे मूल्यमापन केले. हैद्राबादने, कोडावांची (जालना) यावरील आकडेवारी व अहवाल पुरविला आहे. अशा अभ्यासामधील आकडेवारीच्या आधारावर अंदाज बांधण्यात आले आहेत. वेगवेगळया पिकानुसार आणि त्यांच्या कालावधीनुसार आणि जिल्हयांच्या बाष्पीभवनाच्या प्रमाणानुसार सिंचनक्षेत्र विचारात घेता, पाणलोट क्षेत्राद्वारे पाण्याची उपलब्धता आणि प्रतिहेक्टर पाण्याचे आकारमान निश्चित करण्यात आले आहे. हे, तक्ता १०.१२ मध्ये प्रस्तुत करण्यात आले आहे.पाणलोट क्षेत्रातील एकूण क्षेत्राच्या आधारावर प्रति हेक्टर पाण्याची उपलब्धता निश्चित करण्यात आली.

१०.११.७ तक्ता १०.१२ मध्ये प्रस्तुत केलेल्या आकडेवारीने, महत्त्वाची निरीक्षणे उघड केली आहेत. अधिक पाऊस पडणाऱ्या उदाहरणार्थ कालवणी व पेठ या प्रक्षेत्रांमध्ये पाणलोट क्षेत्र विकास उपाययोजनेमुळे पाण्याची उपलब्धता कमी आहे. या प्रदेशातील भौगोलिक रचनेचे स्वरूप अशा फलनिष्पतीसाठी जबाबदार आहे. धाडगांव, दक्षिण सोलापूर, लोहा व मुखेड याचे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हे, नदीपात्र सुधार प्रकल्पाचा भाग होते आणि त्यांच्याबाबतीत पूर्णपणे उपाययोजना करण्यात आली नव्हती. या कार्यक्रमांचा मुख्य उद्देश जमिनीची धूप थांबविणे आणि गाळ कमी करणे हा होता. दुसरे म्हणजे, काडवंची व पंजाबराव कृषि विद्यापीठ पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, पाणलोट क्षेत्र उपाययोजना व्यापक आणि एकात्मीक पध्दतीने उपयोगात आणली. या उपाययोजनेच्या कोणत्याही बाजूकडे दुर्लक्ष केले गेले नसल्यामुळे पाण्याची उपलब्धता प्रत्येकी प्रति हेक्टर उदा.२०३७ आणि ३६६६ घन मीटरपर्यंत वाढली. दोन्ही ठिकाणच्या संपूर्ण उपाययोजनेनंतरही पंजाबराव कृषि विद्यापीठ पाणलोट क्षेत्रातील पाण्याची उपलब्धता काडवंचीपेक्षा १६०० घन मीटरने वाढली आहे. याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. हे दोन घटकांद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. काडवंची हे ठिकाण ५५० ते ६०० मीटर इतक्या पाऊस पडणाऱ्या प्रदेशात स्थित आहे. तर पंजाबराव कृषि विद्यापीठ पाणलोट क्षेत्रात ८५० ते ९०० मीटर पाऊस पडतो. शिवाय, पंजाबराव कृषि विद्यापीठातील जमीन जलधारण क्षमतेसाठी चांगल्या दर्जाची आहे.

१०.११.८ जर आपण कालवणी व कोकणाखेरीज १३ पाणलोट क्षेत्रे विचारात घ्यायचे ठरविले तर, प्रति हेक्टर अतिरिक्त पाण्याची उपलब्धता ९०३ घन मीटर इतकी असेल. ही गोष्ट असे सूचित करते की, ३००० घन मीटर प्रति हेक्टर सिंचन आवश्यकतेच्या प्रमाणाच्या आधारावर उपाययोजना केलेल्या क्षेत्रापैकी ३०-३१ टक्के इतके उपाययोजना केलेले क्षेत्र सिंचनाखाली येईल. अर्थात, उपाययोजना केलेल्या क्षेत्राचा मोठा भाग संरक्षक सिंचन क्षेत्रदेखील असू शकेल असाही याचा अर्थ निघतो.

तक्ता १०.१२
पाणलोट क्षेत्रविकास आणि पाण्याची उपलब्धता

हवामान प्रक्षेत्र	जिल्हा	पाणलोट क्षेत्र	क्षेत्र हेक्टर	अतिरिक्त सिंचन क्षेत्र (युनिट)	पाण्याची अतिरिक्त उपलब्धता घन मीटर	पाण्याची उपलब्धता प्रति हेक्टर घन मीटर
१	२	३	४	५	६	७
अधिक पाऊस पडणारी जांभ्या प्रकारातील जमिन	रत्नागिरी	कालवणी	१२७५	कोणतेही सिंचन नसलेले	पाण्याची कोणतीही उपलब्धता नाही	जांभ्या प्रकारातील मृदेमुळे पाझरणारे पाणी
संक्रमणकालीन प्रक्षेत्र-१	नाशिक	पेठ	१०११	१२	२४००००	२३७
संक्रमणकालीन प्रक्षेत्र-२	नंदूरबार	धाडगाव	३२४८	८	१६००००	६००
अवर्षणप्रवण क्षेत्र-अ	सोलापूर	दक्षिण सोलापूर	३२३४	१३०	१९५००००	६०२
अवर्षणप्रवण क्षेत्र-ब	पुणे	कामिनी	३६०६	३०	१८४३०००	५१०
हमखास पाऊस पडणारे प्रक्षेत्र	जालना	कडवंची	१८८८	१९५	३८२२०००	२०२४
	नांदेड	लोहा	३५६७	१००	१२०००००	३३६
		मुखेड	३२९४	७०	८४००००	२५५
	अकोला	पं.कृ.वि.	२४	८	८७९८४	३६६६
अवर्षणप्रवण क्षेत्र-अ	अहमदनगर	कोल्हेवाडी	४८९	-	१६७५००	३४२
	बीड	पाडळशिंगी	३९०	-	२१८०००	५५८
	सोलापूर	सामुरे	१८०	-	१०८०००	६००
अतिवृष्टीसाठी पुरेसे असलेले	वर्धा	सोनेगाव आबाजी	११४५	३३	४९५०००	४३२
प्रक्षेत्र	भंडारा	पळसपाणी चांदूर	८३४	३४	५६४०००	६७६
सरासरी						**९०३**

स्रोत :- समितीच्या जलसंपदा उपगटाने पुरविलेली माहिती.

१०.११.९ पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

महाराष्ट्रात पाणलोट उपाययोजनेखाली वळवता येण्याजोगे एकूण क्षेत्र २४१ लाख हेक्टर इतके आहे. यापैकी १२६ लाख हेक्टर इतक्या क्षेत्रामध्ये उपाययोजना करण्यात आली असून ११५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये पाणलोट क्षेत्र उपाययोजना करणे बाकी आहे. महसूल विभागाने जोडपत्र १०.११ मध्ये उपाययोजनेच्या पूर्ण व अपूर्ण पाणलोट क्षेत्राची स्थिती दर्शविली आहे. यासंबंधात महसूल विभागवार तूट जोडपत्र १०.१२ मध्ये दर्शविली आहे. केवळ २५ टक्के इतके पाणलोट उपाययोजना क्षेत्र सिंचनाखाली आणता येऊ शकेल. यावरून, संपूर्ण राज्यातील ६० लाख हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली आणता येईल असे दिसून येते. १२६ लाख हेक्टर इतक्या क्षेत्रापैकी पाणलोट विकास उपाययोजना क्षेत्राच्या बराच मोठया भागावर काही वर्षापूर्वी उपचार केले होते. याच्या परिणामी या पाणलोट क्षेत्रामध्ये सिंचनयोग्य जमिनीची खूपच कमी उपलब्धता झाली. १२६ लाख हेक्टर क्षेत्रापैकी ३१ लाख हेक्टर इतके क्षेत्र, सिंचनासाठी पूर्ण क्षमता असणारे सिंचन क्षेत्र म्हणून विचारात घेता येणार नाही. या क्षेत्रांचे पुनरुत्थान करण्याची आवश्यकता आहे. पाण्याच्या उपलब्धतेचा यथोचित सर्वांगीण अभ्यास केल्याखेरीज कोणत्याही पुनर्रचनेचा विचार करणे कठीण बाब आहे. काही पाणलोट क्षेत्र वगळून संपूर्ण पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या उपलब्धतेचेयोग्यपणे निर्धारण व मापन करण्यात आले नाही. पाण्याच्या प्रवाहाच्या मोजणीच्या आधारावर अभ्यास सुरू करणे आवश्यक ठरेल.

१०.११.१० आगामी १० वर्षांमध्ये पाणलोट विकासाची उर्वरित कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. यामुळे संबंधित प्रदेशामध्ये अतिरिक्त निधी उपलब्ध करणे आवश्यक असेल. सध्याचे रूपये १२,००० प्रति हेक्टर हे प्रमाण अपुरे आहे. एकात्मिक पाणलोट विकासाकरिता हे प्रमाण फारच कमी आहे. सन २००६ मधील कृषी वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, हे प्रमाण रुपये २५००० प्रति हेक्टर इतके वाढविण्याची गरज आहे. निधीच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे पाणलोट क्षेत्राच्या कामाचे सर्व आवश्यक घटक पूर्ण होऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे पाणीसाठयाची लक्ष्यित व अपेक्षित पातळी गाठता आली नाही. उर्वरित ११५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये, पाणलोट क्षेत्र विकास उपाययोजना पूर्ण केल्यास २९ लाख हेक्टर इतके अतिरिक्त क्षेत्र (जे ११५ लाख हेक्टर क्षेत्राच्या २५ टक्के आहे.) सिंचनाखाली आणता येईल. या २९ लाख हेक्टरमुळे एका वर्षात दोन हंगामी पिके घेता येतील. पुढील १० वर्षांमध्ये शिल्लक असलेली ही कामे पूर्ण करण्याकरिता संबंधित महसूल विभागांना पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात यावा. तीव्र पाणी टंचाई असलेल्या आणि कमतरता असलेल्या प्रदेशांमध्ये पुढील ५ वर्षात प्राथम्य तत्त्वावर हा कार्यक्रम राबविण्यात यावा. पाणलोट (क्षेत्र) विकासाचे काही अन्य फायदे आहेत. उदा. जमिनीमध्ये ओलावा टिकविण्यामध्ये वाढ होते. १ हेक्टरमागे अतिरिक्त १०० मि.मीटर इतके पाणी दिल्याने सूक्ष्मजीवशास्त्रीय वनस्पती पीके व रोपांना १००० घन मीटर इतक्या पाण्याची उपलब्धता वाढविता येईल. सहज स्पष्ट निरीक्षणे आणि तपशील यांच्या अभावामुळे सिंचन व्यवस्थापनातील व नियोजनातील हे फायदे स्पष्टपणे हिशेबात (विचारात) घेतले नाहीत.

तक्ता १०.१३
पाणलोट क्षेत्र विकासासाठी निधीची प्रदेशनिहाय गरज

अ.क्र.	प्रदेश	अविकसीत क्षेत्र	आवश्यक निधी (रूपये कोटीत)	निधीची वार्षिक आवश्यकता (रूपये कोटीत)
१	२	३	४	५
१	उर्वरित महाराष्ट्र	४९.६५	१२४१२.५	१२४१.२५
२	मराठवाडा	२०.५५	५१३७.५	५१३.७५
३	विदर्भ	४५.१५	११२८७.५	११२८.७५
	एकूण	**११५.३५**	**२८८३७.५**	**२८८३.७५**

स्रोत : १) स्तंभ ३ व ४ मधील माहिती कृषि विभागाने पुरविली आहे.
२) पाणलोट विकास कामांसाठी रुपये २५००० प्रति हेक्टर हा दर अंदाजे घेतला आहे.

१०.११.११ उर्वरित पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी रुपये २५,०००/- प्रति हेक्टर इतकी तरतूद करावी. तक्ता १०.१३ मध्ये प्रदेशांना आवश्यक असलेला एकूण निधी सादर करण्यात आला आहे. या तरतुदींमुळे सिंचनक्षमता अंदाजे २९ ते ३० लाख हेक्टरने वाढेल. त्याचबरोबर, अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्याची गरज आहे. अपूर्ण राहिलेल्या पाणलोट क्षेत्र विकास कामांसाठी आपल्याला सविस्तर आणि स्वतंत्र कार्यक्रमाची गरज आहे. पाणलोट क्षेत्रांचा विकास पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनार्थ उपलब्ध असणाऱ्या पाण्यातही स्थैर्य आणते आणि त्याला संग्रहित करते. अवर्षण आणि दुष्काळग्रस्त परिस्थितीकरिता हे एक महत्त्वाचे साधन आहे. म्हणून, उर्वरित आणि अपूर्ण पाणलोट विकास प्रकल्प विकसित करण्याबरोबरच, पूर्वीची आणि अंशत: पूर्ण झालेले पाणलोट क्षेत्रे (१२६ लाख हेक्टर) ही तातडीने हाती घेण्यात यावीत.

१०.११.१२ प्रशासकीय संरचना

सिंचन विकासातील धोरणात्मक दृष्टिकोन आणि गुंतवणुकीच्या धोरणात यथोचित बदलाची गरज आहे. नैसर्गिक पाण्याचे स्रोत उपयोगात आणण्यासाठी योजना तयार करणे आणि मोठे पाण्याचे साठे तयार करणे हे पुरेसे नाही. यामुळे पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न पर्याप्त पध्दतीने सोडवला जाणार नाही. त्याचवेळी पाणलोट क्षेत्रे आणि शेततळी विकसित करणे गरजेचे आहे. पाणलोट क्षेत्र विकास संघटना, जलसंधारण विभाग, आणि भूजल विभागांनी एकमेकांशी समन्वय साधला पाहिजे आणि एकमेकांशी ताळमेळ राखून काम केले पाहिजे. असा एकसंघ प्रयत्न साध्य करण्यासाठी आपल्याला जमीन आणि पाणी सल्लागार समितीची गरज आहे. परंतु, ही समिती सध्या कार्यरत नाही. तिला सक्रिय करून कार्यरत करायला हवे. अशी सल्लागार समिती हब अँन्ड स्पोक मॉडेलनुसार या कामांमध्ये समन्वय साधेल. सिंचन आणि रासायनिक खतांच्या वापरात कार्यक्षमता वाढविण्याची गरज आहे आणि ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापन यंत्रणा आणि विभाग असावेत. या सर्व अभिकरणांनी मिळून एकत्रितपणे पुढील दहा वर्षांपर्यंत मृद व जल संधारणाच्या कामांच्या पूर्ततेत गती द्यावी. परिरक्षण आणि दुरुस्तीच्या कामांकडे लक्ष देण्यासाठी निधीची आणि नियमित अभिकरणाची आवश्यक ती तरतूद करण्यात यावी. भविष्यातील भरभराट निर्णायकरीत्या पाणी आणि जमिनीवर अवलंबून आहे. जमीन आणि पाण्याच्या साठयांचे न्यूनीकरण करणे हे भविष्याच्या दृष्टीने दुश्चिन्ह आहे. म्हणून सर्व पैलूंचे एकात्मिकृत नियमन, निकोप समन्वय दर्जाबाबत जागरूकता आणि त्वरित अंमलबजावणी ही आजची गरज आहे. आधी मृद संधारण विभागात या प्रयोजनार्थ स्वतंत्र यंत्रणा होती. वर्तमान स्थितीतील यंत्रणेत त्याच धर्तीवर यथोचितरीत्या सुधारणा करण्याची गरज आहे. असे काही प्रदेश आहेत जेथे पाण्याचे नैसर्गिक स्रोत मर्यादित आहेत, प्रवाह ओलिताचा विस्तार तुरळक आहे आणि पाण्याचे दुर्भिक्ष गंभीर स्वरूपाचे आहे. अशा प्रदेशांत पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामांना प्राथम्यक्रम द्यायला हवा आणि अभियान स्तरावर त्याची पूर्तता करायला हवी.

१०.११.१३ पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाची परिणामकारकता वाढविण्यासाठी पुढील बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे.

१) संभाव्य लाभधारक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन तांत्रिकदृष्टया पूर्ण झालेल्या पाणलोट क्षेत्राचा विकास अहवाल तयार करणे

२) मातीचा प्रकार, उंचसखलपणा आणि पर्जन्यमान हे सर्व विचारात घेऊन मृद संधारणाच्या मुद्यांच्या आधारे प्राथमिक स्तरावर पाणलोटक्षेत्र उपाययोजना करणे.

३) नवीन संशोधनाच्या आधारे उपाययोजनेच्या नवीन पध्दतींचा समावेश करणे आणि सध्या वापरात असलेल्या पाणलोट क्षेत्र विकास उपाययोजनेत सुधार करणे.

४) प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प कार्यान्वित करणे.

५) विनियमन, समन्वय आणि मूल्यमापन यासाठी योग्य यंत्रणा.

६) पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाच्या तयारीसाठी गाव, तालुका आणि जिल्हयांच्या आधारावर संबध्द प्राथमिक आधार सामग्रीचा विकास करणे.

७) पाणलोट क्षेत्र विकासासाठी स्थान विशिष्ट आर्थिक निकष विकसित करणे आणि उपलब्ध असलेल्या आवश्यक निधीच्या सहाय्याने कार्यक्रमाचे ठराविक मुदतीत कार्यान्वयन करणे.

८) पाणलोट क्षेत्र विकासाच्या प्रभावी उपाययोजना ठरविणे.

१०.१२ भूजल विकास : राज्यातील महसूल विभागाद्वारे उपलब्ध भूजलाची स्थिती

१०.१२.१ पाणलोट क्षेत्राच्या आधारे भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण भूजलाच्या उपलब्धतेचा अंदाज तयार करते. या प्रयोजनार्थ, १५०५ पाणलोट क्षेत्रात विखुरलेल्या ३९२० निरीक्षण विहिरींचे संनियंत्रण करण्यात आले. उथळ पाणी असलेल्या खडकांमधील पाण्याच्या स्तराचे (अ) पावसाळयाआधी मे महिन्यात आणि (ब) पावसाळयानंतर ऑक्टोबर महिन्यात, निरीक्षण करण्यात आले. भूजल मूल्यमापन हे सर्वसाधारणपणे, उथळपाणी असणाऱ्या खडकांच्या स्तरावर अवलंबून असते. म्हणून, सखोल भागातील जलधारण क्षमता असणाऱ्या खडकांच्या स्तराचा सध्या विचार करण्यात आलेला नाही. पाणलोट क्षेत्राच्या आधारावर सध्या भूजल साठवण पातळीचे प्राक्कलन हाती घेण्यात आले आहे. अशा पध्दतीचे सर्वात पहिले भूजलाचे प्राक्कलन १९७३ मध्ये कृषी पत पुरवठा प्रकल्पाचा एक भाग म्हणून करण्यात आले होते. त्यानंतर १९८५ आणि १९९० मध्ये अति समुपयोजित पाणलोट क्षेत्रांबाबतच्या समितीच्या शिफारशीवरून आणि केंद्र सरकारच्या तत्सम निदेशांनुसार आणि पुढे भूजल प्राक्कलन समितीच्या शिफारशींनुसार, नव्याने आणि सुधारित प्राक्कलन करण्यात आले. नंतर, प्राक्कलन समिती १९९७ च्या शिफारशींवरून, भूजल पुनर्मूल्यांकनाची सहावी आणि सातवी फेरी मार्च, २००४ आणि २००७-०८ मध्ये हाती घेण्यात आली. १३ नोव्हेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार नागपूर येथील केंद्रीय भूजल मंडळाचे कार्यालय आणि प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची यथोचित मंजुरी घेऊन अलीकडेच २००७-०८ भूजल मूल्यमापन अहवाल प्रसिध्द करण्यात आला आहे.

१०.१२.२ भूजलाचा अंदाज काढण्याची पद्धत :

भूजलाच्या उपलब्धतेचे निर्धारण करताना, जलसंधारण, सिंचन कालवे व इतर कृत्रिम भूजल पुनर्भरण यांच्याबरोबरीनेच पावसामुळे होणाऱ्या नैसर्गिक भूजल पुनर्भरणाचा विचार केला आहे. कृत्रिम भूजल पुनर्भरणाचे निर्धारण व अंदाज करताना, कृषि, लघु पाटबंधारे व जलसंपदा विभाग यांच्याकडील तपशील व माहिती विचारात

घेण्यात आली आहे. यामध्ये, कालव्यातील पाण्यामुळे होणाऱ्या पुनर्भरणाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, पिण्याचे पाणी, सिंचन व औद्योगिक वापर यांसाठी विहिरी, विंधण विहिरी, कूप नलिका इत्यादींमधून उपसा केलेले पाणीदेखील विचारात घेण्यात आले आहे. या प्रयोजनासाठी, विहिरींच्या संबंधातील माहिती ही वेगवेगळ्या अभिकरणांकडून (महसूल विभाग, लघु पाटबंधारे विभाग, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांसारख्या) गोळा करण्यात आली असून ती विचारात घेण्यात आली आहे. या माहितीतून भूजल समुपयोजनाचे अंदाज दिले आहेत. पावसासंबंधातील माहिती, हवामानशास्त्र विभाग, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या विभागीय आयुक्तांची कार्यालये यांच्याकडून गोळा करण्यात आली आहे. भूजलापासून ओलिताखाली आणलेल्या पिकांच्या क्षेत्रासंबंधातील तपशील व माहिती, महसूल विभाग तसेच कृषि विभाग यांच्याकडून घेण्यात आली असून तिची भूजल समुपयोजनाच्या पातळीशी तुलना केली आहे.

१०.१२.३ भूजलाच्या स्थितीप्रमाणे पाणलोट क्षेत्रांचे वर्गीकरण :

१०० टक्क्यांपेक्षा अधिक समुपयोजन होत असलेल्या आणि भूजल पातळीचा ऱ्हास होत असलेल्या पाणलोट क्षेत्रांचे वर्गीकरण 'जास्त प्रमाणात समुपयोजन केलेले क्षेत्र' म्हणून करण्यात आले आहे. ९०-१०० टक्के समुपयोजन होत असलेल्या पाणलोट प्रदेशांचे किंवा जेथे मान्सूनपूर्व किंवा मान्सूनोत्तर पाण्याच्या पातळीत घट होत जाते अशा क्षेत्रांचे वर्गीकरण 'टंचाईग्रस्त' क्षेत्र म्हणून केले आहे. मान्सूनपूर्व पाण्याच्या पातळीत घट होत जाणाऱ्या आणि ७०-९० टक्के भूजलाचा वापर होत असलेल्या क्षेत्रांचे 'कमी टंचाईग्रस्त' क्षेत्र म्हणून वर्गीकरण केले आहे. ७० टक्क्यांपेक्षा कमी समुपयोजन होत असणाऱ्या आणि मान्सूनपूर्व किंवा मान्सूनोत्तर पाण्याच्या पातळीत घट न दर्शविणाऱ्या क्षेत्रांना 'सुरक्षित पाणलोट क्षेत्रे' म्हणून मानले जाते.

१. उपलब्ध भूजलापैकी केवळ ७० टक्के भूजलाचा वापर करता येऊ शकेल.

२. नागपूर विभागामध्ये, रूपांतरित खडकांमुळे प्रति विहीर आरेखन ८००० घनमीटर इतके विचारात घेतले आहे.

३. उर्वरित विभागांमध्ये प्रति विहीर आरेखन १५००० घनमीटर इतके विचारात घेतले आहे.

१०.१२.४ २००८-०९ मधील भूजलाची स्थिती :

सुरुवातीला १९८० मध्ये १५०८ इतक्या पाणलोट क्षेत्रांचे सीमांकन करण्यात आले होते. तथापि, जिल्ह्यांनुसार पाणलोट क्षेत्रांचे निश्चितीकरण करण्याच्या प्रयोजनासाठी, या पाणलोट क्षेत्रांच्या सीमांकनात सुधारणा करण्यात आली व ती क्षेत्रे पुन्हा सीमांकित करण्यात आली. परिणामी, पाणलोट क्षेत्रांची सुधारित संख्या १५३१ पर्यंत वाढली. २००८-०९ मध्ये केलेल्या भूजलाच्या मूल्यमापनानुसार, १५३१ एवढ्या पाणलोट क्षेत्रांपैकी, ७३ पाणलोट क्षेत्रांचे जास्त प्रमाणात समुपयोजन करण्यात आले होते. ३ टंचाईग्रस्त क्षेत्रे आणि ११९ क्षेत्रे 'कमी टंचाईग्रस्त' म्हणून मानण्यात आली होती. या मूल्यमापनानुसार, पुनर्भरणाद्वारे भूजलाची निव्वळ उपलब्धता ही ३३८०६ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. यांपैकी, १५९१३ दशलक्ष घनमीटर भूजलाचे विविध प्रयोजनांसाठी समुपयोजन केले आहे व वापर केला आहे. या बाबी संबंधात महसुली विभागानिहाय माहिती **जोडपत्र १०.१३** मध्ये दिली आहे.

१०.१२.५ राज्यातील ३५३ तालुक्यांपैकी ९ तालुक्यांचा, जास्त प्रमाणात समुपयोजन केलेल्या क्षेत्रांच्या प्रवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर, मोर्शी, वरूड, चांदुर बाजार, बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद, अहमदनगर जिल्ह्यातील रहाता, जळगाव जिल्ह्यातील रावेर व यावल आणि सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस या तालुक्यांचा समावेश होतो. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ या तालुक्याचा टंचाईग्रस्त क्षेत्रांच्या

प्रवर्गामध्ये समावेश होतो. १९ तालुके हे कमी टंचाईग्रस्त तालुके आहे. जोडपत्र १०.१३ मध्ये जिल्ह्यांनुसार भूजलाची उपलब्धता दर्शविली आहे.

१०.१२.६ केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, उपलब्ध भूजलापैकी ७० टक्क्यांपर्यंतच्या भूजलाचा वापर पिकांसाठी करण्याची परवानगी आहे. तथापि, राज्यातील ८२ तालुक्यांमध्ये ७० टक्क्यांपेक्षा अधिक वार्षिक वापर होत असल्याचे दिसून येते. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील ५२, मराठवाड्यातील १४ आणि विदर्भातील १६ तालुक्यांचा समावेश आहे. यामधून भूजलाच्या समुपयोजनातील व वापरातील प्रादेशिक असमतोलाचे स्पष्ट पुरावे मिळतात. याबाबतची कारणे मनुष्यनिर्मित आहेत तसेच नैसर्गिक अपर्याप्तता ही आहेत. भूपृष्ठावरील जलसिंचनापेक्षा भूजल सिंचनाचा हिस्सा अधिक आहे. म्हणून, याला एक स्वतंत्र विकास निर्देशांक म्हणून समजण्यात यावे.

१०.१२.७ पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील प्रदेश हे, भूपृष्ठाचे स्वरूप, भूशास्त्रीय संरचना व पावसाची प्रतिकूल परिस्थिती यांमुळे कमी अनुकूल किंवा अनुरूप आहेत. भूपृष्ठजलाची समस्या असलेल्या व मर्यादित उपलब्धता असलेल्या या प्रदेशांमध्ये भूजलावर व भूजलाच्या समुपयोजनावर अवलंबून रहावे लागते. नैसर्गिक साधनसंपत्तीतील असमतोल लक्षात घेता, भूजल विकास धोरणामध्ये, 'तालुका या घटकापेक्षा' एक यथायोग्य घटक म्हणून 'पाणलोट क्षेत्रास' प्राधान्य देण्यात यावे.

१०.१२.८ यथोचित भूजल धोरण तयार करण्यासाठी व प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी असा दृष्टिकोन ठेवणे उपयोगी पडेल.

१०.१२.९ सध्याच्या माहितीवरून असे दिसून येते की, संपूर्ण राज्यात वीज पंप बसविलेल्या १६७१५२४ इतक्या विहिरी आणि १९१३९७ इतक्या पाणी आटलेल्या (सिंक) विहिरी आहेत.याशिवाय, पिण्याच्या पाण्यासाठी वीजपंप बसवलेल्या ५५३३१ इतक्या विहिरी, १०३१०६ इतक्या सर्वसाधारण विहिरी, १४६७३९ इतके हातपंप आणि १५१८२ वीजपंप आहेत. ८०० अधिकृत विहिरींचा उपयोग औद्योगिक वापरासाठी केला जातो.

तक्ता १०.१४

भूजल तूट भरून काढण्यासाठी अतिरिक्त विहिरी

अ.क्र.	प्रदेश	अतिरिक्त विहिरींची संख्या	आवश्यक असलेला निधी (रूपये कोटीत)
१	२	३	४
१	कोकण	–	–
२	नाशिक	१२३८३	१८६
३	पुणे	–	–
४	औरंगाबाद	२८७००	४३१
५	अमरावती	१८५३३	१८८
६	नागपूर	–	–
	एकूण		८०५

स्रोत : समितीच्या जलसंपदा उपगटाने दिलेली माहिती.

१०.१२.१० वरील तक्त्यातील माहितीवरून, विहिरींवर उपलब्ध होणाऱ्या संभाव्य अंतिम सिंचनक्षमतेच्या बाबतीत अतिरिक्त विहिरींची संख्या दिसून येते. हे अंदाज, भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरणाच्या अहवालावर आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषि अहवालावर आधारित आहेत. आम्ही, या प्रयोजनासाठी आवश्यक असलेले आर्थिक स्रोत सूचित केले असून ते, पुढील पाच वर्षांमध्ये प्राप्त होण्याजोग्या या संभाव्य सिंचनक्षमतेच्या एक चतुर्थांश इतके आहेत.

१०.१२.११ पाणलोट क्षेत्रांच्या आधारे गोळा केलेल्या माहितीचे तालुकानिहाय माहितीमध्ये रूपांतर केले असून या माहितीचा तालुका-निहाय भूजलाची उपलब्धता व वापर यांचा अंदाज करण्यासाठी आळीपाळीने उपयोग केला आहे. निव्वळ पुनर्भरण (एकूण भूजलाची उपलब्धता), वेगवेगळ्या वापरासाठी केलेला उपसा (वापरलेली क्षमता) आणि भविष्यामध्ये सिंचनाच्या उपयोगासाठी उपलब्ध असलेले भूजल (उर्वरित क्षमता) इत्यादींसबंधातील माहिती पुढील विभागांमध्ये सादर केली आहे.

१०.१२.१२ भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरणाने २००७-०८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अंदाजानुसार, १८६७६१८ इतक्या विहिरी होत्या. या विहिरींतून, भूजलाच्या १५.९४ दशलक्ष घनमीटर इतके भूजल सिंचनासाठी पुरविण्यात आले. प्रत्येक विहिरीतून सरासरी ८५०० घनमीटर इतका उपसा झाल्याचे यामधून सूचित होते. विहिरींमधून पाण्याचा होणारा हानीकारक नाश थांबवण्यासाठी व त्या पाण्याचा सिंचनासाठी कार्यक्षम पद्धतीने वापर करण्यास चालना देण्यासाठी, विहिंरींमध्ये सुरक्षित अंतर असणे आवश्यक आहे. याशिवाय, उपसाच्या प्रत्येक युनिटावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून रहावे लागत आहे. महाराष्ट्रात, सिंचनाच्या प्रयोजनासाठी प्रत्येक विहिरीतील सरासरी उपसा १५०० घनमीटर असणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बँका या मानकानुसार पतकर्ज वितरित करतात. तथापि, विहिरींच्या संख्येनुसार त्यांचा प्रत्यक्ष वापर व त्यामधून होणारा उपसा यासंबंधातील माहितीतून हे सूचित होते की, उपसा युनिट हे १०००० घनमीटर पेक्षाही कमी झाले आहे.

१०.१२.१३ जेथे विंधण - विहिरींमध्ये सातत्याने वाढ होत आहे अशा क्षेत्रांमधील सर्वसाधारण विहिरी या लवकरच म्हणजे नोव्हेंबर व डिसेंबरमध्येच कोरड्या पडण्यास सुरूवात झाली आहे. अशा विहिरींचे प्रमाण लातूर व उस्मानाबादमध्ये सर्वात अधिक आहे. दिवसेंदिवस विहिरींच्या वाढत जाणाऱ्या संख्येबरोबरच, एकाचवेळी घडणाऱ्या वरील दोन्ही गोष्टींमुळे, राज्याच्या १६ जिल्ह्यांमध्ये, (जेथे अधिक समुपयोजन झालेले आहे व टंचाईग्रस्त पाणलोट क्षेत्रे अधिक संख्येत आहेत तेथे) या समस्यांना वारंवार व नेहमी तोंड द्यावे लागत आहे. तांत्रिक निकषांनुसार, विहिरींची संख्या ही, कठीण खडकाळ प्रदेशांमध्ये प्रती चौ.कि.मी.ला ८ विहिरी आणि गाळाच्या प्रदेशांमध्ये प्रती चौ.कि.मी.ला १६ विहिरी इतकी असली पाहिजे, तसेच विहिरींमधील अंतर योग्य असले पाहिजे. या निकषाचा भंग केल्यास, विहिरी लवकर व ताबडतोब कोरड्या पडतील आणि विहिरी अशा कोरड्या पडण्याचे प्रमाण शीघ्र गतीने वाढत जात असल्याचे आढळून आले आहे.

१०.१२.१४ भूजलाचे कृत्रिमरीतीने पुनर्भरण :

महाराष्ट्रातील खडकांची संरचना ही पाणी साठवून ठेवण्याच्या क्षमतेत खूपच कमी आहे. (आकारमानाने उपलब्ध असलेल्या एकूण खडकांपैकी कठीण खडकांमध्ये केवळ १ ते ४ टक्के आणि वाळुकामय खडकामध्ये १५ ते २० टक्के इतकीच क्षमता असू शकते). या परिस्थितीमुळे भूजलाच्या वार्षिक उपलब्धतेला खूपच मर्यादा पडतात. महाराष्ट्र राज्यामधील, वार्षिक पर्जन्याचे भूजलामध्ये झालेले रूपांतरण याबद्दलची माहिती तक्ता १०.१५ मध्ये दिलेली आहे.

तक्ता १०.१५
पर्जन्यवृष्टीतून भूजल संधारण

अ.क्र.	तालुक्यांची संख्या	एकूण तालुक्यांची टक्केवारी	भूजलामध्ये संधारण (मीटरमध्ये)
१	२	३	४
१	१	०.३	> ०.५
२	९	३	०.२५ ते ०.५०
३	८४	२४	०.१५ ते ०.२५
४	२०९	५९	०.१ ते ०.१५
५	५०	१४	०.०२५ ते ०.१५

स्रोत: भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरणाचा अहवाल, २००८-०९.

१०.१२.१५ वरील तक्ता क्रमांक - १०.१५ मधील आकडेवारीवरून भूजलाची अत्यंत मर्यादित क्षमता व उपलब्धता असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात, ७३ टक्के तालुक्यांमध्ये प्रति हेक्टर अंदाजे १५०० घन मीटरहून कमी भूजलाची उपलब्धता आहे. म्हणून, भूजल उपलब्धतेचे घटते प्रमाण असलेल्या आणि ७०-९० टक्के या मर्यादेतील असा दर असलेल्या तालुक्यांमध्ये, कृत्रिम पुनर्भरण भूजल कार्यक्रम हाती घेण्यात यावा. अशा कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना, भूजलाची स्थिती आणि भूशास्त्रीय रचना यांचा काळजीपूर्वक अभ्यास करण्यात यावा. सामान्यपणे पाणलोट विकास कामे पूर्ण झाल्यानंतर, पाणलोट उतार क्षेत्रात भूजल उपलब्धतेत वाढ झाली असल्याचा अनुभव आला आहे. त्याचप्रमाणे हा लाभ बहुतेकरून एकूण क्षेत्राच्या २५ टक्के क्षेत्रा पुरताच मर्यादित असतो. सध्या पाणलोट विकासाचे काम हाती घेण्यासाठी मान्य खर्च प्रति हेक्टर रु.१२,०००/- इतका आहे. मागील कलमामध्ये, युक्तिवाद केल्याप्रमाणे पाणलोट विकास यशस्वीपणे तडीस नेऊन त्याचा पूर्णपणे लाभ घेण्याच्या दृष्टीने विद्यमान मर्यादा प्रतिहेक्टर रू.२५,०००/- इतकी वाढविण्याची आवश्यकता आहे.

१०.१२.१६ शास्त्रीय दृष्टिकोनातून भूशास्त्रीय सर्वेक्षण करून, त्यानुसार सर्व क्षेत्रांमध्ये पर्जन्यजल संचयन करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. पाणलोट व मृद संधारण विकास आणि भूजल विकास ही कामे एकात्मिकृत दृष्टिकोनातून राबविण्यात यावीत. ही कामे एकाकी पद्धतीने व तदर्थ तत्त्वावर राबविता येणार नाहीत आणि राबविण्यात येऊ नयेत. अशा एकात्मिकृत दृष्टिकोनाचा अभाव असल्याने, पाणलोट विकासामुळे पाण्याचे वाढलेले प्रमाण आणि भूजल विकासाच्या वाढत्या गरजा यांमधील महत्त्वाचा संबंध प्रस्थापित करणे कठीण जाते. शिवाय, विहिरींचे आणि त्याच प्रकारच्या पाण्याचे स्त्रोत यांकरिता विद्युतीकरण आणि इतर पायाभूत सुविधांचे जाळे विकसित करण्यात यावे आणि त्यांचे बळकटीकरण करण्यात यावे. मुख्यत्वेकरून, भूजल वापरावर अवलंबून असलेल्या क्षेत्रांमध्ये अशा वीजनिर्मितीच्या जाळ्याच्या विकासास प्राधान्य देण्यात यावे.

१०.१३ सिंचनाव्यतिरिक्त पाण्याचा वापर :

१०.१३.१ सन२०११ च्या जनगणनेनुसार, एकूण लोकसंख्येच्या ५४.७७ टक्के लोक ग्रामीण भागात आणि ४५.२३ टक्के लोक नागरी क्षेत्रांत राहतात. ग्रामीण आणि नागरी प्रवर्गातील एकूण लोकसंख्येची विभाग-निहाय वर्गवारी तक्ता क्र. **१०.१६** मध्ये देण्यात आली आहे (विभागानुसार लोकसंख्या)

तक्ता १०.१६
प्रदेशनिहाय ग्रामीण व नागरी लोकसंख्या (२०११)

अ.क्र.	प्रदेश	ग्रामीण लोकसंख्या	नागरी लोकसंख्या	एकूण
१	२	३	४	५
१	कोकण	१५६८०३८३	१२९४९१२९	२८६२९५१२
२	पुणे	१२८३८६३४	१०६०२३६४	२३४४०९९८
३	नाशिक	१०१७१६२९	८३९९९०६	१८५७१५३५
	उर्वरित महाराष्ट्र	**३८६९०६४६**	**३१९५१३९९**	**७०६४२०४५**
४	औरंगाबाद	१०२५७१८७	८४७०५६१	१८७२७७४८
	मराठवाडा	**१०२५७१८७**	**८४७०५६१**	**१८७२७७४८**
५.	अमरावती	६१७०७४६	५०९५९०७	११२६६६५३
६	नागपूर	६४२८०९५२	५३०८४३१	११७३६५२६
	विदर्भ	**७०४५१६९८**	**१०४०४३३८**	**२३००३१७९**
	महाराष्ट्र	**६१५४५४४१**	**५०८२७५३१**	**११२३७२९७२**

१०.१३.२ ग्रामीण पाणी पुरवठा

सध्या, ग्रामीण लोकसंख्येसाठी दररोज दरडोई ४० लीटर या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. पाणीपुरवठा विभागाकडील आकडेवारीच्या आधारे, सध्याचा पाणीपुरवठा आणि सन २०३० मधील पूर्वानुमानित पाणीपुरवठा (दररोज दरडोई ४० लीटर प्रमाण गृहीत धरून) जोडपत्र १०.१४ मध्ये देण्यात आला आहे [टीप : दशलक्ष घन मीटर = प्रतिदिन दशलक्ष लीटर ३६५/१०००].

१०.१३.३ या जोडपत्रामध्ये स्पष्टपणे दर्शविण्यात आले आहे की, ग्रामीण क्षेत्रांमध्ये दररोज दरडोई ४० लीटर इतके सध्याचे जे कमी असलेले प्रमाण आहे त्या प्रमाणात देखील पाणी पुरवठा करण्यात येत नाही. विशेषत: नाशिक विभागात ही तूट सर्वाधिक आहे तर अमरावती विभागाची स्थिती उर्वरित विभागांपेक्षा अधिक चांगली असल्याचे दिसून येते. सध्याचे प्रमाण कमी आहे हे स्पष्टच आहे आणि ते दररोज दरडोई ७० लीटर इतके वाढविण्याची आवश्यकता आहे. जर आपण ग्रामीण क्षेत्रांतील पशुधनासाठी लागणाऱ्या पाण्याच्या आवश्यकतेबाबत देखील विचार केला तर, ते प्रमाण दररोज दरडोई १४० लीटर इतके असावे.

जोडपत्र १०.१५ मध्ये, आम्ही २०११ व २०३० मधील लोकसंख्येसाठी असलेल्या प्रमाणावर आधारित पाणी पुरवठ्याची आवश्यक पातळी दिली आहे.

१०.१३.४ पाणी पुरवठ्याची सध्याची पातळी (६७१ दशलक्ष घन मीटर) आणि पाणी पुरवठयाची अपेक्षित पातळी (४१५१ दशलक्ष घन मीटर) यांच्यामध्ये उघडउघड खूप मोठी तफावत आहे. आपणास जर ग्रामीण क्षेत्रातील राहणीमानाचा सुधारित दर्जा अनूस्यूत असेल आणि तसेच पशुधनाच्या गरजादेखील पुरेशा प्रमाणात भागवावयाच्या असतील तर पाणी पुरवठ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करणे आणि अनेक उपाय योजणे आवश्यक असेल. आगामी काळात ही तफावत प्राधान्याने दूर करण्यात यावी. पाणी पुरवठ्यामध्ये वाढ करण्याच्या अशा प्रयत्नांना राज्य शासकीय स्त्रोतांकडून भरीव प्रमाणात सहाय्य आणि भांडवल उपलब्ध करून देण्यात आले पाहिजे.

१०.१३.५ नागरी पाणी पुरवठा

पाणीपुरवठा विभागाने आम्हाला माहिती दिली की, नागरी पाणीपुरवठा योजना या महानगरपालिका आणि श्रेणी अ, ब आणि क च्या नगरपालिका यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून राबविल्या जातात.

१०.१३.६ महसूल विभागाद्वारे महानगरपालिका आणि नगरपालिका यांची संख्या (मुंबई आणि मुंबई उपनगर वगळून) तक्ता क्रमांक १०.१७ मध्ये देण्यात आली आहे.

तक्ता १०.१७

प्रदेश निहाय महानगरपालिकांची आणि नगरपालिकांची संख्या

प्रदेश	महानगरपालिका	नगरपालिका (प्रवर्ग)			नगर पंचायत
		अ	ब	क	
१	२	३	४	५	६
कोकण	८	२	६	१५	५
पुणे	५	३	१०	२८	२
नाशिक	५	१	१३	२२	२
औरंगाबाद	४	२	१०	३८	३
अमरावती	२	२	१२	२६	०
नागपूर	२	२	१०	१७	२
एकूण	**२६**	**१२**	**६१**	**१४६**	**१४**

स्रोत : नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन.

१०.१३.७ सध्या, नागरी क्षेत्रांचे पाणी पुरवठ्याचे प्रमाण हे दररोज दरडोई १४० लीटर इतके आहे. हे प्रमाण गृहीत धरून सन २०११ या वर्षासाठीची सध्याची तूट आणि सन २०३० या वर्षासाठीची आवश्यकता अंदाजित करण्यात आली आहे. पहा जोडपत्र १०.१६

१०.१३.८ पाणी पुरवठा योजनांसाठी वित्तीय आवश्यकता

सध्या, नागरी पाणी पुरवठ्याच्या नियोजनाच्या प्रयोजनार्थ असलेल्या योजनांकरिता दररोज दरडोई १३५ लीटर इतके प्रमाण योग्य असल्याचे ठरविण्यात आले आहे व या योजनांमध्ये मलप्रवाह व जलनिस्सारणाच्या योजना अंतर्भूत आहेत व मलप्रवाह व जलनिस्सारणाच्या योजना अंतर्भूत नसताना सदर योजनांकरिता दररोज दरडोई ७० लीटर इतके प्रमाण वापरण्यात येत आहे. तथापि, नागरी क्षेत्रांमधील राहणीमानामधील सुधारणा तसेच मध्यम आकाराच्या शहरांमधील विकासविषयक उत्तम दर्जा पाहता, आम्ही दररोज दरडोई १४० लीटर इतके प्रमाण असण्याची शिफारस करीत आहोत. पुढील दोन दशकांसाठीचे नियोजन हे दररोज दरडोई १४० लीटर इतक्या प्रमाणावर आधारित असावे.

१०.१३.९ नागरी क्षेत्रांमधील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

नागरी क्षेत्राची पाण्याची गरज भागविताना, पाणी पुरवठ्यात मोठी तफावत असल्याचे उघडउघड दिसते. सध्या, केवळ ५० टक्के मागणी पुरी केली जात आहे. विशेषकरून नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागामध्ये तूट आणि पाणी पुरवठ्याची तफावत चिंताजनक आहे. या प्रदेशांतील पुरवठ्याच्या तफावतीकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. सध्या, अनेक शहरांना आठवड्यातून एकदा किंवा फार फार तर एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. यावरून पिण्याच्या पाणी पुरवठ्यात मोठी तफावत असल्याचे स्पष्ट होते व त्याकरिता तातडीने आणि त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. शिवाय, सध्याच्या पाण्याच्या पुरवठ्याच्या व्यवस्थापनामधील उणिवांबाबत देखील चौकशी करणे आवश्यक असेल.

१०.१३.१० अलिकडच्या दिनांक १३.८.२०१२ च्या शासनाच्या निर्णयानुसार,ग्रामीण पाणी पुरवठ्याकरिता असलेल्या भांडवली खर्च प्रमाणकांत सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, वित्तीय नियोजनांच्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, प्रति घनमीटरकरिता रुपये १३७/- आणि दरडोई रुपये २०००/- इतके अंदाजे प्रमाणक लागू केले आहे. २०३० या वर्षाकरिता, दररोज दरडोई ४० लीटर आणि दरडोई दररोज १४० लीटरच्या (पशुधनविषयक गरजांसह) प्रमाणकाची पूर्तता करण्यासाठी सध्याची तफावत भरून काढण्याकरिता, आम्ही आवश्यक त्या वित्तीय तरतुदी अंदाजित केल्या आहेत. हे अंदाज असे ध्वनित करतात की, दर दिवशी दरडोई ४० लीटरचे प्रमाणक भागवण्याकरिता तफावत भरून काढण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला रुपये ३११३ कोटी इतक्या रकमेची गरज पडेल. पुढील १० वर्षांत, २०३० पर्यंत पोहोचण्याकरिता, दरडोई दर रोज १४० लीटर (पशुधनविषयक गरजांसह) प्रमाणक भागवण्यासाठी रुपये ५६००/- कोटी इतक्या रकमेची गरज भासेल.

१०.१३.११ नागरी पाणी पुरवठा योजना

महाराष्ट्र शासनाने, डॉ. संजय दहासहस्त्र, सेवानिवृत्त सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यासगटाची नियुक्ती केली आहे. या अभ्यासगटाच्या विचारार्थ विषयामध्ये इतर गोष्टींबरोबर, 'जलसंपत्तीचे व स्त्रोतांचे वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी योजना व धोरणे' यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अभ्यासगटाचा अहवाल अजून प्रतिक्षित आहे. तथापि, सदर अहवाल अंतिमत: प्रसिद्ध होईतोपर्यंत, विभागांतील तफावत कमी करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वीकारलेल्या सध्याच्या प्रमाणकाचा (म्हणजेच १३२ घनमीटर किंवा दरडोई रुपये ६७८७) आगामी १० वर्षांकरिता तरतुदी करण्यासाठी वापर करता येईल. नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागांतील पाणी पुरवठ्याची तूट व तफावत इतर विभागांपेक्षा अधिक आहे. म्हणून, या विभागांना, त्वरित व तातडीच्या आधारावर, तक्ता १९ मध्ये दर्शवल्याप्रमाणे, निधींची तरतूद केली पाहिजे. जर पुढील पाच वर्षांत १४० लीटरच्या प्रमाणकातील पुरवठ्याच्या सध्याच्या पातळीतील तफावत भरून काढण्याचा आपला उद्देश असेल तर, दरवर्षी रुपये ४०००/- कोटी खर्च करणे आवश्यक असेल. नंतरच्या नऊ वर्षांत, वाढत्या लोकसंख्येबरोबर गती कायम राखण्यासाठी जादा वार्षिक निधी पुरेसे होतील.

१०.१४ औद्योगिक वापराकरिता पाणीपुरवठा

१०.१४.१ उद्योग विभागाने, महसूल विभागांतील भविष्यकाळात अपेक्षित असलेल्या पाण्याचा औद्योगिक वापर अंदाजित केला आहे. सध्या, मुंबईत व मुंबईच्या सभोवताली उद्योगधंद्याचे केंद्रीकरण झाल्यामुळे, एकाच विभागात, पाण्याच्या औद्योगिक वापराचे जवळजवळ ७० टक्के केंद्रीकरण झालेले आहे. कोकणातून होणाऱ्या सापेक्ष मुबलक पाणी पुरवठ्यामुळे, आवश्यक पाणीपुरवठा वाढ सुरळीतपणे होतआहे आणि पाणी पुरवठ्यातील गंभीर अडचणींना तोंड देणे अपेक्षित नाही. मुंबई शहरासाठी व मुंबई महानगर प्रदेशासाठी पुरविलेल्या पाणी पुरवठ्याच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. तथापि, मोठ्या प्रमाणावर सांडपाण्याचे आणि जलनि:सारणाचे पुनर्चक्रीकरण (पुनर्वापर करणे) करण्याची प्रक्रिया विस्तारित व आवर्धित करण्याची आपल्याला गरज आहे.

१०.१४.२ सर्व विभागांपैकी, अमरावती विभागात पाण्याचा औद्योगिक वापर हा सर्वात कमी आहे आणि त्यात मोठ्या प्रमाणात आणि शीघ्रगतीने वाढ करणे अपेक्षित नाही. तथापि, या विभागात, तसेच औरंगाबाद विभागात पाण्याची टंचाई व कमतरता ठळकपणे मोठ्या प्रमाणात आहेत. म्हणून, या प्रदेशांत नव्याने उभारावयाच्या उद्योगांत पाण्याचा वापर कमी प्रमाणात असावा आणि सांडपाण्याचा आणि जलनि:सारणाचे पाण्यावर प्रक्रिया करणे तसेच पाण्याच्या विद्यमान वापराचे पुनर्चक्रीकरण करणे या बाबी संबंधित विभागांत आवश्यक असलेल्या योग्य प्रोत्साहकांसह, अनिवार्य करण्यात याव्यात.

१०.१४.३ औद्योगिक वापरासाठी असलेली मागणी ही, नाशिक विभागात अतिशीघ्रतेने उद्‌भवण्याची अपेक्षा आहे. हा विभाग गोदावरी व तापी नदीच्या खोऱ्यांनी संपन्न झालेला आहे. तथापि, या दोन्ही नद्यांचे खोरे, पाण्याची एकूणच तूट असल्याची वैशिष्ट्ये दर्शवितात. म्हणून, नाशिक विभागातसुद्धा, पाण्यावरील पुनप्रक्रिया आणि पुनर्चक्रीकरण करण्यावर भर दिला पाहिजे. म्हणून, नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागांत औद्योगीकरणाला चालना देताना, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आणि टाकाऊ पाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण करणे याकरिता विशेष प्रोत्साहके दिली पाहिजेत.

तक्ता १०.१८
औद्योगिक पाणी पुरवठा

प्रदेश	सध्याचा पाण्याचा वापर		भविष्याकाळातील पाण्याचा वापर		पाण्याचा एकूण वापर	
	एमएलडी	एमसीयुएम	एमएलडी	एमसीयुएम	एमएलडी	एमसीयुएम
१	२	३	४	५	६	७
कोकण	१०८१.०	३९४.६	२४२४.६	८८५.०	३५०५.६	१२७९.६
पुणे	२०७.१	७५.९	८६२.४	३१४.८	१०६९.४	३९०.४
नाशिक	८३.३	३०.४	९९२.१	३६२.१	१०७५.४	३९२.५
मराठवाडा	६६.८	२४.४	३७७.९	१३४.९	४४४.६	१६२.३
अमरावती	१०.१	३.७	५९.८	२१.८	६९.९	२५.९
नागपूर	४५.५	१६.६	६७५.८	२४६.७	७२१.३	२६३.३
एकूण	**१४९३.८**	**५४५.३**	**५३९२.५**	**१९६८.३**	**६८८६.३**	**२५१३.९**

स्रोत : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा अहवाल.

१०.१४.४ जर आपण २०३० या वर्षापर्यंतच्या सिंचनेतर प्रयोजनांकरिता पाण्याची एकूण मागणी विचारात घेतली तर, वर दर्शविलेले प्रमाण हे, जेव्हा विविध विभागांतील एकूण पाण्याच्या उपलब्धतेशी तुलना करतो तेव्हा, तितकेसे अधिक असल्याचे दिसून येत नाही. औरंगाबाद व अमरावती विभागांच्या पाण्याच्या तूट असलेल्या प्रदेशांमध्ये देखील पाण्याची सिंचनेतर मागणी ही, एकूण वापराच्या ३ ते ४ टक्क्यांपेक्षा अधिक नाही. तथापि, एकूण वापराच्या ३ ते ४ टक्क्यांची ही मागणी पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेला साठा, ही महत्त्वाची बाब असेल. जर आपण पाण्याचे बाष्पीभवन आणि पाणी वितरणातून होणारे नुकसान या बाबी विचारात घेतल्या तर, पाण्याच्या साठ्यापैकी जवळजवळ २० टक्के पाणी, या प्रयोजनांकरिता राखून ठेवणे आवश्यक आहे. ही बाब, सिंचनाच्या प्रयोजनांकरिता, उपलब्ध असलेल्या पाण्याच्या प्रमाणातील, मोठ्या प्रमाणात घट होत असल्याचे ध्वनित करते. म्हणून, सर्व सिंचनेतर प्रयोजनांकरिता पाण्यावरील पुनर्प्रक्रिया आणि पुनर्वापर यांवर भर देणे अनिवार्य केले पाहिजे. पाण्याच्या अशा पुनर्वापरामुळे केवळ, सिंचनाकरिता उपलब्ध असलेल्या पाण्याचे नि:सारण कमी होणार नाही तर, त्याच्या परिणामी, नद्यांच्या प्रदूषणामध्ये देखील लक्षणीय घट होईल.

१०.१४.५ सध्या, राज्य पातळीवरील सिंचन प्रकल्पांतून प्राप्त झालेल्या सिंचनेतर प्रयोजनांकरिता राखून ठेवलेल्या पाण्याचे प्रमाण हे, खालील तक्ता १०.१९ मध्ये दिल्याप्रमाणे आहे.

१०.१४.६ वरील तक्ता १०.१९ व जोडपत्र १०.१६ मधील आकडेवारीची तुलना करणे हितावह ठरेल. जोडपत्र १०.१९ अनुसार, २०३० मधील अपेक्षित मागणी ही, ६१२० दशलक्ष घनमीटर इतकी अंदाजित केली आहे. तथापि, चालू सिंचनेतर वापरांकरिता जलसंपदा विभागाने यापूर्वीच लागू केलेले आरक्षण हे, ६९९५ दशलक्ष घनमीटर इतके आहे आणि ८४५० दशलक्ष घनमीटर इतके पाणी हे, भविष्यकालीन वापरांकरिता राखून ठेवण्यात आले आहे. सिंचनेतर

प्रयोजनांकरिता पाण्याचे असे अवास्तववादी आणि आगाऊ आरक्षण हे, पाण्याची तूट असलेल्या वर्षांमध्ये, गंभीर अडचणी निर्माण करते. यामुळे जनतेमध्ये नागरी व औद्योगिक पाणी पुरवठ्यासंबंधात दिशाभूल करणारी समजूत निर्माण होते. म्हणून, अशा आरक्षणाची आणि प्रत्यक्ष पाणी वापराच्या प्रत्यक्ष पातळीकडे मोठ्या प्रमाणावर लक्ष ठेवून, वार्षिक आधारावर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. अशी संनियंत्रण करण्याची व आरक्षण ठेवण्याची कामे, प्रादेशिक विकास मंडळाकडे त्यांचा विकासविषयक जबाबदारीचा एक भाग म्हणून, सोपविण्यात यावीत.

अगदी अलीकडील दिनांक १३.८.२०१२ च्या शासनाच्या निर्णयांनुसार, ग्रामीण पाणीपुरवठ्याकरिता असलेल्या भांडवली खर्च प्रमाणकात सुधारणा करण्यात आली आहे. वित्तीय गरजा निर्धारित करण्यासाठी त्याचा वापर करण्यात आला आहे.

तक्ता १०.१९
सिंचन प्रकल्पांतील पाण्याचा वापर

अ.क्र.	सिंचनेतर प्रयोजनाकरिता पाण्याचा वापर करणारी संस्था	मान्यताप्राप्त संख्या	प्रमाण दशलक्ष घनमीटरमध्ये
१	२	३	४
१	ग्रामपंचायत	२०२६	५६१
२	नगरपालिका/नगरपरिषदा	१५९	५३०
३	महानगरपालिका	२२	३०५०
४	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	३१३	५२०
५	खाजगी उद्योगधंदे	३२५	३६४
६	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ	७५	११४६
७	साखर कारखाने	१३४	११५
८	महाजनको (औष्णिक ऊर्जा)	१३	४९७
९	खाजगी औष्णिक ऊर्जा केंद्रे (चालु)	३	१२
१०	खाजगी औष्णिक ऊर्जा केंद्रे (नियोजित)	६४	१४५५
११	इतर उद्योगधंदे	२६	४५
१२	इतर संस्था (शैक्षणिक, धार्मिक, संरक्षण, विमानतळ, रेल्वे आणि केंद्र सरकारी संघटना)	३१	१५५
	एकूण		**८४५०**
	एकूण (अजून सुरू व्हावयाचे प्रकल्प वगळून)		**६९९५**

स्रोत : राज्याचा सिंचन अहवाल, महाराष्ट्र शासन.

तक्ता १०.२०
विविध प्रयोजनांकरिता पाण्याचा वापर

(दशलक्ष घनमीटर)

पाण्याच्या वापराचे प्रयोजन	वर्ष १९९६	वर्ष २०३०
१	२	३
पिण्याचे पाणी		
अ) नागरी	१७०५	४२४०
ब) ग्रामीण	१०६२	१९४३
एकूण	**२७६८**	**६१८४**
प्राणी	७४६	९९८
सिंचन		
अ) भूपृष्ठ जल	२४०९३	६९१६१
ब) भूगर्भ जल	७२५२	२०५०१
एकूण	**३१३४५**	**८९६६२**
जल-विद्युत	३११२	३११२
औष्णिक विद्युत	२७२	४९५२
उद्योगधंदे	१२४१	३२५४
पाण्याचा एकूण वापर	**३९४८४**	**१०३७०५**

स्रोत : महाराष्ट्र जल व सिंचन आयोग (महाराष्ट्र शासन)

१०.१५ आरोग्य

१०.१५.१ ग्रामीण व नागरी पाणीपुरवठ्याची समस्या ही, आरोग्याच्या समस्येशी निकट संबंधित आहे. खालील तक्ता १०.२१ हा, मागील तीन वर्षांत पाण्यामुळे झालेले आजार व रोग यासंबंधातील आकडेवारी दर्शवितो.

तक्ता १०.२१
पाण्यामुळे झालेले रोग

रोग	२००७-०८	२००८-०९	२००९-१०
१	२	३	४
पटकी (कॉलरा)	९२६९	५५६६	२०७१५
गॅस्ट्रो	२२१०६३	१७०२०५	२२९२०३
अतिसार	१५९१०३१	१७७५१९०	१६२३३५७
व्हायरल हेपॅटेटीस	१६४७३	९७३५	८२०५
विषमज्वर (टायफॉईड)	८२०८६	८७८०९	१२४६६२
एकूण	**१९१९९२२**	**२०४८५०५**	**२००६१४२**

स्रोत : आरोग्याची सध्याची स्थिती, महाराष्ट्र २०१०, महाराष्ट्र राज्य, आरोग्य सर्वेक्षण व संशोधन केंद्र.

१०.१५.२ याचा अर्थ महाराष्ट्राच्या लोकसंख्येपैकी २ टक्के लोक दूषित पाण्यामुळे पीडित आहेत. या आजारांत अतिसार (८० टक्के व अधिक) आणि गॅस्ट्रो (८ ते ११ टक्के) यांचे प्राबल्य आहे.

१०.१५.३ पाण्यामुळे होणारे रोग फैलावून उद्‌भवणारा खर्च आणि त्याच्या बरोबरीने होणारी हानी यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या पाहिजेत. कमीत कमी रुपये २०० कोटी इतका खर्च पाण्यामुळे होणाऱ्या रोगांसाठी लागणार असल्याचे अंदाजित केले आहे. नागरी त्याचप्रमाणे ग्रामीण या दोन्ही पाणीपुरवठा योजनांद्वारे शुद्ध व स्वच्छ पाण्याच्या पुरवठ्याबाबत खात्री करून घेण्यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी.

१०.१५.४ जागतिक आरोग्य संघटनेने ठरवून दिल्याप्रमाणे पाण्याच्या प्रतवारीचा दर्जा राखणे आवश्यक आहे. याकरिता देण्यात आलेल्या ठिकाणाच्या लोकसंख्येच्या आकारमानाच्या प्रमाणात पाण्याच्या प्रतवारीचे मूल्यनिर्धारण करण्याकरिता केंद्र स्थापन करणे आवश्यक असेल. या प्रयोजनाकरिता आपणास आवश्यक ते तंत्रशास्त्र विकसित करणे, तांत्रिक क्षमतेसह कुशल मनुष्यबळ तयार करणे गरजेचे आहे.

१०.१६ जल प्रदूषण

१०.१६.१ महाराष्ट्रात वाढलेले औद्योगिकीकरण व नागरीकरण यांमुळे विविध ठिकाणी जल प्रदूषणाची समस्या भेडसावत आहे. प्रक्रिया न केलेले औद्योगिक- सांडपाणी आणि नागरी क्षेत्रांतून वाहणारे मलप्रवाह हे प्रदूषणाचे दोन मुख्य स्त्रोत आहेत. भूपृष्ठ त्याचप्रमाणे भूजल यांतील दूषित द्रव्ये वाढत असून प्रदूषणही वाढत आहे. या प्रयोजनाकरिता नदी, ओढे, प्रवाह व नाले यांमध्ये प्रदूषित पाणी सोडण्यावर बंदी घालण्यात यावी आणि पाण्याच्या प्रतवारी संबंधातील नियमांची व विनियमांची अंमलबजावणी अधिक कठोरपणे करण्यात यावी.

१०.१६.२ **मलप्रवाह, जलनि:सारण यांवर प्रक्रिया करणे व पाण्याचे पुनश्चक्रण** महसूल विभागाने मलप्रवाह व जलनि:सारण यांवर केलेली प्रक्रिया व पुनश्चक्रण याबाबतची सद्यस्थिती जोडपत्र १०.१७ मध्ये दिली आहे.

१०.१६.३ या जोडपत्रातील आकडेवारीवरून स्पष्टपणे असे दिसून येते की, बहुतेक सर्व पुनर्वापर, पुनश्चक्रण योजना कार्यान्वीत नाहीत व बंद पडलेल्या आहेत. पुनश्चक्रण करून वापर हा प्रश्न विशेष लक्ष देऊन व तातडीने सोडवण्यात यावा. राज्यातील २२ महानगरपालिका दररोज ५५८३ दशलक्ष लीटर सांडपाणी निर्माण करतात. यापैकी निदान ७५ टक्के पाण्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तथापि, प्रक्रिया व पुनश्चक्रण प्रकल्प व योजना या पूर्णपणे योजनाबद्ध नसून त्या सुसज्ज नाहीत. परिणामी, महसूल विभागाला वित्तीय गरजांबाबत कोणताही योग्य तो अंदाज काढणे अडचणीचे ठरते. तथापि, सर्वसाधारणपणे नियमानुसार (दरडोई) जलनि:सारणाचा व मलप्रवाह सफाईचा खर्च हा पुष्कळदा दरडोई पाण्याचा पुरवठा करण्यावरील खर्चाच्या समान असतो. म्हणून, लवकरात लवकर या योजनांवरील कामांना सुरूवात करणे हे दूरदर्शीपणाचे ठरेल. जेणेकरून, आगामी १० वर्षांमध्ये प्रक्रिया व पुनश्चक्रण सुविधा सिद्ध होतील व पाणीपुरवठा योजनांच्या बरोबरीने पूर्ण होतील आणि २०३० पर्यंत सध्याच्या उणिवा दूर होतील.

१०.१७ जलसंपत्तीचे नियमन

१०.१७.१ महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र जलसंपदा विनियम प्राधिकरण अधिनियम, २००५ लागू केला आहे. हे प्राधिकरण वेगवेगळ्या नदींच्या खोऱ्यातून उपलब्ध झालेल्या आणि खोऱ्यामध्ये असलेल्या पाण्याचे समन्यायतेने वितरण साध्य करण्याकरिता सहाय्यभूत ठरेल. तसेच, या प्राधिकरणामुळे जलसिंचन, पिण्याच्या पाण्याच्या गरजा व औद्योगिक क्षेत्रांसाठी पाण्याचा उपयोग याकरिता पाण्याचे समन्यायतेने वितरण करणे शक्य होईल. या प्राधिकरणाने पाण्याच्या विविध उपयोगांकरिता पाण्याचे वेगवेगळे दर आकारून निश्चित संलग्नता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुद्धा केला आहे. तथापि, या विनियामक प्राधिकरणाने पाण्याची गुणात्मक व परिणामात्मक व्यवस्था करण्याच्या समस्यांवर पर्याप्तरीतीने पुरेसे लक्ष दिलेले नाही. महाराष्ट्र शासनाने, पाणी व्यवस्थापनाच्या अशा समस्या हाती घेण्याकरिता औपचारिक सूचना देणे आवश्यक आहे. अशा धोरणाच्या मार्गदर्शनाच्या अभावी समन्वित आणि परिपूर्ण पाणी व्यवस्थापन पाहिजे त्या स्वरूपात व यंत्रणा म्हणून आकारास येणार नाही.

१०.१७.२ प्रकल्पामधून उपलब्ध झालेल्या जलसिंचन पाण्याचे अनुकूलतम व गरजाधारित उपयोजन करण्याकरिता, पाणी उपयोगकर्ता संघ (डब्ल्यूयुए) विशेषित क्षेत्रामध्ये स्थापन करण्यात आला असून कालवे व कालवेनिहाय पाण्याचे वितरण करण्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन पाणी उपयोगकर्ता संघाकडे सुपूर्द करण्यात आले आहे. या व्यवस्थेमुळे शासकीय प्रशासनाला पाण्याचे वितरण त्याचप्रमाणे अनेक व्यक्तींकडून पाणीपट्टीची वसुली करणे या जबाबदारीच्या भारातून मुक्ती मिळाली आहे. पाणी वापरकर्ता संघाला पाणी वितरण कालव्यातून पाणी सोडण्यासाठी घनफळ तत्त्वावर पाणी देण्यात आले आहे. पाणी उपयोगकर्ता संघाच्या सदस्यांनी वापरलेल्या पाण्यासाठी पाणीपट्टीची वसुली पाणी वापरकर्ता संघाकडून वसुली तत्त्वावर करण्यात आली आहे. पाणी वापरकर्ता संघ पाणी वितरित करणाऱ्या कालव्यांच्या परिरक्षण व दुरूस्तीसाठी जबाबदार राहील आणि त्यांना परिरक्षण व दुरुस्तीच्या कामावर येणाऱ्या खर्चाकरिता वित्तीय सहाय्य देण्यात आले आहे. आवश्यक असतील तेवढे पाणी वापरकर्ता संघ निर्माण करणे आणि सिंचनापासून लाभ मिळणारे संपूर्ण पाणलोट क्षेत्र अशा पाणी वापरकर्ता संघाकडे पाण्याच्या वितरण व्यवस्थापनाच्या प्रयोजनार्थ हस्तांतरित करणे इष्ट ठरेल. शासनाच्या प्रशासकीय विभागाने या मागणीकडे गंभीरपणे पाहिले पाहिजे.

१०.१७.३ हे एक मोठे काम असून जे लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाने आगामी पाच वर्षात पाणलोट क्षेत्रामध्ये पूर्ण करणे आवश्यक असेल.

१०.१७.४ शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पाणी वापरकर्ता संघाच्या बैठकींना उपस्थित राहिले पाहिजे व बैठकींत सहभागी झाले पाहिजे आणि त्यांना त्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्यामध्ये मदत केली पाहिजे.

१०.१७.५ निरनिराळ्या प्रयोजनासाठी व वेगवेगळ्या वर्गांच्या वापरकर्त्यांना होणारा भूजलाचा पर्याप्त पुरवठा निश्चित करण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक स्रोतांचे संरक्षण व संधारण करण्यासाठी भूजलाचे पोषक संधारण व उपयोजन याकरिता सामूहिक सहभागी व्यवस्थापन यंत्रणा असली पाहिजे. याकरिता डिसेंबर २०११ मध्ये विधानमंडळामधून एकमताने मान्यता मिळालेल्या अधिनियम क्रमांक ४२/२००९ च्या तरतुदी तात्काळ अंमलात आणल्यास त्या सहाय्यभूत ठरतील.

१०.१८ विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पाण्याचे अंशदान

१०.१८.१ लोकांमध्ये त्याचप्रमाणे धोरणकर्त्यांमध्येही अशी वस्तुस्थिती सर्वमान्य आहे की, पर्याप्त व समुचित प्रमाणात पाण्याची उपलब्धता ही बाब आर्थिक विकासात मूलभूत भूमिका बजावते. तथापि, विविध वापरांचे आर्थिक मूल्य, जलसिंचन क्षेत्राखालील पीक पद्धती किंवा रोजगार आणि दरडोई उत्पन्न यासह एकूण सामाजिक विकासासाठी त्यांचे अंशदान यासारख्या पाण्याच्या बाबतीतील दृष्टिकोनातून वेगवेगळ्या पैलूसंबंधात विश्वसनीय व व्यापक माहिती उपलब्ध नाही. म्हणून, या समितीच्या उपगटाने पाण्याचे आर्थिक मूल्य व महत्व याचे प्रमापन करण्यासाठी सिंचनासह व त्याशिवाय असलेल्या खेड्यांचा तौलनिक अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

१०.१८.२ या प्रयोजनार्थ, सहा महसुली विभागांमधून प्रत्येकी, सिंचन सुविधा असलेले एक खेडे आणि सिंचन सुविधा नसलेले एक खेडे निवडण्यात आले. सिंचन सुविधा असलेल्या खेड्यातील शेतकऱ्यांचे एकूण वार्षिक सरासरी उत्पन्न अंदाजित करून त्याची तुलना सिंचन सुविधा नसलेल्या खेड्यातील शेतकऱ्यांच्या एकूण वार्षिक सरासरी उत्पन्नाशी केली. या सर्वेक्षणाच्या निकालांमध्ये सिंचनामुळे उत्पन्नात फायदेशीर वाढ झाल्याचे दिसून आले. सरासरी उत्पन्नानुसार सिंचन सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांपेक्षा सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न हे दुप्पट ते चौपट अधिक होते.

१०.१८.३ सिंचनामुळे फक्त कृषि उत्पन्नात वाढ झाली असे नव्हे तर सिंचनाच्या उपलब्धतेमुळे असंख्य बिगरशेतकी कामाच्या संधींनाही प्रोत्साहन मिळाल्याचे या अभ्यासातून निदर्शनास आले आणि अशा बिगरशेतकी कामांच्या स्त्रोतातून मिळालेल्या उत्पन्नाच्या परिणामस्वरूप कृषि उत्पन्नावर पूरक आणि स्थिर असा परिणाम झाला.

१०.१८.४ वेगवेगळ्या जिल्ह्यांमधील सन २०११ मधील सरासरी उत्पन्नाची जर आपण तुलना केली तर फक्त नागपूर आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये सिंचनाच्या माध्यमातून उत्पन्नामध्ये महत्त्वपूर्ण वाढ करण्याची क्षमता दिसून आली. कालबद्ध आधारसामग्रीच्या अभावामुळे या अभ्यासातून उत्पन्नक्षमतेच्या आणि आर्थिक विकासाच्या वाढीचा दर अंदाजित करणे शक्य झाले नाही. तथापि, सिंचन प्रकल्पामधील ५ ते १० वर्षाचा प्रतिक्षावधी आणि प्रतिहेक्टर रु.३ लाख इतक्या खर्चाची आवश्यकता लक्षात घेता, विकास धोरणांतर्गत सिंचन प्रकल्पांना दिलेला प्राथम्यक्रम न्याय्य असल्याचे दिसून येते.

१०.१९ समतोल विकासाकरिता विशेष शिफारशी

१. दरडोई पाण्याची उपलब्धता आणि प्रतिहेक्टरी उपलब्धता यांचा वापर प्रदेशांमधल्या तफावतीच्या मोजमापाकरिता निर्देशक म्हणून करावा. आर्थिक अनुशेषाच्या पूर्वीच्या निकषांऐवजी हे निर्देशक वापरावेत. उपरोल्लिखित निर्देशांकांच्या आधारे प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठीच्या निधीचे वाटप करण्यात यावे. (म्हणजे दरडोई पाण्याची उपलब्धता आणि प्रति हेक्टर पाण्याची उपलब्धता) ज्या भागांमध्ये पाण्याची उपलब्धता ही प्रति व्यक्ती ५०० घनमीटर पेक्षा कमी आहे तेथे सर्वंकष विकास घडवून आणणे हे अतिशय कठीण जाईल. अशी ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा काटेकोर आणि काटकसरीने वापर करणे आणि त्यासोबतच पाण्यावर पुनप्रक्रिया करणे व पाण्याचा पुनर्वापर करणे यावर भर देऊन त्यास चालना देण्यात यावी. या बाबतीत औरंगाबाद आणि अमरावती विभागांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

२. सिंचन विभागाने सिंचनाच्या मापनाकरिता प्रत्यक्ष साठा आणि प्रत्यक्ष सिंचन यांचा योग्य मोजमापक आणि निर्देशक म्हणून वापर करावा. या निर्देशकाच्या आधारे नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद विभागातील तूट प्राथम्याने दूर करावी. अशा तुटीमुळे निर्माण झालेला असमतोल दूर करण्याकरिता विशेष निधी या विभागांना मंजूर करण्यात यावा.

३. दुष्काळग्रस्त भागांमध्ये पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामांना सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्यात यावा. कमी सिंचन क्षमता आणि पाण्याची मर्यादित नैसर्गिक उपलब्धता असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये, आगामी पाच वर्षात पाणलोट क्षेत्र विकासाची कामे प्राथम्यक्रमाने पूर्ण करण्यात यावीत.

४. शासनाने, दररोज, दरडोई १४० लीटर या प्रस्तावित प्रमाणकाच्या आधारे ग्रामीण (पशुधनाच्या गरजा समाविष्ट करून) आणि शहरी पाणी योजनांमधील तूट आणि पुरवठ्यातील तफावत निर्धारित करावी. अशी तूट भरून काढण्यासाठी ग्रामीण पाणी योजना आणि विशेषत: दुष्काळी भागातील योजनांकरिता शासनाने एक विशेष कार्यक्रम हाती घ्यावा. हे काम येत्या १० वर्षात पूर्ण करावे.

समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी आवश्यक असलेले घटक विवक्षित आणि विशेष प्रयत्न सारांशरुपाने पुढे देत आहोत.

५. ०.५ पेक्षा कमी घनता असलेली वने असणारे, राज्यातील सर्व सिंचन प्रकल्प स्वतंत्रपणे विचारात घेण्यात यावेत आणि असे प्रकल्प पूर्ण व्हावेत म्हणून विशेष परवानगी द्यावी अशी विनंती मा.राज्यपालांना करण्यात यावी व असे जलसाठा प्रकल्प प्राथम्यक्रमाने पूर्ण करण्यात यावेत.

६. सध्या, सिंचनाकरिता प्रादेशिक नियतवाटप केलेल्या रकमेमधून सध्याच्या निव्वळ मूल्याच्या आधारे भूसंपादनाची किंमत, वने आणि वन्यजीवांच्या विस्थापनाची किंमत चुकती करावी. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ह्या किंमती प्रकल्पाच्या खर्चाचाच भाग मानाव्यात. पेयजल पुरवठ्याच्या योजना/प्रकल्पांच्या बाबतीत सध्याच्या निव्वळ मूल्याच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. सिंचन विकास प्रकल्पांना देखील याचप्रकारच्या शिथिलीकरणाकरिता पात्र समजण्यात यावे. विदर्भातील प्रकल्प मोठ्या संख्येने वनक्षेत्राच्या जवळ आहेत आणि सध्याच्या निव्वळ मूल्यांच्या अटींमुळे त्यांच्या आर्थिक क्षमतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

७. जल साठ्यांच्या निर्देशकांनुसार अमरावती आणि औरंगाबाद विभागात फार मोठा तुटवडा आहे. म्हणून शासनाने, २५० ते ६०० हेक्टर्स दरम्यानच्या सर्व स्थानिक लहान सिंचन प्रकल्पांना तातडीने मंजुरी द्यावी आणि पर्यावरणविषयक मंजुरीशी संबंधित असंख्य अटी व शर्तींचा पुनर्विचार करावा.

८. गेल्या दहावर्षात जलसाठा आणि जलवितरणाचे अनेक सिंचन प्रकल्प पूर्ण केले गेले आहेत. या गतकालीन अनुभवातून मिळालेल्या आधारसामग्रीची काळजीपूर्वक छाननी करावी आणि प्रति हेक्टर व प्रति घनमीटर या आधारावरील प्रकल्पांचे निकष पुनर्निर्धारित करावेत. हे निकष संभाव्यत: त्या त्या विभागांमध्ये वेगवेगळे असावेत. सर्व विभागांमध्ये एकच सामायिक निकष लागू करणे हे उचित ठरणार नाही. खास करून कोकणासारख्या अतिशय उंच सखल व दुर्गम डोंगराळ भाग असलेल्या खोऱ्यांचा स्वतंत्र व वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची गरज आहे. त्याचप्रकारे, अमरावती विभागातील काळी कसदार जमीन, ***खारपाण पट्टे*** आणि नागपूर विभागातील वन क्षेत्रे यांना वेगवेगळी मोजमापे लावण्याची आणि विभिन्न मानके लावण्याची आवश्यकता आहे.

९. यापुढे सर्व मोठ्या, सूक्ष्म आणि लहान प्रकल्पांच्या वितरण यंत्रणेची आखणी ही बंदिस्त नळ मार्गांच्या आधारावर करावी आणि सध्याच्या खुल्या कालवा वितरण पद्धतीचा वापर हळूहळू बंद करावा. यामुळे वितरण व पारेषणामुळे होणारा पाण्याचा अपव्यय कमी होईल. खास करून, अवर्षण प्रवण क्षेत्रे व मोठ्या प्रमाणात उंचसखल भाग असणारा कोकण प्रदेश आणि काळी कसदार जमीन असणाऱ्या क्षेत्रांमध्ये या पद्धतीचा तात्काळ अवलंब करण्याची आवश्यकता आहे.

१०. सध्या पिकाखालील वापरातील क्षेत्राच्या आधारे सिंचन क्षमतेचे व सिंचनाच्या वापराचे मोजमाप केले जाते. याऐवजी, सिंचनाद्वारे प्रत्यक्ष लागवडीखाली आलेल्या जमिनीचे मोजमाप करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सिंचन सुविधेची वास्तविक स्थिती अधिक दिसून येईल.

११. औरंगाबाद आणि अमरावती विभागांमध्ये पाण्याचा काटेकोर आणि काटकसरीने वापर करण्यास चालना देण्याची नितांत गरज आहे. या विभागांमध्ये, पाणी बचतीच्या सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानांना (उदा. ठिबक सिंचन, तुषार सिंचन) चालना देण्यासाठी प्रकल्प आरेखन व पद्धती यांमध्ये सुधारणा व फेरबदल केले पाहिजेत. सध्याच्या प्रकल्पाशी संबंधित असे फेरबदल व सुधारणा तात्काळ हाती घेण्यात याव्यात, जेणेकरून दुष्काळी परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल.

१२. सिंचन यंत्रणेचे व्यवस्थापन तिच्या लाभार्थ्यांकडे हस्तांतरित करणे हा शासकीय धोरणाचा उद्देश आहे. तथापि, जून २०१० पर्यंत ४७ लाख हेक्टर्सपैकी केवळ ११.६ लाख हेक्टर भागाचे (म्हणजेच सिंचित जमिनीच्या २४.५ टक्के) हस्तांतरण झाले होते. प्रकल्पांच्या व्यवस्थापनातील सामाजिक आणि सामूहिक सहभाग हा विकास आणि व्यवस्थापनातील कार्यक्षमतेचा एक महत्त्वपूर्ण निर्देशक असतो. पाणी वापर संस्थांची निर्मिती आणि त्यांचे बळकटीकरण करून पाणी वापरातील क्षमता सुधारण्याच्या उद्देशाने एक विशेष कार्यक्रम त्वरित सुरू करण्याची आम्ही शिफारस करतो.

१३. पाण्याचा सर्व सिंचनेतर वापर अनिवार्य तत्वावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापराच्या आवश्यकतांच्या अधीन असला पाहिजे.

१४. पाण्याच्या वापराचा अग्रक्रम पुढीलप्रमाणे असावा (१) पिण्याचे पाणी, (२) सिंचन (३) औद्योगिक वापर. जल स्त्रोताच्या एकात्मिकृत व्यापक विकासासाठीच्या योजना तातडीच्या तत्वावर येत्या ५ वर्षात पूर्ण करण्यात याव्यात आणि महाराष्ट्र जलसंपदा विनियमन प्राधिकरण अशा व्यापक आराखड्यात पाण्याचे समन्यायी वाटप विहितरीतीने करील.

१०.२० पाण्याच्या आधारावर विकासाचे प्रस्तावित निर्देशक :

१०.२०.१ सिंचन व सिंचनेतर उपयोगासाठी भूपृष्ठीय पाण्याशिवाय भूजलाचा वापर वाढत आहे. भूजलाचा वापर मुख्यत: विहिरी, कूप नलिका व पाण्याच्या पंप संचासाठी आवश्यक असलेली उपकरणे यांच्यामार्फत झाला आहे. म्हणून, नळाद्वारे पाणी पुरवठ्याची क्षमता व भूजलाचा अधिकाधिक वापर, हा विकासाचा वेगळा निर्देशक म्हणून विचारात घेण्यात यावा.

१०.२०.२ आणखी तीन घटक विचारात घेता येऊ शकतील (अ) लाभक्षेत्राकरिता असलेले सिंचन सेवांचे प्रमाण (ब) किती पाणी वापरकर्ता संस्था प्रभावीरीतीने कार्यरत आहेत? (क) किती लहान पाणलोटक्षेत्रांचा क्षेत्र विकास कार्यक्रमासोबत विचार करण्यात येतो?

समितीला असे आढळून आले की, तीनही प्रदेशामधील पाण्याच्या कमतरतेची व्याख्या, माहिती व अंदाज यात खूपच तफावत आहे व त्याबाबतीत वादही आहेत. यामुळे आमचे समाधन होऊ शकले नाही म्हणून, आम्ही सध्याची प्रश्नार्थक माहिती व जलसंपदा विभागाचे अंदाज तात्पुरते अंदाज म्हणून वापरण्याचे ठरविले आहे. आपले निधीचे नियतवाटप केवळ त्याचा भाग म्हणून मर्यादित ठेवण्यात यावे व तो आठ वर्षात पूर्ण करण्यात यावा. पुढील ५ वर्षांमध्ये आधारसामग्रीच्या पडताळणीसाठी व समन्यायी वाटपाचा संपूर्ण अंदाज एकत्र करण्यासाठी एक वेगळा स्वतंत्र गट नेमण्यात यावा.

१०.२०.३ समतोल विकासासाठी वित्तीय तरतुदी :

१०.२०.३.१ घटक-१ विकसित झालेल्या सिंचनक्षमतेच्या तुटीच्या आधारे (राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र यासाठी): जर आपण एकूण लागवडयोग्य क्षेत्रापैकी सिंचित क्षेत्र म्हणून राज्याच्या २१.०१ टक्के इतक्या सरासरीमधून प्रत्येक जिल्ह्याच्या तुटीची गणना केली आणि लागवडीखालील क्षेत्राच्या हेक्टरनुसार तुटीच्या प्रमाणाशी एकूण रु.३ लाख प्रतिहेक्टरने गुणाकार केला तर येणारी रक्कम ही एकूण पिकाखालील क्षेत्राच्या सिंचित क्षेत्राचे सरासरी प्रमाण गाठण्यासाठी आवश्यक निधी असेल. ही रक्कम रु. २६७७८ कोटी इतकी आहे. (संदर्भ-जोडपत्र १०.१८) राज्याचे सरासरी २१ टक्के प्रमाण फक्त राज्यक्षेत्र प्रकल्पावर आधारित आहे, वरील वाक्याचा अर्थ राज्याच्या + स्थानिक क्षेत्राचा वापर करा असे आहे.

पाणलोट क्षेत्राच्या विकासासाठी दर हेक्टरी रु.२५,०००/- इतकी तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी रु.२८,८३८/- कोटी इतकी तरतूद आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे प्रत्येक विहिरीस रु.१.५ लाख इतक्या खर्चाच्या प्रमाणानुसार भूजलाचा विकास करण्यासाठी विहिरींच्या संख्येच्या प्रमाणात तूट भरून काढण्यासाठी रु. ७५३३/- कोटीची गरज आहे.

तक्ता १०.२२
लागवडयोग्य लाभक्षेत्राचा दर हेक्टरी वाढीव पाणी साठा

अ.क्र.	प्रदेश	लागवडयोग्य लाभक्षेत्र	वाढीव पाणी साठा जलसंपदा विभाग	वाढीव पाणी साठा स्थानिक क्षेत्र विभाग	एकूण साठवण	घनमीटर/सामूहिकरीत्या हेक्टर (६/३x१०६/१०५)
१	२	३	४	५	६	७
१	कोकण	१७.९३	३५०१	४३१	३९३२	२१९३
२	नाशिक	४०.१६	४४७४	३१११	७५८५	१८८९
३	पुणे	४५.५६	१०२२८	१९१५	१२१४३	२६६५
	उर्वरित महाराष्ट्र	**१०३.६५**	**१८२०३**	**५४५७**	**२३६६०**	**२२८३**
४	**मराठवाडा**	**५९.३**	**७५०७**	**२२७९**	**९७८६**	**१६५०**
५	अमरावती	३५.६२	२९६९	७८१	३७५०	१०५३
६	नागपूर	२६.८५	४७०५	६४८	५३५३	१९९४
	विदर्भ	**६२.४७**	**७६७४**	**१४२९**	**९१०३**	**१४५७**
	महाराष्ट्र	**२२५.४**	**३३३८५**	**९१६५**	**४२५५०**	**१८८८**

स्रोत: समितीच्या जलसंपदा उपगटाद्वारे पुरविलेल्या माहितीनुसार.

१०.२०.३.२ घटक-२ पाणी साठवणीवर आधारित तक्ता क्र. १०.२२ मधील माहिती दर्शविते की, संपूर्ण राज्याच्या सरासरी साठवण क्षमतेमध्ये मराठवाडा व अमरावती खूपच मागे आहे. ही उणीव प्राथम्यक्रमाने भरून काढणे गरजेचे आहे आणि या प्रयोजनार्थ तक्ता क्र. १०.२३ मध्ये दिल्याप्रमाणे योग्य त्या निधीची गरज आहे.

तक्ता १०.२३
साठवण क्षमतेसाठी आवश्यक निधी

औरंगाबाद व अमरावतीसाठी तूट पुढीलप्रमाणे काढण्यात आली आहे.

सरासरी साठवण	दर हेक्टरी घनटमीटर	फरक
१	२	३
महाराष्ट्र सरासरी साठवण (दर हेक्टरी घनमीटर)	१८८८	-
औरंगाबाद सरासरी साठवण (दर हेक्टरी घनमीटर)	१६५०	२३८
अमरावती सरासरी साठवण (दर हेक्टरी घनमीटर)	१०५३	८३५

स्रोत: समितीच्या जलसंपदा उपगटाद्वारे पुरविलेल्या माहितीनुसार.

१०.२०.३.३ औरंगाबाद व अमरावती विभागाचे एकूण लागवडयोग्य क्षेत्र ५९.३ लाख हेक्टर व २६.५ लाख हेक्टर इतके आहे. अशा तऱ्हेने औरंगाबादसाठी २३८x५९.३x$१०^{५}$/$१०^{६}$=१४११.३४ दशलक्ष घनमीटर आणि अमरावतीसाठी ८३५x२६.८५x$१०^{५}$/$१०^{६}$=२९७४.२७ दशलक्ष घनमीटर अशी या दोन क्षेत्रांसाठी अतिरिक्त साठवण क्षमता असणे गरजेचे आहे. पाण्याच्या १ दशलक्ष घनमीटर साठा सरासरी खर्च रु.५.४ कोटी इतका आहे. म्हणून,औरंगाबादसाठी १४११.३४ x ५.४ = रु७६२१.२३ कोटी इतके व अमरावतीसाठी २९७४.२७ x ५.४ = रु.१६०६१.०५ कोटी इतकी रक्कम आवश्यक आहे. एकूण २३६८२.२८ कोटी इतकी रक्कम आवश्यक आहे.

१०.२०.३.४ ही वित्तीय तरतूद केवळ संचय करण्याच्या क्षमतेतील तूट भरून काढण्याशी संबंधित आहे व त्यात कालवे काढणे, वितरण कलवे,चारी इत्यादी, यांसारख्या सिंचन प्रकल्पाच्या अन्य घटकांसाठीच्या खर्चाचा यात समावेश होणार नाही.

१०.२०.४ वरील घटकांमध्ये दर्शविलेली साठवणीतील तूट ही कोणत्याही अप्रत्यक्ष अंदाजावर किंवा अदमासावर आधारित नाही. म्हणून, प्रदेशांमधील साठवण क्षमतेच्या आधारे, फरक हा अधिक वास्तववादी आणि मूर्त उपाययोजनांचा आहे. म्हणून, प्राथम्य क्रमाने वित्तीय तरतुदीच्या प्रयोजनार्थ, या घटकाचा पहिल्यांदा विचार करण्यात यावा.

१०.२०.५ प्रदेशांतील नैसर्गिक साठवणीत सुधारणा होण्यास सुरुवात होत असल्यामुळे आणि नैसर्गिक उपलब्धतेबाबतचा दृष्टिकोन यांमुळे कमी पावसाचे प्रदेश हे, जेथे आणखी वाढ होणे शक्य नाही अशा एका टप्प्यावर पोहचतील (उदाहरणार्थ, तापी नदीच्या खोऱ्यातील नाशिक व अमरावती विभाग). अशा परिस्थितीत, मोठ्या प्रमाणात पाणी बचत करण्याविषयक तंत्रे व साधने (उदाहरणार्थ, सूक्ष्म जलसिंचन, हरितगृह तंत्रज्ञान, पाण्याचे पुनर्चक्रण व पुनर्वापर) ही अधिक महत्त्वाची ठरणार आहेत आणि केवळ असे तंत्रविद्याविषयक विकल्प व पर्याय यांच्या आधारे पुढील विकास साध्य होणार आहे. असे नमूद करता येईल की, जलसिंचन, पिण्याचे पाणी व इतर नागरी वापर आणि औद्योगिक वापर हे पाण्याचे मुख्य तीन वापर असून या सर्व वापरांसाठी लागणाऱ्या पाण्याचा अतिशय काटकसरीने वापर करणे व पाणी बचतीचे पर्याय स्वीकारणे या बाबींसाठी पुरेसा वाव असेल. परंतु, तुलनात्मक दृष्टीने पाहता, हे सर्व करणे पुरवावयाच्या पाण्याच्या प्रत्येक घन मीटरसाठी खर्चिक स्वरूपाचे आहे. सुरूवातीच्या दहा वर्षांमध्ये याचा नेहमीच्या पद्धतीने विस्तार करणे आणि पाणी साठवण, वितरण व वापर यांची पद्धत सुस्थापित करणे उचित ठरेल. नेहमीच्या पद्धतीने हे शक्य झाल्यास त्याच्या लाभाचा व्यापक क्षेत्रांमध्ये प्रसार होईल. जेव्हा अशा विस्ताराची मर्यादा शक्य तितकी साठवणीच्या जवळ पोहचेल तेव्हा, विकासाचा पुढचा विस्तार करताना अधिकतम बचत, जास्त प्रमाणातील कार्यक्षमता यांसाठी ठरवून दिलेली तंत्रे आणि अधिक वारंवारतेने पुन: अवलंब ते पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रिया याबाबतची तंत्रे अपरिहार्यपणे स्वीकारण्यात येतील. अन्यथा, मर्यादित सेवा क्षेत्रांवरील खर्चिक तंत्रे व पद्धती यात वाढ होईल. या टप्प्यावर ज्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेला कार्यक्षम व काटकसरीने वापर आणि वित्तीय तरतुदीं यांसाठी आम्ही कोणत्याही दर्शकांची शिफारस केलेली नव्हती, त्या प्रयोजनासाठी या बाबी आहेत.

१०.२०.६ याशिवाय, अधिक प्रगत व अधिक खर्चिक पर्यायाऐवजी, पाणलोट विकास व भूजल पुनर्भरण यांवर अधिक जोर देण्यावर आमचा विश्वास आणि पसंतीपण आहे. पाणलोट विकास व भूजल पुनर्भरण याद्वारे योग्यरीतीने अनुपूर्ती केलेल्या नैसर्गिक संपन्नतेने तरतूद करण्यात आल्याप्रमाणे प्रदेश अंतिम क्षमतेपर्यंत पोहचतील याबाबत आम्हाला विश्वास वाटतो. एकदा का अशा क्षमतेच्या जवळपास पोहचलो की, त्यानंतर पुढील विकास स्वाभाविकपणे होईल आणि अधिक कार्यक्षम परंतु अधिक खर्चिक तंत्रे सामावून घेतली जातील.

१०.२०.७ मागे पडलेल्या प्रदेशांनाच केवळ संपूर्ण वित्तीय निधीचे वाटप करणे व इतर प्रदेशांना त्यापासून वंचित ठेवणे हे दूरदर्शीपणाचे व उचित ठरणार नाही. म्हणून, सर्व प्रदेशांतील विकासवाढ कायम राखणारा आणि त्याचवेळी, यापूर्वीच विकसित झालेल्या प्रदेशांपेक्षा अधिक प्रमाणात मागे पडलेल्या प्रदेशांतील विकासाच्या वाढीस वेग देणारा असा संमिश्र मार्ग आम्ही स्वीकारला आहे. लागवडयोग्य क्षेत्राचे एक प्रमाण म्हणून सिंचित क्षेत्राच्या राज्य सरासरीपासूनचे अंतर आणि साठवण यांसारखे दर्शक याबाबींखेरीज, वाढीला गती देण्यासाठी आम्ही प्रदेशाशी विनिर्दिष्ट असलेले घटक व गरजा यांचादेखील विचार केला आहे. नागपूर प्रदेशातील जलसिंचन क्षमतेचे पुरेशाप्रमाणात नियोजन केलेले नाही व ती व्यवस्थितपणे वापरण्यात आली नाही याची विविध कारणे आहेत. ही बाब कोकण प्रदेशासाठी देखील तितकीच खरी आहे. जेथे एकदा अशी समन्वेषण न केलेली क्षमता व्यवस्थितपणे वापरण्यात आली असेल आणि वर्धनक्षम प्रस्तावात रुपांतरित केलेली असेल असे प्रदेश वाढीसाठी आणि

भूतकाळापेक्षा अधिक चांगल्या भविष्यकाळासाठीच्या नियोजनासाठी योग्य असतील. या दोन प्रदेशांसाठी केवळ राज्याची सरासरी गाठणे हेच अंतिम उद्दिष्ट नाही. परंतु, पाण्याच्या उपलब्धतेने (नैसर्गिक किंवा प्राधिकरणाने दिलेले) आणि तांत्रिक आर्थिक सुसाध्यतेने अनुज्ञान उच्चतर स्तर गाठणे हे उद्दिष्ट आहे. पुढील पाच वर्षामध्ये या उद्दिष्टाच्या दृष्टीने नयोजन केलेच पाहिजे आणि ते नंतरच्या ८ वर्षांमध्ये साध्य केले पाहिजे. नैसर्गिक संपन्नतेच्या अनुसार जरी तिचे अधिक किंवा कमी प्रमाणात नियोजन केलेले असले तरी मराठवाड्याची क्षमता मर्यादित स्वरूपातील आहे. जलसिंचनाचा वेग वाढविण्यासाठी आणि जल आधारित विकासासाठी या प्रदेशांनी लवकरात लवकर याची उपलब्ध क्षमता जाणून घेण्यासाठी समर्थ व्हावे आणि आर्थिक साधनांचे भाग करताना भविष्यातील क्षमतेची जाणीव होण्यास व्यत्यय येणार नाही. म्हणून, आम्ही निर्देशित केलेले वाटप हे केवळ एकट्या दर्शकावर आधारित नसून त्याकरिता प्रदेशाच्या विनिर्दिष्ट तात्काळ गरजादेखील चांगल्या रीतीने विचारात घेतल्या आहेत.

१०.२०.८ तूट भरून काढण्यावर आम्ही अधिकतम अग्रक्रम व जोर दिलेला आहे. तात्काळ प्राथम्याचा भाग म्हणून आम्ही पाणलोट विकास व भूजल पुनर्भरण याबाबी विचारात घेतल्या आहेत. एकदा का हा प्रदेश विकासाच्या तुलनात्मक स्तरावर पोहचला आणि तूट ही मोठ्याप्रमाणात कमी झाली की, पुढील भविष्यातील वाटप हे, विविध निकष व आधार यांवर आधारित असेल. जेव्हा असमतोल पूर्णपणे दूर करण्यात येईल तेव्हा, भविष्यातील विकास खर्च हा, लोकसंख्येतील हिस्सा व निव्वळ लागवडयोग्य क्षेत्र यावर आधारित असेल. विविध प्रदेशांना पाण्याची विविध नैसर्गिक संपन्नता लाभली आहे. एका बाजूने काही प्रदेश त्यांच्या उपलब्ध जलस्रोतांपर्यंत पोहचले आणि ते जलस्रोत यांनी रिक्त केले आणि काही प्रदेशांमध्ये अतिरिक्त जलस्रोत असणे सुरूच राहीले. परंतु, हे विकासाच्या नंतरच्या तिसऱ्या टप्प्यात घडून येईल, अशा स्थितीत, मोठ्या पर्यावरणीय प्रवाहांचे संरक्षण एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात प्रमाणशीर हस्तांतरण, विवक्षित पूर्वशर्तीनंतरच्या केवळ नदी जोडणीची तपासणी केली जाईल, यांसारखे पर्याय स्वीकारले आहेत. त्याचप्रमाणे, बाष्पीकरण कमी करणे यासारखी अतिप्रगत पाणी बचतीची तंत्रेही अधिक समर्पक बनवता येतील.

१०.२०.९ मागे राहिलेल्या प्रदेशांतील जलसिंचन विकासाच्या प्रश्नांबाबतचा आमचा दृष्टीकोन हा, पूर्वीच्या धोरणांपेक्षा वेगळा आहे. पूर्वी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे, आम्ही उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण भेद दाखवून दिले आहेत. जलस्रोतांचे अधिक अर्थपूर्ण दर्शक म्हणून पहिल्यांदा आम्ही प्रदेशांची पाणी साठवण क्षमता विचारात घेतलेली आहे. पाणी साठवण क्षमता अधिकतम करण्याची गरज आहे आणि ज्यावरून साठवणीचे आकारमान ठरेल ते प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावेत. आतापर्यंत, सिंचित क्षेत्राची राज्य स्तरावरील सरासरी टक्केवारी ते एकूण क्षेत्रापर्यंतच्या अंतराच्या आधारे, विकासात्मक तूट ही, मोजलेली होती. या दर्शकास अंतरिक मर्यादा आहेत. गुणोत्तराच्या आधारावर अशा अंतराबाबतची योजना ही, एकतर उपलब्ध जमीन किंवा पाण्याची नैसर्गिक उपलब्धता यांच्या अनुपलब्धतेमुळे काही प्रदेशांत असाध्य ठरली आहे. जेव्हा राज्याची सरासरी उंचावते तेव्ही ही समस्या अधिक तीव्र बनते. तथापि, एका मर्यादेपर्यंत या दशकात साभिप्राय तफावतीची तरतूद असून, आम्ही पाच ते सात वर्षाच्या लगत कालावधीसाठी हे दर्शक राखून ठेवले आहेत. कोकण आणि नागपूर हे पाण्याची नैसर्गिक संपन्नता असणारे दोन प्रदेश आहेत जेथे हे निकष अजून संयुक्तिकपणे लागू करता येतील. त्याचप्रमाणे, अमरावती विभागात या दर्शकात मोठ्याप्रमाणात तूट आहे त्यासाठी आम्ही त्या विभागास पुढील आठ वर्षांतील साधनसंपत्तीच्या वाटपामध्ये उच्च प्राथम्य दिलेले आहे.

१०.२०.१० विकास तफावत व तूट यांची संगणना करताना, आम्ही क्षमतेचे दोन निरनिराळे स्तर देखील विचारात घेतलेले आहेत. (अ) प्रदेशाची क्षमता, जी प्रस्तावित व चालू असलेल्या प्रकल्पांमध्ये यापूर्वीच निश्चित केलेली, ठेवलेली व नियोजन केलेली आहे. (ब) विविध अडचणींमुळे, काही प्रदेशातील क्षमतेचे नियोजन केलेले नाही आणि ती निश्चित

केलेली नाही. यामध्ये काही पुन:स्थापन कामांचा अतर्भाव होतो ज्यामुळे सध्याच्या क्षमतेत अधिक भर पडू शकेल. ज्यामुळे अशा हंगामी क्षमतेच्या नियोजनास बाधा पोहचत आहे अशा प्रकारचे अडथळे काढून टाकले तर त्यानंतर अशा एखाद्या 'नियोजनातील त्रुटी' वर मात केली जाऊ शकते. नागपूर प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण रितीने वन आरक्षण व पर्यावरणीय अडथळे दूर करणे या कारणांमुळे, मोठ्या प्रमाणातील क्षमता निश्चित करण्याचे राहून गेले आहे आणि ती नियोजित प्रकल्पांच्या स्वरूपात अद्याप ठरवता आलेली नाही. प्रकल्प नियोजन व अंमलबजावणी या बाबतच्या वैशिष्ट्यपूर्ण रीतीने सुस्थितीत राहण्याचा कालक्रम विचारात घेऊन आगामी पाच वर्षांमध्ये अशा नियोजनाच्या प्रक्रियेस गती देणे शक्य होईल. अशा प्रकारे, आम्ही या प्रयोजनांसाठी चांगल्या रीतीने साधनसंपत्तीचे वाटप प्रस्तावित करत आहोत.

१०.२०.११ म्हणून, आम्ही, जलसंपत्तीतील विकासविषयक तफावती दूर करण्यासाठीच्या आमच्या प्रस्तावात एकाचवेळी विविध विचारांनी मार्गदर्शन केलेले आहे. स्थानविनिर्दिष्ट समस्यांबाबत योजना तयार करण्यासाठी म्हणून विकासविषयक तुटीबाबत मूळ उपाय म्हणून साठवणीचा अंगिकार विद्यमान व चालू असलेल्या प्रकल्पांची गतीशीलता, वितरण व्यवस्थेतील जाळ्यांची (नेटवर्कची) तात्काळ पूर्तता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत उत्तम जलसिंचन व्यवस्थापन, पाणलोट विकास प्रकल्पांच्या मंदावलेल्या गतीला वेग देणे . पारंपरिक पाणी साठवण संस्थांचे पुनरूज्जीवन आणि अवघड भूशास्त्रीय संरचना असलेल्या प्रदेशांचा विशेष व वेगळ्या पद्धतीने परामर्श याबाबी स्वतंत्ररीतीने हाताळल्या आहेत. याशिवाय, दृष्टिकोनावरील प्रकरणामध्ये युक्तिवाद केल्याप्रमाणे, ग्रामीण व नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेचा 'सार्वजनिक वस्तू' म्हणून विचार केलेला आहे आणि पूर्व निश्चित प्रमाणकाच्या आधारे, सर्व प्रदेशांमध्ये ती उपलब्ध करून देण्यात येईल. प्रदेशांमधील विकासातील सारखेपणा सिद्ध करण्यासाठी गरज असलेले वित्तीय साधनसंपत्तीचे आमचे अंदाज आम्ही खालील दिलेल्या तक्त्यामध्ये, दर्शवित आहोत.

१०.२०.१२ असे नमूद करण्यात येते की, औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्वाधिक पाण्याची तूट असलेल्या प्रदेशांना, साठवण निर्मितीसाठी निधी मिळण्याची आवश्यकता आहे. दुसऱ्या बाजूने, नागपुर व कोकण प्रदेशाची प्रस्थापित जलसिंचन क्षमता प्रत्यक्षात आणण्यासाठी गती देण्याची गरज आहे. म्हणून, एकूण क्षेत्रातील स्थूल सिंचित क्षेत्राचा उच्चतर टक्केवारीचा स्तर गाठण्यासाठी या दोन विभागांसाठी वाटप करण्यात आलेले आहे. औरंगाबाद विभागात मर्यादित क्षमता आहे आणि तिचे यापूर्वीच अधिक किंवा कमी प्रमाणात पूर्णपणे नियोजन केलेले आहे. औरंगाबाद विभागातील प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे. म्हणून, पुढील पाच वर्षांमध्ये शिल्लक कामांच्या खर्चाच्या ३० टक्के इतके अतिरिक्त वाटप आम्ही प्रस्तावित केले आहे. तसेच वितरण व्यवस्थेच्या जाळ्यांच्या (नेटवर्कच्या) गतीशील पूर्ततेसाठी, नाशिक व पुणे या विभागांना पुढील पाच वर्षांमध्ये शिल्लक कामाच्या १५ टक्के इतके अतिरिक्त वाटप प्राप्त होईल. दुसऱ्या बाजूने, अमरावती व नागपूर विभागांना प्रकल्प क्षमतेच्या सीमांकनासाठी आणि ती गतीशीलतेने पूर्णत्वास नेण्यासाठी पूर्वीच्या वाटपापेक्षा अतिरिक्त वाटप म्हणून शिल्लक कामाच्या ३५ टक्के इतके वाटप प्राप्त होईल. चालू असलेल्या प्रलंबित असलेल्या व शिल्लक असलेल्या कामांचे अंदाज हे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पुरविलेले होते.

१०.२०.१३ तक्त्याच्या तळटिपांमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, जलसंपत्ती विकासाच्या विविध पैलूंसाठी असलेल्या तरतुदी व त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद ही प्रदेशांप्रमाणे दर्शविण्यात आली आहे. असे निदर्शनास येईल की, सुचविण्यात आलेल्या एकूण आर्थिक तरतुदी या सिंचनाशी संबंधित वाटपामध्ये (स्तंभ क्रमांक १,२,३,४ व ५ यानुसार बाबी) आणि पिण्यासाठी व पाण्याच्या अन्य वापरासाठी (स्तंभ क्रमांक ६,७,८,९ व १० यांमधील बाबी) यामध्ये विभाजित करण्यात आल्या आहेत. आम्ही सुचविलेल्या तरतुदी व वाटपांनुसार सिंचन विकासातील विदर्भाचा हिस्सा सर्वात

अधिक म्हणजे ४८.१२ टक्के इतका आहे. तर उर्वरित महाराष्ट्राचा हिस्सा हा ३१.७२ टक्के एवढा आहे. आम्ही असे नमूद करतो की, प्रदेशातील पिण्याच्या पाणी पुरवठ्याचा हिस्सा लोकसंख्येच्या प्रमाणात आहे. यावरून आमचा पिण्याच्या व अन्य दैनंदिन वापराच्या पाण्याच्या गरजा यांमधील समानतेच्या मानकावर आधारित दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. जलसंपत्ती (म्हणजेच सिंचन व पिण्याचे पाणी व पाण्याचा औद्योगिक वापर) यासाठीच्या एकूण तरतुदींमध्ये प्रत्येक प्रदेशांच्या हिश्श्यांचा आपण विचार केला तर तो अनुक्रमे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांच्याकरिता ४२.३२, २०.८१ व ३६.८६ इतका आहे.

तक्ता १०.२४

जलसंपत्तीमधील विकासातील तूट दूर करण्यासाठी प्रस्तावित निधीचे वाटप

अ. क्र.		वर्गवारी	कोकण	नाशिक	पुणे	औरंगाबाद	अमरावती	नागपूर	महाराष्ट्र
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	पाटबंधारे								
	अ) जलसाठवण आधार	अ	०	०	०	७६१९	१६०६०	०	२३६७९
	ब) सिंचन क्षमतेचा विकास	अ	१०३२०	०	०	०	०	६३३२	१६६५२
	एक) प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रकल्पांच्या उर्वरित खर्चाची टक्केवारी	ब	०	२१४३	२६२७	३४९६	८९४	४४३२	१३५९२
		एकूण	**१०३२०**	**२१४३**	**२६२७**	**११११५**	**१६९५४**	**१०७६४**	**५३९२३**
२	लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाची कामे	अ	४३०	२२०७	३९४	३०७९	१४१८	१३८२	८९१०
		एकूण	**४३०**	**२२०७**	**३९४**	**३०७९**	**१४१८**	**१३८२**	**८९१०**
३	पाणलोट विकास	अ	०	२७३	०	०	१७५३	०	२०२६
		ब	२६७३	३२४५	६२२०	५१३८	४९४५	४५८८	२६८०९
		एकूण	**२६७३**	**३५१८**	**६२२०**	**५१३८**	**६६९८**	**४५८८**	**२८८३५**
४	माजी मालगुजारी तलाव पूर्ववत करणे	अ	०	०	०	०	०	२५२०	२५२०
		एकूण	**०**	**०**	**०**	**०**	**०**	**२५२०**	**२५२०**
५	भूजल	अ	३५७	०	०	०	०	२६६२	३०१९
		ब	०	१८६	०	४३१	१८८	०	८०५
		एकूण	**३५७**	**१८६**	**०**	**४३१**	**१८८**	**२६६२**	**३८२४**
६	ग्रामीण पाणी पुरवठा	अ	७०६	७०६	६६१	५६४	१५४	३२१	३११२
		एकूण	**७०६**	**७०६**	**६६१**	**५६४**	**१५४**	**३२१**	**३११२**
७	नागरी पाणी पुरवठा	अ	४३४३	२०८६	४५९४	५२८०	३१२८	१९९३	२१४२४
		एकूण	**४३४३**	**२०८६**	**४५९४**	**५२८०**	**३१२८**	**१९९३**	**२१४२४**

अ. क्र.		वर्गवारी	कोकण	नाशिक	पुणे	औरंगाबाद	अमरावती	नागपूर	महाराष्ट्र
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
८	तीव्र पाणी टंचाई असणारे तालुके	अ	०	५३१	७६७	४५०	५०	०	१७९८
		एकूण	**०**	**५३१**	**७६७**	**४५०**	**५०**	**०**	**१७९८**
९	प्रतिकूल स्तर असणारे तालुके	अ	७२४	२५८	२४३	२९०	५९	१५८	१७३२
		एकूण	**७२४**	**२५८**	**२४३**	**२९०**	**५९**	**१५८**	**१७३२**
१०	क्षारयुक्त क्षेत्रासाठी पाणी पुरवठा योजना	अ	०	०	०	०	५४२	०	५४२
		एकूण	**०**	**०**	**०**	**०**	**५४२**	**०**	**५४२**
	एकूण महाराष्ट्र	**अ**	**१६८८०**	**६०६१**	**६६५९**	**१७२८२**	**२३१६४**	**१५३६८**	**८५४१४**
		ब	**२६७३**	**५५७४**	**८८४७**	**९०६५**	**६०२७**	**९०२०**	**४१२०६**
		एकूण	**१९५५३**	**११६३५**	**१५५०६**	**२६३४७**	**२९१९१**	**२४३८८**	**१२६६२०**

स्रोत : समितीच्या जलसंपदा उपगटाद्वारे पुरविण्यात आलेली माहिती.

हे तात्पुरते अंदाज आहेत म्हणून असे वाटप हे केवळ ८ वर्षांसाठी करण्यात आले आहे.

तक्ता १०.२५
जल संपदेशी संबंधित एकूण (पाटबंधारे अधिक बिगर पाटबंधारे विकास) वित्तीय तरतुदींतील प्रदेशांचा हिस्सा

१	२	३	४	५	६	७	८
एकूण (पाटबंधारे व बिगर पाटबंधारे विकास)	उर्वरित महाराष्ट्र	४६६६६	मराठवाडा	२६३४७	विदर्भ	५३५७९	१२६५९२
प्रादेशिक हिस्सा (टक्केवारी)		३६.८६		२०.८१		४२.३२	१००

स्रोत : समितीच्या जलसंपदा उपगटाद्वारे पुरविण्यात आलेली माहिती.

तक्ता १०.२६
पाटबंधारे विकासाशी संबंधित वित्तीय तरतुदींतील प्रदेशांचा हिस्सा

अ.क्र.	वर्गवारी	कोकण	नाशिक	पुणे	औरंगाबाद	अमरावती	नागपूर	महाराष्ट्र
१	२	३	४	५	६	७	८	९
पाटबंधारे विकास	अ	१११०७	२४८०	४२२	१०६९८	१९२३१	१२८९६	५६८३४
क्षेत्र १,२,३,४ व ५	ब	२६७३	५५७४	८८४७	९०६४	६०२७	९०२०	४१२०५
	अ + ब	१३७८०	८०५४	९२६९	१९७६२	२५२५८	२१९१६	९८०३९
पाटबंधारे विकास	उर्वरित महाराष्ट्र	३११०३	मराठवाडा	१९७६२	विदर्भ	४७१७४	–	९८०३९
प्रादेशिक हिस्सा (टक्केवारी)		३१.७२	–	२०.१६	–	४८.१२	–	१००

टिपा : अ– तातडीच्या आधारावर प्रस्तावित करण्यात आलेल्या तरतुदी
ब– विकासाचा वेग वाढविण्यासाठी इतर विशेष तरतुदी

तक्ता १०.२६ अ
पिण्याच्या पाण्यासाठीच्या वित्तीय तरतुदींतील प्रदेशांचा हिस्सा

अ.क्र.	वर्गवारी	कोकण	नाशिक	पुणे	औरंगाबाद	अमरावती	नागपूर	महाराष्ट्र
१	२	३	४	५	६	७	८	९
पिण्याच्या पाण्याचे	अ	५७७३	३५८१	६२६५	६५८४	३९३३	२४७२	२८६०८
क्षेत्र ६,७,८,९ व १०	ब	०	०	०	०	०	०	०
	अ + ब	५७७३	३५८१	६२६५	६५८४	३९३३	२४७२	२८६०८
बिगर पाटबंधारे विकास	उर्वरित महाराष्ट्र	१५५९१	मराठवाडा	६५८४	विदर्भ	६४०५		२८५८०
प्रादेशिक हिस्सा (टक्केवारी)		५४.५५		२३.०४		२२.४१		१००

स्रोत : समितीच्या जलसंपदा उपगटाद्वारे पुरविण्यात आलेली माहिती.

वरील तक्ता १०.२४ यामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे निधीचे वाटप करण्यासाठी स्पष्टीकरणात्मक टिपा

१०.२०.१४ पाटबंधारे :

पाणी क्षेत्राच्या सर्व घटकातील पाण्याच्या तुटवड्याचा समितीने अंदाज घेतला आहे व तूट दूर करण्यासाठी आवश्यक असलेला असा निधी जोडपत्र १०.३४ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

समितीने प्रत्येक पाटबंधारे विकास महामंडळातील प्रकल्पांच्या उर्वरित कामाच्या खर्चावरील माहिती सादर करण्यासाठी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांना विनंती केली. जलसंपदा विभागाने, पुढीलप्रमाणे प्रकल्पांच्या उर्वरित कामाच्या प्रदेशनिहाय खर्चाची तरतूद केली आहे:

तक्ता १०.२७
राज्य क्षेत्र पाटबंधारे प्रकल्पांच्या उर्वरित कामाचा खर्च (रु.कोटींमध्ये)

महामंडळ	कोकण	नाशिक	पुणे	औरंगाबाद	अमरावती	नागपूर	महामंडळाचा एकूण खर्च
१	२	३	४	५	६	७	८
कोकण पाटबंधारे विकास महामंडळ	४४५०	०	०	०	०	०	४४५०
तापी पाटबंधारे विकास महामंडळ	०	१०६०३	०	०	०	०	१०६०३
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ	०	१८	१७५१४	३१७	०	०	१७८४९
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ	०	३६६४	०	११३३६	०	०	१५०००
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ	०	०	०	०	१७८८०	१२६६४	३०५४४
महसूल विभाग एकूण :	**४४५०**	**१४२८५**	**१७५१४**	**११६५३**	**१७८८०**	**१२६६४**	**७८४४६**

स्रोत : जलसंपदा विभाग

१०.२०.१५ उर्वरित कामाचा खर्च व पुढे नमूद केलेल्या विविध गरजा विचारात घेता, उर्वरित खर्चाचा काही विशिष्ट भाग वर्गवारी ब मध्ये ठेवण्यात आला आहे. वर्ग ब मध्ये आवश्यक असलेला निधी हा तूट दूर करण्याबरोबरच पहिल्या ५ ते ७ वर्षांमध्ये वापरण्याचे देखील प्रस्तावित आहे.

- तूट दूर करण्यासाठी आवश्यक असलेला निधी हा, कोकण विभागात उर्वरित खर्चापेक्षा खूप अधिक आहे.
- अद्यापि, नाशिक व पुणे विभाग हे सिंचन क्षेत्रामध्ये पुढे आहेत. या विभागातील जे तालुके मागे पडलेले आहेत, त्या विशिष्ट तालुक्यांच्या विकासाची गती कायम ठेवण्यासाठी, त्यांच्यासाठी प्रत्येक विभागाकरिता, उर्वरित खर्चाच्या १५ टक्के एवढा निधी वर्ग ब मध्ये ठेवण्यात आला आहे.

१०.२०.१६ पाण्याचा जास्तीत जास्त तुटवडा असणारा विभाग म्हणजे औरंगाबाद विभाग. या भागातील मोठ्या क्षेत्रांमध्ये व्यापक प्रमाणात सिंचनाचे लाभ मिळविण्यासाठी, पीक घेण्याच्या पद्धतीत व स्वरूपात आणि पाणी वापर तंत्रामधील बदल करणे, तूट दूर करण्याव्यतिरिक्त उर्वरित खर्चाच्या ३० टक्के अतिरिक्त रक्कम ठेवणे. या गोष्टी प्रस्तावित केल्या आहेत. तूट दूर करण्याची रक्कम ही अमरावती विभागामध्ये उर्वरित खर्चाच्या अंदाजे ८० टक्के एवढी आहे. म्हणून, ५ टक्के इतकी नाममात्र रक्कम वर्ग ब साठी ठेवण्यात आली आहे. उर्वरित कामाच्या खर्चाच्या ३५ टक्के एवढी रक्कम ही नागपूर विभागातील प्रकल्पांच्या कामाची गती वाढविण्यासाठी प्रस्तावित केली आहे.

१०.२०.१७ पाणलोट विकास : पाणलोट विकासाची गती वाढविण्याचे व ते आगामी ५ ते ७ वर्षांमध्ये पूर्ण करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे पाणलोट विकासासाठी आवश्यक असलेला एकूण निधी म्हणजेच, रु. २८८३५ कोटी एवढी रक्कम ही अशी कामे पूर्ण करण्यासाठी ठेवण्यात आली आहे.

१०.२०.१८ भूजल : भूजलामधील तूट केवळ कोकण व नागपूर विभागामध्ये आहे. नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागातील विकासाच्या प्रगतीच्या वेगाबरोबर राहण्यासाठी, एकूण कामाच्या रकमेच्या २५ टक्के एवढी रक्कम ही वर्ग ब मध्ये ठेवण्यात आली आहे.

१०.२१ समारोपीय अभिप्राय :

१०.२१.१ येत्या दशकांत, विविध प्रकारच्या कामांसाठी पाण्याची मागणी वाढण्याचा संभव आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्याने, जलसंपत्तीच्या वाढत्या मागणीकडे अधिक काळजीपूर्वकपणे पाहिले पाहिजे आणि त्याकरिता लवकरात लवकर नियोजन केले पाहिजे. पिण्याचे पाणी व संरक्षित सिंचन यांसारख्या मानकांधारित, अग्रक्रमाव्यतिरिक्त राज्य शासनाने, पाण्यासाठी सुनियोजित व विस्तृत विनियमित बाजारपेठेचा विकास करण्याची आणि तिला आकार देण्याची काळजी घेतली पाहिजे. पाण्याचा सर्व प्रकारचा वापर, विवेकाने व व्यापकतेने प्रचालित, प्रोत्साहक आणि व्यवहार्य असणाऱ्या जल बचत करणाऱ्या तंत्रज्ञानावर भर देऊन करण्यात यावा. पिण्याचे पाणी व संरक्षित सिंचन यांसारख्या निवडक वापरांव्यतिरिक्त पाणी उपसणे, साठवणे आणि वापरणे यांसाठी पैसे देण्यासाठी लाभधारकांचे मन वळविले पाहिजे. पाण्याच्या शहरी आणि कृषिच्या वाढत्या वापरासाठी शक्य असेल तेथवर, पाण्याचा पुनर्वापर आणि पुनर्चक्रण याचा अंगीकार करणे मोठ्या प्रमाणावर बंधनकारक करण्यात यावे. पाण्याच्या बाजारपेठेच्या सामाजिकदृष्ट्या स्वीकार्य अशा कार्याची आणखी उत्क्रांती व विकास हे धोरणकर्त्यांसाठी एक महत्त्वाचे आव्हानात्मक काम आहे. आमच्या अहवालात, आम्ही पाण्याच्या दुर्मिळ स्रोतांसाठी दीर्घकालीन दृष्टिकोन आणि नियोजन करण्याची गरज अधोरेखित केली आहे. प्रारंभिक टप्प्यांत, आपण, अंतिम उपलब्ध क्षमतेसाठी साठवण क्षमता वाढविण्यावर व त्यांचे बळकटीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे. नागपूर, कोकण व अमरावती विभागांना उच्च प्राधान्य मिळेल. महाराष्ट्र शासनाने, या शिफारशींवर आधारित असलेली निकडीची कामे म्हणून नियतवाटप आणि तूट दूर करण्याचे काम सुरू करायला हवे. परंतु, व्याख्या, आधारसामग्री आणि तुटींचे अंदाज यांसारखे अनिश्चित (निराकरण न केलेले) मुद्दे लक्षात घेता, स्वतंत्र तज्ञांच्या गटास किंवा महाराष्ट्र जल संपत्ती प्राधिकरणास, पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी नवीन दीर्घकालीन अंदाजाची पडताळणी व विकास करण्यास सांगितले पाहिजे. निकटच्या कालावधीत साठवणुकीची उपलब्ध क्षमता उपयोगात आणताना (जल) संपत्तीचे नियोजन व तरतूद करताना प्राधान्य दिले पाहिजे. विशेषकरून, पाणी टंचाई असलेल्या प्रदेशांना, अशा क्षमतेचा वापर करताना, उच्च प्राधान्य द्यायला हवे. पुढील वर्षांत पाण्याची बचत आणि पाण्याची पुनर्निर्मिती करणाऱ्या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार करण्यास, आहे त्यापेक्षा अधिक भर देण्याचे गृहित असेल.

तक्ता १०.२८
पाण्याबाबतच्या शिफारशींचा सारांश

प्राधान्यक्रम	परिच्छेद क्रमांक	शिफारस
१	२	३
१	१०.१३.३	ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रांसाठी पाण्याच्या किमान उपलब्धतेचे प्रमाण दररोज दरडोई १४० लिटर इतके असावे. ग्रामीण क्षेत्रांसाठी या १४० लिटरमध्ये पशुधनाच्या पाण्याच्या गरजांचा समावेश आहे.
२	१०.११.१०	पाणलोट क्षेत्रांच्या विकासासाठीची सध्याची वित्तीय तरतूद अपुरी आहे. ती वाढविण्यात यावी आणि प्रति हेक्टर रुपये २५,०००/- एवढी करण्यात यावी. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, येत्या १० वर्षांत पूर्ण करण्यात यावा. पाणलोट क्षेत्र विकासासाठी एकूण आवश्यक वित्तीय तरतूद रुपये २८८३७.५ कोटी इतकी असेल. पाण्याची तीव्र टंचाई आणि तुटवडा असलेल्या प्रदेशांमध्ये या कार्यक्रमाची पुढील पाच वर्षांत, प्राथम्यतत्वावर अंमलबजावणी करावी.

प्राधान्यक्रम	परिच्छेद क्रमांक	शिफारस
१	२	३
२अ	१०.११.१२	अशी काही क्षेत्रे आहेत की जेथे, पाण्याचे नैसर्गिक स्रोत मर्यादित आहेत, या प्रवाही सिंचनाची व्याप्ती कमी आहे आणि पाण्याची टंचाई तीव्र आहे. अशा क्षेत्रांमध्ये पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामांना उच्च प्राधान्य देण्यात यावे आणि ही कामे येत्या ५ वर्षांत युद्ध पातळीवर पूर्ण करण्यात यावीत.
३	१०.२०.४	प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र आणि साठवण यांना विकासाचे निर्देशांक म्हणून समजण्यात यावे.
	१०.१९.२	
४	१०.१२.१६	विहिरी आणि तत्सम स्रोतांचा स्थिर उद्‌भव आणि वापर याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, वीज पुरवठयाचे पायाभूत सुविधा जाळे निर्माण केले पाहिजे. अशा विजेच्या पायाभूत सुविधा जाळ्यांच्या विकासास प्रामुख्याने भूजल वापरावर अवलंबून असणाऱ्या क्षेत्रांमध्ये प्राधान्य दिले जावे.
५	१०.९.६	खानदेशातील सिंचन विकास.
	१०.९.९	• पाण्याच्या उपलब्धतेच्या दृष्टीने, तापी नदीचे खोरे हे "पाण्याची तूट असणारे" खोरे आहे. नर्मदेच्या पाण्याचा महाराष्ट्राचा जास्तीचा हिस्सा, या तूट असणाऱ्या खोऱ्यामध्ये वापरण्यात यावा. • पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांची तातडीच्या प्राधान्यक्रमाने अंमलबजावणी करण्यात यावी • उंचसखल प्रदेशासाठी पाईपलाईनद्वारे पाण्याचे वितरण करावे.
५	१०.९.४	अमरावती विभागातील सिंचन विकास. • या विभागातील, दरडोई आणि प्रति हेक्टरी पाण्याची उपलब्धता खूपच कमी आहे. म्हणून, दाता खोऱ्याच्या (वैनगंगा उप खोऱ्याच्या) गरजांसाठी देखील पुरेशी तरतूद केल्यानंतर, वैनगंगा उप खोऱ्यातील पाणी, गोदावरीच्या उप खोऱ्यातील पाण्याची कमतरता असणाऱ्या क्षेत्रात वळविण्याचा विचार केला जावा. • या प्रदेशाचे खोल काळी माती आणि 'खार पाण पट्टा' हे वैशिष्टय आहे. या प्रदेशासाठीचे तांत्रिक आणि वित्तीय निकष बदलण्यात यावेत. • येथे शेत-तळे आणि सूक्ष्म सिंचनाला भरपूर वाव आहे. • एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकासाची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरेल. • सिंचित पाण्याच्या वितरणातील तफावत दूर करणे आवश्यक आहे. • खोल काळ्या मातीच्या प्रदेशात पाणीपुरवठा बंद पाईपलाईन मधून करण्यात यावा.

प्राधान्यक्रम	परिच्छेद क्रमांक	शिफारस
१	२	३
५	१०.९.१५	पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन विकास. • कायम पाणी टंचाई असणाऱ्या प्रदेशासाठी उंचावरील ठिकाणी पाणी पोहचवणे ही एक विशेष बाब समजण्यात यावी आणि पाणलोट क्षेत्र विकासाला उच्च प्राधान्य देण्यात यावे. • डोंगराळ प्रदेशांसाठी, पाण्याचे वितरण पाईपलाईनद्वारे करण्यात यावे.
५	१०.९.३	कोकणातील सिंचन विकास • डोंगराळ चढउतार असणाऱ्या प्रदेशांमुळे, आवश्यक असेल तेथे पाईपलाईनद्वारे पाण्याचे वितरण करण्यात यावे. • या प्रदेशांतील बऱ्याच भागात भौगोलिक भूरचनेत, लॅटेराईट (जांभा दगड) आढळतो. अशा भौगोलिक परिस्थितीत पाणी साठविण्याचे पर्याय शोधण्यासाठी संशोधनाची गरज आहे. • तेथे वरचेवर पूर स्थिती उद्भवते आणि अशा पूर परिस्थितीच्या नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. ही समस्या कायमस्वरूपी आणि टिकाऊ तत्त्वावर सोडविण्यासाठी वैज्ञानिक पर्याय शोधण्याची आपल्याला गरज आहे. • जल-कुंड आणि सूक्ष्म सिंचन योजना तात्काळ कार्यान्वित करण्यात याव्यात. • पूर नियंत्रणासाठी स्वतंत्र आणि विशेष तरतुदी करण्याची गरज आहे.
५	१०.९.१०	मराठवाड्यातील सिंचन विकास. • वैतरणेतून पाणी वळविणे आवश्यक असेल. • एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकासाची प्राध्यान्य तत्वावर अंमलबजावणी करण्यात यावी. • न्यायाधिकरणाच्या निवाड्याद्वारे पाण्याच्या वापराच्या प्रमाणावर निर्बंध घातले आहे. या निवाड्याचे पुनर्विलोकन करण्याची गरज आहे. • कापसाच्या पिकाची खोल काळी माती असणाऱ्या क्षेत्रांसाठी पाईपलाईनद्वारे पाण्याचे वितरण करणे. • शेत-तळे आणि सूक्ष्म सिंचनावर लक्ष केंद्रित करणे.
५	१०.९.११	पूर्व विदर्भातील सिंचन विकास. १) पूर्व विदर्भातील काही क्षेत्राच्या विकासावर, नक्षलवादी कारवायांमुळे प्रतिकूल परिणाम झाला आहे. या क्षेत्रांतील प्रकल्प प्राधान्य तत्त्वावर पूर्ण होण्यासाठी पुरेसा निधी देण्यात यावा.

प्राधान्यक्रम	परिच्छेद क्रमांक	शिफारस
१	२	३
		२) वन जमिनीचे संपादन, वनाचे व वन जागांचे विस्थापन याकरिता आवश्यक असलेली रक्कम, सध्याच्या निव्वळ मूल्याच्या आधारे, प्रदान करणे आवश्यक आहे. अशा रकमा, प्रदेशातील प्रकल्पांशी न जोडता एकत्रित निधीवर भारित करण्यात याव्यात. वनांच्या सान्निध्यातील सिंचन प्रकल्पांवर या सध्याच्या निव्वळ मूल्याच्या सशर्ततेमुळे प्रतिकूल परिणाम होत आहेत. सध्या, पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प, या सध्याच्या निव्वळ मूल्याच्या सशर्ततेतून वगळण्यात आले आहेत. सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत हाच दृष्टिकोन अनुसरण्यात यावा. ३) कापसाच्या पिकाच्या खोल काळ्या मातीच्या प्रदेशात पाण्याचे वितरण पाईपलाईनद्वारे करण्यात यावे. ४) पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांची, उच्च प्राधान्याने अंमलबजावणी करण्यात यावी. ५) माजी मालगुजारी तलावांचे पुनर्नवीकरण करण्यात यावे आणि त्यांची साठवण क्षमता वाढविण्यात यावी. ६) माजी मालगुजारी तलावांच्या पुनर्विकासाबरोबरच सूक्ष्म-सिंचन तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि त्याचे प्रचालन करणे.
६	१०.१२.१०	भूजल विकासासाठी रुपये ३८२४ कोटीच्या स्वतंत्र निधीची तरतूद करावी.
७	१०.१९(५)	जेथे जलमग्न प्रदेशांतील वन क्षेत्रांची घनता ०.५ पेक्षा कमी आहे. (उदाहरणार्थ तुलतुली, कारवाफा यांसारखे विदर्भातील सिंचन प्रकल्प) अशा सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत, राज्यपालांची विशेष परवानगी घेण्यात यावी आणि वन क्षेत्रातील या प्रकल्पांचे पाणी साठवण क्षमता प्राधान्य तत्त्वावर पूर्ण करण्यात यावी.
८	१०.१४.४	पाण्याच्या प्रदूषणास प्रतिबंध करणे आवश्यक आहे. सर्व सिंचनेतर वापर व वापरकर्ते यांना पुनर्निर्मिती आणि पुनर्वापर करणे बंधनकारक करण्यात यावे.
९	१०.१९(९)	कालवे वितरण पद्धतींतील पाझर आणि अपव्यय कमी करण्याच्या दृष्टीने, बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी वितरणाचा विचार करण्यात यावा. प्रत्येक प्रदेशासाठी या पर्यायाचा स्वतंत्रपणे विचार करण्यात यावा. विशेषकरून, हा पर्याय, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम असलेल्या प्रदेशाच्या बाबतीत व उंचसखल भूप्रदेशात आणि खोल काळी माती असणाऱ्या प्रदेशांत अत्यंत तातडीने वापरात आणावा.
१०	१०.१२.६	भूपृष्ठ सिंचन पाण्यापेक्षा भूजलाचा हिस्सा मोठा आहे म्हणून त्याला स्वतंत्र विकास निर्देशांक म्हणून समजण्यात यावे.
११	१०.१९(२)	जेथे दरडोई पाण्याची उपलब्धता ५०० घनमीटरपेक्षा कमी आहे अशा क्षेत्रांमध्ये संपूर्ण विकास साध्य करणे खूपच अवघड आहे. अशी गंभीर परिस्थिती लक्षात घेता, पाण्याचा काटेकोर आणि काटकसरीने वापर त्याचप्रमाणे पाण्याची पुनर्निर्मिती व पुनर्वापर यांवर जोर द्यावा व त्याचे प्रचालन करावे. औरंगाबाद व अमरावती विभाग, या रीतीने काळजीपूर्वक संनियंत्रित करण्याची गरज आहे.

प्राधान्यक्रम	परिच्छेद क्रमांक	शिफारस
१	२	३
१२	१०.१०.१	प्रत्यक्ष सिंचित जमिनीवर आधारित असलेल्या विकास निर्देशांकाचा अवलंब करण्यात यावा. येत्या दहा वर्षांमध्ये, सिंचन क्षेत्रांतील तूट अशा निर्देशांकावर आधारित असावी.
१३	१०.११.९	पाण्याच्या उपलब्धतेचा योग्य व्यापक अभ्यास न करता, कोणत्याही पुनर्रचनेचा विचार करणे अवघड ठरेल. काही पाणलोट क्षेत्र वगळता, सर्व पाणलोट क्षेत्रांमधील पाण्याच्या उपलब्धतेचे योग्यरीतीने निर्धारण किंवा मोजमाप करण्यात आलेले नाही. प्रवाह मापनाच्या आधारे, अभ्यासास सुरूवात करणे आवश्यक ठरेल.
१४	१०.९.११	नक्षलवादी कारवायांमुळे विदर्भाच्या ज्या क्षेत्रांमधील आर्थिक विकासावर प्रतिकूलरीतीने परिणाम झालेला आहे त्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात यावे आणि या प्रदेशांतील प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावेत.
१५	१०.१२.१६	वैज्ञानिक दृष्टीने जलवाहक मापनाच्या आधारे, पावसाच्या पाण्याची साठवण हाती घेण्यात यावी. भूजल तज्ञांच्या शिफारशीच्या आधारे, प्रत्येक ठिकाणास आणि परिस्थितीशी अनुरूप असणारे आवश्यक ते उपाय तयार करण्यात यावेत.
१६	१०.६.१	५०% अवलंबिततेच्या निकषांच्या आधारे सर्व खोऱ्यांमध्ये व उप-खोऱ्यांमध्ये संकल्पचित्रण आणि प्रकल्प नियोजन करण्यात यावे.
१७	१०.१९.१०	आपोआप साठवण करणे हे सिंचन प्रकल्पांचे प्रयोजन नाही. म्हणून, प्रत्यक्ष सिंचन क्षेत्राचे मापन हे, विकास तुटीच्या निर्देशांकाचा आधार म्हणून समजण्यात यावे.
१८	१०.१९.७	पाणी साठवण निदेशांकानुसार मापन केल्याप्रमाणे अमरावती व औरंगाबाद विभाग, गंभीर तुटीस सामोरे जात आहेत. अशा गंभीर तुटीवर उपाययोजना करण्यासाठी, स्थानिक क्षेत्रातील सर्व सिंचन प्रकल्प (म्हणजेच २५० ते ६०० हेक्टर प्रकल्प) तातडीने पूर्ण करण्यात यावेत आणि पाण्याच्या उपलब्धतेशी संबंधित असणारे विद्यमान विनियम आणि अन्य पर्यावरणीय विनियम शक्य असेल तेथवर, शिथिल करण्यात यावेत.
१९	१०.१९.१०	प्रकल्पाच्या संकल्पचित्रात पीक पद्धती आणि सिंचित क्षेत्राचे मापन हे पीक क्षेत्रानुसार असते. प्रत्यक्ष सिंचन क्षेत्रांचे मापन, सिंचन सेवा मिळणाऱ्या लागवडीखालील क्षेत्राच्या आधारे केले पाहिजे.
२०	१०.९.१८	जेथे पाण्याची उपलब्धता प्रति हेक्टर ३००० घनमीटरपेक्षा कमी आहे अशा सर्व प्रदेशांसाठी, पीक पद्धतीचा गंभीरपणे पुनर्विचार करण्यात यावा. ज्या पिकांना पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज आहे अशा सर्व पिकांसाठी (ऊसासकट) क्षेत्राच्या प्रमाणाच्या आधारे कमालमर्यादा किंवा उच्च सीमा घालावी. जी पीके कमी पावसात येतात किंवा ज्यांना कमी सिंचनाची गरज लागते परंतु ज्यांचे उच्च लाभ मूल्य आहे अशा पिकांचे योग्य धोरणांद्वारे प्रचालन करावे आणि प्रोत्साहन द्यावे.
२१	१०.१९.११	औरंगाबाद व अमरावती विभागांत तीव्र टंचाई आहे आणि या क्षेत्रांसाठी कडक पाणी बचत उपाययोजनांची तात्काळ गरज आहे. या प्रदेशांमधील सिंचन प्रकल्पांना नवीन सूक्ष्म सिंचन

प्राधान्यक्रम	परिच्छेद क्रमांक	शिफारस
१	२	३
		तंत्रज्ञानाची चालना दिली पाहिजे आणि अशा तंत्रज्ञानांचा समावेश करण्यासाठी कार्यक्रमाच्या संकल्पचित्रात समावेश करावा आणि सुधारणा करावी. पाण्याच्या तुटीवर मात करण्यासाठी याचे दूरगामी परिणाम होतील.
२२	१०.६.४	ज्या प्रदेशात, ४०० मिलीमीटरपेक्षा कमी पर्जन्यमान असणाऱ्या वर्षांची वारंवारता दहा वर्षांतून एकदा यापेक्षा जास्त असते तेथे अशा प्रदेशांमध्ये पाईपलाईनद्वारे पाणी पोहचवण्यासाठी विकास योजनांमध्ये स्वतंत्र विशेष तरतूद करावी.
२३	१०.१०.३ (१०)	मोठे, मध्यम आणि लघु यांसह सर्व सिंचन प्रकल्पांच्या सिंचन विकास कार्यक्रमामध्ये लाभक्षेत्र विकासाची संकल्पना असायला हवी. त्यानुसार, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाची योग्यरीतीने सुधारणा आणि पुनरुज्जीवन करावे. अशा लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे स्वरूप विभागातील कृषि अभियंते, कृषि अर्थशास्त्रज्ञ, कृषि विस्तार अधिकारी, सहकार, पणन वखार अधिकारी यांच्यासह हे बहुविद्याशाखीय असावे. घनपरिमाणाच्या आधारे पाण्याचे व्यवस्थापन आणि वाटप, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे सोपवण्यात यावे.
२४	१०.१९.१४	पाण्याच्या वापरातील प्राथम्यक्रम पुढीलप्रमाणे असावेत : १) पिण्याचे पाणी २) सिंचन ३) औद्योगिक वापर जल खोऱ्याच्या एकात्मीक व्यापक विकासाच्या योजना येत्या ५ वर्षांत तातडीने पूर्ण कराव्यात आणि महाराष्ट्र जलसंपदा विनियमन प्राधिकरणाने, अशा व्यापक संरचनेमध्ये पाण्याचे समन्याय वितरण विहित करावे.
२५	१०.११.१	स्थानिक क्षेत्रातील योजनांच्याद्वारे विकसित केलेली क्षमता व क्षेत्र, निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेशी संबंधित असणाऱ्या आधारसामग्रीत समाविष्ट करावे.
२६	१०.१०.३ (११)	सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठीच्या प्रशासकीय यंत्रणा त्यांच्या जल वितरण क्षमतेसह सुधारल्या पाहिजे आणि सिंचन तसेच सिंचनेतर प्रयोजनाच्या घनपरिमाणांच्या आधारे जल वितरणाच्या तत्त्वांचे बारकाईने अनुपालन करावे.
२७	१०.१०.५	महाराष्ट्र शासनाने, सिंचन व्यवस्थापन, लाभधारकांकडे सोपवण्याचे धोरण आधीच अवलंबिलेले आहे. तथापि, जून २०१० पर्यंत, संभाव्य सिंचन क्षमतेच्या ४७.४ लाख हेक्टर सिंचन क्षमतेपैकी (म्हणजे २४.५%) फक्त ११.६१ लाख हेक्टर सिंचन क्षमता लाभधारकांकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. प्रकल्प व्यवस्थापनातील सामाजिक सहभाग हा, सिंचन विकासातील एक महत्त्वाचा निर्देशांक आहे. विशेषकरून, गंभीर पाणी टंचाई सहन करावी लागणाऱ्या प्रदेशांमध्ये, पाण्याच्या वापराचे कडक, कार्यक्षम आणि पाण्याचा कमी अपव्यय होणाऱ्या व्यवस्थापनाला देखील अधिक महत्त्व प्राप्त होते. अशा प्रदेशांमध्ये, सामाजिक सहभाग असणाऱ्या पाणी वितरण व्यवस्थापन संस्था स्थापन करण्यास उच्च प्राधान्य देण्याचा विचार करण्यात यावा. येत्या ५ वर्षांमध्ये, अशा संस्था निर्मिती आणि बळकटीकरण करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात यावी.

स्रोत : समितीच्या जलसंपदा उप गटाद्वारे पुरविलेली माहिती.

❖❖❖

प्रकरण ११

आरोग्य : सार्वत्रिकीकरणाद्वारे समतोल राखणे

११.० प्रस्तावना

आर्थिक वाढीकरिता आरोग्य ही आवश्यक अशी पूर्वअट आहे. मनुष्य निरोगी असल्यास तो उत्पादक बनू शकतो व 'मानवी भांडवल' किंवा 'मानवस्रोत' तयार होते. तथापि, केवळ आरोग्य हेच आर्थिक वाढीचे साधन नसून आर्थिक वाढीचे उद्दिष्ट म्हणून त्याच्याकडे पाहिले जाऊ शकते. याप्रकारे, आरोग्य व आर्थिक वाढ यांमधील संबंध, द्विमार्गाने परस्पर अधिक बळकट होतात. प्रादेशिक वाढ व विकास, आरोग्य निर्देशांकाने मोजले जाणे शक्य आहे व त्यात आरोग्यविषयक उपायांनी वाढ करणे शक्य आहे. या प्रकरणात, आम्ही पुढील उद्दिष्टांसह तीन प्रदेशांतील लोकसंख्येच्या आरोग्याचा आढावा घेण्याचे प्रस्तावित करत आहोत:-

११.१ प्रकरणाची उद्दिष्टे

१. महाराष्ट्राच्या तीन प्रदेशांमधील आरोग्य व आरोग्यविषयक देखभालीच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

२. आरोग्य निर्देशांक निवडणे व विश्लेषणाचा घटक म्हणून जिल्ह्याचा वापर करून आरोग्यविषयक दर्जाचे निर्धारण करणे.

३. जिल्ह्यांना त्यांच्या आरोग्यविषयक दर्जाच्या स्थितीनुसार स्थान देणे.

४. तीन प्रदेशांतील आरोग्यविषयक दर्जाच्या तुटीचा अंदाज घेणे.

५. त्रुटी असलेल्या आरोग्यविषयक स्थितीसह जिल्ह्यात आरोग्याच्या देखभालीमध्ये सुधारणा करण्याकरिता व्यापक धोरणाची शिफारस करणे.

६. धोरण राबविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वित्तीय साधनांचा स्थूलमानाने अंदाज घेणे.

समितीने, महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्राच्या प्रादेशिक विश्लेषणावरील अभ्यास सुरू केला आहे. मृत्युसंख्या, रोगटपणा व जननक्षमता यांचा प्रादेशिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न या अभ्यासातून करण्यात आला आहे आणि तसेच, या तीन प्रदेशांतील आरोग्यविषयक देखभालीच्या यंत्रणेची उपलब्धतेचा व उपयोगितेचा समीक्षणात्मक आढावाही घेतला आहे. त्यावेळी या अभ्यासात आरोग्यविषयक दर्जाचे मुख्य निर्धारक व निर्देशांक यांवर विचार करण्यात आला आहे.

समितीने, चार मुख्य निष्पत्ती निर्देशांक निवडले होते आणि त्यानुसार जिल्हे व प्रदेशांतील आरोग्यविषयक दर्जाचे निर्धारण केले होते. जिल्हे व तीन प्रदेशांच्या आरोग्यविषयक दर्जाच्या स्थितीचा अंदाज घेऊन त्या स्थितीनुसार जिल्ह्यांना स्थान देण्यात आले होते. अंतिमत:, समितीने त्रुटी असलेले प्रदेश व जिल्हे यांमध्ये आरोग्य व आरोग्य देखभाल यांमध्ये सुधारणा करण्यासाठी व्यापक धोरण निश्चित केले होते व अशा सुधार धोरणाचे टप्प्याटप्प्यांनी कार्यान्वयन करण्यासाठी वित्तीय आवश्यकतांचा अंदाज घेतला आहे.

११.२ आरोग्य क्षेत्रामधील प्रादेशिक तफावती:

११.२.१ लोकसंख्याशास्त्रात्मक स्थिती

राज्यामध्ये, मुंबई व मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई उपनगरांसह ३५ जिल्हे आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या दोन जिल्ह्यांची जिल्हानिहाय लोकसंख्या प्रति चौरस किलोमीटर लोकसंख्येच्या घनतेसह

२०,००० पेक्षा जास्त अशी लोकसंख्येची अत्यंत मोठी घनता दर्शविते. ठाणे, पुणे व कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही लोकसंख्येची घनता जास्त आहे. तर दुसरीकडे, गडचिरोली जिल्ह्यामध्ये लोकसंख्येची घनता कमी दिसून आली आहे. (जोडपत्र ११.१ पहा.)

१. जोडपत्र ११.२ मध्ये, जिल्हानिहाय ग्रामीण, नागरी व राज्यातील एकूण लोकसंख्या तसेच आदिवासी लोकसंख्या दर्शविली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येची शहरी/ग्रामीण विभागणी उपलब्ध आहे. परंतु, आदिवासी लोकसंख्येचा तपशील अद्यापपर्यंत उपलब्ध झालेला नाही. आदिवासी लोकसंख्येची मर्मभेदता सर्वज्ञात आहे. २००१ च्या जनगणनेच्या आधारभूत माहितीमधील आदिवासी लोकसंख्येच्या टक्केवारीपेक्षा जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या अधिक ठरविली आहे. जेथे मोठ्या प्रमाणात (२ लाखांपेक्षा जास्त) आदिवासी लोक राहतात असे १५ जिल्हे आहेत, आणि म्हणून त्यांना आदिवासी जिल्हे म्हणून अधिसूचित करण्यात आले असून जोडपत्र ११.२ मधील स्तंभ ८ मध्ये ते सुस्पष्टपणे दाखविण्यात आले आहेत.

आरोग्याचा दर्जा समजून घेण्यासाठी तसेच पायाभूत सोयीसुविधांच्या आवश्यकतांची परिगणना करण्यासाठी अशा विभागणीचे सर्वसमावेशक ज्ञान असणे आवश्यक आहे. नागरीकरण हे उत्तम आरोग्याच्या परिणामाशी निगडीत आहे. तर दुसऱ्या बाजूला, आदिवासी क्षेत्रांमधील आरोग्य निर्देशांक वाईट आहेत. सध्या, मानकांसाठीची मार्गदर्शक तत्त्वे केवळ लोकसंख्येशी जोडली आहेत. महाराष्ट्रात शहरी भागात राहणाऱ्या लोकांची संख्या सर्वात जास्त (५.०८ कोटी) आहे. तामिळनाडू (४८.४ टक्के) व केरळ (४७.७ टक्के) ज्यानंतर ४५.२ टक्के इतक्या नागरी लोकसंख्येसह महाराष्ट्र हे नागरीकरण झालेल्या महत्त्वाच्या राज्यांपैकी तिसरे राज्य आहे. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या वाढीच्या ६२.८ टक्के इतकी वाढ ही शहरी लोकसंख्येत झालेली आहे. मुंबई, ठाणे, नागपूर व पुणे हे अधिक नागरीकरण झालेले जिल्हे आहेत. गडचिरोली, सिंधुदुर्ग व हिंगोली यांचे शहरीकरण कमी प्रमाणात झाले आहे.

जोडपत्र ११.३ मधील मुलांची जिल्हानिहाय लोकसंख्या असे दर्शविते की, जालना व नंदुरबार जिल्ह्यांमध्ये सहा वर्षांखालील मुलांचे अधिकतम प्रमाण म्हणजे अनुक्रमे १४.४ टक्के व १४.१ टक्के इतके आहे. या जिल्ह्यांमध्ये जननक्षमतेचे एकूण प्रमाण जादा असून हे प्रमाण यानंतर दिले आहे. मुंबईतील दोन्ही जिल्हे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व वर्धा जिल्हे यांमध्ये हे प्रमाण खूप कमी म्हणजेच १० टक्क्यांपेक्षा कमी आहे.

जनगणना २०११ मध्ये नोंदविलेल्या लोकसंख्येतील स्त्री-पुरुष प्रमाण व लहान मुला-मुलींचे प्रमाण जोडपत्र ११.४ मध्ये देण्यात आले आहे. कोकण प्रदेशातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे व विदर्भातील आदिवासी जिल्ह्यांपैकी एक गोंदिया, या जिल्ह्यांमध्ये स्त्री-पुरुषांचे प्रमाण अत्यंत चांगले आहे. मुंबई, मुंबई उपनगर जिल्हे व शेजारील ठाणे जिल्हा यांमध्ये स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाण अत्यंत कमी आहे. २०११ मध्ये स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाण ९०० च्याही खाली असणारे चिंताजनक तीन जिल्हे म्हणजेच मुंबई, मुंबई (उपनगर) व ठाणे हे आहेत. तथापि, २०११ च्या जनगणनेशी तुलना करता, या जिल्ह्यांमध्ये स्त्री-पुरुषाच्या गुणोत्तर प्रमाणात थोडी सुधारणा झाली आहे. हे प्रमाण मुंबई मध्ये ६१, मुंबई उपनगर मध्ये ३५ व ठाणे येथे २२ इतके वाढले आहे. सहा जिल्हे असे आहेत जेथे स्त्री-पुरुषाचे प्रमाण ९०० च्या वर परंतु ९२५ पेक्षा कमी आहे. परंतु कल असे दर्शवितो की, २००१-११ दरम्यान या सर्व जिल्ह्यांमधील स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाणात बीडमध्ये २४ बिंदूने व औरंगाबाद मध्ये ८ बिंदूपर्यंत घट झाली आहे. २००१-२०११ मध्ये रत्नागिरी (१,१२३) व सिंधुदुर्ग (१,०३७) मध्ये अनुक्रमे १३ व ४२ बिंदूची स्त्री-पुरुष प्रमाणात घट दिसून येते. ही वस्तुस्थिती असून देखील या दोन्ही जिल्ह्यांमध्ये स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाण उच्च आहे. मुला-मुलींचे प्रमाण सर्व जिल्ह्यांमध्ये कमी आहे. ही भौगोलिक भिन्नता सुस्पष्टपणे दिसून आली आहे. ***मराठवाडा व पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांतील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे. नागपूर व कोकण***

विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये (मुंबई वगळून) मुला–मुलींचे गुणोत्तर प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे. नाशिक व अमरावती विभागात त्याचे कमी–अधिक स्वरूप दिसून येते.

२०११ मधील (युएनएफपीए) ६०+ वर्षे वयाच्या लोकसंख्येचे अंदाजित प्रमाण जोडपत्र ११.५ मध्ये दिले आहे. आकडेवारी वरून स्पष्टपणे असे दिसून येते की, मुंबई (उपनगर) व ठाणे जिल्ह्यांतील वरिष्ठ नागरिकांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले असून, त्याचवेळी सिंधुदुर्ग व रत्नागिरी मध्ये हे प्रमाण जास्त आहे. या दर्शकानुसार मराठवाडा विभागात हे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा अधिक आहे व उर्वरित महाराष्ट्रात खूपच कमी आहे. ६०+वर्षे वयाची लोकसंख्या १० टक्क्यांपेक्षा अधिक असलेले १४ जिल्हे आहेत. वयोवृद्ध लोकसंख्येला भासणाऱ्या आरोग्यविषयक समस्या व आरोग्य देखभाल विषयक गरजा ह्या पूर्णपणे भिन्न स्वरूपाच्या असून त्यासाठी त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

११.२.२ मृत्युसंख्या

आरोग्य विघातक घटकांमुळे अकाली मृत्यु होतो व त्याचे प्रमाणही जास्त आहे. या अहवालात ढोबळ मृत्यु दर, अर्भक मृत्यु दर, पाच वर्षाखालील बालकांचे मृत्यु प्रमाण व माता मृत्यु प्रमाण यांचे जिल्हानिहाय तुलनेकरिता विचार करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील जिल्हानिहाय **ढोबळ मृत्यु दर** जोडपत्र ११.६ मध्ये सादर केले आहे.

ढोबळ मृत्यु दरावर लोकसंख्येचे वय व स्त्री–पुरुष जाति रचना याचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडतो. सिंधुदुर्ग व रत्नागिरीमध्ये जास्त असलेला ढोबळ मृत्यु दर हा ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या जास्त असल्यामुळे असू शकतो, असे स्पष्टीकरण देता येईल. या दोन जिल्ह्यांमध्ये ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या वरिष्ठ नागरिकांचे प्रमाण अत्याधिक आहे. या जिल्ह्यांमधील १५–४५ वर्षे वयाच्या गटातील मोठ्या प्रमाणातील लोकसंख्या ही, राहण्याच्या ठिकाणापासून दूर मुंबई मध्ये कामाच्या शोधार्थ गेली आहे या माहितीशी देखील सुसंगत आहे. तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, ***मराठवाड्यातील मृत्युसंख्या कमी असून विदर्भातील मृत्युसंख्या अधिक आहे व उर्वरित महाराष्ट्रात हे प्रमाण खूप बदलते आहे.***

आंतरराष्ट्रीय लोकसंख्याशास्त्र संस्था यांच्या जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण २ व ३ मधून प्राप्त झालेले ग्रामीण भागातील जिल्हानिहाय अर्भक मृत्युसंख्या दराबाबतचा अंदाज जोडपत्र ११.७ मध्ये दिलेला असून त्यात उर्वरित महाराष्ट्रातील दोन जिल्ह्यांमधील (रत्नागिरी व कोल्हापूर) अर्भक मृत्युसंख्या दर अत्यंत कमी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. चंद्रपूर, गडचिरोली व नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये अर्भक मृत्युसंख्येचा दर अधिक असेल असे अंदाजित केले आहे. ***प्रदेशनिहाय अंदाजित अर्भक मृत्युसंख्या दर हा विदर्भ विभागात (३९.५) अधिक प्रमाण दाखवतो त्याखालोखाल मराठवाडा (३५) व उर्वरित महाराष्ट्रात (२८.८) सर्वात कमी दर दर्शविलेला आहे.***

२०१० या वर्षाकरिता महाराष्ट्र राज्यातील नवजात, नव–जन्मोत्तर, १–४ वर्षे, १–५ वर्षे व पाच वर्षांखालील बालकांच्या एकूण मृत्युसंख्या दराच्या अंदाजासाठी एकत्रित एमओआरटीपीएके व जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण २ व ३ मधील अप्रत्यक्ष अंदाजाचा वापर करून जोडपत्र ११.८ मध्ये देण्यात आलेला आहे. २००७–२००८ वर्षातील महाराष्ट्र प्रदेशातील पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्युसंख्येच्या दराचा अप्रत्यक्ष अंदाज ब्रास पद्धतीचा वापर करून आकृती ११.१ मध्ये देण्यात आला आहे (राम आणि इतर २०१२). मृत्युसंख्येचे विदर्भातील उच्चतम स्वरूप व उर्वरित महाराष्ट्रातील कमीत कमी स्वरूपही या दर्शकातून दिसून येते.

आकृती ११.१
महाराष्ट्रातील ५ वर्षांखालील बालकांच्या मृत्युसंख्येचा दर



स्रोत : राम आणि इतर लोकसंख्या विज्ञान आंतरराष्ट्रीय संस्था (२०१२)

आरोग्य विभागाच्या व्यवस्थापन माहिती यंत्रणेने जे प्रति एक लाख जन्मानुसार माता मृत्यु संख्या निश्चित केली असून त्यावरून जिल्हानिहाय माता मृत्यु प्रमाण बाबतची, यावरील माहिती जोडपत्र ११.९ मध्ये दिली आहे. माता मृत्युचे प्रमाण (अर्भकांच्या मृत्युशी तुलना करता) सापेक्षतेने कमी असल्यामुळे जिल्हानिहाय अंदाजात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे व तो तंतोतंत असण्याची शक्यता कमी आहे. महाराष्ट्र राज्यातील २०११-१२ या वर्षातील माता मृत्यु प्रमाण प्रति लाख जन्मांशी ९० असे होते. उपलब्ध आकडेवारीवरून काढलेला २०११-१२ या वर्षाचा अधिक दर हा प्रति लाख जन्मांशी माता मृत्यु प्रमाण ८५ इतके दर्शविते, जे प्रमाण आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणेमध्ये नोंद केलेल्या माता मृत्यु प्रमाणाशी अधिक सुसंगत आहे. गडचिरोली, नागपूर व अकोला या जिल्ह्यांमध्ये, माता मृत्यु प्रमाण अनुक्रमे १८४, १७८ व १६१ असे असून ते अतिप्रमाणातील माता मृत्यु असल्याचे द्योतक आहे. हे सर्व जिल्हे विदर्भ विभागातील आहेत. ***म्हणून, विदर्भ विभागामध्ये माता मृत्यु प्रमाण सर्वात अधिक आहे.***

तीन विभागांकरिता जन्माच्या वेळीच अपेक्षित आयुर्मान (life expectancy) अंदाजित केले होते. प्रादेशिक अंदाजामध्ये लोकसंख्येवर भर देण्यात आलेला होता. ***विदर्भात अपेक्षित आयुर्मान*** (life expectancy) ***सर्वात कमी आहे व उर्वरित महाराष्ट्रात ते सर्वात जास्त आहे.*** जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण ३ मधून प्राप्त झालेल्या जिल्हानिहाय अपेक्षित आयुर्मान (life expectancy) जोडपत्र ११.१० मध्ये दिलेले आहे. महत्त्वाचे म्हणजे, नंदुरबारमध्ये अपेक्षित आयुर्मान (life expectancy) हे सर्वात कमी दिसून आले आहे. त्याखालोखाल चंद्रपूर जिल्ह्यातील अपेक्षित आयुर्मान (life expectancy) कमी आहे. नंदुरबार व जळगाव खेरीज उर्वरित महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयुर्मान ७० वर्षांपेक्षा जास्त आहे. पाच जिल्हे असे आहेत ज्यांचे आयुर्मान सर्वात जास्त म्हणजे ७५ वर्षे व त्याहून जास्त आहे. ते सर्व जिल्हे उर्वरित महाराष्ट्रातील आहेत.

११.२.३ रोगांचे प्रमाण

रोगांच्या प्रमाणाची संसर्गजन्य व संसर्गजन्य नसलेले रोग अशी ढोबळमानाने वर्गवारी केली आहे. संसर्गजन्य रोगांमधील प्रमाणाच्या अभ्यासाकरिता, न्युमोनिआ व अतिसार याच्या बाबतीतील जिल्हानिहाय व

प्रदेशनिहाय तफावत दोन कारणांकरिता निर्धारित करण्याचे प्रयत्न केले आहेत. पहिले कारण म्हणजे समाजात सर्वत्र आढळणारे रोग व दुसरे म्हणजे, बाधित झालेली लोकसंख्या ही मुलांची असून जी लोकसंख्येच्या जवळपास १२ टक्के आहे. हिवताप व क्षयरोग या रोगांच्या प्रमाणाचाही अभ्यास केला आहे. हे दोन रोग दीर्घकालिक आजार असल्याचे दिसून येते. व क्षयरोगामुळे होणारे मृत्युसंख्येचे प्रमाण सर्वात जास्त आहे. सरतेशेवटी ज्याचा जननक्षम व लैंगिक दृष्ट्या सक्रिय असणाऱ्या वयोगटावर परिणाम होतो अशा एच. आय. व्ही. बाधित रुग्णांच्या आकडेवारीचेही पृथक्करण केले आहे.

जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण ३ मधून घेतलेली ज्या महिलांच्या मुलांना **अतिसार व न्युमोनिआ** झालेला आहे अशा महिलांची जिल्हानिहाय आकडेवारी जोडपत्र ११.११ मध्ये प्रस्तुत केली आहे.

वरील दृष्टिकोनावरून स्पष्टपणे असे दिसून येते की, अतिसार या रोगाचे प्रमाण उर्वरित महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये सर्वात कमी आहे. मुलांमधील अतिसार तसेच न्युमोनिआ यांच्या अत्याधिक टक्केवारीचा इतिहास असणारा जिल्हा म्हणजे बुलढाणा हा विदर्भातील आहे. *न्युमोनिआ (तीव्र श्वसन संसर्ग) हा विदर्भात अधिक (१५.६ टक्के), त्याखालोखाल मराठवाड्यात ११.४ टक्के व उर्वरित महाराष्ट्रात ९.५ टक्के इतका कमी असल्याचे कळविले होते.*

आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणेकडून **हिवतापाच्या** घटनांविषयीची आकडेवारी प्राप्त झाली आहे. ही आकडेवारी जोडपत्र ११.१२ मध्ये दिली आहे. ती पाहिली असता असे दिसून येते की, हिवतापाच्या घटना ह्या राज्याच्या पूर्व ते पश्चिम भागातील केवळ सहा जिल्ह्यांमध्ये फारच मोठ्या प्रमाणात आहेत. या सहा जिल्ह्यांपैकी चार कोकण विभागातील (मुंबई हा एक जिल्हा म्हणून विचारात घेतला आहे) व दोन जिल्हे विदर्भ विभागातील आहेत. आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणेकडील आकडेवारीनुसार, *ह्या घटना विदर्भाखालोखाल मराठवाड्यात कमी आहेत व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात जास्त आहेत.* तथापि, हे रोगनिदान केलेल्या प्रकरणांच्या अहवालावर आधारित आहे. रोगनिदान व अहवालाचे प्रमाण मुंबई मध्ये चांगले असून आदिवासी क्षेत्रात कमी आहे जेथे प्रत्यक्षातील घटना कदाचित अधिक प्रमाणात असतील जसे गडचिरोली व गोंदिया येथे दिसून आले आहे.

प्रति १००,००० लोकसंख्येत फैलाव झालेल्या क्षयरोगाची माहिती जोडपत्र ११.१३ मध्ये दिली आहे. जिच्यामध्ये सुसंगती नाही अशा आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणेच्या आकडेवारीच्या ऐवजी जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण २ मधील आकडेवारी वापरली होती. गडचिरोली, अमरावती, चंद्रपूर, बीड, बुलढाणा व वाशिम हे जिल्हे मोठ्या प्रमाणातील स्तर दर्शवितात. बीड खेरीज सर्व जिल्हे विदर्भ प्रदेशातील आहेत व पहिल्या तीन जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोक राहतात. *प्रदेशनिहाय देखील विदर्भात त्याचा अधिकतम प्रमाणात फैलाव आढळतो (३०६), त्याखालोखाल मराठवाडा प्रदेशात (२३३) आढळतो. उर्वरित महाराष्ट्रात सर्वात कमी फैलाव आढळून येतो (१७९).*

महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्थेकडून **एचआयव्ही बाधितांवरील** आकडेवारी प्राप्त झाली आहे. ही आकडेवारी जोडपत्र ११.१४ मध्ये देण्यात आली आहे. सांगली जिल्हा हा निश्चितार्थाने या दोन्ही दर्शकांमध्ये अधिकतम आहे. बाधित गरोदर स्त्रियांमध्ये सांगली खालोखाल मुंबई आहे. हे दोन्ही जिल्हे *उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील आहेत. ते प्रदेश अधिकतम बाधित असून त्याखालोखाल मराठवाडा आहे व सर्वात कमी बाधित विदर्भ प्रदेशात आहेत.*

त्या त्या वयाच्या प्रमाणित वजनापेक्षा दोन ते तीन मानकांपेक्षा खाली आहेत अशा पाच वर्षांखालील **कुपोषित मुलांची** २००२-०४ मधील जिल्हानिहाय टक्केवारी जोडपत्र ११.१५ मध्ये दिली आहे व ती जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण-२ मधून प्राप्त करण्यात आली आहे. त्यापुढील वाजवी विश्वसनीय अशी जिल्हानिहाय आकडेवारी

उपलब्ध नाही. कुपोषणाची टक्केवारी अधिक असलेले पहिले पाच जिल्हे हे मुख्यत: आदिवासी जिल्हे आहेत. सर्वात खालच्या सहा जिल्ह्यांमध्ये कोणत्याही आदिवासी जिल्ह्याचा समावेश नाही. महाराष्ट्र राज्यातील मुलांमधील कुपोषणाचे वर्णन करणारी २०११-१२ या वर्षाशी संबंधित असणारी अलिकडील आकडेवारीसुद्धा दिलेले आहे. जिल्ह्यांच्या मासिक प्रगती अहवालातील ही आकडेवारी जोडपत्र ११.१५ मध्ये दाखविलेली आहे. कुपोषित मुलांची नोंदविलेली टक्केवारी ही कमी आहे. संभवत: हे नियमित कामाच्या अहवालामुळे असेल, तथापि, जिल्हानिहाय तुलनेवरून असमतोलाची कल्पना येते. ही माहिती व्यापकपणे जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण २ च्या आकडेवारीच्या धर्तीवर आहे. सर्व तीन बहि:स्थ जिल्हे प्राधान्याने आदिवासी आहेत. नंदुरबार जिल्ह्यामध्ये तीव्रपणे कुपोषित असलेल्या मुलांची टक्केवारी सर्वात जास्त आहे. गडचिरोली व अमरावती जिल्ह्यांमध्ये तीव्रपणे कुपोषित असलेल्या मुलांची टक्केवारी अधिक प्रमाणात आहे. ***विदर्भ प्रदेशात कुपोषणाचे अधिकतम प्रमाण (१२.९ टक्के), उर्वरित महाराष्ट्रामध्ये मध्यम प्रमाण (११.६ टक्के) आणि मराठवाड्यात सर्वात कमी प्रमाण (८.६ टक्के) असल्याचे दिसते.***

जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण २ मधील आंशिक व पूर्ण **अंधत्वा**वरील आकडेवारी एकत्रितपणे जोडपत्र ११.१६ मध्ये दर्शविली आहे. ही आकडेवारी २००२-०४ मधील प्रति लाख लोकसंख्येच्या प्रमाणातील अंधत्वाच्या प्राबल्य दर्शविते. विदर्भ प्रदेशातील वर्धा जिल्ह्यामध्ये आंशिक अंधत्वाचे अत्याधिक प्राबल्य असल्याचे दिसून आले होते. (हे कदाचित अशा छोट्या जिल्ह्यात असलेल्या दोन वैद्यकीय महाविद्यालयांनी मोठ्या प्रमाणात केलेल्या निदानामुळे असेल). उर्वरित महाराष्ट्रातील मुंबई उपनगर जिल्ह्यात आंशिक अंधत्वाचे अत्यंत कमी प्राबल्य असल्याचे दिसून आले होते. विदर्भ प्रदेशात अत्याधिक प्राबल्य व उर्वरित महाराष्ट्रात सर्वात कमी प्राबल्य असल्याचे दिसून आले होते. पूर्ण अंधत्वाचे प्राबल्य तीन जिल्ह्यांमध्ये खूपच जास्त होते. विदर्भातील गडचिरोली जिल्हा हा सर्वात अग्रेसर होता. त्यानंतर उर्वरित महाराष्ट्रातील अहमदनगर होता आणि तिसरा मराठवाड्यातील परभणी जिल्हा होता. प्रदेशवार आकृतिबंधात, पूर्ण अंधत्वाचे प्राबल्य सर्वाधिक विदर्भामध्ये, त्याखालोखाल मराठवाड्यामध्ये व सर्वात कमी उर्वरित महाराष्ट्र दर्शविले आहे. उर्वरित महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्याखेरीज, इतर सर्व जिल्ह्यांमध्ये पूर्ण अंधत्वाचे प्राबल्य खूप कमी आहे. अंधत्वाच्या दोन्ही प्रकारांची प्रदेशवार विभागणी सारखीच होती.

मृत्यूच्या कारणांमध्ये **रस्त्यावरील अपघात** हे एक महत्त्वाचे कारण दिसते. रस्त्यावरील अपघातांची आकडेवारी जसे अपघात, ठार झालेल्या व्यक्तींची संख्या व इजा झालेल्या व्यक्तींची संख्या याचे प्रति लाख लोकसंख्येशी प्रमाण जोडपत्र ११.१७ मध्ये दिले आहे (मोटार वाहन विभागाची आकडेवारी). मुंबईच्या विशिष्ट परिस्थितीस कारणीभूत असणाऱ्या घटकांवरून अपघातांची संख्या जास्त असल्याचे व अपघाती मृत्युंची संख्या कमी दिसून येते, कारण पोलिसांनी मोठ्या संख्येने केलेली अपघातांची नोंदणी आणि अद्ययावत सोयीसुविधांसह अधिक रुग्णालयांची उपलब्धता. गडचिरोली जिल्ह्यामध्ये अपघातांची संख्या कमी आढळून आली होती. मुंबई जिल्ह्यामध्ये मृत्युसंख्येचे प्रमाण अत्यंत कमी नोंदविलेले होते. उस्मानाबाद जिल्ह्यात अपघाती मृत्यू संख्या अत्यंत जास्त होती. धुळे जिल्ह्यामध्ये रोगांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. ***मराठवाडा प्रदेशात अपघातांची संख्या कमीत कमी नोंदविलेली आहे व उर्वरित महाराष्ट्रात सर्वोच्च नोंदविलेली आहे त्याबरोबरच विदर्भ विभागात मध्यम स्थिती आढळून आली आहे.***

११.२.४ जननक्षमता

सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टीम बुलेटिन च्या स्वरूपात भारताच्या महानिबंधकाद्वारे प्रकाशित केलेली २०११ वर्षातील अलिकडील आकडेवारी स्पष्टपणे असे दर्शविते की, राज्यातील ढोबळ **जन्म दरात** प्रति हजारी १६.६ अशी लक्षणीय घट झाली आहे. मृत्युच्या कारणांची सर्वेक्षणातून मिळालेली आकडेवारी व आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थाद्वारे प्राप्त झालेले अंदाज जोडपत्र ११.१८ मध्ये दिलेले आहेत. ग्रामीण भागातील मृत्युच्या कारणांच्या

सर्वेक्षणातून उपलब्ध जन्म दरात नंदुरबार हा जन्माचा अत्यंत उच्च दर असलेला बहि:स्थ जिल्हा आहे. त्या उलट, उर्वरित महाराष्ट्रातील दोन जिल्हे ढोबळ जन्मदर अत्यंत कमी असलेले बहि:स्थ आहेत.

ग्रामीण भागातील मृत्युच्या कारणाचे सर्वेक्षण यातून प्राप्त झालेला **एकूण जननक्षमता दर** याविषयीची माहिती जोडपत्र ११.१९ मध्ये दिली आहे. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात एकूण जननक्षमता दर सर्वात अधिक असल्याचे कळविण्यात आले होते. बुलढाणा जिल्ह्यानंतर उर्वरित महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा आणि मराठवाड्यातील जालना व हिंगोली जिल्हे यांचा क्रमांक लागतो. कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांचा एकूण जननक्षमता दर १.५ असून विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातही एकूण जननक्षमता दर अतिशय कमी आहे. मराठवाड्यातील असा कोणताही जिल्हा नाही जेथे एकूण जननक्षमता दर २ पेक्षा कमी आहे.

११.२.५ ग्रामीण–शहरी आरोग्य दर्शकांची तुलना

सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टिम, भारत सरकार, यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी क्षेत्रांकरिता आरोग्य दर्शके (२०११) प्रकाशित केली आहेत. ही दर्शके अनुक्रमे बाल मृत्यु दर ३० (ग्रामीण) व १७८ (शहरी), ढोबळ जन्मदर १७.३ (ग्रामीण) व १५.८ (शहरी), ढोबळ मृत्युदर ७.३ (ग्रामीण) व ५.१ (शहरी) अशी आहेत. अर्थातच ग्रामीण भागातील आरोग्याची स्थिती (आदिवासी क्षेत्रांसह) शहरी भागापेक्षा वाईट आहे. कमी उत्पन्न, सामाजिक व शैक्षणिक स्तर व आरोग्याची काळजी घेण्यासंबंधात येणाऱ्या अडचणी असे याचे स्पष्टीकरण देता येईल.

११.३ आरोग्य देखभाल यंत्रणा

'पायाभूत सोयीसुविधांशी' निगडित लोकसंख्या असा मापदंड राज्य शासनाने स्वीकारलेला आहे. आदिवासी क्षेत्रामधील ३,००० व बिगर आदिवासी क्षेत्रामधील ५,००० अशा लोकसंख्येला **उप–केंद्रे** पुरविली आहेत. २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्या विचारात घेऊन, आवश्यक असलेल्या उप–केंद्रांची संख्या जोडपत्र ११.२० मध्ये दिलेली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता लोकसंख्येचा मापदंड ग्रामीण भागाकरिता ३०,००० व आदिवासी भागाकरिता २०,००० आहे. २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्या विचारात घेऊन, आदिवासी व बिगर–आदिवासी क्षेत्राकरिता स्वतंत्ररित्या आवश्यक असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची माहिती जोडपत्र ११.२१ मध्ये दिली आहे. उपकेंद्राच्या वाटपाप्रमाणे, काही जिल्हे असे आहेत जेथे आदिवासी किंवा डावा जहाल मतवादग्रस्त असलेल्या जिल्ह्यांमधील विशेष योजनांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या लोकसंख्येच्या मापदंडापेक्षा अधिक आहे. ***उपकेंद्रांच्या व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बाबतीतील अधिकाधिक अनुशेष उर्वरित महाराष्ट्रात दिसून आला असून या विभागातील लोकसंख्येतील प्रचंड वाढीमुळे असा परिणाम झाला आहे.***

ग्रामीण रुग्णालयाच्या स्थापनेसाठीचे मापदंड हे प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या संख्येवर आधारित आहेत. ही प्राथमिक आरोग्य केंद्रे ग्रामीण रुग्णालयांकडे रुग्ण पाठवतात. सध्या, महाराष्ट्र राज्यात पाच प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता एक ग्रामीण रुग्णालय काम करीत आहे. तसेच, उप–जिल्हा रुग्णालयांच्या नावाने संदर्भ रुग्णालयाचा आणखी एक गट असून ज्याची ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवाढ केली आहे व त्यांची खाटांची (bed) संख्या ५० ते २०० आहे. उप–जिल्हा रुग्णालये ही अतिरिक्त संदर्भ रुग्णालये आहेत.

यावर्षीच महाराष्ट्र शासनाने **पायाभूत सोयीसुविधा बृहत योजना** संमत केली आहे. एकूण ८८१ नवीन उपकेंद्रे, २५४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४७ ग्रामीण रुग्णालये व ३ उपविभागीय रुग्णालये मंजूर करण्यात आली आहेत. २१०२ उपकेंद्रांमध्ये बहुउद्देशीय कार्यकर्त्यांची अतिरिक्त ३०५८ पदे व साह्यकारी प्रसाविकांची ३५७९ पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे, ८३४ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये १०७२ साह्यकारी प्रसाविका, २१० वैद्यकीय अधिकारी व ९१ प्रयोगशाळा तंत्रज्ञ अशी अतिरिक्त

पदे निर्माण करण्यात आली आहेत. विद्यमान ५३ ग्रामीण/उप-जिल्हा रुग्णालयातील खाटांची (bed) संख्या वाढविण्यात आली आहे. रुग्णालये स्थापन करण्यात आली असली तरी त्यांचे प्रत्यक्ष काम काही वर्षांनंतर सुरू होईल. विद्यमान डॉक्टरांच्या संख्येचे गुणोत्तर प्रमाण, परिचारिकांच्या संख्येचे गुणोत्तर व खाटांच्या (bed) संख्येचे गुणोत्तर यांमध्ये सारत: तात्काळ बदल होऊ शकणार नाही. परंतु, जेव्हा रुग्णालयाचे काम सुरू होईल तेव्हा त्यात वाढ होऊ शकेल.

शहरी भागामध्ये दोन दशकांहूनही अधिक कालावधी पूर्वी महाराष्ट्र शासनाने विविध प्रकारची आरोग्यविषयक पदे मंजूर केली होती. सध्या कार्यरत असलेली आरोग्यविषयक पदे जोडपत्र ११.२२ मध्ये दिलेली आहेत. बऱ्याचशा महानगरपालिकांमध्ये कुटुंब कल्याण केंद्रे, प्रसूति रुग्णालये इत्यादी आहेत. परंतु सर्वसाधारणपणे शहरी लोकसंख्येमधील आरोग्यसेवेमध्ये एकरूपता नाही व त्या अपुऱ्या आहेत.

अर्हताकारी डॉक्टरांची उपलब्धता (एम.बी.बी.एस व उच्च अर्हताप्राप्त), यात महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी मार्च २०१२ पर्यंत नोंदणीकृत झालेल्या खाजगी व शासकीय क्षेत्रातील सर्व डॉक्टरांचा समावेश होतो. मुंबईसह महाराष्ट्रातील डॉक्टरांची संख्या ही ७७,९८७ इतकी आहे व याचे गुणोत्तर लोकसंख्येच्या ६.६ / १०,००० इतके आहे. एकट्या मुंबईतून २३,६६६ डॉक्टरांची नोंदणी झाली, याचा अर्थ उपलब्धता ७.७० / १०,००० इतकी आहे. मुंबईच्या आकडेवारीचा समावेश करता उर्वरित महाराष्ट्रातील डॉक्टरांची संख्या ५७,७९४ किंवा ७.५५/१०,००० लोकसंख्या एवढ्याने त्यात वाढ होते. नागपूर व पुणे या जिल्ह्यांमधील भागात डॉक्टरांची बहि:स्थ संख्या जास्त आहे. ***उर्वरित महाराष्ट्रातील गुणोत्तर अत्यंत चांगले आहे व विदर्भ व मराठवाड्यात कमी परंतु बहुतांश समान आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांची पाहणी केली असता हे चित्र वेगळे दिसते, कारण यात खाजगी क्षेत्रातील डॉक्टरांचाही समावेश आहे व त्यांची उपलब्धता उर्वरित महाराष्ट्रात अधिक आहे.***

परिचारिका लोकसंख्या गुणोत्तर जोडपत्र ११.२३ मध्ये दिले आहे. सर्व परिचारिकांची अर्हता लक्षात न घेता व सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रात काम करतात त्यांचा महाराष्ट्र परिचारिका परिषदेत नोंदणीकृत असलेल्या सर्व परिचारिकांचा विचार करण्यात आलेला आहे. राज्यामध्ये प्रत्येक परिचारिकेमागे जवळपास दोन डॉक्टर असे प्रमाण आहे जे, इच्छित गुणोत्तराच्या बरोबर विरुद्ध आहे. या निदर्शकांत विदर्भ प्रदेश राज्यात अग्रेसर आहे. विदर्भातील तीन जिल्ह्यांत परिचारिकांचे प्रमाण खूपच जास्त आहे. ही वस्तुस्थिती उप-केंद्रांच्या संख्येशी संबंधित आहे, जी नागपूर विभागातील उप-केंद्रांच्या लोकसंख्या प्रमाणापेक्षा अधिक आहे. विशेषत: आदिवासी किंवा डावा जहाल मतवाद ग्रस्त (नक्षलग्रस्त) क्षेत्रांमधील विशेष वाटपामुळे आहे.

खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्र रुग्णालये लक्षात न घेता, सध्या उपलब्ध असलेल्या जिल्हानिहाय रुग्णालयातील **खाटा** (beds) जोडपत्र ११.२४ मध्ये दिल्या आहेत. अर्थशास्त्र व सांख्यिकी संचालनालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडून ही आकडेवारी प्राप्त झाली आहे. मुंबई मध्ये प्रति लाख लोकसंख्येच्या तुलनेत खाटांची (beds) संख्या अधिक आहे. ***प्रदेशांमध्ये मराठवाड्यात अत्यंत कमी व उर्वरित महाराष्ट्रात अत्यंत चांगले प्रमाण आहे.***

११.४ विरोधाभास

पायाभूत सोयीसुविधांवरील आकडेवारी (लोकसंख्येच्या प्रमाणाशी जोडलेली) मृत्युसंख्या किंवा रोगांचे प्रमाण या आरोग्य परिणामांशी जुळत नाही. विदर्भातील आरोग्य परिणाम अधिक वाईट आहेत तर उलटपक्षी उर्वरित महाराष्ट्रात उप-केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व परिचारिकांची संख्या अपुरी असल्याची वस्तुस्थिती आहे. **हा विरोधाभास** कमी उत्पन्न व विदर्भातील इतर विकासात्मक निदर्शक याद्वारे स्पष्ट करण्यात आला आहे. अशा प्रतिकूल परिणामाचा आरोग्यावर पूर्णपणे परिणाम होऊ नये म्हणून थोड्या अधिक सार्वजनिक आरोग्य सोयीसुविधा पुरवूनही तो पूर्णत: कमी झाला नाही. शिवाय, खाजगी क्षेत्र जे जवळपास ७५ टक्के वैद्यकीय सुविधा देते त्याचा शासनाच्या पायाभूत सोयीसुविधा किंवा सेवा या माहितीमध्ये समावेश करण्यात आलेला नाही. खाजगी क्षेत्राचा सहभाग हा डॉक्टर व रुग्णालयातील खाटांची संख्या यावरून दिसून येतो. त्याबाबतीत, उर्वरित महाराष्ट्रातील स्थिती चांगली आहे. हा विरोधाभास आरोग्याची स्थिती निर्धारित करण्यामध्ये सामाजिक-आर्थिक विकासाचे व खाजगी क्षेत्राने वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे महत्त्व अधोरेखित करतो.

११.५ सेवांचे उपयोजन

विभिन्न सेवांच्या उपयोजनाचा अभ्यास करण्याकरिता, चार जननक्षम व बाल आरोग्य निदर्शकांची निवड करण्यात आली होती, ज्यात स्त्रियांची संपूर्ण प्रसवपूर्व जपणूक, रुग्णालयातील प्रसूति, पूर्णपणे प्रतिक्षम केलेली अर्भके यांचा समावेश होता, आणि अगदी शेवटी आम्ही कुटुंब कल्याणाच्या पूर्ण न करता आलेल्या गरजांचा समावेश केला होता. शेवटच्या निदर्शकामध्ये विविध कारणांमुळे या सेवा निष्फळ ठरल्या आहेत का याची माहिती पुरविली आहे. त्यावरून असे दिसून येते की, कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवण्याची महिलांची इच्छा आहे, परंतु ते कोणत्याही कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करीत नाहीत. ही सर्व माहिती जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण ३ मधून संकलित केलेली आहे.

संपूर्ण प्रसवपूर्व तपासणीचा जिल्हानिहाय तपशील जोडपत्र ११.२५ मध्ये दिलेला आहे. ***मराठवाडा विभागात संपूर्ण प्रसवपूर्व तपासणी करून घेण्याचे महिलांचे प्रमाण किमान होते व उर्वरित महाराष्ट्रात हे प्रमाण कमाल होते.***

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व विशेषत: जननी सुरक्षा योजना सुरू केल्यानंतर, रुग्णालयातील प्रसूति **(इन्स्टीट्युशनल डिलीव्हरी)** मध्ये वाढ झाली. जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण-३ व आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणा या दोन भिन्न स्रोतांकडून मिळालेली आकडेवारी जोडपत्र ११.२६ मध्ये दिली आहे. तथापि, अशी सेवा आकडेवारी (आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणा) काहीही असली तरी, नंदुरबार, गडचिरोली यांसारख्या जिल्ह्यांमध्ये रुग्णालयातील प्रसूतिचे प्रमाण कमी आहे असा संशय आहे.

प्रतिक्षम केलेल्या मुलांची टक्केवारी जोडपत्र ११.२७ मध्ये दिली आहे. आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणेकडील सेवा आकडेवारी, यात दिलेली संख्या ही १०० टक्के अतिशयोक्तिपूर्वक आहे. जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षणामधील आकडेवारी नंदुरबार जिल्ह्यात प्रतिक्षमकरणाची व्याप्ती अत्यंत कमी दर्शविते. त्या खालोखाल मूळचा धुळे जिल्हा असून त्यातून नंदुरबार जिल्हा वेगळा केलेला आहे. गडचिरोली हा प्रतिक्षमकरणामधील सर्वात खाली म्हणजेच तिसऱ्या क्रमांकावरील जिल्हा आहे.

जिल्हास्तरीय कुटुंब सर्वेक्षण-३ कडून उपलब्ध झालेल्या **कुटुंब नियोजनाच्या पूर्ण न करता येणाऱ्या गरजा** जोडपत्र ११.२८ मध्ये दिल्या आहेत. मराठवाड्यात या गरजा अधिकतम असून त्याखालोखाल उर्वरित महाराष्ट्रात व विदर्भात किमान आहेत ज्या तीन प्रदेशांमधील एकूण जननक्षमता दरांशी सुसंगत आहेत.

११.६ आरोग्य परिणाम

११.६.१ परिणाम निदर्शक

या समितीने खालील पद्धतीमीमांसेने तयार केलेले निर्णय हे परिणामांवर आधारित प्रादेशिक असमतोल निर्धारित करण्यासाठी आहेत आणि ते पायाभूत सोयीसुविधा किंवा शासनाने पुरविलेल्या सेवांसारखी साधने यासाठी नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या किंवा रुग्णालय खाटा (beds) किंवा डॉक्टरांच्या संख्येचे गुणोत्तर किंवा मुलांचे प्रतिक्षमकरण इत्यादी सारख्या पायाभूत सोयीसुविधा किंवा सेवा निदर्शके आम्ही निवडले नाहीत. तरीसुध्दा इतर बाबतीत पायाभूत सोयीसुविधांची आकडेवारी प्रादेशिक परिणामांशी जुळत नाही. म्हणून, समितीने आरोग्याचा दर्जा निर्धारित करण्याकरिता निवडक परिणाम निदर्शके निवडली होती. निदर्शकांची निवड ही (अ) चांगल्या दर्जाच्या जिल्हानिहाय आकडेवारीची उपलब्धता आणि (ब) महत्त्वाच्या आरोग्यदर्जाचे स्वरूप मोजण्यासाठी निदर्शकांची क्षमता यावर आधारित होती. जिल्हा स्तरावरील मुख्य आधारसामग्रीच्या विश्वसनीयतेच्या अभावामुळे परिणामांमध्ये संसर्गजन्य नसलेल्या रोगांचा आम्ही समावेश केला नव्हता. निवडलेले चार परिणामनिदर्शक पुढीलप्रमाणे आहेत :

(एक) अर्भक मृत्युसंख्या प्रमाण;

(दोन) क्षयरोगाचे प्राबल्य;

(तीन) मुलांमधील कुपोषण (वयाप्रमाणे वजन) आणि

(चार) एकूण जननक्षमता दर

११.६.२ आरोग्य दर्जाची गुणसंख्या

समितीने नेमलेल्या अभ्यास गटाने या चार निदर्शकांवरून दुय्यम आकडेवारी गोळा केली (जोडपत्र ११.७, ११.१३, ११.१५ आणि ११.१९ मध्ये परिणाम पूर्वीच सादर केले आहेत व ते प्रत्येक जिल्ह्याच्या आरोग्य दर्जाच्या गुणसंख्येमध्ये रूपांतरित केले). गुणसंख्येच्या गणनेकरिता, जिल्हा हा एक घटक म्हणून विचारात घेण्यात आला. प्रत्येक निदर्शकाकरिता जास्तीत जास्त १०० गुण नेमून दिले होते. जिल्ह्यांमधील प्रत्येक निदर्शकाकरिता सर्वात चांगले गुणांकन म्हणजे १०० गुण दिलेले होते व उरलेल्या जिल्ह्यांकरिता त्यानुसार टक्केवारीमध्ये गुणांकन केले होते. याप्रकारे, संभाव्य एकूण गुण ४०० होते. सर्वसमावेशक गुणसंख्या जोडपत्र ११.२९ च्या स्तंभ ७ मध्ये दिलेली आहे.

११.६.३ प्रादेशिक आरोग्य दर्जातील तूट

तीन सर्वोच्च जिल्ह्यांची (रत्नागिरी, सांगली व रायगड) सरासरी गुणसंख्या, ३०२.७ ही संदर्भ गुणसंख्या म्हणून विचारात घेतली होती. संदर्भ गुणसंख्येप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याच्या एकूण गुणसंख्येतील अंतराची गणना करण्यात आली होती (जोडपत्र ११.२९ मधील स्तंभ ८). यामुळे तुटी संख्यात्मक अंदाज उपलब्ध होतो. तीन प्रदेशांतील मुख्य तूट यांची गुणसंख्या सुध्दा अंदाजित केली होती (तक्ता ११.१). तक्ता असे दर्शवितो की, विदर्भ प्रदेशात सर्वात जास्त तूट होती, त्याखालोखाल मराठवाड्यात होती. उर्वरित महाराष्ट्रात सर्वात कमी तूट होती. प्रमाणानुसार आरोग्यामधील प्रादेशिक तुटीबाबतचा संपूर्ण आढावा जोडपत्र ३.७ मध्येही ओझरता दिसून येतो.

तक्ता ११.१

प्रादेशिक आरोग्यविषयक तूट (मुंबई वगळून)

अ.क्र.	प्रदेश	तूट (उच्चतम ३ जिल्ह्यांच्या मुख्य आरोग्य गुणसंख्येतील अंतर ३०२.७)
१	२	३
१	विदर्भ	१२१.८
२	मराठवाडा	१०८.९
३	उर्वरित महाराष्ट्र	६९.३

स्रोत : आरोग्यविषयक अभ्यासगटाने पुरविलेले आहे.

११.६.४ जिल्ह्यांची वर्गवारी

तक्ता ११.२

वर्गवारी क्रमानुसार व ग्रामीण लोकसंख्येनुसार जिल्ह्यांची आरोग्य निष्कर्ष गुणसंख्या (मुंबई वगळून)

स्तर	अ.क्र.	जिल्हा	एकूण गुणसंख्या +	वर्गवारी	ग्रामीण लोकसंख्या	वाढीव ग्रामीण लोकसंख्या
१	२	३	४	५	६	७
एक	१	नंदुरबार*	१२९.९	३३	१३७२८२१	१३७२८२१
	२	गडचिरोली*	१५१.२	३२	९५४९०९	२३२७७३०
	३	बुलढाणा	१५२.५	३१	२०३७३९८	४३६५१२८
	४	अमरावती*	१५९.९	३०	१८५११५८	६२१६२८६
	५	गोंदिया*	१६५.२	२९	१०९६५७७	७३१२८६३
	६	चंद्रपूर*	१७८.९	२८	१४२८९२९	८७४१७९२
	७	धुळे*	१७९.४	२७	१४७९८२६	१०२२१६१८
	८	हिंगोली	१७९.५	२६	९९८६१२	११२२०२३०
दोन	९	ठाणे*	१८०.३	२५	२५४५४७०	१३७६५७००
	१०	वर्धा*	१८१.६	२४	८७७४७४	१४६४३१७४
	११	वाशिम	१८३.७	२३	९८५७४७	१५६२८९२१
	१२	परभणी	१८३.८	२२	१२६६२८०	१६८९५२०१
	१३	नाशिक*	१८९.१	२१	३५०९८१४	२०४०५०१५
	१४	जालना	१८९.९	२०	१५८१६१७	२१९८६६३२
	१५	औरंगाबाद	१९०.६	१९	२०८१११२	२४०६७७४४
	१६	बीड	१९४.१	१८	२०७०७५१	२६१३८४९५
	१७	उस्मानाबाद	१९६.०	१७	१३७६५१९	२७५१५०१४
तीन	१८	नांदेड	२००.१	१६	२४४७३९४	२९९६२४०८
	१९	भंडारा	२००.५	१५	९६६५०३	३०९२८९११
	२०	नागपूर*	२००.८	१४	१४७४८४४	३२४०३७५५
	२१	अकोला	२०२.२	१३	१०९४१६५	३३४९७९२०
	२२	यवतमाळ*	२१३.५	१२	२१७४१९५	३५६७२११५
	२३	लातूर	२१६.५	११	१८२९२१६	३७५०१३३१
चार	२४	जळगाव*	२२३.४	१०	२८८७२०६	४०३८८५३७
	२५	अहमदनगर	२२४.६	९	३६३०५४२	४४०१९०७९
	२६	सिंधुदुर्ग	२३३.०	८	७४२६४५	४४७६१७२४
	२७	पुणे	२३७.०	७	३६७८२२६	४८४३९९५०
	२८	सातारा	२४२.१	६	२४३३३६३	५०८७३३१३
	२९	सोलापूर	२५४.७	५	२९१८६६५	५३७९१९७८
	३०	कोल्हापूर	२६६.२	४	२६४५९९२	५६४३७९७०
	३१	रायगड*	२७३.१	३	१६६४००५	५८१०१९७५
	३२	सांगली	२९५.१	२	२१०२७८६	६०२०४७६१
	३३	रत्नागिरी	३३९.९	१	१३५१३४६	६१५५६१०७
					६१५५६१०७	६१५५६१०७

+ जोडपत्र ११.२९ (स्तंभ ७) यामधून

* जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त आहे(जोडपत्र ११.२, स्तंभ ३)

अशाप्रकारे अंदाजित केलेल्या एकूण आरोग्यदर्जा गुणसंख्येच्या आधारे (जोडपत्र ११.२९, स्तंभ ७) जिल्हयांची वर्गवारी केली होती. तक्ता ११.२, स्तंभ ५ मध्ये वर्गवारी क्रम दर्शविला आहे.

१. जिल्हयांची स्थूलमानाने ४ स्तरांमध्ये वर्गीकरण करता येऊ शकेल.

२. ३३ जिल्हयांपैकी ८ जिल्हे एकूण आरोग्य गुणसंख्येसह १८० (स्तर एक) खाली वाईट स्थितीत आहेत. ते जिल्हे म्हणजे नंदुरबार, गडचिरोली, बुलढाणा, अमरावती, गोंदिया, चंद्रपूर, धुळे व हिंगोली हे आहेत. यांपैकी सहा जिल्हे जास्त आदिवासी लोकसंख्या असलेले आहेत ही आश्चर्यकारक बाब नाही. (त्यामुळे निष्कर्षावर आधारित असलेल्या गुणसंख्येच्या भरभक्कमपणास पुष्टी मिळते.)

३. तळाच्या (१७) जिल्हयांमध्ये (स्तर एक व दोन) मोठया प्रमाणात विदर्भ व मराठवाडयातील जिल्हयांचा समावेश होतो. परंतु, उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील नंदुरबार, धुळे, ठाणे व नाशिक जिल्हयांचा (जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या) दर्जा तळाच्या (१७) जिल्हयांमध्ये आहे, हे फारस आश्चर्यकारक नाही. सहा जिल्हयांनी स्तर-तीन प्राप्त केला आहे. ते सर्व जिल्हे विदर्भ व मराठवाडयातील आहेत. उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील उरलेल्या १० जिल्हयांनी, वर्गवारीक्रमात वरचा दर्जा (स्तर चार) प्राप्त केला आहे. ***विदर्भ व मराठवाडयातील सर्व जिल्हे, निम्न तेवीस (२३) जिल्हयांच्या (स्तर एक,दोन व तीन) जवळपास आहेत तर उर्वरित महाराष्ट्रातील १४ पैकी १० जिल्हे स्तर चार मध्ये आहेत. आरोग्याच्या दर्जातील प्रादेशिक असमतोल स्पष्ट आहे.***

४. १० टक्क्यांपेक्षा अधिक आदिवासी लोकसंख्या असलेले जिल्हे, तक्ता ११.२ च्या स्तंभ ३ मध्ये तारांकित चिन्हाने (*) चिन्हांकित केलेले आहेत. चार स्तरांमधील अशा जिल्हयांचे प्रमाण, पुढीलप्रमाणे आहे: स्तर एक ६/८, स्तर दोन ३/९, स्तर तीन २/६, स्तर चार २/१०. याप्रकारे, तळाच्या १७ जिल्हयांपैकी ९ जिल्हयांमध्ये, उर्ध्व (वरच्या) अर्ध्या जिल्हयांमधील ४/१६ च्या तुलनेत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण (१० टक्के) मोठे आहे. या अहवालातील आदिवासी प्रदेशांबाबतच्या प्रकरणामध्ये सादर केलेल्या आदिवासी लोकसंख्येच्या निकृष्ट आरोग्यस्थितीच्या पुराव्याशिवाय, या विश्लेषणामध्ये देखील त्यांची तळाच्या जिल्ह्यांपैकी अर्ध्या जिल्हयांमध्ये गर्दी झाल्याचे आपल्याला दिसून येऊ शकेल.

११.६.५ सारांश

१. आरोग्य स्थितीतील तुटीच्या उतरत्या क्रमातील विदर्भ (१२१.८), मराठवाडा (१०८.९) व उर्वरित महाराष्ट्र (६९.३) या तुटीच्या गुणसंख्येसह, तीन प्रदेशांच्या आरोग्यस्थितीत प्रादेशिक असमतोल आहे.

२. निम्न गुणसंख्या असलेले जिल्हे हे, बहुतांश, विदर्भ व मराठवाडयातील आहेत, परंतु त्यात आदिवासींची जास्त लोकसंख्या असलेले उर्वरित महाराष्ट्रातील चार जिल्हे देखील समाविष्ट आहेत.

३. आदिवासी लोकसंख्या हे निम्न आरोग्य गुणसंख्या असलेल्या जिल्हयांमधील सर्वसाधारण वैशिष्टय असून ते आदिवासी क्षेत्रांकडे विशेष लक्ष देण्याची गरज अधोरेखित करतात. या जिल्हयांना उच्च प्राधान्य मिळाले पाहिजे.

४. ग्रामीण लोकसंख्येची आरोग्यस्थिती, नागरी लोकसंख्येपेक्षा अत्यंत वाईट आहे. नागरी क्षेत्रांमध्ये अधिक रुग्णालये व डॉक्टर आहेत. म्हणून, हा असमतोल सुधारतेवेळी, ग्रामीण लोकसंख्येला प्राधान्य मिळावयास हवे.

५. आश्चर्यकारक बाब अशी आहे की, सार्वजनिक आरोग्याच्या पायाभूत सोयीसुविधातील तूट उर्वरित महाराष्ट्रात अधिक आहे परंतु, तेथील आरोग्याची स्थिती अधिक चांगली आहे. अर्थातच, इतर घटक-विशेषत: सामाजिक-आर्थिक विकास व खाजगी आरोग्य क्षेत्र, आरोग्यविषयक निष्कर्ष निर्धारित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

६. जेथे डॉक्टर व रुग्णालयीन खाटांची संख्या अधिक प्रमाणात आहेत अशा विशेषत:, उर्वरित महाराष्ट्रातील व शहरी भागांतील खाजगी क्षेत्र, आरोग्य सुविधा पुरविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

आरोग्यातील तफावती दूर करण्यात हस्तक्षेप करण्याकरिता जिल्हयांची, आरोग्य गुणसंख्येच्या दर्जाच्या आधारे, चार स्तरांमध्ये वर्गवारी करण्यात यावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

स्तर एक : सर्वात निम्न असलेला एक चतुर्थांश, आरोग्य गुणसंख्या १८० पेक्षा कमी असलेले आठ जिल्हे.

स्तर दोन : निम्न अर्धे, आरोग्य गुणसंख्या२०० पेक्षा कमी असलेले सतरा जिल्हे.

स्तर तीन : २३ जिल्हे, २२० इतक्या गुणसंख्येखालील

स्तर चार : सर्व ३३ जिल्हे

या स्तरांवरील ग्रामीण लोकसंख्या (आदिवासींसह) तक्ता ११.३ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता ११.३
चार स्तर व ग्रामीण लोकसंख्या

स्तर	वर्णन	ग्रामीण लोकसंख्या
१	२	३
एक	१८० इतक्या आरोग्य गुणसंख्येच्या खालील आठ जिल्हे	११२२०२३०
दोन	२०० इतक्या आरोग्य गुणसंख्येच्या खालील सतरा जिल्हे	२७५१५०१४
तीन	२२० इतक्या आरोग्य गुणसंख्येच्या खालील तेवीस जिल्हे	३७५०१३३१
चार	सर्व ३३ जिल्हे	६१५५६१०७

स्रोत : आरोग्यविषयक अभ्यास गटाने पुरविलेली माहिती.

११.७ आरोग्यविषयक तफावती दूर करण्यासाठी धोरणे

आरोग्य हे, लोकसंख्येच्या सामाजिक-आर्थिक स्थितीवर मोठया प्रमाणावर अवलंबून आहे. म्हणून, शिक्षणातील किंवा दरडोई उत्पन्नातील वाढ यांसारख्या अन्य क्षेत्रांतील विकास, काही प्रमाणात, आरोग्य स्थितीत सुधारणा करण्यासाठी हातभार लावतो. कोणत्याही एकाच तांत्रिक हस्तक्षेपाद्वारे (लसीकरण किंवा रुग्णालयातील प्रसूती किंवा कर्करोग तपासणी यांसारखे) बहुआयामी असलेल्या संपूर्ण आरोग्याच्या स्थितीत सुधारणा करता येणार नाही. म्हणून, आरोग्यविषयक सुविधा सामुहिक कार्यक्रम पॅकेज प्रत्यक्षात व्यापक करण्याची गरज आहे.

मागील १० वर्षांमध्ये, अनेक जागतिक तसेच राष्ट्रीय तज्ञ गटांनी व अहवालांनी असे निष्कर्ष काढले आहेत की :

१. आर्थिक विकास हा, मानवी विकासावर अवलंबून आहे; व मानवी विकासासाठी आरोग्यदायी लोकसंख्येची गरज आहे.

२. आरोग्य सुविधा मिळण्यातील अभाव हा, अधिक चांगले आरोग्य मिळवण्यातील मुख्य अडथळा आहे.

३. केवळ खाजगी क्षेत्र किंवा बाजार-आधारित आरोग्यविषयक देखभाल यांमुळे आरोग्य सुविधांचे अत्यंत विषमन्यायी वितरण व प्रचंड खर्च यात वाढ होते. अशाप्रकारे, अमेरिकेतील वैद्यकीय सुविधा हया, बहुतांश केवळ खाजगी असून, त्यांचा खर्च प्रतिवर्षी दरडोई ६००० डॉलर इतका आहे आणि असे असूनही तो गरजवंतांच्या आवाक्याबाहेर आहे. (म्हणून, ज्यामध्ये राज्य अर्थसहाय्यित किंवा आधारभूत आरोग्य सुविधा आहेत अशा 'ओबामाकेअर' योजना ही दुर्बल घटकांसाठी आहे).

४. मागील २० वर्षांमधील, भारतातील सार्वजनिक आरोग्य सुविधांचा हिस्सा, कमी झाला आहे. तो अपुरा आहे. एकूण आरोग्य सुविधांवरील एकूण खर्चापैकी, एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या जवळपास ५ टक्के इतका असून सार्वजनिक

(सरकारी) आरोग्य खर्च, एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या केवळ १.२ टक्के इतका आहे. बहुतांश विकसित देशांमध्ये, आरोग्य सुविधांवरील खर्च (एकतर सार्वजनिक किंवा सामाजिक आरोग्य व विमा) हा, एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे ८.१२ टक्के इतका आहे. चीन व थायलंड यांसारख्या मध्यम स्तरांवरील देशांमध्ये आरोग्यावरील सार्वजनिक (सरकारी) खर्च एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या २.३ ते ३.३ टक्के इतका आहे. (सार्वत्रिक आरोग्य सुरक्षेबाबतचा उच्च स्तरीय तज्ञ गट, नियोजन आयोग, भारत सरकार, २००१)

५. भारतातील लोक, खाजगी क्षेत्राकडून खरेदी केलेल्या आरोग्य सुविधांवर मोठया प्रमाणावर अवलंबून आहेत, परिणामी, नियोजन आयोगाच्या (१२ वी पंचवार्षिक योजना दस्तऐवज) मते बाहयरुग्ण वैद्यकीय सुविधांपैकी जवळपास ७५ टक्के व आंतररुग्ण सुविधांपैकी ५० टक्के सुविधेसाठी आजारी लोकांकडून रक्कम प्रदान केली जाते. या 'आवाक्याबाहेरील' खर्चाच्या प्रदानामुळे आरोग्य सुविधा मिळण्यामध्ये अडचण येते आणि दु:खद रीतीने दरवर्षी तीन ते चार कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातात.

६. राज्याने, प्रत्येक नागरिकास, विशेषत: दुर्बल नागरिकास, सार्वत्रिकपणे आरोग्य सुविधा मिळण्याची किंवा सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) मिळण्याची हमी दिली पाहिजे.

म्हणून, महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रातील प्रादेशिक तफावती दूर करण्याकरिता **त्रिसूत्री कार्यतंत्र (धोरण)** प्रस्तावित केले आहे :

(एक) आरोग्याच्या सामाजिक व आर्थिक निर्धारक बाबींमध्ये सुधारणा करणे : या अहवालातील अन्य प्रकरणांमध्ये सुचविलेल्या उपाययोजनांच्या मार्गाने, ते पूर्ण करण्यात येईल.

(दोन) टप्प्याटप्प्याने सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा योजना.

(तीन) टप्पा १ मध्ये सार्वजनिक आरोग्य सुविधा देणाऱ्या यंत्रणांचे बळकटीकरण करणे.

शेवटची दोन कार्यतंत्रे संपूरक आहेत. सार्वत्रिक आरोग्य सुरक्षेसाठी सार्वजनिक क्षेत्रातील एका बळकट आरोग्य सुविधा यंत्रणेची व तसेच त्याच्या सेवेसाठी कंत्राट देऊन खाजगी वैद्यकीय सुविधा क्षेत्राचा उपयोग देखील करून घेण्याची गरज आहे. म्हणून, या अहवालात आम्ही आरोग्याची कमतरता असलेल्या क्षेत्रात प्राधान्याने सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) लागू करण्याची शिफारस केली आहे. सार्वजनिक व खाजगी या दोन्ही क्षेत्रांचा उपयोग करून घेता येईल.

११.७.१ सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) :

जागतिक आरोग्य संघटनेने सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) स्वीकारण्याची जोरदार शिफारस केलेली आहे. वास्तविक अमेरिकेखेरीज जवळजवळ सर्व विकसित देशांनी त्यांच्या नागरिकांकरिता अंशत: किंवा संपूर्ण सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) स्वीकारली आहे. याशिवाय, मेक्सिको, ब्राझिल, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, थायलंड व चीन यांनी त्यांच्या देशांमध्ये सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) सुरू केली आहे.

भारताच्या नियोजन आयोगाने सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजने) वरील एक उच्चस्तरीय तज्ञ गटाची स्थापना केली आहे. या गटाने, व्यापक काम केल्यानंतर, नोव्हेंबर, २०११ मध्ये नियोजन आयोगाला त्याचा अहवाल व शिफारशी सादर केल्यात. १२ व्या पंचवार्षिक योजनेत ही संकल्पना समाविष्ट करण्यात आली व अशी शिफारस केली की, राज्यांनी सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजनेचे) जिल्हा पथदर्शक प्रस्तुत करावे. याप्रकारे, संपूर्ण अहवाल व शिफारशी संकेतस्थळावर (http://uhcforward.org/sites/uhcforward.org/files/India-report.pdf) दिसत असल्या तरी, भविष्यवेध (व्हिजन) व तीन रेखाकृती दर्शविणारे कार्यतंत्र, आरोग्य सुविधा कार्यशक्ती व अपेक्षित फलनिष्पती येथे उध्दृत केली आहे. आकृत्या ११.२,११.३ व ११.४ पहा.

११.७.२ दृष्टिवेध (व्हिजन):

सार्वत्रिक आरोग्य सुरक्षेच्या आमच्या दृष्टीवेधामध्ये (व्हिजनमध्ये) सार्वत्रिक आरोग्य आश्वासनाच्या विभिन्न परिणामांचा समावेश होतो: (अ) आरोग्य सुविधा, सुविधांच्या विविध स्तरांवर यास व्यापक प्रमाणात चालना देणाऱ्या, प्रतिबंधक, निवारक व पुनर्वसनकारी आरोग्य सेवा मिळण्याची खात्री करण्याचा समावेश होतो. (ब) आरोग्य सुरक्षा (योजना), यात लोकसंख्येच्या सर्व घटकांचा अंतर्भाव आहे. (क) आरोग्य संरक्षण, ते त्याच्या सामाजिक निर्धारक बाबींद्वारे आरोग्याचे प्रचालन व संरक्षण करते, आणि (ड) हया सेवा परवडण्याजोग्या किंमतीत मिळवून द्याव्यात. म्हणजे, चांगल्या आरोग्याच्या प्रयत्नांत लोकांना आर्थिक अडचण सहन करावी लागणार नाही.

भारतामध्ये सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) पध्दती सुरू करण्याच्या आमच्या शिफारशींच्या मांडणीत पुढील दहा तत्त्वांनी मार्गदर्शन मिळेल. (एक) सार्वत्रिकता; (दोन) समानता; (तीन) वगळणूक-रहित व भेदभाव-रहित; (चार) सयुक्तिक व चांगल्या दर्जाच्या सर्वसमावेशक सुविधा; (पाच) वित्तीय संरक्षण; (सहा) रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण जे सुविधांच्या उचिततेची, रुग्णांच्या पसंतीची सुविधांच्या सुटसुटीतपणाची व सातत्याची हमी देतात; (सात) एकत्रीकृत व बळकट सार्वजनिक आरोग्य तरतुदी ; (आठ) उत्तरदायित्व व पारदर्शकता; (नऊ) सामाजिक सहभाग; आणि (दहा) आरोग्य सेवा लोकांच्या आवाक्यात ठेवणे.

आम्ही असे प्रस्तावित करतो की, प्रत्येक नागरिक आवश्यक प्राथमिक, द्वितीय व तृतीय आरोग्य सुविधा सेवा मिळण्यास हक्कदार असला पाहिजे. त्याबाबत शासनाकडून हमी दिली जाईल. राष्ट्रीय आरोग्य योजना (एन एच पी) म्हणून देऊ केलेल्या अत्यावश्यक आरोग्य सुविधांच्या कक्षेत आरोग्याशी संबंधित मृत्यु व विकलांगता कमी करण्याकरिता सर्व सामान्य शर्ती व उच्च-प्रभावी, खर्चाच्या दृष्टीने-परिणामक्षम आरोग्य सुविधाविषयक बाबींचा समावेश असेल. तज्ञांच्या एका पॅनलने, देशातील साधनसंपत्तीची उपलब्धता व आरोग्यविषयक सुविधांच्या गरजा लक्षात घेऊन, सेवांच्या सामूहिक योजना निर्धारित केल्या पाहिजे.

बहुविध गरजांकरिता आरोग्य सुविधांचे 'आश्वासन' देऊन 'विम्याच्याही' पलीकडे सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा जाते आणि आरोग्य सुविधांपलीकडील आरोग्याचा समावेश करते. केवळ आजारपणातच त्याचा उपयोग होईल असे नाही तर नंतरही ते उपयुक्त ठरेल. सार्वत्रिक आरोग्य सुरक्षेत आरोग्याची सर्व बाजुंनी काळजी घेतली जाईल आणि जे आरोग्य विम्याच्या नेहमीच्या यंत्रणेद्वारे दुर्लक्षित, उपेक्षित किंवा नजरअंदाजित केलेल्या आहेत अशा प्रतिबंधक व प्राथमिक आरोग्य सुविधांवर विशेष भर दिला पाहिजे, असे आश्वासन शासनाने द्यावयाचे असून त्याने सार्वत्रिक आरोग्य सुरक्षेचा हमीदार म्हणून काम करावयाचे आहे आणि सर्व सामाजिक साधनसंपत्ती व प्रगत बहुक्षेत्रीय कृती सुसज्ज करून त्याद्वारे सार्वत्रिक आरोग्य सुरक्षेच्या यशाची व सातत्याने सुरू राहण्याची खात्री करावी. या चौकटीत, सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) आरोग्याच्या हक्काशी दृढपणे जोडते आणि या उत्कट ध्येयाचे हक्कदारी तरतुदींमध्ये रूपांतरण करते.

सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजनेचा) दृष्टिवेध घेण्यासाठी आरोग्य वित्तव्यवस्थेची कर आधारित यंत्रणा अत्यावश्यक आहे. हा एक जागतिक अनुभव देखील असून ज्या देशांनी सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) सुरू केली आहे असे देश जी अपूर्ण सुरक्षा व निर्बंधित सेवा देते अशा अंशदायी विम्याच्या अस्थिर प्रवाहावर अवलंबून राहण्यापेक्षा बहुतांशी, सर्वसाधारण महसुलावर अवलंबून आहेत. सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) भारतामध्ये यशस्वी होण्यासाठी, केंद्र तसेच राज्य शासनाची राजकीय व आर्थिक बांधीलकी आवश्यक आहे.

११.७.३ सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजनेच्या) दृष्टीवेधाच्या (व्हिजन) परिपूर्तीसाठी आरोग्य यंत्रणेची क्षमता वाढविण्याकरिता **सहा समीक्षणात्मक क्षेत्रे** अत्यावश्यक आहेत. खाली सूचीबध्द केलेली ही क्षेत्रे, सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजनेच्या) कोणत्याही नियोजनाच्या केंद्रस्थानी असावीत.

१. आरोग्य वित्तव्यवस्था व वित्तीय संरक्षण

२. आरोग्य सेवा प्रमाणके व पायाभूत सोयी सुविधा

३. आरोग्याकरिता मनुष्यबळ

४. समाजाचा सहभाग व नागरिकांचे सहकार्य

५. औषधे, लसी व तंत्रज्ञान मिळणे, आणि

६. व्यवस्थापन व संस्थात्मक सुधारणा

११.७.४ कार्यतंत्रे (धोरण)

सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) याखाली समाविष्ट असलेल्या सर्व नागरिकांसाठी आरोग्यविषयक सुविधा सार्वजनिक क्षेत्राद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील आणि खाजगी सुविधा प्राप्त करण्यात येतील. (अशासकीय संघटना व सेवाभावी संस्थांसह) (आकृती ११.२ पहा).

आकृती ११.२
धोरण



११.७.५ मनुष्यबळ

सामाजिक आरोग्य कार्यकर्त्यांची, साह्यकारी प्रसाविका (ए एन एम), परिचारिका, डॉक्टर, तंत्रज्ञ, व्यवस्थापकीय कर्मचारी यांची मोठी संख्येने आवश्यकता असेल. (आकृती ११.३) सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजने) करिता आवश्यक असलेले मनुष्यबळ तयार करण्याकरिता उच्चस्तरीय तज्ञ गटाने (एच एल ई जी) सुचविलेल्या पध्दतीचा व कार्यतंत्राचा राज्याने विचार केला पाहिजे.

प्रत्येक जिल्हयात, पुढील गोष्टींची तरतूद केली पाहिजे. (१) प्रत्येकी दोन गटांकरिता एक याप्रमाणे किमान पाच किंवा अधिक सामाजिक आरोग्य कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्रे (२) जिल्हा ज्ञान केंद्र (जिल्हा रुग्णालयास जोडलेले) ज्यामध्ये एक दशलक्षपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या जिल्हयांमध्ये वैद्यकीय व परिचारिका महाविद्यालयाचा समावेश असला पाहिजे, आणि (३) महाराष्ट्राने, जिल्हा सर्वोपचार रुग्णालयांमध्ये १२ वी विज्ञानानंतर साडेतीन वर्षांची विज्ञान पदवी (बी.एस.सी.) सामाजिक आरोग्य पाठयक्रम सुरू करावेत. या कार्यतंत्राचा (धोरण) स्थानिक उमेदवारांना

फायदा होईल आणि दीर्घ कालावधीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता कमी होईल.

आकृती ११.३
सार्वत्रिक आरोग्य सुविधांचा पिरामिड (राष्ट्रीय)



११.७.६ इतर पैलू :

- आरोग्य सुविधा सामूहिक योजनेचे घटक.
- सामाजिक स्तरावरील सक्षमीकरण व सहभाग
- औषधे, लसी व तंत्रज्ञान
- व्यवस्थापन संरचना
- वित्तीय व्यवस्था

वरील बाबींची येथे सविस्तर मांडणी केलेली नाही कारण उच्चस्तरीय तज्ञ गटाने (एच एल ई जी) त्याचे योग्य वर्णन केलेले आहे, आणि राज्याने त्याचा स्वीकार करावा.

त्याचप्रमाणे, **आदिवासी क्षेत्रांतील आरोग्य सुविधांकरिता** विशेष शिफारशी, या अहवालातील आदिवासी प्रदेश यावरील प्रकरणामध्ये देण्यात आलेल्या आहेत.

आकृती ११.४
अपेक्षित परिणाम



११.७.७ टप्पा–एक मधील सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेचे बळकटीकरण करणे

उच्चस्तरीय तज्ञ गटाच्या अहवालामध्ये, सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेबाबतची सविस्तर प्रमाणके व शिफारशी दिलेल्या आहेत. जेव्हा त्यांची अंमलबजावणी केली जाते तेव्हा, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, औषधे, दर्जा व वित्तव्यवस्था यांसारख्या सर्व बाबींचा पुरेशा प्रमाणात समावेश करण्यात येईल. परंतु ज्यावेळी असे केले जाते त्यावेळी, विद्यमान लोकसंख्येच्या प्रमाणकांनुसार सार्वजनिक आरोग्य सुविधा संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी पुढील उपाययोजना हाती घेण्यात याव्यात.

कार्यान्वयन एकक :– विश्वसनीय आधारसामग्री सादर करण्यात आल्यानुसार, आरोग्य सुविधा यंत्रणांचे बळकटीकरण करण्याचे अत्यंत योग्य एकक हे जिल्हा असल्याचे दिसते. आरोग्य गुणसंख्येच्या आधारे, ज्यांच्याकडे तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे असे अत्यंत कमी आरोग्य गुणसंख्या असलेले आठ चिंताजनक परिस्थिती असलेले जिल्हे, म्हणजे नंदुरबार, गडचिरोली, बुलढाणा, अमरावती, गोंदिया, चंद्रपूर, धुळे व हिंगोली हे आहेत.

उप–केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामूहिक आरोग्य केंद्रे व उप–जिल्हा व जिल्हा रुग्णालयांसारख्या सार्वजनिक आरोग्य संस्थांची स्थापना करण्याचे निकष :– शासनाने, बृहत योजनेखाली अलिकडेच नवीन संस्था मंजूर केल्या आहेत. तत्त्वत:, लोकसंख्या नि अंतर यांच्या प्रमाणकाला दिलेली मान्यता शासनाकडून स्वीकारण्यात यावी आणि पहिल्या आठ जिल्हयांमध्ये व त्यानंतर उर्वरित १५ जिल्हयांमध्ये अंमलबजावणी करण्यात यावी, अशाप्रकारे, तळाच्या २३ जिल्हयांचा समावेश केल्यानंतर शेवटी संपूर्ण राज्याचा समावेश करण्यात यावा.

क्रमवार किंवा प्राधान्यक्रमवार संस्था : केरळ सारख्या उत्कृष्ट आरोग्य सुविधा असणाऱ्या राज्यामधील एक प्रमुख फरक म्हणजे, एका उप–केंद्राद्वारे सेवा दिली जाणारी लोकसंख्या हा आहे. म्हणून, अशी शिफारस करण्यात येते की, या आठ जिल्हयांमध्ये पहिले प्राधान्य हे अंतर प्रमाणकांसह नवीन उप–केंद्रांना देण्यात यावे.

बृहत योजनेमध्ये, महाराष्ट्र शासनाने, ५०,१०० व २०० खाटांच्या (beds) काही ग्रामीण रूग्णालयांची श्रेणीवाढ करण्याचे यापूर्वीच ठरविले आहे. या कार्यतंत्राची अंमलबजावणी निश्चित केलेल्या आठ जिल्हयांमध्ये तातडीने करण्यात यावी.

जिल्हा सर्वोपचार रुग्णालयाची (नागरी रुग्णालय) सध्याची खाटांची (beds) किमान संख्या ही, २०० इतकी आहे. खाटांच्या लोकसंख्या गुणोत्तरापर्यंत पोहचण्याकरिता आणि भविष्यात सुरू होणाऱ्या व संलग्न होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयाची शक्यता पाहता, भारतीय वैद्यकीय परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार खाटांची संख्या ३०० (जेथे ती ३०० पेक्षा कमी असेल तेथे) इतकी वाढविण्यात यावी.

११.८ साधनसंपत्तीची आवश्यकता

भारतामध्ये सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) पुरविण्याकरिता, उच्च स्तरीय तज्ञ गटाच्या (एच एल ई जी) अंदाजानुसार (आणि तज्ञांची टिप्पणी, जोडपत्र ११.३० नुसार) एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ३ टक्के किंवा प्रतिवर्षी दरडोई रुपये २,००० इतकी रक्कम आवश्यक असेल. १२ व्या पंचवार्षिक योजनेअनुसार शासनाने, (राज्य व केंद्रीय अंशदान), २०१२-२०१७ मध्ये सार्वजनिक आरोग्य सुविधांकरिता प्रतिवर्षी एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे १.८७ टक्के इतका खर्च करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र शासनाने, (केंद्रीय अंशदानासह) २०१९-२० या वर्षापर्यंत प्रतिवर्षी दरडोई रुपये १,३५५ इतका खर्च करणे अपेक्षित आहे. अशाप्रकारे, २०१४ मध्ये जर सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) सुरू केली तर त्यावर्षी सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) पुरविण्याच्या एकूण अंदाजित रकमेच्या जवळजवळ ६० टक्क्यांपर्यंत निव्वळ अतिरिक्त रक्कम, म्हणजेच प्रतिवर्षी दरडोई रुपये १,२०० इतकी अतिरिक्त रक्कम आवश्यक असेल.

अशाप्रकारे, अशी शिफारस करण्यात येते की, सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) केवळ ग्रामीण (आदिवासींसह) लोकसंख्येकरिता चार टप्प्यांत सुरू करावी. पहिल्या टप्प्यात, १८० इतक्या आरोग्य गुणसंख्येच्या खालील आठ जिल्हयांचा समावेश करण्यात यावा. पुढच्या टप्प्यात, २०० इतक्या गुणसंख्येच्या खालील आणखी नऊ जिल्हयांमध्ये (एकूण १७) सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) लागू करण्यात यावी. तिसऱ्या टप्प्यात, २२० गुणसंख्येखालील २३ जिल्हयांमधील ग्रामीण लोकसंख्येचा समावेश करावा. अंतिमत: चौथ्या टप्प्यात सर्व ३३ जिल्हयांमधील ग्रामीण लोकसंख्येचा समावेश करण्यात यावा. सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजने) करिता टप्पानिहाय आवश्यक असलेला वार्षिक खर्च तक्ता ११.४ मध्ये दिलेला आहे.

तक्ता ११.४
टप्पानिहाय वार्षिक खर्च

टप्पा	समाविष्ट केलेले जिल्हे	ग्रामीण लोकसंख्या (२०११)	सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजनेकरिता) अतिरिक्त रक्कम (दरडोई)	वार्षिक रक्कम (रूपये कोटीत)
१	२	३	४	५
एक	१८० या गुणसंख्येखालील एकूण ८ जिल्हे	१,१२,२०,२३०	रूपये १,२००	१३४६
दोन	२०० या गुणसंख्येखालील एकूण १७ जिल्हे	२,७५,१५,०१४	रूपये १,२००	३३०१
तीन	२२० या गुणसंख्येखालील एकूण २३ जिल्हे	३,७५,०१,३३१	रूपये १,२००	४५००
चार	सर्व ३३ जिल्हे	६,१५,५६,१०७	रूपये १,२००	७३८६

स्रोत :आरोग्यावरील अभ्यासगटाने पुरविली

परिणामत:, महाराष्ट्रातील संपूर्ण ग्रामीण व शहरी लोकसंख्येचा सार्वत्रिक आरोग्य (योजने) मध्ये समावेश करण्यासाठी, रु.१३,२०० कोटी इतकी अतिरिक्त तरतूद (रु.१२०० X ११ कोटी लोकसंख्या) आवश्यक आहे. आम्हाला असे वाटते की, १४ व्या पंचवार्षिक योजनेच्या (२०२२) सुरूवातीला सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा योजनेची १०० टक्के अंमलबजावणी करण्यास शासन

सक्षम असेल आणि चालू किंमत व चालू लोकसंख्येनुसार एकूण आवश्यक निधी निश्चितपणे, त्यावेळी असलेल्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ३ टक्क्यांच्या आत असू शकेल, कारण त्यावेळी एकूण देशांतर्गत उत्पादन निश्चितपणे सारत: अधिक असेल, आणि तशीच करवसुलीदेखील असेल.

११.९ भविष्यातील दिशा

आम्ही केलेल्या शिफारशींकरिता अमंलबजावणी योजना तयार करण्यासाठी, शासनाने, सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा (योजना) सुरू करण्याकरिता तज्ञ गट स्थापन करावा. हा तज्ञ गट, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासह (एन आर एच एम) विद्यमान शासकीय योजनांचा, राज्य शासनाच्या (जीवनदायी योजना सारख्या) तसेच केंद्र सरकारच्या (राष्ट्रीय विमा सुरक्षा योजना) विद्यमान आरोग्य विमा योजना याचा आढावा घेईल, आणि रुग्णालयातील द्वितीय असो किंवा तृतीय दर्जाच्या सुविधा, विम्याद्वारे अर्थसहाय्यित कराव्यात किंवा कसे हे प्रस्तावित करावे. तथापि, वैद्यकीय विम्याचा खर्च उत्तरोत्तर वाढत असल्याने आणि त्यामुळे आरोग्याचे खूपच कमी प्रचालन होत असल्याने द्वितीय व तृतीय दर्जाच्या सुविधा पुरविण्याचा अधिमान्य (प्रचलित) मार्ग हा, उच्च स्तरीय तज्ञ गटाने शिफारस केलेला एक मार्ग आहे, म्हणजेच, सार्वजनिक आरोग्य सुविधा संस्थांचे बळकटीकरण करणे (तमिळनाडूसारखे) आणि तसेच खाजगी पुरवठादाराच्या सुविधा मिळविणे, परंतु शासनाने निर्माण केलेल्या अभिकरणाद्वारे (एजन्सी) पुरवठादारांना रक्कम प्रदान करणे. प्रति व्यक्ती या आधारे (म्हणजेच समाविष्ट केलेल्या लोकसंख्येच्या आधारे, आरोग्य सुविधा पुरवठादारांना रक्कम प्रदान करावी) किंवा पुरविलेल्या वैद्यकीय सुविधेनुसार हे करता येऊ शकेल. या मद्यावर डॉ.नचिकेत मोर यांनी तयार केलेली टिप्पणी, जोडपत्र ११.३० मध्ये आहे.

❖❖❖

प्रकरण १२

शिक्षण : शिक्षणाच्या हक्का पलिकडले

१२.० प्रस्तावना

मानवी क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने शिक्षण आवश्यक (संबद्ध) आहे. मानवी मूल्याच्या एकत्रीकरणात व त्यासंबंधात जागरूकता वाढण्यात, शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते, परिणामी मानवाचा सामाजिक जीवनातील सहभाग अधिकाधिक प्रमाणात वाढतो. विकसनशील प्रदेशांत चांगल्या दर्जाचे मनुष्यबळ असणे हा, आर्थिक वाढ आणि उच्चतम राहणीमान याबाबतीतील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. अशाप्रकारे, **मूलभूत शिक्षण हा विकासाचा एक भाग आहे आणि म्हणून, हक्क, कौशल्य आणि उच्चशिक्षण याबाबतचे कायदेशीर प्रदान हे विशेष करून ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत, उपजीविका आणि प्रगतीचे साधन ठरले आहे.**

शिक्षणाचा हक्क अधिनियमाची योग्य अंमलबजावणी करण्याबरोबरच प्राथमिक शिक्षणाच्या दर्जात समानता राखणे, आणि माध्यमिक शिक्षणाचे जागतिकीकरण या मोठया आव्हानांचा महाराष्ट्राला सामना करावा लागत आहे. शिक्षणाचा हक्क अधिनियमाचे मुख्य लक्ष देण्याजोगे मर्मस्थान म्हणजे शाळेबाहेर असणाऱ्या मुलांना शाळेत प्रविष्ट करणे हे आहे. शिक्षणाचा हक्क अधिनियमाच्या संदर्भात शिक्षणाच्या फलनिष्पत्तीचा दर्जा, स्तर व प्रगती याबाबत सुध्दा काटेकोरपणे लक्ष देण्याची गरज आहे. साक्षरतेचा दर, मुलांचा शाळेतील सहभाग, प्रशासन, सामूहिक सुसज्जता आणि लिंगभेद कमी करणे हे शैक्षणिक कामगिरीतील काही महत्त्वाचे पैलू आहेत.

प्रादेशिक असमतोल ही संकल्पना मर्यादित वित्तीय दृष्टिकोनातून समजावून घेता येणार नाही पण प्रदेशांमधील गरीब लोकांच्या मुक्तीचे ते एक प्रभावशाली साधन ठरत आहे. शिक्षणाचा हक्क अधिनियमाचे भौगोलिक विखुरलेपण लक्षात न घेता, विद्यार्थीवर्गासाठी आवश्यक मूलभूत गोष्टींच्या विशिष्ट स्तराबाबत खात्री करून दिलेली आहे. तथापि, हे नाकारता येणार नाही की, इतर सर्व प्रदेशांमधील विशेषकरून मागे पडलेल्या प्रदेशांमधील लोकांकडून मोठया शहरांना पसंती दिली जाते. संभवत: ही निवड करण्यामागचा आधार, (एक) दर्जेदार आवश्यक मूलभूत गोष्टी (दोन) उज्वल भविष्य (नोकरी/उपजीविकेच्या दृष्टीने) (तीन) स्पर्धात्मक वातावरणाची ओळख होणे आणि (चार) सर्वंकष व्यक्तिमत्व विकासासाठी मिळणाऱ्या संधी हा असू शकतो. शिक्षण हा प्रादेशिक असमतोलास जबाबदार असणारा मूळ आणि पायाभूत घटक आहे कारण उच्च शिक्षण घेण्यासाठी म्हणून स्थलांतरित झालेले तरूण शेवटी प्रगत प्रदेशामध्येच स्थायिक होतात. कारण तेथे त्यांना उच्च जीवनशैलीच्या सुविधा प्राप्त होतात.

या प्रकरणाची विशिष्ट उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

१) महाराष्ट्रातील जिल्हयामधील शैक्षणिक क्षेत्रातील प्रादेशिक असमतोल किंवा मागासलेपणाच्या स्तराच्या स्थितीची तपासणी करणे. ती तपासणी शालेय स्तरावरील शिक्षण प्राथमिक व माध्यमिक, व्यावसायिक शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण या स्तरावर केली जाईल.

२) प्रदेशांतर्गत स्तरासह समान प्रादेशिक विकासासाठी धोरणात्मक बदल करण्यासाठी यथोचित सूचना करणे.

३) शिक्षणात महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी तपासणी करणे आणि त्याबाबतचा प्रस्ताव तयार करणे.

या अहवालाच्या एका विशिष्ट दृष्टीकोनातून आणि या प्रकरणात काय आहे याचा अंदाज घेण्यासाठी, थोडक्यात आम्ही असे म्हणू इच्छितो की, प्राप्त परिस्थितीत एकीकडे साक्षरतेत म्हणावा तसा गुणात्मक फरक दिसून येत नाही आणि शिक्षणाचा हक्क अधिनियमांनुसार इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची काळजी घेतली जाईल आणि तसेच दुसरीकडे प्रागतिक

अभियांत्रिकी व व्यवस्थापन शिक्षण यांमधील अधिकाधिक जागा भरल्या जात असल्याचे दिसून येत आहे; सर्वसाधारणपणे त्यामुळे व्यवसायात आवश्यक स्तरापर्यंत पोहोचण्यास आपणास मदत होईल.पूर्वी नमूद केलेल्या शिक्षणाच्या केवळ दर्जावर लक्ष केंद्रित करण्याबरोबर, आठवी ते दहावी इयत्तेच्या सार्वत्रिक शिक्षणाखेरीज वैद्यकीय शिक्षण घेण्यासंबंधात परवडण्याजोग्या संधी उपलब्ध करून देणे, नाविन्यपूर्ण पध्दतीने व्यावसायिक कौशल्य निर्माण करणे आणि आदिवासी महिलांची (व इतर विशेष गटांची) प्रारंभिक साक्षरता व शिक्षण या मुद्यांवर काम करण्यासाठी एक अभियान पध्दत स्वीकारण्याची सुध्दा गरज आहे. अगदी सर्वसाधारण स्तरावरून नावीन्यता व ज्ञान यांच्या संबंधात चांगले गुणवत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या विद्यापीठांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असेल.

१२.१ संपूर्ण राज्यामधील शैक्षणिक कामगिरीचा आढावा :

शैक्षणिक क्षेत्रातील, प्रादेशिक असमतोलाचा स्तर किंवा महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयांतील मागासपणाचा स्तर निर्धारित करण्यासाठी, जो विश्वसनीय आहे अशा निर्देशांकाचा आणि जिल्हा स्तरावर यापूर्वीच उपलब्ध आहे अशा माहितीचा शोध घेणे गरजेचे आहे. निवडण्यात आलेल्या निर्देशांकासाठीची माहिती ही, धोरणाचा आढावा आणि मूल्यांकन यासाठी नियतकालिक तत्त्वावरसुध्दा उपलब्ध असायला हवी. निवडण्यात आलेल्या निर्देशांकाची "फलनिष्पती" किंवा "प्राप्ती" निर्देशांक विरुध्द "निविष्टी" निर्देशांक अशी वर्गवारी करण्यात यावी. फलनिष्पती ही केलेल्या विविध निविष्टींचा (गुंतवणुकींचा) परिणाम असतो आणि विविध धोरणे एकत्रितपणे राबविण्याच्या अंतिम परिणामांचे प्रतिनिधीत्व करते. म्हणून, शिक्षण क्षेत्रातील "प्रादेशिक असमतोल" आणि "मागासपणा" हा "फलनिष्पतीच्या" स्वरूपात मोजण्यात यावा. त्याचप्रमाणे "निविष्टी" निर्देशकांचे विश्लेषणावरून, फलनिष्पती निर्देशांकामध्ये सुधारणा करण्यासाठी पायाभूत सोयीसुविधांची आवश्यकता दर्शविली जाईल.

फलनिष्पती निर्देशक पुढीलप्रमाणे दाखवून देता येतील :-

१) शिक्षणाचा सर्वसाधारण स्तर (साक्षरता)

२) शालेय स्तरावरील शिक्षण- प्राथमिक आणि माध्यमिक

३) व्यावसायिक/कौशल्याधारित शिक्षण

४) उच्च शिक्षण

५) तंत्र शिक्षण

१२.१.१ शिक्षणाचा सर्वसाधारण स्तर (साक्षरता)

शिक्षणाचा व जागरूकतेचा सर्वसाधारण स्तर निश्चित करण्यासाठी निर्देशांक साक्षरता दर वापरण्यात आला आहे. साक्षरता दर हा, सर्वसाधारण सुनिश्चिती आणि कार्यबळाचा दर्जा विशेषकरून आपल्याला जर लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे फायदे पुन्हा मिळवावयाचे असतील तर त्यांचे निर्देशक आहेत. विशेषकरून, महिलांमधील साक्षरता दरामुळे किंवा त्याप्रदेशाच्या सामाजिक विकासाचा स्तर लक्षात येतो. साक्षरता दर हा जनगणना अहवालात उपलब्ध आहे. २०११ च्या जनगणनेची माहिती उपलब्ध असल्याने ७ वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकसंख्येचा निवडण्यात आलेला निर्देशक हा साक्षरता दर ७+ असा आहे. तसेच ७+ साक्षरता दर आणि १५ ते ५९ वर्ष वय असलेल्या लोकसंख्येच्या प्रौढ साक्षरता दरात किमान फरक असू शकेल. (पहा जोडपत्र १२.१)

२०११ च्या जनगणनेतील आताच्या माहितीवरून असे दिसून येते की, संपूर्ण राज्याचा विचार करता, साक्षरता दरात (७+) २००१ मधील ७६.९ टक्क्यांवरून २०११ मध्ये ८२.९ टक्के इतकी वाढ झाली आहे. २००१ मध्ये उच्च साक्षरता दर असल्याने मुंबई, मुंबई उपनगरे व नागपूर यासारख्या जिल्हयांनी आपली आघाडी राखली आहे आणि अनुक्रमे ८८.५%, ९०.९%, आणि ८९.५% इतक्या साक्षरता दरासह आघाडीवर आहेत. कमी साक्षरता दर असलेले

जिल्हे २०११ मध्येही कमी साक्षरता असणारे जिल्हे ठरले आहेत. नंदूरबार (६३%), गडचिरोली (७०.६%) येथील आदिवासी जिल्हे हे राज्यातील सर्व ३५ जिल्हयांपैकी सर्वात कमी साक्षरता दर असलेले जिल्हे आहेत. (पहा जोडपत्र १२.१)

ज्या जिल्हयांचा साक्षरता दर हा २००१ मध्ये "राज्याच्या सरासरीपेक्षा कमी" होता त्या जिल्हयांची कामगिरी ही आजही राज्य सरासरीपेक्षा कमीच आहे. राज्याच्या उत्तरेकडील जिल्हयाने आणि अहमदनगर जिल्हयाने गेल्या दोन जनगणना अहवालामधून प्रगतीचा निम्नस्तर दर्शविला आहे. अशा रीतीने, ***या भागातील नेमकी मागणी आणि वाढीव सुधारणा या केवळ स्थानिकरीत्या लक्षकेंद्रित (तालुका स्तरावरील आदिवासी लोक, महिला आणि अल्पसंख्याक यासारखे विशेष गट) मोहिमांवर भर देणाऱ्या सर्वसाधारण अभियान निधींच्या माध्यमातूनच यशस्वीपणे पूर्ण करता येतील, असे आमचे सुस्पष्ट मत आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीतून अतिरिक्त निधी देण्याची गरज भासणार नाही.***पुढील निष्कर्षांमधून आम्ही केलेली भाष्ये अधिक ठळकपणे दिसतात.

१२.१.१.१ महत्त्वाचे निष्कर्ष

१. २००१ आणि २०११ या कालावधीत साक्षरतेचा उच्च स्तर असणाऱ्या जिल्हयांनी त्यांची आघाडी कायम राखली आहे.

गेल्या दशकात या जिल्हयांतर्गत असलेली साक्षरता स्तरामधील दरी कमी झाल्याचे सुध्दा दिसून आले आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून शासनाने याबाबतीत सातत्याने लक्ष घालण्याकडे याचे श्रेय जाते.

२. काही भागात असलेला निरक्षरतेचा उच्च स्तर हा, अजूनही "शाळाबाहय" मुलांना परिणामकारकपणे शिक्षण व्यवस्थेत सामावून घेण्यात न आल्यामुळे आहे.

३. जरी साक्षरता दर हे उच्च असले तरी निरक्षरांची एकूण संख्यादेखील खूपच जास्त आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात हे अपेक्षित नाही. साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर आणि विद्यमान धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी या माध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे.

४. महिलांमधील निरक्षरता ही अधिक असून, त्यावर लक्ष केंद्रित करण्याची आणि खास करून नंदूरबारसारख्या भागामध्ये धडक मोहिम राबवून याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.

५. निरक्षर भागांमधील व्यावसायिक गटांमध्ये असणारे साक्षरता दर हे अधिक विचार करायला लावणारे आहेत. जर चांगली स्थिती असलेल्या जिल्हयामधील सुध्दा विद्यमान साक्षरता स्तरांपेक्षा साक्षरता दर सुधारायचा असेल तर निरक्षरता ही नेमकी कोठे आणि किंवा कोणत्या व्यावसायिक गटांमध्ये दिसून येते याची तपासणी करण्याची गरज आहे. स्थलांतरित नैमित्तिक कामगार, महिला आणि आदिवासी समूहांना त्यांच्यातील साक्षरता दर वाढविण्यासाठी सर्वोच्च प्राथमिकता दिली पाहिजे. खरे पाहता याकरिता, ***ज्ञात, नाविन्यपूर्ण, चाकोरीबाहय रीतीने धडक मोहीम राबविली पाहिजे.***

६. २०११ च्या जनगणनेत प्रत्येक जिल्हयाच्या तालुक्यांमधील साक्षरता दराची माहिती दिलेली आहे. यावरून लक्षात येणारी बाब म्हणजे साक्षरता दर निर्देशांकानुसार जिल्हा जरी प्रगत असला तरी त्यात याच निर्देशांकावर अनेक अप्रगत तालुके दिसून येतात. उदा.ठाणे जिल्हयाचा २०११ मधील एकूण साक्षरता दर हा ८६.२ टक्के असून, तलासरी तालुक्यात ५८.९ टक्के, विक्रमगढ ५७.८

टक्के, जव्हार ५८.६ टक्के आणि मोखाडा तालुक्यात ५८.४ टक्के इतका साक्षरता दर नोंदविला गेला आहे. या **जिल्हयांमधील** महिला साक्षरता दर हा ४६ ते ५१ टक्के इतका आहे. ***हे मुख्य आदिवासी जिल्हे आहेत. आणि त्यांच्याकरिता विशेष शिफारशींची आवश्यकता आहे.***(आदिवासी क्षेत्रे हे प्रकरण पहावे)

७. जनगणनेत, सात वर्षे व त्याहून अधिक वय असणाऱ्या व कोणतीही भाषा समजू शकणाऱ्या व त्या भाषेत वाचन व लेखन करू शकणाऱ्या व्यक्तीचा साक्षर म्हणून व्याख्या करण्यात आलेली आहे. यानुसार जी व्यक्ती फक्त वाचू शकते परंतु लिहू शकत नाही ती साक्षर नाही (www.censusindia.gov.in/२०११) या व्याख्येचा आवाका हा "कार्यात्मक साक्षरता" या अर्थापर्यंत विस्तारित करण्याची गरज आहे.

८. उर्वरित शेवटचा टप्पा आणि अडचणीचे क्षेत्र म्हणजे, **नागर समाजाच्या उपांगांच्या साधनाच्या माध्यमातून सक्षम करावयाचा अनौपचारिक दृष्टिकोन आणि विस्तार** हे होय. महानगरपालिका (आणि जिल्हा परिषद) शाळांच्या रचनेमध्ये बाळगलेला चिकित्सक दृष्टिकोन हा प्रत्यक्षात आलेला नाही आणि अशा स्थितीत तो ही खालावत आहे म्हणून येथे एक व्यापक दृष्टिकोन अनुसरण्याची आवश्यकता आहे. खाजगी शाळांची यंत्रणा ही संपूर्ण संभाव्य लाभार्थ्यांना सामावून घेण्याइतकी पुरेशी मोठी नाही, आणि ती सर्वांना परवडणारीही नाही. **या प्रश्नाकडे उदरनिर्वाहाचा प्रश्न म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. अशातऱ्हेने बालकांची काळजी घेणारी यंत्रणा ही शिक्षणाशी सांगड घालणारी असावी. यासाठी चाकोरीपेक्षा वेगळा दृष्टीकोन बाळगायला हवा. आणि अंतर्भूत ज्ञान व कौशल्ये प्रदान करण्याच्या दृष्टीने सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वांचा वापर करण्यासाठी तळागाळातील स्वयंसेवी संस्थांना मान्यता देऊन सक्षम केले पाहिजे.** केवळ या एकाच गोष्टीमुळे मुलांना समजतील असे वाक्प्रचार व चित्र यांचा अध्ययनात वापर केल्याने मुलांना समाधान मिळेल.

अशाप्रकारे, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे महिला आणि इतर दुर्बल गट याखेरीज साक्षरतेचा संबंध हा दैनंदिन कामकाज प्रभावीपणे करण्याशी असावा. महिला व दुर्बल घटकांना मात्र चाकोरीबाहय ठोस उपायांची आवश्यकता आहे.

१२.१.२. शालेय स्तरावरील शिक्षण– प्राथमिक व माध्यमिक

शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडून शाळांमधील पटनोंदणीची आकडेवारी उपलब्ध झाली आहे. संबंधित वयोगटातील लोकसंख्येच्या प्रमाणात असलेल्या पटनोंदणीवरून शाळेत जाणाऱ्या आणि गार्भितार्थाने त्या विवक्षित वयोगटातील "शाळेत न जाणाऱ्या आणि प्रवेश न घेतलेल्या" मुलांची संख्या सूचित होते. संबंधित वयोगटातील लोकसंख्या ही जनगणनेच्या आकडेवारीवरून घेतलेली आहे.

संबंधित म्हणजेच ५ ते १० वर्षे वयोगटातील वयाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवीमधील पटनोंदणीची २००१ मधील आकडेवारी ही राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये असणाऱ्या मुलांची संख्या दर्शविते आणि त्यावरून शाळांमध्ये पटनोंदणी न होण्याचे अनुमान काढता येते. प्राथमिक स्तरावरसुध्दा पटनोंदणी न होण्याचे प्रमाण हे, बऱ्याच जिल्हयांमध्ये खूप अधिक आहे. २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी उपलब्ध नाही आणि अलिकडेच उपलब्ध झालेली आकडेवारी विश्वसनीय नाही त्यामुळे ती विश्लेषणासाठी विचारात घेतलेली नाही.

इयत्ता आठवी ते दहावीमधील पटनोंदणी न झालेल्या १३ ते १५ वर्षे वयोगटातील लोकसंख्येच्या प्रमाणातील संख्या ही सर्व जिल्हयांमध्ये वाढलेली आहे.

कदाचित अधिक चांगले परिणाम दर्शविणारा दर्शक हा औपचारिक शिक्षणपध्दतीच्या यशाचे प्रतिनिधित्व करणारा गळतीचा दरही असू शकतो. (जोडपत्र १२.२) हा दर्शक, पटनोंदणीच्या आकडेवारीवर आधारित असल्याने त्यातून चुकीचे निष्कर्ष मिळू शकतात. उदा., रत्नागिरी, पुणे, वाशिम, अमरावती आणि वर्धा येथे इयत्ता पहिलीपेक्षा इयत्ता पाचवीमध्ये पटनोंदणीचे प्रमाण हे अधिक आहे. तथापि, आकडेवारी मात्र, अनेक जिल्हयांमध्ये प्राथमिक स्तरावरील पहिली ते पाचवी गळतीचे प्रमाण हे २५ टक्क्यांहून अधिक असल्याचे दर्शविते. हे जिल्हे दरडोई उत्पन्नासारख्या आर्थिक निकषांवर, सर्वसाधारणपणे मागास जिल्हे म्हणून समजले जाणारे जिल्हे आहेत.पहिली ते सातवी इयत्तांमधील गळतीच्या प्रमाणात सर्व जिल्हयांमध्ये वाढ झाली आहे. (जोडपत्र-१२.२) ज्यांनी इयत्ता पाचवी यामधील नाव नोंदणीचे प्रमाण अधिक दर्शविले आहे अशा जिल्हयांनीदेखील इयत्ता सातवी यामधील नाव नोंदणीचे प्रमाण अधिक दर्शविलेले नाही.

२०१० मध्ये, नंदूरबार, धुळे व मराठवाडयाच्या बऱ्याचशा जिल्हयांमध्ये शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ही, सुमारे ५० एवढी असून, इयत्ता दहावी यामधील गळतीच्या प्रमाणात आणखी वाढ झाली आहे. जोडपत्र १२.३ मधील स्तंभ ६ मध्ये अशा विद्यार्थ्यांची टक्केवारी दर्शविलेली आहे की, ज्यांनी दहा वर्षांपूर्वी म्हणजे २००१ मध्ये, इयत्ता पहिलीमध्ये नावनोंदणी केली होती त्या विद्यार्थ्यांनी मार्च, २०११ मध्ये माध्यमिक शाळा प्रमाणपत्राची सरकारी परीक्षा दिलेली नाही. याचा अर्थ असा आहे की, महाराष्ट्रातील कित्येक जिल्हयांमधील ३५ ते ५० टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणातील विद्यार्थी हे, शालेय शिक्षण पूर्ण करीत नाहीत. अधिक महत्त्वाचे हे आहे की, या जिल्हयांपैकी बहुतेक जिल्हे हे, जेव्हा विविध आर्थिक निर्देशांकावर त्यांचे मोजमाप करण्यात आले तेव्हा ते मागास जिल्हे म्हणून सामान्यपणे विचारात घेण्यात आले आहेत.

शाळेत उपस्थित न राहण्याची कारणे राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्था (एनएसएसओ) यांच्याकडून देण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र राज्यात २००७-०८ मध्ये घेण्यात आलेल्या ६४ व्या फेरीनुसार, शाळेत उपस्थित न राहण्याच्या कारणांवरील माहिती (पहा तक्ता १२.१) पुढे दिली आहे.

ही निष्पती अपेक्षित असलेल्या बाबींच्या धर्तीनुसारच हे परिणाम आहेत व त्यामध्ये आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही.

तक्ता १२.१
शाळेत उपस्थित न राहण्याची कारणे (२००७-०८)

अ.क्र.		शाळेत उपस्थित न राहण्याची कारणे	टक्केवारी	टक्केवारी
१		२	३	४
१		**शिक्षणाबाबतच्या दृष्टीकोन**		६८.६
	अ	अभ्यासामध्ये आस्था नसलेले आईवडिल	३६.५	
	ब	शिक्षण आवश्यक नसल्याचे समजणारे	२८.९	
	क	समाजामध्ये परंपरा नाही	३.२	
२		**आर्थिक कारणे**		१५.८
	अ	आर्थिक अडचणी	९.१	
	ब	इतर घरगुती कामे करणे	३.२	
	क	मजुरी/वेतनासाठी कामे करणे	०.२	
	ड	लहान भावंडांचा सांभाळ करणे	०.७	
	इ	अन्य आर्थिक कार्यांमध्ये सहभागी होण्यासाठी	१.५	
	फ	घरगुती उपक्रमांमध्ये मदत करण्यासाठी	१.१	

अ.क्र.		शाळेत उपस्थित न राहण्याची कारणे	टक्केवारी	टक्केवारी
१		२	३	४
३		**शिक्षण सुविधा**		२.१
	अ	शाळा खूप दूर आहे	१.९	
	ब	शिक्षकांची अपुरी संख्या	०.०	
	क	शैक्षणिक संस्थांची वेळ सुयोग्य नाही	०.२	
	ड	शिक्षणाची भाषा/माध्यम परिचित नाही	०.०	
४		**अन्य**	१३.५	१३.५
५		**एकूण**	१००.०	१००.०

स्त्रोत: राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६४ व्या फेरीच्या राज्य नमुन्यात संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारित असलेला, शिक्षणातील सहभाग व खर्च, यावरील महाराष्ट्र शासनाचा अहवाल. (जुलै, २००७ ते जून, २००८)

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या ६४ व्या फेरीमधून असे दिसून येते की, – त्याबाबत बऱ्याच अंशी– आश्चर्य न वाटता, शाळेत न जाण्याचे सर्वाधिक महत्वाचे कारण (६८.५%) म्हणजे प्रवृत्ती आहे. शिक्षणाबाबतची प्रवृत्ती अशी आहे की, शिक्षण हे महत्त्वाचे नाही. शिक्षण हे गरजेचे वाटत नाही. ही प्रवृत्ती, शालेय शिक्षणाच्या विविध लक्षणीय कारणांमधून म्हणजे (१) शाळा आवडत नाही,(२) शालेय शिक्षण, मुलांना जीवनासाठीच्या आवश्यक त्या बाबी देत नाही व (३) शालेय शिक्षण उपजीविकेच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेले कौशल्य पुरवित नाही. यामधून कदाचित निर्माण झाली असावी. मूलभूत सोयीसुविधेचा दर्जा हा, शाळा मुलांच्या आवडीचे ठिकाण बनविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकत असला तरी शाळेतील प्रवेशाचे किंवा शाळा उपलब्ध नसल्याच्या अत्यंत महत्व असलेल्या कारणाखेरीज सर्वात महत्वाचे कारण आर्थिक अडचण असल्याचे दिसून येते. ***प्रवेश उपलब्ध करून देण्यामध्ये शासकीय धोरण यशस्वी झाले आहे. तथापि, आर्थिक कारणे ही, शाळा गळतीमध्ये कायम महत्वाची भूमिका बजावीत आहे. अहवालात याबाबत व्यवस्थितपणे नोंद घेतली आहे आणि त्यावर तातडीचा काहीही उपाय नाही ही स्पष्टपणे दिसून येणारी समस्या आहे. अशी प्रवृत्ती अधोरेखित करणारे सामाजिक–सांस्कृतिक मुद्दे, दर्जात्मक सुधारणेसाठी प्रचलित पध्दतीमध्ये सुधारणा करणे व अंतिमत: कौटुंबिक उत्पन्नामध्ये वाढ करणे यासाठी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास त्याचा दृश्यात बदल होऊ शकेल. शिक्षणाच्या हक्कास सुरूवातीला येणाऱ्या अडचणींनंतर अशी आशा आहे की, त्याची अंमलबजावणी अधिक सक्षमतेने व प्रभावीपणे होईल.***

१२.१.२.१ शिक्षणातील सहभागात स्त्री–पुरुष तफावत

शिक्षणातील सहभागामध्ये मुली व मुले यांच्यात मोठी तफावत आहे. शिक्षणातील स्त्री–पुरुष तफावत (जीजीई)– शिक्षणातील स्त्री–पुरुष तफावतींचा साधारण निर्देशांक तपशीलवार तयार करण्यात आला आहे. वापर केलेल्या निर्देशांकात, साक्षरतेतील स्त्री–पुरुष यांच्यातील तफावत (पुरुष व महिला यांच्या साक्षरता प्रमाणांमधील तफावतीची टक्केवारी), नावनोंदणीतील स्त्री–पुरुष यांच्यातील तफावत (प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा स्तरावर मुले व मुली यांच्या नावनोंदणीमधील तफावतींची टक्केवारी) व शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या स्त्री–पुरुष यांच्यातील तफावत (असे विद्यार्थी ज्यांनी १० वर्षांपूर्वी पहिल्या इयत्तेमध्ये नाव नोंदणी केली होती त्यांच्या टक्केवारीवरून जे दहावी इयत्तेच्या परीक्षेला बसले होते असे विद्यार्थी) या बाबी आहेत. गुणसंख्येच्या साधारण सरासरीवरून, शिक्षणातील स्त्री–पुरुष तफावतींमधील प्रत्येक जिल्हयाची स्थिती दिसून येते. (जोडपत्र १२.४) जोडपत्र १२.४ च्या तक्त्यावरून असे ठळकपणे निदर्शनास आले आहे की, शिक्षणामधील स्त्री–पुरुष तफावत ही मुंबईमध्ये, मराठवाडा प्रदेशाच्या अनेक जिल्हयांमध्ये अधिकतम आहे व विदर्भ

प्रदेशामध्ये सर्वात कमी आहे.

१२.१.२.२ शालेय शिक्षणानंतरचे शिक्षण

अशी अनेक मुले आहेत, जी शाळेत जातात, ती प्राथमिक शिक्षण पूर्ण करतात व पुढे व्यावसायिक व उच्च शिक्षणाचा लाभ घेतात. अशा मुलांचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. ६४ व्या फेरीतील (२००७-०८), तक्ता १२.२ यामधील राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या आकडेवारीत, संपूर्ण राज्यासाठी विविध खर्च गटांच्या शिक्षणाचे विविध स्तर पूर्ण करण्यासंबंधीचा तपशील दिलेला आहे. खर्चाच्या संबंधातील वर्गवारी ही, उत्पन्नाच्या प्रवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी म्हणून घेता येईल, याची नोंद घ्यावी.

तक्ता १२.२

मासिक दरडोई उपभोक्ता खर्चाच्या प्रत्येक दशमक वर्गाच्या शिक्षणाच्या स्तराद्वारे व्यक्तींचे सरासरी वितरण टक्केवारी

अ.क्र.	शिक्षणाचा स्तर	टक्केवारी मासिक दरडोई उपभोक्ता खर्चाच्या प्रत्येक दशमक वर्ग		
		०-३०	३०-८०	८०-१००
१	२	३	४	५
१	निरक्षर (साक्षर नसलेले)	४०.१	२८.६	१२.८
२	औपचारिक शिक्षण न घेता साक्षर	०.५	०.४	०.२
३	प्राथमिक शिक्षणाखालील	१४.२	११.०	७.९
४	प्राथमिक	१७.४	१६.६	१०.३
५	पूर्व माध्यमिक	१७.५	२१.८	१८.६
६	माध्यमिक	६.३	११.४	१६.२
७	उच्च माध्यमिक	२.७	६.१	११.९
८	पदविका/प्रमाणपत्र	०.३	०.७	२.९
९	स्नातक (पदवी)	०.८	२.७	१४.९
१०	स्नातकोत्तर (पदवी)	०.१	०.७	४.५
	सर्व	**१००**	**१००**	**१००**

स्रोत: राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६४ व्या फेरीच्या राज्य नमुन्यामध्ये संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारित शिक्षणातील सहभाग व खर्च, यावरील महाराष्ट्र शासनाचा अहवाल. (जुलै, २००७ ते जून, २००८)

हा तक्ता जे चित्र रेखाटतो ते स्वाभाविकपणे सुस्पष्ट आहे (त्यात काहीच आश्चर्य नाही) यातून मोठ्या संख्येने निरक्षर, साक्षर परंतु, प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेले आणि प्राथमिक शिक्षण घेतलेले कमी खर्च (उत्पन्न) असलेले प्रवर्ग असल्याचे निरीक्षणास येते. हे चित्र, शिक्षणाच्या माध्यमिक व माध्यमिकोत्तर स्तरांवर बदलते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेची आकडेवारी ठळकपणे असे दर्शविते की, लोकांच्या मध्यम व उच्च खर्च श्रेणीत असलेल्या प्रवर्ग सूचकपणे अधिक चांगल्या स्थितीत असलेले पूर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा फायदा घेत आहे.

आकलनासाठी, आर्थिक स्थिती हा, बालकांच्या शिक्षणाच्या स्तरासाठी एक महत्त्वाचा निर्धारक आहे. ज्यामध्ये उच्च माध्यमिक शिक्षण, पदविका / प्रमाणपत्र, पदवी व पदव्युत्तर शिक्षणाचा समावेश करता येईल अशा शालेय शिक्षणानंतरचे शिक्षणाचा उच्च खर्च किंवा उत्पन्न गटांतील बालकांकडून मागणी केली जात आहे व प्राप्त केले जात आहे. ***असे निरीक्षण आहे की, शालेय शिक्षणानंतरचे शिक्षण, जे उपजीविकेसाठी कौशल्य संच पुरविते, अशा शालेय शिक्षणानंतरच्या शिक्षणाचा, कमी उत्पन्न/खर्च असलेल्या गटांमध्ये अधिक प्रसार करण्याची गरज आहे.***

१२.१.२.३ अगोदरच्या विभागातील आमचे विचार तपासून पाहणे:शैक्षणिक प्रयोग (अभ्यास)

जेथवर आमच्या वरील निष्कर्षांचा संबंध आहे तेथवर आम्ही योग्य मार्गावर होतो किंवा कसे हे तपासण्याच्या दृष्टीने, आम्ही दोन शैक्षणिक प्रयोग (अभ्यास) करण्याचे ठरवले आहे. आम्ही, एक शैक्षणिक मागासलेपणाचे प्रमाण (इबीएम) आणि दुसरा ज्यास, आम्ही शिक्षण निर्देशांक अशी संज्ञा दिली आहे, असे दोन (खालील) निर्देशांक आम्ही तयार केले आहेत. शैक्षणिक मागासलेपणाचे प्रमाण (इबीएम), शालेय स्तरावरील 'फलनिष्पत्ती' निर्देशांकाचा वापर करून शिक्षणातील असमतोल दर्शवते, ज्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षणाचा समावेश होतो. मानव विकास निर्देशांकाची परिगणना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमामध्ये (युएनडीपी) या पद्धतीचा वापर केला जातो. तक्ता १२.३ मध्ये आणि आकृती १२.१ मध्ये परिणाम दर्शविण्यात आलेले आहेत. समाविष्ट असलेल्या एकूण संख्येवरील ओझरता दृष्टिक्षेप असे दर्शवितो की, जे स्थान मर्यादित आहे, त्याखेरीज त्यात फारशी कोणतीही तफावत नाही (सांख्यिकीदृष्ट्या महत्त्वाची नसलेली) आणि त्याचे आदिवासी, महिला, स्थलांतरित कामगार व अन्य दुर्बल गट या परिभाषेत स्पष्टीकरण करता येऊ शकते. दर्जा व पायाभूत सुविधा केंद्रस्थ मुद्दे म्हणून उपस्थित होऊ शकतील, ज्यांना अतिरिक्त योजनांतर्गत निधीची साधनसंपत्तीची आवश्यकता नाही, परंतु, ज्यांना सुपरिचित व काही प्रमाणात, अधिक कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावयाच्या प्रचलित धोरणांची आवश्यकता आहे. हे अगोदरच्या विभागांमध्ये आम्ही व्यक्त केलेल्या मतांशी अनुरूप आहे.

मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या माहितीवर आधारित असलेल्या निर्देशांकावरून खालील माहिती देत असून जिची श्रीमती माला लालवाणी यांनी, आमच्या समितीसाठी केलेल्या अभ्यासात, परिगणना केलेली होती. (समितीकडे आकडेवारी उपलब्ध आहे.) आम्ही मान्य करतो व यावर नंतर चर्चा करू, वस्तुस्थिती अशी आहे की, पुढे जाण्यासाठी भौतिक माहितीवरच पुष्कळसा भर देणे, हा मार्ग नाही आणि आपण, दर्जा वाढविण्यासाठी आणखी लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. ***शिक्षणविषयक निर्देशांकामध्ये*** विद्यार्थी, शिक्षक प्रमाण, विद्यार्थी- वर्गखोल्यांचे प्रमाण व स्त्री साक्षरतेचे प्रमाण हे तीन घटक आहेत. (विद्यार्थी- शिक्षक प्रमाण व विद्यार्थी- वर्गखोल्यांचे प्रमाण, हे दोन्ही व्यस्त निर्देशांक आहेत व समान भारांकास त्यांची नोंद घ्यावी.) या निर्देशांकामध्ये मुंबई वगळता, कोकण सर्वोत्तम कामगिरी करीत आहे. जेव्हा, मुंबईचा कोकणात समावेश केला जातो तेव्हा, नागपूर विभागाची सर्वोत्तम कामगिरी असताना कोकण दुसऱ्या स्थानावर राहते. कमाल ते किमान प्रमाण केवळ २ च्या खाली आहे आणि तफावतीचा सहगुणक १४ टक्के इतका आहे. इथे सुद्धा आमची मते दृढ झाली आहेत. निर्देशांक तयार करताना आम्ही महिलांची साक्षरता हा एक घटक घेतला आहे, या वस्तुस्थितीमुळे किंचितशी तफावत निरीक्षण करण्यायोग्य आहे.

तक्ता १२.३
शिक्षणविषयक निर्देशांक व त्याचे घटक (विभाग व प्रदेशनिहाय)

शिक्षणविषयक	शिक्षण निर्देशांक	विद्यार्थी– शिक्षक प्रमाण	विद्यार्थी – वर्गखोल्यांचे प्रमाण	महिला साक्षरता प्रमाण (२०११ ची जनगणना)
१	२	३	४	५
औरंगाबाद	२७९.३	२९.६	३०.८	६७.७
कोकण	२९९.१	२८.५	३०.६	७९.१
नाशिक	२६३.७	३१.८	३३.८	६७.१
पुणे	३०४.७	२७.९	२७.९	७५.०

अमरावती	२९२.८	२९.९	३०.१	७६.६
नागपूर	३२९.४	२४.६	२४.७	७३.५
मुंबई वगळून कोकण	३३७.३	२४.४	२४.५	७८.०
उर्वरित महाराष्ट्र	२८८.९	२८.३	२९.०	७३.०
मराठवाडा	२७९.३	२९.६	३०.८	६७.७
विदर्भ	३१०.८	२७.०	२७.१	७४.९

स्रोत:– समितीच्या शिक्षण उपगटाने पुरविलेली.

आकृति १२.१
शिक्षणविषयक निर्देशांक



स्रोत:– समितीच्या शिक्षण उपगटाने पुरविलेली.

महाराष्ट्रात उघड झाल्याप्रमाणे, शिक्षणातील प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात, साक्षरता व शालेय शिक्षणविषयी आम्ही अगोदरच जे काय म्हटले आहे त्यास वरील स्पष्टीकरण अधोरेखित करते व पुष्टी देते. हे स्पष्टच आहे की, अशीही काही ठिकाणे (पॉकेट) आहेत की, जेथे कामगिरी निकृष्ट राहिलेली आहे (स्थानिक ठिकाणे व गट) आणि याकडे केंद्रित व अभियान पद्धतीने लक्ष उपाययोजना करावयाची आहे, उर्वरित ठिकाणी, नेहमीची धोरणे असल्याप्रमाणे, कामकाजात काहीसा फेरबदल करून खरेतर अधिक कार्यक्षमतेपेक्षा अंमलबजावणी करून हे काम करता येईल. पुन्हा सांगायचे तर, याकरिता **राज्याकडून कोणत्याही अतिरिक्त योजनांतर्गत निधीची (साधन संपत्तीची) आवश्यकता नाही, परंतु, दर्जा सुधारण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची व केंद्रस्थ पद्धतीने प्रचालित धोरणांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.** आपण (नंतर या प्रकरणात) शिक्षण हे केवळ जीवनविषयक कौशल्य सुधारण्याचे साधन म्हणून नव्हे, तर, अधिक महत्त्वाचे म्हणजे उपजीविकेच्या संधीमध्ये वाढ करण्याचे साधन म्हणून विचार करू. म्हणून, आता, शिक्षणातील प्रादेशिक असमतोलावरील चर्चा, केवळ, प्राथमिक शिक्षणापासून सुरू होणाऱ्या माध्यमिक (हायस्कूल) शिक्षणापर्यंतचे शालेय शिक्षण पूर्ण करण्याचा समावेश करण्यापुरतीच व्यापक करण्यात येऊ नये तर, जी व्यक्तींना उपजीविकेच्या अधिक चांगल्या संधी मिळविण्यासाठी सक्षम करतील

अशी ज्ञान व कौशल्याची क्षेत्रे संपादन करण्यामधील शालेय शिक्षणानंतरच्या शिक्षणाचासुद्धा समावेश करावा. **शिक्षणाच्या हक्काच्या तत्त्वानुसार, अहवालात अशी शिफारस करतो की, विशिष्ट गटासाठी, इयत्ता दहावी पूर्ण झाल्यानंतर त्याकडे संबंधित कोहोर्टसाठी शिक्षणाचा किमान स्तर म्हणून पाहिले जावे आणि महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यासाठी ते उद्दिष्ट साध्य केले पाहिजे; प्रादेशिक स्तरावरील यासंबंधी तूट आपल्याला कमी अधिक होताना येईल जी विकासविषयक तुटीच्या निर्देशांकाच्या शैक्षणिक घटकामध्ये शोधून काढता येईल, ज्याचे आम्ही नंतर स्पष्टीकरण करू.** शालेय शिक्षणासंबंधी चर्चा थांबविण्यापूर्वी, आम्ही शिक्षण पद्धतीचे परीक्षण करण्याची गरज अधोरेखित करतो.

१२.१.२.४ शालेय शिक्षण पद्धतीचे परीक्षण करण्याची गरज

उपजीविकेच्या प्रयोजनांसाठी सुसंगत शिक्षण तयार करण्यासाठी शालेय अभ्यासक्रमाचे, विशेषत: इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या स्तरावरील परीक्षण करण्याची गरज आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारूपामध्ये सुद्धा असे दर्शविले आहे की, शालेय स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचा अभ्यास एकात्मक करण्याची व त्यात वाढ करण्याची गरज आहे म्हणजे, शिक्षण लोकांपर्यंत घेऊन जाता येऊ शकेल. राष्ट्रीय व्यावसायिक अभ्यासक्रम प्रमाणनने तरतूद केलेल्या चौकटीत हे करावयास हवे, ज्यात या घटकास शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाचा एकात्मीक घटक म्हणून प्रस्तावित केलेले आहे, म्हणजे, व्यावसायिक विरुद्ध मुख्य प्रवाहातील शिक्षणास लागलेला सामाजिक कलंक पुसून टाकता येईल.

अनेक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या सुविधा नाही, प्रसाधनगृहाच्या सुविधा नाही, मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाच्या सुविधांविषयी बोलले जात नाही, पुस्तकांचा चांगला संग्रह असलेल्या ग्रंथालयाचा अभाव आहे, खेळाचे मैदान, इत्यादी सुविधा नसल्याने शाळांच्या पायाभूत सुविधांच्या स्थितीकडे लक्ष देण्याची गरज आहे. शिक्षणाच्या दर्जामधील सुधारणा ही, प्रत्यक्षात जागेचा, पाठ्यपुस्तकविषयक साहित्याचा, वर्गखोल्यांच्या कार्यपद्धतींचा, शिक्षकांना शैक्षणिक सहाय्य करण्याचा, मूल्यनिर्धारण प्रक्रियेचा व समाजाच्या सहभागाचा दर्जा यांच्याशी प्रबळपणे संबंधित असून त्यास सहाय्य करण्याची गरज आहे. शिक्षणाच्या हक्काची मानके विचारात घेऊन, शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची गरज असून शिक्षणाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी, त्यात नियमितपणे सुधारणा करण्याची गरज आहे. त्यात काही सुधारणा होत असताना आवश्यक मनुष्यबळ मिळविण्यासाठी व उद्दिष्ट गाठण्यासाठी अन्य काही राज्यांनी अनुसरलेल्या काही चांगल्या पद्धतींचा अभ्यास करणे आणि विविध संबंधित केंद्र पुरस्कृत योजनांचा मेळ घालणे मौलिक ठरेल.

अध्यापनशास्त्राचे आधुनिकीकरण करणे तितकेच महत्त्वाचे आहे. बहुसंख्य शाळा, शिक्षण हक्क अधिनियमान्वये निर्धारित केलेले विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखत नाहीत. जिल्हा स्तरावरील शिक्षकांची आवश्यक संख्या काढणे गरजेचे आहे – पदे निर्माण करण्याची आणि कायदेशीर शर्तींनुसार ती भरण्याची गरज आहे. **या संदर्भात, मोठ्या प्रमाणात समावेश करण्यासाठी व परिणामकारकतेसाठी माहिती तंत्रज्ञान (आय टी) माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा (आय टी इ एस) तसेच आभासी वर्ग पद्धती (व्हर्च्युअल क्लासरूम मेथडॉलॉजी) इष्टतमपणे प्रतिपूरक करण्याची तात्काळ गरज आहे.** व्यासपीठाचा वापर करण्यासाठी मोठ्या संख्येने अभ्यास व पद्धतीमीमांसा तत्परतेने उपलब्ध आहेत. यामध्ये, मोठ्या प्रमाणावर शिक्षकाच्या पुनर्प्रशिक्षणाचा समावेश होईल ज्यामध्ये त्यांना पाठनिर्देशक व्हावे लागेल आणि अभिजात अध्यापनशास्त्राचा उपयोग करण्याऐवजी समस्या सोडविण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्यासाठी मदत करावी लागेल. त्यांनी माहिती व तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर करण्यात कुशल व निपुण झाले पाहिजे आणि आधुनिक

विद्यार्थी जी भाषा बोलतात ती भाषा बोलली पाहिजे (मागासलेल्या क्षेत्रांमध्येसुद्धा ओळख पटवता येऊ शकते). हे सुसंशोधित स्पर्धात्मक क्षेत्र असून अनेक मुद्दयांपैकी एक मुद्दा असा आहे की ज्याने काळ घडवला आहे आणि पुन्हा साहित्यामध्ये, सांस्कृतिक भाषिक फरक करावयाचा आहे, ज्यायोगे, शिक्षणाच्या धाटणीत सुयोग्य अशी सुधारणा करता येते. आपल्या विकेंद्रीत धोरणाचे हे दुसरे उदाहरण असून, ज्याची आम्ही शिफारस करतो आणि एकच आकार सर्वांसाठी योग्य नाही हे तत्त्व अधोरेखित करतो. विशेषत: ब्रॉडबॅन्डच्या जोडणीचा वापर करता यावा म्हणून, राज्याने स्थानिक भाषेच्या सॉफ्टवेअरमध्ये (ओसीआर) थेट गुंतवणूक करावयाची असून ज्यामध्ये, केंद्राकडून मोठी रक्कम गुंतवण्यात येत आहे. अशा प्रकारे सर्वोच्च महत्त्व असलेल्या दर्जाच्या स्वरूपावर आम्ही भर देत असताना, आम्हाला असे जाणवते की, ते सर्वसामान्यपणे अवकाश व प्रदेशांमध्ये लागू आहे. आम्ही असा विश्वास व्यक्त करतो की, ते मागासलेल्या प्रदेशातील विद्यार्थ्यांना मोठ्या सामर्थ्यानिशी लागू होईल. तसेच, पुन्हा एकदा असा मुद्दा आहे की, ज्ञानमीमांसा किंवा कल्पनात्मक प्रश्न नाही परंतु, त्यापेक्षा बऱ्याच अंशी अंमलबजावणीचा प्रश्न आहे आणि प्रचलित धोरणाच्या रचनेमध्ये सुद्धा याच धर्तीवर चळवळ आहे.

१२.१.३ व्यावसायिक कौशल्य शिक्षण : रोजगार क्षमतेसंबंधातील एक चिंताजनक विषय.

शिक्षण संस्थांमधून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अपुऱ्या संख्येबाबतच्या मुद्यावर वेळोवेळी आणि अनेकदा चर्चा करण्यात आली आहे. हितसंबंधित व्यक्तींनी म्हणजे उद्योग, व्यापार, वाणिज्य यांतील अगदी शिक्षणतज्ञांनी एकमताने मान्य केले आहे की, प्रवेशार्थीमध्ये "रोजगारक्षमता" हा एक न सापडणारा गुण आहे. हीच गोष्ट उच्च व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत देखील सत्य आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व व्यक्तींनी (भावी नियोक्त्यांनी) शैक्षणिक कार्यक्रमांमधील वाव आणि मागणीच्या रचनाकार्यात विचारपूर्वकतेने सहभागी व्हायला हवे. ते शक्य करणाऱ्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेद्वारे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय व्यावसायिक अभ्यासक्रम प्रमाणपत्र यासारखा सहाय्यभूत ठरणारा उपाय आधीच अस्तित्वात आहे. आम्हीसुध्दा या संदर्भात प्रकरणात शेवटी शिफारशी करणार आहोत. तसेच, यासंदर्भात योग्य नोकऱ्या असणारी क्षेत्रे निश्चित करायला हवीत आणि अवकाश (स्थल), गट वैशिष्टयांवर आधारित अशा विशिष्ट आवश्यकतांची पूर्तता करणारा कार्यक्रम तयार करायला हवा. विद्यार्थ्यांसाठी शाश्वत उपजिविकेच्या सक्षमीकरणाची खात्री करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. संबंध्द शैक्षणिक संस्थांच्या उपलब्धतेने, जे उत्पन्न स्तर वाढविण्यास सहाय्यभूत ठरते, अशा कौशल्यसंपादनाबाबत सुनिश्चित करता येईल. जोडपत्र १२.५ मध्ये महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयांतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची (सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रातील) प्रवेशक्षमता दिलेली आहे. १५-२४ वयोगटातील प्रत्येकी १ लाख लोकसंख्येसाठीची संस्थांची संख्या ही, कौशल्य शिक्षण देणाऱ्या पायाभूत सोयीसुविधांच्या संधीचा अंदाजित निर्देशांक असावा. प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांची संख्या ही, इतर जिल्हयांशी तुलना करता मुंबई उपनगरे व ठाणे या जिल्हयांमध्ये ती कितीतरी जास्त आहे. तथापि, इथे आम्हाला असे स्पष्ट करायचे आहे की, जिच्यासंबंधात त्रुटीची गंभीर योग्यपणे दखल घेण्यात आली आहे व जी अपेक्षित परिणाम देण्यात अपयशी ठरली आहे अशा औद्योगिक प्रशिक्षण संस्था पध्दतीपासून आता आपण दूर होण्याची गरज आहे. आम्ही या आकडेवारीचा उपयोग फक्त उदाहरणादाखलच व दुसरी कोणतीही पर्यायी माहिती उपलब्ध नसल्याने करीत आहोत. आम्हाला याची जाणीव आहे की, ही बाब फक्त पायाभूत सोयीसुविधांचा अभाव किंवा संस्थांचा अभाव इतक्या संकुचित अर्थाने घेण्यासारखी नाही तर साहजिकच कौशल्य संपादनाचा निम्न दर्जा हे त्यामागील कारण आहे. या संस्थांद्वारे घेण्यात येणाऱ्या पाठयक्रमाचा दर्जा व सुसंगतता यामध्ये कदाचित हे कारण असेल. खाजगी क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था या जास्त करून आर्थिक दृष्टया/औद्योगिक दृष्टया प्रगत जिल्हयांमध्येच आहेत, तर मागास जिल्हयांमध्ये बहुतकरून एकही नाही.

इथे दोन मुद्दे स्पष्ट करण्याची गरज आहे. एक, फक्त वाटप क्षेत्राच्या प्रयोजनासाठी केवळ आम्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रादेशिक उपलब्धतेच्या आधारे योग्य रीतीने संपादन केलेल्या परिवर्तनशीलतेचा विचार करीत आहोत. दुसरे असे की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची रचना, कार्यपध्दती व सुसंगता याबाबतची परिस्थिती पाहता आणि विशेषकरून मागास प्रदेशातील मुलांच्या सध्याच्या आशा आकांक्षा पाहता, आम्ही पुन्हा त्याच गोष्टींची शिफारस करू इच्छित नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्था या शिक्षणाची अखेर करणारा टप्पा (बऱ्याचदा असंबध्द) उपलब्ध करून देतात. ही बाब लक्षात घेऊन आम्ही, प्रदेश विनिर्दिष्ट पाठयक्रम उपलब्ध करून देणारे आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहजगत्या प्रवेश करण्याची शक्यता उपलब्ध करून देणारे सामूहिक महाविद्यालये यांसारख्या व्यावसायिकता/कौशल्य देणाऱ्या संस्थांच्या उत्तम पर्यायाची शिफारस करीत आहोत.

१२.१.३.१ व्यावसायिक कौशल्यांसाठी गरज

शालेय शिक्षण अधिक उपयोगाभिमुख करण्यासाठी, शालेय स्तरावर व्यावसायिक कौशल्यांचा परिचय करून देण्यात यावा. विशेषकरून, ज्या जिल्ह्यांमध्ये माध्यमिक शिक्षण स्तरामधील गळतीचे प्रमाण अधिक आहे, तेथे शासनाने व्यावसायिक शिक्षण सुरू करावे. स्पष्टपणे असे दिसून येईल की, व्यावसायिक शिक्षण संपादन करण्यासाठी प्रत्यक्ष अशा संस्थांचा अभाव नाही, परंतु या संस्थेद्वारे देण्यात आलेल्या पाठ्यक्रमाचा दर्जा तसेच या कौशल्य संचाची संपादणूक करण्यात प्रादेशिक असमतोलासाठी कारणीभूत ठरणारा अध्ययनाचा दर्जा, हे कारण असण्याची शक्यता आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था व व्यवसाय प्रशिक्षण पाठ्यक्रम बाजाराभिमूख असण्याची आवश्यकता नाही, या क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग महत्त्वाची भूमिका बजावील. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणामधील व्यावसायिक शिक्षणातील खाजगी सहभागाची विद्यमान चौकट शैक्षणिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमधून, कौशल्याचे खालचे स्तर निर्माण करणाऱ्या विशेषत: सामुदायिक ठिकाणांसह (कॉर्पोरेट हाऊस) वाढलेल्या सहभागास चालना देण्याच्या दृष्टीने तपासण्याची गरज आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रमाणन राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण अर्हतेच्या चौकटीशी मिळते जुळते राहील. जे, २०१४ पासून मनुष्यबळ विकास मंत्रालय संपूर्ण देशात सुरू करण्याची योजना करीत आहे. प्रस्तावित वैधानिक विधेयक, महाराष्ट्र व्यावसायिक व शिक्षण प्रशिक्षण (एमव्हीइटी) अधिनियम, जो, व्यावसायिक शिक्षणाच्या मार्गाने दूरगामी सुधारणांचे अभिवचन देतो, राज्यात व्यावसायिक शिक्षण द्यावयाचे आहे त्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

१२.१.३.२ सामूहिक महाविद्यालये-- सामर्थ्यासाठी खूप आवश्यक असलेला पुढाकार

सामूहिक महाविद्यालय (सीसी) आपल्या देशात उदयास येणारी नवीन व आव्हानात्मक संकल्पना आहे. ते लाभदायक रोजगाराकडे नेणारे कौशल्याच्या प्रशिक्षणाचे लक्ष्य असलेले परिवर्तनशील शिक्षण देते. शिक्षणाच्या लक्ष्य गटात गळतीचा समावेश आहे जे, उच्च शिक्षण घेत नाहीत किंवा घेऊ शकत नाहीत. थोडक्यात सामूहिक महाविद्यालय (सीसी) युवकाच्या उपजीविकेच्या सामर्थ्याचे तसेच आर्थिक वृद्धिच्या स्त्रोताचीही निर्णायक व महत्त्वाची साधने आहेत. ती समुदायाच्या गरजांशी योग्य असलेला अभ्यासक्रम उपलब्ध करून देतात. सामूहिक महाविद्यालये, असंख्य गरीब, कष्टकरी वर्ग, अपारंपारिक व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सेवा देऊ शकतात.

सामूहिक महाविद्यालये ही, शिक्षणाची पर्यायी यंत्रणा आहे, जी, व्यक्तीस स्थानिक उद्योग व समुदायाच्या सहकार्याने लाभदायक रोजगाराकडे जाणाऱ्या योग्य कौशल्याच्या विकासाद्वारे सक्षम बनविण्याचे ध्येय बाळगते. ते, विचारात घेतलेला समुदाय/ परिस्थितीमध्ये कामगारांना सर्वात जास्त स्वीकारार्ह असतील या दृष्टिकोनांचा वापर करून स्थानिक गरजा व राज्याच्या आवश्यक गोष्टीवर

आधारित विशेष कार्यक्रमाचा लाभ देतात.

सामूहिक महाविद्यालयात सर्वसामान्यपणे २ वर्षांचा अभ्यासक्रम असेल जो, एकतर (१) पदवीपूर्व महाविद्यालयात स्थानांतर करण्यासाठी सहयोगी असणाऱ्या पदवीचा किंवा (२) विद्यार्थ्याचा कोणताही व्यवसाय किंवा व्यापारामध्ये थेट प्रवेशाचा मार्ग दाखवतो. ही महाविद्यालये आर्थिक वृद्धिचे स्त्रोत आहेत कारण ते शिक्षित व कुशल कार्यबल उपलब्ध करून देतात, जे, व्यक्ती, विद्यार्थी, समुदायाचा आयुष्याचा व राष्ट्राचा दर्जा यात सुधारणा करते.

याची नोंद घेण्यात यावी की, असंघटित क्षेत्रातील, कमी वेतन असलेल्या अर्धकुशल कामगारांच्या कौशल्याच्या संचात सुधारणा करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदे (एआयसीटीई) कडे सामूहिक तंत्रनिकेतनाची योजना आहे. शैक्षणिक नैपुण्यात सुधारणा करण्यासाठी याची जाणीव झाली आहे की, विशेषकरून शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यांमध्ये उपजीविकेच्या संधींमध्ये सुधार आवश्यक आहे. सामूहिक तंत्रनिकेतन योजना, केंद्रस्थ संस्थेद्वारे ग्रामीण क्षेत्रांमध्ये, प्रशिक्षणाचे नेटवर्क उभारण्याचा प्रयत्न करते. ही कल्पना, स्थानिक अर्धकुशल कामगारांच्या कौशल्यात सुधारणा करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अभियांत्रिकी / तंत्रज्ञान संस्थांमार्फत, सामूहिक महाविद्यालये/केंद्रे उभारण्यासाठी विस्तारता येऊ शकते. राज्याच्या निधींमधून योग्य वित्तीय सहाय्य पुरविण्यात यावे. खाजगी क्षेत्राच्या सहभागास सहाय्य देण्यात यावे. सामूहिक महाविद्यालयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे आहे की, ते विवक्षित शर्तींन्वये, पदवी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहजगत्या प्रवेश देतात. सध्याच्या युवकाच्या आकांक्षाशी हे योग्यरीत्या साजेसे आहे. हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था या सारख्या अभ्यासक्रमाशी संबंधित सामाजिक प्रतिबंधसुद्धा टाळते, जे, शेवटचे टोक आहे व सुशिक्षितांमध्ये नवीन जाति-व्यवस्था निर्माण करते.

शिक्षणाची उपयोगिता व उपजीविकेच्या गरजांकरिता त्याची जबाबदारी यादृष्टिने विज्ञान, वाणिज्य व कला यासारख्या विविध शाखांमध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षणाच्या पटनोंदणीकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विज्ञान व वाणिज्य शाखांना चालना देण्यासाठी विशेष सहाय्य देण्याची गरज आहे.

उच्च व व्यावसायिक शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणावर खाजगी सहभाग आहे. मागासलेल्या प्रदेशांमध्ये जरी, सर्वसाधारणपणे परिणाम लाभदायक असले तरी प्रगत प्रदेशांशी तुलना करण्यायोग्य लाभ नाहीत. मागासलेल्या क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्राकडून सामोरे गेलेल्या निर्बंधाना वित्तीय व राजकोषीय प्रोत्साहन देऊन दूर करण्याची गरज आहे. नवीन खाजगी विद्यापीठांचे विधेयक जे, अधिनियमित हाण्याची शक्यता आहे, त्यात मागासलेल्या क्षेत्रांमध्ये अशा विद्यापीठांच्या प्रवेशास उत्तेजन देण्यासाठी प्रोत्साहनाची तरतूद केली पाहिजे.

चांगल्या दर्जाची खात्री करण्यासाठी, बाजाराशी संबंधित अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्रात सुधारणा करणे गरजेचे आहे आणि या क्षेत्रात म्हत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात यावे. **समिती अशी शिफारस करते की, प्रत्येक गटासाठी एक सामूहिक महाविद्यालय निर्माण करण्यात यावे. प्रत्येक पाच वर्षांनी ही कृती करण्यात यावी. राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानाचा निधी या प्रयोजनासाठी राज्याच्या स्वत:च्या निधीशिवाय कमाल मर्यादेपर्यंत वापरण्यात यावा.**

१२.१.३.३ वृद्धिसाठी आवश्यक कौशल्य विकास

आपण अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे, रोजगाराविषयीची गंभीर चिंता सुशिक्षितांतध्ये सुद्धा आहे, तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांमध्ये सुद्धा आहे आणि अशारीतीने त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. व्यवस्था पाहण्याकरिता पारंपारिक विद्यापीठे खूप मोठी झाली आहेत आणि म्हणून राज्यामध्ये, भिन्नता असलेली (रोजगाराच्या विशेष संदर्भात) तंत्रज्ञान विद्यापीठाची संकल्पना मांडणे गरजेचे आहे.

शैक्षणिक संस्थेमध्ये, दर्जा वाढविण्यास सुरूवात करण्यामध्ये, उद्योगांनी, शिक्षण देणे व सहाय्य करण्यामध्ये सक्रियपणे सहभागी असले पाहिजे. उद्योगांची व संस्थांची पूरक भूमिका असावी. अभ्यासक्रमामध्ये अंतर्वासितेच्या संकल्पनेचा परिचय करून देण्यात यावा आणि उद्योगातील कर्मचारी वर्गाच्या गेस्ट लेक्चर्सद्वारे उत्तेजन देण्यात यावे.

भारताचा अभ्यासक्रम पुरेसा स्पर्धात्मक नाही व उद्योगधंद्याशी चर्चा करून खूप बदल करावयाचे आहेत. उपयोजनाशी संलग्न असलेले विज्ञान, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, बीजगणित, सांख्यिकी यांचा भक्कम पाया ही काळाची गरज आहे. जुजबी कौशल्याचा विकास व कौशल्यावर आधारित शिक्षणाच्या तरतुदीसह माहिती व संसूचना तंत्रज्ञान (आयसीटी) च्या साधनाच्या वापरास उत्तेजन दिले पाहिजे व सभोवतालचे उद्योग यासाठी प्रयोगशाळा बनल्या पाहिजेत. अर्थव्यवस्थेने रोजगार निर्माण करणाऱ्या संधींचा पूर्ण विकास केला पाहिजे. जागतिक स्तरावर वाढणाऱ्या रिसर्च पार्क्सची संकल्पना राज्यात सुरू करण्यात यावी. रिसर्च पार्क्समध्ये उद्योग, सुविधा उपलब्ध करून देतील.

सर्वसाधारणपणे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढल्याने शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे याची कुणालाच पर्वा उरलेली नाही. यामुळे पदवीधर बेरोजगारांच्या संख्येत तर वाढ होत आहे परतुं नोकरीच्या बाजारात त्यांना ताबडतोब नोकरी देऊन कुणी त्यांचे दु:ख कमी करू शकत नाही. रोजगाराभिमुखता संवाद कौशल्य आणि उपक्रमशीलतेचा अभाव यामुळे विविध अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांमधून बाहेर पडणारे हजारो पदवीधर नोकरीच्या शोधात फिरत आहेत. अशा शिक्षणव्यवस्थेतील उणिवा दूर करून सर्व संबंधितांसाठी ते अधिक उपयुक्त व फायदेशीर करणे गरजेचे आहे.

१२.१.४ उच्च शिक्षण

ही नवीन पद्धत पुढे घेऊन जात असताना असे दिसून आले आहे की, बहुसंख्येने विद्यार्थी, शिक्षणाच्या अशा शाखांना पसंती दर्शवित आहेत की, ज्या कौशल्याभिमूख किंवा व्यवसायभिमूख आहेत, अशा विज्ञान व वाणिज्य शाखा मुंबई आणि पुण्यात असलेल्या विद्यापीठांमध्ये अधिक प्रमाणात आहेत, ही शहरे, औद्योगिकदृष्ट्या व वाणिज्यिकदृष्ट्या प्रगत मानण्यात आली आहेत. अन्य प्रदेशातील विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या कला शाखेतील विषयांना बहुसंख्य विद्यार्थी पसंती दर्शवित आहेत. (पहा तक्ता १२.४) कला शाखेतील विषय, पदवी मिळविण्यासाठी सामान्यपणे हलकेफुलके व सोपे आहेत व व्यवसायभिमूख नाहीत. (सध्या जे शिकवले जातात त्याचा अभ्यासक्रम दिलेला आहे ते तयार करण्यात आलेले आहेत.) कदाचित, जे उच्च शिक्षणासाठी पसंती दर्शवित आहेत त्यांचा 'पदवी मिळविणे' हा प्रबळ दृष्टिकोन आहे, ते, मोठा खर्च करण्याच्या वर्गवारीतील आहेत आणि कृषि किंवा औद्योगिक क्षेत्रात त्यांचा स्वत:चा व्यवसाय आहे. जर, कमी खर्च करण्याच्या वर्गवारीतील अधिक लोक उच्च शिक्षणासाठी पसंती दर्शवित असतील तर, ते कदाचित व्यवसायभिमुख कौशल्ये व पदव्या मागतील.

तक्ता १२.४
पदवी महाविद्यालयांमध्ये पटनोंदणी (पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वर्षातील एकूण) २०११-१२

अ.क्र.	विद्यापीठ/प्रदेश	एकूण पटनोंदणीच्या विविध शाखांमधील टक्केवारी कला +विज्ञान+वाणिज्य	टक्केवारीप्रमाणे पटनोंदणी काढा
१	२	३	४
१	मुंबई विद्यापीठ	६३	२१
२	पुणे विद्यापीठ	५५	३३
३	सोलापूर विद्यापीठ	३०	४७
४	शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	४३	५२
५	बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	३५	४७
६	स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	३१	३६
७	संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ	३६	४४
८	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ	३३	४१
९	उत्तर महाराष्ट्र जळगाव	३७	४८

टीप : अन्य शाखांमध्ये शिल्लक पटनोंदणी असल्याने, १०० पर्यंत आकडेवारी मिळविण्यात येऊ नये.
स्रोत: तांत्रिक व उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासन.

जोडपत्र १२.६, विज्ञान, वाणिज्य, कला, विधि शिक्षण व अन्य यासह, सर्व क्षेत्रांमध्ये विद्यापीठ स्तरावरील प्रवेश दर्शवितो. शासनाने सहाय्य केलेल्या विद्यापीठांमध्ये प्रवेश क्षमतेपर्यंत इयत्ता १० वी साठी जे विद्यार्थी हजर होतात त्या गुणोत्तराच्या मदतीने, हे तपशीलवार तयार करण्यात आलेले आहेत. मुंबईसाठी ही आकडेवारी ३.९ इतकी कमी आहे आणि मराठवाड्यासाठी १३ इतकी मोठी आहे. नोंद घेण्यात यावी की, कोकणात विद्यापीठ नाही.

१२.१.४.१ उच्च शिक्षण प्रणाली व विद्यापीठ व्यवस्थेतील सुधारणा

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण प्रणाली ही- सौम्य शब्दात सांगायचे तर- खेदकारक आहे. ज्ञानाची सुबत्ता असणाऱ्या भारताला महाराष्ट्राने दृष्टी दिली असून (इतिहास व त्याच्या इतर निष्पत्तीचा विचार करता, महाराष्ट्र तुलनेने अधिक लाभदायक ठरला आहे,) आता या क्षेत्रात तातडीने धोरणात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यातील मुद्दे हे वैचारिक जडणघडण किंवा काल्पनिक आव्हान यांच्या विचारार्थ मांडले नसून, वास्तविकपणे ते सुपरिचित व दस्तऐवजाच्या स्वरूपातील आहेत. अशा सुधारणा अंमलात आणण्यासाठी थोडया साधनसंपत्तीच व राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. येथे याचा उल्लेख केला पाहिजे की, अशा हस्तक्षेपाला मोठे प्रादेशिक परिणाम असेलच असे नाही. परंतु, विकासाच्या गतीमध्ये तो निर्णायक भूमिका बजावेल. ज्यामुळे प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील उपाययोजनेसाठी आवश्यक सार्वजनिक साधनसंपत्ती आपणाला मिळेल. तसेच येथेसुध्दा दर्जा हा महत्वाचा आहे व त्यासाठी काहीतरी केले पाहिजे. विशेषत: उदात्त शिक्षणाच्या बाबतीत सामाजिक व राजकीय नेतृत्त्व निर्माण व्हावे व त्यामध्ये वाढ व्हावी म्हणून त्याच्या भूमिकेवर (सध्या त्याचा पुरावा नाही) आम्ही भर दिला आहे. प्रादेशिक असमतोलातील राजकीय दृष्टिकोन तसेच सामाजिक भांडवल यावरील आमचा भर विचारात घेता, मागास जातीतील विद्यार्थ्यांसाठी विशेषत्वाने हा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो.

१२.१.४.२ समित्या

आधीच उल्लेख केल्याप्रमाणे, आम्हाला येथील मुद्दे समजावून घेण्यास कोणतीही अडचण नाही. कोठारी आयोगापासून (साठच्या दशकाच्या मध्यातील) ते अलिकडच्या महत्त्वाचा राष्ट्रीय ज्ञान आयोग अहवाल व यशपाल समिती अहवाल यांनी लक्षणीय व महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत. अगदी अलिकडेच, महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या मूलभूत प्रश्नांचा निरनिराळया दृष्टिकोनातून विचार करण्यासाठी तीन समित्या होत्या. या समितीच्या अध्यक्षपदी डॉ.काकोडकर, डॉ.निगवेकर व डॉ.ताकवले यांच्यासारख्या विख्यात व्यक्ती होत्या. आता, या ३ समित्यांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी चौथी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समित्यांकडे सोपविण्यात आलेले महत्वाचे मूळ मुद्दे **दर्जा, स्वायत्तता, पर्याप्तता व लवचिकता** हे होते. त्यांच्या शिफारशींमधील महत्वाचे मुद्दे हे बाहय राजकीय पक्ष व शासन असे दोघेही तसेच प्राधिकरणे /न्यायालये यातील निहित हितसंबंधित व्यक्ती यांचे आंतर संस्थात्मक राजकारण याद्वारे होणारे राजकीय हस्तक्षेप कमी करून स्वायत्तता प्रदान करणे, विद्यापीठांचा आकार कमी करून (विद्यार्थ्यांची संख्या, स्थानिक अधिकारिता) तो अधिक व्यवस्थापन योग्य करणे, अध्यापन शास्त्राच्या नवीन पध्दती चालू करणे आणि निवड आधारित श्रेयांक पध्दती संबंधित अभ्यासक्रमाकरिता उद्योगाशी समन्वय साधणे, मुक्त स्त्रोत साहित्य व आयटी /आयटीईएस शाखांचा विस्तार करणे अशा मूल्यमापनाच्या सुधारणा हे होते. वर नमूद केल्याप्रमाणे जागतिक दर्जा/उत्कृष्ट असणाऱ्या संस्था या कमी आहेत व त्या सर्वत्र असणार नाहीत असे आपण मान्य करू या. त्यांची ओळख पटविणे व अन्य संस्थांना त्यानुरूप स्तरांवर आणताना त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. यासाठी अध्यापकांची पदे भरणे, वेतनेतर अनुदान देणे याकरिता शासनाकडून मदत अपेक्षित आहे. थोडक्यात सर्व आवश्यक मदत पुरविताना आपली मर्यादा राखून (हस्तक्षेप नसणे आणि व्यवहार व नियुक्त्या करताना, सर्वात महत्वाचे, कुलगुरूंच्या नियुक्त्यांमध्ये संपूर्ण पारदर्शकता असणे) देखरेख करणे (अशा जागा भरणे, त्या भरण्याचे थांबविणे, त्याबाबत विसरून जाणे हा दृष्टिकोन). अखेरीस, त्यासंबंधातील अनेक विधेयके, केंद्र व राज्य स्तरांवर प्रलंबित आहेत. राज्य स्तरावरदेखील महत्वाचे खाजगी विद्यापीठ विधेयक दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. ते ताबडतोब मंजूर करून घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे पूर्वोक्त समित्यांच्या शिफारशींना पुष्टी देताना, अंमलबजावणीच्या बाबतीत राज्य शासनाने जलद पावले उचलावीत अशी आमची तीव्र इच्छा आहे.

उच्च शिक्षणाच्या ९० % शिक्षण हे राज्य विद्यापीठाकडून देण्यात येते हे सत्य मान्य करून, १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या केंद्रीय निधीच्या केवळ १०% निधी हा, राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान (RUSA) सुरु करण्यासाठी आहे जे उच्चशिक्षण क्षेत्रासाठी राज्य /केंद्र योजनेचे छत्र आहे. याचा अर्थ, यासाठी राज्य विद्यापीठांना धोरणात्मक निधीच्या मोठया प्रमाणात रक्कम देणे असा आहे. ही अशी योजना आहे की, त्यांना आमच्या समित्याची जी तत्त्वे आहेत अगदी त्यासारखीच तत्त्वे अनुसरली आहेत व वैधर्म्य मान्य केले आहे. (एक प्रमाण सर्वांना योग्य असत नाही). महाराष्ट्राने या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेतला हे महत्वाचे आहे. (पूर्वी महाराष्ट्र हा याबाबतीत १४ प्रमुख राज्यांपैकी एक मागास राज्य होते) उच्च शिक्षणासाठी **कार्य करणारी** एक राज्य परिषद असणे व उच्च शिक्षण क्षेत्रासाठी चांगला योजनाबध्द राज्य आराखडा असणे ही पूर्वअट आहे. एक प्रगतीशील राज्य म्हणून आम्हाला असा विश्वास वाटतो की, राज्य शासनाने, केंद्र सरकारकडून (मनुष्यबळ विकास मंत्रालय/विद्यापीठ अनुदान आयोग) प्राप्त होणाऱ्या निधीशिवाय, ज्ञान व उच्च शिक्षणाच्या (विशेषत: प्रगत विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या आघाडीच्या क्षेत्रांमधील) आव्हानांचा सामना करण्यासाठी

स्वत:ला सज्ज ठेवले पाहिजे. राज्याला आम्ही अशी शिफारस करू की, प्रचलित विद्यापीठीय शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी व त्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी राज्याने अंदाजे एकूण रु. १००० कोटींची तरतूद करावी. एकंदरीत, आम्हाला जे म्हणावयाचे आहे त्याचा आम्हाला पुनरुच्चार करावासा वाटतो की, साधनसंपत्ती महत्वाची असली तरी, चांगले प्रशासन हा (संकल्पना व अंमलबजावणी) कळीचा मुद्दा आहे.

१२.१.४.३ शिक्षणातील प्रशासनाचा मुद्दा

सर्वच क्षेत्रात शाळा स्तरावरील प्रशासन हा कळीचा मुद्दा आहे. समितीला, महामंडळे आणि जिल्हा परिषदांच्या शाळांच्या सुमार कामगिरीबद्दल अभिप्राय मिळाले आहेत. शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थी व शिक्षक या दोघांची उपस्थिती, न भरलेली रिक्त पदे या सर्व बाबी सर्वांच्या परिचयाच्या असून त्यांच्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. कदाचित, एकीकडे आम्ही असेही नमूद करू की, आपण पाठबळ योजना सुरु करण्याच्या शक्यतेचा शोध घेतला पाहिजे आणि विद्यार्थ्यांना अशासकीय शाळांमध्ये (त्यांच्या पसंतीच्या शाळांमध्ये) प्रवेश घेण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

महाराष्ट्राने एक प्रगतीशिल राज्य म्हणून, विद्यार्थ्यांना दहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे. दहाव्या इयत्तेपर्यंतच्या शिक्षणाच्या संधीमध्ये समानता आणण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हामध्ये आवश्यक साधने उपलब्ध करून द्यायला हवीत.

साधनांपेक्षाही महत्वाची बाब प्रशासन हीच आहे, याचा आम्ही पुनरुच्चार करतो. येथे स्पष्टपणे सांगितल्याप्रमाणे प्रशासन हे नियामक आराखडयाशी संबंधित आहे. त्यासोबतच ज्याप्रकारे प्रशासनाला व्यवहारात स्थान आहे त्यानुसार त्याचा सहसंबंध क्षमता उभारणी करणाऱ्या आणि प्रोत्साहक, सामर्थ्यदायी व सक्षम बनवणाऱ्या खाजगी धुरीणांशीही येतो. अशाप्रकारे, राज्याची प्रगती साध्य करण्यासाठी, आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे एक परिपूर्ण आखलेली आणि बांधिलकी जपणारी, कल्पकतेने आखलेल्या सामर्थ्यदायी व सक्षम बनवणाऱ्या प्रशासन उपक्रमशिलतांच्या योजनांच्या समूहासह असलेली व्यय योजना तसेच लवचिक पध्दतीचा अधिकाधिक खाजगी सहभाग, हा एक राजमार्ग आहे. शिक्षकांचा कार्यभार तसेच कंत्राटी शिक्षकांना कामावर घेताना कंत्राटी वेतनाची पध्दत लवचिक करण्याची गरज आहे. वेतन रचनेच्या संबंधातला आणि त्यासोबतच लिपिकवर्गीय कामे देण्याची नीती असलेला सध्याचा व्यवहार हा विद्यमान आव्हानांचा सामना करण्याकरिता पोषक नाही. या क्षेत्राची शिक्षकांनी स्वत:हून निवड करावी, अशी दर्जा व उत्कृष्टतेसाठीची प्रोत्साहके येथे नाहीत.

आपण ज्या अर्थव्यवस्थेबद्दल बोलत आहोत, त्याप्रकारची अर्थव्यवस्था महाराष्ट्रात आणायची असेल तर आपण **उत्कृष्ट संस्थांची** स्थापना करणे गरजेचे आहे. **पायाभूत सुविधांच्या प्रचंड गरजा** याचाच अर्थ, राज्याने आवश्यक ती साधनसंपत्ती पुरविली पाहिजे, असा आहे. याकरिता आवश्यक असलेले मनुष्यबळ सुध्दा अत्यंत उच्च दर्जाचे असणे गरजेचे आहे. कंत्राटी वेतन, उपलब्ध असलेल्या चांगल्या पर्यायांच्या (शिक्षकांच्या) तोलाचे असले पाहिजे हाच अर्थ यातून सूचित होतो. सरकारी क्षेत्राने अशा काही संस्था शोधून काढून – त्यांना उत्तेजन देण्यासाठी त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे व त्यांना आवश्यक त्या साधनसंपत्तीचे पाठबळ दिले पाहिजे.

ई–लर्निंगला येथे प्रचंड संधी असून याकडे लक्ष देण्याची गरज आहे. येथे पुन्हा कौशल्यगट आणि आर्थिकदृष्टया वर्धिष्णु उपायांचा वापर केला पाहिजे. खाजगी–सार्वजनिक व त्यासोबतच

औपचारिक व अनौपचारिक क्षेत्रांनी येथेसुध्दा सामूहिक सहसंबंध जोपासायला हवेत. शक्य होईल तेथवर, औपचारिक सरकारी क्षेत्रांना दूर ठेवून (परंतु अर्थातच त्यांच्या मदतीने) धडक मोहिम राबवून हे करावे, असे सुचवण्यात येत आहे.

१२.१.५ तंत्रशिक्षण

तंत्र शिक्षणात आम्ही पदवी आणि पदविका अशी दोन्ही अभियांत्रिकी महाविद्यालये विचारात घेतली आहेत आणि त्यानंतर इयत्ता दहावीच्या परीक्षेस बसणारे विद्यार्थी व अभियांत्रिकी महाविद्यालये/संस्था यांची प्रवेशक्षमता यांच्या गुणोत्तराच्या तपासणीतून, जागांची उपलब्धता काढण्यात आली होती. जागांच्या उपलब्धतेत नागपूर जिल्हयातील एका जागेमागे २.७ इच्छुक विद्यार्थी इतके कमी प्रमाण ते अकोला जिल्हयातील एका जागेमागे १७.८ इच्छुक विद्यार्थी इतके उच्च प्रमाण इतकी प्रचंड तफावत आहे. (आम्ही मुंबई उपनगर जिल्हा विचारात घेतलेला नाही) (पहा जोडपत्र १२.७) व्यापक अर्थाने, अभियांत्रिकीच्या एका जागेमागे, इयत्ता दहावीच्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या ही, पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयांशी तुलना करता, मराठवाडयातील जिल्हे, आणि विदर्भ तसेच कोकणातील काही जिल्हयांसाठी अधिक आहे. स्थानिक पातळीवर महाविद्यालयांची संख्या वाढवण्याच्या बाबतीत धोरणात्मक हस्तक्षेप करता येऊ शकला असता, परंतु एकंदरीत वाढता लोंढा पाहता आणि वस्तुत: तंत्रशिक्षण संचालनालय हे केंद्रीय पध्दतीने प्रवेश देत असल्याने, मागास क्षेत्रातील विद्यार्थ्यांना कोटा पध्दतीने प्रवेश देण्याची सुविधा देणे अधिक योग्य ठरेल, जेणेकरून त्यांना योग्य वाटेल त्या गरजेनुसार ते शिक्षणाची निवड करतील. कोटा पध्दतीच्या प्रवेशाखेरीज शुल्कासाठी अर्थसहाय्य आणि/ किंवा शिष्यवृत्या (अनुसूचित जाती/जमातीबाबत असल्याप्रमाणे) तसेच वसतिगृहाची व्यवस्था या स्वरूपात सहभागाची आवश्यकता आहे. येथे खरा विवादास्पद प्रश्न हा, देऊ केलेल्या योजनेचा दर्जा, आहे. हा सार्वत्रिक प्रश्न आहे आणि हा भेद ओळखण्यास व धोक्याचा इशारा देण्यास बाजारपेठा सक्षम आहेत. (त्याखेरीज सर्व चाळण्यांमधून बाजारपेठेच्या चटकन लक्षात येऊ शकणारा आणि इशारा देणारा आहे.) तंत्रशिक्षण संचालनालयाने अभियांत्रिकी महाविद्यालये देत असलेल्या पायाभूत सुविधा आणि शिक्षणाचा दर्जा या दोन्ही आधारांवर या प्रत्येक महाविद्यालयांची वर्गवारी केलेली आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे होत असलेले हे वर्गीकरण यापुढेही सुरु ठेवले पाहिजे आणि या महाविद्यालयांना पायाभूत सुविधांमधील दर्जावाढ कार्यक्रम बंधनकारक करायला हवा. ***व्यवस्थापन महाविद्यालयांना ती, आहेत तसेच राहू द्यावे आणि त्यांच्यामध्ये हस्तक्षेप करू नये. कारण सद्यस्थितीत हेच बाजारजगत कर्तव्यशून्य व्यक्तींना काढून टाकण्याच्या प्रयत्नात आहे.***

१२.१.६ वैद्यकीय शिक्षण

जोडपत्र १२.८, प्रत्येक वैद्यकीय जागेसाठी इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शविते. असे दिसून येत आहे की, वैद्यकीय जागेची उपलब्धता दर्शविणाऱ्या आकडेवारीत एका वैद्यकीय जागेसाठी विद्यार्थ्यांचे प्रमाण अन्य सर्व प्रदेशांमध्ये कमी असताना कोकण विभागात ते प्रमाण २९२ विद्यार्थी असे अत्यंत कमी आहेत. आपण असे स्पष्ट दर्शवू शकतो की, वरील प्रमाण (गुणोत्तर) असल्याने गणक व निर्देशांक या दोन्हीहीकडून बाधित होऊ शकतो.

महाराष्ट्र राज्यातील सर्व ४३ वैद्यकीय महाविद्यालयांत व रुग्णालयांत एकत्र ३२,४५२५ खाटा आहेत. वैद्यकीय महाविद्यालय याच्या रुग्णालयातील खाटा सर्वसाधारण रुग्णालयातील नेहमीच्या खाटांहून भिन्न आहेत हे दर्शविण्यासाठी मूलभूत विशेषज्ञांच्या तरतुद असली पाहीजे. या संबंधात पुढील खालील परिच्छेदात अध्यापन खाटा (teaching bed) ही संज्ञा वापरण्यात आलेली आहे. प्रति एक लाख लोकसंख्येमागे '२९ अध्यापन खाटा (teaching bed) ही राज्याची सरासरी आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात किमान ५०० खाटा असणे अपेक्षित आहे. १८ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारा कोणताही जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय स्थापन

करण्यासाठी योग्य आहे.

१८ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या आणि अध्यापन खाटा (teaching bed) चे प्रमाण हे लोकसंख्येचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा खूप कमी असणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यासाठी तीन प्रवर्गांमध्ये गटवारी करण्यात येऊ शकते, बीड, नांदेड व यवतमाळ या जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेत, परंतु, या जिल्ह्यातील रुग्णालयातील खाटांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा खूप कमी आहे. या जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील खाटांची संख्या वाढविण्यात यावी आणि वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशांची संख्या सुद्धा प्रमाणबद्धरीत्या वाढविण्यात यावी. अमरावती, जळगाव, नाशिक व रायगड जिल्ह्यांमध्ये खाजगी वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये आहेत. या जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र शासनाकडे दोन पर्याय आहेत. पहिला पर्याय महाराष्ट्र शासन या जिल्ह्यांमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये सुरू करू शकते, असा आहे. दुसरा पर्याय, खाजगी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना त्यांच्या खाटांमध्ये वाढ करण्यासाठी व परिणामत: वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश वाढविण्यासाठी उत्तेजन देण्यात यावे. जालना, परभणी, बुलढाणा व चंद्रपूरसह जिल्ह्यांचा तिसरा प्रवर्ग आहे, जेथे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये नाही. अग्रक्रमाने महाराष्ट्र शासनाकडून वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये सुरू करण्यात यावीत.

अभियांत्रिकी महाविद्यालयासारखा येथेही केंद्रिकृत प्रवेश असल्याने, प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक महाविद्यालय स्थापन करण्यासाठी कोणीही युक्तिवाद करू शकत नाही. तथापि, **या प्रकरणात, सभोवतालच्या परिसरात आरोग्यविषयक सेवा सुविधा आणि दर्जा यात स्वाभाविक सुधारणा करून संलग्न खाटांच्या रुग्णालयासह वैद्यकीय शिक्षण महाविद्यालयाच्या उभारणीमुळे अनुषांगिक लाभ होत असल्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सरकारी सहभाग आवश्यक आहे.** अशाप्रकारे, शासन एकतर स्वत: मागास प्रदेशांमध्ये अशी महाविद्यालये व विद्यापीठ उभारू शकते किंवा नामवंत/दर्जेदार खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांना निदान अनुदाने पुरवू शकते, त्यामुळे ते एकंदरीत अधिक परवडण्यायोग्य दर्जेदार वैद्यकीय शिक्षण देऊ शकेल. या ठिकाणी केवळ पदवीचे शिक्षण नाही, परंतु सहाय्यभूत पदविका व प्रमाणपत्रे यामुळे सुद्धा या व्यवसायांमध्ये असलेली बळाची कमतरता भरून निघेल.

अशाप्रकारे सामान्यत: सर्व वैद्यकीय महाविद्यालये व जिल्हे परिचर्या महाविद्यालयांना जोडलेली असावीत. सरकारी क्षेत्रातील परिचर्या महाविद्यालये आजारी लोकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी त्यांच्या जागा वाढवू शकतात. आरोग्य सेवेमध्ये सध्याच्या मनुष्य बळास सहाय्य करणारा बी.एस.सी. सामूहिक आरोग्य अभ्यासक्रम (कम्युनिटी हेल्थ कोर्स) सुरू करण्यात यावा. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, त्यांना अनुज्ञप्ति मिळालेले व्यवसायी म्हणून काम करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून परवानगी देण्यात यावी.

१२.१.७ कृषिविषयक शिक्षण

कृषिविषयक शिक्षण, (जे, नवीन शेतीसाठी व तिच्या विस्तारासाठी क्षमता निर्मिती करते) राज्यामध्ये शेतीच्या वाढीसाठी आवश्यक घटक आहे. जर सुशिक्षित व कुशल मानवी स्त्रोत कृषि क्षेत्रात दाखल झाले तर नवीन शेती परिणाम देऊ शकते. या संदर्भात नवीन विद्यापीठे, महाविद्यालये व शाळा उघडून कृषिविषयक शिक्षणाचा विस्तार करण्याची तातडीची गरज आहे. महाराष्ट्रात नऊ कृषि हवामानविषयक क्षेत्रे आहेत व या प्रत्येक कृषि क्षेत्रात निरनिराळ्या आवश्यकता आहेत. कृषिविषयक संशोधन व शिक्षणावर क्षेत्रनिहाय लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. संशोधन व विस्ताराने, अध्यापनास, नवीन कृषिविषयक प्रक्रिया, (यापेक्षाही अधिक; आमच्या अहवालामध्ये कृषिविषयक प्रकरण पहा) विशिष्ट प्रदेशात महत्वाच्या सोयीच्या क्षेत्राशी संबंधित कृषि प्रक्रिया व तंत्रज्ञान यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. याशिवाय, विद्यापीठे म्हणून सर्वसाधारण क्षेत्रात ते त्यांचे संशोधन, त्याचप्रमाणे अन्य विद्यापीठांशी असलेले नेटवर्किंग सुरू ठेवतील. कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील विद्यमान विद्यापीठांना प्रदेशातील कृषिविषयक हवामानाच्या क्षेत्राच्या गरजा पुरवण्यासाठी स्थूलमानाने पायाभूत सुविधा आहेत, तथापि, पूर्व

व पश्चिम विदर्भात कृषिविषयक हवामानाची स्पष्टपणे निरनिराळी परिस्थिती आहे.

म्हणून पूर्व विदर्भ प्रदेशाच्या वाढीसाठी आणखी एक किंवा अनेक कृषिविषयक विद्यापीठे पूर्व विदर्भासाठी आवश्यक आहेत. याचे ठिकाण एकतर गडचिरोली किंवा शिंदेवाही असू शकते. तेथे एखादा वनशास्त्राशी संबंधित एकात्मीक घटक असला पाहिजे. (उत्पादक स्त्रोत म्हणून वनांचे अध्यापन करणे व संशोधन करणे; त्यामुळे त्याचा खरोखर एक परिपूर्ण वनशास्त्र विद्यापीठ म्हणून विचार करता येऊ शकेल.) यासोबतच प्रत्येक तालुक्यात कृषिविषयक शिक्षणासाठी सुविधा त्याचप्रमाणे सामूहिक महाविद्यालयाद्वारे कृषि व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्यात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून असणारी सुमारे ५५% लोकसंख्या ग्रामीण क्षेत्रात राहात आहे. कृषिविषयक शिक्षणाचा स्तर हा उच्च स्तरावर (पदवी) आणि कनिष्ठ स्तरावर (पदविका/प्रमाणपत्र) तुलनात्मक दृष्टीने पाहता संपूर्ण प्रदेशामध्ये खालावलेला आहे. विज्ञान शाखेसह उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (एचएससी) उत्तीर्ण झालेले केवळ ३.३ टक्के विद्यार्थी कृषि पदवीसाठी जातात आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (एसएससी) उत्तीर्ण झालेले १.२ टक्के विद्यार्थी कृषि तंत्रज्ञान शाळेत (एटीएस) प्रवेश घेतात. जरी ग्रामीण लोकसंख्येसाठी कृषि व संलग्न कार्यक्रम, रोजगाराचे मुख्य स्रोत असले तरी, त्यानुरूप शिक्षणाच्या सुविधा व पायाभूत सुविधा पूर्णपणे अपुऱ्या आहेत. आकडेवारी असे देखील दर्शविते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेणारे विद्याथी २५ टक्के, मराठवाड्यामध्ये ३१ टक्के आणि विदर्भामध्ये २९ टक्के आहेत. राज्य स्तरावर कृषि व संलग्न पदव्यांची प्रवेशक्षमता केवळ ३.३ टक्के व प्रदेशांमध्ये २.५ ते ६.८ टक्के आहे.

१२.१.७.१ कृषिविषयक संशोधन

राज्यात कृषिविषयक पायाभूत सुविधांचे संशोधन हा कृषि विकासाचा मुख्य कणा आहे. राज्याकडून स्थापन करण्यात आलेली विद्यमान संशोधन केंद्रे असे दर्शवितात की, पश्चिम महाराष्ट्रात १.५३ लाख हेक्टर्ससाठी, मराठवाड्यात १.७७ लाख हेक्टर्ससाठी आणि विदर्भात २.६३ लाख हेक्टर्ससाठी एक संशोधन केंद्र आहे; तुलनात्मक दृष्टिने पाहता संशोधनासाठी कोकणात चांगल्या पायाभूत सुविधा आहेत. माहिती असे दर्शविते की, अन्य प्रदेशांशी तुलना केल्यास, विदर्भात नवीन संशोधन केंद्राच्या स्थापनेवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. ही संशोधन केंद्रे आता सामूहिक महाविद्यालयांशी जोडता येऊ शकतील आणि प्रचलित विद्यापीठांची परिणामकारी विस्तार केंद्रे म्हणून काम करू शकतील. असे सुचविण्यात आले आहे की, सध्या हाती घेतलेल्या केवळ शैक्षणिक महत्वाच्या संशोधनापेक्षा कृषि विद्यापीठांनी कार्यतंत्रात्मक व समस्याभिमुख संशोधन केले पाहिजे (ज्यासाठी अतिरिक्त निधी देण्यात यावा). असे करत असताना, हे आवश्यक आहे की, माहिती तंत्रज्ञानक्षम सेवेने (आयटीइएस) कमाल मर्यादेपर्यंत पाठबळ दिले पाहिजे म्हणजे, यासाठी आस्थापनेचा संपूर्ण लवाजमा आवश्यक नाही. योग्य संशोधनाच्या कार्यक्रमपत्रिकेविषयी तपशिलासाठी आमच्या अहवालातील कृषिविषयक प्रकरणाचा संदर्भ घ्यावा.

कृषि व संलग्न क्षेत्रांमध्ये रोजगारासाठी अतिशय मोठी संभाव्य साधनसंपत्ती आहे आणि नवीन कृषिविषयक दृष्टिकोनांसह कार्ये, व्यवस्थापन, दुरुस्ती व देखभाल, बियाणे, रोपमळा, वनस्पतीचे रक्षण, हंगामोत्तर व प्रक्रिया, पशुधनाचे व्यवस्थापन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय व अन्य उपक्रमांमध्ये विशेषीकृत कौशल्याची गरज असेल. **प्रत्येक प्रदेशात चार आठवडे ते दोन वर्षेपर्यंत कालावधीचा एकाच ठिकाणी असलेल्या व व्यवसाय प्रकारविनिर्दिष्ट प्रशिक्षणासह आणि प्रत्येक व्यवसाय प्रकारामध्ये पर्याप्त प्रवेश क्षमतेसह, एक व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था असेल.**

१२.१.८ आदिवासी लोकांचे शिक्षण

आदिवासी क्षेत्रातील व आदिवासी लोकांच्या शिक्षणामध्ये योग्य ज्ञान व आवश्यक कौशल्याचे शिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित केलेच पाहिजे. त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे प्रयोजन आहे. तथापि, रोजगाराच्या शोधार्थ ते स्वत:च्या भूमितून अन्यत्र स्थलांतरित होऊ नयेत. उपक्रम परिचालकीय विकास हा प्रयत्नाच्या केंद्रस्थानी असेल.

शिक्षणपद्धती अर्थपूर्ण बनविण्यासाठी अभ्यासक्रम सामाजिक प्रश्नांशी जोडण्यात यावा. त्यासाठी खालील अभ्यासक्रम / अभ्यास केंद्रे योग्य असल्याचे दिसून येते:

१. सामाजिक कार्यामध्ये पदवी / पदविका

२. सामाजिक सेवा संघटनेच्या व्यवस्थापनामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम

३. मानववंशशास्त्रामध्ये पदवी अभ्यासक्रम

४. खनिकर्म, खनिजद्रव्ये / भूगर्भशास्त्र यामध्ये पदविका

५. (अ) नक्षलवादाच्या प्रश्नाचे विश्लेषण करणे, (ब) वन विकास, (क) पर्यटन, (ड) आरोग्य कार्यकर्ते, (इ) मत्स्यव्यवसाय व (फ) स्थानिक प्रशिक्षकांसाठी अभ्यास केंद्रे

६. किमान पायाभूत सोयी कार्यक्रमासाठी शैक्षणिक विकासाची योजना.

अलीकडेच नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठातून, विभागणी करून गडचिरोलीमध्ये, गोंडवाना विद्यापीठ स्थापन केले गेले आहे. प्रदेशाच्या विकासाच्या गरजा पुरविण्यासाठी, स्त्रोतांच्या नैसर्गिक देणगीच्या आधारावर व उपलब्ध स्थानिक तज्ञांच्या विनिर्दिष्टपणे काही अभ्यासक्रम सुरू करण्यात येऊ शकतात. सामाजिक कार्याचा स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची गरज आहे, ज्याच्या अधीन विद्यार्थ्यांसाठी, सामाजिक सेवा संघटनेच्या व्यवस्थापनामध्ये पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम विशेषकरून तयार करण्यात येऊ शकतात. आदिवासी अभ्यास केंद्रदेखील स्थापन करता येऊ शकते आणि मानववंशशास्त्र व खनिकर्म, खनिजद्रव्ये यावरील अभ्यासक्रम हितसंबंधिताकरिता आणि अंतिमत: प्रदेशाच्या विकासासाठी उपयुक्त असतील. प्रश्नांची गुंतागुंत समजावून घेण्यासाठी आणि नागालँड व मिझोरामच्या धर्तीवर डाव्यांच्या जहालमतवादी समस्यांना पर्यायी उपाय शोधण्याकरिता प्रदेशाच्या तरुणांच्या मनात सकारात्मक विचाराचा विकास करण्यासाठी स्वतंत्र विभाग उपयुक्त असेल. तेथे सध्याच्या विघातक कार्याकडून विधायक कार्याकडे नेणारा कार्यक्रम असू शकतो. गडचिरोली जिल्ह्यामध्ये, राहणीमानाचा दर्जा सुधारण्यामध्ये बालमृत्यूचे मोठे प्रमाण व कुपोषण हे मुख्य अडथळे आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक संशोधकांकडून विशेषकरून अभ्यास करण्यात यावा. जैवविविधता व वनपर्यटन गडचिरोलीच्या अन्य महत्वाच्या बाजू आहेत. अध्ययन केंद्रे स्थापन करून ही क्षेत्रेसुद्धा विकसित करता येऊ शकतात. बांबू हस्तव्यवसाय / वेतकाम, रेशीमउद्योग, मध गोळा करणे, डिंक व अन्य आयुर्वेदिक वैद्यकीय वनस्पती यासारख्या, प्रदेशाच्या गौण वन उत्पादनावर लक्ष केंद्रित करून, उपक्रम परिचालकीय कौशल्ये सहकाराच्या पद्धतीने सुद्धा विकसित करता येऊ शकतात. आपण हा विभाग 'आदिवासी' प्रकरणाकडे निर्देश करून सोडून देऊ, जेथे आपण मोठ्या तपशिलात शैक्षणिक बाजूंवर सविस्तर मांडणी केली आहे.

१२.२ शिक्षणाच्या हक्कापलीकडे– शिक्षणाचा दर्जा

शिक्षणाचा हक्क हा एक योग्य निर्णय आहे तो, सुरूवातीच्या अडथळ्यानंतर स्थिर होईल, हे मान्य करून, आपण शिक्षणाच्या दर्जावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. दुर्दैवाने, शिक्षणामधील प्रादेशिक असमतोलावरील बहुतांश चर्चांमध्ये किंवा अन्य मार्गाने, आम्ही पायाभूत सुविधांचे वास्तव परिणाम व त्यावरील खर्च (आगत) यावर लक्ष केंद्रित करतो आणि दर्जा गमावला असे म्हणण्याकडे आपली प्रवृत्ती असते आणि वस्तूत: त्यावरूनच निष्कर्ष काढले जातात. हे चांगल्याप्रकारे स्वीकारण्यात आले

आहे की, शाळेतील शिक्षणाचा दर्जा, शाळेत जाणे हा बालकास प्रेरणा देणारा अनुभव असावा याची खात्री करणे आणि हे प्राप्त करण्यासाठी, जे, घटक उत्सुकतेस उत्तेजन देतात, सहभागात्मक अध्ययनाची खात्री करतात, विकासाशी संबंधित जीवनविषयक कौशल्यास मदत करतात व बालकास पूरक आरोग्यविषयक, सौंदर्य अभिरूची असणारे आनंदी वातावरण निर्माण करतात, त्यांचा समावेश केला पाहिजे. वरील विवेचनातून हे मुद्दे व त्यांची अशी उत्तरे सुस्पष्ट झालेली आहेत. ***एकमताने व कार्यतंत्रात्मक पद्धतीने अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची गरज आहे.***

प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात, अध्ययनाच्या ध्येयानुसार, ज्ञानाची प्राप्ती करण्यासंबंधीचा दर्जा व जीवनविषयक कौशल्ये व रोजगाराशी अशा ज्ञानाचा संबंध याकडे आम्हाला लक्ष द्यावे लागेल. जे, असंदिग्धपणे ज्ञानाच्या प्राप्तीचा स्तर व प्राप्त केलेल्या ज्ञानाची जीवनविषयक कौशल्ये व रोजगाराशी असलेला संबंध दर्शवतील, दर्शकांकडे आम्ही पाहिलेले नाही परंतु आम्हाला असे दर्शक माहित आहेत की, पुष्कळ मागासलेल्या क्षेत्रांमध्ये आणि अधिक महत्वपूर्णरीत्या आदिवासी क्षेत्रांमध्ये शिक्षणाचा दर्जा कमी प्रतीचा आहे. ***गळतीचे प्रमाण, अर्ध्यावर शिक्षण सोडून देणे, स्त्री–पुरुषांतील मोठे अंतर, रोजगाराभिमुख व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रम इत्यादीकडे कमी आकर्षण, अशा मानकांमध्ये ते प्रतिबिंबित झालेले आहे.*** प्राथमिक स्तरावर अपेक्षित नैपुण्यानुसार, नैपुण्याचा स्तर दर्शविणारा नमुना अभ्यास आमच्या अहवालात विनिर्दिष्ट करण्यात आलेला आहे.

१२.२.१ शिक्षणाचा दर्जा निश्चित करणारे घटक

१. बालक केंद्रित अध्यापन – अध्ययनाचे प्रायोगिक अभ्यास.

२. वर्गखोलीशी संबंधित अध्यापन – अध्ययनाच्या साहित्याचा वापर.

३. विद्यार्थ्यांच्या आकलनाचे सातत्याने निर्धारण.

४. शिक्षकांचा सातत्याने व्यावसायिक विकास व प्रशिक्षण.

५. अध्यापन अध्ययन पद्धतींचे नियमित मूल्यमापन.

६. शिक्षकांनी अध्यापनास समर्पित केलेली वेळ.

७. शालेय भोजन व आरोग्याशी संबंधित कार्यक्रम हाती घेणे.

८. विशेषत: मुलींसाठी, स्वतंत्रपणे, स्वच्छ पेयजल व स्वच्छतेच्या सुविधांची उपलब्धता.

या सर्वांचा, दर्जावर सकारात्मक परिणाम व्हायला पाहिजे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध कार्यक्रमांनी, वरील पुष्कळ बाबींवर भर दिलेला असला आणि संस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी, मागासलेल्या क्षेत्रांमध्ये आतापावेतो अपेक्षेइतका परिणाम झालेला नाही.

१२.२.२ विनिर्दिष्ट शिफारशी :

१. शिक्षणाच्या हक्कामध्ये व राज्य सरकारच्या अन्य विविध धोरणात्मक दस्तऐवजांमध्ये मुख्य भौतिक पायाभूत सुविधांसाठी विहित केलेली मानके व प्रमाणके साध्य केली पाहिजेत आणि टिकवून ठेवली पाहिजेत आणि यासंबंधात शून्य सहिष्णुता धोरण (काहीही खपवून न घेण्याचे धोरण) स्वीकारण्यात यावे.

२. पुरेशा वित्तीय तरतुदी करण्यात याव्यात.

३. पायाभूत सुविधांचा दर्जा व त्यांची देखभाल (विशेषत: मुलींच्या प्रसाधनगृहांमधून लुप्त झाल्याचे दिसून येणारी) जिल्ह्या जिल्ह्यांमध्ये भिन्नता आहे आणि राज्यामध्ये अत्यंत असमाधानकारक असल्याचे समजले आहे. इमारतीच्या व अन्य पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी व देखभालीसाठी असलेली संस्थात्मक व्यवस्था जर बदलावयाची नसेल तर, तिचे बळकटीकरण करण्याची गरज आहे. सद्य:स्थितीत, वापरकर्त्याचे यासंबंधात,

काहीही म्हणणे नाही. विकेंद्रीकरण स्तराचे बळकटीकरण करण्याशी संबंधित असणाऱ्या आमच्या शिफारशींनुरूप, राज्य व जिल्हा परिषद या दोन्ही स्तरावर (किंवा निम्नस्तरावर सुध्दा) शिक्षण विभागाच्या अंतर्गत एक स्वतंत्र संघटनेची निर्मिती करणे हा एक उपाय होऊ शकतो.

४. शिक्षणाच्या आशयाचा दर्जा व प्रस्तुतता यात विचारपूर्वक वाढ करण्याची गरज आहे आणि नवीन व योग्य अध्यापनशास्त्राकरिता शिक्षकांचे पुनर्प्रशिक्षण सुरू करण्याची गरज आहे.

५. शालेय अधिस्वीकृतीची पद्धती, विशेषत: माध्यमिक स्तरावर सुरू करण्यात यावी. ही पद्धती, दोन्हींसाठी, खाजगी, तसेच सार्वजनिक निधी प्राप्त शाळा या दोन्हींसाठी सक्तीची असेल.

६. प्रस्तावित राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण प्रमाणनाचे प्रतिपूरक करून त्याद्वारे शालेय स्तरावर, व्यावसायिक/उपजीविकेच्या कौशल्याचे शिक्षण सुरु करण्याची आम्ही स्वतंत्रपणे शिफारस केलेली आहे.

७. राज्याच्या विविध भागांतील लौकिक असलेल्या संस्थांना, मागासलेल्या क्षेत्रांमध्ये व अधिक विशेष म्हणजे, आदिवासी क्षेत्रांमध्ये, त्यांची शैक्षणिक प्रांगणे (कॅम्पसेस) उभारण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. माध्यमिक स्तर व तांत्रिक स्तर या दोन्ही स्तरावरील शिक्षणाचा समावेश असला पाहिजे (आयटी/आयटीएसला प्रतिपूरक करता येऊ शकेल)

८. प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता चौथीनंतरच्या व इयत्ता सातवी नंतरच्या स्तरांवर सरकारी परीक्षा सुरू करण्यात याव्यात. ही परीक्षा गंभीरपणे घेण्यात यावी आणि प्राथमिक स्तरावर देण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या दर्जाचे मोजमाप म्हणून या परीक्षेच्या निकालांचा वापर करण्यात यावा.

९. इयत्ता सातवीच्या स्तरापर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी, सार्वजनिक क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावीत असले तरी माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावरील आणि तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणामधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या व विद्यार्थ्यांच्या रोजगार क्षमता सुधारण्याच्या दृष्टिने, खाजगी क्षेत्राचा प्रवेश महत्त्वाचा आहे. खाजगी संस्थांमधील कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी सक्षम व परिणामकारक विनियामक यंत्रणा उभारण्यात यावी.

१०. आम्ही असे मानतो की, एक प्रमाणक म्हणून इयत्ता आठवीच्या ऐवजी, एक प्रमाणक म्हणून त्याला इयत्ता दहावीपर्यंत वाढवले पाहिजे. या विस्तार करण्याच्या आदेशाची पूर्तता करताना, प्राथम्याच्या आधारावर मुली, बालक व आदिवासी व्यक्ती, अल्पसंख्याक समुदाय व मागास जाती यांसारख्या दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष देण्यात यावे. आम्हाला असे वाटते की, एकतर, प्रत्यक्षपणे त्यांची निर्मिती करून (संघटना/संस्थांची उभारणी करून) किंवा सार्वजनिक खाजगी भागिदारीतून त्यांना सुविधा पुरवून व प्रवेशाचा खर्च विनियमित करून किंवा नंतर ***पुन्हा सहेतूक व सशर्त रोख रक्कम स्थानांतरित करून*** त्याद्वारे राज्याने अतिरिक्त आवश्यक मूलभूत गोष्टी पुरवावयाच्या आहेत.

११. मराठवाड्यामध्ये मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे आणि म्हणून, महिलांसाठी वसतिगृहे व अन्य संबंधित पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त वित्तीय तरतूद करण्याची गरज आहे. महिलांना, त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी संरक्षण व सुरक्षा देण्यासाठी विशेष निधी देण्यात यावा आणि येण्या-जाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

१२.२.३ क्षेत्र विनिर्दिष्ट व्यवसाय पाठ्यक्रम: स्पष्टीकरण:

स्थानिक साधनसंपत्तीच्या देणगीसह रोजगाराच्या भावी संधी लक्षात घेऊन, विशेषत: क्षेत्र विनिर्दिष्ट लोकसंख्येची उचित कौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टिने उद्योग, व्यापार व वाणिज्य व कृषि यांच्या सहकार्याने पुढील व्यवसाय पाठ्यक्रमांचा विचार करता येऊ शकेल, त्याचा आराखडा तयार करता येऊ शकेल आणि त्याची

अंमलबजावणी करता येऊ शकेल:

१. (अ) शेतीची आधुनिक तंत्रे (ब) फलोत्पादन (क) रेशीम उद्योग (ड) कुक्कुटपालन (इ) शेतीच्या साधनसामग्रीची देखभाल (फ) जलसंधारणाची तंत्रे (ग) मृदसंधारण (ह) शेतीची कार्यचालक यंत्रसामग्री व आवश्यक स्वयंचलित वाहने (आय) अभयारण्यासाठी पर्यटक मार्गदर्शक आणि (जे) वीजतंत्रीचा पाठ्यक्रम. प्रमाणपत्र देणे हा प्रशिक्षण देण्याचा मुख्य उद्देश नसावा. पाठ्यक्रम पूर्ण झाल्यानंतर, शिकणाऱ्याने त्याचा स्वत:चा चरितार्थ चालविण्यासाठी, लागवडीयोग्य जमीन कसण्यासाठी किंवा एखादा उपक्रम चालविण्यासाठी किंवा नियोक्त्याची लाभदायक सेवा करण्यासाठी त्याच्या स्वत:मध्ये आत्मविश्वास असला पाहिजे.

२. प्रकल्पाभिमुख प्रशिक्षण/अध्ययन: राज्य व राष्ट्रीय महामार्ग यांसारख्या प्रकल्पांची मोठी संख्या, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विमानतळे व कपडे तयार करण्यासबंधीचे समूह किंवा विमानाची देखभाल करण्याची युनिटे सुरू होणे शक्य आहे. मनुष्यबळाच्या आवश्यकतेची परिगणना केल्यानंतर, औपचारिक शिक्षणाचा निम्न स्तर असणाऱ्या किंवा अजिबात शिक्षण नसणाऱ्या स्थानिक लोकसंख्येसाठी प्रशिक्षण कार्यक्रम तयार केले पाहिजेत (अ) रस्त्यांचे बांधकाम (ब) परिसर स्वच्छ करणे व निगा राखणे (क) सुरक्षा (ड) विद्युत तारांचे जाळे (इ) सुतारकाम (फ) नळकाम (ग) कताई, आणि (ह) विणकाम यांतील पाठ्यक्रम सिध्दांतावर खूपच कमी भर देऊन प्रशिक्षण कार्यास पसंती देण्यात यावी. लोकांनी त्यांच्याकडे रोजगाराभिमुख पाठ्यक्रम म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक पाठ्यक्रमाचे आणखी (एक) नवशिक्यांचा पाठ्यक्रम (दोन) प्रारंभिक पाठ्यक्रम व (तीन) प्रगत अभ्यासक्रम यांमध्ये उपविभागणी केली जाऊ शकते.

३. विनिर्दिष्ट प्रदेशाचे पाठ्यक्रम :

ज्यांचा विशिष्ट उद्योगात सहभागी होण्याचा इरादा आहे अशा पदव्युत्तर पदवी, पदवी किंवा पदविका धारकांसाठी हे पाठ्यक्रम तयार करण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, महाजनको, कोराडी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी ऊर्जा अभियांत्रिकीची ओळख करून देण्याकरिता सुट्टीकालीन प्रशिक्षण देत आहे. उद्योगाशी ओळख होण्याकरिता पदवी/पदविका विद्यार्थ्यांसाठी महिनाभराचा प्रमाणपत्र पाठ्यक्रम देखील आयोजित केला जाऊ शकतो,. या प्रकारचे पाठ्यक्रम/प्रशिक्षण कार्यक्रम, विशिष्ट उद्योगाच्या महत्त्वाकांक्षी रोजगार क्षमता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरतील. त्याचप्रमाणे हे पाठ्यक्रम (अ) लोखंड व पोलाद ओतकाम, रोलिंग व री रोलिंग (ब) स्वयंचलित चारचाकी, दुचाकी (क) अभियांत्रिकी (ड) प्लास्टिक्स (इ) कपडे तयार करणे यांसारख्या काही नावाच्या उद्योगांसाठी विशेष पाठ्यक्रम तयार करता येऊ शकेल.

१२.२.४ कौशल्य संपादन करण्यासाठी प्रोत्साहनावर आधारित योजना (आयबीएसएस)

हे अत्यावश्यक आहे की, उच्च शैक्षणिक संस्था, दर्जा व विश्वसनीयतेत सुधारणा करीत असल्याने त्यांमध्ये पारदर्शकता व समाजाप्रती उत्तरदायित्व असलेच पाहिजे. एका क्षेत्रात लागू होणारे मार्गदर्शक तत्त्व, सर्वच बाबतीत योग्य ठरत नसल्याने, प्रदेशविशिष्ट उपाययोजना करण्याची गरज वाटली आणि विकासातील तूट असलेल्या प्रदेशांकडे व्यवधान (लक्ष) देण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

आपल्या राज्यातील कुशल मनुष्य बळाचे वाढते महत्त्व विचारात घेता, तरुण पिढीच्या रोजगार क्षमतेत वाढ करून त्याद्वारे कौशल्य संपादन करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या योजना तयार करणे उपयुक्त ठरेल. यासंबंधी आम्ही, कौशल्य संपादन करण्यासाठी प्रोत्साहनावर आधारित योजनेची शिफारस (आयबीएसएसए) केली आहे. या योजनेअंतर्गत, दोन विविध टप्प्यांमध्ये कौशल्याचा विकास करण्यासाठी प्रमाणके (व्हाऊचर्स) दिले जाऊ शकतात. ज्यांनी इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे, ते, रुपये १०,०००/- इतकी रक्कम मिळण्यास हक्कदार असतील. परंतु त्यांनी राज्याच्या संबंधित प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या व्यवसाय पाठ्यक्रमासाठी शासनमान्य संस्थेत प्रवेश घेतलेला असावा. प्रमाणपत्र पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना रुपये १०,०००/- चे अतिरिक्त वित्तीय

सहाय्य देता येईल. या प्रोत्साहनाचा (संबंधित पाठ्यक्रम असलेले समुह महाविद्यालये यासारख्या आधारभूत संस्थात्मक सुधारणांच्या मदतीने, परिणाम, युवकांच्या रोजगार क्षमतेत व स्वयंरोजगारक्षमतेत वाढ होण्यात होईल. राज्यकोषाची वित्तीय बांधिलकी, वर्ष २०११ मधील इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, आम्ही उत्तीर्ण होणाऱ्यांची टक्केवारी जवळपास ६० टक्के इतकी गृहित धरतो. जेव्हा,योजना सार्वत्रिकपणे व पूर्णपणे कार्यान्वित होईल, तेव्हा व्हाऊचर योजनेचा एकूण अंदाज रुपये २०००/- कोटींची मागणी करता येईल. ही, योजना टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात यावी. साधनसंपत्तीची अडचण विचारात घेता पहिल्या टप्प्यात, ग्रामीण व मागासलेल्या क्षेत्रातील लहान शहरांचा पूर्णपणे समावेश करता येईल आणि अन्य भागात, काही अंशी समावेश करता येईल. अशाप्रकारे, कालदर्शक अर्थाने, साधनसंपत्तीची आवश्यकता, पुष्कळशी आटोक्यात ठेवण्यासारखी असेल. (संपूर्ण अर्थाने ती पूर्णपणे आटोक्यात ठेवण्यासारखी आहे.) तसेच, आणखी अशीही नोंद घेण्याची गरज आहे की, ती योजनेतर/महसुली खर्चाच्या स्वरुपात असेल.

या योजनेच्या यशाची खात्री करण्यासाठी उचित संनियंत्रणकारी यंत्रणेची रचना करावी. बँकांच्या सहकार्याने, शासकीय प्राधिकरणांनी एक कक्ष स्थापन करावा (हे काम वित्तीय सहभागाचा घटक होऊ शकेल.) व्यावसायिक पाठ्यक्रम हाती घेताना, जर उमेदवाराने, आर्थिकदृष्ट्या लाभदायक काम हाती घेतले असेल आणि जर त्याला प्राधिकाऱ्याने (प्राचार्य/तंत्र शिक्षण संस्थांचा प्रभारी) यथोचितपणे प्रमाणित केलेले असेल तर, उपरोल्लिखित कक्षामार्फत, आणखी रुपये १०,०००/- इतकी रक्कम संवितरित करण्यात येईल. दोन महिन्याच्या मुदतीचा कालावधी संपल्यानंतर, नंतरच्या दहा महिन्यांसाठी दरमहा रुपये १०००/- इतकी रक्कम परत करण्यात येईल. एकदा का लाभाधिकाऱ्याच्या कामाविषयी संनियंत्रण प्राधिकाऱ्याची खात्री पटली की, त्याला, परत करण्याच्या आधारावर, आणखी रक्कम संवितरित करण्यात येईल. ही संभवत: स्थानिक लोकांच्या स्वयंविकासातून प्रादेशिक वाढीची काळजी घेईल.

१२.३ नियतवाटप सूत्राकरिता निश्चित केलेले निर्देशांक :

विकासाच्या तफावतीमधील शिक्षणाचा घटक काढण्याचा प्रयत्न करताना, आम्ही, शिक्षणाचे विविध स्तर व पैलू यांच्याशी संबंधित असलेले विविध प्रश्न (विषय) विचारात घेतलेले असले तरी, नियतवाटप सूत्राकरिता वापरावयाच्या निर्देशांकासाठी, आम्ही दोन निर्देशांकावर लक्ष केंद्रित केले आहे. प्रादेशिक असमतोल तसेच अधिकृत स्त्रोताकडून मिळालेल्या विश्वसनीय व सुसंगत आकडेवारीच्या उपलब्धतेवर आधारित असणारा फलवाद यांच्या संदर्भात साधनसंपत्तीचे नियोजन करण्याची गरज लक्षात घेऊन हे करण्यात आलेले आहे. निवडण्यात आलेले दोन निर्देशांक, नोंदणी केलेले एस.एस.सी. चे विद्यार्थी (प्रदेशांपर्यंत एकत्र केलेल्या जिल्हा स्तरावरील)आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रवेश क्षमता, (पुन्हा प्रत्येक जिल्हा व प्रदेशांपर्यंत एकत्रित केलेली) हे आहेत. तफावतीची परिगणना करण्याची आणि प्रमाण पद्धतीचे भारांक पद्धतीने अनुपालन करून नोंदणी करण्याची पद्धती, आम्ही स्वीकारली आहे आणि ती उप प्रकरणात स्पष्ट केली असून मूलभूत (तळाशी असलेली आकडेवारी) जोडपत्र ३.४ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

१२.४ साधनसंपत्तीची (निधीची) आवश्यकता :

आम्ही या प्रकरणात पुष्कळशा शिफारशी केल्या आहेत. आमच्या शिफारशी या मोठ्या प्रमाणावर धोरणकारी सुधारणांना चालणा देणाऱ्या असल्या तरी, शासनाने काही अतिरिक्त योजनांतर्गत साधनसंपत्तीची (निधीची) तरतूद करावयास हवी. आम्ही खाली तक्ता १२.५ देत असून त्यात साधनसंपत्तीची आवश्यकता अंदाजित करतो असे दिसून येते (आणि काही मर्यादेपर्यंत ते सत्य आहे) की, साधनसंपत्ती आवश्यकतांचा कोणताही प्रत्यक्ष प्रादेशिक परिमाण नाही. तथापि, विविध नवीन संस्था (कृषि, वैद्यकीय विद्यापीठांसारख्या) स्थापन करण्याविषयीच्या प्रकरणाच्या मजकुरातील शिफारशींकडे काळजीपूर्वक पाहिले तर, असे निदर्शनास येईल की, या शिफारशी अभिक्षेत्रीय समन्वय साधतात ज्यायोगे प्रादेशिक स्वरूप दर्शवितात. तसेच 'अंत्योदय'च्या तत्त्वामुळे आमच्या अहवालाद्वारे सर्वसाधारण सार्वत्रिक विषय माहित झाला असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या परिभाषेत, ते असे सूचित करते

की, कार्यक्रम अत्यंत मागासलेल्या प्रदेशापासून सुरू होणारे कालिक स्वरूप धारण करील. हे सुपरिचित आहे की, यापैकी काही क्षेत्रासाठी योजनांतर्गत साधनसंपत्ती (निधी) असेल परंतु, अन्य सामाजिक क्षेत्राप्रमाणे, तेथे मुख्यत: योजनेतर किंवा महसुली खर्चांची परिणाम स्वरूप सुरूवातीला देखील आवश्यकता असेल.

तक्ता १२.५: साधनसंपत्तीची (निधीची) आवश्यकता

अ.क्र.	प्रयोजन	रक्कम (रूपये कोटीमध्ये)	शेरा
१	२	३	४
१.	शालेय शिक्षण (शिक्षणाचा हक्क+) व मुलींची वसतिगृहे/ प्रसाधनगृहे/ स्वयंपाकगृह	सध्याच्या अंदाजपत्रकाशिवाय २०-२५ टक्के अधिक	आदिवासी / अल्पसंख्याक / महिला सर्वशिक्षा अभियान/संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम/मनरेगा हे उद्देश असलेल्या विशेष अभियान पद्धतीने काम करण्यासाठी असलेल्या निधीचा अध्यापनशास्त्र विषयक सुधारणा करण्यासाठी, शिक्षकाच्या प्रशिक्षणाद्वारे मेळ घालण्यासाठी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी वापरला जाऊ शकतो.
२.	नवीन विद्यापीठाची स्थापना करणे (५) (प्रादेशिक/वैद्यकीय) आणि विशेषकरून, प्रगत विज्ञान व आधुनिकीकरण	१५००	अंशत: निधासाठी, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानाचा निधी वापरला जाऊ शकतो.
३.	सामूहिक महाविद्यालये (प्रत्येक गटामध्ये) + व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था + आरोग्य संस्था	२०००	१२ व्या पंचवार्षिक योजनेने/राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानाने, प्रत्येक जिल्ह्यात सामूहिक महाविद्यालय प्रस्तावित करणे अपेक्षित आहे.
४.	व्हाऊचर योजना	२०००	काही जुन्या बाबींसह मागणीचालित अवस्थाबद्ध कार्यक्रम
५.	तांत्रिक संशोधन व विकास निधीची निर्मिती (टीआरडीएफ)	१०००	मोठ्या प्रमाणावर (परंतु तेवढेच नव्हे) तंत्रज्ञान क्षेत्रासाठी स्तर संशोधन उपक्रम व स्थानिक भाषेतून सॉफ्टवेअर (ओसीआर) विकसीत करण्यासाठी
६	**एकूण (२+५)**	**६५००**	

स्रोत: समितीच्या, शिक्षण उपगटाने पुरविलेली.

❖❖❖

प्रकरण १३

संपर्क जाळे विस्तृत करणे

१३.० प्रस्तावना

विविध प्रकारातील संपर्क यंत्रणा ही, आर्थिक विकासाकरिता एक महत्त्वाची पूर्वअट आहे. प्रारंभिक व वेगवान विकासात संपर्क यंत्रणेची भूमिका ही, सैद्धांतिक तसेच जागतिक अनुभवाधिष्ठित दस्तऐवजांमध्ये दिसून आलेली आहे. नेमकेपणाने सांगायचे तर, भारतात केल्या गेलेल्या विविध अभ्यासांद्वारे ही वस्तुस्थिती अधोरेखित करण्यात आली असून त्यासंबंधीच्या अहवालात असे सांगण्यात आले आहे की, महिलांसाठी आरक्षण देऊन पंचायत राज संस्थांचे प्रमुख/अध्यक्ष म्हणून, त्यांना अधिकार प्रदान करण्यात आल्यापासून अग्रक्रम द्यावयाच्या गरजा म्हणून पाणी, शिक्षण व संपर्क यंत्रणा यांसारख्या क्षेत्रांना अग्रक्रम देण्याची गरज निर्माण झाली आहे. सहजपणे पाणी आणण्यासाठी आणि त्यांच्या मुलांना शाळेत पोहचविण्यासाठी आणि आजारी व्यक्तींना प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आणि दवाखान्यांमध्ये घेऊन जाण्यासाठी सुद्धा अशा रस्ते संपर्क यंत्रणेची मदत होते, हे सत्य असून ही वस्तुस्थिती असलेल्या या निष्कर्षांबाबत आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. आमच्या दृष्टीने, अशी प्राथमिक रस्ते संपर्क यंत्रणा ही मूलभूत हक्काची बाब आहे आणि म्हणून, मंडळामध्ये विकासाच्या मूलभूत घटकाचे समानीकरण करायलाच हवे.

रस्ते संपर्क यंत्रणेचे उच्चतर आणि नानाविध प्रकार सुद्धा आहेत. ज्यामध्ये, बाजारपेठा, व्यवसायाच्या जागा, उच्च शैक्षणिक संस्था व शासकीय जागा आणि सर्वसाधारणपणे, व्यापक जागतिक महत्त्वाची ठिकाणे, या संपर्क यंत्रणांचा समावेश आहे. या प्रवर्गामध्ये जिल्हा मार्ग, राज्य व राष्ट्रीय महामार्ग येतात. चांगल्या दर्जाच्या रस्त्यांनी त्वरेने हालचाल करण्याच्या क्षमतेत वाढ होते, वाहतूक खर्च कमी होतो, सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी अग्रेसर असणाऱ्या बाजारपेठांपर्यंत सहजपणे पोहचता येते. याशिवाय, विकासाच्या विविध स्तरांवरील जिल्हे, प्रदेश आणि तसेच राज्ये, यांच्यामध्ये संपर्क यंत्रणा असते तेव्हा सहकार्याचा विकास होतो आणि सहवर्ती अध्ययन व अदानप्रदान यांमार्फत संपूर्ण आर्थिक घडामोंडीना चालना मिळते. राज्यांतर्गत आणि आंतरराज्यीय (संपूर्ण प्रदेशात पसरलेले) मोठे मार्ग प्रकल्प, दृश्यरित्या महत्त्वाचे प्रकल्प म्हणून ओळखले जात असले तरी, त्यांच्या परस्पर सकारात्मक प्रतिसादाच्या परिणामामुळे आणि व्यापार व वाणिज्य यांमध्ये होणाऱ्या सखोल (गाव ते शहर) वाढीमुळे त्या प्रकल्पांना भरपूर महत्त्व प्राप्त होते.

रस्ते हे, मोठ्या पायाभूत सुविधेचा केवळ एक भाग आहेत. **विमानतळे, बंदरे आणि बंदरसंपर्क यंत्रणा व रेल्वेच्या** संपर्क यंत्रणा, ऐतिहासिकदृष्ट्या व जागतिकदृष्ट्या, वेगवेगळ्या मार्गांनी, आर्थिक वाढीस आणि विकासाला गती देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. अनेक प्रकरणांमध्ये, अशाप्रकारच्या प्रकल्पांमार्फत असे मोठ्या प्रमाणात उत्तेजन देण्यासाठी, केंद्र सरकारच्या सक्रीय सहभागाची आवश्यकता असेल. केंद्र सरकारकडून यथोचित, सहाय्य मिळवण्यासाठी राज्य शासन आणि राजकीय नेतृत्व यांनी प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. एकात्मिक आर्थिक कार्यक्रमासाठींच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांचा खर्च कमी करण्याव्यतिरिक्त, अशा पायाभूत सेवांमुळे बाजारपेठा खुल्या होतात आणि राष्ट्रीय स्तरावर व अगदी जागतिक स्तरावर देखील मोठ्या खाजगी गुंतवणुकदारांना त्या आकर्षित करतात. जागतिकीकरण झालेल्या या विश्वात/जगात, तितक्याच जागतिक आकांक्षेसह एखाद्याला मोठ्या प्रमाणातील आणि विस्तृत स्वरूपातील जागतिक संधींबाबत विचार करावा लागेल. आपल्या दृष्टीने/आपल्या कार्यतंत्रासाठी जे वास्तविक आहे ते म्हणजे वाढीस गती देणे आणि ते यासाठी आवश्यक आहे की, बाजारपेठा लहान असल्यामुळे त्यांच्यावर कोणतेही निर्बंध येऊ नयेत आणि म्हणून, 'नेहमीच्या साध्या रस्त्यांव्यतिरिक्त, अन्य रस्त्यांचे महत्त्व संपर्क यंत्रणेत' गृहीत धरले आहे.

आधुनिक एकात्मीक जागतिक अर्थव्यवस्थेच्या, कामकाजात वेगळे वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणून जोडलेल्या सभोवतीच्या आणि मागच्या व पुढच्या जोडण्यांना, अशा उच्चतर प्रतीच्या संपर्क यंत्रणांची आवश्यकता असते. कदाचित येथे, गेल्या तीनपेक्षा अधिक दशकांपूर्वी भारतात झालेल्या दूरध्वनी क्षेत्रातील क्रांतीसदृश्य बदलांचे स्मरण करणे उपयोगी ठरेल. गरीबी व इतर या सारख्या अगदी मूलभूत समस्यांच्या मगरमिठीतून सुटण्याचा प्रयत्न करीत असलेल्या या देशात ही क्रांती वस्तुस्थितीस सोडून व अप्रस्तुत होती, असा दृष्टिकोन व्यक्त करून त्या क्रांतीचा उपहास झाला होता. या क्रांतीकडे बघण्याचा संशयास्पद दृष्टिकोन आणि उपहास करण्याच्या दृष्टितील चुकीचा युक्तीवाद आता उघडपणे दिसत आहे आणि हेतुपुरस्सर आणि अहेतुक अशी चांगली फलनिष्पत्ती कोणासही व सर्वांना दिसत आहे.

अंततः आणि याच भावनेने, ब्रॉडबँड संपर्क यंत्रणेच्या महत्त्वावर अधिक जोर देता येणार नाही. प्रादेशिक भाषेमध्ये सॉफ्टवेअर तयार करण्याचे प्रस्तुत काम (सहज शक्य व सहज साध्य असले तरी) फार अवघड असून त्यामुळे मागास प्रदेशांना व तेथील लोकांना खूप मोठ्या प्रमाणात प्रेरणा मिळेल. आधुनिक भारतीयांच्या वर्तमान उत्पादन संरचनेला आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अशा प्रकारच्या प्रस्तुत सहाय्यक पायाभूत सुविधेमुळे आर्थिक घडामोडींत (खासकरून, मुख्य साखळीच्या उच्चतर जबाबदारीत) मूल्यवर्धन उपलब्ध होईल आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे, त्यामुळे खरोखर जे करावयाचे आहे ते काम ***मुक्तपणे*** करता येईल. यामुळे मागास प्रदेशांतील आर्थिक विकासास आणि वाढीस व प्रगतीस गती मिळण्यास मदत होईल. यामुळे जी ***सकारात्मक संपर्क यंत्रणा*** निर्माण होईल त्यामुळे मागास प्रदेशांना आणि तेथील लोकांना आर्थिक वाढीची गती वाढविण्याच्या व विकासाच्या प्रक्रियेत पायरी-पायरीने अग्रेसर राहण्यासाठी मदत होईल. अशाप्रकारे, प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नाबाबतच्या दोन्ही मार्गासंबंधीचे दृष्टिकोन हे, वर व्यक्त केलेल्याप्रमाणे संपर्क यंत्रणेवरील आमच्या विचारांमध्ये प्रतिबिंबित होत आहे.

१३.१ रस्ते

पायाभूत सुविधांचा विकास हा, आर्थिक विकासाचा एक अविभाज्य भाग आहे. **सार्वजनिक बांधकाम विभागा**च्याबाबतीत, किंवा **महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सिडको** किंवा **मुंबई महानगर प्रदेश विकास महामंडळ** अगदी यांच्या बाबतीत देखील वाहतुकीच्या पायाभूत सुविधेमध्ये बंदरे, विमानतळे, रेल्वे, औद्योगिक केंद्रे, प्रमुख शहरे, नगरे आणि डोंगराळ, दुर्गम, आदिवास व विशेष क्षेत्रे यांसह गावे, यांच्यासाठी अधिक चांगल्या यंत्रणेची सुनिश्चिती करण्यासाठी रस्त्यांचे जाळे (नेटवर्क) तयार करण्याचा समावेश आहे.

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी, राज्यातील रस्त्यांची एकूण लांबी ३९,२४२ कि.मी. इतकी आणि घनता १२.७५ कि.मी. प्रती १०० चौरस मीटर क्षेत्रासाठी होती. २० वर्षांच्या रस्ते विकास योजनेमार्फत (१९६१-८१) या क्षेत्राची सुधारणा दृष्टिसमोर ठेवली होती. १,३२,२९८ कि.मी. इतक्या लांबीच्या आणि प्रती १०० चौरस मीटर क्षेत्रासाठी ४३ कि.मी. इतक्या घनतेच्या रस्त्यांचे लक्ष्य साध्य करण्याचे, या २० वर्षांच्या रस्ते विकास योजनेचे उद्दिष्ट होते. मार्च, १९८१ पर्यंत १,००,६३६३ कि.मी. इतक्या लांबीच्या रस्त्यांचा विकास पूर्ण केला होता आणि प्रती १०० चौरस मीटर क्षेत्रासाठी ३२.७ इतकी रस्त्याची घनता साध्य केली होती.

गावांचा आणि लहान शहरांचा विकास करण्याच्या दृष्टिने आणि तसेच, शहरे व मोठी शहरे यांमधील लोकांचे स्थलांतरण रोखण्याच्या दृष्टिने, दुसरी २० वर्षांची रस्ते विकास योजना (सन १९८१ ते २००१) तयार करण्यात आली होती. या योजनेमध्ये सर्व प्रमुख जिल्हा मार्गांनी सर्व नगरांना, राज्य महामार्गांनी सर्व प्रशासकीय मुख्यालयांना, आणि अन्य जिल्हा मार्गांनी १०००-१५०० इतकी लोकसंख्या असणाऱ्या गावांना, जोडणाऱ्या अशा २,०७,३४८ कि.मी. रस्त्यांच्या प्रती १०० चौरस मीटर क्षेत्रासाठी ६७.४ कि.मी. इतक्या वाढीव घनतेसह विकास करण्याचे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवले होते. सन १९९७ मध्ये या योजनेचा आढावा घेण्यात आला होता आणि अशा २,०७,३४८ कि.मी. इतक्या लांबीच्या रस्त्यांचे लक्ष्य वाढवून ते प्रती १०० चौरस मीटर इतक्या क्षेत्रासाठी ८७.७ कि.मी. इतक्या घनतेसह २,७०,०१० कि.मी. इतके ठेवण्यात आले. राज्य शासनाने, २,४१,७१२ इतक्या लांबीचे रस्ते विकसित केले आणि प्रती १०० चौरस मीटर क्षेत्रासाठी ७८.६ कि.मी. इतकी घनता साध्य केली.

भारतीय रस्ते महामंडळाच्या **व्हिजन-२१** या दस्तऐवजांवर आधारित, राज्य शासनाने, वाहनांची ये-जा शीघ्रतेने व विनाव्यत्यय होण्यासाठी ३,३६,९९४ कि.मी. रस्त्यांचे जाळे पूर्ण करण्याचे, प्रति १०० चौरस कि.मी. क्षेत्रासाठी १०९.५ कि.मी. इतकी रस्त्याची घनता साध्य करण्याचे लक्ष्य निर्धारित करणारी आणखी दुसरी २० वर्षांची रस्ते विकास योजना तयार केली आहे. राज्याचे पूर्वेकडील टोक पश्चिम टोकास जोडता येईल आणि उत्तरेकडील टोक दक्षिण टोकास जोडण्यात येईल अशा पद्धतीने विकसित करावयाचे ७०३५ कि.मी. इतक्या एकूण लांबीचे १५ रस्ते, निश्चित करण्यात आले आहेत आणि या पाठोपाठ हे जाळे (नेटवर्क) आंतरराज्यीय दळणवळण आणि वाणिज्यिकीकरण यांसाठी राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्यामध्ये (नेटवर्क) परिवर्तित करण्यात आले आहेत. या रस्त्यांवरील प्रत्येक १०० कि.मी. अंतर सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज करण्यात येईल. या योजनेमध्ये, औद्योगिक केंद्रे, यात्रेकरू केंद्रे आणि पर्यटन व वाणिज्यिक महत्त्वाची ठिकाणे राज्य महामार्गांशी चांगल्या प्रकारे जोडणे ही बाब दृष्टीसमोर ठेवली आहे.

तक्ता १३.१ खाली सन २००१-२०२१ करिता विद्यमान आणि लक्ष्यित रस्त्यांची लांबी दर्शविली आहे;

तक्ता १३.१
रस्त्यांची विद्यमान व लक्ष्यित लांबी (२००१-२०२१)

अ.क्र.	रस्त्याचा प्रवर्ग	विद्यमान रस्त्याची लांबी (कि.मी.)	लक्ष्यित रस्त्याची लांबी (कि.मी.)
१	२	३	४
१	राष्ट्रीय महामार्ग	४३७६	४५०९
२	राज्य महामार्ग/द्रुतगती मार्ग	३४१०३	४३६०१
३	प्रमुख जिल्हा मार्ग	४९९३६	५१९९३
४	इतर जिल्हा मार्ग	४६८९७	६११५९
५	ग्राममार्ग	१०६४००	१७५७३२
६	**एकूण**	**२४१७१२**	**३३६९९४**

स्रोत: सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

अपुऱ्या पायाभूत सुविधेचा परिणाम, कमी कार्यक्षमता, कमी उत्पादकता, अधिक वाहतूक खर्च आणि प्रमुख बाजारपेठांचा अपुरा प्रवेश असा होतो, ही वस्तुस्थिती आहे. याशिवाय, योग्य वाहतुकीच्या पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणातील औद्योगिक क्षेत्राचे विकेंद्रीकरण करण्याचे उद्दिष्ट साध्य होत नाही. औद्योगिक क्षेत्राच्या पुरेशा प्रमाणातील विकेंद्रीकरणाचा अभाव हे देखील, नागरीकरणामध्ये वाढ होण्याचे आणि ज्यामुळे प्रमुख शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होतात असे नागरी क्षेत्रातील मोठ्या प्रमाणातील स्थलांतर हे अनेक प्रमुख कारणांपैकी एक कारण आहे.

एखाद्या विकेंद्रीकृत औद्योगिक क्षेत्रासाठी, उत्पादन युनिटाकरिता कच्च्या सामग्रीची आणि प्रमुख बाजारपेठांकरिता तयार मालाची शीघ्रतेने ने-आण करणे ही, पूर्व-आवश्यक बाब आहे आणि म्हणून, रस्त्यांसारख्या पायाभूत सुविधांचा वेगाने विकास होणे, अनिवार्य आहे. पुढील रीतीने रस्ते विकास कार्यक्रमाची तातडीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे :-

१. विद्यमान दोन पदरी राष्ट्रीय महामार्गांचे चार पदरी महामार्गामध्ये रूपांतर करण्यात यावे.

२. वेगवान प्रवास सुकर करण्यासाठी प्रमुख वाहतूक मार्गांवर द्रुतगती मार्ग बांधण्यात यावेत.

३. लवकरात लवकर १५० कि.मी. लांबीचा मुंबई-नाशिक द्रुतगती मार्ग बांधण्यात यावा.

४. प्रमुख औद्योगिक केंद्रे, वाणिज्यिकदृष्ट्या व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे, राज्य महामार्गांनी जोडण्यात यावीत.

५. ७०३५ कि.मी.चा समावेश असलेल्या (भविष्यात,आंतरराज्यीय दळणवळण व वाणिज्यिकीकरण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांमध्ये परिवर्तित करावयाच्या) १६ मार्गांचे जाळे (नेटवर्क) निश्चित करण्यात आले आहे. त्याचा लवकरात लवकर

विकसित करण्यात यावा.

६. जिल्हा ते जिल्हा मुख्यालये, दुपदरी मार्गांनी जोडण्यात यावेत.

७. तालुका मुख्यालये एक पदरी व अर्धे पदरी मार्गांनी जोडण्यात यावे.

८. १५०० व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे जिल्हा मार्गांनी जोडण्यात यावीत आणि प्रमुख जिल्हा मार्गांपैकी ४०% जिल्हा मार्गांचे दुपदरी मार्गांमध्ये रूपांतर करण्यात यावे.

९. १०००–१५०० लोकसंख्या असलेली गावे अन्य जिल्हा मार्गांनी जोडण्यात यावीत.

१०. सर्व गावे किमान *सर्व ऋतुंमध्ये* वापरता येतील अशा एका तरी रस्त्याने जोडण्यात यावीत.

११. जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी वर्तुळाकार मार्ग तयार करण्यात यावेत.

१२. तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी उपमार्ग (बायपास) बांधण्यात यावेत.

राज्याच्या अर्थसंकल्पीय सहाय्य केंद्रीय मार्ग निधीतून, राष्ट्रीय विकास व ग्रामीण विकास बँक आणि सार्वजनिक खाजगी सहभाग यांच्यामार्फत प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांसारख्या रस्त्यांच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार आहे. याच पद्धतीने, जिल्हा नियोजन समिती, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, अतिरिक्त प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, जनजाति उपयोजना, संसद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास आणि विधानसभा सदस्य (आमदार) निधी यांद्वारे दिलेल्या निधीमार्फत अन्य जिल्हा मार्ग व गाव मार्ग विकसित करण्यात येतील.

१३.१.१ राष्ट्रीय महामार्ग (रा.म.), राज्य महामार्ग (रा.म.) व प्रमुख जिल्हा मार्ग (प्र.जि.मा.)

राष्ट्रीय महामार्गाची आणि राज्य स्तरावरील मार्गाची प्रवर्गनिहाय आणि रेखीव व एकपदरनिहाय, (३.७५ मीटर) लांबीची स्थिती जोडपत्र १३.१ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

१३.१.२ राज्यस्तरीय रस्ते निधीकरण योजना खालीप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

१. प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्ग यांच्या विकासाकरिता राज्य अर्थसंकल्प.

२. प्रमुख जिल्हा मार्गांच्या विकासाकरिता आणि गाव मार्गांवर त्याचबरोबर राज्य महामार्गांवर व जिल्हा महामार्गांवर पुलांचे बांधकाम करण्यासाठी राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) कडील कर्ज घटक.

३. राज्य महामार्गांचे व प्रमुख जिल्हा मार्गांचे रूंदीकरण व सुधारणा करण्याकरिता भारत सरकारकडून केंद्रीय मार्ग निधी.

४. आदिवासी क्षेत्रामधील राज्य क्षेत्रीय मार्गांकरिता जनजाति उपयोजना.

५. प्रकल्पांच्या सुसाध्यतेच्या आधारावर सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांमार्फत खाजगी क्षेत्रातील गुंतवणुका.

१३.१.३ राज्य क्षेत्रीय मार्गांसाठी निधीकरणाच्या शक्य असणारे स्रोत तक्ता १३.२ मध्ये थोडक्यात दिले आहेत.

तक्ता १३.२
सर्व रस्त्यांकरिता निधीचा स्रोत

(रुपये कोटीत)

अ.क्र.	रस्ता प्रवर्ग	एकूण लांबी (किमी)	निधीचा शक्य स्रोत (२०११-१२ जिल्हा दर सूचीनुसार)				
			बीओटी (बांधा, वापरा व हस्तांतरित करा)	राज्यस्तर/ केंद्रीय मार्ग निधी	नाबार्ड	जनजाति उपयोजना	एकूण
१	२	३	४	५	६	७	८
१	राष्ट्रीय महामार्ग	४५०९	०	०	०	०	०
२	द्रुतगती मार्ग	८१२	५८४०	४४	०	०	५८८४
३	प्रमुख राज्य महामार्ग	७०३५	७०१७	२८२७	०	०	९८४४
४	राज्य महामार्ग	३५७५५	७८७४	१६१८६	१९२	०	२४२५१
५	प्रमुख जिल्हा मार्ग	५१९९४	१	८०५२	३०१७	१०९३	१२१६२
६	इतर जिल्हा मार्ग*	६११५९	०	०	२६१	०	२६१
७	ग्राम मार्ग*	१७५७३१	०	०	६२४	०	६२४
	एकूण**	३३६९९४	२०७३१	२७१०८	४०९३	१०९३	५३०२५

*इतर जिल्हा मार्ग व ग्राम मार्ग यावरील पूल**आकडेवारीच्या पूर्णांकामुळे एकूण आकडेवारी वेगळी असू शकेल.

स्रोत: सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

सार्वजनिक खाजगी सहभागाअंतर्गत (बांधा, वापरा व हस्तांतरित करा) राज्याने २०% इतकी निधीतील तफावत कमी केली आहे व केंद्र सरकारने कमाल २०% इतकी निधीतील तफावत कमी केली आहे.केंद्र सरकारकडून निधीतील कमी केलेली तफावत थेटपणे संबंधित उद्योजकाकडे जाते. म्हणून, सरकारच्या स्तरावर कोणताही बदल झालेला नसल्यास, सार्वजनिक खाजगी सहभागाअंतर्गत एकूण आवश्यकता असलेल्या रकमेच्या कमाल २०% इतकी रक्कम, जी रुपये ४१४६ कोटी इतकी आहे त्या रकमेचे केंद्र सरकारकडून अंशदान दिले जाऊ शकते. रुपये १६५८५ कोटी इतक्या उर्वरित रकमेपैकी, रुपये ४१४६ कोटी इतकी राज्याची रक्कम असेल आणि रुपये १२४३९ कोटी इतकी शिल्लक रक्कम उद्योजकाकडून येईल. २०१२-१३ मध्ये हे राज्य क्षेत्र रस्त्यांचे लक्ष्य साध्य करण्यासाठीचा अंदाजित खर्च रुपये ३८२६२ कोटी इतका आहे (प्रति वर्ष ५ टक्के दराने चलनवाढ धरून).

१३.१.४ रत्नागिरी-सोलापूर-नांदेड-यवतमाळ-नागपूर प्रमुख राज्य महामार्ग-६ यांचे द्रुतगती मार्गात रूपांतर करणे.

रस्ते विकास योजना १९८१-२००१ मध्ये, वर नमूद केलेल्या रस्त्यास प्रमुख राज्य महामार्ग-३ म्हणून आणि रस्ते विकास योजना २००१-२१ मध्ये प्रमुख राज्य महामार्ग-६ म्हणून संबोधले जाते. आता, २०१३ या वर्षात रत्नागिरी पासून सोलापूर पर्यंत जोडलेला रस्ता ३६९ कि.मी., राष्ट्रीय महामार्ग-१६६ म्हणून घोषित केलेला आहे. सोलापूरपासून तुळजापूरपर्यंत जोडलेला रस्ता (४०कि.मी.) राष्ट्रीय महामार्ग-२११ म्हणून यापूर्वीच घोषित केलेला आहे आणि २०१३ या वर्षात तुळजापूर पासून नागपूरपर्यंत जोडलेला रस्ता (४९५ किमी) राष्ट्रीय महामार्ग-३६१ म्हणून घोषित केलेला आहे. हे रस्ते महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्राला मध्य प्रदेश सीमेजवळच्या पाठीमागील प्रदेशाला जोडतात. हे रस्ते विकसनशील प्रदेशांमधून जातात आणि त्यांचा विकास हा, मराठवाडा व विदर्भ प्रदेशांच्या एकूण विकासासाठी अतिशय महत्त्वाचा असेल. हे जोड रस्ते अद्यापि राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प कार्यक्रमात अंतर्भूत करावयाचे आहेत आणि अशाप्रकारे ते चौपदरीकरणासाठी घेतले जाऊ शकत नाहीत. सध्याची संकल्पन मानके लक्षात घेता, रत्नागिरीपासून नागपूरपर्यंतच्या चारपदरी रस्त्याचा (९०४ कि.मी.) एकूण खर्च अंदाजे रुपये १३५०० कोटी इतका असेल (२०१२-१३ ची जिल्हा दर सूची) हा एक राष्ट्रीय महामार्ग असल्याने, केंद्राकडून निधी येणे अपेक्षित आहे.

१३.१.५ सागरी महामार्ग

सागरी महामार्ग म्हणजे प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक ४ हा, राष्ट्रीय महामार्ग-१७ ला समांतर असणाऱ्या राज्याच्या सागरी प्रदेशाबरोबर जातो. तो ठाणे जिल्ह्यातील झाई येथून सुरु होतो आणि रायगड व रत्नागिरी या जिल्हयांतून जाऊन नंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी येथे संपतो. सागरी महामार्गाच्या बाजूने दिघी, जयगड, दाभोळ, रत्नागिरी, जैतापूर, विजयदुर्ग, देवगड व रेडी ही राज्य बंदरे आहेत. या सागरी महामार्गाची एकूण लांबी ७८७ कि.मी. इतकी आहे. या महामार्गामध्ये ५१ मोठया व लहान पुलांचा अंतर्भाव होतो, त्यांपैकी ४१ पूल पूर्ण झालेले आहेत, सात पुलांचे काम चालू आहे आणि तीन पुलांचे काम अद्याप हाती घ्यावयाचे आहे. राज्य महामार्ग मानकांनुसार म्हणजे दु-पदरी (७.०० मीटर) वाहन मार्ग असणारा, असा हा महामार्ग पूर्ण करण्यासाठी २०१२-१३ च्या जिल्हा दर सूचीनुसार, जमीन संपादनाच्या खर्चासह एकूण खर्च अदमासे रुपये २००० कोटी इतका असेल.

१३.१.६ इतर जिल्हा मार्ग (इजिमा) व ग्राम मार्ग (ग्रामा)

प्रवर्गनिहाय तसेच लांबीनुसार आणि एक-पदरनिहाय (३.७५ मीटर) विद्यमान जिल्हा रस्त्यांच्या लांबीची स्थिती ही, जोडपत्र १३.२ मध्ये दर्शविलेली आहे.

१३.१.७ जिल्हा स्तरावरील रस्त्यांच्या निधीची योजना

१. ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समिती निधी.

२. इतर जिल्हा मार्ग व ग्राम मार्ग यांसारखी ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी भारत सरकारकडून प्रधानमंत्री ग्राम सडक योजना वित्तीय सहाय्य.

३. आदिवासी क्षेत्रातील स्थानिक क्षेत्र रस्त्यांसाठी जनजाति उपयोजना निधी.

४. संसद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास निधी.

५. विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य निधी (आमदार निधी)

१३.१.८ स्थानिक क्षेत्र रस्त्यांसाठी निधीच्या शक्य स्त्रोतांचा तक्ता १३.३ मध्ये संक्षेप दिला आहे.

तक्ता १३.३
स्थानिक क्षेत्र रस्त्यांसाठी निधी
निधीचे एकूण शक्य स्रोत (२०११-२०१२ जिल्हा सूचीनुसार)

(रुपये कोटीत)

अ.क्र.	प्रवर्ग	एकूण लांबी (कि.मी.)	प्रधानमंत्री ग्राम सडक योजना	अतिरिक्त प्रधानमंत्री ग्राम सडक योजना	इतर जिल्हा मार्ग	जनजाति उप योजना	एकूण राज्य शासन
१	२	३	४	५	६	७	८(६+७)
१	इतर जिल्हा मार्ग	६११५९	६४८३	४७९	५३८२	५५९	५९४२
२	ग्राम मार्ग	१७५७३१	१३०६२	२३८०	२४०९५	३६४७	२७७४१
	एकूण	**२३६८९०**	**१९५४५**	**२८५९**	**२९४७७**	**४२०६**	**३३६८३**

* प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व अतिरिक्त प्रधानमंत्री ग्राम सडक योजना या १००% केंद्र पुरस्कृत योजना आहेत.म्हणून, वरील आकडेवारी निधीच्या शक्य स्रोतामध्ये विचारात घेतली नाहीत.

स्रोत : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

चलनवाढ विचारात घेता, स्थानिक क्षेत्र रस्ता लांबीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी २०१२-१३ मध्ये आवश्यक अंदाजित निधी रुपये ३५,३६७ कोटी इतका असेल.

१३.१.९ ग्राम संपर्क यंत्रणा

२००१ च्या जनगणनेनुसार, २९१ गावांची संपर्क यंत्रणा अद्याप सिध्दिस न्यावयाची आहे. ही गावे महाराष्ट्रातील सर्व प्रदेशांमध्ये, पण बहुसंख्येने गडचिरोली, ठाणे, रायगड, सातारा, नंदुरबार व बुलढाणा या जिल्हयांतील आदिवासी, डोंगराळ किंवा डावा जहाल मतवादग्रस्त क्षेत्रांमध्ये वसलेली आहेत. रस्तेजोडणी न झालेल्या गावांचा तपशील तक्ता १३.४ मध्ये दिलेला आहे.

तक्ता १३.४

रस्ते जोडणी न झालेल्या गावांची संख्या

अ.क्र.	रस्ते जोडणी न झालेल्या गावांचा तपशील (कारणे)	गावांची संख्या
१	२	३
१	वन जमीन	७३
२	डोंगराळ व दुर्गम क्षेत्र	१४
३	खाजगी जमीन	२७
४	विविध योजनांखालील प्रस्तावित कामे	२२
५	खाडी/बेट	२८
६	नक्षल (डावा जहाल मतवाद) ग्रस्त क्षेत्र	३५
७	जलमग्न क्षेत्र	३९
८	चालू असलेली कामे	५३
	एकूण	**२९१**

स्रोत : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

गावांच्या संपर्क यंत्रणेकरिता गावाच्या रस्त्यांचे प्रत्यक्ष प्रमाण हे, ३.७५ मीटर रुंद वाहनमार्ग तसेच रस्त्याच्या प्रत्येक बाजूच्या पन्हळीसह दोन्ही बाजूंना १.५ मीटर इतकी उतरती बाजू, असे आहे. या बांधकामासाठी जमिनीची किमान रुंदी १० मीटर एवढी आवश्यक आहे. रस्त्यासाठीचा थर हा, त्या क्षेत्रातील मातीची अवस्था व पर्जन्यमान यांवर अवंलबून असतो. यासाठीचा प्रति किलोमीटर सरासरी खर्च रुपये ७० ते ८० लाख एवढा आहे. सध्या या गावांच्या संपर्क यंत्रणेचे काम १३ वा वित्त आयोग कार्यक्रम (सार्वजनिक) बांधकाम विभागाद्वारे, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व अतिरिक्त प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (ग्राम विकास विभागाद्वारे) आणि किमान गरजा कार्यक्रम (ग्राम विकास विभागाद्वारे) यांच्यामार्फत हाती घेण्यात आले आहे.

१३.१.१० सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्त्वावर रस्ते

१३७ प्रकल्पांमध्ये, प्रकल्प निधीतील तफावत कमी करून, रुपये १४४७८ कोटी एवढी खाजगी गुंतवणूक स्वीकारून सुमारे ४६८५ कि.मी. लांबीचे रस्ते पूर्ण करण्यात येतील असे समितीला कळविण्यात आलेले आहे. यांपैकी १७३३ कि.मी. लांबीच्या दोन पदरी रस्त्यांचे ९० प्रकल्प, रुपये ८६५ कोटी खर्च करून अगोदरच पूर्ण करण्यात आले आहेत. रुपये १८९४ कोटी खर्चाचे, ५७३ कि.मी.लांबीच्या चार पदरी रस्त्यांचे आणखी १४ प्रकल्प देखील पूर्ण करण्यात आले आहेत. रुपये ४३४५ कोटी खर्चाच्या व ७९९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या १२ प्रकल्पांचे काम चालू आहे. १५८० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे व रुपये ७३७४ कोटी खर्चाचे २१ प्रकल्प सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. प्रकल्प निधीतील तफावत कमी करण्याकरिता तरी निदान, राज्य शासनाने पुरेसा निधी पुरविणे आवश्यक असेल. निधीतील तफावत कमी न होण्याच्या या मुद्यावर अधिक भर दिला जाऊ नये.

१३.१.११ बंदरांपर्यंतची रस्ते संपर्क यंत्रणा

कोकण प्रदेशाचा विकास मोठया प्रमाणावर बंदर विकासावर देखील अवलंबून आहे. बंदराचा विकास हा बंदराच्या पलिकडच्या प्रदेशांपर्यंत रस्ते जोडणी व विनाव्यत्यय प्रवेश यांवरच अवलंबून आहे. म्हणून, बंदरापर्यंतच्या संपर्क यंत्रणेमध्ये सुधारणा करणे आणि पूर्व-पश्चिम जोडमार्ग विकसित करून बंदरांतील वाहतूक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ (मुंबई-गोवा) वर आणणे आवश्यक आहे. सागरी पट्ट्यावर अनेक बंदरे विखुरलेली आहेत. सध्या या बंदरांची विकास कामे चालू आहेत. लहान पूर्व-पश्चिम जोडमार्गांचा विकास करून या बंदरांना राष्ट्रीय महामार्ग १७ शी जोडता येईल. सध्या या जोडमार्गांचे बंदरावरील अवजड वाहतुकीच्या दृष्टीने संकल्प केलेले नाही. अशाप्रकारे, एकूण ७१९ कि.मी. लांबीचे असे २० जोडमार्ग आहेत. ज्यांच्या दर्जात वाढ करण्याची गरज आहे. समितीला असे सांगण्यात आले की, बंदरांच्या विकासाकरिता गृह (परिवहन) विभागाने अगोदरच २०१० मध्ये एक धोरण जाहीर केले आहे. या धोरणामध्ये असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहेकी, बंदर विकासकाने बंदराच्या सीमेपासून जवळच्या राष्ट्रीय महामार्गापर्यंत सहा पदरी /आठ पदरी सिमेंट-काँक्रीटचे रस्ते बांधले पाहिजेत. तथापि, कोणताही बंदर विकासक या कामासाठी पुढे आला नाही तर, बंदर संपर्क यंत्रणा ही एक प्रश्न होऊन बसेल. म्हणून, राज्याने या जोडमार्गांचे काम (सध्या जवळपास सुमारे १७ मार्ग, कारण दिघी, रेवस व निवाळी-जयगड या इतर ३ मार्गांचे बांधकाम सध्याच्या विकासकांनी अगोदरच हाती घेतलेले आहे.) हाती घेणे उचित ठरेल, जेणेकरून कोकणच्या व बंदरप्रदेशांच्या विकासामध्ये अनावश्यक विलंब होणार नाही. या तीन बंदरांपैकी, निवाळी-जयगड रस्त्याचे बांधकाम हे, निधीतील तफावत कमी करण्यासाठी केंद्रीय सहाय्याने सुरू होणे अपेक्षित आहे आणि अन्य दोन रस्त्यांची बांधकामे प्रारंभिक टप्प्यावर आहेत. राज्याला, एकूण ६१३ कि.मी. लांबीच्या उर्वरित १७ जोडमार्गांकरिता तरतूद करता येईल. २०१२-१३ मधील अंदाजित खर्च सुमारे रुपये ९७०० कोटी एवढा असेल.

१३.२ रेल्वे जाळयांचा (नेटवर्क) विकास व विस्तार

आधुनिक (जागतिकदृष्टया एकत्रित अशा) अर्थव्यवस्थेचा पोषक विकास व वाढ यांकरिता इतर स्वरूपातील संपर्क यंत्रणा व्यतिरिक्त ग्रामीण, जिल्हा, राज्य व उर्वरित देश यांचा समावेश असलेले प्राथमिक-रस्त्यांचे-जाळे (नेटवर्क) हे अधिक प्रमाणात नसली तरी समान प्रमाणात महत्वाचे आहे. या संपर्क यंत्रणेमध्ये रेल्वे, बंदर व विमानतळ संपर्क यंत्रणेचा समावेश होतो, पण ब्रॉडबँड जोडण्यांबद्दल येथे उल्लेख केलेला नाही. या संदर्भात, अशा संपर्क यंत्रणेची, विशेषकरून राज्याच्या मागास प्रदेशांतील उणीव भरून काढणे गरजेचे आहे. म्हणून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात या संपर्क यंत्रणेचा निश्चित लाभ होईल अशा रीतीने आपण या कार्यात प्रगती करणे, अत्यावश्यक आहे.

पूर्वीच्या काळी रेल्वेमार्ग हे अग्रदूत म्हणून काम करीत व खरोखरच प्रगतीचे व विकासाचे साधन होते. भारताचा इतिहासदेखील ब्रिटिश राजवटीच्या काळातील रेल्वे जाळयाच्या (नेटवर्क) बांधकामाच्या मोठया प्रमाणातील कार्याचा साक्षीदार आहे. ब्रिटीशांचा बंदरांवरून जहाजाने माल आपल्या देशात परत पाठवता येण्याच्या दृष्टीने, या बंदरांसह सभोवतालचा प्रदेश रस्त्यांनी जोडण्यामागे, या देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या हिताचा विचार जरी त्यामागे अधिक होता तरी सुध्दा, रेल्वे मार्गाजवळ व विशेषकरून रेल्वे स्थानकांच्या सभोवताली मोठी शहरे विकसित झाली हे उघड आहे. रेल्वेमुळे, स्थानिक अर्थव्यवस्थेमधील व्यापार व वाणिज्य यांवर स्पष्ट सकारात्मक परिणामासह कच्च्या व तयार मालाच्या वाहतुकीसच केवळ मदत होत नाही, तर जलद व पर्यावरणास अनुकूल असणाऱ्या अशा प्रवासी वाहतुकीस देखील मदत होते. लोकांच्या दळणवळणाने एकीकडे मोठया प्रमाणात संधी व शक्यता निर्माण होते तर, दुसरीकडे जे अर्थव्यवस्थेकरिता नेहमीच फायद्याचे ठरते अशा अभ्यागत/पर्यटकांना आकर्षित करते.

या दृष्टीने पाहता, ज्यांमुळे राज्यातील स्थानिक अर्थव्यवस्थांचे व जनतेचे मोठया प्रमाणावर एकत्रीकरण होईल असे, (आंतरबाह्य दृष्टीने) विविध प्रदेश एकत्र जोडले जातील याबाबत योग्य विचार करून आखलेले व वास्तववादी कार्यक्रम

महाराष्ट्राकडे आहेत. अर्थात, याकरिता राज्याचा सहभाग ओघाने असला तरी, मूलत: केंद्र सरकारचा पुढाकार आवश्यक असल्यामुळे, केंद्र सरकारने या प्रयोजनाकरिता मंजुरी द्यावी म्हणून राज्याने आपल्या वतीने त्याचे मन वळवण्याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहे.

